महाराष्ट्र शासन

राज्यातील सिंचनाची प्रगती व भविष्यातील वाटचाल.

श्वेतपत्रिका

परिशिष्टे

(खंड - २)

जलसंपदा विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

नोव्हेंबर-२०१२.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत प्रकल्प निहाय टिपणी.

अ नु क्र म णि का

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
अ)	**मोठे प्रकल्प**		
१	भीमा (उजनी)	१	५
२	कुकडी	७	११
३	वारणा	१३	१७
४	दूधगंगा	१९	२४
५	कृष्णा	२५	३०
६	चासकमान प्रकल्प	३१	३५
७	नीरा देवघर	३७	४०
८	उरमोडी	४१	४४
९	भामा आसखेड	४५	४८
१०	गुंजवणी	४९	५२
११	धोम बलकवडी	५३	५६
१२	भीमा सीना जोड कालवा	५७	५९
१३	तारळी	६१	६४
१४	सांगोला शाखा कालवा	६५	६८
१५	सीना कोळेगाव	६९	७२
१६	टेमघर	७३	७५
१७	नवीन दरवाजेयुक्त खोडशी बंधारा.	७७	७९
ब)	**उपसा सिंचन योजना**		
१	कृष्णा कोयना	८१	८८
२	टेंभू	८९	९२
३	वाकुर्डे	९३	९६
४	जनाई शिरसाई	९७	१०१
५	पुरंदर	१०३	१०७
६	कवठे केंजळ	१०९	१११
७	वसना	११३	११५
८	वांगणा	११७	११९
९	धनगरवाडी	१२१	१२२
१०	हणबरवाडी	१२३	१२४
११	जिहे कठापूर	१२५	१२९
१२	सीना माढा	१३१	१३३
१३	दहिगाव	१३५	१३७
१४	शिरापूर	१३९	१४१
१५	आष्टी	१४३	१४४
१६	सांगोला	१४५	१४६
१७	बार्शी	१४७	१४९
१८	एकरूख	१५१	१५३

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
१९	शिराळा	१५५	१५६
क)	**मध्यम प्रकल्प**		
१	आंद्रा मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे	१५७	१५९
२	कलमोडी मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे	१६१	१६३
३	चिल्हेवाडी मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे	१६५	१६६
४	कुडाळी मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा	१६७	१७०
५	मोरणा (गुरेघर) मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा	१७१	१७३
६	नागेवाडी मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा	१७५	१७६
७	उत्तरमांड मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा	१७७	१७९
८	वांग मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा	१८१	१८३
९	कडवी मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	१८५	१८७
१०	पाटगाव मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	१८९	१९१
११	घटप्रभा मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	१९३	१९५
१२	जांबरे मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	१९७	१९९
१३	सर्फनाला मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	२०१	२०३
१४	धामणी मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	२०५	२०८
१५	आंबेओहोळ मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर	२०९	२११
१६	पिंपळगाव (ढाळे) मध्यम प्रकल्प, जिल्हा सोलापूर	२१३	२१५
१७	सिना मध्यम प्रकल्प, जिल्हा अहमदनगर	२१७	२१९
१८	बेनितुरा मध्यम प्रकल्प, जिल्हा उस्मानाबाद	२२१	२२३
१९	मेहेकरी मध्यम प्रकल्प, जिल्हा बीड	२२५	२२८

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
भीमा (उजनी) प्रकल्प, जि.सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव : भीमा (उजनी) प्रकल्प	तालुकाः माढा		जिल्हा : सोलापूर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	२५९५३९ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) २२७७०८ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता (पवनासह)	२०/०८/१९६४	१९६२-६३	४०.५१	१२१४४०
	सुप्रमा-१ (पवना वगळून)	०७/०४/१९७६	१९७४-७५	११३.०८	१२१४४०
	सुप्रमा-२ (पवना वगळून)	१७/०१/२००४	२००१-०२	१४०५.६७	२५९५३९
	सुप्रमा-३ (पवना वगळून)	(प्रस्तावित)	२०१०-११	१९९२.७८	२५९५३९
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)			नियोजन विभागाचे पत्र क्र. २(२)/ २२/दि.२४.३.१९६५ अन्वये गुंतवणूकीस मान्यता प्राप्त रू.४२.५७ कोटी.	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी			१२४४.००	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ८४.३१				
	५.२ बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ९०७.८९				
	५.३ इटीपी खर्च (रु.कोटी) = २५१.८०				
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९६५-६६	
	६.१ प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९६६	
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत, (पवना घटक वगळून) रु.कोटी			३४.९१	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	वाढीची टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२४.६१	६३४.७२	६१०.११	३१.१६
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	७.८२	२२२.५५	२१४.७३	१०.९७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	६४२.७७	६४२.७७	३२.८३
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	५.७६	५.७६	०.२९
७.५	ईटीपी व इतर कारणे	८.०८	४८६.९८	४८४.५०	२४.७५
	एकूण	**४०.५१**			
	एकूण भीमा (उजनी) पवना घटक वगळून	**३४.९१**	**१९९२.७८**	**१९५७.८७**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती: सन १९६४ च्या मूळ प्रकल्प अहवालानुसार उजनी प्रकल्पामध्ये पवना नदीवर पवना धरण व भीमा नदीवर उजनी धरण बांधण्याचे नियोजन होते. त्यानंतर पवना व उजनी धरणास स्वतंत्र मान्यता देण्यात आल्या.मूळ अहवालानुसार उजनी धरणाची साठवण क्षमता ११०.७८ टीएमसी असून, वार्षिक पाणी वापर ८४.५९ टीएमसी आहे. व उपयुक्त पाणीसाठा ५०.७८ टीएमसी व अचल पाणीसाठा ६०.०० टीएमसी इतका आहे. मूळ प्रकल्प अहवालानुसार उजनी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्याव्दारे ११२९४० हेक्टर व उजनी जलाशयातून खाजगी उपसाव्दारे ८५०० हे असे एकूण १२१४४० हे. सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन होते. सुधारीत प्रकल्प अहवालानुसार उजनी प्रकल्पाची साठवण क्षमता ११७.२५ टीएमसी, उपयुक्त पाणी साठा ५३.५८ टीएमसी व वार्षिक पाणी वापर ८३.९४ टीएमसी इतका आहे. तसेच सिंचन क्षेत्र २५९५३९ हे. इतके आहे.

उजनी धरणाचे काम स्व. यशवंतराजी चव्हाण तत्कालीन मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते दिनांक ७.३.१९६६ रोजी सुरु झाले व सन १९८० रोजी १०० टक्के पाणीसाठा निर्माण झाला. सन १९८६ मध्ये सोलापूर जिल्हयातील दुष्काळी तालुक्यांना उजनी प्रकल्पाचे लाभ देण्यासाठी सदर प्रकल्प बारमाही ऐवजी आठमाही करण्यात आला. त्यामुळे प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेत १३८०९९ हेक्टरने वाढ झाली. त्यासाठी मुख्य व शाखा कालव्याची लांबी वाढविण्यात आली. उजनी उजव्या कालव्याची मूळ लांबी ११२ किमी वरुन १३२ किमी पर्यन्त वाढविण्यात आली व त्याव्दारे मंगळवेढा तालुक्यातील ११७०४ हेक्टर अतिरिक्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. उजनी डाव्या कालव्याच्या कुरुल शाखा कालव्याची लांबी ३८ किमी वरुन ६५ किमी पर्यन्त वाढविण्यात आली. दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर या तालुक्यांना या शाखा कालव्याव्दारे सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच बेगमपूर शाखा कालव्याची लांबी ३४ वरुन ५५ कि.मी. वाढविण्यात आली व दक्षिण सोलापूर तालुक्यास या शाखा कालव्याव्दारे सिंचनाचा लाभ होणार आहे. देगाव शाखा कालवा नव्याने काढण्यात आला असून त्याची एकूण लांबी ६४ कि.मी. आहे. डाव्या कालव्याच्या विस्तारीकरणाअंतर्गत उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या दुष्काळग्रस्त तालुक्यांतील ४१२८३ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच जलाशय उपसावर २६३८३ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच मुळ मंजूर प्रकल्प अहवालात प्रवाही सिंचनासाठी (११२९४० हे) पीक गुणांक १ होता तो सुधारीत प्रकल्प अहवालात १ ऐवजी १.५२ इतका झाला. तसेच बारमाही ऐवजी आठमाही पीक रचना याप्रमाणे व्याप्तीत बदल झाल्यामुळे प्रकल्पाच्या मुळ सिंचन क्षमतेत १३८०९९ हेक्टरची वाढ झाली आहे. याप्रमाणे उजनी प्रकल्पाची सध्या सिंचन क्षमता २५९५३९ हेक्टर इतकी आहे.

सध्या उजनी प्रकल्पावरील नियोजित २५९५३९ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी २२७७०८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र १९२३०९ हे. इतके असून त्यापैकी ९२००० हेक्टर क्षेत्र उसाचे आहे. या व्यतिरिक्त उजनी जलाशयावर आष्टी, शिरापूर, एकरुख, बार्शी, सिना माढा, दहिगांव, सांगोला, लाकडी, भीमा सिना जोड कालवा व शिराळा अशा एकूण १० उपसा सिंचन योजना नियोजित आहेत. त्यांना स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या उपसा सिंचनाव्दारे एकूण ११५५२४ हेक्टर सिंचनक्षमतेचे नियोजन आहे.

२.०प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता: उजनी प्रकल्पास रु.४०.५१ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने, दिनांक २०/०८/१९६४ रोजी दिली. त्यानंतर शासनाने रु.११३.०८ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक ७/४/१९७६ रोजी दिली. त्यानंतर महामंडळाने रु.१४०५.६७ कोटी किंमतीस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक १७/०१/२००४ रोजी दिली. या प्रकल्पाची सुधारित प्रस्तावित किंमत रू.१९९२.७८ कोटी आहे. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये १२४४.०० कोटी खर्च झाला आहे.

३.० **मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणेः** प्रकल्पाच्या मुळ मान्यतेच्या तुलनेत रु. १९५७.८७ कोटी इतकी वाढ झाली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढः** प्रकल्पाची मूळ मान्यता सन १९६२-६३ च्या दरसुचीवर आधारित होती. आताची अद्ययावत किंमत सन २०१०-११ च्या दरसुचीवर आधारित आहे. त्यामुळे या ४८ वर्षात या कालावधीत दरसुचीमध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ६१०.११ कोटीची वाढ झाली आहे.

३.२.१ **भूसंपादनामुळे झालेली वाढः** मुळ अहवालामध्ये २४७८३ हे. जमीन संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रु. ४.४२ कोटीची तरतूद होती. त्यानंतर प्रकल्पांच्या व्याप्तीमध्ये वाढ झाल्याने ४१००० हेक्टर क्षेत्र संपादन करणे प्रस्तावित आहे व त्यासाठी रू. ८८.५५ कोटी तरतूद आहे. भूसंपादनाच्या क्षेत्रात व दरामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने प्रकल्पाच्या खर्चात रु. ८४.१३ कोटी इतकी वाढ झाली आहे. तसेच कलम १८ / २८ व न्यायालयीन प्रकरणामुळे रु. ६०.०० कोटी वाढ झाली आहे. भूसंपादन खर्चातील एकूण वाढ रु. १४४.१३ कोटी इतकी आहे.

३.२.२ **पुनर्वसनामुळे झालेली वाढः** प्रकल्पाच्या मूळ अहवालाप्रमाणे ४८ गावांना नागरी सुविधा पुरविण्याच्या होत्या. त्यावेळी पुनर्वसन अधिनियम १९७६ अस्तित्वात नसल्याने नागरी सुविधा पुरविण्याबाबत स्पष्टता नसल्याने मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये रु. ३.४० कोटीची ढोबळ तरतूद होती. सविस्तर सर्वेक्षणाअंती प्रकल्पामुळे संपूर्ण बाधीत ५१ गावे व अंशतः बाधीत ३१ गांवे असून प्रकल्पबाधीत ५६३०८ एवढया लोकसंख्याचे पुर्नवसन १०४ पुनर्वसित गावठाणात करण्यात आले. त्यांना पुनर्वसन अधिनियम १९७६ लागू करण्यात आला व त्याप्रमाणे सुरुवातीस १३ नागरी सुविधा व त्यानंतर जादा ५ याप्रमाणे एकूण १८ नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत. यासाठी रु. ७४ कोटीची तरतूद असून, यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ७०.६० कोटी वाढ झाली आहे. भूसंपादन व पुनर्वसनामुळे झालेली एकूण वाढ रु. २१४.७३ कोटी इतकी आहे.

३.३ **व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढः**

(अ) उजनी प्रकल्प मुळ प्रशासकीय मंजूरीप्रमाणे बारमाही पीक रचना पध्दतीवर आधारीत होता.तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. श्री. शंकरराव चव्हाण यांची दिनांक ४.४.१९८६ रोजी सोलापूर येथे बैठक झाली. त्यावेळी सोलापूर जिल्हयातील अवर्षण प्रवण भागास सिंचनाचा लाभ व्हावा अशी दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट व मंगळवेढा तालुक्यातील पुच्छ भागातील सन्माननीय लोकप्रतिनिधीनी मागणी केली. त्यानुसार सन १९८७ मध्ये सोलापूर जिल्हयातील उर्वरित अवर्षण प्रवण भागास जास्तीत जास्त सिंचनाचा लाभ व्हावा म्हणून शासनाने उजनी प्रकल्पावर बारमाही पीक रचने ऐवजी आठमाही पीक पध्दती राबविण्याचा निर्णय घेतला. यामुळे प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेमध्ये १३८०९९ हेक्टर एवढी वाढ झाली. तसेच उजनी प्रकल्पाच्या जलाशयावरील खाजगी उपसा सिंचन क्षमतेत वाढ झाली. यामुळे प्रकल्पाच्या मूळ आराखडयात नसलेल्या २८२ गावांना सिंचनाचा लाभ झाला.

नवीन आठमाही धोरणामुळे भीमा (उजनी) प्रकल्पाच्या कालवे विस्तारीकरणास शासनाने दि. १३/३/१९८७ व १०/४/१९८७ अन्वये मान्यता दिली. त्यानुसार डाव्या कालव्याच्या बेगमपूर शाखा कालव्याची लांबी ३४ कि.मी. वरुन ५२ कि.मी. पर्यन्त, कुरुल शाखा कालव्याची लांबी ३८ कि.मी. वरुन ६३ कि.मी. पर्यन्त, मोहोळ-कारंबा शाखा कालव्याची लांबी ६२ कि.मी. वरुन १७० कि.मी. पर्यन्त व उजनी उजवा कालवा कि.मी. ११२ वरुन १३२ कि.मी. पर्यन्त याप्रमाणे कालव्याचे विस्तारीकरण करण्यात आले. तसेच दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील क्षेत्रासाठी देगांव शाखा कालवा कि.मी. १ ते ६४ या कालव्याचा नव्याने समावेश करण्यात आला. देगांव शाखा कालव्याची वितरण व्यवस्थेसह किंमत रु. ३४१.८२ कोटी आहे. प्रकल्पाच्या पीक रचनेत बदल झाल्याने, व सिंचन क्षमतेत वाढ झाल्याने कालव्याच्या वहन क्षमतेत देखील वाढ झाली. त्यामुळे

कालव्याच्या काही भागात नूतनीकरण करावे लागले. या सर्व कारणामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ५१८.६१ कोटी एवढी वाढ झाली आहे.

(ब) मुळ अहवालात लाभक्षेत्र विकास कामाच्या घटकाचा समावेश नव्हता. सुधारित अहवालात लाभक्षेत्र विकास कामासाठी रू.१२४.१६ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढः मूळ अहवालातील तरतूदी व्यतिरिक्त उजनी धरणाच्या निम्न बाजूच्या लो-लेव्हल बकेट विशेष दुरूस्ती, कर्टेन ग्राऊटींग, गॅलरीतील पाईपची छिद्रे ड्रिल करणे, इत्यादी कामांमुळे प्रकल्पाच्या खर्चात रू.५.७६ कोटी एवढी वाढ झाली आहे.

३.५ आस्थापना व इतर कारणेः-

प्रकल्पाच्या सन १९६४ मध्ये मंजूर झालेल्या मूळ प्रशासकीय मान्यता अहवालात आस्थापनेसाठी रू.२.४८ कोटी एवढी तरतूद होती. अपु-या निधीमुळे व आठमाही पीक पध्दती राबविण्याच्या निर्णयामुळे प्रकल्पाच्या कामांमध्ये वाढ झाल्याने पूर्णत्व कालावधीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे आस्थापना खर्चात रू.४१४.४६ कोटी इतकी वाढ झाली.

मंगळवेढा तालुक्यातील खोल काळया मातीतील काही भागात विशेष उपाय योजना करणे व इतर कामामुळे खर्चात रु. ५७.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे. तसेच कामे चालू असताना उद्‌भवलैल्या लवाद प्रकरणामुळे खर्चात रु. ११.०० कोटी इतकी वाढ झाली आहे.

उजनी धरणाच्या ४१ वक्रव्दारांची उंची ०.५ मीटरने वाढवून धरणाची पूरगृहण क्षमता वाढविण्यात आली आहे. यामुळे धरणात ६.०० टीएमसी जादा पाणी तात्पुरत्या स्वरुपात साठवून पूरनियंत्रण करणे सोईचे झाले आहे. यामुळे खर्चामध्ये रु. १.२८ कोटी वाढ झाली आहे.अशा प्रकारे आस्थापना व इतर कारणामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ४८४.५० कोटी वाढ झाली आहे.

४.०० विलंबाची कारणेः.

४.१ अपु-या निधीमुळे झालेला विलंबः प्रकल्पास सन १९६४ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यांनंतर प्रकल्पास मागणीपेक्षा प्रतिवर्षी कमी निधी प्राप्त झाल्याने प्रकल्पाच्या पूर्णत्वाच्या कालावधीत वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होत आहे.

४.२ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- प्रकल्पास मुळ मान्यता सन १९६४ मध्ये मिळाली. त्यानंतर प्रकल्पाच्या मूळ व्याप्तीमध्ये सन १९८७ मध्ये मोठा बदल करण्यात आला. त्यामुळे प्रकल्पाच्या मूळ सिंचन क्षमतेमध्ये १३८०९९ हेक्टरची वाढ झाल्याने कालवे व वितरणव्यवस्थेच्या कामात वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वाच्या कालावधीत वाढ झाली आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थितीः भीमा (उजनी) प्रकल्पाचे उजनी धरण, उजनी डावा कालवा कि.मी.१ ते १२६, डाव्या कालव्यावरील कुरूल, बेगमपूर, कारंबा शाखा कालव्यांचे काम पूर्ण झाले आहे. आता प्रकल्पाचे उर्वरीत कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रकल्पाच्या एकूण २५९५३९ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी जून २०१२ अखेर २२७७०८ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. सध्या उजनी प्रकल्पाच्या देगांव जोड कालव्याचे व मंगळवेढा तालुक्यातील वितरणव्यवस्थेची कामे अपूर्ण असून ती अपु-या निधीमुळे संथगतीने प्रगतीत आहेत.

६.० उजनी प्रकल्पाचे झालेले प्रत्यक्ष फायदे -

प्रकल्पावर जून २०१२ पर्यंत २२७७०८ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली असून १९२३०९ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. प्रकल्प जरी आठमाही पीकपध्दतीप्रमाणे असला

तरी सुमारे ९२००० हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे पीक घेतले जात आहे. उजनी प्रकल्प होण्यापूर्वी लाभक्षेत्रात ८ साखर कारखाने होते. त्यामुळे जिल्हयात सध्या २३ साखर कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्याव्दारे फक्त साखरेचे उत्पादन न होता इतर सहपदार्थ निर्मिती सुध्दा करण्यांत येते. यामुळे सन २०१०-११ मध्ये अंदाजे कृषी उत्पादनाव्दारे सुमारे रू.३००० कोटीची वार्षिक उत्पन्न मिळाले आहे.

उजनी जलाशयातील पाण्याचा सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुका वगळता इतर सर्व तालुक्यातील शहरांना व उस्मानाबाद शहरास पिण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो. यामध्ये सोलापूर शहर, करमाळा, पंढरपूर, कुर्डुवाडी, सांगोला, अक्कलकोट, मंगळवेढा, इंदापूर इत्यादी शहरांना नगरपालिका व महानगरपालिकेव्दारे एकंदरीत ४२६ गांवे व ३५ लक्ष लोकसंख्येस पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपलब्धता करुन दिली आहे. तसेच १३ औद्योगिक संस्था, २३ साखर कारखाने व १३२० मे. वॅटचे नॅशनल थर्मल पॉवर स्टेशनला पाणीपुरवठा होतो. उजनी धरणाच्या पायथ्याशी १२ मे. वॅट क्षमतेच्या रिव्हर्सीबल टर्बाईनव्दारे वीजनिर्मिती करण्यात येते.

प्रकल्पाची सुधारित किंमत रु. १९९२.७८ कोटी आहे. प्रकल्पाची प्रतिहेक्टरी किंमत रु. ०.७६८ लक्ष असून लाभव्यय गुणोत्तर ३.९४ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
कुकडी प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : कुकडी प्रकल्प	तालुका : जुन्नर , आंबेगांव, शिरुर, पारनेर,श्रीगोंदा,कर्जत, करमाळा		जिल्हा : पुणे, अहमदनगर,सोलापुर.	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र) :-	१५६२७८ हेक्टर	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र) :- १३८३२९		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मूळ प्रशासकीय मान्यता	०८/११/१९६६	१९६५-६६	३१.१८	१०७६२४
	सुप्रमा-१	२२/०२/१९८०	१९७६-७७	१२३.०३	१४०५४१
	सुप्रमा-२	०५/०८/१९९४	१९८९-९०	६९२.१८	१५६२७८
	प्रस्तावित सुप्रमा-३	--	२००७-०८	२१८४.१७	१५६२७८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु. कोटी)	केंद्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त आहे. तथापी तपशिल उपलब्ध नाही.			
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			१९२८.६०	
	५.१	भू-संपादन , पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च कोटी) =१६२.०१			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = १५१८.६९			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) अइतर =२४७.९०			
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९६८-६९	
६.१	प्रकल्पाच्या धरणाची कामे सुरु झाल्याचे वर्ष	येडगांव- सन १९७० वडज - सन १९७४ माणिकडोह-सन १९७४ डिंभे- सन १९७८ पिंपळगांव जोगे- सन १९९२			
६.२	त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु.कोटी)			४३.६५	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	२७.२८	९०५.९२	८७८.६४	४०.८२
७.२	भूसंपादन खर्चातील वाढ	१.९०	१८६.९८	१८५.०८	८.६०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२५५.७२	२५५.७२	११.८७
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२३३.४४	२३३.४४	१०.८४
७.५	इतर कारणे	०.००	२६०.५७	२६०.५७	१२.१०
७.६	इ.टी.पी. मुळे झालेली वाढ	२.००	३४१.५४	३३९.५४	१५.७७
	एकूण	**३१.१८**	**२१८४.१७**	**२१५२.९९**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहितीः -

कुकडी प्रकल्पात एकूण पाच धरणे असून सर्व धरणे पुणे जिल्हयात आहेत. येडगांव धरण व माणिकडोह धरण कुकडी नदीवर,वडज धरण मीना नदीवर, पिंपळगांव जोगे धरण आर नदीवर असून ही सर्व धरणे जुन्नर तालुक्यात तर डिंभे धरण घोड नदीवर असून ते आंबेगांव तालुक्यात आहे .या धरणांची कामे १९७० पासून सुरु होऊन २००१ अखेर पूर्ण झालेली असून त्याद्वारे ३०.५४ अ.घ.फू. उपयुक्त पाणीसाठा करण्यात येत आहे.

एकूण ६७५.५० कि.मी.लांबीचे कालव्याव्दारे पुणे जिल्हयातील आंबेगांव (१५४१८ हे.), जुन्नर (२७११५ हे.) शिरुर (१३८३७ हे.) व अहमदनगर जिल्यातील पारनेर (१४७४० हे.) , श्रीगोंदा (३०६१६ हे.),कर्जत(२९९९० हे.) तसेच सोलापूर जिल्हयातील करमाळा (२४५६२ हे.), या सात दुष्काळ प्रवण तालुक्यातील एकूण १५६२७८ हेक्टर. क्षेत्रास लाभ देण्याचे प्रस्तावित आहे .त्यापैकी जुन २०१२ अखेर १३८३२९ हेक्टर सिंचन निर्मिती साध्य झालेली आहे. सध्या कालव्याच्या अस्तरीकरणाची ५० टक्के कामे निधी अभावी बाकी असल्याने संकल्पित विसर्ग न गेल्याने पुच्छ भागातील कर्जत व करमाळा तालुक्यास सिंचनासाठी नियोजनानुसार पाणी देता येत नाही.

२.० प्रशासकीय मान्यता : कुकडी प्रकल्पास दिनांक ८.११.१९६६ रोजी शासनाने रु. ३१.१८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर दिनांक २२.२.१९८० रोजी शासनाने रु.१२३.०३ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता व दिनांक ०५/०८/१९४ रोजी रु. ६९२.१८ कोटी किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. प्रकल्पावर अद्यावत खर्च रु. १९२८.६० कोटी झाला आहे. प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल शासनास २००४ मध्ये सादर केला होता. त्यानंतर पुन्हा दिनांक २७.२.२००८ रोजी रु. २१८४.१७ कोटी किंमतीचा तृतीय सुधारीत प्रशासकीय अहवाल मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यास अद्याप मान्यता न मिळाल्याने सध्या प्रकल्पाची कामे बंद आहेत.

३.० किंमत वाढीची कारणे : प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.२१८४.१७ कोटी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रु. २१५२.९९ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ : मूळ प्रशासकीय मान्यता सन १९६५-६६ च्या दरसूचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २००७-०८ च्या दरसूचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे. या ४२ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रु. ८७८.६४ कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढ : मूळ अहवालामध्ये ९६२७ हेक्टर जमिन सरासरी रु. १२०० प्रति हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते . त्यासाठी व पुनर्वसनासाठी रु.१.९० कोटी तरतूद होती. सुधारीत प्रशासकीय अहवालामध्ये २१५७७ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. ६१००० प्रति हेक्टर संपादन करणे प्रस्तावित आहे. मूळ प्रशासकीय अहवालामध्ये भूसंपादन कायदा कलम १८ व २८ खालील देय होणा-या रकमेची तरतूद नव्हती परंतु न्यायालयीन निर्णयानुसार तरतूद करण्यात आली. पुनर्वसन कायद्यातील तरतूदीनुसार पुनर्वसनाच्या बाबीवर खास बाब पुनर्वसन, बुडीत क्षेत्रातील पर्यायी रस्ते इ. साठी भूसंपादनासह १८६.८८ कोटी इतकी तरतूद आहे. त्यामुळे रु. १८५.०८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधीची व लाभधाराकांच्या मागण्यामुळे कुकडी प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये वेळोवेळी झालेल्या बदलामुळे प्रकल्प खर्चात रु. २५५.७२ कोटीची वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेत ४८६५४ हेक्टरची वाढ झाली आहे. त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) धरण साठयात वाढ व कालवा लांबीतील वाढ : मूळ अहवालानुसार कुकडी प्रकल्पामध्ये ५ ठिकाणी धरणे बांधणे प्रस्तावित होते. या धरणांचा उपयुक्त पाणीसाठा २७.८७ अ.घ.फू. असून पावसाळयातील पाणी वापरासह प्रकल्पाचा एकूण पाणी वापर ४२.९१ अ.घ.फू. होता. सुधारीत प्रकल्प अहवालानुसार ५ धरणांचा एकूण उपयुक्त पाणीसाठा ३०.५४ अ.घ.फू. असून एकूण पाणी वापर ३८.९० अ.घ.फू. आहे. त्यामुळे पाणीसाठयात २.६७ अ.घ.फू. इतकी वाढ झाली आहे.

यापैकी डिंभे धरणाच्या पाणीसाठयात २.२ अ.घ.फू. वाढीसाठी धरणांची उंची ५ मी. वाढविण्यात आली व पिंपळगांव धरणाचा साठा ०.२९ अ.घ.फू. ने वाढला त्यासाठी पिंपळगांव जोगे धरणाच्या उंचीत २.८१ मी. वाढ करण्यात आली.

मूळ प्रकल्प अहवालामध्ये कुकडी प्रकल्पाची पीकरचना बारमाही होती, त्यानुसार प्रकल्पीय क्षेत्र १०७६२४ हेक्टर होते. दरम्यानच्या काळात आठमाही पिक पध्दती नुसारच्या सुधारित पिक रचनेस शासनाने दि. २०/११/१९८० च्या पत्रान्वये मान्यता दिल्यामुळे सिंचनक्षेत्रामध्ये ४८६५४ हेक्टर वाढ होऊन प्रकल्पीय पिक क्षेत्र १५६२७८ हेक्टर झाले.मूळ प्रकल्प अहवालामध्ये कुकडी डाव्या कालव्याची लांबी विसापूर पर्यंत १२४ कि.मी. होती. ती २४९ कि.मी. पर्यंत वाढली. तसेच ११६ कि.मी. लांबीच्या डिंभे उजव्या कालव्याचा, ७० कि.मी. लांबीच्या पिंपळगांव जोगे डाव्या कालव्याचा, १० कि.मी. लांबीच्या वडज उजव्या कालव्याचा व २३.५० कि.मी. लांबीच्या माणिकडोह डाव्या कालव्याचा नव्याने समावेश करण्यात आला. वरील प्रमाणे पाणीसाठा व सिंचन क्षेत्र वाढल्याने १८७.९५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

ब) वडझिरे, देवीभोयरे व शिवडोह तीन पुच्छ तलावांचा समावेश : अवर्षण प्रवण पारनेर तालुक्यातील पिंपळगांव जोगे धरणावरील पावसाळयातील वाहून जाणा-या पाण्याचा उपयोग करणेकरिता मा.आ.नंदकुमार झावरे ता.पारनेर यांच्या दि.२६/०२/८६ च्या मागणीनुसार व मा.राज्यमंत्री श्री.आण्णासाहेब म्हस्के यांच्या दि.८/०४/८६ रोजीच्या मंत्रालयीन बैठकीतील सुचनेनुसार पिंपळगांव जोगे डाव्या कालव्याच्या शेवटी वडझिरे, देवीभोयरे व शिवडोह या तीन पुच्छ तलावांचा सन १९८८ मधील शासनाच्या तसेच सन १९९८ मधील महामंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार नव्याने समावेश करण्यात आला. त्यामुळे रु. ९.५४ कोटी खर्चात वाढ झाली.

क) शासन धोरणानुसार डिंभे धरणाच्या पायथ्याच्या विद्युतगृहासाठी विमोचकाची तरतूद करणेत आली. त्यामुळे रु.५.५० कोटी खर्चात वाढ झाली.

ड) डिंभे धरणाच्या वरील बाजूस राहणा-या लोकांसाठी दळणवळणाकरिता डिंभे धरणाखाली घोड नदीवर पूल बांधणेत आला. त्यामुळे रु.३.५० कोटी खर्चात वाढ झाली.

इ) मूळ प्रकल्प अहवालामध्ये कुकडी डावा मुख्य कालवा विसापूर तलावापर्यंत होता. शासन धोरणानुसार अवर्षण प्रवण अहमदनगर जिल्हयातील कर्जत व सोलापूर जिल्हयातील करमाळा या तालुक्यातील क्षेत्रास पाण्याचा लाभ देणेसाठी कुकडी डाव्या कालव्याची लांबी वाढविल्यामुळे हंगा नदीवर पूर्वरचित व पूर्वबलित सलोह संधानकामध्ये ४५ मी. लांबीच्या १६ गाळयांचा जलसेतू बांधण्यात आला. त्यामुळे रु.३६ कोटी खर्चात वाढ झाली.

फ) मूळ प्रकल्प अहवालामध्ये कुकडी नदीवर कुमशेत गावाजवळ को.पं. बंधारा वजा पूलाचा समावेश नव्हता, तो बांधणेत आला. त्यामुळे रु.१.७८ कोटी खर्चात वाढ झाली.

ग) डिंभे धरणाच्या बुडीत क्षेत्रातील आदिवासी कुटूंबाच्या उद्योगांसाठी व उन्हाळी हंगामात पिण्यासाठी पाणी उपलब्ध होण्यासाठी तत्कालीन आदिवासी विकास मंत्री मा. ना. मधूकरराव पिचड व तत्कालीन तंत्र शिक्षण व ऊर्जा मंत्री मा.ना. दिलीपराव वळसे पाटील यांचे मागणीनुसार धरणाच्या बुडीत क्षेत्रात ८ बुडीत बंधा-यांचा सन २००४ मध्ये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार समावेश करण्यात आला. त्यामुळे रु.११.५० कोटी खर्चात वाढ झाली.

अशा प्रकारे व्याप्तीतील वाढीमुळे खर्चात एकूण रु. २५५.७२ कोटी खर्चात वाढ झाली.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ : कुकडी प्रकल्पाच्या सविस्तर संकल्पचित्रामुळे प्रकल्प खर्चात रु. २३३.४४ कोटीची वाढ झालेली आहे. त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) धरण सुरक्षा पुनर्विलोकन समितीने पूर नियंत्रणासाठी सुचविलेल्या उपाय योजना : शासनाने नियुक्त केलेल्या धरण सुरक्षा पुनर्विलोकन समितीने पूर नियंत्रणासाठी सुचविलेल्या डिंभे धरणाच्या पॅरापेट भिंतीचे काम, पूर्वबलित सलोह संधानकाच्या पूलाचे काम करणेत आले. त्यामुळे रु.२२.९५ कोटी खर्चात वाढ झाली.

ब) शासन निर्णयानुसार धोरणात्मक बदल :

दि.९.७.२००२ च्या शासन निर्णयानुसार सर्व दगडी बांधकामे संधानकात करण्याचे निर्णय घेण्यात आला. तसेच मूळ प्रकल्प अहवालामध्ये कालव्याचे अस्तरीकरणाची तरतूद नव्हती, सिंचन क्षेत्रात वाढ

झाल्यामुळे कालवा अस्तरीकरणासह संकल्पित करण्यात आला. त्यामुळे रु.१७३.१३ कोटी खर्चात वाढ झाली.

३.५ इतर कारणांमुळे झालेली वाढ :

अ) मूळ प्रकल्प अहवालामध्ये लाभक्षेत्र विकास कामांचा समावेश नव्हता परंतु शासनाचे धोरणानुसार लाभक्षेत्र विकास कामांचा समावेश नव्याने करणेत आला. त्यामुळे रु. २६०.५७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

ब) आस्थापना व अनुषंगिक खर्चामध्ये वाढ : मूळ प्रकल्प अहवालामध्ये रु. २.०० कोटी तरतूद होती. ती सुधारीत प्रशासकीय अहवालामध्ये ३४१.५४ करण्यात आली. त्यामुळे रु. ३३९.५४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ व्याप्तीतील बदलांमुळे झालेला विलंब :

अ) कुकडी प्रकल्पाचा मुळ प्रकल्प अहवालास १९६६ मध्ये मान्यता मिळावी. प्रकल्पातील ५ धरणांपैकी प्रथमत :

येडगाव धरणाचे काम १९७० साली, वडज व माणिकडोह धरणाचे काम १९७४ साली ,आणि डिंभे धरणाचे काम १९७८ तसेच पिंपळगांव जोगे धरणाचे काम १९९२ साली सुरु झाले . सन १९६८ ते १९७५ या कालावधीमध्ये अत्यल्प निधी प्राप्त झाला. तदनंतर निधीचे उपलब्धतेनुसार धरणाची कामे हाती घेण्यात येऊन सन १९७७ मध्ये येडगांव ,सन १९८४ मध्ये वडज व माणिकडोह, सन २००० मध्ये पिंपळगांव जोगे व सन २००१ मध्ये डिंभे धरण पुर्ण करण्यात आले.

ब) पिंपळगांव जोगे धरणासाठी आवश्यक असणारे वनक्षेत्रास सन १९९४ मध्ये मान्यता मिळाल्याने धरणाचे काम सुरु करण्यास विलंब झाला.

क) सन १९६६ चे मुळ अहवालामध्ये प्रकल्पाची पीकरचना बारमाही होती. अहमदनगर व सोलापुर जिल्हयातील अवर्षण प्रवण कर्जत, करमाळा व जुन्नर, आबेगांव, पारनेर, शिरुर या तालुक्यातील एकूण ४८६५४ हेक्टर जादा क्षेत्राचा समावेश प्रकल्पामध्ये करण्यात येऊन प्रकल्पाची पीकरचना आठमाही करण्यात आली. सिचन क्षमतेमध्ये वाढ केल्याने कालव्याच्या लांबीमध्ये खालीलप्रमाणे वाढ करणेत आली. कुकडी कालव्याची लांबी १२४ कि.मी. होती ती २४९ कि.मी. पर्यंत वाढविण्यात आली, डिंभे उजव्या कालव्याच्या ११६ कि.मी. लांबीचा, पिंपळगांव जोगे डाव्या कालव्याच्या ७० कि.मी. लांबीचा,वडज उजव्या कालव्याच्या १० कि.मी. लांबीचा,माणिकडोह डाव्या कालव्याच्या २३.५० कि.मी. लांबीचा नव्याने समावेश करण्यात आला, त्यामुळे कामांना विलंब झाला.

४.२ अपुरा निधी : प्रकल्पाचे नियोजना प्रमाणे लागणारा निधी पुरेशा प्रमाणात प्राप्त न झाल्याने प्रकल्पास विलंब झाला. या प्रकल्पास केंद्र शासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ योजने अंतर्गत सन २००३ ते २००८ या कालावधीत रु.३९५ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्याद्वारे मुख्यत्वे कालवा व वितरण व्यवस्थेची ५०४२४ हेक्टरची कामे पूर्ण झाली आहेत. त्यानंतर प्रकल्पास निधी उपलब्धता कमी झाल्याने कामे संथगतीने चालु आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

अ) धरण :- प्रकल्पातील येडगांव, माणिकडोह ,वडज ,डिंभे, पिंपळगांव जोगे या पाचही धरणांची कामे सन २००१ पर्यंत पुर्ण झालेली असून ३०.५४ अ.घ.फू. उपयुक्त पाणीसाठा करणेत येत आहे.

ब) कालवे :– प्रकल्पातील कुकडी डावा कालवा २४९ कि.मी., डिंभे डावा कालवा ५५ कि.मी.,पिंपळगांव जोगे डावा कालवा ७० कि.मी. व डिंभे उजव्या कालव्याचे ११६ कि.मी. पैकी ९२ कि.मी. पर्यंत मुख्य कालव्याची मातीकामे व बांधकामे पुर्ण झालेली आहेत. या कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी सोडण्यात येते. कुकडी डावा कालवा व डिंभे उजव्या कालव्यावरील अस्तरीकरण व पूलांची कामे निधी अभावी सद्या शिल्लक आहेत. त्यामुळे कालव्यातून संकल्पित विसर्ग जाउु शकत नसल्याने पुच्छ भागातील कर्जत , करमाळा व शिरुर तालुक्यातील नियोजित सिंचन क्षेत्रास नियमित पाणी

पुरवठा करण्यास अडचणी आहेत. तसेच सिंचन क्षमता निर्मितीची १७९४९ हे. ची वितरण व्यवस्थेची कामे निधी अभावी शिल्लक आहेत. प्रकल्पावर सुप्रमापेक्षा जास्त खर्च झाल्याने सद्या कामे बंद आहेत. प्रकल्पाचा तृतीय सुप्रमा शासनास मान्यतेसाठी सादर झालेला असून तो प्रलंबित आहे.

क) सिंचन : - कुकडी प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र १,५६,२७८ हेक्टर आहे. जुन २०१२ अखेर १,३८,३२९ हेक्टर सिंचन निर्मीती करण्यात आलेली आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

डिंभे धरणाच्या ५ मे.वॅ. क्षमतेच्या पायथा जलविद्यूत केंद्रातून सन १९९८-९९ पासून विद्युत निर्मिती सुरु असून त्याद्वारे एकूण १७४ दशलक्ष युनिट इतकी विद्युत निर्मिती झाली आहे. तसेच माणिकडोह धरणाच्या ६ मे.वॅ. क्षमतेच्या पायथा जलविद्यूत केंद्रातून सन २००२-२००३ पासून विद्युत निर्मिती सुरु असून त्याद्वारे एकूण ५६.४७ दशलक्ष युनिट इतकी विद्युत निर्मिती झाली आहे.

कुकडी प्रकल्पामुळे अवर्षण प्रवण क्षेत्रातील पुणे जिल्हयात जुन्नर तालुक्यातील २७०१९ हेक्टर क्षेत्रास, आंबेगांव तालुक्यातील ८६१५ हेक्टर क्षेत्रास , शिरुर तालुक्यातील ८०८८ हेक्टर क्षेत्रास तसेच अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील १४३५० हेक्टर क्षेत्रास, श्रीगोंदा तालुक्यातील ४१८४८०हेक्टर क्षेत्रास, कर्जत तालुक्यातील १४८२८ हेक्टर क्षेत्रास व सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील ८७५ हेक्टर क्षेत्रास असे एकूण ११५२५९ हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्यात आले आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळाल्यामुळे आंबेगांव , पारनेर तालुक्यातील प्रत्येकी एक , श्रीगोंदा तालुक्यातील तीन , कर्जत तालुक्यामध्ये दोन व करमाळा तालुक्यात एक असे एकूण आठ साखर कारखाने चालू झाले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली. लाभक्षेत्रामध्ये कुकूटपालन , दुग्ध व्यवसाय इ. कुटीर उद्योगांमध्ये वाढ झाली आहे.सन २०१२ च्या टंचाई मध्ये कुकडी प्रकल्पाची कालवा वहन प्रणाली तयार असल्याने प्रकल्पामधील उपलब्ध पाणी साठयामधून लोकप्रतिनिधी व जनता यांचे मागणीनुसार व शासन धोरणानुसार पिण्यासाठी प्राधान्याने पाणी देण्याचे ठरले. त्यानुषंगाने अहमदनगर, पुणे, सोलापूर जिल्हयातील साठवण तलावांमध्ये आयुक्त, पुणे यांचे सुचनेनुसार अहमदनगर जिल्हयातील ९७ गावांना २६१६३५ लोकसंख्येस, पुणे जिल्हयातील १२१ गावांना ३४०५४५ लोकसंख्येस व सोलापूर जिल्हयातील ५६ गावांना ९७२४० लोकसंख्येस पिण्यासाठी पाणी देणे शक्य झाले.

प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. २१८४.१७ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत रु. १.३९ लक्ष प्रति हेक्टरी व लाभव्यय गुणोत्तर १.०६ आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
वारणा प्रकल्प, जिल्हा सांगली

१	प्रकल्पाचे नांव : वारणा मोठा पाटबंधारे प्रकल्प	तालुका : शिराळा		जिल्हा : सांगली	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	९१३५० हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचनक्षमता (हे.): प्रवाही पद्धतीने ५९७२ हे. व को.प.बं.वरील उपसा सिंचनाद्वारे ६०२०६ हे. असे एकूण ६६१७८ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०३/०१/१९६७	१९६३-६४	३१.६४	९९१००
	प्रथम सुप्रमा-१	२९/०९/१९७६	१९७५-७६	८१.९७	९५६७६
	द्वितीय सुप्रमा-२	१७/०७/१९८६	१९८५-८६	२८८.४७	९१३५०
	प्रस्तावित सुप्रमा-३	२७/०१/२०११ (रोजी शासनास सादर)	२००९-१०	२१४९.९५	९१३५०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता(TAC/ Investment) संदर्भ व किंमत	TAC मान्यता 40th meeting dtd 17/08/1988	१९८६-८७	३७७.८१	९१३५०
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			६०४.१८	
	५.१	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) ६०.८४			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) ४४९.०२			
	५.३	ई टी पी खर्च (रु.कोटी) ९४.३२			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७५-७६	
	६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९७६	
	६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)		८१.९७	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२७.४३	१२२७.६२	१२००.१९	५६.६६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१.६५	१११.८०	११०.१५	५.२०
७.३	प्रकल्पव्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	१०.०१	१०.०१	०.४७
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	३२५.८०	३२५.८०	१५.३८
७.५	इतर कारणांमुळे झालेली वाढ	०	१४९.०७	१४९.०७	७.०४
७.६	ई टी पी मूळे झालेली वाढ	२.५६	३२५.६५	३२३.०९	१५.२५
	एकूण	३१.६४	२१४९.९५	२११८.३१	१००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती

मुळ वारणा धरणाचे नियोजन (सन १९६७) मौजे खुजगाव, ता. शिराळा, जि. सांगली येथे होते. सदर धरणाचा एकूण पाणीसाठा ८७.१२ टी.एम.सी, उपयुक्त पाणीसाठा ३५.१२ टी.एम.सी. व मृत पाणीसाठा ५१.९५ टी.एम.सी. होता. धरणाच्या डाव्या तीरावरती १४७ कि.मी. लांबीचा व उजव्या तीरावरती १९५ कि.मी. लांबीचा कालवा काढून प्रवाही सिंचनाद्वारे ९९१०० हेक्टर पीक क्षेत्र निर्माण करणेचे नियोजन होते. सदर धरणामूळे ८८७० हेक्टर क्षेत्र जलमय होणार होते तर सांगली जिल्हयातील २० गावे आणि कोल्हापूर जिल्हयातील १७ गावे व २९२८३ इतक्या लोकांचे विस्थापन करावे लागणार होते. यामूळे सदर धरण स्थळास स्थानिक व बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांनी विरोध केल्याने धरणाची जागा बदलून मौजे चांदोली, ता.शिराळा, जि. सांगली येथे सन १९७६ साली निश्चित करणेत आली. या धरणस्थळातील बदलामूळे बुडीत क्षेत्रामध्ये घट होवून २९०० हेक्टर इतके झाले, तसेच बुडीत क्षेत्रातील गावांची संख्या १६ पुर्णतः व ९ अंशतः तर विस्थापीत लोकांची संख्या ४८५७ इतकी कमी झाली.

सध्या मौजे चांदोली येथील धरण स्थळानुसार प्रकल्पांतर्गत वारणा धरणाचा पाणीसाठा ३४.४०३ टी.एम.सी, उपयुक्त पाणीसाठा २७.५२२ टी.एम.सी. व मृत पाणीसाठा ६.८८१ टी.एम.सी. आहे. प्रकल्पाच्या सुधारीत जल नियोजनानुसार वारणा प्रकल्पाअंतर्गत सिंचनासाठी १८.०५ टी.एम.सी, वाकुर्डे उपसा सिंचन योजने अंतर्गत सिंचनासाठी ६.९४ टी.एम.सी, पिण्यासाठी ९.५४८ टी.एम.सी, आद्योगीक वापरासाठी १.२७ टी.एम.सी. व बाष्पीभवन व्यय १.२७ टी.एम.सी. इतका आहे.

प्रकल्पांतर्गत वारणा धरण, वारणा जलविद्युत प्रकल्प, सुधारीत सोनवडे जलविद्युत प्रकल्प, वारणा डावा तीर कालवा कि.मी. १ ते ७०, वारणा उजवा तीर कालवा कि.मी. १ ते ११७, वारणा छोटा उजवा तीर कालवा कि.मी. १ ते ३३.५०, वारणा उजवा व डाव्या कालव्यावर ११.५८ मी. उंचीच्या ४८ उपसा सिंचन योजना व वारणा डावा तीर कालव्यावरील ८० मी. उंचीच्या एकूण २५ उपसा सिंचन योजना आहेत.

चांदोली येथील वारणा धरणाचे काम सन १९७६ मध्ये सुरू झाले. सन २००० पर्यंत द्वारउभारणीसह धरणाचे काम पूर्ण झाले. सन २००२ पासून धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यात येत आहे.

या प्रकल्पामुळे ९१३५० हेक्टर पिकक्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. (शिराळा ९८१० हेक्टर, वाळवा ३०४२१ हेक्टर, तासगांव (पलूस) २५६७ हेक्टर, मिरज ८७९९ हेक्टर, शाहुवाडी ८९०१ हेक्टर, पन्हाळा ७८३२ हेक्टर, हातकणंगले ९६८५ हेक्टर व शिरोळ १३३३५ हेक्टर) सद्यःस्थितीत कालव्याद्वारे ५९७२ हेक्टर व वारणा आणि कृष्णा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांतून खाजगी व सहकारी तत्वावरील उपसा योजनांद्वारे ६०२०६ हेक्टर असे एकूण ६६१७८ हेक्टर क्षेत्र प्रत्यक्षात सिंचनाखाली येत आहे.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता

सुरुवातीस खुजगांव ता.शिराळा येथे धरणासह वारणा प्रकल्पास दिनांक ०३/०१/१९६७ रोजी रु. ३१.६४ कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. खुजगाव धरण स्थळास प्रकल्पग्रतांचा तीव्र विरोध झाल्याने धरणाची जागा चांदोली येथे बदलण्यात आली व दिनांक २९/०९/१९७६ रोजी रु.८१.९७ कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. तसेच दिनांक १७/०७/१९८६ रोजी रु.२८८.४७ कोटी किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. रु.२१४९.९५ कोटी किंमतीचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव दिनांक २७/०१/२०११ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे. माहे मार्च २०१२ पर्यंत प्रकल्पावर रू.६०४.१८ कोटी खर्च झाला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे

वारणा प्रकल्पाची मूळ किंमत सन १९६७ मध्ये रु. ३१.६४ कोटी होती. त्यावेळी धरणस्थळ मौजे खुजगांव ता.शिराळा येथे नियोजित होते. तथापि, सदर धरणस्थळास व बुडित क्षेत्रातील भूसंपादनास स्थानिक शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला. या कारणाने धरणस्थळ मौजे चांदोली ता.शिराळा येथे सन १९७६ मध्ये बदलण्यात आले. त्यामुळे धरणाचे काम प्रत्यक्ष सुरु होण्यास सुमारे ९ वर्षांचा विलंब झाला आहे. त्यानंतर प्रकल्पाचे काम अपुऱ्या निधीमूळे संथगतीने चालू आहे. सध्या प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.२१४९.९५ कोटी आहे. प्रकल्पाचे मुळ किंमतीमध्ये रु.२११८.३१ कोटी इतकी वाढ झालेली आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ

धरणस्थळ बदलण्याच्या लोकांच्या आग्रही मागणीमुळे विलंबीत झाल्याने भूसंपादन, पुनर्वसन, अपूरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये १२००.१९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ

भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रु.११०.१५ कोटी इतकी वाढ झाली आहे. वाढीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ९८०८.२२ हे. जमीन संपादन सरासरी रु.२१६१ प्रती हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रु.२.१२ कोटीची तरतूद होती. सध्या प्रकल्पासाठी ५३७१ हेक्टर इतके क्षेत्र सरासरी रु.१,५९,४३० प्रती हेक्टरी दराने संपादन करावे लागत आहे. त्यासाठी रु.८५.६३ कोटी इतका खर्च येत आहे. त्यामुळे रु.८३.५१ कोटी इतकी वाढ होत आहे.

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालानुसार वनजमीन १९६४.७८ हे. संपादित करावी लागणार होती. तथापि, त्यासाठी मूळ अहवालात आर्थिक तरतुद केलेली नव्हती. सध्या प्रकल्पासाठी ७६८.७९ हे. वनजमीनीचे संपादन प्रस्तावित असून त्यासाठी रु.१२.४४ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे रु.१२.४४ कोटी वाढ झाली आहे.

पुनर्वसनाच्या कामासाठी मूळ तरतूदीमध्ये ६.४१ कोटीची वाढ झालेली आहे. त्यामध्ये वाढीव नागरी सुविधामुळे रु.४.१६ कोटी, घरबांधणी अनुदान व वाहतुक भत्त्यामुळे रु. ०.७५ कोटी व सुप्रमात नमुद इतर कारणामुळे रु.२.४१ कोटी वाढ आहे. तसेच न्यायालयीन प्रकरणासाठी रु.०.४७ कोटी इतकी वाढ झालेली आहे. अशी एकूण रु.१४.२० कोटीची वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

वारणा प्रकल्पाची मूळ किंमत सन १९६७ मध्ये रु. ३१.६४ कोटी होती. त्यावेळी धरणस्थळ मौजे खुजगांव ता.शिराळा येथे नियोजित होते. सदर धरणस्थळास व बुडित क्षेत्रातील भूसंपादनास स्थानिक शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला. या कारणाने धरणस्थळ मौजे चांदोली ता.शिराळा येथे बदलण्यात आले. धरणस्थळात बदल करण्यात आल्याने प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. यामुळे रु. १०.०१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ

सुधारीत प्रकल्प अहवालात २ x ८ मेगा वॅट क्षमतेचा वारणा जलविद्युत प्रकल्पाचा समावेश करण्यात आला. धरणातील जलविद्युत प्रकल्पांच्या वाढीव घटकामूळे रु.२१.०६ कोटी इतकी वाढ झाली. कालव्यावरील सी.डी. वर्क्स, सुपर पॅसेज, स्लॅब ड्रेन, पुल व जलसेतू या बांधकामांच्या सविस्तर संकल्पनानुसार व क्षेत्रिय परिस्थितीनुसार रु. १९.२१ कोटी इतकी वाढ झालेली आहे. वारणा धरण सुरक्षिततेसाठी त्या लगतच्या कालवा एस्केपचे मजबूतीकरणाचे कामामध्ये क्षेत्रीय परिस्थितीनुसार रु. ०.६५ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

मा.ना.श्री. शिवाजीराव देशमुख, सभापती महाराष्ट्र विधान परिषद यांच्या विधानभवन मुंबई येथील दालनात दि. ०७/०३/२००६ रोजी, मा.ना.श्री.जयंत पाटील, वित्त व नियोजन मंत्री, मा.ना.श्री.रामराजे नाईक निंबाळकर, मंत्री जलसंपदा (कृखोपामं), मा.आ.श्री.शिवाजीराव नाईक, शिराळा यांचे समवेत झालेल्या बैठकीत वारणा कालव्यातून होणारी पाण्याची गळती थांबवण्यासाठी कालव्यास जिओसिंथेटीक लायनींग करण्याबाबत निर्णय झाला. त्यानुसार आवश्यक ठिकाणी जिओसिंथेटीक लायनींग प्रस्तावीत केल्याने रु. १०८.०६ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

वितरण प्रणालीची तरतूद मूळ प्रशासकीय अहवालात करण्यात आली नव्हती. सध्यस्थितीत सिंचन क्षेत्रानुसार वितरण प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे रु.१७६.८२ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

अशा प्रकारे संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु.३२५.८०कोटी इतकी आहे.

३.५ इतर कारणांमुळे झालेली वाढ

वारणा धरणाचे हायड्रोलॉजीकल, जिओलॉजीकल व मेट्रोलॉजीकल सर्व्हेक्षण इत्यादीमूळे रु ०.१८ कोटी इतकी वाढ झालेली आहे. कोर्ट केस, डिमारकेशन चार्जेस, भुसंपादन चार्जेस, इत्यादीमूळे रु.१२.५३ कोटी इतकी वाढ झालेली आहे. धरणावरील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यामूळे रु. २.१० कोटी इतकी वाढ झालेली आहे. धरणाचे पर्यावरणदृष्टया पाणलोटक्षेत्र उपाय योजना कामामूळे रु.९.०३ कोटी इतकी वाढ झालेली आहे. वारणा प्रकल्पाचे धरण, कालवे, वसाहती, निरीक्षण वाहने यावरील देखभाल दुरुस्ती खर्च व रुपांतरीत अस्थाई आस्थापनावरील खर्च यामूळे रु १२५.२३ कोटी इतकी वाढ झालेली आहे. यामुळे एकूण रुपये १४९.०७ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.६ ई टी पी मूळे झालेली वाढ

मूळ अहवालामध्ये आस्थापना व संयंत्रे यासाठी रु.२.५६ कोटी इतकी तरतुद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात रु.३२५.६५ कोटी इतकी तरतूद केल्याने रु.३२३.०९ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे

४.१ धरणस्थळास प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामूळे झालेला विलंब

वारणा प्रकल्पाच्या मुळ प्रकल्प अहवालाप्रमाणे मुळ धरणस्थळ सन १९६७ मध्ये मौजे.खुजगांव ता.शिराळा येथे नियोजित होते. तथापि, सदर धरणस्थळास व बुडित क्षेत्रातील भूसंपादनास स्थानिक शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला. या कारणाने धरणस्थळ सन १९७६ मध्ये मौजे चांदोली ता.शिराळा येथे बदलण्यात आले. या दरम्यान सुमारे ९ वर्षांचा विलंब झाला आहे.

४.२ प्रकल्पाच्या कालव्यांना व वितरण प्रणालीस भुसंपादनासाठी विरोध केल्यामूळे झालेला विलंब

वारणा डावा कालवा कि.मी. २७ ते ७० व उजवा कालवा कि.मी. १३ ते ६० मधील वितरण व्यवस्था कामांना शेतकरी व स्थानिक लोक प्रतिनिधींनी विरोध केला आहे. तसेच वारणा उजवा कालवा कि.मी. ६१ ते ११७ मधील मूख्य कालवा कामास शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. त्यामूळे सदर लांबीतील कालवा कामे सुरु करता आली नाहीत. वारणा डावा कालवा कि.मी. ३९ मधील रिळे जलसेतूचे कामास सन २०००-०१ मध्ये शेतकरी व स्थानिक लोकनेत्यांनी विरोध करुन काम बंद केले. प्रकल्पाच्या कालवा कामास व वितरण प्रणालीस भुसंपादनासाठी स्थानिक शेतकरी व लोकनेते यांनी विरोध केल्यामूळे ७ वर्षाचा विलंब झालेला आहे.

४.३ अपुऱ्या निधीमुळे झालेला विलंब

प्रकल्पास सन १९६७ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. मात्र सन १९७६ पर्यंत निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला. सदर निधीमधून मुख्य धरणाचे काम व डाव्या तीरावरील कालव्याच्या पहिल्या किमी १ ते २६ व उजव्या तीरावरील कालव्याच्या पहिल्या १ ते १२ किमी लांबीमधील कामे पूर्ण करण्यास प्राधान्य दिले. त्यानंतर वारणा प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या तीरावरील कालव्यांच्या उर्वरित कामांसाठी पुरेसा निधी दरवर्षी उपलब्ध

झाला नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत पुर्ण होऊ शकली नाहीत. अपुऱ्या निधीमुळे प्रकल्पाच्या कामास २४ वर्षांचा विलंब झालेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती

धरणाच्या दगडी व मातीभागाचे काम सन १९९८ मध्ये पूर्ण करणेत आले. तसेच धरणाच्या द्वार उभारणीचे काम सन २००० मध्ये पूर्ण करणेत आले. धरणात सन १९८५ पासून अंशतः पाणीसाठा करणेत आला व सन २००२ पासून धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येत आहे.

५.१ मुख्य कालवे / शाखा कालवे सध्यस्थिती

वारणा डावा कालवा कि.मी. १ ते ३९ व वारणा उजवा कालवा कि. मी. १ ते ३० मधील कामे बहुतांशी पूर्ण झाली आहेत. वारणा डावा कालवा कि.मी. ४० ते ७० व वारणा उजवा कालवा कि. मी. ३१ ते ६० मधील कामे प्रगतीत आहेत. सन २००५-०६ मध्ये वारणा प्रकल्पाचा उर्वरीत कालवा कामे पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाचे ''वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमामध्ये'' समावेश करण्यांत आला, तथापी केंद्रिय जलआयोगाने सुधारीत मान्यता घेण्याची सुचना दिली आहे. त्यासाठी प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल शासनास जानेवारी २०११ मध्ये सादर केला आहे. त्यास मान्यता मिळाली नाही.

५.२ वितरण व्यवस्था स्थिती, निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र

वारणा डावा कालवा कि.मी.१ ते २६ व वारणा उजवा कालवा कि.मी.१ ते १२ मधील वितरण व्यवस्थेची कामे पुर्ण आहेत. उर्वरीत लांबीतील वितरण व्यवस्थेची कामे निधीच्या उपलब्धते नुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

वारणा प्रकल्पाचे मंजुर सुधारीत जलनियोजनानुसार वारणा डावा व उजव्या कालव्याव्दारे प्रवाही पध्दतीने २३२४६ हेक्टर, वारणा डावा व उजव्या कालव्यावरील ११.५८ मी. व ८० मी.उचीच्या शासकीय उपसा सिंचन योजनाव्दारे २२५६२ हेक्टर व नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यावरील खाजगी उपसा व्दारे ४५५४२ हेक्टर, असे एकुण ९१३५० हेक्टर पिकक्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे. सध्या प्रकल्पाअंतर्गत वारणा डावा कालव्याचे कि.मी. ३९ पर्यंत तर वारणा उजव्या कालव्याव्दारे कि.मी.३० पर्यंत सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत असून जून २०१२ अखेर कालव्यावरील निर्मीत सिंचन क्षमता ५९७२ हेक्टर इतकी निर्माण झाली आहे. तसेच नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यावरुन खाजगी व सहकारी उपसा सिंचन योजनाव्दारे ६०२०६ हेक्टर असे एकुण ६६१७८ हेक्टर इतके पिकक्षेत्र प्रत्यक्षात सिंचनाखाली येत आहे.

६.० वारणा प्रकल्पाचे झालेले प्रत्यक्ष फायदे :-

प्रकल्पावर जून २०१२ पर्यंत ६६१७८ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली असून ५२६०० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. प्रकल्प जरी आठमाही पीकपद्धतीप्रमाणे असला तरी सुमारे ४२१०० हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे पीक घेतले जात आहे. वारणा प्रकल्प होण्यापूर्वी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये २ साखर कारखाने होते. सध्या ९ साखर कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्यांद्वारे साखरेच्या उत्पादनाबरोबरच इतर सहपदार्थांची निर्मिती करण्यात येते. यामुळे सन २०१०-११ मध्ये अंदाजे कृषी उत्पादनाद्वारे सुमारे रु. २००० कोटीचे वार्षिक उत्पन्न मिळाले आहे.

वारणा जलाशयातील पाण्याचा वापर करुन सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेसह अन्य ५३ गांवे व १० लक्ष लोकसंख्येस पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपलब्धता करुन दिली आहे. त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यातील कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेअंतर्गतच्या म्हैशाळ उपसा सिंचन योजनेसाठी दरवर्षी ४ टीएमसी पाणी वारणा नदीतून उपलब्ध करण्यात येते. तसेच वारणा धरणाच्या पायथ्याशी (२ x ८ मेगा वॅट क्षमतेच्या) जनित्राद्वारे १६ मेगावॅट व डाव्या कालव्यावरील खाजगीकरणांतर्गत (२ x २) ४ मेगा वॅट अशी एकूण २० मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येते. आजपर्यंत ७२६ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती करण्यात आली आहे.

प्रकल्पाची सुधारीत किंमत २१४९.९५ कोटी आहे. प्रकल्पाची प्रति हेक्टरी किंमत रु. २.३५ लक्ष असून लाभव्यय गुणोत्तर १.९४ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
दूधगंगा प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नांवः दूधगंगा प्रकल्प	तालुका :राधानगरी		जिल्हा :कोल्हापूर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	महाराष्ट्र राज्य : ६१०३२ कर्नाटक राज्य : १२९८५ एकूण.. ७४०१७		जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) महाराष्ट्र राज्य :३९१६५ हे	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत रु. कोटी	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२७/०९/१९६५	१९६४-६५	१६.२५	६७१९८
	प्रथम सुप्रमा	२१/०२/ १९७६	१९७४-७५	५८.८३	७४०१७
	द्वितीय सुप्रमा	२४/५/१९८५	१९८२-८३	१५९.०४	
	तृतीय सुप्रमा	१५/७/२०११	२००८-०९	१७१२.८०	
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत	Gò.NO.१६/१७/२००८-PA (N)/ ३६४-९५ Dated १२/३/२००८	२००७-०८	१४६०.५७	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				६७०.१५
	५.१	भूसंपादन पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = १६.०२			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु. कोटी) = ५४९.७५			
	५.३	इटीपी खर्च (रु. कोटी) = १०४.३८			
६.	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९७६-७७
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				सन १९७६.
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु. कोटी)				५८.८३
७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				

	बाब	मूळ तरतूद	अद्यावत सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	१४.२३	९२६.००	९११.७७	५३.७४
७.२	भूसंपादन पुनर्वसन, वनजमीन व एन्पीव्ही मुळे खर्चातील वाढ	०.९७	१४३.८७	१४२.९०	८.४२
७.३	प्रकल्पव्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	२१.१७	२१.१७	१.२५
७.४	सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ	०	३०४.२०	३०४.२०	१७.९३
७.५	इतर कारणे	०	०	०	०
७.६	इटीपी मूळे झालेली वाढ	१.०५	३१७.५६	३१६.५१	१८.६६
	एकूण	१६.२५	१७१२.८०	१६९६.५५	१००.००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

दूधगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. मौजे आसनगांव,ता.राधानगरी,जि.कोल्हापूर येथे दूधगंगा नदीवर २५.४० अघफू क्षमतेचे धरण सन १९९९ मध्ये पूर्ण झाले आहे. प्रकल्पाचा नियोजित वार्षिक पाणी वापर २७.०५ अघफू. असून त्यापैकी महाराष्ट्रात २३.०५ व कर्नाटकात ४.०० अघफू. होणार आहे. प्रकल्पाची महाराष्ट्रातील सिंचन क्षमता (पीकक्षेत्र) ६१०३२ हेक्टर आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी (६९३८ हे.), भुदरगड (२७०८ हे.), कागल (१८०८८ हे.), करवीर (१३४०० हे.), हातकणंगले (८१५६ हे.) व शिरोळ (११७४२ हे.) या तालुक्यातील एकूण ६१०३२ हे व कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी तालुक्यातील एकूण १२९८५ हे असे एकूण ७४०१७ हे सिंचनक्षेत्र नियोजित आहे.
महाराष्ट्रातील नियोजित २३.०५ अघफू पाणीवापरापैकी सिंचनासाठी १६.६६ अघफू व बिगर सिंचनासाठी ६.३९ अघफू पाणीवापर प्रस्तावित आहे.

दूधगंगा पाटबंधारे आंतरराज्य प्रकल्पाच्या सामंजस्य करार दिनांक १८/८/२००१ रोजी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत स्वाक्षांकित झाला आहे. उपरोक्त करारानुसार धरणाच्या कामापोटी झालेल्या खर्चाचा ८५ टक्के वाटा महाराष्ट्र राज्याचा व १५ टक्के वाटा कर्नाटक राज्याचा आहे. तसेच भूसंपादन व पुनर्वसन या कामापोटी झालेल्या खर्चाचा ८० टक्के वाटा महाराष्ट्र राज्याचा असून कर्नाटक राज्याचा वाटा २० टक्के आहे. कालव्याच्या कामापोटी झालेल्या खर्चाचा वाटा हा कि.मी.क्युमेक्स या सूत्रावर आधारित असून कालव्याच्या कामासाठी महाराष्ट्र व कर्नाटकाच्या वाट्यास अनुक्रमे ८५ ते ९० व १० ते १५ टक्के इतका येतो. दूधगंगा आंतरराज्यीय प्रकल्पाच्या सामंजस्य करारानुसार उभय राज्यांच्या मा.मंत्री स्तरावर तसेच मुख्य अभियंता स्तरावर स्थायी समिती गठित केल्या आहेत. आंतरराज्यीय करारातील अटीनुसार सामंजस्य कराराबाबत विविध विषय स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यांत येतात.

सद्य:स्थितीत धरणाचे काम पूर्ण असून कालव्याची कामे निधी अभावी संथ गतीने चालू आहेत. मुख्यत्वे करुन अपुरा निधी व कालव्यासाठी आवश्यक भूसंपादनास होत असलेला विलंब या कारणांमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :-

दूधगंगा प्रकल्पास रू. १६.२५ कोटी किंमतीस दरसूची १९६४-१९६५ नुसार मूळ प्रशासकीय मान्यता शासनाने, दिनांक२७/९/१९६५ रोजी दिली. त्यानंतर प्रकल्पास दिनांक २१/२/१९७६ रोजी सन १९७४-१९७५ च्या दरसूचीनुसार रू. ५८.८३ कोटी रकमेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर दिनांक २४/५/१९८५ रोजी सन १९८२-८३ च्या दरसूचीनुसार रू.१५९.०४ कोटी रकमेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता व दिनांक १५/७/२०११ रोजी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार रू.१७१२.८० कोटी रकमेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. दूधगंगा प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु.६७०.१५ कोटी खर्च झाला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत तृतीय सुप्रमाची किंमत रु. १६९६.५५ कोटी इतकी वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ :-**

भूसंपादन व अपूरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन, त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ९११.७७ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

भूसंपादन व पुनर्वसन खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १०५.१५ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या ६ टक्के वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ४४९५ हे. जमीन प्रती हेक्टर सरासरी रु.०.०१२ लक्ष प्रती हेक्टर दराने संपादन करणे प्रस्तावित होते. यासाठी मुळ

प्रशासकीय मान्यता अहवालात रु.०.५६ कोटी तरतूद होती. तृतीय सुप्रमा अहवालामध्ये ६४४४.४० हेक्टर प्रती हेक्टर सरासरी रु.१.६० लक्ष दराने संपादन करणे प्रस्तावित आहे. यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.१०२.५९ कोटी व पुनर्वसनाच्या नागरी सुविधासाठी रु.२.५६ कोटी अशी एकूण रु.१०५.१५ कोटीची वाढ झाली आहे

मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ९७८.१३ हे. वन जमीन संपादनाची तरतूद होती. तथापि, उपरोक्त प्रकल्प सन १९८० पूर्वीचा असल्याने वनक्षेत्राच्या निर्वनीकरणासाठी वित्तीय तरतूद अंतर्भूत नव्हती.भारतीय वनकायदा १९८० च्या तरतूदीनूसार वनविभागास देय पर्यायी दंडात्मक वनीकरण व पाणलोट क्षेत्र विकास यासाठी एकूण रु.३७.७५ कोटी रकमेची तरतूद तृतीय सु.प्र.मा. मध्ये केल्यामुळे रु. ३७.७५ कोटीची वाढ झाली आहे.

उपरोक्त भूसंपादन पूनर्वसन व वनजमिनीमूळे रु. १४२.९० कोटीची वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :-

मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ६३३.१२ दलघमी (२२.३६ अघफू) व प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र ६७१९८ हे होते. मूळ मंजूर प्रकल्पाची व्याप्ती महाराष्ट्र राज्याकरिता होता. प्रकल्पास ७५ टक्के विश्वासार्हतेवर आधारीत १०१९ दलघमी (३६ अघफू) इतक्या पाणीसाठ्याचा प्रकल्प व्हावा अशी स्थानिक जनतेची आग्रही मागणी होती. स्थानिक जनतेची मागणी व कर्नाटक राज्यातील १२९८५ हे सिंचनक्षेत्राचे समावेशन यामूळे धरणाच्या पाणी साठ्यात तसेच सिंचनक्षमतेत वाढ झाली आहे. त्यानुसार शासन ठराव क्र.:दुध/११७६/४५७/टी/(३) दिनांक २१/०२/१९७६ अन्वये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता (रु.५८.८३ कोटी) व शासन निर्णय क्र.:दुधगंगा-०४१०/(२३७/१०)/मोप्र १ दिनांक १५ जुलै, २०११ अन्वये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त (रु १७१२.८० कोटी) झाली. यामुळे धरणाच्या काटछेदात बदल झाल्याने दगडी बांधकाम व मातीकाम यात रु.१८.५७ कोटीची वाढ झाली.

दूधगंगा धरणाची घळभरणी सन १९७८ पासून सुरु करण्यात येऊन सन १९९० पर्यंत धरणात ३.५१ अघफू पाणीसाठा होता. त्यावेळी दूधगंगा प्रकल्पाच्या पंचगंगा खोऱ्यातील ९.१७ अघफू इतक्या पाण्याचा वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय क्र.डीयुडी-१०८४/ १३९/(३९५४) मोप्र-१, दिनांक. २/२/१९९० नूसार दूधगंगा डाव्या कालव्याच्या किमी. १२ मधून दूधगंगा - भोगावती (पंचगंगा) खोऱ्यास जोडणाऱ्या ५५० मी. लांबीच्या बोगद्याद्वारे पाणी सोडण्याचा निर्णय झाला माहे ०४/९७ मध्ये गैबी बोगद्याचे काम पूर्ण करुन पाणी पंचगंगा खोऱ्यात सोडण्यात आले. यासाठी रु.२.६० कोटी खर्च झाला आहे. त्याची तरतूद मंजूर तृतीय सुप्रमा अहवाला मध्ये करण्यात आली असून त्यामुळे रु.२.६० कोटी वाढ झाली आहे.

उपरोक्त कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु. २१.१७ कोटी वाढ झाली.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-

१.० दूधगंगा प्रकल्पाच्या मुख्य दगडी धरणाच्या पायात थरयूक्त क्वार्टझाईट पद्धतीचा दगड व शेलचे वेगवेगळ्या जाडीचे थर आढळले. धरणाच्या पायातील भूस्तराची भूशास्त्रिय वर्गवारी अर्थाक्वार्टझाईट इंटरबेडेड वीथ सेल बँड अशी असून या गुंतागुतीच्या भूस्तरीय रचनेमुळे धरणाच्या पाया संदर्भात निर्माण झालेल्या अडचणीवर अभ्यास करुन उपाय योजना सुचविण्यासाठी शासनाने एप्रिल १९७३ मध्ये श्री.देऊस्कर यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सल्लागार समिती नियुक्त केली. या समितीने मुख्य धरणाच्या पाया मध्ये शिअर की ची तरतूद, धरणाच्या पायाचा पृष्ठभाग कृत्रिमरित्या खडबडीत करणे, धरणाच्या संरेखेस ५ कि.मी. त्रिज्येची वक्रता, धरणाच्या सांडव्याचा विचार करुन अन्य मोनोलिथ लांबीमध्ये वक्रता देण, धरणासाठी पायातील छन्नमार्ग व निरिक्षण छन्नमार्गाची तरतूद, धरणाच्या संकल्पनासाठी सुधारित भूकंप गुणक घेणे इत्यादी सुचविलेल्या उपाययोजनानुसार बांधकाम करण्यात आले. त्याची तरतूद मंजूर तृतीय सुप्रमा अहवाला मध्ये करण्यात आली असून, त्यामुळे रु. १९.१८ कोटी वाढ झाली आहे.

२.० सन १९९९ च्या पावसाळयानंतर धरणातील मोनोलिथ क्र.३ व ४, ४ व ५ तसेच ७ व ८ च्या सांध्यातून पाण्याचा झिरपा निदर्शनास आला. सदर गळती कमी करण्या बाबत प्राथमिक उपाय योजना करण्यात आल्या. प्रकल्पाच्या धरणात आढळून आलेल्या चिरा (जॉईंट्स) व छन्न (गॅलरी) भागातील गळतीच्या कारण मिमांसेचा अभ्यास करुन उपाय योजना सुचविण्यासाठी शासनाने डिसेंबर २००० मध्ये श्री. एम. जी. पाध्ये यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती नियुक्त केली. सदर समितीने धरणाच्या मोनोलिथ मध्ये प्रत्येकी ६ मी. अंतरावर स्टॅगर्ड पध्दतीने दुस-या ओळीत सिमेंट ग्राऊटींग करणे, धरणाच्या उर्ध्वबाजूस गनायटिंग न केलेल्या भागास गनायटिंग करणे, धरणाच्या गॅलरीमधील ड्रेन होल्स, पोरस पाईप्स, व ग्रॅव्हीटी ड्रेन पाईप स्वच्छ करणे, पायातील गॅलरीमधील पाण्याचा उपसा उच्च शक्तीचे पंप बसवून करणे, धरणाचे विचलन मोजण्यासाठी धरण स्थळावर ट्रॅग्यूलेशन स्टेशन्स स्थापन करणे इत्यादी लघुकालीन व दीर्घकालीन उपाय योजना करण्याच्या शिफारशी केल्या आहेत. सदर उपायांची अमंलबजावणी प्रगतीपथावर आहे. त्याची तरतूद मंजूर तृतीय सुप्रमा अहवालामध्ये करण्यात आली असून त्यामुळे रु.१९.१९ कोटी वाढ झाली आहे.

३.० दूधगंगा उजव्या कालव्याच्या सुरुवातीचा १० किमी चा भाग डोगर उतारावरुन जातो. विशेषतः पहिल्या चार किमी मध्ये एका बाजूस उंच डोंगर तर दुस-या बाजूस नदीच्या पात्रापर्यन्त तिव्र उतार अशा स्वरुपाची रचना या भागात आहे. किमी १ ते १० पैकी सुरुवातीच्या किमी १ ते ३ मधील कालव्याचा भाग क्वार्टझाईट सँड स्टोन आणि शेल अशा स्तरीय स्वरुपाचा असून किमी ४ ते १० मधील कालवा पॉरफिरीटीक बेसाल्ट व व्होलकॅनिक ब्रेसिया असलेला डेक्कन ट्रॅप प्रकारच्या खडकात असून सदर खडक अति सांधेयुक्त व भेगाळलेला आहे. या विशिष्ठप्रकारच्या भूस्तरामूळे पाणी सोडल्यावर भूस्तराचे स्खलन होऊन कालवा भरावा घसरण्याच्या घटना निदर्शनास आल्या होत्या. किमी १ ते १० मध्ये वैशिष्ठयेपूर्ण भूस्तरीय रचनेचे प्राबल्य मोठया प्रमाणात आढळल्याने कालवा भरावा घसरण्याची घटना घडून सिंचनावर भविष्यात .त्याचा विपरित परिणाम होवू नये यादृष्टीने आवश्यक सुधारणा व मजबूतीकरण करणे कामा संदर्भात सर्वकष अभ्यास करुन कायमस्वरुपी उपाय योजना करण्याकरीता शासनाने दिनांक १४/०२/१९९५ रोजी श्री. एम. व्ही. भावे, यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समितीचे गठण केले. सदर समितीने किमी १ ते १० मधील उर्वरित कालवा लांबीमध्ये निरिक्षण पथाकडील बाजूस आवश्यक त्या ठिकाणी खोदाईसाठी अतिरिक्त बर्म देणे, सेवा पथाकडील भरावास मजबूतीकरणासाठी अतिरिक्त बर्म देणे, रॉक टो बांधकाम, आधारभिंत बांधकाम, पहिल्या व दुस-या किमी मध्ये ड्रिलिंग व ग्राऊटींग करणे, तसेच कांही लांबीमध्ये १५ सें.मी. जाडीचे सलोह संधानकात अस्तरीकरण इ. तसेच किमी २ व ३ मधील सा.क्र. १६०० ते २३०० मी. या ७०० मी. लांबीमध्ये आरसीसी बॉक्स बांधकाम इत्यादी उपाययोजना सुचविल्या. त्यानुसार सदर उपायांची अम्मलबजावणी प्रगतीपथावर आहे. यासाठी रु.२७.९४ कोटी व याप्रमाणे दूधगंगा उजवा कालवा किमी ११ ते १७ मधील कालवा स्थैर्यकरण करावयाच्या कामासाठी रु.७.३५ कोटी अशी एकूण रु.३५.२९ कोटीची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात करण्यात आली असून त्यामुळे रु.३५.२९ कोटी वाढ झाली आहे.

४.० दूधगंगा उजवा कालवा किमी.५ ते ७ मधील गळती कमी करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर जिओ सिंथेटिक अस्तरीकरण करण्याची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात केल्यामुळे रु.८.०१ कोटी वाढ झाली आहे.

५.० मूळ प्रकल्प अहवालात कालवा परिमाणाची तरतूद ढोबळमानाने करण्यात आली होती, तथापि प्रत्यक्षात क्षेत्रिय परिस्थिती व सविस्तर सर्वेक्षणानुसार आवश्यकतेनुसार कालवे व त्यावरील बांधकामे व बोगदे यांच्या कामांची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात केल्यामुळे रु. २२२.५३ कोटी वाढ झाली आहे.

उपरोक्त सर्व कारणांमुळे रु.३०४.२० कोटीची वाढ झाली आहे.

३.४ आस्थापना व इतर कारणे :-

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रु.१.०५ कोटी इतकी तरतूद होती. प्रचलित नियमानुसार आस्थापनेसाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात रु. ३१७.५६ कोटीची तरतूद केल्यामुळे रु. ३१६.५१ कोटी रक्कमेची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ भूसंपादनास झालेल्या विलंबाचा तपशिल :

दूधगंगा डावा कालवा, कोल्हापूर व कुरुंदवाड शाखा कालव्याचे ६२९ हे. खाजगी जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव साधारणतः सन २००१ ते २००५ या कालावधीत महसुल विभागाकडे सादर करण्यात आली आहेत. यापैकी आज अखेर ३१० हे. क्षेत्र भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन प्रत्यक्ष ताब्यात मिळाले असून उर्वरित ३१९ हे. क्षेत्राच्या संपादनाची कार्यवाही प्रलंबित आहे. उपरोक्त पैकी कांही प्रस्तावावर विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे या पैकी कांही प्रकरणे व्यपगत झाली आहेत. कालव्याच्या भूसंपादनास विलंब झाल्याने कालव्याच्या बांधकामाचा कालावधी आजमितीस सुमारे ७ वर्षे इतका लांबला.

४.२ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल :

प्रकल्पास सन १९६५ मध्ये मुळ प्र.मा. मिळाली. तथापि, सन १९७५-१९७६ पर्यंत निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेण्यात आलेली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

५.१ धरणाचे काम सन १९९९ मध्ये पूर्ण झाले असून, धरणात सन १९९९ पासून पूर्ण क्षमतेने २५.४० अघफू पाणीसाठा करण्यात येतो.

५.२ महामंडळाच्या स्थापनेपूर्वी दूधगंगा धरण,डावा कालवा किमी १ ते १२, गैबी बोगदा तसेच उजवा कालवा किमी १ ते २४, निढोरी शाखा किमी १ ते २५ इ. कामे प्रगतीपथावर होती. महामंडळाच्या स्थापनेनंतर डावा कालव्याचे किमी.१ ते ३१ पर्यंत मातीकाम व बांधकामे पूर्ण करण्यात आले. किमी.३२ ते ७६, कुरुंदवाड शाखा कालवा किमी.१ ते २६ व कोल्हापूर शाखा कालवा किमी.१ ते २२ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. उजवा कालवा किमी १ ते २४, बिद्री शाखा किमी १ ते ४४, निढोरी शाखा किमी.१ ते २५ या कालव्यांची महाराष्ट्र हद्दीपर्यंत मातीकाम व बांधकामे पूर्ण असून, कूर शाखा कालवा किमी.१ ते १७ मातीकाम व बांधकामे पूर्ण आहेत. या पूर्ण झालेल्या कालव्यामधून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे.

दूधगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. प्रकल्पांतर्गत दत्तवाड शाखा, दूधगंगा उजवा कालव्याच्या बिद्री किमी ४४ च्या पुढील व निढोरी किमी २५ च्या पुढील कामे कर्नाटक शासनामार्फत प्रगतीपथावर आहेत.

शासन पत्र क्र.डीयुयडी-१०८४/१३१/(३९५४) /मोप्र-१/पाटबंधारे विभाग, मुंबई दिनांक २ फेब्रुवारी १९९० मधील मुद्दा क्रमांक ४ मध्ये दूधगंगा धरणात साठलेल्या पाण्याचा उपयोग सिंचनासाठी करण्याच्या दृष्टीने दूधगंगा,पंचंगंगा व वेदगंगा खोऱ्यात पाणी वापरासाठी १२ वर्षे मुदतीचे पाणी उपसा परवाने मंजूर करण्यात यावेत असे नमुद केले आहे. त्यानुसार उपरोक्त नमुद पूर्ण झालेल्या कालव्याचे नियोजित सिंचन क्षेत्र नदी उपसा, खाजगी उपसा व लाभक्षेत्रातील खाजगी सायफन व्दारे तसेच लाभक्षेत्रातील खाजगी विहिरीव्दारे विकसित झालेले आहे. त्यामुळे वितरिकांची कामे करण्यासाठी आवश्यक जमिनी संपादन करण्यास लाभधारकांचा विरोध आहे. बऱ्याचदा वितरिकांसाठी कांही भागात मागणी करतात तथापी, त्याला त्याच भागातून तीव्र स्वरुपाचा विरोध होऊन वितरिकांच्या सर्वेक्षणासारख्या प्राथमिक कामासाठी विरोध होत आहे. त्यामुळे लाभधारकांच्या एकमुखी मागणीनुसार वितरिकांची कामे हाती घ्यावयाचे नियोजन आहे.

प्रकल्पांतर्गत पूर्ण झालेल्या कालव्यामधून सिंचनासाठी सोडण्यात येणाऱ्या कालव्याद्वारे १२६८९ हे. तसेच को.प. बंधा-याद्वारे २६४७६ हे असे एकूण ३९१६५ हे क्षेत्र सिंचनक्षेत्र निर्मित झाले आहे.

५.३ धरण पाया व बुडीत क्षेत्राचे तसेच वनजमीन संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. प्रगतीत असलेल्या कालवा कामासाठी आवश्यक ६२९ हे. खाजगी क्षेत्रापैकी ३१० हे.क्षेत्र ताब्यात मिळाले असून उर्वरित ३१९ हे. क्षेत्राच्या संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. कालव्यासाठी आवश्यक क्षेत्राचे संपादन वेळेत न झाल्याने काही प्रस्ताव व्यपगत होत असल्याने त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होत आहे.

६.० **प्रकल्पाचे झालेले प्रत्यक्ष फायदे :-**

प्रकल्पावर जून २०१२ पर्यंत ३९१६५ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली असून ३८८४६ क्षेत्रास सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. प्रकल्प बारमाही पीकपद्धतीप्रमाणे असून सुमारे १७३५९ हेक्टर क्षेत्रावर ऊसाचे पीक घेतले जात आहे. दूधगंगा प्रकल्प होण्यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये ३ साखर कारखाने होते. सध्या ६ साखर कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्यांद्वारे फक्त साखरेच्या उत्पादनासह इतर सहपदार्थ निर्मिती होते. यामुळे सन २०१०-११ मध्ये अंदाजे कृषी उत्पादनाद्वारे सुमारे रु.६०० कोटीचे वार्षिक उत्पन्न मिळाले आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये कागल येथे पंचतारांकित औद्योगिक वसाहत नव्याने निर्माण झाली असून १५५९ हेक्टर क्षेत्राच्या शिरोली, गोकुळ शिरगांव व हातकणंगले या औद्योगिक वसाहतीसाठी १६८७ छोटया मोठया कारखान्यास २२ एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येतो.

धरणामध्ये साठणाऱ्या पाण्याचा उपयोग जास्तीत जास्त होण्यासाठी दुधगंगा डावा कालव्यामधून गैबी बोगदा काढून पाणी भोगावती नदीद्वारे पंचगंगा खो-यात सोडण्यात आले. यामुळे त्याचा फायदा कोल्हापूर व इचलकरंजी शहर पाणीपुरवठा व पंचगंगा खो-यातील लाभक्षेत्रामध्ये सिंचनासाठी झाला आहे.

दूधगंगा जलाशयातील पाण्याचा वापर करुन कोल्हापूर महापालिकेसह अन्य ५७ गांवे व १० लक्ष लोकसंख्येस पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपलब्धता करुन दिली आहे. तसेच दूधगंगा धरणाच्या पायथ्याशी २ X १२ अशा २४ मेगा वॅट क्षमतेचे जलविद्युत केंद्र कार्यान्वित असून सन १९९९-२००० पासून विद्युत निर्मिती सुरु करुन सन २०१२ पर्यंत एकूण ७०६ दशलक्ष युनिट विद्युत निर्मिती झाली आहे.

दूधगंगा प्रकल्प हा आंतरराज्य प्रकल्प असून दोन्ही राज्यांदरम्यान झालेल्या करारानुसार ३.४३ अघफू पाणी कर्नाटक राज्यास दूधगंगा उजवा कालव्याच्या बिद्री व निढोरी शाखा तसेच दूधगंगा व वेदगंगा नदीद्वारे देण्यांत येते. यामुळे कर्नाटक राज्याच्या चिक्कोडी तालुक्यातील प्रकल्पीय १२९८५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत १७१२.८० कोटी असून प्रती हेक्टरी किंमत रु.२.४८ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.७४ इतके आहे.

.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
कृष्णा प्रकल्प, जिल्हा सातारा, सांगली

१	प्रकल्पाचे नांव : कृष्णा प्रकल्प	तालुका :वाई, जावळी, सातारा, कोरेगांव, क-हाड, खानापूर, तासगांव , पलूस , कडेगांव		जिल्हा : सातारा, सांगली	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीक क्षेत्र)	७४०००	जुन २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता : ७३२२८ हेक्टर		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	मुळ प्रशासकिय मान्यता	२५/०१/१९६७	१९६५-६६	२७.६५	१०६२८६
	सुप्रमा-१	२८/०१/१९७७	१९७५-७६	७१.३१	१०६२८६
	सुप्रमा-२	१९/१०/१९८३	१९८१-८२	१३३.८०	१०६२८६
	सुप्रमा-३	१८/०१/१९९४	१९९२-९३	२६९.६३	९७६५९
	सुप्रमा-४	१३/०२/२००४	२००२-०३	६४८.०५	७४०००
	सुप्रमा-५	प्रस्तावित	२०११-१२	९९१.२२	७४०००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	एन आर (२) (६२-६६) दि.१७/२/१९६६ रु.२७.६५ कोटी			
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			७२७.६७	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		१७.६३		
	५.२ बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		६०७.६५		
	५.३ इटीपी खर्च (रु.कोटी)		१०२.३९		
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९६८-६९	
	६.१ प्रकल्पाच्या धरणाची कामे सुरु झाल्याचे वर्ष			धोम धरण- १९७० कण्हेर धरण -१९७६	
	६.२ प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळी प्रकल्पाची अंदाजित किंमत (रुपये कोटी)			३६.५०	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	मुळ तरतुद	सुप्रमा तरतुद (पाचवा)	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ	२१.६६	४३२.२४	४१०.५८	४२.६१
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे	३.८५	१४६.८५	१४३.००	१४.८४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	१६८.४५	१६८.४५	१७.४८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	१०४.६१	१०४.६१	१०.८५
७.५	इटीपी व इतर करणामुळे वाढ	२.१४	१३९.०७	१३६.९३	१४.२२
	एकूण	**२७.६५**	**९९१.२२**	**९६३.५७**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१) सर्वसाधारण माहिती :

कृष्णा प्रकल्पाचा सन १९६७ मध्ये प्राप्त मुळ प्र.मा.नुसार प्रकल्पामध्ये धोम, कण्हेर व बोरखळ या तीन धरणामधून १०६२८६ हे. सिंचन क्षमता निर्मीती करण्याचे नियोजन होते. सुधारित अहवालानुसार कृष्णा पाटबंधारे प्रकल्पात एकूण २ धरणे असून त्यामध्ये धोम व कण्हेर धरणांचा समावेश आहे. धोम धरण कृष्णा नदीवर असून उपयुक्त साठा ११.७० अ. घ. फु. आहे. कण्हेर धरण वेण्णा नदीवर असून उपयुक्त पाणी साठा ९.५९ अ.घ.फु. आहे. धोम धरणाचे काम १९७० साली व कण्हेर धरणाचे काम १९७६ मध्ये सुरु होऊन अनुक्रमे सन १९७७ व १९८८ मध्ये पुर्ण झालेले आहे.

धोम धरणांतर्गत उजवा कालवा ५९ कि.मी. व डावा कि.मी. ११३ कि.मी. आहे. कण्हेर धरणांतर्गत उजवा कालवा ५८ कि.मी., डावा कि.मी. २१ कि.मी. व त्यापुढे आरफळ कालवा एकूण १९१ कि.मी. आहे. आरफळ कालव्याचा १ ते ८५ कि.मी. सातारा जिल्हयात व ८६ ते १९१ कि.मी. सांगली जिल्हयामध्ये येतो.

प्रकल्पाची एकुण सिंचन क्षमता ७४००० हेक्टर असून त्यापैकी सातारा जिल्हयामध्ये ५७२४२ हेक्टर व सांगली जिल्हयामध्ये १६७५८ हेक्टर आहे. प्रकल्पाची धोम व कण्हेर धरणे पुर्ण असून सातारा जिल्ह्यामधील पुर्ण सिंचन क्षमता व सांगली जिल्हयातील १६७५८ हेक्टर पैकी १५९८६ हेक्टर सिंचन निर्मिती झाली आहे.

२) प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :

शासनाने कृष्णा प्रकल्पास रु. २७.६५ कोटी किंमीतीस मूळ प्रशासकीय मान्यता दि.२५.१.१९६७ रोजी दिली. त्यानंतर प्रथम सुधारी प्रशासकीय मान्यता रु. ७१.३१ कोटी दि.२८.१.१९७७ रोजी व दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता रु.१३३.८० कोटी किंमतीस दि.१९.१०.१९८३ रोजी दिली. तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता रु.२६९.६३ कोटी दि.२८.१.१९९४ रोजी शासनाने दिली. चौथी प्रशासकीय मान्यता रु.६४८.०५ कोटी किंमतीस दि.१३.२.२००४ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिली आहे. प्रकल्पाचा रु.९९१.२२ कोटी किंमतीचा पाचवा सुधारीत प्रशासकीय अहवाल मान्यतेसाठी शासनास सादर केलेला आहे. या प्रकल्पास सन १९६६ मध्ये केंद्रीय जलआयोगाने मान्यता दिली आहे. तसेच केंद्रीय नियोजन आयोगाने दिनांक १७/२/१९६६ रोजी रु.२७.६६ कोटी रक्कम गुंतवणुकीस मान्यता प्राप्त दिली आहे.

कृष्णा प्रकल्पाचा एआयबीपी अंतर्गत कार्यक्रमामध्ये सन २००२-०३ मध्ये समावेश झाला या मध्ये उर्वरित १९५८८ हे. सिंचन क्षेत्र निर्मीतीचे उद्दिष्ट होते. जानेवारी २००९ अखेर एआयबीपी अंतर्गत जवळपास सर्व कामे पूर्ण करुन १९५८८ हे. पैकी १८८१६ हे. (९६.०६ टक्के) सिंचन क्षमता निर्मीती करण्यात आली. स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध व काही शेतकरी न्यायालयामध्ये गेल्यामुळे उर्वरित ७७२ हे. सिंचन क्षमता निर्मीती होऊ शकली नाही.

३) मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनते सु.प्र.मा.ची किंमत वाढणेची कारणे :

सन १९६७ मध्ये प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता किंमत २७.६५ कोटी रुपये आहे. प्रकल्पाची सुधारित सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार प्रस्तावित किंमत ९९१.२२ कोटी असून एकूण वाढ ९६३.५७ कोटी इतकी झाली आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे.

३.१ दरसूचीतील वाढ :

प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन १९६७ मध्ये मिळाली आहे. भूसंपादन पुनर्वसन, अपुरा निधी व्याप्तीतील बदल यामुळे प्रकल्पाचे कामास विलंब झाला आहे. या काळात ४५ वर्षे झालेल्या विलंबामुळे, दरसूचीत वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात ४१०.५८ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढ :

मूळ प्रशासकीय अहवालामध्ये ८६२४ हे. क्षेत्र ४४६४ रुपये प्रति हेक्टरी दराने संपादनासाठी रु.३.८५ कोटी रुपयांची तरतुद होती. सुधारित अहवालामध्ये ५७८० हे. क्षेत्र रुपये सरासरी ९१५०० प्रति हेक्टरी दराने संपादन प्रस्तावित असून त्यासाठी ५५.३८ कोटी तरतुद आहे. बोरखळ धरण रद्द झाल्याने क्षेत्र कमी झाले आहे. मात्र जमिनीच्या किंमती वाढल्याने भूसंपादनाच्या खर्चात ५१.५१ कोटी इतकी वाढ झाली आहे. सन १९७६ पुर्वी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे मुळ प्रकल्पात पुनर्वसनासाठी वेगळी तरतुद नव्हती. पुनर्वसनाचा कायदा १९७६ पासून लागू झाल्याने त्यानुसार प्रकल्प बाधीतांना पुनर्वसन कायद्यातील १८ नागरी सुविधा देणेत येत आहेत. त्यामुळे पुनर्वसनाच्या कामासाठी सुधारित अहवालामध्ये एकूण ९०.८४ कोटी तरतुद केलेली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

अ) कालवा लांबीतील वाढ :

मुळ प्रकल्प अहवालामध्ये धोम १२.४८ अ.घ.फु. कण्हेर १०.१० अ.घ.फु. व बोरखळ ६.१७ अ.घ.फु. या तीन धरणांचा अंतर्भाव होता. प्रकल्पाचा एकूण पाणी वापर ३६.२५ अ.घ.फु. व नियोजित सिंचन क्षमता १०६२८६ हे. होती. सन १९७६ च्या कृष्णा तंटा लवाद निर्णयानुसार कृष्णा प्रकल्पासाठी २९.३० अ.घ.फु. पाणी उपलब्ध झाले. त्यामुळे बोरखळ धरण रद्द करण्यांत आले व धोम व कण्हेर धरणाचा उपयुक्तसाठा अनुक्रमे १३.५० अ.घ.फु. कण्हेर १०.१० अ.घ.फु. करण्यात आला. त्यानुसार धरणाचे बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे.

मुळ प्रकल्प अहवालानुसार कृष्णा प्रकल्पामध्ये बिगरसिंचन पाणी वापराची तरतुद नव्हती. दिनांक २०/११/२००१ रोजी कृष्णा खोऱ्यातील राज्याच्या हिस्याच्या पाण्याचा बृहत आराखडा शासनाचे केंद्रीय जल आयोग नवी दिल्ली यांना सादर केला. त्यानुसार कृष्णा प्रकल्पाचा जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेसह पाणी वापर ३२.०८५ अ.घ.फु. नियोजीत केला. त्यामध्ये सिंचनासाठी २६.८६८ अ.घ.फु., पिण्यासाठी ४.८० अ.घ.फु. व औद्योगीक वापरासाठी ०.४१७ अ.घ.फु.ची तरतुद करण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या चौथ्या सुधारित अहवालास महामंडळाने दिनांक १३/२/२००४ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुध्ये कृष्णा प्रकल्पाचा भाग म्हणून धोम कालव्यावरुन वंचित क्षेत्रास लाभ देण्यासाठी कवठेकेंजळ (१.२८ अ.घ.फु.), वसना (०.९२ अ.घ.फु.), वांगणा (१.३४ अ.घ.फु.), हणबरवाडी (०.८२ अ.घ.फु.) व धनगरवाडी (०.७९ अ.घ.फु.) आणि जिहे कठापुर (३.१७ अ.घ.फु) या योजनांचा अंतर्भाव केला. या उपसा योजनांना स्वतंत्र प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे कृष्णा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रासाठी व बिगर सिंचन वापरासाठी २३.७६ अ.घ.फु. पाणी उपलब्ध झाले.

वरील प्रमाणे चौथ्या सुप्रमामधील जल नियोजनानुसार प्रकल्पाचा मुळ नियोजीत पाणी वापर १२.४९ अ.घ.फु.ने कमी झाल्यामुळे प्रकल्पाची मुळ सिचंन क्षमता ३२२८६ हेक्टरने कमी झाली. मात्र मुळ पिक पध्दती विरळ करुन सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आली. त्यामुळे अहवालातील कालव्यांच्या लांबीमध्ये खालील प्रमाणे वाढ झाली आहे.

अ. क्र.	कालवा	मूळ अहवालानुसार		मंजूर चौथा सुप्रमानुसार		झालेली वाढ	
		लांबी कि.मी.	सिंचन क्षेत्र (हे.)	लांबी कि.मी.	सिंचन क्षेत्र (हे.)	लांबी कि.मी.	सिंचन क्षेत्र (हे.)
१.	धोम डावा	९२	१८५७५	११३	२४८२५	२१	६२५०
२.	धोम उजवा	४३	६११२	५९	८१००	१६	१९८८
३.	कण्हेर डावा	१६	११७४	२१	१६०५	५	४३१
४.	कण्हेर उजवा	४८	६११०	५८	८४६५	१०	२३५५
५.	आरफळ डावा	१६८	३२३७५	१९१	३१००५	२३	-१३७०
	एकूण	३६७	६४४२६	४४२	७४०००	७५	९६५४

वरील प्रमाणे कालव्याच्या लांबीत वाढ झाल्याने प्रकल्पाच्या खर्चात रु.६९.१५ कोटी वाढ झाली आहे.

ब) लाभक्षेत्र विकासाच्या कामामुळे झालेली वाढ :

मुळ प्रकल्प अहवालात लाभक्षेत्र विकासाच्या कामासाठी तरतुद करण्यात आलेली नव्हती. पाचव्या सुधारित प्रकल्प अहवालामध्ये लाभक्षेत्र विकासाच्या कामासाठी ५३.६७ कोटीची तरतुद करण्यांत आलेली आहे.

क) विद्युत विमोचकामुळे झालेली वाढ :

मुळ प्रकल्प अहवालामध्ये सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतुद करण्यांत आलेली नव्हती. ती करण्यात आल्याने रु. ०.९३ कोटीची वाढ झालेली आहे.

ड) जल लक्ष्मी योजना :

प्रकल्पग्रस्ताना शासनाच्या खर्चाने सिंचनाचे लाभ देण्यासाठी जललक्ष्मी सिंचन योजनेस धोम जलाशयावरुन चौथ्या सुधारित अहवालामध्ये मान्यता देण्यात आली. जललक्ष्मी योजनेमुळे प्रकल्प बाधीतांच्या

८५७ हे. क्षेत्रास लाभ देण्याचे नियोजीत आहे. सदरची योजना मुळ अहवालाशिवाय असल्याने प्रकल्प खर्चात रु.४४.७० कोटी वाढ झाली.

वरील प्रमाणे व्याप्तीतील बदलामुळे एकूण रु.१६८.४५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४. संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

मूळ प्रशासकीय अहवालात आरफळ कालव्याची लांबी १६८ कि.मी. होती. त्यापैकी कि.मी. ८५ ते १०२ हा कालवा द्रुतगती कालवा म्हणून प्रस्तावित केला होता. सदरचा कालवा डोंगराळ भागातून तीव्र उतारावरुन, वनजमिनीतून जात होता. क्षेत्रीय परिस्थिती विचारात घेऊन सदर ठिकाणी कालव्या ऐवजी बोगदा प्रस्तावित करण्यात आला. त्यामुळे रु.६७.२३ कोटीची वाढ झालेली आहे. मुळ अहवालामध्ये मुख्य कालवा व वितरण व्यवस्थेचे संकल्पन ढोबळ मानाने केले होते. प्रत्येक्ष काम करतेवेळी क्षेत्रीय परिस्थितीनुसार सविस्तर संकल्पनानंतर कामाच्या परिमाणात वाढ झाली. त्यामुळे रु.३७.३८ कोटी इतकी वाढ झाली. अशा प्रकारे संकल्पानातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु.१०४.६१ कोटी इतकी आहे.

५. ईटीपी व इतर कारणाने झालेली वाढ :

मूळ अंदाजपत्रकात आस्थापना खर्चासाठी रु.२.१४ कोटीची तरतूद होती. त्या ऐवजी सुधारीत अंदाजपत्रकात रु. १२८.१८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच अपुऱ्या तरतुदी मुळे १०.८९ कोटी वाढ झाली आहे. अशाप्रकारे ईटीपी व इतर कारणामुळे प्रकल्प खर्चात एकूण वाढ रु.१३६.९३ कोटी झाली आहे.

६. प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

६.१ निधीची अपुरी तरतुद :

प्रकल्पास सन १९६७ मध्ये मुळ प्रशासकिय मान्यता मिळाली. सन १९६८ मध्ये प्रथमतः निधी उपलब्ध झाला. परंतु त्यानंतर प्रकल्पास मागणी प्रमाणे निधी उपलब्ध न झालेने नियोजनाप्रमाणे वेळेत कामे होऊ शकली नाही.

६.२ व्याप्तीतील बदल :

अ) मुळ प्रकल्प अहवालामध्ये सर्व कालव्यांची एकूण लांबी ही ३६७ कि.मी. होती. व्याप्तीतील बदलामुळे नंतर ती ४४२ कि.मी. पर्यंत वाढविण्यांत आली. त्यामुळे ७५ कि.मी. लांबीचे वाढीव कालव्यांची कामे करावी लागली. त्यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झाला.

ब) कृष्णा प्रकल्पाच्या पाणी नियोजनात वारंवार झालेल्या बदलामुळेही प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

६.३ संकल्पनातील बदल :

प्रकल्पाच्या कामामध्ये ४९ कि.मी. लांबीच्या द्रुतगती कालव्याऐवजी १६ कि.मी. लांबीच्या बोगद्याचा अंतर्भाव केल्याने त्याचे संकल्पन, बांधकाम तसेच त्यापुढील कालव्यांवरील बांधकामांचे संकल्पन व त्यानंतर बांधकाम इत्यादींमुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

६.४ पुनर्वसनाच्या कामाचा अंतर्भाव :

कृष्णा प्रकल्प हा १९७६ पुर्वीचा असल्याने त्यावेळी पुनर्वसन कायदा लागू नव्हता. नंतर १९७६ च्या पुनर्वसन कायद्यानुसार १८ नागरी सुविधांची तरतुद करण्यात आली. त्यामुळे पुनर्वसनाची काम नव्याने समाविष्ठ झाल्याने ती अद्याप प्रगतीत आहेत. त्यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

७. प्रकल्पाची सद्यःस्थिती :

सद्यःस्थितीमध्ये धोम, कण्हेर धरणाचे काम पुर्ण झालेले असून नियोजनानुसार धोम उजवा, डावा कालवा व कण्हेर उजवा, डावा कालवा आणि आरफळ कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. प्रकल्पाच्या एकूण ७४००० हे. सिंचन क्षमते पैकी ७३२२८ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सांगली जिल्ह्यातील काही वितरिकांची कामे कोर्टकेस मुळे प्रलंबीत असल्याने ७७२ हे. क्षेत्राची सिंचन निर्मीती व्हावयाची आहे.

८. प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

या प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील वाई, सातारा, जावळी, कराड या तालुक्यातील व अवर्षण प्रवण कोरेगांव तालुक्यातील एकूण ५७२४२ हे. क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगांव, पलूस व कडेगांव या अवर्षण प्रवण तालुक्यातील १२६२६ हे. क्षेत्रास पाणी देण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे सातारा व सांगली जिल्ह्यातील एकूण ६९८६८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

या प्रकल्पात १९८० पूर्वी लाभक्षेत्रात ऊसाचे क्षेत्र ६३५० हेक्टर होते. मुळ प्रकल्प आराखडयानुसार ऊस पिक क्षेत्र १ टक्के (७४०) हेक्टर होते. आता सन-२०११-१२ नुसार एकूण ऊस उत्पादन १३५४८ हेक्टर एवढ्या क्षेत्रावर घेण्यात येत आहे. तसेच सन-१९८० पूर्वी साधारण ११२० हेक्टर क्षेत्रात भाजीपाला होत असे. आता सन-२०११-१२ मध्ये २५४० हेक्टर क्षेत्रात भाजीपाला लागवड झाली होती. अशा प्रकारे सन-२०११-१२ मध्ये सर्व मिळून १०१३५५ हेक्टर क्षेत्र पिकाखाली आले आहे.

कृष्णा प्रकल्पाच्या धोम जलाशयावरील ३ गावांना तसेच कण्हेर जलाशयावरील ११ गावांना , वाई नगरपालिका व कृष्णा काठच्या १४ गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सातारा औद्यागिक वसाहतीसाठी ७० उद्योगांसाठी कृष्णाप्रकल्पातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

धोम जलाशयातून २ मे.वॅ. क्षमतेचे जनित्र बसविण्यात आले असून आतापर्यंत १२६ द.ल.युनिट एवढी वीज निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच कण्हेर जलाशयातून ४ मे. वॅ. क्षमतेचे जनित्र बसविण्यात

आले असून आतापर्यंत १८३ द.ल.युनिट एवढी वीज निर्मिती करण्यात आलेली आहे. प्रकल्पामधून आतापर्यंत एकूण ३०९ द.ल.युनिट एवढी वीज निर्मिती करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात कुकुट पालन, दुग्ध व्यवसाय इ. कुटीर उद्योगामध्ये वाढ झाली आहे. महाबळेश्वर तसेच पाचगणी ही थंड हवेची ठिकाणे धोम व कण्हेर जलाशयाच्या जवळ असल्याने या ठिकाणी येणारे पर्यटक जलविहार, नौकानयन इ.साठी धोम व कण्हेर जलाशयांना भेटी देतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटनाला चालना मिळालेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रती हेक्टरी किंमत प्रस्तावित ५ व्या प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार रु. १.३४ लक्ष प्रती हेक्टरी येते. तसेच या प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर ३.२३ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
चासकमान प्रकल्प, जिल्हा पुणे.

१	प्रकल्पाचे नांव :- चासकमान	तालुका :- खेड		जिल्हा :- पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५६०९६ हे.	जून-१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता ५०६०४ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचनक्षमता हे.
	मुळ प्रशासकीय मान्यता	१५/१२/१९७३	१९६९-७०	१०.६५	३५०४०
	सुप्रमा-१	१९/११/१९७६	१९७५-७६	२२.४८	३६४३५
	सुप्रमा-२	१८/७/२००३	२०००-०१	३८८.१३	५६०९६
	सुप्रमा-३	प्रस्तावित	२००८-०९	७२८.४९	५६०९६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत	११/२ (१०३)/ ७७-आय ॲण्ड सीएडी दि.१७/२/१९७७		२२.४८	३६४३५
५.०	दिनांक ३१/३/२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			५१३.३०	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) ११६.०२			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ३५१.६७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ४५.६१			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७६-७७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९८२	
६.२	त्यावेळची प्रकल्पाचे धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु.कोटी)			६६.२७	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			(रु.कोटी)	
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	८.९०	४५२.३७	४४३.४७	६१.७७
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१.२३	९६.८९	९५.६६	१३.३३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२९.०७	२९.०७	४.०५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.	०.००	७८.९६	७८.९६	११.००
७.५	इटीपी व इतर कारणे	०.५२	७१.२०	७०.६८	९.८५
	एकूण	**१०.६५**	**७२८.४९**	**७१७.८४**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण.

१.० सर्वसाधारण माहिती :

पुणे जिल्ह्यातील अवर्षणप्रवण खेड व शिरुर तालुक्यास सिंचनाचा लाभ देण्यासाठी खेड तालुक्यातील बिबी गावाजवळ भिमा नदीवर चासकमान धरण बांधण्यात आले आहे. मुळ प्रकल्प अहवालानुसार पीकपध्दती बारमाही होती. त्यानंतर १९८७ साली शासनाच्या धोरणानुसार ती आठमाही करण्यात आली. त्यामुळे प्रकल्पाचे लाभक्षेत्रात २१०५६ हे. इतकी वाढ झाली. सुधारित अहवालानुसार चासकमान धरणाचा एकूण पाणीसाठा २४१.६९ दलघमी (८.५३५ अघफू) असून त्यापैकी उपयुक्त साठा २१४.५० दलघमी (७.५३५ अघफू) आहे. धरणाचे काम सन १९९८ मध्ये पूर्ण झाले आहे. प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ५६०९६ हे. असून खेड तालुक्यामध्ये १०५१९ हे. व शिरुर तालुक्यातील ४५५७७ हे. आहे.

प्रकल्पामध्ये डावा कालवा १४४ कि.मी. व उजवा कालवा १८ कि.मी. चा अंतर्भाव आहे. प्रकल्पाच्या धरणाचे काम सन १९९८ मध्ये पूर्ण झाले असून मुख्य कालव्याची कामे पूर्ण झाली असून वितरण व्यवस्थेची बहुतांशी कामे पूर्ण आहेत. तथापि कालवा अस्तरिकरण, वितरण व्यवस्थेची अंशतः शिल्लक कामे व लाक्षेवि कामे निधी अभावी अपूर्णावस्थेत आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता :

चासकमान प्रकल्पास दि. १५/१२/१९७३ रोजी शासनाने रु.१०.६५ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. शासनाने दि. १९/११/१९७६ रोजी रु. २२.४८ कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. १८/७/२००३ रोजी रु.३८८.१३ कोटी किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचा रु.७२८.४९ कोटी किंमतीचा तृतीय सुधारित प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. या प्रकल्पास केंद्रिय नियोजन आयोगाकडून दि. १७/२/१९७७ रोजी रु. २२.४८ कोटी किंमतीस मान्यता मिळाली आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.७२८.४९ कोटी इतकी आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रु. ७१७.८४ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

मुळ प्रशासकीय मान्यता सन १९६९-७० च्या दरसुचीवर आधारीत होती. धरणाचे मातीकाम यांत्रिकी संघटनेमार्फत सन १९७८ पासून हाती घेण्यात आले. दगडी बांधकामासाठी स्वतंत्र निविदा सन-१९८२ मध्ये निश्चित करण्यात आली. निविदेची किंमती रु.५.६५ कोटी होती. प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सन १९८४ ते १९८८ या कालावधीत धरणाचे काम बंद होते. त्यामुळे निविदेचे दर ४० टक्के इतके वाढवून देण्यात आले होते. सन १९८८ ते १९९८ या १० वर्षाच्या कालावधीत धरणाचे काम पूर्ण झाले. त्यावेळी देण्यात आलेली भाववाढ व विविध घटकांची दरसूचीतील वाढ यामुळे धरणाच्या किंमतीत वाढ झाली. चासकमान प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रामुख्याने सन १९९० ते २०१० या कालावधीत झाल्याने दरसुचीतील वाढीमुळे कालव्याच्या किंमतीत देखील वाढ झाली.

वरील बाबीमुळे दरसुचीतील वाढीमुळे (भाववाढीसह) एकूण वाढ रु.४४३.४७ कोटी इतकी झाली आहे.

३.२ भूसंपादन,पुनर्वसन व वन जमिनीच्या किंमतीत झालेली वाढ :

मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये २३४४ हे. जमीन सरासरी रु.१८०४ प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.४२ कोटीची तरतूद होती. प्रत्यक्षात ५९२८ हेक्टर क्षेत्र सरासरी रु.७२३९६ प्रती हेक्टरी दराने संपादन करावी लागली त्याची किंमत रु.४२.९२ कोटी आहे. त्यामुळे रु.४२.५० कोटीची वाढ झाली आहे. भूसंपादनाचे कलम-१८ व २८ मधील न्यायालयीन निर्णयामुळे रु.५.८६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जमिनीच्या किंमतीमध्ये ३६ वर्षात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या करिता संपादित करावयाच्या पर्यायी जमिनीच्या मावेजापोटी प्रकल्प किंमतीमध्ये वाढ झाली.

चासकमान प्रकल्पात ९ गावे पूर्णतः व १९ गावे अंशतः बाधीत झाली आहेत. यामधील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन नवीन १२ गावठाणात करण्यात आले. पुनर्वसन कामासाठी मूळ अहवालात रु.०.०९ कोटी इतकी तरतूद होती. याची झालेल्या खर्चासह अदयावत तरतूद रु.७.५८ कोटी आहे त्यामुळे रु.७.४९ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

आदिवासी क्षेत्रातील प्रकल्प बाधीतांच्या दळणवळणाच्या सोईसाठी श्री. दिलीप मोहिते आमदार खेड यांच्या मागणीनुसार खेड तालुक्यातील पाबे व डेहणे येथे पुल वजा बंधारा, व धुवोली पुल या कामाचा समावेश प्रकल्पाचा भाग म्हणून करण्यात आला. महामंडळाने पत्र क्र.२६७१ दि.२६/३/२००७ च्या ज्ञापनानुसार यास मान्यता दिली. यामुळे रु. ३.७७ कोटी इतकी वाढ झाली.

मुळ प्रकल्प अहवालात वन जमीनीसाठी आर्थिक तरतूद नव्हती. वन जमीन कायदयातील सुधारित तरतूदीनुसार एनपीव्हीसाठी, रु.१.६९ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :

मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार चासकमान प्रकल्प हा बारमाही पिक रचनेचा प्रकल्प म्हणून मंजूर करण्यात आला होता व प्रकल्पाची सिंचन क्षमता ३५०४० हे. एवढी होती. शासनाने सन १९८७ साली अवर्षण प्रवण क्षेत्रातील सर्वंच प्रकल्पासाठी बारमाही पिकपध्दती ऐवजी आठमाही पीकपध्दतीचे धोरण स्विकारले. (शासन निर्णय १०८६/३९७ दि. १३/२/१९८७) आठमाही पिकपध्दतीनुसार प्रकल्पीय सिंचनक्षेत्रात ३५१९० हे. इतकी वाढ झाली व एकूण सिंचन क्षमता ७०२३० हे. इतकी झाली. प्रकल्पिय सिंचन क्षेत्रात वाढ झाल्यामुळे प्रकल्पाचा डावा कालवा ११७ कि.मी. लांबीवरुन १४४ कि.मी. इतका झाला. त्यामुळे शिरुर तालुक्यातील दुष्काळी भागातील अतिरिक्त २२ गावांचे जास्तीचे क्षेत्र सिंचनाखाली आले. तसेच खेड तालुक्यातील ९ गावांच्या सिंचन क्षेत्रासाठी १८ कि.मी. लांबीचा उजवा कालवा नव्याने प्रस्तावित करण्यात आला. लाभक्षेत्रात वाढ झाल्यामुळे कालव्याची लांबी व वितरण व्यवस्थेमध्ये वाढ झाली. पर्यायाने प्रकल्पाच्या किंमतीत रु.२९.०७ कोटी इतकी वाढ झाली

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

प्रकल्पाचे काम करताना मुख्यत्वे करुन संकल्पचित्रांमध्ये खालील बदल करण्यात आले.

वाढीव ३५१९० हे. क्षेत्रासाठी आस्तिवातील मुख्य कालव्याची वहन क्षमता वाढविण्यासाठी (मुळ क्षमता ७२३ क्युसेक्स वाढीव क्षमता ९३० क्युसेक्स) कालव्याला अस्तरीकरण प्रस्तावित करण्यात आले. प्रकल्पामध्ये सिंचन तथा विद्युत विमोचकाऐवजी सिंचन व विद्युत विमोचक अशा स्वतंत्र दोन विमोचकांची तरतूद करण्यात आली. तसेच दगडी धरणामध्ये ड्रेनेज गॅलरी नव्याने प्रस्तावित करण्यात आली. धरणाच्या संकल्पनामुध्ये भूकंप व पायातील Fissured Clay material या कारणामुळे धरणाचा काटछेट सुधारित करण्यात आला.

धरणात सन १९९१ मध्ये प्रथम पाणीसाठा झाल्यानंतर धरणाचे खालील बाजूस पाण्याचा उपळा (Boil) निदर्शनास आला. त्यावर उपाय म्हणून सा.क्र.८५० ते ९१० मी. लांबीमध्ये मातीकाम वाढवून दाबस्कंध करण्यात आला. तसेच पायामध्ये सिमेंट ग्रावन करण्यात व धरणाच्या खालील बाजूस जलनि:सारण,विहीरी करण्यात आल्या. या प्रस्तावास शासन (पा.वि.) पत्र क्र. चासकमान-१०९४/टी ४४५/(१०४/९४) एमपीआय दि.२२/४/१९९४ नुसार मान्यता मिळाली.

धरणाचे व कालव्यांचे वरील तांत्रिक बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत सुमारे रु.७८.९६ कोटी इतकी वाढ झाली.

३.५ ईटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ :-

अ) ई.टी.पी. साठी मुळ अहवालामध्ये रु.०.५२ कोटीची तरतूद होती. सुधारित अहवालात रु.६३.७६ कोटी इतकी तरतूद आहे. त्यामुळे ईटीपी मध्ये रु. ६३.२४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

ब) लोकप्रतिनिधीच्या मागण्यानुसार बांधण्यात आलेले पूल, पायपूल तसेच खेड ते बिबी रस्त्याच्या कामाचे Resurfacing, प्रकल्पांतर्गत वसाहतीच्या इमारतीसाठी करावा लागलेला जादा खर्च, हत्यारे व सयंत्रे तसेच पर्यावरण यासाठी करावी लागलेली जादा तरतूद इत्यादी कारणामुळे रु. ७.४४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

उपरोक्त प्रमाणे एकूण वाढ रु.७०.६८ कोटी इतकी झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब :-

चासकमान डावा कालव्याचे काम सन १९७२-७३ च्या दुष्काळी परिस्थितीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत हाती घेण्यात आले. त्यानंतर चासकमान धरणाचे मातीकाम यांत्रिकी विभागामार्फत सन १९७६ मध्ये सुरु करण्यात आले. दगडी धरण काम १९८२ साली सुरु करण्यात आले. त्यानंतर पुनर्वसनाचे प्रश्न हळू हळू सुटत गेले व सन १९९०-१९९१ मध्ये घळभरणी करण्यात आली. १९९१ मध्ये अंशत: साठा झाल्यानंतर दगडी धरणाचे काम १९८९ ते १९९७ या कालावधीत टप्प्या टप्प्याने पूर्ण करण्यात आले. भूसंपादन व पुनर्वसनामुळे झालेला एकूण विलंब १६ वर्षे इतका होता.

४.२ अपु-या निधीमुळे झालेला विलंब :-

चासकमान प्रकल्प मूळ प्रकल्पअहवालानुसार ५ वर्षात पूर्ण करण्याचे अपेक्षित होते. चासकमान प्रकल्पाला सन १९७३ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रथम प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर जवळ जवळ १४ वर्षे प्रकल्पास पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही. या प्रकल्पाची कालव्याची कामे रो.ह.यो. मार्फत व माती धरणाची कामे यांत्रिकी संघटनेमार्फत करण्यात आली.

सन १९८७-८८ नंतर सन १९९३-९४ पर्यंत धरणाचे व कालव्याचे कामांस पुरेसा निधी उपलब्ध होत गेला.

सन २००१-२००२ ते सन २००३-२००४ या कालावधीत प्रकल्पास पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर टंचाई कार्यक्रमांतर्गत सन २००४-२००७ या कालावधीत काही निधी उपलब्ध झाला. सन २००२-०३ ते २००७-०८ या कालावधीत केंद्र शासनाच्या अे.आय.बी.पी. कार्यक्रमांतर्गत देखील रु. ११९.४१ कोटी निधी प्राप्त झाला होता. सद्यःस्थितीत प्रकल्पास नियोजनाप्रमाणे निधी उपलब्ध होत नसल्याने तसेच भूसंपादनाचे दायित्व जास्त असल्याने कामासाठी कमी निधी उपलब्ध होतो, त्यामुळे वितरण व्यवस्थेची कामे व लाक्षेवि कामे संथगतीने सुरु आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

चासकमान धरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच मुख्य डावा कालवा व त्यावरील शाखा कालवा पूर्ण झालेला आहे. उजवा मुख्य कालवा देखील पूर्ण झाला आहे. वितरण व्यवस्थेचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. चासकमान प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षमता ५६०९६ हेक्टर इतके आहे. त्यापैकी ५०६०४ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. ५४९२ हे. सिंचन क्षमतेची कामे बाकी आहेत. डाव्या कालव्याची वहन क्षमता वाढीसाठी हाती घेतलेली अस्तरीकरणाची कामे डावा कालवा सतत चालू राहात असल्याने तसेच पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने पूर्ण होत नाहीत. रोहयो मध्ये केलेल्या कामात गळती असल्याने डाव्या कालव्याच्या बाजूच्या शेतजमिनी पाणथळ होतात. त्यामुळे खेड तालुक्यातील शेतकरी सातत्याने कालवा चालू ठेवण्यास विरोध करतात. कालव्याचे अस्तरीकरण न झाल्याने कालवा संकल्पीत विसर्गा इतका वाहत नसल्याने व कमी विसर्गामुळे जास्त कालावधीसाठी कालवा चालू ठेवावा लागतो.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

चासकमान धरणाचे काम पूर्ण झाले असून ८.५३५ अ.घ.फू. पाणीसाठा निर्मिती झाली आहे. चासकमान प्रकल्पाचे अंतिम सिंचन क्षमता ५६०९६ हे. असून जुन २०१२ अखेर एकूण ५०६०४ हे. सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. सन २०११-२०१२ मध्ये चासकमान प्रकल्पांतर्गत ३४३२० हे. क्षेत्र सिंचीत झालेले आहे. सदर प्रकल्पावर बीओटी मधून ३ मेगावॅट विज निर्मिती होत आहे. सदर प्रकल्पामधून गुंडाळवाडी,कडूस,तिफनवाडी, रांजणगांव गणपती, करंदी, तळेगांव ढमढेरे व राजगुरुनगर या गांवांना पिण्याचा पाणी पुरवठा होतो. चासकमान प्रकल्पाचे पाण्यामुळे शिरुर तालुक्यातील सणसवाडी येथे औद्योगिक वसाहती मोठया प्रमाणात उभारलेल्या आहेत व त्यामुळे रोजगार निर्मिती झालेली आहे. प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील कोंढापूरी, दहिवडी, मोटेवाडी, आलेगांव पागा, इत्यादी दुष्काळी भागांतील पाझर तलाव भरुन देण्यांत येतात, त्याचा लाभ शेतीचे व पिण्याचे पाण्यासाठी होतो.

शासनास सादर केलेल्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालानुसार प्रकल्पाची एकूण किंमत रु. ७२८.४९ कोटी इतकी असून प्रति हेक्टरी किंमत रु. १.३० लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.५१ इतके आहे

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
निरा देवघर प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : निरा देवघर	तालुका: भोर		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	६०५८१ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचनक्षमता ४७१२ हे..		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२९/५/८४	१९८३-८४	६१.४८	४७८००
	सुप्रमा-१	२९/५/२०००	१९९६-९७	५८८.६५	५८२२१
	सुप्रमा-२	१६/१०/२००२	२०००-२००१	९१०.९०	६०५८१
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत	CWC, Cost Appraisal Directorate let. No. 10/23/86- CA (1) 8 Dated 2/6/2009	२००७-२००८	१३३४.३५	६०५८१
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			६१२.९२	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) =१७०.५०			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ४०२.६०			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ३०.३८			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९८९-९०	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९३-९४	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			४६७.२९	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	४९.१७	८०७.५०	७५८.३३	५९.५८
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	५.०९	२२९.५४	२२४.४५	१७.६३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१२३.१५	१२३.१५	९.६७
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	७६.१६	७६.१६	५.९८
७.६	ई टी पी मुळे झालेली वाढ	७.२२	९८.००	९०.७८	७.१४
	एकूण	**६१.४८**	**१३३४.३५**	**१२७२.८७**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :

निरा देवघर प्रकल्पाच्या रुपये ६१.४८ कोटी रकमेच्या प्रकल्प अहवालास शासनाने १९८४ साली प्रशासकिय मान्यता दिली होती. मुळ मंजुरीनुसार निरा देवघर धरण ५.५१ अघफू क्षमतेचे व नियोजित सिंचन क्षेत्र ४७८०० हे. इतके होते. मूळ प्रकल्प अहवालामध्ये उजवा कालवा १३६ कि.मी. लांबीचा समावेश असून कालव्यावरील सा.क्र. ३८/०१० येथे शिंदेवाडी उपसा सिंचन योजनेची तरतूद होती. आवर्षण प्रवण क्षेत्रातील लोकप्रतिनिधीच्या मागणीमुळे धरणाच्या पाणीसाठयात व सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आली. सध्या धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ११.७१ अघफू व नियोजित सिंचन क्षमता ६०५८१ हे. इतकी आहे. प्रकल्पाचा एकूण वार्षीक पाणीवापर १२.९८ अघफू आहे. सन १९९३ पर्यंत पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने धरणाचे काम हाती घेता आले नाही. तथापि १९९३-९४ मध्ये धरणाचे कामासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया सुरु करुन कामास सुरुवात झाली.

२.० प्रशासकिय मान्यता व सुधारीत प्रशासकिय मान्यता :

निरा देवघर प्रकल्पाच्या रु ६१.४८ कोटी इतक्या किंमतीस सन १९८३-८४ च्या दरसूचीनुसार मूळ प्रशासकिय मान्यता शासनाने दि. २९/५/१९८४ रोजी दिली. त्यानंतर व्याप्तीतील झालेले बदल लक्षात घेऊन मकृखोविम ने रु ५८८.६५ कोटी किंमतीस (दरसूची सन १९९६-९७ नुसार) प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता दि. २९/५/२००० रोजी दिली. त्यानंतर मकृखोविमं ने रु ९१०.९१ कोटी किंमतीस (दरसूची सन २०००-२००१ नुसार) व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता दि. १६/१०/२००२ रोजी दिली. प्रकल्पाला केंद्रिय जल आयोगाच्या कॉस्ट अप्रायझल संचालनालयाने रु. १३३४.३५ कोटी (सन २००७-२००८ ची दरसूची) इतक्या रकमेस मान्यता माहे ६/२००९ मध्ये दिलेली आहे. या अनुषंगाने तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यावरील शेरे पूर्तता करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु ६१२.९२ कोटी खर्च झाला आहे.

३.० मूळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्तावित केलेल्या किंमतीमध्ये रु १२७२.८७ कोटी इतकी वाढ झाली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

भूसंपादन, पुनर्वसन, अपुरा निधी व प्रकल्पबाधीतांच्या वारंवार विरोधामुळे प्रकल्पाचा बांधकाम कालावधी वाढला. त्यामुळे दरसूचीतील दरवाढीमुळे व भाववाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ७५८.३३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मूळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत २२४.४५ कोटी वाढ झाली आहे. मूळ प्रशासकिय मान्यता प्राप्त अहवालामध्ये बुडीत क्षेत्रातील तसेच कालव्यासाठी ३७७३ हेक्टर जमिन सरासरी रु ६८२८/- प्रति हेक्टर दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी २.५८ कोटीची तरतूद होती. तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्तावित अहवालामध्ये ३३३६ हेक्टर क्षेत्र सरासरी रु ३४७२१२/- प्रति हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु.११५.८३ कोटी आहे त्यामुळे रु.११३.२४ कोटी इतकी वाढ होत आहे.

पुनर्वसनाच्या कामात नागरी सुविधामुळे रु८.२९ कोटी, उदरनिर्वाह भत्यामुळे रु१.०५ कोटी, घरबांधणी अनुदानामुळे रु १.०५ कोटी, बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्यासाठी रु४६.५२ कोटी व बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरणासाठी रु२.०६ कोटी, कलम १८ व २८ खालील वाढीव रक्कम अदा करणेसाठी रु.४१.५२ कोटी अशी एकूण रु.१००.४९ कोटीची वाढ झाली आहे.

तसेच वनजमिनीसाठीच्या संपादनापोटी प्रस्तावित तृतीय सुधारीत प्रशासकिय अहवालामधील तरतुदीनुसार झालेली वाढ रु १०.७२ कोटी इतकी आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

सन १९७६ मध्ये कृष्णा पाणी तंटा लवादाच्या आदेशाची अंमलबजावणी सुरु झाल्याने भिमा खो-यातील एकूण पाणीवापरावर निर्बंध लागू झाले. त्यामुळे उपलब्ध पाणी वापराचे पुर्न:नियोजन अनिवार्य झाले. प्रकल्पाचे बहुतांशी लाभक्षेत्र हे खंडाळा व फलटण या अवर्षण प्रवण तालुक्यातील होते. शासन निर्णय क्र एमआयपी/ २२७३/ १९३६८ IP (I) दि. १८/८/१९७३ अनुसार अवर्षण प्रवण क्षेत्रातील पाटबंधारे योजनांचे नियोजन हे ५० टक्के येव्यावर आधारीत करणेबाबत निर्देश देण्यात आले. निरा देवघर प्रकल्पाचे मूळ नियोजन ७५ टक्के जलनिष्पत्तीवर आधारित होते. निरा देवघर धरणस्थळी ५० टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध जलनिष्पत्ती १३ अघफू होती त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार १२.९८ अघफू पाणी वापराचे नियोजन करण्यात आले. त्यामुळे धरणाची साठवण क्षमता ५.५१ अघफू वरुन ११.९१ अघफू इतकी करण्यात आली.

तसेच भोर तालुक्याचे लोकप्रतिनिधी तत्कालीन आमदार अनंतराव थोपटे यांची भोर तालुक्यातील जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणेकरीता डावा कालवा २१ कि मी व उजव्या कालव्यावरुन वेनवडी येथे उपसा सिंचन योजना शासकिय खर्चाने प्रकल्पाचा भाग म्हणून कार्यान्वित करावी अशी मागणी होती.

तसेच खंडाळा तालुक्याचे लोकप्रतिनिधी तत्कालीन आमदार मदनराव पिसाळ, यांनी खंडाळा तालुक्यातील दुष्काळी भागातील जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने मौजे शेखमिरवाडी व वाघोशी येथे शासकिय खर्चाने उपसा सिंचन योजना निरा देवघर उजव्या कालव्यावरुन कार्यान्वित करण्याबाबत मागणी केली होती. तसेच तत्कालीन नामदार विजयसिंह मोहिते पाटील यांनी माळशिरस या अवर्षण प्रवण तालुक्यातील क्षेत्रास सिंचन लाभ मिळावा अशी आग्रही मागणी केली होती. लाभक्षेत्रातील सर्व मागण्यांच्या व शासन निर्णयाच्या अनुषंगाने मूळ प्रकल्पाच्या व्याप्तीत खालीलप्रमाणे बदल करण्यात आले.

अ) धरणामधील पाणीसाठा ५.५१ अघफू ऐवजी ११.९१ अघफू करण्यात आला. त्यामुळे निरा देवघर धरणस्थळी प्रस्तावित पाणीसाठयात वाढ झाल्यामुळे धरणाची लांबी १६०८ मी वरुन २३३० मी उंची ४६ मी वरुन ५८.५ मीटर व तळाची रुंदी ३७० मी वरुन ४९४ मीटर झाली. त्यामुळे धरणाच्या मातीकामातील परिमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे किंमतीमध्ये रु.५७.१० कोटी वाढ झाली.

ब) प्रकल्पाच्या नियोजित सिंचन क्षेत्र ४७८०० हे. वरुन ६०५८१ हे. करण्यात आले. त्यामुळे सिंचन क्षेत्रात १२७८१ हे. वाढ करण्यात आली. वाढीव लाभक्षेत्रास सिंचन सुविधा देण्याच्या दृष्टीने निरा देवघर उजव्या कालव्याची लांबी १३६ किमी वरुन २०८ किमी करण्यात आली. २१ किमी लांबीचा डावा कालवा व वेनवडी, शेखमिरवाडी व वाघोशी या उपसा सिंचन योजना नव्याने समाविष्ठ केल्या. त्यामुळे किंमतीमध्ये रु.६६.०५ कोटी वाढ झाली.

अशा प्रकारे व्याप्तीमधील बदलामुळे रु १२३.१५ कोटी वाढ झाली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

माती धरणाची तळातील रुंदी मातीच्या अभियंत्रिकी गुणधर्मानुसार वाढली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु १७.५० कोटी वाढ झाली आहे.

सन २००० मध्ये धरणाची घळभरणी करताना सांडव्यातून पुराचे पाणी सुरक्षितपणे जाण्याच्या दृष्टीने आगम व पुच्छ कालव्यामध्ये अतिरिक्त पायलट कट घ्यावा लागला. त्याची तरतुद मूळ प्रकल्प अहवालात नव्हती. त्यामुळे कठिण खडकातील खोदाई परिमाणात वाढ झाली, धरणाच्या काटछेदाप्रमाणे भरावाच्या कामामध्ये वाढ झाली. मूळ सांडवा हा व्दारविरहीत ओगी पद्धतीचा होता. तथापि धरणाच्या व्याप्तीमध्ये वाढ झाल्यामुळे ५ वक्राकार व्दारांची तरतूद असलेल्या फ्लिप बकेट पद्धतीचा सांडवा करावा लागला. त्यामुळे सांडव्याचे मूळ लांबीमध्ये वाढ झालेली आहे. तसेच अंत्य कालव्यातील खडक उभ्या आडव्या जोडाचा असून सांडव्यावरुन वाहणा-या पुराच्या पाण्यामुळे अंत्य कालव्यामध्ये खडकाची झीज झालेली आहे. त्यासाठी अस्तरीकरण व एंडविअर या संरक्षक कामाची गरज भासली. तसेच डाव्या व उजव्या अनुत्सारीत भागाची मार्गदर्शक भिंतीची लांबी, कि वॉलची लांबी व पाया पातळी वाढल्यामुळे खोदाई व बांधकामाच्या परिमाणात वाढ झाली. अशी सांडवा कामात एकूण रु १५.५४ कोटी वाढ झाली.

सिंचन तथा विद्युत विमोचकाचे स्थान बदलून साक्र ४२० मी ऐवजी साक्र ५७० मी येथे तांत्रिक कारणामुळे घ्यावे लागले. तसेच आर्च टाईप कॉन्डयुट संकल्पनाऐवजी स्टील पाईप इनकेसिंग करावे लागले. त्याचप्रमाणे यांत्रिकी घटक भागांसाठी प्रत्यक्ष संकल्पनाप्रमाणे तरतूद करावी लागली. या सर्व कारणांमुळे सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या कामात रु १३.८२ कोटी वाढ झाली.

त्याचप्रमाणे प्रस्तावित केलेल्या चार उपसा योजनांच्या यांत्रिकी, विद्युत व स्थापत्य कामासाठी प्रत्यक्ष संकल्पनानुसार रु. २९.३० कोटी रकमेची वाढीव तरतूद करावी लागली.

अशाप्रकारे संकल्पचित्रात झालेल्या बदलामुळे एकूण रु.७६.१६ कोटी वाढ होत आहे.

३.५ आस्थापना खर्चातील वाढ :

मूळ प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये आस्थापना खर्चासाठी रु ७.२२ कोटी इतकी तरतूद होती. प्रस्तावित तृतीय सुधारीत प्रशासकिय अहवालात रु. ९८.०० कोटी इतकी तरतूद केल्याने रु.९०.७८ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

प्रकल्पास मुळ मान्यता सन १९८४ मध्ये मिळली. मात्र प्रथम सुप्रम नंतर पुनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये कलम ११ ची सुधारीत अधिसूचना १९९३ मध्ये महसूल खात्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आली व नागरी सुविधांची कामे सन २०००-२००१ मध्ये पूर्ण झाली. तथापि मंजूरी प्रमाणे सर्व प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप वेळेत झाले नाही. त्यामुळे कामात वेळावेळी अडथळे निर्माण झाले.

प्रकल्प मान्यतेनंतर सन १९८४ ते १९८९ या कालावधीत प्रकल्पासाठी निधीची तरतूद नसल्याने कोणत्याही कामास सुरुवात होऊ शकली नाही. त्यानंतरही १९८९ ते १९९४ पर्यंत प्रकल्पास अल्पसा निधी उपलब्ध झाला त्यामुळे प्रकल्पाची केवळ प्राथमिक स्वरुपाचीच कामे झाली. त्यानंतर धरण पायथ्याची (Seat of Dam) जागा संपादन करुन धरणाचे काम सुरु झाले. याबरोबरच बुडीत क्षेत्र वन जमिन इ. ची संपादन प्रक्रिया सुरु झाली व ती पुर्ण होताच सन २००० मध्ये घळभरणी करुन अंशतः पाणीसाठा निर्माण झला. यानंतर २००१ ते २००४ पर्यंत प्रकल्पास अपुरा निधी मिळत गेल्याने प्रकल्पाचे काम मंद गतीने चालू होते. यानंतर सन २००४-२००७ या काळात टंचाई अंतर्गत निधी प्राप्त झाल्याने धरणाची उर्वरीत कामे व कालव्याची कामे सुरु करण्यात आली. कालव्याची कामे करतानाही भूसंपादन व प्रत्यक्ष स्थानिक शेतक-यांच्या अडथळयामुळे कालव्याची कामे सलगतेने पूर्ण होऊ शकली नाहीत. टंचाई अंतर्गत प्राप्त निधी संपल्यानंतर पुन्हा निधीचा ओघ कमी झाल्याने सिंचन क्षमता निर्मितीच्या कामास नियोजनाप्रमाणे गती देता आली नाही.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

धरणाचे काम १०० टक्के पुर्ण झाले असून सन २००८ पासून धरणामध्ये पुर्ण क्षमतेने ११.९१ अघफू पाणीसाठा करण्यात येत आहे. निरा देवघर उजवा कालवा कि मी १ ते २०८ पैकी १ ते ३९ या लांबीतील कामे बहुतांशी पुर्ण असून कि मी ४० ते ६५ ची कामे प्रगतीपथावर आहेत. कि मी ६६ ते १०० या लांबीतील कालव्याची संरेखा मंजूर असून अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. निरा देवघर डावा कालव्याचे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. सदर कालव्याला लाभधारकांनी विरोध केला असून पर्यायी कालव्याची मागणी केल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे. निरा देवघर उजवा कालवा कि मी १ ते ४० मधील थेट विमोचकांची कामे बहुतांशी पुर्ण झाली असून कि मी १ ते १९ मधील वितरण व्यवस्थेची कामे शेतचा-यांसह पुर्ण झालेली असून या भागात प्रत्यक्ष सिंचनास सुरुवात झाली आहे. प्रकल्पाचे एकूण ६०५८१ हेक्टर पिक क्षेत्रापैकी ४७१२ हेक्टर पिक क्षेत्र इतकी सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. प्रत्यक्ष सिंचित क्षेत्रास लाभ देऊन धरणातील उर्वरीत पाणीसाठा वीर जलाशयात सोडून वीर धरणाचे लाभक्षेत्रातील अंदाजे ३०,००० हेक्टर अतिरिक्त सिंचन साध्य होत आहे. प्रकल्पाची अद्यावत किंमत रु १३३४.३५ कोटी असून प्रति हेक्टरी किंमत रु ३.१० लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.३६ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
उरमोडी प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : उरमोडी प्रकल्प	तालुका: सातारा		जिल्हा : सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	४३८७० हे.	निर्मित सिंचन क्षमता (हे) पीक क्षेत्र : जून २०१२ अखेर ३२८१ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०६/१०/१९९३	१९९०-९१	२१२.०७	४३८७०
	सुप्रमा-१	०३/१०/२००२	२०००-०१	८६७.७७	४३८७०
	सुप्रमा-२	०२/११/२०१०	२००८-०९	१३२४.१४	४३८७०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जल आयोगाचे इंग्रजी पत्र क्र. १६/२७/ २०११ पीए (एन)/ ५७९- ६१०, दि. २९/०३/२०११.	२००९-१०	१४१७.७५	४३८७०
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			६२०.३७	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ८१.६९			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ४९४.४७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ४४.२४			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९०-१९९१
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				१९९७
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत रु. कोटी				४४३.१८
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	१३८.५९	९२२.९४	७८४.३५	६५.०५
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	३६.३१	१४९.७९	११३.४८	९.४१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१८.०८	१८.०८	१.५०
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	८२.६०	८२.६०	६.८५
७.५	इतर कारणे	०.००	१२६.४०	१२६.४०	१०.४८
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	३७.२१	११७.९४	८०.७३	६.७१
	एकूण	**२१२.०७**	**१४१७.७५**	**१२०५.६४**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती -

सुरुवातीस उरमोडी मध्यम प्रकल्पाच्या रुपये १०.८४ कोटी रकमेच्या प्रकल्प अहवालास शासनाने १९८१ साली प्रशासकीय मान्यता दिली होती. मध्यम प्रकल्पाच्या धरण व जलाशयाकरिता अंशतः भूसंपादन करणेत आले. तथापी प्रकल्पबाधितांच्या तीव्र विरोधामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही. त्यामुळे १९९३ साली शासनाने मध्यम प्रकल्पाची मान्यता रद्द करुन, उरमोडी मोठया प्रकल्पास नव्याने प्रशासकीय मान्यता दिली.

उरमोडी मोठा प्रकल्पांतर्गत सातारा तालुक्यातील परळी गावाजवळ उरमोडी नदीवर ९.९६ अ.घ. फू. क्षमतेचे धरण बांधणे व आंबळे येथे ०.३० अ.घ.फू. क्षमतेचा पूरक जलाशय बांधणे नियोजित आहे. प्रकल्पामधून सातारा तालुक्यातील ११८७० हेक्टर, खटाव तालुक्यातील १६००० हेक्टर व माण तालुक्यातील १६००० हेक्टर असे एकूण ४३८७० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्मिती नियोजित आहे.

प्रकल्पामध्ये सातारा डावा कालवा १५ कि.मी., सातारा उजवा कालवा ३२ कि.मी., कण्हेर जोड कालवा ८ कि.मी., खटाव कालवा ७६ कि.मी. व माण कालवा ३१ कि.मी., तसेच उरमोडी उपसा सिंचन योजना टप्पा १ व २, जलाशयावर २ व कालव्यावर ३ उपसा सिंचन योजनांचा समावेश आहे.

सद्यस्थितीत ९.९६ अ.घ.फू. क्षमतेच्या उरमोडी धरणाचे काम पूर्ण झाले आहे. मुख्य कालव्याची कामे प्रगतीपथावर असून, सिंचन क्षमता निर्मितीची कामे अपु-या निधीमुळे संथ गतीने चालू आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता -

उरमोडी मोठा प्रकल्पास दि. ०६/१०/१९९३ रोजी शासनाने रुपये २१२.०७ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०३/१०/२००२ रोजी रुपये ८६७.७७ कोटी किंमतीस प्रथम सुधारित मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि. ०२/११/२०१० रोजी रुपये १३२४.१४ कोटी किंमतीस व्दित्तीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पास केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचेकडून दि. २९/०३/२०११ रोजी रुपये १४१७.७५ कोटी किंमतीस मान्यता मिळाली आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे -

प्रकल्पाची अद्यावत सुधारित किंमत रुपये १४१७.७५ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रुपये १२०५.६८ कोटीने वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ - मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९०-१९९१ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २००९-२०१० च्या दरसूची प्रमाणे काढण्यात आलेली आहे. या १९ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रुपये ७८४.३५ कोटी असून, ती एकूण वाढीच्या ६५.०५ टक्के इतकी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ - यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ रुपये ११३.४८ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या ९.४१ टक्के इतकी आहे. वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे

(अ) सुरुवातीस उरमोडी मध्यम प्रकल्पाकरिता सन १९८०-१९८५ दरम्यान जमीनीचे संपादन सुरु करण्यात आले होते. त्यानंतर मध्यम प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रद्द करुन, उरमोडी मोठया प्रकल्पास शासनाने सन १९९३ मध्ये मान्यता दिली. मध्यम प्रकल्पाकरिता पूर्वी संपादीत केलेल्या जमीनीवर वाढीव नुकसान भरपाई देणेबाबत प्रकल्पबाधितांची मागणी शासनाने दि. २४/१०/१९९७ रोजी मंजूर केली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये ६.८४ कोटी इतकी वाढ झाली.

(ब) मूळ प्रकल्प अहवालानुसार २३९९ हेक्टर क्षेत्र संपादन करणे प्रस्तावित होते. आता ३५५० हेक्टर क्षेत्र संपादन करणे प्रस्तावित आहे. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये ३८.९८ कोटीची वाढ झाली आहे.

(क) बुडीत क्षेत्रातील बाधित १४ गावातील प्रकल्पबाधितांना सन १९९९ मध्ये शासनाने निवाडयाच्या रकमेच्या १५६ टक्के इतके सानुग्रह अनुदान मंजूर केले. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये ६.०६ कोटी इतकी वाढ झाली. तसेच अंशतः बाधित रोहोट व कातवडी गावचे खास बाब पुनर्वसनास शासनाने सन २००१ मध्ये मान्यता दिल्याने रुपये ५.०६ कोटी वाढ झाली आहे.

(ड) पुनर्वसनाच्या कामात मूळ प्रकल्प अहवालातील तरतुदी शिवाय वाढीव नागरी सुविधांमुळे रुपये २५.३९ कोटी, उदरनिर्वाह भत्त्यामुळे रुपये २.३४ कोटी, घरबांधणी अनुदान यामुळे रुपये ३.६१ कोटी, पर्यायी जमीनीच्या किंमती पोटी रुपये १८.५९ कोटी, बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते दिल्यामुळे रुपये ५.७८ कोटी, बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रुपये ०.८४ कोटी अशी एकूण रुपये ५६.५५ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्प अहवालामध्ये एक्स एनव्हार्यमेंट ॲन्ड इकॉलॉजी अंतर्गत कॅट प्लॅन, पी. मेन्टेंनन्स व वाय लॉसेस यासाठी एकूण रुपये १८.०८ कोटी इतकी नव्याने तरतूद करण्यात आलेली आहे. सदरची वाढ ही १.५० टक्के इतकी आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

(अ) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी २.५० मी. ऐवजी ४.१० मी. मुक्तांतर सुचविल्यामुळे धरणाची उंची १.६० मी. ने वाढली. त्यामुळे धरणाच्या किंमतीत रुपये ६.३५ कोटी वाढ झाली. तसेच शासनाच्या सुधारित धोरणानुसार सिंचन विमोचकाऐवजी जलविद्युत निर्मितीसाठी सिंचन तथा विद्युत विमोचक बांधण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे रुपये ७.७८ कोटी वाढ झाली.

(ब) मूळ प्रकल्प अहवालानुसार सांडव्याची जागा सा.क्र. ४७३ ते ५३० मी. इतकी होती. क्षेत्रिय परिस्थितीनुसार सदर जागा सा.क्र. १८३ ते २४० मी. येथे करण्यात आली. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये २८.९७ कोटी इतकी वाढ झाली.

(क) मूळ प्रकल्प अहवालानुसार सातारा तालुक्यातील लाभक्षेत्र को. प. बंधा-यांवरुन खाजगी उपसा योजनांव्दारे सिंचीत करणे प्रस्तावित होते. तत्कालीन सहकार मंत्री मा. श्री. छ अभयसिंहराजे भोसले, यांचे मागणीनुसार सातारा तालुक्यातील लाभक्षेत्र को. प. बंधा-यावरुन भिजविणेऐवजी कालव्याव्दारे प्रवाही पध्दतीने भिजविणेसंदर्भात दि. २५/०४/१९९४ रोजी मा. मुख्यमंत्रीमहोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. तसेच सातारा तालुक्यातील कालव्याच्या वरील बाजूस ५० मीटर उपसा सिंचन सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत व त्याचप्रमाणे जलाशयाच्या वरील बाजूसही उपसा सिंचनाव्दारे पाणी उपलब्ध करुन देणेसंदर्भात दि. १०/०६/१९९६ रोजी

पाटबंधारे मंत्री यांचे बैठकीत निर्णय घेणेत आला. यामुळे प्रकल्पाच्या किमतीमध्ये रुपये ३९.४९ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

अशा प्रकारे सविस्तर संकल्पचित्रामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. ८२.६० कोटी वाढ झाली आहे.

३.५ इतर कारणामुळे झालेली वाढ :

(अ) केंद्रीय जल आयोगाची मान्यता घेण्यासाठी त्यांच्या निकषानुसार उरमोडी प्रकल्पाची विश्वासार्हता ५० टक्के वरुन ७५ टक्केपर्यंत वाढविणेसाठी आंबळे पूरक जलाशयाचा समावेश उरमोडी प्रकल्पामध्ये करण्यास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने दि. १२ जून २००९ रोजी मान्यता दिली. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये ७७.८४ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

(ब) मूळ प्रकल्प अहवालानुसार खटाव व माण कालव्याचा संकल्पित विसर्ग १४.०२ क्युमेक्स इतका होता. तारळी प्रकल्पाच्या खटाव व माण तालुक्यातील लाभक्षेत्रासाठी उरमोडी प्रकल्पाच्या कालव्याचा वापर करण्याचे ठरल्यामुळे, कालव्याची वहन क्षमता, तसेच उरमोडी उपसा सिंचन योजनेची अश्वशक्ती वाढवावी लागली. त्यामुळे रुपये ४८.५६ कोटी इतकी वाढ झाली.

(क) इटीपी व इतर : मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये ३७.२१ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रकल्प अहवालानुसार यासाठी रुपये ११७.९४ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे. यामध्ये रुपये ८०.७३ कोटीची वाढ (६.७१ टक्के) झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे

४.१ पुनर्वसनाच्या कामास झालेला विलंब

(अ) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर सन १९९३-१९९७ या कालावधीत पुनर्वसनाचे काम पूर्ण न झाल्यामुळे व प्रकल्पबाधितांच्या विरोधामुळे धरणाच्या कामास सुरुवात होऊ शकली नाही.

(ब) पुनर्वसनाचे काम अंशतः झाल्यानंतर धरणाच्या कामास डिसेंबर १९९७ मध्ये सुरुवात झाली. परंतू सन १९९८ ते २००७ या दरम्यान प्रकल्पबाधितांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रकल्पाचे काम एकूण ९७९ दिवस बंद पाडले.

(क) उरमोडी धरणाचे काम सन २०१० मध्ये पूर्ण झाले असले तरीही ३६५८ पैकी ९११ प्रकल्पबाधित खातेदारांना पर्यायी जमीन वाटप करणेचे अद्याप शिल्लक आहे. तसेच ३६३ खातेदारांना नवीन पुनर्वसित गावठाणात भूखंड वाटपाचे काम शिल्लक आहे.

(ड) आंबळे पूरक जलाशयाचे भूसंपादन व पुनर्वसन न झाल्याने प्रकल्पबाधितांच्या विरोधामुळे काम अद्याप सुरु होऊ शकलेले नाही.

४.२ अपुरा निधी :

उरमोडी प्रकल्पास सन १९९३ ते १९९६ या कालावधीत प्रकल्पास अत्यल्प निधी प्राप्त झाला. त्यामुळे प्रकल्पाची कामे सुरु होऊ शकली नाहीत. त्यानंतरही मागणीपेक्षा खूपच कमी निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे प्रकल्पाची कामे संथ गतीने चालू आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती

प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम पूर्ण असून, ९.९६ अ.घ.फू. पाणी साठा सन २०१० मध्ये निर्माण झाला आहे. कण्हेर जोड कालवा, खटाव कालवा कि.मी. ४२ पर्यंत, तसेच उरमोडी उपसा सिंचन योजना टप्पा १ व टप्पा २ अंशतः कार्यान्वित झाली आहे.

सातारा डावा कालवा, सातारा उजवा कालवा व माण कालव्याची कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पाच्या ४३८७० हेक्टर सिंचन क्षमतेपैकी ३२८१ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सध्या मुख्यत्वे सिंचन क्षमता निर्मितीची कामे बाकी असून, ती अपु-या निधीमुळे संथ गतीने चालू आहेत.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे

धरणाचे काम पूर्ण झाल्याने ९.९६ अ.घ. फू. पाणी साठा निर्मिती झाली आहे व ५०० हेक्टर क्षेत्राचे प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.

तसेच सन २००२ पासून धरणातील पाणी नदीत सोडून सातारा शहरास पाणी पुरवठा करणेत येत आहे. सन २००६-२००७ पासून टंचाई परिस्थितीत पिण्यासाठी, तसेच जनावरांसाठी चारा पिक निर्मितीसाठी खटाव कालवा कि.मी. क्र. १ ते ४२ मध्ये पाणी सोडण्यात येत आहे.

सन २०११-१२ मध्ये खटाव तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमध्ये उरमोडी धरणातील पाणी येरळवाडी, शिरसवडी, पारगांव, येळीव व इतर १० गावतलावामध्ये सोडल्यामुळे ५३ गावातील पाणी पुरवठा योजनेचे पुनर्जीवन झाले. याबरोबरच टँकरग्रस्त गावांना पाणी पुरविणेसाठी टँकर फिडींग पॉईंट उपलब्ध झाले.

प्रकल्पाची सुधारीत किंमत १४१७.७५ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ३.२३ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.०८३ इतके आहे.

ᴘᴘ

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
भामा आसखेड प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : भामा आसखेड	तालुका: खेड		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	हे.२९४६५	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हे) :४३४		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे)
	नविन मूळ प्रशासकीय मान्यता	०३/१०/१९९२	१९९१-१९९२	११२.९३	२९४६५
	सुप्रमा-१	०३/१०/२००२	१९९९-२०००	४५८.२०	२९४६५
	सुप्रमा-२ (प्रस्तावित)		२००९-२०१०	५७५.८४	२९४६५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			२२२.८२	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/ संपादन खर्च (रु.कोटी)		६०.२०		
	५.२ बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		१२८.८२		
	५.३ इटीपी खर्च (रु.कोटी)		३४.५०		
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९२-९३	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९५	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रू,कोटी)			११२.९३	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			(रु. कोटी)	
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	८३.७८	३७८.२८	२९४.५०	६३.६२
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	११.६१	९१.३१	७९.७०	१७.२२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	४.८८	४९.४७	४४.५९	९.६३
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				
७.५	इतर कारणे	०.७७	८.७७	८.००	१.७३
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	११.८९	४८.०१	३६.१२	७.८०
	एकूण	११२.९३	५७५.८४	४६२.९१	१००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :

भामा आसखेड धरण भीमा नदीची उपनदी भामा या नदीवर मौजे करंजविहिरे ता. खेड, जि. पुणे येथे धरण बांधणेत आले आहे. धरणाचा एकुण पाणीसाठा ८.१४ अघफु (२३०.४७३ द.ल.घ.मी) व उपयुक्त पाणीसाठा ७.६४५ अघफु आहे. भामा आसखेड धरणास डावा १४ कि. मी. व उजवा १०५ कि. मी. लांबीचे दोन कालवे नियोजित आहेत. प्रकल्पाची नियोजित सिंचन क्षमता २९४६५ हे. असून त्यामुळे पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील ११५८७ हे. (३७ गावे), हवेली तालुक्यातील ८३९८ हे. (१८ गावे) व दौंड तालुक्यामधील ९४८० हे.(९ गावे) इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २०१० मध्ये पूर्ण झाले असून उजव्या कालव्याची कि.मी.१८ पर्यंत अंशतः कामे पूर्ण आहेत. उर्वरित कालवा व वितरणाची व्यवस्थेची कामे निधीच्या कमतरेतमुळे अद्यापही हाती घेता आली नाहीत.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :

भामा आसखेड प्रकल्पास रु.६३.१४ कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता शासनाने दि.२२/४/१९८८ रोजी दिली होती. प्रकल्पास १९८८ ते १९९२ या कालावधीत आर्थिक तरतूद न झालेने व पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने शासनाने रु.११२.९३ कोटी (दरसूची १९९१-९२) रकमेस नव्याने प्रशासकीय मान्यता दि.३०/१०/१९९२ रोजी दिली. त्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने प्रकल्पाच्या रु.४५८.२० कोटी (दरसूची १९९९-२०००) रकमेस दि.३/१०/२००२ चे पत्रान्वये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रकल्पावर मार्च-२०१२ अखेर रु.२२२.८२ कोटी खर्च झाला असून प्रकल्पाची प्रस्तावित द्वितीय सुधारीत प्रशासकीय किंमत रु.५७५.८४ कोटी इतकी आहे.

३.० प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढण्याची कारणे :

३.१ दरसूचीतील वाढ :

मुळ प्रशासकिय मान्यता सन १९९१-९२ चे दरसूचीवर अधारित होती. सन १९९२ मध्ये प्रत्यक्ष धरणाचे बांधकाम हाती घेण्यात आले, व सन २०१० मध्ये पूर्ण झाले. मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये धरणाच्या बांधकामाची तरतूद सांडव्यासह रु.१८.८० कोटी इतकी होती. प्रत्यक्षात धरणांचे स्थापत्य काम पूर्ण होताना धरणाची सांडव्यासह किंमत रु.७२.१२ कोटी इतकी झाली. त्यामुळे धरणाचे कामात रु.५३.३२ कोटी इतकी वाढ झाली आहे. मूळ प्र.मा. अहवालात कालव्यांच्या कामासाठी वितरण व्यवस्थेसह रु.५३.२५ कोटी इतकी तरतूद होती. प्रत्यक्षात निधी अभावी २० वर्षानंतर देखील ११९ कि.मी लांबीच्या कालव्यापैकी फक्त १८ कि.मी. लांबीचे कालवे अशंतः करणे शक्य झाले आहे. त्यामुळे उर्वरित कालव्याचे कामांची किंमत दरसूचीतील वाढीमुळे रु.२१४.८४ कोटी इतकी वाढ अंदाजित आहे. इतर घटक्तील वाढ धरुन दरसूची वाढ व भाववाढीमुळे किंमतीमध्ये २९४.५० कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसनामुळे झालेली वाढ :

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्येतेच्या वेळी १३८९ हेक्टर इतके क्षेत्र संपादित करणे अपेक्षित होते. तथापि मूळ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर धरणाची साठवण क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पूर्ण संचय पातळीची उंची ४.८ मीटरने वाढली. त्यामुळे जलमग्न क्षेत्रात ८७० हेक्टर वाढ झाली. तसेच भूसंपादन करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किंमतीत देखील वाढ झाल्याने रु.२१.५८ कोटी इतकी वाढ झाली आहे. प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना बुडित क्षेत्रातील जमीनींची निवाडा किंमत मान्य नसलेने कलम-१८ व २८ खाली जिल्हा न्यायालयाने वाढीव किंमत मंजूर केल्यानुसार रु.९.९४ कोटी तरतूद करण्यात आली आहे. . तसेच वाहतुक भत्ता, बुडित क्षेत्रातील पर्यायी रस्ते व विद्युत वाहिन्या स्थलांतर यासाठी मूळ अहवालात १०.०० कोटी ची तरतूद होती. प्रकल्पांतर्गत वाकी तर्फे वाडा, अनावळे, पराळे व रौंधळवाडी बाधित गावठाणासाठी घरांचा

मोबदला व नागरी सुविधांसाठी आतापर्यंत रु.१४.२२ कोटी खर्च झाला आहे. मौजे शिवे व रौंधळवाडी गावांच्या खास बाब पुनर्वसन प्रस्तावास शासनाने दि.२३/८/२००४ रोजी मान्यता दिली. त्यामुळे घराचा मोबदला व नागरी सुविधांकरीता एकुण रु.१४.११ कोटी तरतूद करण्यात आली आहे. वाघुची साबळेवाडी, कासारी कुदळेवाडी, पाईट गवारवाडी नागरी सुविधांकरीता १०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे. मूळ प्रकल्प अहवाल व सुधारित प्रकल्प अहवालामध्ये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी पर्यायी जमिन, उदरनिर्वाह भत्ता, घरबांधणी अनुदान या बाबींची तरतूद नव्हती. पर्यायी जमीनीकरीता रु.८.०३ कोटी तरतूद करण्यात आली आहे. उदरनिर्वाह भत्ता व घरबांधणी अनुदानासाठी रु.१.०७ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

धरणाचे बुडीत क्षेत्रातील पाळू कासारी रस्ता (रु.०.९४ कोटी) व वहागाव देशमुखवाडी पूल (रु.०.९२ कोटी) अशी एकुण रु.१.८६ कोटी तरतूद करण्यात आली आहे. वरील सर्व कामांकरीता रु.९१.३१ कोटी रुपयांची एकुण तरतूद करण्यात आली आहे. नवीन मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार मूळ तरतूद रु.११.६१ कोटी रुपयांची होती. वरील वाढीव बाबींमुळे भूसंपादन व पुनर्वसन यामध्ये रु.७९.७० कोटी वाढ झाली आहे.

३.३ प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे संकल्पचित्रात झालेला बदल व त्यामुळे झालेली वाढ :

मूळ प्रकल्प अहवालानुसार धरण स्थळी ७५ टक्के विश्वासार्ह येवा ७.७६५ अघफु इतका अंदाजित केला होता. त्यानुसार धरणाची एकुण क्षमता ५.९८४ अघफु, उपयुक्त साठा ५.५०७ अघफु व वार्षिक पाणीवापर ६.८२० अघफु इतका निश्चित केला होता. त्यानंतर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी अंतिम केलेल्या जलशास्त्रीय अभ्यासानुसार धरण स्थळी ७५ टक्के विश्वासार्हतेचा येवा ५.८५३ अघफु व ५० टक्के विश्वासार्हतेचा येवा ७.६४७ अघफु असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रकल्पाचे जलनियोजन ७५ टक्के यशस्वीतेस करण्यासाठी धरणात १.८२५ अघफु इतका निभावणीचा पाणीसाठा ठेवण्यात आला. त्यासाठी धरणाची एकुण क्षमता ८.१४ अघफु व उपयुक्त पाणीसाठा ७.६४७ अघफु ठेवण्यात आला. त्यासाठी धरणाच्या पूर्ण संचय पातळीमध्ये ४.३ मी. ने वाढ करण्यात आली.

उंची वाढ झाल्यामुळे धरणांचे संकल्पन बदलण्यात आले. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी धरणाची पूर्ण संचय पातळी ६६७.२० मी. वरुन ६७१.५० मी. पर्यंत वाढविली. धरणाची उंची वाढीमुळे व माती धरण संकल्पन पॅरामीटरमध्ये बदल झाल्याने धरणाच्या काटछेदात विस्तारित उतार व विस्तारीत बर्म देण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाची किंमत रु.३०.४५ कोटीने वाढली. धरणाच्या नविन संकल्पनानुसार पोहोच कालव्याची लांबी ३५० मी. वाढली तसेच पूच्छ कालव्याच्या लांबीमध्ये ६७५ मी. वाढ झाली व तळ उतार वाढविण्यात आले. त्यामुळे खोदाईच्या परिमाणामध्ये वाढ झाली. मूळ अहवालात सिंचन तथा विद्युत विमोचक सा. क्र. ६४५ मी. येथे होते. सुधारीत संकल्पानुसार सा.क्र. ६६० येथे करण्यात आले. वरीलप्रमाणे संकल्पचित्रात झालेल्या बदलांमुळे धरणाची किंमत रु.४४.५९ कोटी ने वाढ झाली आहे.

३.५ इतर कारणे :

सुधारीत प्रकल्प अहवालात सरिता मापन केंद्र, हवामान सूचक केंद्र, सर्वेक्षण व पर्यावरण मान्यता, शिर्ष विमोचकाची संकीर्ण कामे यामुळे रु.८.०० कोटी वाढ झाली आहे.

३.६ इटीपी मुळे झालेली वाढ : मूळ प्रकल्प अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये ११.८९ कोटी इतकी तरतूद होती. द्वितीय सु.प्र.मा. (प्रस्तावित) प्रकल्प अहवालानुसार रुपये ४८.०१ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे. यामध्ये रुपये ३६.१२ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

शासनाचे प्रथमतः अनुदान सन १९९२-९३ साली मिळाले. त्यानंतर अनुदान अनुपलब्धतेमुळे नियोजित कामे वेळेत हाती घेता आली नाहीत. प्रत्यक्षात धरणाचे काम सन १९९५ साली सुरु झाले. धरणाचे काम निधीअभावी १५ वर्षे लांबले. कालव्याची कामे निधीअभावी हाती न घेतल्याने अद्याप अपूर्ण आहेत. त्यामुळे प्रकल्पास निधी नसल्यामुळे विलंब होत आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाचे काम पूर्ण झाले असून काही तद्नुषंगिक किरकोळ कामे प्रगतीपथावर आहेत. तथापि धरणात सन २०१० पासून ८.१४ अघफु इतका म्हणजे १०० टक्के पाणीसाठा करणेत येत आहे. धरणातील पाण्याचा वापर धरणाखालील नदीमध्ये आस्तित्वातील को.प.बंधारेद्वारे (१२४४३ हे.) व जलाशयातील उपसा सिंचन योजनाद्वारे (४३४ हे.) असे एकुण १२८७७ हे. इतके क्षेत्र सिंचनाखाली येते. धरणास उजवा कालवा १०५ कि.मी. व डावा कालवा १४ कि.मी. असे दोन कालवे आहेत. त्यापैकी उजव्या कालव्याची कि.मी.१८ पर्यंतची कामे प्रगतीत आहेत. उर्वरित १८ कि.मी. पर्यंतची बांधकामे व उर्वरित कालव्याची कामे निधीअभावी हाती घेता आली नाहीत.

प्रस्तावित सु.प्र.मा. नुसार प्रकल्पाची एकुण किंमत ५७५.८४ कोटी इतकी असून प्रति हेक्टरी किंमत रु.१.९५ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.७६७ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
गुंजवणी प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : गुंजवणी	तालुका: वेल्हा		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	२६६८६ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) :- निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रक ल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६/१०/१९९३	१९९०-९१	८६.७७	२४१८१
	सुप्रमा-१	०३/१०/२००२	२०००-०१	३१६.६०	२६६८६
	सुप्रमा-२	प्रस्तावित	२०११-२०१२	६६५.२३	२६६८६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत			नाही.	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			२०५.०७	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ७३.६०			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ११८.७८			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = १२.६९			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९८	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			२७७.०३	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	अद्यावत तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	५७.१४	३९०.९३	३३३.७९	५७.७०
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१२.२२	१५८.६०	१४६.३८	२५.३१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१०.२०	१०.२०	१.७६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	६३.६७	६३.६७	११.०१
७.५	इतर कारणे व आस्थापना	१७.४१	४१.८३	२४.४२	४.२२
	एकूण	**८६.७७**	**६६५.२३**	**५७८.४६**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :

गुंजवणी धरण ता.वेल्हे जि.पुणे हे कानंदी नदीवर सन १९९८ पासून प्रगतीत आहे. धरणाचा पाणी साठा ३.७० अ.घ.फू असून प्रकल्पाचे एकूण पिकक्षेत्र २६६८६ हे. आहे. (वेल्हे ९२५ हे., भोर ११८५७ हे. व पुरंदर १३९०४ हे.) गुंजवणी प्रकल्पामध्ये धरण, डावा कालवा १४४ कि.मी. व उजवा कालवा २२ कि.मी. चा अंतर्भूत आहे. त्यापैकी धरण व डाव्या कालव्याचे काम प्रगतीत आहे. धरणात ०.७ अ.घ.फू. पाणी साठा सन २००० पासून होत आहे. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर सन २००२ पर्यंत काम चालू होते. त्यानंतर गेल्या १० वर्षात पुनर्वसनाचा विशेषतः पर्यायी जमिन वाटपाचा प्रश्न मार्गी न लागल्याने प्रकल्पबाधितांचा कामास विरोध असल्याने आज अखेर प्रकल्पाचे काम बंद आहे.

प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :

गुंजवणी प्रकल्पास रु.८६.७७ कोटी किंमतीस दरसूची १९९०-९१ नुसार मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने, दिनांक १३/१०/१९९३ रोजी दिली. त्यानंतर मकृखोविमं ने रु.३१६.६० कोटी किंमतीस (दरसूची २०००-०१ नुसार) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक ३/१०/२००२ रोजी दिली. प्रकल्पाची सन २०११-१२ मधील उर्वरीत कामाच्या खर्चासाठी ८ टक्के भाववाढ ग़हीत धरून व महसूल खात्याच्या रेडी रेकनर नुसार संपादन करावयाच्या जमिनीच्या किमतीनुसार प्रकल्पाची अद्ययावत अंदाजित किंमत रू. ६६५.२३ कोटी आहे. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये २०५.०७ कोटी खर्च झाला आहे.

२.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत अद्यावत किंमत रु.५७८.४६ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

भूसंपादन, पुनर्वसन, अपूरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ३३३.७९ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १४६.३८ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या २५ टक्के वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये २३७० हे. जमीन सरासरी रु.९१७० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते. अद्यावत किंमतीनुसार २४४८ हेक्टर क्षेत्र सरासरी रु ४.८७ लक्ष प्रति हेक्टरी दराने व अतिरिक्त घरे, फळझाडे, ताली, विहीरी इ. संपादन करणे प्रस्तावित आहे. तसेच पुनर्वसनाच्या कामात वाढीव नागरी सुविधामुळे, उदरनिर्वाह भत्त्यामुळे, बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्यासाठी व वन जमिनीच्या नुकसान भरपाई (NPV सह) कारणामुळे रु.१४६.३८ कोटीं वाढ झालेली आहे.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढः

भोर तालुक्यातील सोंडे,हातवे बुद्रुक व खुर्द, माहेरी बुद्रुक व खुर्द,कासुर्डी, आळंदे या गावचे २५०५ हे.अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची मागणी तत्कालीन आमदार श्री.काशिनाथ खुटवड यांनी केली होती. त्यास महामंडळाने पत्र क्र.२९९/२७४/९९/मोप्र-२/११६४५ दि.१/१२/२००० रोजी

मान्यता दिली. त्यामुळे गुंजवणी प्रकल्पात २२ कि.मी. चा उजवा कालवा व त्यावरील वितरण व्यवस्था नव्याने अंतर्भूत झाली. त्यानुसार रु.१०.२० कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

धरणाच्या माती धरणाच्या संकल्पनामध्ये क्षेत्रिय ठिकाणी उपलब्ध कवच भरावा साहित्याच्या गुणधर्मानुसार बदल करावा लागला त्यामुळे माती धरणाच्या रुंदीमध्ये वाढ झाल्याने रु.४०.४५ कोटी किंमत वाढ झाली. सांडव्याचा पाया मुळ प्र.मा. मधील तरतूदी पेक्षा ७ मीटरने खोलवर लागल्यामुळे सांडव्याची खोदाई, बांधकाम व अनुषंगिक बाबींमध्ये वाढ झाल्याने रु. २.२९ कोटी ची वाढ झाली. तसेच सा.क्र.९०० ते ९६० व १४३० ते १५३० या भागात सीओटी नियोजनापेक्षा जादा खोल घ्यावी लागल्याने रु. ४.३१ कोटी वाढ झाली. मुळ प्र.मा.मध्ये सिंचन विमोचकाची तरतुद होती. तथापि सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये शासनाच्या धोरणानुसार जल विद्युत निर्मितीसाठी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतुद केल्याने रु.१४.२४ कोटीची वाढ झाली. पोहच व पुच्छ कालवा संकल्पानातील बदलामुळे रु.२.३८ कोटीची वाढ झाली. अशाप्रकारे संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. ६३.६७ कोटी इतकी आहे.

३.५ आस्थापना व इतर कारणे :

आस्थापना व अनुषंगीक खर्चामुळे रू. २४.४२ कोटी वाढ झालेली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणेः

४.१ पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब :

पुनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये कलम ११ ची अधिसूचना ऑक्टोबर १९९४ मध्ये महसूल खात्यामार्फत प्रसिध्द करण्यात आली. तथापि पुनर्वसनास विरोध झाल्याने विभागीय आयुक्त, पुणे यांनी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर २२ फेब्रुवारी, १९९८ रोजी धरणाच्या कामास सुरुवात झाली. सन २००० मध्ये संपूर्ण बुडीत क्षेत्राचे संपादन करुन अंशतः घळभरणी करण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीनीच्या वाटपाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने सन २००२ मध्ये प्रकल्पग्रस्तांमार्फत उच्च न्यायालयामध्ये याचिका (५५०/२००२) दाखल करण्यात आली व प्रकल्पाचे काम बंद पाडले.

सन २००५ मध्ये उच्च न्यायालयाने संकलन रजिष्टर मधील त्रुटी दुरुस्त करुन पर्यायी जमिनीचे वाटप करावे असे आदेश दिले. त्यानंतर २००७ मध्ये संकलनातील दुरुस्ती करुन खातेदारांची संख्या १३५२ वरुन ७७५ करण्यात आली व त्याचे वाचन बाधीत गावांमध्ये जाऊन केले. यानंतर जिल्हाधिकारी, पुणे व प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांबरोबर बैठक घेऊन बंद असलेने काम दिनांक ६/११/२००८ रोजी सुरु केले. परंतू पर्यायी जमिन वाटपात अपेक्षित प्रगती नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी धरणाचे काम पुन्हा दिनांक ९/३/२००९ रोजी बंद पाडले. जुलै, २००९ मध्ये प्रकल्प बाधीतांनी पुन्हा सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन पर्यायी जमीनीचे वाटप त्वरीत पुर्ण करण्याबाबत उच्च न्यायालयाकडे मागणी केली. याबाबत ३ महिन्यामध्ये कालबध्द पध्दतीने पात्र खातेदारांना पर्यायी जमीनीचे वाटप पूर्ण करण्याचे महसुल खात्यातर्फे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यानुसार सर्व पात्र खातेदारांना पर्यायी जमीनीचे वाटप नोव्हेंबर २००९ अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापी अद्यापी २५१ खातेदारांना पर्यायी जमिन वाटपाबाबतचे आदेश महसूल विभागामार्फत झालेले नाहीत. आजमितीस सुधारित संकलन रजिस्टरनुसार ६५ टक्के रक्कम

भरलेल्या ४११ खातेदारांपैकी २५१ (६१ टक्के) खातेदारांना पर्याची जमीन वाटपाबाबतचे आदेश काढण्यात आले असून यापैकी पर्यायी जमीनीचा प्रत्यक्ष ताबा २५१ पैकी १६० खातेदारांना मिळालेला आहे. अद्याप ३९ टक्के खातेदारांना पर्यायी जमिनीचे वाटप आदेश महसूल खात्यामार्फत निघालेले नाहीत. त्यामुळे धरणाचे काम सध्या बंद आहे. एकंदरीत ऑक्टोबर १९९४ मध्ये पुनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये कलम ११ प्रसिध्द केल्यानंतर सुमारे १८ वर्षाचे कालावधीतही पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी न लागल्याने धरणाचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही.

४.२ वन जमीनीच्या हस्तांतरणास झालेला विलंबः

धरणाच्या कामासाठी ५०.०८ हेक्टर वन जमीनीचे हस्तांतरण करण्याच्या प्रस्तावास दिनांक ६.३.२००३ रोजी काही अटींच्या अधीन राहून तत्वतः मान्यता मिळालेली आहे. या अटींची पूर्तता करुन अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव २४ डिसेंबर २०१० रोजी केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयास सादर केलेला होता. त्यावर शेरे उपस्थित झाले आहेत. प्रस्तावास केंद्रीय वन व पर्यावरण खात्याची अंतिम मान्यता मिळाल्याशिवाय धरणाचे उर्वरित काम करता येत नाही.

४.३ अपु-या निधीमुळे झालेला विलंब :

प्रकल्पास सन १९९३ मध्ये मुळ प्र.मा. मिळाली. मात्र सन १९९६-९७ पर्यंत काहीही निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला मात्र पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता येवू शकली नाहीत.

७.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून धरणात ०.७० अ.घ.फू. पाणीसाठा सन २००० पासून करण्यात येत आहे.सदर पाणी साठयाचा वापर धरणाखालील नदीमधील अस्तित्वातील को.प बंधा-याद्वारे करण्यात येत असून त्याद्वारे १४० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सांडवा बांधकाम व त्यावर दरवाजे बसविण्याचे काम अद्यात सुरु होऊ शकले नाही. प्रकल्पाच्या प्रस्तावित १४४ कि.मी. डाव्या कालव्यापैकी फक्त १ कि.मी. कालवा पूर्ण असून कि.मी.२ चे काम प्रगतीपथावर आहे. उजव्या कालव्याचे कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. निधी अभावी कालव्यांची व वितरण व्यवस्थेची कामे हाती घेता आली नाहीत.

प्रकल्पाची अद्यावत किंमत ६६५.२३ कोटी असून प्रतिहेक्टरी रु. २.४९ लक्ष खर्च होणार आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
धोम बलकवडी बोगदा प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : धोम बलकवडी बोगदा पाटबंधारे प्रकल्प, तालुका वाई जिल्हा : सातारा				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	२५५०० हे.	जून – २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - ९५५३ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	११/०६/१९९६	१९९५-९६	२६१.७२	२१७००
	सुप्रमा-१	०४/०७/२००२	१९९९-२०००	४७५.२९	२५५००
	सुप्रमा-२	०२/०५/२००३	१९९९-२०००	४७५.२९	२५५००
	सुप्रमा-३	३०/०६/२००९	२००७-०८	६८४.६५	२५५००
	सुप्रमा-४	प्रस्तावीत	२००८-०९	८४८.८९	२५५००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जल आयोगाचे इंग्रजी पत्र क्र./१६/२७/२००९ - पीए (एन)/ २४२३-२४५७ दि.१४.१२.२००९	२००८-०९	८४८.८९	२५५००
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			६१२.५०	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ३८.३२			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ५४३.१६			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ३१.०२			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९९५-९६	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९९७	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजीत किंमत (रु. कोटी)			२६१.७२	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	२०२.७८	४८६.७९	२८४.०१	४८.३७
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१३.११	५३.५०	४०.३९	६.८८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	४२.७८	४२.७८	७.२८
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	११५.९८	११५.९८	१९.७५
७.५	इतर कारणे	०.००	१०४.०१	१०४.०१	१७.७२
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	४५.८३	४५.८३	०.००	०.००
	एकूण	**२६१.७२**	**८४८.८९**	**५८७.१७**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : धोम बलकवडी बोगदा पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बलकवडी गावाजवळ कृष्णा नदीवर मोठे धरण बांधण्यात आले आहे. या धरणाची एकूण साठवण क्षमता ४.०८ अ.घ.फू. इतकी असून उपयुक्त साठा ३.९६ अ.घ.फू. आहे. या धरणाच्या पाण्यातून पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील १४६० हेक्टर, सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील ६०६० हेक्टर व फलटण तालुक्यातील १७९८० हेक्टर असे एकूण २५५०० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्मिती होणार आहे. या प्रकल्पास दोन कालवे असून डाव्या कालव्याची लांबी १४.५० किमी. व उजव्या कालव्याची लांबी १४७ किमी. आहे. या प्रकल्पामध्ये कृष्णा नदी खोऱ्यातील पाणी नीरा खोऱ्यात वळविले जाणार आहे.

धोम बलकवडी धरणाचे काम सन २००७ मध्ये पूर्ण झाले असून ४.०८ अ.घ.फू. इतका पाणीसाठा निर्माण झाला आहे. डाव्या कालव्याची एकूण लांबी १४.५० किमी. असून त्यापैकी ५ किमी. चे काम पूर्ण झाले आहे. उजव्या मुख्य कालव्याचे एकूण १४७ लांबीपैकी किमी. ७९ पर्यंत काम पूर्ण झाले असून ९५५३ हेक्टर एवढी सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण १५ बोगदे नियोजीत असून ते सर्व पूर्ण झाले आहेत.

सन २००७-०८ पासून या प्रकल्पास वेगवर्धीत सिंचन लाभ योजने अंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. तथापी अर्थसंकल्पात पूरेशी तरतूद होऊ शकत नसल्याने केंद्राचे अर्थसहाय्य मंजूर असूनही प्रकल्पास पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही.

२.० प्रशासकीय मान्यता : धोम बलकवडी प्रकल्पास राज्य शासनाने रुपये २६१.७२ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता दि. ११/०६/१९९६ रोजी दिली. त्यांनतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०४/०७/२००२ रोजी रुपये ४७५.२९ कोटी किंमतीस प्रथम सुधारित मान्यता दिली. त्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०२/०५/२००३ रोजी रुपये ४७५.२९ कोटी किंमतीस व्दित्तीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर राज्य शासनाने दि. ३०/०६/२००९ रोजी ६८४.६४ कोटी किमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. प्रकल्पाची चतूर्थ सुधारीत किंमत रुपये ८४८.८९ कोटी (दरसुची २००८-०९ नुसार) इतकी असून त्यास केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली व राज्य शासनाच्या राज्य वित्त समितीची (SFC) यांची मान्यता सन २००९ मध्ये मिळाली आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे : प्रकल्पाची सुधारित किंमत रुपये ८४८.८९ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रुपये ५८७.१७ कोटीने वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ : धोम बलकवडी प्रकल्पाचे मुळ अंदाजपत्रक सन १९९५-१९९६ च्या दरसूचीवर आधारित होते. आता चतुर्थ सुधारित अंदाजपत्रक सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार तयार करणेत आले आहे. या १३ वर्षातील दरसुचीतील बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रुपये २८४.०१ कोटी एवढी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ : भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीच्या खर्चात मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ रुपये ४०.३९ कोटी इतकी आहे. वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे

(अ) मुळ प्रकल्प अहवालात २३८३ हेक्टर जमिन रु. ३५००० प्रती हेक्टर या दराने संपादित करणे व ४ गावठाणात नागरी सुविधा पुरविणे यासाठी रुपये १३.११ कोटीची तरतूद होती. अद्यावत प्रकल्प अहवालात २९३२ हेक्टर जमिन रु. ७५००० प्रती हेक्टर या दराने संपादित करणे, ६ गावठाणात नागरी सुविधा तरतूद पुरविणे, पाणलोट क्षेत्र उपाय योजना करणे, वन जमिनीची नक्त अद्यावत किंमत (Net Present Value) भरणे यासाठी प्रकल्पाच्या खर्चात रुपये २१.११ कोटी इतकी वाढ होत आहे.

(ब) मुळ प्रकल्प अहवालातील तरतूदी व्यतिरीक्त सु.प्र.मा. अहवालात वाढीव नागरी सुविधासाठी रुपये ३.४७ कोटी, उदरनिर्वाह भत्यासाठी रुपये ०.८४ कोटी, घरबांधणी अनुदानापोटी रुपये ०.४२ कोटी, पर्यायी जमिनीच्या किमतीपोटी रुपये १२.३७ कोटी, बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्त्याच्या कामापोटी रुपये १.८४ कोटी, अंशतः बाधीत गोळेगाव, गोळेवाडी व जोर या गावातील घरांचे खास बाब म्हणून

पुनर्वसनासाठी रुपये ०.८१ कोटी खर्च प्रस्तावित आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात एकूण रुपये २०.२८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

(अ) धरणस्थळी उपलब्ध येव्याचा उपयोग करुन विज निर्मिती करण्यासाठी धरणाचा पाणीसाठा ३.३३ अ.घ.फू. वरुन ४.०८ अ.घ.फू. एवढा करण्यात आला. त्यासाठी धरणाची उंची ४.३८ मी. ने वाढविण्यात आली. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रुपये १७.१० कोटी इतकी वाढ झाली आहे.

(ब) माजी मंत्री मा. अनंतरावजी थोपटे व तसेच भोर तालुक्यातील लोकप्रतिनीधी श्री. कृष्णा शिनगारे, श्री. उत्तम थोपटे यांच्या मागणीनुसार कोर्ले-टिटेघर-वडतुंबी उपसा सिंचन योजनेस धोम बलकवडी प्रकल्पाचा भाग म्हणून अंतर्भाव करण्यात आला. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रुपये ५.५६ कोटी एवढी वाढ झाली आहे.

(क) उजव्या मुख्य कालव्यावर ४ बोगद्यांची तरतूद होती त्यामध्ये प्रत्यक्ष काम करतांना १५ बोगद्यांची तरतूद करण्यात आली व सविस्तर संकल्पन करण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रुपये ८.२१ कोटी इतकी वाढ झाली.

(ड) मूळ प्रकल्प अहवालात मनुष्यबळाने कालव्यास अस्तरीकरण करण्याची तरतूद होती. शासनाच्या सुचनांनुसार यांत्रिकी पध्दीने अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले त्यामुळे प्रकल्पाच्या किमंतीत रुपये ११.९१ कोटी इतकी वाढ झाली.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

(अ) मूळ प्रकल्प अहवालात धरणाचा संडवा व्दार विरहीत होता. तथापी बुडीत क्षेत्र मर्यादित करण्यासाठी १२ मी. x ५ मी. आकाराच्या तीन वक्र दरवाजे बसविण्यात आले. तसेच सांडव्याच्या संकल्पनात बदल करून गॅलरीची तरतूद करण्यात आली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रुपये ७.१० कोटी इतकी वाढ झाली.

(ब) धरणाच्या साठ्यात ०.७५ अ.घ.फू. एवढी वाढ झाल्याने धरणाची लांबी व उंची वाढविण्यात आली. त्यामुळे मातीकामाच्या परिमाणात वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रक्कम रु. २७.८९ कोटी इतकी वाढ झाली.

(क) सांडव्याची जागा बदलल्याने भूस्तर सर्व्हेक्षणापोटी प्रकल्पाच्या किंमतीत रु. ०.३७ कोटी इतकी वाढ झाली.

(ड) शासनाच्या धोरणाप्रमाणे मूळ अहवालातील सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद करण्यात आली. त्यामुळे किमतीमध्ये रुपये ४.४० कोटी इतकी वाढ झालेली आहे.

(इ) मूळ प्रकल्प अहवालातील तरतूदीशिवाय मातीधरणामध्ये वाळूच्या चाळणीची तरतूद करणे धरणाच्या खालील बाजूस उतारावरील ड्रेनचे बांधकाम करणे तसेच बर्मच्या ठिकाणी डांबरी रस्ता करणे, पुच्छ कालव्यातील गाईड वॉलचे काम करणे व बुडीत क्षेत्रातील गावांना जोडणारे रस्ते तयार करणे इ. कामांमुळे प्रकल्पाच्या किमतीत रुपये १७.६१ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

(फ) मूळ प्रकल्प अहवालात उजव्या कालव्याची लांबी १९० कि.मी. होती व त्यात ४ बोगदे प्रस्तावित होते. सविस्तर संरेखा मंजूरी नंतर उजव्या कालव्याची लांबी १७४७ कि.मी. झाली त्यामध्ये १५ बोगदे करण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रुपये ९.३५ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

(ग) मूळ प्रकल्प अहवालात वितरण व्यवस्थेच्या कामासाठी रु. ३२२५ प्रती हेक्टर एवढी तरतूद होती चतूर्थ सुधारीत प्रकल्प अहवालात रु. ६४७०० प्रती हेक्टर एवढी तरतूद करण्यात आली आहे. धोम बलकवडी उजवा कालव्यावरील बांधकामांची अंदाजपत्रके नमुना संकल्पचित्रानुसार करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष काम करतेवेळी क्षेत्रिय परिस्थितीनुसार व प्राप्त संकल्पनानुसार बांधकामे करण्यात आल्याने प्रकल्पाच्या किमतीत रुपये ३७.६८ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

४.० भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या हस्तांतरणामुळे झालेला विलंब -

(अ) **भूसंपादन :-** धोम बलकवडी प्रकल्पाच्या धरण व कालव्यासाठी २९३२ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यासाठी एकूण २२५ भूसंपादन प्रस्ताव आतापर्यंत सादर करणेत आले आहेत. त्यापैकी १०३ प्रस्तावांचे निवाडे जाहीर झाले असून २०२२.५४ हेक्टर एवढे क्षेत्र ताब्यात आले आहे. उर्वरीत १२२ भूसंपादन प्रस्ताव कार्यवाहीवर आहेत. भूसंपादनाच्या विलंबामुळे प्रकल्पाच्या किमतीत वाढ होत आहे.

(ब) **पुनर्वसन :-**प्रकल्प मान्यतेनंतर सुरुवातीच्या ३ वर्षात प्रकल्पासाठी निधीची तरतूद अत्यंत कमी असल्याने पुनर्वसनाचे कोणतेही काम होऊ शकले नाही. सन १९९७-९८ या काळात धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी ५७ दिवस काम बंद होते. सन १९९९-२००० मध्ये घळभरणीचे कामापूर्वी ६ महिने काम बंद होते. पुनर्वसनाच्या कामामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे.

५.० अपुरा निधी :

धोम बलकवडी प्रकल्पास प्र. मा. नंतर सुरवातीच्या काळात सन १९९८ पर्यंत अत्यल्प निधी मिळाला. सन २००१ ते २००४ या कालावधीत प्रकल्पास पुरेसा निधी मिळाला नाही. त्यामुळे उपलब्ध निधीतून धरणाच्या कामास प्राधान्य देऊन ते सन २००७ मध्ये पूर्ण करण्यात आले. मात्र कालव्याची कामे निधी अभावी संथगतीने चालू आहेत.

६.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

धोम बलकवडी प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून ४.०८ अ.घ.फू. पाणीसाठा सन २००७ मध्ये निर्माण झाला आहे. डाव्या कालव्याची एकूण लांबी १४.५० किमी. इतकी असून त्यापैकी ५ किमी. पूर्ण झाले आहे. उजव्या कालव्याची एकूण लांबी १४७ किमी. इतकी असून त्यापैकी किमी. ७८ पर्यंत कामे पूर्ण होऊन डिसेंबर २०११ मध्ये पाणी चाचणी घेण्यात आली आहे. प्रकल्पाच्या एकूण २५५०० हेक्टर सिंचन क्षमतेपैकी ९५५३ हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्यापैकी ७९५३ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. पुढील लांबीतील कालव्याची व वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत.

७.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

धोम बलकवडी धरणाचे काम सन २००७ मध्ये पूर्ण झाल्याने ४.०८ अ.घ.फू. पाणीसाठा निर्माण करणेत आला आहे. या साठयातून निर्मित सिंचन क्षमतेच्या क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्यात येत आहे. २०११-१२ या वर्षात प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील खंडाळा व फलटण या तालुक्यात भिषण दुष्काळ होता. या काळात उजवा कालव्याद्वारे लाभक्षेत्रातील ११० पाझर तलाव, को. प. बंधारे भरुन दिल्याने २२ गावातील १,१८,००० लोकसंख्येस पिण्यासाठी व या गावातील शेतीस सिंचनासाठी पाण्याचलाभ झाला आहे. सन २००७-०८ पासून या प्रकल्पास वेगवर्धीत सिंचन लाभ योजने अंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. तथापी अर्थसंकल्पात पूरेशी तरतूद होऊ शकत नसल्याने केंद्राचे अर्थसहाय्य मंजूर असूनही प्रकल्पास पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.८४८.८९ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ३.३३ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.११ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
भीमा सीना जोड कालवा उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव : भीमा सीना जोड कालवा उपसा सिंचन योजना	तालुका : माढा		जिल्हा : सोलापूर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र)	३२६६०	जून-२०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर): ३२६६०		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२५/०९/१९९६	१९९५-९६	५९.७४	३२६६०
	अधिक्य टिप्पणी	१६/१०/२०००	१९९९-२०००	१०५.८९	३२६६०
	सुप्रमा-१	प्रस्तावित	२००७-०८	१२८.०१	३२६६०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु. कोटी)				नाही
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			९६.६८	
	५.१	भू-संपादन , पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ०.११			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ९१.४६			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ५.११			
६.०	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९७-९८	
६.१	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९७	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)			७१.६९	
७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीशी कारणे (रु.कोटी)				
		मुळ तरतूद	सु.प्र.मा. तरतूद	वाढ रक्कम	वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकाची किंमत)	४८.२९	७१.१५	२२.८६	३३.४८
७.२	भूसंपादन खर्चातील वाढ	०.११	०.४६	०.३५	०.५१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३०.०५	३०.०५	४४.०२
७.५	ई.टी.पी. व इतर कारणे	११.३४	२६.३५	१५.०१	२१.९९
	एकूण	**५९.७४**	**१२८.०१**	**६८.२७**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :- भीमा सीना जोड कालवा उपसा सिंचन योजनेव्दारे उजनी धरणातून ३.१५ अ.घ.फू. पाणी प्रवाही पध्दतीने २०.२५५ कि.मी.लांबीच्या बोगदयाद्वारे सिना नदीत सोडून, सिना नदीवरील ११ कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यातून खाजगी उपसा सिंचनाद्वारे अवर्षण प्रवण क्षेत्रातील माढा, बार्शी, मोहोळ, व परांडा तालुक्यातील ३२६६० हे. पीकक्षेत्र सिंचन निर्मीती करण्याचे नियोजन आहे.या बोगदयाद्वारे भीमा नदी खो-यातील पाणी अवर्षण प्रवण सीना नदीच्या खो-यात वळविलेले असल्याने हा नदीजोड प्रकल्प आहे.प्रकल्प २००२ साली कार्यान्वित झालेला असून त्यामूळे सीना नदीखो-यात १०० टक्के सिंचन होत आहे.

२.० प्रशासकीय मान्यता :- भीमा सीना जोड कालवा उपसा सिंचन योजनेस दि. २५/९/१९९६ रोजी शासनाने रू. ५९.७४ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर रू. १२८.०१ कोटी रक्कमेचा प्रथम सुधारीत प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी शासनास दि. २४/०६/२००९ रोजी सादर करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकल्पाच्या रू. १०५.८९ कोटी रक्कमेच्या अधिक्य टिपणीस महामंडळाने दि. १६/१०/२००० रोजी मंजुरी दिलेली आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे :- प्रकल्पाची सुधारीत किंमत रू. १२८.०१ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रू. ६८.२७ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसुचीतील वाढ :- मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९५-९६ च्या दरसुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २००७-०८ च्या दरसुचीनुसार काढण्यात आलेली आहे. या १२ वर्षातील दरसुची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रू. २२.८६ कोटी आहे.

३.२ भूसंपादनामुळे झालेली वाढ :- मुळ अहवालामध्ये २६ हे. जमीन सरासरी रू. ३८७०० प्रति हेक्टर दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रू. ०.११ कोटीची तरतुद होती. सुप्रमा अहवालामध्ये ४० हे. क्षेत्र सरासरी १.१६ लक्ष प्रतिहेक्टर दराने संपादन करण्याची तरतूद असून त्याची किंमत रू. ०.४६ कोटी इतकी होते. त्यामुळे भूसंपादन खर्चात रु. ०.३५ कोटी वाढ होत आहे.

३.३ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

अ) मूळ प्रकल्प अहवालानुसार सुरूवातीची बोगदा विमोचक तळपातळी ४८९.४० मी. इतकी होती. सीना खो-यामध्ये दुष्काळाच्यावेळी जास्तीत जास्त कालावधीकरिता पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाचे पत्र दि. २६/११/१९९७ नुसार सुरवातीची बोगदा तळपातळी १.२० मी. खाली घेऊन ४८८.२० मी. ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर बदलामुळे उघड्या कालव्याच्या खोदकामात वाढ झाली.

ब) मुळ मंजुर संरेखेवर काम करताना सुरवातीचा उघडा कालवा खोदाईमध्ये शेतक-यांनी जमीन देण्यास विरोध केल्याने बोगदयाच्या सुरुवातीच्या व शेवटच्या भागात अनुक्रमे ७९१ मी. व २५४ मीटर बोगदा लांबी वाढवावी लागली. त्यामुळे बोगदयाच्या लांबीमध्ये एकून १०४५ मीटर वाढ झाली.

क) बोगदा लांबी वाढ,अतिपडझड व पे-लाईनमुळे संधानकाच्या परीमाणात वाढ झाली.

ड) प्रत्यक्ष लागलेला भूस्तराच्या रचनेनुसार रॉक बोल्टींग करावे लागले.यामुळे रॉक बोल्टींग परीमाणात वाढ झाली.

इ) विमोचकांच्या द्वारांच्या सुधारित संकल्पानामुळे संधानक व द्वाराच्या परीमाणात वाढ झाली.

ई) बोगदा सुरक्षा समितीने सुचविलेल्या चेन लिंक संधानक व तत्सम सुरक्षात्मक कामांमुळे वाढ झाली.

फ) प्रकल्पावरी मोहोळ तालुक्यातील नियोजित क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी तत्कालिन आमदार श्री. राजन पाटील यांनी मागणी केली होती. त्यानुसार सीना नदीवर अनगर येथे प्रकल्पांतर्गत को.पं. बंधारा बांधण्यास महामंडळाने मान्यता दिली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली.

वरील सर्व बाबींमुळे संकल्पनातील बदलांमुळे एकूण रू. ३०.०५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ ई.टी.पी.व इतर कारणामुळे झालेली वाढः- मुळ प्रकल्प अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू.११.३४ कोटी इतकी तरतुद होती. सुधारीत प्रशासकीय अहवालानुसार यासाठी रू.१६.४५कोटीची तरतुद

करण्यात आली आहे. यामध्ये झालेली एकूण वाढ रूपये ५.११ कोटी आहे.तसेच इतर कारणामुळे रु.९.९० कोटीची वाढ झाली आहे. अशी एकूण रु. १५.०१ कोटी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :- प्रकल्पास सन १९९६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. व प्रकल्पाचे काम सन मे -१९९७ मध्ये सुरू होवून सन २००१ मध्ये प्रकल्पाचे ९५ टक्के काम पुर्ण होवून सन २००२ मध्ये प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. सध्या बोगदयाचे अस्तरीकरण व इतर तत्सम कामे बाकी आहेत. मात्र बोगदयातून सतत पाणी पुरवठा होत असल्याने बंद कालावधी अभावी कामे करण्यास विलंब होत आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :- सदर प्रकल्पांतर्गत २०.२५५ कि.मी. लांबीचा बोगदा व ५.७२ कि.मी. लांबीचा उघडा कालवा यांची कामे पुर्ण झालेली आहेत. सन २००२ पासून या प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. तेव्हापासून प्रकल्पाचे एकूण ३२६६० हे. सिंचन क्षेत्र निर्मीती पुर्ण झालेली आहे.त्यापैकी मागणीनुसार २४९५० हे. क्षेत्र प्रत्यक्ष सिंचनाखाली आले आहे.त्यामूळे या भागात हरीत क्रांती झालेली आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :-सन २००२ पासून योजना कार्यान्वित झालेली आहे.तेंव्हा पासून ३२६६० हे. सिंचन क्षमता निर्मीती करण्यात आलेली आहे. सन- २०११-१२ मध्ये २२९२२ हे. क्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले असून यामधील ११०५०हे. क्षेत्र ऊसावरील आहे. यामुळे शेतक-यांना प्रति वर्षी रु.२०० कोटी उत्पन्न मिळत आहे.

प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. १२८.०१ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत रु. ०.५५ लक्ष प्रति हेक्टरी व लाभव्यय गुणोत्तर २.५१ आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
तारळी प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : तारळी पाटबंधारे प्रकल्प			ता.पाटण	जि.सातारा
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पिक क्षेत्र)	१९४९८	जून-२०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - ५२७२ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६/०२/१९९६	१९९५-१९९६	१९४.३२	१९४९८
	सुप्रमा-१	३०/१०/२००२	२०००-२००१	६८५.९३	१९४९८
	सुप्रमा-२	२९/०७/२००२	२००७-२००८	९५४.०१	१९४९८
	सुप्रमा-३	०६/०९/२०१०	२००८-२००९	१०५७.६३	१९४९८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Invesment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२८/०१/२०१०	२००८-२००९	१०५७.६३	१९४९८
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)				७४८.३७
	५.१ भू-संपादन,पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ४५.९९				
	५.२ बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ६७४.०५				
	५.३ इटीपी खर्च (रु.कोटी) = २८.३३				
६.०	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				सन १९९७
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				सन १९९८
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजीत किंमत (रु.कोटी)				१९४.३२
७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
		मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढीची रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामांच्या घटकांची किंमत)	१५१.४५	४२७.७२	२७६.२७	३२.००
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	५.२०	७४.२१	६९.०१	७.९९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	११०.४९	११०.४९	१२.७९
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२६३.५३	२६३.५३	३०.५३
७.५	इतर कारणे	०.००	११०.८२	११०.८२	१२.८४
७.६	इ.टी.पी.मुळे झालेली वाढ	३७.६७	७०.८६	३३.१९	३.८५
	एकूण	**१९४.३२**	**१०५७.६३**	**८६३.३१**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० - सर्वसाधारण माहिती :-

तारळी प्रकल्पांतर्गत मौजे डांगिष्टेवाडी, ता. पाटण, जि. सातारा येथे तारळी नदीवर ५.८५ अ.घ.फू. इतक्या क्षमतेचे दगडी धरण बांधून, तारळी नदीवर बांधण्यात आलेल्या ७ को.प. बंधा-यावर ७ उपसा सिंचन योजनाव्दारे तारळी खो-यातील ७५६० हे. इतक्या क्षेत्रास लाभ देण्याचे नियोजन आहे. उरमोडी उपसा सिंचन योजनेव्दारे अवर्षण प्रवण क्षे६तील खटाव तालुक्यातील ५९६९ हे. व माण तालुक्यातील ५९६९ हे क्षेत्रास पाणी पुरविणे नियोजित आहे. उऱमोडी उपसा योजनेव्दारे खटाव व माण तालुक्यासाठी वापरावयाचे ३.३९ अ.घ.फू. पाणी तारळी प्रकल्पाच्या कोपर्डे पोहोच कालव्याव्दारे आरफळ कालव्यात उपलब्ध करून दिले जाणार आहे. तारणी प्रकल्पाची एकूण नियोजीत सिंचन क्षमता १९४९८ हे. असून नियोजीत पाणी वापर ८.२४ अ.घ.फू. आहे. त्यापैकी ०.८१ अ.घ.फू. पाणी टेंभु उपसा सिंचन योजनेस उपलब्ध करून दिले जाणार आहे. उर्वरीत पाणी तारळी प्रकल्पाच्या सिंचनासाठी वापरण्याचे नियाजन आहे.

सद्यस्थितीत तारळी धरणाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, धरणामध्ये ४.८९ टी.एम.सी. इतका पाणीसाठा निर्माण झाला आहे. तारळी नदीवरील इंदोली,पाल,तारळे,बांबवडे या उपसा सिंचन योजना पूर्ण झाल्या असून, उर्वरीत आवर्डे,कोंजवडे व धुमकवाडी या योजनांची कामे सुरु होणे बाकी आहे.. खटाव उजव्या कालव्याचे काम वितरण व्यवस्थेसह पूर्ण झाले आहे. खटाव डाव्या कालव्याचे ८० टक्के काम पुर्ण झाले असून वितरण व्यवस्था ६० टक्के पूर्ण झाली आहे. कोपर्डे कालव्याचे व माण तालुक्यातील कालव्याची कामे करणे प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे व अपुऱ्या निधीमळे संथ गतीने प्रगतीत आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता :-

तारळी प्रकल्पाच्या रुपये रु. १९४.३२ कोटी किमतीस शासनाने मूळ प्रशासकीय मान्यता दि.१६/०२/१९९६ रोजी दिली. त्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक ०३/१०/२००२ रोजी रु. ६८५.९३ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर दि.२९/०७/२००९ रोजी रु.९५४.०१ कोटी किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. शासनाने दि. ०६/०९/२०१० अन्वये रु.१०५७.६३ कोटी इतक्या किंमतीस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली.

३.० किंमत वाढणेची कारणे :-

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.१०५७.६३ कोटी आहे. ही किंमत मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु.८६३.३१ कोटीने वाढली असून वाढीची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :-

तारळी प्रकल्पाची मान्यता सन १९९५-९६ च्या दरसूचीवर आधारीत होती. सुधारीत अद्ययावत किंमत सन-२००८-०९ दरसूची प्रमाणे काढणेत आलेली आहे. या १३ वर्षातील दरसूची बदलामुळे निव्वळ वाढ २७६.२७ कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढ :-

भूसंपादन,पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ रु.६९.०१ कोटी आहे. वाढीची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) मुळ प्रकल्प अहवालानुसार ८२४ हे. क्षेत्र सरासरी रु.०.६३ लक्ष प्रती हे.दराने संपादन करणे प्रस्तावित होते. व त्यासाठी रु.५.२० कोटीची तरतुद करण्यात आली होती. सुधारीत प्रशासकीय अङवालामध्ये २१६९.५९ हे. क्षेत्र सरासरी रु. २.६६ लक्ष प्रती हेक्टरी दराने संपादीत करणे प्रस्तावीत असून, त्याची एकूण किंमत रु.५७.७५ कोटी आहे. यानुसार याबाबीखाली रु.५२.५५ कोटी एवढी वाढ झाली आहे.

ब) पुनर्वसनाच्या कामात मुळ प्रकल्प अहवाला शिवाय वाढीव नागरी सुविधा / दुरुस्ती यामुळे रु.१३.४६ कोटी,उदरनिर्वाह भत्यामुळे ०.३२ कोटी, घरबांधणी अनुदानापोटी रु.१.९७ कोटी व बुडीत क्षेत्रातील विद्यूत वाहिन्या स्थलांतरासाठी रु.०.९७ कोटी अशी एकूण रु. १६.४६ कोटी एवढी वाढ झाली आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे दि. १३/०१/१९९८ रोजी झालेल्या बैठकीत तारळी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तासाठी शासकीय खर्चाने उपसा सिंचन योजना करण्याच्या मागणी बाबत खास बाब म्हणून निर्णय घेऊन कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे. तसेच जिल्हाधिकारी सातारा यांनी त्यांचे पत्र क्र.

पुनर्व/कावि/११२२,दि.२५/११/१९९९ नुसार तारळी प्रकल्पाचे लाभक्षेत्रात शासनाने स्वखर्चाने उचलून पाणी देण्याबाबत कार्यवाही व्हावी असे कळविले होते. त्यानुसार शासनाने निर्णय क्र. तारळी - २९९/क्ष-१०९/(६८/९९)/मो.प्र.-१/मुंबई दि. २५/४/२००० अन्वये सदरची मागणी मान्य केली त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.११०.४९ कोटी वाढ झाली.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

अ) सन १९९५ -९६ मध्ये तारळी पाटबंधारे प्रकल्पाच्या मूळ प्रकल्प अहवालामध्ये पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभागाने दिलेल्या संकल्पन व रेखाचित्रानुसार तारळी धरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यानुसार मूळ प्रकल्प अहवालामध्ये धरणाची किंमत रु. १२६.७७ कोटी होती. प्रत्यक्षात १९९८-९९ मध्ये निविदा काढतेवेळी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांनी दिलेल्या संकल्पन व रेखाचित्रानुसार अंदाजपत्रके तयार करुन निविदा काढणेत आल्या. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांचे संकल्पन व रेखाचित्रानुसार धरणाच्या भिंतीचा मूळ अहवालातील उतार १:०.१४ ऐवजी १:०.१८ करणेत आला. तसेच धरणाच्या उर्ध्व आणि अधो बाजूकडील भागामध्ये दगडी बांधकामऐवजी कोलग्राऊट मेसनरी बांधकाम करण्याचे प्रस्तावित केले. त्यामुळे धरणांची किंमतीत रु. १६१.८६ कोटी इतकी वाढ झाली.

ब) पाया खोदाई करताना धरणाच्या पायामध्ये भेगायुक्त ठिसूळ खडक (ब्रेसिया) व लाल गेरू पध्दतीचा दगड आढळल्याने धरणाची पाया पातळी संकल्पित पाया पातळी पेक्षा ५ ते ६ मी. खोल गेल्याने बांधकामामध्ये रुपये ३९.५३ कोटी वाढ झाली. धरणाची भूकंप प्रतिरोधकता वाढविण्यासाठी व भविष्यातील संभाव्य गळती कमी होण्याच्या दृष्टीने धरणाच्या मध्यभागात यू.सी.आर. (१:५) ऐवजी कोलग्राऊट (१:३.५) चे बांधकाम करणेस शासनाने मान्यता दिली. यामुळे धरणाच्या किंमतीमध्ये रु. ३६ कोटी वाढ झाली.

क) विद्युतगृह व सिंचन तथा विद्युत विमोचकास होणारा संभाव्य धोका टाळणेसाठी व नदीकाठची संभाव्य झीज टाळण्यासाठी क्षेत्रिय परिस्थितीनुसार मार्गदर्शक भिंतीची लांबी वाढविणेत आली. त्यामुळे धरणाच्या किंमतीत रु. १४.७६ कोटी वाढ झाली. धरणाच्या पूर्ण संचय पातळीच्या वरील शेतजमिनीस पोहोच रस्ता देणेसाठी रिंगरोडची तरतूद केल्याने खर्चामध्ये रु. १०.९१ कोटी वाढ झाली आहे. वरील सर्व कारणास्तव संकल्पनातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. २६३.५३ कोटी झाली आहे.

३.५ ई.टी.पी. व इतर कारणामुळे झालेली वाढ :-

मूळ प्रकल्प अहवालामध्ये ई.टी.पी. साठी रु. ३७.६७ कोटी एवढी तरतूद होती. सुधारीत प्रकल्प अहवालात ती रु. ७०.३६ कोटी करण्यात आली त्यामुळे रु. ३३.१९ कोटी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन-१९९६ मध्ये मिळाली. त्यामुळे सन-१९९७ चा बंदी दिनांक शासनाकडून मंजूर करुन घेण्यास्तव प्रकल्प ग्रस्तांनी सन-२००८-०९ ते २००९-१० मध्ये धरणाचे चालू काम वारंवार बंद पाडले.

५.० अपु-या निधीमुळे झालेला विलंब :-

सन २००२ - २००३ ते २००७-२००८ पर्यंत प्रकल्पाचे काम निधी अभावी बंद होता. तसेच २००७-०८ मध्ये प्रकल्प केंद्र शासनाच्या अे.आय.बी.पी. मध्ये समाविष्ट झाला तेव्हापासून प्रकल्पास निधी प्राप्त होत आहे. मात्र मंजूर अे.आय.बी.पी.सामंजस्य करारानुसार आवश्यक तो निधी प्राप्त होत नाही. त्यामुळे प्रकल्प पुर्णत्वाच्या कालावधीमध्ये विलंब होत आहे.

६.० प्रकल्पाची सद्यस्थिती

तारळी धरण :- तारळी धरणाचे बांधकाम ९९ टक्के पूर्ण झाले असून सद्यस्थितीत धरणामध्ये क्रेस्ट तलांकापर्यंत ४.८९ टी.एम.सी.पाणीसाठा निर्मिती झाली आहे. वक्रदरवाजे व सांडवा पूल उभारणीचे काम प्रगतिपथावर आहे.

मुख्य कालवे / शाखा कालवे सद्यस्थिती :- काही किरकोळ कामे वगळता खटाव उजवा कालव्याचे संपूर्ण काम पुर्ण झाले असून त्यामुळे १६०० हे. पिकक्षेत्र (११९० हे. ICA) सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. खटाव डावा कालव्याची एकूण लांबी २६ किमी असून त्यापैकी २० किमी लांबीचे मातीकाम पुर्ण झाले आहे. तसेच कालव्यावरील १११ पैकी ८५ बांधकामे पुर्ण झाली असून २६ किमी पैकी १६ किमी

लांबीचे अस्तरिकरणाचे काम पुर्ण झाले आहे. खटाव डाव्या कालव्यावरील वितरीकेचे ६० टक्के काम पुर्ण झाले आहे माण वाढीव कालव्याची एकूण लांबी ८.२६ किमी असून भूसंपादनासाठी शेतकऱ्याकडून सम्मतीपत्रे घेण्याचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत पहिल्या ६ किमी मधील ७० टक्के शेतकऱ्यांकडून सम्मतीपत्रे घेण्यात आली आहेत. कोपर्डे पोहोच कालव्याच्या कामाची निविदा फेब्रुवारी २००९ मध्ये निश्चित झाली आहे. स्थानिक नेते व शेतकरी यांच्या प्रखर विरोधामुळे भुसंपादनाचे काम होऊ शकले नाही. सद्यस्थितीमध्ये उघडया कालव्याऐवजी ७.१९ किमी बंदिस्त पाईपलाईन व १२.०४ किमी लांबीच्या बोगदयाव्दारे काम करण्यास मंजुरी मिळाली आहे. निधीच्या उपलब्धेतेनुसार काम प्रगतीत आहे. तारळी नदीवरील उजव्या तिरावरील इंदोली,पाल, तारळे, बांबवडे या चार उपसा सिंचन योजनांची कामे वितरणव्यवस्थेसह पुर्ण झाली असून या योजना कार्यान्वीत होण्याच्या अंतिम टप्यात आहेत. तारळी नदीवरील डाव्या तिरावरील कोंजवडे, आवर्डे व धुमकवाडी या तीन उपसा सिंचन योजनांची कामे अद्याप सुरु व्हावयाची आहेत.

७.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

तारळी धरणाचे काम क्रेस्ट तलांकापर्यंत पूर्ण झाल्याने धरणामध्ये ४.८९ टी.एम.सी. पाणीसाठा निर्मिती झाली आहे. त्यामुळे तारळी नदीमध्ये बारमाही पाणी उपलब्ध होत असून नदीकाठच्या गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले आहे. याव्दारे सन २०११-१२ या वर्षामध्ये २७०० हे. प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. सन-२०१२ मध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीमध्ये खटाव उजव्या कालव्याद्वारे पारगांव तलाव भरण्यात आला. यास्तव परिसरातील पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष दुर झाले.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु. १०५७.६३ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ५.४२ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.३७ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
सांगोला शाखा कालवा प्रकल्प, जिल्हा, सोलापूर.

१.०	प्रकल्पाचे नांव: सांगोला शाखा कालवा	तालुका: सांगोला		जिल्हा : सोलापुर	
२.०	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	१३१४० हे.	जून-२०१२अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - ७६६७ हेक्टर		
३.०	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२२/२/१९८०	१९७९-८०	१७.१५	१३१४०
	सुप्रमा-१	१/१२/२००३	२००१-०२	२८८.०१	१३१४०
	सुप्रमा-२ (शासनास सादर)	२०/१०/२०११	२०१०-११	५७४.५६	१३१४०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत शाखा क्र.४ वगळून	२७/७/२००७	२००६-०७	२८७.७७	११२८८
		प्रस्तावीत	२०१०-११	५६२.७९	११२८८
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			२१०.३१	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) १.३५			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) २०७.९५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) १.०१			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९८१-८२	
६.१	प्रकल्पाचे धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९८१,	
६.२	प्रकल्पाचे धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			१७.१५	

७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	१२.९२	२५३.९५	२४१.०३	४३.२४
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.२७	१०.११	९.८४	१.७७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	६०.०१	६०.०१	१०.७७
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	२.३१	११९.५६	११७.२५	२१.०३
७.५	इतर कारणे	०.००	६५.६९	६५.६९	११.७८
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	१.६५	६५.२४	६३.५९	११.४१
	एकूण	१७.१५	५७४.५६	५५७.४१	१००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० **सर्वसाधारण माहिती :**

सांगोला शाखा कालवा प्रकल्पामध्ये अस्तित्वातील नीरा उजवा कालवा कि.मी.१ ते १६९ मधील मजबुतीकरण, कि.मी.११५ ते १६९ चे अस्तरीकरण, शाखा क्र.१,३ व निवडक मोठ्या वितरिकांना अस्तरीकरण करून बचत होणाऱ्या पाण्यातून सांगोला शाखा कालवा क्र.५ या १०३ कि.मी. लांबीच्या कालव्यावर ११२८८ हे. सिंचन क्षमता निर्माण करावयाची आहे. याशिवाय खरीप हंगामात धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहत असताना शाखा क्र.४ वर १८५२ हे. सिंचनक्षमता निर्माण होणार आहे.

सांगोला शाखा कालव्यासाठी लागणारे पाणी, नीरा उजवा कालवा कि. मी. ११५ ते १६९, शाखा क्र. १, ३ व निवडक मोठ्या वितरीकांना अस्तरीकरण करून वहनतुटी मध्ये होणाऱ्या बचतीमधून उपलब्ध होणार आहे. नीरा उजवा कालवा व वरील घटकास अस्तरीकरण केल्यानतर १११.७२ द.ल.घ.मी. पाणी वहनतुटी मध्ये होणाऱ्या बचतीमधून उपलब्ध होणार आहे. त्यापैकी ७२.४७ द.ल.घ.मी. पाणी वापर करणेचे नियोजीत आहे. त्यासाठी प्रकल्पांतर्गत नीरा उजव्या कालव्यावरील बांधकामांचे मजबुतीकरण देखील समाविष्ट आहे. शाखा क्र. ४ व शाखा क्र.५ अंतर्गत अनुक्रमे १८५२ व ११२८८ असे एकूण १३१४० हे पिक क्षेत्र सिंचनासाठी प्रस्तावित आहे. त्यापैकी ७६६७ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

२.० **प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :**

सांगोला शाखा कालवा प्रकल्पास शासनाकडून रू. १७.१५ कोटी इतक्या किंमतीस माहे फेब्रूवारी १९८० मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सांगोला शाखा कालवा प्रकल्पाच्या रू. २८८.०१ कोटी किंमतीच्या प्रकल्प अहवालास महामंडळाची माहे १२/२००३ मध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. सन २०१०-११ चे दरसूचीवर आधारित रू.५७४.५६ कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रकल्प अहवाल राज्य शासनास सादर करणेसाठी तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर केला आहे.

२.१.० केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांत समावेश व केंद्रीय जलआयोगाच्या मान्यताः

सांगोला शाखा कालवा प्रकल्पाच्या रू. २८७.७७ कोटी किंमतीच्या प्रकल्प अहवालास (सांगोला शाखा कालवा क्र.४ वगळून) केंद्रीय जल आयोगाची माहे ७/२००७ मध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यास केंद्रीय जल आयोगाने मंजुरी देवून त्यामधील उर्वरीत शिल्लक कामाच्या रू.१८३.२४ कोटी किंमतीचा समावेश वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत (एआयबीपी) घेणेबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने या प्रकल्पास एआयबीपी अंतर्गत एकूण रू. १५५.२६ कोटी इतका निधी प्राप्त झालेला असून ३१/३/२०१२ पर्यंत रू. १३५.२३ कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २०१०-११ चे दरसूचीवर आधारित रू. ५६२.७९ कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रकल्प अहवाल केंद्रीय जल आयोगाच्या मान्यतेसाठी तांत्रिक सल्लागार समितीचे ११५ व्या बैठकीमध्ये दि.२४.०७.२०१२ रोजी सादर केला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत द्वितीय सुप्रमाची किंमत रु. ५५७.४१ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१.० दरसूचीतील वाढ :

प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७९-८० चे दरसूचीवर आधारित रू. १७.१५ कोटी किंमतीस असून सन २०१०-११ चे दरसूचीवर आधारित रू.५७४.५६ कोटी किंमतीचा आहे. त्यानूसार दरसूचीत वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये २४१.०३ कोटीची वाढ झाली आहे.

३.२.० भूसंपादन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

जमिनीच्या भूसंपादनासाठी खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत ९.८४ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या १.७६ टक्के वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये १०६० हे. जमीन सरासरी रु.२५०० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.२७ कोटीची तरतूद होती. सुप्रमा अहवालामध्ये ७६७ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. १३२००० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु.१०.११ कोटी आहे. त्यामुळे रु.९.८४ कोटी इतकी वाढ होत आहे.

३.३.० व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :

सन १९८० मध्ये मंजुर करणेत आलेल्या प्रकल्प अहवालात सांगोला शाखा कालव्याची लांबी ९३ कि.मी. होती ती १०३ कि.मी. पर्यंत वाढवण्यात आली. शाखा क्र.५ चे कि.मी. ७४ पर्यतचे अस्तरीकरण व नीरा उजवा कालव्याचे शाखा क्र.१ व ३ साठी अस्तरीकरणाचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे रु.६०.०१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४.० संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

नीरा उजवा कालव्याची वहन क्षमता १५०० क्युसेक्स वरुन १९६७ क्युसेक्स व शाखा क्रं. ५ ची वहन क्षमता १८० क्युसेक्स वरुन २३६ क्युसेक्स करण्यात आली आहे. मुळ प्रकल्प अहवालामध्ये बांधकामाच्या आधुनिकीकरणासाठी रु.२.३१ कोटी इतकी तरतुद होती, प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या वेळी नीरा उजव्या कालव्यावरील २३ जलसेतु व .११७ लादीमोरींची पुर्नस्थापना करुन बांधकामाचे आयुष्यमान वाढविण्याचे ठरले. सन २००१-२००२ च्या दरसुचीनुसार व तत्कालीन संकल्पनानुसार बांधकामाच्या मजबुतीकरणासाठी रु.६०.०१ कोटी इतकी तरतुद करुन सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यांत आली होती, `जलसेतुचे प्रत्यक्ष संकल्पनाचे काम हाती घेतल्यानंतर व सन २००६ मध्ये जलसेतु क्रं.१० पडल्यानंतर जलसेतुचे आयुष्यमान जवळपास संपले असेल्याचे निदर्शनास आले, कालवा सतत चालू असल्याने पर्यायी जलसेतुंचा विचार करणे शक्य नव्हते, त्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक, यांचेकडुन सद्यपरिस्थितीप्रमाणे जलसेतू पुर्नस्थापनेचे संकल्पचित्र करुन घेण्यांत आले, त्यामध्ये बांधकामाची धारण क्षमता शुन्य धरण्यांत आलेने जलसेतुंच्या घटकांचे आकारमान वाढले, व त्याअनुषंगाने संधानक व लोहसळईच्या परिमाणात वाढ झाली. त्यामुळे सर्वच जलसेतुंची किंमत वाढली आहे अशाप्रकारे संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. ११७.२५ कोटी इतकी आहे.

३.५.० इतर कारणे : .

मूळ अहवालामध्ये लाभक्षेत्रामधील भाग-१ कामासाठी तरतुद नव्हती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात भाग-१ कामासाठी रु.६५.६९ कोटी इतकी तरतूद केली आहे.

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालात ई.टी.पी.साठी रू.१.६५ कोटी इतकी तरतूद होती, सुधारित प्रकल्प अहवालात ई.टी.पी.साठी रू.६५.२४ कोटी इतकी तरतूद केल्याने रू.६३.५९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणेः -

४.१ वन जमीनीच्या हस्तांतरणास झालेला विलंब :

प्रकल्पाचा वनजमिन मिळणेबाबतचा प्रस्ताव सन १९९१ मध्ये केंद्र शासनास सादर केला होता. त्यास केंद्र शासनाने २००० मध्ये मान्यता दिलेली आहे. वनजमिनीस मान्यता मिळणेस लागलेला कालावधी ८ वर्षे आहे. त्यामुळे ८ वर्षे विलंब झाला आहे.

४.२ अपु-या निधीमुळे झालेला विलंब :

प्रकल्पाचा नियोजनाप्रमाणे मार्च २००८ मध्ये अेआयबीपी कार्यक्रमामध्ये समावेश झालेनंतर प्रकल्पास निधी प्राप्त झाला. १९८५ ते २००८ या २३ वर्षाच्या कालावधीतील ९ वर्षे कालावधी हा अपु-या निधीचा कालावधी आहे. त्यामुळे नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता येवू शकली नाहीत.

४.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेला विलंब :

प्रकल्प अहवालात शाखा क्र.५ चे कि.मी. ७४ पर्यतचे अस्तरीकरण, नीरा उजवा कालव्याचे शाखा क्र.१ व ३ साठी अस्तरीकरण व नीरा उजवा कालव्याची वहनक्षमता १५०० क्युसेक्स वरुन १९६७ क्युसेक्स केल्यामुळे प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाला आहे. सदर बदलामुळे परिमाणात वाढ झाली असल्यामुळे २ वर्षे विलंब झाला आहे.

४.४ इतर कारणामुळे झालेला विलंब :

नीरा उजवा कालवा हा बारमाही असून वर्षामध्ये केवळ २ महिने कालवा बंद असतो तसेच नीरा उजवा कालव्याच्या अस्तरीकरणास लाभधारक शेतकऱ्यांचा विरोध आहे. या दोन्हीही कारणामुळे प्रकल्पाचे कालावधीमध्ये ८ वर्षे वाढ झाली आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

नीरा उजवा कालवा कि.मी. १ ते १६९ मधील बहुतांशी भरावाचे नुतनीकरण करण्याचे काम पूर्ण झालेले आहे. नीरा उजवा कालव्यावरील एकूण १४० बांधकामामध्ये २३ जलसेतू असून त्यापैकी १८ जलसेतूंच्या मजबूतीकरणाची कामे पूर्ण होत आली आहेत. अस्तरीकरणापैकी नीरा उजवा कालवा कि.मी. ११४ ते १६९ च्या अस्तरीकरणाची कामे सुरू केल्यानंतर शेतक-यांकडून कामास विरोध करण्यात आलेला आहे, त्यामुळे अस्तरीकरणाची प्रगती होऊ शकलेली नाही.

५.१ शाखा कालवे सद्यस्थिती :

सांगोला शाखा कालव्याची एकूण लांबी १०३ कि. मी. आहे. त्यापैकी कि. मी. १ ते ४८ पर्यंतचे मातीकाम व बांधकामे पूर्ण झालेली असून, अस्तरीकरणाची कामे अंतिम टप्प्यात आहेत. कि.मी. क्र.४८ मधील माण जलसेतूचे काम ७० टक्के पूर्ण झालेले आहे. कि.मी.४९ ते ८४ मधील मातीकाम, बांधकामे व अस्तरीकरणाची कामे प्रगतीत आहेत.

५.२ वितरण व्यवस्था सद्यस्थिती :

सांगोला शाखा कालव्याची कि. मी. १ ते ४८ मधील वितरिकांची कामे पूर्ण झालेली असून, कि. मी. ४९ ते ८४ मधील वितरिकांची कामे सुरू करण्यात आली आहेत.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
सिना कोळेगाव प्रकल्प, जिल्हा उस्मानाबाद.

१	प्रकल्पाचे नांव : सिना कोळेगांव	तालुका: परांडा		जिल्हा : उस्मानाबाद.	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	१२५८४ हे.	जून-२०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हे.) - निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२३/१०/१९९२	१९९१-९२	७०.८८	१०६०८
	सुप्रमा-१	०३/०६/२०१०	२००७-०८	४५५.२८	१२५८४
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत.		नाही.		
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			२९७.१७	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ६७.८३			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = २०४.७७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = २४.५७			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९३-९४	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९३	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत, (रु.कोटी)			९०.००	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			(रु. कोटी)	
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	५१.७३	१२५.६१	७३.८८	१९.२१
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	६.६७	१०४.७१	९८.०४	२५.५२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	७६.०५	७६.०५	१९.७८
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१०६.६२	१०६.६२	२७.७४
७.५	इटीपीमुळे झालेली वाढ	१२.४८	४२.३२९	२९.८१	७.७५
	एकूण	**७०.८८**	**४५५.२८**	**३८४.४०**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :

सिना कोळेगाव प्रकल्पांतर्गत सिना नदीवर एकुण ५.३१५ अ.घ.फु. क्षमतेचे (२.६९१ अ.घ.फु. उपयुक्त साठा) असलेले धरण बांधुन तीन उपसा योजना द्वारे परांडा तालुक्यातील ९०४८ हे. व करमाळा तालुक्यातील ३५३६ हे. अशी एकुण १२५८४ हे सिंचन क्षमता निर्मिती करण्याचे नियोजित आहे.

धरण बांधकाम सन २००७ मध्ये पुर्ण् झालेले असुन, या वर्षापासुन धरणामध्ये १०० टक्के पाणी साठा निर्माण झालेला आहे. सिना कोळेगांव जलाशयावरुन परांडा व करमाळा बाजुच्या दोन उपसा योजना अंतिम टप्प्यात असुन या योजनांची ९५ टक्के कामे पुर्ण झालेली आहेत. परंडा उपसा योजनेचे ०.४२ अ.घ.फु. पाणी अस्तित्वातील अनाळा तलावात सोडुन तेथुन अनाळा उपसा योजनेद्वारे १९७६ हेक्टर सिंचन क्षमता नियोजित आहे. अपुरा निधीमुळे अनाळा उपसा सिंचन योजनेचे काम संथ गतीने सुरु आहे.

२.०प्रशासकीय मान्यता :सिना कोळेगाव प्रकल्पास दि.२३/१०/९२ अन्वये शासनाने रु७०.८८कोटी किमतीस प्रशासकिय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि.३/६/२०१० अन्वये ४५५.२८ कोटी किमतीस सुधारीत प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

३.०किंमत वाढण्याची कारणे : प्रकल्पाची सुधारित किंमत रुपये ४५५.२८ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेपेक्षा हि किमंत ३८४.४० कोटीने वाढलेली आहे. याबाबतची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ : सिना कोळेगाव प्रकल्पाची मुळ प्रशासकिय मान्यता सन १९९१-९२ च्या दरसुचीवर आधारीत असुन सुधारीत प्रशासकिय मान्यता सन २००७-०८ च्या दरसुचीप्रमाणे आहे. या १६ वर्षातील दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ रुपये ७३.८८ कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

(अ) मुळ प्रकल्प अहवालामध्ये ३६१ हे बागायत क्षेत्रासाठी २५,०००/- प्रति हेक्टर व ३२४६ हे जिरायत क्षेत्रासाठी रुपये १०,०००/- प्रति हेक्टर या प्रमाणे रु. ४.१५ कोटीची तरतुद करण्यात आलेली होती. सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये ८५० हे बागायत क्षेत्रासाठी १,२५,०००/- प्रति हेक्टर व २७५७ हे जिरायत क्षेत्रासाठी ८१,०००/- प्रति हेक्टर प्रमाणे अशी एकूण ३२.९५ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. यामुळे रु. २८.८८ कोटीची वाढ झालेली आहे. या शिवाय वरील दरामध्ये दिलासा रक्कम व अनुषंगिक खर्चामध्ये ४०.५० कोटीची वाढ झालेली आहे.

ब) मुळ अंदाजपत्रकामध्ये रु.७००० प्रति दर या दराने बुडीत क्षेत्रातील ७७० घरासाठी रुपये ०.५४ कोटी व झाडे व विहिरीसाठी रु.०.२० कोटी अशी एकुण ०.७४ कोटी व अनुषंगिक महसुली खर्चासाठी रु.०.२६ कोटी अशी एकुण रु.१.०० कोटी ईतकी तरतुद आहे. सुधारित अंदाजपत्रकात प्रत्यक्ष मुल्याकंनानुसार फक्त घरासाठी रु.५.६० कोटी, वन झाडे, विहिरी व बांधासाठी रु. २.३४ कोटी अशा प्रकारे एकुण रु.७.९४ कोटी व अनुषंगिक महसुली खर्च रु.०.२६० कोटी असा एकुण रु.७.१६ कोटी तरतुद आहे. त्यामुळे मुळ तरतुदी पेक्षा रु.६.१७ कोटी वाढ झालेली आहे.

(क) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील कल्याणस्वामी मंदिराच्या सुरक्षात्मक कामासाठी ३.४२ कोटीची वाढ झालेली आहे. मुळ अहवालामध्ये या कामासाठी ढोबळ ०.२० कोटीची तरतुद होती.

(ड) बुडीत क्षेत्रातील रस्त्याच्या वळण कामासाठी रु.१३.६४ कोटीची वाढ झालेली आहे. मुळ अहवालात या बाबत वेगळी तरतुद नव्हती.

(इ) प्रकल्पाच्या तीन पुनर्वसित गावठाणासाठी मुळ अंदाजपत्रकात पुनर्वसन व नागरी सुविधासाठी रुपये ०.२८ कोटी व अनुषंगिक (वाहतुक,विदयुत लाईन स्थलांतर ईत्यादी) कामासाठी रु. ०.०६ कोटी अशी एकुण रु. ०.३४ कोटी तरतुद करण्यांत आली आहे. प्रत्यक्षात पुनर्वसित गावठाणासाठी करावयाच्या एकुण १३ नागरी सोयी सुविधासाठी स्वतंत्र अंदाजपत्रके करण्यांत आली असुन या सर्व सोयी सुविधा व अनुषंगिक कामासाठी रु.५.७६ कोटी इतकी तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात प्रस्तावित केली आहे. यामुळे ५.४२ कोटी वाढ झाली आहे.

वरील प्रमाणे वाढीव खर्चामुळे एकुण भुसंपादन पुनर्वसन व अनुषंगिक बाबीमध्ये ९८.०४ कोटीची वाढ झालेली आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

मुळ प्रकल्प अहवालामध्ये सिना कोळेगाव प्रकल्पा अंतर्गत दोन उपसा योजनांचा नियोजित पाणी वापर ६३.४९ दलघमी. व सिंचन क्षेत्र १०६०८ हेक्टर होते. तसेच धरणा खालील ६ को.प.बंधा-यासाठी १६.९९ दलघमी पाणी वापर प्रस्तावीत होता. दरम्यानच्या काळात धरणा खालील ६ को.प.बंधा-यापैकी ५ को.प.बंधा-यामध्ये सिना भिमा बोगदयाद्वारे पाणी उपलब्ध झाल्यामुळे या ६ को.प.बंधा-याच्या १६.९९ दलघमी पाणी वापर बचतीमधून ११.८९ दलघमी पाणी वापराची अनाळा उपसा सिंचन योजना व त्याद्वारे १९०० हेक्टर सिंचन क्षमता निमीर्ती प्रस्तावित करण्यांत आले. व उर्वरित बचतीमधुन ५.१० दलघमी. पाणी औदयोगिक पाणी वापरासाठी ठेवण्यांत आले. या नुसारच्या सुधारीत जलनियोजना बाबत मा. मंत्री जलसंपदा (कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे वगळून) व मंत्री जलसपदा कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे तसेच भुम व परंडा तालुक्याचे आमदार श्री. राहुल मोटे, यांच्या समवेत दिनांक २९/०१/२००८ रोजी मंत्रालय मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीमध्ये अनाळा उपसा सिचंन योजनेचा अंर्तभाव सुधारीत प्रशासकिय मान्यते मध्ये करावा असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्रकल्पास दिनांक ३/६/२०१० रोजी शासनाने सुधारीत मान्यता दिलेली आहे. यामुळे मुळ प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेमध्ये १९७६ हेक्टरची वाढ झाली आहे. या व्यापतीतील बदलामुळे खर्चात एकूण ७६.०५ कोटीची वाढ झालेली आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

(अ) क्षेत्रिय परिस्थितीनुसार सिना कोळेगांव धरणाच्या माती धरणाच्या लांबीमध्ये १३८ मी वाढ झालेली आहे. तसेच किल्लारी भुकंपानंतर बदललेल्या निकषांनुसार या प्रकल्पाचा भुकंप झोन क्र.५ ऐवजी झोन क्र.३ मध्ये घेतल्यामुळे माती धरणाचे उतार, बर्म इ मध्ये वाढ झालेली आहे. रोधीचर पाया रुंदी ३ मी वरुन ५ मी व काटछेदाच्या क्षेत्रफळामध्ये वाढ झालेली आहे. यामुळे एकुण रु. ८.०० कोटीची वाढ झालेली आहे.

(ब) दगडी धरणाच्या काटछेदामध्ये भुकंपाबाबतचा झोन क्र.३ घेतल्यामुळे वाढ झालेली आहे. तसेच धरणाच्या अनुउत्सारीत भागाची लांबी १२२ मी वाढलेली आहे. ड्रेनेज गॅलरीची नव्याने तरतुद व सांडवा पुर विर्सगाच्या नवीन संकल्पनाप्रमाणे धरण क्रेस्ट पातळीमध्ये मध्यवर्ती संकल्प चिंत्र नासिक यांच्या संकल्पानाप्रमाणे ३.६ मी ने वाढ झालेली आहे. यामुळे एकुण ५२ कोटीची वाढ झालेली आहे. सदरच्या तांत्रिक बदलास म.सं.सं.नाशिक,यांनी मान्यता दिलेली आहे.

(क) उपसा सिंचन योजनेच्या म.सं.सं.नाशिक, यांच्याकडून प्राप्त सविस्तर संकल्पामुळे पंपगृह आकारमानामध्ये तसेच उध्वर्गामी नलिका लांबीमध्ये वाढ झालेली आहे. तसेच वीज स्त्रोतापासुन पंपगृह जोडणी खर्चामध्ये वाढ यामुळे ३३.९५ कोटीची वाढ झालेली आहे.

(ड) कालवा व वितरण प्रणालीच्या संकल्पनास शासनाच्या दि. १५/१०/१९९५ च्या नवीन मार्गदर्शक तत्वाप्रमाणे व सविस्तर सर्वेक्षणाप्रमाणे मुळ प्र. मा. प्राप्त कालवा लांबीमध्ये ४५ कि.मी. वरुन ८६ कि मी अशी ४१ कि.मी. ची वाढ झालेली आहे. तसेच वितरण प्रणालीमध्ये नवीन संकल्पनामुळे वाढ झालेली आहे. या बाबीमुळे एकुण १४.५२ कोटीची वाढ झालेली आहे.

वरील सर्व बाबीमुळे एकूण संकल्पातील बदलातील वाढ १०६.६२ कोटी आहे.

३.५ इतर कारणामुळे झालेली वाढ :

मुळ अहवालामध्ये इर्टीपी खचार्साठी रु १२.४८ कोटीची तरतुद होती. प्रकल्प पुर्ततेच्या कालावधी १२ वर्षानी वाढलेला आहे. यामुळे ईटीपी खर्चामध्ये २९.८१ कोटीची वाढ झालेली आहे.

४.० प्रकल्प पुर्ण करण्याबाबत विलंबाची कारणे :

४.१ भूसंपादन व पुनर्वसन : प्रकल्पासाठी एकुण ३४५० हे जमीन धरणकामे बुडीत क्षेत्र व कालवा कामासाठी संपादित करण्यांत आलेली आहे. यापैकी बुडीत क्षेत्रातील बहुंशी गावाचे भूसंपादन प्रस्ताव १९९७-१९९८ मध्ये सादर करण्यात आलेले होते तथापी या भूसंपादन प्रकरणापैकी कांही गावाच्या

भुसंपादनाचा अंतिम निवाडा २००६-०७ मध्ये जाहीर झालेला आहे. यामुळे धरणाचे बांधकाम कालावधी ७ वर्षानी वाढलेला आहे.

४.२ व्याप्तीतील झालेला बदल :प्रकल्पांतर्गत अनाळा उपसा सिंचन योजनेचा नव्याने समावेश सुधारीत प्रशासकिय मान्यतेमध्ये करण्यांत आलेला आहे. यामुळे १९७६ हे. प्रकल्पीय सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे. या बदलामुळे प्रकल्प पुर्ततेचा कालावधी वाढलेला आहे.

४.३ **अपुरा निधी :**

प्रकल्पास सुरुवातीच्या काळामध्ये अपुरा निधी प्राप्त झालेला आहे. २००० ते २००७ या काळामधील निधीचा वापर मुख्यत्वेकरुन धरण कामे पुर्ण करुन पाणीसाठा निर्मीती करण्यामध्ये करण्यात आलेला आहे. यामुळे सिंचन क्षमता निर्मितीसाठी उपसा योजनेची कामे उशिरा हाती घेण्यात आलेली आहेत. यामुळे प्रकल्प पुर्ण होण्याचा कालावधी वाढलेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

धरणाची कामे २००७ मध्ये पुर्ण झालेले असुन ५.३१५ अ.घ.फु.पाणी साठा निर्माण झालेला आहे. तीन उपसा योजनापैकी परांडा बाजु उपसा योजनेवरील सिंचन क्षमता ७०७२ हे. असुन यापैकी २२७५ हे सिंचन क्षमतेच्या कालवा व वितरण प्रणालीची कामे पुर्ण आहेत. तसेच करमाळा बाजु उपसा योजनेवरील सिंचन क्षमता ३५३६ हे. असुन ११९० हे सिंचन क्षमतेचा कालवा व वितरण प्रणालीची कामे पुर्ण् आहेत. तथापी या दोन उपसा योजना अदयापी कार्यान्वित नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात सिंचीत क्षेत्र निर्माण झालेले नाही. अनाळा उपसा योजनेची सिंचन क्ष्ंमता १९७६ हे. असुन या योजनेची सिचन क्षमतेची कामे प्राथमिक अवस्थेमध्ये आहेत.

:६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे

धरणाचे कामे जुन २००७ मध्ये पूर्ण झाली असुन धरणामध्ये एकूण ५.३१५ अघफु. पाणी साठा निर्माण झालेला आहे. यामुळे जलाशयावरुन शेतक-यानी वैयक्तिक उपसाद्वारे पाणीवापर करुन २०११-१२ मध्ये ३४५५ हे. प्रत्यक्ष सिंचन क्षेत्रास लाभ मिळालेला आहे.

प्रकल्पाच्या खालच्या बाजुस सीना नदीवर भोत्रा को.प.ब. असुन यावरुन परांडा नगरपालिकेस पाणीपुवरठा केला जात आहे. तसेच सीना कोळेगांव जलाशयावरुन करमाळा तालुक्यातील ८ गावे व परांडा तालुक्यातील २ गावाना पाणीपुरवठा योजना कायार्न्वित झालेल्या आहेत.

प्रकल्पामुळे भुम, परंडा व करमाळा तालुक्यातील कायम टंचाई ग्रस्त क्षेत्रास मोठा दिलासा मिळालेला असुन या भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे.

प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु. ४५५.२८ इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु. ३.६२ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.१५ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.

टेमघर प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : टेमघर	तालुका: मुळशी		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	१००० हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हे) : १०००		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२०/०१/१९९४	१९९१-९२	७०.५१	१०००
	सुप्रमा-१	१९/०१/२००४	२०००-०१	३२३.५३	१०००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकुण खर्च (रु.कोटी)			३०५.८९	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) = १.६४			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = २८३.२९			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = २०.९६			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९४-९५	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९७	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत, (रू. कोटी)			१५९.८९	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु. कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२.४९	१५९.२२	१५६.७३	६१.९४
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	४.१५	३०.१८	२६.०३	१०.२९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	५०.६५	१०१.४९	५०.८४	२०.०९
७.५	इतर कारणे	०	०	०	०
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	१३.२२	३२.६४	१९.४२	७.६८
	एकूण	**७०.५१**	**३२३.५३**	**२५३.०२**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण वर्णन :

सन १९९४ पूर्वी खडकवासला प्रणालीमध्ये पानशेत, वरसगांव, खडकवासला ही तीन धरणे होती. खडकवासला प्रकल्पाची मंजूर सिंचन क्षमता ६२१४६ हेक्टर असून त्यासाठी २४.९८ अ.घ. फू. पाणी वापर नियोजित होता. खडकवासला प्रकल्पाच्या मूळ अहवालामध्ये सिंचनासाठी २४.९८ अघफू व बिगर सिंचनासाठी ५ अघफू अशी २९.९८ अघफु पाणी वापराची तरतूद होती. पुणे शहराचा भविष्यातील वाढता पाणी वापर विचारात घेऊन खडकवासला धरणाच्या वरील बाजूस ३.७१ अघफू क्षमतेचे टेमघर धरण बांधण्यास शासनाने सन १९९४ मध्ये मान्यता दिली.

टेमघर धरणाचा नियोजित पाणी वापर ३.७१ अघफू असून त्यापैकी ०.४६५ अघफू सिंचनासाठी (१००० हेक्टर) व ३.२४५ अघफू पुणे शहरासाठी नियोजित आहे. धरणास कालवे नाहीत सर्व पाणी वापर नदीपात्रामधून ५ को.प.बं.द्वारे होणार आहे. टेमघर धरणाचे पाणीसाठा निर्मितीचे काम सन २०१० मध्ये पूर्ण झाले असून प्रकल्पाचा सिमेंट ग्राऊटींग व तत्सम कामे बाकी आहेत. नियोजनानुसार पाणी वापर केला जात आहे.

२.० मूळ प्रशासकीय मान्यता व सूधारित प्रशासकीय मान्यता :

टेमघर प्रकल्पाचे बांधकामास शासन निर्णय क्र.टेमघर-१०९३/१०८९/(१९८/९३) जसंअ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२०/१/१९९४ अन्वये रु.७०.५१ कोटी (दरसूची सन १९९१-९२) खर्चाच्या अंदाजपत्रकास मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ निर्णय क्र.मकृखोविम/टेमघर/(२९७)/ (७९०/९७)/ सुप्रमा/मोप्र-५/५८७, दि.१९/१/२००४ रु.३२३.५३ कोटी (दरसूची सन २०००-०१) खर्चाचे अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे.

३.० किंमत वाढीची कारणे :

प्रकल्पाची मूळ किंमत रु.७०.५१ कोटी व सु.प्र.मा.किंमत रु.३२३.५३ कोटी आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा प्रकल्पाची किंमत रु.२५३.०२ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

मूळ प्रशासकीय मान्यतेनंतर प्रत्यक्ष धरण कामास ४ वर्षानंतर सुरुवात झाली. मूळ प्रशासकीय मान्यतेच्या वेळी धरणाची किंमत रु.४७.३१ कोटी (सन १९९१-९२) इतकी होती. धरणाच्या कामाची निविदांची स्विकृती किंमत रु.१५९.८९ कोटी इतकी होती. त्यामुळे धरणाचे कामाची सुरुवात होतानाच रु.११२.५८ कोटी इतकी वाढ झाली. त्यानंतर प्रत्यक्ष धरणाचे काम सुरु असताना भाववाढीपोटी रु.२५.६३ कोटी इतकी रक्कम देय झाली. सन २००२ ते २००९ पर्यंत वनजमीनीच्या संपादनामुळे काम प्रलंबित राहिलेने धरणाचे कर्टन ग्राऊटींग, दगडी बांधकामातील ग्राउटींग, धरणाचे मो. क्र. १४ अे व १५ मधील (६९७.५० मी. तलांकावरील) उर्वरित बांधकाम, सिंचन तथा विद्युत विमोचकाचे इंनटेक वेल, पूच्छ कालवा, सांडव्यावरील पूल, धरण सुरक्षा विषयक कामे करण्यास विलंब झाला. अशा प्रकारे झालेल्या विलंबामुळे दरसूचीत वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये १५६.७३ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

मूळ प्रकल्प अहवालामध्ये धरण व जलाशयासाठी ५१९ हे. क्षेत्र संपादन करणे नियोजित होते. त्यासाठी रु.४.१५ कोटी तरतूद केली होती. सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये ५६५.६५ हे. क्षेत्र संपादित करणे नियोजित असून त्यासाठी भूसंपादन रु.२३.७७ कोटी, पुनर्वसन रु.५.६८ कोटी व तद्नुषंगिक बाबींसाठी रु.०.७३ कोटी अशी एकुण रु.३०.१८ कोटी ची तरतूद आहे. त्यामुळे रु.२६.०३ कोटी एवढी वाढ झाली आहे.

३.३ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

धरणाचे संकल्पीत पाया पातळीचे खडकामध्ये भेगा व ठिसूळपणा आढळलेने पायाची खोली १३ मी. वाढली, त्यामुळे खोदाई कामात रु.३.२७ कोटी इतकी वाढ झाली आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या सूचने नुसार, धरण उत्सारित भागासाठी फ्लीप टाईप बकेट ऐवजी स्टीलिंग बेसिन टाईप जलशोभनाशक कुंडी, गाईड वॉलची लांबी २१० मी. वाढलेने, व धरणाची उंची ७० मी. पेक्षा जास्त असलेने व धरण पुणे शहराचे जवळ असलेने सुरक्षिततेच्या दृष्टीने मजबुतीकरणाचे प्रमाण २ ऐवजी ३ घेतले. त्यामुळे दगडी बांधकामा ऐवजी कोलग्राऊट दगडी बांधकाम केले.त्यामुळे रु. ३४.९१ कोटी इतकी वाढ झाली आहे. भूशास्त्रीय अन्वेषणातील पायातील भूस्तरास एम-१५ ऐवजी एम-२० चे संधानक करावे लागलेने रु. ६.८७ कोटी इतकी वाढ झाली आहे. एन्ड विअर, स्टिलींग बेसिन, लिफ्टवेल मध्ये संकल्पनाप्रमाणे स्टिलची तरतूद, बॅक फिंलिग व इतर बाबीमुळे रु. १.५० कोटी इतकी वाढ झाली आहे. मूळ प्रकल्प अहवालामध्ये शीर्ष विमोचकासाठी ढोबळ तरतूद केली होती. सविस्तर संकल्पनाप्रमाणे त्यामध्ये रु.३.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे. को.प.बंधा-याचे कामासाठी प्रति बंधारा रु.३.०० लक्ष याप्रमाणे ५ को.प.बंधारे साठी रु.१५.०० लक्ष अशी ढोबळ तरतूद होती. संकल्पचित्रातील बदलामुळे त्यामध्ये रु.०.२४ कोटी इतकी वाढ झाली आहे. सर्व्हेक्षण व अन्वेषणातील तरतूदीमुळे रु. ०.२९ कोटी इतकी वाढ झाली आहे. अशा प्रकारे संकल्पचित्रातील बदलामुळे एकूण रु.५०.८४ कोटी वाढ झाली आहे.

३.५ इटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ :

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये १३.२२ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रकल्प अहवालानुसार यासाठी रुपये ३२.६४ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे. यामध्ये रुपये १९.४२ कोटीची वाढ झाली आहे.

४.० वन जमीनीच्या हस्तांतरणास झालेला विलंब :

प्रकल्पासाठी २.४२ हे. इतका वनजमीनीचा प्रस्ताव दि.२०/७/१९९६ रोजी वन विभागाकडे सादर केला होता. सदर प्रस्तावास दि.१५/५/१९९८ चे पत्रानुसार केंद्र शासनाने तत्वतः मान्यता पत्रातील अटींची पूर्तता करुन दि.३०/९/२००० अन्वये प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सादर केला होता. त्यानंतर वन विभागाने बुडील क्षेत्रातील लवार्डे ल.पा.तलावांतर्गत असलेली जमीन जलसंपदा विभागाची असल्याची याबाबत तेव्हा वन विभागाने सुद्धा आक्षेप घेतला नव्हता, त्यामुळे जलसंपदा विभागाची जमीन असल्याचे गृहित धरण्यात आली होती. प्रस्ताव पाठविल्यानंतर सन २००१-०२ मध्ये वन विभागाने २.०८ हे. इतके क्षेत्र वन विभागाचे असल्याचा दावा केल्याने एकुण ४.५० हे. क्षेत्राचा फेर प्रस्ताव सन २००२ मध्ये सादर करण्यात आला. त्यास सन २००७ मध्ये मान्यता मिळेपर्यंत धरणाचे काम ७ वर्षे बंद राहिले. त्यामुळे कामास विलंब झाला.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

जुन २०१० मध्ये धरणाचे बांधकाम पूर्ण झाले असून धरणात पुर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात आला आहे. सद्यःस्थितीत धरणाचे सांडव्यावरील लोखंडी पुल, दगडी बांधकाम ग्राउंटींग,कर्टन ग्राऊटींग, विद्युत व यांत्रिकी, धरण सुरक्षा विषयक कामे प्रगतीपथावर आहेत.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :

धरणाचे काम पूर्ण झाल्याने ३.७१ अ.घ. फू. पाणी साठा निर्मिती झाली आहे व १००० हेक्टर क्षेत्राचे प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. तसेच ३.२४ टीएमसी धरणातील पाणी नदीत सोडून पिण्यासाठी व सिंचनासाठी वापरण्यात येत आहे. मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ३२३.५३ कोटी आहे. धरणातील पाणी वापराच्या प्रमाणात प्रति हेक्टरी खर्च रु.३.६५ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर ४.२९ इतके आहे

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
नविन दरवाजे युक्त खोडशी बंधारा प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव नविन दरवाजे युक्त खोडशी बंधारा	तालुका: कराड		जिल्हा : सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	लागू नाही.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता लागू नाही.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२६-०९-१९७८	१९७७-७८	२.२३	लागू नाही.
	सुप्रमा-१	प्रस्तावित	२०११-१२	३०.९१	--
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			निरंक	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			१२.८५	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	०.०६		
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१२.३०		
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी)	०.४९		
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७९-८०	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९७९	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			२.२३	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	१.९७५	२२.०८५	२०.११	७०.११
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.०१	०.२०९	०.१९९	०.६९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	०	०	०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	४.६३	४.६३	१६.१४
७.५	इतर कारणे	०	०	०	०
७.६	इटीमुळे झालेली वाढ	०.२३५६	३.९८	३.७४	१३.०४
	एकूण	**२.२३**	**३०.९१**	**२८.६८**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहितीः

सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील मौजे खोडशी येथे सन १८६७ साली कृष्णा नदीवर वळवणीचा बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्याद्वारे कृष्णा कालव्याद्वारे सातारा व सांगली जिल्हयातील सुमारे ११२९४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळतो.

सदर बंधारा १४५ वर्षापूर्वीचा जुना असून सद्या गाळाने भरला आहे. म्हणून जुन्या बंधाऱ्याच्या खालील बाजूस ३५ मी. अंतरावर नविन दरवाजेयुक्त बंधारा बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. यामुळे कृष्णा कालव्याचे अस्तीत्वातील ११२९४ हे. सिंचन क्षेत्र अबाधीत राहणार आहे. तथापि पुरेसा निधी प्राप्त न होऊ शकल्यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

२.० प्रशासकीय मान्यता :

नविन दरवाजेयुक्त खोडशी बंधारा प्रकल्पास शासन निर्णय क्र. आर/डी/डब्ल्यू/१०७६/३३०७/(११५८) आय एम जी दिनांक २६.९.१९७८ अन्वये , रु. - २.२३ कोटी, किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानंतर रु. ३०.९१ कोटी इतक्या किंमतीचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव (दरसूची २०११-१२) महामंडळाचे पत्र जा.क्र. मकृखोविमं/२११/५२७-२०११) मोप्र-२ दिनांक २७.०९.२०१२ अन्वये अ.अ. राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना तांत्रिक तपासणीसाठी सादर करण्यात आला आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणेः

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रस्तावित सुप्रमाची किंमत रु. २८.६८ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढः

मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७७-७८ च्या दरसुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २०११-१२ च्या दरसुचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे. अपूरा निधीच्या कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूचीमध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात एकूण रुपये २०.११ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन रकमेमुळे झालेली वाढः

प्रकल्पासाठी कामाठिकाणची जागा वसाहती, ॲप्रोच रोड इ.साठी मूळ प्रकल्प अहवालात ढोबळमानाने रु. १.०० लक्ष तरतूद करण्यात आली होती. परंतू सन २०११-१२ च्या अद्यावत मुल्यांकन किंमती धरल्याने भूसंपादनाच्या रकमेमध्ये रु.०.१९९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढः

मूळ प्रकल्प अहवालानुसार बंधा-यास उभ्या सरळ दरवाजे नियोजित होते. त्याऐवजी प्रकल्पास १२ X ५ मीटरचे १७ वक्र दरवाजे व धरणाच्या देखभालीकरिता स्टॉपलॉग दरवाजे व त्यासाठी आवश्यक ४.९ मी. रुंदीचा पूल यांची तरतूद करण्यात आली. त्यास महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभागाचे पत्र क्र.एफ.डी.डब्ल्यू १०८२/(२२)/(२८६)/८२/सिंव्य (कामे) दि. ३०/०३/१९८४ अन्वये मंजूरी मिळाली. त्यामुळे रु. १.६६ कोटी इतकी वाढ झालेली आहे. खोडशी बंधा-यावर सलोह संधानकाऐवजी पुर्वरचित व पुर्वबलित पुलाचा समावेश करण्यात आला आहे. त्यास अधीक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, नाशिक यांनी आर-३/१९८९-९० अन्वये मान्यता दिली. सदर बाबीमुळे रु.१.३१ कोटी इतकी वाढ झालेली आहे. धरणाच्या उजव्या

तीरावरील खोडशी गावास, पावसाळयात पुरापासून संरक्षण व्हावे म्हणून संरक्षक भिंतीची लांबी वाढविण्यात आली. त्यास मुख्य अभियंता यांनी आर-७४ सन २००६-०७ अन्वये मान्यता दिली आहे. त्यामुळे कामाचे किंमतीत रू.१.०२ कोटी एवढी वाढ झाली आहे.

वरीलप्रमाणे संकल्पचित्रातील झालेल्या तांत्रिक बदलामुळे झालेली एकूण वाढ ही रु. ४.६३ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या १६ टक्के इतकी आहे.

३.४ **आस्थापना व इतर करणे:**

मुळ अंदाजपत्रकात आस्थापनेसाठी रु. ०.२३५६ कोटीची तरतूद करण्यात आली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात रु. ३.९८ कोटी इतकी तरतूद केल्याने, एकूण रु. ३.७४ कोटी इतकी जादा वाढ झालेली आहे.

४.० **प्रकल्पाच्या विलंबाची कारणे:**

अपु-या निधीमुळे झालेला विलंब:

प्रकल्पास सन १९७८ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रकल्पाचे बांधकाम सुरु झाल्यापासून गेल्या ३४ वर्षापैकी १५ वर्षे काहीही निधी उपलब्ध झाला नाही. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियेजनाप्रमाणे कामे वेळेत पुर्ण झाली नाहीत.

५.० **प्रकल्पाची सद्य:स्थिती:**

सदर बंधा-यास एकूण १८ स्तंभ असून त्यापैकी १ ते ११ स्तंभाचे संधानक पूर्ण झाले आहे. तसेच एकूण १७ गाळयापैकी १ ते १० गेट बसविणेचे काम पूर्ण झाले आहे.

प्रस्तावित सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ३०.९१ कोटी असून लाभव्यय गुणोत्तर १.५६ इतके आहे.

६.० **प्रकल्पाचे प्रत्यक्ष होणारे फायदे**

कृष्णा नदीवरील मौजे खोडशी येथील अस्तित्वातील जुना बंधारा गाळाने भरलेने व कालबाहय झालेने सदर बंधा-याच्या खालील बाजूस ३५ मी. अंतरावर नवीन खोडशी बंधा-याचे काम प्रगतीपथावर आहे.

खोडशी वळवणीच्या बंधा-यापासून ८६ कि.मी. लांबीचा कृष्णा कालवा सुरु होतो. सदर कालव्यातून संकल्पित विसर्गाने पाणी वाहणे तसेच सिंचन क्षेत्र (११२९४ हे.)अबाधीत ठेवणे असा प्रकल्पाचा उद्देश आहे.

सदर प्रकल्पाच्या बंधा-याजवळ कृष्णा नदीच्या डाव्या तीरावर बांधा, वापरा व हस्तांतर या तत्वावर खोडशी जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम सुरु आहे. सदर प्रकल्पाची विद्युती निर्मितीची स्थापित क्षमता ४.९ MW इतकी आहे.

जुना खोडशी बंधारा हा ब्रिटीशकालीन असून पूर्ण संचय पातळी पर्यंत पूर्णपणे गाळाने भरलेला आहे. त्यामुळे उर्ध्वबाजूस असणा-या कृष्णा नदीच्या काठावरील गावाना पावसाळयात पुराचे पाणी पसरुन पूरहानी होते. नवीन खोडशी बंधारा बांधल्यानंतर जुना ब्रिटीश कालीन बंधारा तोडून त्यामधील गाळ पुढे प्रवाहीत करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे भविष्यातील उर्ध्वबाजूवरील गावांची पुरहानी टळणार आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प, जिल्हा सांगली, सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव : कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प	तालुका - वाळवा, पलुस, कडेगांव, खानापूर, तासगांव, मिरज, कवठेमहांकाळ, जत		जिल्हा : सांगली,	
		तालुका- सांगोला, मंगळवेढा		जिल्हाः सोलापूर,	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	११७३२२ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून २०१२- ३१६४६ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२६/०४/१९८४	१९८२-८३	८२.४३	५१९९४
	सुप्रमा-१	२७/०३/१९८६	१९८४-८५	१८७.९०	९७८४९
	सुप्रमा-२	०७/०५/१९९७	१९९५-९६	१३२१.१२	११३९६५
	सुप्रमा-३	२२/०१/२००४	२००३-०४	१९८२.८१	११७३२२
	सुप्रमा-४ (प्रस्तावित)	-	२०११-१२	३०४२.४८	११७३२२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जलआयोगाचे इंग्रजी पत्र क्र. 16/27/2008 (P/N) 1363-1402, dt. 27, 28 /07/2009.	२००५-०६	२२२४.७६	११७३२२
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			१६४०.५९	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ३३.२०			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = १४३४.८७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = १७२.५२			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९८४-१९८५	
६.१	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९८४	
६.२	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु. कोटी)			८२.४३	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
		मूळ तरतूद	सु.प्र.मा. तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	६९.२७	१६९२.४२	१६२३.१५	५४.८३
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१.४३	२००.००	१९८.५७	६.७१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	५४८.४५	५४८.४५	१८.५३
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	३१७.२२	३१७.२२	१०.७२
७.५	इतर कारणे	०	३९.८७	३९.८७	१.३५
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	११.७३	२४४.५२	२३२.७९	७.८६
	एकूण	**८२.४३**	**३०४२.४८**	**२९६०.०५**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :

सांगली जिल्ह्याच्या पूर्व भागातील मिरज, कवठेमहांकाळ,जत, तासगांव, कडेगांव, खानापूर, पलूस आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा हे तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रातील आहेत. या भागास पिण्यासाठी व सिंचनासाठी सुविधा देण्यासाठी आणि कृष्णा पाणी तंटा लवादाने राज्यास दिलेल्या कृष्णा नदी खो-यातील पाणी वापरासाठी दुसरा पर्याय नसल्याने शासनाने कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेस सन १९८४ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता दिली. मुळ अहवालामध्ये फक्त ताकारी योजना होती व योजनेची सिंचन क्षमता ५१९९४ हेक्टर इतकी होती. त्यानंतर योजनेच्या व्याप्तीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार वेळोवेळी शासन मान्यतेने बदल करण्यात आले. सध्या योजनेमध्ये ताकारी व म्हैसाळ या दोन योजनांचा समावेश असून योजनेची एकूण सिंचन क्षमता ११७३२२ हे. आहे. या योजनेचा एकूण नियोजित पाणी वापर २६.७८ अ.घ.फू. इतका आहे. सदरचे पाणी कोयना धरणातून १९.४४ अ.घ.फू. व पावसाळ्यात कृष्णा नदीतून ७.३४ अ.घ.फू. उपलब्ध करण्याची तरतूद आहे.

या योजनेस केंद्र शासनाच्या तांत्रिक सल्लागार समितीने व केंद्रीय नियोजन आयोगाने दिनांक १३/१०/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे योजनेस सन २००९-१० पासून ए.आय.बी.पी. अंतर्गत अर्थसहाय्य मिळत आहे. दोन्ही योजनांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

ताकारी योजना-

या योजनेद्वारे ताकारी ता.वाळवा येथून कृष्णा नदीतून ९.३४ अ.घ.फू. पाणी ४ टप्प्यात जास्तीत जास्त २२० मी. उचलून वाळवा -१२९ हे., पलूस - ५४८ हे. कडेगांव -१४४७५हे., खानापूर-४६८५ हे., तासगांव -१४०८२ हे. व मिरज ४७८ हे. असे एकूण ३४३९७ हे. क्षेत्रास पाणी देण्याचे नियोजन आहे. यासाठी ४ पंपगृहे, मुख्य कालवा १४४ कि.मी., चिंचणी अंबक भरण कालवा ११ कि.मी. व सोनसळ डावा कालवा २३ कि.मी., येरळा नदीवरील ४ को.प.बंधारे व वितरण व्यवस्था बांधण्याचे नियोजन आहे. योजनेची एकूण अश्वशक्ती ५३८८४ अश्वशक्ती असून वार्षिक नियोजीत विज वापर १८०.३४ दशलक्ष युनिट आहे. योजना सन २००२ मध्ये अंशतः कार्यान्वित झाली असून सध्या १६४०७ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ५४४८ हे. इतके आहे.

म्हैसाळ योजना-

या योजनेद्वारे म्हैसाळ ता.मिरज येथील कृष्णा नदीतून १७.३६ अ.घ.फू. पाणी ५ टप्प्यात जास्तीत जास्त २५५.६६ मी. उचलून मिरज -३३५४० हे., कवठेमहांकाळ- १३९६४ हे. तासगांव -२३८० हे., जत-२२८८८ हे., सांगोला -४०६० हे. व मंगळवेढा- ६०९० हे. असे एकूण ८२९२२ हे. क्षेत्रास पाणी देण्याचे नियोजन आहे. यासाठी ५ पंपगृहे, कवठेमहांकाळ कालवा ७३ कि.मी., जत कालवा ८२ कि.मी., ७ लघु उपसा सिंचन योजना, अग्रणी नदीवरील १२ को.प.बंधारे व वितरण व्यवस्था बांधण्याचे नियोजन आहे. योजनेची एकूण अश्वशक्ती ११३५५४ अश्वशक्ती असून वार्षिक नियोजीत विज वापर ३५० दशलक्ष युनिट आहे. योजना सन २००२ मध्ये अंशतः कार्यान्वित झाली असून सध्या १५२३९ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र १२००० हे. इतके आहे.

२.० प्रशासकीय मान्यता :

या योजनेस महाराष्ट्र शासनाने दि. २४/०४/१९८४ रोजी रु. ८२.४३ कोटी रक्कमेस मुळ प्रशासकीय मान्यता दिली त्यावेळी फक्त ताकारी योजना होती. त्यानंतर ताकारी योजने बरोबरच म्हैसाळ योजनेचा समावेश करुन रक्कम रु. १८७.९० कोटीच्या एकत्रित सुधारित प्रकल्प अहवालास शासनाने दिनांक २७/०३/१९८६ अन्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर व्याप्तीतील बदलामुळे रुपये १३२१.१२ कोटीच्या व्दितीय सुधारित प्रकल्प अहवालास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक ०७/०५/१९९७ रोजी मान्यता दिली. त्यानंतर झालेल्या व्याप्तीतील बदलासह रुपये १९८२.८१ कोटीच्या तृतीय सुधारित प्रकल्प अहवालास

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक २२/०१/२००४ रोजी तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. सदर योजनेस केंद्रीय जल आयोगाने सन २००५-०६ च्या दरावर आधारित रक्कम रुपये २२२४.७६ कोटी रक्कमेस दि. ०९/०७/२००९ रोजी मंजूरी दिली आहे. योजनेची प्रस्तावित चतुर्थ सुधारीत किंमत सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार अंदाजे रु.३०४२.४८ कोटी इतकी आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाची प्रस्तावित चतुर्थ सुधारित किंमत रुपये ३०४२.४८ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रुपये २९६०.०५ कोटीने वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत सन १९८३-८४ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २०११-२०१२ च्या दरसूची प्रमाणे आहे. या २८ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रुपये १६२३.१५ कोटी असून, ती एकूण वाढीच्या ५४.८३ टक्के इतकी आहे.

३.२ भूसंपादन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

मूळ प्रकल्प अहवालानुसार १५७३.९० हेक्टर क्षेत्र प्रति हेक्टरी सरासरी रु.९०८५ या दराने संपादन करणे प्रस्तावित होते. अद्ययावत प्रकल्प अहवालानुसार ७६७२.१५ हेक्टर क्षेत्र प्रति हेक्टरी सरासरी रु.२५८८१९ या दराने संपादन करणे प्रस्तावित आहे. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु.१९८.५७ कोटीची वाढ झाली आहे. ती एकूण वाढीच्या ६.७१ टक्के इतकी आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

मूळ प्रकल्प अहवालानुसार कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी टप्पा १ ते ४ मधून २०१ कि.मी. लांबीच्या कालव्याव्दारे १४ अघफू पाणी वापरातून सांगली जिल्ह्यातील खानापूर (२०७६८ हे.) मिरज (१६५६९ हे.),तासगांव (१४६३९ हे.) या तालुक्यातील एकूण सिंचन क्षमता ५१९९४ हे. निर्माण करुन दुष्काळी भागास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित होते. त्यानंतर अवर्षण प्रवण भागातील लोकांच्या व लोकप्रतिनिधींच्या मागणीमुळे योजनेच्या व्याप्तीमध्ये एकूण ६५३२८ हे. इतकी वाढ झाली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) कृष्णा नदीमधून उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त वापर करुन जास्त आवर्षणप्रवण क्षेत्र सिंचनाखाली आणण्याच्या दृष्टीने सुधारित प्रकल्पास शासनाने दिनांक २७/०३/१९८६ ला मान्यता दिली. त्यामध्ये मूळ ताकारी योजनेसह म्हैसाळ योजनेचे पाच टप्पे प्रस्तावित करण्यात आले. यामुळे सिंचन क्षेत्रात २९७२९ हेक्टर वाढ झाली व किंमतीमध्ये रु.८९.७४ कोटी वाढ झाली.

ब) ताकारी योजनेव्दारे कडेगांव तालुक्यातील आसद, चिंचणी (अं), पाडळी, सोनकिरे, सोनसळ, शिरसगांव, अंबक, तडसर, हिंगणगांव खुर्द वगैरे गावांना सिंचनाचा लाभ मिळण्याची मागणी मा.ना.डॉ.पतंगराव कदम, मंत्री, वने, पुनर्वसन व मदतकार्य यांनी केली होती. शासनाने दिनांक २८/०४/१९८७ व दि. ०४/१०/१९९४ रोजी त्यास मंजूरी दिली. त्यामुळे ताकारी योजनेमध्ये टप्पा क्र. ३ व ४ चा नव्याने समावेश करण्यात आला. त्यामुळे योजनेची सिंचन क्षमता ४३४३ हे. वाढली व किंमतीत रु.२२.७१ कोटी वाढ झाली.

क) म्हैसाळ टप्पा क्र.४ अंतर्गत खंडेराजूरी कालव्याची लांबी वाढवून मौजे सोनी, पाटगांव, करोली या गावातील ७९१ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याबाबत तत्कालीन आमदार श्री.वि.श्री.पाटील व श्री.दत्ताजी कृष्णाजी गायकवाड, अध्यक्ष, जलद प्रतिपूर्ती कृती समिती यांनी केलेल्या मागणीनुसार शासनाने दिनांक २८/०८/१९९० रोजी यास मान्यता दिली. त्यामुळे रु. ११.६४ कोटी वाढ झाली.

ड) कवठे महांकाळ कालवा कि.मी. ३८/७३० जवळ अग्रणी नदीवर को.प.बंधारा बांधणे व तेथून अंजनी व आसपासच्या गावातील तलाव भरुन देणे व तेथील शेतीला पाणी पुरवठा करणे याबाबत मा.ना. श्री.आर.आर.पाटील, गृहमंत्री यांनी मागणी केली होती. सदर मागणी म.कृ.खो.वि.महामंडळाने दिनांक १२/१०/१९९८ रोजी मान्य केली. त्यामुळे रु.५.८४ कोटी वाढ झाली.

इ) वाळवा तालुक्यातील ताकारी व दुधारी गावातील १०३ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची मागणी मा.ना.श्री. जयंतराव पाटील, मंत्री, ग्रामविकास व स्वच्छता यांनी मागणी केली होती. त्यास महामंडळाने दिनांक ०३/११/१९९९ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.२.१० कोटी वाढ झाली.

ई) तत्कालीन राज्यमंत्री श्री.अजितराव घोरपडे यांच्या दि. ०७/०३/२००० च्या पत्रातील मागणीनुसार अग्रणी नदीवरील १२ को.प.बंधारे बांधणे याबाबत केलेल्या मागणीचा समावेश तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रकल्प अहवालात करण्यात आला. त्यामुळे रु.१९.२८ कोटी वाढ झाली.

प) तत्कालीन राज्यमंत्री (म.कृ.खो. व कोकण महामंडळ) श्री.अजितराव घोरपडे यांच्या मागणीनुसार म्हैसाळ पंपगृह ५ मधून शिपूर, पायाप्पाचीवाडी, खंडेराजूरी या भागास हनुमान खिंडीतून कालवा काढून २६८९ हे. क्षेत्रास पाणी देणेबाबत डोंगरावाडी उपसा सिंचन योजनेस शासनाने दिनांक ०४/०९/२००१ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.६.५८ कोटी वाढ झाली.

फ) कवठेमहांकाळ कालव्यामधून मौजे बनेवाडी, खरशिंग, अलकुड या गावातील ११०० हेक्टर क्षेत्राला पाणी मिळण्याबाबत मा.राज्यमंत्री (म.कृ.खो.वि.म व को.पा.महामंडळ) श्री.अजितराव घोरपडे यांच्या मागणीनुसार शासनाने दिनांक ०४/०९/२००१ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.७.८० कोटी वाढ झाली.

भ) गव्हाण को.प.बंधा-यातून उपसा करुन मणेराजूरी, योगेवाडी, उपळावी, वज्रचौडे या गावातील १७०० हेक्टर द्राक्ष बागांना ठिबक सिंचनाव्दारे विस्तारीत गव्हाण योजना करून पाणी देण्याची मागणी मा.ना.श्री.आर.आर.पाटील, गृहमंत्री यांनी केली होती. त्यास शासनाने दिनांक ०४/०९/२००१ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.२०.२६ कोटी वाढ झाली.

म) मोहिते वडगांव, देवराष्ट्रे व आसद गावाच्या हद्दीतील ६०० हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची मागणी किसान क्रांती संघ, मोहित्याचे वडगांव व ग्रामपंचायत, मोहिते वडगांव यांनी तसेच शे.का.पक्षाचे सरचिटणीस भाई प्रा.एन.डी.पाटील यांनी केली होती. त्यास शासनाने दिनांक २०/११/२००१ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.२.७६ कोटी इतकी वाढ झाली.

त) मा.ना.श्री.शिवाजीराव देशमुख, मंत्री, सार्वजनिक बांधकाम, तत्कालीन माजी राज्यमंत्री श्री.अजितराव घोरपडे, तत्कालीन आमदार श्री.उमाजीराव सनमडीकर, मा.श्री.आप्पासाहेब

काटकर, मा.श्री.विजयराजे डफळे व मा.ना.श्री. लक्ष्मणरावजी ढोबळे व लाभार्थींच्या मागणीनुसार म्हैसाळ योजनेमध्ये टप्पा ६ अंतर्गत जत तालुक्यातील २२२५० हे. सांगोला ४००० हे. व मंगळवेढा ६००० हे. चा समावेश होणेबाबत मागणी केली होती. सदर मागणीमुळे कालव्याच्या लांबीत वाढ झाली तसेच नव्याने टप्पा क्र. ६ अ व ६ ब अंतर्भूत झाला. त्यामुळे रु.३३६.७३ कोटी वाढ झाली.

थ) म्हैसाळ योजनेमध्ये आगळगांव, जाखापूर, कुची, शेळकेवाडी या गावांतील १९१० हे. क्षेत्रास पाणी मिळणेबाबत तत्कालीन राज्यमंत्री श्री.अजितराव घोरपडे यांनी केलेल्या मागणीनुसार महामंडळाने तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालात दिनांक २२/०१/२००४ रोजी आगळगांव जाखापूर उपसा सिंचन योजनेस मंजूरी दिली. त्यामुळे रु.१२.०१ कोटी वाढ झाली.

द) माजी आमदार अनिल बाबर यांनी येरळा नदीवर नेवरी, हणमंतवडीये, भाळवणी व रामापूर या चार को.प. बंधाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी केली होती. त्यास महामंडळाने दिनांक १३/०४/२०११ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.११.०० कोटी वाढ झाली.

व्याप्तीत झालेल्या बदलामुळे ताकारी व म्हैसाळ योजनेच्या खर्चात रु.५४८.४५ कोटी इतकी वाढ झाली आहे. ही एकूण वाढीच्या १८.५३ टक्के इतकी आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

ताकारी उपसा सिंचन योजना-

१. मुळ ताकारी योजनेमध्ये नागठाणे येथील को.प. बंधा-याचे नुतनीकरण करुन नागठाणे बंधा-यात पाणी अडविणेचे प्रस्तावित होते. तथापि त्याऐवजी साटपेवाडी येथे बॅरेज कम बंधारा बांधणेत आला. या बदलामुळे रु. १४.४५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२. मुळ प्रकल्प अहवालात कृष्णा नदीजवळ इनटेक स्ट्रक्चर बांधण्याचे प्रस्तावित होते. तथापि ताकारी टप्पा क्र.१ चे पंपगृहाजवळ नदीपासून पंपगृहापर्यंत पोहोच कालवा बांधण्यात आला व त्यानुसार पंपगृहात बदल करण्यांत आले यामुळे रु. ७.८० कोटी इतकी वाढ झाली आहे.

३. पंपगृह टप्पा क्र. २ ते ४ मध्ये सखोल सर्वेक्षण व अन्वेषणानंतर सविस्तर संकल्पनानुसार झालेल्या बदलामुळे रु. २४.३६ कोटी इतकी वाढ झाली.

४. सोनसळ बंधा-याच्या मजबुतीकरणाच्या कामामुळे रु. २.८२ कोटी इतकी वाढ झाली.

५. सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनानंतर कालवा व वितरण व्यवस्थेतील बांधकामात बदल झाले. सर्व बांधकामे दगडी बांधकामा ऐवजी संधानकात करण्याचे निर्देश आहेत. तसेच आयएस-४५६-२००० नुसार संधानक एम-१० ऐवजी संधानक एम-१५ चा वापर करावा लागतो या कारणांमुळे रु. २६.६६ कोटी इतकी वाढ झाली.

म्हैसाळ उपसा सिंचन योजना-

१) म्हैसाळ येथील प्रवेश कालवा मार्ग, टप्पा क्र. १ ते ५ चे पंपगृह व इतर अनुषंगिक घटकांच्या केलेल्या सविस्तर संकल्पनातील तरतूदींमुळे रु. ६.४० कोटी इतकी वाढ झाली आहे.

२) म्हैसाळ योजनेच्या वाढीव व्याप्तीच्या अनुषंगाने

२.१ म्हैसाळ टप्पा क्र. १ ते ५ च्या उर्ध्वगामी प्रवाही नलिकेचा व्यास व पाईपच्या जाडीमध्ये झालेल्या बदलामुळे रु. ८.७९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.२ म्हैसाळ टप्पा क्र. १ ते ५ च्या वितरण हौदाच्या संकल्पनामुळे रु. १.०७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.३ म्हैसाळ टप्पा क्र. १ ते ५ च्या वितरण हौदाच्या संकल्पनामुळे रु. १.०७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.४ म्हैसाळ टप्पा क्र. ६ अ, ६ ब चे समावेशन केल्यामुळे रु. ७४.४४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.५ म्हैसाळ योजनेच्या विद्युत पुरवठ्यासाठी आवश्यक घटकांची नरवाड येथील स्विचयार्ड मध्ये केलेल्या तरतूदी तील वाढीमुळे रु. १.६७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.६ कालव्याची वाढीव लांबी व वहन क्षमता यामुळे कालवा मातीकामाच्या संकल्पनात झालेल्या बदलासअनुसरुन रु. ९.६२ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.७ कालव्याच्या संकल्पनातील बदलामुळे रु. ३५.७३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२.८ कालव्याच्या वाढीव लांबीमुळे कालव्यावरील विविध बांधकामे (उदा. जलसेतू, पूल, नलिकामोरी, लादी मोरी, अधिमार्ग, अतिवाहक इत्यादी) यांच्या संख्येत व संकल्पनात झालेल्या बदलामुळे रु. ११.५८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३) वितरण व्यवस्थेच्या संकल्पनात झालेल्या बदलामुळे रु. १४.३६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

ताकारी व म्हैसाळ योजनांच्या व्याप्तीमध्ये वेळोवेळी झालेल्या बदलामुळे यांत्रिकी व विद्युत घटकांच्या संकल्पनात बदल झाले त्यामुळे यांत्रिकी घटकात रु. ५४.३७ कोटी व विद्युत घटकात रु. ९.१८ कोटी अशी एकूण ६३.५५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

वरील ठळक तरतूदीसह प्रकल्पाचे इतर घटकांचे संकल्प चित्रातील बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत **रु. ३१७.२२** कोटी वाढ झाली आहे. ही एकूण वाढीच्या १०.७२ टक्के इतकी आहे.

३.५ इतर कारणामुळे झालेली वाढ :

(१) १९८४ ते आतापर्यंत प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात बऱ्याच नागरी सुधारणा झाल्या आहेत. त्याचाही परिणाम प्रकल्पाच्या किंमतीवर झाला आहे. (उदा. गावरस्ते, राज्यमार्ग व या मार्गावरील बांधकामे, वाढत्या विद्युतीकरणामुळे विद्युत वाहीन्यांचे स्थलांतर इ.) या सर्व बदलांच्या परिणामामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. ३९.८७ कोटी वाढ झाली.

(२) इटीपी व इतर : मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये ११.७३ कोटी इतकी तरतूद होती. प्रस्तावित प्रकल्प अहवालानुसार यासाठी रुपये २४४.५२ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे. यामध्ये रुपये २३२.७९ कोटीची वाढ (७.८६ टक्के) झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे

४.१ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ – सन १९८४-८५ मध्ये मंजूर झालेल्या मूळ प्रकल्प अहवालाच्या व्याप्तीमध्ये वेळोवेळी मोठया प्रमाणात बदल होत गेले. योजनेच्या सिंचन क्षमतेमध्ये ६५३२८ हे. इतकी वाढ झाली. सध्याची संपूर्ण म्हैसाळ योजना प्रकल्पामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आली तसेच ताकारी योजनेमध्ये ताकारी टप्पा क्र.३ व ४ चा नव्याने समावेश करण्यात आला. व्याप्तीतील बदलांच्या अनुषंगाने वाढीव प्रकल्प घटकांच्या पूर्णत्वाच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

४.२ **अपुरा निधी:** या योजनेस प्रशासकीय मान्यता मिळालेपासून प्रतिवर्षी आवश्यकतेपेक्षा अत्यल्प निधि प्राप्त होत आहे. मात्र योजनेच्या व्याप्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे

योजनेची कामे संथ गतीने प्रगतीत असून विलंब वाढत आहे. त्यामुळे भाववाढीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होत आहे.

ताकारी योजनेची सद्यःस्थिती-

शिर्षकामे (पंपगृहे, उर्ध्वगामी नलिका, संतुलन जलाशय, वितरण हौद) :- टप्पा क्र. १ ते ४ ची शिर्षकामे पूर्ण आहेत. ताकारी योजनेंतर्गत कालव्याच्या एकूण १८२ कि.मी. लांबीपैकी ११३ किमी लांबीमधील मातीकाम, बांधकामे पूर्ण आहेत. ४० कि.मी. लांबीमधील अस्तरीकरणाची कामे पूर्ण आहेत. उर्वरीत ५५ कि.मी. मधील कामे प्रगतीपथवर आहेत व १४ कि.मी. मधील कामे अद्याप हाती घ्यावयाची आहेत. सध्या ताकारी मुख्य कालवा कि.मी. ९१ पर्यंत व चिंचणी (अं) भरण कालव्याद्वारे पूर्ण लांबीत सिंचनासाठी पाणी सोडण्यात येते. ४ को.प.बंधा-यापैकी भाळवणी, नेवरी, हणमंतवडीये या ३ को.प.बंधाऱ्यांची कामे पूर्ण झाली असून त्यात पाणी साठा करणेत येत आहे. रामापूर को.प.बंधा-याचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. ताकारी मुख्य कालव्याच्या कि.मी. ९१ पर्यंतच्या एकूण ५६ वितरीकांची कामे तसेच ३ ऱ्या व ४ थ्या टप्प्याची कामे सुमारे ९० टक्के पूर्ण झाली आहेत. कि.मी. ९१ ते १०५ मधील १० वितरीकांची कामे प्रगतीपथावर आहेत. ताकारी योजनेचे एकूण सिंचन क्षेत्र ३४३९७ हे. असून जून - २०१२ अखेर १६४०७ हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. ताकारी योजनेद्वारे सन २०११-१२ या वर्षात ५४४८ हे. क्षेत्रास सिंचनासाठी लाभ झाला आहे.

५.१ म्हैसाळ योजनेची सद्यःस्थिती -

शिर्षकामे (पंपगृहे, उर्ध्वगामी नलिका, संतुलन जलाशय, वितरण हौद) :- टप्पा क्र. १ ते ५ ची शिर्षकामे पूर्ण आहेत. गव्हाण व विस्तारीत गव्हाण योजना पूर्ण आहेत. टप्पा क्र.१ ते ५ गव्हाण व विस्तारीत गव्हाण या ठिकाणी ११४ पंप बसविण्यात आले असून ४९ पंप कार्यान्वित करुन सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. डोंगरवाडी व बनेवाडी योजनांची स्थापत्य कामे जवळजवळ पूर्ण असून विद्युत व यांत्रिकी कामे हाती घेण्यात येत आहेत. आगळगांव जाखापूर उपसा सिंचन योजना, टप्पा क्र.६अ व ६ब या उपसा सिंचन योजनांची कामे अद्याप हाती घ्यावयाची आहेत. म्हैसाळ योजनेंतर्गत कालव्याच्या एकूण ३८१ कि.मी. लांबीपैकी मिरज, तासगांव, कवठे महांकाळ या भागातील २१३ कि.मी. लांबीमधील पूर्ण आहेत व ३१ कि.मी. मधील कामे प्रगतीपथावर आहेत. जत भागातील एकूण १३८ कि.मी.पैकी २० कि.मी.मधील बोगदा कामे, मातीकामे व बांधकामे पूर्ण आहेत. जत कालव्याचे ६२ कि.मी. लांबीमधील मातीकामे, बांधकामे प्रगतीपथावर असून अंदाजे ४५ टक्के कामे पूर्ण आहेत. टप्पा क्र.५ नंतर सुरु होणा-या कवठे महांकाळ कालवा कि.मी. क्र. १ ते ६९ मध्ये पाणी सोडण्यात येते. कि.मी. ५६ येथून जत कालवा निघत असून त्याचे १ ते २० कि.मी. मधील कामे पूर्ण झालेली असून जुलै-२०१२ मध्ये पाणी सोडण्यात आले असून त्याद्वारे बसाप्पावाडी व प्रतापपूर या तलावात पाणी साठा झाला आहे. त्याचा उपयोग जत तालुक्यातील टंचाईग्रस्त भागांस पाणी पुरवठा होत आहे. म्हैसाळ योजनेची एकूण सिंचन क्षमता ८२९२२ हे. असून जून- २०१२ अखेर १५२३९ हे. इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. म्हैसाळ योजनेच्या टप्पा १ ते ५ च्या उर्ध्वगामी प्रवाही नलिकेची एक ओळ कार्यान्वित करुन कालव्यात पाणी सोडण्यात येते होते.

यामधून सुमारे १०३४५ हेक्टर इतकी अप्रत्यक्ष सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. योजना अंशतः कार्यान्वित करुन सन २०११-१२ मध्ये १२००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ दिला आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे-

६.१ ताकारी योजना- सन २००३ पूर्वी ताकारी योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये नगदी पीके घेणेत येत नव्हती. ताकारी योजना सुरु झालेनंतर लाभक्षेत्रामध्ये ऊसाचे प्रमाण वाढलेने सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि.,वांगी, ता.कडेगांव,केन ॲग्रो एनर्जी (इंडिया) लि. रायगांव ता. कडेगांव, व क्रांती सहकारी साखर कारखाना,कुंडल या तीन साखर कारखान्यांची उभारणी झाली आहे. सन २००११-१२ च्या टंचाई परिस्थितीत ताकारी योजनेतून दि. १०/०८/११ ते दि. १५/०६/१२ या कालावधीत कृष्णा नदीतून **६.०७ टीएमसी** पाणी उपसा करुन ५४४८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये पलूस, कडेगांव, खानापूर व तासगांव तालुक्यामध्ये सुमारे ३७०० हे. इतक्या ऊस पिकाला योजनेद्वारे पाणी दिले. सन २०११-१२ या वर्षात ३ साखर कारखान्यांचे ऊसाचे गाळप १४.५८ लक्ष मेट्रीक टन इतके झाले आहे. त्याचे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अंदाजे रु.१७५ कोटी इतके उत्पन्न मिळाले आहे. या व्यतिरिक्त भुसार व चारा पिकांचे उत्पादन वाढले आहे.

सन २०११-१२ टंचाई परिस्थितीत ताकारी योजनेतून सोडलेल्या पाण्यामुळे लाभक्षेत्रातील ३४ ल.पा.तलाव/ को.प.बंधारे/पाझर तलाव इ. भरुन देणेत आले असुन ३२ गावातील ०.९४ लक्ष लोकाना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याचा लाभ झाला आहे.

६.२ म्हैसाळ योजना-

सन २००११-१२ च्या टंचाई परिस्थितीत म्हैसाळ योजनेतून दि. ०२/०८/११ ते दि. २३/०९/१२ या कालावधीत कृष्णा नदीतून ६.३९ टीएमसी पाणी उपसा करुन १२००० हे. क्षेत्रास देण्यात आले. दिनांक २७/१०/२०११ ते २३/०९/२०१२ या ११ महिन्याच्या कालावधीत पाचही टप्प्याचे पंप अविरत चालू होते. या पाण्याचा लाभ अवर्षण भागातील मिरज, कवठेमहांकाळ व तासगांव या तालुक्यातील १२००० हे. क्षेत्रास झाला आहे. त्यापैकी मिरज, तासगांव व कवठे महांकाळ या तालुक्यातील अंदाजे ७५०० हे. क्षेत्रावरील द्राक्ष बागा जगविण्यात आल्याने शेतक-यांना उत्तम द्राक्ष पिकांमुळे रु.३५० कोटी बेदाण्याचे उत्पन्नही मिळाले आहे. योजना कार्यान्वित झाल्यापासून प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मोहनराव शिंदे सह. साखर कारखाना, ता. मिरज, महाकाली सह. साखर कारखाना, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ आणि वसंतदादा सह. साखर कारखाना, सांगली यांच्या ऊस गाळपामध्ये भरीव वाढ झाली आहे. ऊस पीकाद्वारे शेतक-यांना सन २०११-१२ या वर्षात रु. १०० कोटी इतके उत्पन्न अंदाजे मिळाले. सन २०११-१२ टंचाई परिस्थितीत म्हैसाळ योजनेतून सोडलेल्या पाण्यामुळे लाभक्षेत्रातील ६० ल.पा.तलाव/ को.प.बंधारे/पाझर तलाव इ. भरुन देणेत आले असुन ५४ गावातील २.१४ लक्ष लोकाना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याचा लाभ झाला आहे. तसेच टंचाईग्रस्त जत तालुक्यातील प्रतापपूर तलावात १५३ दलघफू व कवठेमहांकाळ तालुक्यातील बसाप्पावाडी तलावात १०० दलघफू साठा करण्यात आला. प्रतापपूर तलावातून जत शहरास पाणी पुरविण्यासाठी स्त्रोत उपलब्ध झाला आहे.

ताकारी व म्हैसाळ योजनेतील ज्या क्षेत्रात सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले तेथे शेतीकामामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली.

प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. ३०४२.४८ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत रु. २.५९ लक्ष इतकी आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
टेंभू उपसा सिंचन प्रकल्प

१	प्रकल्पाचे नांव :टेंभू उपसा सिंचन प्रकल्प	तालुका: कराड		जिल्हा : सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	१११८५६ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता ३४३७ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१९/०२/१९९६	१९९५-९६	१४१६.५९	११०६४४
	सुप्रमा-१	२२/०१/२००४	२०००-०१	२१०६.०९	१११८५६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रिय जलओयागाचे इंग्रजी पत्र क्र.१६/ २७/ २०११पीए (एन)/ ५७९-६१० दि.२९/०३/२०११			
			२००९-१०	३४५०.३५	१११८५६
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			१३१५.५२	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) ५०.५९			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) ११५७.००			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) १०७.९३			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९६	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			१४१६.५९	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	११४१.७३	२६३१.९६	१४९०.२३	७३.२७
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	२५.७३	१६८.८२	१४३.०९	७.०४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	६९.४७	६९.४७	३.४२
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	२५३.२८	२५३.२८	१२.४५
७.५	इतर कारणे	०	८.३१	८.३१	०.४१
७.६	ई.टी.पी.चार्जेस	२४९.१३	३१८.५१	६९.३८	३.४१
	एकूण	**१४१६.५९**	**३४५०.३५**	**२०३३.७६**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० **सर्वसाधारण माहिती :**

कृष्णा नदीवर टेंभू येथे बॅरेज बांधून ५ टप्प्याव्दारे २२.१३ अघफू पाणी उचलून सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयामधील अवर्षण प्रवण क्षेत्रास देणेच्या प्रकल्पाचे काम सन १९९६ पासून प्रगतीत आहे. प्रकल्पाचा २२.१३ अघफू नियोजित पाणीवापर कोयना, वांग, तारळी या धरणातून व कृष्णा नदीतून उपलब्ध होणार आहे. प्रकल्पाचे एकूण पीकक्षेत्र १११८५६ हे. आहे. (कराड ८३४ हे., कडेगांव १२९६२ हे., खानापूर २६३७५ हे., तासगांव १०७०३ हे., आटपाडी २२२४० हे., कवठेमहंकाळ १०९४२ हे. व सांगोला २७८०० हे.) टेंभू योजना सप्टेंबर २००९ मध्ये अंशतः कार्यान्वित झाली असून त्यामुळे जून २०१२ अखेर ३४३७ हे. इतके पिकक्षेत्रावर सिंचन निर्मिती झाली आहे.

केवळ अपु-या निधी उपलब्धतेमुळे प्रकल्पाचे काम संथ गतीने चालू आहे. टेंभू उपसा सिंचन योजना प्रकल्पामध्ये १-अ, १-ब, २,३,४,५ व पूणदी व विसापूर असे एकूण ८ टप्पे आहेत तसेच १) जोड कालवा-१ २) जोड कालवा-२ ३) सुर्ली ४) कामथी ५) टप्पा-३-अ ते घाणंद तलाव ६) खानापूर-तासगांव ७) टप्पा ४ ते ५ ८) कचरेवाडी ९) गोरेवाडी १०) आटपाडी ११) घाणंद हिवथड १२) कवठेमहांकाळ १३) सांगोला असे एकूण १३ मुख्य कालवे आहेत. त्यावर देविखिंडी, खंबाळे , बाणूर, म्हासुर्णे व विटा हे ५ बोगदे आहेत.

२.० **प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यताः**

टेंभू उपसा सिंचन प्रकल्पास रु.१४१६.५९ कोटी किंमतीस दरसूची १९९५-९६ नुसार मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने, दिनांक १९/०२/१९९६ रोजी दिली. त्यानंतर मकृखोविमं ने रु.२१०६.०९ कोटी किंमतीस (दरसूची २०००-०१ नुसार) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक २२/०१/२००४ रोजी दिली. **केंद्रिय जलआयोग नवी दिल्ली यांनी दि. १४/०३/२०११ च्या १०९ व्या बैठकीमध्ये रु. ३४५०.३५ कोटी किमतीस मान्यता दिली आहे..** प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये १३१५.५२ कोटी खर्च झाले आहेत.

३.० **मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :**

प्रकल्पाची मूळ किंमत रुपये १४१६.५९ कोटी असून सुधारित किंमत रुपये ३४५०.३५ कोटी आहे. प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुधारित किंमतीमध्ये रु. २०३३.७६ कोटी इतकी वाढ झाली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ :-**

प्रतिवर्षी आवश्यकतेपेक्षा कमी निधी उपलब्ध झाल्यामुळे कामास विलंब झाला. या कालावधीमध्ये दरसूचीमध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात १४९०.२३ कोटीची म्हणजेच एकूण वाढीच्या ७३.२७ टक्के इतकी वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन व वनजमिनीच्या किंमतीमधील झालेली वाढ :**

भूसंपादन व वनजमिनीमध्ये किंमतीमध्ये मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १४३.०९ कोटी म्हणजेच एकूण वाढीच्या ७.०४ टक्के वाढ झाली आहे. मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ३४६० हे.जमिन सरासरी रु. ७४३६४ प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते. व त्यासाठी रु. २५.७३ कोटीची तरतूद होती. सुप्रमा अहवालामध्ये जमिनीची सरासरी किंमत रु.३८८४६९ प्रती हेक्टरी या दराने ४६२१.५८ हे. संपादन करणे प्रस्तावित आहे. त्याची किंमत रु. १६७.८८ कोटी आहे. तसेच वनजमिनीच्या एन.पी.व्ही.साठी रु.०.९४ कोटी खर्च झाले आहे. त्यामुळे एकूण रु. १४३.०९ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या ७.०४ टक्के इतकी आहे.

३.३ **व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :**

टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत येरळा व माण नदीवर १० को.प.बंधारे होणविषयी आ.श्री.अनिल बाबर यांनी त्यांच्या दि.१५/१२/१९९९ च्या पत्रान्वये मागणी केली होती. त्यास

महामंडळाचे दि.१३/०४/२००४ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे रु. १२.१३ कोटी इतकी किंमत वाढली. पाटबंधारे राज्यमंत्री श्री.अजितराव घोरपडे (कृ.खो.व को.पा.मं.) यांनी दि. १५/०२/२००० च्या पत्रान्वये टेंभू प्रकल्पांतर्गत कवठेमहांकाळ तालुक्यातील उंचावरील घाटनांद्रे,तिसंगी, कुंडलापूर, जाखापूर व वाघोली या गांवासाठी घाटनांद्रे-तिसंगी उपसा सिंचन योजनेद्वारे ८७२ हे. क्षेत्रास पाणी देण्यात यावे अशी मागणी केली. त्यास शासनाने दि.०४/०९/२००१ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु. १२.९७ कोटी इतकी वाढ झाली. श्री. अनिल बाबर, आमदार यांनी भूड, घरनिकी, गोरेवाडी व देविखिंडी भागातील क्षेत्रास टेंभू योजनेचे पाणी देणेची मागणी केली. श्री. अनिल बाबर, आमदार यांनी टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत खानापूर व आटपाडी तालुक्यातील स्थानिक नाल्यावर ६२ को.प.बंधारे हाती घेणेची मागणी केली. त्यामुळे किंमत रु. ३८.६७ कोटी वाढ झाली. वरीलप्रमाणे व्याप्तीतील बदलामुळे रु. ६९.४७ कोटी इतकी वाढ झाली असून, ती एकूण वाढीच्या ३.४२ टक्के इतकी आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :

मूळ प्रशासकीय मान्यतामध्ये कृष्णा नदीवर योजनेसाठी आवश्यक एक दिवसाचा पाणी पुरवठा असणारा को.प.बंधारा नियोजित होता. सविस्तर संकल्पनामध्ये अडीच दिवसाचा पाणी साठा असण्याची गरज भासल्याने को.प.बंधा-याऐवजी ०.४२३ अघफू क्षमतेचे बॅरेज नियोजित करण्यात आले. प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये पंपाची क्षमता, उर्ध्वगामी नलिकेचा व्यास, लांबी व जाडी याबाबत तरतूदी ढोबळ मानाने केलेल्या होत्या. प्रत्यक्ष काम करतांना सविस्तर संकल्पन करण्यात आले व त्यास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेची मान्यता घेणेत आली. सविस्तर संकल्पनातील वरीलप्रमाणे झालेल्या बदलामुळे किंमतीमध्ये रु. ३७.४३ कोटी वाढ झाली. टेभू उपसा सिंचन योजनेमध्ये एकूण १३ मुख्य कालवे असून, मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये त्यांच्या लांबी टोपोशीट आधारे अंदाजित केल्या होत्या. सविस्तर सर्वेक्षण, संकल्पन आधारित मंजूर केलेल्या योजनेच्या आराखडयामध्ये कालव्यांच्या लांबीमध्ये ६२ किमी. वाढ झाली (सांगोला कालव्यामध्ये २७ कि.मी. तसेच भूड, देविखिंडी, घरनिकी व गोरेवाडी कालव्यामध्ये ३५ कि.मी. ने वाढ झाली आहे) त्यामुळे रु.१४२.६५ कोटी किंमत वाढली.

मूळ प्रकल्पामध्ये तरतूद केलेल्या ढोबळ संकल्पानुसार योजनेच्या ५ टप्यात एकूण २०८२५० एच.पी. इतकी पंपींग क्षमता प्रस्तावित होती. सविस्तर संकल्पनानुसार योजनेसाठी २२५५०१ एच.पी. इतकी पंपींग क्षमता निश्चित करण्यांत आली. त्यामुळे विद्युत व यांत्रिकी खर्चात एकूण रुपये ६४.६७ कोटी वाढ झाली.

मूळ प्रकल्प अहवालामध्ये टप्पा १(ब) ते खंबाळे बोगदा येथे जाणेसाठी निरिक्षण रस्त्याची तरतूद नव्हती. त्यासाठी घाटरस्ता प्रस्तावित करणेत आला. त्यामुळे किंमतीमध्ये रु. २.८२ कोटीची वाढ झाली. बराजचे संकल्पन सन २००० पूर्वी झाले होते तथापि सन २००५ मध्ये कृष्णा नदीच्या महत्तम पूर पातळीमध्ये वाढ झालेने केंद्रिय जलआयोगाच्या हायड्रॉलॉजी विभागाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यामुळे बराजची किमंत रु. १९.८० कोटी झाली आहे. शासन निर्णय दिनांक ०९/०७/२००२ नुसार कालव्यावरील दगडी बांधकामाऐवजी संधानकाचे बांधकाम करणेत आलेने रु. २.७१ कोटी इतकी वाढ झाली आहे. अशा प्रकारे संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. २५३.२८ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या १२.४५ टक्के इतकी आहे.

३.५ आस्थापना व इतर कारणे :

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रु.२४९.१३ कोटी इतकी तरतुद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये रु.३१८.५१ कोटी इतकी तरतूद केल्याने रु.६९.३८ कोटीची वाढ झाली आहे. तसेच प्रकल्पाचे सर्वेक्षण, संकल्पने, आराखडे व लाभक्षेत्र सर्वेक्षण या कामासाठी रु. ८.३१ कोटीची वाढ झालेली आहे. अशा प्रकारे आस्थापना व इतर कारणामुळे झालेली एकूण वाढ रु.७७.६९ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या ३.८२ टक्के इतकी आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ **भूसंपादनाच्या कामामुळे झालेला विलंब :**

बॅरेज, टप्पा १(अ) पंपगृह व उर्ध्वगामी नलिका टप्पा १(अ) ते १(ब) येथील क्षेत्र बागायती व नदीकाठचे असलेने जमिनीचा ताबा मिळणेस एक वर्ष विलंब झाला. तसेच माहूली टप्पा ३ येथील पंपगृहाच्या कामासाठी शेतक-यांचा भूसंपादन करणेस विरोध झालेने काम पूर्ण होणेस दोन वर्षे इतका विलंब लागलेला आहे.

४.२ **अपु-या निधीमुळे झालेला विलंब :**

प्रकल्पास सन १९९६ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. या अहवालानुसार प्रकल्पाची कामे ६/२००० पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन होते. प्रकल्पाच्या व्याप्तीचा विचार करता प्रकल्पास सन १९९६ ते २००० या कालावधीत रु.३२६.२६ कोटी (प्रकल्प किंमतीच्या १.५%)निधी उपलब्ध झाला. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत गेली. त्यानंतर प्रकल्पास आवश्यकतेपेक्षा खुप कमी प्रमाणात निधी मिळत राहिला. त्यामुळे नियोजनाप्रमाणे कामे वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

प्रकल्पाच्या एकूण ५ टप्यापैकी टप्पा १(अ), १(ब) व टप्पा २ ची कामे सर्वार्थाने पूर्ण झाली असून माहे सप्टेंबर, २००९ रोजी योजना अंशतः कार्यान्वीत झाली आहे. टप्पा ३ चे स्थापत्य काम ९५ टक्के व टप्पा ४ व ५ चे स्थापत्य काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या कालव्याची मातीकाम ६० टक्के व बांधकामे ५५ टक्के पूर्ण झाली आहेत. प्रकल्पाच्या एकूण १११८५६ हे. इतक्या पीकक्षेत्रापैकी जून २०१२ अखेर ३४३७ हे. पीकक्षेत्रावर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सुर्ली कालव्यावरील वितरण व्यवस्थेची कामे अंतिम टप्यात असून कामथी, जोड कालवा १ वरील सर्व वितरण व्यवस्थेची कामे व जोड कालवा २ वरील २३६८ हे. (५१%) इतके वितरण व्यवस्थेची कामे हाती घेणेत आली आहेत. प्रकल्प सप्टेंबर २००९ पासून अंशतः कार्यान्वित झाला असून त्यामूळे सुर्ली, कामथी या कालव्यातून लाभक्षेत्रास पाणी देणेत येत आहे. तसेच जोड कालवा १ व जोड कालवा २ ची अंशतः कामे पूर्ण करुन टप्पा ३ पर्यंत पाणी सोडणेत आले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये २ ते ३ हजार हे. क्षेत्रावर नव्याने लागवड झाली आहे. ऊस क्षेत्राची वाढ झालने लाभक्षेत्राच्या साखर कारखान्यांच्या गाळपामध्ये अंदाजे दीड पटीने व दूध संकलनामध्ये दुपटीने वाढ झाली आहे. तसेच गेल्या ५ ते ६ वर्षामध्ये या भागातील उद्योगधंदयामध्ये तिपटीने वाढ झाली आहे. सन २०१२ मध्ये दुष्काळी परिस्थितीत टप्पा ३ पर्यंत पाणी गेलेने कडेगांव व कराड तालूक्यातील २५ लहान मोठे तलावामध्ये पाणी सोडून त्याद्वारे कडेगांव तालुक्यातील २२ गांवामधील अंदाजे ८७००० इतक्या लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होऊ शकले आहे. बांधा, वापरा व हस्तांतरण या तत्वावरील टेंभू जलविद्युत प्रकल्प सन २००९ पासून कार्यान्वित झाला असून याची विद्युत निर्मिती क्षमता ४.५ मे.वॅट अशी आहे. या जलविद्युत प्रकल्पामधून आजपर्यंत ६ दशलक्ष युनीट विज निर्मीती झालेली आहे.

प्रकल्पाची एकूण किंमत रु.३४५०.३५ कोटी असून प्रतिहेक्टरी किंमत रु. ३.०९ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.२२ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
वाकुर्डे उपसा सिंचन योजना, जिल्हा सांगली

१	प्रकल्पाचे नांव: वाकुर्डे उपसा सिंचन योजना	तालुका: शिराळा		जिल्हा : सांगली	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीकक्षेत्र	३५१०७ हे.	जून २०१२ अखेर निर्मीत सिंचन क्षमता २७७२ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१९/१२/१९९८	१९९५-९६	१०९.६८	१९७५४
	प्रथम सुप्रमा-१	२५/१०/२००४	२००३-०४	३३२.३१	२४५१३
	प्रस्तावित सुप्रमा-२		२००९-१०	७७२.६२	३५१०७
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			९८.८४	
	५.१	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) ०.६०			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) ९८.११			
	५.३	ई टी पी खर्च (रु.कोटी) ०.१३			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			२०००-०१	
	६.१	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		२०००	
	६.२	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)		१२७.९३	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	८९.९०	३६१.४६	२७१.५६	४०.९६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	३.५१	२८.९७	२५.४६	३.८५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२५२.५७	२५२.५७	३८.१०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.५	इतर कारणांमुळे झालेली वाढ	०.००	१९.२७	१९.२७	२.९०
७.६	ई टी पी मूळे झालेली वाढ	१६.२७	११०.३५	९४.०८	१४.१९
	एकूण	१०९.६८	७७२.६२	६६२.९४	१००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती

वाकुर्डे उपसा सिंचन योजना ही सांगली व सातारा जिल्हयातील शिराळा, वाळवा व कराड तालुक्यातील डोंगराळ भागास सिंचनाचा लाभ देण्यासाठी प्रस्तावित केलेली आहे. योजनेस सन १९९८ मध्ये महामंडळाने रु.१०९.६८ कोटी किंमतीच्या प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता दिली आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार वारणा डावा कालवा कि.मी. २४ मध्ये तीन टप्प्यामध्ये ११७ मी. पाणी उपसा करुन शिराळा, वाळवा व कराड तालुक्यातील एकुण १९७५४ हेक्टर पिकक्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन होते. योजनेच्या व्दितीय प्रस्तावित सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालानुसार वारणा मोठया पाटबंधारे प्रकल्पाच्या डावा तीर कालवा कि.मी. २४ मध्ये तीन टप्प्यात व कि.मी ६८ मधून एक टप्प्यात वार्षिक ६.९४ अ.घ.फुट पाणी उपसा करुन शिराळा, वाळवा व कराड तालूक्यातील एकूण ३५१०७ हे. पिकक्षेत्र (शिराळा ८९४२ हे., वाळवा २३३९३ हे., कराड २७७२ हे.) सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित आहे.

सद्यःस्थितीत योजनेच्या भाग-१ टप्पा-१ व २ ची स्थापत्य,यांत्रिकी व विद्युत घटकांची कामे पूर्ण करुन दिनांक ३०/१२/२०११ रोजी योजना अंशतः कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे कराड तालुक्यातील २७७२ हेक्टर क्षेत्र सिंचनक्षम झाले आहे. तसेच भाग-१ टप्पा-२ मधील वाकुर्डे रेड कालवा व बादेवाडी बिऊर कालव्याची पहिल्या १० कि.मी. ची कामे निधी उपलब्धतेनुसार सुरु आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता

वाकुर्डे उपसा सिंचन योजनेसाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक १९/१२/१९९८ रोजी रु.१०९.६८ कोटी किंमतीला व १९७५४ हेक्टर पिकक्षेत्रास मूळ प्रशासकीय मान्यता दिली. यानंतर महामंडळाने दिनांक २५/१०/२००४ रोजी रु.३३२.३१ कोटी किंमतीस व २४५१३ हे.पिकक्षेत्रास प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. मा.ना.श्री. शिवाजीराव देशमुख, सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद यांच्या विधान भवन मुंबई येथील दालनात दि.०७/०३/२००६ रोजी मा.ना.श्री.जयंत पाटील, वित्त व नियोजन मंत्री, मा.ना.श्री.रामराजेनाईक निंबाळकर मंत्री जलसंपदा (कृखोपाम) मा.आ.श्री.शिवाजीराव नाईक शिराळा यांचे समवेत झालेल्या बैठकीत योजनेच्या व्याप्तीत बदल करुन योजनेची द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी ३५१०७ हे. एवढे पीकक्षेत्र निश्चित करण्यात आले. त्यानुसार द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीचा रु.७७२.६२ कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून त्यावरील शेऱ्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सध्या प्रगतीपथावर आहे. प्रकल्पावर माहे मार्च २०१२ अखेर रु.९८.८४ कोटी इतका खर्च झाला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे

मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार वाकुर्डे उपसा सिंचन योजनेची किंमत रु.१०९.६८ कोटी होती. प्रस्तावित व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावानुसार योजनेची किंमत रु.७७२.६२ कोटी आहे. योजनेच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत अद्यावत सुप्रमाची किंमत रु.६६२.९४ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ

अपुरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूचीत वाढ होऊन प्रकल्पाच्या खर्चात रुपये २७१.५६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ

भूसंपादनासाठी मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत २५.४६ कोटी इतकी वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ४९५ हे. जमीन संपादन सरासरी रु.७०,००० प्रती हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रु. ३.५१ कोटीची तरतूद होती. प्रस्तावित सुप्रमा

अहवालामध्ये ८६९.१३ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. ३,३०,००० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु. २८.९७ कोटी आहे. त्यामुळे रु. २५.४६ कोटी इतकी वाढ होत आहे. सदर योजनेमुळे पुनर्वसन करावे लागत नाही. तसेच सदर योजनेस वनजमीन संपादित करावी लागत नाही.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ

योजनेच्या मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार १९७५४ हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावीत होते. तथापी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आग्रही मागणीनुसार व महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ठराव क्रमांक ३८/१५ व ३८/२२ नुसार योजनेच्या मूळ व्याप्तीत बदल करुन २४५१३ हे. क्षेत्र प्रस्तावित करुन त्या बदलास महामंडळाकडून दिनांक २५/१०/२००४ रोजी प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

मा.ना.श्री. शिवाजीराव देशमुख, सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद, यांच्या विधान भवन मुंबई येथील दालनात दि.०७/०३/२००६ रोजी मा.ना.श्री.जयंत पाटील, वित्त व नियोजन मंत्री, मा.ना.श्री.रामराजे नाईक निंबाळकर मंत्री जलसंपदा (कृखोपाम), मा.आ.श्री.शिवाजीराव नाईक शिराळा यांचे समवेत झालेल्या बैठकीत योजनेच्या व्याप्तीत बदल करुन योजनेची द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी ३५१०७ हे. एवढे पीकक्षेत्र निश्चित करण्यात आले.

याप्रमाणे मूळ योजनेत एकूण १५३५३ हे. सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे. कालव्याच्या लांबीमध्ये १५०.४० किमी इतकी वाढ झालेली आहे. त्यामुळे किंमतीमध्ये रु.१२०.८९ कोटी इतकी वाढ झालेली आहे. बोगद्यांच्या लांबीमध्ये ६.३७ कि.मी. इतकी वाढ झालेली असून त्यामुळे किंमतीमध्ये रु.५१.७३ कोटी इतकी वाढ झाली आहे. तसेच वितरण व्यवस्थेत वाढ झाल्याने किंमती मध्ये रु.७९.९५ कोटीची वाढ झालेली आहे.

अशा प्रकारे व्याप्तीतील बदलामुळे वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या किंमतीमध्ये एकूण रु.२५२.५७ कोटी वाढ झालेली आहे. सदर व्याप्तीतील वाढीमुळे लाभक्षेत्रात २८ गांवाचा नव्याने समावेश झालेला आहे.

३.४ आस्थापना व इतर कारणे

मूळ अहवालामध्ये आस्थापना व संयंत्रे यासाठी रु.१६.२७ कोटी इतकी तरतुद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात रु.११०.३५ कोटी इतकी तरतूद केल्याने रु. ९४.०८ कोटीची वाढ झाली आहे. इतर कारणामुळे रु.१९.२७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे

४.१ अपुऱ्या निधीमुळे झालेला विलंब

प्रकल्पास माहे १२/१९९८ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. मात्र सन २००० मध्ये प्रकल्पास प्रथमतः अनुदान प्राप्त झाले व त्यानंतर कांही प्रमाणात निधी उपलब्ध होत गेला. मात्र पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता आली नाहीत. योजनेचे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यामध्ये, वेळोवेळी करण्यात आलेल्या व्याप्तीमधील बदलामुळे, व अपुऱ्या निधीमूळे एकूण ४ वर्षे विलंब झालेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती

या योजनेचे काम सन २००० पासून सुरु करणेत आले. यात प्रामुख्याने भाग-१ टप्पा-१ अंतर्गत पंपगृह, जोड कालवे, खिरवडे, हातेगांव बोगदे व टप्पा २ अंतर्गत पंपगृह, बादेवाडी, येणपे बोगदे तसेच टप्पा ३ अंतर्गत शिरशी, पणुंब्रे बोगदे इ. कामे जवळजवळ पूर्ण करण्यात आली. जेणेकरुन सदर योजना दि.३०/१२/२०११ रोजी अंशतः कार्यान्वित करणे शक्य झाले आहे. या योजनेअंतर्गत येणपे बोगद्यातून कराड तालुक्यातील दक्षिण मांड नदीत सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे कराड तालुक्यातील २७७२ हेक्टर इतके सिंचनक्षेत्र निर्माण झाले आहे.

योजनेच्या भाग-२ चे सविस्तर सर्वेक्षण सुरु असून काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. योजनेच्या भाग-१, टप्पा क्र.२ अंतर्गत वाकुर्डे रेड कालवा कि.मी. १ ते १० व बादेवाडी बिऊर कालवा कि.मी. १ ते १० ची मातीकामे व बांधकामे निधी उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहेत.

योजनेच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार भाग-१ व २ साठी खुल्या चाऱ्यांमधून वितरण व्यवस्थेची तरतूद होती. तथापि महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ७० व्या बैठकीतील ठराव क्र. ७०/१९ नुसार योजनेच्या भाग-२ अंतर्गतच्या लाभक्षेत्रासाठी बंदनलिकेद्वारे वितरण प्रणाली विकसित करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रकल्प अहवालामध्ये तरतूद करण्यात आली आहे. भाग-१ व २ मधील लाभक्षेत्रमधील वितरण व्यवस्थेची कामे अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत.

या योजने अंतर्गत एकूण ३५१०७ हे. सिंचन क्षमतेपैकी २७७२ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. योजनेच्या प्रथम प्रशासकीय मान्यतेनुसार कराड तालूक्यातील दक्षीण मांड नदीमध्ये येणपे बोगद्याद्वारे पाणी सोडून खाजगी उपसा सिंचनाद्वारे २७७२ हे. इतके पीकक्षेत्र प्रत्यक्ष सिंचीत होत आहे.

प्रस्तावित सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ७७२.६२ कोटी इतकी असून प्रति हेक्टरी किंमत रु २.२० लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.६२ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना, जि.पुणे

१	प्रकल्पाचे नाव : जनाई शिरसाई	तालुका : दौंड		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) :	१५४८८ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता - ९३४२ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता हे.
	मूळ प्रशासकीय मान्यता	२४/११/९३	१९९१-९२	५६.९२	१२०००
	सुप्रमा -१	१७/२/२०००	१९९६-९७	१४४.२४	१५४८८
	सुप्रमा -२	३/१२/२००४	२००१-०२	१९९.००	१५४८८
	सुप्रमा -३	२/६/२०११	२००८-०९	४११.७२	१५४८८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			२६२.९१	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ९.६६				
	५.२ बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = २२५.०२				
	५.३ इटीपी खर्च (रु.कोटी) = २६.१५				
६.०	प्रकल्पास प्रथंमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९३	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९४	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			६६.३९	

७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.				(रु. कोटी)
	बाब	मुळ तरतूद	अद्यावत तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	४५.१०	१६१.७०	११६.६०	३२.८६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ	०.७९	५९.७१	५८.९२	१६.६०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	१२.०५	१२.०५	३.४१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	८३.५९	८३.५९	२३.५५
७.५	ईटीपी चार्जेस व इतर कारणे	११.०३	९४.६७	८३.६४	२३.५८
	एकूण	५६.९२	४११.७२	३५४.८०	१००

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

जनाई शिरसाई उपसा सिंचनयोजनेअंतर्गत खडकवासला कालव्याद्वारे वरवंड व शिर्सुफळ या दोन तलावात सोडलेले एकूण ३.६० अघफू पाणी उपसा करुन अनुक्रमे जनाई व शिरसाई या दोन उपसा योजना अंशतः कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. या योजनेद्वारे पुणे जिल्ह्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील दौंड तालुक्यातील १९८० हे., बारामती तालुक्यातील ११३०८ हे. व पुरंदर तालुक्यातील २२०० हे. अशा एकूण १५४८८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात येणार आहे. आत्तापर्यंत ९३४२ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जनाई योजनेत एकूण ३ टप्प्यात एकूण ७६ कि.मी. लांबी असलेले ६ कालवे असून शिरसाई योजने अंतर्गत एक टप्प्यात ४ कालवे असून त्यांची लांबी ५३ कि.मी. आहे. दोन्ही योजनांच्या मुख्य कालव्यांची कामे पूर्ण झाली असून वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत.

२.०० प्रशासकीय मान्यता/सु.प्र.मा.तपशील

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेस शासन निर्णय क्र.जनाई/शिरसाई/ १९०३/१०५६ (१/९३) ज.स.अ. दि.२४/११/१९९३ अन्वये रु. ५६.९२ कोटी किंमतीस मूळ प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. या प्रशासकीय मान्यतेनंतर योजनेच्या आराखड्यात बदल करण्यात आला. शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या सिंचन क्षमतेमध्ये २६५३ हे. वाढ झाली. तसेच जनाई उपसा सिंचन योजना दोन टप्प्याऐवजी तीन टप्प्यात केल्याने योजनेच्या पंपगृहाच्या संकल्पचित्रात बदल झाला आहे. सदर बदलासह प्रथम सुप्रमा अहवालास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ निर्णय क्र.१५५५ दि. १७/२/२००२ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

३.०. मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे.

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु.३५४.८० कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

प्रकल्पाच्या कामास १६ वर्षे इतका विलंब झालेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अपुरा निधी, संकल्पचित्रात झालेल्या बदलामध्ये झालेला विलंब तसेच योजनेच्या कालव्याचा काही भाग मौजे सुपे येथील मयुरेश्वर अभयारण्य घोषित झाल्याने सर्वोच्च न्यायालयाची स्वतंत्र मान्यता घ्यावी लागली. त्यामुळे प्रकल्पाच्या कामाचा कालावधी वाढला. कामाचा कालावधी वाढल्यामुळे दरसूचीतील वाढीवर परिणाम होऊन प्रकल्पाची किंमत रु. ११६.६० कोटी इतकी वाढली आहे.

३.२ भूसंपादन व वनजमिनी यांच्या किंमतीतील वाढ :

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ७६४.६६ हे.जमीन सरासरी रु.१०३३० प्रति हेक्टर दराने संपादीत करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.७९ कोटीची तरतूद होती. प्रत्यक्षात ७३३.७४ हे.क्षेत्र, सरासरी रु.८१३००० प्रति हेक्टर दराने संपादन करणे आवश्यक असून त्याची किंमत रु. ५९.७१ कोटी आहे. त्यामुळे ५८.९२ कोटी इतकी वाढ होत आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

मयुरेश्वर वनपरिक्षेत्र हे प्रकल्पाचे काम सुरु असताना वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित झाल्याने केंद्र शासनाच्या वन विभागाच्या सुचनेप्रमाणे जनाई उजवा कालवा कि.मी.६ ते ९ या भागात खुल्या कालव्याऐवजी बोगदा प्रस्तावित करावा लागला. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु १२.०५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेची मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालानुसार सिंचन क्षमता १२००० हे. होती. सन १९९५ मध्ये योजनेच्या पीकरचनेत बदल करण्यात आला. उसाचे क्षेत्र कमी करुन इतर पिकांचे क्षेत्र वाढविण्यात आले. पाणीवापर कायम ठेवून फक्त पिकरचना विरळ करण्यात आली. या सुधारित पिकरचनेस कृषी विभागाचे पत्र क्र. सिंचन-२२,१९९३,ॲग्री-५९ दि.२४/८/१९९५ अन्वये मान्यता घेण्यात आली. पिकरचना विरळ केल्याने जनाई शिरसाई योजनेचे एकूण क्षेत्र ३२१९ हे. ने वाढले.

त्यानंतर भगतवाडी व दत्तवाडी येथील शेतक-यांनी त्यांचे क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याची मागणी केली. सदर मागणी मान्य करण्यासाठी शिरसाई योजनेच्या पिकरचनेत बदल करण्यात आला, त्यामुळे २६९ हे. इतके क्षेत्र वाढले या सुधारित पिकरचनेस कृषी विभागाचे पत्र क्र.पिकपध्दती/९३/०४ दि. २४/७/२००४ अन्वये मान्यता घेण्यात आली.

उपरोक्त पिकरचनेतील बदलांमुळे जनाई शिरसाई योजनेची सिंचन क्षमता १२००० हे. वरुन १५४८८ हे. इतकी झाली.

३.४ संकल्पचित्रात बदल झाल्यामुळे झालेली वाढ :

मा.सुभाष कुल, विधानसभा सदस्य, दौंड, यांनी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेमधून पाझर तलाव भरण्यासाठी भरण कालवा हाती घेण्याची मागणी दिनांक १२/१/९४ च्या पत्रान्वये केली. खडकवासला धरणातील पूर विसर्गाचे पाणी नविन मुठा कालव्यामधून सोडण्यात येते. या अतिरिक्त पाण्यामधून हे पाझर तलाव पूराचे कालावधीत उपसा करुन भरणे शक्य होते. त्यानुसार

जनाई उपसा सिंचन योजनेमार्फत दौंड तालुक्यातील १८ पाझर तलाव भरण्यास शासन पत्र क्र.जनाई/१०९३/१०५९/ (१/९३) जसंअ दिनांक १२/९/९४ नुसार मान्यता देण्यात आली. तसेच शिरसाई उपसा सिंचन योजनेमार्फत दौंड तालुक्यातील ३ व बारामती तालुक्यातील ४४ अशा एकूण ४७ पाझर तलाव भरण्यास शासन पत्र क्र.जनाई/१०९३/१०५९/(१/९३) जसंअ दिनांक २८/२/९६ अन्वये मान्यता प्राप्त झाली, या दोन्ही मान्यतांमुळे एकूण ६५ तलावांच्या फिडर कालव्यांची तरतूद करावी लागली.

मुळ प्रशासकीय अहवालानुसार वरवंड तलावातून कुसेगांव उपसा सिंचन योजना व जनाई उपसा सिंचन योजना अशा दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना प्रस्तावित होत्या. संकल्पचित्र संघटनेने तयार केलेल्या संकल्पनानुसार जनाई व कुसेगाव या दोन्ही उपसा सिंचन योजनांचे एकत्रिकरण करुन जनाई टप्पा-१ व जनाई टप्पा-२ संकल्पीत करण्यात आले. तसेच जनाई टप्पा-३ मधील पंपगृहाच्या संकल्पनात सुधारणा करण्यात आली. मुळ प्रशासकीय अहवालातील शिरसाई योजनेचे लाभक्षेत्र वाढल्याने पंपगृह व उध्दरण नलिका व वितरण व्यवस्था यामध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या संकल्पचित्रानुसार बदल करण्यात आले. सिंचन क्षेत्रात एकूण ३४८८ हे. इतकी वाढ, ६५ पाझर तलावांचे फिडरची कामे व त्याअनुषगाने जनाई व शिरसाई या दोन्ही उपसा सिंचन योजनेच्या संकल्पचित्रात बदल झाल्याने प्रकल्पाच्या किंमतीत रु.५१.८९ कोटी इतकी वाढ झाली.

मूळ प्रशासकीय अहवालामध्ये लाभक्षेत्र विकास भाग-१ ची कामे अंतर्भूत नव्हती. तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालामध्ये या कामांचा समावेश केल्याने रु.३१.४२ कोटी इतकी वाढ झाली.

जनाई व शिरसाई योजनेचे मुळ प्रस्तावातील उपरोक्त व इतर संकल्पनातील बदलामुळे एकूण वाढ रु.८३.५९ कोटी इतकी झाली.

३.५ इतर कारणांमुळे झालेली वाढ :-

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी वापरण्यात येणा-या वीजेची आकारणी सन २००० पासून औद्योगिक दराने (एचटीपी-२) करण्यात येत होती. त्यानंतर वीज देयकाची आकारणी शेतीपंपाच्या दराने (एचटीपी-७) करण्याबाबतचे धोरण शासनाने स्विकारले. त्यामुळे पुर्वीची आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने सुधारित करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास व महाराष्ट्र उर्जा आयोगास करण्यात आली होती. मात्र ती अमान्य झाली. दरम्यानच्या काळात थकीत वीज देयकावर व्याज व दंड आकारण्यात आल्याने एकूण थकबाकी रु.३४.०० कोटी इतकी झाली होती. या रक्कमेची तरतूद तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालात तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे रु. ३४.०० कोटी इतकी वाढ झाली आहे.

ETP चार्जेस मध्ये १४.८८ कोटी वाढ झाली. सेवापथाची दुरुस्ती, सर्वेक्षणातील वाढ, व्यवस्थापन खर्च, दळणवळण, पर्यावरण व इतर अनुषंगिक कारणांमुळे ३२.२६ कोटीची वाढ झाली. जनाई उपसा सिंचन योजनेचा उजवा कालवा कि.मी. ६ ते ९ मयुरेश्वर अभयारण्यातून जातो. त्याच्या परवानगीसाठी लागणा-या वन्यजीव संरक्षण निधीची तरतूद मुळ प्रशासकीय अहवालामध्ये नव्हती. प्रत्यक्षात मयुरेश्वर अभयारण्याच्या भागात कालव्याचे काम करण्यासाठी केंद्र शासनाच्या मंजूरीच्या पत्रातील अटींप्रमाणे रु.२.५० कोटी इतका निधी वन विभागास वर्ग करावा लागला. या सर्व बाबींमुळे एकूण रु.८३.६४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ वनजमिनीच्या हस्तांतरणामुळे झालेला विलंब

जनाई उपसा सिंचन योजनेचा उजवा कालवा मयुरेश्वर अभयारण्यामधून जात असून त्याकरिता १४.९२ हे. क्षेत्राची आवश्यकता होती. वनजमीन कायदा १९८० नुसार मान्यतेचा प्रस्ताव दि.२/९/१९९७ रोजी सादर करण्यात आला. मान्यतेच्या प्रक्रिये दरम्यान या भागात अभयारण्य घोषित करण्यात आले त्यामुळे वन्यजीव संरक्षण अधिनियम २००३ नुसार मान्यता घेणे क्रमप्राप्त होते. सुप्रीम कोर्टाने काही अटींच्या अधीन राहून दि.२८/३/०७ रोजी या भागातील काम करण्यास परवानगी होते. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वन संरक्षक वन्यजीव, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र.कक्ष-२३(२)/सर्व्हे/प्र.क्र.१५/२६४१/०८-०९, दि.११/१२/२००८ अन्वये अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये कालव्याच्या कामास ११ वर्षे इतका विलंब झाला.

४.२ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशील :

प्रकल्पास सन १९९३ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. मात्र सन १९९७-९८ पर्यंत काही प्रमाणात निधी उपलब्ध झाला. मात्र तद्नंतर पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता आली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती

जनाई उपसा सिंचन योजने अंतर्गत ३ पंपगृह व उध्दरण नलिका असून २ पंपगृह कार्यान्वित झाले आहेत. तीस-या पंपगृहाचे व उध्दरण नलिकेचे काम प्रगतीपथावर आहे.जनाई उपसा सिंचन योजने अंतर्गत ६ मुख्य कालवे असून त्यांची एकूण लांबी ७६ कि.मी. इतकी आहे. मुख्य कालव्याची मातीकामे व बांधकामे बहुतांशी पूर्ण करण्यात आली आहे. जनाई डावा कालवा, हिंगणीगाडा शाखा कालवा यांचे वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले आहे. जनाई उजवा कालवा कि.मी. ९ च्या पुढील भागातील वितरण व्यवस्थेचे काम हाती घ्यावयाचे आहे. पुरंदर शाखा कालव्यावर वरील वितरण व्यवस्थेचे काम हाती घ्यावयाचे आहे. जनाई उपसा सिंचन योजनेच्या प्रकल्पीय सिंचन क्षमता ९१८५ हे. पैकी जून १२ अखेर ४०२२ हेक्टर क्षेत्राची निर्मिती झाली आहे.

शिरसाई उपसा सिंचन योजनेचे पंपगृह व उध्दरण नलिकेचे काम करण्यात आले आहे. शिरसाई योजनेवर ४ कालवे असून त्यांची एकूण लांबी ५३ कि.मी. आहे. मुख्य कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. शिरसाई डावा कालव्याची लांबी १५ कि.मी. असून वितरण व्यवस्थेसह कामे पूर्ण झाली आहे. शिरसाई उजव्या कालव्याची लांबी १४ कि.मी. असून वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत. तथापि लघुवितरिका ३, ते ५ ची कामे शेतक-यांच्या विरोधामुळे होऊ शकली नाहीत. शिर्सुफळ उजव्या कालव्याची लांबी ११ कि.मी. असून १० कि.मी. लांबीतील कामे पूर्ण झालेली आहेत. लघुवितरिका ३ व ४ मधील कामे शेतक-यांच्या विरोधामुळे होऊ शकले नाही. शिर्सुफळ डाव्या कालव्याची लांबी १३ कि.मी. तो पूर्ण आहे. वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीपथावर आहेत. शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या ६३०३ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षमतेपैकी ५३२० हेक्टर क्षेत्राची सिंचन निर्मीती झाली आहे.

६.०० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे

सदर योजना सन २००१ मध्ये अंशतः कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेद्वारे सन २०११-२०१२ मध्ये सुमारे ०.८३ अघफू पाणी उचलण्यात आले. या पाण्यामुळे दौंड तालुक्यातील ७ गावे व बारामती तालुक्यातील २१ गावांना दुष्काळ परिस्थतीत पाणीपुरवठा करण्यात आला. सन २०११-१२ मध्ये लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प होते. जनाई उपसा सिंचन योजनेद्वारे ८१ पाझर तलाव तर शिरसाई उपसा सिंचन योजनेद्वारे ७६ पाझर तलाव भरण्यात आले. त्यामुळे टंचाई कालावधीत महसूल विभागामार्फत पाणी पुरवठा करीता टँकर्सची संख्या कमी झाली. पाझर तलावात पाणी सोडल्याने पाझराने विहीरीत पाणी येऊन त्याद्वारे लाभधारकांना फायदा झाला. त्यामुळे सुमारे १३०० हे. अप्रत्यक्ष सिंचन झाले. जनावरांना पिण्याचे पाणी व चारा, पिकासाठी याचा फायदा झाला. त्यामुळे पाणी टंचाईवर व दुष्काळी परिस्थितीवर मात करणे शक्य झाले आहे. ५६० हे. इतके प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले.

सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची किंमत रु.४११.७२ कोटी असून प्रति हेक्टरी किंमत रु. २.९२ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.१७ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
पुरंदर उपसा सिंचन योजना, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव :पुरंदर उपसा सिंचन योजना	तालुका: हवेली		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	२५७५३	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) : १७९६८ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये) पीकक्षेत्र
	मुळ प्रशासकीय मान्यता	२४.१२.१९९६	१९९५-९६	१७८.९३	२५८१३
	अधिक्य टिपणीस मान्यता	२४.०३.२०००	१९९९-२०००	२५०.००	२५३५१
	सुप्रमा-१	२०.०१.२०१२ शासनास सादर	२०११-१२	६०८.९०	२५७५३
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)			--	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी			२८७.८३	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) = १.३७			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) =२८०.४७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ५.९९			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन २०००	
६.२	प्रकल्पाचे काम सुरू झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			२५५.९२	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढीसह)	१३८.७६	२६१.९५	१२३.१९	२८.६५
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	३.३१	७.९०	४.५९	१.०७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१६५.५१	१६५.५१	३८.५९
७.५	इतर कारणे	१.५२	६६.११	६४.५९	१५.०२
७.६	ई.टी.पी. मुळे झालेली वाढ.	३५.३४	१०७.४३	७२.०९	१६.७७
	एकूण	**१७८.९३**	**६०८.९०**	**४२९.९७**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० **सर्वसाधारण माहिती :** पुणे जिल्हयातील पुरंदर, बारामती, दौंड व हवेली (पुर्व भाग) हे तालुके पर्जन्य छायेच्या प्रदेशात येत असून येथील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ४०० ते ५०० मिमी असते. लाभक्षेत्र उंच सखल डोंगराळ असल्याने इतर प्रवाही सिंचन योजनांचा या भागास लाभ होत नाही. या दुर्गम डोंगराळ भागातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करणेसाठी मुळा- मुठा नदीतून उपसा सिंचन योजनेस मान्यता देण्यात आली आहे. मुळ प्र.मा.मध्ये पारंपारिक कालव्याची तरतूद होती त्याऐवजी सुधारित संकल्पनाप्रमाणे बंद पाईप वितरण प्रणालीचा वापर केला आहे. वहनव्यय कमी होऊन योजनेच्या कार्यक्षमतेत वाढ झाल्याने अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य झाले आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजनेचा मुळ स्त्रोत मुळा-मुठा नदीवर कोरेगाव (मुळ) ता.हवेली जि.पुणे आहे. पावसाळयात नदीचे पाणी व इतर वेळी पुणे व पिंपरी शहरातून उपलब्ध होणारे सांडपाणी कोरेगाव (मूळ) येथील को.प.बंधा-यातून उपसा करून वापरण्यासाठी सदरची योजना आखण्यात आली. योजनेमध्ये ४.०० अ.घ.फू. इतका पाणीवापर असून पाणी सहा टप्यामध्ये ३५६ मी. उचलून हवेली (पुर्व भाग) ८९९ हे., दौंड ३७९७ हे., पुरंदर १४५९५ हे. व बारामती ६४६२ हे. या अवर्षणप्रवण तालुक्यातील एकूण २५७५३ हेक्टर क्षेत्रास देण्याचे नियोजन आहे.

२.० **प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता :** पुरंदर उपसा सिंचन योजनेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा निर्णय क्र. पुरंदर/उसिंयो /प्रशा-२/(२९६)/(३८२/९६), दि.२४.१२.१९९६ अन्वये रू. १७८.९३ कोटी रकमेस (दरसूची १९९५-९६) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. योजनेच्या किंमतीमध्ये सुधारित आराखडयाप्रमाणे होणा-या वाढीचा विचार करता सन १९९९-२००० च्या दरसूचीनुसार रु.२५० कोटी रकमेच्या अधिक्य टिपणीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पत्र क्र. मकृखोविमं./ पुरंदर/ उसिंयो/ २९६/ २७८२, दि. २४.३.२००० अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्यस्तर तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे सहमतीने महामंडळाने पत्र क्र. ५९५ दि.२०.१.१२ अन्वये शासनास सादर केला आहे. सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रू. ६०८.९० कोटी असून कामाप्रित्यर्थ किंमत रू. ५०१.४७ कोटी आहे.

३.० **मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे :** प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रथम सुप्रमाची किंमत रू. ४२९.९७ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ : योजनेस मुळ प्रमा प्राप्त झाल्यानंतर योजनेच्या आराखडयात खुल्या कालव्याऐवजी बंद पाईपने सिंचनाचा पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता लाभक्षेत्रातील हलक्या प्रतीची जमीन विचारात घेऊन निश्चित करण्यात आली. बंद पाईपमुळे बचत झालेल्या पाण्यामधून वाढीव ४८४८ हे. सिंचन क्षेत्रास लाभ देणे शक्य झाले आहे. मुख्यत्वे अपुरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चात रू.१२३.१९ कोटीची म्हणजे एकूण वाढीच्या २९ टक्के वाढ झालेली आहे. जादा अदा कराव्या लागणा-या भाववाढीपोटी रू. ८२.९३ कोटी, निविदा अधिक्यामुळे रू.५.९२ कोटी व दरसुचीतील वाढीमुळे रू. ३४.३४ कोटी वाढ झालेली आहे.

३.२ भुसंपादन व वनजमीनीमुळे झालेली वाढः भुसंपादन व वनजमीनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रू.४.५९ कोटी वाढ झालेली आहे. भुसंपादन व वनजमीनीच्या ४७७ हे. क्षेत्रासाठी मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये रू.३.३१ कोटीची तरतूद होती. प्रत्यक्षात ५१.५२ हे. इतके क्षेत्र प्रकल्पासाठी आवश्यक ठरले. उर्वरित भुसंपादन विचारात घेऊन प्रत्यक्ष भुसंपादन निवाडा झाल्यानंतर अदयावत किमतीपेक्षा सानुग्रह अनुदानासह एकूण रू.७.९० कोटी इतकी तरतूद सु.प्र.मा.मध्ये केली आहे.

३.३ संकल्पनातील बदलामुळे झालेली वाढ : संकल्पनातील बदलामुळे मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रू. १६५.५१ कोटी वाढ झालेली आहे. मुळ प्र.मा.प्रमाणे तीन टप्यात २८३.५० मी. उंच पाणी उचलण्याचे प्रस्तावित होते. माजी आमदार श्री.दादा जाधवराव यांचे दि.१२.०५.१९९७ चे मा.उपमुख्यमंत्री महोदय यांना दिलेल्या निवेदनानुसार ३५६ मी. उंचीवर पाणी नेण्याची योजना करण्यात आली. त्यामुळे पंपगृह क्र. ५ व ६, वितरण कुंड ३ व ४ आणि उर्ध्वगामी नलिका ३.५० किमी. आणि जाधववाडी वितरिकेची वितरण व्यवस्था ही जादा कामे समाविष्ट करण्यात आली. तसेच लाभक्षेत्रातील हलक्या प्रतीच्या जमिनीमध्ये परंपरागत कालवे केल्यास पाण्याचा पाझर जादा होणार असल्याने अपव्यय टाळण्यासाठी खुल्या कालव्याऐवजी बंद पाईप प्रणालीव्दारे वितरण व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारच्या तांत्रिक बदलास महामंडळाने पत्र क्र. मकृखोविम/२९८/ (२५४/९८) पीएलआयएस/ आरडीडी/प्रशा-८/९८ दि.०६.०५.१९९८ नुसार मान्यता दिली आहे. मुळ प्र.मा. मंजूरीप्रमाणे बारामती तालुक्यातील क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी नाझरे धरणामध्ये पाणी सोडून आस्तित्वातील नाझरे कालवा व वितरण व्यवस्थेचे अधुनिकीकरण करून पारंपारिक कालव्याव्दारे सिंचन करणे नियोजित होते. प्रत्यक्षात सन १९९६ नंतर मागील पंधरा वर्षात मुळा मुठा नदीतील पाण्याचा स्त्रोत पुणे व पिंपरी शहरातील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाल्याचे निदर्शनास आले. नाझरे जलाशयातून २७ गावांसाठी

प्रादेशिक पाणी पुरवठा व ओदयोगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. प्रदुषित झालेले पाणी नाझरे धरणात सोडल्यास नाझरे जलाशय प्रदुषित होणार होता. त्यामुळे बारामती तालुक्यातील क्षेत्रासाठी नाझरे धरणाच्या खालील बाजूने बंद पाईप वितरण व्यवस्था नियोजित करण्यात आली आहे. त्यास महामंडळाच्या दि. ०७.०७.२०१० च्या नियामक मंडळाच्या ६५ व्या बैठकीत ठराव क्र. ६५/१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. वरील बदलामुळे प्रकल्पाच्या किमतीमध्ये खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.

पंप हाऊस (स्थापत्य कामे) मधील वाढ –

मुळ प्र.मा. प्रमाणे तीन पंपहाऊस बांधणे प्रस्तावित होते त्याऐवजी सुधारित आराखडयानुसार सहा पंपहाऊस बांधण्यात आले त्यामुळे रू. ०.०७ कोटी वाढ झालेली आहे.

वितरण कुंडामुळे झालेली वाढ -

मुळ प्र.मा. मध्ये तीन वितरण कुंडांची तरतूद होती सविस्तर संकल्पनानुसार चार वितरण कुंड बांधण्यात आले आहेत. यामुळे रू.१.४४ कोटी ची वाढ झाली आहे.

यांत्रिकी व विदयुत कामातील वाढ –

अ) योजनेसाठी बुस्टर प्रणाली व नियंत्रण व माहिती संकलनासाठी स्काडा प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. यामुळे रू.५.३८ कोटी वाढ झालेली आहे.

ब) योजनेसाठी १३२/३३ के.व्ही. मुख्य सबस्टेशन शिंदवणे या मध्यवर्ती ठिकाणी बांधण्यात आले आहे. तसेच प्रत्येक पंप हाऊस साठी ३३/११ के.व्ही. सबस्टेशन उभारण्यात आलेली आहेत. त्याच प्रमाणे मुख्य ग्रीड लाईनपासून शिंदवणे सब स्टेशन पर्यंत अखंडीत विदयुत पुरवठा राहण्याकरिता एच.टी.लाईन टाकण्यात आलेली आहे. यामुळे रू. १३.२० कोटी वाढ झालेली आहे. या करिता मूळ अहवालात तरतूद नव्हती.

ओपन कालव्याऐवजी बंद पाईप वितरण प्रणालीचा वापर

मुळ प्रमा प्रमाणे कालव्यासाठी पारंपारिक पध्दतीचा कालवा प्रस्तावित होता. माजी आमदार श्री.दादा जाधवराव यांनी प्रकल्पामध्ये वाढीव क्षेत्राचा समावेश करण्यासाठी मागणी केल्याने सविस्तर संकल्पनानुसार पारंपारिक पध्दतीचा कालव्या ऐवजी बंद पाईप वितरण प्रणालीचा वापर करण्यात आलेला आहे. शिंदवणे, कुपटेवाडी, माळशिरस, राजेवाडी, वाघापूर, दिवे, जाधववाडी या मुख्य वितरिकांची लांबी ७६.१८२ किमी आहे. त्यास अधिक्य टिपणीव्दारे महामंडळाने मान्यता दिलेली आहे. मुळ प्रमा व अधिक्य टिपणीत यामुळे रू. ५४.५४ कोटी वाढ झालेली आहे.

मुळ प्र.मा. व अधिक्य टिपणीतील मंजूरीप्रमाणे बारामती तालुक्यातील ६००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी नाझरे धरणामध्ये पाणी सोडून आस्तित्वातील नाझरे कालवा व वितरण व्यवस्थेचे अधुनिकीकरण करून पारंपारिक कालव्याव्दारे सिंचन करणे नियोजित होते. प्रत्यक्षात सन १९९६ नंतर मागील पंधरा वर्षात मुळा मुठा नदीतील पाण्याचा स्त्रोत पुणे व पिंपरी शहरातील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाल्याचे निदर्शनास आले. नाझरे जलाशयातून २७ गावांसाठी प्रादेशिक पाणी पुरवठा व ओदयोगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. प्रदुषित झालेले पाणी नाझरे धरणात सोडल्यास नाझरे जलाशय प्रदुषित होणार होता. मा. आमदार श्री. अशोकराव टेकावडे , स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांची नाझरे धरणात मुळा मुठा नदीतील दुषित पाणी सोडण्यास तीव्र विरोध झाल्याने बारामती तालुक्यातील क्षेत्रासाठी नाझरे धरणाच्या खालील बाजूने बंद पाईप वितरण व्यवस्था करण्यात येत आहे. याकरिता नाझरे धरणाच्या खालील बाजूकडून बारामती शाखा, मुर्टी, पळशी व लोणी भापकर या मुख्य वितरिकांची ५०.६५३ किमी ची कामे बंद पाईपलाईनव्दारे करण्यात येत आहेत. यास महामंडळाच्या ६५ (दि.०७.०७.२०१०) व ६८ (दि. २८.०९.२०११) व्या नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यतेचा निर्णय झालेला आहे. तसेच बारामती तातुक्यातील वितरण व्यवस्थेसाठी यामुळे रू. ७१.९७ कोटी वाढ झालेली आहे.

सदर बदलामुळे एकूण रू. १२६.५१ कोटी वाढ झालेली आहे.

वितरण व्यवस्था

मुळ प्रमा प्रमाणे वितरिकांसाठी पारंपारिक पध्दतीचा कालवा प्रस्तावित होता. सविस्तर संकल्पनानुसार त्याऐवजी बंद पाईप वितरण प्रणालीचा वापर करण्यात आलेला आहे. शिंदवणे, कुपटेवाडी, माळशिरस, राजेवाडी, वाघापूर, दिवे, जाधववाडी या लघुवितरिकांची लांबी १७३ किमी आहे. त्यासाठी मुळ प्रमा व अधिक्य टिपणीत यामुळे रू. १४.२२ कोटी वाढ झालेली आहे. बारामती, मुर्टी, पळशी व लोणी भापकर या मुख वितरिकांवरील उप वितरिकांची लांबी ५३ किमी असून त्यासाठी पाईपलाईनचा वापर करण्यात आलेला आहे. बारामती तालुक्यातील वितरण व्यवस्थेसाठी यामुळे रू. १९.२६ कोटी वाढ झालेली आहे. सदर बदलामुळे एकूण रू. ३३.४८ कोटी वाढ झालेली आहे.

बंद पाईप प्रणालीमुळे खुल्या कालव्याचे घटक उदा. मातीकाम, विमोचक, बांधकामे, पुल इ. कामामध्ये रू. १०.९२ कोटीची बचत झालेली आहे.

३.४ इतर कारणे व अनुषंगिक खर्चात वाढः मुळ प्र.मा. मध्ये सविस्तर सर्वेक्षण, संकल्पन, पर्यावरण मान्यता व लाभक्षेत्र विकास या कामाकरिता ढोबळ रू. १.५२ कोटीची तरतूद होती. प्रस्तावित सुप्रमा प्रस्तावामध्ये प्रचलित नियमानुसार या कामासाठी रू. ६७.२४ कोटी तरतूद केली असून रू. ६४.५९ कोटी वाढ झालेली आहे.

सुधारित किमतीनुसार अनुषंगिक खर्चासाठी तरतूदीमुळे मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रू. ७२.०९ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या १७ टक्के इतकी वाढ झालेली आहे.

४. प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ प्रत्यक्ष काम सुरू करण्यास झालेला विलंब : योजनेस माहे डिसेंबर-९६ मध्ये मुळ प्र.मा.प्राप्त झाल्यानंतर विद्युत, यांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी ज्ञानाचा समन्वयाने अभ्यास करून संकल्पन करणे आवश्यक असल्याने या कामासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करून सविस्तर तांत्रिक अंदाजपत्रके तयार करण्यात आली. तसेच पारंपारिक कालव्याऐवजी बंद पाईप मधुन वितरण करण्याचे निश्चित केल्याने सविस्तर सर्वेक्षण व संकल्पन करून अंदाजपत्रके तयार करण्यास कालावधी लागला. तसेच या कालावधीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तीन ऐवजी सहा टप्यात योजना करून अधिक क्षेत्रास पाणी देण्याची मागणी केली. योजनेच्या सुधारित आराखडयास मान्यता झाल्यानंतर योजनेच्या अधिक्य टिपणीस मान्यता प्राप्त करून घेऊन योजनेच्या निविदा कार्यवाहीस सुरवात करण्यात आली निविदा निश्चित झाल्यानंतर माहे मे-२००० मध्ये प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात आली.

४.२ निधीची अनुपलब्धता : महामंडळाने दि.२०.०६.२००२ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे माहे जून २००२ ते मार्च २००४ या कालावधीत निधीअभावी योजनेचे काम बंद ठेवण्यात आले. योजनेच्या एकूण किमतीच्या तुलनेत मागणीपेक्षा वर्षनिहाय प्राप्त निधीतुन काम करावे लागल्याने वेळेत कामे पुर्ण होऊ शकलेली नाहीत.

५. प्रकल्पाची सदयस्थिती :

योजनेच्या टप्पा क्र. १ ते ६ मधील पंपहाऊस, रायझिंग मेन, वितरण कुंड, सर्ज टँक, प्रत्येक पंपहाऊसचे ठिकाणी ३३/११ के.व्ही.सबस्टेशन व शिंदवणे येथे १३२/३३ के.व्ही.केद्र उभारणे ही शिर्ष कामे पुर्ण झालेली आहेत.

योजनेची शिंदवणे, कुपटेवाडी, माळशिरस, राजेवाडी, वाघापूर, दिवे व जाधववाडी या मुख्य वितरिकांची कामे पुर्ण झालेली असून बारामती शाखा व बारामती मुख्य वितरिकेची तसेच दौंड तालुक्यातील यापुर्वी विरोध झालेली कामे प्रगतित आहेत.

योजनेच्या २५४९८ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षमतेपैकी १७९६८ हे. सिंचन क्षेत्रावरील आऊटलेट पर्यंतची कामे झालेली आहेत. उर्वरित ७५३० हे. क्षेत्रावरील कामे प्रगतित आहेत. विमोचकाचे खालील भाग-१ ची कामे झालेली नाहीत. यासाठी सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली असून सु.प्र.मा. प्राप्त झाल्यानंतर ही कामे करण्याचे नियोजन आहे.

विमोचकापर्यंत पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली असून विमोचकापासून लाभधारकांच्या पाणी वापर संस्था स्थापन करून पाणी नियोजन करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात लाभधारक पाझर तलाव भरून देण्याची मागणी करीत आहेत.

योजनेपासून झालेले फायदे

सन २००६-०७ पासून योजना अंशतः कार्यान्वित करण्यात आलेली असून योजनेव्दारे सन २००६-०७ पासून लाभधारकांच्या मागणीनुसार लाभक्षेत्रातील पाझर तलाव व गाव तलाव हे जलस्त्रोत भरून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सन ११-१२ मध्ये या भागात अत्यल्प पाऊस झाल्याने मोठया प्रमाणात पाण्यासाठी मागणी आली. त्यास अनुसरून पुरंदर उपसा सिंचन योजनेव्दारे दि.२३.०७.२०११ ते २०.०३.२०१२ या कालावधीत पाणी सोडण्यात आले असून त्याव्दारे १०९ पाझर तलाव/नाला बंडींग इ. जलस्त्रोत भरून देण्यात आलेले आहेत. याव्दारे जवळपास ३००० हे क्षेत्रास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळालेला आहे. या पाण्यामुळे या भागात गहू, ज्वारी सारखी अन्यधान्य देणारी पीके तसेच ऊस, भाजीपाला, डाळिंब, चिक्कू, सिताफळ, अंजीर ही नगदी पीके घेण्यात आलेली आहेत. यामधून शेतक-यांना आर्थिक लाभ मिळालेला आहे. तसेच मजुरांना रोजगार मिळालेला आहे. जनावरांचा पाण्याचा व चा-याचा प्रश्न मिटण्यास मदत झालेली आहे.

सन २०१२-१३ मध्ये या भागात मोठया प्रमाणात टंचाई परिस्थिती निर्माण झालेली आहे. अदयापही ही परिस्थिती कायम आहे. शासनाचे निर्णयानुसार व मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचे निर्देशाप्रमाणे दि.१७.०४.२०१२ पासून टंचाई अंतर्गत या भागातील जलस्त्रोत भरून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आतापर्यंत १६४ जलस्त्रोत भरून देण्यात आले आहेत. याचा लाभ ३५ गावांना झालेला आहे. दुष्काळी परिस्थितीत योजनेमुळे कोणालाही विस्थापित व्हावे लागलेले नाही. तसेच टँकरची गरज मोठया प्रमाणात कमी झालेली असून जनावरांना पाणी व चारा उपलब्ध होण्यास मदत झालेली आहे. तसेच या पाण्यामुळे या भागातील क्षेत्रास पाझराव्दारे, विहीरींची पाणी पातळी वाढून, काही ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रास पाणी उपलब्ध झाल्याने तसेच काही ठिकाणी पाणी उचलून घेतल्याने सुमारे ५००० हे क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळालेला आहे. तसेच यामुळे मोठया प्रमाणात उत्पन्न व रोजगार मिळालेला आहे.

पुरंदर तालुक्यातील डोंगरी भागातील पाझर तलावासारखे जलस्त्रोत भरल्यामुळे या भागातील अत्यल्प पावसामुळे खोलवर गेलेली भुगर्भातील पाण्याच्या पातळीत सुधारणा झालेली आहे.

योजनेच्या किमतीत वाढ झालेली असली तरी अवर्षण प्रवण, डोंगराळ भागातीत इतर कोठूनही पाण्याची व्यवस्था होऊ न शकणा-या दुर्गम भागास सिंचनाची व्यवस्था होत असल्याने तसेच टंचाई परिस्थितीत पर्याय उपलब्ध झालेला असल्याने योजना फलदायी होत आहे.

शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावानुसार योजनेची एकूण किंमत रू. ६०८.९० कोटी असून प्रति हेक्टरी खर्च रू. २.३९ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर २.६७ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
कवठे-केंजळ उपसा सिंचन योजना, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : कवठे-केंजळ उपसा सिंचन योजना, ता. वाई जिल्हा : सातारा				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	५७८४ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हे.) (पीक क्षेत्र) जुन २०१२ – निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०४/०५/२०००	१९९९-२०००	४१.६६	५७८४
	सुप्रमा-१	१३/०७/२००१	२०००-२००१	८३.०२	५७८४
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)				नाही
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			२७.१४	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ०.००			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = २७.१४			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				२००६-०७
६.१	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				२००६-०७
६.२	प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु. कोटी)				८३.०२
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	२९.८९	२९.८९	०.००	०.००
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१.०१	१.०१	०.००	०.००
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१२.३५	१२.३५	२९.८६
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२१.७३	२१.७३	५२.५४
७.५	इतर कारणे	०.००	२.३८	२.३८	५.७५
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	१०.७६	१५.६६	४.९०	११.८५
	एकूण	**४१.६६**	**८३.०२**	**४१.३६**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : कवठे-केंजळ उपसा सिंचन योजना, ता. वाई, जि. सातारा या योजनेअंतर्गत वाई तालुक्यातील धोम धरण डवा कालवा सा.क्र. १३/१२५ येथून उपसा सिंचनद्वारे ३६.३३ दलघमी. पाणी दोन टप्प्यात उचलून वाई तालुक्यातील २८ गावांमधील ५७८४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

२.० प्रशासकीय मान्यता : कवठे-केंजळ उपसा सिंचन योजना प्रकल्पास रु. ४१.६६ कोटी किमतीस मुळ प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०४/०५/२००० रोजी दिली. त्यानंतर शासनाने रु. ८३.०२ कोटी किमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दि. १३/०७/२००१ रोजी दिली.

२.० किंमत वाढण्याची कारणे : प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेमध्ये प्रथम सुप्रमाची किंमत रु. ४१.३६ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : रुपये १२.३५ कोटी

१) मुळ प्रकल्प अहवालामध्ये वितरण व्यवस्थेकरिता रु. १०,००० प्रति हेक्टर ढोबळ तरतूद केली होती. सुधारित प्रकल्प अहवालानुसार रु.३४१९२ प्रती हेक्टर एवढा खर्च येत आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ११.४७ कोटीची वाढ झाली आहे.

२) इन्टेक व साठवण विहीरी करीता मुळ अहवालामध्ये रु.०.५२ कोटी तरतुद होती सुधारित प्रकल्प अहवालात सविस्तर अंदापत्रकानुसार सर्व घटकांची किंमत रु. ०.९५ कोटी इतकी येते. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ०.४३ कोटीची वाढ झाली आहे.

३) मुळ प्रकल्प अहवालामध्ये पंप हाऊस करिता ढोबळ तरतुद रु. ०.७० कोटी इतकी होती परंतू सुप्रमा मध्ये सविस्तर अंदाजानुसार रु. १.०७ कोटी इतकी तरतुद आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ०.३७ कोटीची वाढ झाली आहे.

ब) सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ : रुपये २१.७३ कोटी

१) उर्ध्वगामी नलिका :- मुळ अंदाजपत्रकात रु.५७८५ प्रति मी. या दराने ढोबळ तरतुद करण्यात आली. म.सं.स. चे मापदंडानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले व त्यानुसार रुपये ३.९५ कोटी वाढ झालेली आहे.

२) मुख्य वितरण नलिका :- मुळ अहवालामध्ये वितरण व्यवस्थेसाठी RCC पाईप गृहीत धरणेत आले होते. सुधारीत प्रकल्प अहवालात पाईपवर येणारा प्रत्यक्ष दाब लक्षात घेऊन PSC पाईपची तरतूद केली आहे. त्यामुळे रुपये १४.१२ कोटी वाढ झालेली आहे.

३) यांत्रिकी भागाचे काम :- मुळ प्रकल्प अहवालात रू. ४.९१ कोटी एवढी तरतुद होती. सुधारित प्रकल्प अहवालात रु. ६.०५ कोटी तरतुद आहे. त्यामुळे रुपये १.१४ कोटी वाढ झालेली आहे.

४) विद्युत भागाचे काम :- मुळ प्रकल्प अहवालात विद्युत भागासाठी ढोबळ मानाने रु. ०.९८ कोटी तरतुद होती. सुधारित प्रकल्प अहवालात सविस्तर संकल्पन केल्यानंतर विद्युत भागाची किंमत रु. ३४९.७५ लक्ष इतकी येत आहे. त्यामुळे रुपये २.५२ कोटी वाढ झालेली आहे.

क) इतर कारणामुळे झालेली वाढ : रुपये ७.२८ कोटी

१) संकल्पन व तांत्रिक सल्ला यासाठी केलेली तरतूद : ०.५३ कोटी

२) निरीक्षण नियंत्रण व माहिती संकल्पन यासाठी केलेली तरतूद : ०.५३ कोटी

३) देखभाल दुरुस्ती यासाठी केलेली तरतूद : १.३२ कोटी

४) ईटीपी चार्जेस मधील वाढीकरीता केलेली तरतूद : ४.९० कोटी

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :- प्रकल्पास पुरेसा निधी न मिळाल्याने प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

कवठे-केंजळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत धोम डावा कालवा सा.क्र. १३/१२५ मी. येथे पंपहाऊसचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. उर्ध्वगामी नलिका (Rising Main) चे काम व मुख्य वितरण कुंडाचे (Main Delivary Chamber) बांधकाम पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्याच्या पंपहाऊसमध्ये ७४० अश्वशक्तीचे ४ पंपांच्या उभारणीचे काम चालू आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (MSEDCL) च्या वाई औद्योगिक वसाहतीमधील सबस्टेशनपासून ३३ के.व्ही. विज पुरवठा करण्यासाठी आवश्यक विद्युत वाहिनीचे काम चालू आहे. स्वीचयार्डचे काम चालू आहे.

वितरण व्यवस्थेच्या कामापैकी वितरण नलिका बीबी-१ च्या एकूण ८.३३ किमी. लांबीपैकी ६ किमी. व सीसी-१ च्या एकूण १२ किमी. लांबीपैकी ४ किमी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे. वितरण नलिका सीसी-२ च्या २८.५० किमी. व वितरण नलिका इइ-१ च्या ४.३५ किमी. लांबीचे वितरण व्यवस्थेचे काम अद्याप बाकी आहे.

टप्पा – २ चे पंपहाऊसचे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही.

चालू वर्षी धोम डावा तीर कालव्याच्या आवर्तन कालावधीमध्ये पाणी उचलून बीबी-१ वितरण नलिकेद्वारे २०० हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याचे प्रस्तावीत आहे.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.८३.०२ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत १.७४ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.५८ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
वसना उपसा सिंचन योजना, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव- वसना उपसा सिंचन योजना	तालुका – कोरेगांव			जिल्हा - सातारा
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५८८० हे.		निर्मित सिंचन क्षमता (हे.) जून -२०१२ – **निरंक**	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	३/०५/२०००	१९९८-९९	३४.८८	३९२०
	सुप्रमा-१	११/०७/२००१	१९९९-२०००	९४.६४	५८८०
	अद्यावत किंमत	प्रस्तावित	२००९-१०	१९१.९८	५८८०
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (रू.कोटी)				नाही
५	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रू. कोटी)				३१.२७
	५.१) भूसंपादन / पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) = ०.००				
	५.२) बांधकामावरील खर्च (रू.कोटी) = ३१.२७				
	५.३) इटीपी खर्च (रू.कोटी) = ०.००				
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				२०००-०१
	६.१) प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष				२००६
	६.२) त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)				९४.६४
७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रू.कोटी)				(रू.कोटी)
		मूळ तरतूद	अद्यावत तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	२८.८३	१२१.९१	९३.०८	५९.२५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.८७	०.९०	०.०३	०.०२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२०.७०	२०.७०	१३.१८
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२१.१६	२१.१६	१३.४७
७.५	इतर कारणामुळे झालेली वाढ	०.००	७.५०	७.५०	४.७७
७.६	इ.टी.पी. मुळे झालेली वाढ	५.१८	१९.८१	१४.६३	९.३१
	एकूण	**३४.८८**	**१९१.९८**	**१५७.१०**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती –

कोरेगाव तालुक्याच्या कायम दुष्काळी क्षेत्रास सिंचनाची सोय करण्यासाठी वसना उपसा योजनेचे नियोजन करण्यात आले आहे. कृष्णा प्रकल्प टप्पा २ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या ६.५७ अ.घ.फू. जलसंपत्तीपैकी या योजनेसाठी धोम डाव्या कालव्यातून ०.९२ अ.घ.फू. पाणी दोन टप्प्यामध्ये उपसा करून १८ गावातील ५८८० हेक्टर पीकक्षेत्रास सिंचन लाभ देण्यात येणार आहे.

२.० प्रशासकीय मान्यता –

योजनेस मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु.३४.८८कोटीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे दि.३/०५/२००० रोजी मान्यता दिलेली असून प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु ९४.६४ कोटीस शासनाने दि. ११/०७/२०००१ रोजी मान्यता दिलेली आहे. सन २००९-१० च्या दरसूचीने योजनेची अद्यावत किंमत रू. १९१.९८ कोटी येत आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे –

३.१ दरसूचीतील वाढ-

मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९८ – ९९ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २००९-२०१० च्या दरसूचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे. या ११ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रू.९३.०८ कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन किंमतीमध्ये झालेली वाढ –

या योजनेसाठी पुनर्वसन व वनजमीन संपादनाची आवश्यकता नाही. मूळ प्रकल्प अहवालामध्ये ८७ हे. एवढे क्षेत्र संपादनासाठी प्रस्तावित होते. सुधारित प्रकल्प अहवालानुसार ४० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. जमीन क्षेत्रामध्ये घट होऊन देखील दरम्यानच्या कालावधीमध्ये जमिनीच्या दरामध्ये वाढ झालेली असल्याने भूसंपादन किंमतीमध्ये रू. ०.०३ कोटी वाढ होत आहे.

३.३ योजनेच्या व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ –

मूळ प्रकल्प अहवालामध्ये धोम डावा कालव्याच्या कि.मी. ४१ मधून पाणी तीन टप्प्यामध्ये अनुक्रमे ७१ मी., ५४मी., व ६७ मी. (एकूण १९२ मी.) उपसा करुन १३ कि.मी. उघडया प्रवाही कालव्याव्दारे कोरेगांव तालुक्याच्या पश्चिम-उत्तर भागातील १२ गावातील ३९२० हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्याचा समावेश होता. तथापि, या योजनेमध्ये उर्वरीत टंचाईग्रस्त गावांचाही समावेश करण्याची मागणी तत्कालीन आमदार श्री. शंकरराव जगताप, डॉ. शालिनीताई पाटील, यांनी शासनाकडे केली होती. या उपसा सिंचन योजनेस ०.९२ अब्ज घन फूटापेक्षा जादा पाणी उपलब्ध नसल्याने उघडया प्रवाही कालव्याऐवजी बंदिस्त नलिकेव्दारे वितरण करुन त्यातून वाचणाऱ्या पाण्यातून जादा क्षेत्राचा समावेश करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पाणी दोन टप्यामध्ये अनुक्रमे ९५ मी. व ९९ मी. (एकूण १९४ मी.) उपसा करून मूळ १२ गावातील ३९२० हेक्टर ऐवजी १८ गावातील ५८८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. योजनेच्या व्याप्तीत वाढ झाल्यामुळे रु. २०.७० कोटी वाढ होत आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-

प्रवाही उघडया कालव्याऐवजी सिंचन विमोचकापर्यंत बंदिस्त नलिकाव्दारे वितरण व्यवस्थेचा समावेश केलेला आहे. सविस्तर संकल्पन मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक, विद्युत विभाग, यांत्रिकी विभाग यांचेकडून प्राप्त करुन त्याप्रमाणे किंमतींचा समावेश केलेला आहे. यामुळे रु. २१.१६ कोटी वाढ झालेली आहे.

४.० इतर कारणामुळे झालेली वाढ –

सुधारित प्रकल्प अहवालात लाभक्षेत्रातील पोटचाऱ्यांची कामे तसेच जलनिःस्सारण कामासाठी नव्याने तरतूद केल्यामुळे रू. ७.५० कोटी वाढ झालेली आहे.

५.० इ.टी.पी.-

मूळ प्रकल्प अहवालात इ.टी.पी.साठी रू. ५.१८ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित अहवालात कामाच्या खर्चाच्या प्रमाणात आस्थापना खर्चात रू. १४.६३ कोटी वाढ झालेली आहे.

५.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

अपुरा निधी- वसना उपसा सिंचन योजनेस सन २००१ ते २००६ या कालावधीत काहीही निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे या योजनेचे काम सुरू होऊ शकले नाही. सन २००७ पासून अपूरा निधी उपलब्ध होत असल्याने काम संथगतीने सुरू आहे.

५ कामाची सद्यःस्थिती –

सद्यःस्थितीत योजनेच्या पहिल्या टप्याचे काम ८५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. पहिल्या टप्प्यातील १९३४ हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी १२०० हेक्टर सिंचन क्षेत्रातील वितरण व्यवस्थेचे काम व यांत्रिकी कामे पूर्ण झालेली असून इलेक्ट्रीक स्वीचयार्ड, उच्चदाब विद्युत वाहिनी उभारणी व उर्वरीत ७३४ हेक्टर सिंचन क्षेत्रातील वितरण व्यवस्थेचे काम निधी अभावी संथगतीने प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.१९१.९८ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ३.२६ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर २.१३ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी

वांगणा उपसा सिंचन योजना, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव- वांगणा उपसा सिंचन योजना	तालुका – कोरेगांव			जिल्हा - सातारा
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५०८२ हे.		निर्मित सिंचन क्षमता (हे.) जून -२०१२ – १४५२	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रू.कोटीं)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२२/१२/१९९९	१९९७-९८	४८.०५	५०८२
	सुप्रमा-१	११/०७/२००१	१९९९-२०००	७९.१९	५०८२
	अद्यावत किंमत	--	२००९-१०	१३९.७६	५०८२
४	केद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (रू.कोटी)				नाही
५	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रू. कोटी)				६०.०९
	५.१) भूसंपादन / पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) = ०.०५				
	५.२) बांधकामावरील खर्च (रू.कोटी) = ६०.०४				
	५.३) इटीपी खर्च (रू.कोटी) = ०.००				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				२००५-०६
	६.१) प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष				२००५
	६.२) त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)				७९.१९
७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रू.कोटी)				
		मूळ तरतूद	अद्यावत तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	३८.०६	८८.८३	४९.७०	५४.१९
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	१.८७	०.८०	०.००	०.००
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१८.०६	१८.०६	१९.६९
७.५	इतर कारणांमुळे झालेली वाढ	०.००	४.६०	४.६०	५.०२
७.६	इ.टी.पी. मुळे झालेली वाढ	८.१२	२७.४७	१९.३५	२१.१०
	एकूण	**४८.०५**	**१३९.७६**	**९१.७१**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती –

कोरेगांव तालुक्याच्या उत्तर भागातील कायम दुष्काळी क्षेत्रास सिंचनाची सोय करण्यासाठी वांगणा उपसा सिंचन योजना राबविण्यात येत आहे. योजनेद्वारे धोम डावा कालवा कि.मी. ५३ येथून (सा.क्र. ५२/२०० कि.मी.) या योजनेंतर्गत एका टप्प्यात ८१.८४ मी. उंचीपर्यंत पाणी उपसा करणे प्रस्तावित आहे. सदर योजनेसाठी १.३४ अ.घ.फू. पाणीवापर करून ५०८२ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

२.० प्रशासकीय मान्यता –

मूळ प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पत्र दिनांक २२/१२/९९ रोजी रू. ४८.०८ कोटी इतक्या किंमतीस प्राप्त झाली आहे.

प्रथम सुधारित प्रकल्प अहवालास शासनाने दि. ११/०७/२००१ अन्वये रू. ७९.१९ कोटी इतक्या किंमतीस मान्यता दिलेली आहे. योजनेची अद्यावत किंमत सन २००९-१० च्या दरसूचीनुसार काढणेत आली असून ती रू. १३९.७६ कोटी इतकी येत आहे.

३. ० किंमत वाढण्याची कारणे –

योजनेची अद्यावत सुधारित किंमत रू. १३९.७६ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रू. ९१.७१ कोटीने वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे-

३.१ दरसूचीतील वाढ-

मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९७ – ९८ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २००९-२०१० च्या दरसूचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे. या १२ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रू.४९.७० कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन किंमतीमध्ये वाढ झालेली नाही

या योजनेसाठी पुनर्वसन व वनजमीन संपादनाची आवश्यकता नाही. मूळ प्रकल्प अहवालामध्ये १३७.५० हे. एवढे क्षेत्र संपादनासाठी प्रस्तावित होते. परंतू उघडया कालव्याऐवजी बंदिस्त नलिकेव्दारे वितरण व्यवस्था प्रस्तावित असल्याने सुधारित प्रकल्प अहवालानुसार ६०.६० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे.

३.३ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ–

अ) मूळ मंजूर प्रस्तावातील उघडया कालव्या ऐवजी सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये बंद नलिकेद्वारे वितरण व्यवस्था प्रस्तावित करण्यात आलेली आहे. यामुळे वाहणा-या पाण्यामुळे लाभक्षेत्राची भौगोलिक मर्यादा लक्षात घेवून जास्तीत जास्त लाभक्षेत्राचा विचार करुन व घन पीक पद्धतीचा अवलंब करुन योजनेची आर्थिक व्यवहार्यता वाढलेली आहे. तसेच पाणी वाटपाची कार्यक्षमता वाढलेली आहे. कालव्याऐवजी बंद पाईपद्वारे वितरण व्यवस्था प्रस्तावित केल्याने योजनेची कार्यक्षमता ४९ टक्के वरुन ७२ टक्के पर्यंत वाढलेली असल्याने मूळ प्रकल्प अहवालातील पीक टक्केवारी १०२ टक्के ऐवजी सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये ही टक्केवारी १२१ टक्के पर्यंत येत आहे.

ब) सुधारित प्रकल्प अहवालामध्ये उर्ध्वनलिका व्यास व जाडी तसेच पंपाची अश्वशक्ती यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांच्याकडून सविस्तर संकल्पनास मूल्यार्पित करून त्यास मा.

मुख्य अभियंता (वि.प्र.), पुणे यांनी दि. १३/१०/२००६ व दि. ४/०४/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

क) सुधारित प्रकल्प अहवालात लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कामासाठी नव्याने तरतूद केलेली आहे. वरील कारणांमुळे एकूण झालेली वाढ रू. १८.०६ कोटी वाढ झालेली आहे.

४.० इतर कारणे, इ.टी.पी.-

अ) सुधारित प्रकल्प अहवालामध्ये योजनेसाठी तांत्रिक सल्ला सेवा, स्कॅडा व देखभाल दुरूस्तीकरीता तरतूद केलेली आहे. त्यामुळे रू. ४.६० कोटी वाढ झालेली आहे.

ब) मूळ प्रकल्प अहवालात रू. ८.१२ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित अहवालात कामाच्या खर्चाच्या प्रमाणात आस्थापना खर्चात रू. १९.३५ कोटी वाढ झालेली आहे.

५.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

अपुरा निधी- वांगणा उपसा सिंचन योजनेस सन २००१ ते २००५ या कालावधीत निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे या योजनेचे काम चालू होऊ शकले नाही. त्यानंतर मागणीपेक्षा खूपच कमी निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे योजनेचे काम संथगतीने चालू आहे.

६.० कामाची सद्यःस्थिती –

योजनेचे पंपगृह, स्विचयार्ड, ३३ के.व्ही. विद्युत पुरवठा करणे, इनटेक व सम्पवेल, पंपिंग मशिनरी, उर्ध्वगामी नलिका इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

वितरण व्यवस्थेमध्ये सहा मुख्य वितरीकांपैकी तीन वितरीका व दोन गुरुत्वनलिकांपैकी एका गुरूत्वनलिकेचे काम पूर्ण झाले आहे. तसेच तीन वितरण हौदांपैकी दोन वितरण हौदांचे काम पूर्ण झाले आहे

७.० योजनेचे प्रत्यक्ष झालेले फायदे –

योजनेच्या मुख्य घटकांची कामे पूर्ण करून कोरेगांव तालुक्यातील एकूण ५०८२ हे. सिंचन क्षेत्रापैकी ४२४ हे. क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. तसेच सन २०११-१२ मध्ये टंचाई काळात पिण्यासाठी पाणी पुरविले आहे

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.१३९.७६ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत २.७५ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.६४ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी

धनगरवाडी उपसा सिंचन योजना, हेळगाव, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : धनगरवाडी उपसा सिंचन योजना	ता.कराड		जि.सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पिक क्षेत्र)	३०२५	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) (पीक क्षेत्र) : **जून-२०१२ – निरंक हे.**		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१५/०५/२०००	१९९९-२०००	१६.२७	३०२५
	सुप्रमा-१	१३/०७/२००१	१९९९-२०००	३३.०८	३०२५
	सुप्रमा-२	१६/०३/२०१२	२०१०-२०११	८७.१०	३०२५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Invesment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)		नाही		
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			०.०००७	
	५.१	भू-संपादन,पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	= ०.००		
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	= ०.००		
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी)	=०.०००७		
६.०	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९९.२०००	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		योजनेचे कामास सुरुवात झालेली नाही		
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)				
७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
		मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढीची रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामांच्या घटकांची किंमत)	१३.५३	३६.९८	२३.४५	३३.१०
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.२९	०.८५	०.५६	०.७९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३४.२१	३४.२१	४८.३१
७.५	इतर कारण	०.००	५.२९	५.२९	७.४७
७.६	इ.टी.पी.मुळे झालेली वाढ	२.४५	९.७७	७.३२	१०.३३
	एकूण	**१६.२७**	**८७.१०**	**७०.८३**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : धनगरवाडी उपसा सिंचन योजना कण्हेर धरणाच्या आरफळ कालव्याच्या कि.मी.५९ मधून नियोजीत असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३०२५ हे. आहे. सदर योजनेसाठी कृष्णा प्रकल्प टप्पा क्र.२ अंतर्गत ०.७९ टी.एम.सी. पाणी वापर मंजूर आहे. या योजनेअंतर्गत आरफळ कालव्यामधून टप्पा-१ मध्ये ७९.६० मी. व टप्पा-२ मध्य ४५.१३ मी. उंचीवर पाणी उचलून ९३ कि.मी. पी.एस.सी.पाईप वितरण व्यवस्था करुन ३०२५ हे.क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजनात आहे.अपु-या निधीमुळे सद्यस्थितीत योजनेचे कोणतेही काम सुरु नाही.

२.० प्रशासकीय मान्यता :- धनगरवाडी उपसा सिंचन योजनेच्या रु. १६.२७ कोटी किंमतीस दरसूची १९९९-२००० नुसार मूळ प्रशासकीय मान्यता म.कृ.खो.वि.मं. ने दि. १५/०५/२००० रोजी दिली त्यानंतर शासनाने रु. ३३.०८ कोटी किंमतीस दरसूची १९९९-२००० नुसार प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.१३/०७/२००१ रोजी दिली. त्यानंतर द्वितीय प्रशासकीय मान्यता शासनाने दि. १६/०३/२०१२ रोजी दरसूची २०१०-११ नुसार रु. ८७.१० कोटी किंमतीस दिली आहे.

३.० किंमत वाढणेची कारणे :- प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. ७०.८३ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :- सन २०००-२००१ ते २०११-१२ या कालावधीत दरसूची बदलामुळे झालेली वाढ विचारात घेता रु. २३.४५ कोटी इतकी (३३.१०%) वाढ झालेली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढ :- भूसंपादन खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत ०.५६ कोटी म्हणजेच एकूण वाढीच्या ०.७९ टक्के वाढ झाली आहे. मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये १६.०१ हे. जमीन सरासरी रु.०.२० लक्ष प्रती हे. दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.२९ कोटीची तरतूद होती. सु.प्र.मा. अहवालामध्ये १६.०१ हे. क्षेत्र सरासरी रु. ०.८० लक्ष प्रति हे. दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु. ०.८५ कोटी आहे. त्यामुळे रु. ०.५६ कोटी इतकी वाढ होत असून ती एकूण वाढीच्या ०.७९ टक्के इतकी आहे.

३.३ संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :- मूळ प्रकल्प अहवालामध्ये वितरण व्यवस्थेसाठी उघडया कालव्याची तरतूद होती. परंतू भूसंपादन, व इतर कारणामुळे म.कृ.खो.वि.मं. चे पत्र क्र. २११/(४४९/२०११) /मोप्र-५/ ६१२६ दि. ०१/०८/२०११ नुसार वितरण व्यवस्थेसाठी पी.एस.सी. पाईपची तरतूद केलेली आहे. या बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. ३४.२१ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या ४८.३१ टक्के इतकी आहे.

३.४ आस्थापना व इतर कारणे :- मूळ अहवालामध्ये आस्थापना व इतर कारणासाठी रु. २.४५ कोटी इतकी तरतूद होती. सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये रु. १५.०६ कोटी इतकी तरतूद केल्याने रु. १२.६१ कोटीची वाढ झाली असून ती एकूण वाढीच्या १७.८० टक्के इतकी आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :- प्रकल्पास सुरुवातीपासून आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने प्रकल्पाचे काम हाती घेता आले नाही.सबब प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

५.० अपु-या निधीमुळे झालेला विलंब :- प्रकल्पास सन २००० मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली मात्र सन २००९-१० पर्यंत आवश्यक निधी उपलब्ध झाला नाही. पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने योजनेचे काम सुरु करता आले नाही.

६.० प्रकल्पाची सद्यस्थिती :- सदर प्रकल्पाचे कोणतेही काम अद्याप सुरु नाही,निविदा प्रक्रिया सुरु आहे.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु. ८७.१० कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत २.८८ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.५८ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
हणबरवाडी उपसा सिंचन योजना, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : **हणबरवाडी उपसा सिंचन याजना**			ता.कराड	जि.सातारा
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पिक क्षेत्र)	३१४६	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) (पीक क्षेत्र) : जून-२०१२ – निरंक हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१५/०५/२०००	१९९९-२०००	१६.९६	३१४६
	सुप्रमा-१	१३/०७/२००१	१९९९-२०००	३९.३७	३१४६
	सुप्रमा-२	१६/०३/२०१२	२०१०-२०११	१०१.४०	३१४६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Invesment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)				०.०००७
	५.१	भू-संपादन,पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		= ०.००	
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		= ०.००	
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी)		= ०.०००७	
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९९-२०००
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			योजनेचे कामास सुरुवात झालेली नाही	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
		मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढीची रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	१४.३०	४०.१२	२५.८२	३०.५८
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.३७	२.०४	१.६७	१.९८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४०.६२	४०.६२	४८.११
७.५	इतर कारणे	०.००	६.७१	६.७१	७.९४
७.६	इ.टी.पी.मुळे झालेली वाढ	२.२९	११.९१	९.६२	११.३९
	एकूण	**१६.९६**	**१०१.४०**	**८४.४४**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : हणबरवाडी उपसा सिंचन योजना कण्हेर धरणाच्या आरफळ कालव्याच्या कि .मी. ७२ मधून नियोजीत असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३१४६ हे. आहे. सदर योजनेसाठी कृष्णा प्रकल्प टप्पा क्र.२ अंतर्गत ०.८२ टी.एम.सी. पाणी वापर मंजूर आहे. या योजनेअंतर्गत आरफळ कालव्यामधून १०२.२२ मी.उंचीवर पाणी उचलून ११५ कि.मी. पी.एस.सी.पाईप वितरण व्यवस्था करुन ३१४६ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजनात आहे.अपु-या निधीमुळे सद्यस्थितीत योजनेचे कोणतेही काम सुरु नाही.

२.० प्रशासकीय मान्यता :- हणबरवाडी उपसा सिंचन योजनेच्या रु. १६.९६ कोटी किंमतीस दरसूची १९९९-२००० नुसार मूळ प्रशासकीय मान्यता म.कृ.खो.वि.मं. ने दि. १५/०५/२००० रोजी दिली त्यानंतर शासनाने रु. ३९.३७ कोटी किंमतीस दरसूची १९९९-२००० नुसार प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दि. १३/०७/२००१ रोजी दिली. त्यानंतर द्वितीय प्रशासकीय मान्यता शासनाने दि. १६/०३/२०१२ रोजी दरसूची २०१०-११ नुसार रु. १०१.४० कोटी किंमतीस दिली आहे.

३.० किंमत वाढणेची कारणे :- प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. ८४.४४ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :- सन २०००-२००१ ते २०११-१२ या कालावधीत दरसूची बदलामुळे झालेली वाढ विचारात घेता रु. २५.८२ कोटी इतकी (३०.५८%) वाढ झालेली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढ :- भूसंपादन खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १.६७ कोटी म्हणजेच एकूण वाढीच्या १.९८ टक्के वाढ झाली आहे. मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये २५.६० हे. जमीन सरासरी रु.०.२० लक्ष प्रती हे. दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.३८ कोटीची तरतूद होती. सु.प्र.मा. अहवालामध्ये २५.६० हे. क्षेत्र सरासरी रु. ०.८० लक्ष प्रति हे. दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु. २.०४ कोटी आहे. त्यामुळे रु. १.६७ कोटी इतकी वाढ होत असून ती एकूण वाढीच्या १.९८ टक्के इतकी आहे.

३.३ संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :- मूळ प्रकल्प अहवालामध्ये वितरण व्यवस्थेसाठी उघडया कालव्याची तरतूद होती. परंतू भूसंपादन, व इतर कारणामुळे म.कृ.खो.वि.मं. चे पत्र क्र. २११/(४४९/२०११) /मोप्र-५/६१२६ दि. ०१/०८/२०११ नुसार वितरण व्यवस्थेसाठी पी.एस.सी. पाईपची तरतूद केलेली आहे. या बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. ४०.६२ कोटी इतकी असून ती एकूण वाढीच्या ४८.११ टक्के इतकी आहे.

३.४ आस्थापना व इतर कारणे :- मूळ अहवालामध्ये आस्थापना व इतर कारणासाठी रु. २.२९ कोटी इतकी तरतूद होती. सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये रु. १८.६२ कोटी इतकी तरतूद केल्याने रु. १६.३३. कोटीची वाढ झाली असून ती एकूण वाढीच्या १९.३३ टक्के इतकी आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :- प्रकल्पास सुरवातीपासून आवश्यक निधी प्राप्त न झालेने प्रकल्पाचे काम हाती घेता आले नाही. सबब प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

५.० अपु-या निधीमुळे झालेला विलंब :- प्रकल्पास सन २००० मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली, मात्र सन २०११-१२ पर्यंत आवश्यक निधी उपलब्ध झाला नाही. पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने योजनेचे काम सुरु करता आले नाही.

६.० प्रकल्पाची सद्यःस्थिती : सदर प्रकल्पाचे कोणतेही काम अद्याप सुरु नाही,निविदा प्रक्रिया सुरु आहे.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.१०१.४० कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ३.२२ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.५३ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
जिहे कठापूर उपसा सिंचन योजना, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव : जिहे कठापूर उपसा सिंचन प्रकल्प	ता. कोरेगाव	जि.-सातारा		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता/पीक क्षेत्र (हेक्टर)	२७५०० हे.	निर्मित सिंचन क्षमता/पीक क्षेत्र (हेक्टर) जून २०१२ निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	३.१) मुळ प्रशासकीय मान्यता	११/०२/१९९७	१९९५-९६	२६९.०७	२३९००
	३.२) सुधारीत प्रशासकीय मान्यता	प्रस्तावित	२०१०-११	९८०.०७	२७५००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)			नाही	
५	५.१) दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकुण खर्च (रु.कोटी)			१७४.१९	
	५.२) भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)= ६.२३				
	५.३) बांधकामावरील खर्च (रु.कोटी) =१४४.४८				
	५.४) इटीपी खर्च (रु.कोटी) =२३.४८				
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९७-९८	
	६.१) प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९७-९८	
	६.२) प्रकल्पाची त्यावेळची किंमत (रु. कोटी)			२६९.०७	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	२१०.४४	४१४.६४	२०४.१८	२८.७२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन मुळे खर्चातील वाढ	०.७४	१२.५५	११.८०	१.६६
७.३	व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१५३.७२	१५३.७०	२१.६२
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२१३.४८	२१३.४६	३०.०२
७.५	इतर कारणे	५७.८९	१८५.६८	१२७.८६	१७.९८
		२६९.०७	**९८०.०७**	**७११.००**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :

सातारा जिल्ह्यातील खटाव व माण या अवर्षण प्रवण भागात शेती व पिकासाठी पाणी देण्यासाठी जिहे कठापूर उपसा सिंचन प्रकल्पास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने सन १९९७ साली मान्यता दिली. सदर प्रकल्पामधुन कृष्णा नदीतुन ३.१७ अ.घ.फु. पाणी उचलुन दुष्काळग्रस्त खटाव तालुक्यातील ११७०० व माण या तालुक्यातील १५००० असे एकुण २७५०० हे. क्षेत्र सिंचनाखाली आणणे नियोजित आहे. प्रकल्पाचे काम अपुऱ्या अनुदानामुळे संथगतीने चालु आहे. प्रकल्पामध्ये कृष्णा नदीवरील बॅरेज, टप्पा क्र. १, २ व ३ मधील पंपगृहे, २ उर्ध्वगामी नलिका रांगा, वर्धनगड बोगदा ४.०९५ कि.मी., आंधळी बोगदा १३.७७ कि.मी., नेर उपसा, येरळा नदीवरील १५ को.प. बंधारे व माण नदीवरील १७ को.प. बंधा-यांचा समावेश आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे बॅरेज, पंपगृह क्र. २ व ३, उर्ध्वगामी नलिका व बोगद्यांची कामे प्रगतीपथावर असुन माण व येरळा नदीवरील ३० को.प. बंधा-यांची कामे पुर्ण झाली आहेत.

२.० प्रशासकीय मान्यताः

जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेस रु.२६९.०७ कोटी किमंतीच्या प्रस्तावास कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी त्यांचे दि.११/०२/१९९७ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेचा रु.९८०.०७ कोटी किंमतीचा सन २००९-१० च्या दरसुचीवर आधारीत सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रकल्प अहवाल तयार करुन महामंडळाने दि.२१/०६/२०११ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास मंजूरीसाठी सादर करणेत आला आहे. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये १७४.१९ कोटी खर्च झाला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे :

प्रकल्पाच्या मुळ रु.२६९.०७ कोटी किमंतीच्या प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रथम सुप्रमाची किंमत रु.९८०.०७ इतकी आहे. प्रकल्पाच्या किमंतीमध्ये रु.७११ कोटी इतकी वाढ झाली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

अपूऱ्या निधीच्या तरतुदीमुळे प्रकल्प पुर्णत्वाच्या कालावधीत वाढ झाली आहे. या कालावधीत दरसूचीमध्ये वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये २०४.१८ कोटीची म्हणजे एकूण वाढीच्या २८.७२ टक्के इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन जमिनीमुळे झालेली वाढ :

मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ४६८ हे. भूसंपादनासाठी रु. ०.१६ लाख प्रति हेक्टरी दराने रु.०.७४ कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. मुळ अहवालामध्ये ५ टप्पे व मोठ्या प्रमाणात उघडे कालवे असल्याने भुसंपादन क्षेत्र जास्त होते. सुधारीत अहवालामध्ये ३ टप्पे करुन उघडया कालव्या ऐवजी बंद नलिका व बोगद्याची तरतुद केल्यामुळे भुसंपादन क्षेत्र कमी झाले. सुधारीत अहवालामध्ये योजनेच्या विविध कामासाठी सुमारे २३५ हे. क्षेत्राचे संपादन आवश्यक असुन त्यासाठी रु. ५.३४ लाख प्रति हेक्टरी दराने रु.१२.५५ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. सुधारीत अहवालामध्ये भूसंपादन क्षेत्र कमी होवूनही वाढीव प्रचलीत दरामुळे भूसंपादनापोटी रु.११.८० कोटी इतकी वाढ झाली असुन ती एकुण वाढीच्या १.६६ टक्के इतकी आहे.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :

अ) मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये कृष्णा नदीवर ०.०३१ अ.घ.फु. क्षमतेचा को.प.बंधारा बांधणे प्रस्तावित होते. सदर पाणीसाठा हा उपसासाठी एकच दिवस पुरेल एवढा होता. जिहे कठापूर उपसा सिंचन प्रकल्प दुष्काळी भागातील प्रकल्प असल्याने व भविष्यात अे.आय.बी.पी.च्या अनुदानासाठी प्रस्तावित

करणेसाठी केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ७५ टक्के विश्वासार्हता होणेसाठी को.प.बंधाऱ्याऐवजी ०.३५ अ.घ.फु. क्षमतेचा बॅरेज प्रस्तावित करणेत आला. त्यास शासनाने दि.२६/०५/२०११ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.११६.३७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

ब) मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये प्रकल्पाची सिंचन क्षमता २३९०० हे. इतकी होती. धोमबलकवडी प्रकल्पा अंतर्गत असणा-या उजवा कालव्याच्या किलोमीटर ११० पुढील माण तालुक्यातील भाग हा डोंगराळ असल्याने आर्थिक दृष्ट्या कालव्यातुन पाणी नेणे व्यवहार्य ठरत नव्हते. त्यामुळे धोम बलकवडी प्रकल्पाचे ०.५३ टीएमसी पाण्याचा अंतर्भाव जिहे कठापूर प्रकल्पांतर्गत करण्याच्या प्रस्तावास कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि.१९/०५/१९९७ च्या पत्रान्वये मान्यता दिली. या पाण्याच्या वापराकरिता धोमबलकवडी प्रकल्पामधील १५ गांवातील ३६००हे. क्षेत्राचा समावेश जिहे कठापूर उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत करण्यात आला. अशा प्रकारे सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची सिंचन क्षमता २७५०० हे. इतकी आहे.

मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये १२ को.प.बंधारे बांधणेचे प्रस्तावित होते. महाराष्ट्र शासनाच्या महसुल व वन विभागाच्या दि.२३/०९/२००५ च्या शासन निर्णयानुसार टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत देणेत आलेल्या रु.१० कोटी अनुदानातुन जादा १३ नवीन को.प.बंधाऱ्याची कामे करण्यात आली. तसेच तत्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधी मा.श्री.भाऊसाहेब गुदगे, श्री.डॉ.दिलीप येळगांवकर, श्री.तुपे, श्री.सदाशिवराव पोळ या माजी आमदारांनी येरळा व माण नदीवर को.प.बंधाऱ्यांची कामे घेणेसाठी वारंवार आग्रही मागणी केली होती. त्या अनुषंगाने नियामक मंडळाच्या दि.२४/०७/२००९ च्या ६० वी बैठकीमध्ये जादा ७ को.प.बंधाऱ्यांना मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे सुधारीत अहवालामध्ये एकुण ३२ को.प.बंधाऱ्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नविन २० को.प.बंधाऱ्याचा समावेशामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.३७.३३ कोटी इतकी वाढ झाली.

अशाप्रकारे व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.१५३.७० कोटी इतकी वाढ झाली असुन ती एकुण वाढीच्या २१.६२ टक्के इतकी आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढः

अ) पंपगृहे : मूळ मान्यता प्राप्त अहवालामध्ये ५ पंपगृहामध्ये एकुण १०२ पंपाची तरतुद होती. त्यांची एकुण अश्वशक्ती ८८४५० इतकी होती. तथापि सदर पंपावरील भविष्यातील देखभाल दुरुस्ती खर्च कमी करणे तसेच मुळ योजनेप्रमाने १०२ पंप चालविणे जिकीरीचे असल्यामुळे योजनेच्या सुधारीत आराखड्यानुसार ३ पंपगृहांमध्ये १८ पंपाची तरतुद करण्यात आली आहे. सदर बदलास कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि.३०/०७/१९९९ च्या पत्रान्वये मान्यता दिली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ०.१९ कोटी इतकी वाढ झाली.

ब) उर्ध्वगामी नलिका : मूळ मान्यता प्राप्त अहवालामध्ये ५ टप्पे प्रस्तावित केले होते. त्यातील उर्ध्वगामी नलिकेची एकुण लांबी ५.१७२ कि.मी. व कालव्याची लांबी ४५.३६५ कि.मी. तरतुद होती. मूळ प्रकल्प अहवालानुसार टप्पा क्र. १, २ व ५ मध्ये ४ रांगाची, व टप्पा क्र. ३ व ४ मध्ये ५ रांगाची तरतुद होती. सदर तरतुदी प्रकल्प अहवालातील ढोबळ संकल्पनावर आधारीत होत्या. लोकप्रतिनिधी मा.दिलीप येळगांवकर यांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांना सन १९९७ साली नेर धरणात थेट पाणी सोडण्याची मागणी केली. त्यामुळे योजनेमध्ये ५ टप्प्याऐवजी ३ टप्पे प्रस्तवित करण्यात आले. ३ टप्प्यातील उर्ध्वगामी नलिकेची लांबी १७.११ कि.मी. असून १८०० मिमि. व्यासाच्या दोन रांगाची प्रस्तावित आहेत. सदर बदलास कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि.३०/०७/१९९९ च्या पत्रान्वये मान्यता दिली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. १२९.३५ कोटी इतकी वाढ झाली.

क) बोगदे : मूळ प्रकल्प अहवालामध्ये वर्धनगड बोगद्यातून कालव्याव्दारे नेर धरणापर्यंत २३.४९ कि.मी. लांब कालवा व नेर धरणापासून आंधळी धरणापर्यंत ५९ कि.मी. लांब कालवा असे एकूण ८७.६५ कि.मी. लांबीच्या कालव्याची तरतूद होती. सुधारीत अहवालामध्ये कालव्यातुन होणारी वहनतुट, भूसंपादन क्षेत्र, वनजमिन संपादन व भविष्यातील देखभाल दुरुस्ती खर्च कमी करण्यासाठी सुधारीत अहवालामध्ये उघडा कालवा रद्द करुन वर्धनगड बोगदयातून नेर धरणात थेट पाणी सोडण्याचे नियोजन केले. त्यानुसार वर्धनगड बोगदा ४.०९५ कि.मी. तसेच नेर धरणातून आंधळी धरणात थेट पाणी सोडण्याचे नियोजन केल्याने आंधळी

बोगदा १३.७७ कि.मी. प्रस्तावित केला आहे. त्यामुळे उपसा उंची कमी होवून अश्वशक्ती व पंपांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे भविष्यातील विज खर्चात बचत होवून शेतकऱ्यांना कायमस्वरुपी फायदा मिळणार आहे. सदर बदलास कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि.३०.०७.१९९९ च्या पत्रान्वये मान्यता दिली. तसेच बोगद्यांच्या संरेशेस मुख्य अभियंता (विप्र) यांनी दि.०५/०२/२००१ व १४/०८/२००१ च्या पत्रान्वये मंजूरी दिली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ५६.६३ कोटी इतकी वाढ झाली.

वर्धनगड व आंधळी बोगद्याचा काटछेद लहान आकाराचा ठेवल्यामुळे अत्याधुनिक मशिनरीने काम करणे अवघड होते. त्यामुळे यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने खोदाई करण्यासाठी काटछेद सुधारीत करण्यात आला. त्यामुळे भविष्यात बोगद्याची देखभाल दुरुस्ती करणे सोइचे होणार आहे. सदर बदलास मा. मुख्य अभियंता (वि.प्र.) पुणे यांनी त्यांचे दिनांक १४.०८.२००१ च्या पत्रानुसार मान्यता दिली आहे. या बोगद्याचा काटछेदामध्ये सुधारणा केल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ९.७५ कोटी इतकी वाढ झाली.

ड) नेर उपसा सिंचन योजना : सुधारित नियोजनानुसार वर्धनगड बोगद्यातून नेर धरणात पाणी येणार असल्यामुळे नेर तलावाच्या वरील मुळ अहवालातील ३८०० हे. क्षेत्रासाठी नेर उपसा सिंचन योजना प्रस्तावित केली आहे. सदर प्रस्तावास कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि.३.५.२००१ च्या पत्रान्वये तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. १७.५४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

अशाप्रकारे सविस्तर संकल्पचित्रामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.२१३.४६ कोटी इतकी वाढ झाली असुन ती एकुण वाढीच्या ३०.०२ टक्के इतकी आहे.

३.५ इतर कारणे :

सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये आवश्यकतेनुसार पंपगृह.उर्ध्वगामी नलिका, विद्युत व यांत्रिकी कामामध्ये कार्यव्ययी आस्थापना व किरकोळ खर्चासाठी रु. ८.९२ कोटी तरतूद केली आहे. तसेच योजनेचे सुधारीत आराखडयानुसार संकल्पने तयार करुन घेणेसाठी रु. १.८७ कोटी तरतुद केली आहे. धोम बलकवडी धरणातून ०.५३ अ.घ.फू. पाण्याचा विनियोग या योजनेव्दारे होणार असल्यामूळे ०.५३ अ.घ.फू. पाणीसाठा करणेसाठीचा खर्च धोम बलकवडी योजनेतून वगळून या योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यासाठी रु. ४९.७३ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. मुळ प्रकल्प अहवालात या तरतुदी नव्हत्या. मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालातील समाविष्ठ तरतूदीपेक्षा सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरण, वनजमीन तसेच केंद्रिय जलआयोगाच्या निर्देशानुसार टयूबवेल, वॉटर लेव्हल इंटीकेटरची तरतूद केली असल्याने रु.४.६८ कोटी इतकी वाढ झालेली आहे. सुधारीत अहवालानुसार देखभालीच्या खर्चात रु.६.३२ कोटी इतकी वाढ झालेली आहे. मूळ अहवालामध्ये दळण-वळणसाठी ढोबळ मानाने तरतुद करण्यात आली होती. सुधारीत अहवालात आवश्यकतेनुसार रस्त्यांची तरतुद करण्यात आली आहे त्यामुळे रु.६.१९ कोटी इतकी खर्चात वाढ झालेली आहे. प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाल्याने त्याप्रमाणात अनुषंगिक खर्चात (ई.टी.पी.) वाढ झाली असून सदर तरतूद शासनाच्या प्रचलित नियमानुसार केली आहे. त्यामूळे खर्चात रु.५२.४८ कोटी वाढीची तरतुद केली. तसेच इमारती, हत्यारे व संयंत्रे यासाठीच्या तरतुदीमध्ये २.३३ कोटी एवढी बचत झाली आहे.

अशाप्रकारे इतर बदलामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.१२७.८६ कोटी इतकी वाढ झाली असुन ती एकुण वाढीच्या १७.९८ टक्के इतकी आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणेः

प्रकल्पास सन १९९७ मध्ये मुळ प्र.मा. मिळाली. मात्र सन १९९७-९८ ते सन २००७-०८ या कालावधीमध्ये अत्यल्प निधी उपलब्ध झाला. त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला. मात्र मागणीनुसार पुरेसा निधी उपलब्ध झाला नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता येवू शकली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

५.१ बॅरेज : कृष्णा नदीवरील कठापूर गावाजवळील बॅरेजचे काम मार्च-२०१२ मध्ये सुरु करण्यात आले असुन १५% काम पुर्ण झाले आहे.

५.२ पंपगृहे : पंपगृह क्र. १ चे को.प. बंधा-याऐवजी बॅरेज प्रस्तावित केल्याने सुधारीत संकल्पन अंतिम न झाल्यामुळे अद्याप काम सुरु नाही. पंपगृह क्र. २ चे खोदकाम पूर्ण होवून संधानकाचे काम प्रगतीमध्ये असुन

२५% काम पुर्ण झाले आहे. पंपगृह क्र. ३ चे खोदकाम पूर्ण होवून संधानक कामास नुकतीच सुरुवात झाली आहे.

५.३ उर्ध्वगामी नलिका : उर्ध्वगामी नलिका टप्पा १ हा ४.५ किमी. असुन १ कि.मी. खोदकाम पूर्ण होवून ०.६ कि.मी. पाईप अंथरणे पुर्ण झाले आहे. उर्ध्वगामी नलिका टप्पा २ हा ६.७ किमी. असुन ३ कि.मी. खोदकाम पूर्ण होवून पाईप अंथरणे काम प्रगतिपथावर आहे. उर्ध्वगामी नलिका टप्पा ३ हा ५.९१ किमी. असुन ९० टक्के खोदकाम पूर्ण होवून काम प्रगतिपथावर आहे.

५.४ बोगदे : वर्धनगड बोगद्याच्या ४.०९५ किमी लांबीपैकी ३.८० किमी (९३%) खोदकाम अस्तरीकरणासह पुर्ण. झाले आहे. आंधळी बोगद्याच्या १३.७७ किमी लांबी पैकी ७.५० किमी (५५%) खोदकाम पूर्ण झाले आहे.

५.५ को.प.बंधारे : येरळा नदीवरील एकुण १५ पैकी १५ को.प.बंधा-यांचे काम भौतिकदृष्टया पुर्ण झाले आहे. तसेच माण नदीवरील एकुण १७ पैकी १५ को.प.बंधा-यांचे कामे पूर्ण होवून उर्वरित २ को.प.बंधा-यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.९८०.०७ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ३.५६ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर २.२४ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
सीना माढा उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव : सीना माढा उपसा सिंचन योजना	तालुका : माढा		जिल्हा : सोलापूर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)(पीकक्षेत्र) :-	२४५५०	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हे.): १०३७१ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१७/०५/१९९४	१९९२-९३	५४.४९	१९४५६
	सुप्रमा-१	२३/०९/२०११	२००७-०८	३००.०४	२४५५०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु. कोटी)			नाही.	
५.	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			२३१.३९	
	५.१	भू-संपादन , पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	= ६.७०		
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	= १७२.०५		
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी)	= ५२.६४		
६.	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९९५-९६	
६.१	प्रकल्पाचे काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९९५	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किमंत (रुपये कोटी)			६५.४०	
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारण (रुपये कोटी)				
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतुद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटंकाची किंमत)	४३.१९	१३६.९२	९३.७३	३८.१८
७.२	भूसंपादन खर्चातील वाढ	०.६०	९.१७	८.५७	३.४९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	८५.९५	८५.९५	३५.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३.००	३.००	१.२२
७.५	ई. टी. पी. व इतर कारणे	१०.७०	६५.००	५४.३०	२२.११
	एकूण	**५४.४९**	**३००.०४**	**२४५.५५**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :-

सीना माढा उपसा योजने अंतर्गत माढा तालुक्यातील फुटजवळगाव येथून उजनी धरणाच्या जलाशयातून ४.७३ अ.घ.फु. पाणी प्रत्येकी १५०० एच.पी. च्या ९ पंपाद्वारे एक टप्प्यात ५१ मीटर उंचावर उपसा करून त्याद्वारे माढा तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील २४५५० हे. पीकक्षेत्र आठमाही सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

२.० प्रशासकीय मान्यता :- सीना माढा उपसा सिंचन योजनेस दि. १७/५/१९९४ रोजी शासनाने रू. ५४.४९ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि. २३/०९/२०११ रोजी रूपये ३००.०४ कोटी रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे – प्रकल्पाची सुधारीत किंमत रू. ३००.०४ कोटी इतकी आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रू २४५.५५ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसुचीतील वाढ :- मुळ प्रशासकीय मान्यता सन १९९२-९३ च्या दरसुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २००७-०८ च्या दरसुचीप्रमाणे काढण्यात आली आहे. या १५ वर्षातील दरसुची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रू. ९३.७३ कोटी आहे.

३.२ भूसंपादना मुळे झालेली वाढ :- मुळ अहवालामध्ये ४१४ हे. जमीन सरासरी रू. १४००० /- प्रती हे. दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रू. ०.६० कोटीची तरतुद होती. सुप्रमा अहवालामध्ये १०१६ हे. क्षेत्र सरासरी रू. ९००००/- प्रती हे. दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रू. ९.१७ कोटी आहे. त्यामुळे रू. ८.५७ कोटी इतकी वाढ होत आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

मुळ मान्यतेनुसार माढा तालुक्यातील १९४५६ हे. पीकक्षेत्रास सिंचन करणे अंतर्भुत होते. यासाठी प्रतीवर्षी ३.७५ अ.घ.फु. पाणी वापर होणार होता. प्रकल्पाचे मुळ मंजुरीनुसार उजनी जलाशयातून पाणी उपसा करून निमगाव तलावात सोडणे व तलावातून कालवा काढून प्रवाही पध्दतीने सिंचन करण्याचे नियोजन होते. त्यानंतर खालीलप्रमाणे व्याप्तीमध्ये बदल झाले.

सीना माढा उपसा योजनेद्वारे जादा ०.७५ टी.एम.सी. पाणी वापरून अतिरिक्त ३८०० पीक क्षेत्र (२५०० हे. आय.सी.ए.) निर्मीत करण्यास शासनाने ६ ऑक्टोबर १९९५ रोजी मंजुरी दिली. त्यामध्ये कालव्याची संरेखा बदलण्यास मान्यता दिली. त्यामुळे उपसा योजनेची उंची ३ मीटरने वाढली आणि मुख्य कालव्याची लांबी १६ कि.मी. ऐवजी २२ कि.मी. झाली. तसेच उजनी जलाशयामधील अकार्यान्वित खाजगी उपसा क्षेत्र रद्द करून त्याऐवजी निमगाव, बादलेवाडी परिसरातील ८५० हे. क्षेत्र या योजनेत समावेश करण्याची मागणी माढा तालुक्याचे मा. आमदार श्री. बबनदादा शिंदे यांनी केलेली होती. त्यास महामंडळाने दि. २३/४/१९९९ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुळे या योजनेच्या सिंचन क्षेत्रात १२९४ हे. पीकक्षेत्र (८५० हे. आय.सी.ए.) व पाणी वापरात ०.२३ टी.एम.सी. इतकी वाढ झालेली आहे.

वरील दोन कारणामुळे झालेल्या व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात एकूण ५०९४ हेक्टर इतकी वाढ झाली. त्यामुळे कालव्यांची लांबी व वितरण व्यवस्थेत वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रकल्प खर्चात रू. ८५.९५ कोटीची वाढ झालेली आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :- प्रकल्पाचे लाभक्षेत्र वाढल्याने मुख्य कालव्याचा विसर्ग वाढला. त्यामुळे उध्वर्गामी नलिकेचा व्यास १२९६ मी. मी. ऐवजी १६०० मी.मी., प्लेटची जाडी ८ मी. मी. ऐवजी १२ मी. मी., व पंपाची अश्वशक्ती १४७५ एच.पी. ऐवजी १५०० एच.पी. झाली. त्यामुळे खर्चात रू. ३.०० कोटीने वाढ झाली आहे.

३.५ ई. टी. पी. व इतर कारणाने झालेली वाढ :- मुळ प्रकल्प अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू. १०.७० कोटी इतकी तरतुद होती. सुधारीत प्रशासकीय अहवालानुसार यासाठी रू. ६०.६५ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. यामध्ये झालेली एकूण वाढ रू. ४९.९५ कोटी आहे. तसेच इतर कारणांमुळे रु. ४.३५ कोटी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

प्रकल्पास सन १९९४ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उपसा योजनेचे काम १९९५ मध्ये सुरु झाले. मात्र योजनेस प्रतिवर्षी आवश्यकतेपेक्षा अपुरा निधी प्राप्त झाला.त्यामुळे निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाची कामे संथ गतीने चालू आहेत. प्रकल्पाच्या कामास अपुऱ्या निधीमुळे विलंब झाला आहे.

५.०० प्रकल्पाची सद्यस्थिती :- प्रकल्पाचे पंपगृह, उर्ध्वगामी नलिका, वितरणकुंड ही शिर्ष कामे पुर्ण झालेली आहेत. मुख्य कालव्याचे २२ कि.मी. लांबीतील मातीकाम पुर्ण असून अस्तरीकरण बाकी आहे. डाव्या कालव्याचे १५ कि. मी. लांबीपैकी १३ कि.मी. मातीकाम पुर्ण आहे. उजव्या कालव्याचे सर्व १७ कि.मी. मधील काम प्रगतीपथावर असून ३५ टक्के पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेची ४२ टक्के कामे पुर्ण झालेली आहेत. प्रकल्पाच्या एकूण २४५५० हे. सिंचन क्षेत्रापैकी जून -२०१२ अखेर १०३७१ हे. सिंचन क्षेत्र निर्मित करण्यात आलेले आहे. योजना अंशतः २००५ मध्ये कार्यान्वित झाली असून या पैकी २७४० हे. क्षेत्र प्रत्यक्ष सिंचनाखाली आले आहे. लाभक्षेत्र विकासाची व भूविकास कामे अदयाप न झाल्यामुळे घोषित क्षेत्र पुर्णपणे सिंचनाखाली आलेले नाही.

६.०० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :-

सन २००५ पासून योजना अंशतः कार्यान्वित झालेली आहे. तेव्हापासून सिंचन करण्यात येत असून योजनेचे वीज बील शेतकऱ्यांकडून वसूल केलेल्या पाणीपट्टीमधून भरण्यात येते. योजना कार्यान्वित होऊन वितरण व्यवस्था पूर्ण झालेल्या भागातील दुष्काळी स्थिती संपुष्टात आली आहे. त्यामुळे या भागातील लोकांचे जिवनमान उंचावले आहे. सन २०११-१२ मध्ये २७४० हेक्टर क्षेत्रावर सिंचन करण्यात आले असून यामुळे शेतक-यांना साधारणपणे प्रति वर्षी रु. ४०.०० कोटी उत्पन्न होत आहे. प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. ३००.०४ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत रु. १.८५ लक्ष प्रति हेक्टरी व लाभव्यय गुणोत्तर १.५५ आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
दहिगांव उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव : दहिगांव उपसा सिंचन योजना	तालुका: करमाळा		जिल्हा : सोलापुर.	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र) :-	१३३३५ हेक्टर	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र):- निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मूळ प्रशासकीय मान्यता	०१/१०/१९९६	१९९५-९६	५७.६६	१३३३५
	सुप्रमा-१	२७/०२/२००९	२००७-०८	१७८.९९	१३३३५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु. कोटी)			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			७९.६२	
	५.१	भू-संपादन , पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च कोटी) = ०.६८			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ७८.१७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) व इतर = ०.७७			
६	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-१९९७	
६.१	प्रकल्पाची कामे सुरु झाल्याचे वर्ष			१९९७	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु.कोटी)			६३.४२	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	४५.४५	८६.९४	४१.४९	३४.२०
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.९२	१.९१	०.९९	०.८२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२२.०४	२२.०४	१८.१६
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	९.९६	९.९६	८.२१
७.५	ई. टी. पी. व इतर कारणामुळे झालेली वाढ	११.२९	५८.१४	४६.८५	३८.६१
	एकूण	**५७.६६**	**१७८.९९**	**१२१.३३**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :-

उजनी जलाशयातून दहिगांव लगत १.८१ अ.घ.फुट पाणी उपसा करून योजनेव्दारे दुष्काळग्रस्त करमाळा तालुक्यातील २४ गांवे लाभक्षेत्रात येतात ही आठमाही योजना असून सिंचनक्षमता १३३३५ हे.आहे. सदर योजनेत दोन टप्पे असून टप्पा १ अंतर्गत दहिगांव येथे ७५५ अश्वशक्तीचे सहा पंपांचा वापर करुन पाणी १५०० मि. मी. व्यासाच्या ३१४० लांबीच्या दोन उर्ध्वगामी नलिकेतून ६६ मी. उंचीवर वितरण कुंडात टाकले जाणार आहे. त्यानंतर सदर पाणी १० कि. मी. लांबीच्या जोड कालव्याद्वारे मौजे कुंभेज येथील संतुलन तलावात सोडण्यांत येणार आहे. त्यामुळे एकूण ६२२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

त्यानंतर टप्पा २ अंतर्गत सदर संतुलन तलावातून ७३० अश्वशक्तीच्या चार पंपाद्वारे १५०० मी. मी. व्यासाच्या व ३१२० मि. लांबीच्या दोन उर्ध्वगामी नलिकेद्वारे ४३ मी. उंचीवरील वितरण कुंडात सोडण्यांत येणार आहे. तेथून या योजनेचा मुख्य कालवा व वितरण व्यवस्थेद्वारे १२७१३ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

२.० प्रशासकीय मान्यता –

या प्रकल्पास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने रू. .५७.६६ कोटी किंमतीस दिनांक १०/१०/१९९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानंतर शासनाने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता रु.१७८.९९ कोटी किंमतीस दि.२७.०२.२००९ रोजी दिली. प्रकल्पावर मार्च-२०१२ अखेर रु.७९.६२ कोटी खर्च झालेला आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे –

प्रकल्पाची प्रथम सुधारीत किंमत रू.१७८.९९ कोटी आहे मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किमंत रू. १२१.३३ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ -

दहिगांव उसिंयोची मुळ प्रशासकीय मान्यता दरसुची सन १९९५-९६ वर आधारीत होती. सुधारीत अद्ययावत किंमत सन २००७-०८ दरसुचीप्रमाणे काढण्यात आली आहे. या १२ वर्षातील दरसुचीच्या वाढीमुळे रु.४१.४९ कोटीची वाढ झाली आहे. त्याची टक्केवारी ही ३४.२० टक्के इतकी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ –

मुळ प्रकल्प अहवालानुसार २२३ हे. क्षेत्र संपादन करणेसाठी ०.९२ कोटीची तरतूद होती. त्यापैकी ५७ हेक्टर क्षेत्र सन १९९८-९९ मध्ये संपादीत केलेले आहे. सुधारीत प्रकल्प मान्यता अहवालानुसार १.९१ कोटीची तरतूद असल्याने त्यातील वाढ ०.९९ कोटी असून वाढीची टक्केवारी ०.८२ इतकी आहे. जमिनीच्या वाढत्या किंमतीमुळे उर्वरीत १६६ हेक्टर क्षेत्र सध्याच्या दराने संपादित करावयाचे असल्याने खर्चात ०.९९ कोटी वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ –

करमाळा तालुक्यातील तत्कालिन आमदार कै. दिगंबररावजी बागल ,यांनी उंचावरील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ व्हावा यासाठी टप्पा-२ ची उंची ८ मिटरने वाढविण्याची मागणी केली. या प्रस्तावास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांनी दि.२२.०७.२००२ राजी मान्यता दिली. सदर उंचीतील वाढीमुळे उर्ध्वगामी नलिकेच्या लांबीत व इतर अनुषंगित बाबीत वाढ झाली. तसेच सविस्तर सर्वेक्षणानंतर कालव्याची संरेखा मंजूर करण्यांत आली. त्यामुळे कालव्याच्या वितरीका,उप वितरीका तसेच पुलांच्या संख्येत वाढ झाली. त्यामुळे किंमतीत वाढ झाली.अशाप्रकारे व्याप्तीतील बदलामुळे रु.२२.०४ कोटी रुपयांची वाढ झालेली असून त्याची टक्केवारी १८.१६ टक्के इतकी आहे.

३.४ संकल्प चित्र बदलामुळे झालेली वाढ –

मूळ प्रकल्प अहवाल तयार करतांना पंपगृह, उर्ध्वगामी नलिका, पंपिंग यंत्रसामुग्री इ. घटकांचे सविस्तर संकल्पन उपलब्ध नव्हते त्यामुळे ढोबळ तरतूद केली होती.परंतू प्रत्यक्ष काम करतांना म.सं.सं.नाशिक यांनी तयार केलेल्या संकल्पनानुसार उर्ध्वगामी नलिकेची जाडी वाढली. तसेच पंपगृह १ व २ यांच्या संधानकात व लोहसळीत वाढ झाली. त्यामुळे खर्चात वाढ झाली. अशाप्रकारे संकल्पनातील बदलामुळे रु.९.९६ कोटी म्हणजेच ८.२१ टक्के वाढ झाली.

३.५ आस्थापना व इतर संकीर्ण कारणे -

अ) मूळ प्रकल्प अहवालात आस्थापना व इतर संकीर्ण कामासाठी रु.११.२९ कोटी एवढी तरतूद होती.सुधारीत प्रशासकीय मान्यतृ अहवालानुसार इटीपी साठी २०.८७ कोटीची तरतूद केल्याने इटीपी खर्चात रु.९.५८ कोटी इतकी वाढ झाली. इटीपी खर्च हा कामाच्या किंमतीच्या टक्केवारीवर असल्याने सन-२००७-०८ च्या दरसुचीनुसार कामाच्या किंमतीत वाढ झाल्याने इटीपी खर्चात वाढ झाली.

ब) सुधारीत प्रकल्प अहवालात लाभक्षेत्र विकास कामे नव्याने अंतर्भूत केल्याने रु.१५.७५ कोटीची वाढ झाली आहे.

क) मुळ प्रकल्प अहवालात सल्लगार सेवा, ट्रॅश रॅक गेट,सीआय पाईप तसेच जमिनीखालील पाईप लाईन बदलण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे रु. २.४३ कोटीची वाढ झाली.

ड) वाढीव दराच्या निविदा स्विकृतीमुळे रु.२.३८ कोटी व निविदेतील भाववाढीमुळे रु.१६.७१ कोटी वाढ झाली आहे.

वरील प्रमाण आस्थापना व इतर संकीर्ण कामासाठी रु.४६.८५ कोटी म्हणजेच ३८.६१ टक्के वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

अ) अपुरा निधी :- सन २००१ ते जून २००९ या कालावधीत प्रकल्पास निधी प्राप्त झाला नाही त्यामुळे या कालावधीत योजनेचे काम बंद होते. सबब काम पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल झाल्याने कामामध्ये वाढ झाली. त्यामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झाला आहे..

ब) भूसंपादनास विरोधः-या योजनेच्या टप्पा १ चे काम उजनी जलाशयालगत आहे. त्याठिकाणी संपूर्ण बागायत क्षेत्र आहे. योजनेच्या भू संपादनासाठी सन-२००८ मध्ये २/३ रक्कमेपोटी रु.५७ लक्ष भू संपादन विभागाकडे जमा करण्यांत आलेले आहेत. त्याचे वाटप अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यामुळे संबंधीत शेतकरी कामास अडथळा निर्माण करतात. त्यामुळे काम संथगतीने चालु आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती –

या योजनच्या टप्पा-१ मधील पंपगृहाचे काम ८० टक्के,उर्ध्वगामी नलिकेच काम ७० टक्के, वितरण कुंडाचे काम ९० टक्के व कालव्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. टप्पा-२ मधील पंपगृहाचे काम ८० टक्के,उर्ध्वगामी नलिकेच काम ९० टक्के, वितरण कुंडाचे काम ९० टक्के व कालव्याचे काम १० टक्के पूर्ण झाले आहे.

प्रथम सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु. १७८.९९ कोटी इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु. १.३४२ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.५३ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
शिरापूर उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पांचे नांव - शिरापूर उपसा सिंचन योजना तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर						
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर) पीक क्षेत्र	१४२०० हे	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ – निरंक				
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत रु. कोटी			प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये) पीकक्षेत्र
				शिरापूर	भीमा सिना जोड कालवा	एकूण	
	मूळ प्रशासकिय मान्यता	१०.१०.९६	१९९५-९६	५७.८५	३२.७२	९०.५७	१४२००
	सुप्रमा-१ (प्रस्तावित)	१९.०३.११	२०१०-११	१७७.६२	७०.१०	२४७.७२	१४२००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किमंत(रु कोटी)						नाही
५	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च(रु कोटी)						१३१.०५
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु कोटी) - १.७१						
	५.२ बांधकामावरील खर्च(रु कोटी) - ११९.०८						
	५.३ इटीपी खर्च (रु कोटी) - १०.२६						
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष						सन १९९६-९७
	६.१ प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष						सन १९९७
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किमंत (रु.कोटी)						५७.८५
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु कोटी)						

	बाब	**मूळ तरतूद**	**सुप्रमा तरतूद**	**वाढ रक्कम**	**एकूण वाढीशी टक्केवारी**
	७.१ दरसूचीतील वाढ	७२.५७	१२६.०१	५३.४४	३४.००
	७.२ भूसंपादन पुनर्वसन वन जमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	०.२८	१८.२५	१७.९७	११.४४
	७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२३.५०	२३.५०	१४.९५
	७.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२७.७५	२७.७५	१७.६६
	७.५ इतर कारणे				
	निविदा अधिक्य	०.००	३.५९	३.५९	२.२८
	अपु-या तरतुदीमुळे	०.००	९.४४	९.४४	६.०१
	७.६ ईटीपीमुळे झालेली वाढ	१७.७२	३९.१८	२१.४६	१३.६६
	एकूण	**९०.५७**	**२४७.७२**	**१५७.१५**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती- शिरापूर उपसा सिंचन योजना ही भीमा (उजनी) प्रकल्पातून भीमा सीना जोड कालव्याद्वारे सीना नदीवरील शिरापूर को.प.बंधाऱ्यात १.७३ अ.घ.फु. पाणी सोडुन तेथुन दोन टप्प्यात उपसा करुन उत्तर सोलापूर तालुक्यातील १४००१ हेक्टर व तुळजापूर तालुक्यातील १९९ हेक्टर असे एकूण

१४,२०० हेक्टर सिंचन क्षमता निर्मित करणे प्रस्तावित आहे. योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही . टप्पा क्र.१ व २ चे पंपगृह, उध्दरण नलिका व कालव्याची कामे ही ६० टक्के पूर्ण झालेली आहेत. वितरण व्यवस्थेची कामे ही अपुऱ्या निधी अभावि हाती घेतलेली नाहीत.

२.० प्रशासकिय मान्यता व सुधारीत प्रशासकिय मान्यता – शिरापूर उपसा सिंचन योजनेस भीमा सिना जोड कालव्यासह रुपये ९०.५७ कोटी किंमतीस प्रशासकिय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक १०.१०..१९९६ रोजी दिली आहे. प्रकल्पांची भीमा सिना जोड कालव्यासह अद्ययावत किंमत रुपये २४७.७२ कोटी इतकी आहे. भीमा सीना जोड कालव्याची किंमत पाणी वापराच्या प्रमाणात विचारात घेतलेली आहे.

३.० किंमत वाढण्यांची कारणे – प्रकल्पाच्या किंमतीत रु. १५७.१५ कोटी इतकी वाढली आहे. व त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील बदल :-प्रशासकीय मान्यता सन १९९५-९६ च्या दरसुचीवर आधारित होती. परंतु सुधारीत प्रशासकीय मान्यता सन २०१०-११ च्या दरसुचीप्रमाणे केल्यामुळे व भीमा सिना जोड कालव्याच्या खर्चात पाणी वापराच्या प्रमाणात झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ५३.४४ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.२ व्याप्तीतील बदल :-मूळ प्रकल्प अहवालात जोड कालवा, डावा कालवा व उजवा कालवा यांची एकूण लांबी २९.८३ किमी इतकी होती. परंतु चिंचोळी औद्योगिक क्षेत्र्, वनजमीन व नागरी वसाहतीमुळे कालव्याची संरेखा बदलावी लागली. त्यामुळे कालव्याची लांबी ४५.७५ किमी इतकी झाली आहे. सदर बदलास मकृखोवि, पुणे यांनी दि. १५.५.९८ रोजी मान्यता प्रदान केली आहे. तसेच उपसा योजनेच्या उर्ध्वगामी नलिकाच्या मूळ संकल्पनाप्रमाणे ८ एमएम जाडीचे पाईप प्रस्तावित होते परंतु सुधारीत प्रशासकिय मान्यता मध्ये सविस्तर संकल्पनपनानुसार १० एमएम जाडीचे पाईप बसविले आहेत. त्यामुळे रु. २३.५० कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ संकल्पचित्र/तांत्रिक बदल :-पंपगृह टप्पा १ व २ च्या पायामध्ये फिशर्ड रॉक/गेरु लागल्यामुळे जादा खोदाई करावी लागली. प्रशासकीय मान्यता मध्ये उर्ध्वगामी नलिका पाईपचा व्यास १२१९ मीमी होता. सविस्तर संकल्पनाप्रमाणे १५०० मीमी व्यासाचा पाईप वापरण्यात आला. भीमा सिना जोड कालव्याच्या खर्चात झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. २७.७५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ भूसंपादन :- मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये भूसंपादन क्षेत्र ८२ हे. रु. २७००० प्रति हेक्टर दराने घेण्यात आले होते व त्यासाठी रु. ०.२८ कोटी तरतुद होती. सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये ४४६.६३ हे. क्षेत्र रु. ४.०० लक्ष प्रति हेक्टर दराने घेण्याचे प्रस्तावित आहे. व त्यासाठी रु. १८.२५ कोटी तरतुद आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. १७.९७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.५ ईटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ:- मूळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकामध्ये ईटीपीसाठी रु. १७.७२ कोटीची तरतूद होती. सुधारीत प्रशासकीय मान्यता मध्ये रु. ३९.१८ इतकी तरतूद आहे. त्यामुळे रु. २१.४६ कोटी इतकी वाढ होत आहे. इतर कारणामुळे व भीमा सिना जोड कालव्याच्या ईटीपी खर्चात झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ३४.४९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे -

४.१ अभयरण्यातील कालव्यामुळे झालेला बदल-शिरापूर उपसा सिंचन योजनेच्या कालव्याची काही लांबी ही माळढोक अभरण्याच्या संरक्षित क्षेत्रात येते. दि.२३.०६.२०१० रोजी वन विभागाने वरील संरक्षित क्षेत्रात उर्वरित कामे करण्यास हरकत घेतली त्यामुळे शिरापूर उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी लागणारे माळढोक संरक्षित अभयारण्य क्षेत्रात कराव्या लागणाऱ्या ९२.९९ हेक्टर क्षेत्रासाठीचा मान्यतेचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.उकावि-८/प्रशा-१/४४८१,दि.१०.०९.२०१२ अन्वये वन विभाग,सोलापूर/वन्य जीव विभाग,पुणे यांना सादर केला. अद्याप प्रस्तावास मान्यता मिळालेली नसल्याने कामे बंद आहेत.

४.२ अपु-या निधीमुळे झालेला विलंब–प्रकल्पास सन १९९६ मध्ये प्रशासकिय मान्यता मिळाली, सन २००८-०९ पर्यंत अत्यल्प प्रमाणात निधी मिळत राहीला. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने कामे संथ गतीने चालू आहेत.

५.० प्रकल्पांची सद्यस्थिती

योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही. पंपगृह टप्पा -१ पंपगृहाचे स्थापत्य काम ६० टक्के यांत्रिकी कामे ५० टक्के् व विद्युत कामे १० टक्के पूर्ण झाले असून उर्ध्वगामी नलिका ९५ टक्के व वितरणकुंडाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. पंपगृह टप्पा -२ मधील पंपगृहाचे स्थापत्य काम ९५ टक्के यांत्रिकी कामे ५० टक्के् व विद्युत कामे १० टक्के पूर्ण झाले. असून उर्ध्वगामी नलिका ९५ टक्के व वितरणकुंडाचे काम १० टक्के पूर्ण झाले आहे. जोड कालवा किमी १ ते ११ मधील १०० टक्के पूर्ण झाले आहे. उजवा कालवा किमी १ ते १९ मधील ३५ टक्के व डावा कालवा किमी १ ते १२ मधील मातीकामे ९५ टक्के कामे पूर्ण व उर्वरित कामे प्रगतीत आहेत. जोड कालव्यावरील ल.वि.२- ७० टक्के पूर्ण.व ल.वि.६- पूर्ण, उर्वरित वितरण व्यवस्थेची कामे निधी नसल्यामुळे हाती घेतलेले नाही.

या योजनेची एकूण अद्ययावत किंमत रु.१७७.६२ कोटी असून प्रतिहेक्टरी खर्च रु.१.२५ लक्ष असून लाभव्यय गुणोत्तर १.६५ आहे.

कल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
आष्टी उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पांचे नांवः-आष्टी उपसा सिंचन योजना	तालुका मोहोळ	जिल्हा सोलापूर		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर) पीक क्षेत्र	१२७८० हे	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ – निरंक		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किमंत (रु कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्य) पीकक्षेत्र
	मूळ प्रशासकिय मान्यता	१०.१०.९६	१९९५-९६	४९.६०	१२७८०
	सुप्रमा-१	१.११.२०१०	२००७-०८	८३.०४	१२७८०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किमंत (रु कोटी)			नाही	
५.०	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च(रु कोटी)			५०.१४	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु कोटी)		२.०५		
	५.२ बांधकामावरील खर्च(रु कोटी)		४२.६८		
	५.३ इटीपी खर्च (रु कोटी) :		५.४१		
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९९६-९७	
	६.१ प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९९७	
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु. कोटी)			४९.६०	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			(रु कोटी)	
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
	७.१ दरसूचीतील वाढ	३९.५०	६५.२९	२५.७९	७७.१२
	७.२ भूसंपादन पुनर्वसन वन जमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	०.३४	३.६६	३.३२	९.९३
	७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२.२७	२.२७	६.७९
	७.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
	७.५ इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
	७.६ ईटीपीमुळे झालेली वाढ	९.७६	११.८२	२.०६	६.१६
	एकूण	**४९.६०**	**८३.०४**	**३३.४४**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती -आष्टी उपसा सिंचन योजनेअंतर्गत भीमा (उजनी) प्रकल्पातून व अस्तित्वातील आष्टी मध्यम प्रकल्पातील जलाशयामध्ये उपलब्ध होणारे १.५५ अ.घ.फु. पाणी दोन टप्प्यात उचलणे प्रस्तावित आहे. टप्पा-१ मध्ये ३७० अश्वशक्तिचे सहा पंप वापरुन ३५.७४ मी. पाणी उंचीवर नेऊन माढा तालुक्यातील ६८२ हेक्टर व मोहोळ तालुक्यातील ११,५१३ हेक्टर तसेच उजवा कालवा कि.मी. १३ मधुन टप्पा-२ द्वारे ६५ अश्वशक्तिचे दोन पंप वापरुन १९.७५ मी. पाणी उंचीवर नेऊन मोहोळ तालुक्यातील ५८५ हेक्टर असे एकूण १२,७८० हेक्टर पीकक्षेत्र सिंचन व्यवस्थेद्वारे सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे. टप्पा-१ चे पंपगृह,उध्दरण नलिका व कालव्याची कामे ही ५० टक्के पूर्ण झाली आहेत. टप्पा-२ चे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. तसेच वितरण व्यवस्थेची कामे अपुऱ्या निधी अभावि हाती घेण्यात आलेली नाहीत.

२.० प्रशासकिय मान्यता व सुधारीत प्रशासकिय मान्यता-आष्टी उपसा सिंचन योजनेस रुपये ४९.६० कोटी किंमतीस मुळ प्रशासकिय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक १०.१०.१९९६ रोजी दिली. त्यानंतर शासनाने रुपये ८३.०४ कोटी किमंतीस प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता दिनांक १.११.२०१० रोजी दिली.

३.० किंमत वाढण्याची कारणे – प्रकल्पाची मूळ किंमत रु. ४९.६० कोटी होती. सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ८३.०४ कोटी असून प्रकल्पाच्या किंमतीत रुपये ३३.४४ कोटी इतकी वाढ झाली आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ–प्रशासकीय अहवाल दरसुची १९९५-९६ वर आधारित आणि सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल सन २००७-०८ या दरसुचीवर आधारित असल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये २५.७९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीमुळे झालेली वाढ-मुळ प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये ११८ हेक्टर जमीन संपादनासाठी सरासरी रु २८००० प्रति हेक्टरी दराने करणे प्रस्तावीत होते व त्यासाठी ०.३४ कोटीची तरतूद होती. टप्पा २ चा नव्याने समावेश केल्यामुळे सुप्रमा अहवालामध्ये २४३ हेक्टर क्षेत्रासाठी सरासरी रुपये १५१००० प्रति हेक्टर दराने संपादन करणे प्रस्तावीत असून त्यांची किमंत रुपये ३.६६ कोटी आहे. त्यामुळे रु ३.३२ कोटी इतकी वाढ होत आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- मूळ प्रकल्प अहवालामध्ये आष्टी डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्र ३४०० हे. इतके होते. माजी आमदार श्री. राजन पाटील, मोहोळ यांचेकडून व इतर स्थानिक लोकप्रतिनिधीनी मोहोळ तालुक्यातील मौजे पोखरापूर, खवणी व सारोळे या गावांना पाणी देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा २ (पोखरापूर योजना) व्दारे ५८५ हे. सिंचनाचा लाभ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला या प्रस्तावास शासनाचे पत्र दि. १.१२.२००१ अन्वये तत्वतः मान्यता दिली आहे. यामुळे योजनेच्या किंमतीत २.२७ कोटी एवढी वाढ झाली आहे.

३.४ ईटीपीमुळे झालेली वाढः- - मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये ९.७६ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकिय मान्यता अहवालात रु ११.८२ कोटी इतकी तरतूद केल्याने रु २.०६ कोटी ची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे -

४.१ अपु-या निधीमुळे झालेला विलंब–प्रकल्पास सन १९९६ मध्ये प्रशासकिय मान्यता मिळाली. सन २००८-०९ पर्यत प्रकल्पास अत्यल्प प्रमाणात निधी मिळत राहीला. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने कामे संथ गतीने चालू आहेत.

५.० प्रकल्पांची सद्यस्थिती –

पंपगृह टप्पा -१ पंपगृहाचे स्थापत्य काम ६० टक्के यांत्रिकी कामे २० टक्के् व विद्युत कामे ३० टक्के पूर्ण झाले असून उर्ध्वगामी नलिका व वितरणकुंडाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. उजवा कालवा किमी १ ते २४ मधील ७० टक्के व डावा कालवा किमी १ ते २३ मधील मातीकामे ७० टक्के कामे पूर्ण असून उर्वरित कामे प्रगतीत आहेत. पंपगृह टप्पा-२ चे सर्वसाधारण आराखडा निश्चितीचे काम म.सं.सं., नाशिक यांचेकडून प्रगतीपथावर असून काम अद्याप हाती घेण्यात आले नाही. वितरण व्यवस्थेची कामे अपु-या निधी अभावी अद्याप हाती घेण्यात आलेली नाहीत

या योजनेची एकूण अद्ययावत किंमत रु.८३.०४ कोटी असून प्रतिहेक्टरी खर्च रु.०.६५ लक्ष येत आहे. व लाभव्यय गुणोत्तर १.९१ येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
सांगोला उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पाचे नांव :- सांगोला उपसा सिंचन योजना	तालुका-सांगोला	जिल्हा-सोलापूर		
२	प्रकल्पीय सिंचनक्षमता (हेक्टर) पीकक्षेत्र	१०७०१	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र) जून २०१२ — ‘ निरंक ’		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	७/७/२०००	१९९९-२०००	७३.५९	१०७०१
	सुप्रमा-१	प्रस्तावित	२०११-१२	१५२.८५	१०७०१
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रू.कोटी)		नाही		
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)		०.०३		
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) --				
	५.२ बांधकामावरील खर्च (रू.कोटी) - = ०.०३				
	५.३ इटीपी खर्च (रू.कोटी) -- --				
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		सन २०००-०१		
	६.१ प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष		अद्याप काम सुरू झालेले नाही.		
	६.२ प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रू.कोटी) -				
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	५८.२७	१२७.६९	६९.४२	८७.५८
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ	०.६०	२.८५	२.२५	२.८४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	--	--	--	--
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	-	--	--	--
७.५	इतर कारणे	--	--	--	--
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	१४.७२	२२.३१	७.५९	९.५८
७.७	**एकूण --**	**७३.५९**	**१५२.८५**	**७९.२६**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० **सर्वसाधारण माहिती --** सांगोला उपसा सिंचन योजना ता.सांगोला जि.सोलापूर ही योजना उजनी उजवा कालवा सा.क्र.४२/३५० मधून उपसा सिंचनाव्दारे निरा उजवा कालवा किमी.क्र.१४३/९१० मध्ये पाणी सोडून कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पातून अवर्षण प्रवण सांगोला तालुक्याला सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. योजनेचे काम निधीअभावी अद्याप सुरु नाही.

प्रकल्पामध्ये उजनी उजवा कालव्या शेजारी सा.क्र.४२/३५० येथे पंपगृह बांधणे,१७०० मिमि.व्यासाची १०.९८ किमी.लांबीची एक रांग असलेली उर्ध्वगामी नलिका, वितरणकुंड बांधणे, २.६१ किमी.लांबीचा भरण कालव्याचा समावेश आहे. प्रकल्पाची सिंचनक्षमता १०७०१ हे. आहे. त्यापैकी ७६६२ हे.नवीन क्षेत्र असून उर्वरीत क्षेत्रामध्ये सांगोला शाखा क्र.४ च्या ३०३९ हे.चे रूपांतर चारमाही वरून आठमाही पीक पध्दतीमध्ये करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची किंमत वाढ ही मुख्यत्वे दरसुचीत वाढ झाल्यामुळे आहे.

२.० **प्रशासकीय मान्यता--**सांगोला उपसा सिंचन योजना या प्रकल्पास दि.७/७/२००० रोजी महामंड़ळाने रू.७३.५९ कोटी किंमतीस दरसूची १९९९-२००० नुसार मुळ प्रशासकीय मान्यता दिली. प्रकल्पाची सन २०११-१२ च्या दरसूचीने अद्ययावत अंदाजित किंमत रू.१५२.८५ कोटी इतकी आहे. सध्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर चालू आहे.

३.० **किंमत वाढण्याची कारणे -**प्रकल्पाचे प्रस्तावित सुधारित प्रशासकीय किंमत रू.१५२.८५ कोटी इतकी आहे. प्रकल्पाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा हि किंमत रू.७९.२६ कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ -** सांगोला उपसा सिंचन योजना या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९९-२००० च्या दरसूचीवर आधारित होती. प्रकल्पाचे काम निधीअभावी सुरू होवू शकले नाही. सुधारित अद्ययावत किंमत सन २०११-२०१२ च्या दरसूची प्रमाणे काढण्यात आलेली आहे. या १२ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रुपये ६९.४२ कोटी असून, ती एकूण वाढीच्या ८७.५८ टक्के इतकी आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ --** मूळ प्रशासकीय मान्यता अहवालात रू.०.६० कोटी इतकी भूसंपादनासाठी तरतूद होती. प्रस्तावित सुप्रमा अहवालात भूसंपादनाकरिता रू.२.८५ कोटी इतकी तरतूद आहे. त्यामुळे भूसंपादनामध्ये रू.२.२५ कोटी इतकी वाढ असून वाढीची टक्केवारी २.८४ टक्के इतकी आहे.

३.३ **आस्थापना व इतर कारणे --** मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू.१४.७२ कोटी इतकी तरतूद होती. प्रस्तावित सुधारित प्रकल्प अहवालानुसार यासाठी रू.२२.३१ कोटीची तरतूद आहे. यामुळे ईटीपी मध्ये रू.७.५९ कोटी इतकी वाढ झाली असून वाढीची टक्केवारी ९.५८ टक्के इतकी आहे.

४.० **प्रकल्पाची विलंबाची कारणे –**

४.१ **अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशील --**

प्रकल्पास सन २००० मध्ये मूळ प्र.मा.मिळाली. तथापि प्रकल्पास सन २०११ पर्यंत अत्यल्प निधी उपलब्ध झाल्याने कामास सुरूवात करता आली नाही.

५.० **प्रकल्पाची सद्यःस्थिती --**

प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात नाही.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
बार्शी उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पांचे नांव बार्शी उपसा सिंचन योजना तालुका बार्शी जिल्हा सोलापूर						
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर) पीक क्षेत्र			२१३०० हे	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ – निरंक		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत रु. कोटी			प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्य) पीकक्षेत्र
				बार्शी	भीमा सिना जोड कालवा	एकूण	
	मूळ प्रशासकिय मान्यता	१०.१०.९६	१९९५-९६	८१.६०	४९.७८	१३१.३८	२१३००
	सुधारित प्रशासकीय मान्यता	२३.९.११	२००८-०९	१९७.०७	१११.२१	३०८.२८	२१३००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किमंत(रु कोटी)				नाही		
५	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च(रु कोटी)				१८९.१२		
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु कोटी) = २.०१						
	५.२ बांधकामावरील खर्च(रु कोटी) = १७६.७६						
	५.३ इटीपी खर्च (रु कोटी) = १०.३५						
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				सन १९९६-९७		
	६.१ प्रकल्पाचे प्रत्यक्षे काम सुरु झाल्याचे वर्ष				सन १९९७		
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु. कोटी)				१३१.३८		
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु कोटी)		
	बाब		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी	
	७.१ दरसूचीतील वाढ		१०४.७४	१८४.९६	८०.२२	४५.३५	
	७.२ भूसंपादन पुनर्वसन वन जमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ		१.०१	४.१२	३.११	१.७६	
	७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		०.००	०.००	०.००	०.००	
	७.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		०.००	६५.८६	६५.८६	३७.२३	
	७.५ इतर कारणे -						
	अ) इतर कारणे ब) अपुरी तरतूद (पर्यावरण ,लॉस ऑन स्टॉक) क) भाववाढ		०.०० ०.०० ०.००	१.२० ०.८८ ७.३४	१.२० ०.८८ ७.३४	०.६८ ०.५० ४.१४	
	७.६ ईटीपीमुळे झालेली वाढ		२५.६३	४३.९२	१८.२९	१०.३४	
	एकूण		**१३१.३८**	**३०८.२८**	**१७६.९०**	**१००.००**	

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती – बार्शी उपसा सिंचन योजना जि.सोलापूर, योजनेव्दारे उजनी जलाशयातून भीमा सीना जोड कालव्याद्वारे २.५९ अ.घ.फु. पाणी सीना नदीवरील रिधोरे को.प.बंधारा येथे सोडणे व तेथून दोन टप्प्यात उपसा करुन बार्शी तालुक्यातील १७,८२० हेक्टर व माढा तालुक्यातील ३,४८० हेक्टर असे एकूण २१,३०० हेक्टर सिंचन क्षमता निर्मित करणे प्रस्तावित आहे. योजनेचे काम निधीअभावी संथ गतीने चालू असून योजना अद्याप कार्यान्वित झालेले नाही. टप्पा क्र.१ व २ चे पंपगृह,उध्दरण नलिका,व कालव्याची कामे ५० टक्के पूर्ण झालेली आहेत. वितरण व्यवस्थेची कामे ही अपुऱ्या निधी अभावि अद्याप हाती घेण्यात आलेली नाहीत.

२.० प्रशासकिय मान्यता व सुधारीत प्रशासकिय मान्यता-बार्शी उपसा सिंचन योजनेस रुपये १३१.३८ कोटी (रु ८१.६० उपसा योजना (+) रु. ४९.७८ जोड कालवा) किंमतीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक १०.१०.१९९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने रुपये ३०८.२८ (रु. १९७.०७ उपसा योजना (+) रु. १११.२१ जोड कालवा) कोटी किंमंतीस प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता दिनांक २३.११.२०११ रोजी दिली आहे. भीमा सीना जोड कालव्याची किंमत बोगद्यावरुन होणा-या एकूण पाणी वापराच्या प्रमाणात घेतली आहे.

३.० किंमत वाढण्यांची कारणे–प्रकल्पाच्या प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत सुधारित प्रशासकीय मान्यता किमंत रुपये १७६.९० कोटी इतकी वाढली आहे. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहे.

३.१ दरसूचीतील वाढ-प्रशासकीय मान्यता सन १९९५-९६ वर्षीची आहे. मुख्यत्वे अपु-या निधीमुळे योजनेचे काम अपूर्ण आहे. सन २००८-०९ पर्यन्त दरसूचीत झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ८०.२२ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीमुळे झालेली वाढ- मुळ प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये ३५६ हेक्टर जमीन सरासरी रु २८३०० प्रति हेक्टरी दराने संपादीत करणे प्रस्तावीत होते व त्यासाठी १.०१ कोटीची तरतूद होती. सुधारीत प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये ४८२.३५ हेक्टर क्षेत्र सरासरी रुपये ८५००० प्रति हेक्टर दराने संपादन करणे प्रस्तावीत असून त्यांची किंमत रुपये ४.१२ कोटी आहे. त्यामुळे भूसंपादनामधील खर्चात झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात एकूण रु ३.११ कोटी इतकी वाढ होत आहे.

३.३ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ– या योजनेच्या मूळ अहवालामध्ये टप्पा-१ पंपगृहासाठी पायापातळी ४६०.०० मी. विचारात घेतली होती. प्रत्यक्षात कठीण स्तर जादा खोलीवर लागल्याने पाया पातळी ४४८.५० मी. येथे ठेवण्यांत आली. मूळ अहवालामध्ये टप्पा क्र.१ उर्ध्व नलिकेचा व्यास १५२४ मी.मी. व जाडी ११ मी.मी. गृहीत घरली होती. सविस्तर संकल्पनानुसार १७०० मी.मी. व्यास व १२ मी.मी. जाडी ठेवण्यांत आली. टप्पा क्र.२ उर्ध्वगामी नलिका १६२६ मी.मी.व्यास व ८ मी.मी. जाडीची एक रांग मूळ अहवालामध्ये प्रस्तावित होती. सविस्तर संकल्पनानुसार ती १३०० मी.मी. व्यासाच्या व ८ मी.मी. जाडीच्या दोन रांगा प्रस्तावित करण्यांत आल्या. मूळ अहवालामध्ये टप्पा-१ व २ वितरण कुंड कामासाठी दगडी बांधकामाची तरतूद होती. शासन परिपत्रकातील सुचनेनुसार दगडी बांधकामा ऐवजी संधानक प्रस्तावित करण्यांत आले. तसेच भीमा सिना जोड कालव्याच्या खर्चात विविध कारणांनी झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ६५.८६ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.४ ईटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ -मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये २५.६३ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकिय मान्यता अहवालात रु ४३.९२ कोटी इतकी तरतूद केल्याने रु १८.२९ कोटीची वाढ झाली आहे .तसेच कामाच्या खर्चामध्ये भाववाढ व इतर कारणामुळे रु.९.४२ कोटी इतकी वाढ होत आहे, अशा प्रकारे एकूण रु. २७.७१ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे –

४.१ अपु-या निधीमुळे झालेला विलंब– अपुरा निधी हे विलंबाचे मुख्य कारण आहे. प्रकल्पास सन १९९६ मध्ये प्रशासकिय मान्यता मिळाली, सन २००८-०९ पर्यत अत्यल्प प्रमाणात निधी मिळत राहीला. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने कामे संथ गतीने चालू आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थितीः-

योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही. टप्पा १ पंपगृहाचे स्थापत्य काम ६० टक्के, यांत्रिकी कामे ३० टक्के व विद्युत कामे १० टक्के पूर्ण झाले असून उर्ध्वगामी नलिका व वितरणकुंडाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. टप्पा २ पंपगृहाचे यांत्रिकी कामे ३० टक्के व विद्युत कामे १० टक्के पूर्ण झाले असून उर्ध्वगामी नलिका व वितरणकुंडाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे मुख्य कालव्याचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून डावा कालव्याचे काम ३० टक्के व उजवा कालव्याचे काम २० टक्के पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेची कामे अपु-या निधीअभावी अद्याप हाती घेण्यात आलेली नाहीत.

बार्शी उपसा सिंचन योजनेची एकूण अद्ययावत किंमत रु.१९७.०७ कोटी असून प्रतिहेक्टरी खर्च रु.०.९२ लक्ष आहे व लाभव्यय गुणोत्तर १.७९ येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
एकरुख उपसा सिंचन योजना, जिल्हा सोलापूर
(बोरी मध्यम प्रकल्पासह)

१	प्रकल्पांचे नांव एकरुख उपसा सिंचन योजना तालुका उ.सोलापूर जिल्हा सोलापूर				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर) पीक क्षेत्र	२९९०५ हे	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ – निरंक		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किमंत (रु कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्य) पीकक्षेत्र
	मूळ प्रशासकिय मान्यता अ) एकरुख	२१.१२.९६	१९९५-९६	८७.४७	२४७८१
	ब) बोरी	१०.११.९७	१९९६-९७	४४.५८	५३२५
	सुप्रमा-१ प्रस्तावित (बोरी मध्यम प्रकल्पासह)	प्रस्तावित	२०११-१२	३२३.७०	२९९०५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किमंत (रु कोटी)				नाही
५	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च(रु कोटी)				१५५.०७
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु कोटी)		-	३१.१३	
	५.२ बांधकामावरील खर्च(रु कोटी)		-	१०५.१७	
	५.३ इटीपी खर्च (रु कोटी)			१८.७७	
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				सन १९९६-९७
	६.१ प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				सन १९९७
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत			(रु. कोटी)	१३२.०५
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
	७.१ दरसूचीतील वाढ	९७.२१	१९८.८५	१०१.६४	५३.०४
	७.२ भूसंपादन पुनर्वसन वन जमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	७.९२	४२.०१	३४.०९	१७.७९
	७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	०	०	०
	७.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	३०.८८	३०.८८	१६.११
	७.५ इतर कारणे				
	भाववाढ व इतर कारणे	०	११.१२	११.१२	५.८०
	ईटीपीमुळे झालेली वाढ	२६.९२	४०.८४	१३.९२	७.२६
	एकूण	**१३२.०५**	**३२३.७०**	**१९१.६५**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० **सर्वसाधारण माहिती** – एकरुख उपसा सिंचन योजनेव्दारे भीमा (उजनी) प्रकल्पातून ३.०४४ अ.घ.फु. पाणी कारंबा शाखा कालव्याद्वारे हिप्परगा तलावात सोडून दोन टप्प्याद्वारे उचलणे व दक्षिण सोलापूर तालुक्यातील १०२२४ हेक्टर सिंचनक्षेत्र हे वितरणव्यवस्थेव्दारे व अक्कलकोट तालुक्यातील १९६८१ हेक्टर सिंचनक्षेत्र हे अस्तित्वातील बोरी मध्यम प्रकल्पात सोडून तेथून नदीवरील बंधा-यातून खाजगी उपसा सिंचन योजनेव्दारे सिंचनाखाली आणण्याचे नियोजित आहे. या योजनेची कामे ही अपुऱ्या निधीमुळे संथ गतीने चालू असून योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही.

२.० प्रशासकिय मान्यता व सुधारीत प्रशासकिय मान्यता–. एकरुख उपसा सिंचन योजनेस रुपये ८७.४७ कोटी किंमतीस प्रशासकिय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक २१.१२.१९९६ रोजी दिली आहे. बोरी मध्यम प्रकल्प योजनेस रु. ४४.५८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिनांक १०.११.१९९७ रोजी दिली आहे. एकरुख उपसा सिंचन योजनेतून बोरी मध्यम प्रकल्पात पाणी सोडून अक्कलकोट तालुक्यातील क्षेत्र सिंचन करणे प्रस्तावित असल्याने प्रदेश कार्यालयाचे पत्र जा.क्र. मुअ(विप्र)/उअ.४/प्रशा-९/६८७९ दिनांक १/१२/२००८ अन्वये दोन्ही प्रकल्पाची एकत्रित सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांची अद्ययावत किंमत रुपये ३२३.७० कोटी इतकी आहे. दोन्ही प्रकल्पाचा एकत्रित सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव हा मंजूरीसाठी राज्य तांत्रिक सल्लागार, नाशिक यांचेकडे सादर केलेला आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे –एकरुख उपसा सिंचन योजना व बोरी मध्यम प्रकल्पाला स्वतंत्र प्रशासकीय मान्यता आहेत. शासनाच्या सुचनेनुसार बोरी मध्यम प्रकल्पाच्या खर्चाचा अंतर्भाव एकरुख उपसा सिंचन योजनेच्या सुधारित प्रकल्प अहवालात केल्याने प्रकल्प खर्चात मोठी वाढ दिसत आहे. प्रकल्पाच्या किंमतीत रु. १९१.६५ कोटी इतकी वाढ झाली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ – एकरुख उपसा सिंचन योजना प्रकल्प अहवाल दरसुची १९९५-९६ वर आधारित आणि सुधारीत प्रकल्प अहवाल सन २०११-१२ या दरसुचीवर आधारित असल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु. ९७.८१ कोटीची वाढ झाली आहे. तसेच बोरी मध्यम प्रकल्प अहवाल दरसूची १९९६-९७ वर आधारित आणि सुधारित प्रकल्प अहवाल सन २०११-१२ च्या दरसूचीवर आधारित असल्यामुळे पकल्पाच्या खर्चात रु.३.८३ कोटीची वाढ झाली आहे. अशी एकूण वाढ १०१.६४ कोटी इतकी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीमुळे झालेली वाढ - एकरुख उपसा सिंचन योजनेच्या प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये २२३ हेक्टर क्षेत्रासाठी ०.५२ कोटीची तरतूद होती. सुधारीत प्रकल्प मान्यता अहवालामध्ये ५०२ हेक्टर क्षेत्र संपादन करणे प्रस्तावीत असून त्यांची किंमत रुपये १०.४८ कोटी आहे. बोरी मध्यम प्रकल्प अहवालामध्ये ८३० हेक्टर क्षेत्रासाठी रु. ३.१७ कोटी तरतूद होती.तसेच पुनर्वसनासाठी रु. ४.२३ कोटी तरतूद होती. सुधारित प्रकल्प मान्यता अहवालामध्ये ६८८ हेक्टर क्षेत्रासाठी रु. १८.८३ कोटी . व पुनर्वसनाकरिता रु १२.७० कोटी इतकी तरतूद आहे. सुधारित प्रकल्प अहवालात दोन्ही मिळून रु. ३४.०९ कोटी वाढ होत आहे. सदर वाढ ही एकरुख उपसा सिंचन योजनेमध्ये प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात वितरणव्यवस्थेकरिता लागणा-या भूसंपादनाची तरतूद नसल्याने तसेच बोरी मध्यम प्रकल्पात प्रकल्पग्रस्तांच्या अतिरिक्त मागण्यामुळे झालेली आहे.

३.३ संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ- मूळ प्रकल्प अहवालामध्ये कारंबा शाखेतून उपसा योजना करुन त्याव्दारे एकरुख तलावात पाणी टाकण्याचे नियोजन आहे. तथापि, कारंबा शाखेतून प्रवाही पध्दतीने एकरुख तलावात पाणी सोडण्याचे शक्य असल्याचे निदर्शनास आल्याने त्यासाठी पोहोच कालवा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार एकरुख उपसा सिंचन योजनेत कारंबा शाखा कालव्यातून पाणी प्रवाही पध्दतीने एकरुख पंपगृह टप्पा १ पर्यन्त आणणेसाठी पोहोच कालवा काढण्यात आला त्यामुळे खर्चात रु.१.८१ कोटी इतकी वाढ झाली आहे. शासन परिपत्रक क्र. एमआयएस-१०९४/(१५४६/९४)/एमपी.१/दिनांक १०.२.१९९५ अन्वये दर्गनहळळी कालव्यासाठी अस्तरीकरणाची तरतूद केल्याने रु. ६.८९ कोटी इतकी वाढ प्रस्तावित आहे. सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनानुसार कालव्यावरील बांधकामामध्ये वाढ झाल्याने रु. ७.४३ कोटी वाढ प्रस्तावित आहे. मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये वितरण व्यवस्थेकरिता रु. ४६०० प्रति हेक्टर याप्रमाणे ढोबळ तरतूद करण्यात आली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये सविस्तर संकल्पनानुसार रु. १४.७५ कोटी इतकी वाढ प्रस्तावित आहे. अशी एकूण रु. ३०.८८ वाढ झाली आहे.

३.४ ईटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ--प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये आस्थापनेसाठी रुपये २६.९२ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकिय मान्यता अहवालात रु ५१.९६ कोटी इतकी तरतूद केल्याने रु २५.०४ कोटी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे

४.१ अपु-या निधीमुळे झालेला विलंब –प्रकल्पास सन १९९६ मध्ये प्रशासकिय मान्यता मिळाली, सन

२००८-०९ पर्यत अत्यल्प प्रमाणात निधी मिळत राहीला. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने कामे संथ गतीने चालू आहेत. म्हणून प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यास विलंब होत आहे.

५.० प्रकल्पांची सद्यस्थिती –

बोरी मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००५ मध्ये पूर्ण झाले असून पुनर्वसनाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे.बोरी प्रकल्पाचा पाणी वापर जलाशय उपसा व त्याखालील नदीवरुन केला जातो. त्यामधून सध्या बोरी प्रकल्पाच्या मूळ सिंचन क्षमतेच्या ५३२५ हेक्टर पैकी १९०६ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे. व एकरुख उपसा सिंचन योजनेच्या कामाची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

पंपगृह टप्पा १ चे स्थापत्य काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. यांत्रिकी व विद्युत कामे २० टक्के पूर्ण झाले आहे. उर्ध्वगामी नलिकाचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. वितरणकुंडाचे काम हाती घ्यावयाचे आहे. जलद कालव्याचे मातीकाम व बांधकामे ७० टक्के पूर्ण् झाले आहे. पंपगृह टप्पा २ चे स्थापत्य काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. यांत्रिकी व विद्युत कामे २० टक्के पूर्ण झाले आहे. उर्ध्वगामी नलिकाचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. वितरणकुंडाचे काम हाती घ्यावयाचे आहे, दर्शनाळ खोल खोदाई कालव्याचे मातीकाम व बांधकामे ८० टक्के पूर्ण झाले आहे. दर्गनहळळी कालवा किमी १ ते १२ मधील मातीकाम व बांधकामे ९० टक्के पूर्ण झाले आहे. किमी १३ ते १८ चे मातीकामे व बांधकामे ४० टक्के पूर्ण झाले असून प्रगतीपथावर आहेत.अपु-या निधीमुळे वितरण व्यवस्थेची कामे अद्याप हाती घेतलेली नाहीत.

योजनेची एकूण अद्ययावत किंमत रु.२४३.४० कोटी असून प्रतिहेक्टरी खर्च रु. १.०८ लक्ष आहे. व लाभव्यय गुणोत्तर १.९१ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
शिराळा उपसा सिंचन योजना, जिल्हा उस्मानाबाद

१	प्रकल्पाचे नांव : शिराळा	तालुका: परांडा		जिल्हा : उस्मानाबाद.	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	४०४७ हे.	जून-२०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हे.) - निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१०/०६/१९९९	१९९६-९७	२३.००	४०४७
	सु.प्र.मा.१	२४/०९/२००८	२००७-०८	५२.५५	४०४७
	सु.प्र.मा.२ (प्रस्तावित)	-	२००९-१०	१०६.२८	४०४७
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)			नाही.	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी				५०.४४
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ०.१४			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ४९.८०			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.५०			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				२००७-०८
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				२००९
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)				५२.५५
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	१८.१७	३६.१७	१८.००	२१.६१
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.१८	०.४१	०.२३	०.२७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	६.६७	६.६७	८.०१
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४६.६०	४६.६०	५५.९६
७.५	इतर कारणे	०.००	२.७२	२.७२	३.२७
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	४.६५	१३.७१	९.०६	१०.८८
	एकूण	**२३.००**	**१०६.२८**	**८३.२८**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :शिराळा उपसा सिंचन योजनेअंतर्गत उजनी जलाशयातील ०.६२३ अघफु. पाणी भिमा सिना जोड कालव्यातून म्हैसगाव को.प.बंधा-यातून ४७.५० मी. उंचीवर उचलून त्याद्वारे अवर्षण प्रवण क्षेत्रातील परांडा तालुका जि.उस्मानाबाद मधील ४०४७ हे. सिचंन निर्मिती करण्याचे नियोजन आहे.

२.० प्रशासकीय मान्यता : या योजनेस दि.१०.६.९९ अन्वये रु २३.०० कोटी किमतीस प्रशासकिय मान्यता दिली. त्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांनी दि. २४/९/२००८ रोजी रु. ५२.५५ कोटीस किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता दिली आहे. या योजनेची अदयावत किमंत

रु.१०६.२८ कोटी आहे. द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेसाठी अहवाल शासनास दि.१२.७.२०१२ रोजी सादर केला आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे : योजनेची सुधारित अदयावत किंमत रुपये १०६.२८ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा हि किमंत रु.८३.२८ कोटीने वाढली असुन त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ : शिराळा उपसा सिंचन योजनेची मुळ प्रशासकिय मान्यता सन १९९७-९८ च्या दरसुचीवर आधारीत आहे. सुधारीत अदयावत किमंत सन २०१०-११ च्या दरसुची प्रमाणे आहे. दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ रुपये १८.०० कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ : या योजनेद्वारे म्हैसगांव बंधा-यावरुन उपसा योजनेचा पाणी वापर असुन कालवा व वितरणप्रणाली बंदपाईप लाईनद्वारे आहे. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ अल्प असुन ती रुपये ०.२३ कोटी आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : ही योजना भीमा सिना जोड कालव्यातून म्हैसगांव को.प. बंधा-यात उपलब्ध होणा-या उजनी जलाशयातील ०.६२३ अघफु. पाण्यावर आधारीत आहे. या बंधा-याचे काम सन १९८५ मध्ये झालेले असल्यामुळे याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता वर्ष २००८ पर्यत बंधा-यास दुरुस्तीची आवश्यकता नव्हती. त्यामुळे या बंधा-याच्या दुरूस्तीचा समावेश प्रथम सु.प्र.मा. मध्ये करण्यात आलेला नव्हता.तथापी २००९ मध्ये सीना नदीला आलेल्या मोठया पुरामुळे या बंधा-याची मोठया प्रमाणावर पडझड झालेली आहे. क्षेत्रीय परीस्थीतीनुसार हे काम करणे आवश्यक आहे. व्दितीय सु.प्र.मा.साठी शासनास सादर केलेल्या अहवालात या कामाचा समावेश केलेला आहे. यामुळे झालेली वाढ रुपये ६.६७ कोटी आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ : मुळ अहवालामध्ये सिंचन प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र उघडा कालवा व वितरण प्रणालीद्वारे करण्याचे नियोजन होते. पाण्याचा अपव्यय कमी करण्याच्या दृष्टीने व पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्याचे उद्देशाने या योजनेचे लाभक्षेत्र बंद पाईपलाईनद्वारे विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मंजुर प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यतेमध्ये बंद पाईप वितरण तरतुद केली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किमंतीमध्ये रु.४६.६० कोटी वाढ झाली आहे.

३.५ ईटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ :

योजनेसाठी आवश्यक विद्यूत वाहिनी खर्चामध्ये रु. २.७२ कोटीची वाढ झालेली आहे. तसेच इ.टी.पी. मध्ये एकूण रु. ९.०६ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणेः

४.१ अपुरा निधी :

प्रकल्पास मुळ प्रशासकिय मान्यता दिनांक १०/०६/९९ रोजी प्राप्त आहे. निधी अभावी कामे २००८-०९ पासुन सुरु झालेली आहेत. अपु-या निधीमुळे योजनेचे काम संथ गतीने चालू आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

योजनेचे पंपगृह व उर्ध्वनलिकेचे कामे १०० टक्के पुर्ण झालेली आहेत. पंपीग मशिनरी व.स्वीचयार्ड उभारणीचे ७५ टक्के कामे पुर्ण आहेत. पंपगृहास वीज जोडणी व पुरवठा कामे १० टक्के पुर्ण आहेत.

या योजनेअंतर्गत सिंचन क्षमता बंद पाईपलाईन द्वारे विकसीत करण्यात येत आहे. पीएससी पाईपची एकूण लांबी ३५.८७ कि.मी. व पीव्हीसी पाइर्पची लांबी ९४.५५ कि.मी. आहे. या पैकी जून २०१२ अखेर पीएससी पाईप २५.०० कि मी पीव्हीपी पाईपची ४०.०० कि मी कामे पुर्ण झालेली आहेत. या प्रमाणे एकूण ६० टक्के कामे पुर्ण झालेली आहेत. योजनेसाठी आवश्यक पंपगृह व उध्वर्नलिकेसाठी १५ हे जमिन सपांदित होत आहे.

प्रकल्पास द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर या योजनेसाठी आवश्यक वीज जोडणी व पुरवठा विषयक कामे मार्च-२०१३ अखेर पुर्ण करुन योजनेची चाचणी मार्च-२०१३ अखेर घेण्याचे नियोजन आहे.

प्रकल्पाची अद्यायवत किंमत रु. १०६.२८ इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु. २.६३ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर- १.०१९ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
आंद्र मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : आंद्र खोरे	तालुका: मावळ		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	९१७७ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) ९१७७		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६/०३/१९९५	१९९२-१९९३	३४.४६	१३१५०
	सुप्रमा-१	२१/१०/२००२	१९९९-२०००	९६.००	३५६५
	अद्ययावत किंमत	प्रस्तावित	२०११-२०१२	१२६.५०	९१७७
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत				नाही
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			८६.०७	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी)= ९.३५			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ७४.७९			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = १.९३			
६	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९६	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)			३४.४६	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु..कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२७.२७	४३.९०	१६.६३	१८.०७
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	४.१५	५५.७८	५१.६३	५६.१०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	००.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१०.३४	१०.३४	११.२३
७.५	इतर कारणे	०.००	२.३४	२.३४	२.५४
७.६	इ.टी.पी. वाढ	३.०४	१४.१४	११.१०	१२.०६
	एकूण	**३४.४६**	**१२६.५०**	**९२.०४**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

आंद्र धरण भीमा खो-यातील इंद्रायणी नदीची उपनदी आंद्र नदीवर मौजे मंगरुळ, ता.मावळ जि. पुणे येथे दगडी बांधकामात बांधले असून धरणाची साठवण क्षमता २.९४ अघफु (८३.३१ दलघमी) आहे. सन २००३ मध्ये प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले आहे, इंद्रायणी नदीवरील आस्तित्वातील १३ को.प.बंधारे व प्रकल्पांतर्गत ३ पैकी एका को.प.बंधा-यावरुन खाजगी उपसा सिंचनाद्वारे एकूण ९१७७ हे.सिंचन क्षमता निर्मीती नियोजित आहे.सिंचन क्षमतेपैकी ८३१९ हे. मावळ तालुक्यातील व ८५८ हे. हवेली तालुक्यातील आहे.

सुप्रमा नुसार प्रकल्पाचा एकूण वार्षिक पाणी वापर २.९४ अघफू (८३.३१ दलघमी) आहे. त्यापैकी पिण्यासाठी ०.३४ अघफू (९.६३ दलघमी), औद्योगिक वापर १.०९ अघफू (३०.८८ दलघमी) व सिंचनासाठी १.५१ अघफू (४२.७७ दलघमी) अशी विभागणी आहे.

२.० प्रशासकीय मान्यताः-

प्रकल्पास शासनाकडील दि. १३/३/१९९५च्या पत्रान्वये रु.३४.४६ कोटीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मकृखोविम तर्फे दि.२१/१०/२००२ रोजी रु.९६.०० कोटी किंमतीस प्रथम सुधारीत मान्यता प्राप्त आहे. प्रकल्पाची अद्ययावत किंमत रु.१२६.५० कोटी इतकी अपेक्षित आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाची अद्ययावत किंमत रुपये १२६.५० कोटी असून, मूळ मान्यतेपेक्षा रु. ९२.०४ कोटीने वाढली असुन त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसुचीतील वाढ :-

प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता सन १९९२-९३ च्या दरसूचीवर आधारीत होती. प्रथम सु.प्र.मा.घेताना प्रत्यक्षात झालेला खर्च व उर्वरित घटकासाठी सन १९९९-२००० च्या दरसूचीवर आधारीत सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. या कालावधीमध्ये दरसूचीत वाढ झाली.

धरणाच्या निविदेची किंमत रु.३१.७४ कोटी इतकी होती. निविदा स्विकृत करताना निविदेवरील अधिक्य रु.३.८० कोटी होते. तसेच निविदेचे काम चालू असताना निविदा तरतूदीप्रमाणे रु.५.७५ कोटी भाववाढ देखील अदा करण्यात आली. या सर्व दरसूचीच्या वाढीच्या बाबीमुळे रु.१६.६३ कोटी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

प्रकल्पाचे मूळ मंजूर अंदाजपत्रकात द्वाररहित सांडव्यामुळे ६१४.३० तलांकास ८१० हे. क्षेत्राचे भूसंपादनासाठी रु.४.१४ कोटीची तरतूद होती. सुधारित संकल्पनानुसार द्वारविरहित सांडव्यामुळे ६१४.४५ तलांकास भूसंपादन (खाजगी जमिन ८०२ हे + वन जमिन १३४ हे) अंशी एकूण ९३६ हे. क्षेत्रासाठी भूसंपादन करावे लागले. मूळ अंदाजपत्रकात जमीनीचा दर रु. १३००० प्रति हेक्टर होता. मात्र सरासरी रु.८७००० प्रति हेक्टर दराने संपादन करावे लागल्याने रु.१३.१८ कोटी ची वाढ झाली आहे. विद्युत लाईनचे स्थलांतरामुळे रु. ०.६३ कोटीची वाढ झालेली आहे.

कोडिवडे पूल, पवळे-कल्हाट नविन रस्ता बनविणे व वडेश्वर किवळे पुल यामुळे रु. ७.०८ कोटीची वाढ झाली आहे.

शिरे शेटेवाडी खास बाब पुनर्वसन प्रस्ताव शासनाने दि.९/५/२००५ अन्वये मंजूर केला आहे, त्यासाठी घरांचा मोबदला व नागरी सुविधामुळे रु.४.५४ कोटी वाढ होणार आहे.

वनजमीनीसाठी एन.पी.व्ही.रक्कम व निर्वनीकरणासाठी रु.१२.७९ कोटी वाढ झाली आहे. प्रकल्पग्रस्तांनी निवाडयामध्ये जमीनीची किंमत मान्य नसल्यामुळे न्यायालयीन निकालाप्रमाणे वाढीव किंमत द्यावी लागली त्यामुळे जिल्हा न्यायालयाने वाढीव किंमत (रुपये १३२००० दराने) मंजुर केल्यानुसार अनुक्रमे रु.१३.४१ कोटी जिल्हा न्यायालयात भरण्यात आले आहेत.

अशा प्रकारे भूसंपादन, वनजमीन व पुनर्वसन यासाठी एकुण रु.५१.६३ कोटी वाढ झाली आहे.

३.३० सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढः-

मुळ अहवालामध्ये धरणाचा संकल्पित पूर विसर्ग १०७८५२ क्युसेक्स होता. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी केलेल्या सविस्तर अभ्यासामध्ये तो १०६६६८७ क्युसेक्स इतका झाला. त्यामुळे धरणांची उंची ०.९० मी. ने वाढली. तसेच जलक्षोभंनाशक कुंडाची लांबी १८ मी. वाढली. त्यामुळे खर्चामध्ये रु.०.६८ कोटी इतकी वाढ झालेली आहे. प्रकल्पाचा सांडवा दरवाजाविरहित केल्यामुळे खर्चात रु.३.११ कोटीची वाढ झाली आहे. धरणाचे काटछेदात उर्ध्व भागात दगडी बांधकामाऐवजी ५ मी. रुंदीचे कोलग्राऊट नव्याने प्रस्तावित केल्याने रु.४.१७ कोटीची वाढ झाली आहे. सिंचन तथा विद्युतविमोचकाची तरतूद करण्यात आल्यामुळे खर्चात रु ०.६२ कोटी

एवढी वाढ झाली आहे. पूर्वरचित पूर्वबलित पूलाऐवजी लोखंडी पूल केल्यामुळे १.७६ कोटीची वाढ झाली आहे. वरील संकल्पचित्रातील बदलामुळे रु.१०.३४ कोटींची वाढ झाली आहे.

३.४० ई.टी. पी. व इतर करणामुळे झालेली वाढ :

पर्यावरण मान्यतेसाठी रु. २.३४ कोटी, व अनुषगिक वाढीसाठी रु. ११.१० कोटी अशी एकूण रु. १३.४४ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

सन २००० मध्ये महामंडळाचे अर्थिक टंचाईमुळे कामावर खर्च करु नये व कामे बंद ठेवण्यात यावीत असे आदेश होते, वन जमिनीचे एन.पी.व्हि. रक्कमेचे खर्चाचे शासन परवानगी व अपु-या निधीमुळे रक्कम टप्याने दिली गेली.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :-

प्रकल्पाचे काम २००३ साली पूर्ण झाले आहे. २०१० मध्ये २.९२ अ.घ.फू. पाणीसाठा निर्मिती झाली असून, मागणी प्रमाणे निम्नबाजूच्या को. प. बंधा-या मार्फत सिंचन होत आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :-

प्रकल्पाचा एकूण वार्षिक पाणी वापर २.९४ अघफू आहे. आंद्र धरणाच्या पाण्यामुळे तळेगांव म.औ.वि.महामंडळांतर्गत फुलशेतीसाठी व उद्योगासाठी वापरले जात आहे, त्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे. तसेच खालील बाजूस असलेल्या को.प.बंधा-यामार्फत सिंचनाचा लाभ होत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
कलमोडी मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : कलमोडी	तालुका: खेड		जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५६२२ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३०/४/१९९७	१९९६-९७	५४.३०	५६२२
	सुप्रमा-१	प्रस्तावित	२०११-१२	१७३.१५	५६२२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			५३.८२	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी)=०.९८			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ४८.०५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ४.७९			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९८-९९	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			२०००	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजे किंमत (रू. कोटी)			५४.३०	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	४२.३०	९९.०३	५६.७३	४७.७३
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१.४९	६.२०	४.७१	३.९६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	३७.९८	३७.९८	३१.९५
७.५	इतर कारणे	०	२.६९	२.६९	२.२७
७.६	आस्थापना (इ.टी.पी. मुळे) झालेली वाढ	१०.५१	२७.२५	१६.७४	१४.०९
		५४.३०	**१७३.१५**	**११८.८५**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :

कलमोडी प्रकल्पांतर्गत आरळा नदीवर १.५१ अब्जघनफुट क्षमतेचे धरण बांधुन त्यातून चासकमान प्रकल्पांच्या धरणात पाणी सोडुन चासकमान डाव्या कालव्यावरुन उपसा योजनेद्वारे आंबेगाव तालुक्यातील ३८१८ हेक्टर व खेड तालुक्यातील १८०४ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती करणेचे नियोजन आहे.

कलमोडी धरण दगडी बांधकामात असुन धरणाचे काम एप्रिल-२००० मध्ये सुरु झाले व सन २०१० मध्ये पूर्ण झाले. कलमोडी प्रकल्पांतर्गत सातगाव पठार उपसा सिंचन योजने द्वारे ०.८७ अघफू. पाणी उचलून, पहिल्या टप्प्यात खेड तालुक्यातील १८०४ हे. पीक क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टप्पा क्र. २ व ३ नंतर बोगद्यातून वेळ नदीत पाणी सोडून, वेळ नदीवरील आस्तित्वातील ४ व प्रकल्पांतर्गत नविन बांधकाम केलेले ९ असे एकुण १३ कोल्हापूर पध्दतीचे बंधा-याद्वारे ३८१८ हे. पीक क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्पीय सिंचन क्षमतेपैकी आंबेगाव तालुक्यातील वेळ नदीवर बांधण्यात आलेल्या नविन ९ को.प.बंधा-यांद्वारे २७९१ हे. इतकी रब्बी हंगामामध्ये सिंचन निर्मिती झाली असुन, सद्या ९१ हे. क्षेत्र रब्बी हंगामामध्ये सिंचनाखाली आले आहे. प्रकल्पावर मार्च-२०१२

अखेर रु.५३.८२ कोटी खर्च झालेला आहे. सातगांव पठार उपसा सिंचन योजनेचे काम अद्याप सूरु झालेले नाही.

२.० प्रशासकीय मान्यता

प्रकल्पास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे निर्णय क्र.आरळा (कलमोडी)/ प्रशा-२/(२९७)/(३०३/९७) दि.३०/४/१९९७ अन्वये रु.५४.३० कोटी (दरसूची १९९६-९७) प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे. प्रकल्पाची अद्ययावत किंमत रु.१७३.१५ कोटी (सन २०११-१२ दरसूचीनुसार) इतकी आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे :-

प्रकल्पाची अद्यायावत किंमत रु. १७३.१५ कोटी आहे. मुळ प्रशासकिय मान्यतेपेक्षा ही किंमत ११८.८५ कोटीने वाढली असून त्यांची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :-

मुळ प्रशासकिय मान्यता सन १९९६-९७ चे दरसूचीवर अधारित होती. त्यांनंतर सन २००० मध्ये दगडी धरणाचे बांधकाम हाती घेण्यात आले, ते सन २०१० मध्ये पूर्ण झाले. या कालावधीत दरसुचीवाढ व भाववाढी मुळे किंमतीमध्ये २२.०३ कोटी इतकी वाढ झाली. उपसा सिंचन योजनेचे काम अद्याप हाती घेण्यात आले नाही. दरसूचीवाढीमुळे किंमतीमध्ये ३४.७० कोटी वाढ झाली आहे. दरसूचीवाढीमुळे एकुण ५६.७३ कोटी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, खर्चातील वाढ :-

मुळ अहवालामध्ये प्रकल्पासाठी एकुण २९२ हे. क्षेत्र संपादीत करण्याचे नियोजन होते. त्यासाठी सरासरी रु.१.१० लक्ष प्रति हेक्टरी दराने १.४९ कोटी इतकी तरतुद होती. भूसंपादन क्षेत्रात वाढ झालेली नाही. तथापी जमीनीचे दर रु.४.८० लक्ष प्रति हेक्टरी झाल्याने भूसंपादनासाठी आता रु.६.२० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे भूसंपादनात रु.४.७१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-

मुळ अहवालामध्ये धरणाचा संकल्पित पूर विसर्ग ६५७.३८ क्युमेक्स होता. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी केलेल्या सविस्तर अभ्यासामध्ये तो ९६३.२१ क्युमेक्स इतका झाला. त्यामुळे धरणांची उंची १ मी. ने वाढली. तसेच जलक्षोभंनाशक कुंडाची लांबी १४ मी. वाढली. त्यामुळे खर्चामध्ये रु.४.५५ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

मुळ प्रकल्प अहवालामध्ये सिंचन क्षमता निर्मिती उघडया कालव्याद्वारे नियोजित होती. तथापी प्रकल्पांचे लाभक्षेत्र डोंगराळ भागात असल्याने कालव्यातून होणारी संभाव्य गळती व कालव्यांची किंमत कमी करण्यासाठी कालवे व वितरण व्यवस्था बंद पाईपद्वारे प्रस्तावित करण्यांत आली. त्यामुळे रु.१७.०५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

उपसा योजनेच्या टप्पा क्रं. ३ ते वेळ नदी दरम्यान बोगदा प्रस्तावित आहे. मुळ अहवालामध्ये प्रस्तावित सातगांव पठार उपसा सिंचन योजनेची उंची २९१.७१ मी. व पंपाची एकुण अश्वशक्ती १०७०० एच पी. होती.सविस्तर सर्वेक्षणानंतर योजनेची उंची कमी करणे शक्य असल्याचे निदर्शनास आल्याने भविष्यांत वीज खर्च व देखभालीचा खर्च कमी करण्यासाठी योजनेची एकुण उंची २४८.७४ मी. व अश्वशक्ती ६५२६ एच.पी इतकी करण्यांत आली. त्यामुळे बोगदयांच्या लांबीत ९१० मी. वाढ होऊन खर्चात ५.५१ कोटी वाढ झालेली आहे.

पाणी सोडण्यासाठी शिर्षे विमोचकांची मूळ प्रकल्प अहवालामध्ये रु.०.४० कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रकल्प अहवालामध्ये आवश्यकतेनुसार ही तरतूद रु.९.१० कोटी इतकी आहे. त्यानुसार रु.८.७० कोटी वाढ झाली आहे.

मुळ प्रकल्प अहवालामध्ये सांडव्यावर आवश्यकते नुसार पूर्वरचित पूर्वबलित पुलाऐवजी लोखंडी पुलाची तरतूद करण्यांत आली. त्यामुळे खर्चामध्ये रु.२.१७ कोटी इतकी वाढ झाली.

संकल्पचित्रातील बदलामुळे एकूण वाढ रु. ३७.९८ कोटी इतकी आहे.

३.४ ई.टी. पी. व इतर कारणामुळे झालेली वाढ :-

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत दोन को. प. बंधा-यांच्या कामात रु. ०.५५ कोटी, गौण खनिजा करिता रु. ०.६४ कोटी, धरणाच्या पोहच रस्त्याकरिता रु. १.३८ कोटी व इतर अनुषगिक कामाकरिता रु. ०.१२ कोटी अशी इतर कारणामुळे एकूण वाढ रु.२.६९ कोटी इतकी आहे. तसेच इटीपी मुळे रु. १६.७४ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

अ) अपु-या निधीमुळे झालेला विलंब:-

धरणांच्या कामास सन २००० मध्ये सुरुवात झली. त्यानंतर सन २००५ पर्यंत अपु-या निधीमूळे काम जवळपास बंद होते. सन २००७ ते २०१० मध्ये निधी उपलब्ध झाल्यानंतर धरणाचे काम सन २०१० मध्ये पुर्ण झाले. तथापी उपसा सिंचन योजनेच्या व कालव्याच्या कामास निधी नसल्याने अद्यापपर्यंत ती कामे हाती घेता आली नसल्याने विलंब झालेला आहे.

ब) सातगांव पठार उपसा सिंचन योजनेचे पंपगृह चासकमान डाव्या कालव्यावर आहे. चासकमान प्रकल्पांच्या प्रकल्पबांधीताचे पुनर्वसनाचे प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटले नसल्याने त्यांनी सातगांव पठार उपसा सिंचन योजनेच्या कामास विरोध केला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :-

जून २०१० अखेर धरणाचे काम पूर्ण झाले असून, धरणामध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणेत येत आहे.

प्रकल्पांतर्गत सातगाव पठारावरील (ता.आंबेगांव) वेळ नदीवर नविन ९ को.प.बंधा-यांची कामे पूर्ण करणेत आली आहेत. त्याव्दारे ९१ हे. क्षेत्रास रब्बी हंगामात सिंचनाचा लाभ होत आहे.

खेड तालुक्यातील शेतक-यांनी चासकमान प्रकल्पाचे पुनर्वसन प्रश्न सोडविणे, बंद पाईप लाईन ऐवजी कालव्याद्वारे पाणी द्यावे, रायझिंग मेनचे बाजूस असलेल्या रस्त्यासाठीचे भुसंपादनास विरोध या कारणासाठी ३० एप्रिल २०१२ पासून सातगाव पठार उपसा सिंचन योजनेच्या रायझिंग मेन सर्वेक्षणाचे काम बंद पाडले आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :-

अस्तित्वातील ९ को.प.बंधा-याद्वारे ९१ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होतो. चासकमान धरणाचे पुर्नभरणासाठी कलमोडी धरणामध्ये १.०७ टि.एम.सी. पाणीसाठा निर्मिती झाली असून त्यांचा सन २०१० पासून वापर होत आहे. बुडीत क्षेत्रालगतच्या ६ गावांना पिण्याच्या पाण्याकरिता लाभ होत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
चिल्हेवाडी मध्यम प्रकल्प, जिल्हा पुणे

१	प्रकल्पाचे नांव : चिल्हेवाडी मध्यम प्रकल्प		तालुका : जुन्नर	जिल्हा : पुणे	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (पीकक्षेत्र) :-		७४५५ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) : १०७०	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील		दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मूळ प्रशासकीय मान्यता		०६/०८/१९९७	१९९६-९७	१२३.६३	७४५५
	सुप्रमा-१		२५/०५/२०१०	२००७-०८	१९४.२३	७४५५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु. कोटी)				नाही.	
५.	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)				११३.२९	
	५.१	भू-संपादन , पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	= ८.७३			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	= १०४.५६			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी)	= ०.००			
६.	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९८	
६.१	प्रकल्पाचे काम सुरु झाल्याचे वर्ष				१९९८	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किमंत (रु.कोटी)				१२३.६३	

७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे			(रु.कोटी)	
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटंकाची किंमत)	९८.१७	११४.९२	१६.७५	२३.७२
७.२	भूसंपादन खर्चातील वाढ	१.४३	१८.०३	१६.६	२३.५१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	४९.९	४९.९	७०.६८
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.५	ई. टी. पी. व इतर कारणां मुळे झालेली बचत	२४.०३	११.३८	-१२.६५	-१७.९१
एकूण		**१२३.६३**	**१९४.२३**	**७०.६०**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :- चिल्हेवाडी धरण हे जुन्नर तालुक्यात मांडवी नदीवर आहे. चिल्हेवाडी प्रकल्पामध्ये ०.९६ अ.घ.फू. चे धरण व ४४.३० कि.मी. च्या कालव्याद्वारे जुन्नर तालुक्यातील ७४५५ हे. क्षेत्रास पाणी देण्याचे नियोजन आहे. धरणाचे काम सन २००४ मध्ये पूर्ण झाले आहे. तथापि वन जमीन संपादनापोटीची रु. १०.८३ कोटी पैकी रु. ८.८३ कोटी भरणे निधी अभावी प्रलंबित असल्याने सध्या सांडवा पातळीपर्यंत ०.६१ अ.घ.फू. पाणीसाठा करण्यात येत आहे. तसेच निधी अभावी कालव्याची कामे सुरु केलेले नाहीत.

२.० प्रशासकीय मान्यता :- चिल्हेवाडी प्रकल्पास रु.१२३.६३ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता म.कृ.खो.वि.म.यांनी दिनांक ०६/०८/१९९७ रोजी दिली. त्यानंतर बंद पाईप कालव्यासह शासनाने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता रू.१९४.२३ कोटी रक्कमेस दिनांक २५/०५/२०१० रोजी दिली.

३.० **किंमत वाढण्याची कारणे** : — प्रकल्पाची सुधारीत किंमत रू.१९४.२३ कोटी आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किमंत रू.७०.६० कोटीने वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे

३.१ **दरसुचीतील वाढ** :- चिल्हेवाडीची मुळ प्रशासकीय मान्यता दरसुची सन १९९६-९७ वर आधारीत होती. सुधारीत अद्ययावत किंमत सन २००७-०८ दरसुचीप्रमाणे काढण्यात आली आहे. या ११ वर्षातील दरसुची बदलामुळे रू. १६.७५ कोटीची वाढ झालेली आहे.

३.२ **भूसंपादन पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ** :- भूसंपादन व वन जमीनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ रू. १६.६० कोटी आहे.

अ) खाजगी जमीन संपादन :- मूळ प्रकल्प अहवालामध्ये १०७ हे. क्षेत्रासाठी रु. १.४३ कोटीची तरतुद होती. सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये ६८.८६ हे. क्षेत्रासाठी रु.७.२० कोटी तरतुद असुन त्यामळे रु. ५.७७ कोटी वाढ झाली आहे.

ब) वन जमीन संपादन :- मुळ प्रकल्प अहवालात वन जमीन संपादन तरतुद नव्हती. या प्रकल्पासाठी ५४.१६ हे. वन जमीन लागणार असुन त्याचे नक्त वर्तमान मुल्य (N.P.V.) साठी रु. ५.२० कोटी व पान वहळ प्रकियेसाठी (C.A.T.PLAN) रु. ५.८१ कोटी असे एकूण रु. १०.८३ कोटीची तरतुद आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. १०.८३ कोटीची वाढ झालेली आहे.

३.३ **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ** :- मुळ प्रकल्प अहवालामध्ये ३० कि.मी.लांबीच्या उघड्या कालव्याची तरतूद होती. सुरवातीचा कालवा डोंगराच्या कडेने व नदीच्या जवळून जात होता. तसेच सदर ठिकाणची भौगोलीक परिस्थिती ही उघड्या कालव्यासाठी योग्य नाही. सुरवातीच्या १५ कि.मी. पर्यंत लाभक्षेत्र सुध्दा अत्यल्प आहे. त्याचप्रमाणे याभागात कालव्यासाठी भुसंपादन करण्यास शेतकऱ्यांचा विरोध होता. या भागात रोहकडी, ओतुर, आंबेगव्हाण येथे तीन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असुन त्यामार्फत सिंचन होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध होता. जुन्नर तालुक्याचे आमदार तथा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष श्री वल्लभ बेनके यांचे मागणीनुसार नियामक मंडळाच्या दिनांक २३/०५/२००७ रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीत चिल्हेवाडी डावा कालवा बंदीस्त पाईप लाईन मधून काढण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या बदलामुळे रु. ४९.९० कोटी वाढ झाली.

४.० **प्रकल्पाच्या विलंबाची कारणे : -**

४.१ **भूसंपादनास विरोधः-** उघड्या कालव्याच्या भुसंपादनास शेतकऱ्यांचा विरोध असल्याने बंदिस्त पाईपलाईन कालवा प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळेपर्यंत सन २००० ते २०१० या कालावधीत विलंब झाला. सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर संकल्पनास व अंदाजपत्रकास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया चालु आहे.

४.२ **अपुरा निधी :-** सन २००४ ते २०१२ या कालावधीत प्रकल्पास अत्यल्प निधी प्राप्त झाला त्यामुळे वन जमीनीची रक्कम अदा न केल्याने पुर्ण पाणीसाठा करता आला नाही व प्रकल्पाच्या कालव्याची कामे सुरु केलेली नाहीत.

५.० **प्रकल्पाची सद्यस्थिती :-** धरणाचे काम १०० टक्के पुर्ण झाले असुन ०.९६ अ.घ.फू. साठवण क्षमता निर्माण झाली मात्र वन विभागास एन.पी.व्ही. पोटी रु. ८.८३ कोटी रक्कम भरणे प्रलंबित असल्यामुळे वन विभागाच्या विरोधामुळे धरण सांडवा पातळी पर्यंत ०.६१ अ.घ.फू. इतकाच पाणीसाठा करण्यात येत आहे. निधी अभावी कालव्याचे कामे सुरु झाले नाही.

६.० **प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :-** प्रकल्पामुळे ०.६१ अ. घ.फु. पाणी साठा होत असून १०७० हे. पीक क्षेत्र सिंचन निर्मीती होत आहे. जलाशयातील संपुर्ण साठयाचा वापर नदीवरील उपसा सिंचनाद्वारे तसेच येडगाव जलाशयातून कुकडी कालव्या द्वारे होत आहे.

प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. १९४.२३ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत रु. २.६० लक्ष प्रति हेक्टरी व लाभव्यय गुणोत्तर १.१० आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
कुडाळी मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव- कुडाळी मध्यम प्रकल्प	तालुका – जावली			जिल्हा - सातारा
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)-	८५२३ हे.		निर्मित सिंचन क्षमता (हे.) जून -२०१२ – निरंक	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रू.कोटीं)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	०६-०८-१९९६	१९९३-९४	६३.४६	८२६४
	सुप्रमा-१	०६-११-२००७	२००५-०६	२७१.७९	८५२३
	प्रकल्पाची अद्यावत किंमत	प्रस्तावित	२००९-१०	४४९.२१	८५२३
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (रू.कोटी)	केंद्रीय जल आयोगाचे इंग्रजी पत्र क्र. १६/२७/ २००८ पी.ए.(एन)/ ८२८ -६० दि.१६/६/२००८	२००५-०६	२७१.७९	८५२३
५	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रू. कोटी)				२५२.२७
	५.१) भूसंपादन / पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) = २५.३४				
	५.२) बांधकामावरील खर्च (रू.कोटी) = २०१.९१				
	५.३) इटीपी खर्च (रू.कोटी) = २५.०२				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९६-९७
	६.१) प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष				१९९७
	६.२) त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रू.कोटी)				६३.४६
७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रू.कोटी)				
	बाब	मूळ तरतूद	अद्यावत तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	४८.२०	१९५.८६	१४७.६६	३८.२८
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	३.३९	४७.४१	४४.०२	११.४१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	५६.२८	५६.२८	१४.५९
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेल वाढ	०.००	७४.४९	७४.४९	१९.३१
७.५	इतर कारणे	०.००	१५.२१	१५.२१	३.९४
७.६	इ.टी.पी.मुळे झालेली वाढ	११.८७	५९.९६	४८.०९	१२.४७
	एकूण	**६३.४६**	**४४९.२१**	**३८५.७५**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती –

कुडाळी प्रकल्पांतर्गत महू येथे कुडाळी नदीवर महू धरण व हातगेघर नाल्यावर हातगेघर धरण अशी दोन धरणे नियोजित आहेत. महू धरण १.१० अ.घ.फू. व हातगेघर धरण ०.२६ अ.घ.फू. असून एकूण पाणीसाठा १.३६ अ.घ.फू. प्रस्तावित आहे. या प्रकल्पाची नियोजित सिंचन क्षमता ८५२३ हे. आहे.

महू व हातगेघर धरणांची मातीकामे ९८ टक्के पूर्ण झालेले असून.आजअखेर धरणांमध्ये एकूण ०.९१६ अ.घ.फू. इतका पाणीसाठा झालेला आहे. पुनर्वसनाच्या विलंबामुळे धरणांची कामे अपूर्ण आहेत.

कुडाळी प्रकल्पामध्ये कुडाळी उजवा कालवा कि.मी. १ ते ३२, डावा कालवा कि.मी. १ ते १७ व भरण कालवा कि.मी. १ ते ३, महू - हातगेघर धरणाचे वरचे बाजूस ४ उपसा सिंचन योजना (रांजणी, दापवडी, कावडी, विवर) याव्दारे एकूण ८५२३ हे. पिकक्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

२.० प्रशासकीय मान्यता –

कुडाळी मध्यम प्रकल्पास रू.६३.४६ कोटी किंमतीस शासनाने दि. ६/०८/१९९६ रोजी मान्यता दिली. त्यानंतर रू. २७१.७९ कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दि.६/११/२००७ रोजी दिली असून प्रकल्पाची अद्ययावत किंमत रू. ४४९.२१ कोटी असून त्या बाबतचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे कडे दिनांक ११/२०११ मध्ये तांत्रिक तपासणीसाठी सादर झालेला आहे.

३.० किंमत वाढण्याची कारणे –

प्रकल्पाची सुधारित किंमत मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रू. ३८५.७५ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ-

मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९३-९४ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २००९-१० च्या दरसूचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे. या १७ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रू. १४७.६६ कोटी आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीमुळे झालेली वाढ-

मूळ प्रशासकीय अहवलात ३५६ हे. जमिनीचे संपादन करणेचे प्रस्तावित होते, त्यासाठी रू. ३.३९ कोटीची तरतूद होती. अद्यावत प्रस्तावामध्ये ४३४.८६ हे. इतकी जमीन संपादन करावी लागणार असून त्यासाठी रू. ४७.४१ कोटी आवश्यक आहेत. त्यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रू. ४४.०२ कोटी वाढ झाली आहे.

३.३ प्रकल्प व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ –

अ) मूळ प्रशासकीय अहवालामध्ये १६ को. प. बंधारे कुडाळी नदीवर बांधून सिंचन करण्याचे नियोजित होते. त्याऐवजी प्रवाही सिंचनाकरिता कालव्यांची तरतूद करण्याची मागणी तात्कालीन आमदार मा. सदाशिवराव सपकाळ व धरणग्रस्त संघर्ष समिती यांनी दि. २४/०९/१९९७ रोजी

करण्यात आली होती, त्यास महामंडळाने पत्र क्र. मकृखोविम/प्रशा-२/ कुडाळी/(२९७)/(२८८/९७) दि.९/०४/१९९७ अन्वये प्रवाही सिंचनास मंजूरी देण्यात आली.

ब) कृष्णा पाटबंधारे टप्पा २ चे पाणी वापरानुसार जावली तालुक्यासाठी उपलब्ध झालेले १.४२ अ.घ.फू. पाणी पूर्णपणे जावली तालुक्याकरिताच वापरावे अशी मागणी तात्कालीन आमदार मा. सदाशिवराव सपकाळ व धरणग्रस्त संघर्ष समिती यांनी दि.१३/०५/१९९७ रोजी केली, त्यास महामंडळाने पत्र क्र. मकृखोविम/प्रशा-७/ कुडाळी/(२९७)/(२८८/ ९७) दि.५/११/१९९७ अन्वये मंजूरी देण्यात आली.

क) धरणाच्या बुडीत क्षेत्रावरील जमीनींसाठी उपसा सिंचन योजनेव्दारे सिंचन करणेसाठी धरणग्रस्त व संघर्ष समितीच्या मागणीनुसार शासन खर्चाने महू व हातगेघर धरणाचे वरील बाजूस अनुक्रमे रांजणी, दापवडी, कावडी व विवर या उपसा सिंचन योजनांना महामंडळाने जावक पत्र क्र. मकृखोविम/२९७/(२८८/९७)मप्र-१/४७३५ दि.१९/०५/२००० अन्वये मंजूरी दिली आहे.

ड) शासकीय धोरणानुसार आता सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक करणे. व धरणाचे खंदकामध्ये मड गनायटिंग व नव्याने प्रस्तावित रॉयल्टी चार्जेसमुळे वाढ झाली.
उपरोक्त अ ते ड मुळे एकूण रू. ५६.२८ कोटीची वाढ झाली आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-

अ) मूळ प्रशासकीय मान्यता अहवालातील धरणाच्या काटछेदास सविस्तर संकल्पनानुसार बदल झाला त्यास मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचेकडून मुल्यार्पित करण्यात येवून, मुख्य अभियंता (वि.प्र.) यांचे पत्र जा.क्र. मु.अ.(विप्र)/प्रशा/उवि-५/८/८७/भाग-११/१५६१/२००० दि.१४/०२/२००० अन्वये मान्यता घेणेत आली आहे.

ब) सविस्तर संकल्पनानुसार महू धरणांच्या सांडव्याची लांबी २७ मी. वरून ४१ मी. झाली आहे. त्यामुळे महू धरणांचे वक्र दरवाजे संख्येत वाढ झाली आहे. (दोन ऐवजी तीन) तसेच सांडव्याचे पाया पातळीत बदलामुळे खोदकामात वाढ झालेली आहे. या बदलास मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचेकडून मूल्यार्पित करून त्यास मुख्य अभियंता (वि.प्र.) यांचे पत्र जा. क्र. मु.अ.(विप्र)/प्रशा/उवि-५/८/८७/६४८८ दि. ३/०८/१९९९ अन्वये मान्यता घेणेत आली आहे..

क) महू धरणाच्या पूच्छ कालव्याचे संकल्पन सुधारित केल्यामुळे त्यास मुख्य अभियंता (वि.प्र.), पुणे यांचे पत्र जा.क्र. मु.अ.(वि.प्र.)/उअ-२/प्रशा-६/२९१२/२००९ दि. २७/०५/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
वरील संकल्पन बदलामुळे प्रकल्पाच्या खर्चात एकूण रू. ७४.४९ कोटी वाढ झाली आहे.

३.५ इतर कारणामुळे झालेली वाढ -

अ) मूळ अहवालातील अपुऱ्या तरतूदी उदा. तांत्रिक सल्लागार सेवा, विद्युत वाहिनी स्थलांतर यामुळे झालेली वाढ इ.- रू. १५.२१ कोटी वाढ झाली आहे.

ब) इ.टी.पी.मुळे रू. ४८.०९ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

४.१ पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब -

अ) महू व हातगेघर धरणामुळे एकूण १० बाधित गावातील १३३४ खातेदारांना खंडाळा व फलटण तालुक्यातील १४ पुनर्वसित गावठाणांमध्ये एकूण २२७० भूखंड देय असून त्यापैकी ४८७

खातेदारांना १२२८ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित ८४७ खातेदारांना भूखंड वाटप करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

ब) त्याचप्रमाणे १३३४ खातेदारांना लाभक्षेत्रामध्ये १२२८ हे. पर्यायी शेतजमीन देय असून ९८२ खातेदारांना ८९४.५० हे. शेतजमीनीचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित ३५९ खातेदारांना ३६८.०७ हे. इतक्या पर्यायी शेतजमीनीचे वाटप करण्याची कार्यवाही महसूल खात्याकडून प्रलंबित आहे.

क) वरिल कारणामुळे प्रकल्पग्रस्तांनी धरणाचे काम वेळोवेळी बंद पाडले. तसेच कालव्याची सुरवातीची कामे बंद पाडली आहेत. त्यामुळे निर्धारित सिंचन क्षमता निर्माण झाली नाही.

४.२ **अपुरा निधी –**

प्रकल्पातील धरणांची कामे सन १९९७ मध्ये सुरू झाली. प्रकल्पास सन २००१ पर्यंत निधी उपलब्ध झाला परंतू सन २००१ ते २००८ अखेर पूरेसा निधी उपलब्ध नसलेने प्रकल्पाचे काम बंद होते. तद्नंतर अल्पप्रमाणात निधी उपलब्ध होत असून प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती –

- **धरण –**

कुडाळी प्रकल्पांतर्गत महू व हातगेघर ही दोन धरणे असून त्यांचे मातीकाम ९८ टक्के, सांडवा काम ७० टक्के तसेच विमोचकाची ९० टक्के कामे पूर्ण होऊन ०.९१३ अ.घ.फू. पाणीसाठा निर्माण झाला आहे.

- **मुख्य कालवे / शाखा कालवे सद्यस्थिती --**

कुडाळी प्रकल्पामध्ये डावा कालवा १७ कि.मी., उजवा कालवा ३२ कि.मी. व भरण कालवा ३ कि.मी. असून सुरूवातीचे कि.मी. १ वगळता (भूसंपादनाच्या अडचणीमुळे) उर्वरीत कालव्याची ४० टक्के मातीकामे पूर्ण झाली आहेत.

प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.४४९.२१ कोटी असुन प्रति हेक्टरी किंमत ५.२७ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.७४५ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
मोरणा (गुरेघर) मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचेनांव : **मोरणा (गुरेघर)**	तालुका:पाटण		जिल्हा : सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे) पीक क्षेत्र	५४२३	निर्मित सिंचन क्षमता (पीक क्षेत्र) जुन.२०१२ अखेर २३५ हे		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे) मध्ये
	मुळ प्रशासकीय मान्यता	२३/९/१९८२	१९८०-८१	६.२६	५४२३
	सुप्रमा-१	३१/१/१९९६	१९९३-९४	३६.१६	५४२३
	सुप्रमा-२	२२/१/२००४	२००३-०४	११८.०३	५४२३
	सुप्रमा-३	३०/५/२००९	२००५-०६	१२९.६४	५४२३
	प्रस्तावित अद्ययावत किंमत	-	२००९-१०	२२७.७८	५४२३
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय नियोजन आयोग न्यु.दिल्ली यांचे पत्र एफ दि. २०/०९/२००७		१२९.६४	
५	दि.३१.०३.१२ अखेर खर्च (रु.कोटी)			१०७.६२	
५.१	भूसंपादन पुर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ७.३५				
५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ८७.६४				
५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = १२.६३				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९७	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)			४७.००	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
	बाब	मुळ तरतूद	अदयावत किंमत	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाची किंमत)	५.९२	१००.५०	९४.५८	४२.६९
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.२८	१५.७६	१५.४८	६.९९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२.२६	२.२६	१.०२
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४०.९६	४०.९६	१८.४९
७.५	इतर कारणे	०.००	२६.०२	२६.०२	११.७५
७.६	इटीपी मध्ये झालेली वाढ	०.०६	४२.२८	४२.२२	१९.०६
	एकुण	**६.२६**	**२२७.७८**	**२२१.५२**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : मोरणा (गुरेघर) हा प्रकल्प सातारा जिल्हयातील मोरणा नदीवर पाटण तालुक्यातील गुरेघर गावाजवळ आहे धरणाचा पाणीसाठा ३९.५५ द.ल.घ.मी. (१.३९६ अ. घ. फु) असुन

प्रकल्पाचे एकुण पिकक्षेत्र ५४२३ हे. आहे. (पाटण तालुका ५१८२ हेक्टर व कराड तालुका २४१ हे) मोरणा डाव्या कालव्याचे पिकक्षेत्र ११५६ हे. आहे व उजव्या कालव्याचे पिकक्षेत्र ४२६७ हे. आहे.

धरणाचे काम पुर्ण झाले असुन धरणात सन २०१० पासून ३९.५५ द.ल.घ.मि. (१.३९६ अ. घ. फु) पाणीसाठा निर्माण झाला आहे. मोरणा डाव्या कालव्याची लांबी १७ किमी असून मोरणा उजव्या कालव्याची लांबी ३० किमी आहे. मोरणा डावा व उजवा कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

२.० प्रशासकिय मान्यंता व सुधारीत प्रशासकिय मान्यता - मोरणा प्रकल्पास दिनांक २३/०९/१९८२ रोजी रु ६.२६ कोटी रक्कमेस शासनाने मूळ प्रशासकीय मान्यता दिली होती. परंतु वन जमीन अडचणी मुळे काम सुरु न झाल्याने शासनाने प्रथम प्रशासकीय मान्यता रु. ३६.१६ कोटी इतक्या रक्कमेस दि. ३१/१/१९९६ रोजी दिली आहे. तद्नंतर द्वितीय सुधारीत मान्यता म.कृ.खो.वि.मं. यांनी रु.११८.०३ कोटी रूपयास दि. २२.०१.२००४ रोजी दिली आहे. तृतीय सुधारीत मान्यता शासनाकडून रु.१२९.६४ कोटी इतक्या रक्कमेस दि.३०.०५.२००९ रोजी मिळाली आहे. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण खर्च रूपये १०७.६२ कोटी इतका झाला आहे. प्रकल्पाची अद्ययावत किंमत रु.२२७.७८ कोटी असून, चतुर्थ सुप्रमा राज्यतांत्रिक समिती, नाशिक यांना ८/२०११ मध्ये सादर झाला आहे.

३.० मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे -

३.१ दरसुचीतील वाढः- मूळ प्रशासकीय मान्यता सन १९८०-८१ या दरसूचीवर आधारित होती. सुधारित किंमत सन २००९-१० च्या दरसूचीवरुन काढण्यात आली आहे. या २९ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ ९४.५८ कोटी असून, ती एकूण वाढीच्या ४२.६९ टक्के इतकी आहे.

३.२ भुसंपादन, पुनर्वसन व वनजमिनीमुळे झालेली वाढः- अ)प्रकल्पास मूळ प्रशासकिय मान्यंता अहवाला प्रमाणे भुसंपादनास रु ०.२८ कोटीची तरतुद असुन, प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रात ६१.२२ हे इतके वनक्षेत्र बाधित होत असल्याने वन जमिन हस्तांरणास केंद्र शासनाकडून पत्र क्र.४-७९/८४ दि.२४-१-१९९६ अन्वये अंतिम मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे १४ वर्ष प्रकल्पाचे काम सुरु करता आले नाही. मूळ प्रशासकीय अहवाला मध्ये ६२७.२७ हेक्टर क्षेत्र संपादित करणे प्रस्तावित होते. अद्ययावत सुप्रमा अहवाला मध्ये ७०९.२२ हे. क्षेत्र संपादित करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु.१५.७६ कोटी आहे.

ब)वाढीव नागरी सुविधामुळे रु.०.७३ कोटी, उदरनिर्वाह भत्यामुळे रु.०.३४ कोटी, घरबांधणी अनुदानामुळे रु. ०.४५ कोटी, बुडीत क्षेत्रातील पर्यायी जमिनीची किंमत रु.३.६६ कोटी, बुडीत क्षेत्रातील पर्यायी रस्त्याचे काम रु३.५० कोटी, अशी एकूण रु.८.६८ कोटी वाढ झाली

क) वनजमिनीमुळे रु.०.१९ कोटी व जमिन भुसंपादनास विलंब झाल्यामुळे रु.६.६१ कोटी अशी एकूण रु.६.८० कोटी वाढ झाली. अद्यायावत सुप्रमा मध्ये रु.१५.७६ कोटीची तरतुद केली आहे.त्यामुळे एकुण रु.१५.४८ कोटी वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ - मूळ प्रकल्प अहवालामध्ये सिंचन विमोचक बांधण्याची तरतुद होती. तथापि शासनाच्या सुधारीत धोरणानुसार विद्युत निर्मितीसाठी सिंचन तथा विद्युत विमोचक बांधण्याची तरतुद करण्यात आली. तसेच जलरोधी खंदकाच्या सा.क्र ०/४२० ते ०/४४० मी. या भागामध्ये डायफ्राम भिंत बांधावी लागली. तसेच पुच्छ कालव्यात ५ प्रपात बांधण्याचा काम प्रस्तावित करण्यात आले. त्यामुळे रु.२.२६ कोटी इतकी वाढ झाली आहे. प्रत्यक्ष क्षेत्रिय सर्वेक्षणानंतर आवश्यकता असलेने व मुळ प्रकल्प अहवालात अपु-या तरतुदी असलेने या नविन बाबी समाविष्ट झालेल्या आहेत. सदर वाढ ही संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली आहे. तथापि सुप्रमा अहवालात व्याप्तीतील बदल म्हणून दर्शविण्यात आला आहे.

३.४ सविस्तर संकल्पचित्रात /तंत्रिक बदलामुळे झालेली वाढ :--अ) जलरोधी खंदकामध्ये कठीण खडक खोल अंतरावर लागल्यामुळे परिमाण वाढले व प्रकल्पाचे ठिकाण भुकंप प्रवण क्षेत्र क्र २ मधून भुकंप प्रवण क्षेत्र क्र ४ मध्ये गेल्यामुळे धरणाचा काटछेद सुधारीत करावा लागला. सुधारित काटछेदास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून व्हेटिंग केलेले आहे. त्यामुळे रु.१३.११ कोटी वाढ झालेली आहे.

ब) धरणाच्या सांडव्या करिता सविस्तर संकल्पनाप्रमाणे (Divide wall, Guide wall, Key Wall) ची तरतूद,सांडवा कोलग्राऊट मध्ये बांधण्याची तरतुद, व पुच्छ कालव्यावरील ५ प्रपातांच्या कामाची तरतूद केल्याने किंमतीत रु.१४.२८ कोटी वाढ झालेली आहे.

क)सिंचन विमोचक बांधण्याचे मूळ प्र.मा.मध्ये प्रस्तावित होते. तथापि शासनाच्या धोरणानुसार विद्युत निर्मितीसाठी सिंचन तथा विद्युत विमोचक बांधण्याची तरतूद करुन पेनस्टॉक पाईप वापरुन त्याच्या बाजूने संधानक करावे लागल्यामुळे व धरणाच्या ठिकाणी बोगद्यासाठी कठिण खडक उपलब्ध नसल्याने सिंचन तथा विघुत विमोचकाचे काम कट ॲड कव्हर पध्दतीने करावे लागल्यामुळे परिमाण वाढले. त्यामुळे रु.२.९३ कोटी वाढ झालेली आहे.

ड) मोरणा डावा व उजव्या कालव्याचे सविस्तर सर्व्हेक्षण व संकल्पन झालेनंतर केलेल्या सविस्तर अंदाजपत्रकानुसार तरतूद केल्यामुळे रु.१०.६४ कोटी वाढ झाली आहे. अशी एकूण वाढ रु.४०.९६ कोटी झाली आहे.

३.५ इतर कारणांमुळे झालेली वाढ :-

अ) अपुऱ्या तरतूदीमुळे झालेली वाढः- कालव्याचे सविस्तर सर्व्हेक्षण केल्यानंतर केलेल्या कालव्याच्या अंदाजपत्रकानुसार मातीकामाची किंमतची तरतूद केल्यामुळे व कालव्यावरील बांधकामाची संख्या वाढल्यामुळे रु.१६.५७ कोटी वाढ झाली आहे.

ब) नवीन तरतुदीमुळे झालेली वाढ :- सविस्तर सर्व्हेक्षणानंतर मुख्य कालव्यास छेदुन जाणाऱ्या नाल्यावरील बांधकामाची संख्या, थेट विमोचकांची संख्या वाढल्यामुळे व मोरणा डाव्या कालव्यास किमी १ ते ३ करिता अस्तरीकरणाची नव्याने तरतूद केली, त्यामुळे रु.९.४५ कोटी वाढ झाली. अशी एकूण वाढ रु.२६.०२ झाली आहे.

क) आस्थापना खर्च (ई टी पी):-

मूळ प्रकल्प अहवालामध्ये आस्थापनेसाठी ०.०६ कोटी इतकी तरतुद असुन अद्ययावत सुधारीत प्रशासकिय अहवालात रु.४२.२८ कोटीची तरतुद केल्याने रु.४२.२२ कोटी वाढ झालेली आहे. प्रकल्पास सुरुवात होणेसाठी १४ वर्षाचा कालावधी गेला. त्यामुळे आस्थापना खर्च वाढला आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ वनजमिनीच्या हस्तातरणास झालेला विलंब :- धरणाच्या कामासाठी ६१.२२ हे. वनजमिनीची आवश्यकता असल्याने वनजमिन संपादनाचा प्रस्ताव दि.१/१/१९८६ रोजी सदर करण्यात आला वनजमिन संपादनास दि १/६/१९९४ रोजी तत्त्वतः मान्यंता मिळालेली आहे. त्यानंतर निविदा काढून धरणाचे काम माहे ०४/१९९७ मध्ये सुरु झाले त्यामुळे धरणाचे काम सुरु होण्यास १४ वर्षे विलंब झाला .

४.२ अपु-या निधीमुळे झालेला विलंबः- प्रकल्पाचे कामास सुरवातीपासुनच मागणी पेक्षा कमी निधी उपलब्ध होत आहे. सन २००१ ते २००७ पर्यंत निधी अभावी पुर्णतः बंद होते. त्यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे.

४.३ भूसंपादनामूळे झालेल्या विलंबाचा तपशील- वनजमिनीचा प्रस्तावास मंजुरी मिळाले नंतर भुसंपादन प्रस्तावाची प्रक्रिया चालु केली. तथापि धरणात जमिनी गेल्यामुळे कालव्यास जमिनी देण्यास शेतकरी विरोध करत आहेत. त्यामुळे भुसंपादन प्रक्रियेस लागलेल्या वेळा मुळे विलंब झाला आहे.

४.४ पुनर्वसनाच्या कामास झालेल्या विलंबामुळे

सन २००१ ते २०११ मध्ये पर्नवसनासाठी प्रकल्प ग्रस्ताचा अडथळा होता त्यामुळे वारंवार काम बंद होते.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थितीः:-

मोरणा (गु) मध्यम प्रकल्पाची घळभरणीचे काम सन २००९-१० मध्ये पूर्ण करुन ३९.५५ दलघमी इतका पाणी साठा निर्माण झाला आहे. यामुळे अंबरंग बंधा-याव्दारे १०० हे. इतकी सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. नदीवर उपसा करुन १३५ हे. क्षेत्र असे मिळून एकूण २३५ हे. सिंचन क्षेत्र जून-२०१२ अखेर निर्मित झाले आहे.

या प्रकल्पाची शिर्ष कामे (माती धरण, सांडवा, विमोचक इ. सर्व) पूर्ण झाली आहेत. डावा कालवा व उजव्या कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु.२२७.७८ कोटी इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु.४.२० लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.६० इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
नागेवाडी मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव- नागेवाडी	तालुका- वाई		जिल्हा- सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हे)पीक क्षेत्र	२४१८ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर)पीक क्षेत्र जून २०१२ अखेर- ३१०		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे) मध्ये
	मुळ प्रशासकीय मान्यता	०१.११.१९९०	१९८९-९०	८.९९	२४१८
	सुप्रमा-१	१२.०१.१९९६	१९९३-९४	२५.९४	२४१८
	सुप्रमा-२	१०.१०.२००२	१९९९-००	५१.९५	२४१८
	अद्ययावत किंमत	-	२०११-१२	६४.९०	२४१८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)			नाही	
५	दि.३१.०३.१२ अखेर खर्च (रु.कोटी)			४९.४१	
५.१	भूसंपादन पुर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) =१.६७				
५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) =३९.३२				
५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) =८.४२				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९३	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९३	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)			१२.५८	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
	बाब	मुळ तरतूद	अद्यायावत तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (किंमाची किंमत)	८.३१	५७.८२	४९.५१	८८.५५
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.४३	२.३९	१.९६	३.५१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३.९५	३.९५	७.०६
७.५	इ.टी.पी. व इतर कारणे	०.२५	०.७४	०.४९	०.८८
	एकूण	**८.९९**	**६४.९०**	**५५.९१**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : नागेवाडी धरण ता.वाई जि.सातारा येथे बावधन ओढयावर बांधण्यात आलेले आहे..धरणाचा पाणी साठा ६.४७ द.ल.घ.मी. (०.२२८ अ.घ.फु) असून प्रकल्पाचे एकूण पिकक्षेत्र २४१८ हे.आहे. धरणाचे काम सन १९९३ पासून सुरु होऊन सन २००० मध्ये पूर्ण झाले आहे. प्रकल्पामधुन वाई तालुक्यातील २४१८ इतकी सिंचन क्षमता निर्मिती नियोजित आहे. प्रकल्पामध्ये डावा तीर ४.११५ कि.मी.

व उजवा तीर १२.५० कि.मी. प्रस्तावित आहे. पैकी डावा तीर कालवा पूर्ण होऊन ३१० हे. पिक क्षेत्र सिंचन निर्मिती झाली आहे. उजव्या कालव्यावरील कि.मी.१ ते १० मधील कामे प्रगती पथावर आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यताः शासनाने दिनांक ०१.११.१९९० रोजी प्रकल्पास रु ८.९९ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने रु २५.९४ कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक १२.०१.१९९६ रोजी दिली .द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासनाने रुपये ५१.९५ कोटी किमतीस दिलेली आहे. तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची अद्ययावत किंमत रु ६४.९० कोटी इतकी आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणेः

३.१ दरसूचीतील वाढ : प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत द्वितीय सुप्रमाची किंमत भूसंपादन, पुनर्वसन, अपूरा निधी व इतर कारणामुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रुपये ४९.५१ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढः भूसंपादन पुनर्वसन व वन जमिनीच्या किमंतीत मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रु.१.४७ कोटी वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये १५८ हे जमीन सरासरी रु २०५०० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रु. ०.३२४ कोटीची तरतूद होती. सुप्रमा अहवालामध्ये ११९.७३ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. ७७,७७५ प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु ०.९३ कोटी आहे. पुनर्वसना करिता मुळ तरतुद बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्यासाठी रु ७ लक्ष,पर्यायी जमिनीची किंमत रु.०.४२ लक्ष व बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रु १.४० लक्ष अशी एकूण रु ५१.४० लक्ष इतके (०.५२ कोटी) रकमेची तरतुद आहे. सुधारित प्रशासकीय मान्यते प्रमाणे रु.२.३९ कोटीची तरतुद आहे. त्यामुळे झालेली वाढ रु.१.९६ कोटी आहे.

३.३ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढः

अ)सी.डी.ओ. नाशिक यांनी निर्देश दिल्याप्रमाणे सांडवा सा.क्र. १०५० ते १०८० मी. ऐवजी सा.क्र. १०५० ते ११२० मध्ये घेण्यात आले व त्यामुळे कठिण स्तर खडकातील खोदाई परिमाणात वाढ झाली त्यामुळे रुपये २.०७ कोटी.वाढ झाली आहे.

ब)सी.डी.ओ. नाशिक यांनी निर्देश दिल्याप्रमाणे मुख्य सिंचन विमोचकाची विहिर व वहन नलीका दगडी बांधकाम ऐवजी संधानकात करावे लागल्याने किंमतीत झालेली वाढ रुपये १.५५ कोटी.

क) कालवा संरेखा बदलामुळे झालेली एकुण वाढ रुपये ०.३३ कोटी झालेली आहे.

३.४ इ.टी.पी. व इतर कारणे : मुळ अहवालात आस्थापनासाठी रु.०.२५ कोटी इतकी तरतुद होती. सुधारित अद्यावत किंमती नुसार यासाठी रु. ०.७४ कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे. यामध्ये एकुण रु. ०.४९ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

६.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

६.१ **अपुऱ्या निधीमुळे झालेला विलंबः**

प्रकल्पाचे काम सन १९९३ मध्ये सुरु झाल्यानंतर मागणी पेक्षा कमी प्रमाणात निधी मिळाला त्यामुळे नियोजनाप्रमाणे कामे होऊ शकली नाहीत . त्यामुळे प्रकल्पाचे कामास विलंब झालेला आहे.

५.० **प्रकल्पाची सद्यःस्थिती :**

प्रकल्पाचे मुख्य धरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून धरणात ६.४७ द.ल.घ.मी. (०.२२८ अ.घ.फू.) पाणीसाठा सन २००० मध्ये करण्यात आलेला आहे. डावा कालवा व उजवा कालव्याची कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पाच्या २४१८ हेक्टर सिंचन क्षमतेपैकी ३१० हेक्टर सिंचन क्षमता जुन २०१२ मध्ये निर्माण झाली आहे. सदर पाणी साठयाचा वापर कालव्याचे कामे अपुर्ण असल्याने पुर्ण क्षमतेने झालेला नाही. धरणाच्या लाभक्षेत्रातील मौजे बावधन, कणूर, अनपटवाडी, म्हातेकरवाडी, दरेवाडी ही गावे पिण्याच्या पाण्याचा वापर करीत आहेत. सद्यस्थिती उजव्या कालव्यावरील कामे प्रगतीपथावर आहेत.

सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु. ६४.९० कोटी इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु. २.६८४ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.२८ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
उत्तरमांड मध्यम प्रकल्प, जिल्हा सातारा

१	प्रकल्पाचे नांव- उत्तरमांड मध्यम प्रकल्प	तालुका – पाटण	जिल्हा - सातारा		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे) पीक क्षेत्र	७६८० हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर)पीक क्षेत्र-७६८० हेक्टर जून २०१२ अखेर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे) मध्ये
	मुळ प्रशासकीय मान्यता	२७.११.१९९५	१९९३-९४	३४.७१	७६८० हेक्टर
	सुप्रमा-१	१०.१०.२००२	१९९९-२०००	१०२.३७	७६८० हेक्टर
	सुप्रमा-२	१०.१.२००७	२००५-२००६	१२३.१७	७६८० हेक्टर
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	१२३.१७ कोटी, नं २०(१३)/२००७ जसं/नियोजन अयोग, नवी दिल्ली, दि.२०/०९/२००७			
५	दि.३१.०३.१२ अखेर एकुण खर्च (रु.कोटी)				१२२.१७ कोटी.
५.१	भूसंपादन पुर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) =१५.२२				
५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) =८८.०९				
५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) =१८.८६				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९६-९७
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				१९९६
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)				४५.१२
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकुण वाढीची टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाची किंमत)	२६.३२	३७.१५	१०.८२	१२.२३
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	२.३७	१८.७२	१६.३५	१८.४९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.	०.००	१७.१२	१७.१२	१९.३५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१३.०२	१३.०२	१४.७२
७.५	ई.टी.पी. व इतर कारणे	६.०२	३७.१६	३१.१४	३५.२१
	एकूण	**३४.७१**	**१२३.१७**	**८८.४५**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती: उत्तरमांड धरण ता. पाटण जि. सातारा हे उत्तरमांड नदीवर सन १९९६-९७ पासून प्रगतीत आहे. धरणाचा पाणी साठा ०.८८५ अ.घ.फू असून प्रकल्पाचे एकूण पिकक्षेत्र ७६८० हे. आहे. (कराड तालुका-६१०६ हे. व पाटण तालुका १५७४ हे.) धरणामध्ये सन २०१० पासून ०.८८५

अ.घ.फू. इतका १०० टक्के पाणीसाठा झालेला आहे. सध्या धरणाचे अनुषंगिक कामे प्रगतीत आहेत. प्रकल्पाची सिंचन क्षमता ही नदीवरील १५ को.प. बंधा-यावरुन खाजगी उपसा सिंचन योजनेव्दारे नियोजित असुन बंधा-याची कामे पुर्ण झाली आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता :- उत्तरमांड प्रकल्पास दिनांक १७/१०/१९८१ रोजी रु ४.०५ कोटी रक्कमेस शासनाने प्रशासकीय मान्यता दिली होती. परंतु अनुदान उपलब्ध न झाल्याने सदर प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्याने शासनाने नव्याने मुळ प्रशासकीय मान्यता रु. ३४.७१ कोटी इतक्या रक्कमेस दि. २७/११/१९९५ रोजी दिली आहे. तदनंतर प्रथम सुधारीत मान्यता म.कृ.खो.वि.मं. ने १०२.३७ कोटी रूपयास दि. १०/१०/२००२ रोजी दिली आहे. व्दितीय सुधारीत मान्यता शासनाने रु.१२३.१७ कोटी इतक्या रक्कमेस जानेवारी २००७ ला दिली आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

३.१ दरसूचीतील वाढ :- मुळ प्रशासकीय मान्यता सन १९९३-९४ च्या दरसुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २००५-०६ च्या दरसुची प्रमाणे काढण्यात आले आहे. या १२ वर्षातील दरसुची बदलामुळे झालेली वाढ़ रुपये रु.१०.८२ इतकी आहे.

३.२ भूसंपादन पुर्नवसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :- भूसंपादन व पुर्नवसन खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १६.३५ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या १८.४८ टक्के वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये २५५ हे जमीन सरासरी रु ३३७०० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.८६ कोटीची तरतूद होती. सु.प्र.मा अहवालामध्ये २८६.७४५ हेक्टर क्षेत्र सरासरी रु २२०००० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु ६.४१ कोटी आहे. त्यामुळे रु ५.५५ कोटी इतकी वाढ होत आहे.

पुनर्वसनाच्या कामात वाढीव नागरी सुविधामुळे १.४६ कोटी, उदरनिर्वाह भत्यामुळे रु ०.४५ कोटीं घर बांधणी अनुदान व वाहतुक भत्यामुळे रु ०.३३ कोटी बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्यासाठी रु २.४७ कोटी व बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रु ०.०४ कोंटी अशी एकूण रु १०.४८ कोटीची वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढः नदीपात्रातील सांडवा व सांडव्याच्या अनुत्सारीत भितीमधून असणारा सिंचन तथा विद्यूत विमोचक मुळ मजुंर ठिकाणी नदीपात्रात जांभा खडक लागल्याने उजव्या तिरावर स्थलांतरीत झाल्यामुळे प्रकल्पाचे संकल्पनात बदल होऊन किंमतीत वाढ झालेली आहे. एकुण वाढ रू. १७.१२ कोटी इतकी आहे. तथापि हा संकल्पचित्रातील बदल असुन सुप्रमा अहवालामध्ये व्याप्तीतील बदल दर्शविण्यात आला आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढः धरणाच्या मातीकामाच्या संकल्पनामध्ये क्षेत्रिय ठिकाणी उपलब्ध कवच भरावा साहित्याच्या गुणधर्मानुसार बदल करावा लागला. व नदीपात्रातील सांडवा व सांडव्याच्या अनुत्सारीत भितीमधून असणारा सिंचन तथा विद्यूत विमोचक उजव्या तिरावर स्थलांतरीत झाल्यामुळे प्रकल्पाचे संकल्पनात बदल होऊन वाढ झालेली आहे. एकुण वाढ रू.१३.०२ कोटी इतकी आहे.

३.५ इतर कारणे - धरणाच्या जलरोधी चरातील ड्रिलिंग, ग्राऊटिंग करणे, धरणात उपकरणे बसवणे, बुडीत क्षेत्राच्या बाजुने मौजे कडववाडी व जाळगेवाडी गावरस्ता करणे इत्यादी कामामुळे, पुच्छ कालव्यावरील पुल बांधणे तसेच इतर अनुषंगीक कामामुळे सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालात रू.३१.१४ कोटीची वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

४.१ भू-संपादन व पुर्नवसन विलंबामुळे :- उत्तरमांड मध्यम प्रकल्पाचे बांधकाम, आक्टोंबर १९९६ मध्ये सुरु झाले. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात मौजे नाणेगांव(बु.) हे गांव पुर्णतः व मौजे माथणेवाडी, चाफळ, जाळगेवाडी आणि गमेवाडी ही ०४ गांवे अंशतः बुडीत क्षेत्रात आहेत. प्रकल्पग्रस्तानी ६५ टक्के रक्कम शासनाकडे जमा केली नाही त्यामुळे त्यांना पर्यायी जमीन वाटप करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तानी वांरवार काम बंद पाडले. दि. ११/०६/१९९९ रोजी धरणस्थळावर जिल्हाधिकारी, सातारा यांचे उपस्थितीत बैठक झाली. त्यावेळी पर्यायी जमीन, भूखंड वाटपाचे नियोजन केल्यानंतर काम पुनश्चः सुरू करणेत आले.

प्रथम टप्यातील घळभरणीचे काम सन १९९९-२००० मध्ये नियोजित होते, परंतू पर्यायी जमीनी वाटपा अभावी प्रकल्पग्रस्तांनी विरोध केला. त्यामुळे २० मार्च २००१ रोजी प्रथम घळभरणीचे काम चालू करून पूर्ण केले. सन २००४ ते २००८ पर्यंत निधी उपलब्ध नसल्यामुळे काम बंद होते. सन २००७ मध्ये ए.आय.बी.पी. मधुन अनुदान मिळाले नंतर दुस-या टप्यातील घळभरणीचे व इतर अनुषंगीक कामे हाती घेण्यात आली. या प्रकल्पा अंतर्गत एकूण प्रकल्पग्रस्त खातेदार ४६६ इतके असुन त्यापैकी ३०४ खातेदारांनी ऐच्छीक पुर्नवसन घेतले असुन उर्वरीत १६२ खातेदारांचे पुर्नवसन ५ गांवठाणात करणेत येत आहे. सध्यस्थितीत १६२ पात्र खातेदारांपैकी ९७ खातेदारांना पूर्णतः व ४८ खातेदारांना अंशतः अशी १४५ खातेदारांना १३८.०५ हे. जमीन वाटप करणेत आलेली असुन अद्याप ३५.४३ हे. जमीन वाटप होणेची आहे. लाभक्षेत्रात पर्यायी जमीन उपलब्ध नाही त्यामुळे अध्याप जमीन वाटपाचे आदेश महसुल विभागामार्फत झालेले नाहीत. त्यामुळे पाणीसाठा होऊनही प्रकल्पग्रस्त लाभक्षेत्रात पाणी सोडण्यास वेळो वेळी विरोध करत आहेत. एकंदरीत १० वर्षाच्या कालावधीतही पुर्नवसनाचा प्रश्न मार्गी न लागल्याने धरणाच्या कामास विलंब झालेला आहे.

४.२ अपुऱ्या निधीमुळे झालेला विलंबः- प्रकल्पाचे कामास सुरवातीपासुनच मागणी पेक्षा कमी निधी उपलब्ध होत आहे. सन २००४ ते २००८ पर्यंत निधी अभावी पुर्णतः बंद होते. त्यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :- धरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून धरणात ०.८५८ अ.घ.फू. पाणीसाठा सन २०१० मध्ये करण्यात आलेला आहे. सदर पाणी साठयाचा वापर धरणाखालील नदीमधील प्रकल्पांतर्गत १५ को.प.बंधाऱ्याद्वारे करण्यात येत असून त्याद्वारे **४८००** हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु. १२३.१७ कोटी इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु.२.३३२ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.६२ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
वांग मध्यम प्रकल्प जिल्हा - सातारा

१	प्रकल्पाचे नांवः- वांग मध्यम प्रकल्प	तालुकाः- पाटण		जिल्हाः- सातारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे) पीक क्षेत्रः- ८७४२		निर्मित सिंचनक्षमता पीकक्षेत्र जून-२०१२ अखेर -२९९८ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे) मध्ये
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१.१०.१९९५	१९९३-९४	८१.४७	८७४२
	सुप्रमा-१	१०.१०.२००२	९९-२०००	२०९.११	८७४२
	सुप्रमा-२	०५.५.२००५	२००३-०४	२२७.९६	८७४२
	सुप्रमा-३	२३.३.२००९	२००५-०६	२३५.९१	८७४२
	प्रस्तावित अद्यावत किंमत		२००९-१०	३००.०३	८७४२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)			केंद्रीय नियोजन आयोग न्यु. दिल्ली यांचे पत्र क्र.२०(१३)/ २००७ दि. २०/०९/२००७ रु. १६२.७८ कोटी.	
५	दि.३१.०३.१२ अखेर खर्च (रु.कोटी)			१८४.८९ कोटी	
५.१	भूसंपादन पुर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ६०.००				
५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = १०४.६५				
५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = २०.२४				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९७	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)			१६६.५६	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)				
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाची किमंत)	५८.५७	१७४.९९	११६.४२	५३.२७
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	८.८८	८०.१८	७१.३०	३२.६२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.५	ई.टी.पी. व इतर कारणे	१४.०२	४४.८६	३०.८४	१४.११
	एकूण	८१.४७	३००.०३	२१८.५६	१००.००

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहितीः वांग मध्यम प्रकल्प ता.पाटण जि.सातारा हा प्रकल्प मराठवाडी गावाजवळ वांग नदीवर सन १९९७ पासून प्रगतीत आहे. धरणाचा पाणीसाठा ७७.२९ द.ल.घ.मी.(२.७३ अघफू) इतके

आहे. प्रकल्पामधुन पाटण तालुक्यातील ३७७९ हेक्टर, कराड तालुक्यातील ४९६४ हेक्टर असे एकुण ८७४२ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्मिती नियोजित आहे. प्रकल्पांतर्गत एकुण १० को.प.बंधारेव्दारे खाजगी उपसा सिंचन योजनेने सिंचन प्रस्तावित आहे. धरणात १६.७५ द.ल.घ.मी. (.०.६० अघफू) पाणीसाठा सन २०१०-११ मध्ये झाला आहे. ५ को.प. बंधारे पुर्ण असून उर्वरीत ५ को.प.बंधारे प्रगतीपथावर आहे.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यताः वांग मध्यम प्रकल्पास रु.८१.४७ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने दिनांक ३१/१०/१९९५ रोजी दिली. त्यानंतर म.कृ.खो.वि.म. पुणे रु.२०९.११ कोटी किमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक १०/१०/२००२ रोजी दिली. त्यानंतर शासनाने रु.२२७.९६ कोटी किमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिं.५/५/२००५ रोजी दिली. तसेच शासनाने रु.२३५.९१ कोटी किमतीस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.२३/०३/२००९ रोजी दिली. प्रस्तावित अद्यावत किंमत रु.३००.०३ कोटी असून सदरचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समीती नाशिक यांचेकडे तांत्रिक तपासणीसाठी ८/२०११ मध्ये सादर झालेला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणेः

३.१ दरसूचीतील वाढः- मुळ प्रशासकीय मान्यता सन १९९३-९४ च्या दरसुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन २००९-१० च्या दरसुची प्रमाणे काढण्यात आले आहे. या १६ वर्षातील दरसुची बदलामुळे झालेली वाढ़ रुपये रु. ११६.४२ इतकी आहे.

३.२ भूसंपादन पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ - .भूसंपादन,पुनर्वसन व वनजमिनीच्या खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रु.७१.३० कोटी वाढ झाली आहे.मूळ प्रशासकीय मान्यतेच्या अहवालामध्ये ५८० हेक्टर जमिन सरासरी रु.४९,००० प्रती हेक्टरी या दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी रु.२.९८ कोटीची तरतूद चतुर्थ सुप्रमा अहवालामध्ये २५६४.०६ हेक्टर क्षेत्र सरासरी रु.१,०६,००० प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु.२७.३२ कोटी इतकी होत आहे. पुनर्वसानाच्या कामात उदरनिर्वाह भत्यामुळे रु.२.७० कोटी घरबांधणी अनुदान रु.१.५५ कोटी पर्यायी जमिनिची किंमत रु.२२.५९ कोटी किंमतीत वाढ तसेच खासबाब पुनर्वसन किंमत रु.१४.३७ कोटी वाढ बुडीत क्षेत्रातील पर्यायी रस्ते किंमत रु.२.६२ कोटी वाढ झालेली आहे.

३.३ आस्थापना व इतर कारणे - मुळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी व इतर कारणासाठी रु.१४.०२ कोटी इतकी तरतूद केली होती. सुधारीत चतुर्थ अहवालात रु.४४.८६ कोटी इतकी तरतूद केल्याने रु ३०.८४ कोटीची वाढ होत आहे. वरील कारणामुळे मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत २१८.५६ कोटी इतकी वाढ होत आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-

४.१ पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब - वांग प्रकल्पाचे पुनर्वसन सांगली व सातारा या दोन जिल्हात प्रस्तावित असून सन १९९७ ते २००१ या कालावधीत सांगली जिल्हात १२ व सातारा जिल्हात ३ अशी एकूण १५ पुनर्वसित गावठाणे जलसंपदा विभागामार्फत बांधून त्यात नागरी सुविधा निर्माण करण्यात आल्या. तसेच एकूण २०० प्रकल्पग्रस्तांना २०३ हेक्टर पर्यायी जमिनी सांगली जिल्हात वाटप करण्यात आली. वांग मध्यम प्रकल्पात एकूण १८३९ बाधीत खातेदार असून पैकी १००० खातेदारांना २०१२ अखेर जमिनी वाटप पूर्ण करण्यात आलेले असून त्यापैकी सुमारे ७०० खातेदार हे त्यांच्या गावठाणात स्थलांतरीत झालेले आहेत ५३९ खातेदार हे दुस-या टप्यातील असून त्यांच्या पंसतीनुंसार त्यांना जमिनी वाटप करण्यात येईल. व उर्वरित ३०० प्रकल्पग्रस्तांनी जमिनी ऐवजी रोख रकमेची मागणी केलेली आहे.पैकी १६८ खातेदारांचा रक्कम रु.१०.३२ कोटीचा प्रस्ताव शासनाने नुकताच मान्य केलेला आहे. तथापी मेघाताई पाटकर समर्थक प्रकल्पग्रस्तांनी सदर प्रस्ताव अदयाप स्विकारलेला नाही.तसेच पर्यायी जमिनी देखील या प्रकल्पग्रस्तांना पसंत नाही. म्हणून त्यांनी जमिनी अदयाप स्विकारलेली नाही. लाभक्षेत्रात सांगली जिल्हयात जमिनी उपलब्ध असताना ही जमिन वाटप वरील खातेदारांनी करुन घेतली नाही. .त्यामुळे सदरील खातेदारांची सांगली जिल्हयात जमिनी वाटप करुन घेऊन त्यांचे नियोजित पुनर्वसित गावठाणात स्थलांतरीत होण्याची त्यांची मानसिकता नाही त्यामुळे पुनर्वसन कायदयाबाहेरील अशा मागण्यांमुळे प्रकल्पाच्या कामास त्ीव्र विरोध होत असून त्यामुळे धरणाचे कामात गेली १५ वर्षे प्रकल्पग्रस्तांकडून अडथळे येत आहेत तसेच

सातारा जिल्हात पुनर्वसनासाठी आवश्यक २२० हेक्टर जमिनी पैकी १७० हेक्टर क्षेत्र लाभक्षेत्रातील जमिन २००७ साली ताब्यात आली.

धरणाचे काम गेल्या १५ वर्षापासून चालू असूनदेखील पुनर्वसनाचे कामास अंतिम स्वरुप प्राप्त न झालेने धरणाच्या कामास प्रकल्पग्रस्तांकडून तीव्र विरोध होत आहे.डॉ.भारत पाटणकर यांचे श्रमिक मुक्ती दल व मेधाताई पाटकर यांची वांग-मराठवाडी धरणग्रस्त कृती समिती या दोन संघटना वांग प्रकल्पामध्ये सक्रिय कार्यरत असून प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी सन १९९७ ते २००१ या कालावधीत एकूण ९ वेळा २०९ दिवस धरणाचे काम बंद केले होते. तसेच सन २००१ ते २००८ पर्यंत महामंडळाकडे निधी नसल्याने धरणाचे काम बंद होते.

वांग प्रकल्पाचा समावेश ए.आय.बी.पी अतंर्गत सन २००८-०९ या सालात प्रथमच झाल्याने धरणाचे काम २००८-०९ मध्ये चालू करण्यात आले सन २००८ ते २०११ या कालावधीत एकूण ८ वेळा ९४ दिवस धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांनी बंद पाडले.प्रकल्पासाठी ए.आय.बी.पी. चे अंतर्गत निधी मिळविण्यासाठी केंद्रीय जलआयोगाने दिलेली मुदत मार्च् २०११ रोजी संपल्याने ए.आय.बी.पी.अंतर्गत निधी मिळणे बंद झाले आहे.

प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी घेऊन व केंद्रीय जलआयोगाच्या फेर मंजूरी नंतरच प्रकल्पास अे.आय.बी.पी.चा निधी् मिळणार आहे त्यामुळे निधी अभावी व पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या विरोधामुळे धरणाचे काम जून २०११ नंतर बंद आहे.

४.२ अपु-या निधीमुळे झालेला विलंब - सन २००१ ते २००८ या कालावधीत कृष्णा खोरे विकास महामंडळामध्ये निधी उपलब्ध नसल्याने व त्यामुळे धरणाची कामे बंद करण्याचे लेखी पत्र महामंडळाने दिल्याने धरणाचे काम या कालावधीमध्ये पूर्णपणे बंद होते. तसेच मार्च २०११ रोजी केद्रीय नियोजन आयोगाची मुदत संपल्याने अे.आय.बी.पी.चे अंतर्गत निधी मिळणे बंद झाल्याने धरणाचे काम जून २०११ पासून बंद आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थितीः धरणाचे मातीकाम ८० टक्के सांडव्याचे काम ३५ टक्के तसेच पुच्छ कालव्याचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले आहे.सिंचन व विदयुत निमोचकाचे काम प्रगतीपथावर आहे. जून २०११ अखेर प्रकल्पाची प्रथम टप्पा घळभरणी पूर्ण करुन धरणात ०.६० टीमसी पाणीसाठा निर्माण करण्यात आला त्यामुळे एकूण ४५० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

चतुर्थ सुधारीत अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रु.३००.०३ कोटी इतकी असून प्रकल्पाचा प्रती हेक्टरी खर्च रु.३.४३ लक्ष इतका येत असून लाभव्यय गुणोत्तर १.४२ इतके येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
कडवी मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नांव: कडवी मध्यम प्रकल्प	तालुका: शाहूवाडी		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	१३३६८	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर)		१३३६८
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२२/०६/१९७७	१९७५-७६	३.४७	१३३६८
	सुप्रमा-१	२३/०२/१९८८	१९८४-८५	१३.५६	१३३६८
	सुप्रमा-२	१७/०२/२०००	१९९५-९६	६९.७४	१३३६८
	सुप्रमा-३	०३/०३/२०११	२००८-०९	११०.१३	१३३६८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत	Apprvoed Vide CWC Letter No.II- 20 (14)78 -I & CAD, GOI Dated 21/04/1979		३.४७	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			८०.६८	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) = ८.१३			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ७२.५५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७७-७८	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			१९९३	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रु.कोटी)			५८.५८	

७.०	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२.९०	४२.४३	३९.५३	३७.०६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.२६	११.३९	११.१३	१०.४४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१०.०९	१०.०९	९.४६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२४.१९	२४.१९	२२.६८
७.५	इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	०.३१	२२.०३	२१.७२	२०.३६
	एकूण	**३.४७**	**११०.१३**	**१०६.६६**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

कडवी धरण मौजे परळे निनाई ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर हे कडवी नदीची उपनदी असलेल्या पोटफुगी नाल्यावर बांधलेले आहे. धरणाचा पाणीसाठा २.५१५ अघफू असून ९ को.प.बंधा-यातून खाजगी उपसांव्दारे शाहूवाडी तालुक्यातील १३३६८ हे. क्षेत्र सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे.

कडवी मध्यम प्रकल्पाच्या रु.३.४७ कोटी रकमेच्या प्रकल्प अहवालास शासनाने १९७७ साली अलतूर येथील धरणस्थळास प्रशासकीय मान्यता दिली. परंतु या धरणामुळे ५ गांवे व ८६४ हे. क्षेत्र जलमय होणार असल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करुन अलतूर धरणस्थळाच्या ४ कि.मी. उर्ध्व बाजूस धरणस्थळ परळे निनाई येथे घेण्यास भाग पाडले व या स्थळबदलास १९८३ मध्ये मंजूरी मिळाली. धरणाच्या बांधकामास १९९३ मध्ये यांत्रिकी संघटनेमार्फत सुरुवात करण्यात आली.

धरणाचे पाणीसाठा निर्मितीचे काम सन २००८ मध्ये १०० टक्के पूर्ण झाले असून सध्या पुच्छ कालव्यातील कामे प्रगतीपथावर आहेत.

२.०० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :-

कडवी मध्यम प्रकल्पास दिनांक २२/०६/१९७७ रोजी रु.३.४७ कोटी रकमेस अलतूर या ठिकाणी धरण बांधणेस प्रशासकीय मान्यता मिळाली. मंजूर प्रमा नुसारच्या धरण संरेखेनुसार बुडित क्षेत्रात पाच गावे व ८६४ हे. क्षेत्र जलमय होणार असल्याने स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी अलतूर धरणस्थळास विरोध केला. त्यामुळे धरणस्थळ बदलण्यात आले व ते परळे निनाई ता.शाहूवाडी येथे वरच्या बाजूस घेण्यात आले. त्यास शासनाकडून दि.२४/०२/१९८३ रोजी मंजूरी मिळाली व २३/२/१९८८ रोजी रु.१३.५६ कोटी रकमेस (दरसूची १९८४-८५) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर दि.१७/०२/२००० रोजी रु.६९.७४ कोटी रकमेस (दरसूची १९९५-९६) द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर दि.०३/०३/२०११ रोजी रु.११०.१३ कोटी रकमेस (दरसूची २००८-०९) तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली.

मार्च-२०१२ अखेर प्रकल्पावर रु.८०.६८ कोटी खर्च झाला आहे.

३.० मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत तृतीय सुप्रमाची किंमत रु. १०६.६६ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :-

प्रकल्पास मूळ मान्यता १९७७ मध्ये मिळाली. तथापि प्रकल्प बाधितांच्या विरोधामुळे प्रत्यक्ष काम १९९३ ला सुरु झाले व एकूण विलंब १६ वर्षे झाला. या विलंबामुळे व त्यांनतर अपुरा निधी उपलब्ध झाल्याने दरसूची वाढ होऊन खर्चात रुपये ३९.५३ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ८७६ हे. जमीन संपादन सरासरी रु.४१७ प्रति हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.०४ कोटीची तरतूद होती. सुधारित अंदाजपत्रकामध्ये ५८१ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. ५२,३२३ प्रति हेक्टरी दराने संपादन केली असून त्याची किंमत रु.३.०४ कोटी आहे. त्यामुळे रु.३.०० कोटी इतकी वाढ झाली आहे.

पुनर्वसनाच्या कामात वाढीव नागरी सुविधामुळे ५.३४ कोटी, बुडित क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्यासाठी रु १.९० कोटी अशी एकूण रु.७.२४ कोटीची वाढ झाली.

मूळ प्रमा मध्ये वनजमिनीसाठी तरतूद नव्हती. प्रत्यक्षात २.५२ हे. वन जमिनीसाठी रू.०.८९ कोटी अदा करावे लागले.

वरील प्रमाणे भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चात मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत ११.१३ कोटी वाढ झाली आहे.

३.३ धरण स्थळातील बदलामुळे झालेली वाढ :-

मूळ प्र.मा प्रमाणे अलतूर या ठिकाणी धरण बांधलेस पाच गांवे व ८६४ हे. क्षेत्र जलमय होणार असल्याने स्थानिक शेतकरी व लोक प्रतिनिधी यांनी अलतूर या ठिकाणी धरणस्थळ ठेवण्यास विरोध दर्शविला त्यामुळे अलतूर ऐवजी परळे निनाई या ठिकाणी धरणस्थळ ठेवण्यास शासनाने दि.२४/०३/१९८३ रोजी मान्यता दिली. त्यामुळे रु.१०.०९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-

धरणस्थळ बदलल्याने धरणाच्या लांबीमध्ये ३७२ मी. व महत्तम उंचीमध्ये ९.५० मीटरने वाढ झाली. माती धरणाच्या संकल्पनामध्ये क्षेत्रिय उपलब्ध गाभा व कवच भरावाच्या अभियांत्रिकी गुणधर्मानुसार बदल करावा लागला, त्यामुळे माती धरणाच्या काटछेदामध्ये वाढ झाली आहे.

मूळ प्रमा मध्ये सिंचन विमोचकाची तरतूद होती. तथापि शासनाच्या धोरणानुसार जलविद्युत निर्मितीसाठी सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद केली आहे.

वरील सर्व बाबींमुळे एकूण रु.२४.१९ कोटीची वाढ झाली आहे.

३.५ आस्थापना व इतर कारणे :-

मूळ प्रमा मध्ये आस्थापना (ईटीपी ची) तरतूद ०.३१ कोटी इतकी करण्यात आली होती, तथापि सुप्रमा मध्ये रू.२२.०३ कोटी इतकी तरतूद केली आहे. त्यामुळे एकूण रु.२१.७२ कोटी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे कामामध्ये झालेला विलंब :-

प्रकल्पास मूळ प्रमा सन १९७७ मध्ये मिळाली. तथापि स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांच्या विरोधामुळे सन १९८३ मध्ये अलतूर ऐवजी परळे निनाई येथील धरणस्थळास शासनाची मान्यता मिळाली. त्यामुळे १९७७ ते १९८३ या कालावधीमध्ये बांधकामास प्रारंभ होऊ शकला नाही. माती धरणाचे संकल्पचित्र मं.सं.चि.सं.नाशिक यांचेकडून सन १९९३ मध्ये प्राप्त झाले. प्रत्यक्ष धरणाच्या कामास १९९३ मध्ये सुरुवात करण्यात आली. अशा प्रकारे सन १९७७ ते १९९३ पर्यंत १६ वर्षे प्रत्यक्ष धरणाचे कामास विलंब झाला आहे.

४.२ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल व इतर कारणे :-

प्रत्यक्ष धरणाच्या कामास १९९३ मध्ये सुरुवात करण्यात आली. सन १९९३ ते २००० या कालावधी मध्ये उपलब्ध निधीनुसार यांत्रिकी संघटनेमार्फत माती धरणाचे काम घळभरणीसह पूर्ण करण्यात आले. त्यानंतर २००० ते २००७ पर्यंत कामास निधी उपलब्ध झाला नाही व त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कामे प्रगतीत आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाचे काम पूर्ण झाले असून धरणात २.५१५ अघफू इतका पूर्ण क्षमतेने पाणीसाठा सन २००८ पासून करण्यात येत आहे. सदर पाणीसाठयाचा वापर धरणाखालील नदीवरील अस्तित्वातील ९ को.प.बंधाऱ्यांच्या शृंखलेव्दारे खाजगी उपसा सिंचन योजनांव्दारे कडवी नदीच्या दोन्ही तीरावरील जमिनीना सिंचनाचा लाभ होत आहे. सांडव्याच्या उर्जास्खलन व्यवस्थेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

धरण पायथ्याजवळ १.५ मे.वॅ. क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणांतर्गत कार्यान्वित झाला असून सप्टेंबर २०१२ अखेर २.९७ दलयुनिट्स वीजनिर्मिती झाली आहे.

मंजूर तृतीय प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ११०.१३ कोटी असून, प्रतिहेक्टरी किंमत रु.०.८२ लक्ष आहे. व लाभव्यय गुणोत्तर १.५४ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
पाटगाव मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नांव : पाटगांव प्रकल्प	तालुका: भुदरगड		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	१२०७०	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर)		१२०७०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	०८/१२/१९७७	१९७५-७६	५.४०	८३५८
	सुप्रमा-१	१७/०१/१९९७	१९९१-९२	३८.१३	१२०७०
	सुप्रमा-२	०६/०४/२०००	१९९५-९६	८२.२०	१२०७०
	सुप्रमा-३	शासनास सादर	२०१०-११	१८०.३६	१२०७०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत	सी.डब्ल्यु सी. लेटर न.११-२०(१४) ८३/१४ सी ए डी जी ओ आय दि.०४/०७/१९८४		५.४०	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			९२.५८	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) = ८.९८			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ८३.६०			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७८-७९	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९७९	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रु.कोटी)			५.४०	
७.०	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)

	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	४.३६	४५.६७	४१.३१	२३.६१
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.४५	४४.५७	४४.१२	२५.२२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	२१.३८	२१.३८	१२.२२
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२१.२८	२१.२८	१२.१६
७.५	इतर कारणे	०.००	२४.०६	२४.०६	१३.७५
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	०.५९	२३.४०	२२.८१	१३.०४
	एकूण	**५.४०**	**१८०.३६**	**१७४.९६**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

पाटगांव धरण ता.भुदरगड जि.कोल्हापूर हे वेदगंगा नदीवर बांधण्यात आलेले असून, धरणाचा पाणीसाठा सन २००० पासून अंशत: व सन २००८ पासून पूर्ण क्षमतेने होत आहे. १७ को.प.बंधा-यातून भुदरगड तालुक्यातील १२०७० हे. क्षेत्र खाजगी उपसांव्दारे सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे. प्रत्यक्ष महत्तम सिंचित क्षेत्र ९३७१ हे. आहे.

पाटगांव प्रकल्पाला सन १९७७ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली व त्यानंतर सन १९८२ मध्ये यांत्रिकी संघटनेमार्फत काम सुरु करण्यात आले. सन १९७८ ते १९९२-९३ पर्यंत पुरेसा निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे काम अपेक्षित गतीने होऊ शकले नाही. ३५२.०७ हे. वन क्षेत्र संपादनाची प्रक्रिया १९८७ मध्ये आरंभ झाली असून, वनजमिनीची एन.पी.व्ही.किंमत रु.३३.०६

कोटी इतकी आहे. सदर रक्कम भरण्यासाठी निधी उपलब्ध न झाल्याने रक्कम वनखात्यास भरता आली नाही. त्यामुळे अद्याप अंतिम मान्यता मिळालेली नाही.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता :-

पाटगांव मध्यम प्रकल्पास रु.५.४० कोटी किंमतीस दरसूची सन १९७५-७६ नुसार मूळ प्रशासकीय मान्यता शासनाने दि.०८/१२/१९७७ रोजी दिली. त्यानंतर रु.३८.१३ कोटी किंमतीस दरसूची १९९१-९२ नुसार प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दि.१७/०१/१९९७ रोजी दिली. तद्नंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी रु.८२.२० कोटी किंमतीस दरसूची १९९५-९६ नुसार द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दि.०६/०४/२००० रोजी दिली. दरसूची सन २०१०-११ वर आधारित तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी रु.१८०.३६ कोटी किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर करणेत आला आहे.

३.० मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रस्तावित तृतीय सुप्रमाची किंमत रु.१७४.९६ कोटी इतकी वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ**

मूळ प्रशासकीय मान्यता सन १९७७ मध्ये मिळाली. मात्र सन १९८३ पर्यंत निधी अभावी मुख्य धरणाचे काम सुरु होऊ शकले नाही. मुख्य धरणाचे मातीकाम यांत्रिकी संघटनेमार्फत सन १९८३ पासून सुरु झाले. कामाची प्रगती ही उपलब्ध निधी विचारात घेऊन संथ गतीने ठेवावी लागली. त्यामुळे कामास विलंब झाला. त्यामुळे दरसूचीत वाढ होऊन प्रकल्पाच्या खर्चात रु.४१.३१ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :**

मूळ प्रमा अहवालानुसार प्रकल्पासाठी ८४८ हे. क्षेत्र रु.३,१०० प्रतिहेक्टरी दराने संपादन प्रस्तावित होते. त्यासाठी ०.२६ कोटीची तरतूद होती. प्रत्यक्षात सुप्रमामध्ये १०७६ हे. क्षेत्र रु.५,७०० प्रतिहेक्टरी दराने संपादन प्रस्तावित असून त्यासाठी रु. ६.१३ कोटीची तरतूद आहे. तसेच मूळ प्रमामध्ये वन जमिनी संपादनाची तरतूद नव्हती. सुप्रमा मध्ये ३५२.०७ हे. वनजमिन आवश्यक असून, त्यासाठी रु.३५.३२ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

पुनर्वसनाच्या कामासाठी मूळ प्रमामध्ये ०.१९ कोटीची तरतूद होती. सुप्रमा मध्ये ती ३.१९ कोटी करण्यात आली आहे. अशा प्रकारे भूसंपादन वनजमिन व पुनर्वसनाच्या खर्चात रु.४४.१२ कोटीची वाढ झाली आहे.

३.३ **व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :-**

कृष्णा खो-यातील पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करणेचे दृष्टीने पाटगांव धरणाची उंची ३.१० मी. ने वाढविण्याचे प्रस्तावित केले. त्यानुसार मूळ ७६.२६ दलघमी पाणीसाठयात वाढ करुन १०५.२४ दलघमी पाणीसाठा करणेच्या प्रस्तावास शासन निर्णय.क्र.पीटीजी/१०७७/१२९२/(५०९/९२) मप्र-१ दि.१६/१२/१९९४ अन्वये मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेमध्ये ३७१२ हे. वाढ झाली. वाढीव उंचीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर मुख्य धरण कटक बांध क्र. १, २, ३ आणि सांडव्याच्या भागास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त सुधारित संकल्पनाप्रमाणे प्रकल्पाच्या किंमती मध्ये रु.२१.३८ कोटी इतकी वाढ झाली.

३.४ **संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-**

धरणाच्या उंची ३.१० मी. वाढल्यामुळे सांडवा, पुच्छ कालवा यांच्या कामात वाढ झाली. वाढीव साठयामुळे कटक बंधारा क्र. १ व ३ साठी वाढीव तरतूद यासाठी १८.५२ कोटी इतकी वाढ झाली. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद केल्यामुळे रु.२.७६ कोटी इतकी वाढ झाली. म्हणजे एकूण वाढ रू.२१.२८ कोटी वाढ झाली आहे.

३.५ **आस्थापना व इतर कारणे**

पाटगांव प्रकल्पामधील सिंचन क्षमता निर्मिती अस्तित्वातील १७ को.प.बंधाऱ्यामार्फत प्रस्तावित आहे. त्यापैकी कार्यप्रगती लेखा परिक्षणानुसार मडूर, शेळोली, करंबळी व वेंगरुळ या चार को.प.बंधाऱ्यांच्या दुरुस्ती तथा पुनर्बाधणीसाठी रु.१२.६१ कोटी तरतूद करण्यात आली. तसेच पाटगांव बुडित क्षेत्रातील काटरस्ते (२.५४ कोटी), नदीचे पुनर्ढाळीकरण (५.७० कोटी) व इतर अनुषंगिक कामे (३.२१ कोटी) इ. कामासाठी एकूण २४.०६ कोटी वाढ होत आहे.

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू ०.५९ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात २३.४० कोटी इतकी तरतूद केली आहे. एकूण रू.२२.८१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ **वन जमीनीच्या हस्तांतरणास झालेला विलंब :**

३५२.०७ हे. वनक्षेत्र संपादनाचा प्रस्ताव १९८७ मध्ये सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाने दि.३०/०४/२००१ अन्वये निर्वनिकरण प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली. विधीवत मान्यतेसाठी आवश्यक सर्व अनुदान वन खात्यास नोंव्हेबर २००५ अखेर जमा केले असून, एन.पी.व्ही. साठी वन खात्याने रु. ३३.०६ कोटीची मागणी केली आहे. सदर रकमेची तरतूद निधी अभावी अद्याप होत नसल्याने विलंब होत आहे.

४.२ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल :

प्रकल्पास मूळ प्रमा १९७७ मध्ये प्राप्त झाली त्यानंतर १९८३ पर्यंत काहीही निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर अल्प प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने यांत्रिकी संघटनेमार्फत मातीकाम सुरु करण्यात आले. त्यानंतर २००४ पर्यंत निधी उपलब्ध झाल्यानंतर कामे सुरु झाली. एकंदरीत निधीच्या अपु-या तरतूदीमुळे कामास विलंब झाला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

पाटगांव प्रकल्पांतर्गत मुख्य माती धरण, कटक बांध १,२ व ३ सांडवा बांधकाम सिंचन तथा उर्जा विमोचकाचे काम, पुच्छ कालव्याचे काम इ. कामे पूर्ण झालेली असून सन २००० पासून धरणामध्ये अशंतः पाणीसाठा करुन सन २००८ पासून पूर्ण संचय क्षमतेने पाणीसाठा केला जात असून, धरणाच्या खालील बाजूच्या वेदगंगा नदीवरील १७ को.प.बंधाऱ्याच्या शृंखलेद्वारे खाजगी व सहकारी उपसा सिंचन योजनेद्वारे वेदगंगा नदीच्या दोन्ही तीरावरील जमिनींना सिंचनाचा लाभ होत आहे. धरणाच्या पायथ्याशी १ x २.५ मे.वॅट क्षमतेचे लहान जलविद्युत प्रकल्प खाजगी तत्वावर (बी.ओ.टी) उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच मडूर, शेळोली, करंबळी व वेंगरुळ या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे सुप्रमा मान्यतेअभावी प्रलंबित आहेत.

प्रस्तावित तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालानुसार एकूण किंमत रु.१८०.३६ कोटी असून प्रतिहेक्टरी किंमत रु.१.४९ लक्ष आहे व लाभव्यय गुणोत्तर १.४८ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
घटप्रभा मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नांव :घटप्रभा प्रकल्प	तालुका: चंदगड		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	६९३६	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) ६९३६		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	११/०१/१९९६	१९९४-९५	३४.९२	६३३७
	सुप्रमा-१	२१/०८/२००४	२००२-०३	८६.०९	६३३७
	सुप्रमा-२	२२/११/२०१०	२००८-०९	१२७.६६	६९३६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही.	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			८८.४०	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = १२.९९			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ७५.४१			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९६-९७	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			४/१९९७	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रू.कोटी)			४०.५१	
७.०	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२७.६६	५२.९२	२५.२६	२७.२४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१..६०	१४.५९	१२.९९	१४.००
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३६.७३	३६.७३	३९.६१
७.५	इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	५.६६	२३.४२	१७.७६	१९.१५
	एकूण	**३४.९२**	**१२७.६६**	**९२.७४**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

मौजे फाटकवाडी ता. चंदगड जि कोल्हापूर येथे घटप्रभा नदीवर १.५५ अघफू क्षमतेचे धरण असून, ७ को.प.बंधा-यातून खाजगी उपसाव्दारे गडहिंग्लज तालुक्यातील ३१३६ हे. व चंदगड तालुक्यातील ३८०० हे. असे एकंदर ६९३६ हेक्टर सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे. प्रत्यक्ष महत्तम सिंचित क्षेत्र ३४०१ हे. आहे.

घटप्रभा प्रकल्पास १९९६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली तथापि प्रकल्प नियेजित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक निधी सन २००८ पर्यंत उपलब्ध झाला नाही. धरणाचे पाणीसाठा निर्मितीचे १०० टक्के काम सन २०११ रोजी पूर्ण झाले आहे.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :-

घटप्रभा प्रकल्पास शासनाने दि. ११/०१/१९९६ रोजी सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रु ३४.९२ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर प्रकल्पास मकृखोवि महामंडळाने दि.२१/८/२००४ रोजी सन २००२-०३ च्या दरसूचीनुसार रु ८६.०९ कोटी रकमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि. २२/११/२०१० रोजी सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार रु १२७.६६ कोटी रकमेस द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्यात आली. प्रकल्पावर ३/२०१२ अखेर ८८.४० कोटी इतका खर्च झाला आहे.

३.० मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाची मूळ किंमत रु.३४.९२ कोटी असून सुप्रमा किंमत १२७.६६ कोटी आहे. प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत रु. ९२.७४ कोटी इतकी वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ**

पुनर्वसन, अपुरा निधी व इतर कारणामुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन, त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रू. २५.२६ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :**

भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १२.९९ कोटी म्हणजे वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ३२५ हे. जमीन संपादन सरासरी रु.४९,५०० प्रती हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी १.६१ कोटीची तरतूद होती. प्रत्यक्षात ३११ हेक्टर क्षेत्र सरासरी रु.२,७४,००० प्रती हेक्टरी दराने संपादन करावे लागेल. त्याची किंमत रु.८.५२ कोटी आहे.

पुनर्वसनाच्या कामात वाढीव नागरी सुविधामुळे ४.३६ कोटी, घरबांधणी अनुदान व वाहतूक भत्यामुळे रु.०.०४ कोटी व बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रु.०.०६ कोटी अशी एकूण रु.४.४७ कोटीची वाढ झाली

३.३ **व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :-**

मा.कै.बाबासाहेब कुपेकर, माजी अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांनी तारेवाडी व कानडेवाडी को. प. बंधा-यांचा समावेश घटप्रभा प्रकल्पामध्ये करून हेब्बाळ व जलद्याळ या गावांचे अंदाजे ४३१ हे क्षेत्र सिंचनाखाली आणावे अशी मागणी केली होती, त्यास अनुसरून साठ्यामध्ये बदल न करता पीक रचनेमध्ये बदल करून सिंचन क्षेत्र वाढले आहे. त्याकरिता वेगळे बंधारे न बांधता अस्तित्वात असलेल्या तारेवाडी व कानडेवाडी या को प बंधा-यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे वेगळा खर्च करावा लागला नाही. सदर पीक रचनेस दि.६/५/२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता मिळाली आहे.

३.४ **संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-**

मूळ प्रमा मध्ये चित्री धरणाच्या काटछेदाप्रमाणे माती धरण प्रस्तावित होते. प्रत्यक्ष उपलब्ध मातीच्या अभियांत्रिकी गुणधर्मानुसार मसंसं, नाशिक यांनी धरणाचे संकल्पन केले. त्यामुळे धरणाच्या काटछेदामध्ये वाढ झाल्याने रु.२९.७३ कोटी किंमत वाढ झाली. मूळ प्र.मा.मध्ये सिंचन विमोचकाची तरतूद होती. शासनाच्या धोरणानुसार सिंचन विमोचका ऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद केल्याने तसेच विमोचकाची जागा सा.क्र. ४२० मी ऐवजी सा.क्र.७२० मी येथे बदलण्यात आल्यामुळे रु.७.०० कोटीची वाढ झाली. संकल्पचित्र बदलामुळे मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त तरतूदीवर रू. ३६.७३ कोटी वाढ झाली आहे.

३.५ **आस्थापना व इतर कारणे**

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू. ५.६६ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकिय मान्यता अहवालात २२.०३ कोटी इतकी तरतूद केली आहे. एकूण रू.१७.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल :-

प्रकल्पास सन १९९६ मध्ये मूळ प्र.मा. मिळाली. त्यानंतर प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढा निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रकल्पाची घळभरणी सन २००८-०९ मध्ये करण्यात आली व १०० टक्के पाणीसाठा सन २०११ मध्ये करण्यात आला.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाचे १.५५ अ.घ.फू पाणीसाठा क्षमतेचे काम १०० टक्के सन २०११ मध्ये पूर्ण झाले असून धरणाखालील नदीमधील अस्तित्वातील ७ को.प बंधा-यामधून ६९३६ हे. पीकक्षेत्र निर्मिती साध्य झाली आहे. प्रकल्पातील प्रत्यक्ष महत्तम सिंचित क्षेत्र ३४०१ हे. इतके आहे.

खाजगी प्रवर्तकाकडून धरण पायथा विद्युतगृहातून ८ मे.वॅट निर्मिती ७/२०११ पासून करण्यात येत असून ३०/९/२०१२ पर्यंत १.८३ कोटी युनिट्स इतकी वीजनिर्मीती करण्यात आली आहे.

मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत १२७.६६ कोटी असून प्रतिहेक्टरी किंमत रु.१.१९ लक्ष आहे. व लाभव्यय गुणोत्तर १.९६ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
जांबरे मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नाव : जांबरे	तालुका – चंदगड		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	५३५०	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१६/१०/१९९२	१९९०-९१	१७.३०	५३५०
	सुप्रमा-१	११/०४/२००१	१९९६-९७	६६.०३	५३५०
	सुप्रमा-२	०८/०४/२०११	२००८-०९	१४६.७७	५३५०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही.	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			७४.५४	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = १४.१७			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ६०.३७			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९४-९५	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			२०००	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रू.कोटी)			६६.०३	
७.०	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	१४.३७	६०.३१	४५.९४	३५.४८
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.५६	१४.७३	१४.१७	१०.९४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४४.६५	४४.६५	३४.४९
७.५	इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	२.३७	२७.०८	२४.७१	१९.०९
	एकूण	**१७.३०**	**१४६.७७**	**१२९.४७**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

जांबरे धरण ता. चंदगड जि. कोल्हापूर हे ताम्रपर्णी नदीवर प्रस्तावित आहे. धरणाचा पाणीसाठा ०.८२ अ.घ.फू. असून ८ को.प.बंधा-यातून खाजगी उपसाव्दारे चंदगड तालुक्यातील ५३५० हे. पिकक्षेत्र सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची घळभरणी अद्याप झालेली नाही. जांबरे प्रकल्पास सन १९९२ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तदनंतर १९९४ मध्ये ७८ हे. वनजमीन संपादनाचा प्रस्ताव सादर केला असता, दोन वेळा प्रस्ताव नाकारण्यात आला. प्रकल्प यंत्रणेच्या पाठपुराव्याने वनक्षेत्र ६२.५० हे. करून पुनःश्च प्रस्ताव सादर केला. सन २००३ मध्ये प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळाली. त्यानंतर अपु-या निधीमुळे सन २००८ पर्यंत बांधकामात प्रगती राखता आली नाही. धरणाच्या बुडित क्षेत्रात जलमग्न होणा-या ६२.५० हे. वनजमिनीच्या

निर्वनीकरण्याच्या प्रस्तावास अंतिम मान्यता मिळण्यास विलंब झाल्याने प्रकल्पाचे कामात विलंब झाला.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता :-

जांबरे प्रकल्पास रु.१७.३० कोटी किंमतीस दरसूची १९९०-९१ नुसार मूळ प्रशासकीय मान्यता शासनाने, दिनांक १६/१०/१९९२ रोजी दिली. त्यानंतर मकृखोविमं ने रु.६६.०३ कोटी किंमतीस (दरसूची १९९६-९७ नुसार) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ११/०४/२००१ रोजी दिली. त्यानंतर शासनाने रु.१४६.७७ कोटी किंमतीस (दरसूची २००८-०९ नुसार) व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ०८/०४/२०११ रोजी दिली. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये ७४.५४ कोटी खर्च झाला आहäþ.

३.० मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाची मूळ किंमत रू. १७.३० कोटी असून सुप्रमा किंमत रू. १४६.७७ कोटी आहे. प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत व्दितीय सुप्रमाची किंमत रु. १२९.४७ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ :-**

वनजमिनीच्या हस्तांतरणास लागलेला कालावधी, भूसंपादन, पुनर्वसन, अपुरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ४५.९४ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :**

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये १३७.२१ हे. जमीन संपादन सरासरी रु.२६,२३७ प्रति हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ०.३६ कोटीची तरतूद होती.सुप्रमा अहवालामध्ये १३७.२१ हेक्टर क्षेत्र सरासरी रु.२,२७,३८८ प्रति हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु.३.१२ कोटी आहे. त्यामुळे रु.२.७६ कोटी इतकी वाढ होत आहे.

पुनर्वसनाच्या कामात बुडित क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी व पर्यायी जमिनीसाठी रु.१.५५ कोटी आणि वनजमिनीमुळे ९.८६ कोटी वाढ झाली आहे.

अशा प्रकारे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रु. १४.१७ कोटी वाढ झाली आहे.

३.३ **संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-**

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालानुसार चित्री धरणाच्या काटछेदानुसार माती धरण प्रस्तावित केले होते. प्रत्यक्ष धरणाच्या खाणीतील मातीच्या अभियांत्रिकी गुणधर्मावरून मातीच्या धरणाचे काटछेद मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने संकल्पित केला आहे. त्यानुसार मातीकामाचे परिमाणामध्ये वाढ झाली आहे. तसेच सांडव्याची पायापातळी ७२१.६२ वरून ७१४.५० पर्यंत खाली गेल्याने सांडव्याचे खोदकाम व बांधकामाच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण रू.३७.४५ कोटी वाढ झाली आहे.

मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये सिंचन विमोचकाची तरतूद होती. तथापि शासनाच्या सुधारित धोरणानुसार सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद केल्याने रु.७.२० कोटीची वाढ झाली आहे.

संकल्पचित्रातील बदलामुळे एकूण रू.४४.६५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.४ **आस्थापना व इतर कारणे :-**

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू. २.३७ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात २७.०८ कोटी इतकी तरतूद केली आहे. यामुळे रू.२४.७१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ **पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब :-**

पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी डिसेंबर १९९३ मध्ये पुनर्वसन अधिनियम कलम ११ व नोव्हेंबर १९९८ मध्ये कलम १३ ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. तथापि महसूल खात्याने लाभक्षेत्रातील भूसंपादन प्रक्रिया सुरू केली नाही.

प्रकल्पग्रस्तांना मोबदला वाटप सन २००८ मध्ये झाले. तदनंतर ६५ टक्के रक्कम भरलेल्या पात्र ११ खातेदारांना लाभक्षेत्रामधील जमीन संपादन करून वेळेत देता येणे शक्य होणार नसलेमुळे लाभक्षेत्राबाहेरील मौजे हेरे येथील गट क्र.७०४ मधील २४.१६ हेक्टर जमीन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन म्हणून देण्यात येणार आहे. अद्याप या जमिनीचे प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेले नाही.

४.२ वन जमिनीच्या हस्तांतरणास झालेला विलंब :

जांबरे मध्यम प्रकल्पांतर्गत ७८ हेक्टर वनजमीन संपादनाचा प्रस्ताव दिनांक ८/१२/१९९४ रोजी केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालय नवी दिल्ली यांना मंजूरीसाठी सादर केला होता. तथापि वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत कलम २ अन्वये सदर प्रस्तावास मान्यता देण्यास असमर्थ असल्याचे सदर मंत्रालयाने दिनांक २२/०८/१९९५ रोजी कळविले. सदरचा प्रस्ताव पुनर्विचारास्तव महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०६/१९९६ रोजी पुनःश्च सादर केला असता, सदर मंत्रालयाने दिनांक २७/०७/२००१ रोजी संपादन करावयाच्या क्षेत्रातील झाडांची घनता ०.६० व झाडांची संख्या ३३४६२ असल्याचे कारणास्तव सदरील प्रस्ताव फेटाळला.

सन २००१ मध्ये उपरोक्त प्रकल्पाच्या सुधारित ६२.५० हे. वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाचा प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात आला. उपरोक्त प्रस्तावाला पर्यावरण व वन विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १५/१/२००३ अन्वये अटींच्या पूर्ततेच्या ५ वर्षाच्या कालमर्यादेच्या अधिन राहून तत्वतः मान्यता प्रदान केली होती. प्रकल्पासाठी सन २००१ ते २००८ पर्यंत अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे वन विभागास वर्ग करावयाची नक्त वर्तमान मूल्य (एनपीव्ही) रक्कम न भरल्याने तत्वतः मान्यता व्यपगत झाली. पुनःश्च वन जमिनीच्या मुदतवाढ प्रस्तावास पर्यावरण व वन विभाग, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २०/५/२००९ अन्वये अटींच्या अधिन राहून तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. अटींची पूर्तता केल्यानंतर वन व पर्यावरण मंत्रालय,नवी दिल्ली यांचेकडून दिनांक ९/९/२०१० नुसार अंतिम विधीवत मान्यता प्राप्त झाली.

धरण पायासाठी लागणा-या वनजमिनीतील वृक्षतोड करून माहे २/२०११ मध्ये जमीन ताब्यात मिळाली आहे. तथापि बुडित क्षेत्रातील वृक्षतोड अद्याप पूर्ण झालेली नाही.

उपरोक्त सर्व घटनाक्रम पाहता सन १९९४ ते २०१० या १६ वर्षांच्या कालावधीत वनखात्याची विधीवत मंजूरी न मिळाल्याने प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

४.३ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल :

प्रकल्पास सन १९९२ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली.मात्र सन १९९४-९५ पर्यंत निधी उपलब्ध झाला नाही.त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला.मात्र पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेण्यात आलेली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाच्या डाव्या तीरावरील मातीकाम बहुतांशी पूर्ण झाले आहे. धरणाच्या उजव्या तीरावर वनक्षेत्रातील जलरोधी खंदक, मातीकामासह घळभरणीचे काम बाकी आहे.

मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत १४६.७७ कोटी असून प्रतिहेक्टरी रु.२.७४ लक्ष आहे व लाभव्यय गुणोत्तर १.५२ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
सर्फनाला मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नाव : सर्फनाला	तालुका – आजरा		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	३७८४	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१६/१०/१९९८	१९९६-९७	३३.००	३३८६
	सुप्रमा-१	२९/०९/२०१०	२००८-०९	१४५.७०	३७८४
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही.	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			५५.१५	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = १५.८७			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = ३९.२८			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			२००७-०८	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			११/२००८	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रू.कोटी)			१२९.१९	

७.०	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२३.८६	८३.१६	५९.३०	५२.६२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	३.२५	२१.१३	१७.८८	१५.८६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१६.६९	१६.६९	१४.८१
७.५	इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	५.८९	२४.७२	१८.८३	१६.७१
	एकूण	**३३.००**	**१४५.७०**	**११२.७०**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

सर्फनाला धरण ता. आजरा जि. कोल्हापूर हे हिरण्यकेशी नदीला मिळणा-या सर्फनाल्यावर आहे. धरणाचा पाणीसाठा ०.६७ अघफू असून ५ को.प.बंधा-यातून खाजगी उपसाव्दारे आजरा तालुक्यातील ३७८४ हे. पीकक्षेत्र सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामास विलंब झाल्याने प्रकल्पाची घळभरणी अद्याप झालेली नाही.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :-

सर्फनाला प्रकल्पास रु.३३.०० कोटी किंमतीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक १६/१०/१९९८ रोजी देण्यात आली. त्यानंतर

शासनाने रु.१४५.७० कोटी किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक २९/०९/२०१० रोजी दिली. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये ५५.१५ कोटी खर्च झाला आहे.

३.० मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाची मूळ किंमत रू. ३३.०० कोटी असून, सुप्रमा किंमत रू. १४५.७० कोटी आहे. प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रथम सुप्रमाची किंमत रु.११२.७० कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ :-**

अपुरा निधी, भूसंपादन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन प्रकल्पाच्या खर्चात रुपये ५९.३० कोटीची वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :**

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये २८७.९० हे. जमीन संपादन सरासरी रु.९७,९५० प्रति हेक्टरी दराने करणे प्रस्तावित होते व त्यासाठी २.८२ कोटीची तरतूद होती. सुप्रमा अहवालामध्ये २८७.९० हे. क्षेत्र सरासरी रु.५,३६,६४४ प्रति हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून, त्याची किंमत रु.१५.४५ कोटी आहे. त्यामुळे रु.१२.६३ कोटी इतकी वाढ होत आहे.

पुनर्वसनाच्या कामात नागरी सुविधांमुळे रू.४.२० कोटी, बुडित क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रु.०.१५ कोटी आणि वनजमिनीमुळे ०.९० कोटी वाढ झाली आहे.

अशा प्रकारे मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत रु.१७.८८ कोटी वाढ झाली आहे.

३.३ **व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :-**

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालात लाभक्षेत्रातील १४ गावांमधील ३३८६ हे. पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार होता. साठयामध्ये बदल न करता पीक रचनेतील बदलामुळे सुधारित अहवालात नवीन ६ गावातील ३९८ हे. सिंचन क्षेत्र समाविष्ट केले आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र ३७८४ हे. इतके आहे. त्यासाठी वेगळे बंधारे न बांधता पूर्वीच नदीवर अस्तित्वात असलेल्या साळगाव व सोहाळे या स्वतंत्र बंधा-यांच्या क्षेत्राचा समावेश करण्यात आला. यासाठी वेगळा खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे जरी व्याप्तीमध्ये बदल झाला असला तरी किंमतीमध्ये वाढ झालेली नाही.

३.४ **संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-**

मूळ प्रशासकीय मान्यता अहवालानुसार प्रकल्पाची अंदाजपत्रके घटप्रभा प्रकल्पाचा काटछेद वापरून तयार केली होती. प्रत्यक्षात उपलब्ध खाणीतील माती नमुन्याच्या अभियांत्रिकी गुणधर्माप्रमाणे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने धरणाचा सुधारित काटछेद संकल्पित केला आहे. त्यानुसार मातीकामाच्या परिमाणामध्ये वाढ झाली आहे. कवच भरावाची पारगम्यता कमी असल्याने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या धरणाच्या काटछेदामध्ये अधोबाजूच्या कवच भरावामध्ये (बर्म) स्कंध पातळीवर वाळूच्या आडव्या गाळणीची तरतूद केली आहे. त्यामुळे एकूण रू.१४.२४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जलविद्युत निर्मितीसाठी सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद केल्याने रू.२.४५ कोटीची वाढ झाली. धरणाचा काटछेद व सिंचन तथा विद्युत विमोचक या संकल्पचित्रातील बदलामुळे एकूण वाढ रू.१६.६९ कोटी इतकी आहे.

३.५ **आस्थापना व इतर कारणे :-**

मूळ अहवालामध्ये आस्थापनेसाठी रू.५.८९ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात २४.७२ कोटी इतकी तरतूद केली आहे. यामुळे रू.१८.८३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ **भूसंपादनामुळे झालेला विलंब :-**

प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातील संपादनाचे प्रस्ताव १९९९ मध्ये सादर झाले तरी संपादनाची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. प्रकल्पग्रस्तांच्या प्रखर विरोधामुळे २००८ पर्यंत प्रकल्पग्रस्तांनी काम सुरू करू दिले नाही.

४.२ **पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब :-**

पुनर्वसन अधिनियम अंतर्गत कलम-११ ची अधिसूचना ७/२००० मध्ये काढण्यात आली असली तरी प्रकल्पग्रस्तांच्या प्रखर विरोधामुळे महसूल विभागाकडून संपादनाबाबतची कार्यवाही २००८ मध्ये सुरू झाली. त्यामुळे प्रकल्पास ८ वर्षे इतका विलंब झाला आहे.

२७९ प्रकल्पग्रस्ताना २२० हेक्टर क्षेत्र पर्यायी जमीन म्हणून देय असून, प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील १४ गांवामध्ये एकूण ३३६.५९ हे. क्षेत्र संपादन प्रगतीपथावर आहे. त्यापैकी दर्डेवाडी व पारपोली गांवामधील १६.७२ हे. क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन ७.८४ हे. क्षेत्र प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे. शेळप व आल्याचीवाडी या दोन गांवांचे ७०.८३ हे. क्षेत्राचे निवाडे नुकतेच जाहीर झाले आहेत. उर्वरित २४९ हेक्टरसाठी भूसंपादन कार्यवाही विविध स्तरावर प्रगतीपथावर आहे.

४.३ **अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशील :**

प्रकल्पास सन १९९८ मध्ये मूळ प्र.मा. मिळाली. मात्र प्रकल्पास सन २००७-०८ पर्यंत निधी उपलब्ध झाला नाही. प्रकल्पासाठी पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत हाती घेता आली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाचे दोन्ही तीरावरील मातीकाम पूर्ण आहे. तसेच सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या अववाहक नलिकेचे (पेनस्टॉक) संधानकासह काम पूर्ण झालेले असून सांडव्याचे खोदकाम पूर्ण झाले आहे. धरणाच्या घळभरणीचे काम शिल्लक असून सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या शुष्क विहिरीचे काम बाकी आहे. सांडवा बांधकाम, पुच्छ कालव्यावरील पूल व पुच्छ कालव्याचे खोदकाम बाकी आहे.

प्रकल्पांतर्गत ५ को.प.बंधारे असून, या को.प.बंधाऱ्यांची कामे पूर्ण आहेत. या को.प.बंधाऱ्याद्वारे खाजगी उपसासिंचनाद्वारे ३७८४ हे.(पीकक्षेत्र) सिंचन प्रस्तावित आहे.

मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत १४५.७० कोटी असून प्रति हेक्टरी खर्च रू.३.८५ लक्ष आहे व लाभव्यय गुणोत्तर १.५५ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
धामणी मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नाव : धामणी	तालुका - राधानगरी		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	२१००	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२४/१२/१९९६	१९९५-९६	१२०.३०	२१००
	सुप्रमा-१	०९/०२/२००५	२००३-०४	३२०.७०	२१००
	सुप्रमा-२ (प्रस्तावित)		२०११-१२	७८२.५५	२१००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत			नाही	
५.०	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			२७७.०१	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च(रु.कोटी) ४५.३६			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) २३१.६५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) ०.००			
६.०	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९९-००	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			२०००	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किमत (रू.कोटी)			२४९.७३	
७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु.कोटी)
	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	९६.०९	२८९.२६	१९३.१७	२९.१७
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	२.३१	५४.१८	५१.८७	७.८३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	१८०.५७	१८०.५७	२७.२७
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१११.०७	१११.०७	१६.७७
७.५	इतर कारणे	०.००	०.००	०.००	०.००
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	२१.९०	१४७.४७	१२५.५७	१८.९६
	एकूण	**१२०.३०**	**७८२.५५**	**६६२.२५**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :

धामणी धरण मौजे राई ता राधानगरी, जि. कोल्हापूर येथे धामणी नदीवर प्रस्तावित आहे. धरणाचा एकूण उपयुक्त पाणीसाठा ३.५८ अघफू आहे.प्रकल्पाचा वार्षिक नियोजित पाणी वापर ३.८० अघफू आहे. त्यापैकी ३.१९ अघफू पाणी बिगर सिंचनासाठी व ०.६१ अघफू पाणी सिंचनासाठी प्रस्तावित आहे. १० को.प.बंघा-यातून खाजगी उपसाव्दारे प्रकल्पाचे एकूण २१०० हेक्टर पीकक्षेत्र (राधानगरी ५८८ हे., पन्हाळा ७६५ हे.व गगनबावडा ७४७ हे.).सिंचनक्षम करण्याचे नियोजन आहे. धरणाचे मातीकाम ७३ टक्के पुर्ण असुन निधी अभावी सध्या काम संथगतीने प्रगतीपथावर आहे. प्रकल्पासाठी आवश्यक ४६ हेक्टर वन्यजीव व ५८ हेक्टर वनजमीन असे एकूण १०४ हेक्टर वनजमीनीच्या निर्वनिकरणाचा प्रस्ताव मंजूरीअभावी धरणाचे काम ६/२००२ ते

५/२००७ पर्यंत म्हणजेच ५ वर्षे बंद होते. मार्च २००७ मध्ये वन्यजीव क्षेत्र निर्वनिकरणाकरिता वर्ग करणेसाठी दाखल करण्यात आलेल्या इंटर लॉक्युटरी ॲप्लीकेशनला मा. सर्वोच्च न्यायालयाची मान्यता मिळाली.४६ हे. वन्यजीव क्षेत्रासह १०४ हे. वनजमीनीच्या निर्वनीकरण प्रस्तावास दिनांक १७.०९.२०१२ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. सदर १०४ हेक्टर वनक्षेत्र अंशतः घळभरणी पूर्वी हस्तांतरित करून घेणेची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

२.० **प्रशासकिय मान्यता / सुधारित प्रशासकिय मान्यता तपशीलः**

धामणी मध्यम प्रकल्पास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी दिनांक २४/१२/१९९६ रोजी रु.१२०.३० कोटी रकमेस (दरसूची सन १९९५-१९९६) प्रशासकीय मान्यता दिली आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेतील धरण संरेखेनुसार बुडीत क्षेत्रात एकूण ५४० हेक्टर क्षेत्र होते (खाजगी ३९० हे., शासकीय १० हे. व वनजमीन १४० हे.) .धामणी प्रकल्पाच्या मंजूर धरणस्थळी आवश्यक असणारे वनक्षेत्र कमी करणेकरिता धरण संरेखा ६५० मीटरने खाली घेण्यात आली. प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत मान्यता अहवालास मकृखोविमं, पुणे यांनी दिनांक ९/२/२००५ रोजी रू.३२०.७० कोटी रकमेस (दरसूची २००३-०४) प्रशासकिय मान्यता दिली.

या प्रकल्पाच्या दगडी धरणास दिं.२४/१२/१९९६ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मूळ प्रमानुसार जागेवर दगडी धरण बांधकाम अर्थिकदृष्टया किफायतशिर नसलेने याच जागी वारणा धरणाच्या काटछेदावर अधारित माती धरण बाधंणेच्या अंदाजपत्रकास मु.अ.(वि.प्र.) यांनी दिं.२३/०९/१९९७ मध्ये मान्यता दिली आहे. उपरोक्त मंजूर अंदाजपत्रकावर धामणी धरणाच्या कामाची निविदा माहे १०/१९९७ मध्ये बोलविणेत आली.निविदा कार्यवाही पूर्ण करून लघुत्तम निविदेस महामंडळाने दिं.३१/१२/१९९८ रोजी मान्यता दिली आहे. धरणासाठी लागणा-या वनजमिनीतील घट तसेच धरण पाणीसाठयात व सिंचन क्षेत्रात कोणताही बदल होत नसल्याने धरण संरेखा मूळ संरेखेच्या ६५० मी. अधर बाजूस सुधारित संरेखेस महामंडळाने दि.१७/०६/२००० रोजी मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने धरणाच्या सर्वसाधारण मंजुर आराखडयामधील सुधारित काटछेदानुसार प्रकल्पाच्या रु.३२०.७० कोटीचा द्वितीय सु.प्र.मा.प्रस्तावास दिं.९/२/२००५ रोजी महामंडळाने मान्यता दिली. धरणाची अंतिम संकल्पने सन २००७ मध्ये प्राप्त झालेमुळे प्रकल्पाचा रु.७८२.५५ कोटी इतक्या रकमेचा द्वितीय सु.प्र.मा. अहवाल तयार करणेत आल असून तो मंजूरीसाठी राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे दिनांक ३०/१/२०१२ रोजी सादर करण्यांत आला आहे. सदर प्रस्ताव दिनांक २८/९/२०१२ रोजी शेरे पूर्ततेसाठी प्राप्त झाला असून विभागीय स्तरावर शेरे पूर्ततेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु.२७७.०१ कोटी इतका खर्च झाला आहे.

३.० **मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमाची किंमत वाढण्याची कारणे :**

सदर प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किमत रु.१२०.३० कोटी असून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर झालंल्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची किंमत रु.७८२.५५ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यता किमतीच्या तुलनेत रु.६६२.२५ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.१ **दरसूचीतील वाढ** :

मुळ प्र.मा. सन १९९५-९६ या दरसुचीवर आधारित आहे. द्वितीय सुप्रमा २०११-१२ च्या दरसुचीवर आधारित आहे. या १७ वर्षातील बदलामुळे झालेली वाढ, निविदा अधिक्यामुळे झालेली वाढ व कार्यक्षेत्रावरील परिस्थितीनुसार १२५ टक्केपेक्षा पुढील परिमाणासाठी लागणारे कवच व गाभा साहित्य ६.५० कि.मी.ऐवजी ८.०० कि.मी. वहन अंतर इतकी वाढ, उपरोक्त बाबीच्या वाढीव उचल (लिफ्ट) तसेच क्षेत्रिय ठिकाणी बोल्डर्ससाठी करावे लागणारे अतिरिक्त परिश्रम इत्यादीमुळे वाढलेला खर्च तसेच दरांमधील वाढ दरसुचीमधील वाढीमध्ये अंतर्भूत केली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.१९३.१७ कोटी वाढ झाली आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादनामुळे झालेली वाढः**

भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीच्या खर्चाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत ५१.८७ कोटी वाढ झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये एकूण ५४० हे. क्षेत्र संपादित

करण्याचे नियोजित होते त्यापैकी ३९० हेक्टर खाजगी क्षेत्र होते. सदर प्रस्तावामध्ये रु.४८,२०० प्रती हेक्टर याप्रमाणे ३९० हेक्टर खाजगी क्षेत्र संपादन व अनुषांगिक बाबींसाठी एकूण रु १.८८ कोटी तरतूद करण्यात आली होती. प्रस्तावित सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये एकूण ६९७ हे. क्षेत्र संपादित करण्याचे नियोजित आहे. यामध्ये ३२५ हेक्टर खाजगी क्षेत्र येते. सदर प्रस्तावामध्ये रु.१,९६,९०० प्रती हेक्टर याप्रमाणे ३२५ हेक्टर खाजगी क्षेत्र संपादन व अनुषांगिक बाबींसाठी एकूण रु.६.४ कोटी तरतूद करण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.४.५२ कोटी इतकी वाढ झाली आहे.

पुनर्वसनाच्या कामात वाढीव नागरी सुविधामुळे ५.८४ कोटी, उदरनिर्वाह भत्त्यामुळे रु.०.२१ कोटी, घर बांधणी अनुदानामुळे रु.०.१३ कोटी व बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी रु.०.५९ कोटी अशी एकूण रु.६.७७ कोटीची वाढ झाली.

सदर प्रस्तावामध्ये प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या राई व पडसाळी गावातील घरांचे मुल्यांकन व पाईप लाईन यांचा मोबदला यासाठी एकूण रु.०.६१ कोटी सानुग्रह अनुदान म्हणून तरतूद करण्यात आली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये यासाठी तरतूद नव्हती. यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.०.६६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये एकूण १५० हे. वन जमीन क्षेत्र संपादित करण्याचे नियोजित होते प्रकल्पाच्या नवीन संरेखेनुसार ४६ हेक्टर वन्यजीव व ५८ हेक्टर वनक्षेत्र असे एकूण १०४ हेक्टर वनजमीन बाधित होते. सदर वनक्षेत्र अंतिमतः वर्ग करण्यांस विधीवत मान्यता प्राप्त झाली आहे. वन जमीन क्षेत्र वर्ग करण्यासाठी वन विभागास नक्त वर्तमान मूल्य व अन्य अनुषंगिक बाबींसाठी रु.४०.३२ कोटी इतकी रक्कम अदा करण्यांत आली आहे. उपरोक्त कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.३९.९७ कोटी इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रु.५१.८७ कोटी वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

धरण पायातील वनजमिनीच्या क्षेत्रातील घट तसेच पाणीसाठा व सिंचन क्षेत्रात कोणताही बदल होत नसल्याने धरणांची संरेखा अधर बाजूस ६५० मी. घेण्यात आली.यामुळे धरणाच्या लांबीमध्ये ४०२ मीटरने वाढ झाली असून प्रकल्पाच्या मातीकाम परिमाण वाढले आहे. तसेच सांडव्याच्या लांबीमध्ये ६५० मी. ने वाढ झाली आहे. सिंचन तथा विद्युत विमोचकाची सुधारित तरतूदीमुळे परिमाणात वाढ झाली आहे.यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.१८०.५७ कोटी वाढ झाली आहे.

३.४ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढः

मूळ तांत्रिक मंजूर अंदाजपत्रकासाठी धामणी धरणाच्या मातीकामासाठी वारणा प्रकल्पाचा मंजूर काटछेद विचारात घेण्यांत आला होता. क्षेत्रियस्थळी उपलब्ध कवच व गाभा भरावाच्या साहित्याच्या गुणधर्मानुसार म.स.स, नाशिक यांनी मंजूर केलेल्या संकल्पनानुसार धरणाच्या काटछेदात वाढ झाली आहे. त्यामुळे माती धरणाच्या कवच भराव, गाभा भराव, वाळूची तिरपी झिरणी, अश्मपटल व खोदाई इत्यादी प्रमुख बाबीच्या परिमाणात वाढ झाली आहे. तसेच उर्ध्व व अधर बाजूस कवच भरावात वाळूच्या आडव्या झिरणीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

सुधारित संरेखेनुसार सांडव्याच्या प्रवण मार्गाची लांबी व तळातील रुंदी वाढली. माती धरणाची उंची ७४.६४ मी.इतकी असलेमुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या निकषानुसार घळ भरणीचे काम दोन टप्यात करावे लागणार आहे. यामुळे तात्पुरत्या वळण कालव्याची तरतुद केली आहे. सांडव्याच्या प्राप्त झालेल्या संकल्पनानुसार पुच्छ कालव्याच्या खोदकामाच्या परिमाणात वाढ झाली आहे.

मूळ प्रस्तावानुसार सिंचन विमोचक व कोल्हापूर शहर पाणी पुरवठा विमोचक अशा दोन्ही विमोचकाची तरतुद होती. सुधारित संरेखेनुसार सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतुद करणेत आली आहे. त्यामुळे खोदकामाच्या परिमाणात वाढ झाली आहे.

उपरोक्त कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.१११.०७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.५ **आस्थापना व इतर कारणांमुळे झालेली वाढः**

मूळ प्रकल्प अहवालाच्या तुलनेमध्ये द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये शासनाच्या प्रचलित नियमानुसार आस्थापना (ईटीपी). या कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.१२५.५७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ **पुनर्वसनाच्या कामास झालेल्या विलंबामुळे :**

प्रकल्पाची व पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी मार्च १९९९ मध्ये पुनर्वसन अधिनियम कलम ११ व जूलै १९९९ मध्ये कलम १३ ची अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर लाभक्षेत्रातील जमीनीचे संपादन सुरु करुन पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे मात्र अद्याप ती अपूर्ण आहे .

प्रत्यक्ष धरणासाठी (Seat of Dam) लागणारी जमीन खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेऊन नोव्हेंबर २००० मध्ये धरणाच्या कामास सुरुवात झाली आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक ३२५ हेक्टर खाजगी क्षेत्रापैकी ३०४ हेक्टर खाजगी जमीन संपादन प्रक्रिया पूर्ण होऊन ताब्यात मिळाली आहे. उर्वरित २१ हेक्टर क्षेत्राची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या एकूण २८४ खातेदारांना १७८ हेक्टर क्षेत्र देय आहे. या पैकी ५७ प्रकल्पग्रस्तांना ४२ हेक्टर सरकारी मुलकीपड जमीन देण्यात आली आहे. उर्वरित खातेदारांना पर्यायी जमीन वाटप अद्याप झालेली नाही.

महसूल खात्यामार्फत मुळ संकलन रजिस्टर अद्यावत करुन त्याप्रमाणे पर्यायी देय क्षेत्र अंतीम झालेले नाही. त्यामुळे पुनर्वसन कामास विलंब होत आहे .

धरणाचे मातीकाम ७३ टक्के, सिंचन तथा विद्युत विमोचकाचे काम ६० टक्के व सांडव्याची खोदाई ५० टक्के पूर्ण झाली आहे. निधी उपलब्धतेनुसार अंशतः घळभरणी करण्यांचे नियोजन आहे. यासाठी बूडीत क्षेत्रातील २१ हेक्टर क्षेत्राचे संपादन व २२७ प्रकल्पग्रस्तांना १३६ हेक्टर इतकी जमीन वितरण होणे आवश्यक आहे. तसेच राई, तामकरवाडी व शेटेवाडी ही गावठाणे /वाडी स्थलांतरित होणे आवश्यक आहे.

४.२ **वन जमिनीच्या हस्तांतरणास झालेला विलंब :**

प्रकल्पासाठी आवश्यक ४६ हेक्टर वन्यजीव व ५८ हेक्टर वनजमीन असे एकूण १०४ हेक्टर वनप्रस्ताव मंजूरी अभावी धरणाचे काम ६/२००२ ते ५/२००७ पर्यंत ५ वर्षे बंद होते. मार्च २००७ मध्ये वन्यजीव क्षेत्र वर्ग करणेच्या इंटर लॉक्युटरी अप्लीकेशनला मा. सर्वोच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर शासनाच्या अनुमतीन काम सुरू झाले. १०४ हे. वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाच्या प्रस्तावास दिनांक १७.०९.२०१२ रोजी विधीवत मान्यता प्राप्त झाली आहे. मात्र सदर १०४ हेक्टर वनक्षेत्र अद्याप हस्तांतरीत झालेले नाही .

४.३ **अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशील :**

प्रकल्पास सन १९९६ मध्ये मुळ प्र.मा. मिळाली. सदर कामाची निविदा सन १९९७ मध्ये मागविण्यात आली. तथापि, सदर कामाच्या पूर्व अर्हतेबाबत न्यायालयात दावा दाखल झाला होता. सदर दाव्याच्या निकालानंतर या कामाचे कार्यारंभ आदेश सन २००० मध्ये देण्यात आले. सन २००२-२००३ पर्यंत प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला. मात्र पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने नियोजनाप्रमाणे कामे वेळेत पूर्ण झालेली नाहीत.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती :

धरणाचे एकूण सुमारे ७३ टक्के मातीकाम काम पूर्ण झाले आहे. राई, शेटेवाडी व तामकरवाडी या गावाचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. शुष्क विहिरीतील आपत्कालीन द्वार व सेवाद्वाराच्या अंतस्थ सुट्या भागांच्या उभारणीसह शुष्क विहिरीचे काम तलांक ६१५.३० मी.पर्यंत पूर्ण झाले आहे. प्रकल्पास द्वाररहित सांडव्याची तरतुद असून त्याचे खोदकाम सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्रस्तावित द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालाची अंदाजित किंमत रु.७८२.५५ कोटी असून प्रती हेक्टर सिंचनाचा खर्च रु.३७.२६ लक्ष असून फक्त सिंचनसाठ्याचा विचार करता हा प्रती हेक्टरी खर्च रु. ५.९० लक्ष इतका येतो व लाभव्यय गुणोत्तर १.१३ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी.
आंबेओहोळ मध्यम प्रकल्प, जिल्हा कोल्हापूर

१	प्रकल्पाचे नांव : आंबेओहोळ	तालुका: आजरा		जिल्हा : कोल्हापूर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	६३४२ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१६/१०/१९९८	१९९६-९७	२९.३०	६३४२
	सुप्रमा-१	०८/०१/२०१०	२००८-०९	११४.९३	६३४२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत				नाही.
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			५७.७२	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) ११.५८			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) ४६.०५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) ०.०९			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९९-२०००	
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			२००१	
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे त्यावेळची अदांजीत किंमत (रु.कोटी)			३१.९२	

७ मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु.कोटी)

	बाब	मुळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२०.३७	२८.८२	८.४५	९.८७
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	३.९१	२०.८३	१६.९२	१९.७६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०	०	०	०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	४५.००	४५.००	५२.५५
७.५	इतर कारणामुळे झालेली वाढ	०	१.१२	१.१२	१.३१
७.६	ईटीपी मुळे झालेली वाढ	५.०२	१९.१६	१४.१४	१६.५१
	एकूण	**२९.३०**	**११४.९३**	**८५.६३**	**१००**

सविस्तर स्पष्टीकरण

१.० सर्वसाधारण माहिती :-

आंबेओहोळ प्रकल्प हा हिरण्यकेशी नदीच्या आंबेओहोळ नाल्यावर असून त्यावर १.२४ अ.घ.फू क्षमतेचे धरण बांधून त्याच्या खालील बाजुस ७ को. प. बंधा-यातून खाजगी उपसाव्दारे आजरा तालूक्यात २१६८ हे. व गडहिंग्लज तालूक्यात ४१७४ हे. असे एकुण ६३४२ हे. सिंचन क्षमता निर्मितेचे नियोजन आहे.

धरणाचे कामास सन २००१ मध्ये सुरुवात झाली तथापि पुनर्वसन प्रक्रियेस होणारा विलंब, प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील संपादनास मा.उच्च न्यायालयाची स्थगिती तसेच पर्यायी जमीनीच्या संपादनास शासनस्तरावरुन दिलेली स्थगिती यामुळे धरणाच्या कामास विलंब होत आहे.

२.० प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यता :-

आंबेओहोळ प्रकल्पास रु. २९.३० कोटी किंमतीस दरसूची १९९६-९७ नुसार मुळ प्रशासकीय मान्यता महामंडळाने दिनांक १६/१०/१९९८ रोजी दिली. त्यानंतर शासनाने रु.११४.९३

कोटी किंमतीस (दरसूची २००८-०९ नुसार) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक ०८/०१/२०१० रोजी दिली. प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये ५७.७२ कोटी खर्च झाला आहे.

३.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत सुप्रमा ची किंमत वाढण्याची कारणे :-

प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रथम सुप्रमाची किंमत रु. ८५.६३ कोटी इतकी वाढली असून त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :

भूसंपादन, पुनर्वसन, अपूरा निधी व इतर कारणांमुळे झालेल्या विलंबामुळे दरसूची वाढ होऊन त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रुपये ८.४५ कोटीची वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :

मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये ४५७ हे. जमीन सरासरी रु.८०,०००/- प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित होते व त्यासाठी ३.९१ कोटीची तरतूद होती. सुप्रमा अहवालामध्ये ३९५ हेक्टर क्षेत्र सरासरी रु. ३,९०,०००/- प्रती हेक्टरी दराने संपादन करणे प्रस्तावित असून त्याची किंमत रु. १५.४७ कोटी आहे. त्यामुळे भूसंपादनासाठी रु. ११.५६ कोटी वाढ झाली आहे. प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये पुनर्वसन कामासाठी तरतूद नव्हती, तथापि, सदर कामासाठी सुप्रमा अहवालामध्ये रु.५.३६ कोटीची तरतूद केली आहे. त्यामुळे भूसंपादन व पुनर्वसन कामासाठी एकूण रु.१६.९२ कोटीची वाढ झाली आहे.

३.३ संकल्पचित्रात बदलामुळे झालेली वाढ :-

१) धरणाचे काटछेदाच्या रुंदीत वाढ :- मुळ प्र.मा. अहवालानुसार धरणाचे संकल्पन चिकोत्रा प्रकल्पाच्या काटछेदानुसार करण्यात आले होते, त्यानंतर क्षेत्रिय साहित्याच्या गुणधर्मानुसार मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचेकडून धरणाचे संकल्पन करुन घेण्यात आले. त्यानुसार धरणाच्या काटछेदात वाढ होऊन रु. २९.६० कोटी इतकी खर्चात वाढ झाली आहे.

२) डकबिल पध्दतीचा सांडवा :- मुळ प्र.मा अहवालानुसार सांडव्यासाठी १६० मी. लांबी आवश्यक होती. तथापि, क्षेत्रीय परिस्थितीनुसार सांडव्यास पुरेशी जागा मिळत नसलेने मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचेकडून डकबिल पध्दतीच्या सांडव्याचे संकल्पन तयार करणेत आले. त्यामुळे १३.८४ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३) मुळ प्र.मा. अहवालामध्ये सिंचनविमोचकाची तरतूद होती. तथापि प्रचलित शासन धोरणानुसार ०.५० मेगावॅट विद्युत निर्मीती करणेसाठी सिंचन तथा विदयुत विमोचकाची तरतूद करण्यात आली.. त्यामुळे १.५६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

उपरोक्त सर्व संकल्पचित्रातील बदलांमुळे झालेली एकूण वाढ रु.४५.०० कोटी वाढ झाली आहे.

३.४ आस्थापनामुळे व इतर कारणामुळ झालेली वाढ :

मुळ अहवालामध्ये आस्थापनापोटी रु. ५.०२ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात आस्थापना करीता रु. २०.२८ कोटी इतकी तरतूद केल्याने रु. १५.२६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४.०० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :-

४.१ पुनर्वसनाच्या कामामुळे झालेला विलंब :-

प्रकल्पाची व पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी जुलै २००० मध्ये पुनर्वसन अधिनियम कलम ११ व ऑगस्ट २००२ मध्ये कलम १३ ची अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर लाभक्षेत्रातील जमीनीचे संपादन सुरु करुन पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्यात आली.

प्रत्यक्ष धरण पाया व सांडवा यासाठी लागणारी जमीन संपादन करताना धरणपायातील मौजे आर्दाळ, उत्तूर व करपेवाडी येथील प्रकल्प्रस्तांनी तीव्र विरोध केला होता. जिल्हाधिकारी, कोल्हापूर व लोकप्रतिनिधी यांनी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर २९ मार्च, २००१ रोजी धरणाच्या कामास सुरुवात झाली.

प्रकल्पांतर्गत एकूण ६२० प्रकल्पग्रस्त खातेदारांना ४५६ हे. इतकी पर्यायी जमीन देय आहे. आंबेओहोळ लाभक्षेत्रातील १८ गावांमध्ये २९७ हे. उपलब्ध असुन त्यापैकी १७.४० हे. क्षेत्र संपादन झाले आहे व उर्वरित २७९.६० हे. क्षेत्राचे संपादन कार्यवाही महसुल खात्यामार्फत सुरु आहे. तथापी ४ गावातील १७५ हे. क्षेत्राचे संपादन कार्यवाहीस न्यायालयाची स्थगिती आहे.

आंबेओहोळ लाभक्षेत्रातील उपलब्ध क्षेत्र वजा जाता उर्वरित आवश्यक १५९ हे. पर्यायी जमीन चित्री प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये उपलब्ध आहे. तथापि, पर्यायी जमीन वाटपासाठीच्या भूसंपादनास शासन स्तरावरुन पुनर्वसन व मदत विभागाने गडहिंग्लज तालुक्यातील क्षेत्र संपादनास स्थगिती दिली असलेने पर्यायी जमिनीच्या भूसंपादनास व पर्यायाने पुनर्वसन कामास विलंब होत आहे. त्यामुळे धरणाचे कामास आणखी विलंब होऊन पर्यायाने प्रकल्पाचे किंमतीत वाढ होणार आहे.

जुलै २००० मध्ये पुनर्वसन अधिनियम कलम ११ प्रसिध्द केल्यानंतर सुमारे १२ वर्षाचे कालावधीतही फक्त एकूण देय क्षेत्राच्या १ टक्का जमिनीचे वाटप झाले आहे. त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप मार्गी न लागल्याने धरणाचे घळभरणीचे काम हाती घेता आलेले नाही..

४.२ अपु-या निधीमुळे झालेल्या विलंबाचा तपशिल :

प्रकल्पास सन १९९८ मध्ये मुळ प्र.मा. मिळाली. मात्र सन २००५-०६ पर्यंत पुरेसा निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर प्रकल्पास काही प्रमाणात निधी मिळत राहिला. मात्र पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने नियोजनाप्रमाणे गतीने कामे करता आलेली नाहीत. सध्या धरण सांडवा व सिंचन तथा विद्युत विमोचकाची कामे प्रगतीपथावर आहेत.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

धरणाची एकूण लांबी १९७५ मी. असून महत्तम उंची २७.७८ मीटर आहे. धरणाचे एकूण २२.५० लक्ष घ.मी. मातीकामापैकी १७.०० लक्ष घ.मी. इतके घळभरणी व्यतिरिक्त दोन्ही तीरावरील काम एकूण सुमारे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे.

सिंचन तथा विद्युत विमोचकाचे खोदकाम पूर्ण होऊन संधानकाचे ३ स.घ.मी. पैकी २ स.घ.मी. चे काम पुर्ण झाले आहे. तसेच पातनळ टाकणेचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. याप्रमाणे एकूण सुमारे ६० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

या प्रकल्पास व्दार रहित डकबिल प्रकारचा ८० मी. लांबीचा सांडवा आहे. सांडवा तसेच पुच्छ कालवा खोदाईचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून सांडवा संधानकाचे १३ स.घ.मी. पैकी ७.५० स.घ.मी. चे काम पुर्ण झाले आहे. याप्रमाणे एकूण सुमारे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्रकल्पबाधीतांच्या विरोधामुळे उर्वरित माती धरण घळभरणीसह, सांडवा बांधकाम व विमोचक दरवाजे बसविण्याचे काम अपूर्ण असून धरणात पाणीसाठा करता आलेला नाही.

मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ११४.९३ कोटी असून प्रतिहेक्टरी किंमत रु. १.८१ लक्ष व लाभव्यय गुणोत्तर १.८३ इतके आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
पिंपळगांव ढाळे मध्यम प्रकल्प, जिल्हा सोलापूर

१	प्रकल्पांचे नांव:- पिंपळगांव ढाळे मध्यम प्रकल्प	तालुका बार्शी	जिल्हा सोलापूर		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर) पीक क्षेत्र	३३८४ हे	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ – ११२४ हे		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची वर्ष	किमंत (रु कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्य) पीकक्षेत्र
	मूळ प्रशासकिय मान्यता	३०.०६.१९९४	१९९२-१९९३	१०.०१	३३८४
	सुप्रमा-१	०२.०९-१९९९	१९९६-१९९७	४२.७८	३३८४
	सुप्रमा-२	०३.०२.२००४	२०००-२००१	६०.३०	३३८४
	सुप्रमा-३	१८.०३.२०१०	२००८-२००९	९५.३९	३३८४
	सुप्रमा-४	प्रस्तावित	२०११-२०१२	१२१.४९	३३८४
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किमंत (रु कोटी)			आवश्यक नाही	
५.०	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च(रु कोटी)			८९.९५	
	५.१ भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु कोटी) = १९.०७				
	५.२ बांधकामावरील खर्च(रु कोटी) = ६२.७६				
	५.३ इटीपी खर्च (रु कोटी) = ८.१२				
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९९६-१९९७	
	६.१ प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९९६	
	६.२ त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु. कोटी)			**१०.०१**	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु कोटी)				
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
	७.१ दरसूचीतील वाढ	७.२७	३४.७५	२७.४८	२४.६५
	७.२ भूसंपादन पुनर्वसन वन जमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	१.१२	४२.३२	४१.२०	३६.९६
	७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	-	-	-	-
	७.४ सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	-	२४.१४	२४.१४	२१.६५
	७.५ इतर कारणे	-	१६.५७	१६.५७	१४.८६
	७.६ ईटीपीमुळे झालेली वाढ	१.६२	३.७१	२.०९	१.८८
	एकूण	**१०.०१**	**१२१.४९**	**१११.४८**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

सर्वसाधारण माहिती - :- पिंपळगांव (ढाळे) मध्यम प्रकल्प अवर्षण प्रवण बार्शी तालुक्यातील मौजे पिंपळगांव गांवाजवळ सिरा नाल्यावर आहे. या प्रकल्पाचा पाणी साठा १२.६६ द.ल.घ.मी. असून बार्शी तालुक्यातील ३३८४ हे.सिंचन क्षमता निर्मितीचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या उजवा कालवा २३ कि.मी. व

त्यावरील वितरण व्यवस्थेच्या कामाचा समावेश आहे. धरणाचे काम सन २००८ मध्ये पूर्ण असून कालव्याची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार प्रगतीत आहेत.

२) **प्रशासकिय मान्यता :-** या प्रकल्पावर रु.१०.०१ कोटी किंमतीस शासनाने दिनांक ३०.६.१९९४ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी दिनांक २.९.१९९९ अन्वये रुपये ४२.७८ कोटी प्रथम व दिनांक ३.२.२००४ अन्वये रु.६३.३० कोटी व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. तद्नंतर शासनाने दिनांक १८.३.२०१० अन्वये रु.९५.३९ कोटी किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. प्रस्तावित चौथी सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावाची किंमत रु. १२१.४९ कोटी आहे.

३) **किंमत वाढण्याची कारणे :-**

प्रकल्पाची प्रस्तावित चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु.१२१.४९ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यता पेक्षा ही किंमत रु.१११.४८ कोटीने वाढली असून, त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत

३.१ दरसुचीतील वाढः- मूळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन १९९२-९३ च्या दरसूचीवर आधारीत होती. चतुर्थ सु.प्र.मा.अंदाजपत्रक सन २०११-१२ च्या दरसूचीवर आधारीत आहे. या १९ वर्षाच्या कालावधीत दरसूचीत झालेल्या बदलामुळे रु. २७.४८ कोटी इतकी वाढ आहे.

३.२ भूसंपादनातील व पुर्नवसन वाढः- मूळ प्रशासकीय मान्यता अहवालात ७२६ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादनासाठी १२९००/ हे. दराने रु.०.९४ कोटी इतकी तरतूद करण्यांत आली होती. आता याच क्षेत्रासाठी रु. ३,६३,०००/हे. दराने रु.२६.३८ कोटी इतकी तरतूद केली आहे. तसेच पुनर्वसनाकरिता रु.०.१८ कोटी मुळ तरतूद होती व ती सुधारित नुसार रु.१५.९४ कोटी झाली आहे. सदर पुनर्वसना कामातील वाढ ही प्रामुख्याने बुडीत क्षेत्रात बांधण्यात आलेला पूल व रस्त्यामुळे झालेली आहे. असे एकंदरीत भूसंपादन व पुनर्वसन मधील वाढीमुळे एकूण खर्चात ४१.२० इतकी वाढ झाली आहे.

३.३ सविस्तर संकल्पनामुळे झालेली वाढ :- धरणाच्या सांडव्याच्या संकल्पनात बदल झाल्यामुळे सांडव्याची लांबी कमी झाली व माती धरणाची लांबी वाढली तसेच पुच्छ कालव्याची लांबी व रुंदी वाढली. वरील बदलास मा.मुख्य अभियंता(विप्र), पुणे यांनी दिनांक २८.१०.११९७ रोजी मान्यता दिली आहे. यामुळे रु.५.४८ कोटी इतकी वाढ झाली आहे. धरणाच्या पायाच्या खोलीत व पुच्छ कालव्याच्या भूस्तरात बदल झाल्याने व सीओटीच्या बाजू उतारामध्ये बदल झाल्यामुळे रु.१८.६६ कोटी इतकी वाढ झाली आहे. यामध्ये संकल्पनातील एकूण वाढ २४.१४ कोटी आहे.

३.४ ईटीपी व इतर कारणामुळे वाढ :- मूळ प्र.मा.अंदाजपत्रकात ईटीपीसाठी रु १.६२ कोटी इतकी तरतूद होती. आज ही तरतूद रु.३.७१ कोटी इतकी आहे. यामुळे ईटीपीमध्ये झालेली वाढ रु. ३.४० कोटी इतकी आहे. कालव्याचे प्रत्यक्ष भूस्तरामध्ये बदल झाल्याने रु.२.०९ कोटी तसेच पाणी उपसा वाढ , भाववाढ, निविदा अधिक्य, स्वामीत्व शुल्क व मुरुम कटफील यामुळे रु.१६.५७ कोटी वाढ झाली आहे.

४) **प्रकल्पाची विलंबाची कारणे –**

४.१ अपुरा निधीः- प्रकल्पाचे काम सन १९९७ मध्ये सुरु होऊन निधी उपलब्धेप्रमाणे सन २००८ मध्ये धरणाचे काम पूर्ण झाले. मात्र सन १९९८-९९ ते २००८-०९ या कालावधीत अत्यल्प निधी उपलब्ध झाला मागणी नुसार पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने कालव्याची कामे नियोजनाप्रमाणे वेळेत हाती घेता येऊ शकली नाहीत. या प्रकल्पास सन १९९८-९९ ते २००८-०९ या १० वर्षाच्या कालावधीत अपुरा निधी उपलब्ध झाल्याने प्रकल्पास विलंब झाला आहे.

४.२ भूसंपादन :- या प्रकल्पाच्या कामासाठी लागणा-या भूसंपादनास शेतक-यांचा विरोध असल्याने वेळोवेळी अडथळा निर्माण केल्याने कामास विलंब झाला आहे.

५) **प्रकल्पाची सद्यस्थिती –** प्रकल्पाच्या धरणाचे काम **२००८** मध्ये पूर्ण झाले असून १२.६६ द.ल.घ.मी. इतका पाणी साठा निर्माण् झाला आहे. प्रकल्पाच्या उजवा कालव्याचे ७० टक्के मातीकाम पूर्ण असून, एकूण ८३ बांधकामापैकी २५ बाधकामे पूर्ण असून, ५८ बांधकामे प्रगतीपथावर आहेत. वितरण व्यवस्थेचे २० टक्के व सध्या उजव्या कालव्याचे १२ कि.मी. चे काम पूर्ण झालेले आहे. वितरिका व कांही

बांधकामाचे काम शिल्लक राहल्यामुळे सिंचन क्षेत्र निर्माण होऊ शकले नाही.प्रकल्पाचा खर्च रु.५.०० लक्ष / हे. असून लाभव्यय गुणोत्तर ०.६६ इतके आहे.

प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे :- धरणाचे काम पूर्ण झाल्यामुळे १२.६६ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला. त्यावरील खाजगी उपसा सिंचनाव्दारे ३३८ हे. इतके क्षेत्र सिंचीत झाले आहे.

या धरणाच्या निर्मित झालेल्या पाणीसाठयामुळे लगतच्या पिंपळगांव (ढाळे), महागांव, बावी, साकत, पानगांव इ. गावांना पिण्यासाठी शाश्वत पाणी उपलब्ध झाले आहे.

सन २०१२-१३ या वर्षात अपू-या पावसाने उस्मानाबाद शहर व आजूबाजूच्या गावासाठी या धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित केले आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
सिना मध्यम प्रकल्प (भोसे खिंड बोगद्यासह), जिल्हा अहमदनगर

१	प्रकल्पाचे नांव : सिना मध्यम प्रकल्प (भोसे खिंड बोगद्यासह)		तालुका - कर्जत	जिल्हा : अहमदनगर	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे) पीक क्षेत्र ८४४५ हेक्टर		जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता ८४४५ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२१/१२/१९७२	१९७१-७२	३.७३	६७१८ हे.
	सु.प्र.मा.-१	२०/११/२०००	१९९९-२०००	११८.९४	८४४५ हे.
	सु.प्र.मा.-२	प्रस्तावित	२०११-१२	१५३.६४	८४४५ हे.
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता संदर्भ व किंमत (कोटी रु.)			नाही	
५	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			१३०.३८	
५.१	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = ५.८९				
५.१	बांधकामावरील खर्च (रु. कोटी) = ११६.५२				
५.३	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी) + इतर = ७.९७				
६	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन १९७३-७४	
६.१	प्रकल्पाच्या धरणाची कामे सुरु झाल्याचे वर्ष			सन १९७२	
६.२	त्यावेळची प्रकल्पाची अंदाजीत किंमत (रु.कोटी)			३.७३	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे	मूळ तरतूद	सु.प्र.मा. तरतूद	वाढ रक्कम	वाढीशी टक्केवारी
७.१	दरवाढीतील वाढ (कामांच्या घटकांची किंमत)	२.७४	२९.९६	२७.२२	१८.१६
७.२	भूसंपादन खर्चातील वाढ	०.७३	६.४३	५.७०	३.८०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	९८.०५	९८.०५	६५.४१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१०.८३	१०.८३	७.२२
७.५	ई.टी.पी. व इतर कारणे	०.२६	८.३७	८.११	५.४१
	एकूण	**३.७३**	**१५३.६४**	**१४९.९१**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती : सिना मध्यम प्रकल्प ता.कर्जत, जि. अहमदनगर यास शासनाने १९७२ साली रु. ३.७३ कोटी इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सन १९८५ मध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण झाले. प्रकल्पातंर्गत सीना (निमगांव गांगर्डा) धरण सिना नदीवर मौजे निमगांव गांगर्डा ता. कर्जत जि. अहमदनगर येथे असून धरणाचा उपयुक्त पाणी साठा १.८४७ अ.घ.फू. आहे. या प्रकल्पाच्या ७३ कि.मी. लांबीच्या उजव्या व १३.२० कि.मी. लांबीच्या डाव्या कालव्याद्वारे अहमदनगर जिल्ह्यातील ७६७२ हे. व बीड जिल्ह्यातील ७७३ हे. असे एकूण ८४४५ हे. सिंचन क्षमता नियोजीत होती. त्यानुसार सर्व कामे पूर्ण असून नियोजित सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. सदरचा प्रकल्प अवर्षण प्रवण

क्षेत्रातील आहे. सीना मध्यम प्रकल्पातील नियोजीत ८४४५ हे. सिंचन क्षमतेचे शाश्वतरित्या सिंचन शक्य होण्यासाठी कुकडी डाव्या कालव्यातून ०.७० अ.घ.फू. पाणी भोसा खिंड कालव्याद्वारे सिना धरणात सोडण्यास महामंडळाने १९९९ मध्ये तत्वतः मान्यता दिली व त्यानुसार सीना मध्यम प्रकल्पाचा प्रथम सुधारीत अहवालास दिनांक २०/११/२००० रोजी प्रशासकीय मान्यता दिली त्यानुसार भोसाखिंड कालव्याचे काम पूर्ण झाले आहे.

२.० प्रशासकीय मान्यता : सिना मध्यम प्रकल्पास दिनांक २१/१२/१९७२ रोजी रु. ३.७३ कोटी रकमेस मूळ प्र.मा. शासनाने दिली. त्यानंतर भोसा खिंड कालव्याच्या कामासह प्रकल्पास रु. ११८.९४ कोटी किंमतीस महामंडळाने दिनांक २०/११/२००० रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. या मान्यतेमध्ये भोसेखिंड बोगद्याची किंमत रु. ८३.०४ कोटी व सीना मध्यम प्रकल्पाची सुधारीत किंमत रु. ३५.९० कोटी याचा समावेश आहे. प्रकल्पाची प्रस्तावित व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. १५३.६४ कोटी इतकी आहे.

३.० किंमत वाढीची कारणे :

३.१ दरसूचीतील वाढ : प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७१-७२ च्या दरसुचीवर आधारीत होती. प्रकल्पाचे काम सन १९७२ मध्ये सुरु होऊन प्रत्यक्षात १९८५ मध्ये पूर्ण झाले. त्यानंतर भोसेखिंड बोगद्याचे काम सन २००० साली प्रकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात आले असून हे काम मार्च २०१२ अखेर पूर्ण झाले आहे. दरम्यानच्या काळात दरसूचीमध्ये झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या किमतीत रु. २७.२२ कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.२ भूसंपादन - सीना धरणाची उंची २.५६ मी. ने वाढवण्यात आल्यामुळे बुडीत क्षेत्रात ८२ हे. ने वाढ झाली. भूसंपादन क्षेत्रात वाढ झाल्याने तसेच दरम्यानच्या काळात जमिनीच्या किंमतीत वाढ झाली यामुळे एकूण रु. ५.७० कोटी इतकी वाढ झाली आहे.

३.३ व्याप्तीतील बदल - मूळ अहवालामध्ये प्रकल्पाचा उपयुक्त पाणी साठा ७५ टक्के विश्वासार्हतेने १.१७ अ.घ.फू. इतका होता. अवर्षण प्रवण क्षेत्रातील आष्टी तालुक्यातील ७७३ हे. व कर्जत तालुक्यातील ९५४ हे. असे एकूण १७२७ हे. क्षेत्रास सिंचन करण्यासाठी प्रकल्पाचे नियोजन ५० टक्के विश्वासार्हतेने करून उपयुक्त पाणी साठ्यात १.८४७ अ.घ.फू. इतकी वाढ करण्यात आली. त्यासाठी धरणाची उंची २.५६ मी इतकी वाढविण्यात आली. सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी नव्याने डावा कालवा १३.२० कि.मी. लांब व उजवा कालव्याची लांबी ५३ कि. मी वरून ७३ कि.मी पर्यंत वाढविली तसेच धरणामध्ये ०.७० अ.घ.फू. पाणी साठा करून भोसा खिंड कालव्याचा समावेश करण्यात आला.

वरील कारणामुळे प्रकल्पाच्या खर्चात एकूण रु. ९८.०५ कोटी इतकी वाढ झाली आहे. त्यामधील रु. ९४.४८ कोटी भोसा खिंड कालव्याचा असून उर्वरीत रु. ३.५७ कोटी मूळ प्रकल्पाचा आहे.

३.४ संकल्पचित्रातील बदल - धरणाच्या उंचीमध्ये २.५६ मी ने वाढ झाल्यामुळे धरणाच्या काटछेदामध्ये बदल झाला त्यामुळे संधानक व मातीभरावाच्या परिमाणात वाढ झाली. त्यामुळे कामात रु. २.७० कोटी वाढ झाली.

तसेच मूळ अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या लाभक्षेत्र विकासाची कामे व जलनिसारण व निवडक अस्तरीकरणामुळे खर्चात रु. ७.२६ कोटी ची वाढ झाली आहे. अशा प्रकारे एकूण रु. १०.८३ कोटी वाढ झाली आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे : मूळ प्रशासकीय मान्यतेनंतर प्रतिवर्षी प्रकल्पास मागणीनुसार आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती : सिना मध्यम प्रकल्पाचे नियोजीत धरण व दोन्ही कालवे सन १९८५ मध्ये पूर्ण होऊन १०० टक्के सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. तसेच भोसेखिंड कालव्याचे काम मार्च २०१२ अखेर पूर्ण झालेले आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे - प्रकल्पाची नियोजीत ८४४५ हे. सिंचन क्षमता निर्मिती पूर्ण झालेली आहे. सदरचा प्रकल्प अवर्षण प्रवण क्षेत्रातील असल्याने धरणात अपेक्षित पाणी प्रतिवर्षी उपलब्ध होत नाही. पाण्याचा उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष सिंचन होते. तसेच या धरणावरून १९ गांवाना ८९००० लोकसंख्येस पिण्येचे पाणी पूरवठा केला जातो.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
बेनितूरा मध्यम प्रकल्प, जिल्हा उस्मानाबाद

१	प्रकल्पाचे नांव : बेनितूरा मध्यम प्रकल्प	तालुकाः उमरगा		जिल्हा : उस्मानाबाद	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	२२९३ हे.	सन २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) २२४९ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२०.१२.१९८३	१९८१.८२	३.२८	२२९३
	सुप्रमा-१	२६.३.१९९६	१९९३.९४	२०.२६	२२९३
	सुप्रमा-२	१८.१०.२०११	२००८-०९	४५.५६	२२४९
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जल आयोगाचे इंग्रजी पत्र क्र. महा/२५/९४-पीएसी-१६५ दि.०१.०३.१९९४	१९९३-९४	१२.१२	२२९३
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)			३५.२२	
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) = १५.०७			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) = १६.९५			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) = ३.२०			
६	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९८९-९०
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				१९८८
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची किंमत (रु.कोटी)				४.९२
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				(रु. कोटी)
	बाब	मूळ तरतूद	सुप्रमा तरतूद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	१.७७	१२.३३	१०.५६	२४.९८
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.९४	२६.७८	२५.८४	६१.११
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.५३	०.५३	१.२५
७.५	इटीपी व इतर कारणामुळे झालेली वाढ	०.५७	५.९२	५.३५	१२.६६
	एकूण	**३.२८**	**४५.५६**	**४२.२८**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० **सर्वसाधारण माहिती :** बेनितूरा मध्यम प्रकल्प ता.उमरगा हा बेनितूरा नदीवर ०.४५२ अ.घ. फू. क्षमतेचे धरण बांधण्यात आलेले आहे. यामधून अवषर्ण प्रवण क्षेत्रातील उमरगा तालुक्यातील २२९३ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्मिती झालेली असून ०.४५२ अ.घ.फू. क्षमतेच्या बेनितूरा धरणाचे व मुख्य कालव्याचे काम सन १९९६ मध्ये पूर्ण झाले आहे.

२.० **प्रशासकीय मान्यता :** बेनितूरा प्रकल्पास दि. २०/१२/१९८३ रोजी शासनाने रुपये ३.२८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि. २६/३/१९९६ रोजी रुपये २०.२६ कोटी किंमतीस प्रथम सुधारित मान्यता दिली. त्यानंतर शासनाने दि. १८/१०/२०११ रोजी रुपये ४५.५६ कोटी किंमतीस व्दित्तीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पास केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचेकडून दि. १.३.१९९४ रोजी रुपये १२.१२ कोटी किंमतीस मान्यता मिळाली आहे.

३.० **किंमत वाढण्याची कारणे :** प्रकल्पाची सुधारित किंमत रुपये ४५.५६ कोटी इतकी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रुपये ४२.२८ कोटीने वाढली असून, त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

३.१ **दरसूचीतील वाढ :** बेनितूरा प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता सन १९८१-१९९२ च्या दरसूचीवर आधारित होती. सुधारित अद्ययावत किंमत सन २००८-२००९ च्या दरसूची प्रमाणे काढण्यात आलेली आहे. या २८ वर्षातील दरसूची बदलामुळे झालेली निव्वळ वाढ रुपये १०.५६ कोटी असून, ती एकूण वाढीच्या २४.९८ टक्के इतकी आहे.

३.२ **भूसंपादन, पुनर्वसन व वन जमिनीमुळे झालेली वाढ :** भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीनीच्या खर्चाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत झालेली निव्वळ वाढ रुपये २५.८४ कोटी म्हणजे एकूण वाढीच्या ६१.११ टक्के इतकी आहे. वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे

(अ) मुळ प्रमामध्ये भूसंपादनासाठी रू. ०.९४ कोटी तरतूद होती. द्वितीय सुप्रमा अहवालामध्ये ७९६ हेक्टर क्षेत्र रू.६८०००/हेक्टर दराने प्रस्तावीत आहे.त्यासाटी एकूण रू. ५.४३ कोटी इतकी तरतूद आहे.यामुळे एकूण रू. ४.४९ कोटी वाढ झाली.

(ब) मुळ प्रमा अहवालामध्ये पुनवर्सनासाटी तरतूद नव्हती. बेनितूरा प्रकल्पामुळे अंशतः बाधित तुगाव या गावाचे नियमाप्रमाणे (महत्तम पूर पातळी + ०.५०) पुनवर्सन केल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चामध्ये रू. ४.९१ कोटी वाढ झालेली आहे.

(क) पुनर्वसनाच्या कामासाटी मा.उच्चन्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायनिवाडयानूसार शासनाने खास बाब म्हणून उर्वरीत संपुर्ण गावाचे पुनर्वसनास सन २००० मध्ये मान्यता दिल्याने, प्रकल्पाच्या खर्चामध्ये रुपये ११.९० कोटी इतकी वाढ झालेली आहे. (संदर्भ शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्रं.आरपीए ४३९५/२४८/प्रक्रं.२४/र-३ दिनांक १७.११.२०००)

घरबांधणी अनुदान व बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते दिल्यामुळे ,बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिन्या स्थलांतरासाठी व महसूल खर्च अशी एकूण रुपये ४.५४ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

३.३ **सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :**

मुळ प्र मा मध्ये रोधीचराची रुंदी ३ मी.इतकी ठेवण्यात आली होती. परंतू सदरील काम जलसंपदा विभागाच्या यांत्रीकी संघटने मार्फत मशीनरीने खोदाई केल्यामुळे रोधीचराची रूंदी ५ मी. ठेवण्यात आली. तसेच रोधीचराच्या खोली मध्ये वाढ झाल्यामुळे रू.०.५३ कोटी इतकी वाढ झाली आहे. सदरची वाढ एकुण खर्चाच्या १.२५ टक्के इतकी आहे.

३.४ **इटीपी व इतर :** मूळ अहवालामध्ये ई.टी.पी. के इमारती, ओ संकिर्ण, आर दळणवळण व एम वृक्षारोपन इ साठी रुपये ०.५७ कोटी इतकी तरतूद होती. सुधारित प्रकल्प अहवालानुसार यासाठी रुपये ५.९२ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे. यामध्ये रुपये ५.३५ कोटीची वाढ झाली आहे.

४.० **प्रकल्पाच्या विलंबाची कारणे-भूसंपादनामुळे झालेला विलंब**

मुळ प्रशासकीय मान्यता डिसेंबर १९८३ मध्ये प्राप्त झाली असून प्रत्यक्ष प्रकल्पाचे कामास जून-१९८८ मध्ये सुरूवात झाली. प्रकल्पाच्या भुसंपादनाचे अंतीम निवाडे १९९०-९१ मध्ये झाले. भुसंपादनामुळे ८ वर्षाचा विलंब झाला.

४.१: मा.उच्चन्यायालयाचे अहवालानूसार सन.२००० चे आदेशान्वये शासनाने दि.१७.११.२००० मध्ये उर्वरीत संपूर्ण तुगावचे पूनर्वसनास मान्यता दिली असल्यामुळे पूर्वसनाचे काम प्रगतीपथावर आहे.सदरचा विलंब उर्वरीत संपूर्ण गावचे पूनर्वसनामुळे झालेला असून विलंबाचा कालावधी १२ वर्ष आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती

प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम पूर्ण असून, ०.४५२ अ.घ.फू. पाणी साठा सन १९९६ मध्ये निर्माण झाला आहे. दोन्ही कालव्या द्वारे २२९३ हे सिंचन निर्मिती झालेली आहे. दरम्यानच्या काळात मुरुबम नगर परिषद व विठ्ठल साई सहाकारी साखर कारखाना मुरुम यासाठी ०.१०५ अ.घ.फू. पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षीत झाल्यामुळे व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये प्रकल्पाचे सिंचन ४४ हे कमी होऊन २२४९ हे. क्षेत्र मंजूर झाले. प्रकल्प अहवालानूसार अंशतः तुगाव गावचे पूनर्वसन गावठाण क्रं.१ व २ मध्ये सन १९९५ मध्ये करण्यात आले. तथापी न्यायालयीन निणर्याप्रमाणे उर्वरीत संपूर्ण गावचे पूनर्वसन गावठाण क्रं.३ मध्ये करण्यात येत असून नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.तसेच तुगाव जवळ बेनितूरा नदीवर आरसीसी पूलाचे काम प्रगतीपथावर आहे.

६.० प्रकल्पाचे प्रत्यक्ष झालेले फायदे

प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे व दोन्ही कालव्याचे काम पूर्ण झालेले असून ०.४५२ अघफु पाणीसाठा सन.१९९६ मध्ये निर्माण झालेला आहे.दोन्ही कालव्या द्वारे २२४९ हे सिंचन निर्मिती झालेली आहे.

मुरूम नगरपरिषद पिण्यासाठी पाणी पूरवठा करण्यात येत आहे.औद्योगीक कारणाकरिता श्रीविठ्ठल साई साखर करखाना लि.मुरूम करिता पाणी पूरवठा करण्यात येत आहे.

मंजूर द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची किंमत रू.४५.५६ कोटी असुन प्रति हे.किंमत रू.२.०२ लक्ष व लाभव्यय गुण्णोत्तर १.६८ येत आहे.

प्रकल्पाची किंमत वाढ व कालावधी वाढ याबाबत टिपणी
मेहकरी मध्यम प्रकल्प, जिल्हा बीड
(सिना धरणातून उपसा सिंचन योजनाद्वारे मेहकरी धरणातील पाण्याची स्त्रोतवृध्दी)

१	प्रकल्पाचे नांव : मेहकरी मध्यम प्रकल्प (सिना धरणातुन उपसा सिंचन योजनाद्वारे मेहकरी धरणातील पाण्याची स्त्रोतवृध्दी)		तालुका: आष्टी		जिल्हा : बीड
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीक क्षेत्र	४०४८ हे.	जून २०१२ अखेर निर्मित सिंचन क्षमता : ४०४८ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्ष	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता(मेहकरी मध्यम प्रकल्प)	१४/१०/५९	१९५८-५९	०.५७	४०४८
	सुधारीत प्रशासकीय मान्यता (मेहकरी मध्यम प्रकल्प)	४/१२/६३	१९६०-६१	०.९४	४०४८
	सुप्रमा-२ मेहकरी मध्यम प्रकल्प (सिना धरणातुन उपसा सिंचन योजनाद्वारे मेहकरी धरणातील पाण्याची स्त्रोतवृध्दी)	१७/०८/०४	२००१-०२	५२.९७	४०४८
	सुप्रमा-३: मेहकरी मध्यम प्रकल्प(सिना धरणातुन उपसा सिंचन योजनाद्वारे मेहकरी धरणातील पाण्याची स्त्रोतवृध्दी)	प्रस्तावित	२००९-१०	११८.६८	४०४८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)				नाही
५	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर एकूण खर्च (रु.कोटी)				७०.३६
	५.१	भूसंपादन पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) : ०.२४			
	५.२	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) : ७०.१२			
	५.३	इटीपी खर्च (रु.कोटी) : ०.००			
६	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				सन १९६०-६१
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				सन १९६०
६.२	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाले त्यावेळची प्रकल्पाची अंदाजित किंमत (रु. कोटी)				०.६१
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (रु. कोटी)				
		मूळ तरतूद	सुप्रमा तरतुद	वाढ रक्कम	एकूण वाढीशी टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ (कामाच्या घटकांची किंमत)	०.३९	२५.०१	२४.६२	२०.८४
७.२	भूसंपादन पुनर्वसन वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	०.१०	२.३५	२.२५	१.९०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१४.६०	१४.६०	१२.३६
७.५	इतर कारणे	०.००	७०.१९	७०.१९	५९.४३
७.६	इटीपीमुळे झालेली वाढ	०.०८०	६.५४	६.४६	५.४७
	एकूण	**०.५७**	**११८.६९**	**११८.१२**	**१००.००**

सविस्तर स्पष्टीकरण

८.० सर्वसाधारण माहिती :- मेहकरी मध्यम प्रकल्प ता.आष्टी जिल्हा बीड हा अवर्षणप्रवण भागात असून त्यास मुळ मान्यता सन १९५९ मध्ये मिळाली. व प्रकल्पाचे काम सन १९६५ मध्ये पुर्ण झाले गेल्या ५० वर्षीय मेहकरी प्रकल्पाचा जलाशय भरण्याचा अनुभव लक्षात घेता प्रकल्पामध्ये निर्धारित ५० टक्के विश्वासहर्ताने पाणी उपलबध होऊ शकत नसल्याने निर्धारीत ४०४८ हे. सिंचन क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत नाही. त्यामुळे या प्रकल्पाच्या स्त्रोतवृध्दीसाठी कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातुन (भोसाखिंड बोगदा व कालव्याद्वारे) पाणी मिळण्याची आग्रही मागणी सातत्याने केली जात होती. त्याअनुषंगाने भोसाखिंड बोगदयाद्वारे १.२० अ.घ.फु. घनफुट पाणी सीना मध्यम प्रकल्पात सोडणे व तेथुन ०.५० अ.घ.फु. पाणी उपसा द्वारे मेहकरी प्रकल्पात सोडुन स्त्रोतवृध्दी करण्यास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचे मकृखोविम निर्णय क्रं.७९८/(६१/९८)मोप्र-३/ दि.५ मे १९९९ अन्वये निर्णय घेतला. त्यानुसार महामंडळाने निर्णय क्रं. मकृखोविम/मोप्र-३/मेहकरी (सुप्रमा)/६४३१, दि.१७ ऑगस्ट-२००४ अन्वये या प्रकल्पास द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता दिली. या प्रकल्पामध्ये नव्याने सिंचन क्षमता निर्माण होणार नसुन मेहकरी प्रकल्पामध्ये ०.५० अ.घ.फु.पाणी स्त्रोत्रवृध्दीसाठी सोडण्याचे नियोजन आहे.

सध्या भोसाखिंड कालव्याचे काम पुर्ण असुन सीना मध्यम प्रकल्पामध्ये उपलब्धतेनुसार पाणी सोडण्यात येते. सीना मध्यम प्रकल्पावरुन नियोजित उपसा योजना व मेहकरी प्रकल्पाची उंची वाढ व मजबुतीकरणाची कामे प्रगतीत आहेत.

२.० प्रशासकीय मान्यता :- मेहकरी मध्यम प्रकल्पास ०.५७ कोटी किंमतीस शासनाची दिनांक १४/१०/१९५९ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यानंतर शासनाने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक ४/१२/१९६३ रोजी ०.९४ कोटी किंमतीस दिली. मेहकरी प्रकल्प व स्त्रोतवृध्दी करण्याच्या कामासह प्रकल्पास दिनांक १७/०८/२००४ रोजी रु. ५२.९७ कोटी रकमेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांनी द्वितीय सुधारीत प्रशाकिय मान्यता दिली. प्रकल्पाचा तृतीय सुधारीत अहवाल दिनांक २५/१०/२०१० रोजी शासनास सादर केला असुन त्याची किमंत रुपये ११८.६८ कोटी आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त नाही.

३.० प्रकल्पाची किंमत वाढीची कारणे :- प्रकल्पाची अद्यायवत किंमत रू. ११८.६८ कोटी आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ही किंमत रू. ११८.१२ कोटींने जास्त आहे. किंमत वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

३.१ दरसूचीतील वाढ :- प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता सन १९५८-५९ च्या दरसूचीवर आधारीत आहे. मुळ मेहकरी प्रकल्पाचे काम सन १९६५ मध्ये पुर्ण आहे. अवर्षण क्षेत्रातील प्रकल्प असल्याने धरणात अपेक्षित येवा येत नसल्यामुळे स्त्रोतवृध्दी करण्याचा निर्णय सन १९९९ मध्ये घेवुन त्यानुसारच्या द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता अहवालास प्रशासकिय मान्यता सन २००४ मध्ये दिली आहे. प्रस्तावित तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता सन २००९-१० च्या दरसुचीवर आहे. त्याची सन १९५९ च्या अहवालाशी तुंलना करता दरसुचीतील वाढ रुपये २४.६२ कोटी आहे.

३.२ भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ :- द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये प्रकल्पाच्या स्त्रोतवृध्दीसाठी उर्ध्वगामी नलीका, बोगदा व कालवा इ. साठी अतिरिक्त भूसंपादन करावे लागलेले आहे. या क्षेत्राची मूळ प्रशासकीय मान्यता किंमतीमध्ये समावेश नव्हता. यामुळे अंतिम मावेजा वाटपाप्रमाणे भूसंपादनामध्ये वाढ झालेली आहे. तसेच बुडीत क्षेत्रातील वळण रस्ता व पुलामुळे रु. ०.८० कोटीची वाढ झालेली आहे. अशा प्रकारे एकूण रु. २.२५ कोटी वाढ झालेली आहे.

३.३ संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ :- मुळ अहवालातील मेहकरी प्रकल्पाच्या कामामध्ये तांत्रिक बदल झाल्याचे आढळुन येत नाही. तथापी व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालातील स्त्रोतवृध्दी कामाच्या संकल्पचित्रातील बदलामुळे एकूण रू. १४.६० कोटी एवढी वाढ झाली असून, त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) द्वितीय अहवालामध्ये मेहकरी धरणाची उंची संधानक भींत बांधुन वाढविण्याचे प्रस्तावित होते. परंतु या प्रकारे उंची वाढऊन तांत्रिक दृष्टया योग्य नसल्याने माती धरणाची उंची वाढ अस्तीत्वातील भरावाची उंची वाढ करण्याचा निर्णय घेण्यांत आला. त्यानुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक,यांचेकडुन संकल्पचित्रे करण्यांत आली आहेत. तसेच सांडव्यासाठी जलक्षोभ पुंडी प्रस्तावित केल्यामुळे कामाच्या किमंतीत रुपये ५.७३ कोटीची वाढ झालेली आहे.

ब) मा.आमदार श्री. सुरेशजी धस (आष्टी-पाटोदा) यांनी सीना मेहकरी उपसा सिंचन योजनेच्या बोगदा व कालव्याची सरेखा वाहिरा व मौजे पिंपळगाव दाणी ता. आष्टी या गावच्या सुपीक जमिनीतून जात असल्यामुळे नुकसान टाळण्यासाठी संरेखा बदलण्याची मागणी दिनांक १९/८/२००७ अन्वये केली होती. तसेच वाहिरा येथील सरपंच व सर्व शेतकऱ्यांनी संरेखा बदलून पडीक जमिनीतून घेण्याबाबत मागणी केली. त्यानुसार प्रत्यक्ष संरेखा बदलल्याने बोगद्याची लांबी २२० मी.ने मागणी वाढल्याने रु. ६.४६ कोटी वाढ झाली आहे.

३) उपसा योजनेचे संकल्पन करतांना पावसाळयातील काळात धरणातील पाण्याचा नियोजित उपसा कालावधी ९० दिवसाऐवजी ३६ दिवस घेतल्यामुळे पाईपचा व्यास ११०० मि.मी.ऐवजी १७०० मि.मी. इतका झाला असून जाडी ६ मि.मी. ऐवजी १४ मि.मी झाली आहे. यामुळे उर्ध्वगामी नलिकेची किमंत व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता पेक्षा रू. ३.८० कोटीने वाढलेली आहे.

४) मा.श्री.सुरेशजी धस आमदार, यांच्या मागणीनुसार दोन पाझर तलाव भरण्यासाठी लहान उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. यामुळे रुपये ०.८८ कोटीची वाढ झालेली आहे.

वरील सर्व बाबीमुळे एकुण रू. १४.६० कोटीची वाढ झालेली आहे.

३.४ इतर कारणे :- मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत द्वितीय सुधारीत अहवालातील भोसाखिंड व सीना मेहकरी उपसा सिंचन योजनेच्या कामाचा अंतर्भाव झाल्याने ५०.४० कोटीची वाढ झालेली आहे.

तृतीय प्रस्तावित सुधारीत अहवालामध्ये भोसीखिंड कालव्याची किमंत प्रत्यक्ष खर्चानुसार १८.९८ कोटीने वाढ होऊन रु. ४८.९८ कोटी झालेली आहे.

वरील सर्व बाबीमुळे प्रकल्पाच्या खर्चात एकुण रुपये ७०.१९ कोटी वाढ झालेली आहे.

३.५ ई.टी.पी. : मूळ प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये अनुषंगीक खर्चापोटी रु. ०.०८ कोटी एवढी तरतूद होती. प्रस्तावित तृतीय सुधारीत अहवालामध्ये रुपये ६.५४ कोटी एवढी तरतूद आहे. त्यामुळे ई.टी.पी. मध्ये एकूण वाढ रु. ६.४६ कोटी आहे.

४.० प्रकल्पाच्या विलंबाची कारणे :

४.१ भूसंपादन - मुळ मेहेकरी मध्यम प्रकल्प १९६५ मध्ये पूर्ण झालेला आहे. स्त्रोत वृध्दीसाटी नियोजित उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी आवश्यक पंपगृह,कालवा व बोगदा, उर्ध्वगामी नलीका या कामासाठी भूसंपादन प्रस्तावित आहे. त्यासाठी २००५ मध्ये संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे. तथापी अंतिम मोवेजा २०१० मध्ये वाटप झालेला आहे. भूसंपादानाचा मोवेजा मिळाला नसल्याने शेतकऱ्यांनी कामामध्ये अडथळे निर्माण केलेली आहेत. यामुळे कालवा व बोगद्याचे कामे पूर्ण करण्याचा कालावधी वाढलेला आहे.

४.२ इतर कारणे : मेहकरी मध्यम प्रकल्पास प्रथम प्रशासकिय मान्यता सन १९५९ मध्ये प्राप्त असुन सन १९६५ मध्ये प्रकल्प पुर्ण झालेला आहे. प्रकल्पामध्ये पर्याप्त पाणी येवा प्राप्त होत नसल्यामुळे प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल करुन प्रकल्पास मेहकरी मध्यम प्रकल्प (सीना धरणातुन उपसा सिंचन

योजनेद्वारे मेहकरी धरणातील पाण्याची स्त्रोतवृध्दी) या नावाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांच्याकडुन दिनांक १७/०८/२००४ मध्ये द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यामुळे मेहकरी मध्यम प्रकल्प प्रत्यक्षात सन १९६५ मध्ये पुर्ण झालेला असतांना देखील व्याप्तीतील बदलामुळे व स्त्रोतवृध्दीच्या कामामुळे प्रकल्प अदयापी पुण झालेला नाही. यामुळे प्रकल्प पुर्णतेचा कालावधी वाढलेला आहे.

५.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :-

मुळ मेहकरी धरण सन १९६५ मध्ये पुर्ण आहे. स्त्रोतवृध्दी करण्याच्या कामापैकी भोसीखिंड कालवा पुर्ण आहे. उपसा योजना ७० टक्के व जोडकालवा व बोगदयाचे काम ९० टक्के पुर्ण आहेत. व तसेच मेहकरी धरणाची उंची वाढ कामे ५० टक्के पुर्ण झाली आहेत. प्रकल्पावर मंजुर सुधारीत प्रशासकिय मान्यतेपेक्षा जास्त खर्च झालेला आहे.

प्रकल्पाची तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता अहवाल दिनांक २५/१०/२०१० रोजी शासनास सादर झालेला असुन त्यास मान्यता नसल्याने प्रकल्पाचे काम बंद आहे.

विदर्भ मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

विदर्भ मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

विदर्भ मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत तपशील
प्रकल्पनिहाय (टिप्पणीसह)
अ नु क्र म णि का

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
अ)	**मोठे प्रकल्प**		
१	बावनथडी	१	४
२	गोसीखुर्द प्रकल्प	५	१६
३	आजनसरा बॅरेज	१७	१८
४	निम्न वर्धा प्रकल्प	१९	२४
५	धापेवाडा उसिंयो टप्पा-२	२५	२८
६	पेंच प्रकल्प	२९	३२
७	निम्न वेणा प्रकल्प	३३	३६
८	हुमन प्रकल्प	३७	४०
९	उर्ध्व वर्धा प्रकल्प	४१	४४
१०	अरूणावती प्रकल्प	४५	४८
११	बेंबळा प्रकल्प	४९	५२
१२	निम्न पैनगंगा प्रकल्प	५३	५६
१३	खडकपुर्णा प्रकल्प	५७	६०
१४	जिगांव प्रकल्प	६१	६४
१५	वान प्रकल्प	६५	६८
१६	पेनटाकळी प्रकल्प	६९	७२
१७	निम्न पेढी प्रकल्प	७३	७८
ब)	**मध्यम प्रकल्प**		
१	कटंगी प्रकल्प	७९	८२
२	धाम उंचीकरण वाढविणे	८३	८६
३	जाम नदी प्रकल्प	८७	९२
४	कार नदी प्रकल्प	९३	९६
५	मदन नदी प्रकल्प	९७	१००
६	लाल नाला प्रकल्प	१०१	१०४
७	तेढवा शिवणी उसिंयो	१०५	१०६
८	निम्न चुलबंद प्रकल्प	१०७	११०
९	धापेवाडा उसिंयो टप्पा-१	१११	११४
१०	सोंडयाटोला उसिंयो	११५	११८
११	झाशीनगर उसिंयो	११९	१२२
१२	कालपाथरी प्रकल्प	१२३	१२६
१३	रजेगांवकाटी उयिंयो	१२७	१३०
१४	करजखेडा उसिंयो	१३१	१३४
१५	सुरेवाडा उसिंयो	१३५	१३६

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
१६	सत्रापूर उसिंयो	१३७	१३८
१७	पळसगाव आमडी उसिंयो	१३९	१४२
१८	बोरघाट उसिंयो	१४३	१४६
१९	सोनापुर टोमटा उसिंयो	१४७	१५०
२०	वाघोलीबुटी उसिंयो	१५१	१५४
२१	पोथरानाला प्रकल्प	१५५	१५८
२२	बेंडारा प्रकल्प	१५९	१६२
२३	डोंगरगाव प्रकल्प	१६३	१६६
२४	पुर्णा प्रकल्प	१६७	१७०
२५	चंद्रभागा प्रकल्प	१७१	१७४
२६	सपन प्रकल्प	१७५	१७८
२७	पंढरी प्रकल्प	१७९	१८२
२८	वासणी प्रकल्प	१८३	१८६
२९	अडाण प्रकल्प	१८७	१९०
३०	नवरगांव प्रकल्प	१९१	१९४
३१	मन प्रकल्प	१९५	१९८
३२	तोरणा प्रकल्प	१९९	२०२
३३	उतावळी प्रकल्प	२०३	२०६
३४	बोर्डी नाला प्रकल्प	२०७	२१०
३५	घुगंशी बॅरेज	२११	२१४
३६	उमा बॅरेज	२१५	२२०
३७	पुर्णा बॅरेज - २ (नेरधामणा)	२२१	२२६
३८	वर्धा बॅरेज उसिंयो	२२७	२३२
३९	टाकळी डोलारी प्रकल्प	२३३	२३८
४०	पेढी बॅरेज	२३९	२४२

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांव-बावनथडी आंतर राज्यीय प्रकल्प, तालुका - तुमसर, जिल्हा - भंडारा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - २७७०८ (महाराष्ट्र भाग)	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	२७२०३	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	१२/९/१९७५	१९७४-७५	११.६५	२७७०८
	सुप्रमा -१	१२/८/१९९३	१९८८-८९	७१.७९	२७७०८
	सुप्रमा -२	७/१२/२००१	१९९९-२०००	१८२.०१	२७७०८
	सुप्रमा -३	२५/८/२००९	२००६-०७	५६१.२६	२७७०८
	चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रीक सल्लागार समिती, नाशीक ला सादर.	-	२००८-०९	७४९.३३	२७७०८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	१२.५.२०१०	२००८-०९	७४९.३३	-
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				:- ६११.६०
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)				:- ८२.५९
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)				:- ५०४.७२
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)				:- २४.२८
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				:- १९७४-७५
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.१६.५४ कोटी) :- म.प्र. शासनाद्वारे १९८० मध्ये सुरु.				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
	मुळ प्र.मा. ते तृतीय सु.प्र.मा.			रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			४५३.४४	६१.४७
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			२४.८५	३.३७
	अद्यावत सुप्रमा तरतुद रु.२५.१७ कोटी - प्रमा तरतुद रु.०.३२ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			८४.४७	११.४५
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१७४.९२	२३.७१
	एकूण :-			**७३७.६८**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भूसंपादन (आवश्यक जमिन १८६७.८५ हे. संपादित १४३२.८२),				६० टक्के
	ब) पूनर्वसन प्रस्तावित ८ गांवे पुनर्वसित ८ गावे,				१०० टक्के
	क) वन जमिन संपादन (आवश्यक वनजमिन ४७३७.९८ हे.अंतिम मान्यता प्राप्त)				१०० टक्के
८.२	धरण				१०० टक्के
८.३	कालवा (एकूण लांबी २६.४८)	झालेली लांबी २६.४८ कि.मी.			१०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र २५०६२)	झालेले क्षेत्र २३८०९ हे.			९० टक्के
८.५	पाटचायांची कामे (एकूण क्षेत्र)	पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र- निरंक	लाभक्षेत्र धानशेती असल्याने पाटचा-यांची आवश्यकता नाही.		

बावनथडी प्रकल्प

ता.तुमसर जिल्हा भंडारा

- **प्रकल्पाची रुपरेषा :-** बावनथडी प्रकल्प हा महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन्ही राज्याचा संयुक्त प्रकल्प असून प्रकल्पाचे बांधकाम बावनथडी नदीवर भंडारा जिल्हयातील तुमसर तालुक्यात असलेल्या सितेकसा गावाजवळ आहे. आंतरराज्यीय करारानुसार धरणाचे व मध्यप्रदेश राज्यातील डाव्या कालव्याचे बांधकाम मध्यप्रदेश शासना तर्फे सुरु असुन महाराष्ट्रातील उजव्या कालव्याचे काम महाराष्ट्र शासनातर्फे सुरु आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्हयामध्ये १८,६१५ हे. जमिनीस ८०.५२ कि.मी. लांबीच्या डावा मुख्य कालव्याद्वारे व महाराष्ट्रातील भंडारा जिल्हयामध्ये १७५३७ हे. जमिनीस २६.४८ किमी. लांबीच्या उजव्या मुख्य कालवा, शाखा कालवा क्रं. १ व शाखा कालवा क्र. २ द्वारे सिंचनाचा लाभ मिळेल. प्रकल्पाची अद्यावत सुधारित किंमत रु. ७४९३३ लक्ष (महाराष्ट्र भाग) आहे. बावनथडी प्रकल्पातून महाराष्ट्रातील गोबरवाही व परीसरातील २१ गांवाना पिण्याचे पाणी पुरवठा करण्याकरीता प्रस्तावीत योजनेसाठी १.२१ द.ल.घ.मी. वार्षिक पाणी साठयाचे आरक्षण करण्यात आले आहे.

- **प्रशासकिय मान्यता :-** (रु.कोटीत)

अ)	मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत (१९७५) (७४-७५ च्या दरसुचीनुसार)	महाराष्ट्र भाग - मध्यप्रदेश भाग -	११.६६ ११.८२
		एकूण किंमत -	२३.४७
ब)	प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत (१९९३) (८८-९९ च्या दरसुचीनुसार)	महाराष्ट्र भाग - मध्यप्रदेश भाग -	७१.७९ ८९.७८
		एकूण किंमत -	१६१.५७
क)	दुसरी सूधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत सुधारित प्रशाकीय मान्यता वर्ष २००१	महाराष्ट्र भाग - मध्यप्रदेश भाग -	१८२.०१ १९४.९९
	(१९९९-२००० च्या दरसुचीनुसार)	एकूण किंमत -	३७६.९९
ड)	तिसरी सूधारीत प्रशासकीय मान्यता शासनाकडुन २५/८/२००९ अन्वये प्राप्त		
	(२००६-०७ च्या दरसुचीनुसार)	महाराष्ट्र भाग रु.	५६१.२६
ई)	प्रकल्पाची अद्यावत सुधारित किंमत	महाराष्ट्र भाग रु.	७४९.३३
	(राज्य वित्त आयोग व केंद्रिय जलआयोगाद्वारे मान्य दरसुची २००८-०९)	मध्यप्रदेश भाग रु.	६५७.८६
	एकुण किंमत	रु.	१४०७.१९

- **कामाची सद्यःस्थिती :-**

शिर्षकामे :-

मध्यप्रदेश शासनातर्फे बावनथडी नदीच्या माती धरणाचे काम, सांडव्याचे बांधकाम (वक्राकार द्वारासह) व धरणाची घळभरणी पुर्ण झालेली आहे. सन २०१२ च्या पावसाळ्यात ३० टक्के पाणी साठा निर्माण करण्यात आला आहे.

डावा कालवा :-

डावा कालव्याचे काम मध्यप्रदेश शासनाकडे आहे. कालव्याची लांबी ८०.५२ कि.मी. आहे. डाव्या कालव्याचे जवळपास ९० टक्के काम झालेले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे.

उजवा कालवा :-

उजवा मुख्य कालवा, शाखा कालवा क्र. १ व २ चे मातीकाम व बांधकामे जवळपास पुर्ण झालेली आहेत. वितरण प्रणाली ची कामे ९० टक्के झालेली असून उर्वरीत कामे सुरु आहेत. सन २०१२ च्या खरीप हंगामात सुमारे ५००० हे. पेक्षा जास्त लाभक्षेत्राच्या कालवे प्रणालीची चाचणी करण्यात आली असून शेतकऱ्यांा मागणीप्रमाणे पाणी देण्यांत येत आहे.

- **प्रकल्पग्रस्तांसाठी पॅकेज क्र. १ :**

सदर पॅकेजमधील तरतूदी याप्रमाणे आहेत (१). रोजगार प्रशिक्षणाकरीता प्रती कुटूंब रु.१००००/- (२). घरकुल बांधकामाकरीता प्रती कुटूंब रु.६८५००/- (३). पुनर्वसीत गावठाणात २५ कुटूंबांसाठी १ यानुसार व्यापार संकुलांचे बांधकाम. (४). विभक्त कुटुंबांच्या वारसदारांनी स्वतंत्र नव्याने बांधलेल्या घरांचा मोबदला. सदर पॅकेजची एकूण रक्कम रु. ६४१.३२ लक्ष असुन प्रकल्पग्रस्तांना त्याचे वाटप करणे सुरु आहे.

- **प्रकल्पग्रस्तांसाठी पॅकेज क्र. २ :-**

प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अनुदान (अंदाजे रु. ८४.२३ लक्ष) व पर्यायी जमिनी ऐवजी रोख रक्कम (अंदाजे रु. ९९६.५० लक्ष) असे एकूण रु. १०८०.७३ लक्ष पुनर्वसनाचे पॅकेज नियामक मंडळाच्या दि. ११.८.११ रोजी झालेल्या ४९ व्या बैठकीत मंजूर करण्यात आले आहे.

या पॅकेजचे वितरण भुसंपादन अधिकाऱ्यांमार्फत करावयाचे आहे. त्यांचे मागणीनुसार दि. ३१.१.२०१२ पूर्वी भुसंपादन अधिकारी, नागपूर यांना रु. ४.९२ कोटी व भुसंपादन अधिकारी, भंडारा यांना रु. ३.२१ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

- **आर्थिक बाबी** :-

(१) मार्च २०१२ अखेर पर्यंत एकूण खर्च - रु. ६११.६० कोटी (महाराष्ट्र भाग)

(२) सन २०१२-१३ ची अर्थसंकल्पीय तरतूद - रु. १७.०० कोटी (महाराष्ट्र भाग)

प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च : (रु. कोटी)

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकूण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकूण
१९९५ अखेर	३५.३५	४.३७	३९.७२				
९६-९७	२.५६	०.९०	३.४६	०४-०५	६.९९	१.३२	८.३१
९७-९८	२.६९	०.९०	३.५९	०५-०६	५७.७०	१.३०	५९.००
९८-९९	७.७९	२.६०	१०.३९	०६-०७	१४२.६६	१.६२	१४४.२८
९९-००	७.७१	२.६०	१०.३१	०७-०८	८६.२५	१.४७	८७.७२
००-०१	१२.४५	४.२०	१६.६५	०८-०९	१०६.७५	१.३९	१०८.१४
०१-०२	३.७६	१.३०	५.०६	०९-१०	६.१५	१.८१	७.९६
०२-०३	५.०८	१.१	६.१८	१०-११	४२.८९	२.०२	४४.९१
०३-०४	२.०८	१.२७	३.३५	११-१२	५०.४८	२.११	५२.५९

- **प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण : (रु. कोटी)**
- **(अ) मुळ प्रमा व मंजुरी प्राप्त तृतीय सु.प्र.मा.**

मुळ प्र.मा. किंमत	सुधा. प्र.मा. किंमत	किंमत मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ		भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमूळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेला वाढ	
			रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के
११.६५	५६१.२५	५४९.६१	३२६.२०	५९.३५	०	०	८४.४७	१५.३७	२०.३२	३.७०	२८.७४	५.२३	८९.८८	१६.३५

१. दरसूचीतील वाढ :

रू.३२६.२० कोटी. मुळ प्र.मा. किंमत दरसूची १९७४-७५ वर आधारीत होती. चतुर्थ सु.प्र.मा. मान्यता प्राप्त किंमत दरसूची २००६-०७ वर आधारीत असल्यामुळे एकूण ३२ वर्षात दरसूचीतील वाढीमुळे झालेली आहे.

२. तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ :

रु.८४.४७ कोटी. मुळ प्र.मा.मधील तरतूदी ह्या सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनावर आधारीत नव्हत्या व बहुतांष सर्व तरतुदी ढोबळ मानाने घेण्यात आल्या होत्या. सदर वाढ मुळ प्र.मा.प्राप्त अंदाजपत्रकात मुख्य कालवा व शाखा कालव्यांना अस्तरीकरण प्रस्तावीत आहे व सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात क्षेत्रीय आवश्यकतेप्रमाणे तसेच केंद्रिय जल आयोगाचे पत्र दि.२८.४.०६ मध्ये नमुद बाबींचा विचार करून पुनश्च अस्तरीकरण प्रस्तावीत केल्याने वाढ झाली आहे.

३. भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ :

रू.२०.३२ कोटी. खाजगी जमीनीच्या भावात वाढ झाल्यामूळे तसेच पुनर्वसण १९९९ च्या कायद्या अंतर्गत तरतुदीनुसार कामे केल्यामुळे वाढ झाली आहे.

४. इतर कारणांमूळे झालेली वाढ :

रु.२८.७४ कोटी. मुळ प्र.मा.प्राप्त किंमतीमध्ये गृहीत धरण्यात आलेल्या वनजमीनीच्या संपादना मुळे सदर वाढ झाली आहे. २००३ पुर्वी माती/ मुरूम करीता स्वामित्व शुल्क लागत नव्हते, तथापी सध्या प्रचलीत दरसुची प्रमाणे स्वामित्व शुल्क अंतर्भुत केल्याने मातीकामात २० ते ३० टक्के वाढ झालेले आहे.

५. ईटीपी मध्ये झालेली वाढ : रु. ८९.८८ कोटीची वाढ झालेली आहे.

- **(ब) मुळ प्रमा व अध्यावत किमत (राज्य वित्त आयोग व केंद्रिय वित्त आयोग कडुन मान्यता प्राप्त)**

मुळ प्र.मा. किंमत	सुधा. प्र.मा. किंमत	किंमत मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ		भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमूळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेला वाढ	
			रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के
११.६५	७४९.३३	७३७.६८	४५३.४४	६१.४७	०	०	८४.४७	११.४५	२४.८५	३.३७	५२.४१	७.१०	१२२.५१	१६.६१

१. दरसूचीतील वाढ :

रू.४५३.४३ कोटी. मुळ प्र.मा. किंमत दरसूची १९७४-७५ वर आधारीत होती. टी.ए.सी. मान्यता प्राप्त किंमत दरसूची २००८-०९ वर आधारीत असल्यामुळे दरसूचीतील वाढीमुळे झालेली आहे.

२. तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ :

रु.८४.४७ कोटी. मुळ प्र.मा.मधील तरतूदी ह्या सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनावर आधारीत नव्हत्या व बहुतांष सर्व तरतुदी ढोबळ मानाने घेण्यात आल्या होत्या. सदर वाढ मुळ प्र.मा.प्राप्त अंदाजपत्रकात मुख्य कालवा व शाखा कालव्यांना अस्तरीकरण प्रस्तावीत आहे व टी.ए.सी मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात क्षेत्रीय आवश्यकतेप्रमाणे तसेच केंद्रिय जल आयोगाचे पत्र दि.२८.४.०६ मध्ये नमुद बाबींचा विचार करून पुनश्च अस्तरीकरण प्रस्तावीत केल्याने वाढ झाली आहे.

३. भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ :

रू.२४.८५ कोटी. खाजगी जमीनीच्या भावात वाढ झाल्यामूळे तसेच पुनर्वसण १९९९ च्या कायद्या अंतर्गत तरतुदीनुसार कामे केल्यामुळे वाढ झाली आहे.

४. इतर कारणांमूळे झालेली वाढ :

रु.५२.८१ कोटी. मुळ प्र.मा.प्राप्त किंमतीमध्ये गृहीत धरण्यात आलेल्या वनजमीनीच्या संपादना मुळे सदर वाढ झाली आहे. २००३ पुर्वी माती/ मुरूम करीता स्वामित्व शुल्क लागत नव्हते, तथापी सध्या प्रचलीत दरसुची प्रमाणे स्वामित्व शुल्क अंतर्भुत केल्याने मातीकामात २० ते ३० टक्के वाढ झालेले आहे.

५. ईटीपी मध्ये झालेली वाढ :

रु.१२२.५१ कोटीची वाढ झालेली आहे.

मुळ प्र.मा. ते राज्य वित्त आयोग व केंद्रीय वित्त आयोग यांचे कडून मंजूर असलेल्या किंमतीमधील एकूण वाढ ७३७.६८ कोटी (महाराष्ट्र भाग) आढळत आहे. सदर प्रकल्प आंतरराज्यीय असल्यामुळे मध्यप्रदेश शासनाकडील भागाचीही किंमतीत वाढ झाल्याचे निदर्शनास येते. मध्यप्रदेश शासनाकडील भागाची प्र.मा. किंमत रू.११.८२ कोटी असून कें.ज.आ. नुसार सु.प्र.मा. मान्य किंमत रू.६५७.८६ कोटी व रू.६४६.०४ कोटीची वाढ निदर्शनास येते. यावरून दरसुचीतील वाढ, भुसंपादनातील वाढ व इतर कारणामुळे झालेल्या वाढी मध्यप्रदेश शासन भागाकडील घटकातही निदर्शनास येतात.

गोसीखुर्द प्रकल्पाचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१)	**प्रकल्पांचे नांव : गोसीखुर्द प्रकल्प**		तालुका : पवनी		जिल्हा : भंडारा	
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	२,५०,८००	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	३६,८९४	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	५२७९
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१.३.१९८३	१९८१-८२		३७२.२२	२,५०,८००
	सुप्रमा-१	३.७.१९९९	१९९५-९६		२०९१.१३	२,५०,८००
	सुप्रमा-२	१.११.२००७	२००५-०६		५६५९.०९	२,५०,८००
	सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तां.स. समीती नाशीक यांना महामंडळाचे पत्र दि. २७/९/२०१२ अन्वये सादर		२०११-१२		१३७३९.०४	२,५०,८००
४)	केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२७.२.२००८	२००७-०८		७७७७.८५	२,५०,८००
४	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					६०७३.७१
४	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					१२०३.०६
४	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					४६०६.०७
४	इटीपी खर्च (रु.कोटी)					२६४.४७
५)	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष					१९८३
६)	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.२०९१ कोटी)					१९९७
७)	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ				६८१७.६९	५१.००
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ				२२८०.५८	१७.०६
	अ) मुळ प्र.मा.तरतुद रु.५५.८३कोटी ब) तृतीय प्र.मा.तरतुद रु.२३३६.४१ कोटी					०.००
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				५१६.२४	३.८६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				७१२.२३	५.३३
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)				३०४०.०८	२२.७४
	एकूण				**१३३६६.८२**	**१००.००**

८)	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**						
८.१		लागणारे क्षेत्र (हे.)		झालेले क्षेत्र (हे.)		टक्केवारी	
	भू-संपादन	८२२८.४१		४६८८.५२		५६.९८	
	पूनर्वसन	२६९२१.८५		२२३६९.१५		८३.०९	
	वनजमिन	१६०५.०९		१०१०.१४		६२.९३	
८.२	धरण						
	मातीधरण व सांडवा	११.३६ कि.मी.		११.३६ कि.मी.		१००	
८.३	कालवे						
	कालवा	एकूण लांबी (कि.मी.)		झालेली लांबी (कि.मी.)			
	उजवा कालवा	९९		९९			
	आसोलामेंढा	४१.३७		३०			
	डावा कालवा	२२.९३		२२.९३			
	टेकेपार उ.सिं.यो.	१६.५०		१६.५०			
	आंभोरा उ.सिं.यो.	१५.४५		१५.४५			
	मोखाबर्डी उ.सिं.यो.	४४.४१		४१.८१			
	नेरला उ.सि.यो.	४३.८०		१०.५०			
	एकूण	**२८३.४६**		**२३६.१९**			**८३.३२**
८.४	वितरण व्यवस्था						
	कालवा	एकूण क्षेत्र (हे.)		झालेले क्षेत्र (हे.)			
	उजवा कालवा	४८७५९		६४३३			
	आसोलामेंढा	५२३६०		२४४९			
	डावा कालवा	३०४५९		४६३५			
	टेकेपार उ.सिं.यो.	५८४०		५८४०			
	आंभोरा उ.सिं.यो.	८४८१		८१२७			
	मोखाबर्डी उ.सिं.यो.	२१३९०		००			
	नेरला उ.सि.यो.	२१७२७		६७१			
	एकूण	**१९०००० ०**		**२८१५५**			**१४.८२**
८.५	पाटचायांची कामे :						
	कालवा	एकूण क्षेत्र (हे.)		झालेले क्षेत्र (हे.)			
	उजवा कालवा	५१३२७		००			
	आसोलामेंढा	५५०९८		००			
	डावा कालवा	३२०४२		००			
	टेकेपार उ.सिं.यो.	६१४८		६१४८			
	आंभोरा उ.सिं.यो.	८९२७		५६५३			
	मोखाबर्डी उ.सिं.यो.	२२५१६		००			
	नेरला उ.सि.यो.	२२८७१		००			
	एकूण	**२००००० ०**		**११८०१**			**५.९०**

गोसीखुर्द राष्ट्रिय प्रकल्प
टिप्पणी

- मुळ अंदाजपत्रकीय किंमत रु.३७२.२२ कोटी (दरसुची १९८१-८२) दि.३१.३.१९८३
- प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२०९१.१३ कोटी (दरसुची १९९५-९६) दि.३.७.९९
- व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.५६५९.०९ कोटी (दरसुची २००५-०६) दि.१.११.०७
- के.ज.आ.तांत्रिक सल्लागार समिती मान्यता रू.७७७७.७८ कोटी(दरसुची २००७-०८) दि.२७.२.०८
- त्रृतीय सु.प्र.मान्यतेसाठी प्रस्तावित किंमत रु.१३७३९ कोटी (दरसुची २०११-१२)
- मुळ अंदाजपत्रक ते प्रथम सुधारित अंदाजपत्रकामध्ये मुख्यतः खालील बाबीमुळे वाढी झालेल्या आहेत.

(किंमत रू.कोटीत)

प्र.मा./सु.प्र.मा.	किंमत	दिनांक	दरसुचीचे वर्ष	मुळ प्र.मा.शी वाढ	वाढीची टक्केवारी	शेरा
मुळ प्र.मा.	**३७२.२२**	**३१.३.१९८३**	**१९८१-८२**	**०**	**०**	
प्रथमसु. प्र.मा.	**२०९१.१३**	**३.७.१९९९**	**१९९५-९६**	**१७१८.९१**	**०**	
आस्थापना				१६८.८०	९.८२	
दरसुची				९१४.३४	५३.१९	
भुसंपादन				१५५.१९	९.०३	
व्यापतीतील बदल				८०.९१	४.७१	
संकल्पचित्र				५७.१३	३.३२	
व इतर कारणे				३४२.५४	१९.९३	
व्दितीय सु.प्र.मा.	**५६५९.०९**	**१.११.२००७**	**२००५-०६**	**५२८६.८७**		
आस्थापना				५११.६०	२९.७६	
दरसुची				२८१९.९१	१६४.०५	
भुसंपादन				७१६.५३	४१.६९	
व्यापतीतील बदल				८५.४२	४.९७	
संकल्पचित्र				२२७.२५	१३.२२	
व इतर कारणे				९२६.१५	५३.८८	
तृतीय सुप्रमा (प्रस्तावित)	**१३७३९**		**२०११-१२**	**१३३६६.७८**		
आस्थापना				१०७७.७३	६२.७	
दरसुची				६८१७.८९	३९६.६४	
भुसंपादन				१९१५.०६	१११.४१	
व्याप्तीतील बदल				५१६.९६	३०.०७	
संकल्पचित्र				७१२.२३	४१.४३	
व इतर कारणे				२३२६.९	१३५.३७	

१. मुळ अंदाजपत्रक ते व्दितीय सु.प्र.मा. मधील वाढीत, प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ एकुण वाढीच्या तुलनेत १.६२ टक्के आहे व याकरिता विविध लोकप्रतिनिधींकडून शिफारशी प्राप्त झाल्याचे आढळत नाही. प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलांमुळे रू.८५.४२ कोटी, (१.६२ टक्के) ऐवढी वाढ झाल्याचे आढळते. अंभोरा उपसा सिंचन

योजना सर्वप्रथम आम नदीवर प्रस्तावित होती. सविस्तर सर्वेक्षणानंतर सदर योजना वैनगंगा नदीवर प्रस्तावित करण्यात आली तसेच योजनेकरीता वन जमिन वगळुन उर्ध्व नलिकेची संरेखा प्रस्तावित करण्यांत आल्यामुळे उर्ध्व नलिकेच्या लांबीत वाढ झालेली आहे. सदर योजना दोन टप्प्यांमधे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामुळे योजनेच्या सर्वसाधारण आराखडयात बदल झाला. व त्याचप्रमाणे आंभोरा उ.सिं.यो. टप्पा २ मध्ये किनी वितरीकेचे काम अंतर्भूत केल्याने योजने अंतर्गत वाढ झालेली आहे.

सदर योजना वैनगंगा नदीवरून कार्यान्वित होत असल्याने गोसीखुर्द प्रकल्पाचे जलाशय पुर्णपणे भरण्यापूर्वीच या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष लाभ मिळण्यास सुरूवात झालेली आहे.

प्रकल्पाच्या मुळ अंदाजपत्रकातील बांधकामात झालेल्या वाढीअंतर्गत संकल्पचित्रातील बदलांमुळे रू.२२७.२४ कोटी, (४.३० टक्के) वाढ झालेली आढळते. ही वाढ विविध घटकांतर्गत वेळोवेळी व प्रत्यक्ष कामानुसार झालेल्या आवश्यक तांत्रिक बदलांमुळे झालेली आढळते. मुळ अंदाजपत्रक तयार करतांना ढोबळ मानाने तरतूद करण्यात आलेली होती. तथापी नविन अंदाजपत्रक तयार करतांना सविस्तर गणना करुन आवश्यकतेनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

२. लोकप्रतिनिधी व स्थानीक संघटना यांच्या मागणीचे अनुषंगाने प्रकल्पाचे किंमतीमध्ये वाढ झाल्याचे आढळत नाही.

३. प्रकल्पावरील खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) सन १९९५-९६ ते १९९९-२००० **(रु. कोटी)**

अ. क्र.	वर्ष	खर्च
१	१९९५ पर्यंत	१०९.४२
२	१९९५-९६	५०.२१
३	१९९६-९७	४०.२०
४	१९९७-९८	७०.७०
५	१९९८-९९	९५.४६
६	१९९९-२०००	१११.७०
	एकुण	**४७७.६९**

ब) सन २०००-२००१ ते २०१०-२०११ **(रु. कोटी)**

अ. क्र.	वर्ष	खर्च
१	२०००-२००१	१७२.८६
२	२००१-२००२	१०६.१९
३	२००२-२००३	४७.६१
४	२००३-२००४	८४.४१
५	२००४-२००५	६७.०४
६	२००५-२००६	४६९.६५
७	२००६-२००७	५५७.५३
८	२००७-२००८	५५९.५९
९	२००८-२००९	७४९.२६
१०	२००९-२०१०	८८४.८३
११	२०१०-२०११	९२२.८३
	एकुण	**४६२१.८०**

- प्रकल्पावरील सिंचन क्षमता निर्मिती साठवण क्षमता व सिंचीत क्षेत्राबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

(सिंचन क्षमता हेक्टर, रु. कोटी)

अ. क्र.	घटक	प्रकल्पीय सिंचन क्षमता	सिंचन क्षमता निर्मीती जून २०११	सन २०१२-१३ करीता प्रस्तावित तरतुद	सन २०१२-१३ मधील ऑगस्ट-१२ अखेर खर्च	सन २०१२-१३ मधील सिंचन क्षमता साध्य	प्रकल्पीय एकूण पाणीसाठा (दलघमी)	जून २०११-अखेर निर्मित पाणीसाठा (दलघमी)
१	शिर्ष कामे	०	०	६०	८७.१६	०		
२	उजवा कालवा	६४३६२	६८९९	२८	४१.३५	१५९३		
३	आसोलामेंढा	७०४१२	३२२३	२७९	०	०		
४	डावा कालवा	४०२०६	५२२१	७०	०१.६८	६८०		
५	अंभोरा उ.सिं.यो.	१११९५	१०६८२	०	४.८६	०		
६	मोखाबर्डी उ.सिं.यो.	२८२३५	०	२९	१२.८७	०		
७	नेरला उ.सिं.यो.	२८६८०	३२१	९०	०५.७६	५६५		
	एकूण	**२४३०९०**	**२६३४६**	**५५६**	**१५३.६२**	**२८३८**		
८	टेकेपार उ.सिं.यो.	७७१०	७७१०	०	०	०		
	एकूण प्रकल्प	**२५०८००**	**३४०५६**	**५५६**	**१५३.६२**	**२८३८**	**११४६.०८**	**२०२.७७**

पुनर्वसन :-

गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाचे काम तिन टप्प्यात करण्याचे नियोजित आहे. त्याप्रमाणे १ ल्या टप्प्यात २३९.०० मी. पर्यंत पाणी साठा करण्याचे नियोजित असून त्यामुळे २८३.२ दलघमी (१० टिएमसी) पाणी साठा होणार आहे. १ ल्या टप्प्यात नागपूर व भंडारा जिल्ह्याचे अनुक्रमे ११ व ३ अशी एकूण १४ गांवे स्थलांतरीत करावयाची आहे. त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील ७ व भंडारा जिल्ह्यातील ३ गावे स्थानांतरीत झालेली असून उर्वरित ४ गावे स्थनांतरीत व्हायची शिल्लक आहे. पहिल्या टप्प्यातील सर्व पर्यायी गावांमध्ये १८ नागरी सुविधांची कामे पुर्ण झालेले आहे. स्थानांतरीत न झालेली गावे जिवनापूर, नवेगांव (सिर्सि), सिर्सि व अंभोरा (खुर्द) ही आहेत. स्थानांतरीत न होण्यामागे त्यांच्या प्रमुख्याने राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ लागू करणे. उदर निर्वाहाकरीता नोकरी ऐवजी पॅकेज च्या मागण्या आहेत. २ ऱ्या पॅकेज अंतर्गत या प्रमुख मागण्या असुन आयुक्त कार्यालयामार्फत याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झालेला आहे.

दुसऱ्या टप्प्यात २४२.०० मी. पर्यंत पाणीसाठा करण्यात येणार असून ५६६.४ दलघमी (२० टीएमसी) पाणीसाठा होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नागपूर व भंडारा जिल्ह्यातील ४५ गांवे बाधित होणार आहेत त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील २६ व भंडारा जिल्ह्यातील १९ गावांचा समावेश आहे. ४५ बाधित गावांचे ३२ पर्यायी गावठाणात स्थानांतरीत करावयाचे असून ३० गावांच्या १८ नागरी सुविधा पुर्ण झालेल्या आहेत. ४५ बाधित गावांपैकी नागपूर जिल्ह्यातील १ व भंडारा जिल्ह्यातील ४ अशा एकूण ५ गावे पुर्णपणे स्थानांतरीत झालेली असून इतर गावांत स्थानातरणाची कार्यवाही सुरु आहे.

तिसऱ्या टप्प्यात २४५.५० मी. पर्यंत पाणीसाठा करण्याचे नियोजन असून ११४६ दलघमी (४०.४७ टीएमसी) पाणीसाठा होणार आहे. तिसऱ्या टप्प्यात नागपूर व भंडारा जिल्ह्यातील अनुक्रमे १४ व १२ गावे असे एकूण २६ गावांचे स्थानांतरण करावयाचे आहे. सदर गावे अनुक्रमे ११ व १० अशा २१ पर्यायी स्थळी स्थानांतरीत होणार आहेत. त्यापैकी अनुक्रमे ७ व ५ अशा १२ पर्यायी ठिकाणी नागरी सुविधांचे कामे पुर्ण झालेली आहेत. तिसऱ्या टप्प्यातील भंडारा जिल्ह्यातील दोन गावे पुर्णपणे स्थानांतरीत झालेली असून उर्वरित ठिकाणी स्थानांतरणाची प्रक्रिया सुरु आहे.

शासन निर्णयानुसार झालेले काम १८ नागरी सुविधांव्यतिरीक्त महामंडळाने पूनर्वसनाकरिता दिलेल्या अतिरिक्त सुविधाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- घरबांधणी अनुदान : रु. १००००/- प्रति कुटुंब
- शौचकुप अनुदान : रु. ५०००/- प्रति कुटुंब
- वाहतुक अनुदान : रु. ५०००/- प्रति कुटुंब
- भुखंड रद्द मोबदला : रु. ५००००/- प्रति कुटुंब
- अतिक्रमित जागेवरील बांधकामांचा सानुग्रह अनुदानाच्या स्वरूपात मोबदला वाटप.
- कलम ४ नंतर बांधकाम केलेल्या घरांचा सानुग्रह अनुदानाच्या स्वरूपात मोबदला वाटप.

याशिवाय गोसीखुर्द प्रकल्पाचे पुनर्वसन जलदगतीने व्हावे यासाठी मुख्यमंत्री यांनी १५२ कोटीचे प्रथम पॅकेज मंजूर केले आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

मा. मुख्य मंत्री पॅकेज अंतर्गत तिन्ही टप्प्यातील वाटपाचा गोषवारा
(दि. ३१/०८/२०१२ माहिती)

रु. कोटी

अ. क्र	बाधित जिल्ह्याचे नाव	एकूण बाधीत कुटुंब संख्या	ए.पी.ए ल. कुटुंब संख्या	मा. मुख्य मंत्री पॅकेज अंतर्गत				एकुण
				पॅकेज प्रमाणे व्याजाची रक्कम देय / दिलेली रक्कम (शेती)	पॅकेज प्रमाणे देय रक्कम /वाटप ए.पी. एल. अंतर्गत रु. ६८५०० (दिलेली एकूण)	व्यापार सकुल बांधकामा साठी देय रक्कम / व्यापार संकुलावर झालेला खर्च	प्रशिक्षणा साठी देय रक्कम/ प्रशिक्षणा साठी झालेला खर्च	
१	नागपूर जिल्हा	८३३२	५४२४	४२ /३८ ८६ %	३७ /११ ३० %	४ / ०.१३ ०.०३ %	८/४ ५० %	९१/५३ ५८ %
२	भंडारा जिल्हा	६६३६	३७९१	२९ /२९ १०० %	२३/९ ३९ %	२/० ०%	६/३ ५०%	६०/४१ ६८ %
	एकूण	१४९६९	९०१५	७१ /६७ ९३ %	६० /२० ३३ %	६ /०.१३ ०.०२ %	१४/७ ५०%	१५२/९४ ६२ %

विभागीय आयुक्त यांचेकडून गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांसाठी दूसरे पॅकेज प्रस्तावित आहे. त्यास प्रामुख्याने १. पर्यायी शेतजमिनीऐवजी एकमुस्त रक्कम २. नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम देण्याचे प्रस्तावित आहे. सदर पॅकेज गोपनिय असल्याने आयुक्त कार्यालयाकडून त्याचा पुर्ण तपशिल मिळू शकणार नाही.

४. भुसंपादनाच्या अडचणी :

प्रकल्पामुळे बाधित होणा-या गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या खालील प्रमुख मागण्या आहेत.

१. <u>वाढीव भुखंडाची मागणी</u> :- गोसीखुर्द प्रकल्पाची भुसंपादनाची कार्यवाही फार पुर्वीपासून सुरु असल्याने दरम्यानच्या काळात कुटुंब संख्येत वाढ होवून त्याचे स्वतंत्र कुटुंब तयार झाले आहे. त्याप्रमाणे स्वतंत्र कुटुंब घोषित करुन त्यांना भुखंड देण्याची मागणी आहे. स्वतंत्र कुटुंब घोषित केल्यास भुखंड धारकांना देण्यात येणारे सर्व लाभ वाढीव कुटुंबांना द्यावे लागतील.

२. <u>पुनर्वसन धोरण २००७ लागू करणे</u> :- पुनर्वसन धोरण २००७ लागू करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांकडून होत आहे. हा कायदा अमलात आणल्यास रु. ९१५.०० कोटीचा आर्थिक बोझा पडेल.

३. पर्यायी शेतजमिन प्रकल्पग्रस्तांना त्यांचे बाधित शेतीच्या निवाड्याची रक्कम घेतांना त्यांनी ६५ टक्के रक्कम शासनाकडे जमा न केल्याने त्यांना पर्यायी शेतजमिन देण्यात आलेली नाही. प्रकल्पग्रस्त शेतमजूरांना ०.४० आर जमीन देय आहे. (पुनर्वसन कायदा १९९९ अन्वये)

४. प्रकल्पग्रस्त कुटुंबांना रु. १५ लक्षाचे पॅकेज देण्यात यावे. प्रकल्पग्रस्त कुटुंब पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत झाल्यावर त्याना व्यवसाय सुरु करण्यासाठी / प्रत्येक कुटुंबातील एकास शासकिय नोकरी देणे शक्य नसल्याने, त्यांनी रु. १५.०० लक्ष पॅकेजची मागणी केली आहे.

५. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त मच्छिमारांना गोसीखुर्द प्रकल्पाच्या जलाशयात मच्छिमारीचे अधिकार मिळावे.

६. गोसीखुर्द प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना वृध्दापकाळाची पेंशन मिळावे.

७. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना दोन ते तीन वर्षाच्या कालावधीचे प्रशिक्षण मिळावे.

८. बाधित गावातील प्रकल्पग्रस्त जमीन प्रकल्पात गेल्याने भुमिहीन झाल्याने त्यांना बी.पी.एल. घोषित करुन बी.पी.एलचे फायदे द्यावे.

९. पर्यायी गावठाणातील सर्व रस्ते डांबरीकरण करुन देण्यात यावे.

५. धरणात एकुण तीन टप्प्यात पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन असुन त्याअनुषंगाने प्रथम टप्प्यात २३९.०० मी तलांकापर्यंत १० टि.एम.सी., व्दितीय टप्प्यात २४२.०० मी तलांकापर्यंत २० टि.एम.सी. व तृतीय टप्प्यात २४५.५० मी तलांकापर्यंत ४०.४७ टि.एम.सी. पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे. तथापी, प्रथम टप्प्यातील बाधित होणा-या काही गावांतील प्रकल्पग्रस्तांचा पुनर्वसनास प्रखर विरोध असल्याने नियोजनानुसार पाणीसाठा निर्माण करता आला नाही.

गोसीखुर्द राष्ट्रिय प्रकल्प

वाढीव किंमती बाबत टिप्पणी

अ) मुळ ते प्रथम सुप्रमा : एकुण वाढ रु. १७१८.९१ कोटी

- मुळ प्र.मा. दिनांक : ३१.०३.१९८३
- सुधारीत प्र.मा. दिनांक : ०३.०७.१९९९
- मुळ प्र.मा. दरसुची : १९८१-१९८२
- सुधारीत प्र.मा. दरसुची : १९९५-१९९६
- **निव्वळ दरसुचीमुळे वाढ : रु. ९१४.३४ कोटी (५३.१९ टक्के).**
  दोन अंदाजपत्रकाचे मंजुरी दरम्यान १६ वर्षाचा कालावधी असल्याने प्रकल्पाच्या सर्व घटकांतर्गत एकुण ९१४.३४ कोटीची वाढ झाली आहे. विविध घटकांतर्गत झालेली वाढ पुढीलप्रमाणे आहे.शिर्ष कामे रु २०४.१५ कोटी,उजवा कालवा रु १४३.०४ कोटी, डावा कालवा रु ६२.४५ कोटी, टेकेपार रु १५.४५ कोटी, नेरला रु ६७.५२ कोटी, मोखाबर्डी रु १४८.४५ कोटी, अंभोरा रु ५५.०४ कोटी, आकोट रु १५.४६ कोटी व आसोलामेंढा रु २०२.७९ कोटी.
- **भुसंपादन किमतीतील वाढ : रु. १५५.१९ कोटी (९.०३ टक्के).**
  प्रकल्पांतर्गत विविध घटकांतर्गत नागपुर, भंडारा व चंद्रपुर जिल्हयातील जमिनींचे संपादन अंतर्भुत असल्याने या जमिनी संपादनाचे दर जिल्हानिहाय वेगवेगळे आहेत. शिर्ष कामा अंतर्गत रु १२७.४६ कोटी वाढ असून धरणातील बुडीत गावांचे संपादन अंदाजपत्रकात अंतर्भुत असल्याने या घटकांतर्गत वाढ जास्त आहे. मुळ अंदाजपत्रकात बुडीत क्षेत्राकरिता १२,९८४ हे. ची तरतुद करण्यात आली होती. सुधारीत अंदाजपत्रकात सविस्तर सर्वेक्षणाचे आधारे १९०२६ हे. ची तरतुद करण्यात आली आहे. बुडीत क्षेत्रातील बाधित गावांच्या संख्येत वाढ झाली नसली तरी मुळ अंदाजपत्रकातील तरतुदी ढोबळमानाने असल्याने अंदाजपत्रकात वाढ झाली आहे. हयात उजवा कालवा रु २.०३ कोटी, डावा कालवा रु १.६८ कोटी, टेकेपार रु ०.०९ कोटी, मोखाबर्डी रु २.२१ कोटी व आसोलामेंढा रु २१.७२ कोटी वाढ झालेली आहे.
- **कामाच्या व्याप्तीतील बदल : रु. ८०.९१ कोटी (४.७१ टक्के).**
  मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार आंभोरा उपसा सिंचन योजना आम नदीच्या तीरावर प्रस्तावित होती. परंतु उर्ध्वगामी नलीकांची लांबी येत असल्यामुळे ती कमी करण्यास्तव भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन ही योजना वैनगंगेच्या तीरावर प्रस्तावित करण्यांत आली. प्रथमतः २६५.०० मी. पर्यंत पाण्याची उचल करुन सिंचन प्रस्तावित होते. परंतु नंतर त्यात बदल होऊन २६०.०० मी. पातळीपर्यंत १ टप्पा व २६९.०० मी. पातळीपर्यंत दुसरा टप्पा अशी दोन टप्प्यात विभागणी करुन सिंचन करण्याचे ठरले. त्याचप्रमाणे पुवी गोसीखुर्द प्रकल्प झाल्यानंतर जलाशयातील साठ्याव्दारे २४०.२९० मी. पातळीवरुन पाणी उचलण्याचे प्रस्तावित होते. नंतर मात्र नदी पातळी २३०.०० मी. वरुन पाणी उचलण्याचे निश्चित झाल्यामुळे उपसा शीर्षात वाढ होऊन त्यानुषंगाने पंपाच्या अश्वशक्तीत वाढ करावी लागली व त्यानुषंगाने इतर बाबी सुद्धा वाढीव परिमाणाच्या झाल्या. प्रस्तुत वाढ रु.४६.३३ कोटी ही कामाच्या व्याप्तीत झालेल्या बदलामुळे आहे. मोखाबर्डी उपसा सिंचन योजना अंतर्गत वितरण प्रणालीत ढोबळ मानाने तरतुद करण्यात आली होती. सुधारीत अंदाजपत्रकात सविस्तर सर्वेक्षणाअंती तरतुद करण्यात आली. यामुळे किमतीत रु. ८.७९ कोटीने वाढ झाली. टेकेपार उपसा सिंचन योजनायामुळे किमतीत रु. २५.७९ कोटीने वाढ झाली.

- **संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ : रु. ५७.१३ कोटी (३.३२ टक्के).**
  गोसीखुर्द मुख्य धरणाचे तसेच नेरला उपसा सिंचन योजना व मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेच्या क-बांधकामे या शिर्षांतर्गत धरण, सांडवा पंपगृह, उर्ध्वगामी नलीकांचे इतर उपसा सिंचन योजनेकरीता वापरण्यात आलेल्या तरतुदींच्या आधारे अंदाजपत्रके तयार करण्यात आल्या मुळे किंमतीत अनुक्रमे रु. ५२.४८ कोटी व रु. ४.६५ कोटीने वाढ झालेली आहे.

- **इतर कारणांमुळे झालेली वाढ : रु. ५११.३३ कोटी (२९.७५ टक्के).**
  यामध्ये आस्थापना व इतर अनुषंगिक खर्चामुळे रु १६८.८० कोटीची वाढ झाली आहे. याव्यतिरीक्त डावा कालवा या घटकांतर्गत मुळ अंदाजपत्रकात एक शाखा कालवा प्रस्तावित होता व सुधारीत अंदाजपत्रकात तीन शाखा कालवे प्रस्तावित करण्यात आल्याने रु.८.०० कोटीची वाढ झाली आहे. अपु-या तरतुदीमुळे शिर्ष कामे, उजवा कालवा, मोखाबर्डी व अंभोरा या घटकांतर्गत रु. २५.०० कोटीची वाढ झाली आहे. मुळ अंदाजपत्रकात ब-याच उपशिर्षांतर्गत ढोबळ मानाने तरतुदी करण्यात आल्या होत्या, सुधारीत अंदाजपत्रकात या या शिर्षांकरिता सविस्तर अंदाजपत्रकीय तरतुदी करण्यात आल्याने शिर्ष कामे, उजवा कालवा, टेकेपार, आकोट, गोसी व नेरला या घटकांतर्गत एकुण रु. २८९.५१ कोटीची वाढ झाली आहे.

ब) प्रथम सुप्रमा ते व्दितीय सुप्रमा : एकुण वाढ रु. ३५६७.९६ कोटी

- प्रथम सुधारीत प्र.मा. दिनांक : ०३.०७.१९९९
- व्दितीय सुधारीत प्र.मा. दिनांक : ०१.११.२००७
- प्रथम प्र.मा. दरसुची : १९९५-९६
- व्दितीय सुधारीत प्र.मा. दरसुची : २००५-२००६
- **निव्वळ दरसुचीमुळे वाढ : रु. १९०५.५७ कोटी (५३.४१ टक्के).**
  दोन अंदाजपत्रकाचे मंजुरी दरम्यान ८ वर्षाचा कालावधी असल्याने प्रकल्पाच्या सर्व घटकांतर्गत एकुण १९०५.५७ कोटीची वाढ झाली आहे. विविध घटकांतर्गत झालेली वाढ पुढीलप्रमाणे आहे.शिर्ष कामे रु ४५७.५० कोटी, उजवा कालवा रु ७००.०८ कोटी, डावा कालवा रु १०७.५६ कोटी, टेकेपार रु ९.३८ कोटी, नेरला रु १८५.०० कोटी, मोखाबर्डी रु १५४.५७ कोटी, अंभोरा रु ३८.६२ कोटी, गोसी रु १०.४६ कोटी, आकोट रु १.०१ कोटी व आसोलामेंढा रु २४१.३९ कोटी.
- **भुसंपादन किमतीतील वाढ : रु. ५६१.३४ कोटी (१५.७३ टक्के).**
  प्रकल्पांतर्गत विविध घटकांतर्गत नागपुर, भंडारा व चंद्रपुर जल्हयातील जमिन संपादन अंतर्भुत असल्याने संपादनाचे दर वेगवेगळे आहेत. विविध घटकांतर्गत झालेली वाढ पुढीलप्रमाणे आहे. शिर्ष कामे रु ५३८.१३ कोटी, शिर्ष कामे अंतर्गत धरणामुळे बुडीत गावांचे संपादन अंतर्भत असल्याने या घटकांतर्गत वाढ जास्त आहे. बुडीत क्षेत्रामध्ये १५३ हे.ने वाढ झालीअसुन ही वाढ किरकोळ आहे. उजवा कालवा रु १०.५१ कोटी, डावा कालवा रु २.८९ कोटी, टेकेपार रु ०.०७ कोटी, नेरला रु २.९६ कोटी, मोखाबर्डी रु ०.५६ कोटी, अंभोरा रु ६.२१ कोटी व आसोलामेंढा रु ०.०० कोटी
- **कामाच्या व्याप्तीतील बदल : रु. ४.५१ कोटी (०.६८ टक्के).**

  डावा कालवा अंतर्गत शाखा कालवा क्र.२ व ३ चे अस्तरीकरण अंतर्भूत करण्यात आले. यामुळे रु. १.६१ कोटीने वाढ झाली.अंभोरा उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. २.९० कोटीची वाढ झाली आहे. प्रथम सुधारीत अंदाजपत्रकात टप्पा २ च्या मुख्य कालव्यास अस्तरीकणाची तरतुद नव्हती ती तरतुद प्रस्तावीत केल्यामुळे ही वाढ झालेली आहे.

- **संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ : रु. १७०.१२ कोटी (४.७७ टक्के).**

  शिर्ष कामे या घटकांतर्गत सर्व संकल्पने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी मंजुर केली असुन त्याअनुषंगाने विविध कामांमध्ये बदल झाला असुन त्यामुळे रु. ५०.९० कोटीची वाढ झाली आहे. नेरला उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. १०८.३९ कोटीची वाढ झाली आहे. ही वाढ शिर्ष कामांचे प्रथम प्र.मा. अंदाजपत्रक तयार करतांना त्यावेळेस इतरत्र सुरु असलेल्या उ.सिं. योजनांचे संकल्पन व रेखाचीत्रांच्या आधारे प्रकल्पांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. प्रत्यक्षात शिर्ष कामांचे म.सं.सं. द्वारे प्राप्त सविस्तर संकल्पन व संकल्पचित्रानुसार प्रत्येक्ष बांधकामाच्या परीमाणात झालेल्या बदलामुळे वाढ झालेली आहे. तसेच अंभोरा सिंचन योजने अंतर्गत रु. २०.०६ कोटीची वाढ झाली आहे. प्रथम सु.प्र.मा. मध्ये पंपगृहाचे बांधकाम टेकेपार उपसा सिंचन योजनेच्या धर्तीवर प्रस्तावित होते. परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्र संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळावरील पाहणीनुसार पंपगृहाचे संकल्पन करुन बांधकाम करण्यांत आले. तसेच त्यांचेतर्फे पुरविण्यात

आलेल्या सर्वसाधारण आराखड्यानुसार कन्ट्रोल रुम, सर्व्हिस बे चे बांधकाम करण्यांत अले. तसेच पुर्वीचे सुपरस्ट्रक्चरचे बांधकाम लोखंडी होते. त्याऐवजी काँक्रीमध्ये प्रस्तावित केले. पिकअप विअरचा स्पॅन २ मी. ऐवजी ४ मी. झाल्यामुळे स्लॅबची जाडी ३० से,मी. ऐवजी ४० से.मी. घेण्यात आली. स्पॅन वाढल्यामुळे पर्यायाने लोखंडी सळया व अनुषंगिक बाबींच्या परिमाणात वाढ झाली. उर्ध्वगामी नळरांगाच्या ५५० मी. लांब क्षेत्रात आधाराकरीता सॅडल सपोर्ट देण्यात आल्याने काँक्रीट, लोखंडाचे परीमाण वाढले. शिवाय Wearing Plate चे अतिरिक्त काम (सॅडल सपोर्टच्या वर) करण्यात आल्याने देखील वाढ झाली. या सर्व बाबींमुळे झालेली एकूण वाढ रु.२०.०६ कोटी आहे.

- **इतर कारणांमुळे झालेली वाढ : रु. ९२६.४२ कोटी (२५.९७ टक्के).**

  यामध्ये आस्थापना व इतर अनुषंगिक खर्चामुळे रु ३४२.८० कोटीची वाढ झाली आहे.मुळ अंदाजपत्रकात बयाच उपशिर्षांतर्गत ढोबळ मानाने तरतुदी करण्यात आल्या होत्या, सुधारीत अंदाजपत्रकात या या शिर्षांकरिता सविस्तर अंदाजपत्रकीय तरतुदी करण्यात आल्याने शिर्ष कामे, मोखाबर्डी, आकोट, गोसी व नेरला या घटकांतर्गत एकुण रु. ५१०.६७ कोटीची वाढ झाली आहे. तसेच अपु-या सर्वेक्षणामुहे व अपु-या तरतुदींमुळे काही घटकांतर्गत रु ३३.७६ कोटीची वाढ झाली आहे. उच्च दरांच्या निविदा स्विकृतीमुळे ३४.९४ कोटीची वाढ झाली आहे.

क) व्दितीय सुप्रमाते तृतीय सुप्रमा : एकुण वाढ रु. ८०७९.२३ कोटी

- व्दितीय सुधारीत प्र.मा. दिनांक : ०१.११.२००७
- तृतीय सुधारीत प्र.मा. दिनांक : मान्यतेस्तव सादर
- व्दितीय प्र.मा. दरसुची : २००५-२००६
- व्दितीय सुधारीत प्र.मा. दरसुची : २०११-२०१२
- **निव्वळ दरसुचीमुळे वाढ : रु. ३९९७.९८ कोटी (४९.४८ टक्के).**

  दोन अंदाजपत्रकाचे मंजुरी दरम्यान ५ वर्षाचा कालावधी असल्याने प्रकल्पाच्या सर्व घटकांतर्गत एकुण ३९९७.९८ कोटीची वाढ झाली आहे. विविध घटकांतर्गत झालेली वाढ पुढीलप्रमाणे आहे.शिर्ष कामे रु ११३.४७ कोटी, उजवा कालवा रु २०३१.४५ कोटी, डावा कालवा रु २३४.६५ कोटी, टेकेपार रु ०.०० कोटी, नेरला रु १६८.०७ कोटी, मोखाबर्डी रु ५४९.७१ कोटी, अंभोरा रु१०९.६८ कोटी, गोसी रु५६.०६ कोटी आकोट रु८.५८ कोटी व आसोलामेंढा रु७२५.९१ कोटी.
- **भुसंपादन किमतीतील वाढ : रु. ११९८.५३ कोटी (१४.८३ टक्के).**

  प्रकल्पांतर्गत विविध घटकांतर्गत नागपुर, भंडारा व चंद्रपुर जिल्हयातील जमिन संपादन अंतर्भुत असल्याने संपादनाचे दर वेगवेगळे आहेत. विविध घटकांतर्गत झालेली वाढ पुढीलप्रमाणे आहे. शिर्ष कामे रु ८००.८१ कोटी, शिर्ष कामे अंतर्गत धरणामुळे बुडीत गावांचे संपादन अंतर्भत असल्याने या घटकांतर्गत वाढ जास्त आहे. बुडीत क्षेत्रामध्ये ४१६ हे.ने वाढ झाली असुन ही वाढ प्रत्यक्ष निवाझ्यांनुसार असुन किरकोळ आहे. उजवा कालवा रु २४१.७३ कोटी, उजवाकालवा वितरणप्रणालीचे कामेनुकतीच सुरु झाली असल्याने या घटकाचे् भुसंपादन शिल्लक आहे. यास्तव या घटकांतर्गत वाढ जास्त आहे. डावा कालवा रु ३४.९३ कोटी, टेकेपार रु ०.०९ कोटी, नेरला रु ५.९७ कोटी, मोखाबर्डी रु ६६.६९ कोटी, अंभोरा रु -५.२७ कोटी, गोसी रु ११.६६ कोटी, आकोट रु ०.००५ कोटी व आसोलामेंढा रु ४१.९५ कोटी
- **कामाच्या व्याप्तीतील बदल : रु. ४३०.८२ कोटी (५.३३ टक्के).**

  पर्यावरण व वन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, भोपाळ यांचे दि. २७.०९.२०१२ चे पत्रात नमुद सुचनेनुसार कालव्यावर टायगर पाससाठी प्राथमिक तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. याकरिता रु. १० कोटीची तरतुद प्रस्तावित आहे. मोखाबर्डी उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. ४२१.४६ कोटीची वाढ अपेक्षित आहे. मा. लोकप्रतिनीधी श्री विजय वडेट्टीवार यांचे निवेदनाप्रमाणे योजनेअंतर्गत वडाळा शाखा कालव्या अंतर्गत चिमुर परिसरातील क्षेत्र अंतर्भुत केल्याने तसेच श्री बंडुभाउ सावरबांधे यांचे मागणीचे अनुषंगाने पवनी व शेळी सोमनाळा या दोन नविन उपसा सिंचन योजनांचा अंतर्भाव गोसीखुर्द प्रकल्पात करण्यास विदर्भ पाटबंधारे विकास

महामंडळाचे नियामक मडळाने मंजुरी प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने सद्यःस्थितीत या दोन योजनांच्या प्राथमिक सर्वेक्षणाचा खचाचा समावेश तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आला आहे. यामुळे रु. ०.७२ कोटी वाढ अपेक्षित आहे.

- **संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ : रु. ४८४.९८ कोटी (६.०० टक्के).**
  शिर्ष कामे अंतर्गत भंडारा सुरक्षा भिंतीचा आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी मंजुर केला असुन त्याअनुषंगाने एकुण रु. ४३.९९ कोटी वाढ अपेक्षित आहे. डावा कालवा अंतर्गत रु. १२.४४ कोटीची वाढ अपेक्षित आहे. नेरला उपसा सिंचन योजने अंतर्गतरु. ३५६.५३ कोटीची वाढ अपेक्षित आहे. मोखाबर्डी उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. ४०.६९ कोटीची वाढ अपेक्षित आहे. अंभोरा उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. ९.६५ कोटीची वाढ अपेक्षित आहे. गोसी उपसा सिंचन योजने अंतर्गत रु. २१.६८ कोटीची वाढ अपेक्षित आहे.
- **इतर कारणांमुळे झालेली वाढ : रु. १९६६.९१ कोटी (२४.३५ टक्के).**
  यामध्ये आस्थापना व इतर अनुषंगिक खर्चामुळे रु ५६६.१७ कोटीची वाढ झाली आहे. गोसी व आकोट या उपसा सिंचन योजनांच्या कालव्यांना असतरीकरण प्रस्तावित केल्याने तसेच लाभक्षेत्रातील पाण्याचा निचरा व्यवस्थित होण्याकरिता मुख्य कालवा वडाळा शाखा कालव्यावरील मो-यांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यामुळे ६३.४४ कोटीची वाढ अपेक्षित आहे. उजवा कालवा या घटकांतर्गत रिटेनिंग वॉल व कट अँड कव्हर मधिल सुधारीत संकल्पनामुळे रु. ९८.३५ कोटीची वाढ अपेक्षित आहे. घोडाझरी या घटकांतर्गत कट अँड कव्हर व बोगदा मधिल सुधारीत संकल्पनामुळे रु. ६०७.३८ कोटीची वाढ अपेक्षित आहे. उजवा कालवा व घोडाझरी या घटकांतर्गत सिआर व एचआर मधिल सुधारीत संकल्पनामुळे रु. १५.७१ कोटीची वाढ अपेक्षित आहे. उजवा कालवा व घोडाझरी या घटकांतर्गत एफ-आरएचटी या शिर्षाखाली सुधारीत संकल्पनामुळे रु. ६९.२२ कोटीची वाढ अपेक्षित आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांव – आजनसरा बॅरेज प्रकल्प तालुका – हिंगणघाट, जिल्हा -वर्धा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - २८०००	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	निरंक	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	निरंक
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	१३.४.२०००	१९९६-९७	१५८.२२	२८०००
	सुप्रमा -१/नव्याने	२१.११.२००६	२००५-०६	२०८.४२	२८०००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	-	-	-	-
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- २.३०४	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- २.३०२	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- ०.००२	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- - -	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:- २०११-१२	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			:-सूरू व्हायचे आहे	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम	टक्के
७.१	दरसूचीतील वाढ			३०.७७	६१.२९
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			१०.५२	२०.९६
	सुप्रमा तरतुद रु.१५.४५ कोटी - प्रमा तरतुद रु.४.९३ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			-	-
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			८.९१	१७.७५
			एकूण	**५०.२**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन		०		०
८.२	धरण (एकुण ३७६५ मी. पैकी ० मी. लांबी पुर्ण)		झालेली लांबी निरंक).		०
८.३	कालवा (एकुण लांबी २५.५९ कि.मी.)		झालेली लांबी निरंक).		०
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र २४००० हे.		वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र निरंक		०
८.५	पाटचा-याची कामे (एकुण क्षेत्र २४००० हे.		पाटचा-याची कामे तयार झालेले क्षेत्र निंरक)		०

आजनसरा बॅरेज प्रकल्प

ता. हिंगणघाट जि. वर्धा

टिप्पणी

<u>प्रकल्पाची रुपरेषा</u>

आजनसरा बॅरेज उपसा सिंचन प्रकल्प हा वर्धा नदीवर आजनसरा गांवाजवळ प्रस्तावित आहे. या प्रकल्पा अंतर्गत नदीचे पात्रात दगडी बांधकामात बॅरेज प्रस्तावित असून नदीचे दोन्ही बाजूला मातीचा बंधारा, बॅरेजवरील बाजूस जॅकवेल, रायझिंग मेन, वितरण हौद व दोन मुख्य कालवे प्रस्तावित आहेत.

प्रकल्पास मिळालेल्या विविध प्रशासकिय मान्यतेचा तपशिल

मुळ प्रशासकिय मान्यता	रु. १५८.२२ कोटी दि. १३/४/२००० दरसुची १९९६-९७
नव्याने प्रशासकिय मान्यता	रु. २०८.२२ कोटी दि.२७.११/२००६ दरसुची २००५-०६
केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय प्रादेशिक कायार्लय भोपाल याची वनजमीन हंस्तांतरण तत्वतः मंजुरी	दि. २५/४/२००८
१) एन.पी.व्ही मागणी	रु. २.२८ कोटी दि. २७/५/२००८
२) सुधारीत एन.पी.व्ही. मागणी	रु. ५.८१ कोटी दि. ४/५/२००१
३) एन.पी.व्ही. पुर्तता	रु. २.२८ दि. २८/४/२०११ (रु. ३.५३ कोटीचा भरणा व्हायचा आहे.)

प्रकल्पाचा भौतीक उदिष्टाचा तपशिल

अ. क्र.	तपशिल	मुळ अंदाजपत्रक				तृतीय सुधारीत अंदाजपत्रक			
		पाणीसाठा निर्मीती दलघमी	सिंचन क्षमता निर्मिती हे.	पिण्याच्या पाण्याची तरतुद दलघमी	औदयोगीक पाणी वापर दलघमी	पाणी साठा निर्मीती दलघमी	सिंचन क्षमता निर्मिती हे.	पिण्याच्या पाण्याची तरतुद दलघमी	औदयोगीक पाणी वापर दलघमी
१	धरण	२२.२४	२८०००	निरंक	निरंक	२२.२४	२८०००	निरंक	निरंक

आजनसरा बॅरेज प्रकल्पाच्या सन २००० मध्ये मंजुर मान्येनुसार प्रकल्पाची कामे पुर्ण करण्याच्या कालावधी ७ वर्षाचा नियोजीत होता. परतुं निधी अभावी प्रकल्पाचे कांमास सुरुवात व्हायची आहे.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाचा तपशिल

१) सन १९९५-९६ ते १९९९-२००० पर्यंत झालेला खर्च -- निरंक

२) सन २०००-०१ ते २०१०-११ पर्यंत झालेला खर्च -- रु. २३०.१८ कोटी

अ) मुळ प्रशासकिय मान्यता ते प्रथम सुप्रमा- वाढ रु. ५०.२० कोटी

१) निव्वळ दरसुची फरकामुळे झालेली वाढ -- **रु. ३०.७७ कोटी** (दरसुची १९९६-९७ ते २००५-०६)

२) भुसंपादनाच्या किंमती वाढीमुळे -- **रु. १०.५२ कोटी**

प्रथम एन.पी.व्ही. ची मागणी रु. २.२८ कोटीची होती त्याचा भरणा वेळेत न झाल्यामुळे एन.पी.व्ही. च्या किमंतीत रु. ३.३५ कोटीची वाढ झाली आहे.

३)अनुषंगीक खर्चातील वाढ -- **रु. ८.९१ कोटी**

सदर प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात येणा-या जमीनीचा एन.पी.व्ही. चा रु. ३.५३ कोटीचा भरणा व्हायचा आहे. त्यामुळे केंद्रीय जलआयोग पर्यावरण व वनमंत्रालयाची अंतीम मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर व्हायचा आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांव – निम्न वर्धा प्रकल्प**	तालुका - आर्वी		जिल्हा -वर्धा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ६६१७२	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	१७३७९	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	३२८
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	९.१.१९८१	१९७९-८०	४८.०९	५१६५५
	सुप्रमा -१	१०.१.२०००	१९९७-९८	४४४.५२	५१६५५
	सुप्रंमा-२	२९.८.२००६	२००५-०६	९५०.७०	५१६५५
	सुप्रमा-३	१८.८.२००९	२००८-०९	२३५६.५८	६६१७२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	तांत्रिक सल्लागार समितीच्या १०८ व्या बैठकीत दिनांक ४.१.२०११ रोजी मंजूर, केंद्र शासनाच्या नियोजन विभागाची मान्यता दिनांक १८.०३.२०११ रोजी.	२००८-०९	२२३२.४१	६३३३३
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				:- ११२७.३३
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)				:- ३४०.५८
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)				:- ७२९.६४
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)				:- ५७.११
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				:- १९८०-८१
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.४८.०९ कोटी)				:- १९८१
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		रक्कम	टक्के	
७.१	दरसूचीतील वाढ		८२१.५५	३५.५८	
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ		१५५.३३	६.७३	
	सुप्रमा बी लॅण्ड ची तरतुद रु.३२५.७६ कोटी - प्रमा बी लॅण्ड ची तरतुद रु.६.४५ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		५९६.०६	२५.८२	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		२७६.७२	११.९९	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)		४५८.८३	१९.८८	
		एकूण	**२३०८.४९**	**१००.००**	
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन			७२.४५	
८.२	धरण (पूर्ण)			१००	
८.३	कालवा एकूण लांबी १०७.२८ कि.मी.	झालेली लांबी १०१.५८ कि.मी.		९४.६९	
८.४	वितरण व्यवस्था - एकूण क्षेत्र ४४१५० हे.	तयार झालेले क्षेत्र -१४८५४ हे.		३३.६४	
८.५	पाटचा-यांची कामे एकूण क्षेत्र ६५४३० हे.	पाटचा-याची कामे तयार झालेले क्षेत्र - निरंक		०.००	

निम्न वर्धा प्रकल्प

ता.आर्वी जि.वर्धा

संक्षिप्त टिप्पणी

प्रकल्पाची रुपरेषा :-

निम्न वर्धा प्रकल्प वर्धा जिल्हयातील आर्वी तालुक्यातील धनोडी गांवाजवळ वर्धा नदीवर बांधण्यात येत आहे. निम्न वर्धा प्रकल्प मा.पंतप्रधान यांच्या पॅकेज मध्ये अंतर्भुत असून वेगवर्धीत सिंचन कार्यक्रमात समावेश आहे.

प्रकल्पास मिळालेल्या विविध मान्यतेचा तपशिल :-

प्रशासकिय मान्यता	रु. ४८.०८५ कोटी दि. ०९-०१-१९८१ दरसुची १९७९-८०
प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता	रु. ४४४.५२१ कोटी दि. १०/०१/२०००दरसुची १९९७-९८
द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता	रु. ९५०.७०० कोटी दि. २९/०८/२००६ दरसुची २००५-०६
तृत्रीय सुधारित प्रशासकिय मान्यता	रु. २३५६.५७६कोटी दि. १८/०८/२००९ दरसुची २००८-०९
वन / पर्यावरण मान्यता	दि. १६/०३/२००० / दि. ५.१.२००७
केंद्रीय जल आयोग नवी दिल्ली च्या तत्त्व मान्यता	रु. २२३२.४१ कोटी दि. ०४/०१/२०११ दरसुची २००८-०९

प्रकल्पाच्या भौतिक उदिष्टाचा तपशील :-

अ.क्रं.	तपशिल	मुळ अंदाजपत्रक				तृतिय सुधारीत अंदाजपत्रक			
		पाणीसाठा निर्मिती दलघमी	सिंचन क्षमता निर्मिती हे.	पिण्याच्या पाण्याची तरतूद दलघमी	औद्योगिक पाणी वापराची तरतूद दलघमी	पाणीसाठा निर्मिती दलघमी	सिंचन क्षमता निर्मिती हे.	पिण्याच्या पाण्याची तरतूद दलघमी	औद्योगिक पाणी वापराची तरतूद दलघमी
१	धरण	२५३.३४	५१६५५	९.९५	--	२५३.३४	५१६५६	०	४०.२०
२	उ.सिं.यो.	--	--	--	--	--	९३६०	०	०
३	पुलगांव बॅरेज	--	--	--	--	१०.८०	०	९.९५	०
४	खर्डा बॅरेज	--	--	--	--	१२.५१	२४२३	३.५७	०
५	आंजी-अंदोरी बॅरेज	--	--	--	--	१२.८८	२७३३	०	०
	एकूण :-	**२५३.३४**	**५१६५५**	**९.९५**		**२८९.५३**	**६६१७२**	**१३.५२**	**४०.२०**

निम्न वर्धा प्रकल्पाच्या सन १९८१ मध्ये मंजुर मुळ प्रकल्प अहवालानुसार धरण कामे पुर्ण करण्याचा कालावधी ९ वर्ष व कालवा / वितरण प्रणालीसह कामे पुर्ण करण्याचा कालावधी १३ वर्ष याप्रमाणे नियोजीत होता. प्रत्यक्षात धरण बांधकामास सन १९८१ मध्ये सुरुवात करण्यात आली व कालवा बांधकामास सन १९९८ मध्ये सुरुवात करण्यात आली.

प्रकल्पावर झालेला खर्चाचा तपशिल

१. सन १९८०-८१ ते १९९४-९५ - रु. ७.२२ कोटी

२. सन १९९५-९६ ते १९९९-०० - रु. ७५.११ कोटी

३. सन २०००-०१ ते २०१०-११ - रु. ७७६.६७ कोटी

४. सन २०११-१२ - रु. २६८.३३ कोटी

एकूण - रु. ११२७.३३ कोटी

अ) मुळ प्र.मा. ते प्रथम सुप्रमा - वाढ रु.३९६.४४ कोटी

- निव्वळ दरसुची फरकामुळे - रू.२०६.०० कोटी (दरसुची १९७९-८० ते १९९७-९८)
- भुसंपादन किंमतीतील वाढ- रू.५१.१६ कोटी (सरासरी दर प्र.मा.ते सु.प्र.मा. रु.३७५८ ते रू.३०१५५ प्रति हेक्टरी)
- संकल्पचित्रातील बदलामुळे - रू.१९.२४ कोटी (रोधीचराची खोलीतील वाढ सुधारीत मातीधरण काटछेद, सुधारीत स्पीलवे संकल्पन, आयसीपीओ सुधारीत संकल्पन)
- कामातील व्याप्तीतील बदलामुळे - रू.४२.८५ कोटी (भुविकास भाग-१ कामाचा अंतर्भात व ऊ-ड्डदध्द्धदृदश्ड्डदद्य नव्याने तरतुद)
- इतर कारणामुळे वाढ - रू.५०.५० कोटी (कालव्यावरील बांधकामात झालेली वाढ ९१, (११३- २२ = ९१)
- बचत - रू.५.३० कोटी (टी. अँड पी. वरील खर्चाची बचत)
- अनुषंगिक खर्चामुळे वाढ - रु. ३१.९९

ब) प्रथम सुप्रमा ते द्वितीय सुप्रमा - वाढ रु. ५०६.१८ कोटी

- निव्वळ दरसुची - रू.२८९.८७ कोटी (सन १९९७-९८ ते २००५-०६)
- भुसंपादन किंमतीतील वाढ- रू.२३.८९ कोटी (सन २००५-०६)
- संकल्पचित्रातील बदलामुळे - रू.३३.४० कोटी (रोधीचर मातीधरण काटछेद, स्पीलवे, आयसीपीओ चे सुधारीत संकल्पनामुळे)
- इतर कारणामुळे - रू.१२५.१२ कोटी (पुर्वी २६ गावांचे पुनर्वसन आता २९ गावांचे पुनर्वसन ३ गावांचे पुनर्वसन वाढल्यामुळे ६७.२८ कोटी व कालव्यावरील बांधकामात वाढ (३०६- ११३) = १९३ बांधकामे वाढली रू.५७.८४ कोटी)
- अनुषंगिक खर्चामुळे वाढ - रू.३३.९१ कोटी

क) द्वितीय सुप्रमा ते तृतीय सुप्रमा - वाढ रु. १४०५.८७ कोटी

- निव्वळ दरसुची फरकामुळे - रू.३२५.६८ कोटी
- भुसंपादन किंमतीतील वाढ - रू.८०.२८ कोटी (उर्वरीत क्षेत्राच्या भुसंपादनासाठी प्रति हेक्टरी दर रू.१०,१०००/-)
- संकल्पचित्रातील बदलामुळे - **रू.२२४.०८ कोटी (कालवा अस्तरीकरण)**

अस्तरीकरण मुळ प्रशासकीय मान्यतेत समाविष्ठ आहे. कालव्याची कामे कमी खर्चात करण्याचे शासन धोरणामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता व व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात मुख्य कालवा व शाखा कालव्यास अस्तरीकरणाचे काम घेण्यांत आले नाही. प्रकल्पावरील लाभ वाढविण्यासाठी अस्तरीकरण करून विज निर्मितीस पाणी देणे व आर्वी उपसा सिंचन योजनेव्दारे सिंचन क्षेत्र निर्माण करणे, मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व सार्वजनिक आरोग्य महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १.४.०८ च्या पत्रानुसार मागणी केल्यान्वये, तसेच भविष्यात कालवा सुस्थितीत ठेवण्यासाठी तसेच देखभाल दुरुस्ती खर्चात बचत व्हावी म्हणून तृतीय सुप्रमा मध्ये अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. कालव्यास अस्तरीकरण प्रस्तावित केल्यामुळे पाण्याचा वहन व्यय कमी होवून पाण्याची बचत झाली. या झालेल्या पाण्याच्या बचतीमुळे या प्रकल्पातून लॅको विज ताप केंद्र यांना पाणी देता आले त्यामुळे शासनास महसुल प्राप्त होवून, अतिरीक्त विज निर्मीती होण्यास मदत होत आहे. त्यामुळे शासनास पुनर्स्थापना खर्चापोटी रू.९५.७५ कोटीच्या महसुल प्राप्त होणार असून त्यापैकी आजतागायत रू.४७.७५ कोटी जमा झालेले आहेत. तसेच प्रत्यक्ष पाणी उचल सूरू

झालेवर शासन परिपत्रन्वये मंजूर औद्योगीक दरानुसार बिगर सिंचन पाणीपट्टीव्दारे महसुल प्राप्त होत राहील. तसेच आर्वी उपसा सिंचन योजना प्रस्तावित करता आली.

- परिमाणातील बदलामुळे वाढ -
  रू.३३.४० कोटी व्दितीय सुधारित अंदाजपत्रकात मुख्य कालवा व शाखा कालवा व वितरण प्रणाली याकरीता १२७० हे. याप्रमाणे जमिन संपादनाची तरतूद होती. तृतिय सुधारीत अंदाजपत्रकानुसार कालवा व वितरण प्रणालीकरीता २९०१ हे. जमिन संपादीत करण्याचे तरतूद आहे.
- प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे -
  रू.५५३.२० कोटी (मुळ प्रकल्प अहवालात नसलेले तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ अ शिर्ष कामांतर्गत सांडव्याच्या कामात वाढ रू.५२.८३ कोटी)
  तृतिय सुधारीत अंदाजपत्रकात नव्याने प्रस्तावित ३ बॅरेजचे बांधकाम व उपसा सिंचन योजनेचे काम अंतर्भुत आहेत.

१) वर्धा नदीवरील पुलगांव बॅरेज :-

रू.८८.७१ कोटी

मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व सार्वजनिक आरोग्य महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १४.५.२००८ च्या पत्रानुसार मागणी केल्यान्वये. तसेच वर्धा जिल्हयातील पुलगांव येथे केंद्र शासनाचे क्रं.१ चे दारुगोळा भांडार असुन, पुलगांव शहर, केंद्रीय दारुगोळा भांडार व पुलगाव परीसरातील १३ गांवाना निम्न वर्धा प्रकल्पातुन पाणी पुरवठा करण्याचे नियोजीत आहे. परंतु सदर भागाकरीता पाणी नदी पात्रा मधुन सोडावे लागते. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी धरणामधुन सोडावे लागणार आहे. पुलगांव शहराजवळ पाणी साठा करण्याची सद्यःस्थिती मध्ये कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो. वर्धा नदीवर पुलगांव जवळ बॅरेज बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. पुलगांव व खर्डा बॅरेज निम्प वर्धा प्रकल्पाचा भाग म्हणून घेण्यास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर पत्र दिनांक २०/११/२००८ अन्वये मान्यता प्राप्त आहे. पुलगांव बॅरेजची एकूण साठा क्षमता १०.८० द.ल.घ.मी. असुन, उपयुक्त साठा ९.९५ द.ल.घ.मी. एवढा आहे. उपरोक्त शहरांना व गावांना पुलगांव बॅरेज मधुन सरळ पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. भविष्यात पुलगांव शहर व गांवाना भिषण पाणी टंचाई निवारण करणे शक्य होईल.

२) वर्धा नदीवरील खर्डा बॅरेज :-

रू.९७.२० कोटी

वर्धा जिल्हयामध्ये मागील तीन वर्षापासुन पिण्याचे पाण्याची उन्हाळामध्ये भिषण टंचाई जाणवत आहे. निम्न वर्धा प्रकल्पामध्ये फक्त पुलगांव व परीसरातील गावांकरीता पाण्याचे आरक्षण करण्यात आलेले आहे. खर्डा बॅरेज वर्धा प्रकल्पाचाच भाग म्हणून घेण्यास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर पत्र दिनांक २०-११-२००८ अन्वये मान्यता प्राप्त आहे. बॅरेजची साठवण क्षमता १२.५०५ द.ल.घ.मी. या बॅरेजमधुन वर्धा नदीचे काठावरील गावांना उन्हाळामध्ये पिण्याचे पाणी देणे प्रस्तावित असुन, उपसा सिंचनाव्दारे २०७१ हेक्टर पिक क्षेत्रास पाणी देण्याचे प्रस्तावित आहे.

३) वर्धा नदीवरील आंजी-अंदोरी बॅरेज :-

रू.१०४.४५ कोटी

वर्धा जिल्हयामध्ये मागील तीन वर्षापासुन पिण्याचे पाण्याची उन्हाळामध्ये भिषण टंचाई जाणवत आहे. निम्न वर्धा प्रकल्पामध्ये फक्त पुलगांव व परीसरातील गावांकरीता पाण्याचे आरक्षण करण्यात आलेले आहे. आंजी-अंदोरी बॅरेज वर्धा प्रकल्पाचाच भाग म्हणून घेण्याचा अंतर्भाव तृतीय सु.प्र.मा प्रस्तावात करण्यांत आलेला आहे. बॅरेजची साठवण क्षमता १२.८८ द.ल.घ.मी. या बॅरेजमधुन वर्धा नदीचे काठावरील गावांना उन्हाळामध्ये पिण्याचे पाणी देणे प्रस्तावित असुन, उपसा सिंचनाव्दारे २३३६ हेक्टर पिक क्षेत्रास पाणी देण्याचे प्रस्तावित आहे.

४) उपसा सिंचन योजना :-

रू.२१० कोटी

निम्न वर्धा प्रकल्पाच्या मुख्य व शाखा कालव्यास अस्तरीकरण प्रस्तावित केल्यामुळे वहनव्ययात बचत झाली. तसेच पुलगांव येथील बॅरेजची तरतूद केल्यामुळे धरण साठयातून तरतूद असलेले पाणी पुरवठयाची मागणी पुलगांव बॅरेजच्या साठयात वर्ग झाली. त्यामुळे वरील बचतीतून उपलब्ध झालेल्या अतिरीक्त पाणी साठयातून बुडीत क्षेत्रावरील कास्तकारांच्या मागणी नुसार उपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजने पासुन धरणातून उपसा सिंचन योजनेव्दारे ८००० हे. पिक क्षेत्रात पाणी देण्याचे प्रस्तावित आहे.

तृतिय सुधारीत अंदाजपत्रकात नव्याने प्रस्तावित ३ बॅरेजचे बांधकाम व उपसा सिंचन योजनेचे काम अंतर्भुत केल्यामुळे प्रशासकिय मान्यता ते तृतिय सुधारीत मान्यता किंमतीत एकूण रु. ५५३.२० कोटी वाढ झाली.

- इतर कारणामुळे वाढ - रू.३५.९२ कोटी इतर कारणामुळे तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात रु.३५.९२ कोटी ने वाढ झाली आहे. तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात या पूर्वी अंतर्भुत नसलेल्या दोन उंच पुलांची तरतुद करण्यात आली तसेच विद्युत वजा सिंचन विमोचकाचे पाणी पुनश्च मुख्य कालव्यात सोडण्याकरीता जोड कालव्याची नव्याने तरतुद करण्यात आली त्यामुळे झालेली आहे.
- अनुषंगिक खर्च मुळे वाढ - तृतिय सुधारीत मान्यता किंमतीत अनुषंगिक खर्चामुळे एकूण रु. १५३.३० कोटी वाढ झाली.

भुसंपादन :-

धरण व पुनर्वसन कामे याकरीता आवश्यक खाजगी जमीन ६४४७ हे. ३१/०३/२०१२ पर्यत संपादीत जम न ६४२३.८२ हे. उर्वरीत २३.१८ हे. संपादन प्रगतीपथावर आहे.

कालवा व वितरण प्रणाली करीता आवश्यक खाजगी जमीन २९०१ हे. ३१/०३/२०१२ पर्यत संपादीत जम न १४१२.६७ हे. उर्वरीत १४८८.३३ हे. संपादन प्रगतीपथावर आहे.

वनजमिन संपादनाच्या प्रस्तावास केंद्र शासन पर्यावरण व वनविभाग, नवी दिल्ली यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

पुनर्वसन :-

वर्धा जिल्ह्यातील २० गावे व अमरावती जिल्ह्यातील ९ गावे अशी एकूण २९ गावे बाधीत असून २० गावाचे पुर्णपणे स्थलांतरण झाले आहे व ४ गावे अंशतः स्थलांतरीत झाले आहेत. २०१४ पर्यंत संपूर्ण गावाचे स्थलांतरण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांव-धापेवाडा उसिंयो टप्पा-२**	तालुका – तिरोडा		जिल्हा - गोंदिया	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ९८५५८	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	निरंक	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	१७.४.२००७	२००४-०५	९१७.०३	९८५५८
	सुप्रमा -१	-	-	-	-
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	अद्याप नाही. तथापि प्रकल्पाच्या प्राथमिक अहवालास केंन्द्रीय जल आयोग, नवी दिल्ली द्वारे दि. ३०/५/१२ ला तत्वतः मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.			
४	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				:- ३६९.३७
४	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)				:- २.०४
४	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)				:- ३५७.२०
४	इटीपी खर्च (रु. कोटी)				:- १०.१२
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				:- २००८
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.११७३.८० कोटी) :- प्रकल्पांतर्गत बॅरेजचे काम वर्ष २००८ मध्ये सुरु झाले				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणेः-मुळ प्र.मा. किंमतीच्या तुलनेत फक्त ४०.२७ टक्के खर्च झाला असल्यामुळे सु.प्र.मा. प्रस्ताव अद्याप तयार करण्यात आला नाही.				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७	दरसूचीतील वाढ			--	--
७	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			--	--
	सुप्रमा तरतुद रु.४.६४ कोटी - प्रमा तरतुद रु.०.५१ कोटी			--	--
७	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			--	--
८	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			--	--
	एकूण			--	--
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भुसंपादन (एकुण आवश्यक २८४.४३ हे./संपादित क्षेत्र २.९३ हे.)				१.००
	ब) पुनर्वसन - नाही				-
	क) वनजमिन संपादन - आवश्यक वनजमीन १३३.०१ हे. संपादीत जमीन १.९६ हे.				१.००
८.२	बॅरेज				९०.००
	पंपगृह				५०.००
८.३	कालवा-कि.मी. (एकुण लांबी ६५ किमी.)	झालेली लांबी- निरंक			०.००
८.४	वितरण व्यवस्था-हे. (एकुण क्षेत्र ६७५०६ हे.)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र -निरंक			०.००
८.५	पाटचा-यांची कामे-हे. (एकुण क्षेत्र ६७५०६ हे.)	पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र-निरंक			०.००

धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२

ता. तिरोडा **जि. गोंदिया**

संक्षिप्त टिप्पणी

❖ **प्रकल्पाची रुपरेषा :-**

- धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ ही योजना गोंदिया जिल्हयातील तिरोडा तालुक्यात कवलेवाडा गावाजवळ प्रस्तावित असून या योजनेअंतर्गत कवलेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीवर बॅरेज व पंपगृहाचे बांधकाम, तसेच बोदलकसा येथे पंपगृहाचे बांधकाम प्रस्तावित आहे.
- या योजनेद्वारे ११ पूर्ण झालेल्या व ५ बांधकामाधीन प्रकल्पात पाणी सोडून सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे.
- उपरोक्तपणे गोंदिया जिल्हयातील ५७,३३१ हे. व भंडारा जिल्हयातील १०,१७५ हे. अशा एकंदरीत दोन्ही जिल्हयातील **एकुण ६७,५०६ हे. सिंचन प्रस्तावित आहे.**
- या योजनेतंर्गत प्रस्तावित बॅरेजच्या साठयातून अदानी पॉवर लिमीटेड यांच्या तिरोडा येथे प्रस्तावित ३३०० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत केंद्रासाठी वार्षिक **९० दलघमी पाणी पुरवठा** करण्यास शासनाची मंजूरी प्राप्त आहे.
- **प्रशासकीय मान्यता :-** शासन निर्णय दिनांक ३०/९/१९९९ अन्वये रु. ७६२.३८ कोटी (दरसुची १९९७-९८) मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तथापि ५ वर्षात आर्थिक तरतुद उपलब्ध न झाल्याने नव्याने प्रशासकीय मान्यता रु. ९१७.०३ कोटी (दरसुची २००४-०५) दिनांक १७/४/२००७ अन्वये प्राप्त झालेली आहे.

❖ **पाण्याचा येवा व वापर :-** प्रकल्पस्थळी एकुण येवा १६१९ दलघमी. असून त्यापैकी ३२७ दलघमी.पाणी वापर नियोजित आहे

❖ **प्रकल्पाची ठळक वैशिष्टये :-** हा प्रकल्प खालीलप्रमाणे **तीन चरणात (Three Phase)** पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

- **प्रथम चरण (First Phase) (अद्यावत किंमत रु. ४८५ कोटी)**

  १) बॅरेज

  - **लांबी** - वैनगंगा नदीवर ४१३ मीटर
  - **दरवाजे** - १५ मीटर ङ्र ८.५० मीटर चे २३ दरवाजे.
  - **साठा** - ४४.०५ दलघमी.

  २) कवलेवाडा पंपगृह - कवलेवाडा येथे बॅरेजच्या उर्ध्वभागात २७७५ अश्वशक्तीच्या ६ व २८९५ अश्वशक्तीच्या २ अशा **८ पंपासाठी** आवश्यक पंपगृहाचे बांधकाम.

- **द्वितिय चरण (Second Phase) (अद्यावत किंमत रु. ६५० कोटी)**
  - **दोन उर्ध्वनलिका :-**
    - कवलेवाडा येथील पंपगृह ते **बोदलकसा वितरणकुंडापर्यंत** १८.७५ किमी. लांबीच्या २००० मीमी. व्यासाच्या **दोन रांगा.**
    - कवलेवाडा येथील पंपगृह ते **सर्रा वितरणकुंडा पर्यंत** १९.९५ किमी. लांबीच्या १६०० मिमी. व्यासाची **एक रांग.**
  - **पूरक कालवे :-**
    - बोदलकसा वितरणकुंड ते बोदलकसा, संग्रामपूर, भद्भद्या व खैरबंदा या **४ तलावात** पाणी सोडण्यासाठी पुरक कालवे.
    - सर्रा वितरणकुंड ते चोरखमारा व रिसाळा या **२ तलावात** पाणी सोडण्यासाठी पुरक कालवे.

- **तृतिय चरण (Third Phase) (अद्यावत किंमत रु. ७३७ कोटी)**

  १) पंपगृहः- बोदलकसा येथे १९७० अश्वशक्तीच्या **५ पंपासाठी** आवश्यक पंपगृहाचे बांधकाम.

२) उर्ध्वनलिका:- बोदलकसा पंपगृह ते मंगेझरी वितरणकुंडा पर्यंत ९.२४ किमी. लांबीच्या १४०० मीमी. व्यासाच्या **४ रांगा.**

३) पूरक कालवे:- मंगेझरी वितरणकुंड ते गुमडोह, पांगडी, पिंडकेपार, कटंगी, रेंगेपार, बंदरचुहा, चुलबंद, उमरझरी, कन्हाळपायली व नवेगांवबांध या **१० तलावात** पाणी सोडण्याकरीता आवश्यक पुरक कालवे.

❖ **कामाची सद्य:स्थिती :-**

- **प्रथम चरण (First Phase)**

अ) बॅरेज :- - प्रकल्पास प्राप्त प्रशासकिय मान्यतेच्या अटीनुसार प्रथमत: बॅरेजचे काम हाती घेण्यात आले आहे.

-नदीपात्रातील तसेच दोन्ही तिरावरील गाईड वॉल व डिव्हाईड वॉलचे कामे पुर्ण.
-२४ प्रस्तंभ १०० टक्के पुर्ण.
-२३ द्वारांपैकी १७ द्वारांची निर्मिती व उभारणी पुर्ण व उर्वरित १६ द्वारांची निर्मिती पुर्ण.
-पुलाच्या २३ गाळांच्या प्रिस्ट्रेस गर्डर पैकी १५ गाळयांचे प्रिस्ट्रेस गर्डर पुर्ण. व ७ गाळयांचे स्लॅबचे काम पूर्ण.

-बॅरेजचे काम माहे जुन/२०१२ पर्यंत पुर्ण करणे नियोजित असुन अद्याप पुर्ण झाले नसल्यामुळे पाणीसाठा निर्माण झालेला नाही.

ब) कवलेवाडा पंपगृह :- पंपगृहाचे काम सुरक्षित तलांका पर्यंत करण्यात आले असून जुन २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

-प्रथम चरणातील कामे जुन २०१३ पर्यंत पुर्ण करणे नियोजित आहे.

- **द्वितिय चरण (Second Phase)**

-कामास अद्याप सुरवात करण्यात आलेली नाही.

- **तृतिय चरण (Third Phase)**

-कामास अद्याप सुरवात करण्यात आलेली नाही.

❖ **आर्थिक बाबी :-**

- मंजूर प्रशासकीय मान्यता किंमत :- रु. ९१७.०३ कोटी
- मार्च २०१२ पर्यंत झालेला खर्च :- रु. ३६९.३७ कोटी.
- सन २०१२-१३ साठी प्राप्त अनुदान :- रु. ३३.७८ कोटी

❖ **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च :-**

- **वर्ष १९९५-९६ ते १९९९-२०००** :- निरंक
- **वर्ष २०००-०१ ते २०१०-११**

वर्ष	२०००-०१ ते २००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११	एकुण
बांधकाम	निरंक	०.०१	२७१६.६०	७७०७.४१	९८९१.१५	**२०३१५.१७**
आस्थापना	निरंक	--	१५८.३६	२४७.०२	२७८.१३	**६८३.५१**
एकुण :-	निरंक	०.०१	२८७४.१७	७९५४.४३	१०१६९.२८	**२०९९८.६८**

❖ **प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण :-**

मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत फक्त ४०.२७ टक्के खर्च झाला असल्यामुळे सदर खर्च प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत आहे. सु.प्र.प्रस्ताव अद्याप तयार करण्यात आलेला नाही.

१	**प्रकल्पाचे नांव :- पेंच पाटबंधारे प्रकल्प** तालुका : **पारशिवनी** जिल्हा : **नागपूर**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area) : १०७७३५	निर्मित सिंचन क्षमता : (हेक्टर) जून-२०१२ :	१०४७१५	प्रत्यक्ष झालेले : सिंचन (हेक्टर)	९१९४९
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२१.०८.१९७१	१९६८-६९	२६.२२	६०९०६
	सुप्रमा-१	२९.१.२००२	१९९२-९३	३००.७४	१०४४७६
	सुप्रमा-२	१४.८.२००९	२००८-०९	९३९.२२	१०७७३५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	भारत सरकार योजना आयोग पत्र क्र. II-2(109)/77-I&CAD Dt. ३/१०/१९७७ किंमत रु. ४०.६९ कोटी.			
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			: **रु.**	**२९३.०२**
४.२	भु-संपादन , पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			: **रु.**	७.४७
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			: **रु.**	२५९.०५
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			: **रु.**	२६.५०
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:	**१९७१.७२**
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (प्रचलित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२६.२२ कोटी)	: **१९६८**	(म.रा.वि.मं. यांचे कडून प्राप्त ठेव निधितून १९६८ साली प्रकल्पाची प्राथमिक कामे सुरु झाली)		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			**रक्कम (कोटी)**	**टक्केवारी**
७.१	दरसुचीतील वाढ			२४६	२७
७.२	भुसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (सु.प्र.मा.तरतूद १९१.४१ - प्र.मा.तरतूद ०.५८ = १९०.८३ समजा : १९१)			१९१	२१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			३५४	३९
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१४	१
७.५	इतर कारणे (०) + ई.टी.पी. (१०८.००)			१०८	१२
			एकूण वाढ :	**९१३**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		**एकूण**	**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन (हेक्टर मध्ये)		१४७४९.१४	१४६२२	९९
८.२	धरण (पाणीसाठा १२७१ दलघमी)		घटक	पूर्ण	१००
८.३	कालवा (कि.मी.)		२९८	२६६	८९
८.४	वितरण व्यवस्था (C.C.A.) (हेक्टर)		१३१४१३	१२६९१३	९७
८.५	पाटचाऱ्यांची कामे (C.C.A.) (हेक्टर)		१३१४१३	१२६९१३	९७

प्रकल्प किंमतीमधील वाढीची कारणे :

७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे :**	
७.३	**प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)**	• मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालाचे तुलनेत, पेंच उजवा कालवा, कांद्री शाखा, खिंडशी पुरक कालवा, पेंच उच्च पातळी कालवा नव्याने अंतर्भूत करणेत आला. सिंचन क्षमतेत ४६८२९ हेक्टरची वाढ झाली. तसेच खिंडशी पुरक कालव्यामुळे खिंडशी जलाशयाच्या साठयात वाढ होऊन संपूर्णपेंच प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेच्या विश्वासार्हतेत भर पडणार आहे. • विद्युत गृह स्थापित क्षमतेत १४० मे.वॅट वरुन १६० मे.वॅट पर्यंत वाढ झाली. (महाराष्ट्राचा वाटा ३३ टक्के) • नागपूर शहराकरिता अतिरीक्त पाण्याची मागणी पूर्ण करण्याकरिता वहन व्यय कमी करुन, तूट भरुन काढण्याकरिता कालवा अस्तरीकरण करण्याची तरतूद करण्यात आली. • लाभक्षेत्र विकास कामासाठी तरतूद करण्यात आली.
७.४	**सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ**	विविध बांधकामाच्या संकल्पनात झालेल्या बदलामुळे रु. १४.०० कोटी ने वाढ झालेली आहे.
७.५	**इतर कारणे (स्पष्ट करावीत)**	सदर १०८ कोटीची वाढ आस्थापना (ई.टी.पी) खर्चातील आहे.

पेंच पाटबंधारे प्रकल्प

तालुका : पारशिवनी **जिल्हा : नागपूर**

१.० प्रकल्पाची संक्षिप्त टिप्पणी व व्याप्ती वाढी बाबतचा तपशील :

१.१ गोदावरी खोऱ्यातील प्राणहिता उपखोऱ्यातील पेंच प्रकल्पास सन १९६८-६९ चे दरसुचीचे आधारे रु.२६.२२ कोटीस दिनांक २१-०८-१९७१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

- या प्रकल्प अहवालात नवेगांव खैरी धरण, डावा कालवा व नागपूर महानगर पालिका तसेच कोराडी औष्णिक विद्युत केंद्रास पाणी पुरवठा करणेसाठी बेबी कालव्याची तरतूद होती.
- प्रकल्पीय सिंचन क्षमता ६०९०६ हेक्टर इतकी होती. नवेगांव धरण १९७७ मध्ये पूर्ण करण्यात आले.

१.२ यानंतर १९९२-९३ चे दरसुचीवर आधारित रु.३००.७५ कोटीचे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक २९-०१-२००२ रोजी देण्यात आली. या प्रस्तावामध्ये खालील तरतूदी नव्याने करण्यात आल्या.

- बेबी कालव्या ऐवजी पेंच उजवा कालवा.
- पेंच कांद्री शाखा कालवा.
- पेंच जलविद्युत प्रकल्पासाठी (तोतलाडोह भाग) रु.६०.६५ कोटीची तरतूद (५२.८० कोटी विद्युत केंद्रापोटी)
- भू-विकासाची कामे रु.४२.८३ कोटी.
- प्रथम सुधारित प्रकल्प अहवालानुसार सिंचन क्षमता ६०९०६ हेक्टर वरुन १,०४,४७६ हेक्टर झाली.

१.३ यानंतर सन २००८-०९ चे दरसुचीवर आधारित रु.९३९.२२ कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालास दिनांक १४-०८-२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्प अहवालात खालील घटकांसाठी नव्याने तरतूद करण्यात आली.

- खिंडशी पुरक कालवा, खिंडशी उच्च पातळी विमोचक, खिंडशी उच्च पातळी कालवा (किंमत रु.२०५.५१ कोटी)

पेंच प्रकल्पात १०९१ दलघमी उपयुक्त जलसाठा असणारे मध्यप्रदेश सिमेवरील तोतलाडोह धरण व खालील बाजूस १८० दलघमी क्षमतेच्या पेंच कामठी खैरी धरणाचा समावेश आहे. तोतलाडोह धरणातील पाणी १६० मे.वॅट स्थापित क्षमतेच्या जलविद्युत केंद्रातून विद्युत निर्मिती करुन खाली सोडण्यात येते, ते कामठी खैरी येथील धरणात साठवून कालव्याद्वारे नागपूर व भंडारा जिल्हयातील १,०४,४७६ हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी, नागपूर महानगरपालिकेस पिण्याच्या पाण्यासाठी तसेच कोराडी व खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रासाठी वापरण्यात येते. जलविद्युत केंद्राचा पाणीवापर व उपरोक्त प्रयोजनार्थ पाण्याचा वापर यामध्ये बरेचदा ताळमेळ जुळत नाही व पाणी सांडव्यावरुन वाहून जाते. तसेच पावसाळयातही कामठी खैरी धरणाच्या सांडव्यावरुन पाणी वाहून जाते. सन १९८८ ते २००५ मधील १७ वर्षाच्या अभ्यासाअंती कामठी खैरी जलाशयातून ७५ टक्के विश्वासार्ह, ६५ दलघमी पाणी सांडव्यावरुन वाहून जाते असे निदर्शनास आले.

या तुलनेत रामटेक तालुक्यातील ब्रिटीश कालीन बांधलेल्या १०५ दलघमी क्षमतेच्या खिंडशी जलाशयात केवळ ३० टक्केच पाणीसाठा होतो.

त्यामुळे पावसाळयातील अतिरिक्त येवा खिंडशी धरणात साठवून त्याचा वापर पेंच डाव्या कालव्याखालील लाभक्षेत्रास सिंचनासाठी करणे व कामठी खैरी धरणात अतिरिक्त राहणाऱ्या पाण्याचा वापर नागपूर महानगरपालिका तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या वाढीव मागणीसाठी करता यावा या संकल्पनेतून सदर खिंडशी जोड कालव्याची तरतूद करण्यात आली.

सदर खिंडशी पूरक कालव्याची तरतूद ब्रिटीश काळातील "मि.टिकेल" यांचे अहवालातील होती.

सारांशाने प्राणहिता उपखोऱ्यातील उपलब्ध जलसंपत्तीचा इष्टत्तम वापर करता यावा यासाठी खिंडशी पुरक कालव्याची तरतूद करण्यात आली.

तसेच खिंडशी धरणाचे सॅडल डॅम मधून उच्चपातळी विमोचक व १३.८ कि.मी. लांबीचा अतिरिक्त कालवा काढून पेंच प्रकल्पाच्या कांद्री शाखा कालव्याच्या वरील बाजूचे अतिरिक्त २४९३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची तरतूद करणेत आली.

- तसेच पेंच उच्च पातळी कालवा काढून पारशिवनी तालुक्यातील अतिरिक्त ७६६ हेक्टर क्षेत्रास सिंचन सुविधा देण्याचीही तरतूद करण्यात आली. **याबाबत श्री.सुनिल केदार, विधानसभा सदस्य, सावनेर यांची मागणी होती.**(किंमत रु.१६.७८ कोटी) यामुळे प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता १,०७,७३५ हेक्टर होणार आहे.
- नागपूर महानगर पालिकेची पाण्याची मागणी ११२ दलघमी वरुन १९० दलघमी झाल्याने वहन व्यय कमी करणे अपरिहार्य ठरल्याने पेंच मुख्य डावा व उजवा कालवा, त्यांचे उपकालवे व वितरिका यांचे अस्तरीकरण करण्याची तरतूद करण्यात आली. तसेच काही कालव्यांवर अतिरिक्त बांधकामाची तरतूद अंतर्भूत करण्यात आली.

२.० प्रकल्पापासून मिळणारे फायदे :

पेंच प्रकल्प हा नागपूर जिल्ह्यासाठी सर्व अर्थाने वरदाई ठरला आहे.

- सद्या नागपूर जिल्ह्यातील ८३०७६ हेक्टर व भंडारा जिल्ह्यातील २१४०० हेक्टर असे मिळून एकूण १०४४७६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. प्रकल्पातून १९७६-७७ पासून प्रत्यक्ष सिंचन होत आहे. सन २०११-१२ मधील प्रत्यक्ष सिंचन ९१९४९ हेक्टर म्हणजेच ८८ टक्के आहे. खिंडशी उच्च पातळी कालवा व पेंच उच्च पातळी कालव्याची कामे झाल्यानंतर यात आणखी ३२५९ हेक्टरची भर पडणार आहे.
- सन १९८६-८७ पासून तोतलाडोह जलविद्युत केंद्रातून १६० मे.वॅट विद्युत निर्मिती होत आहे. यापैकी ३३ टक्के म्हणजे ५३.३३ मे.वॅट वीज महाराष्ट्रास मिळते.
- याच प्रमाणे नवेगांव खैरी धरण पायथ्यास १.४ मे.वॅट चे जलविद्युत केंद्रातूनही विद्युत निर्मिती होत आहे.
- प्रकल्प अहवालानुसार नागपूर महानगर पालिकेस दरवर्षी ११२ दलघमी पाणी देणे अभिप्रेत असतांनाही सद्या १९० दलघमी पाणी दिले जाते. याचा लाभ नागपूरच्या २८ लाख लोकसंख्येस तसेच लहान मोठ्या उद्योगास होतो.
- कोराडी ऑष्णिक विद्युत निर्मिती केंद्रास वार्षिक ४५ दलघमी पाणी पुरवठा केला जातो. या विद्युत केंद्रातून १०४० मे. वॅट विद्युत निर्मिती केली जाते.
- त्याच प्रमाणे खापरखेडा ऑष्णिक विद्युत निर्मिती केंद्रास वार्षिक २२ दलघमी पाणी पुरवठा केला जातो. या विद्युत केंद्रातून ८४० मे. वॅट विद्युत निर्मिती शक्य होत आहे.
- नागपूर परिसरातील कळमेश्वर ब्राम्हणी, नगरधन, पारशिवनी या तीन ग्रामिण पाणी पुरवठा योजनेस वार्षिक ३.६२ दलघमी. पाणी पुरवठा करण्यात येतो.
- भंडारा जिल्ह्यातील केंद्रशासनाच्या ऑर्डीनन्स फॅक्टरीस वार्षिक २ दलघमी पाणी पुरवठा करण्यात येतो.
- तसेच भंडारा जिल्ह्यातील सन फ्लॅग कंपनीस वार्षिक २ दलघमी पाणी दिले जाते. या कारखान्यातून वार्षिक २ लक्ष मे.टन पोलाद निर्मिती होते.
- जलाशयामुळे पेंच व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव संवर्धनास लाभ होतो.
- तसेच जलाशयाचे अनुषंगाने पर्यटन विकासही झालेला आहे.

३.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

मुळ व प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालाचे व्याप्ती नुसार प्रकल्पाची कामे पुर्ण झालेली आहेत. सन १९८९ पासून विद्युत निर्मिती व सन १९७७ पासून सिंचन सुरु आहे. वाढीव घटकांचे कामे प्रगतीपथावर आहेत. द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.९३९.२२ कोटी असली तरीही माहे जुलै २०१२ पर्यंतचा खर्च रु.२९३.०२ कोटी इतकाच आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांवः- निम्न वणा प्रकल्प**	तालुका :	**उमरेड**	जिल्हा :	**नागपूर**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area) : २५५४५	निर्मित सिंचन क्षमता : (हेक्टर) जून-२०१२ :	२५५४५	प्रत्यक्ष झालेले : सिंचन (हेक्टर) :	११२५५
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०६/०७/१९७९	१९७७-७८	२४.८३	२५५४५
	सुप्रमा-१	१५/१०/२००३	१९९५-९६	२५५.३९	२५५४५
	सुप्रमा-२	१२/०२/२००८	२००३-०४	३२४.५६	२५५४५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	१२/१९८९	१९८८-८९	८७-५५	२५५४५
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			:	**रु. ३१५.१८**
४.२	भु-संपादन , पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			:	**रु.** ७५.०४
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			:	**रु.** २०९.५५
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			:	**रु.** ३०.५९
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:	**१९८०-८१**
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (प्रचलित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२४.८३ कोटी)			:	**सन १९८०-८१**
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			**रक्कम (कोटी)**	**टक्केवारी**
७.१	दरसुचीतील वाढ			१४४.७७	४८
७.२	भुसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (सु.प्र.मा.तरतूद ८१.९६ - प्र.मा.तरतूद ६.९२)			७५.०४	२५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			५२.६०	१८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			४.२४	१
७.५	इतर कारणे (०) + ई.टी.पी. (२३.०८)			२३.०८	८
			एकूण वाढ :	**२९९.७३**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		**एकूण**	**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन (हेक्टर मध्ये)		५८९८	५८३८	९९
८.२	धरण (वडगांव व नांद) (पाणीसाठा १३६ + ५३.१८ = १८९.१८ दलघमी)		२ घटक	पूर्ण	१००
८.३	कालवा (कि.मी.)		८१.८८	८१.८८	१००
८.४	वितरण व्यवस्था (C.C.A.) (हेक्टर)		२१५९४	२१५९४	१००
८.५	पाटचायांची कामे (C.C.A.) (हेक्टर)		२१५९४	२१५९४	१००

प्रकल्प किंमतीमधील वाढीची कारणे :

७.३ तपशीलवार सर्वेक्षण व संकल्पनानुसार झालेल्या बदलांचा तपशील :

प्रकल्प खर्चात झालेली वाढ ही प्रामुख्याने सविस्तर सर्वेक्षणाअंती केलेल्या सविस्तर संकल्पनामुळे कामाचे व्याप्तीत झालेल्या वाढीमुळे आहे. याचा थोडक्यात तपशील पुढील प्रमाणे आहे.

नांद धरण :

- संकल्पिय पुरामध्ये २४४० घ.मी./सें. पासुन ५२४८ घ.मी./सें. अशी वाढ झाली. परिणामी मुळ प्रकल्प अहवालाचे तुलनेत धरणाची उंची ०.७५ मीटरने वाढली. त्यामुळे मातीकामाचे परिमाणात वाढ झाली.
- पिक रचनेत बदल झाल्याने वेणा डाव्या कालव्याची क्षमता १२.३२६ घ.मी./सें. पासून १४.६३ घ.मी./सें पर्यंत वाढ झाली. त्याचप्रमाणे नांद कालव्याची क्षमता ९.४४५ घ.मी./सें. पासून ११.४१ घ.मी./सें. पर्यंत वाढली.
- भू-स्तर फरकामुळे रोधीचर परिमाणात वाढ झाली.

वडगांव धरण :

- केंद्रीय जल आयोगाचे सुचनेनुसार प्रकल्पीय पूर ८००० घ.मी./सें. ऐवजी १०८८७ घ.मी./सें. पूर विचारात घेऊन सांडवा संकल्पन करणेचा निर्णय झाला त्यामुळे अशी वाढ करण्यात आली. त्यामुळे सांडव्यावरील दरवाज्यांचे १६ वरुन २१ वर गेली. त्यामुळे सांडव्याचे लांबी वाढ झाली. त्यामुळे आगमन कालवा व पुच्छ कालव्याचे रुंदीत वाढ झाली व इ.डी.ए. ची लांबी ही ४५ मी. वरुन ५८ मी. झाली.
- सविस्तर संकल्पनात कवच भरावाखाली १ मी. जाडीचा वाळूचा थर नव्याने प्रस्तावित झाला.
- गाभा भरावाच्या खालच्या बाजूचा उतार १ : १ ऐवजी १.५ : १ करण्यात आला.
- भविष्यात धरण पायथा, जलविद्युत गृह विकसित करणे शक्य होणेसाठी सिंचन विमोचका ऐवजी विद्युत तथा सिंचन विमोचकाची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आली.
- सुधारित प्रकल्प अहवालात सांडव्यावर गोलीयेथ क्रेनची तरतुद नव्याने करण्यात आली.

निम्न वणा प्रकल्प

तालुका : उमरेड **जिल्हा : नागपूर**

१.० प्रकल्पाची व्याप्ती व सर्वसाधारण माहिती :

निम्न वणा प्रकल्पात १३६.०० दलघमी क्षमतेच्या वडगांव व ५३.१८ द.ल.घ.मी. क्षमतेच्या नांद धरणाचा धरणाचा समावेश आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता २५५४५ हेक्टर आहे.

प्रकल्पासन सन १९७७-७८ चे दरसुचीवर आधारित रु.२४.८३ कोटी किंमतीस दिनांक ०६-०२-१९७९ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रकल्प कामास सन १९८० मध्ये सुरुवात झाली. नांद व वडगांव धरणात अनुक्रमे सन १९९० व १९९७ मध्ये पाणी साठा निर्माण झाला. सद्यःस्थितीत २५५४५ हेक्टर ही संपूर्ण प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. मात्र भू-विकासाची कामे १७४७५ हेक्टर क्षेत्रावर झालेली आहेत. सन २०११-१२ मध्ये ११२५५ हेक्टर क्षेत्रास प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देण्यात आला..

वाढत्या शहरीकरणामुळे सदर प्रकल्पाच्या १८९.१८ दलघमी प्रकल्पीय पाणी साठयापैकी ९५.०८ दलघमी पाणी बिगर सिंचन वापरासाठी वळवणे क्रमप्राप्त ठरले. त्यामुळे प्रत्यक्ष सिंचन कमी होत आहे.

२.० प्रकल्पापासून मिळणारे फायदे :

सन २००५-०६ पासून सिंचन सुरु झाले आहे. सन २०११-१२ मधील प्रत्यक्ष सिंचन ११२५५ हेक्टर आहे. या व्यतिरिक्त ९५.०८ दलघमी बिगर सिंचन पाणी पुरवठा होत आहे त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेचे नांव	मंजूर पाणी आरक्षण (दलघमी)	
		औद्योगिक	पिण्यासाठी
१	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बुटीबोरी वसाहत	१९.१८०	-
२	हिंगणघाट गावाकरीता पाणी पुरवठा	-	१०.५२०
३	डिफेन्स रिसर्च आर्गनाझेशन साठी पाणीपुरवठा	-	०.१८०
४	सिंधी गावासाठी पाणी पुरवठा	-	१.२७०
५	केसलापूर पाणी पुरवठा योजना	-	०.०२२
६	पिंपरी सिर्सी पाणी पुरवठा योजना	-	०.११०
७	रुची सोया. इंडस्ट्रिज, बुटीबोरी	०.१८२	-
८	कार्गोहब विमानतळ [MIHAN]	२६.१६०	-
९	पूर्ती साखर कारखाना लि. बेला (अंतर्गत विज प्रकल्पाकरिता पाणी आरक्षण)	१.३१०	-
१०	आयडीयल एनर्जी प्रोजेक्ट	१७.८००	-
११	अपर्णा इन्फ्रा एनर्जी लि. कवठाळा	६.०००	-
१२	विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि., नागपूर	१२.३५	-
	एकूण :	**८२.९८२**	**१२.१०२**
		९५.०८	

१	**प्रकल्पाचे नांव : हूमन प्रकल्प**	तालुकाः**-सिंदेवाही**		जिल्हा **चंद्रपूर**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area) : ४६११७	निर्मित सिंचन क्षमता : (हेक्टर) जून-२०१२ :	निरंक	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हेक्टर) :	निरंक
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१/०३/१९८३	१९७८-७९	३३.६८	३४४१६
	सुप्रमा-१	२४/०६/२००९	२००८-०९	१०१६.४९	४६११७
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			: **रु.**	**२०६.८६**
४.२	भु-संपादन , पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			: **रु.**	१८८.५४
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			: **रु.**	११.०९
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			: **रु.**	७.२३
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:	**वर्ष १९८२-८३**
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (प्रचलित प्रशासकीय मान्यता किंमत रु.३३.६८ कोटी)	: **सन १९८२-८३ मध्ये कामास सुरुवात होऊन सन १९८४-८५ मध्ये वनकायद्यामुळे काम बंद झाले.**			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			**रक्कम (कोटी)**	**टक्केवारी**
७.१	दरसुचीतील वाढ			५२७.९९	५४
७.२	भुसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (एन.पी.व्ही. भरण्यास राज्य मंत्रीमंडळाने परवानगी दिली) (सु.प्र.मा. तरतूद ३०९.१७ कोटी – प्र.मा. तरतूद ८.२९ कोटी)			३००.८८	३१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			९१.०२	९
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१४.५०	१
७.५	इतर कारणे (३७.६५) + ई.टी.पी. (१०.७८)			४८.४३	५
			एकूण वाढ :	**९८२.८२**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		**एकूण**	**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन (हेक्टर मध्ये)		७६५१.४०	२५.००	०.३०
८.२	धरण		घटक	०	०
८.३	कालवा (कि.मी.)		१३४.८०	०	०
८.४	वितरण व्यवस्था (C.C.A.) (हेक्टर)		४२२७७	०	०
८.५	पाटचायांची कामे (C.C.A.) (हेक्टर)		४२२७७	०	०

प्रकल्प किंमतीमधील वाढीची कारणे :

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : रु.९१.०२

(१) प्रकल्प व्याप्तील बदलामुळे एकूण ९१.०२ कोटी रुपयाची वाढ झालेली आहे. मुळ प्रकल्प अहवालात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे औष्णिक उर्जा निर्मीती केंद्रासाठी १३२ दलघमी पाण्याची तरतूद होती. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने त्यांची मागणी रद्द केली. त्यामुळे प्रकल्पीय सिंचन क्षमतेत वाढ करुन ती ४६११७ हेक्टर करण्यात आली. त्यासाठी कालवे व वितरण प्रणालीचे लांबीत वाढ झाली. उजव्या मुख्य कालव्याची लांबी २७.८० कि.मी. वरुन ८४.१० कि.मी. पर्यंत वाढली.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ : रु.१४.५०

(२) मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावात उपशिर्ष सिं व डी मधील कामाचे अंदाजपत्रक पाटबंधारे अन्वेषण मंडळाचे संकल्पचित्रानुसार व सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या संकल्पचित्रानुसार तयार करण्यात आले असल्यामुळे रु.१४.५० कोटीची वाढ झालेली आहे.

७.५ इतर कारणे : रु.४८.४३

(१) यामध्ये केंद्रीय जल आयोगाचे निकषानुसार पर्यावरण बाबीसाठी (X-Environment & Ecology) या लेखा शिर्षाखाली अंदाजपत्रकात नव्याने केलेल्या तरतुदीमुळे ३७.६५ कोटी रुपयाची वाढ झालेली आहे. तसेच प्रकल्पाचे कालावधीत वाढ झाल्यामुळे अनुषंगीक खर्चात १०.७८ कोटी रुपयाची वाढ झालेली आहे.

हुमन प्रकल्प

तालुका : सिंदेवाही **जिल्हा : चंद्रपूर**

चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यात सिरकाडा या गावाजवळ हुमन नदीवर प्रस्तावित हा एक मोठा प्रकल्प आहे.

सदर प्रकल्पास वर्ष १९८२-८३ च्या दरसूचीवर आधारित रु.३३.६८ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता शासनाचे परिपत्रक क्र.PIM-1080/1043/2023/WRI-2/ मुंबई दिनांक ३१/०३/१९८३ नुसार प्राप्त आहे.

सदर प्रकल्पास प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता महामंडळाचा निर्णय क्रमांक विपाविम/कातां.२/ ५४९/प्रमा/(८/२००९)/२००९, दिनांक २४/०६/२००९ अन्वये वर्ष २००८-०९ च्या दरसूचीनुसार रु.१०१६.४९ कोटीस प्राप्त आहे. प्रकल्पावर ०३/२०१२ अखेर रु.२०६.८६ कोटी खर्च झाला आहे.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(१)	उपधरण स्थळाला जाण्यासाठी पोचमार्ग व त्यावरील पुरकेपार, नवरगांव व सिंदेवाही येथील स्थायी/ अस्थायी स्वरुपाच्या इमारती, विभागीय व उपविभागीय कार्यालयासाठी इमारती, इत्यादि	.	रु. १८.४६ कोटी
(२)	वनजमीन हस्तांतरणासाठी वन विभागास अदा केलेली केलेली रक्कम (एन.पी.व्ही., पर्यायी वनीकरण इ.)	..	रु.१८८.४० कोटी
	एकूण	**..**	**रु.२०६.८६ कोटी**

प्रकल्पाच्या प्राथमिक कामास वर्ष १९८२-८३ पासून सुरुवात करण्यात आली, या प्रकल्पास वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या कायदया अंतर्गत वन प्रस्तावास केंद्र शासनची मान्यता नसल्यामुळे १९८४-८५ पासून प्रकल्पाची कामे स्थगित करण्यात आली.

सदर प्रकल्पाचे सुधारित वन प्रस्तावास (पुर्ण संचय पातळी - १.०० मी.) १९२५.५५ हेक्टर वन क्षेत्र वळती करण्यास केंद्र शासनाकडून पत्र दिनांक ०३/०२/२००४ अन्वये काही अटीचे अधिन राहून तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने तत्वतः मंजूरी प्रदान केल्याचे निर्णया विरुध्द संचालक, बॉम्बे निसर्ग इतिहास संस्था, मुंबई यांनी सर्वोच्च न्यायालयाकडून स्थापित केंद्रीय उच्चाधिकारी समिती, नवी दिल्ली यांचेकडे दिनांक १८/०६/२००४ रोजी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाची दिनांक २१/११/२००८ रोजी अंतिम सुनावणी होऊन प्रकल्पाचे काम सुरु होणेसाठी वनासंबंधी एन.पी.व्ही., पर्यायी वनीकरण इत्यादिची रक्कम (रु.१८८.४० कोटी) एकमुस्त भरण्याचे अटीवर मा.सर्वोच्च न्यायालयानी पर्यावरण व वन मंत्रालय निर्देशलयास, निर्देश दिले आहे.

सदर प्रकल्पाचा एन.पी.व्ही., पर्यायी वनीकरण व इतर बाबींसाठी एकूण रु.१८८.४० कोटी भरावयाचे होते, यापैकी १२.४९ कोटी सन २००४ मध्ये व ४.०३ कोटी सन १९९६ मध्ये भरले होते. उर्वरित रक्कम एक रक्कमी भरण्याचा निर्णय राज्य मंत्री मंडळाने घेतला. त्यानुसार शासनाने दिनांक ०१.०२.२०११ रोजी ज्ञापनाद्वारे (ज्ञापन क्र.बीजीएम १०.१०/(२५७/२०१०)/अर्थ-१) रु.१७०.४९ कोटी इतकी रक्कम महामंडळास शासनाचे भाग भांडवली अंशदान म्हणून सुपूर्द केली. जलसंपदा विभागाने सदर रक्कम वन विभागाकडे दिनंक ०७/०३/२०११ ला भरुन वनजमीन प्रकरणी केंद्र शासनाचे अंतिम मंजूरीस्तव तत्वतः मान्यता अटीचे अनुपालन दिनांक २८/०३/२०११ अन्वये उपवनसंरक्षक, चंद्रपूर, वन विभाग, चंद्रपूर यांना सादर करण्यात आले.

मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे दिनांक ०१/०३/२०११ च्या पत्रानुसार पर्यायी वनीकरणाचे दरपत्रकानुसार पर्यायी वनीकरणाच्या फरकाची रक्कम रु.६७.८८ कोटी व पाणलोट क्षेत्र विकासाची सुधारित दरानुसार येणारी फरकाची रक्कम रु.३.५० कोटी अशी एकूण रु.७१.३८ कोटीचा अतिरिक्त भरणा करण्यास्तव कळविले आहे.

वरीलप्रमाणे फरकाची रक्कम अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर व वनजमीन हस्तांतरणापूर्वी भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र दिनांक ०५/१०/२०११ अन्वये उपवनसंरक्षक यांना सादर करण्यात आले असून सद्यःस्थितीत मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर कडून सदर अहवाल दिनांक २३/१२/२०११ अन्वये अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करण्यात आलेला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : ऊर्ध्व वर्धा प्रकल्प**		**तालुका मोर्शी**		**जिल्हा अमरावती**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	७५०८० हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ -- ७५०८० हेक्टर		प्रत्यक्ष झालेले सिंचन ३६११९ हेक्टर (सन २००७-०८)
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची (सन)	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१३.०२.१९६५	१९६३-६४	१३.०५	४५०००
	सु.प्र.मा.-१	१९.१२.१९९५	१९८७-८८	३०२.७८	८०२५०
	सु.प्र.मा.-२	३१.०७.१९९९	१९९५-९६	६६१.८६	८०२५०
	सु.प्र.मा.-३	२९.०३.२००६	२००३-०४	९५१.३३	८०२५०
	सु.प्र.मा.-४	१३.०७.२००९	२००८-०९	१३७६.६४	७५०८०
४	केन्द्र शासनानी अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (र.कोटी)	भारत सरकार नियोजन विभाग पत्र क्र. 11-15(1)(14)/76-1 & CAD दिनांक ०६/०५/१९७६ किंमत रू. ३९.८८ कोटी			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)				११०६.१२ कोटी
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)				७८.०१ कोटी
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)				८२६.६९ कोटी
४.४	इ.टी.पी. खर्च (रू.कोटी)				२०१.४३ कोटी
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९७६
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष (अंदाजित किंमत)				
७	मूळ प्रशसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			४६९.१९	३४.४१
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	चतुर्थ सु.प्र.मा. ९२.६३ मूळ प्र. मा. २.१३		९०.५०	६.६४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			२९२.६६	२१.४६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			६७.५७	७.९६
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१६०.४१	११.७६
	इ.टी.पी. मधील वाढ			२८३.२६	२०.७७
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**				
८.१	भूसंपादन				९९.९३ टक्के
	पुनर्वसन				१०० टक्के
	वनजमीन संपादन				१०० टक्के पूर्ण संपादित
८.२	धरण (टक्केवारी)				१०० टक्के काम पूर्ण
८.३	कालवा ऊजवा कालवा ९५.५० कि.मी. डावा कालवा ४२.४० कि.मी.		झालेली लांबी ९५.५० कि.मी. झालेली लांबी ४२.४० कि.मी.		१०० टक्के पूर्ण १०० टक्के पूर्ण
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ७०१६९ हेक्टर)		झालेले क्षेत्र ७०१६९ हेक्टर		१०० टक्के पूर्ण
८.५	पाटचा-यांची कामे (एकूण क्षेत्र ६९९५२ हेक्टर)		झालेले क्षेत्र ६६००० हेक्टर		९४.३५ टक्के
८.६	पाणीसाठा (संकल्पीत ६७८.२७ द.ल.घ.मी.)		निर्मितसाठा ६७८.२७ दलघमी		१०० टक्के पूर्ण

प्रकल्प किंमतीच्या वाढी बाबतची कारणे:-

७.३ प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

१) **ठाणाठुणी ऐवजी सिंभोरा** येथील धरण स्थळातील बदलल्यामुळे धरणाच्या भिंतीच्या लांबी मध्ये २३७९ मी. वरुन ५९२० मी. इतकी वाढ झाली तसेच सांडव्याच्या रेडीयल गेट मध्ये (संख्या व आकार) सुद्या बदल झाला, तसेच वर्धा जिल्हयातील सिंचना करिता ४२.४० कि.मी.लांबीचा डावा कालवा नव्याने प्रस्तावीत केल्यामुळे प्रकल्पाच्या किमती मध्ये अंदाजे रु.४४.५० कोटीनी वाढ झाली.

मुळ अंदाजपत्रकामध्ये ठाणाठुणी येथील प्रकल्पाची सिंचन क्षमता ४५००० हेक्टर होती, धरणाच्या स्थळातील बदलामुळे धरणसाठ्या मध्ये वाढ झाली तसेच डावा कालवा नव्याने प्रस्तावीत केल्यामुळे व मुळ प्रकल्प अहवालातील पिकरचने मध्ये बदल करुन त्यामध्ये खरीप पिकांचा समावेश केल्यामुळे सिंचनक्षेत्रामध्ये वाढ होऊन सिंचन क्षमता ८०२५० हेक्टर इतकी झाली, तद्नंतर प्रत्यक्ष कामाच्या वेळेस तसेच कालव्याच्या संरेखा संकल्पनानुसार प्रत्यक्ष ओलीता खाली येणारे क्षेत्र, लाभक्षेत्रातील उंचक्षेत्र, व नदी किनारी लागवडी योग्य नसणारे क्षेत्र, तसेच लाभक्षेत्रा मध्ये बिगरशेती झालेले क्षेत्र या कारणामुळे अंतिमत: ७५०८० हेक्टर एवढी सिंचन क्षमता या प्रकल्पावर आहे.

२) लाभक्षेत्र विकास कामाचा समावेश व लाभक्षेत्रातील रस्त्यांचा नव्याने समावेश केल्याने अंदाजे रु.३०.६३ कोटीनी वाढ झाली.

३) लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने गुरुकुंज व पाथरगांव उपसा सिंचन योजनाचा प्रकल्पाचा भाग म्हणुन समावेश केल्यामुळे अंदाजे रु.२१७.५३ कोटीनी वाढ झाली.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

१) मुख्य कालव्यांना व वितरण प्रणालीस अस्तरीकरण प्रस्तावीत केल्यामुळे व त्यानंतर अस्तरीकरणाच्या कामाला स्थगिती दिल्याने अस्तरीकरणाच्या कामाला (तब्बल १७ वर्ष) विलंब झाला, त्यामुळे अंदाजे रु.४२.०० कोटीनी वाढ झाली.

२) दगडी धरणामध्ये उजवा तट डिव्हाईड भिंत (Right bank divide wall) Under seepage control measure, रेडीयल गेट उच्चालनाचे ऑटोमेशन मुळे अंदाजे रु.१९.८० कोटीनी वाढ झाली.

३) वरच्या भागास करण्यात आलेल्या एथ्ठ्ठदत्त्ड्ढद्यत्दढ़ मुळे अंदाजे रु.१.३८ कोटीनी वाढ झाली.

४) डावा कालवा साध्या Hed Regulator एवजी ICPO Hed Regulator केल्यामुळे वाढ झाली.

७.५ इतर कारणामुळे झालेली वाढ

१) पुर्नवसन अधिनियमानुसार पुर्नवसित क्षेत्रातील नागरी सुविधा पुर्ततेमुळे अंदाजे रु.५.३१ कोटीनी झालेली वाढ.

२) वनजमीन कायदा १९८० अन्वये संपादीत केलेल्या वन जमीनी करिता करावे लागलेले भूगतान व वनविभागास द्यावी लागलेली पर्यायी जमीन यामुळे अंदाजे रु.१४.४० कोटीनी वाढ झाली.

३) पर्यावरण अटी पुर्तते करिता करावी लागलेली कामे, त्यामुळे अंदाजे रु.३.५३ कोटीनी वाढ झाली.

४) भूसंपादनासाठीचे दर वाढल्यामुळे अंदाजे रु.३.४२ कोटी तसेच ४७४३ हेक्टर वाढीव भूसंपादन आवश्यक झाल्याने अंदाजे रु.२०.१९ कोटीनी वाढ झाली.

उर्ध्व वर्धा प्रकल्प

ता. मोर्शी जि. अमरावती

संक्षिप्त टिप्पणी

उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे धरणस्थळ हे **" ठानाठुणी "**असलेल्या प्रकल्पास सन १९६३-६४ च्या दरसुचीवर आधारीत प्रकल्प अहवालास महाराष्ट्र शासन प्रत्र क्र.PIM/2264/96951-IP (cell) दिनांक १३.०२.१९६५ अन्वये रु. १३०४.६५ लक्ष किमतीस प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यावेळीच्या नियोजना नुसार प्रकल्प १२ वर्षा मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन होते.

तदनंतर उपलब्ध पाण्याचे स्त्रोताचा पुरेपुर वापर व्हावा, बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या संत्रा बगीच्याचे क्षेत्र कमी व्हावे, तसेच वर्धा जिल्हयास सिंचनाचा लाभ मिळावा अशी होत असलेली मागणी लक्षात घेऊन धरण स्थळाची जागा ही पुर्वी नियोजीत असलेल्या ठाणाठुणी च्या ११ कि.मी. खालच्या बाजुला सिंभोरा येथे निश्चित करण्यात आली. त्यास दि.१८/१२/१९७६ चे शासन पत्रान्वये मंजुरी प्राप्त झाली व डिसेंबर १९७६ मध्ये धरणाचे कामास सुरुवात करण्यात आली.

धरण स्थळातील बदल, प्रकल्पास विरोध, प्रकल्पाच्या व्याप्तीत झालेली वाढ, कालव्याचे अस्तरीकरणाच्या कामास स्थगिती, गरुकुंज व पाथरगांव उपसा सिंचन योजनांचा प्रकल्पाचा भाग म्हणुन समावेश या बाबी मुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झाला आहे.

तृतीय सु.प्र.मा.व चतुर्थ सु.प्र.मा.मध्ये प्रकल्पाच्या किंमतीत रु.४२५.३१ कोटीची वाढ झाली आहे.यापैकी रु.२८८.०७ कोटीची वाढ ही गरुकुंज व पाथरगांव उपसा सिंचन योजनांचा प्रकल्पाचा भाग म्हणुन समावेश करण्यात आल्यामुळे झाली असुन उर्ध्व वर्धा प्रकल्पावर रु.१३७.२४ कोटीची वाढ झाली आहे. कालव्याच्या संरेखा संकल्पनानुसार प्रत्यक्ष ओलीता खाली येणारे क्षेत्र, लाभक्षेत्रातील उंचक्षेत्र, व नदी किनारी लागवडी योग्य नसणारे क्षेत्र, तसेच लाभक्षेत्रा मध्ये बिगरशेती झालेले क्षेत्र या कारणामुळे अंतिमतः ७५०८० हेक्टर एवढी सिंचन क्षमता या प्रकल्पावर आहे.यामुळे सिंचनक्षमता कमी झाली तरी प्रकल्पीय किंमतीत वाढ दिसुन येते.

सन २०११-२०१२ पर्यंत प्रकल्पावर झालेला एकुण खर्च ११०६.१२ लक्ष रुपये

कामाची सद्यःस्थिती

माती धरण व सांडव्याचे काम पुर्ण झाले असुन, कालवा, वितरण प्रणालीची कामे पुर्ण झाली आहेत. तसेच कालव्याची अस्तरीकरणाची कामे १०० टक्के पुर्ण झाली आहेत. वितरण प्रणालीच्या अस्तरीकरणाची कामे ९८ टक्के पुर्ण झाली असुन उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे. भाग -१ ची ६६००० हेक्टरची कामे पुर्ण झाली असुन ३९५२ हेक्टरची कामे प्रगती पथावर आहे.

गुरुकुंज उपसा सिंचन योजनेची मागणी माजी राज्य मंत्री सौ. वसुधाताई देशमुख यांनी २००३ मध्ये, अप्पर वर्धा लघूपाट संघर्ष कृती समिती यांनी २००३ मध्ये, माजी आमदार श्री. पांडूरंग ढोले यांनी अप्रत्यक्षपणे २००७ मध्ये, आमदार श्री.बच्चु कडू यांनी २००७ मध्ये, आमदार सौ. सुलभा खोडके यांनी २००७ मध्ये, जिल्हा परिषद सदस्य अमरावती श्री.देशमुख यांनी २००८ मध्ये मागणी केलेली होती. त्यामुळे त्याचा अंतर्भाव सुप्रमा मध्ये करण्यात आला.

गुरुकुंज उपसा सिंचन योजनेच्या कामाचा सप्टेंबर २०११ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचे कडुन संकल्पन करुन घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या संबधात योजनेची परिगणके निश्चित करण्यासाठी स्थायी समितीच्या उपसमितीची बैठक दि.२६.०९.२०१२ रोजी घेण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही.

पाथरगांव उपसा सिंचन योजनेची मागणी विद्यमान आमदार श्री. विरेंद्र जगताप यांनी २००८ मध्ये मागणी केल्यामुळे त्याचा अंतर्भाव सुप्रमा मध्ये करण्यात आला.वनजमीन संपादन प्रक्रीया व्हायची असल्याने पाथरगांव उपसा सिंचन योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही.

वरील दोन्ही उपसा सिंचन योजनांना मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांनी फेब्रुवारी २००९ मध्ये मान्यता दिलेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : अरूणावती प्रकल्प**		**तालुका दिग्रस**		**जिल्हा यवतमाळ**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	२३९३० हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ -- २३९३० हेक्टर		प्रत्यक्ष झालेले सिंचन १०२२९ हेक्टर (सन २०११-१२)
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची (सन)	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	६.१२.१९७८	१९७७-७८	१९.१३	३०८७०
	सु.प्र.मा.-१	२३.५.१९९६	१९९२-९३	१४७.९१	२५१५५
	सु.प्र.मा.-२	२३.५.२००३	१९९८-९९	२२४.१६	२४००३
	सु.प्र.मा.-३	१९.१२.२००८	२००७-०८	३३१.१८	२३९३०
४	केन्द्र शासनानी अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (र.कोटी)		केन्द्रीय योजना आयोगाचे पत्र क्र. २(१५५)/०३/डब्ल्युआर, दिनांक २०.१२.२००६ किंमत रू. २२४.१६ कोटी		
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)				२८५.१३ कोटी
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)				३८.४६ कोटी
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)				२०३.३५ कोटी
४.४	इ.टी.पी. खर्च (रू.कोटी)				४३.३२ कोटी
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९७९-८०
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष या वेळी मंजूर असलेली प्रशसकीय मान्यता किंमत				१९८० रू. १९.१३ कोटी
७	मूळ प्रशसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			१३७.४५	४४.०५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ सु.प्र.मा. - मूळ प्र. मा. (६१.२९ — ३.६७)			५७.६२	१८.४६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			४.६३	१.४८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१६.४६	५.२८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) + ETP (३६.७३ + ५९.१६)			९५.८९	३०.७३
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**				
८.१	भूसंपादन				१०० टक्के
	पुनर्वसन				१०० टक्के
	वनजमीन संपादन				१०० टक्के
८.२	धरण (टक्केवारी)				१०० टक्के
८.३	कालवा (एकूण लांबी १०२ कि.मी. व झालेली लांबी १०२ कि.मी)				१०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था (एकूण सिंचन क्षेत्र २४१३५ हेक्टर व वितरण प्रणाली तयार झालेले सिंचन क्षेत्र २४१५३ हेक्टर)				१०० टक्के
८.५	पाटचा-यांची कामे (एकूण सिंचन क्षेत्र २४१३५ हेक्टर व पाटचा-यांची कामे तयार झालेले क्षेत्र २०६४६ हेक्टर)				८६ टक्के काम पूर्ण झाले
८.६	संकल्पीय पाणीसाठा १३९.९८ द.ल.घ.मी.			निर्मित पाणीसाठा १९८.३९ दलघमी	१०० टक्के

<u>अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल</u>

७.३ प्रकल्प व्याप्ती बदलामुळे झालेली वाढ :-

लाभक्षेत्रातील विहीरीच्या अतिरीक्त तरतूदीमुळे झालेली वाढ. (रु. ४.६३ कोटी)

७.४ सविस्तर घटक संकल्प चित्रामुळे झालेली वाढ :-

१) मातीधरण, सांडवा, निर्गमन वाहीका सिंचन विमोचकाच्या संकल्पनात बदल झाल्यामुळे.(रु. १२.८८ कोटी)

२) मॅगझीन ईमारतीच्या जोड रस्त्यामध्ये झालेला बदल. (रु. ०.७५ कोटी)

३) मुख्य विमोचकाचा जोड पुल व पेनस्टॉकला ईपॉक्सी ग्राऊटींग करणे. (रु. ०.०७ कोटी)

४) शासनाचे सुधारीत निर्देशानुसार कालव्यावर विसर्ग मापक यंत्रे बांधण्याची तरतुद.

७.५ इतर कारणे :-

१) धरण कालवे शिर्षात काही बाबींची तरतूद (रु. ४.२३ कोटी)

२) धरणावर संगणीकृत यंत्रणा बसविणे. (रु. १.०० कोटी)

३) धरणावर फ्लड लाईट ची व्यवस्था करणे. (रु. ०.७० कोटी)

४) जलक्षोभनाशक कुंडाची दुरुस्ती. (रु. ३.९३ कोटी)

५) कालव्याच्या सखोल सर्व्हेक्षणाअंती आवश्यक शेतसारा व भुविकासाची कामे (रु. ११.६९ कोटी)

६) स्वामित्व शुल्काची प्राकलनात तरतूद नसल्याने झालेली वाढ.

७) संचालन व प्रशासनाचा खर्च. (रु. ५९.१६ कोटी)

अरूणावती प्रकल्प

ता. दिग्रस जि. यवतमाळ

<u>प्रकल्प विषयक टिपणी</u>

अरूणावती नदी प्रकल्प यवतमाळ जिल्हयातील दिग्रस तालुक्यातील सावंगा बु. येथे बांधण्यात आला आहे. अरूणावती नदी ही गोदावरी खो-यातील पैनगंगा उपखो-यातील वाहणा-या अडाण नदीची उपनदी असुन एकूण पाणलोटक्षेत्र ८९४ चौ.कि.मी. आहे.

प्रकल्पाच्या मातीधारणाची लांबी ४८६० मी. असुन, जलोत्सारणीची लांबी १६२ मी. आहे. जलोत्सारणीवर १२ ज्र ८ मीटरची ११ वक्रव्दारे आहेत. प्रकल्पाला दोन कालवे असुन, उजव्या कालव्याची लांबी ४६ कि.मी. व डाव्या कालव्याची लांबी ५६ कि.मी. आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता २४००३ हे. आहे.

महत्वाचे मुद्दे :-

१) प्रकल्पावरील व्याप्तीत बदल :- लाभक्षेत्रातील विहीरीच्या अतिरीक्त तरतूदीमुळे झालेली वाढ.

२) लोक प्रतिनिधी स्थानिक संघटना यांचे मागणीनुसार वाढ :- मागणी नाही.

३) प्रकल्पावरील खर्चाची माहिती :- **एकूण खर्च रु. २८५.१३ कोटी.**

४) भुसंपादनाच्या अडचणी :-

धरणामध्ये व कालव्यामध्ये येणाऱ्या वनजमिनीस केंद्रीय वन खात्याची मान्यता मिळण्यास विलंब झाल्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत वाढ झाली व प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या भूसंपादनाचे काम पुर्ण झाले आहे

५) धरणात साठा करू शकत नसल्यास त्याची कारणे :-

सन १९९४ मध्ये घळभरणीचे काम पुर्ण झाले असुन पूर्ण संचयपातळी पर्यंत पाण्याचा साठा होत आहे.

प्रकल्पाची सद्यःस्थिती :-

अरूणावती प्रकल्पाच्या घळभरणीचे काम १९९४ मध्ये पुर्ण झाले असुन सन १९९५ पासुन वितरण प्रणालीचे काम पुर्ण झालेल्या भागात प्रत्यक्ष सिंचन सुरु आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता २४००३ हे. असुन, सिंचन क्षमता निर्मीती जून-२००८ अखेर पुर्ण झाली आहे. प्रकल्पावर मार्च-२०१२ अखेर रू. २८५.१३ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पाची अद्यावत किंमत तृतीय सुधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे रू. ३३१.१८ कोटी आहे. सद्यास्थितीत धरणाचे, कालव्याचे, वितरणप्रणालीचे १०० टक्के काम पुर्ण झाले आहे. तसेच भुसंपादन व पुनर्वसनाची कामे सुध्दा पुर्ण झालेली आहे. भुविकास भाग-१ ची ८६ टक्के कामे पुर्ण झालेली आहे. लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्याचे दृष्टीने हस्तांतरणपुर्व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. वरील कामे जून-२०१४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांवः- बेंबळा नदी प्रकल्प**		तालुका-बाभुळगांव		जिल्हा- यवतमाळ
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५२५४३	निर्मिती सिंचन क्षमता ३४५१९ हे. (जुन २०१२) सिंचन क्षमता निर्मिती कि.मी.१ ते ५०- १०४६८ हे. झालेले सिंचन कि.मी. १ ते ५०-२०६६ हेक्टर (सन २०११-१२)		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६.१०.१९९२	१९९१-९२	१९०.३६	४७०००
	सुप्रमा-१	४.८.२००४	९९-२०००	६२२.४८	५२५४३
	सुप्रमा-२	२९.८.२००६	२००५-०६	१२७८.९६	५२५४३
	सुप्रमा-३	१४.८.२००९	२००८-०९	२१७६.२८	५२५४३
	सुप्रमा-४	--	--	--	--
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२०.७.११	२००८-०९	२१३०.१३	५२५४३
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)				१४८२.२७
४.२	भूसंपादन,पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)				४१९.२७
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)				१००१.२
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)				६१.८
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९३
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			प्र.मा. रू.१९०.३६	१९९३
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			५१०.४३	२५.७०
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पि.व्ही मुळे खर्चातील वाढ सुप्रमा किंमत रू.३८६.८६-प्र.मा.किंमत रू.३६.२८ = (३५०.५८)			३५०.५८	१७.६५
७.३	प्रकल्प व्यासीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथपि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			४२८.२५	२१.५६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			४७७.०७	२४.०३
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) + ई.टी.पी. (३.६५+१२६.६०)			२१९.५९	११.०६
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपदान, पुनर्वसन, वन जमिन संपादन	धरणाकरिता १०० टक्के भूसंपादन झालेले आहे. कालव्याकरिता भूसंपादन शिल्लक असून राजस्व विभागाकडे कार्यवाही सुरू.			
८.२	धरण (टक्केवारी)				१००% पुर्ण
८.३	कालवा (एकूण लांबी ११३ कि.मी. व झालेली लांबी १०७कि.मी.				९५% पुर्ण
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र : ५३५६० हे. (लांबी ६३० कि.मी.) वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र : ३३११८ हे. (लांबी ५६० कि.मी.)				६२% पुर्ण
८.५	पाटचायांची कामेः(एकुण क्षेत्रः ५३५६० हे. पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्रः ८७६८ हे.)				१६ % पुर्ण
८.६	अ) प्रकल्पीय पाणीसाठा -- ब) निर्मित पाणीसाठा --				३२२.०६ द.ल.घ.मी. १५७.६५ द.ल.घ.मी.

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

मुद्दा	विश्लेषण
७.३ प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)	मा.श्री. माणिकराव ठाकरे, तत्कालीन राज्यमंत्री, गृह यांचे पत्र दि. ४.७.२००० अन्वये मा. सचिव, पाटबंधारे यांना देण्यात आलेली आहे. या पत्रामध्ये स्थानिक कास्तकार तसेच प्रकल्प बाधीत यांचे मागणीनुसार बेंबळा जलाशयाच्या उर्ध्व बाजुस डेहणी उपसा सिंचन योजना होण्याबाबतची मागणी होती. त्याप्रमाणे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये अंतर्भुत करण्यात आलेली आहे. तृतीय सुप्रमा नुसार बेंबळा प्रकल्पाचा घटक भाग असलेल्या डेहणी उपसा सिंचन येजनेची किंमत रु. ४११.८० कोटी इतकी आहे. हया योजनेमुळे ५५४३ हेक्टर क्षेंत्रास ठिबक सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर योजनेची मूळ प्रशासकीय मान्यतामध्ये तरतूद नसल्यामुळे एकंदर वाढ रू. ४११.८० कोटी आहे.
७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.	१. प्रकल्पाच्या १९९२ च्या प्र.मा.मध्ये संपुर्ण कालवा अस्तरीकरणाची तरतूद होती. परंतु प्रथम सुधारित अंदाजपत्रकामध्ये निधीच्या कमतरतेमुळे सदर तरतूद कमी करून निवडक ठिकाणी व बांधकामाचे आजूबाजूस काही मीटरपर्यंत मर्यादित ठेवण्यांत आली होती. संपुर्ण क्षेत्र हे प्रामुख्याने काळ्या मातीचे असल्याने त्याचप्रमाणे कालवा संरेखन कि.मी.४० पर्यंत काही भागात भरावातून जात असल्यामुळे तसेच कि.मी. ६८ चे पुढे भूस्तर चुनखडी व ठिसूळ दगडात (disintegrated rock) असल्यामुळे संपुर्ण लांबीत पाणी पोचविण्याचे दृष्टीने तसेच देखभाल व दुरूस्तीचा वारंवारचा खर्च वाचविण्याचे दृष्टीने संपुर्ण लांबीत अस्तरीकरण करण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यांत आला. सदर तरतूदीनुसार सु.प्र.मा. व त्यास राज्य वित्त व नियोजन विभागाची मान्यता तसेच कें.ज.आ. च्या तांत्रिक सल्लागार समितीची मान्यता प्राप्त आहे. (एकूण वाढ रू. २९५.८६ कोटी) २. धरणाच्या उंचीमध्ये वाढ झाल्यामुळे (१.५० मीटर वाढ) संकल्पनातील बदल, सिंचन विमोचका ऐवजी सिंचनासह विद्युत विमोचक बसविणे, सरीता विमोचकाची तरतूद इ. कारणांमुळे वाढ झाली आहे. (एकूण वाढ रू. १०.९६ कोटी) ३. कालव्यावरील पुलांची संख्या ११७ वरून १६१ झाल्याने झालेली वाढ रू. ३.१३ कोटी. ४. काट नियंत्रक व SWF आवश्यकतेनुसार दिल्याने झालेली वाढ रू. ३.९३ कोटी ५. वितरण प्रणालीमध्ये शाखा कालव्याची लांबी १० कि.मी वरून २३ कि.मी झाल्याने झालेली वाढ रू. १.२५ कोटी ६. वितरण प्रणाली व भूविकास भाग-१ च्या कामाची तरतूद केल्यामुळे झालेली वाढ रू. २१.१३ कोटी
७.५ ईतर कारणे व इ.टि.पी.	१. आस्थापना, हत्यारे व संयंत्रे यामध्ये झालेली वाढ रू.१५६.४६ कोटी. २. कें.ज.आ.चे मार्गदर्शक सुचनांनुसार पर्यावरण विषयक तरतूदीमुळे झालेली वाढ रू.३.६५ कोटी.

बेंबळा नदी प्रकल्प

ता.बाभुळगांव जि.यवतमाळ

प्रकल्प विषयक टिप्पणी

प्रस्तावना :- बेंबळा नदी प्रकल्प यवतमाळ जिल्हयातील बेंबळा नदीवरील मोठा प्रकल्प आहे. प्रकल्पाच्या मातीधरणाची लांबी ७२०३ मि. असुन दगडी बांधकामातील सांडव्याची लांबी ४४७ मि. आहे. सांडव्यास १२ मि.ऱ्ह ८ मि. ची २० वक्रव्दारे आहेत. धरणाची महत्तम उंची २९.१५ मि. इतकी आहे. प्रकल्पास सिंचनासह विद्युत विमोचक असुन १००० किलोवॅट इतकी विद्युत निर्मीती करण्याचे नियोजीत आहे. प्रकल्पाच्या उजव्या तिरावरील कालवा ११३ कि.मी. लांबीचा असुन, ३ शाखा कालवे, १८ वितरीका,७९ लघुपाट व ३४ विमोचक यासह कालव्या अंतर्गत ४७००० हेक्टर इतकी सिंचन क्षमता प्रस्तावित आहे.तसेच प्रकल्पाचा भाग असलेल्या डेहणी उपसा सिंचन योजनेअंतर्गत ५५४३ हेक्टर इतकी सिंचन क्षमता प्रस्तावित असुन एकुण प्रकल्पीय सिंचन क्षमता ५२५४३ हेक्टर इतकी आहे.

या प्रकल्पावर एकूण खर्च रू. १४२८.२७ कोटी झाला आहे.

भूसंपादनाच्या अडचणी :- महसूल विभागाकडून भूसंपादन कार्यवाहीस बराच विलंब झालेला आहे. काही ठिकाणी भूधारकांचा भूसंपादनाला विरोध झाला. सद्यःस्थितीत भूसंपादनातील बहुतांशी अडचणीचे निराकरण झालेले आहे.

धरणात साठा करु शकत नसल्यास त्याची कारणे :- बेंबळा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौजा घुईखेड येथील भूखंड वाटपाचे प्रकरण न्यायप्रविष्ट होते. आता याबाबतचा निकाल लागलेला असून भूखंड वाटप झालेले आहे. तसेच नवीन गावठाणातील संपूर्ण नागरी सुविधा पूर्ण झालेल्या आहेत. अद्याप ग्रामस्थ नवीन गावठाणात स्थानांतरीत झालेले नाहीत. यामुळे धरणात पूर्ण साठा करु शकत नाही.

प्रकल्पाची सद्यःस्थिती :-

प्रकल्पाचे मुख्य धरणाचे काम सन २००७ मध्ये पुर्ण झाले असुन जलसाठा निर्मीती करण्यात येत आहे. मुख्य कालवा व शाखा कालव्याची कामे ९५% पुर्ण झालेली आहेत. तसेच वितरीकांची कामे ८५% पुर्ण झालेली आहेत व पाटचाऱ्यांची १६% कामे पुर्ण झालेली आहे. प्रकल्पाचा घटक भाग असलेल्या उर्ध्व बाजुकडील डेहणी उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर असुन सुमारे ७०% कामे पुर्ण झालेली आहेत.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : निम्न पैनगंगा प्रकल्प**		**तालुका घाटंजी**		**जिल्हा यवतमाळ**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	२२७२७१ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर निरंक		प्रत्यक्ष झालेले सिंचन हेक्टर निरंक
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची (सन)	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२६.६.१९९७	१९९५-९६	१४०२.४३	२२७२७१
	सु.प्र.मा.-१	१४.८.२००९	२००८-०९	१०४२९.३९	२२७२७१
४	केन्द्र शासनानी अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (र.कोटी)	CWC has granted ‘ in principal consent’ to prepare DPR of Lower Penganga project vide CWC letter dated 31.10.2011. Final submission is in progress.			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)				२२६.७४ कोटी
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)				१६४.४७ कोटी
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)				३०.०९ कोटी
४.४	इ.टी.पी. खर्च (रू.कोटी)				३२.१८ कोटी
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९९-२०००
६.१	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष व या वेळेस मंजूर असलेली प्र. मा. (सुप्रमा-१) किंमत रू. १०४२९.३९ कोटी सन २००८-०९				जुलै-२०११
७	मूळ प्रशसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			४४०४.९९	४८.८० टक्के
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ (सु. प्र. मा. किंमत रू.१५९१.९३ कोटी) – (प्र.मा.नुसार किंमत रू.१४२.२६ कोटी) एकूण वाढ = १४४९.६७ कोटी			१४४९.६७	१६.०६ टक्के
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			२४०४.५०	२६.६४ टक्के
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१६०.६१	१.७८ टक्के
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) ETP ETP charges = Rs. 451.94 cr. other charges = Rs. 155.26 crores Total = Rs. 607.20 crores			६०७.२०	६.७२ टक्के
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**	**काम बंद आहे**			
८.१	भूसंपादन	खाजगी वाटाघाटीने ७.५१ हेक्टर जमीन खरेदी केली आहे. पुनर्वसनाची प्राथमिक स्वरूपाची कामे सुरू आहेत. दिनांक १३.६.२०११ रोजी वनजमिनीचा प्रस्ताव (९९८.१० हेक्टर) - अंतिम मान्यतेकरिता केन्द्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.			
	पुनर्वसन				
	वनजमीन संपादन				
८.२	धरण (टक्केवारी)	शुन्य			
८.३	कालवा (मुख्य कालवा)	एकूण लांबी १६५ कि.मी. मुख्य कालवा कामे अद्याप सुरू नाहीत.			
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र व वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र)	कामे अद्याप सुरू झालेली नाहीत.			
८.५	पाटचा-यांची कामे(पाटचा-यांची कामे तयार झालेले क्षेत्र)	कामे अद्याप सुरू झालेली नाहीत.			
८.६	प्रकल्पीय पाणीसाठा निर्मित पाणीसाठा	११६४.३०५४ द.ल.घ.मी. निरंक			

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशील

अ.क्र.	बाब	तपशील
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ. (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ.	१) टिपेश्वर अभयारण्या वगळविण्यास्तव प्रस्तावित बोगदा - टिपेश्वर अभयारण्य वगळण्यासाठी अभयारण्याच्या वरच्या बाजुने बोगदयाद्वारे डाव्या कालव्याची संरेखा प्रस्तावित करणेबाबतच्या प्रस्तावास शासनाने दिनांक २-०७-२००१ चे पत्राने बोगदयाच्या प्रस्तावास मंजुरी दिली. व त्यानुसार बोगदा सुधारित अंदाजपत्रकात अंतर्भुत करण्यात आलेला आहे.प्रस्तावित बोगदा कामाकरिता रु. १४७१ कोटी ची तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. २) पैनगंगा धरण ते वर्धा नदी संगमा दरम्यान ४ बॅरेजेस सुधारीत अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात आले. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने पत्र क्रमांक विपाविम/कंता-३/६३७/यपामं/ नि.पै./ सुप्रमा/ २००९ दिनांक १४-८-२००९ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. प्रस्तावित ६ बॅरेजेस करीता रु. ८०१.५० कोटी ची तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. ३) सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प - निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या वरच्या बाजुस मौजे. कोठा येथे नांदेड जिल्हयातील हिमायतनगर तालुक्यात सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पास प्रशासकिय मान्यता मिळाली असून या प्रकल्पाच्या एकुण भांडवली खर्चापैकी रु. १३२ कोटीचा आर्थिक भार निम्न पैनगंगा प्रकल्पावर वर्ग करण्यात आला असून सदर खर्च निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेला आहे.
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	दगडी धरणाच्या बाबतीत मात्र जेथे कमी अंतरावर उत्तम गुणवत्तेची नैसर्गिक वाळु उपलब्ध आहे, बांधकाम परिमाण कमी आहे व इतर बाबी पुरक आहे, तेथे कोलग्राऊट मेसनरीचा पर्याय खुला राहील. मात्र धरणाचे कोणतेही काम दगडी बांधकामात करु नये.' या पार्श्वभुमीवर निम्न पैनगंगा धरणाचे काम दगडी बांधकामा ऐवजी संधानकात करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. उपरोक्त प्रकल्पाच्या धरणाच्या कामाच्या संकल्पचित्रात झालेल्या बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. १६०.६१ कोटी एवढी वाढ झाली आहे.
७.५	इतर कारणे स्पष्ट करावीत.	निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या इतर (ईटीपी सह) वाढीतील बदल – प्रकल्पाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे प्रकल्पाच्या इतर आवश्यक शिर्षनिहाय कामाच्या किंमतीत सुद्धा अनुषंगिक वाढ झालेली आहे. ईटीपीमुळे रु. ४५१.९४ कोटी वाढ व इतर अनुषंगिक वाढ (Ecology & Environmental issues & other) रु. १५५.२६ कोटी झालेली आहे. त्यामुळे इतर (ईटीपी सह) एकुण वाढ रु. ६०७.२० कोटी (६.७२ टक्के) वाढ झालेली आहे.

निम्न पैनगंगा प्रकल्प

ता. घाटंजी जि. यवतमाळ

टिपणी

प्रस्तावना :-

निम्न पैनगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र व आन्ध्रप्रदेशाचा संयुक्त आंतरराज्यीय मोठा सिंचन प्रकल्प असून विशेषतः सिंचनाचे दृष्टीने मागासलेल्या विदर्भ प्रदेशातील यवतमाळ व चंद्रपुर जिल्ह्यासाठी एक अत्यंत महत्वाकांक्षी व फलदायी सिंचन प्रकल्प आहे. गोदावरी पाणीतंटालवादानुसार प्रस्तावित धरणस्थळापर्यंतचे पैनगंगा नदीचे संपूर्ण पाणी महाराष्ट्र राज्याने आंतरराज्यीय प्रकल्प बांधून वापरावयाचे आहे. त्यानुसार ११६४.३० दलघमी (४१.१४ टी एम सी) पाणी वापरावयास मिळणार आहे. त्याकरीता सध्या प्रस्तावित केलेले धरणस्थळ भौगोलीक व अभियांत्रिकीदृष्टया योग्य स्थळ असून केवळ २.० किमी लांबीचे धरण या ठिकाणी बांधण्यामुळे उपरोक्त पाणी वापर शक्य होतो.

या अंतरराज्यीय, बहुउद्देशीय प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या यवतमाळ व चंद्रपूर तसेच आंन्ध्रप्रदेशाच्या अदिलाबाद जिल्हयातील मागासवर्गीय व नक्षलग्रस्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळेल तसेच या भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटून, औद्योगिकरण, मत्स्यव्यवसाय, पर्यटन, दळणवळण, कृषीउत्पन्न इत्याइी क्षेत्राचा विकास होईल. या सर्व विकासामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यासही मदत होईल.

भूसंपादन – निम्न पैनगंगा प्रकल्पाचे एकुण बुडीत क्षेत्र - १५,९५१ हेक्टर एवढे असून त्यामध्ये खाजगी जमीन - १४६५७.४९ हे. व वन जमीन - ७४६.६७ हे. व सरकारी जमीन - ५४६.९४ हे. एवढी येत आहे. वन जमीनीचे नक्त वर्तमान मुल्य, पर्यायी वनीकरणाचा खर्च, सर्वेक्षणाचा खर्च तसेच महसूल खात्याकडे हस्तांतरीत करावयाच्या रक्कमेचा समावेश, शेतक-यांच्या जमीनीच्या दरास्तव वाढलेल्या अपेक्षा व पुनर्वसन प्रस्तावित करावयास्तव आवश्यक जमीन व आवश्यक तरतूदी यासर्व बाबींचा विचार करता, प्रकल्पाच्या भूसंपादन या शिर्षाखाली होणारा खर्चात रु. १४४९.६७ कोटीची वाढ झालेली आहे.

सिंचन प्रकल्पाचा वाढता कालावधी व किंमतीचा तपशिल (प्रकल्पनिहाय)

१	**प्रकल्पाचे नांवः- खडकपुर्णा प्रकल्प**		**तालुकाः- देऊळगांव राजा,**	जिल्हा बुलडाणा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) २४८६४	निर्मीत सिंचन क्षमता हेक्टर :- जुन २०१२,	१३९००	प्रत्यक्ष झालेले सिंचन हे.(२०११-१२)	९०९४
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकिय मान्यता	१६/०८/१९८९	८७-८८	७९.५५	१८०००
	सुप्रमा -१	१५/०१/२००२	९९-२०००	३६८.८८	१८०००
	सुप्रमा -२	२९/०८/२००६	२००५-०६	६६९.४०	२४८६४
	सुप्रमा -३	२४/०६/२००९	२००८-०९	१०९५.९२	२४८६४
४.०	केंद्रशासनाची अद्यावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	०९/०२/२०१०	२००८-०९	९१७.९५	२४८६४
४.१	दिनांक ३१.०३.२०१२अखेर खर्च (रु. कोटी)			७९९.७५	
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु. कोटी)			२२२.८५	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			५४२.४८	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			३४.४२	
५	प्रकल्पास प्रथम अनुदान उपलब्ध झाल्याचे वर्ष			१९९४-९५	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९९७	सुप्रमा-१. ३६८.८८	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			४७१.१५	४६.३५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ सुप्रमा - मुळ प्रमा (२२१.२९ - ९.८८)			२११.४१	२०.८०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ)			८४.२८	८.२९
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			६१.९६	६.१०
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) + E T P			१८७.५७	१८.४६
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन			८५ टक्के	
८.२	धरण			१०० टक्के	
८.३	कालवा	एकुण लांबी	११३.७२ कि.मी.	झालेली लांबी	८३.१० कि.मी. ७३ टक्के
८.४	वितरण व्यवस्था	एकुण क्षेत्र	१८७२० हेक्टर	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र	२८०० (१५ टक्के)
८.५	पाटचायांची कामे. :	एकुण क्षेत्र	१८७२०	पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र	५००(३ टक्के)
८.६	पाणीसाठा	प्रकल्पीय पाणीसाठा	१६०.६०६ दलघमी	निर्मीत पाणीसाठा	१६०.६०६ दलघमी

७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ झालेली वाढ	धरणाचे पश्चःजल अभ्यासा नुसार एकुण १४ गावापैकी.८ अतिरीक्त गावाच्या गांवाच्या पुनर्वसनास शासन पत्र क्र. खडक/ २००२/ १६६५/(३४४/२०००) मोप्र-२ दि. ०२/०९/२००२ अन्वये मान्यता प्राप्त झालेले आहे. व व्दितीय सुप्रमामध्ये तरतुद करुन मान्यता प्राप्त झाली आहे. कालवा प्रणालीमध्ये खालील प्रमाणे लोकप्रतिनिधीचे मागणीनुसार (शासन मान्यतेनुसार) खालील प्रमाणे बदल करण्यात आलेले आहे. मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये धरणाचे खाली ५ कोल्हापूरी बंधाऱ्यावरुन उजव्या व डाव्या तीरावरील १२५० हेक्टर सिंचन प्रस्तावित होते. परंतु तत्कालीन सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार श्री. तोतारामजी कायंदे यांनी को.प.बंधाऱ्याऐवजी उजवा व डावा कालवा व त्यावरील उपसा सिंचन योजनेवरुन सिंचन करण्याची मागणी केली. त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला व सदर प्रस्तावास शासनाचे पत्रक्र १०९०/२६/(१३१/९९) एन.पी (२) दिनांक १७/७/१९९२ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार प्रथम प्रशासकीय मान्यतेमध्ये तरतूद करण्यात आली. त्यामुळे ३९.७८ कोटी रु.वाढ झाली सिंदखेडराजा व देऊळगांव राजा परिसरातील शेतकऱ्यांनी परिसरातील क्षेत्र हे खडकपुर्णा प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात घेण्यासाठी मागणी केली. त्यानुसार सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार श्री. राजेंद्रजी शिंगणे यांनी बुडीत क्षेत्रातुन दगडवाडी उपसा सिंचन योजनेच्या अतिरीक्त कामास शासनाचे पत्र क्र २००३/४६/(१२३/२००३) मो प्र.(२) दिनांक २३.११.२००५ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे ३४.३५ कोटी रु.वाढ झाली चिखली मतदार संघाच्या तत्कालीन आमदार सौ. रेखाताई खेडेकर, यांनी ९ गांवाचे क्षेत्र खडकपुर्णा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात समाविष्ठ करण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाकडुन अतिरीक्त कामास पत्र क्र. बैठक / २००१/१५० (६९९/२००१ मोप्र २ दि. १/४/२००३ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे १०.१५ कोटी रु.वाढ झाली त्यानुसार व्दितिय प्रशासकीय मान्यतेमध्ये दगडवाडी उपसा सिंचन योजना व प्रस्तावित ९ गावांचे क्षेत्र समाविष्ट करुन तरतूद करण्यात आली.
७.४ सविस्त घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	सविस्तर घटक चित्रामुळे झालेली वाढ ६१.९६ कोटी आहे.
७.५ ईतर कारणे व इ.टी.पी.	**मुख्य शिर्ष :-** मध्यवर्ती जलोत्सारणीच्या कामात कोलग्राऊट मॅशनरी, प्रिस्ट्रेसड ब्रीज, मा. उच्च न्यायालयातील Arbitration साठी, नियंत्रण कक्ष, जनरेटर रुम, शास्त्रीय उपकरणे बसविणे ह्या करीता ३९.३१ कोटी वाढ झाली **कालवे / वितरीका :-** को.प.बधारे वगळुन उजवा , डावा कालवा व त्यावरील उ.सि.योजना, दगडवाडी उपसा सिंचन योजना व अतिरीक्त ९ गांवाचा लाभक्षेत्रात समावेश, कालव्यास अस्तरीकरण, उसियोजना टप्पा क्र. १ ते ४ व कालव्यावरील बांधकामाना ढोबळमानाने तरतुदीमुळ ५९.९९ ची वाढ झाली **इटीपी तील वाढी मुळे :-** ८८.२७ कोटी ची वाढ झाली

खडकपूर्णा प्रकल्प

ता. देऊळगाव राजा जि.बुलडाणा

प्रस्तावनाः-

खडकपूर्णा प्रकल्प बुलडाणा जिल्हयातील खडकपूर्णा नदीवर गारखेड गावाजवळ देऊळगाव राजा पासून १६ कि.मी. अंतरावर आहे. सांडव्यासह धरणाची एकूण लांबी २१३० मीटर आहे. या प्रकल्पास व्दारयुक्त जलोत्सारणी असून

१२ x ८ मीटरचे १९ वक्रव्दारे आहेत. उजवा मुख्य कालवा ३६ कि.मी. लांबीचा आहे व डावा मुख्य कालव्याची लांबी १० कि.मी. आहे. तसेच उपसा सिंचन योजना टप्पा क्र. १ ते ४, दगडवाडी उपसा सिंचन, उजव्या व डाव्या कालव्यावरील उपसा सिंचन योजना आहेत. सदर धरणामधून बुलडाणा जिल्हयामधील देऊळगाव राजा, चिखली व सिंदखेड राजा तालुक्यातील २०७२० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यापैकी डाव्या व उजव्या मुख्य कालव्याव्दारे २६९४ हेक्टर व उपसा सिंचनाव्दारे १८०२६ हेक्टर सिंचन क्षेत्र प्रस्तावित आहे.

कामाची सद्यःस्थिती :-

धरण वितरण प्रणाली- धरण ९८ टक्के व कालवे व वितरण प्रणाली ८० टक्के पुर्ण. इतर कामे प्रगतीपथावर

उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ जोड कालव्याची लांबी ५.४५ कि.मी. असुन काम पुर्ण झालेले आहे. जोड कालव्यावर एकुण ७ लघुकालवे असून सर्व लघुपाटाचे कामे पुर्णत्वास आहेत.

उपसा सिंचन योजना टप्पा क्र.२ अस्तरयुक्त जोडकालव्याची एकुण लांबी ८ कि.मी असुन कालव्याचे ८५ टक्के कामे पुर्ण झाले असुन उर्वरीत कामे प्रगतीत आहे. त्या कालव्यावरुन १ वितरीका व ७ लघुपाट निघत आहेत. त्याची कामे प्रगतीत आहेत.

उपसा सिंचन योजना टप्पा क्र.३ अस्तरयुक्त जोड कालव्याची एकुण लांबी ६ कि.मी. असुन कालव्याचे कामे प्रगतीत आहे. ह्या कालव्यावरील ११ कि.मी लांबीच्या शाखा कालव्याचे ७० टक्के पूर्ण झालेली असून काम प्रगती पथावर आहे. या कालव्यावरील १ वितरीका व २१ लघुपाटाच्या कामाची निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे.

उपसा सिंचन योजना टप्पा क्र.४ च्या अस्तरयुक्त मुख्य कालव्याची एकुण लांबी ४ कि.मी असुन कालव्याचे कामे प्रगतीत आहे. ह्या कालव्यावरुन ३ कि.मी लांबीच्या शाखा कालव्याचे काम प्रगती पथावर आहे. शाखा कालवा व मुख्य कालव्यावरील एकुण ६ वितरीका पैकी एका वितरीकेचे काम पुर्णत्वास असुन ५ वितरीका व त्यावरील लघुपाटाची कामे निविदा स्तरावर आहे.

दगडवाडी उपसा सिंचन योजनेचा अस्तरयुक्त मुख्य कालवा एकुण १६ कि.मी. लांबीचा असुन कालव्याची कामे ८० टक्के पूर्ण झालेली असून काम प्रगती पथावर आहे. ह्या कालव्यावरील १ वितरीका १३ लघु कालव्याची व भाग १ ची काम प्रगती पथावर आहे. ७ लघुकालव्याची कामाची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

भाग-१ ची कामे- खडकपूर्णा प्रकल्पाच्या २३४०० हेक्टर वहिती लायक लाभक्षेत्रावरील भुविकास भाग-१ ची ९६० हेक्टरची कामे मार्च २०१२ पर्यत पुर्ण झालेली आहे. उर्वरीत क्षेत्रावरील भाग-१ ची कामे प्रगतीत आहे.

प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे, आलेल्या ठळक अडचणी

१) **निधी उपलब्धता** प्रकल्पास प्र.मा. दिनांक १६/०८/१९८९ ला प्राप्त झाली परंतु १९९४-९५ पर्यंत निधी उपलब्ध झाला नाही. तसेच सन २००३-०४, २००४-०५ या वर्षी अपुरा निधी मिळाला.

२) **प्रकल्पग्रस्तांचा विरोध** :- खडकपुर्णा प्रकल्पास बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध झाल्यामुळे भुंसपादन कार्यवाहीस विलंब झाला.

३) **न्यायप्रविष्ट प्रकरणे** :- प्रकल्पाच्या बांधकामामुळे धरणाखालील बाजुस असलेल्या येलदरी प्रकल्पातील पाणी अडविल्या गेल्याने मराठवाडा जनता परिषद यांनी न्यायालयात याचीका दाखल केल्यामुळे कामामध्ये अडचण आली होती.

४) सध्या पुनर्वसनाच्या समस्येमुळे दरवर्षी फक्त ४२ टक्के पाणीसाठा करण्यात येतो.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव**		**जिगांव**	**तालुका : नांदुरा**	**जिल्हा : बुलढाणा**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) १०१०८८		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून २०१२ –निरंक		प्रत्यक्ष झालेले सिंचन-निरंक
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०३.०१.१९९६	१९९४-१९९५	६९८.५०	९१८००
	सुप्रमा-१	२०.१०.२००५	पा.वि.०३-०४	१२२०.९८	१०१०८८
	सुप्रमा-२	२४.०६.२००९	पा.वि. सा.बां.	४०४४.१४	१०१०८८
	सुप्रमा-३	--	--	--	--
	सुप्रमा-४	--	--	--	--
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	०६.०१.२०१२	२०१०-२०११	४४२४.९६	केंद्रिय जल आयोगाचे सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम केला असुन अंतीम मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)				८५३.८७
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)				२२३.८७
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)				५९७.५५
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)				३२.४५
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९८-९९
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष				३०.११.२००८/ प्रथम सु.प्र.मा.-रुपये १२२०.९८ कोटी
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			१४५७.९४	४३.५८
७.२	भूसंपादन,पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळ खर्चातील वाढ (द्वितीय सु.प्र.मा. प्रमाणे रु १३१०.९९ कोटी – मुळ प्र.मा.प्रमाणे रु.१९९.२८ कोटी उ रु.१२०१.७१ कोटी)			१२०१.७१	३५.९२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७.४	सविसतर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			२३३.६२	६.९८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) अ ई.टी.पी. (रु.२५४.६९ + १९७.६८)			४५२.३७	१३.५२
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती			प्राथमिक अवस्थेत	
८.१	भू-संपादन पुनर्वसन,वन जमीन संपादन			कार्यवाही प्रगतीपथावर	
८.२	धरण			२४ टक्के पूर्ण	
८.३	कालवा (एकूण लांबी २६२ कि.मी. व झालेली लांबी ० कि.मी.) उपसा सिंचन योजना क्र.१ ते १२			उपसा सिंचन योजनांवर ३५ टक्के खर्च झाला असुन भौतिक प्रगती नाही.	
८.४	वितरण व्यवस्था एकूण क्षेत्र : वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र :		८४२४० हे. ० हेक्टर	० टक्के	
८.५	पाटचाऱ्यांची कामे एकूण क्षेत्र : पाटचाऱ्याची कामे तयार झालेले क्षेत्र :		११२३२० हे. ०० हेक्टर	० टक्के	
८.६	संकल्पीत पाणीसाठा (७३६.५७९ द.ल.घ.मी.)			निर्माण झालेला पाणीसाठा- निरंक	

जिगांव प्रकल्प

ता.नांदुरा जि.बुलडाणा

<u>७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल</u>

७.३ - प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ - निरंक

७.४- सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

मुळ अंदाजपत्रकातील धरणाचा काटछेद हा ढोबळमानाने गृहीत धरुन व उ.सि.यो.च्या उर्ध्वगामी नलीका, पंपगृहे, वितरणकुंड, पंपींग मशीनरी, विद्युत कामे इ. साठी तर अतिशय ढोबळमानाने किमती घेतल्याचे दिसून येत आहे. व्दितीय सु.प्र.माच्या वेळी धरणाचा सर्वसाधारण आराखडा म.सं.सं.,नाशिक यांनी मंजुर केल्याप्रमाणे व उ.सिं.यो.चे संकल्पन तयार करुन पंपगृह, उर्ध्वगामी नलीका वितरणकुंड इत्यादी स्थापत्य घटकाचा समावेश करण्यांत आला आहे तसेच यांत्रिकी व विद्युत कामांचे सविस्तर अंदाजपत्रके खात्याच्या यांत्रिकी व जलविद्युत यंत्रणेकडून तयार करुन व्दितीय सु.प्र.मा.मध्ये अंतर्भूत करण्यांत आली आहे. उपरोक्त नमुद कारणामुळे प्रथम शिर्षकामे यावर रुपये १००.९० कोटी व द्वितीय मुख्य कालवे आणि उपसा सिंचन योजना यावर रुपये १३२.७२ कोटी अशी एकुण **रुपये २३३.६२ कोटी** ने वाढ झाली आहे.

७.५- इतर कारणामुळे झालेली वाढ

१) आस्थापना खर्चामध्ये रुपये १९७.६८ कोटी ने वाढ झाली आहे.

२) सविस्तर सर्वेक्षणाअंती रुपये १.८४ कोटी ने कामामध्ये वाढ झाली आहे.

३) आवश्यक नविन बाबींचा समावेशामुळे व इतर किरकोळ कारणांमुळे रुपये १९७.२५ कोटी ने वाढ झाली आहे.

४) इतर कारणांमुळे.

उपरोक्त कारणामुळे एकुण **रुपये ४५२.३७ कोटी** ने वाढ झाली आहे.

जिगांव प्रकल्प

ता.नांदुरा जि.बुलढाणा

संक्षिप्त टिप्पणी

प्रस्तावनाः

तापी खोऱ्यातील पुर्णा नदीवर बुलडाणा जिल्हयाच्या नांदुरा तालुक्यातील जिगांव या गावाजवळ प्रस्तावित असलेला जिगांव प्रकल्प सर्वात मोठा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे बुलडाणा जिल्हयाच्या ६ तालुक्यातील २६८ गांवे व अकोला जिल्हयाच्या २ तालुक्यातील १९ गावे अशा एकुण २८७ गावाच्या ८४२४० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

या प्रकल्पास प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध होता. त्याकरीता मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ०७/१०/२००३ च्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पातील जलसाठा पातळी १.५९ मी. ने कमी करुन प्रकल्पाचे पुनर्वनियोजन करण्यात आले. त्यामुळे बुडीत क्षेत्र कमी झाले व पुनर्वसन गावांची संख्या कमी झाली. त्यामुळे प्रकल्पाचे अंदाजपत्रकास प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली. शासनाचे पत्र दिनांक १५/१२/२००४ अन्वये मृत साठयातील पाण्याचा उपयोग सिंचनासाठी करण्यात आला या अनुषंगाने सिंचनासाठी उपलब्ध झालेल्या पाण्यातुन अकोला जिल्हयातील ९२८८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असल्याने प्रकल्पीय सिंचन क्षमता ९१८०० हेक्टर वरुन १०१०८८ हेक्टर इतकी झाली.

मुळ प्रशासकीय मान्यता व प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकातील धरणाचा काटेछद, सांडवा, वक्रद्वारे, उ.सिं.योजनांची स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत घटक कामासाठी अतिशय ढोबळ मानाने तरतुदी ठेवण्यात आल्या होत्या. द्वितीय सु.प्र.मा. पुर्वी धरणाच्या सर्वसाधारण आराखडा म.सं.सं.नाशिक यांनी दिल्या प्रमाणे व उ.सिं.योजनेच्या घटक कामाचे सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी प्रदान केली. त्याआधारे द्वितीय सु.प्र.मा. अंदाजपत्रकात अंतर्भुत करण्यात आली.

बुलडाणा जिल्हयातील सिंचन अनुशेष पूर्ण करावयाचा झाल्यास जिगाव प्रकल्पावर उपसा सिंचन योजना राबविण्याशिवाय पर्याय नाही. जिगाव प्रकल्पास प्रवाही कालव्याव्दारे प्रश्न सुटणार नाही. तथापि कालव्याव्दारे एवढे मोठे क्षेत्र सिंचनाखाली आणता येणार नाही. त्यामुळे उपसा सिंचन योजनाव्दारे १०१०८८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणून सिंचनाचा अनुशेष कमी करण्यासाठी हा एकच पर्याय असल्यामुळे शासनाने या प्रकल्पास मान्यता देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

प्रकल्प कामाची सद्यःस्थिती

- प्रकल्पाचे माती धरणाचे काम दिनांक ३०.११.२००८ रोजी सुरु झाले आहे.
- सद्यःस्थितीत जलरोधी चराचे खोदकाम, माती भरावाचे काम प्रगतीपथावर आहेत.
- उपसा सिंचन योजनेचेही काम प्रगतीपथावर आहे.
- प्रकल्प बांधकामाच्या तलांकानुसार पुनर्वसनाचे ५ टप्प्यामध्ये नियोजन करण्यांत आलेले असुन, प्रथम टप्प्यामधील ६ गावांच्या नविन गांवठाणाच्या स्थळासह एकुण ३१ गावांची स्थळ निश्चिती पुर्ण झालेली आहे.
- नविन गांवठाणासाठी आवश्यक ७४२ हे.पैकी १ गावाचे पुर्ण व ७ गावांचे अंशतः असे एकुण १३१ हे. क्षेत्र ताब्यामध्ये असुन ३ गावांसाठी भुखंड आखणी पुर्ण व १ गावांची अंशतः झालेली आहे. मौ. खरकुंडी या गावाच्या नागरी सुविधांच्या कामाची निविदा अंतिम टप्प्यामध्ये असुन इतर दोन मौ. पलसोडा व मौ. टाकळी वतपाळ या गावांच्या नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

- प्रकल्पासाठी एकुण आवश्यक १७००० हे. क्षेत्रापैकी २३०६ हे. क्षेत्र ताब्यामध्ये आहे.

मार्च २०१२ अखेर एकुण खर्च (१३.५७७ + ८४०.२९६) -रुपये ८५३.८७३ कोटी

प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यासाठी भौतिक व आर्थिक नियोजन

धरणात जून-२०१५ मध्ये पाणीसाठा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार धरणाचा बांधकाम कार्यक्रम सुधारीत करण्यात आल्यामुळे त्यास सुसंगत अशा प्रकारे उपसा सिंचन योजना बांधकाम कार्यक्रम सुधारीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमात उपसा सिंचन योजनांची कामे सप्टेंबर-२०१५ अखेर कार्यान्वीत करण्याचे नियोजन केले आहे.

अ)	**भौतिक नियोजन**			**ब)**	**आर्थिक नियोजन**	
१	पुनर्वसन	--	डिसेंबर २०१४	२०१२-१३	--	रुपये १८४.६० कोटी
२	धरण घळभरणी	--	जुन २०१५	२०१३-१४	--	रुपये ७९४.०३ कोटी
३	उपसा सिंचन योजना	--	सप्टेंबर २०१५	२०१४-१५	--	रुपये ८१५.३४ कोटी
४	वितरण प्रणाली	--	मार्च २०१७	२०१५-१६	--	रुपये ५१८.०१ कोटी
				२०१६-१७	--	रुपये ८३८.२९ कोटी
						एकूण : ३१९०.२७ कोटी

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)

१	प्रकल्पाचे नांव	वान प्रकल्प	तालुका :-तेल्हारा	जिल्हा:-अकोला	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	१९१७७	निर्मित सिंचन क्षमता (हे) जून २०१२	१८९२४	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.) १४४२८ हे. (०३-०४)

३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०६.०६.१९७९	१९७७-१९७८	१३.३७	१९१७७
	सुप्रमा-१	१९.११.१९९७	१९९२-१९९३	१३४.६६	१९१७७
	सुप्रमा-२	०७.१२.२०००	१९९९-२०००	२२८.४०	१९१७७
	सुप्रमा-३	०२.०२.२००९	२००७-२००८	२७६.३२	१९१७७
	सुप्रमा-४	--	--	--	
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२१.१२.१९८८	--	४६.८५	पत्र क्र.८/२४०/८८ पीएडी/५२९/ दि.२१.१२.१९८८

४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	२५४.०४
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)	१३.७५
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	२०७.१८
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)	३३.११
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७९-१९८०
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	वर्ष १९७९

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	१०४.२६	३९.६६
७.२	भूसंपादन,पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळ खर्चातील वाढ (तृतीय प्र.मा.तरतुद **१५.७७** कोटी - मुळ प्र.मा.तरतुद **०.२४**)	१५.५३	५.९०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	४.०६	१.५५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	४२.७६	१६.२६
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) अ इ.टी.पी. (६४.६८ अ ३१.६६)	९६.३४	३६.६३

८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**		
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन		१०० टक्के पुर्ण
८.२	धरण (टक्केवारी)		१०० टक्के पुर्ण
८.३	कालवा (एकुण लांबी ३५९ कि.मी.) (वितरण प्रणालीसह)	झालेली लांबी ३५३ कि.मी. (वितरण प्रणालीसह)	९८ टक्के पुर्ण
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र २२५२५ हे.)	२१२९२ हे.	९५ टक्के पुर्ण
८.५	पाटचा-यांची कामे : (एकुण क्षेत्र २२५२५ हे.)	पाटचा-यांची कामे तयार झालेले क्षेत्र २१२९२ हे.	९५ टक्के पुर्ण.
८.६	संकल्पीत पाणी साठा (८३.४६५ द.ल.घ.मी.)	निर्माण झालेला पाणीसाठा ८३.४६५ द.ल.घ.मी.	१०० टक्के संकल्पीत जलसाठा निर्मिती झाली आहे.

७.३ ते ७.५ मधील किंमत वाढीचा सविस्तर तपशिल.

(७.३) प्रकल्पातील व्याप्तीतील बदल. **वाढ**

१	मुळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकामध्ये Power outlet चा अंतर्भाव नव्हता. त्यानंतर या बाबींचा अंतर्भाव झाला आहे.	१.५५ कोटी
२	अस्तरीकरणाचा अंतर्भाव व अतिरिक्त बांधकामे	२.५१ कोटी
	एकूण	**४.०६ कोटी**

(७.४) सविस्तर सर्वेक्षण व संकल्पचित्र यामुळे झालेली वाढ. **वाढ**

१	धरणभिंत दगडी बांधकामाऐवजी कोलग्राऊट मध्ये करणे तसेच १२न्५ मी. चे ७ द्वारांऐवजी १२ न ८ मी. चे ६ द्वारे घेतली तसेच सिंचन विमोचकास स्टील लायनींग केल्यामुळे	२०.६८ कोटी
२	बांधकामांच्या प्रकारातील बदल तसेच कालवे व उपकालव्यावरील अतिरिक्त बांधकामे	७.२९ कोटी
३	केंद्रिय जल आयोगाचे सुचनेनुसार कुपनलिकांचा अंतर्भाव करण्यात आला	२.५२ कोटी
४	उर्ध्वबाजुस कोलग्राऊटची Septum Width ३.०० मी. वरुन ५.०० मी. केली	७.२३ कोटी
५	सिंचन विमोचके व Power Outlet, Constuction sluice यांची सविस्तर संकल्पने प्राप्त झाल्यानंतर झालेली वाढ	०.३४ कोटी
६	कुपनलिकांची संख्या ५४ वरुन २२८ करण्यात आली	४.७० कोटी
	एकुण	**४२.७६ कोटी**

(७.५) इतर कारणे.

वाढ

१	आस्थापना खर्चामधील वाढ	३१.६६ कोटी
२	कुपनलिकांची देखभाल दुरुस्ती	१.६१ कोटी
३	कुपनलिकांची विद्युत जोडणीसाठीची तरतुद	८.०२ कोटी
४	कोलग्राऊट बांधकामासाठी आवश्यक बाबी जसे प्रेशर सेल, कंत्राटदाराचे दावे, सौंदर्यीकरण इ.	१०.७७ कोटी
५	कोलग्राऊट बांधकामातील अत्यावश्यक बाबींचा अंतर्भाव	१.१८ कोटी
६	विमोचकामधील इतर बदलामुळे	०.४३ कोटी
७	बेलखेड शाखा कालव्यावर प्रपात व नियंत्रक व पुल या कामासाठी अतिरिक्त तरतुद	१.१३ कोटी
८	बेलखेड शाखा कालव्यावरील अतिरिक्त मातीकाम	०.७० कोटी
९	लाभक्षेत्र विकास कामांचा केलेला अंतर्भाव व निवडक ठिकाणी अस्तरीकरण	१७.२८ कोटी
१०	लाभक्षेत्र विकास कामांचा केलेला अंतर्भाव	१५.०३ कोटी
११	कोलग्राऊट बांधकामासाठी लागणारे दगड व रेतीच्या वहनावळ अंतरामध्ये झालेली वाढ	८.०७ कोटी
१२	इतर कारणे	०.४६ कोटी
	एकुण	**९६.३४ कोटी**

वान प्रकल्प

ता.तेल्हारा जि.अकोला

संक्षिप्त टिप्पणी

प्रस्तावना

वान प्रकल्प हा अकोला जिल्हया मधील तेल्हारा तालुक्यातील मोठा प्रकल्प असून वारी (भैरवगड) या गावा जवळ वान नदीवरील प्रकल्प आहे. या प्रकलपामुळे अकोला जिल्हयातील ४१ गांवे व बुलढाणा जिल्हयातील १३ गावांना सिंचनाचा लाभ मिळत आहे.

प्रशासकीय मान्यता

प्रकल्पाला माहे फेब्रुवारी २००९ मध्ये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यता ते तृतीय सु.प्र.मान्यते बाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	विवरण	किंमत (रु.कोटी)	दिनांक	दरसूचि वर्ष.
१	२	३	४	५
१	मुळ प्रशासकीय मान्यता	१३.३७	०६/०६/१९७९	१९७७-१९७८
२	प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता	१३४.६६	१९/११/१९९७	१९९२-१९९३
३	व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता.	२२८.४०	०७/१२/२०००	१९९९-२०००
४	तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता.	२७६.३२	०२/०२/२००९	२००७-२००८

- तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत किंमत वाढीचा तपशिल पुढील प्रमाणे देण्यांत येत आहे.

(७.१) <u>दरसूचितील झालेली वाढ</u>

प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७७-७८ च्या दरसूचिवर १३.३७ कोटी रुपयास प्राप्त झाली. त्यानंतर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता २००७-२००८ च्या दरसूचि नुसार २७६.३२ कोटी रुपयास प्राप्त झाली. या ३० वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीमुळे दरवर्षी दरसूचिमध्ये होणा-या वाढमुळे त्यात १०४.२६ कोटी ने वाढ झाली आहे.

(७.२) भूसंपादन/पुनर्वसन/NPV किंमत मुळे झालेली वाढ.

मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून दरवर्षी बाजार मुल्य दर तक्त्यानुसार जमीनीचे दारात (शिघ्रसिध्द गणकाचे) प्रतिवर्ष ५ ते १० टक्के वाढ झालेली आहे. त्यामुळे भूसंपादनाच्या किंमतीत वाढ झालेली दिसून येते.

प्रकल्प कामाची सद्यःस्थिती.:

- प्रकल्पाची बहुतांश कामे पुर्ण झालेली असुन उर्वरीत भाग-१ ची किरकोळ कामे व कुपनलीका विद्युत जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत.

- प्रकल्पाव्दारे मागील ११ वर्षापासुन सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी पाणी पुरवठा केला जात आहे. तसेच १.५ मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प स्थित असुन त्याव्दारे विज निर्मिती केली जाते.

मार्च २०१२ अखेर खर्च (२१७.७१ + ३६.३३) = रुपये २५४.०४

प्रकल्पाव्दारे मिळत असलेले फायदे.

- **सिंचन :** प्रकल्पाव्दारे निर्मिती सिंचन क्षमता १८९२४ हे. चा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वापर होत आहे.
- **पेय जलपाणी पुरवठा योजना** : प्रकल्पामधुन ५ बिगर सिंचन पाणी पुरवठा योजना मंजूर असुन त्याव्दारे, ३.२० लक्ष लोकसंख्येस पिण्याच्या पाण्याचा लाभ होत आहे. बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे ३७३३ हे. सिंचन क्षमता प्रभावित झालेली आहे.
- **पुनर्वसन निरंक** : प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र पुर्णपणे वन जमीनीचे असुन त्यामध्ये एकही गांव बाधीत होत नसल्याने पुनर्वसन करण्याची आवश्यकता भासली नाही.

- **जलविद्युत निर्मिती :** वान प्रकल्पावर १५०० किलोवॅट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्प स्थित असुन सन २००७ पासुन जलविद्युत निर्मितीस प्रारंभ झाला आहे. धरणामध्ये पावसाळयात जेव्हा अतिरिक्त पाणी येते ते पाणी सांडव्यावरुन न सोडता जलविद्युत निर्मितीसाठी सोडण्यांत येते. विद्युत निर्मितीनंतर आवश्यकतेनुसार हे पाणी कालव्याव्दारे सिंचनास किंवा अती वाहकातुन पुन्हा नदीत सोडण्यांत येते. नदी मधील अतिरीक्त येवा बंद झाल्यानंतर जेंव्हा सिंचनाकरीता पाण्याची आवश्यकता असते त्याच वेळी सदर पाणी विद्युत विमोचकाव्दारे सोडून विज निर्मिती करण्यांत येते व हेच पाणी पुढे कालव्याव्दारे सिंचनाकरीता सोडण्यांत येते. त्यामुळे विद्युत निर्मिती करीता कोणतेही अतिरीक्त पाणी खर्च होत नाही हे विशेष आहे. आतापर्यंत प्रकल्पावर ४५,३९,१८० युनिट जलविद्युत निर्मिती झाली आहे.
- सद्य:स्थितीमध्ये प्रकल्पाचे ९८ टक्के काम पुर्ण झालेले असुन सिंचन, पेय जल पाणी पुरवठा योजना व मत्स्य व्यवसाय या व्दारे महसुल प्राप्ती होत आहे.
- मार्च २०१२ अखेर पर्यंत प्रकल्पावर २५४.०४ कोटी रु. ची कामे करण्यांत आली आहेत.

प्रकल्पाव्दारे मिळत असलेले फायदे.

- **सिंचन :** प्रकल्पाव्दारे निर्मिती सिंचन क्षमता १८९२४ हे. चा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वापर होत आहे.
- **पेय जलपाणी पुरवठा योजना** : प्रकल्पामधुन ५ बिगर सिंचन पाणी पुरवठा योजना मंजूर असुन त्याव्दारे, ३.२० लक्ष लोकसंख्येस पिण्याच्या पाण्याचा लाभ होत आहे. बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे ३७३३ हे. सिंचन क्षमता प्रभावित झालेली आहे.
- **पुनर्वसन निरंक** : प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र पुर्णपणे वन जमीनीचे असुन त्यामध्ये एकही गांव बाधीत होत नसल्याने पुनर्वसन करण्याची आवश्यकता भासली नाही.

- **जलविद्युत निर्मिती :** वान प्रकल्पावर १५०० किलोवॅट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्प स्थित असुन सन २००७ पासुन जलविद्युत निर्मितीस प्रारंभ झाला आहे. धरणामध्ये पावसाळयात जेव्हा अतिरिक्त पाणी येते ते पाणी सांडव्यावरुन न सोडता जलविद्युत निर्मितीसाठी सोडण्यांत येते. विद्युत निर्मितीनंतर आवश्यकतेनुसार हे पाणी कालव्याव्दारे सिंचनास किंवा अती वाहकातुन पुन्हा नदीत सोडण्यांत येते. नदी मधील अतिरीक्त येवा बंद झाल्यानंतर जेंव्हा सिंचनाकरीता पाण्याची आवश्यकता असते त्याच वेळी सदर पाणी विद्युत विमोचकाव्दारे सोडून विज निर्मिती करण्यांत येते व हेच पाणी पुढे कालव्याव्दारे सिंचनाकरीता सोडण्यांत येते. त्यामुळे विद्युत निर्मिती करीता कोणतेही अतिरीक्त पाणी खर्च होत नाही हे विशेष आहे. आतापर्यंत प्रकल्पावर ४५,३९,१८० युनिट जलविद्युत निर्मिती झाली आहे.
- सद्य:स्थितीमध्ये प्रकल्पाचे ९८ टक्के काम पुर्ण झालेले असुन सिंचन, पेय जल पाणी पुरवठा योजना व मत्स्य व्यवसाय या व्दारे महसुल प्राप्ती होत आहे.
- मार्च २०१२ अखेर पर्यंत प्रकल्पावर २५४.०४ कोटी रु. ची कामे करण्यांत आली आहेत.

सिंचन प्रकल्पाचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नांव : पेनटाकळी**		**तालूका : मेहकर**	**जिल्हा : बुलडाणा**	
२	प्रकल्पीय सिंचनक्षमता (हेक्टर) १४३३२		निर्मित सिंचन क्षमता १४०३२ हेक्टर	जून २०१२ अखेर प्रत्यक्ष सिंचन निर्मित ७७०४ हेक्टर	
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकिय मान्यता	६.१.१९८९	१९८७-८८	१६.८५	९१०४
	सुप्रमा-१	२१.३.१९९८	१९९४-९५	८९.४९	१४३३२
	सुप्रमा-२	२५.१०.२००५	२००३-०४	१७२.४५	१४३३२
	सुप्रमा-३	२४.६.२००९	२००७-०८	२३०.२७	१४३३२
	सुप्रमा-४				
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत		नवि दिल्ली के.ज.आ. २/४०७/डब्ल्यू आर/२४.९.०७ रु.१६९.६७ कोटी		
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			:	२०५.१५
४.२	भूसंपादन, पूनर्वसन/ वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)			:	५३.१४
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			:	१२८.८४
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			:	२३.१७
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:	१९८९-९०
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			:	१९८९-९०
	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			९९.१८	४६.४७
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ(२८.७६-१.०३) = २७.७३			२७.७३	१२.९९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतूदीमूळे झालेली वाढ)			४.३७	२.०५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			३५.८८	१६.८१
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (२५.६७अ१७.५९ ईटीपी)			४६.२६	२१.६८
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती- प्रकल्प पुर्ण झाला असुन उर्वरीत कालव्याची व भाग-१ ची कामे सुरु आहेत.				
८.१	भू-संपादन,पूनर्वसन,वनजमीन संपादन			पूर्ण	१०० टक्के
८.२	धरण			पूर्ण	१०० टक्के
८.३	कालवा		एकुण लांबी झालेली लांबी	२१ कि.मी. २० कि.मी.	९५ टक्के
८.४	वितरण व्यवस्था		एकुण लांबी झालेली लांबी	६६ कि.मी. ६० कि.मी.	९० टक्के
८.५	पाटचायांची कामे :		एकुण क्षेत्र झालेले क्षेत्र	४३३४ हे. १५५३ हे.	३६ टक्के

ता. अ.क्र.७.३ ते ७.५ नूसार प्रकल्पाच्या किंमतीत झालेल्या वाढी बाबत कारणे

७.३ : प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदल अंतर्गत मुख्य कालवा कि.मी.३३ पुढील कालव्यावरील सिंचनाऐवजी तापी खोऱ्यातील शाखा कालव्याद्वारे सिंचन प्रस्तावित करण्यांत येऊन त्याऐवजी पैनगंगा नदीवर ६ को.प.बंधाऱ्याद्वारे उपसा सिंचन प्रस्तावित करण्यांत आले आहे. व कालव्याची लांबी कमी करण्यांत आली. त्यामुळे ४.३७ कोटी रुपयांची वाढ झाली.

७.४ : सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

पाणीवापर संस्था महासंघाच्या मागणीनूसार दोन अतिरिक्त को.प.बंधाऱ्याची तरतूद करण्यांत आली आहे. ती ५.९३ कोटी रुपये आहे.

७.५ : इतर कारणे :

सुधारीत अंदाजपत्रकात द्वार प्रचलनाकरीता स्वयंचलित यंत्रणा बसविण्यासाठी रु.३.१३ कोटी खर्च झाली आहे. व स्वयंचलीत संगणकीकृत प्रणालीसाठी रु.१.२० कोटी रुपयाची तरतूद करण्यांत आली आहे.

सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमूळे क्षतीग्रस्त झालेला पूच्छ कालव्याची पूनःस्थापणा करण्यांत आलेली आहे, त्यामुळे ७.७० कोटी रुपये अतिरिक्त खर्च झाला.

मुळ अंदाजपत्रकामध्ये तरतुद न केलेल्या बाबीमुळे काही प्रमाणात अधिक्य झाले आहे.

मुख्य कालवा व शाखा कालव्याच्या अस्तरीकरणासाठी रु.६.५५ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आली आहे.

तसेच प्रकल्पाच्या ईटीपी वर १७.५९ कोटी रुपये खर्च झाला आहे.

पेनटाकळी प्रकल्प

ता.मेहकर जि.बुलडाणा

१) <u>प्रशासकिय मान्यता/सु.प्र.मा. किंमतीतील वाढीची कारणे :</u>

पेनटाकळी प्रकल्प ता.मेहकर जि.बुलडाणा या योजनेस दिनांक ०६/०१/१९८९ नूसार रुपये १६.८५ कोटी किंमतीस मूळ प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे. या योजनेच्या कामास मार्च १९९० मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु होई पर्यत दरसूचीच्या दरात वाढ झाल्यामूळे धरणाच्या काही बाबींमध्ये बदल झाल्यामूळे, जमीनीचे दर वाढल्यामूळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली. तसेच प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्याने उदा. मुख्य कालवा कि.मी. ३३ पुढील कालव्यावरील सिंचनाऐवजी तापी खोऱ्यातील शाखा कालव्याद्वारे सिंचन प्रस्तावित करण्यांत आले व त्याऐवजी पैनगंगा नदीवर ६ को.प.बंधाऱ्याद्वारे उपसा सिंचन प्रस्तावित करण्यांत आले. त्या अनुषंगाने या योजनेस दिनांक २१/३/१९९८ नूसार रुपये ८९.४९ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.

प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असतांनाच दरसूचीतील वाढ बांधकाम साहित्याच्या वहनावळीत वाढ,अभियांत्रिकी बदल, जमीनीच्या दरात वाढ, अतिरिक्त बाबी इत्यादी कारणांमूळे प्रकल्पाच्या किंमती वाढ झाली. त्या अनुषंगाने या प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकास दिनांक २५/१०/२००५ नूसार रु.१७२.४५ कोटी यास मंजूरी प्राप्त आहे.

दरसूचीतील वाढ सन २००६ मधील अतिवृष्टीमूळे क्षतिग्रस्त झालेल्या पूच्छ कालव्याची पूनर्स्थापना, प्रकल्पाची उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी लागणारी आवश्यक तरतूद, पाणीवापर संस्थेच्या महसंघाद्वारे दोन अतिरिक्त को.प.बंधाऱ्याची मागणीचे अनुषंगाने केलेली तरतूद इत्यादी कारणांमूळे प्रकल्पीय किंमतीत वाढ संभवत असल्याने प्रकल्पाची तृतीय सुधारीत अंदाजपत्रक सु.प्र.मा. तयार करण्यांत आले असून त्यास २३०.२७ कोटी रुपयास मान्यता प्राप्त आहे.

२) <u>भौतीक साध्य :</u>

हया प्रकल्पाचे धरणाचे काम पूर्ण झालेले असून १०० टक्के जलसाठा निर्माण झालेला आहे. कालवा व वितरण प्रणालीची भाग-१ ची कामे पूर्णत्वास येत आहेत. या प्रकल्पाची एकुण सिंचनक्षमता १४३३२ हेक्टर असून निर्मित सिंचनक्षमता १४०३२ हेक्टर आहे. उर्वरीत ३०० हेक्टर सिंचनक्षमता सन २०१२-१३ मध्ये पूर्ण करणे नियोजित आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	**प्रकल्पाचे नांव : निम्न पेढी प्रकल्प** तालुका : **भातकुली** जिल्हा : **अमरावती**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area) : १२२९२	निर्मित सिंचन क्षमता : (हेक्टर) जून-२०१२ :	०.००	प्रत्यक्ष झालेले : सिंचन (हेक्टर)	०.००
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१२.८.२००४	२००३-०४	१६१.१७	१०१९२
	सुप्रमा-१	१४.८.२००९	२००८-०९	५९४.७५	१२२९२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२८.७.२००८	२००६-०७	२८३.१०	१०१९२
	Investment clearance	१४.८.२००८	२००६-०७	२८३.१०	१०१९२
१	**प्रकल्पाचे नांव – लाल नाला प्रकल्प तालुका-समुद्रपुर, जिल्हा वर्धा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ७२९०	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	३७८३	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	४८० प्रवाही व उपसा
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१.१०.१९८३	१९८२-८३	६.८९	७२९०
	सुप्रमा -१	१६.१०.१९९२	१९९१-९२	१९.०५	७२९०
	सुप्रमा-२	१३.५.२००२	१९९९-२०००	५९.१७	७२९०
	सुप्रमा-३	२९.८.२००६	२००३-०४	१०३.४८	७२९०
	सुप्रमा-४	५.१२.२०११	२००८-०९	२०२.५१	७२९०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	पत्र क्र.२०(१३/०७) जस दि.२३.३.०७		१०३.४८ (हे.)- केंद्रीय जल आयोगाची तांत्रिक सल्लागार समिती नवि दिल्ली यांची ८८ वी बैठक दि.२.३.०७	
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				:- १५७.९०
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)				:- ३६.२२
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)				:- १११.५४
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)				:- १०.१४
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				:- १९९३
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रू.२१.७२ कोटी) :- १९९३				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम	टक्के
७.१	दरसूचीतील वाढ			७६.६२	३९.१६
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			२१.६३	११.०६
	सुप्रमा तरतुद रु.२२.९७ कोटी - प्रमा तरतुद रु.१.३४ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात			६४.५५	३३
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१३.७९	७.०५
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१९.०३	९.७४
	एकूण			१९५.६२	१००
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन				
	अ) भुसंपादन (एकुण १६५५ हे. पैकी १६४२ हे. संपादित)				९८
	ब) पुनर्वसन (एकुण गांवे ३ पैकी ३ पुर्ण)				१००
	क) वनजमिन (२९.८३ हे. पैकी २९.८३ हे.)				१००
८.२	धरण				१००
८.३	कालवा (एकुण लांबी ३८.२३ कि.मी.)		झालेली लांबी ३८.२३ किमी).		१००
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र ७२९० हे.		वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र ३७८३		५२
८.५	पाटचा-याची कामे (एकुण क्षेत्र ७२९०हे.		पाटचा-याची कामे तयार झालेले क्षेत्र १५१३ हे.)		२५

लाल नाला प्रकल्प तह. समुद्रपूर जि. वर्धा संक्षिप्त टिप्पणी

प्रकल्पाची रुपरेषा :-

लाल नाला प्रकल्प हा वर्धा जिल्हयातील समुद्रपूर तालुक्यातील कोरा गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात आलेला मध्यम प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे वर्धा जिल्हयाच्या ३४५ हे. व चंद्रपूर जिल्हयाचे ५०५५ हे. असे एकुण ५४०० हे. क्षेत्रात सिंचनाचा लाभ होणार आहे.

प्रकल्पास मिळालेला विविध मान्यतेचा तपशिल

मुळ प्रशासकिय मान्यता	रु. ६.८९ कोटी दि. ३१/१०/१९८३ दरसुची १९८२-८३
प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता (नव्याने सुप्रमा)	रु. १९.०५ कोटी दि.१६/१०/१९९२ दरसुची १९९१-९२
व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता	रु. ५९.१७ कोटी दि. १३५८/२००२ दरसुची १९९९-२०००
तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता	रु. १०३.४८ कोटी दि. २९/८/२००६ दरसुची २००३-०४
चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता	रु. २०२.५१ कोटी दि. ०५/१२/२०११ दरसुची २००८-०९
वन/पर्यावरण मान्यता	
केंद्रीय जलआयोग नवी दिल्लीच्या टि.ए.सी. मान्यता	रु. १०३.४८ कोटी दि. २३/०३/२००७ दरसुची २००३-०४

लाल नाला प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास मुळ प्रशासकिय मान्यता दि. ३१/१०/१९८३ ला रु. ६.८९ कोटी रुपयास प्राप्त असुन प्रकल्पाचे काम पहिल्या पाच वर्षात निधी उपलब्ध न झाल्याने मुळ प्रशासकिय मान्यता व्यपगत झाली व त्यामुळे प्रकल्पास नव्याने प्रथम सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास शासन स्तरावरुन दिनांक १९/१०/१९९२ ला मंजूरी प्राप्त झाली. व त्यामुळे सुरुवातीच्या कालावधीत ९ वर्षाने वाढ झाली. प्रकल्पाचे बांधकामास प्रत्यक्षात सन १९९३ ला सुरुवात झाली

प्रकल्पावर झालेल्या खर्चाचा तपशिल

१) सन १९९२-९३ ते १९९४-९५ पर्यंत झालेला खर्च	--	रु. १.२७ कोटी
२) सन १९९५-९६ ते १९९९-२००० पर्यंत झालेला खर्च	--	रु. १३.६४ कोटी
३) सन २०००-०१ ते २०१२ पर्यतं	--	रु.१४२.९९ कोटी
	एकुण	**रु. १५७.९० कोटी**

अ) मुळ प्रशासकिय मान्यता ते प्रथम सुप्रमा- वाढ रु. १२.१६ कोटी

वाढ होणारी किंमत आणि कारणे

१) निव्वळ दरसुची फरकामुळे झालेली वाढः-**रु.९.०० कोटी** सन १९८२-८३ ते १९९१-९२ या कालावधीत झालेल्या दरसूचीतील वाढीमुळे.

२) भुसंपादनाच्या किंमती वाढीमुळे :-**रु.०.७४ कोटी** (मुळ प्रशासकिय मान्यता प्रस्तावात संपादित करावयाचे जमिनीचा दर ६००० रु./प्रति हे.होता. प्रथम सु.प्र.मा. च्या वेळेस जमिनीच्या किंमतीच्या दरात वाढ होऊन तो दर १२००० /प्रति हे. झाला. त्यामुळे एकुण ०.७४ कोटी रुपयाने वाढ झाली. तसेच प्रथम सु.प्र.मा. च्या वेळेपर्यंत निधी उपलब्ध न झाल्याने प्रत्यक्षात काम सन १९९३ पासुन सुरु झाले.)

३) अनुषंगिक खर्चामुळे झालेली वाढ :-अनुषंगिक खर्चामुळे २.४२ कोटी रु. ने वाढ झाली.

ब) प्रथम सुप्रमा ते व्दितीय सुप्रमा :- वाढ रु. ४०.१२ कोटी

वाढ होणारी किंमत आणि कारणे

१) निव्वळ दरसुची फरकामुळे झालेली वाढ :- **रु. २६.१८ कोटी** सन १९९१-९२ ते १९९९-२००० या कालावधीत झालेल्या दरसूचीतील वाढीमुळे.

२) भुसंपादनाच्या किंमती वाढीमुळे :- **रु. ०.७८ कोटी** (प्रकल्पाच्या प्रथम सु.प्र.मा. प्रस्तावात बुडित क्षेत्रात येणा-या बाधित गावठाणातील घरांची मुल्यांकनाची तरतूद ढोबळमानाने करण्यात आली होती. त्यामुळे आता नव्याने मुल्यांकनाची किंमत प्रस्तावित केल्यामुळे रु. ०.४४ कोटीची वाढ झाली. तसेच या व्दितीय सु.प्र.मा. च्या किंमतीत जमिनीचा दर २५००० प्रती हेक्टर झाल्याने ०.३४ कोटी रुपयाची वाढ झाली. अशी एकुण ०.७८ कोटींनी वाढ झाली.)

३) सर्व्हेक्षण व संकल्पनातील बदलामुळे झालेल वाढ :- **रु. ५.२० कोटी (**१) मुळ सु.प्र.मा. प्रस्तावातील तरतूद सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनेवर आधारीत नव्हते. म्हणजेच ढोबळमानाने तरतुद करण्यात आली होती. धरणाच्या सांडव्याचे बांधकाम व त्यावरील १२ ¬ ३ मी. चे ५ व्दारांचे किंमतीची पुरेशी तरतूद नसल्याने प्रत्यक्षात म.सं. संघटना नाशिक यांचेकडुन प्राप्त संकल्पनामुळे त्यात ३.१० रु. कोटीने वाढ

झाली. (२) तसेच प्रकल्पाच्या कालव्यावरील बांधकामाच्या किंमतीची तरतूद ढोबळमानाने करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात कालव्यावरील बांधकामाचे संकल्पचित्र तयार करुन त्यानुसार येणा-या किंमतीत २.१० कोटी रु. ने वाढ झाली. अशी एकुण ५.२० कोटीने वाढ झाली.

४) अनुषंगिक खर्चातील वाढ :-**रु. २.७७ कोटी** अनुषंगिक खर्चामुळे २.७७ कोटीने वाढ झाली.

क) व्दितीय सुप्रमा ते तृतीय सुप्रमा :-रु. ४४.३१ कोटी

वाढ होणारी किंमत आणि कारणे

१) निव्वळ दरसुची फरकामुळे झालेली वाढ :-रु. १८.१२ कोटी सन १९९९-२००० ते २००३-०४ या कालावधीत झालेल्या दरसूचीतील वाढीमुळे.

२) भुसंपादनाच्या किंमतीतील व पुनर्वसन किंमतीतील वाढ :-रु. २०.११ कोटी (१) प्रत्यक्षात भुसंपादन करण्यात येणा-या जमिनीची किंमत रु. ३७५०० प्रती हेक्टरनी संपादित करण्यात आल्याने रु. ७.३२ कोटीने वाढ झाली. (२) भुसंपादीत करण्यात येणा-या जमिनीच्या क्षेत्रात (मुळ सु.प्र.मा. च्या तुलनेत) वाढ झाल्यामुळे ३.९६ कोटीची वाढ झाली.

(३) तसेच पुनर्वसनाकरीता प्रस्तावित नविन गावठाणात पुरविण्यात येणा-या नागरी सुविधा अंतर्गत सोयीकरीता झालेला खर्चात ३.८३ कोटीची वाढ झाली. (४) प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातुन जाणा-या ४०० कि.वॅट विद्युत वाहिणीचे स्थानांतर करण्याकरीता ५.०० कोटी रुपयाचा खर्च झाल्यामुळे वाढ झाली. सदर तरतूद मुळ प्रशासकिय मान्यतेमध्ये नसल्याने रु. ५.०० कोटींनी वाढ झाली.अशी भुसंपादन व पुनर्वसना अंतर्गत एकुण २०.११ कोटी रु. ने वाढ झाली.

३) अनुषंगिक खर्चातील वाढ :- रु. ४.४२ कोटी अनुषंगिक खर्चामुळे रु. ४.४२ कोटीने वाढ झाली.

४) इतर कारणे:- रु. १.६६ कोटी प्रकल्पाच्या मुळ प्र.मा. मध्ये कालवा बांधकामाचे तरतुद क्ष्ह्तत्र शिर्ष अंतर्गत एकुण ६ बांधकामाची तरतुद होती. परंतु प्रत्यक्षात बांधकामाच्या संखेत १९ नी वाढ झाल्याने त्यात रु. १.६६ कोटीची वाढ झाली.

ड) तृतीय सु.प्र.मा. ते चतुर्थ सु.प्र.मा. मध्ये वाढ -- रु. ९९.०३ कोटी

१) दरसुचीतील वाढ :- रु. २३.३२ कोटी प्रकल्पाची तृतीय सु.प्र.मा. किंमत रु. १०३.४८ कोटी हि दरसूची २००३-०४ च्या आधारावर होती. आता नव्याने चतुर्थ सु.प्र.मा. किंमत रु. २०२.५१ कोटी दरसुची २००८-०९ च्या दराचे आधारावर असल्याने रु. २३.३२ कोटी रुपयाची वाढ झाली. तसेच सदर वाढीत बांधकाम साहित्याकरीता स्वामित्व शुल्काची दरात वाढ झाल्याने एकंदरीत दरसुचीत वाढ झालेली आहे.

२) संकल्पनातील बदलामुळे :- रु. ८.५९ कोटी मुळ प्रशासकिय मान्यता प्राप्त प्रस्तावात पुच्छ कालव्यावर प्रपाताचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आलेले नव्हते. परंतु म.सं.संघटना नाशिक यांनी सांडव्याचे संकल्पन तसेच पुच्छ नालीचे संकल्पन करतेवेस सा.क्र. ६०० ते ९०० मी. मधिल कालवा उतार काढुन वर्षानंतरच्या प्रत्यक्ष निरीक्षणानंतर जमिनीची धुप कमी करण्याकरीता त्या ठिकाणी योग्य उपाययोजना करण्यात यावी. त्या अनुषंगाने झालेल्या कालवा उताराची धुप लक्षात घेता सा.क्र. ६६० मी. वर ३.२० मी. उंचीचा प्रपात म.सं.संघटना नाशिक व्दारे संकल्प चित्रात करण्यात आला. त्यामुळे ८.५९ रु. कोटीने वाढ झाली.

३) व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :- रु. ६४.५५ कोटी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रापैकी वरोता तालुक्यातील २४५० हे. सिंचन क्षेत्र कोळसा खदानीमुळे कमी झालेल्या क्षेत्राची भरपाई करण्यासाठी प्रकल्पाच्या साठयात चिमुर तालुक्यातील २४५० हे. सिंचन क्षेत्राकरीता उपसा सिंचन योजना लाल नाला प्रकल्पाचा भाग समजून प्रस्तावित करण्यात आली. उपसा सिंचन योजनेकरीता लागणा-या खर्चाची तरतुद चतुर्थ सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आली. सदर उपसा सिंचना योजना लोकप्रतिनीधींची मागणी व मा. राज्यमंत्री यांच्या पुढाकाराने प्रस्तावित करण्यात आली. व त्यास विपाविमं नागपूर कडुन पत्र दि.२७/२/२००९ अन्वये तत्वतः मंजूरी प्राप्त झाली. त्यानंतर त्यात शासन स्तरावरुन मान्यता प्रदान करण्यात आली. त्यामुळे एकुण प्रकल्पाच्या किंमतीत ६४.५५ कोटी रुपयाने वाढ झाली.

४) अनुषंगिक खर्च :- रु. ४.८६ कोटी प्रकल्पाच्या अनुषंगिक खर्चात ४.८६ कोटीने वाढ झाली आहे.

५) इतर कारणे :-रु. २.२९ कोटीची बचत प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील वरोरा शाखा कालव्याचे काम कोळसा खदानीमुळे कमी झाल्यामुळे वितरण प्रणालीच्या कामाच्या परिमाणात घट झाल्याने एकुण किंमतीत २.२९ कोटीची बचत झालेली आहे. सदर प्रकल्पास केंद्रिय जल आयोगाच्या तांत्रीक सल्लागार समिती नवी दिल्ली यांचे ८८ वी बैठक दिनांक २/३/२००७ पत्र दि.२३/३/२००७ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांव - तेढवा सिवनी उ. सिं. यो. तालुका - गोंदिया, जिल्हा -गोंदिया**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ४९३८	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	२६/५/२००८	२००७-०८	४४.९९	४९३८
	सुप्रमा -१	२८/१२/२०१०	२००९-१०	१०६.५५	४९३८
	अद्यावत किंमत	लागु नाही			
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)			लागु नाही	
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- २९.९५	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- ०.७०	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- २८.७७	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- ०.४७	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:- २००९-१०	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.५१.२९ कोटी) :- २००९-१० शिर्ष कामे				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			१२.५१	२०
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			१.६२	३
	सुप्रमा तरतुद रु.३.३१ कोटी - प्रमा तरतुद रु.१.६९ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			२४.९९	४१
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			२२.४४	३६
	एकूण			**६१.५६**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	भूसंपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन (आवश्यक जमीन ६६ - संपादीत ३३.८०, आवश्यक वन जमीन निरंक)				५१.०० टक्के
८.२	शिर्ष कामे (पंपगृह व उर्ध्वनलिका)				२०.०० टक्के
८.३	कालवा (एकूण लांबी १०.०५)	झालेली लांबी-० किमी			० टक्के
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ५४८६)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र -० हे.			० टक्के
८.५	पाटचायांची कामे (एकूण क्षेत्र)	पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्र ० हे.			धान बहूल क्षेत्र असल्यामुळे **आवश्यक** नाही

तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना

ता.गोंदिया **जिल्हा गोंदिया**

- **प्रकल्पाची रुपरेषा :-** तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना ही गोंदिया जिल्हयातील गोंदिया तालुक्यातील तेढवा गावाजवळ वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावर प्रस्तावित केली आहे. या योजनेपासून गोंदिया तालुक्यातील १९ गावांतील ३२९२ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा फायदा होणार आहे. गोंदिया तालुक्यातील वैनगंगा तिराच्या लगतचा भागासाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

  प्रस्तावित तेढवा शिवनी उपसा सिंचन योजनेचे शिर्ष भागाचे स्थळ (जॅकवेल-पंप गृह) मौजा तेढवा गावठाणात वैनगंगा नदीच्या डाव्या तिरावर प्रस्तावित करण्यांत आले आहे. या याचेजनेसाठी १७.२७ द.ल.घ.मी. पाणी वापर प्रस्तावित केला आहे.

- **मुळ प्रशासकिय मान्यता :-** रु.४४.९९ कोटी, दिनांक २६.५.२००८
- **प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता :-** रु.१०६.५५ कोटी, दिनांक २८.१२.२०१०
- **कामाची सद्यःस्थिती :-**
  - जॅकवेल व पंप हाऊस- २० टक्के पुर्ण
  - रायझिंग मेन (लांबी ५३१५ मी. व्यास -१३०० मिमी, जाडी ११ व ८ मिमी)- पाईपचा पुरवठा झाला आहे. उभारणी ७० टक्के पूर्ण.
  - स्विचयार्ड - पुढील वर्षी निविदा २०१३-१४ ला अपेक्षित.
  - पंप सामुग्री (६३० अश्वशक्तीचे ३ पंप) - पुढील वर्षी निविदा २०१३-१४ ला अपेक्षित.
  - मुख्य कालवा :- भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन काम २०१३ पासुन सुरु करण्यात येईल.
- **पाणी वापर :-** १७.२७ द.ल.घ.मी.
- **लाभक्षेत्र /सिंचन क्षमता /निर्मिती :-** ३२९२ हेक्टर/४९३८ हेक्टर/ शुन्य.
- **वनजमीन सद्यःस्थिती :-** आवश्यकता नाही.
- **भूसंपादन सद्यःस्थिती :-**
  - एकुण आवश्यक खाजगी जमीन - ६६ हेक्टर
  - एकुण संपादित खाजगी जमीन/दिलेला निधी - ७.१८ हेक्टर/रु.२९.३२ लक्ष.
  - कार्यवाही सुरु प्रकरणे (हेक्टर/संख्या) - २४.८९ हे./ ८ प्रकरणे
- **पुनर्वसन सद्यःस्थिती :-**
  - सदर प्रकल्पात पुनर्वसन नाही.
- **नियोजन :-** दरवर्षी या प्रकल्पास पुरेसा निधी उपलब्ध आहे. त्यानुसार शीर्ष कामे सुरु असून सन २०१३-१४ मध्ये पूर्ण होतील. कालव्याची कामे सन २०१३ मध्ये सुरु करण्याचे नियोजन आहे.

(१) मार्च २०१२ अखेर पर्यंत एकूण खर्च - रु. २९.९५ कोटी

(२) सन २०१२-१३ ची अर्थसंकल्पीय तरतूद - रु. १९.०० कोटी

- **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च : (रु. कोटी)**

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकूण
सन १९९५ - २००९ अखेर खर्च		०	०
२००९-१०	३.२६	०.०७	३.३३
२०१०-११	१४.५९	०.१९	१४.७८
२०११-१२	११.६२	०.२१	११.८३

- **अ) प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण : (रु. कोटी)**

मुळ प्र.मा. किंमत	सुधा. प्र.मा. किंमत	किंमत मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ		भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमूळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेला वाढ	
			रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के
४४.९९	१०६.५५	६१.५६	१२.५१	२०.३२	०	०	२४.९९	४०.५९	१.६२	२.६३	११.०३	१७.९२	११.४१	१८.५३

१. दरसूचीतील वाढ : प्रकल्पास प्राप्त मुळ प्र.मा. किंमत रु. ४४.९९ कोटी दरसूची २००७-०८ वर आधारीत होती. प्रथम सु.प्र.मा. ही रु. १०६.५५ कोटी दरसूची २००९-१० वर आधारीत असुन त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. १२.५१ कोटीची वाढ ही दरसूचीतील वाढीमुळे झालेली आहे.

२. व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : निरंक

३. तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ : या अंतर्गत रु. २४.९९ कोटीची वाढ झालेली आहे. मुळ प्रमा अंदाजपत्रकातील तरतुदी जुन्या प्रचलित पंपगृह, उर्ध्व नलिकेच्या आराखडयाप्रमाणे होत्या. बांधकाम सुरु केल्यावर संद्याचे प्रचलित धोरणावर आधारित म.स.स. कडुन प्राप्त प्रत्येक घटकाच्या संकल्पनाप्रमाणे खोदकामातील वाढ, राफ्ट फाऊंडेशनची तरतुद, पाया भराव तसेच सेवाद्वार व आकस्मीक द्वारांची उचल व्यवस्था या तरतुदी चे वाढीव परिमाण घेतल्याने वाढ झालेली आहे. तसेच उर्ध्वनलिकेच्या रचना व मांडणीचे कामाची तसेच पंप गृहाच्या बांधकामाची निविदा जास्त दराने स्विकारण्यात आल्याने सुप्रमा किंमतीमध्ये वाढ झालेली आहे.

४. भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ : खाजगी जमीनीच्या भावात वाढ झाल्यामूळे रु. १.६२ कोटीची वाढ झालेली आहे. जुना दर २.०० लक्ष /हेक्टर, नविन दर ५.०० लक्ष /हेक्टर.

५. इतर कारणांमूळे झालेली वाढ : या अंतर्गत रु. ११.०३ कोटीची वाढ झालेली आहे. उर्ध्व नलीकेच्या बाहेरील व आतील पृष्ठभागावर ॲन्टी करोजीव पेन्टीग इत्यादी बाबी अंतर्भुत केल्याने सुप्रमाच्या किंमती मध्ये वाढ झालेली आहे. रायल्टी मधील झालेली वाढ, मुळ प्र.मा.मध्ये विशेष कृती कार्यक्रमची तरतुद करण्यात आलेली नव्हती. आता विशेष कृती कार्यक्रम अंतर्गत १० टक्के अधिकची तरतुद केल्यामुळे वाढ झालेली आहे.

६. ईटीपी मध्ये झालेली वाढ : या अंतर्गत रु. ११.४१ कोटीची वाढ झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांव - निम्न चुलबंद प्रकल्प, तालुका - साकोली, जिल्हा - भंडारा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ८८७६	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे. मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२९/४/१९९५	१९९३ - ९४	४१.६७	८८७६
	सुप्रमा -१	३१/३/२००८	२००६ - ०७	११७.१८	८८७६
	सुप्रमा -२	-	-	-	-
	सुप्रमा -३	-	-	-	-
	सुप्रमा -४	-	-	-	-
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)				-
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- ७३.८४	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- १.६४	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- ६७.२८	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- ४.९०	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:- १९९५ -९६	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.५३.३५ कोटी) :- १९९७				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			३८.६१	५१.१३
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			१.५९	२.१
	सुप्रमा तरतुद रु.३.६७ कोटी - प्रमा तरतुद रु.२.०८ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			३.९२	५.१९
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			९.३५	१२.३८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			२२.०४	२९.२
	एकूण			**७५.५१**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भूसंपादन (आवश्यक जमीन ९०.०० हे. संपादीत ३१.४८ हे.) ब) पूनर्वसन क) वन जमिन संपादन आवश्यक वन जमीन १६.८५८ हे.अंतीम मान्यता प्राप्त)			६० टक्के लागु नाही १०० टक्के	
८.२	शिर्षकामे- अ) क्रॉक्रिट बॅरेज ब) रॉयझींग मेन व पंपहाऊस			९७ टक्के ६० टक्के	
८.३	कालवा (एकूण लांबी १८.२१) कि.मी.	झालेली लांबी-१२.७४ किमी		७० टक्के	
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ६३८६)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र -० हे.		०	
८.५	पाटचायांची कामे (एकूण क्षेत्र) /	पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्र ० हे.		धानाचे पिक असल्यामुळे पाटचा-याची गरज नाही.	

निम्न चुलबंद प्रकल्प

ता.साकोली जिल्हा भंडारा

- **प्रकल्पाची रुपरेषा :-** निम्न चुलबंद प्रकल्प कुंभली गावाजवळ चुलबंद नदीवर बांधण्याचे प्रस्तावित असुन नदीचे दोन्ही तिरावर मातीचे धरण व नदीचे पात्रात १०८ मी. लांबीचे संधानक धरण बांधुन १२ ¬ ६ मीटरचे ७ दरवाजे अंतर्भाव आहे व त्यापासुन साकोली तालुक्यातील २३ गावांतील ५९९७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच ३२ गावासाठी ३.००८ दलघमी पिण्याचे पाणी आरक्षणाचा अंतर्भाव आहे.

- **मुळ प्रशासकिय मान्यता :-** रु.४१.६८ कोटी, दिनांक २९.४.९५
- **प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता :-** रु.११७.१९ कोटी, दिनांक ३१-३-२००८
- **कामाची सद्यःस्थिती :-**
  - माती धरण (लांबी - २.२९० किमी) - ९५ टक्के पुर्ण
  - काँक्रीट बॅरेज (लांबी - ०.१०८ किमी) - १०० टक्के पुर्ण
  - जॅकवेल व पंप हाऊस- पंप हाऊसचे काम जून २०१२ मध्ये सुरु करण्यात आले.
  - रायझिंग मेन (१) (लांबी ६६० मी. व्यास - १२५० मिमी, जाडी ११ मिमी)
    (२) (लांबी ५००० मी. व्यास -९५० मिमी, जाडी ९ मिमी)- ८५ टक्के पुर्ण
  - उजवा मुख्य कालवा (६.९४ किमी) - माती काम ८० टक्के पुर्ण, बांधकाम ५० टक्के पुर्ण
  - डावा मुख्य कालवा (९.९२ किमी) - माती काम ६० टक्के पुर्ण, बांधकाम ५० टक्के पुर्ण
  - बॅरेजचे दरवाजे (१२ ज्र ६ मी. चे ७ व्हर्टीकल लीफ्ट द्वारे) - द्वार उभारणीचे काम पूर्ण झालेले आहे.
- **उपयुक्त पाणी साठा / पाणी वापर :-** ४.३०३ द.ल.घ.मी. / ३७.७९९ द.ल.घ.मी.
- **लाभक्षेत्र / सिंचन क्षमता / निर्मिती :-** ५९९७ हेक्टर/८८७६ हेक्टर /शुन्य.
- **वनजमीन सद्यःस्थिती :-** या योजनेकरिता १६.८५८ हे. वनजमिनीला अंतिम मान्यता प्राप्त.
- **भूसंपादन सद्यःस्थिती :-**
  - एकुण आवश्यक खाजगी जमीन - ९० हेक्टर
  - एकुण संपादित खाजगी जमीन/दिलेला निधी - ३१.४८ हेक्टर/रु.९६.४३ लक्ष.
  - कार्यवाही सुरु प्रकरणे (हेक्टर/संख्या) - ३९.८८ हे./ ९ प्रकरणे
- **पुनर्वसन सद्यःस्थिती :-**
  - सदर प्रकल्पात पुनर्वसन नाही.
- **नियोजन :-**
  - बॅरेजचे दरवाजे बंद करून ४.३०३ द.ल.घ.मी. (जिवंत साठा) निर्माण करणे सुरु आहे.
  - सदर साठयातुन खाजगी उपसा व्दारे सन २०१२-१३ रब्बीसाठी ५० हे. क्षेत्रास सिंचन करण्याचे नियोजित आहे.
  - सदर साठयामधुन ३२ गावांसाठी ३.००८ द.ल.घ.मी. पाणी वापर प्रस्तावित असलेली महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाची पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

➢ डिसेंबर -२०१३ पर्यंत पंपगृहाचे काम पूर्ण करून २०१४ पासुन प्रकल्पाचे लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे.

(१) मार्च २०१२ अखेर पर्यंत एकूण खर्च - रु. ७३.८४ कोटी.

(२) सन २०१२-१३ ची अर्थसंकल्पीय तरतूद - रु. १०.०० कोटी

- **मुळ सुप्रमा ते सध्याची मंजूर प्रथम सुप्रमा पर्यंत प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण : (रु. कोटी)**

मुळ प्र.मा. किंमत	सुधा. प्र.मा. किंमत	किंमत मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ		भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमूळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेला वाढ	
			रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के
४१.६८	११७.१९	७५.५१	३८.६१	५१.१३	०	०	९.३५	१२.३८	१.५९	२.११	१०.६०	१४.०४	१५.३६	२०.३४

१. दरसूचीतील वाढ : प्रकल्पास प्राप्त मुळ प्र.मा. किंमत रु. ४१.६८ कोटी दरसूची १९९३-९४ वर आधारीत होती. प्रथम सु.प्र.मा. ही रु. ११७.१९ कोटी दरसूची २००५-०६ वर आधारीत असुन त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. ३८.६१ कोटीची वाढ ही मुख्य:ता दरसूचीतील वाढीमुळे झालेली आहे.

२. व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : निरंक

३. तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ : मुळ सुप्रमा मध्ये तरतूदी सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनेवर आधारीत नव्हत्या म्हणजेच ढोबळमानाने घेण्यात आल्या होत्या. या अंतर्गत रु. ९.३५ कोटीची वाढ झालेली आहे. मसस कडुन प्राप्त संकल्पनाप्रमाणे मुळ प्रमा मधील बॅरेजचे व प्रस्तंभांचे बांधकाम दगडी बांधकामाऐवजी संधानकात प्रस्तावीत केल्याने व सुधारीत प्रमा मध्ये सदर बाब समाविष्ट केल्याने वाढ दिसत आहे. तसेच क्षेत्रीय आवश्यकतेनुसार उर्ध्व नलीकेची लांबी वाढल्याने किंमतीमध्ये वाढ झाली आहे.

४. भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ : मुळ सुप्रमामध्ये ८७०००/- हें. तरतूद करण्यात आलेली होती. परंतु प्रत्यक्षात २,००,००० प्रति हेक्टर भुगतान करण्यात येत आहे. त्यामुळे खाजगी जमीनीच्या भावात वाढ झाल्यामूळे रु. १.५९ कोटीची वाढ झालेली आहे.

५. इतर कारणांमूळे झालेली वाढ : या अंतर्गत रु. १०.६० कोटीची वाढ झालेली आहे. मुळ प्रमा मध्ये प्रस्तावीत वितरणकुंडाचे स्थान बदलल्यामुळे कालव्यांच्या संरेखा बदलण्यात आल्या त्यामुळे वाढ

झालेली आहे. तसेच कालवा बांधकामासाठी उदग्रहण क्षेत्रातुन माती घेण्यामुळे वाढ झाली आहे. सन २००३ पूर्वी मातीकामावर स्वामीत्व धनाची आकारणी होत नव्हती व आता शासन धोरणाप्रमाणे मातीकामावर सर्वसाधारण २० ते ३० टक्के स्वामीत्व धनाची आकारणी होत असल्यामुळे वाढ झालेली आहे. त्याच प्रमाणे हा प्रकल्प नक्षलग्रस्त भागात २००५ पासुन मोडत असल्यामुळे सॅप ची १० टक्के वाढ झालेली आहे.

६. ईटीपी मध्ये झालेली वाढ : या अंतर्गत रु. १५.३६ कोटीची वाढ झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांव – धापेवाडा उसिंयो टप्पा-१, तालुका – तिरोडा, जिल्हा -गोंदिया**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ८०५०	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	६७००	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	९/५/९४	९३-९४	२४.०१	८०५० (अंतिमतः ६७००)
	सुप्रमा -१	१४/१२/९८	९८-९९	७८.०२	८०५० (अंतिमतः ६७००)
	सुप्रमा -२	२५/६/२००९	२००७-०८	१८५.६८	६७०० अ २१५६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)		लागू नाही		
४	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- १०९.७६	
४	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- ६.३२	
४	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- ९५.५४	
४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- ७.९०	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:- १९९८	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.३२.४१ कोटी) :- १९९८				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७	दरसूचीतील वाढ			३८.९०	२४.०६
७	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			४.१३	२.५५
	सुप्रमा तरतुद रु.४.६४ कोटी - प्रमा तरतुद रु.०.५१ कोटी				
७	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			८०.००	४९.४८
७	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			२०.२७	१२.५४
८	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१८.३७	११.३७
	एकूण			**१६१.६७**	**१००.००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भुसंपादन(एकुण आवश्यक १६८.५१ हे./संपादित क्षेत्र १५३.०१ हे.)				९०.००
	ब) पुनर्वसन - नाही				-
	क) वनजमिन संपादन - निरंक				-
८.२	पंपगृह				१००.००
८.३	कालवा (कि.मी.) (एकुण लांबी ११.६५)	झालेली लांबी ११.६५ कि.मी.			१००.००
८.४	वितरण व्यवस्था (हे.) (एकुण क्षेत्र ४१६१/२१५६ हे.)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र ४१६१ हे.			१००.००
८.५	पाटचा-यांची कामे (हे.) (एकुण क्षेत्र ४१६१ हे.)	पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र- निरंक			०

धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१

ता. तिरोडा **जि. गोंदिया**

संक्षिप्त टिप्पणी

❖ **प्रकल्पाची रुपरेषा :-**

- धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१ ही योजना गोंदिया जिल्हयातील तिरोडा तालुक्यात कवलेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीचे डाव्या तिरावर बांधकामाधीन आहे. या योजनेद्वारे तालुक्यातील १७ गावातील ५००० हे. क्षेत्रास सिंचन प्रस्तावित आहे. यासाठी ४७.६१ दलघमी. पाणी वापर प्रस्तावित आहे.
- **विस्तारित योजना :-**. धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत बॅरेजचे बांधकाम सुरु असून जलसाठा निर्माण होणार आहे. शासन धोरणानुसार उ.सिं. योजनेसाठी विसर्ग ७० टक्के व च्द्यठ्ठदड्ड डद्र घ्ढ्ढ्र वगळल्यामुळे दोन नविन पंप बसवून त्याद्वारे खैरबंदा जलाशयात ३१.२५ द.ल.घ.मी. पाणी टाकून खैरबंदा प्रकल्पाचे २१५६ हे. क्षेत्रास सिंचन प्रस्तावित आहे.

❖ **प्रशासकीय मान्यता :-**

- मुळ प्रशासकीय मान्यता :- शासन निर्णय दिनांक ९/५/१९९५ अन्वये रु. २४.०१ कोटी (दरसुची १९९३-९४) मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.
- प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता :- विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र दिनांक १४/१२/१९९९ नुसार रु. ७८.०२ कोटी (दरसुची १९९८-९९) किंमतीस प्रथम सुधारीत मान्यता प्राप्त झालेली आहे.
- द्वितिय सुधारित प्रशासकीय मान्यता :- विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे पत्र दिनांक २५/६/२००९ नुसार रु. १८५.६८ कोटी (दरसुची २००७-०८) किंमतीस द्वितिय सुधारीत मान्यता प्राप्त झालेली आहे.

❖ **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च :-**

- **वर्ष १९९५-९६ ते १९९९-२०००**
-

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण
१९९५-९६	---	---	---	१९९८-९९	१९४७.९१	३२.६७	१९८०.५८
१९९६-९७	---	---	---	१९९९-२०००	७४७.१७	५२.७३	७९९.९०
१९९७-९८	---	---	---	**एकुण :-**	**२६९५.०८**	**८५.४०**	**२७८०.४८**

- **वर्ष २०००-०१ ते २०१०-११**

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण
२०००-०१	५१२.७९	४७.४३	५६०.२२	२००६-०७	१२०६.६२	६१.९४	१२६८.५६
२००१-०२	३३९.५९	४२.०७	३८१.६६	२००७-०८	५३३.८३	१३५.८९	६६९.७२
२००२-०३	१२४.७७	४४.२३	१६९.००	२००८-०९	१०२१.७४	५१.००	१०७२.७४
२००३-०४	३९१.८४	४८.६२	४४०.४६	२००९-१०	६४.७४	६५.४६	१३०.२०
२००४-०५	७५३.४४	५२.६३	८०६.०७	२०१०-११	१६३.१३	४८.२०	२११.३३
२००५-०६	५६७.७३	६८.१६	६३५.८९	**एकुण :-**	**५६८०.२२**	**६६५.६३**	**६३४५.८५**

❖प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण :-

या प्रकल्पास मुळ प्रशासकिय मान्यता रु. २४.०१ कोटी दरसुची १९९३-९४ नुसार होती. प्रकल्पाच्या खर्चात वाढ होणार आहे असे लक्षात आल्यावर प्रथम सु. प्र. मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यांत आला. मा.आमदारांच्या मागणीनुसार खैरबंधा उर्ध्वनलिकेचे काम अंतर्भूत करुन द्वितीय सुधारित प्र.मा.प्रस्ताव सादर करण्यात आला. सु.प्र.मा. किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) दरसुचीतील वाढ :- १) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- प्रकल्पास प्राप्त मुळ प्र. मा. दरसुची १९९३-९४ वर आधारीत होती. प्रथम प्र. मा. प्राप्त किंमत दरसुची१९९८-९९ वर आधारीत असून त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु.२०.६५ कोटी ची वाढ झाली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- प्रकल्पास प्राप्त प्रथम प्र. मा. दरसुची १९९८-९९ वर आधारीत होती. द्वितीय प्र. मा. प्राप्त किंमत दरसुची २००८-०९ वर आधारीत असून त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. १८.२५ कोटी ची वाढ झाली आहे.

त्यामुळे दरसुचीतील वाढीमुळे मुळ प्र.मा.ते द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ३८.९० कोटीची वाढ झाली आहे.

ब) व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :-

१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- निरंक

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.-सदर प्रकल्प तालुका तिरोडा, जिल्हा गोंदिया अंतर्गत येत असल्याने तिरोडा विधानसभा क्षेत्राचे, तत्कालीन आमदार यांच्या मागणीनुसार उर्ध्वनलिकेद्वारे खैरबंधा जलाशयात पाणी सोडण्याचे प्रस्तावित काम धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ मधुन वगळुन धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१ मध्ये अंतर्भुत केले. त्या मुळे प्र.मा.किंमतीच्या

तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ८०.०० कोटीची वाढ झाली आहे. त्यामुळे खैरबंधा जलाशयाच्या २१५६ हे. सिंचन क्षेत्रात वाढ झाली.

क) तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे वाढ :-

१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- (i) मुळ प्रशासकीय मान्यता अंतर्गत पाणी उपसा करण्याकरिता इंटेक वेल व जॅकवेल चे प्रावधान मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त संकल्पनेत पंपगृह व संलग्न कामांचे प्रावधान. (ii) मुळ प्रशासकीय मान्यता अंतर्गत उर्ध्वनलिका- १६०० मिमी. व्यास, ८ मि. मी. जाडीची एक रांगेचे प्रावधान होते. म.सं.सं. नाशिक कडुन प्राप्त संकल्पनेनुसार प्रत्येक्षात – १४०० मि. मी. व्यास, १० मि. मी. जाडी दोन रांगा.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- प्रथम प्र.मा.ते द्वितीय सुप्रमा दरम्यान सदर शिर्षांतर्गत वाढ निरंक आहे. तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. २०.२७ कोटीची वाढ झाली आहे.

ड) भुसंपादन :- **१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.-** मुळ प्र.मा.प्रस्तावित रु. ३८९४५ प्रति हेक्टर प्रमाणे कालवे वितरण प्रणालीकरिता लागणारी २.७८ हेक्टर जमिनीचे प्रावधान करण्यात आले होते. प्रथम प्र.मा.प्रस्तावात रु. ९०६४० प्रति हेक्टर प्रमाणे कालवे व वितरणप्रणाली करिता १४५ हे. जमिनीचे प्रावधान करण्यात आले. त्यामुळे रु. ३.१३ कोटीची वाढ झाली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- खैरबंधा उर्ध्वनलिकेकरिता आवश्यक खाजगी व सरकारी जमिनीकरिता रु. १.०० कोटीचे प्रावधान करण्यात आले. त्यामुळे रु. ४.१३ कोटीची वाढ झाली आहे.

इ) इतर कारणे :- **१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.-** (i) मुळ प्र. मा. अंतर्गत आय. डी. स्विच यार्ड चे प्रावधान नसल्यामुळे सुधारित प्र. मा. अंतर्गत प्रावधान. (ii) मुळ प्र. मा. अंतर्गत उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Mics. P- Maintainance.) बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- प्रथम प्र. मा. अंतर्गत उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Mics. P- Maintainance.) बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ. सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ६.१७ कोटीची वाढ झाली आहे.

फ) ई. टि. पी. :- **१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.-**आस्थापना विषयक खर्चात रु. ५.९४ कोटीची वाढ झाली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.-आस्थापना विषयक खर्चात रु. ६.२६ कोटीची वाढ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांवः-** **सोंडयाटोला उ. सिं. यो.**	तालुका – तुमसर		जि.भंडारा	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ३६०५	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	३६०५	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	-
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	०८/०५/१९९५	१९९४-९५	१३.३३	३६०५
	सुप्रमा -१	२१/१२/२००१	१९९९-२०००	६०.३२	३६०५
	सुप्रमा -२	१४/०८/२००९	२००८-०९	१०३.३१	३६०५
	तृतीय सुप्रमा प्रस्ताव शासनास सादर	---	२००९-१०	१२९.७४	३६०५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)				-
४	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)				:- १०७.८४
४	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)				:- ०.२४
४	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)				:- १०३.९७
४	इटीपी खर्च (रु. कोटी)				:- ३.६३
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				:- १९९८
६	प्रकल्पाच्या पंपगृहाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.१७.०६ कोटी)				:- १९९८
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे :-				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७	दरसूचीतील वाढ			३५.६७	३०.६४
७	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			०.२१	०.१८
	अद्यावत सुप्रमा तरतुद रु.०.२८ कोटी - प्रमा तरतुद रु. ०.०७ कोटी				
७	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			६९.९७	६०.११
८	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१०.५६	९.०७
	एकूण			**११६.४१**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भुसंपादन (एकुण आवश्यक ३.५९/संपादित क्षेत्र ३.५९)				१००.००
	ब) पुनर्वसन - नाही				-
	क) वनजमिन संपादन - आवश्यक वनजमीन १३.३७ हे. संपादीत जमीन १३.३७ हे.				१००.००
८.२	बंधारा व पंपगृह				१००.००
८.३	कालवा (कि.मी.) (एकुण लांबी -निरंक)	झालेली लांबी- निरंक			०.००
८.४	वितरण व्यवस्था (हे.) (एकुण क्षेत्र - निरंक)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र -निरंक			०.००
८.५	पाटचा-यांची कामे (हे.) (एकुण क्षेत्र - निरंक)	पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र- निरंक			०.००
टिप :- योजनेचे शिर्ष कामे पुर्ण झाली असून योजने अंतर्गत बावनथडी नदीतून पाणी उपसा करुन सिंचनाकरिता चांदपूर तलावात साठविण्यात येत आहे. योजने अंतर्गत थेट कालव्याद्वारे सिंचन प्रस्तावित नाही.					

सोंडयाटोला उपसा सिंचन योजना
ता.तुमसर जि. भंडारा
संक्षिप्त टिप्पणी

❖ **प्रकल्पाची रुपरेषा :-**

- सोंडयाटोला उपसा सिंचन योजना ही बावनथडी नदीच्या उजव्या तिरावर घानोर गावाजवळस्थित असून या योजनेअंतर्गत पंपगृह उर्ध्वनलिका व बावनथडी नदीवर बंधा-याचे कामाचा अंतर्भाव आहे.
- या योजनेद्वारे बावनथडी नदीतून पाणी उपसा करुन चांदपूर जलाशयात साठविण्यात येत आहे. एकुण ६५.२० दलघमी. पाणी उपसाद्वारे चांदपूर जलाशयात साठवून त्याद्वारे ३६०५ हे. अतिरिक्त क्षेत्रास सिंचन होणार आहे.

❖ **प्रशासकि य मान्यता :-**

- मुळ प्रशासकीय मान्यता, शासन निर्णय दि.८.५.१९९५ अन्वये रुपये १३.३३ कोटीस प्राप्त. (दरसुची १९९४-९५)
- कामा दरम्यान प्रकल्प खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि.२१/१२/०१ अन्वये रु.६०.३२ कोटीस (दरसुची १९९९-२०००) मान्यता प्राप्त.
- व्दितीय सुधारित प्रशासकीय विपाविम निर्णय दिनांक १४/८/०९ अन्वये रु.१०३.३१ कोटस प्राप्त (दरसुची २००८-०९)
- तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेचे प्रस्ताव रु.१२९.७४ कोटी (दरसुची २००९-१०) किंमतीचे मा. कार्यकारी संचालक, वि.पा.वि.म. नागपूर यांनी दि.५/१०/११ ला मंजुरीस्तव शासनास सादर केले आहे.

❖ **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च :-**

- **वर्ष १९९५-९६ ते १९९९-२००० (रु.लक्ष)**

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण
१९९५-९६	---	---	---	१९९८-९९	३३६.६३	--	३३६.६३
१९९६-९७	---	---	---	१९९९-२०००	४८२.८२	३४.४७	५१७.२९
१९९७-९८	---	---	---	**एकुण :-**	**८१९.४५**	**३४.४७**	**८५३.९२**

- **वर्ष २०००-०१ ते २०१०-११ (रु.लक्ष)**

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकुण
२०००-०१	५२०.१२	५२.५८	५७२.७०	२००६-०७	१९३३.८९	२७.८६	१९६१.७५
२००१-०२	१६९.९६	२२.७९	१९२.७५	२००७-०८	३७५.८६	३१.६७	४०७.५३
२००२-०३	३३.२७	१३.१८	४६.४५	२००८-०९	१३५७.०६	२९.२६	१३८६.३२
२००३-०४	६५.६८	१६.८३	८२.५१	२००९-१०	१५१.२६	३९.५७	१९०.८३
२००४-०५	५१८.३८	२०.४१	५३८.७९	२०१०-११	१३७३.३७	३९.५४	१४१२.९१
२००५-०६	३७१.०६	२४.७८	३९५.८४	**एकुण :-**	**६८६९.९१**	**३१८.४७**	**७१८८.३८**

❖ **प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण :-**

या प्रकल्पास मुळ प्र.मा. खर्चात वाढ होणार आहे असे लक्षात आल्यावर प्रथम सु.प्र.मा.प्रस्ताव सादर करण्यांत आला. मा.आमदारांच्या मागणीनुसार बावनथडी नदीवर बंधा-याचे काम अंतर्भूत करुन द्वितीय सु. प्र.मा.प्रस्ताव सादर करण्यात आला. सु.प्र.मा. किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

अ) दरसुचीतील वाढ :- १) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.-प्रकल्पास प्राप्त मुळ प्र.मा. किंमत रु. १३.३३ कोटी दरसुची १९९४-९५ वर आधारित होती. प्रथम सु.प्र.मा. प्राप्त किंमत रु. ६०.३२६ कोटी दरसुची १९९९-२००० वर आधारित असुन दरसुचीतील झालेल्या वाढीमुळे रु. १३.५२ कोटीची वाढ झालेली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितीय सु.प्र.मा.- प्रकल्पास प्राप्त प्रथम प्र.मा. किंमत रु. ६०.३२६ कोटी दरसुची १९९९-२००० वर आधारित होती. द्वितिय सु.प्र.मा. प्राप्त किंमत रु. १०३.३१ कोटी दरसुची २००८-०९ वर आधारित असुन दरसुचीतील झालेल्या वाढीमुळे रु. १९.०६ कोटीची वाढ झालेली आहे. मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ३२.५८ कोटीची वाढ झाली आहे.

ब) व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ :- मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत वाढ निरंक आहे.

क) तपशिलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदलामुळे वाढ-

१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- (i) मुळ प्र.मा. प्रस्तावात उर्ध्वनलिकेचे प्रावधान १८०० मि.मी. व्यासाचे ८ मि.मी.जाडीचे २ Row व सुधारित प्र.मा.प्रस्तावात म.सं.सं. नाशि द्वारे प्रस्तावित १६०० मि.मी.व्यासाचे १२ मि.मी जाडीचे ३ Row (ii) योग्य भुस्तर न प्राप्त झाल्यामुळे पंपगृहाचा पायवा जास्त खोल घेण्यात आला. त्याअनुषंगाने संकल्पनेत आवश्यक बदल करण्यात आले. (iii) विद्युत व यांत्रीकी कामासाठी संबंधीत विभागाकडून झालेल्या खर्चात वाढ.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- (i) सोंडयाटोला उ.सिं.योजनेमध्ये बंधा-याचे बांधकामासाठी, महाराष्ट्र शासनाचे हिवाळी अधिवेशन २००७ दरम्यान **मा.मंत्री महोदय** यांची जनप्रतिनिधी सोबत या संदर्भात दि. ३०/११/२००७ रोजी झालेल्या बैठकीत, जनप्रतिनिधींनी बावनथडी नदीवर बंधा-याची मागणी केली. यावर मा.मंत्री महोदयांनी कार्यवाही करण्याचे मान्य करुन त्या अनुषं ाने सूचना दिल्यात. त्यानुसार वि.पा.वि.मं. नागपूर यांचे पत्र दि.५/२/० अन्वये सोंडयाटोला उ.सिं.योजने करिता बावनथडी नदीवर बंधा-याचे कामासाठी निर्देश प्राप्त झाले

त्यामुळे तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ४९.६२ कोटीची वाढ झाली आहे.

ड) भुसंपादन :-

१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- मुळ प्रशासकिय मान्यता पाप्त अंदाजपत्रकामध्ये शेतजमिनीचे दर व क्षेत्र कमी धरण्यात आले होते. प्रत्यक्षात संपादित जमिनीच्या किंमतीत व क्षेत्रात वाढ झाल्यामुळे भुसंपादना अंतर्गत रु. ०.२१ कोटीची वाढ झाली आहे. मुळ प्रस्तावात जमिनीचे दर हेक्टरी रु. ४४९७७ प्रति हेक्टर होते. यात वाढ झाल्याने सदर दर रु. २५७९३८ प्रति हेक्टरी गृहीत धरला आहे. तसेच वनजमिनीसाठी मुळ प्रस्ताव रु. २५१८८ प्रति हेक्टरी होता. सदर दर ५९४८२ प्रति हेक्टरी धरल्याने सदर वाढ झालेली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- भुसंपादन शिर्षा अंतर्गत मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ०.२१ कोटीची वाढ झाली आहे.

इ) इतर कारणामुळे झालेली वाढ :-

१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.- (i) मुळ प्र.मा. अंत र्त उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Misc. P-Maintainance.) बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.- (i) मुळ प्र.मा. अंतर्गत उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Misc. P-Maintainance.) बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ. त्यामुळे इतर कारणे शिर्षा अंतर्गत मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. ४.८० कोटीची वाढ झाली आहे.

फ) ई. टि. पी. :- **१) मुळ प्र.मा.ते प्रथम सु.प्र.मा.-**आस्थापना विषयक खर्चात रु. १.३३ कोटीची वाढ झाली आहे.

२) प्रथम प्र.मा.ते द्वितिय सु.प्र.मा.-आस्थापना विषयक खर्चात रु. १.४४ कोटीची वाढ झाली आहे.

त्यामुळे इ.टी.पी. शिर्षा अंतर्गत मुळ प्र.मा.किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा किंमतीत एकंदरीत रु. २.७७ कोटीची वाढ झाली आहे.

- **अद्यावत प्रस्ताव :-** या प्रकल्पाचे द्वितिय सु. प्र. मा. एवढा खर्च झाला असून अद्याप प्रकल्प पुर्ण झाला नसल्याने तृतिय सु. प्र. मा. प्रस्ताव रु. १२९.७४ कोटी दरसुची २००९-१० नुसार तयार करण्यांत आला असून सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आलेला आहे. अद्यावत किंमत (प्रस्तावित तृतीय सु.प्र.मा.) मुळे द्वितिय सु.प्र.मा. वर एकुण रु.२६.४२७ कोटीची वाढ होत आहे. ही वाढ मुख्यतः दरसुचीमुळे रु. ३.०९ कोटीची वाढ, संकल्पचित्र बदलामुळे (बंधारा पायव्याची खोली वाढल्यामुळे संधानक व संलग्न परिणामात वाढ झाल्यामुळे) रु. २०.३५ कोटीची वाढ, तसेच इ.टी.पी व उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Misc. P-Maintainance.) टक्केवारी नुसार झालेली वाढ रु. २.९८ कोटी आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांवः- झांशीनगर उ. सिं. यो.**	तालुका — अर्जुनी मोर		जिल्हा -गोंदिया	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - ४२२५	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	निरंक	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	१८/१०/१९९६	१९९५-९६	१४.४३	४२२५
	सुप्रमा -१	३१/३/२००८	२००५-०६	४५.१८	४२२५
	द्वितीय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रीक सल्लागार समिती, नाशीकला सादर.	---	२०११-१२	१४३.४१	४२२५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)				-
४	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- ४५.१८	
४	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- ०.२४	
४	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- ४३.११	
४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- १.८३	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:- १९९८	
६	प्रकल्पाच्या पंपगृहाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.१९.४८ कोटी) :- २००२				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे :- मुळ प्रशासकिय मान्यतेच्या किंमतीपेक्षा रु.३०.७५ कोटी खर्च झालेले आहे व वाढीची कारणे खालीलप्रमाणे आहे.				
				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७	दरसूचीतील वाढ			७०.३९	५४.५७
७	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			६.३३	४.९१
	अद्यावत सुप्रमा तरतुद रु.७.२९ कोटी - प्रमा तरतुद रु. ०.९६ कोटी				
७	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१४.५६	११.२९
८	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			३७.७०	२९.२३
			एकूण	**१२८.९८**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	अ) भुसंपादन (एकुण आवश्यक ६६.६८ हे. /संपादित क्षेत्र ८.२५ हे.)				१२.००
	ब) पुनर्वसन - नाही				-
	क) वनजमिन संपादन - आवश्यक वनजमीन ३२.७२ हे. संपादीत जमीन १८.३७ हे.				५६.००
८.२	पंपगृह				३०.००
८.३	कालवा (कि.मी.) (एकुण लांबी १३.५०)			झालेली लांबी- ७.५० कि.मी.	५५.००
८.४	वितरण व्यवस्था (हे.) (एकुण क्षेत्र २५००)			वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र - निरंक	०.००
८.५	पाटचा-यांची कामे (हे.) (एकुण क्षेत्र २५००)			पाटचायांची कामे तयार झालेले क्षेत्र- निरंक	०.००

झाशीनगर उपसा सिंचन योजना

ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

संक्षिप्त टिप्पणी

❖ **प्रकल्पाची रुपरेषा :-**

झाशीनगर उपसा सिंचन योजना, अर्जुनी/मोर. तालुक्यातील येरंडी दर्रे गावाजवळ पूर्ण झालेल्या इटियाडोह पकल्पाच्या बुडीत क्षेत्रावरुन प्रस्तावित केली आहे. या योजनेद्वारे इटियाडोह प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातून २५.२३ द.ल.घ.मी. पाण्याचा उपसा करुन अर्जुनी/मोरगांव तालुक्यातील १२ आदिवासी गावातील २५०० हे. जमीन सिंचनाखाली आण्यायाचे नियोजीत आहे.

❖ **प्रशासकिय मान्यता :-**

- मुख्य प्रशासकिय मान्यता - शासन निर्णय दि.१८/१०/९६ रुपये १४.४३ कोटी (दरसुची १९९५-९६)
- प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता - कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर यांचे निर्णय दि.३१/३/२००८ रुपये ४५.१८ कोटी (दरसूची २००५-०६)
- द्वितिय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा (दरसुची २०११-१२) रु. १४३.४१ कोटीचा प्रस्ताव मा.कार्यकारी संचालक वि.पा.वि.म. नागपूर यांचे कडून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, जलविज्ञान भवन, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

❖ **आर्थिक बाबी :-** मुळ प्र. मा. किंमत :- रु. १४.४३ कोटी
प्रथम सु.प्र.मा.किंमत :- रु. ४५.१८ कोटी.
अद्यावत किंमत :- रु. १४३.४१कोटी.
मार्च १२ पर्यंत झालेला खर्च :- रु. ४५.१८ कोटी.
सन २०१२-१३ साठी प्राप्त अनुदान :- रु. २.५८ कोटी.

❖ **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च :-**

- **वर्ष १९९५-९६ ते १९९९-२००० (रु. लक्ष)**

वर्ष	बांधकाम	वर्ष	बांधकाम
१९९५-९६	---	१९९८-९९	०.४०
१९९६-९७	---	१९९९-२०००	९.८६
१९९७-९८	०.१०	**एकुण :-**	**१०.३६**

- **वर्ष २०००-०१ ते २०१०-११ (रु. लक्ष)**

वर्ष	बांधकाम	वर्ष	बांधकाम
२०००-०१	२५.६७	२००६-०७	४६९.८१
२००१-०२	१९.४९	२००७-०८	१००.१२
२००२-०३	३.३९	२००८-०९	६६०.८५
२००३-०४	३२.१०	२००९-१०	१३७.६०
२००४-०५	३०८.२५	२०१०-११	९९३.२३
२००५-०६	४१२.६९	**एकुण :-**	**३१६३.२०**

❖ **प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण :- (रु.कोटी)**

मुळ प्र.मा. किंमत	प्रथम सु.प्र.मा. किंमत	किंमती मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीमधील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे वाढ		भूसंपादन पुनर्वसन रक्कमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमुळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेली वाढ	
			रक्कम	टक्के.	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के.	रक्कम	टक्के.	रक्कम	टक्के.	रक्कम	टक्के.
१४.४३	४५.१८	३०.७५	१०.०५	३२.६८	-	-	१३.१२	४२.६७	१.९८	६.४४	०.२३	०.७५	५.३७	१७.४६

या प्रकल्पास मुळ प्रशासकिय मान्यता रु. १४.४३ कोटी दरसुची १९९५-९६ नुसार होती. या प्रकल्पाचा खर्च सप्टेंबर २००५ अखेर रु. ५.९१ कोटी झाला तेव्हा प्रकल्पाच्या खर्चात वाढ होणार आहे असे लक्षात आल्यावर सु. प्र. मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यांत आला. मुळ प्रशासकिय किंमत ते प्रथम सु. प्र. मान्यता किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) दरसुचीतील वाढ :- प्रकल्पास प्रशासकिय मंजुरी प्राप्त किंमत रु.१४.४३ कोटी दरसुची १९९५-९६ वर आधारित होती. वर्ष २००५-०६ च्या दरसुची नुसार प्रकल्पाच्या किंमतीत रु.३०.७५ कोटीची वाढ होत आहे. सन १९९५-९६ ते २००५-०६ चे दरसुचीमधील वाढीमुळे रु.१०.०५ कोटी (३२.६८ टक्के) वाढ झालेली आहे.

२) तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे वाढ :- प्रकल्पाच्या किंमतीत रु. १३.१२ कोटीची वाढ झाली असून वाढीचे कारणे खाली नमुद केली आहे. **(अ)** मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या पंपगृहाच्या सर्वसाधारण आराखडयात झालेला बदल. **(ब)** मुळ प्र.मा.प्रस्तावात Fore Bay**,** पोच कालवा (Conduit) चे प्रावधान नसल्यामुळे संकल्पनेनुसार सुधारित प्र.मा.अंतर्गत उपरोक्त बाबीचा समावेश केल्यामुळे वाढ. **(क)** स्विचयार्ड, बुस्टर पंपहाऊस, रॉ वाटर इलेव्हेटेड टँक इत्यादीचे प्रावधान नसल्याने सुधारित प्रस्तावात अंतर्भाव करण्यांत आला.

३) भुसंपादन :- प्रकल्पाकरिता संपादनाकरिता प्रस्तावित जमिनीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे या शिर्षातंर्गत रु. १.९८ कोटीची वाढ झाली आहे. मुळ प्रस्तावात खाजगी जमीनीचे दर रु. ३३२५५ प्रती हेक्टरी दर गृहीत धरले होते. तथापि सुधारीत प्रस्तावात सदर दर रु. ४९९०० प्रती हेक्टरी घेण्यात आले. तसेच वनजमीनीचे दर मुळ प्रस्तावात रु. २५१८४ प्रती हेक्टरी गृहीत धरण्यांत आले होते. सदर दरात एन. पी. व्ही. मुळे रु. ५,०००,००/- प्रती हेक्टरी दर घेण्यात आले.

४) इतर कारणे :- या शिर्षातंर्गत प्रकल्पाच्या किंमतीत रु. ०.२३ कोटीची वाढ झाली असून वाढीची काही कारणे खालील प्रमाणे आहेत.(**अ**) मुळ प्रशासकिय मान्यता प्राप्त प्रस्तावात तरतुद नसल्यामुळे **(ब)**

मुळ प्र. मा. अंतर्गत उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Mics. P-Maintainance.)बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ

५) ई. टि. पी. :- आस्थापना खर्चात रु. ५.३७ कोटीची वाढ झाली आहे.

- **अद्यावत प्रस्ताव :-** या प्रकल्पाचे प्रथम सु. प्र. मा. एवढा खर्च झाला असून अद्याप प्रकल्प पुर्ण झाला नसल्याने द्वितीय सु. प्र. मा. प्रस्ताव रु. १४३.४१ कोटी दरसुची २०११-१२ नुसार तयार करण्यांत आला असून सदर प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, जल विज्ञान भवन, नाशिक यांचे कडे तपासणीत आहे. सदर द्वितीय सु.प्र.मा. किंमतीमध्ये प्रथम सु.प्र.मा. वर रु. ९८.२३ कोटी वाढ होत आहे. ही वाढ दरसुची फरकामुळे रु. ६०.३४ कोटी, तपशिलवार सर्वेक्षण व संकल्पचित्रातील बदलामुळे १.४४ कोटी, भुसंपादनामुळे रु. ४.३५ कोटी, इतर कारणामुळे रु. १३.४६ कोटी, व इ.टी.पी. मुळे रु. १८.६४ कोटीची वाढ झालेली आहे. वाढीचे कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) दरसुचीतील वाढ :- प्रकल्पास प्राप्त प्रथम सु.प्र.मा. रु. ४५.१८ कोटी, दरसुची २००५-०६ वर आधारित होती. सादर द्वितिय सु.प्र.मा.प्रस्ताव दरसुची२०११-१२ वर आधारित असल्यामुळे दरसुचीतील वाढीमुळे रु.६०.३४कोटीची वाढ झाली आहे.

२) तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनातील बदला मुळे वाढ :- पंपगृहाच्या सर्वसाधारण आराखडयात पुनश्च बदल झाल्यामुळे या शिर्षांतर्गत रु. १.४४ कोटीची वाढ झाली आहे.

३) भुसंपादन :- प्रकल्पास प्राप्त प्रथम सु.प्र.मा.प्रस्तावात ७.८९ हे.खाजगी जमिन रु. ५००००/हेक्टर या दराने गृहीत धरण्यात आली होती. प्रत्यक्षात प्रकल्पास ६६.६८ हे. खाजगी जमिनीची आवश्यकता असुन रु. ३००००० /हेक्टर या दराने गृहीत धरुन त्या अनुषंगाने प्रावधान द्वितिय सु.प्र.मा प्रस्तावात करण्यात आले. यामुळे शिर्षातंर्गत रु.४.३५कोटीची वाढ झाली आहे.

४) इतर कारणे :- या शिर्षातंर्गत प्रकल्पाच्या किंमतीत रु. १३.४६ कोटीची वाढ झाली असून वाढीची काही कारणे खालील प्रमाणे आहेत. (अ) मुख्य कालव्याच्या लांबीत झालेली वाढ. ब) अधिग्रहीत वनजमिनीची रुंदी कमी असल्यामुळे मुख्य कालव्याकरिता Toe-wall चे प्रावधान. क) विद्युत वाहिनीकरिता प्रावधान. ड) लघुकालवे व उपलघुकालव्यांच्या संख्येत झालेली वाढ. इ) मुळ प्र. मा./प्रथम सु.प्र.मा. अंतर्गत उपशिर्षनिहाय (जसे M- Plantation, O- Mics. P- Maintainance.) बाबत टक्केवारी नुसार केलेल्या प्रावधानाच्या अनुषंगाने सुधारित किंमतीत झालेली वाढ.

५) ई. टि. पी. :- आस्थापना खर्चात होणारी वाढ यामुळे रु. १८.६४ कोटीची वाढ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील					
१	**प्रकल्पाचे नांव - कालपाथरी मध्यम प्रकल्प** तालुका - गोरेगांव			जिल्हा -गोंदिया	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) - २०५९	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) - जुन २०१२	१८००	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	२९४
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता
	मुळ प्रशासकीय मान्यता	७.८.१९९५	१९९४-९५	९.७८	२०५९
	सुप्रमा -१	२२.६.२०००	१९९८-९९	२७.४४	२०५९
	द्वितीय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रीक सल्लागार समिती, नाशीक ला सादर.		२०१०-११	८२.२७	२०५९
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु. कोटी)	-	-	-	-
४.१	दिनांक ३१.३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			:- ६४.९१	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)			:- ३०.१३	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			:- ३२.५३	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			:- २.२३	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष (रोहयो) १९९५-९६ (नियमीत) :- १९८७-८८				
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (किंमत रु.१०.४६ कोटी) :- १९९५-९६				
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम	टक्के
७.१	दरसूचीतील वाढ			२४.२४	३३.४४
७.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन. पी. व्ही. मुळे खर्चातील वाढ			३३.६१	४६.३७
	अद्यावत सुप्रमा तरतुद रु.३७.०८ कोटी - प्रमा तरतुद रु.३.४७ कोटी				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामूळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१२.५४	१७.३
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			२.१	२.८९
	एकूण			**७२.४९**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यस्थिती				
८.१	१) भूसंपादन			८८	
	२) पुनर्वसन			९७	
	३) वनजमिन			१००	
८.२	धरण (पूर्ण)			१००	
८.३	कालवा (एकूण लांबी १५.५४ कि.मी.)	झालेली लांबी-१३.९९ किमी		९०	
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र २५५८)	वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र -२२३६ हे.		७०	
८.५	पाटचायांची कामे (एकूण क्षेत्र)	पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्र ०हे.		लाभक्षेत्र हे धानक्षेत्र असल्याने पाटचाया करण्याची गरज नाही	

कालपाथरी मध्यम प्रकल्प

ता. गोरेगाव जिल्हा- गोंदिया

- **प्रकल्पाची रुपरेषा :-** कालपाथरी मध्यम प्रकल्प योजना कालपाथरी गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्याचे काम चालु असून या प्रकल्पापासून गोरेगांव तालुक्यातील १० गावाना १९१५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा फायदा होणार आहे.
- **मुळ प्रशासकिय मान्यता :-** रु.९.७८ कोटी, दिनांक ७.८.१९९५
- **प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता :-** रु.२७.४४ कोटी, दिनांक २२.६.२०००
- **द्वितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता :-** रू. ८२.२७ कोटी (दरसुची २०१०-११) रकमेचा सुप्रमा प्रस्ताव वि.पा.वि.म. तर्फे दिनांक ५/१०/२०११ रोजी तांत्रिक सल्लागार समिती कडे सादर. राज्य तांत्रिक सल्लागार समिती कडून उपस्थित मुद्यांचे अनुपालनाची कार्यवाही विभागाअंतर्गत सुरु आहे.
- **कामाची सद्यःस्थिती :-**
  - शिर्षकामे - धरणाची घळभरणी जुन २००९ मध्ये पुर्ण झाली.सन २०१० पासून १०० टक्के जल निर्माण करुन १०० टक्के पाण्याचा वापर सुरु. मुख्य कालवा (लांबी १५.५४ किमी) मातीकाम व बांधकाम ९५ टक्के पुर्ण. उप कालवे (लांबी १९.४२ किमी) ७० टक्के पुर्ण. सन २०१० पासुन सिंचन सुरु आहे. सन २०११-१२ मध्ये २९४ हे. सिंचन झाले आहे.
- **एकूण उपयुक्त साठा/निर्मिती :-** ६.५९५ द.ल.घ.मी. / ६.५९५ द.ल.घ.मी.
- **लाभक्षेत्र /सिंचन क्षमता/निर्मिती :-** १९१५ हेक्टर/२०५९ हेक्टर/ १८०० हेक्टर
- **वनजमीन सद्यःस्थिती :-** २७.५३ हे. जमिनीस अंतिम मान्यता प्राप्त.
- **भूसंपादन सद्यःस्थिती :-**
  - एकुण आवश्यक खाजगी जमीन - ५५० हेक्टर
  - एकुण संपादित खाजगी जमीन/दिलेला निधी — ५१३.४८ हेक्टर/रु.१४११.५६ लक्ष.
  - कार्यवाही सुरु प्रकरणे (हेक्टर/संख्या) - १५.१३ हे./ १० प्रकरणे
- **पुनर्वसन सद्यःस्थिती :-**
  - एकुण बाधित गावठाण - ३ गावठाण (भगतटोला, सोनारटोला, आकोटोला)
  - पुनर्वसीत नविन गावठाण - महाजनटोली (गोरेगांव)
  - नागरी सुविधा कामाची सद्यःस्थिती - पूर्ण (१३ ना.सु.)
  - बाधित कुटुंबाचे स्थालांतरण - पूर्ण

(१) मार्च २०१२ अखेर पर्यंत एकूण खर्च - रु. ६४.९१ कोटी **(२) सन २०१२-१३ ची अर्थसंकल्पीय तरतूद** - रु. ४.०० कोटी

- **प्रकल्पावर वर्षवार झालेला खर्च : (रु. कोटी)**

वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकूण	वर्ष	बांधकाम	आस्थापना	एकूण
१९९५ अखेर	०.३२	०.१०	०.४२				
९६-९७	१.८०	०.६००	२.४०	०४-०५	१.०९	०.१५	१.२४
९७-९८	३.००	१.०००	४.००	०५-०६	५.१९	०.०८	५.२७
९८-९९	३.९४	१.३१३	५.२५	०६-०७	८.८१	०.९८	९.७९
९९-००	२.२२	०.७४०	२.९६	०७-०८	५.०९	०.१०	५.१९
००-०१	१.२९	०.४३०	१.७२	०८-०९	५.८६	०.१४	६.००
०१-०२	०.४६	०.१५३	०.६१	०९-१०	२.४५	०.३५	२.८०
०२-०३	०.१६	०.०२	०.१८	१०-११	७.०४	०.४१	७.४५
०३-०४	०.२२	०	०.२२	११-१२	७.७५	०.४२	८.१७

- **प्रकल्पाच्या किंमत वाढीचे विश्लेषण : (रु. कोटी)**
- **अ) मूळ प्रमा ते मंजूर सुप्रमा.**

मुळ प्र.मा. किंमत	सुधा. प्र.मा. किंमत	किंमत मधील वाढ	दरसूचीतील वाढ		व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ		तपशीलवार सर्वेक्षण व तांत्रिक संकल्पनामुळे झालेली वाढ		भुसंपादन / पुनर्वसन रकमेमुळे झालेली वाढ		इतर कारणांमूळे झालेली वाढ		ईटीपी मध्ये झालेला वाढ	
			रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के	रक्कम	टक्के
बुडीत क्षेत्रातील ५७४ हेक्टर क्षेत्रापैकी १२७.४९ हेक्टर क्षेत्राचे संपादन झालेले आहे. तसेच दोन पुनर्वसन गावठाणापैकी १ पुनर्वसन गावठाण सर्व सोयीसह पुर्ण झाले आहे. तथापि बाधीत घरांचा निवाडा अद्यापी न झाल्याने प्रकल्पग्रस्तांनी स्थलांतर केलेले नाही.

४.० प्रकल्प कामाची सद्यःस्थिती :

सांडव्याचे काम प्रगतीपथावर आहे. नदीपात्रातील मातीच्या धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे अद्यापी हाती घेतलेले नाही. ऑगष्ट २०१२ अखेर प्रकल्पावर रु.३२.५८ कोटी खर्च झाला असून यात भू-संपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनाचा प्रामुख्याने समावेश आहे. (रु.१६.६४ कोटी). रु.१०.७० कोटीची धरणाची कामे झाली असून उर्वरित खर्च आस्थापनेवरील आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)					
१	प्रकल्पाचे नांव : **डोंगरगांव प्रकल्प** तालुका : **राजुरा** जिल्हा : **चंद्रपूर**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area) : ३९४२ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ :	३१५३	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हेक्टर) :	७७४
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०५/०८/१९७७	१९७६-७७	१.५०	३५८९
	सुप्रमा-१	१०/०४/२००१	१९९५-९६	२४.१५	३९४२
	सुप्रमा-२	०२/०४/२००४	२०००-०१	४१.१६	३९४२
	सुप्रमा-३	१४/०२/२००८	२००७-०८	६७.०४	३९४२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्र शासन, योजना आयोग जलसंसाधन विभाग पत्र क्र.२०(१३)२००९/WR दि.१६/०९/२००९	२००७-०८	६७.०४	३९४२
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			: **रु.**	**५९.९८**
४.२	भु-संपादन , पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			: **रु.**	६.९०
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			: **रु.**	४५.८६
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			: **रु.**	७.२२
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:	**वर्ष १९७९-८०**
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष (प्रचलित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२४.१५ कोटी)			:	**वर्ष १९९५-९६**
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			**रक्कम (कोटी)**	**टक्केवारी**
७.१	दरसुचीतील वाढ			३६.२४	५५
७.२	भुसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (सु.प्र.मा. तरतूद ७.१३ - प्र.मा.तरतूद ०.०३ कोटी)			७.१०	११
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			८.७८	१३
७.५	इतर कारणे (३.०१) + आस्थापना (१०.४१)			१३.४२	२१
			एकूण वाढ :	**६५.५४**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		**एकूण**	**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन (हेक्टर मध्ये)		५६१.७७	५४४.७२	९७
८.२	धरण (पाणीसाठा १२.४४१ द.ल.घ.मी.)		घटक	पूर्ण	१००
८.३	कालवा (कि.मी.)		६२.४२	५३.७७	८६
८.४	वितरण व्यवस्था (C.C.A.) (हेक्टर)		२८४५	२२७६	८०
८.५	पाटचाऱ्यांची कामे (C.C.A.) (हेक्टर)		२८४५	११९५	४२

प्रकल्प किंमतीमधील वाढीची कारणे :

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ (रु.८.७८ कोटी)

मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवाल हा क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या आराखडयावर आधारीत होता. यामध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने सविस्तर आराखडा तयार केल्यानंतर खालील बदल झाले.

- सविस्तर पूर परिगणनेमध्ये संभाव्य पुरांचे परिमाण वाढले त्यामुळे सांडव्याची लांबी ९१ मी. वरुन १५२ मी. पर्यंत वाढली. त्यामुळे आगमन कालवा व पुच्छ कालव्याचे रुंदीतही वाढ झाली.
- मुळ आराखडयात डिव्हाईड वॉलची तरतूद नव्हती. ती सविस्तर संकल्पचित्रात समाविष्ठ झाली.
- सविस्तर संकल्पचित्रानंतर पुच्छ कालव्यावर दोन प्रपात नव्याने देण्यात आले.
- मुळ प्रकल्प अहवालात ड्रिलींग, ग्राऊटींगची तरतुद नव्हती, ती सविस्तर संकल्पनेअंती नव्याने समाविष्ट झाली.
- धरणाचा रोधीचर मुळ आराखडयानुसार ४ मी. रुंदीचा होता. सविस्तर संकल्पनानुसार तो ५ मी. रुंदीचा करण्यात आला.

७.५ इतर कारणे (वाढ रु.३.०१ कोटी)

- मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात पर्यायी वनीकरण, कॅचमेंट एरीया ट्रिटमेंट प्लॉन व भुविकासाचे कामाची तरतुद नव्हती. सुधारीत निकषानुसार सदर तरतुदीची आवयकता असल्याने यासाठीची तरतुद सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालात केली आहे.
- मुख्य कालवा कोळसा क्षेत्रातून जात असल्याने डब्लु.सी.एल. चे सुचनेनुसार या लांबीत कालवा पाईप मधून घ्यावा लागला. तसेच नव्याने रेल्वे क्रॉसींगची तरतुद करावी लागली.
- **ई.टी.पी. मध्ये झालेली वाढ (रु.१०.४१ कोटी)**

डोंगरगांव मध्यम प्रकल्प

तालुका : राजूरा **जिल्हा : चंद्रपूर**

१.० प्रकल्पाची पुर्वपिठिका व सद्यःस्थिती :

प्रकल्पास दिनांक ०५-०८-१९७७ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली असली तरी प्रकल्पास आवश्यक २३७.५९ हेक्टर वनजमीनीस केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाची अंतिम मंजूरी दिनांक २२-०८-१९९५ अन्वये प्राप्त झाली. सन १९९५-९६ मध्ये प्रकल्पाच्या शिर्ष भागाची कामे सुरु होवून प्रकल्पाची घळभरणी जून २००० मध्ये झाली. प्रकल्पाची सिंचन क्षमता ३९४२ हेक्टर असून जून-२०१२ अखेर ३१५३ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. सन २००१-०२ पासून प्रकल्पावरुन सिंचन करण्यात येत आहे. भूविकासाची कामे अद्यापी पुर्ण झालेली नाहीत. सन २०११-१२ मधील प्रत्यक्ष सिंचन ७७४ हेक्टर आहे.

२.० प्रकल्प बांधकाम कालावधी लांबण्याची कारण मिमांसा :

२.१ प्रकल्पाचे धरणाचे कामासाठी/बुडीत क्षेत्रासाठी १९३.०२ हेक्टर वन जमीन लागते. दिनांक २२-८-१९९५ रोजी वन जमीनीस केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळाली. प्रकल्पाची किंमत २० वर्षा पूर्वीची असल्याने त्या सुधारित करुन सन १९९५-९६ पासून धरणाचे काम सुरु झाले व जून-२००० मध्ये घळभरणी झाली. सारांशाने धरण कामास प्रकल्प यंत्रणेकडून विलंब झालेला नसून विधीवत मान्यतेसाठी १८ वर्षे लागलेली आहेत.

२.२ कालव्याचे व वितरण व्यवस्थेचे कामास १६७.१२ हेक्टर खाजगी जमीन व ४४.५७ हेक्टर वनजमीन लागते. कालव्याचे संरेखा बदलाचे वन प्रस्तावास जून-२०१० मध्ये केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळाली. कालवे व वितरण व्यवस्थेच्या कामास भू-संपादनामुळे विलंब झालेला आहे.

३.० प्रकल्पाची सद्यःस्थिती :

जून २००० मध्ये घळभरणी होऊन १२.४४१ दलघमी पाणीसाठा निर्माण झालेला आहे. वितरण व्यवस्थेची ८० टक्के कामे झाली आहेत. पाटचाऱ्यांची ४२ टक्के कामे झाली आहेत. सन २०११-१२ मध्ये ७७४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात आला. पाटचाऱ्यांची व वितरण व्यवस्थेची कामे अपूर्ण असल्याने प्रत्यक्ष सिंचन कमी होत आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील (प्रकल्पनिहाय)

१	**प्रकल्पाचे नाव :- पुर्णा मध्यम प्रकल्प तालुका :- चांदुर बाजार, जिल्हा :- अमरावती**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता हे. (Cropped Area)	७८४३ हे	सिंचन निर्मित क्षमता हे.जुन २०१२ : ७८४३ हे	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.) (सन २०११-१२) ५२७२ हे.	
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील		दिनांक	दरसुची सन	किंमत रु.कोटी	प्रकल्पीय सिंचन क्षमता हे.मध्ये
	मुळ प्रशासकिय मान्यता		०८/०७/१९९४	१९९०-९१	३६.४५	७८४३
	प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता		१३/०६/२०००	१९९८-९९	१३२.३३	७८४३
	व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता		२८/१०/२००५	२००४-०५	२१३.१०	७८४३
४	केंन्द्र शासनाची अद्यावत मान्यता TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी		२५/०४/२००८	२००४-०५	२१३.१०	७८४३
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च रु. कोटी			:-	२२५.८७	
४.२	भुसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			:-	१८.२९	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			:-	१७४.९७	
४.४	ई.टि.पी.खर्च (रु.कोटी)			:-	३२.६१	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			:-	१९९५	
६	प्रकल्पाचे धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			:-	१९९५(प्रकल्पांची किंमत रु.३६.४५ कोटी)	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ				८६.०६	४८.७२
७.२	भुसंपादन, पुनर्वसन/वनजमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ				१४.५२	८.२१
	सुप्रमा किंमत रु.१५.४५ कोटी - प्रमा किंमत रु.०.९३ कोटी उ रु. १४.५२ कोटी					
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प) अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ				०	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				४९.२९	२७.९०
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) सोबतच्या टिप्पणीमध्ये सविस्तर कारणे नमुद केलेली आहे.				२६.७८	१५.१७
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**					
८.१	भुसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन				१०० टक्के	
८.२	धरण (टक्केवारी)				१०० टक्के	
८.३	कालवा (एकुण लांबी / झालेली लांबी)				११.०३ कि.मी./११.०३ कि.मी (१०० टक्के)	
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र /वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र)				७८४३ हे./७८४३ हे. (१०० टक्के)	
८.५	पाटचा-यांची कामे :- एकुण क्षेत्र /पाटचा-यांची कामे तयार झालेले क्षेत्रः-				७८४३ हे./५४९७ हे .(७० टक्के)	
८.६	प्रकल्पाचा पाणीसाठा/निर्मित झालेला पाणीसाठा				४१.७५९ दलघमी /४१.७५९ दलघमी (१०० टक्के)	

मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

७.४:- सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

प्रकल्पाच्या मुळ सर्वसाधारण आराखडा व सुधारीत आराखडयामध्ये क्षेत्रीय परिस्थितीमुळे बदल झाल्याने प्रकल्पाच्या विविध घटकांच्या अभियांत्रीकी बदलामुळे व त्याअनुषंगे मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक यांच्या अंतीम संकल्पीय बदलानुसार झालेल्या किंमत वाढीचा घटक निहाय तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) मुळ प्रमा नुसार मुख्य मातीधरणाची लांबी २२३० मी. होती. सुधारीत संकल्पनानुसार मातीधरणाच्या लांबीमध्ये ५९२ मी. ची वाढ झाल्याने रु.३.८० कोटी वाढ झालेली आहे.

२) मुळ प्रमा नुसार मध्यवर्ती जलोत्सारणीची लांबी १२० मी होती व त्यामध्ये १२ मी. X ८ मी. चे ८ दरवाजे प्रस्तावीत होते. सुधारीत संकल्पनानुसार जलोत्सारणीच्या लांबीमध्ये १७८ मी. वाढ झाली. व १२ मी x ८ मी. चे ९ वक्रव्दारे प्रस्तावीत करण्यात आली. तसेच जलोत्सारणीचे वरील बाजुचे दगडी बांधकामा ऐवजी ग्रावणयुक्त दगडी बांधकामामुळे जलोत्सारणीचे किंमतीमध्ये एकुण रु.३६.११ कोटी वाढ झाली.

३) मुळ प्रमा नुसार प्रकल्पास मुख्य विमोचक प्रस्तावीत होते. सुधारीत प्रशासकिय मान्यता मध्ये सिंचनासह विद्युत विमोचक प्रस्तावीत असल्याने झालेल्या संकल्पीय बदलामुळे रु.०.५८ कोटी वाढ झाली.

४) मुळ प्रमा नुसार मुख्य कालव्याची लांबी १.७१ कि.मी होती. मुख्य कालव्याच्या संकल्पीय बदलानुसार मुख्य कालव्याची लांबी ११.०३ कि.मी झाली आहे. यामुळे रु.३.०७ कोटी वाढ झाली आहे.

५) तसेच वितरण प्रणालीचे मंजुर संरेखेमधील वितरीका क्षेत्रीय परिस्थितीनुसार शाखा कालव्यामध्ये परावर्तीत केल्याने रु.५.७३ कोटी वाढ झाली आहे.

वरील सर्व घटकातील अभियांत्रीकी व संकल्पीय बदलामुळे एकुण रु. ४९.२९ कोटी वाढ झाली आहे.

७.५:-इतर कारणामुळे झालेली वाढ :-

इतर कारणामुळे एकुण रु.२६.७८ कोटी वाढ झाली आहे.त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

मुळ प्र.मा.अहवाल जलरोधी खंदकाची खोली वाढल्याने रु.१.६९ कोटी वाढ झाली आहे.

मुळ प्र.मा.नुसार मातीधरणासाठी प्रस्तावीत खदानीचे वहन अंतर काळी माती, मुरुम, दगड व खडी यासाठी १/२ कि.मी धरणाच्या खालील बाजुस प्रस्तावीत होते. परंतु प्रत्यक्षात धरणासाठी लागणारी सदर सामुग्री प्रस्तावीत खदानीमध्ये पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने काळी माती विश्रोळी गावाजवळ ४ कि.मी, मुरुम, दगड, व खडी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील २ कि.मी अंतरावरील खदानीतुन घेण्यात आली. त्याच प्रमाणे वाळु खदानीचे अंतर ब्राम्हणवाडा येथील १० कि.मी अंतरावर प्रस्तावीत होते. प्रत्यक्षात प्रकल्पासाठी लागणारी वाळु आसेगाव येथुन ४३ कि.मी अंतरावरुन आणावी लागली. यामुळे वहनावळीतील बदलाने रु.४.५३ कोटी वाढ झाली आहे.

प्रकल्पाचे ई.टी.पी. चार्जेस अंतर्गत एकुण रु. ८.६० कोटीची वाढ झाली आहे.

पुर्णा मध्यम प्रकल्प

ता.चांदुर बाजार जि.अमरावती

सविस्तर टिप्पणी

➢ **प्रस्तावनाः-**

पुर्णा मध्यम प्रकल्प हा अमरावती जिल्हयातील चांदुर बाजार तालुक्यांतर्गत विश्रोळी गावाचे वरील बाजुस तापी खो-याचे पुर्णा उपखो-यातील पुर्णा नदीवर बांधण्यात आला आहे. प्रकल्पाचे मुख्य धरणाचे बांधकाम सन २००७ मध्ये पुर्ण झाले असुन एकुण प्रकल्पीय संकल्पीत ४१.७५९ दलघमी. जलसंपत्ती सन २००७ पासुन प्रकल्पस्थळी निर्माण होत आहे. प्रकल्पाचा मुख्य डावा कालवा ११ .०३ कि.मी. लांबीचा असुन बांधकाम पुर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे ७८४३ हे.वरील वितरण प्रणालीची कामे सन २००९ मध्ये पुर्ण करण्यात आली आहेत.सद्यस्थिती प्रकल्पावर सन २००७-०८ पासुन लाभार्थी प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ घेत आहेत.

प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील भुविकास भाग-१ ची कामे सन २००६-०७ पासुन हाती घेण्यात आली. आजमीतीस ७८४३ हे. पीकाखालील लागवडी क्षेत्रापैकी ५४९७ हे.वरील भाग-१ ची कामे पुर्ण झाली असुन उर्वरीत २३४६ हे. वरील कामे सन जुन २०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.

➢ **भुसंपादनाच्या अडचणी (उदा. PAP कास्तकारांचा विरोध इ.)**

पुर्णा प्रकल्प हा महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यातंर्गत आंतरराज्यीय प्रकल्प असल्याने मध्यप्रदेश व महाराट्र राज्य सरकार मधील समन्वयाचे आवश्यक बाबींचे पुर्ततेस विलंब झाला. आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाच्या बैठकिच्या अटीनुसार मध्यप्रदेश शासनाकडुन प्रकल्पाचे हायड्रोलॉजीची तपासणी करुन घ्यावी असे निर्देश होते. त्यानुसार त्यास मान्यता प्राप्त करण्यास तसेच दोन्ही राज्यांच्या मा.मुख्यमंत्री यांच्या संयुक्त बैठकिचे आयोजन करुन मान्यता प्राप्त करुन घेणे इत्यादिच्या अनुषंगाने प्रकल्पाचे काम १९९७ पासुन खोळंबलेले होते. त्यानंतर वरील बाबतीत मध्यप्रदेश शासनाचे पत्र दिनाक १७/२/१९९९ अन्वये मान्यता देण्यात आली व नाला क्लोझर वगळता बांधकामास परवानगी मिळाली. तदनंतर दिनांक २०/८/२००० च्या आंतरराज्यीय बैठकिमध्ये नाला क्लोझरला परवानगी मिळाली. त्याअनुषंगाने मातीधरण, दगडी धरण व गेटची कामे सन २००७ पर्यंत पुर्णत्वास गेली आहे. हया सर्व बाबींमुळे मुख्य धरणाचे काम पुर्ण करण्यास सहा वर्ष अधिक कालावधी लागला. मुख्य धरणाचे कामाचे अनुषंगाने वितरण प्रणालीच्या कामांचे नियोजन करण्यात येते. मध्यंतरीच्या काळात सन २००१ ते २००९ पर्यंत कालव्याकरीता टप्या-टप्याने जमीन उपलब्ध झाली. त्यामुळे वितरण प्रणालीची कामे पुर्ण करण्यास विलंब झाला.

प्रकल्पाचे लाभक्षेत्रात संत्रा बागायती क्षेत्र अधिक असल्याने लाभक्षेत्रातील सहकारी पाणी वापर संस्था यांनी खुल्या पाटचा-यांव्दारे भाग – १ ची कामे करण्यास विरोध केला. कारण खुल्या पाटचारीमुळे संत्रा बागायतीसाठी आवश्यक असणारा ताण व इतर कारणांमुळे संत्रा बागांचे होणारे संभावीत नुकसान टाळण्यासाठी भुमीगत पाईप लाईनव्दारे भाग-१ ची कामे करण्याबाबत लाभार्थ्यांनी मागणी केली. भाग-१ ची कामे करण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रीयस्थळी शेतातील उभ्या पिकांमुळे फक्त एप्रील - मे हया दोन महीन्यांचाच कालावधी मिळत असल्याने भाग – १ ची कामे करण्यासाठी विलंब होत आहे.

व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेच्या मर्यादित किंमतीच्या मार्च २०१० पर्यंत २१२.०० कोटी खर्च झालेला आहे. त्यामुळे प्रकल्पाचे तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक ९/३/२०१० ला शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. शेरे पुर्तता सुरु आहे.

➢ **<u>प्रकल्पाची उपयोगीता</u> :-**

पुर्णा मध्यम प्रकल्पामुळे ४१.७६९ दलघमी. जलसंपदा निर्मितीमुळे चांदुर बाजार शहर व तालुक्यांतर्गत ग्रामीण भागातील १०५ गावांसाठीची पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झालेली आहे. तसेच प्रकल्पस्थळी नियोजीत जलविद्युत प्रकल्प पुर्णत्वास येत आहे. यामुळे ५०० कि/वॅट विज निर्मिती नजीकच्या काळात निर्मित होणार आहे. पुर्णा मध्यम प्रकल्पाचे ७८४३ लागवडी योग्य सिंचन क्षेत्र निर्मित झाले असुन त्यापैकी सन २०११-१२ मध्ये ५२७२ हे.वरील लाभार्थ्यांनी सिंचनाचा लाभ घेतलेला आहे. लाभक्षेत्रामध्ये प्रकल्पाच्या पाण्याव्दारे सिंचन झाल्याने भुगर्भ पाणी पातळीत वाढ झाली आहे व त्यामुळे खाजगी विहीरी व कुप नलीकांची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे पाण्याचा या ठीकाणी संयुक्तीक वापर होत असुन घेण्यात येणाऱ्या पिकांची प्रती हेक्टरी उत्पादकता रु.८३०० प्रति हे. वरुन या प्रकल्पाच्या सिंचनामुळे रु.१०७००० प्रति हे. पर्यंत वाढलेली आहे. परिणामी लोकांचे दरडोई उत्पादन वाढत असुन लोकांचे राहणीमानात सुधारणा झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नाव :- चंद्रभागा मध्यम प्रकल्प तालुका :- अचलपुर, जिल्हा :- अमरावती**					
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता हे. (Cropped Area)	७०१३ हे	सिंचन निर्मित क्षमता हे.जुन २०१२ :-७०१३ हे		प्रत्यक्ष झालेले सिंचनः- (सन २०११-१२) २०३६(हे.)	
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशील		दिनांक	दरसुची सन	किंमत रु.कोटी	प्रकल्पीय सिंचन क्षमता हे.मध्ये
	मुळ प्रशासकिय मान्यता		२६/०९/१९९०	१९८८-८९	२४.७९	७०१३
	प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता		०३/०९/१९९९	१९९५-९६	९६.३१	७०१३
	व्दितीय सुधारीत प्रशासकिय मान्यता		१३/११/२००२	१९९९-२०००	१७७.६४	७०१३
	तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता		२६/०६/२००९	२००८-०९	२००.२८	७०१३
४	केंन्द्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी		केंन्द्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र.२०(१३७/२००७-डब्ल्यु आर) दिनांक ५/१०/२००७ अद्यावत मान्यता (Investment Clearance) रु.१८८.९३			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च रु. कोटी १९९.९			:-	१९९.९१	
४.२	भुसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :- २०.३५			:-	२०.३५	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) :- १५६.४७			:-	१५६.४७	
४.४	ई.टि.पी.खर्च (रु.कोटी) :- २३.०९			:-	२३.०९	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष :-१९९१-९२			:-	१९९१-९२	
६	प्रकल्पाचे धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्षः- १९९२			:-	१९९२(प्रकल्पांची किंमत रु.२४.७९ कोटी)	
७	मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ				१०२.०८	५८.१७
७.२	भुसंपादन, पुनर्वसन/वनजमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ				६.२४	३.५५
	सुप्रमा किंमत रु.७.२८ कोटी - प्रमा किंमत रु.१.०४ कोटी उ रु. ६.२४ कोटी					
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प) अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ				०	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				२७.००	१५.३९
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) सोबतच्या टिप्पणीमध्ये सविस्तर कारणे नमुद केलेली आहे.				४०.१७	२२.८९
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती :-**					
८.१	भुसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन			१०० टक्के		
८.२	धरण (टक्केवारी)			१०० टक्के		
८.३	कालवा (एकुण लांबी / झालेली लांबी)			७.२५ कि.मी./७.२५ कि.मी (१०० टक्के)		
८.४	वितरण व्यवस्था (एकुण क्षेत्र /वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र)			७०१३ हे./७०१३ हे. (१०० टक्के)		
८.५	पाटचा-यांची कामे :- एकुण क्षेत्र /पाटचा-यांची कामे तयार झालेले क्षेत्रः-			७०१३ हे./४५६९ हे. (६५ टक्के)		
८.६	प्रकल्पाचा पाणीसाठा/निर्मित झालेला पाणीसाठा			४१.४२७ दलघमी /४१.४२७ दलघमी (१०० टक्के)		

मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

७.४:- सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

१) मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक यांच्या मातीधरणाच्या अंतीम काटछेदानुसार धरण माथ्याची रुदी ४.५० मी. ऐवजी ६.५० मी. आहे. त्यामुळे परिमाणात झालेल्या वाढीमुळे रु.२.५२ कोटी वाढ झाली.

२) मुळ प्र.मा. अहवालानुसार डाव्या तिरावर व्दारयुक्त ४५ मी लांबीची जलोत्सारणी प्रस्तावीत होती. त्या ऐवजी मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक यांचे कडुन प्राप्त संकल्पनानुसार नदीपात्रातील मध्यवर्ती १६१ मी लाबीची जलोत्सारणी प्रस्तावीत करण्यात आली. त्यामुळे रु ७.५४ कोटी वाढ झाली.

३) मुळ प्र.मा नुसार मुख्य विमोचक प्रस्तावीत होते. सुधारीत प्रशासकिय मान्यता मध्ये सिंचनासह विद्युत विमोचक प्रस्तावीत केल्याने झालेल्या संकल्पीय बदलामुळे रु. ९.४६ कोटी वाढ झाली.

४) प्रकल्पाची भाग १ ची कामे पारंपारीक पाटचारी ऐवजी भुमीगत पी.व्ही.सी. पाईप लाइनव्दारे लोकाग्रहास्तव प्रस्तावीत करावी लागल्याने रु.७.४८ कोटी वाढ झाली.

वरील सर्व घटकातील अभियांत्रीकी व संकल्पीय बदलामुळे एकुण रु.२७.०० कोटी वाढ झाली.

७.५:-इतर कारणामुळे झालेली वाढ :-

इतर कारणांमुळे एकुण रु.४०.१७ कोटीची वाढ झाली आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

मुळ प्रशासकिय मान्यता प्रस्तावात वाळु खदान प्रकल्प स्थळापासुन ३० कि.मी. अंतरावर प्रस्तावीत होती. परंतु प्रस्तावीत अंतरावर कुठल्याही खदानीमध्ये वाळु उपलब्ध नसल्याने ४२ कि.मी अंतरावरील आसेगाव पुर्णा येथील वाळु खदानीतुन वाळुची वहनावळ केल्याने व जलोरोधी खंदकातील भुस्तरातील झालेल्या बदलामुळे एकुण रु. ३.०४ कोटीची वाढ झाली आहे.

सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे टक्केवारी आधारीत असलेल्या उपशिर्षा मध्ये वाढ झाली आहे, तसेच निविदा आधिक्यामुळे वाढ झाली आहे. यामुळे एकुण १२.०४ कोटीची वाढ झाली आहे.

प्रकल्पाचे ई.टी.पी. चार्जेसमुळे एकुण रु. २५.०९ कोटीची वाढ झाली आहे.

चंद्रभागा मध्यम प्रकल्प

ता.अचलपुर **जि.अमरावती**

सविस्तर टिप्पणी

प्रस्तावना :-चंद्रभागा मध्यम प्रकल्प हा अमरावती जिल्हयातील व अचलपुर तालुक्यातील बोपापुर गावाजवळ बांधण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे मुख्यधरणाचे काम सन २००५ मध्ये पुर्ण झालेले असुन एकुण प्रकल्पीय संकल्पीत ४१.४२७ दलघमी. जलसंपत्ती सन २००५ पासुन प्रकल्पस्थळी निर्माण होत आहे

चंद्रभागा मध्यम प्रकल्पाला ७.२५ कि.मी.लांबीच्या डाव्या मुख्यकालव्याचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. तसेच वितरण प्रणालीचे ७०१३ हे.क्षेत्राचे बांधकाम सन २००९ मध्ये पुर्ण झालेल असुन संपुर्ण प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. प्रकल्पाचे सद्यस्थितीत पारंपारीक पाटचारी ऐवजी पीव्हीसी पाईप लाईवव्दारे भाग १ ची कामे प्रगतीपथावर आहेत. एकुण ७०१३ हे. क्षेत्राच्या भाग-१ च्या कामापैकी सद्यस्थितीत ४५६९ हे. भाग-१ ची कामे पुर्ण झालेली आहेत. व उर्वरीत कामे जुन-२०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.

➢ स्थानीक संघटना यांच्या मागणीच्या अनुषंगाने चंद्रभागा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात येंणाऱ्या सहकारी पाणी वापर संस्थातील लाभधारकांनी पारंपारीक पाटचारी ऐवजी पी.व्ही.सी. पाईपलाईन व्दारे भाग-१ ची कामे करण्याची मागणी केली. त्या अनुषंगाने भाग-१ ची कामे पाटचारी ऐवजी पाईलाईन व्दारे करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर प्रस्तावास नियामक मंडळाच्या २६ व्या बैठकिस मान्यता प्रदान करण्यात आली.

➢ **भुसंपादनाच्या अडचणी (उदा. PAP कास्तकारांचा विरोध इ.)**

चंद्रभागा प्रकल्पामुळे सोलामोह हे गाव पुर्णतः तसेच भोपापुर व गौरखेडा बाजार हि दोन गावे अंशतः अशी एकुण तीन गावे बाधीत झालेली आहे.

या तीनही गाावांची पुनर्वसनाची व पुनर्वसन अधिनियमानुसार नागरी सुविधांची कामे पुर्ण झालेली आहे. पुनर्वसनाकरीता कोणाचाही (**PAP**) विरोध नव्हता.

चंद्रभागा प्रकल्पाचे लाभक्षेत्रात संत्राबागा जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे याठिकाणी पारंपारीक पाटचा-यांना शेतक-यांचा विरोध होता. खुल्या पाटचा-यातील पाझरामुळे संत्राबागायतीस आवश्यक असणारा ताण व इतर दुष्परीणामुळे लाभक्षेत्रातील सहकारी पाणी वापर संस्थांतर्गत असलेल्या लाभार्थ्यांनी पारंपारीक खुल्यापाटचा-या ऐवजी विरोधामुळे भुमीगत पीव्हीसी पाईपलाईनव्दारे भाग-१ ची कामे करण्याची मागणी केली होती . त्यामुळे खुल्या पाटचा-यांऐवजी भाग-१ ची कामे पीव्हीसी पाईप लाईनव्दारे करण्यात येत आहे. तसेच प्रकल्पाचे लाभक्षेत्रात संत्राबागायती क्षेत्र अधिक असल्याने परिणामी शेतक-यांच्या विरोधामुळे तसेच भुसंपादनाच्या निवाडया पर्यत प्रक्रियेमुळे कालव्यासाठी लागणारी जमीन हे टप्याटप्याने संपादित करण्यात आली परिणामी कालव्यांची कामे पुर्ण करण्यास विलंब झाला.

➢ **प्रकल्पाची उपयोगीता :-**

चंद्रभागा मध्यम प्रकल्पामुळे ४१.४२७ दलघमी. जलसंपदा निर्मितीमुळे अचलपुर व परतवाडा शहराकरीता ९.६२ दलघमी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत होत आहे. प्रकल्पावर धरण पायथा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित असून १ x १००० कि.वॅ. जलविद्युत निर्मिती नियोजीत आहे. चंद्रभागा मध्यम प्रकल्पाचे ७०१३ लागवडी योग्य सिंचन क्षेत्र निर्मित झाले असुन त्यापैकी सन २०११-१२ मध्ये २०३६ हे.वरील लाभार्थ्यांनी सिंचनाचा लाभ घेतलेला आहे. लाभक्षेत्रामध्ये प्रकल्पाच्या पाण्याव्दारे सिंचन झाल्याने भुगर्भ पाणी पातळीत वाढ झाली आहे व त्यामुळे खाजगी विहीरी व कुप नलीकांची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे पाण्याचा या ठीकाणी संयुक्तीक वापर होत असुन घेण्यात येणाऱ्या पिकांची प्रती हेक्टरी उत्पादकता रु.७२५० प्रति हे. वरुन या प्रकल्पाच्या सिंचनामुळे रु.७२००० प्रति हे. पर्यंत वाढलेली आहे. परिणामी लोकांचे दरडोई उत्पादन वाढत असुन लोकांचे राहणीमानात सुधारणा झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : सपन**		**तालुका अचलपूर**		**जिल्हा अमरावती**
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	६३८० हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर ६११५ हेक्टर		प्रत्यक्ष झालेले सिंचन ९४० हेक्टर (सन २००८-०९)
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची (सन)	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	३.११.१९९५	१९९३-१९९४	२९.२९	४४००
	सु.प्र.मा.-१	१३.१.२००३	२०००-२००१	१३९.२७	४४००
	सु.प्र.मा.-२	४.५.२००७	२००५-२००६	२९५.८५	६३८०
	सु.प्र.मा.-३	७.७.२००९	२००८-२००९	३८७.३३	६३८०
४	केन्द्र शासनानी अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (र.कोटी)		Planning commission no. 20(13)/WR/GOI, dated 5.10.2007 for Rs. 200.70 crores (Prise level 2005-06)		
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)				३३९.८७ कोटी
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)				२१.८६ कोटी
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)				३१८.०१ कोटी
४.४	इ.टी.पी. खर्च (रू.कोटी)				०० कोटी
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				१९९८-९९
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष (अंदाजित किंमत)				नोव्हेंबर २००० रू.१३९.२७
७	मूळ प्रशसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			१४०.१६	३९.१५ टक्के
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ (मूळ प्र.मा. रू. ८० कोटी व त्रुतीय सु.प्र.मा. रू. २३.२४ कोटी)			२२.४४	६.२७ टक्के
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			३८.९१	१०.८७ टक्के
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१११.५३	३१.१५ टक्के
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (इतर ३७.१३ कोटी + ETP ७.८७ कोटी)			४५.००	१२.५६ टक्के
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**				
८.१	भूसंपादन				८५ टक्के
	पुनर्वसन				१०० टक्के
	वनजमीन संपादन				१०० टक्के
८.२	धरण (टक्केवारी)				१०० टक्के
८.३	कालवा		एकूण लांबी १०.९० कि.मी. झालेली लांबी १०.९० कि.मी.		१०० टक्के १०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र १०७ कि.मी.)		झालेले क्षेत्र ७५ कि.मी.		७० टक्के
८.५	पाटचा-यांची कामे (एकूण क्षेत्र ६३८० हेक्टर)		झालेले क्षेत्र १९१४ हेक्टर		३० टक्के
८.६	पाणीसाठा (एकूण / निर्मित)		एकूण साठा ३९.९७ दलघमी निर्मितसाठा ३९.९७ दलघमी		१०० टक्के

सपन नदी प्रकल्प

ता.अचलपूर जि.अमरावती

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

तत्कालीन लोकप्रतिनिधी ना.सौ.वसुधाताई देशमुख (सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे राज्यमंत्री) यांचे मागणीनुसार उपलब्ध येव्याच्या सुधारीत अभ्यास करण्यात आला व सुधारीत येव्यानुसार धरणाची उंची ४.५० मी. ने वाढविण्यात आली. त्यानुसार झालेले बदल खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	विवरण	मुळ प्र.मा नुसार	सु.प्र.मा नुसार
१	धरणाची उंची	५०.७७	५५.२७
२	साठवण क्षमता	३०.३०७	३९.९६७
३	जलोत्सारीणीची लांबी	४१.५०	५७
४	द्वारांची संख्या	३	४
५	बुडीत क्षेत्र हे.	१९८	२६३
६	बाधीत गांवे	१	२
७	लाभक्षेत्र हे.	४४००	६३८०

- या **व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्पाचे किंमतीत ३८.९१ कोटी रु. इतकी वाढ झाली आहे**. या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

- धरणाच्या उंचीत वाढ झाल्यामुळे धरणाच्या तळ रुंदीत वाढ झाली. माथारुंदी ४.५० मी ऐवजी ६.५०मी, बर्मची रुंदी अधो बाजुस ६ मी ऐवजी ८ मी व उर्ध्व बाजुस ५ मी ऐवजी ८ मी घेण्यात आली. यामुळे भरावाचे कामात वाढ झाली. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ३७.१७ कोटीची वाढ झाली आहे**
- प्र.मा प्रस्तावानुसार १२ = ६.५० मी चे ३ द्वारे प्रस्तावित होती. सुधारीत पूर अभ्यासानुसार १२ x ८ मी चे ४ द्वारे देण्यात आली आहेत. जलोत्सारीणीची लांबी ४१.५० मी वरुन ५७ मी देण्यात आली. मुळ प्र.मा. अंदाजपत्रकानुसार उत्सारीत व अनुत्सारीत भागाचे बांधकाम दगडी बांधकामात प्रस्तावित होते तसेच उर्ध्व बाजुस ५ मी चे कोलग्राऊट देण्यात आले होते त्याऐवजी संपुर्ण काम एम-१० संधानक देण्यात आले आहे. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ७४.३६ कोटीची वाढ झाली आहे**

७.५ इतर कारणे (स्पष्ट करावीत) :-

प्रकल्पाच्या व्याप्तीत व संकल्पनात बदल झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रकात नसलेल्या बाबींचा समावेश करावा लागला. त्यामुळे ३७.१३ कोटीची वाढ झाली. ह्या बाबी प्रामुख्याने एम-१० संधानक, गौण खनिजाचे स्वामित्व शुल्क, लाभक्षेत्राचे सखोल सर्वेक्षण, वितरण प्रणालीचे सखोल सर्वेक्षणा नुसार विस्तृत अंदाजपत्रके, धरणाचे विद्युतीकरण, व नियंत्रीत सुरंगाद्वारे खोदकाम ह्या आहेत. त्यापैकी वितरण प्रणालीच्या कामासाठी रु १६.५४ कोटी, मुख्य कालवा निवडक अस्तरीकरणासाठी रु ४.७१ कोटी वाढ झालेली आहे. प्रकल्पाच्या एकून किंमतीत वाढ झाल्यामुळे ई.टी.पी. चार्जेस मध्ये ७.८७ कोटीची वाढ झाली आहे.

सपन नदी प्रकल्प

ता.अचलपूर जि.अमरावती

संक्षिप्त टिप्पणी

सपन नदी प्रकल्प अचलपूर तालुक्यातील वझ्झर गावाजवळ बांधण्यात आला आहे. सदर प्रकल्प तापी खोऱ्यातील पूर्णा उपखोऱ्यात आहे.

या प्रकल्पाचा एकुण पाणी साठा ३९.९६७ द.ल.घ.मी. असुन ०.६० द.ल.घ.मी. पाणी

घरगुती व औद्योगीक वापरासाठी आरक्षित आहे.

प्रकल्पाची एकुण सिंचन क्षमता ६३८० हे. सिंचन असुन ६१९५ हे. सिंचन क्षमता निर्मीती झालेली आहे. या प्रकल्पामुळे ०.७५ मे.वॅट विद्युत निर्मीती सुध्दा होणार आहे. तसेच २ गांवे बाधीत झाली आहेत.

या प्रकल्पासाठी ४९.५४ हे. वनजमीन आवश्यक होती. वनजमीनीच्या हस्तांतरण प्रस्तावास केंद्र शासनाने पत्र क्र.१७३/९७ दिनांक ३/४/२००० मान्यता दिली. व त्यानंतर कामास सुरुवात झाली. **यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होण्यास ५ वर्षाचा विलंब झाला.**

तत्कालीन लोकप्रतिनिधी ना.सौ.वसुधाताई देशमुख (सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे राज्यमंत्री) यांचे मागणीनुसार उपलब्ध येव्याच्या सुधारीत अभ्यास करण्यात आला व सुधारीत येव्यानुसार धरणाची उंची ४.५० मी. ने वाढविण्यात आली. त्यामुळे धरणाची साठवण क्षमतेत ९.६६ द.ल.घ.मी ने व लाभक्षेत्रात १९८० हे. ने वाढ झाली. या व्याप्तीतील बदलामुळे कालवे व वितरण प्रणालीच्या कामा मध्ये वाढ झाली यामुळे प्रकल्पाचे किंमतीत ३८.९१ कोटी रु. इतकी वाढ झाली आहे. या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे. सदर कामाचा समावेश सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

धरणाचे उंचीत व व्याप्तीत बदल झाल्यामुळे धरणाचे संकल्पचित्रात मोठे बदल झालेत त्यामुळे धरणाचे विविध घटक भागांचे संकल्पन सुधारीत करावे लागले. या संकल्पनास व सुधारीत संकल्पनानुसार माती धरणाचे व सांडव्याचे वाढीव परीमाणाचे काम करण्यास मोठा कालावधी लागला. संकल्पचित्रे प्राप्त करणे त्यास सक्षम स्तरावरुन मान्यता घेणे व वाढीव परिमाणाचे कामे करणे यासाठी सुमारे **४ वर्षाचा जादा कालावधी लागला.** तसेच वाढीव भुसंपादन व वाढीव एका गांवाचे पुनर्वसन करावे लागल्यामुळे यास सुमारे **३ वर्षाचा अधीक कालावधी लागला.**

मुख्य धरणाचे व मुख्य कालव्याचे काम पूर्ण झाले असुन सन २०१० पासुन पाणीसाठा करण्यात येत आहे. तसेच सन २००७-०८ पासून अंशतः सिंचनसुध्दा करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत. वितरण प्रणालीची कामे प्रगतीपथावर असुन ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. लाभक्षेत्र विकास भाग-१ ची कामे ३० टक्के पूर्ण झाली आहेत. प्रकल्पाची ६१९५ हे सिंचन क्षमता निर्माण झाली असुन सद्यःस्थितीत सन २००७-०८ पासुन काही भागातील शेतकरी सिंचनाचा लाभ घेत आहेत. विज निर्मिती प्रकल्पाचे काम जलविद्युत विभागामार्फत नुकतेच हाती घेण्यात आले असुन याचाही लाभ परीसरातील भागास होणार आहे. तसेच या प्रकल्पावरुन २२४ गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षणाचे प्रस्तावास शासनाकडून मान्यता प्राप्त झाली असुन जिवन प्राधीकरणा मार्फत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सन २०१४ पर्यंत या प्रकल्पाचे सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रक़ल्पाचा वाढता कालावधी व क़िंमतीबाबतचा तपशिल

१	**प्रक़ल्पाचे नाव -पंढरी मध्यम प्रक़ल्प तालुका-वरुड, जिल्हा-अमरावती**				
२	प्रक़ल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) **८३७०** हे.	निर्मित सिंचन क्षमता (हे.) जून २०१२ : **०**		प्रत्यक्ष झालेले सिंचन **०**	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	क़िंमत (रू.कोटी)	प्रक़ल्पीय सिंचन
	मुळ प्रशासकीय मान्यता	१५/०६/०५	२००३-०४	१७९.४२	८१५०
	सुप्रमा -१	२०/०२/०९	२००८-०९	६०२.७१	८३७०
४	केंद्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/investment) संदर्भ व क़िंमत (रू.कोटी)			---	
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)			५१६.१४	
४.२	भू-संपादन,पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)			८१.६२	
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)			४३४.५२	
४.४	इटीपी खर्च (रू.कोटी)			--	
५	प्रक़ल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			२००५-०६	
६	प्रक़ल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष व क़िंमत			मे-२००८ रु. ६०२.७१ कोटी	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		रक्कम (रू.कोटी)		टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ		१०७.९१		२५.४९
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (मुळ प्र.मा. रु. २३.३५ कोटी व सु.प्र.मा. ६१.२२ कोटी)		३७.८७		८.९५
७.३	प्रक़ल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रक़ल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदूमुळे झालेली वाढ)		२.७६		०.६५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		२२७.९३		५३.८४
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (इतर ० + ETP ४६.८३)		४६.८३		११.०७
८	**प्रक़ल्पाची सद्यःस्थिती**				
८.१	भूसंपादन,				९२ टक्के पुर्ण
	पुनर्वसन,				९० टक्के पुर्ण
	वन जमिन संपादन				१०० टक्के पुर्ण
८.२	धरणे (टक्केवारी) मातीधरण				१०० टक्के पुर्ण
	सांडवा				३५ टक्के पुर्ण
८.३	कालवा (एकूण लांबी २१.६८ कि.मी. व झालेली लांबी ३ कि.मी.)				१४ टक्के पुर्ण
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ९८५० हे. व वितरण प्रणली तयार झालेले क्षेत्र ० हे.) (१३० कि.मी. / ० कि.मी.)				० टक्के पुर्ण
८.५	पाटचायाची कामे (एकूण क्षेत्र ९८५० हे. व पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्र ० हे.)				० टक्के पुर्ण
८.६	प्रकल्पीय पाणीसाठा ७१.१४ द.ल.घ.मी. व निर्मीत पाणीसाठा ० द.ल.घ.मी.				० टक्के पुर्ण

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल (पंढरी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालानुसार या प्रकल्पास फक्त उजवा कालवा प्रस्तावित होता. मा.हर्षवर्धन देशमुख, आमदार मोर्शी मतदार संघ यांनी मा.ना.श्री. अजितदादा पवार, मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य यांना लिहीलेल्या दिनांक ४/९/२००७ चे पत्रानुसार मागणी केल्याप्रमाणे ३.१८ कि.मी.चा **डावा कालवा प्रस्तावित केल्यामुळे कालवा व वितरण प्रणालीचे कामासाठी प्रकल्पाचे किंमतीत रु. २.७६ कोटीची वाढ झाली आहे.**

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

- मध्यवर्ती संकल्पचित्र संघटने कडुन सविस्तर संकल्पनाअंती प्राप्त काटछेदानुसार प्रत्यक्ष काम करण्यात आले. त्यानुसार माथारुंदी ४.५० मी ऐवजी ६.५०मी, बर्मची रुंदी अधो बाजुस ७ मी ऐवजी १२ मी व उर्ध्व बाजुस ५ मी ऐवजी १० मी घेण्यात आली. तसेच दोन्ही बाजुचे उतार १:३ ऐवजी १:३.५० मी झाला आहं. यामुळे भरावाचे कामात वाढ झाली. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ५८.०९ कोटीची वाढ झाली आहे.**

- धरण बैठकीमधील जमीन संत्राबागाईत व वन जमीन होती त्यामुळे मुळ प्र.मा. अदाजपत्रकात ०.६० मी. स्ट्रिपींग ऐवजी १.५०मी घेण्यात आली त्यामुळे सविस्तर संकल्पनाअंती कामाचे परीमाणात वाढ झाली. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ४.१८ कोटीची वाढ झाली आहे**

- जलरोधी खंदक कठीण खडकावर ठेवण्यात आल्यामुळे व बाजुचे उतार क्षेत्रिय परिस्थितीनुसार ०.५०:१ ऐवजी १:१ व ०.२५:१ ऐवजी ०.५०:१ असे घेण्यात आल्यामुळे जलरोधी खंदकाचे खोदकामात वाढ झाली व परीणामी भराईचे परिमाणात वाढ झाली आहे. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ६७.५४ कोटीची वाढ झाली आहे.**

- पुरवठा कालव्याचे सा.क्र. २७०० ते ३२१० मी मध्ये बोगदा ऐवजी खुले खोदकाम करावे लागले. त्यामुळे खोदकामाचे परिमाणात वाढ झाली. वनजमीनीमुळें व पंढरी गांव जवळ असल्यामुळे खोदकाम नियंत्रीत सुरंगाद्वारे करावे लागले. तसेच बाजुचे खोदकामातील उतार क्षेत्रिय परिस्थितीनुसार ०.२५:१ ऐवजी ०.५०:१ असे घेण्यात आल्यामुळे खोदकामाचे परीमाणात वाढ झाली. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ९८.१२ कोटीची वाढ झाली आहे**

७.५ इतर कारणे (स्पष्ट करावीत) :- प्रकल्पाच्या एकूण किंमतीत वाढ झाली असल्यामुळे ई.टी.पी. खर्चात रु ४६.८३ कोटीची वाढ झाली आहे.

पंढरी मध्यम प्रकल्प

ता. वरुड जि.अमरावती

संक्षिप्त टिप्पणी

पंढरी मध्यम प्रकल्प वरुड तालुक्यातील शक्ती नदीवर पुसला गावाचे उर्ध्व बाजुस २ कि.मी. अंतरावर बांधण्याचे प्रस्तावित आहे. वर्धा नदीचे पाणी मौजे पिंपळागड गावाजवळ नदीपात्रात डायव्हर्शन विअर बांधुन पुरवठा कालव्याद्वारे वळविण्यात येऊन पंढरी मध्यम प्रकल्पामध्ये साठविण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पाचा एकुण पाणी साठा ७१.१४ द.ल.घ.मी. असुन ८.५२६० द.ल.घ.मी. पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित आहे. त्याद्वारे ८३७० हे. जमीन ओलीताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे १ गांव बाधीत होत आहे. सदर प्रकल्प वरुड तालुक्यात आहे व या तालुक्यतील बहुतेक जमीन संत्रा बागायती आहे. त्यामुळे भूसंपादनास विरोध होता तसेच बागायती जमीनीला जादा भाव द्यावा लागला.

या प्रकल्पासाठी २०९.७३ हे. वनजमीन आवश्यक आहे. वनजमीनीच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव सन २००६ मध्ये वनखात्यास सादर करण्यात आला व केंद्र शासनामार्फत दिनांक २०/१०/२००८ मध्ये तत्वतः मान्यता प्राप्त झाली. व त्यानंतर प्रकल्पाचे कामास सुरुवात झाली. वनजमीन मान्यतेअभावी सन २००५ ते २००८ या कालावधीत प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही. यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होण्यास ३ वर्षाचा विलंब झाला.

पुरवठा कालव्यावरील रस्ता ओलांड्याचे कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे व बॅरेजचे प्रस्तंभ टोपणाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचे कडे प्रलंबीत असल्यामुळे सुमारे २ वर्षाचा विलंब झाला.

मार्च -२०१२ अखेर प्रकल्पावर एकूण ५१६.१४ कोटी खर्च झाला आहे.

माती धरणाचे काम १००% पूर्ण व सांडव्याचे काम ३५% पूर्ण झाले आहे. वळण बंधारा व पुरवठा कालवा पूर्ण झाला असुन उजव्या मुख्य कालव्याचे काम १०% पूर्ण झाले आहे. सन २०१६ पर्यंत या प्रकल्पाचे सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : वासनी प्रकल्प, तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	४३१७ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर ०० हेक्टर		प्रत्यक्ष झालेले सिंचन हेक्टर ०० हेक्टर
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची (सन)	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१४.२.२००८	२००७-०८	१०२.८२	४३१७
	सु.प्र.मा.-१	१५.१.२००९	२००८-०९	१९७.८३	४३१७
४	केन्द्र शासनानी अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (र.कोटी)				
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)				१७२.०९ कोटी
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)				११.७७ कोटी
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)				१६०.३२ कोटी
४.४	इ.टी.पी. खर्च (रू.कोटी)				--
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष				२००७-०८
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष (अंदाजित किंमत)				फेब्रु-२००८ रू. १०२.८२ कोटी
७	मूळ प्रशसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			२८.१४	२९.६२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ (मूळ प्र. मा. रू. १३.२६ कोटी व सु. प्र.मा. २०.७० कोटी)			७.४४	७.८३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			४८.६३	५१.१८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (इतर २.४५ + ईटीपी ८.३५)			१०.८०	११.३७
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**				
८.१	भूसंपादन				३० टक्के
	पुनर्वसन				०२ टक्के
	वनजमीन संपादन				१०० टक्के
८.२	धरण (टक्केवारी)				माती धरण १५ टक्के व सांडवा ६० टक्के
८.३	कालवा		एकूण लांबी १३.०५ कि.मी. झालेली लांबी ०० कि.मी.		०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था		एकूण क्षेत्र ५०४३ हेक्टर. झालेले क्षेत्र ०० हेक्टर		०० टक्के
८.५	पाटचा-यांची कामे (एकूण क्षेत्र हेक्टर)		एकूण क्षेत्र ५०४३ हेक्टर. झालेले क्षेत्र ०० हेक्टर		०० टक्के
८.६	पाणीसाठा (संकल्पीत द.ल.घ.मी.)		एकूणसाठा ३१.५३ दलघमी निर्मितसाठा ०० दलघमी		०० टक्के

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल (वासनी)

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

प्र.मा. अंदाजपत्रकानुसार या प्रकल्पाचा सांडवा नदीमध्ये प्रस्तावित होता. प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीनुसार नदीमध्ये योग्य पायवा भुस्तर उपलब्ध नसल्यामुळे साईड स्पिलवे प्रस्तावित करण्यात आला आहे. या बदलामुळे आगमन व पुच्छ कालव्याच्या खोदकामात वाढ झाली आहे. मुळ प्र.मा.नुसार या प्रकल्पास आगमन व पुच्छ कालवा प्रस्तावित नव्हता. सुधारीत संकल्पनानुसार ३६०मी लांबीचा आगमन कालवा व ११०० मी लांबीचा पुच्छ कालवा प्रस्तावित करण्यात आल्यामुळे खोदकामाच्या बाबीत वाढ झाली. **यामुळे प्रकल्पाचे किंमतीत रु ५१.०८ कोटीची वाढ झाली आहे**

७.५ इतर कारणे (स्पष्ट करावीत) :-

प्रकल्पाचे अ-प्राथमीक यामध्ये ०.२२ कोटी, एम-वृक्षारोपन मध्ये ०.१९ कोटी, ओ-संकिर्ण मध्ये १.४८ कोटी व पी-देखभाल मध्ये ०.५६ कोटी अशी एकूण २.४५ कोटीची वाढ झाली आहे. तसेच प्रकल्पाचे एकूण किंमतीत वाढ झाल्यामुळे ई.टी.पी. खर्चात रु ८.३५ कोटीची वाढ झाली आहे.

वासनी मध्यम प्रकल्प

ता. अचलपूर जि.अमरावती

संक्षिप्त टिप्पणी

वासनी मध्यम प्रकल्प अचलपूर तालुक्यातील मौजे वासनी गावाचे वरचे बाजुस सपन नदीवर प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प तापी खोऱ्याच्या पूर्णा उपखोऱ्यात आहे.

या प्रकल्पाचा एकुण पाणी साठा ३१.५२ द.ल.घ.मी. असुन ४.२८ द.ल.घ.मी. पाणी बिगर सिंचनासाठी आरक्षित आहे. या प्रकल्पाद्वारे ४३१७ हे. जमीन ओलीताखाली येणार आहे. व ३ गांवे बाधीत होत आहेत.

या प्रकल्पासाठी २४.७३ हे. वनजमीन आवश्यक आहे. वनजमीनीच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव जुन २००८ मध्ये वनखात्यास सादर करण्यात आला व केंद्र शासनामार्फत दिनांक ०३/२००९ मध्ये तत्वतः मान्यता प्राप्त झाली. व त्यानंतर प्रकल्पाचे कामास सुरुवात झाली. वनजमीन मान्यतेअभावी मार्च २००८ ते मार्च २००९ या कालावधीत प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नाही. **त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होण्यास १ वर्षाचा विलंब झाला आहे.** दरम्यान सांडव्याचा पायव्याचा भुस्तर विचारात घेवून नदीमधील सांडव्या ऐवजी साईड स्पिलवे देण्यात आला संकल्पनातील झालेला बदल विचारात घेवून या प्रकल्पाचे प्रथम सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

मार्च -२०१२ अखेर प्रकल्पावर एकूण १७२.०९ कोटी खर्च झाला आहे

माती धरणाचे काम १५% व सांडव्याचे काम ६०% पूर्ण झाले असुन कालव्याचे कामे सुरु व्हायचे आहेत. सन २०१६ पर्यंत या प्रकल्पाचे सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रक्रल्पाचा वाढता कालावधी व क्रिंमतीबाबतचा तपशिल (प्रक्रल्पनिहाय)

१	**प्रक्रल्पाचे नाव -अडाण मध्यम प्रक्रल्प, तालुका- कारंजा, जिल्हा-वाशिम**				
२	प्रक्रल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) **१००६७** हे.	निर्मित सिंचन क्षमता (हे.) जून १९९९		प्रत्यक्ष झालेले सिंचन ८२९४ हे. (सन २००६-०७)	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	क्रिंमत (रू.कोटी)	प्रक्रल्पीय सिंचन
	मुळ प्रशासकीय मान्यता	२३/१०/१९७४	१९७४-७५	३.७८	१०७१३
	सुप्रमा -१	२०/३/१९८२	१९८०-८१	११.९७	१००६७
	सुप्रमा -२	२०/९/१९९४	१९९३-९४	४६.८६	१००६७
	सुप्रमा -३	१५/३/२०००	१९९७-९८	७१.२७	१००६७
	सुप्रमा -४	२१/५/२००९	२००७-०८	९३.९६	१००६७
४	केंद्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/investment) संदर्भ व क्रिंमत (रू.कोटी)	पत्र क्र. II-10(I)(14)72-I CAD Dt. 21.12.1973 रु. २८९.०८ लक्ष			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)	७९.९०			
४.२	भू-संपादन,पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)	१.६१			
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)	६५.११			
४.४	इटीपी खर्च (रू.कोटी)	१३.१८			
५	प्रक्रल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७४-७५			
६	प्रक्रल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष (यावेळी मंजुर असलेली प्र.मा. क्रिंमत रू. ३.७८ कोटी)	१९७४			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (रू.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			२८.८१	३१.९५
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (०.४३-४.७२)			४.२९	४.७६
७.३	प्रक्रल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रक्रल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदूमुळे झालेली वाढ			०.४७	०.५२
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			८.५६	९.४९
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)+ ETP (३३.२३+१४.८२)*			४८.०५	५३.२८
८	प्रक्रल्पाची सद्यःस्थिती				
८.१	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन संपादन				१०० टक्के पुर्ण
८.२	धरणे (टक्केवारी)				१०० टक्के पुर्ण
८.३	कालवा (एकूण लांबी ६५.०० कि.मी. व झालेली लांबी ६५.०० कि.मी.)				१०० टक्के पुर्ण
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ९९९९ हे. व वितरण प्रणली तयार झालेले क्षेत्र ९९९९ हे.)				१०० टक्के पुर्ण
८.५	पाटचायाची कामे (एकूण क्षेत्र ९९९९ हे. व पाटचायाची कामे तयार झालेले क्षेत्र ९९९९ हे.)				१०० टक्के पुर्ण
८.६	प्रकल्पीय पाणीसाठा ७८.३२ द.ल.घ.मी. व निर्मीत पाणीसाठा ७८.३२ द.ल.घ.मी.				१०० टक्के पुर्ण

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.४ सविस्तर घटक संकल्प चित्रामुळे झालेली वाढ :-

१) अडाण प्रकल्पाचे कामास १९७४ साली सुरुवात झाली व १९७७ साली घळभरणीचे काम पुर्ण झाले परंतु एप्रिल-१९७८ साली धरणाचे मातीकाम खालील बाजूस १५० मी. लांबीमध्ये खचल्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून कायमस्वरुपी उपायोजना प्राप्त करून सन १९८३ साली काम पुर्ण करण्यात आले.

मुख्य कालव्याचे मुळ अस्तरीकरण क्षतिग्रस्त झाल्याने पाझरामुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता निवडक ठिकाणी अस्तरीकरण दुरुस्तीचे कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये रु. ६.४१ कोटी ची तरतूद करण्यात आली.

मुख्य कालवा कि.मी. ५१ च्या पुढील भागात पाणी पोहचविण्याचे दृष्टीने कि.मी. ५१ मधील साठवण तलावा मधून द्रुतगती कालव्याचे कामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये रु. ०.८० कोटी ची तरतूद करण्यात आली.

७.५ इतर कारणे :

१) संगणकीय प्रणाली मध्ये जलोत्सारणीचे व्दाराचे प्रचलन करण्याकरीता तसेच देखभाल दुरुस्तीकरीता रु. २.०० कोटी ची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये तरतूद करण्यात आली.

पाणी वापर संस्था यांना क्षेत्र हस्तांतरणाचे दृष्टीने करावयाची आवश्यक दुरुस्ती करीता सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये रु. २.५० कोटी ची तरतूद करण्यात आली.

ईतर कारणामुळे रु. २८.७३ कोटी ची वाढ झाली.

अडाण नदी मध्यम प्रकल्प

ता. कारंजा जि. वाशिम

प्रकल्प विषयक टिपणी

अडाण नदी प्रकल्प म्हसणी ता. कारंजा जि. वाशिम येथे १९७७ साली बांधण्यात आला आहे. प्रकल्पाच्या मातीधारणाची लांबी ७५५ मी. असुन, जलोत्सारणीची लांबी ७२ मी. आहे. जलोत्सारणीवर १२ X ८ मीटरची ५ वक्रव्दारे आहेत. धरणाचे एकूण पाणलोट क्षेत्र ७९८ चौ.कि.मी. आहे धरणाची एकूण उंची ३०.२९ मी. असुन महत्तम साठा ७८.३२ द.ल.घ.मी. इतका आहे. प्रकल्पाला एक उजवा कालवा असुन, कालव्याची लांबी ६५ कि.मी. आहे. प्रकल्पाची सिंचन क्षमता १००६७ हे. असुन, संपुर्ण सिंचन क्षमता निर्मीती झाली आहे.

१) लोक प्रतिनिधी स्थानिक संघटना यांचे मागणीनुसार वाढ :- निरंक

प्रकल्पाची सद्यःस्थिती :-

सद्यास्थितीत धरणाचे, कालव्याचे, वितरणप्रणालीचे १०० टक्के काम पुर्ण झाले आहे. तसेच भुसंपादन व पुनर्वसनाची कामे पुर्ण झालेली आहे. भुविकास भाग-१ ची १०० टक्के कामे पुर्ण झालेली आहे. लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्याचे दृष्टीने हस्तांतरणपुर्व आवश्यक दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. वरील कामे जून-२०१४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पावर १९७७ पासून सिंचन सुरु आहे. सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये साखर कारखाना सुरु झाला आहे. खरीप हंगामाचे सिंचन ग्राहय धरता सन २००६-०७ मध्ये ८२९४ हेक्टर (८३ टक्के) सिंचन झाले आहे. याच प्रमाणे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील भुजल पातळीमध्ये सुध्दा वाढ झाली आहे. यामुळे लाभक्षेत्रातील विहीरीवरील सिंचन क्षेत्रात वाढ झालेली आहे.

सिंचन प्रकल्पाचा वाढता कालावधी व किंमतीबाबतचा तपशिल

१	**प्रक्रल्पाचे नाव :- नवरगांव मध्यम प्रक्रल्प तालुका-मारेगांव, जिल्हा- यवतमाळ**				
२	प्रक्रल्पीय सिंचन क्षमता २८७८(हेक्टर) (Cropped Area).		निर्मित सिंचन क्षमता २८७८ (हेक्टर) जुन २०१२		प्रत्यक्ष झालेले सिंचन १७४२ हेक्टर (सन 2002-03)
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	क्रिंमत (रू.कोटी)	प्रक्रल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०६/१०/१९९२	१९९१-९२	८.७२	३४३०
	सुप्रमा -१	०५/०८/२०००	१९९५-९६	२८.२४	३४५०
	सुप्रमा -२	३०/०१/२००७	१९९९-२०००	४६.४८	२८७८
	सुप्रमा -३	२९/०२/२०१२	२००७-२००८	७०.७०	२८७८
	सुप्रमा -४	--	--	--	--
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/investment) संदर्भ व क्रिंमत (रू.कोटी)			T.A.C. १३/०४/१९८८ रु. ५.२६ कोटी	
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)		५९.३०		
४.२	भू-संपादन,पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी)		९.३७		
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी)		४३.१६		
४.४	इटीपी खर्च (रू.कोटी)		६.७७		
५	प्रकल्पास प्रथमत अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९९२		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष		जून - १९९२		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (कोटी	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			२३.२९	३७.५७
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ			११.८८	१९.१७
७.३	प्रक्रल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रक्रल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ			६.३९	१०.३१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			६.९८	११.२७
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१३.४४	२१.६८
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन संपादन	धरणाकरिता १०० टक्के भुसपांदन झालेले आहे. कालव्या करिता किरकोळ भूसंपादन कास्तकारांचे विरोधामुळे झालेले नाही. पुनर्वसन व वनजमीन संपादन आवश्यक नाही.			
८.२	धरणे (टक्केवारी)				पुर्ण १०० टक्के
८.३	कालवा (एकुण लांबी २८ कि.मी. व झालेली लांबी २८ कि.मी.				पुर्ण १०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र २०६० हेक्टर व वितरण प्रणली तयार झालेले क्षेत्र २०६० हेक्टर				पुर्ण १०० टक्के
८.५	पाटचायाची कामे (एकूण क्षेत्र पाटचायाची कामे झालेले क्षेत्र)				२०६० हेक्टर
८.६	पाणीसाठा : एकूण पाणीसाठा : १४.९८ द.ल.घ.मी. निर्मित पाणीसाठा : १४.९८ द.ल.घ.मी.				पुर्ण १०० टक्के पुर्ण १०० टक्के

अ.क्र.७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रक़ल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रक़ल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ)	:-	मुख्य कालव्याच्या २८ कि.मी. लांबीपैकी मुळ संरेखा कि.मी.२० ही कोळसा खाणीतुन जात होती. त्या संरेखामध्ये बदल करण्यांत आला.बदल करण्यांत आलेल्या संरेखेत कि.मी. २० मध्ये पोकळी आढळली सदर कि.मी. मधुन त्यानंतर विसर्ग व्यवस्थीत जाण्यासाठी सलोह संधानकामध्ये अस्तरी करणाचे प्रयोजन करण्यांत आले आहे. एकुण वाढ रु. ६.३९ कोटी आहे.
७.४ सविस्तर घटक संकल्प चित्रमुळे झालेली वाढ	:-	सविस्तर सर्वेक्षणानंतर मुळ प्रशासकीय मान्यतेत समाविष्ट नसल्यामुळे मुख्य कालव्याच्या लांबीत १४.७० कि.मी. ने वाढ झाली सदर वाढीव लांबीत गांव रस्ता पुल व इतर कालव्यावरील बांधकामाचा समावेश करण्यात आला त्यामुळे प्रकल्पाच्या संकल्पचित्रात व्याप्तीच्या बदलामुळे रू. ६.९८ कोटी वाढ झालेली आहे.
७.५ इतर कारणे	:-	१) भूसंपादनाबाबत न्यायालयीन प्रकरणे, कलम १८ व २८ (अ) अंतर्गत न्यायालयाने दिलेल्या निकालाप्रमाणे भुगतान करण्याकरिता तरतूद केल्यामुळे वाढ झालेली आहे. मुख्य शिर्षांतर्गत मुरुम आवरण कर्बींग स्टोन, हिरवळ लावणे हयुम पाईप मोरी व इतर अनुषंगीक घटकामुळे झालेली वाढ तसेच मुख्य कालव्या अंतर्गत सिंचन व्यवस्थापनेस प्रकल्प हस्तांतरीत करावयाचे दृष्टीने प्रस्तावित केलेल्या कामामुळे झालेली वाढ रु. ४.३० कोटी २) आस्थापना हत्यारे व संयंत्रे (ईटीपी) मध्ये झालेली वाढ रु. ९.१४ कोटी
लोकप्रतिनिधीची शिफारस	:-	--

नवरगांव मध्यम प्रकल्प
ता. मारेगांव जि.यवतमाळ

नवरगांव मध्यम प्रकल्प हा यवतमाळ जिल्हातील मारेगांव तालुक्यामध्ये नवरगांव गावजवळील निरगुडा नदीवर बांधण्यांत आलेला आहे.

प्रकल्पाच्या मातीकामाची धरणाची लांबी २४८३ मीटर असून जलोत्सारणीची लांबी २३२ मीटर आहे. जलोत्सारणीचा प्रकार हा विनाव्दार ओगी टाईप असा आहे. धरणाचे एकूण पाणलोट क्षेत्र ९६ चौ.कि.मी. आहे. धरणाची एकूण उंची १९.३१ मीटर इतकी आहे. या प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा १४.९८७ द.ल.घ.मी. असून त्यापैकी १२.४७५ द.ल.घ.मी.उपयुक्त व २.५०८ द.ल.घ.मी. मृत साठा आहे. या प्रकल्पाची २८७८ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षमता असून याव्दारे २०५६ हेक्टर जमीन ओलीतासाठी येणार आहे.

प्रकल्पाची सद्यःस्थिती :-

प्रकल्पाचे काम १९९२ ला सुरू होऊन सद्यःस्थितीत धरण, कालवे व वितरण प्रणालीची कामे पूर्ण झाली आहे. प्रकल्पाची भूविकासाची कामेही पूर्ण झाली आहेत. या प्रकल्पावर सन २००२-०३ पासून सिंचन सुरू झाले आहे. लाभक्षेत्र पाणीवापर संस्थेस हस्तांतरपूर्ण आवश्यक दुरूस्तीची कामे प्रस्तावित आहेत. तसेच मुख्य कालव्याच्या २८ कि.मी. लांबीपैकी मूळ संरेखा कि.मी. २० कोळसा खाणीतून जात होती. त्या संरेखामध्यम बदल करण्यात आला. बदल करण्यात आलेल्या संरेखेत कि.मी. २० मध्ये पोकळी आढळली. सदर कि.मी. मधून त्यानंतर विसर्ग व्यवस्थीत जाण्याकरिता सलोह संधानकामध्ये अस्तरीकरणाचे प्रयोजन करण्यात आले. सदर प्रकल्प सन जून-२०१४ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजित आहे. खरीप हंगामाचे सिंचन ग्राहय धरता सन २००२-०३ मध्ये १७४२ हेक्टर सिंचन झाले आहे. तसेच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधील भूजल पातळीमध्ये सुध्दा वाढ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : मन मध्यम प्रकल्प, तालुका : खामगांव, जिल्हा : बुलढाणा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता ८२८५ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता ८२८५ हेक्टर		वर्ष २००६-०७ महत्तम सिंचन ३०५० हेक्टर	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	९/८/१९७९	१९७८-७९	५.१८३	९२८७
	सुप्रमा-१	११/१/१९९०	१९८४-८५	१८.६०७	९२८७
	सुप्रमा-२	२१/९/२००१	१९९४-९५	४८.५०१	९२८७
	सुप्रमा-३	६/१२/२००५	२०००-०१	५९.१८७	८२८५
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		५४.७५		
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)		१.४०		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		५१.२१		
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)		२.१४		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९८२-८३		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		मार्च - १९८९मुळ प्र.मा.रुपये ५.१८ कोटी		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		रक्कम (कोटी	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		१९.०५	३५.२७	
७.२	भूसंपादन,पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळ खर्चातील वाढ (तृतीय सु.प्र.मा. प्रमाणे रु ६.११ कोटी – मुळ प्र.मा.प्रमाणे रु.०.५६ कोटी उ रु.५.५५ कोटी)		५.५५	१०.२८	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		--	--	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		९.६०	१७.७७	
७.५	अ) आस्थापना		११.१३	२०.६१	
	ब) इतर कारणे (स्पष्ट करावीत)		८.६८	१६.०७	
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती				
८.१	भू-संपादन पुनर्वसन,वन जमीन संपादन		पूर्ण	१०० टक्के	
८.२	धरण		पूर्ण	१०० टक्के	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		पूर्ण	१०० टक्के	
८.४	वितरण व्यवस्था एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)		६९६२ हेक्टर ६९६२ हेकटर	पूर्ण	
८.५	पाटचाऱ्यांची कामे एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) पाटचाऱ्याची कामे तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)		६९०० हेक्टर ८७०२ हेकटर	७९ टक्के पूर्ण	
८.६	जलसाठा (द.ल.घ.मी.)		संकल्पीत ४२.४८	निर्मित ४२.४८	

मन प्रकल्प

ता. : खामगांव जि. बुलडाणा

प्रकल्पाच्या किमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे

७.३ - प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ - निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ.

१) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी धरणाच्या डाव्या बाजुचे मातीकाम काटछेदात सा.क्र.७२ ते ४५० मी. या ३७८ मी. तसेच सा.क्र.४८३ मी. ते ५५५ मी. द्वारयुक्त सांडव्याच्या संकल्पनानुसार झालेली वाढ यामुळे रुपये ६.३६ कोटी ने वाढ झाली आहे.

२) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी सांडव्यामध्ये सुचविलेल्या १२X८ मी. चे ५ द्वारे प्रस्तावित केल्यामुळे रुपये २.७९ कोटी ने वाढ झाली आहे. मुळ प्रस्तावामध्ये द्वारविरहीत सांडवा अंतर्भुत होता.

३) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी मुख्य धरणाच्या विमोचकामध्ये सिंचना ऐवजी सिंचनासह विद्युत विमोचक या सुचविलेल्या बदलामुळे रुपये ०.४५ कोटी ने वाढ झाली आहे.

७.५ ब) इतर कारणे

१) आस्थापना खर्चामध्ये रुपये ११.१३ कोटी ने वाढ झाली आहे.

२) मुख्य धरणाच्या पायव्यामध्ये ड्रिलींग, ग्राऊटींग व कोलग्राऊटच्या कामापोटी रुपये २.६७ कोटी ने वाढ झाली.

३) धरणाच्या खालील बाजुस साचलेल्या पाण्याचा निचरा, रेडीयम रेजपट्टी व वीजटॉवर या बाबींवर रुपये ०.६२ कोटी ने वाढ झाली आहे.

४) धरणाच्या पोच रस्त्याचे डांबरीकरण यामुळे रुपये ०.१३ कोटी ने वाढ झाली आहे.

५) मुख्य कालव्यावरील कालवा ओलांडणी अतिरिक्त बांधकामे याकरीता रुपये ०.२१ कोटी ने वाढ झाली.

६) शिर्ला वसाहती मधील तात्पुरत्या गाळयांऐवजी पक्क्या इमारती बांधणे, "अ"- प्राथमिकता या सदरात प्रस्तावित सविस्तर सर्वेक्षण, वृक्षारोपण या सदरामध्ये पुर्ण किंमतीच्या टक्केवारीमुळे येणारी व इतर किरकोळ कारणामुळे रुपये २.०५ कोटी ने वाढ झाली आहे.

मन प्रकल्प

ता.खामगांव जि.बुलडाणा

प्रस्तावनाः-

मन नदी प्रकल्प हा बुलडाणा जिल्हयातील व खामगांव तालुक्यातील शिर्ला (नेमाने) गावाजवळ बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाची लांबी १३९४ मी. व दगडी धरणाची (जलोत्सारणी) लांबी ७२ मी. असुन महत्तम उंची ३०.८० आहे. जलोत्सारणीला ८ x १२ आकाराचे ५ वक्रद्वारे आहेत. या प्रकल्पाच्या डाव्या बाजुकडून २२.५३ कि.मी. लांबीचा मुख्य कालवा व त्यावरुन दोन शाखा कालवे अनुक्रमे २.९० व २.४० कि.मी. लांबीचे निघाले आहेत. या प्रकल्पामुळे बुलडाणा जिल्हयातील खामगांव तालुक्यातील ५४३५ हेक्टर, अकोला जिल्हयातील पातुर तालुक्यातील ६६९ हेक्टर व बाळापुर तालुक्यातील ८५८ हेक्टर असे एकुण ६९६२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. प्रकल्पाच्या कामास मे-१९८६ मध्ये सुरुवात करण्यात आली होती. प्रकल्पाकरीता २६१.७६ हेक्टर वनजमिनीची आवश्यकता असल्यामुळे व केंद्र शासनाची मान्यता नसल्यामुळे फेब्रुवारी १९८७ मध्ये प्रकल्पाचे बांधकाम बंद करावे लागले. वन जमिनीचे वापरास केंद्र शासनाकडून फेब्रुवारी १९८९ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाचे काम मार्च १९८९ पासुन सुरु करण्यात आले. प्रकल्पाची घळभरणी सन १९९२ मध्ये झाली. सन १९९३-९४ पासुन प्रकल्पावर ओलीत सुरु आहे. प्रकल्पाचे काम संपण्याचे वर्ष १९८३ अपेक्षीत होते मात्र प्रकल्पाचे काम जुन २००३ मध्ये पुर्ण झाले.

प्रकल्पाच्या कामास झालेल्या विलंबा बाबत-

१) प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७९ मध्ये मिळाली. वन जमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडुन सन १९८९ मध्ये मान्यता मिळाल्यामुळे प्रकल्पास कामास मार्च १९८९ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची घळभरणी सन १९९२ मध्ये झाली.

२) सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे महापुर आल्याने धरणाच्या पुच्छ कालव्यामधील तळात खड्डे पडुन नुकसान झाले. तसेच पक्षभिंत वाहुन गेली. त्यामुळे सविस्तर अभ्यासाअंती संकल्पनात सुधारणा करुन प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

प्रकल्पापासून झालेले फायदे

०१) मन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कास्तकार यापूर्वी फक्त खरीप हंगामातील पीकांचे उत्पन्न घेत होते. निसर्गाच्या पावसाच्या अनियमिततेमुळे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे कास्तकारांची परिस्थिती अतिशय दयनिय होती. प्रकल्पामधील हमी पाण्यामुळे कास्तकारांचे दरडोई उत्पन्नामध्ये वाढ झाली.

०२) पावसाचे प्रमाण भरपूर झाल्यास कास्तकारांना खरीप हंगामाशिवाय रब्बी हंगाम व उन्हाळी हंगामामध्ये दुहंगामी पीके घेता येतात. त्यामुळे त्यांच्या राहणीमानामध्ये व आर्थिक स्थितीमध्ये वाढ झालेली आहे.

०३) प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन झाल्यामुळे त्यांच्या सोईनुसार उत्पन्नाचे नगदी हमी पीके घेऊ शकतात.

०४) प्रकल्पातील पाणीसाठयामुळे लाभक्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढलेली आहे.

०५) प्रकल्पाच्या कालव्यांमुळे कास्तकारांना जाण्या-येण्याच्या सुविधा मिळाल्या.

०६) गुराढोरांना व पिण्याचे पाणी व चारा मोठया प्रमाणात उपलब्ध झाला पर्यायाने दुधाचे उत्पन्नामध्ये वाढ झाली. त्यानुषंगाने दुध डेरीची निर्मिती झाली व लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

०७) प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठयामधून लाखनवाडा २१ गांव पाणीपुरावठा योजना कार्यान्वीत झाली तसेच खामगांव शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता योजना प्रगती पथावर आहे.

०८) प्रकल्पामुळे मत्स्य व्यवसाय मोठया प्रमाणावर सुरु आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : तोरणा मध्यम प्रकल्प तालुका : खामगांव जिल्हा : बुलढाणा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता १४२८ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता १४२८ हेक्टर		वर्ष २००६-०७ महत्तम सिंचन ७४१ हेक्टर	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२१/१/१९८०	१९७८-७९	१.३५	१४२८
	सुप्रमा-१	६/३/२००२	१९९७.९८	१३.५८	१४२८
	सुप्रमा-२	२३/८/२००५	२०००-०१	१८.१०	१४२८
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			१८.४७	
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)			१.६५	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			१४.९०	
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)			१.९२	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९१-९२	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			ऑक्टोबर-१९९२/मुळ प्र.मा. रुपये १.३५ कोटी	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रक्कम (कोटी	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			७.२९	४३.५२
७.२	भूसंपादन,पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळ खर्चातील वाढ (द्वितीय सु.प्र.मा. प्रमाणे रु १.४० कोटी – मुळ प्र.मा.प्रमाणे रु.०.०७ कोटी उ रु.१.३३ कोटी)			१.३३	७.९४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			१.१७	६.९९
७.५	अ) आस्थापना			३.०९	१८.४५
७.५	ब) इतर कारणे (स्पष्ट करावीत)			३.८७	२३.१०
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती				
८.१	भू-संपादन पुनर्वसन,वन जमीन संपादन			पूर्ण	१०० टक्के
८.२	धरण			पूर्ण	१०० टक्के
८.३	कालवा व वितरण व्यवस्था			पूर्ण	१०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)			१४६५ हेक्टर १४६५ हेकटर	पूर्ण
८.५	पाटचाऱ्यांची कामे एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) पाटचाऱ्याची कामे तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)			१७२५ हेक्टर १७२५ हेकटर	टक्के पूर्ण
८.६	जलसाठा (द.ल.घ.मी.)			संकल्पीत ८.४८	निर्मित ८.४८

तोरणा प्रकल्प

ता.: खामगांव जि. बुलडाणा

प्रकल्पाच्या किमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे

७.३ - प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ - निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ.

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी धरणाची लांबी ८८६ मी. ऐवजी ९७६ मी. प्रस्तावित केली, धरणाच्या काटछेदाचे २:१ ऐवजी ९ मी. उंचीपर्यंत २.५:१ व त्याखाली ३:१ उतार प्रस्तावित केल्यामुळे धरणाचे मातीकाम ४७२४१६ घ.मी. ऐवजी ५४०८८३ घ.मी. इतके झाले व दगडी बांधकाम ३२५८ घ.मी. ऐवजी ६४५१ घ.मी. झाले. या वाढीमुळे रुपये १.१४ कोटी खर्चात वाढ झाली आहे व इमारती वरील खर्चात रुपये ०.०३ कोटी अशी एकुण रुपये १.१७ कोटी ने वाढ झाली आहे.

७.५ ब) इतर कारणे

१) आस्थापना खर्चामध्ये रुपये ३.०९ कोटी ने वाढ झाली आहे.

२) पुच्छ कालव्यातील संरक्षण भिंतीची लांबी १४० मी. ऐवजी ३०० मी. झाल्यामुळे रुपये १.१५ कोटी ने वाढ झाली.

३) उजव्या व डाव्या कालव्यावरील कालवा ओलांडणी पुलांची अतिरिक्त बांधकामे व अस्तरीकरण या करीता रुपये ०.९४ कोटी ने वाढ झाली.

४) धरणाच्या संपादीत क्षेत्रामधील पाईप लाईन वळविणे, लाखनवाडा वसाहती मधील गाळयांचे बांधकाम व धरणासाठी पोच रस्त्याची दुरुस्ती व इतर किरकोळ बाबीमध्ये रुपये १.५९ कोटी ने वाढ झाली.

तोरणा प्रकल्प

ता.खामगांव जि.बुलडाणा

प्रस्तावना-

तोरणा नदी प्रकल्प हा बुलडाणा जिल्हयातील व खामगांव तालुक्यातील दधम गावाजवळ बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाची लांबी ८९६ मी. व पाँडी प्रकारच्या सांडव्याची लांबी ८० मी. अशी एकुण ९७६ मी. असुन महत्तम उंची २२.९९५ मी. आहे. या प्रकल्पाच्या उजव्या बाजुकडून ७.५० कि.मी. लांबीचा मुख्य कालवा व त्यावरील वितरण प्रणाली द्वारा खामगांव तालुक्यातील ७५९ हे. क्षेत्र व डाव्या बाजुकडुन १७.०१ कि.मी. लांबीचा मुख्य कालवा व त्यावरील वितरण प्रणाली द्वारा बुलडाणा जिल्हयातील खामगांव तालुक्यातील ७०६ हेक्टर क्षेत्र असे एकुण १४६५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. वनजमिनीचे वापरास केंद्र सरकारकडून मार्च १९९२ मध्ये मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाच्या कामास ऑक्टोंबर १९९२ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची सिंचन क्षमता १४६५ हेक्टर सन २००० मध्ये पुर्ण झाली. प्रकल्पाचे काम संपण्याचे वर्ष १९८७ अपेक्षीत होते मात्र प्रकल्पाचे काम जुन २००० मध्ये पुर्ण झाले.

प्रकल्पाच्या कामास झालेल्या विलंबा बाबत-

१) प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन १९८० मध्ये मिळाली. वन जमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडुन सन १९९२ मध्ये मान्यता मिळाल्यामुळे प्रकल्पास कामास ऑक्टोंबर १९९२ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची घळभरणी सन १९९३ मध्ये झाली.

२) सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे महापुर आल्याने धरणाच्या पुच्छ कालव्यामधील तळात खड्डे पडुन नुकसान झाले. पुच्छ कालव्यामध्ये आडव्या प्रपात भिंतीची तरतुद करण्यात आली. तसेच कालव्यामध्ये गाभा क्षेत्राची तरतुद करण्यात आली.

प्रकल्पापासून झालेले फायदे

०१) तोरणा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कास्तकार यापूर्वी फक्त खरीप हंगामातील पीकांचे उत्पन्न घेत होते. निसर्गाच्या पावसाच्या अनियमिततेमुळे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे कास्तकारांची परिस्थिती अतिशय दयनिय होती. प्रकल्पामधील हमी पाण्यामुळे कास्तकारांचे दरडोई उत्पन्नामध्ये वाढ झाली.

०२) पावसाचे प्रमाण भरपूर झाल्यास कास्तकारांना खरीप हंगामाशिवाय रब्बी हंगाम व उन्हाळी हंगामामध्ये दुहंगामी पीके घेता येतात. त्यामुळे त्यांच्या राहणीमानामध्ये व आर्थिक स्थितीमध्ये वाढ झालेली आहे.

०३) प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन झाल्यामुळे त्यांच्या सोईनुसार उत्पन्नाचे नगदी हमी पीके घेऊ शकतात.

०४) प्रकल्पातील पाणीसाठयामुळे लाभक्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढलेली आहे.

०५) प्रकल्पाच्या कालव्यांमुळे कास्तकारांना जाण्या-येण्याच्या सुविधा मिळाल्या.

०६) गुराढोरांना व पिण्याचे पाणी व चारा मोठया प्रमाणात उपलब्ध झाला पर्यायाने दुधाचे उत्पन्नामध्ये वाढ झाली. त्यानुषंगाने दुध डेरीची निर्मिती झाली व लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

०७) प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठयामधून चिंचपूर पाणीपुरावठा योजना प्रस्तावित आहे.

०८) प्रकल्पामुळे मत्स्य व्यवसाय मोठया प्रमाणावर सुरु आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव : उतावळी मध्यम प्रकल्प, तालुका : मेहकर, जिल्हा : बुलढाणा**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता ५३९४ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता ५३९४ हेक्टर		वर्ष २००९-१० महत्तम सिंचन १६८९ हेक्टर	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१७/१/१९९१	१९८९-९०	१५.६२७	५३९४
	सुप्रमा-१	१४/२/२००३	१९९९-२०००	५१.३१९	५३९४
	सुप्रमा-२	१७/६/२००६	२००३-०४	८१.४८५	५३९४
	सुप्रमा-३	४/६/२००८	२००७-०८	१०९.६४	५३९४
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केन्द्र शासनाचे पत्र क्र.२०(१३)२००४-डब्ल्युआर,प्लॅनिंग कमीशन दिनांक २१/७/०९ अन्वये सन २००७-०८ चे दरसुचीनुसार रु.१०९.६४ कोटीस मान्यता.			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			११२.१४	
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वन जमीन संपादन खर्च (रु.कोटी)			२१.२९	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			७७.१८	
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)			१३.६७	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९९५-९६	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सप्टेंबर-१९९९ / प्रथम सु.प्र.मा	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
				रक्कम (कोटी	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			४५.२०	४८.०८
७.२	भूसंपादन,पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही.मुळ खर्चातील वाढ (तृतीय सु.प्र.मा. प्रमाणे रु ८.७५ कोटी – मुळ प्र.मा.प्रमाणे रु.०.६९ कोटी उ रु.८.०६ कोटी)			८.०६	८.५७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			२१.९४	२३.३४
७.५	अ) आस्थापना			१२.२०	१२.९८
	ब) इतर करणे (स्पष्ट करावीत)			६.६१	७.०३
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती				
८.१	भू-संपादन पुनर्वसन,वन जमीन संपादन			पूर्ण	१०० टक्के
८.२	धरण			पूर्ण	१०० टक्के
८.३	कालवा व वितरण व्यवस्था			पूर्ण	१०० टक्के
८.४	वितरण व्यवस्था एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) वितरण प्रणाली तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)			३७२० हेक्टर ३७२० हेकटर	पूर्ण
८.५	पाटचाऱ्यांची कामे एकूण क्षेत्र : (हेक्टर मध्ये) पाटचाऱ्याची कामे तयार झालेले क्षेत्र : (हेक्टर मध्ये)			४६५० हेक्टर ३९५१ हेकटर	८४.२७ टक्के पूर्ण
८.६	जलसाठा (द.ल.घ.मी.)			संकल्पीत २०.८१	निर्मित २०.८१

प्रकल्पाच्या किमतीमध्ये झालेल्या वाढीचा तपशिल

७.३ - प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ - निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ.

१) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी सुचविलेल्या धरणाच्या घळभरणीच्या परिमाणात झालेल्या वाढीमुळे रुपये ३.६० कोटी ने वाढ झाली आहे.

२) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी सुचविलेल्या सुधारीत संकल्पनानुसार सांडव्याची लांबी २११ मी. ऐवजी वक्राकार ३४५.६० मी. झाल्यामुळे रुपये ८.४५ कोटी ने वाढ झाली आहे.

३) सांडव्याच्या काटछेदात ओगी बार मध्ये कोलग्राऊट संधानकाची सुधारणा केल्यामुळे रुपये २.०० कोटी ने वाढ झाली आहे.

४) दोन धरणांना जोडण्यासाठी पाईप लाईन ऐवजी उघडा खंदक प्रस्तावित केल्यामुळे रुपये ४.६९ कोटी ने वाढ झाली आहे.

५) धरणाच्या पायव्या मधील काटछेदा मधील भुस्तर वर्गीकरणामुळे खोदकामाच्या परिमाणात वाढ झाल्यामुळे रुपये ०.९१ कोटी ने वाढ झाली आहे.

६) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडुन धरणाच्या मुख्य विमोचकाचे स्थान सा.क्र.२७०० मी. ऐवजी सा.क्र.२०९० मी. वरील संकल्पनानुसार झालेल्या बदलामुळे रुपये १.०७ कोटी ने वाढ झाली आहे.

७.५ ब) इतर कारणे

१) आस्थापना खर्चामध्ये रुपये १२.२० कोटी ने वाढ झाली आहे.

२) नैसर्गिक टेकडीचा अभ्यास सांडवा व धरणाच्या मातीकामातील समाविष्ठ नसलेल्या बाबींची तरतुद, यांत्रिकी विभागातर्फे करावयाची कामे, तलमापना संबंधी सामुग्री विकत घेणे इ. कारणांसाठी रुपये ०.८७ कोटी ने वाढ झाली आहे.

३) पुच्छ कालव्याच्या कामाध्ये संधानकासाठी केलेल्या तरतुदीमुळे रुपये २.०३ कोटी ने वाढ झाली.

४) इलेक्ट्रीक लाईन वळविणे, पोचरस्ता दुरुस्ती तसेच वृक्षारोपण व इतर घटकात एकुण खर्चाच्या वाढीवर येणाऱ्या टक्केवारी मधील वाढ रुपये १.१९ कोटी.

५) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी सुचविलेल्या पुच्छ कालव्यातील संधानकामुळे रुपये ०.३० कोटी ने वाढ झाली आहे.

६) मुख्य कालव्यावरील अस्तरीकरण तसेच बांधकामे यावरील नव्याने समाविष्ठ बाबी करीता रुपये ०.५२ कोटी ने वाढ झाली आहे.

उतावळी प्रकल्प

ता. मेहकर जि. :बुलडाणा

प्रस्तावना-

उतावळी नदी प्रकल्प हा बुलडाणा जिल्हयातील व मेहकर तालुक्यातील देऊळगांव साकरशा गावाजवळ बांधण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माती धरणाची लांबी अनुक्रमे लेंडी व उतावळी ९२३ अ ९३३ उ १८५६ मी. व वक्रकार सांडव्याची लांबी ३४५.६० मी. असुन महत्तम उंची २६.०० मी. व २०.६७ मी. आहे. या प्रकल्पाच्या उजव्या बाजुकडून १७.५१ कि.मी. लांबीचा कालवा उगमीत होत आहे. या प्रकल्पामुळे मेहकर तालुक्यातील १८१ हेक्टर व पातुर तालुक्यातील ३५३९ हेक्टर असा एकुण ३७२० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. वनजमिनी संबंधी केन्द्र शासनाची अंतीम मान्यता दिनांक २८/७/१९९९ रोजी प्राप्त झाली. त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु करण्यास विंलब झाला. प्रकल्पाच्या कामास सप्टेंबर-१९९९ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची घळभरणी सन २००५ मध्ये करण्यांत आली. प्रकल्पीय सिंचन क्षमता ५३९४ हेक्टर जून-२०११ अखेर निर्मित झालेली आहे.

वेगवर्धीत सिंचन लाभ योजना- उतावळी प्रकल्प हा अे.आय.बी.पी. अंतर्गत सन २००६-०७ मध्ये पंतप्रधान पॅकेज अंतर्गत घेण्यात आला होता. अे.आय.बी.पी. अंतर्गत मिळालेला निधी खालील प्रमाणे.

१) सन २००६-०७ रु.१०.२६ कोटी

२) सन २००७-०८ रु.८.३० कोटी

३) सन २००८-०९ रु.१७.१७ कोटी

४) सन २००९-१० रु.५.३३ कोटी

अे.आय.बी.पी. अंतर्गत ५०७४ हे. सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट ठरविण्यांत आले होते, प्रत्यक्ष सिंचन क्षमता ४७५४ हे. निर्मित होऊ शकली. कास्तकारांचा कालव्याच्या खोदकामास असलेल्या विरोधामुळे उर्वरित ३२० हे. सिंचन क्षमता निर्मित होऊ शकली नाही. सस्ती वितरीकेवर पर्यायी लाभक्षेत्र उपलब्ध करुन ३२० हे. सिंचन क्षमता महामंडळांतर्गत निधी उपलब्ध करुन जून-२०११ अखेर निर्मित करण्यांत आली.

वेगवर्धीत सिंचन लाभ योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीच्या अनुषंगाने पूर्णत्व अहवाल शासनास सादर करण्यांत आलेला आहे.

प्रकल्पाच्या कामास झालेल्या विलंबा बाबत-

१) प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन १९९१ मध्ये मिळाली. वन जमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडुन सन १९९९ मध्ये मान्यता मिळाल्यामुळे प्रकल्पास कामास सप्टेंबर १९९९ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची घळभरणी सन २००५ मध्ये झाली.

२) सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे महापुर आल्याने धरणाच्या पुच्छ कालव्यामधील तळात खड्डे पडुन नुकसान झाले. त्यामुळे सविस्तर अभ्यासाअंती संकल्पनात सुधारणा करुन मान्यतेनंतर पुच्छ कालव्याचे काम पुर्ण करण्यात आले.

३) पुच्छ कालव्यामध्ये आडव्या प्रपात भिंतीची तरतुद करण्यात आली.

४) लाभक्षेत्रातील कास्तकारांचा कालव्यास विरोध.

प्रकल्पापासून झालेले फायदे

०१) उतावळी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कास्तकार यापूर्वी फक्त खरीप हंगामातील पीकांचे उत्पन्न घेत होते. निसर्गाच्या पावसाच्या अनियमिततेमुळे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे कास्तकारांची परिस्थिती अतिशय दयनिय होती. प्रकल्पामधील हमी पाण्यामुळे कास्तकारांचे दरडोई उत्पन्नामध्ये वाढ झाली.

०२) पावसाचे प्रमाण भरपूर झाल्यास कास्तकारांना खरीप हंगामाशिवाय रब्बी हंगाम व उन्हाळी हंगामामध्ये दुहंगामी पीके घेता येतात. त्यामुळे त्यांच्या राहणीमानामध्ये व आर्थिक स्थितीमध्ये वाढ झालेली आहे.

०३) प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन झाल्यामुळे त्यांच्या सोईनुसार उत्पन्नाचे नगदी हमी पीके घेऊ शकतात.

०४) प्रकल्पातील पाणीसाठयामुळे लाभक्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढलेली आहे.

०५) प्रकल्पाच्या कालव्यांमुळे कास्तकारांना जाण्या-येण्याच्या सुविधा मिळाल्या.

०६) गुराढोरांना व पिण्याचे पाणी व चारा मोठया प्रमाणात उपलब्ध झाला पर्यायाने दुधाचे उत्पन्नामध्ये वाढ झाली. त्यानुषंगाने दुध डेरीची निर्मिती झाली व लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

०७) प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठयामधून बाळापूर शहर पाणीपुरावठा योजना प्रस्तावित आहे.

०८) प्रकल्पामुळे मत्स्य व्यवसाय मोठया प्रमाणावर सुरु आहे.

१)	**प्रकल्पांचे नांव : बोर्डी नाला मध्यम प्रकल्प तालुका :चांदूर बाजार, जिल्हा : अमरावती**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	४१२६	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१७/१०/२००७	२००३-०४		१००.८०	४१२६
	सुप्रमा-१ शासनास सादर		२०१०-११		३५१.८२	
४)	**केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)**					नाही
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१३८.१७
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					२२.५६
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					१०६.२३
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					९.३८
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००६-०७
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					२००८
७)	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (३५१.८२ - १००.८० = २५१.०२)**					
					रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ				४०.८३	१६.२७
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (प्र.मा. १२.४४ व सुधारित ३६.३९ कोटी रु.)				२४.०५	९.५८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				०	०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				१४०.४९	५५.९७
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) निविदा आधिक्य व पोच रस्ते इत्यादी				२४.३६	९.७०
७.६	इटीपी मुळे झालेली वाढ)				२१.२९	८.४८
	एकूण				२५१.०२	**१००**
८)	प्रकल्पाची सद्यःस्थिती			एकूण	झालेले काम	टक्केवारी
८.१	भू-संपादन,			७७५.२१	५५४.५२	७१.५३
	पूनर्वसन			०	०	०
	वनजमिन संपादन			०	०	०
८.२	धरण					८०
८.३	कालवा (एकूण लांबी १५.५४ कि.मी.)			१५.५४	०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ४७४५ हे.)			४७४५	०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ४७४५ हे.,)			४७४५	०	०

७.३) व्याप्तीतील बदल :- सदर प्रकल्पात व्याप्तीतील बदल नाही.

७.४) संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात कोंडवर्धा धरणाच्या ठिकाणी मध्यवर्तीत सांडवा प्रस्तावित होता. परंतु ह्या ठिकाणी ४० मी. खोलीपर्यंत काळी माती असल्याने सांडव्यासाठी योग्य पायवा मिळाला नाही. त्याऐवजी हा सांडवा धरणाच्या उजव्या तीरावर घेण्यात आला तसेच बोरगांव मोहना धरणाचे प्रशासकीय मान्यता प्रमाणेच्या ठिकाणी सुध्दा पायव्यासाठी योग्य भूस्तर नसल्याने सांडव्याचे स्थळ डाव्या तीरावर घेण्यात आले. प्र.मा. प्रस्तावात पाळा येथील वळण बंधाऱ्य-याचे स्थळी पायव्याची खोली जास्त येत असल्याने व पुरवठा कालव्यामधे संत्राबागा मोठ्याप्रमाणात येत असल्याने पाळा वळण बंधाऱ्य-याचे स्थळ उर्ध्व बाजुला घेण्यात आले. प्रशासकीय मान्यता प्रस्तावात पुरवठा कालव्यासाठी कट ॲन्ड कव्हरची तरतुद नव्हती.परंतु पुरवठा कालव्याची खोली जास्त होत असल्याने कट ॲन्ड कव्हरपध्दतीचा कालवा करण्यात आला. खोदकामातुन उपलब्ध सामुग्री आवरणाकरितां योग्य नसल्याने इतरत्र परिसरातुन सामुग्री आणावी लागली. वरील सुधारणामुळे संकल्पचित्रात रु. १४०.४९ कोटीची वाढ झालेली आहे.

७.५) इतर कारणामुळे वाढ :- वाढीव दराच्या निविदा स्विकृतीमुळे रु. १७.४६ कोटी , प्र.मा. मध्ये नसलेल्या तरतुदीमुळे रु.६.१५ कोटी व विद्युतीकरण, पुल संरक्षक भिंत यामुळे रु. ०.७५ कोटी अशी एकूण रु. २४.३६ कोटीची वाढ झालेली आहे.

बोर्डीनाला प्रकल्प

ता-चांदुरबाजार **जि-अमरावती**

बोर्डीनाला मध्यम प्रकल्प, ता-चांदुरबाजार येथील स्थानिक बोर्डीनाल्यावर, कोंडवर्धा व बोरगाव मोहना या गावाजवळ आहे.

१) प्रशासकीय मान्यता :- महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग क्रमांक-बोर्डीनाला-२००६/१३४/ (४७/०६)/जसंअ, दिनांक १७/१०/२००६ अन्वये दरसुची २००३-०४ चे आधारावर रु. १००.८० कोटी रूपयास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली.

२) सुधारीत प्रशासकीय मान्यता :- दरसुची २०१०-११ चे आधारावर रु. ३५१.८२ कोटी रूपयास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव महामंडळाचे पत्र दि. २३.०९.२०११ अन्वये शासनास सादर झाला असून अद्याप मान्यता अप्राप्त आहे.

३) कामाची सद्यःस्थिती :- प्रकल्पात समाविष्ट वेगवेगळ्या घटकाचे कामाची सद्यःस्थिती खालील प्रमाणे आहे.

अ) मेघा वळण बंधारा :- बंधाऱ्याचे काम ८० टक्के व कालव्याचे काम १० टक्के पूर्ण.

ब) कोंडवर्धा संतुलीत बंधारा :- मातीकाम ८० टक्के ओगी पध्दतीच्या सांडव्याचे काम ८० टक्के, पुच्छ कालव्याच्या संधानकाचे काम ४० टक्के व शिर्ष विमोचकाचे काम ५० टक्के पूर्ण.

क) बोरगाव मोहना धरण :- दोन्ही तिरावरील मातीकाम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. सांडवा, कालवा व उपसा सिंचन योजनेच्या कामास सुरुवात झाली नाही.

४)व्याप्तीतील बदलासाठी लोकप्रतिनिधी शिफारस / विनंती :- प्रकल्पाचे व्याप्तीत बदल झालेला नाही.

५) लोकप्रतिनिधी / स्थानिक संघटना मागणी :- लोकप्रतिनिधी यांनी जमिनीकरीता वाढीव दराची मागणी केली आहे. (मागणी दि. ११.९.२००८, ५.११.२००८ व १४.५.२०१२)

६) भूसंपादन अडीअडचणी (P.A.P. व कास्तकारांचा विरोध) :- प्रकल्पाकरिता लागणा-या जमिनीकरिता वाढीव दराची मागणी शेतक-यांकडून होत आहे.

७) प्रकल्पाचे प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

अ) सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मंजूरी करीता दिनांक २३/९/२०११ रोजी शासनास सादर झाला आहे.

ब) सदर प्रकल्पाकरीता ७७५.२१ हेक्टर जमीनीपैकी ५५४.५२ हेक्टर जमीन सरळ खरेदीने संपादीत करण्यात आली.

क) केंद्रीय जल आयोगाचा प्रस्ताव नागपूर येथील कार्यालयास सादर केला असून त्रुटीची पुर्तता करणे चालू आहे.

ड) वनजमीन प्रस्तावास दिनाक १७.४.२००८ रोजी तत्वतः मान्यता व दिनांक १३.८.२०१० रोजी अंतीम मान्यता प्राप्त झाली आहे.

८) प्रकल्प किंमतीत झालेल्या वाढीची कारणे :- सादर सुधारीत प्रशासकीय मान्यता नुसार प्रकल्पाचे किंमतीत रु. २५१.०२ कोटी वाढ संभवते, त्याची वाढीची कारणमिमांसा माहिती खाली नमूद करण्यात येत आहे.

अ) दरसुचीतील वाढ :- प्रशासकीय मान्यता सन २००३-०४ चे दरसुचीने असून सुधारीत प्रशासकीय मान्यता सन २०१०-११ चे दरसुचीने असल्यामुळे रु. ४०.८३ कोटीची वाढ झाली आहे.

ब) निविदेमुळे वाढ :- वाढीव दराचे निविदामुळे रु. १७.४६ कोटीची वाढ झाली आहे.

क) भुसंपादनातील वाढ :- प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात सन २००५ चे दर-तक्त्यानुसार खरेदी विक्रीचे दर विचारात घेवून तरतूद करण्यात आली होती. सद्यःस्थितीत नगर रचना कार्यालय यांचेकडून मंजूर दराने सरळ खरेदी पध्दतीने भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार ५५४.५२ हेक्टर जमीन खरेदी करण्यात आली असून २२०.६९ हेक्टर जमीन खरेदी करणे बाकी आहे. या प्रमाणे खरेदी करण्यात आलेल्या जमिनीचे दर विचारात घेवून रु. २४.०५ कोटी वाढ संभवते.

ड) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाचे व्याप्तीत बदल झालेला नाही.

इ) सकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात कोंडवर्धा धरणाच्या ठिकाणी मध्यवर्ती सांडवा प्रस्तावित होता. परंतु ह्या ठिकाणी ४० मी. खोलीपर्यंत काळी माती असल्याने सांडव्यासाठी योग्य पायवा भूस्तर मिळाला नाही. त्याऐवजी हा सांडवा धरणाच्या उजव्या तीरावर घेण्यात आला तसेच बोरगांव मोहना धरणाचे प्रशासकिय मान्यते प्रमाणेच्या ठिकाणी सुध्दा पायव्यासाठी योग्य भूस्तर आढळून न आल्याने सांडव्याचे स्थळ सुधारीत करुन डाव्या तीरावर घेण्यात आले. प्र.मा. प्रस्तावात पाळा येथील वळण बंधा-याचे स्थळी पायव्याची खोली जास्त येत असल्याने व पुरवठा कालव्यामधे संत्राबागा मोठ्याप्रमाणात येत असल्याने पाळा वळण बंधा-याचे स्थळ उर्ध्व बाजुला घेण्यात आले. प्रशासकीय मान्यता प्रस्तावात पुरवठा कालव्यासाठी कट ॲन्ड कव्हरची तरतुद नव्हती.परंतु पुरवठा कालव्याची खोली जास्त होत असल्याने कट ॲन्ड कव्हरपध्दतीचा कालवा करण्यात आला. खोदकामातुन उपलब्ध सामुग्री आवरणाकरिता योग्य नसल्याने इतरत्र परिसरातुन सामुग्री आणावी लागली. वरील सुधारणामुळे संकल्पचित्रात रु. १४०.४९ कोटीची वाढ झालेली आहे.

प) इतर कारणामुळे वाढः- वाढीव दराच्या निविदा स्विकृतीमुळे रु. १७.४६ कोटी, प्र.मा. मध्ये नसलेल्या तरतुदीमुळे रु.६.१५ कोटी व विद्युतीकरण पुल संरक्षक भिंत यामुळे रु.०.७५ कोटी अशी एकूण रु. २४.३६ कोटीची वाढ झालेली आहे.

फ) अनुषंगीक खर्चातील वाढ :- प्रकल्पाची किंमत वाढल्यामुळे अनुषंगीक खर्चामध्ये रु. २१.२९ कोटीची वाढ झालेली आहे.

९) विलंबाची कारणे / अडीअडचणी :-

सद्यःस्थितीत मुळ प्रशासकीय मान्यता पेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे तसेच प्रकल्पावर खर्च करण्याची परवानगी नसल्यामुळे प्रकल्पाचे काम दोन वर्षापासून बंद आहे.

१०) खर्चाचा तपशिल :-

१) सन १९९५- ते २००० :- ---- निरंक ----

२) सन २००१ ते २०११-१२ :- या प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर पर्यंत रु. १३८.१७ कोटी खर्च झालेला आहे. खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	खर्च (इटीपी सह)
१	२००६-०७	०.०६
२	२००७-०८	१७.३६
३	२००८-०९	७१.७९
४	२००९-१०	१३.०५
५	२०१०-११	२५.१५
६	२०११-१२	१.३८
	एकुण	१२८.७९
	इटीपी	९.३८
	एकुण (रू,कोटी)	१३८.१७

प्रकल्पाचे उर्वरीत कामाची किंमत रु.२१३.६५ कोटी आहे.

११) प्रकल्पापासुन मिळणारे संभाव्य फायदे :- १) या प्रकल्पापासुन अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील ४१२६ हे.जमीन सिंचनाखाली येणार असुन त्याचा लाभ २४९० शेतकऱ्यांना मिळणार आहे. २) पिण्याचे पाण्याकरीता प्रकल्पात २.६३१ दलघमी. साठा आरक्षीत असुन या परीसरातील गावांना याचा लाभ होणार आहे. ३) प्रकल्पात होणाऱ्या साठयातून मत्सव्यवसायाला चालना मिळणार आहे.

४) रोजगार निर्मितीत वाढ होईल.

१)	**प्रकल्पांचे नांव : घुंगशी बॅरेज म.प्र. तालुका :मुर्तीजापूर, जिल्हा : अकोला**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	६३४३	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२३/१२/२००८	२००८-०९		१७०.१५	६३४३
	सुप्रमा-१ क्षेत्रिय स्तरावर	सुधारित किंमत	२०११-१२		३७४.९१	
४)	**केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)**	सदर योजनेच्या प्र.मा.किंमतीच्या आधारावर रू.१७०.१५ कोटी किंमतीस के.ज.आ. दिल्ली यांनी दि.११.०३.२००९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.				
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१६१.४१
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					७.६३
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					१५२.७७
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					१.०१
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००९-१०
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					२००९
७)	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (३७४.९१ - १७०.१५ = २०४.७६)**					
					रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ				२७.६७	१३.५१
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (प्र.मा. १२.४४ व सुधारित ३६.३९ कोटी रु.)				१७.१२	८.३६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				०	०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				११५.४४	५६.३८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) निविदा आधिक्य व पोच रस्ते इत्यादी				२४.७४	१२.०८
७.६	इटीपी मुळे झालेली वाढ)				१९.७९	९.६६
	एकूण				२०४.७६	**१००**
८)	प्रकल्पाची सद्यःस्थिती			एकूण	झालेले काम	टक्केवारी
८.१	भू-संपादन,			५०६.३६	१६०	३१.५९
	पूनर्वसन			०	०	०
	वनजमिन संपादन			०	०	०
८.२	धरण					५०
८.३	कालवा (एकूण लांबी १६.८२ कि.मी.)			१६.८२	०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ७०४८ हे.)			७०४८	०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ७०४८ हे.,)			७०४८	०	०

७.३) व्याप्तीतील बदल :- सदर प्रकल्पात व्याप्तीतील बदल नाही.

७.४) संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- प्र.मा. मधील पुराची किंमत वाढली त्यामुळे माती धरणाच्या काटछेदाची उंची वाढल्याने रु. ८.४३ कोटी व प्रस्तंभाचे उंचीत वाढ झाल्यामुळे रु. ८२.६३ कोटी वाढ झाली आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त सर्वसाधारण आराखड्यामध्ये डेक स्लॅब ऐवजी पूर्वबलित पुलाचे बांधकाम प्रस्तावित केल्यामुळे रु. २.५१ कोटी वाढ संभवते. तसेच प्र.मा. प्राप्त अहवालात १५ ॅ ८ मी. प्रमाणे द्वारांचे संकल्पनाची परिमाणे विचारात घेतली होती. पुराची किंमत वाढल्यामुळे १५ ॅ १० मी. आकारांची द्वारे विचारात घेऊन परिमाणे प्रस्तावित केल्यामुळे रु. २१.८७ कोटींची वाढ झाली आहे. अशाप्रकारे संकल्पनातील बदलामुळे एकूण ११५.४४ कोटी वाढ होत आहे.

७.५) इतर कारणांमुळे वाढ :- महामंडळाने १५.६४ टक्के आधीक्याची रु. १५७.६६ कोटी किंमतीची निविदा मंजूर केल्यामुळे रु. २४.०४ कोटीची वाढ झाली आहे. याशिवाय इतर उपशिर्ष – ए/के/एम/पी/आर व ओ मध्ये बांधकामाचे वाढीचे टक्केवारीमुळे रु. ०.७० कोटी वाढ झाली आहे. अशाप्रकारे इतर कारणांमुळे रु. २४.७४ कोटीची एकूण वाढ संभवते.

घुंगशी बॅरेज

ता.मुर्तिजापूर जि. अकोला.

घुंगशी बॅरेज हा मध्यम प्रकल्प पूर्णा (तापी) उपखोयात अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर् तालुक्यातील पारद गावाजवळ पूर्णा नदीवर आहे.

१) प्रशासकीय मान्यता : विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्रमांक / कांता-७/४९८/घुंगशी बॅरेज/प्रमा/(३८/२००८) दिनांक २३/१२/२००८ अन्वये सन २००८-२००९ चे दरसूचीने रु. १७०.१५ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रकल्प अंशतः खारपाण पट्टयात येतो.

२) प्रकल्पाची सुधारीत किंमत :- प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकिय मान्यतेचा प्रस्ताव सन २०११-१२ चे दरसुचीवर आधारित तयार करण्यात आला असून प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.३७४.९१ कोटी येत आहे.

३) कामाची सद्यःस्थिती :- प्रकल्पाचे कामास दिनांक २ मार्च २००९ पासून सुरूवात झाली असून दोन्ही तिरावरील मातीकाम जवळपास ९० टक्के व बॅरेजच्या संधानकाचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच १५ ॅ १० मी आकाराच्या उभ्या उचल पद्धतीच्या लोखंडी दरवाजे तयार करण्याचे काम कार्यक्षेत्रावर सुरू आहे.

४) वितरण प्रणालीतील संकल्पनातील बदलासाठी लोकप्रतिनिधींची शिफारस/ विनंती :- दि. ९/८/२०११ रोजी मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये मा.आ. श्री. बळीरामजी सिरस्कार व मा.आ. श्री. हरिष पिंपळे यांनी पारंपारीक कालव्या ऐवजी बंद पाईपलाईनव्दारे सिंचन करण्याची मागणी केल्यानुसार प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश प्राप्त झालेत (प्रत संलग्न) यासाठी बंद पाईपलाईनव्दारे कालव्याच्या संकल्पनाचा प्रस्ताव वाल्मी, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला आहे. तसेच नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी प्रादेशिक कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

५) लोकप्रतिनिधी/ स्थानिक संघटनेची मागणी :- जमीनीचा मोबदला वाढीव दराने मिळावा अशी मौखीक मागणी करण्यात आली आहे.

६) भूसंपादन अडीअडचणी (PAP व कास्तकारांचा विरोध) :- भूस्वामिंना जमीनीचे दर वाढवून पाहीजे असल्यामुळे सदर खरेदी करुन देण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे भूसंपादन कायद्याअंतर्गत भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले आहेत.

७) प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

अ) प्रकल्पाला दिनांक ११/०३/२०१० रोजीच्या टी.ए.सी.च्या १०३ व्या बैठकीत रु. १७०.१५ कोटी किंमतीस केंद्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त झाली आहे.

ब) केंद्र शासनाचे नियोजन विभागाने दि. १२/०४/२०१० च्या पत्राने रु. १७०.१५ कोटी किंमतीस Investment Clearance दिलेले आहे.

क) महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने त्यांचे पत्र क्रमांक क्क्क/२००९/३९४/क्ड-१८/च्क्र-१ दिनांक १५/०४/२०१० अन्वये Environmental Clearance दिलेले आहे.

ड) सन २०१०-११ व सन २०११-१२ दोन्ही वर्षी केंद्र शासनाचे अर्थसहाय्य करिता ए.आय.बी.पी. चा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला. परंतु सदर प्रकल्प ए.आय.बी.पी. मध्ये अंतर्भुत झाला नाही.

८) प्रकल्पाच्या किंमतीत झालेल्या वाढीची कारणमिमांसा :- प्रकल्पाचे सुधारीत अंदाज पत्रकानुसार रु. २०४.७६ कोटी ची वाढ संभवते. त्याची कारणमिमांसा खाली नमूद करण्यात येत आहे.

अ) दरसुचीतील वाढ :- प्र.मा. सन २००८-०९ चे दरसुचीने असून सु.प्र.मा. सन २०११-१२ चे दरसुचीने असल्यामुळे रु. २७.६७ कोटी वाढ झाली आहे.

ब) भूसंपादनातील वाढ :- प्र.मा. प्राप्त अंदाजपत्रकात सन २००८ चे शिघ्रगणकाप्रमाणे खरेदी विक्रीचे दर विचारात घेवून तरतूद करण्यात आली होती. सद्यःस्थीत नगर रचनाकार यांचेकडून मंजूर दराने सरळ खरेदीव्दारे १६० हेक्टर जमिन खरेदी करण्यात आली असून ३४६.३६ हेक्टर जमिन खरेदी करणे बाकी आहे. त्यामुळे रु. १७.१२ कोटीची वाढ संभवते.

क) संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- प्रशासकीय मान्यता मधील पुराची किंमत वाढली त्यामुळे माती धरणाच्या काटछेदाची उंची वाढल्याने रु. ८.४३ कोटी व प्रस्तंभाचे उंचीत वाढ झाल्यामुळे रु. ८२.६३ कोटीची वाढ झाली आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त सर्वसाधारण आराखड्यामध्ये डेक स्लॅब ऐवजी पूर्वबलित पुलाचे बांधकाम प्रस्तावित केल्यामुळे रु. २.५१ कोटी वाढ संभवते. तसेच प्र.मा. प्राप्त अहवालात १५ ॅ ८ मी. प्रमाणे द्वारांचे संकल्पनाची परिमाणे विचारात घेतली होती. पुराची किंमत वाढल्यामुळे १५ ॅ १० मी. आकारांची द्वारे विचारात घेऊन परिमाणे प्रस्तावित केल्यामुळे रु. २१.८७ कोटींची वाढ झाली आहे. अशाप्रकारे संकल्पनातील बदलामुळे एकूण ११५.४४ कोटी वाढ होत आहे.

ड) इतर कारणांमुळे वाढ :- महामंडळाने १५.६४ टक्के आधिक्याची रु. १५७.६६ कोटी किंमतीची निविदा मंजूर केल्यामुळे रु. २४.०४ कोटीची वाढ झाली आहे. याशिवाय इतर उपशिर्ष – ए/के/ एम/पी/आर व ओ मध्ये बांधकामाचे वाढीचे टक्केवारीमुळे रु. ०.७० कोटी वाढ झाली आहे. अशाप्रकारे इतर कारणांमुळे रु. २४.७४ कोटीची एकूण वाढ संभवते.

इ) अनुषंगिक खर्चातील वाढ :- यामुळे रु. १९.७९ कोटीची वाढ झाली आहे.

९) विलंबाची कारणे / अडीअडचणी :- भूसंपादनासाठी शेतक-यांचे शेतजमीनीचा दर वाढवून मिळावा याकरिता विरोघ असल्यामुळे भूसंपादनास विलंब होत आहे.

अ) निधीचे अनउपलब्धतेमुळे प्रकल्पाचे कामात ६ महिन्याचा विलंब झाला आहे.

ब) पर्यावरण मान्यता प्राप्त करणेचे प्रक्रियेस एक वर्षाचा कालावधी लागला

क) दिनांक ९/८/२०११ रोजी मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये प्राप्त सुचनांनुसार पारंपारिक कालव्याऐवजी बंद पाईप लाईन द्वारे सिंचन प्रस्तावित करावे असे निर्देश असल्यामुळे वाल्मी, औरंगाबाद यांचेकडून बंद पाईप लाईन द्वारे कालव्याचे संकल्पन प्राप्त करून घेण्यात येत आहे. पाईप वितरण प्रणालीबाबतचा नियामक मंडळाच्या वान्यतेचा प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आलेला आहे.

१०) वर्षवार खर्च :-

या प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु. १६१.४१ कोटी खर्च झालेला आहे. वर्षवार खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	खर्च (इटीपी सह)
१	२००९-१०	१२.६६
२	२०१०-११	५५.७८
३	२०११-१२	९१.९६
	एकुण	१६०.४०
	इटीपी	१.०१
	एकुण (रू,कोटी)	१६१.४१

प्रकल्पाची सद्यास्थितीत उर्वरीत किंमत रु. २१३.५० कोटी एवढी येते.

११) प्रकल्पामुळे फायदे :-

१. या प्रकल्पापासुन मुर्तिजापूर व अकोला तालुक्यातील २२ गावांमधील ६३४३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असुन त्याचा लाभ ८००० शेतक-यांना होणार आहे.

२. औद्योगीक व पिण्याचे पाण्याकरीता प्रकल्पात २.६३ द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षीत आहे. त्याचा फायदा परीसरातील गावांना होणार आहे.

३. होणा-या साठयातून मत्सव्यवसायाला चालना मिळणार आहे.

४. रोजगार निर्मिती होणार आहे.

१)	**प्रकल्पांचे नांव : उमा बॅरेज तालुका :मुर्तिजापूर, जिल्हा : अकोला**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	५५१०	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१/०८/२००७	०७-०८		७८.६२	५५१०
	सुप्रमा-१	३१/०३/२०११	०९-१०		२३७.२४	५५१०
४)	**केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)**				टीएसी चा (प्रस्ताव २३.११.०९ ला सादर)	
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१४२.१८
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					६.५७
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					१०६.८८
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					२८.७३
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					०७-०८
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					२००९
७)	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (२३७.२४ - ७८.६२ उ १५८.६२)**					
					रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ				२०.४७	१२.९०
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (प्र.मा. २०.५५ व सु.प्र.मा. ४४.६८ कोटी रु.)				२४.१३	१५.२१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				८४.५९	५३.३३
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)				१४.२१	८.९६
७.६	इटीपी मुळे झालेली वाढ)				१५.२२	९.६०
	एकूण				**१५८.६२**	**१००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती			एकूण	झालेले काम	टक्केवारी
८.१	भू-संपादन,			६७७ हे	१५२.०० हे	२२.४५
	पूनर्वसन			४ गावे	०	०
	वनजमिन संपादन			०	०	०
८.२	धरण					४५
८.३	कालवा (एकूण लांबी १२.७० कि.मी.)				०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र ५५१० हे.)				०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ५५१० हे.,)				०	०

७.३) व्याप्तीतल बदल – सदर प्रकल्पात व्याप्तीतील बदल नाही.

७.४) संकल्पचित्रातील बदल – प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये १५ मी. ÷ १२ मी. चे ३ व्दारासह बॅरेज प्रस्तावित होते. तथापी म.स.स. ने केलेल्या पूर अभ्यासानुसार पुराचा विसर्ग वाढल्याने १५ मी. ÷ ८.५० मी. आकाराचे ८ व्दारासह म.स.स. नाशिक यांनी संकल्पीत केलेल्या सर्व साधारण आराखडयानुसार संकल्पनात बदल झाला व त्यामुळे रु. ८४.५९ कोटीची वाढ झाली.

७.५) इतर कारणांमुळे झालेली वाढ – निविदा आधिक्यामुळे रू.१२.७६ कोटी व इतर आवश्यक बाबींची तरतूद केल्याने होणारी वाढ रु. १.४५ कोटी अशी एकूण रू. १४.२१ कोटीची वाढ झाली.

फ) अनुषंगीक खर्चामुळे रू. १५.२२ कोटी वाढ होत आहे.

उमा बॅरेज

ता. मुर्तिजापूर **जि. अकोला.**

उमा बॅरेज प्रकल्प मौजे बोर्टा ता. मुर्तिजापूर या गावाजवळ तापी खो-यात पुर्णा नदीची उपनदी उमानदीवर प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प हा जिल्हयातील खारपाण पट्टयामध्ये आहे.

१. प्रशासकिय मान्यता :- या योजनेस विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे निर्णय क्र.विपविम/ नाता-५/२८२३/०७/दिनांक ३१/८/०७ अन्वये दरसुची २००७-०८ अन्वये रु.७८.६२ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे

२. सुधारीत प्रशासकिय मान्यता :- या योजनेच्या दरसुची २००९-१० वर आधारीत रु.२३७.२३ कोटी किंमतीच्या सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावास महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र.नांता.७/२७०३/सुप्रमा/ दि.३१/३/२०११ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे.

अ) पर्यावरण :- टी.ओ.आर. प्रस्तावास राज्यस्तरीय समितीने दिनांक ७ मार्च २००९ रोजीच्या ८ बैठकीमध्ये तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. प्रकल्पस्थळी दिनांक ६/१०/२०१२ रोजी जनसुनावणी झाली असून अंतिम मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

ब) केंद्रीय जलआयोग, इत्यादिची मान्यता :- केंद्रिय जल आयोगाचे मान्यतेचा प्रस्ताव नागपूर कार्यालयास सादर झाला असून सद्यःस्थितीमध्ये त्यांनी उपस्थित केलेल्या शे-ंयाची पुर्तता करुन प्रस्ताव दिनांक ९/८/२०१२ ला प्रादेशिक कार्यालयामार्फत फेर सादर करण्यात आला.

३. सद्यःस्थितीः- प्रकल्पाचे कामास दि.१६/५/२००९ पासून सुरुवात झालेली आहे. सद्यःस्थितीत सर्वसाधारणपणे बॅरेजचे काम (मातीकामासह) ४५ टक्के पूर्ण झालेले आहे. भूसंपादन २२.४५ टक्के पूर्ण झाले आहे.

४. व्याप्तीतील बदलासाठी लोकप्रतिनिधी शिफारस/ विनंती - या प्रकल्पाकरीता व्याप्तीतील बदलासाठी लोकप्रतिनिधीनी शिफारस वा विनंती केलेली नाही.

५. लोकप्रतिनिधी / स्थानिक संघटना मागणी :- प्रशासकिय मान्यतेनुसार प्रकल्पामुळे बाधीत होणा-या लंघापूर गावाचे पूर्णतः व माना, रोहणा व पोही या गावांचे अंशतः असे एकूण ४ गांवांचे पुनर्वसन प्रस्तावित होते. तथापि अंशतः बांधीत होणा-या रोहणा व पोही येथील ग्रामस्थांची या गावाठाणाचे पूर्णतः पुनर्वसनाची मागणी करीत आहेत. सदर बाबीमुळे होणारी वाढ सु.प्र.मा.मध्ये अंतर्भुत नाही.

६. भूसंपादन अडीअडचणी (PAP व कास्तकारांचा विरोध) :- हया प्रकल्पाचे मुख्य कामाकरिता ६४५ हेक्टर व कालव्याकरिता ३२.०० हेक्टर अशी एकूण ६७७ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. आतापर्यंत त्यापैकी मुख्य कामाकरिता १५२ हेक्टर जमिन सरळ खरेदीने संपादीत केलेली आहे. उर्वरीत जमिन सरळ खरेदीने संपादीत करण्याकरीता संबंधीत कास्तकार बाजार भावानूसार वाढीव दराची मागणी करीत आहेत.

७.धरणात साठा करू शकत नसल्यास त्याची कारणे :- प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असुन जुन २०१६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

८.प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन :- प्रकल्पाचे काम जून २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पामुळे बाधीत होणा-या ४ गावापैकी एक गांव लंघापूर पूर्णतः व ३ गांवे माना, पोही व रोहणा अंशतः पुनर्वसित करण्याचे नियोजित होते. तथापी वरीलपैकी अंशतः बाधीत होणा-या रोहणा व पोही येथील ग्रामस्थांनी पूर्णतः पुनर्वसनाची मागणी केल्यामुळे त्यानुसार प्रस्ताव जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे सादर करण्यात आला आहे. यामुळे प्रकल्पाच्या कामास विलंब होत आहे.

९. प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

१)) या योजनेचा केंद्रिय जल आयोगाची मान्यतेच्या प्रस्तावामध्ये नागपूर कार्यालयाने दिनांक १३/१०/२०११ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या शे-यांच्या पुर्ततेची कार्यवाही प्रतीपथावर आहे. केंद्रिय जल आयोगाच्या प्रस्तावासाठी म.सं.सं.नाशिक यांचे प्रमाणपत्र आवश्यक असून ते प्राप्त करण्यासाठी म.सं.सं.नाशिक कडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यावर म.सं.सं.नाशिक द्वारा त्यांचे दि.२८/३/२०१२ चे पत्रानुसार उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यात येत आहे.

२) प्रकल्पास पर्यावरण विभागाची मान्यता आवश्यक असून त्याबाबतचा प्रस्ताव संबंधीत विभागास सादर करण्यात आला असून मान्यता प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

३) प्रशासकिय मान्यतेनुसार प्रकल्पामुळे बाधीत होणा-या लंघापूर गावाचे पूर्णतः व माना, रोहणा व पोही या गावांचे अंशतः असे एकूण ४ गांवांचे पुनर्वसन प्रस्तावित होते. तथापि अंशतः बांधीत होणा-या रोहणा व पोही येथील ग्रामस्थांची या गावाठाणाचे पूर्णतः पुनर्वसनाची मागणी करीत असून त्यानुसार पूर्णतः पुनर्वसनाचा प्रस्ताव माहे मार्च २०१२ मध्ये जिल्हाधिकारी अकोला यांना सादर करण्यात आला आहे.

मौजे लंघापूर येथील घरांचा संपादन प्रस्ताव दि.१३/१/२०१० रोजी जिल्हा महसुल यंत्रणेस सादर करण्यात आलेला असून त्याची संयुक्त मोजणी डिसेंबर २०११ मध्ये पूर्ण झाली आहे. संयुक्त मोजणीचा सविस्तर अहवाल प्रतिक्षेत आहे. पुनर्वसनासाठी लागणा-या पर्यायी जमिनीचा प्रस्ताव फेब्रु.१२ मध्ये सादर करण्यात आला असून प्रकरण संयुक्त मोजणीसाठी आहे.

तसेच मौजे माना येथील अंशतः बाधीत (७४ घरे) संपादन प्रस्ताव एप्रिल २०१२ मध्ये सादर करण्यात आला असून प्रकरण संयुक्त मोजणीकरीता आहे. पुनर्वसनासाठी आवश्यक पर्यायी जागेची निश्चित अद्याप ग्रामसभेमार्फत झालेली नाही. ती प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

४) योजनेवरील वितरण प्रणाली पाईप लाईनद्वारे प्रस्तावित असून पाईप लाईन वितरण प्रणालीची सर्वसाधारण संरेखा तयार करण्यात आलेली आहे. या संरेखेचे प्रातिनिधीक स्वरुपात सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन कामाची प्रति मी. लांबीतील दराची परिगणना करण्यात आली आहे. हा प्रति मिटरचा दर गृहित धरुन संपूर्ण वितरण प्रणालीचे अंदाजपत्रक तयार करणे सुरु आहे.

१०. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारण मिमांसा –

अ) दरसूचीतील वाढ – प्रशासकिय मान्यता अहवाल दरसूची सन २००७-२००८ चे आधारावर होता. सु.प्र.मा. किंमत दरसूची २००९-१० चे आधारावर असल्याने दरसूचीमुळे रु.२०.४७ कोटी वाढ झाली.

ब) निविदेमुळे वाढ - सदर योजनेच्या सी व डी कामाच्या निविदा दरसूची २००८-०९ नुसार तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकाचे आधारावर बोलविण्यात आल्या होत्या सदर निविदा २२ टक्के अधीक दराने मंजूर असल्यामुळे रु. १२.७६ कोटी ची वाढ झाली.

क) भूसंपादनातील व पुनर्वसनातील वाढ – प्रशासकिय मान्यता अहवालानुसार भूसंपादनासाठी तत्कालिन शिग्रगणकातील दराचे आधारावर तरतूद होती. तथापी प्रत्यक्षात जमीन सरळ खरेदी पध्दतीने घेण्यात आल्याने नगर रचनाकार कार्यालय, अकोला यांनी प्रस्तावित केलेल्या दराप्रमाणे तरतूद करण्यात आली व त्यामुळे रु. २४.१३ कोटी ची वाढ झाली.

ड) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाचे व्याप्तीत बदल झालेला नाही.

इ) संकल्पचित्रातील बदल – प्रशासकिय मान्यता अहवालामध्ये १५ मी. x १२ मी. चे ३ व्दारासह बॅरेज प्रस्तावित होते. तथापी म.स.स. ने केलेल्या पूर अभ्यासानुसार पुराचा विसर्ग वाढल्याने १५ मी. x ८.५० मी. आकाराचे ८ व्दारासह म.स.स. नाशिक यांनी संकल्पीत केलेल्या सर्व साधारण आराखडयानुसार संकल्पनात बदल झाला व त्यामुळे रु. ८४.५९ कोटीची वाढ झाली.

प) इतर कारणांमुळे झालेली वाढ – निविदा आधिक्यामुळे रू.१२.७६ कोटी व इतर आवश्यक बाबींची तरतूद केल्याने होणारी वाढ रु. १.४५ कोटी अशी एकूण रू. १४.२१ कोटीची वाढ झाली.

फ) अनुषंगीक खर्चामुळे रू. १५.२२ कोटी वाढ होत आहे.

११. विलंबाची कारणे / अडीअडचणी :-

१. बॅरेजच्या घटक कामाच्यासंकल्पनास बराच विलंब लागला आहे. अजुन बॅरेजच्या स्तंभाचे संकल्पन पूर्ण करण्यात आले नाही.

२. अंशतः बाधीत रोहणा पोही या गावांचे पुर्णतः पुनर्वसनाची मागणी करण्यात येत असुन त्याबाबतीत अंतिम निर्णय होईपर्यंत अडचणी उद्‌भवल्या आहेत.

१२. आर्थिक नियोजन व खर्चाचा तपशिल :- या योजनेसाठी सन २०१२-१३ करिता रु.१९.०० कोटी इतके अनुदान उपलब्ध असून सप्टेंबर २०१२ अखेर रु.४.१४ कोटी खर्च झाला असून प्रकल्पावर एकूण रु.१४६.२६ कोटी इतका खर्च झाला आहे.

१३. खारपाणपट्टयात असल्यामूळे :-

सदर प्रकल्प पश्चिम विदर्भातील खारपाणपट्टयातील प्रदेशात येत आहे. सदर प्रदेशातील भुगर्भातील पाणी हे क्षारयुक्त व खारे असल्यामूळे पिकांचे सिंचनाकरीता विहितीव्दारे/ कुपनलिकाव्दारे वापर करण्यात येत नाही. याशिवाय दुसरे कुठलेही सिंचनाचे स्त्रोत उपलब्ध नाहीत.

सदर प्रदेशातील भूस्तर ४० ते ५० मी. खोलिपर्यंत मऊ भूस्तर असून, बांधकमां करीताचे पायवा करिता आवश्यक कठिण खडक उपलब्ध नाही भुपृष्ठावरील वाहणारे पाणी अडवून सिंचना करीतां पाणीसाठा निर्माण करण्यास करावे लागणा-या धरण व सांडवा अथवा बॅरेजेस चे बांधकाम करण्यास जास्त खर्च येतो. या कारणांमुळे शासनाने, शासन निर्णय २३०६/(३५८/२०६)/लपा-२, दि. ०३/०१/२००८ अन्वये विदर्भातील खारपाणी पट्टयातील लघू पाटबंधारे योजनांचे मापदंड, प्रचलित मापदंडा पेक्षा तिपटीने वाढवून दिलेले आहेत. तसेच लाभव्यय गुणोत्तर विचारात घेवू नये असे नमूद केले आहे.

सद्यःस्थितीत अशाप्रकारे प्रकल्प मंजूर होवून सुरु झाल्यामुळे, खारपाणी पट्टयातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत घेवून राष्ट्रीय उत्पन्नात देखील वाढ होईल.

वर्षनिहाय खर्चः- मार्च २०१२ अखेर रु. १४२.१८ कोटी खर्च झाला. वर्षवार खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे.

वर्ष	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	एकूण अनुषंगिक खर्च	एकुण
खर्च	०.१४८	०.२८२	३३.८८	३४.५९	४४.५५	२८.७३	१४२.१८

१४. प्रकल्पामुळे फायदे :-

१) सिंचन आयोगाच्या शिफारशीनुसार खारपाणपट्टयात सिंचनाच्या सोयी उपलब्ध होते..

२) प्रकल्पापासून २०.७९ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्मिती होवून त्याद्वारे ५५१० हे.सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

३) प्रकल्पाचे बांधकामामुळे परिसरातील भूजल पातळीत वाढ होईल..

४) प्रकल्पामधे पिण्याचे पाण्याचे आरक्षण आहे. त्यामुळे प्रकल्पाचे परिसरामध्ये पिण्याचे पाण्याच्या प्रश्न मिटेल.

५) परिसरात रोजगार निर्मिती होईल.

६) मत्स्यव्यवसाय वाढीमुळे शासनास महसुल प्राप्त होईल.

७) लाभक्षेत्रात पिकांचे उत्पन्नात वाढ होऊन लोकांचे राहणीमान उंचावेल.

८) या प्रकल्पामुळे उपलब्ध होणा-या गोड पाण्यामुळे व त्याच्या वापरामुळे कालांतराने खारपाणपट्टयामधील काही भागामधील खारेपणा (Salinity) कमी होण्यास मदत होईल.

१)	**प्रकल्पांचे नांव : पुर्णा बॅरेज-२ (नेरधामणा) तालुका :तेल्हारा, जिल्हा : अकोला**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	६९५४	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	०	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	०
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२४/१०/२००८	०७-०८		१८१.९९	६९५४
	सुप्रमा-१	३१/०३/२०११	१०-११		६३८.३५	६९५४
४)	**केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)**	१२/०१/२०१२	१०-११		६१७.४६	६९५४
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					२००.१९
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					०.६८
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					१५९.५६
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					३९.९५
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००८-०९
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					२००९
७)	**मळ प्रशासकीय मान्यतेच्या तलनेत खर्च वाढीची कारणे (६३८.३५-१८१.९९ = ४५६.३६)**					
					रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ				३५.७४	७.८३
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (प्र.मा. २७.१६ व सु.प्र.मा.(-) २१.११ कोटी रु.) बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहीनीची तरतुद कमी झाली					-६.०५	-१.३३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)					-	-
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ					३६९.५४	८०.९८
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)					१४.०३	३.०७
७.६	इटीपी मुळे झालेली वाढ					४३.१०	९.४४
	एकूण वाढ					**४५६.३६**	**१०० %**
८)	**प्रकल्पाची सद्यःस्थिती ,**					**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वनजमिन संपादन						
	भू-संपादन,	२८४ हे.				२५ हे	८.८०
	पूनर्वसन	-- निरंक ---				--	०
	वनजमिन संपादन	-- निरंक ---				--	०
८.२	धरण						४५
८.३	कालवा (एकूण लांबी २२.२६ कि.मी.)					--	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र : ६९५४ हे.)					--	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ६९५४ हे.)					--	०

७.३) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाचे व्याप्तीत बदल झालेला नाही.

७.४) संकल्पचित्रातील बदल –

प्रकल्पाच्या पूर्णा नदीपात्रात माती व रेती मिश्रीत (Flexible strata) आहे. तसेच नदीच्या दोन्ही तिरावर सुध्दा मऊ भुस्तर आढळून येतो. सदर प्रकल्प खारपाणपट्टयात असून हया भागामध्ये ५० मी. पर्यंत बांधकामाकरीता कठीण भूस्तर उपलब्ध होत नाही. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक ह्यांचेकडून संकल्पचित्र प्राप्त करुन घेऊन प्रशासकिय मान्यता प्रस्ताव तयार करण्यात आला होता, त्यामध्ये बॅरेजचे दोन्ही बाजूस पोचपूल प्रस्तावित होते. तसेच बॅरेजचा पाया हा राफ्टसहीत (वरच्या पातळीवर) प्रस्तावित होता व त्याप्रमाणे निविदा काढण्यात आली. तथापी प्रकल्पाचे सुरक्षेचे दृष्टीने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडे पुनश्च संकल्पन प्रस्तावित करण्यात आले. त्याअनुषंगाने मा. महासंचालक (संकल्पन, प्रशिक्षण व संधोधन), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. ८/१/२०१० रोजी झालेल्या बैठकीत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेतील दगडी धरण मंडळात अशा प्रकारच्या कामाचा अनुभव नसल्याने व याबाबतचे Mathematical Model संघटनेत नसल्यामुळे त्यांनी अशा बॅरेजचे संकल्पन केंद्रिय जलआयोग वा वॅप्कॉस, नवि दिल्ली किंवा अन्य मान्यताप्राप्त खाजगी संस्था, आंतरराष्ट्रीय सल्लागार ज्यांना अशा कामाचा अनुभव आहे त्यांचे कडून करून घेण्याचे सुचविले होते. त्यानूसार सदर बॅरेजचे संकल्पन वॅप्कॉस, नवि दिल्ली या भारत सरकारच्या अंगिकृत संस्थेकडून करून घेण्यात आले. प्रशासकीय मान्यता प्रस्तावानूसार २१६ मी. लांबीचे आर.सी.सी. राफ्ट बॅरेज प्रस्तावित होते. वॅप्कॉसने दिलेल्या संकल्पन व नकाशानूसार बॅरेजची लांबी २१५.८२५ मी.एवढी ठेवण्यात आली आहे. तथापी प्रकल्पाचा १०० वर्षातून येणारा पूराचा विसर्ग आता संकल्पनानूसार २१५.८२५ मी. लांबीचे बॅरेज मधून वाहून जाणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचा SPF व्दारभागातून (Gated) वाहून जाणे शक्य नसल्यामुळे हा विसर्ग वाहून जाण्याकरीता बॅरेजच्या दोन्ही तिरावर प्रत्येकी १०० मीटर लांबीच्या व्दारविरहीत (Un-gated) भागाची तरतूद वॅप्कॉस मार्फत करण्यात आली आहे. पूर्णा नदी बारमाही नसून बॅरेजमध्ये पावसाळोत्तर पाणी साठविणे प्रस्तावित आहे. त्यामुळे बॅरेज water tight असणे गरजेचे असल्याने वॅप्कॉसने राफ्टच्या खालुन होणारा पाण्याचा संभाव्य पाझर टाळण्याकरीता तसेच मातीच्या long time settlement व boxing effect चा विचार करून diaphragm wall प्रस्तावित केल्या आहेत. अशा प्रकारचे खोल काळया मातीतील diaphragm wall चे बांधकाम महाराष्ट्रात प्रथमच करण्यात आले असून या बदलामुळे रू.३६९.५४ कोटी ची वाढ झाली.

७.५) इतर कारणांमुळे झालेली वाढ –

निविदा अधीक्यामुळे होणारी वाढ रु. ३०.५४ कोटी व इतर आनावश्यक बाबींची तरतूद कमी केल्याने होणारी बचत रु. १६.५१ कोटी अशी एकूण १४.०३ कोटीची वाढ झाली.

पूर्णा बॅरेज-२ (नेरधामणा)

ता. तेल्हारा **जि. अकोला.**

पूर्णा बॅरेज नं.२ (नेरधामणा) प्रकल्पाचे बांधकाम मौजे धामणा ता.तेल्हारा या गावाजवळ तापी खो-यात पुर्णा नदीवर सुरु आहे. सदर प्रकल्प हा जिल्हयातील खारपाण पट्टयामध्ये आहे.

१. प्रशासकिय मान्यता :- या योजनेस विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे निर्णय क्रमांक-विपविम/काता-७/४५४/ (३६/२००८)/पूर्णा बॅरेज नं.२ (नेरधामणा)/प्रमा/२००८/दिनांक २४/१०/०८ अन्वये दर सुची २००७-०८ वर आधारीत रु.१८१.९९ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

२. सुधारीत प्रशासकिय मान्यता :- प्रकल्पाच्या किंमतीत संकल्पचित्रातील बदल, आधीक्य दराने निविदा स्विकृती, अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादि कारणांमुळे वाढ झाल्याने या योजनेच्या दरसुची २०१०-११ वर आधारीत रु.६३०.३५ कोटी किंमतीस विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर द्वारा पत्र क्र.कांता.७/२६९९/ सुप्रमा, दि.३१/३/२०११ अन्वये सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

अ) पर्यावरण :- प्रकल्पास राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाचे पत्र क्र.एसईएसी-२००८/सीआर/३७१/टीसी-२/दिनांक १६/११/२०१० अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

ब) केंद्रीय जलआयोग, इत्यादिची मान्यता :- प्रकल्पास राज्य शासनाने दिनांक १९/७/२०११ रोजी रु. ६३८.३५ कोटी रुपयास इन्व्हेस्टमेंट क्लिअरन्स प्रदान केले त्यानंतर नियोजन आयोग नवि दिल्ली यांनी दिनांक २६/३/२०१२ रोजी प्रकल्पास रु. ६१७.४६ कोटी रुपयास इन्व्हेस्टमेंट क्लिअरन्स प्रदान केले. त्यानंतर प्रकल्पाच्या सुधारित किंमतीस केंद्रीय जलआयोगाने दिनांक १२/१/२०१२ रोजी संपन्न झालेल्या ११३ व्या सभेमध्ये सुधारित मान्यता प्रदान केली आहे.

३. सद्यःस्थितीः- दिनांक १५/९/२००९ ला योजनेच्या कामास सुरवात झालेली आहे. सद्यःस्थितीत बॅरेजच्या डायफ्राम वॉलचे व द्वार भागातील लिन काँक्रीटचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच डाव्या तिरावरील व्दारविरहीत भागातील Lean Concrete चे काम पूर्ण झाले असून उजव्या तिरावरील व्दारविरहीत भागातील Lean Concrete चे ५० टक्के काम झाले आहे. डाव्या तिरावरील द्वार विरहीत भागातील चार स्पॅनचे राफ्टचे काम पूर्ण झाले आहे. पुलाच्या दोन्ही तिरावरील राफ्टचे बांधकाम पूर्ण झाले असून उजव्या तिरावरील चार व डाव्या तिरावरील एक असे एकूण पाच स्लॅबचे काम पुर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पास एकूण १२ द्वार असून त्यापैकी ६ द्वारांचे फॅब्रीकेशनचे काम पूर्ण झाले आहे. सर्वसाधारणपणे एकंदरीत बॅरेजचे ४५ टक्के काम पूर्ण झाले असून भूसंपादन ८.८० टक्के पूर्ण झाले आहे.

४. व्याप्तीतील बदलासाठी लोकप्रतिनिधी शिफारस/विनंती - या प्रकल्पाकरीता व्याप्तीतील बदलासाठी लोकप्रतिनिधीनी शिफारस वा विनंती केलेली नाही.

५. लोकप्रतिनिधी / स्थानिक संघटना मागणी :- निरंक.

६. भूसंपादन अडीअडचणी (PAP व कास्तकारांचा विरोध) :- याप्रकल्पाच्या बॅरेज करिता ५५ हेक्टर व कालव्या करिता २२९ हेक्टर अशा एकूण २८४.०० हेक्टर जमिनीची आवश्यकता असुन आता पर्यंत बॅरेजकरीता सरळ खरेदीव्दारे २५ हेक्टर जमिन संपादीत केली आहे. उर्वरीत जमिन सरळ खरेदीने संपादीत करण्याकरीता संबंधीत कास्तकार बाजार भावानूसार वाढीव दराची मागणी करीत आहेत व त्यानुसार जमिन देण्यास तयार आहेत.

७. धरणात साठा करू शकत नसल्यास त्याची कारणे :- प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

८. प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन :- . प्रकल्पाचे काम जून २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

९. प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

१) संकल्पनातील बदलामुळे निविदेच्या परिमाणामध्ये वाढ झाली असून वाढीव परिमाणास मान्यतेची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

२) कालव्याऐवजी पाईप वितरण प्रणाली प्रस्तावित करण्यात येत असून पाईप लाईन वितरण प्रणालीची सर्वसाधारण संरेखा तयार करण्यात आलेली आहे. या संरेखेचे प्रातिनिधीक स्वरुपात सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन कामाची प्रति मी. लांबीतील दराची परिगणना करण्यात आली आहे. हा प्रति मिटरचा दर गृहित धरुन संपूर्ण वितरण प्रणालीचे अंदाजपत्रक तयार करणे सुरु आहे.

१०. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारण मिमांसा –

अ) दरसूचीतील वाढ – प्रशासकिय मान्यता अहवाल दरसूची सन २००७-२००८ चे आधारावर होता. सु.प्र.मा. किंमत दरसूची २०१०-११ चे आधारावर असल्याने दरसूचीमुळे रु.३५.७४ कोटी वाढ झाली.

ब) निविदेमुळे वाढ - सदर योजनेच्या सी व डी कामाच्या निविदा दरसूची २००८-०९ नुसार तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकाचे आधारावर बोलविण्यात आल्या होत्या सदर निविदा १५.५७ टक्के अधीक दराने मंजूर असल्यामुळे रु. ३०.५४ कोटी ची वाढ झाली.

क) भूसंपादनातील व पुनर्वसनातील वाढ –प्रशासकिय मान्यता अहवालानुसार भूसंपादनासाठी तत्कालिन शिग्रगणकातील दराचे आधारावर तरतूद होती. तथापी प्रत्यक्षात जमीन सरळ खरेदी पध्दतीने घेण्यात आल्याने नगर रचनाकार कार्यालय, अकोला यांनी प्रस्तावित केलेल्या दराप्रमाणे तरतूद करण्यात आली व प्र.मा. अहवालामध्ये असलेली बुडीत क्षेत्रातील पुलाची व विद्युत वाहीनी ची तरतूद कमी झाल्याने एकत्रित रु. (-) ६.०५ कोटी ची बचत झाली.

ड) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाचे व्याप्तीत बदल झालेला नाही.

इ) संकल्पचित्रातील बदल –प्रकल्पाच्या पूर्णा नदीपात्रात माती व रेती मिश्रीत (Flexible strata) आहे. तसेच नदीच्या दोन्ही तिरावर सुध्दा मऊ भुस्तर आढळून येतो. सदर प्रकल्प खारपाण पट्टयात असून हया भागामध्ये ५० मी. पर्यंत बांधकामाकरीता कठीण भूस्तर उपलब्ध होत नाही. त्याअनुषंगाने महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना अशा प्रकारच्या संकल्पनाचा अनुभव नसल्यामुळे त्यांनी अशा बॅरेजचे संकल्पन केंद्रिय जलआयोग वा वॅप्कॉस, नवि दिल्ली किंवा अन्य मान्यताप्राप्त खाजगी संस्था, आंतरराष्ट्रीय सल्लागार ज्यांना अशा कामाचा अनुभव आहे त्यांचे कडून करून घेण्याचे सुचविले होते. त्यानूसार सदर बॅरेजचे संकल्पन वॅप्कॉस, नवि दिल्ली या भारत

सरकारच्या अंगिकृत संस्थेकडून करून घेण्यात आले. प्रशासकीय मान्यता प्रस्तावानूसार २१६ मी. लांबीचे आर.सी.सी. राफ्ट बॅरेज प्रस्तावित होते. वॅप्कॉसने दिलेल्या संकल्पन व नकाशानूसार बॅरेजची लांबी २१५.८२५ मी.एवढी ठेवण्यात आली आहे. तथापी प्रकल्पाचा १०० वर्षातून येणारा पूराचा विसर्ग आता संकल्पनानूसार २१५.८२५ मी. लांबीचे बॅरेज मधून वाहून जाणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचा च्छ्क व्दारभागातून (Gated) वाहून जाणे शक्य नसल्यामुळे हा विसर्ग वाहून जाण्याकरीता बॅरेजच्या दोन्ही तिरावर प्रत्येकी १०० मीटर लांबीच्या व्दारविरहीत (Un-gated) भागाची तरतूद करण्यात आली आहे. पूर्णा नदी बारमाही नसून बॅरेजमध्ये पावसाळोत्तर पाणी साठविणे प्रस्तावित आहे. त्यामुळे बॅरेज water tight असणे गरजेचे असल्याने वॅप्कॉसने राफ्टच्या खालुन होणारा पाण्याचा संभाव्य पाझर टाळण्याकरीता तसेच मातीच्या long time settlement व boxing effect चा विचार करून diaphragm wall प्रस्तावित केल्या आहेत. या बदलामुळे रू.३५९.५४ कोटी ची वाढ झाली.

प) इतर कारणांमुळे झालेली वाढ – निविदा अधीक्यामुळे होणारी वाढ रु. ३०.५४ कोटी व इतर अनावश्यक बाबींची तरतूद कमी केल्याने होणारी बचत रु. १६.५१ कोटी अशी एकूण १४.०३ कोटीची वाढ झाली.

११. विलंबाची कारणे / अडीअडचणी :- वॅप्कॉस कडून प्राप्त झालेल्या नकाशांमुळे होणा-या वाढीव परिमाणाचे प्रस्तावास मान्यता प्राप्त न झाल्यामुळे तसेच अे.आय.बि.पी अंतर्गत निधी उपलब्ध न झाल्यामुळे कामाची गती मंदावली आहे.

१२. आर्थिक नियोजन व खर्चाचा तपशिल :- या योजनेसाठी सन २०१२-१३ करिता रु.८०.०० कोटी इतके अनुदान उपलब्ध असून सप्टेंबर २०१२ अखेर रु.५१.२५ कोटी खर्च झाला असून प्रकल्पावर एकूण रु.२५१.३४ कोटी इतका खर्च झाला आहे.

१३. खारपाणपट्टयात असल्यामूळे :-

सदर प्रकल्प पश्चिम विदर्भातील खारपाण पट्टयातील प्रदेशात येत आहे. सदर प्रदेशातील भुगर्भातील पाणी हे क्षारयुक्त व खारे असल्यामूळे पिकांचे सिंचनाकरीता विहितीव्दारे/ कुपनलिकाव्दारे वापर करण्यात येत नाही. याशिवाय दुसरे कुठलेही सिंचनाचे स्त्रोत उपलब्ध नाहीत.

सदर प्रदेशातील भूस्तर ४० ते ५० मी. खोलिपर्यंत मऊ भूस्तर असून, बांधकमां करीताचे पायवा करिता आवश्यक कठिण खडक उपलब्ध नाही भुपृष्ठावरील वाहणारे पाणी अडवून सिंचना करीतां पाणीसाठा निर्माण करण्यास करावे लागणा-या धरण व सांडवा अथवा बॅरेजेस चे बांधकाम करण्यास जास्त खर्च येतो. या कारणांमुळे शासनाने, शासन निर्णय २३०६/ (३५८/२०६)/लपा-२/दि.०३/०१/२००८ अन्वये विदर्भातील खारपाणी पट्टयातील लघू पाटबंधारे योजनांचे मापदंड, प्रचलित मापदंडा पेक्षा तिपटीने वाढवून दिलेले आहेत. तसेच लाभव्यय गुणोत्तर विचारात घेवू नये असे नमूद केले आहे.

सद्य:स्थितीत अशाप्रकारे प्रकल्प मंजूर होवून सुरु झाल्यामुळे, खारपाणी पट्टयातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत घेवून राष्ट्रीय उत्पन्नात देखील वाढ होईल.

वर्षनिहाय खर्च:- मार्च २०१२ अखेर रु. २००.१९ कोटी खर्च झाला. वर्षवार खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे.

वर्ष	२००८-०९	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	एकुण
खर्च	०.००	६३.४७	६९.५०	६७.२२	२००.११

१४. प्रकल्पामुळे फायदे :-

१) सिंचन आयोगाच्या शिफारशीनुसार खारपाणपट्टयात सिंचनाच्या सोयी उपलब्ध होतील..

२) प्रकल्पापासून ८.१७९ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्मिती होवून त्याद्वारे ६९५४ हे.सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

३) प्रकल्पाचे बांधकामामुळे परिसरातील भूजल पातळीत वाढ होईल..

४) प्रकल्पामधे १.२२ द.ल.घ.मी. पिण्याचे पाण्याचे आरक्षण आहे. त्यामुळे प्रकल्पाचे परिसरामध्ये पिण्याचे पाण्याच्या प्रश्न मिटेल.

५) परिसरात रोजगार निर्मिती होईल.

६) मत्स्यव्यवसाय वाढीमुळे शासनास महसुल प्राप्त होईल.

७) लाभक्षेत्रात पिकांचे उत्पन्नात वाढ होऊन लोकांचे राहणीमान उंचावेल.

८) या प्रकल्पामुळे उपलब्ध होणा-या गोड पाण्यामुळे व त्याच्या वापरामुळे कालांतराने खारपाणपट्टयामधील काही भागामधील खारेपणा (Salinity) कमी होण्यास मदत होईल.

१)	**प्रकल्पांचे नांव : वर्धा बॅरेज उपसा सिंचन योजना तालुका : बाभुळगांव, जिल्हा : यवतमाळ**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (**Cropped Area**)	५६६३	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	--	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	--
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२२.१०.२००८	२००८-०९ जलसंपदा व २००७-०८ म.जि.प्रा.		१८९.९९	५६६३
	सुप्रमा-१ (क्षेत्रिय पातळीवर)				सुप्रमा प्रस्ताव करणे क्षेत्रिय स्तरावर चालू आहे.	
	सुप्रमा-२					
४)	**केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)**	सद्यःस्थितीत केंद्र शासनाची अद्यावत किंमतीस मान्यता नाही.				
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१४.०६
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					२.०५
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					१०.९३
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					१.०८
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००९-१०
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					जाने. २०११
७)	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ					
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ. प्र.मा.नुसार किंमत रु. २.२६ कोटी सुधारीत किंमत रु. ३.२२ कोटी					
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ					
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)					
७.६	अनुषंगीक खर्च					
	एकूण वाढ					

८)	प्रकल्पाची सद्यःस्थिती		झालेले काम	टक्केवारी
८.१	भू-संपादन, ,	४००.२८ हे.	२१.०१	५.२५
	पूनर्वसन	-- निरंक --	०	०
	वनजमिन संपादन	१९.७२ हे	१९.७२	१००
८.२	धरण			२०
८.३	कालवा -उजवा (एकूण लांबी ५.१६ कि.मी.)		०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र : ६३५० हे)		०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ६३५० हं)		०	०

७.३) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाच्या किंमतीत व्याप्तीतील बदलामुळे वाढ झाली नाही.

७.४) संकल्प चित्रातील बदलामुळे झालेली वाढ :- शासनाच्या प्रचलीत परिपत्रकानुसार सांडवयाचे विभाजक भिंत, मार्गदर्शक भिंत, व प्रस्तंभाचे पायव्याचे संधानक एम-७५ चे ऐवजी संधानक एम-१५० ची तरतुद केल्याने तसेच प्रवाही पध्दती व ठिबक सिंचन पध्दतीच्या ओलीतासाठी ४.९० कि.मी. लांबीच्या वेगवेगळया रायझींग मेन्सची तरतुद आवश्यक्तेनुसार केल्याने जॅक वेल व रायझींग मेन्सच्या संलग्न घटकातील वाढ, बांधकामात अडचण येऊ नये म्हणून नदीतील पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कॉफर डॅम जलरोधी खंदकासह इत्यादी बाबींमुळे २७.४३ कोटी रु. ची वाढ झाली आहे.

७.५) इतर कारणामुळे वाढ :- सी कामाची निवीदा १२.६६ टक्के अधिक्याने असल्याने १६.७२ कोटी रु. ची वाढ होत आहे. बॅरेजच्या बांधकामात आवश्यकतेनुसार विंधन विवरे, पारगम्यता चाचण्या, ग्राविताची कामे व खोदकामाचा पाया तयार करणे, द्वाराचे व्यवस्थापन इत्यादीची तरतुद केल्याने, या शिवाय इतर उपशिर्ष (ए/के/एम/पी/आर व ओ) मध्ये बांधकामाचे वाढीच्या टक्केवारीमुळे रु.५.७९ कोटी वाढ झाली आहे. अशा प्रकारे इतर कारणामुळे रु.२२.५१ कोटी ची वाढ झाली आहे.

वर्धा बॅरेज (हादगांव) उपसा सिंचन योजना मध्यम प्रकल्प

ता.बाभुळगांव जि. यवतमाळ.

वर्धा बॅरेज (हादगांव) हा प्रकल्प गोदावरी खोऱ्यातील वर्धा उपखोऱ्यामध्ये, वर्धा व बेंबळा नदीच्या संगमाच्या वरील बाजुस बांधकामाधीन आहे. प्रकल्पस्थळ यवतमाळ जिल्हयातील बाभुळगांव तालुक्यातील मौजे हादगांव या उजाड गावाजवळ वर्धा नदीवर आहे.

१) प्रशासकीय मान्यता :-

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर निर्णय क्र. वि.पा.वि.म./कातां-७/४४४/ (३९/२००८) /वर्धा बॅरेज/प्रमा/२००८ दि.२२.१०.२००८ अन्वये सन २००८-०९ चे दरसुचीवर रु.१८९.९९ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२) प्रकल्पाची सुधारित किंमत :-

प्रकल्पाची सद्यःस्थितीत सुधारित किंमत रु.२५६.०७ कोटी असुन योजनेचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा २५६.०७ कोटी रु. चा प्रस्ताव शासनास सादर झाला होता दि.३०.४.२०११ चे पत्रातील निर्देशान्वये योजनेच्या सबंधी सर्व बाबींची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून प्राप्त झाल्यावर अद्यावत दरसुचीनुसार योजनेचा सु.प्र.मा. प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

३) कामाची सद्यःस्थिती :-

प्रकल्पाचे कामास जानेवारी २०११ मध्ये सुरुवात करण्यात आली असुन सद्यःस्थितीत बॅरेजच्या डाव्या बाजुकडील उर्ध्व व अधर बाजुच्या मार्गदर्शक, विभाजक भिंतीचे तसेच बॅरेजच्या मुख्य भिंतीचे व जलक्षोभनाशी कुंडाचे खोदकाम पूर्ण होऊन संधानकाचे काम प्रगती पथावर आहे. सद्यःस्थितीत निविदेत असलेल्या कामानुसार बॅरेजचे २० टक्के काम पूर्ण झाले असुन १५ ज्र १२ मी आकाराच्या द्वाराचे काम लगेच हाती घेण्यात येत आहे.

४) व्याप्तीतील बदलासाठी लोक प्रतिनिधी शिफारस/विनंती :-

प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झालेला नाही व तशी लोकप्रतिनिधीची मागणी नाही.

५) भुसंपादन अडीअडचणी (P.A.P. व कास्तकारांचा विरोध) :-

प्रकल्पांतर्गत पुनर्वसन येत नसुन, सद्यःस्थितीत भूसंपादनास कास्तकारांचा विरोध नाही. प्रकल्पास एकूण ४००.२८ हे. जमीन आवश्यक असून त्यापैकी २१.०१ हे. जमीन संपादीत करण्यात आली आहे. उर्वरीत जमीन भुसंपादन कायद्यानुसार संपादीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

६) धरणात साठा करु शकत नसल्यास त्याची कारणे :-

प्रकल्पाचे काम नुकतेच सुरु झाले आहे. त्यामुळे तूर्त धरणात पाणीसाठा करणे प्रस्तावित नाही.

७) प्रकल्पाचे प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

९.१) महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने त्यांचे पत्र क्र.SEAC/२०१०/CR/370/TC2 दिनांक ३ जानेवारी २०१० अन्वये Environmental Clearance दिलेले आहे.

९.२) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात १९.७२ हे. वनजमीन येत असुन सदर सदर वनजमीनीच्या प्रस्तावास केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय भोपाळ यांचे पत्र क्र.६ग्त्तक्र ०२६/२०१०-एत्त्र/१९१९ दि.१२.१०.२०१० अन्वये तत्वतः मान्यता दिली आहे. प्रस्तावास अंतिम मान्यता मिळविण्याचे दृष्टिने पुढील कार्यवाही प्रगती पथावर आहे.

९.३) प्रस्तावास केंद्रीय जलआयोगाची मान्यता मिळविण्याचे दृष्टिने प्रस्ताव केंद्रीय जलआयोग नागपूर यांना २.९.२०११ मध्ये सादर करण्यात आला आहे. केंद्रीय जलआयोग नागपूर यांनी उपस्थित केलेल्य मुद्यांचे अनुपालत करुन तसेच म.सं.सं. नाशिक यांचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगती पथावर असुन, सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तसेच मुद्यांचे अनुपालन करुन प्रस्ताव फेरसादर करण्यात येईल.

८) प्रकल्पाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणमीमांसा :-

अ) दरसुचीमुळे वाढ :- प्रकल्पाची प्र.मा. २००८-०९ च्या दरसुचीवर असुन, प्र.मा. प्राप्त अहवालात सी कामाच्या रायझींग मेन्स चे उपअंदाजपत्रक महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे सन २००७-०८ चे दरसुचीवर आधारीत होते, सी कामाचे तांत्रिक मंजूरी अंदाजपत्रकाचे वेळी मुळ प्र.मा. प्रस्तावातील दरात दरसुचीच्या अनुषंगाने करण्यात आलेले बदल, तसेच रायझींग मेन्स या उपअंदाजपत्रकासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे सन २००८-०९ ची दरसुची वापरल्यामुळे दरसुचीमुळे एकूण रु. ९.३७ कोटी ची वाढ झालेली आहे.

ब) भूसंपादनातील व पुनर्वसनातील वाढ :- भूंसपादनाअंतर्गत प्र.मा. प्राप्त अंदजपत्रकानुसार सन २००८ चे शिघ्रगणकाप्रमाणे खरेदी विक्रींचे दर घेण्यात आले असुन, सद्यःस्थितीत प्रचलीत शिघ्रगणका प्रमाणे भूसंपादनाचे दर घेतल्याने ०.९६ कोटी रु. ची वाढ संभवते.

क) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाच्या किंमतीत व्याप्तीतील बदलामुळे वाढ झाली नाही.

ड) संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ :- मूळ प्रशासकिय मान्यतेमध्ये संकल्पात बदल होतो. तथापी क्क्र कडून सविस्तर संकल्पने प्राप्त करुन घेऊन शासनाच्या प्रचलीत परिपत्रकानुसार सांडवयाचे विभाजक भिंत, मार्गदर्शक भिंत, व प्रस्तंभाचे पायव्याचे संधानक एम-७५ चे ऐवजी संधानक एम-१५० ची तरतुद केल्याने तसेच प्रवाही पध्दती व ठिबक सिंचन पध्दतीच्या ओलीतासाठी ४.९० कि.मी. लांबीच्या वेगवेगळया रायझींग मेन्सची तरतुद आवश्यक्तेनुसार केल्याने जॅक वेल व रायझींग मेन्सच्या संलग्न घटकातील वाढ, बांधकामात अडचण येऊ नये म्हणून नदीतील पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कॉफर डॅम जलरोधी खंदकासह इत्यादी बाबींमुळे २७.४३ कोटी रु. ची वाढ झाली आहे.

इ) इतर कारणामुळे वाढ :- सी कामाची निवीदा १२.६६ टक्के अधिक्याने असल्याने १६.७२ कोटी रु. ची वाढ होत आहे. बॅरेजच्या बांधकामात आवश्यकतेनुसार विंधन विवरे, पारगम्यता चाचण्या, ग्राविताची कामे व खोदकामाचा पाया तयार करणे, द्वाराचे व्यवस्थापन इत्यादीची तरतुद केल्याने, या शिवाय इतर उपशिर्ष (ए/के/एम/पी/आर व ओ) मध्ये बांधकामाचे वाढीच्या टक्केवारीमुळे रु.५.७९ कोटी वाढ झाली आहे. अशा प्रकारे इतर कारणामुळे रु.२२.५१ कोटी ची वाढ झाली आहे.

प) अनुषंगीक खर्चातील वाढ :- यामुळे ५.८१ कोटी ची वाढ झाली आहे. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकीय किंमत रु.१८९.९९ कोटी मध्ये रु.६६.०८ कोटी वाढ होऊन प्रकल्पाची सुधारीत किंमत रु.२५६.०७ कोटी झाली आहे.

९) विलंबाची कारणे/ अडीअडचणी :-

१) प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात येणाया वनजमीन प्रस्तावास तत्वतः मान्यता ऑक्टो. २०१० ला प्राप्त झाल्याने प्रकल्प सुरु करण्यास विलंब झाला.

२) सन २०१०-११, २०११-१२ मध्ये नियोजनानुसार निधी उपलब्ध न झाल्याने कामाची प्रगती साध्य करता आली नाही.

१०) खर्चाचा तपशिल :-

प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु. १४.०६ कोटी खर्च झाला आहे. वर्षवार खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

प्रथम अनुदान प्राप्त झालेले वर्ष २००९-१०

वर्षवार झालेला खर्च				
१९९५-९६ ते १९९९-२००० -निरंक-				
२०००-०१ ते २०११-२०१२				
वर्ष	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	एकूण खर्च रु.कोटी (ई.टी.पी.सह)
खर्च कोटी रु.	०.००	८.२१	५.८५	१४.०६

प्रकल्पाचे उर्वरीत कामाची किंमत रु.२४२.०१ कोटी इतकी आहे.

११) प्रकल्पामुळे फायदे :-

११.१) मत्स्य व्यवसायः- प्रकल्पाची घळभरणी पुर्ण होऊन जलसाठा निर्माण झाल्यानंतर त्यामध्ये मत्स्य व्यवसाय सुरुवात होऊन त्या व्दारे ०.५७ कोटी रु. महसुल प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

११.२) बिगर सिंचन पेय जल पाणी पुरवठा :- प्रकल्प अहवालात पेय जलासाठी १.९७ द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षीत असल्यामुळे आजुबाजुच्या गावांना पाणी पुरवठा योजना निर्मीत करुन त्या व्दारे पाण्याचे दुरभिक्ष दुर करता येईल.

११.३) भुजल पातळी मध्ये होणारी वाढ :- प्रकल्पाची घळभरणी पुर्ण होऊन जलसाठा निर्माण झाल्यावर नजिकच्या क्षेत्रातील भुजल पातळी वाढ होऊन विहिरी व बोरवेल मधील पाणीसाठयात वाढ होईल. पर्यायाने पिण्याच्या पाण्यासाठी तसेच सिंचनासाठी अतिरीक्त पाणी उपलब्ध होईल. प्रकल्पामध्ये जलसाठा झाल्यानंतर तसेच पेयजलासाठी पाणीसाठा आरक्षीत असल्याने टँकर व्दारे पाणी पुरवठा होत असलेल्या गावांना पाणी पुरवठा उपलब्ध होऊन टँकरवर होणाऱ्या खर्चात कपात अपेक्षीत आहे.

११.४) प्रकल्पामुळे प्रत्यक्ष सिंचना व्दारे होणारे क्षेत्र व त्यामुळे उत्पन्नात होणारी वाढ :- प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सद्यःस्थितीत सिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्याने प्रकल्प पुर्ण झाल्यावर ५६६३ हे. क्षेत्रास सिंचनाचा फायदा

होऊन त्या व्दारे ३९.७९ कोटी रु. उत्पन्नात वाढ होईल असे अपेक्षीत आहे. तसेच गाळपेर जमीनीव्दारे पिके घेऊन ०.६३ कोटी रु. उत्पन्न अपेक्षीत आहे.

११.५) प्रकल्पामुळे जमीनीच्या किंमतीत होणारी वाढ :- प्रकल्प पुर्ण झाल्यावर जमीन सिंचना खाली येईल व पर्यायाने जमीनीच्या किंमतीत वाढ होईल.

११.६) लाभधारकाच्या राहणीमानात व आर्थिक परिस्थीतीबाबत :- सद्यःस्थितीत प्रकल्पातील लाभधारक हा पुर्ण पणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. प्रकल्प पुर्ण झाल्यावर सिंचना खाली जमीन आल्याने लाभधारकांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध होईल. व उत्पन्नात वाढ होईल. तसेच लाभक्षेत्रातील इतरांना रोजगार मिळेल. त्यामुळे लाभधारकांच्या राहणीमानात व आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

१)	**प्रकल्पांचे नांव : टाकळी डोल्हारी मध्यम प्रकल्प, तालुका : दारव्हा, जिल्हा : यवतमाळ**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	४३३०	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२	--	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	--
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२४.१०.२००८	२००८-०९		१२२.१५	४३३०
	सुप्रमा-१ सुधारीत किंमत (क्षेत्रिय पातळीवर)		सुप्रमा प्रस्ताव करणे सुरु आहे.			
४)	केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				सद्यःस्थितीत केंद्र शासनाची अद्यावत किंमतीस मान्यता नाही.	
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१२.२६
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					६.५०
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					५.२४
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					०.५२
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००९-१०
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					नोंव्हेबर २०११
७)	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ					
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ प्र.मा.नुसार किंमत रु. २०.४० कोटी सुधारीत किंमत रु. ३८.२४ कोटी					
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ					
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)					
७.६	अनुषंगिक खर्चासाठी तरतुद					
	एकूण वाढ					
८)	प्रकल्पाची सद्यःस्थिती				झालेले काम	टक्केवारी
८.१	भू-संपादन,	१७४.४० हे			५५.००	३१.५४
	पूनर्वसन	३ गावे			०	०
	वनजमिन संपादन	-- निरंक --			०	०
८.२	धरण					५
८.३	कालवा (एकूण लांबी ३१.१० कि.मी.)				०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र : ४०२२ हे)				०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : ४०२२ हे)				०	०

७.३) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाच्या किंमतीत व्याप्तीतल बदलामुळे वाढ झाली नाही.

७.४) संकल्प चित्रातील बदलामुळे झालेली वाढ :- प्र.मा. अहवालात जलरोधी खंदक हा Partial COT प्रस्तावित होता, परंतु तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाचे वेळी जलरोधी खंदक हा Positive COT प्रस्तावित केल्याने रु. ५.७५ कोटीची वाढ झालेली आहे. जलोत्सारणीचे काम करण्यासाठी नदीपात्र वळविण्याची तरतुद केल्याने, जलरोधी खंदकातुन निघालेले साहित्य वापरण्यास अयोग्य आढळल्याने सदर सामुग्री फेकरण्यासाठी कलेली तरतुद तसेच आवश्यक जल निष्काशनाची तरतुद, इत्यादी बाबींमुळे रु. ५.०० कोटी ची वाढ झाली आहे. काम करतेवेळी नदी पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कॉफर डॅमची तरतुद, तसेच जलोत्सारणी वरील वाहणारा विसर्ग आजुबाजुच्या शेतात पसरु नये म्हणून नदीच्या दोन्ही तिराला संरक्षक बांध प्रस्तावित केल्याने रु. ५.३९ कोटी ची वाढ होत आहे. अशा प्रकारे एकूण संकल्प चित्रातील बदलामुळे रु. १६.१४ कोटी ची वाढ होत आहे.

७.५) इतर कारणामुळे वाढ :- सी कामाची निवीदा २१.८३ टक्के अधिक्याने असल्याने रु. २२.९१ कोटी ची वाढ होत आहे. या शिवाय इतर उपशिर्ष (ए/के/एम/पी/आर व ओ) मध्ये बांधकामाचे वाढीच्या टक्केवारीमुळे रु. ८.५८ कोटी वाढ झाली आहे. अशा प्रकारे इतर कारणामुळे रु. ३१.४९ कोटी ची वाढ झाली आहे.

टाकळी डोल्हारी मध्यम प्रकल्प

ता. दारव्हा जि. यवतमाळ

टाकळी डोल्हारी मध्यम प्रकल्प ता. दारव्हा जि. यवतमाळ हा प्रकल्प अडाण नदीवर मौजा डोल्हारी व मौजा उदापूर या गावाजवळ बांधकामाधीन आहे.

१) प्रशासकिय मान्यता :- विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांचे पत्र क्रमांक/कातां-७/ ४५०/टाकळी डोल्हारी/प्रमा/(३७/२००८)/दि. २४.१०.२००८ नुसार दरसुची २००८-०९ च्या आधारावर रु. १२२.१५ कोटी लक्ष किंमतीस प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२) प्रकल्पाची सुधारीत किंमत :- प्रकल्पाच्या सी कामाची तांत्रिक मंजूरी किंमत तसेच निविदा अधिक्य व जमीनीच्या दरातील वाढ इत्यादी बाबींमुळे योजनेची सुधारीत किंमत रु.२३३.८७ कोटी येत आहे. सुप्रमा प्रस्ताव करणे क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

३) कामाची सद्यःस्थिती :- प्रकल्पाचे कामास नोव्हेंबर २०११ पासुन सुरुवात करण्यात आली असुन जलोस्तारणीचे पायाचे खोदकाम प्रगती पथावर आहे.

४) व्याप्तीतील बदलासाठी लोक प्रतिनिधी शिफारस/विनंती :-

प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्पाचे किंमतीत वाढ झालेली नाही.

५) भुसंपादन अडीअडचणी (P.A.P. व कास्तकारांचा विरोध) :-

प्रकल्पास आवश्यक १७४.४० हे. जमीन आवश्यक असून त्यापैकी ५५.०० हे. जमीन संपादीत करण्यात आली आहे. कास्तकारांची जमीनीसाठी वाढीव किंमतीची मागणी असल्याने भुसंपादन कायद्यांतर्गत जिल्हाधिकारी ह्यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत उदापूर, फुबगांव व घनापूर या तीन बाधित गावांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. सद्यःस्थितीत पुनर्वसनास विरोध नाही.

६) धरणात साठा करु शकत नसल्यास त्याची कारणे :-

प्रकल्पाचे बांधकाम नुकतेच सुरु झाले असल्याने तुर्त धरणात पाणीसाठा करण्याचे प्रस्तावित नाही.

७) प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-

७.१) प्रकल्पाला केंद्रिय जल आयोगाची मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे.

७.२) प्रस्तावास केंद्रिय जलआयोगाची मान्यता मिळविण्याचे दृष्टिने प्रस्ताव केंद्रीय जलआयोग नागपूर यांना २.९.२०११ मध्ये सादर करण्यात आला आहे. केंद्रीय जलआयोग नागपूर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करुन तसेच म.सं.स. नाशिक यांचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असुन सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तसेच मुद्यांचे अनुपालन करुन प्रस्ताव फेर सादर करण्यात येईल.

७.३) महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडन Environment clearance आवश्यक आहे. त्याबाबतची जनसुनावणी मार्च २०११ मध्ये झाली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

८) प्रकल्पाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणमीमांसा :-

अ) दरसुचीमुळे वाढ :- प्रकल्पाची प्र.मा. २००८-०९ च्या दरसुचीवर असुन, सी कामाचे तांत्रिक मंजूरी अंदाजपत्रकाचे वेळी मुळ प्र.मा. प्रस्तावातील दरात दरसुचीच्या अनुषंगाने करण्यात आलेले बदलामुळे एकूण रु. ३५.९४ कोटी ची वाढ झालेली आहे.

ब) भूसंपादनातील व पुनर्वसनातील वाढ :- भूंसपादनाअंतर्गत प्र.मा. प्राप्त अंदजपत्रकानुसार सन २००८ चे शिघ्रगणकाप्रमाणे खरेदी विक्रींचे दर घेण्यात आले असुन, सद्यःस्थितीत जवळच्याच बाणगांव प्रकल्पाच्या भुसंपादन प्रकरणात सरळ खरेदीसाठी नगर रचना कार्यालयाने निश्चित करुन दिलेले दर घेतल्याने भूसंपादनात रु. १७.८४ कोटी रु. ची वाढ संभवते.

क) व्याप्तीतील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाच्या किंमतीत व्याप्तीतल बदलामुळे वाढ झाली नाही.

ड) संकल्प चित्रातील बदलामुळे झालेली वाढ :- प्र.मा. अहवालात जलरोधी खंदक हा Partial COT प्रस्तावित होता, परंतु तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाचे वेळी जलरोधी खंदक हा Positive COT प्रस्तावित केल्याने रु. ५.७५ कोटीची वाढ झालेली आहे. जलोत्सारणीचे काम करण्यासाठी नदीपात्र वळविण्याची तरतुद केल्याने, जलरोधी खंदकातुन निघालेले साहित्य वापरण्यास अयोग्य आढळल्याने सदर सामुग्री फेकरण्यासाठी कलेली तरतुद तसेच आवश्यक जल निष्काशनाची तरतुद, इत्यादी बाबींमुळे रु. ५.०० कोटी ची वाढ झाली आहे. काम करतेवेळी नदी पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कॉफर डॅमची तरतुद, तसेच जलोत्सारणी वरील वाहणारा विसर्ग आजुबाजुच्या शेतात पसरु नये म्हणून नदीच्या दोन्ही तिराला संरक्षक बांध प्रस्तावित केल्याने रु. ५.३९ कोटी ची वाढ होत आहे. अशा प्रकारे एकूण संकल्प चित्रातील बदलामुळे रु. १६.१४ कोटी ची वाढ होत आहे.

इ) इतर कारणामुळे वाढ :- सी कामाची निवीदा २१.८३ टक्के अधिक्याने असल्याने रु. २२.९१ कोटी ची वाढ होत आहे. या शिवाय इतर उपशिर्ष (ए/के/एम/पी/आर व ओ) मध्ये बांधकामाचे वाढीच्या टक्केवारीमुळे रु. ८.५८ कोटी वाढ झाली आहे. अशा प्रकारे इतर कारणामुळे रु. ३१.४९ कोटी ची वाढ झाली आहे.

प) अनुषंगीक खर्चातील वाढ :- यामुळे रु. १०.३१ कोटी ची वाढ झाली आहे.

प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकीय किंमत रु. १२२.१५ कोटी मध्ये रु. १११.७२ कोटी वाढ होऊन प्रकल्पाची सुधारीत किंमत रु. २३३.८७ कोटी झाली आहे.

९) विलंबाची कारणे/ अडीअडचणी :-

या प्रकल्पाला दिनांक २४.१०.२००८ प्र.मा. प्राप्त झाली व त्यानंतर मुख्य कामाची निविदा अंतिम करुन निविदेला दि. १५.७.२००९ ला कार्यारंभ आदेश देण्यात आला. प्रकल्पासाठी म.स.स. ची नाशीक यांचेकडुन सन २०११ मध्ये सर्वसाधारण आराखडा प्राप्त झाला. त्यास मान्यता घेऊन प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात नोव्हेंबर २०११ मध्ये सुरुवात करण्यात आली.

९) **खर्चाचा तपशिल :-** या प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु. १२.२६ कोटी खर्च झालेला आहे. वर्षवार खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

प्रथम अनुदान प्राप्त झालेले वर्ष २००९-१०

वर्षवार झालेला खर्च				
१९९५-९६ ते १९९९-२००० -निरंक-				
२०००-०१ ते २०११-२०१२				
वर्ष	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	एकूण एकूण खर्च रु.कोटी (ई.टी.पी.सह)
खर्च कोटी रु.	०.००	०.१८	१२.०८	१२.२६

प्रकल्पाचे उर्वरित कामाची किंमत रु.१०९. ८९ कोटी आहे.

११) प्रकल्पामुळे फायदे :-

११.१) मत्स्य व्यवसाय:- प्रकल्पाची घळभरणी पुर्ण होऊन जलसाठा निर्माण झाल्यानंतर त्यामध्ये मत्स्य व्यवसाय सुरुवात होऊन त्या व्दारे २.८९ कोटी रु. महसुल प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

११.२) बिगर सिंचन पेय जल पाणी पुरवठा :- प्रकल्प अहवालात पेय जलासाठी व औद्योगीक विकासासाठी ६.११ द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षीत असल्यामुळे आजुबाजुच्या गावांसाठी पाणी पुरवठा योजना निर्मीत करुन त्या व्दारे पाण्याचे दुर्रभिक्ष दुर करता येईल. तसेच आजुबाजुच्या क्षेत्रात औद्योगीक विकासाला चालना मिळेल.

११.३) भुजल पातळी मध्ये होणारी वाढ :- प्रकल्पाची घळभरणी पुर्ण होऊन जलसाठा निर्माण झाल्यावर नजिकच्या क्षेत्रातील भुजल पातळी वाढ होऊन विहिरी व बोरवेल मधील पाणीसाठयात वाढ होईल. पर्यायाने पिण्याच्या पाण्यासाठी तसेच सिंचनासाठी अतिरीक्त पाणी उपलब्ध होईल. प्रकल्पामध्ये जलसाठा झाल्यानंतर तसेच पेयजलासाठी पाणीसाठा आरक्षीत असल्याने टँकर व्दारे पाणी पुरवठा होत असलेल्या गावांना पाणी पुरवठा उपलब्ध होऊन टँकरवर होणाऱ्या खर्चात कपात अपेक्षीत आहे.

११.४) प्रकल्पामुळे प्रत्यक्ष सिंचना व्दारे होणारे क्षेत्र व त्यामुळे उत्पन्नात होणारी वाढ :- प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सद्य:स्थितीत सिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्याने प्रकल्प पुर्ण झाल्यावर ४३३० हे. क्षेत्रास सिंचनाचा फायदा होऊन त्या व्दारे १३.४६ कोटी रु. उत्पन्नात वाढ होईल असे अपेक्षीत आहे. तसेच गाळपेर जमीनीव्दारे पिके घेऊन ०.९७ कोटी रु. उत्पन्न अपेक्षीत आहे.

११.५) प्रकल्पामुळे जमीनीच्या किंमतीत होणारी वाढ :- प्रकल्प पुर्ण झाल्यावर जमीन सिंचना खाली येईल व पर्यायाने जमीनीच्या किंमतीत वाढ होईल.

११.६) लाभधारकाच्या राहणीमानात व आर्थिक परिस्थीतीबाबत :- सद्य:स्थितीत प्रकल्पातील लाभधारक हा पुर्ण पणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. प्रकल्प पुर्ण झाल्यावर सिंचना खाली जमीन आल्याने लाभधारकांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध होईल. व उत्पन्नात वाढ होईल. तसेच लाभक्षेत्रातील इतरांना रोजगार मिळेल. त्यामुळे लाभधारकांच्या राहणीमानात व आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

१)	**प्रकल्पांचे नांव : पेढी बॅरेज उसिंयो तालुका : अमरावती, जिल्हा : अमरावती**					
२)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) (Cropped Area)	२२३२	निर्मित सिचन क्षमता (हे.) : जून २०१२	--	प्रत्यक्ष झालेले सिंचन (हे.)	--
३)	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन		किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३०.०४.२००८	२००७-०८		६२.७६	२२३२
	सुप्रमा-१ सुधारीत किंमत		सुप्रमा प्रस्ताव करणे सुरु आहे.			
४)	केन्द्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)		सदर योजनेचा के.ज.आ. चे मान्यतेसाठी प्रस्ताव दि.१०.१२.२००९ अन्वये के.ज.आ. नागपूर यांना सादर झाला आहे.			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) :-					१३.२६
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) :-					७.१०
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)					५.३०
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)					०.६६
५)	**प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष**					२००९-१०
६)	**प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष**					२०१०
७)	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				रक्कम (कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ					
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ प्र.मा.नुसार किंमत रु. २०.४० कोटी सुधारीत किंमत रु. ३८.२४ कोटी					
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)				०	०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ					
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)					
७.६	अनुषंगिक खर्चासाठी तरतुद					
	एकूण वाढ					
८)	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**				**झालेले काम**	**टक्केवारी**
८.१	भू-संपादन,	४७८.१९ हे			१४२.४७	२९.७९
	पूनर्वसन	३ गावे			०	०
	वनजमिन संपादन	-- निरंक --			०	०
८.२	धरण					५०
	बॅरेज				०	०
८.३	कालवा (एकूण लांबी १०.८४ कि.मी.)				०	०
८.४	वितरण व्यवस्था (एकूण क्षेत्र : २६२६ हे)				०	०
८.५	पाटचाऱ्यांची कामे : (एकूण क्षेत्र : २६२६ हे)				०	०

७.३) व्याप्तीतील बदल :- सदर प्रकल्पात व्याप्तीतील बदल नाही.

७.४) संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाचे प्र.मा. मध्ये Standard Type संकल्पनाची तरतुद करण्यात आली होती. नंतर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून संकल्पन प्राप्त करून घेऊन तांत्रिक मान्यता देण्यात आली. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर प्रकल्पस्थळी अन्वेषण अंती अती खोली पर्यंत मऊ स्तर असल्याचे आढळल्यामुळे महासंचालक मेरी नाशिक यांना दि.८.१.२०१० रोजी बैठकीमध्ये अशा सर्वच बॅरेजेसचे संकल्पन म.सं.स. नाशिक यांचे ऐवजी सदर संकल्पन के.ज.आ. अथवा वॅपकॉस संस्थेकडून करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार वॅपकॉस नवी दिल्ली यांचेकडे संकल्पनाचे काम देण्यात आले. भुस्तराच्या तांत्रिक चाचण्या घेऊन वॅपकॉसकडून सुधारित संकल्पन तयार करण्यात येत असून सद्यःस्थितीत प्राप्त झालेल्या संकल्पनानुसार रू.४३.७६ कोटी ची वाढ संभवते.

७.५) इतर कारणामुळे वाढ :- वाढीव दराच्या निविदा स्विकृतीमुळे व डी कामाची किंमत वाढल्याने त्यावर टक्केवारीत प्रस्तावित उपशिर्षामध्ये वाढ झाल्याने रु. ३.०६ कोटीची वाढ झालेली आहे.

पेढी बॅरेज प्रकल्प
ता. अमरावती जि. अमरावती

पेढी बॅरेज उपसा सिंचन योजना तापी खोऱ्यातील मुचय उपनदी असलेल्या पुर्णा उपखोऱ्यातील पेढील नदीवर मौजे टेंभा ता.जि. अमरावती या गावाजवळ प्रस्तावित आहे.

१) **प्रसासकीय मान्यता** :- विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.कांता.६/२०११/(४४/२००८)/पेढी बॅरेज उसिंयो/प्रमा-२००८, दिनांक ३०.४.२००८ नुसार दरसूची २००७-०८ चे आधारावर एकूण रु.६२.७६ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

२) **प्रकल्पाची सुधारित किंमत** :- प्रकल्पाची दरसूची २०११-१२ चे आधारावर सुधारित किंमत रु.१६९.६९ कोटी येत आहे. सुप्रमा प्रस्ताव क्षेत्रिय पातळीवर करणे सुरु आहे.

३) **कामाची सद्यःस्थिती** :- प्रकल्पाचे काम जून २०१० मध्ये सुरु करण्यात आले. दोन्ही तिरावरील मातीधरणाचे काम जून २०१२ पर्यंत ५० टक्के पुर्ण करण्यांत आले. बॅरेजचे सुधारित संकल्पन वॉप्कॉस, नवी दिल्ली यांचेकडून अद्याप अप्राप्त असल्यामुळे बॅरेजचे खोदकाम, बांधकाम सुरु होऊ शकले नाही.

४) **व्याप्तीतील बदल** :- प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल झालेला नाही.

५) **लोकप्रतिनिधी / स्थानिक संघटना मागणी** :- दिनांक ९.८.२०११ रोजी मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये मा.आ. श्री. बळीरामजी सिरस्कार व मा.आ. श्री. हरिष पिंपळे यांनी पारंपारिक कालव्या ऐवजी बंद पाईपलाईनव्दारे सिंचन करण्यांची मागणी केल्यानुसार प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्राप्त झालेत. यासाठी बंद पाईपलाईनव्दारे कालव्याच्या संकल्पनाचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी प्रादेशिक कार्यालयास सादर करण्यांत आला आहे.

६. **भूसंपादन अडीअडचणी :-**

अ) उजव्या बाजुकडील धरण रेषेवरील ४.०१ हे. सरकारी जमिनीचा प्रस्ताव शासनाने दिनांक २२.११.२०११ मध्ये मंजुर केला. त्यामुळे तोपर्यंत ह्या जागेवार धरणाचे बांधकाम होऊ शकले नाही.

ब) डाव्या बाजूची धरण रेषेवरील एकसंघ जमिन पुर्णपणे ताब्यात नसल्यामुळे व सरळ खरेदी करीता शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे सदर जमिन भूसंपादन प्रस्ताव सादर करुन व अंतिम निवाडा प्राप्त करुन जून २०१२ मध्ये सदर जमिनीचा ताबा मिळाल्यामुळे, तोपर्यंत त्या जागेवर धरणाचे काम होऊ शकले नाही.

पुनर्वसन :- ह्या प्रकल्पामध्ये ३ गावाचे पुनर्वसन आहे. त्यामुळे पुनर्वसनाकरीता प्रकल्पग्रस्तांचा स्थळ निश्चिती करीता विरोध होत असल्याने विलंब होत आहे. तसेच सद्यःस्थितीमध्ये ३ गांवापैकी २ गावाकरीता निश्चित केलेल्या जागवेर भूधारक जमिनी देण्यास विरोध करीत असल्यामुळे व जमिनीचे वाढलेले दर ह्यामुळे पुनर्वसनास पर्यायाने प्रकल्पास विलंब होत आहे.

७) **प्रकल्पाच्या प्रगतीतील महत्वाचे टप्पे :-**

अ) महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने दिनांक १४.३.२०११ च्या एस.ई.ए.सी. च्या ४१ व्या बैठकीमध्ये Environmental Clearance दिलेले आहे.

ब) प्रकल्पाला केन्द्रीय जल आयोगाची मान्यतेसाठी प्रस्ताव दिनांक १०.१२.२००९ अन्वये केन्द्रीय जल आयोग नागपूर यांना सादर झाला आहे.

८) **प्रकल्प किंमतीस झालेल्या वाढीचे कारण मिमांसा** :- तयार करण्यांत आलेल्य सु.प्र.मा. नुसार प्रकल्पाचे किंमतीत रु.१०६.९३ कोटीची वाढ संभवते. त्याची कारणमीमांसा खाली नमूद करण्यांत येत आहे.

अ) दरसूचीतील वाढ :- प्रशासकीय मान्यता सन २००८-०९ चे दरसूचीचे असून सुप्रमा सन २०११-२०१२ चे दरसूचीने असल्यामुळे रु. २६.२१ कोटी वाढ झाली आहे.

ब) भूसंपादनातील वाढ :- प्र.मा. प्राप्त अंदाजपत्रकात सन २००८ चे शिघ्रगणकाप्रमाणे दर विचारात घेऊन तरतूद करण्यांत आली होती. सद्यःस्थितीत जमिनीची १४२.४७ हे. सरळ खरेदीव्दारे करण्यांत आली असून ३०६ हेक्टर (कालवे, वितरिका, पुनर्वसन धरुन) जमिन खरेदी करणे बाकी आहे. सद्यःस्थितीत खरेदी करण्यांत आलेल्या जमिनीचे दर विचारात घेऊन रु. २६.७६ कोटीची वाढ संभवते.

क) संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :- प्रकल्पाच्या प्र.मा. मध्ये Standard Type संकल्पनाची तरतूद करण्यांत आली होती. नंतर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून संकल्पन प्राप्त करुन घेऊन तांत्रिक मान्यता देण्यात आली. प्रत्यक्ष काम सुरु झालेनंतर प्रकल्पस्थळी अन्वेषण अंती अतिखोली पर्यंत मऊस्तर असल्याचे आढळल्यामुळे महासंचालक, मेरी, नाशिक यांना दिनांक ८.१.२०१० रोजी बैठकीमध्ये अशा सर्वच बॅरेजेसचे संकल्पन म.सं.स.नाशिक यांच्या ऐवजी सदर संकल्पन केन्द्रीय जल आयोग अथवा वॉप्कॉस संस्थे्कडून करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार वॅप्कॉस, नवी दिल्ली यांचेकडे संकल्पनाचे काम देण्यात आले. भूस्तराच्या तांत्रिक चाचण्या घेऊन वॉप्कॉसकडून सुधारित संकल्पन तयार करण्यांत येत असून सद्यःस्थितीत प्राप्त झालेल्या संकलपनानुसार रु. ४३.७६ कोटीची वाढ संभवते.

ड) इतर कारणामुळे वाढ :- निविदा अधिक दराने स्विकृती व सी व डी कामाची किंमत वाढल्याने त्यावर टक्केवारीत प्रस्तावित उपशिर्षांमध्ये वाढ झाल्याने रु.३.०६ कोटीची वाढ झाली आहे.

इ) अनुषंगीक खर्चातील वाढ :- प्रकल्पाची किंमत वाढल्यामुळे त्या अनुषंगाने रु. ७.१४ कौटीची वाढ झाली आहे.

प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकीय किंमत रु.६२.७६ कोटीमध्ये रु. १०६.९३ कोटी वाढ होऊन प्रकल्पाची अद्यावत किंमत रु. १६९.६९ कोटी झाली आहे.

९) विलंबाची कारणे / अडीअडचणी :- खोदकामादरम्यान भुस्तरमध्ये तफावत आढळल्यामुळे प्रकल्पस्थळी पुन्हा तांत्रिक चाचण्या घेऊन संकल्पन सुधारित करण्याकरीता वॉप्कॉसकडे सादर करण्यांचे आले आहे. सदर संकल्पन अद्याप अप्राप्त आहे. त्यामुळे बॅरेजचे बांधकाम सुरु होऊ शकले नाही.

१०) खर्चाचा तपशिल :- या प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु.१३.२६ कोटी खर्च झालेला आहे. खर्चाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	खर्च (ई.टी.पी.सह) रुपये कोटी
१	२००९-१०	५.९८
२	२०१०-११	४.०६
३	२०११-१२	२.५६
	एकूण :-	१२.६०
	ई.टी.पी.	०.६६
	एकूण :-	१३.२६

सद्यःस्थितीत प्रकल्पाची उर्वरित किंमत रु. १५६.४३ कोटी येते.

११) प्रकल्पापासून मिळणारे संभाव्य फायदे :- प्रकल्पापासून अमरावती तालुक्यातील २२३२ हेक्टर जमिन सिंचनाखाली येणार असून, त्याचा लाभ १८७१ शेतकऱ्यांना मिळणार आहे. तसेच पिण्याचे पाण्याकरीता ०.६९ दलघमी साठा आरक्षीत असून त्याचा लाभ परिसरातील गावांना होणार आहे व होणाऱ्या साठ्यातून मत्स्यव्यवसायास चालना मिळणार आहे.

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत तपशील
प्रकल्पनिहाय (टिप्पणीसह)
अ नु क्र म णि का

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
अ)	**मोठे प्रकल्प**		
१	वाघूर, ता.जि.जळगाव	१	४
२	निम्न तापी, ता.अमळनेर, जि.जळगाव	५	६
३	पुनंद, ता.कळवण, जि.नाशिक	७	९
	मध्यम पकल्प		
१	अंजनी, ता.एरंडोल, जि.जळगाव	११	१३
२	बहुळा, ता.पाचोरा, जि.जळगाव	१५	१७
३	गुळ, ता.चोपडा, जि.जळगाव	१९	२१
४	मंगरुळ, ता.रावेर, जि.जळगाव	२३	२४
५	मोर, ता.यावल, जि.जळगाव	२५	२६
६	शेळगाव बॅरेज, ता.जि.जळगाव	२७	२९
७	कमानीतांडा, ता.जामनेर, जि.जळगाव	३१	३२
८	अमरावती, ता.शिंदखेडा, जि.धुळे	३३	३४
९	निम्न पांझरा (अक्कलपाडा), ता.साकी, जि.धुळे	३५	३७
१०	वाडी शेवाडी, ता.शिंदखेडा, जि.धुळे	३९	४०
११	सुलवाडे बॅरेज, ता.शिंदखेडा, जि.धुळे	४१	४२
१२	जामखेडी, ता.साकी, जि.धुळे	४३	४४
१३	सारंगखेडा बॅरेज, ता.शहादा, जि.नंदुरबार	४५	४६
१४	प्रकाशा बॅरेज, ता.शहादा, जि.नंदुरबार	४७	४८
१५	शिवण, ता.जि.नंदुरबार	४९	५०
१६	नागन, ता.नवापूर, जि.नंदुरबार	५१	५२
१७	कोरडी, ता.नवापूर, जि.नंदुरबार	५३	५४
१८	देहली, ता.अक्कलकुवा, ता.नंदुरबार	५५	५६
१९	दरा, ता.शहादा, जि.नंदुरबार	५७	५८
२०	माणिकपुंज, ता.नांदगाव, जि.नाशिक	५९	६०
	उपसा सिंचन योजना		
१	वरणगाव तळवेल, ता.भुसावळ, जि.जळगाव	६१	६४
२	कुऱ्हा-वढोदा, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव	६५	६७
३	बोदवड परिसर, ता.बोदवड, जि.जळगाव	६९	७१
४	पद्मालंय-२, ता.एरंडोल, जि.जळगाव	७३	७४
५	सुलवाडे जामफळ कनोली, ता.शिंदखेडा, जि.धुळे	७५	७६
६	प्रकाशा बुराई, ता.जि.नंदुरबार	७७	७८

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.०	**प्रकल्पाचे नाव : वाघूर प्रकल्प**	**तालुका : जळगांव**		**जिल्हा : जळगांव**	
२.०	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) :	३८५७०		निर्मित सिंचन क्षमता जुन-२०१२ अखेर -१५९९२	
३.०	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प्र.मा.शासन	१/६/१९७६	१९७१-७२	१२.२८	१८५६७
	सुप्रमा-१ शासन	१/३१/१९८१	१९७७-७८	२१.२८	२६३२५
	सुप्रमा- २ शासन	९/२०/१९९३	१९९०-९१	८०.२१	२६३२५
	सुप्रमा-३ महामंडळ	४/६/१९९९	१९९७-९८	१८९.३१	२६३२५
	सुप्रमा-४ महामंडळ	३/१४/२००६	२००४-०५	३७४.०९	२६३२५
	सुप्रमा-५ शासन	२/२७/२००९	२००७-०८	५७८.७३	२६३२५
	सुप्रमा-६ शासन	३/१६/२०११	२००९-१०	११८३.५५	३८५७०
४.०	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	TAC Note Meeting - 109 th No. 16/27/2011-PA(N), Dt-29/3/2011 Investment Clerance No. Planning Commission, WRD, GOI, New Delhi File No.-2(305)/2011-WR, Dt-19/5/2011 Amount Rs. 1183.55 Crores			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			रु.४७०.६८ कोटी	
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			रु.२२१. ८८ कोटी	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			रु.१८५.९३ कोटी	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			रु. ६२. ८७ कोटी	
५.०	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			सन-१९७६	
६.०	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष			सन १९७८(यांत्रीकी विभागामार्फत कामास सुरुवात झाली. अंदाजीत किंमत रु. १५.८८ कोटी)	
७.०	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
	एकूण वाढ			रु. ११७१.२७ कोटी	
	मुळ किंमत रु. १२.२८ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार - रू.११८३.५५ कोटी				
				रक्कम (कोटी)	**टक्केवारी**
७.१	दरसूचीतील वाढ			३९७.०८	३३.९०
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ मूळ प्रकल्प अहवालातील तरतूद -१.८५ कोंटी सुप्रमा - ६ नसार तरतूद ३२३.१६ कोटी			२०४.७१	१७.४८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ) १) उजवा तट कालवा अंतर्भूत झाला.२) जळगांव शहर पाणी पुरवठा योजनेमुळे धरणाची उंची २.०० मी. ने वाढली आहे.३) जलाशयावर वाघूर उपसा सिंचन योजना. भूसंपादन १८४१ हे. व वनजमिन ७८.६२ हे. क्षेत्र वाढ. (वाढलेला पाणीसाठा ६४ दलघमी व सिंचन क्षमता १२२४५ हे.)			४१२.०८	३५.१८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ - १) २.०० मी. ने धरणाची उंची वाढ २) जळगांव शहर पाणीपुरवठा विमोचक			५३.२४	४.५५

७.५	इतर कारणे अनूषंगिक खर्चात झालेली वाढ (आस्थापना खर्च)	१०४.१६	८.८९
	एकूण	**११७१.२७**	**१००.००**
८.०	**प्रकल्पाची सद्यस्थिती**		
८.१	भू-संपादन, पूनर्वसन, वन जमिन संपादन	८० टक्के पूर्ण	
८.२	धरण	९५ टक्के पूर्ण	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	५५ टक्के पूर्ण	

वाघूर प्रकल्प, ता.जि.जळगाव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ-

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये ३९७.०८ कोटी

मूळ प्रशासकीय मान्यता सन-१९७१-७२ च्या दर सुचीवर आधारीत होती. सुधारीत किंमत सन-२००९-१० च्या दर सुचीप्रमाणे काढण्यात आलेली आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये २०४.७१ कोटी (मुळ तरतूद रु. १.८५ कोटी, सुधारीत रु.२०६.५६ कोटी)

अ) पुनर्वसनाच्या कामात मूळ प्रकल्प अहवालातील तरतूदी शिवाय नव्याने १८ नागरी सुविधामूळे वाढ झाली. तसेच बुडीत क्षेत्रातील रस्त्यांना पर्यायी रस्ते दिल्यामुळे वाढ झाली.

ब) मुळ वनजमिन ३१९.२१ हे. होती.

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रुपये ४१२.०८ कोटी.

अ) २३ किमी लांबीच्या वाघूर उजवा कालव्याचा समावेश झाला त्यानुसार ३१३७ हे. सिंचन क्षमतेत वाढ.

ब) वाघूर प्रकल्पाचा पाणीवापराचा सुधारीत अभ्यास करुन बचत होणाऱ्या पाण्यामध्ये जलाशयावरुन उपसा सिंचन योजना प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आली. व त्यास केंद्रीय जलआयोगाची मान्यता मिळाली. त्यानुसार १२२४५ हे. सिंचन क्षमतेत वाढ.

क) अतिरिक्त उंची वाढीमुळे ६४ दलघमी पाणीसाठ्यात वाढ झाली. सदर अतिरिक्त पाणीसाठा जळगांव शहरासाठी आरक्षीत आहे.

ड) मूळ प्रकल्प अहवालानुसार ३२८७ हे. क्षेत्र संपादन करणे प्रस्तावित होते. जागा बदलल्यामुळे ३१४० हे. क्षेत्र संपादीत करणे प्रस्तावीत होते. तदंतर धरणाची उंची २ मीटरने वाढविल्यामुळे संपादीत क्षेत्रात १८४१ हेक्टरने वाढ झाली. अशी एकूण ४९८१ हे. जमीन संपादन करावी लागली.

इ) वाढीव वनक्षेत्र ७८.६२ हे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये ५३.२४ कोटी

धरणाची उंची २ मीटरने वाढविल्याने धरणाचे संकल्पचित्रामध्ये बदल झाले. जळगांव शहर पाणीपुरवठा विमोचकाचे बांधकाम अंतर्भूत करण्यांत आले.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रुपये १०४.१६ कोटी

वरील बदलाप्रमाणे आस्थापनेत झालेली अनुषंगीक वाढ.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या सहा पुर्णतः व एक अंशतः बाधीत गावांचे पुनर्वसन करण्यास जास्त कालावधी लागला. यामध्ये प्रकल्पगस्त गामस्थांची पुनर्वसित गावठाणात स्थलांतर होण्याची

मानसिकता तयार होण्यामध्ये उशिर झाला. तसेच पुनर्वसन कायदा १९८६ नुसार नागरी सुविधा पुरविण्यात आल्यानंतर पुनर्वसन कायदा १९९९ अन्वये अतिरिक्त नागरी सुविधा पुरवाव्या लागल्यामुळे जास्त कालावधी लागला. भुसंपादन होण्यास शेतकऱ्यांच्या जमिनी देण्याच्या अनास्थेमुळे भुसंपादन प्रकिया होण्यास अतिरिक्त कालावधी लागला.

- सन १९७८ ते १९९३ पर्यंत प्रकल्पास निधीचा पुरेसा पुरवठा न होणे.
- सन १९८५ ते १९९२ दरम्यान वन मंजूरी अभावी प्रकलपचे काम पुर्ण पणे ठप्प होते.
- भुसंपादन व पुनर्वसन कामांकरीता नियोजनापेक्षा जास्त कालावधी लागला सदर कामामध्ये महसुल विभागांचा संबंध असल्यामुळे या कार्यालयास नियंत्रण ठेवणे शक्य झाले नाही.
- जळगाव शहर पाणी पुरवठा योजनेसाठी धरणाची उंची २ मीटरने वाढवावी लागली. त्यामुळे धरणाचे सुधारीत संकल्पन व नकाशे करावे लागले यासाठी अतिरीक्त कालावधी लागला. तसेच धरणाची उंची २ मीटरने वाढविल्यामुळे भुसंपादन, पुनर्वसन कामांच्यादेखील व्याप्तीत वाढ झाल्यामुळे अतिरिक्त काम वाढले.
- धरणाच्या २ मीटर उंची वाढीमुळे प्रकल्पास नव्याने पर्यावरण मंजूरी घेणे भाग पडले त्यामध्ये सुमारे ७ वर्षाचा कालावधी लागला. तसेच अतिरीक्त बाधीत होणाऱ्या ७८.६२ हेक्टर सन जमिनीस मान्यता मिळण्यासाठी १० वर्षाचा कालावधी लागलेला आहे. सद्यस्थितीमध्ये दिनांक २६/०१/२०१० रोजी सदर वन जमिनीस तत्वता मान्यता प्राप्त झालेली असून अंतीम मान्यतेचा प्रस्ताव दिनांक २९/५/२०११ रोजी वनखात्यास सादर केलेला आहे. त्यास अद्याप अंतिम मान्यता मिळाली नाही.
- धरणाचे बुडीत क्षेत्रातील अतिउच्चदाब विद्युत वाहीनीचे स्थलांतर करण्यास विलंब झाला.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती.

- धरणाचे काम ९५ पूर्ण झाले आहे.
- भूसंपादनाची कामे ८० टक्के पूर्ण झाली आहेत.
- बाधीत ७ गावांपैकी ६ गावांचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे.
- धरणाच्या २० दरवाजांच्या उभारणीचे काम पुर्ण झाले आहे.
- सद्यस्थितीत डावा कालवा ८० टक्के पूर्ण झालेला असून उजवा कालवा ७५ टक्के पूर्ण झाला आहे. एकंदरीत कालवा व वितरण व्यवस्था ५५ टक्के पूर्ण
- जळगाव शहर पाणी पुरवठा योजनेचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. जलविद्युत प्रकल्पाचे काम BOT तत्वावर प्रगतीपथावर आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नाव- निम्न तापी प्रकल्प (पाडळसे)**		**तालूका- अमळनेर**	**जिल्हा - जळगांव**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)		६३६५६	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर निरंक	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)**
	मुळ प.मा. (शासन स्तर)	६/३/१९९७	१९९५-९६	१४२.६४	४०७०१
	महामंडळ स्तर - सुप्रमा-१	६/४/१९९९	१९९८-९९	२७३.०८	४०७०१
	महामंडळ स्तर -सुप्रमा-२	८/५/२००३	२००१-०२	३९९.४६	४०७०१
	शासन स्तर -सुप्रमा-३	१४/९/२००९	२००८-०९	११२७.७४	६३६५६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचे कडून इं. पत्र क-६४/२००४-/४९६-५०० दि.१२/१०/२०१० अन्वये तत्वतः मान्यता पाप्त झालेली आहे. प्रारुप प्रकल्प अहवाल अंतिम मान्यते करीता केंद्रीय जल आयोग नागपूर येथे मंडळ कार्यालयाचे पत्र क-८० दि.१/१०/२०१२ अन्वये सादर			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी) -			२२६.४४	
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी) -			६५.६३	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) -			१३८.८१	
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी) -			२२.००४	
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष -			१९९९-२०००	
६	प्रकल्पास धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष -			एपिल १९९९ (अंदाजीत किंमत रु.२७३.०८ कोटी)	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे -				
	एकूण वाढ			रु.९८५.१० कोटी	
	मुळ किंमत रु.१४२.६४ कोटी, मंजूर सुप्रमानुसार - रु.११२७.७४ कोटी				
				रक्कम (कोटी)	**टक्केवारी**
७.१	दरसूचीतील वाढ			४०७.६८	४१.४०
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.३०.२५ कोटी, सुधारीत रु.२००.६५ कोटी			१७०.४०	१७.३०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			१०३.५२	१०.५०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			११२.५६	११.४२
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१९०.९४	१९.३८
	एकूण वाढ			**९८५.१०**	**१००.००**
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन			प्रगतीत	
८.२	धरण			मातीधरण ६० टक्के व सांडवा ३५ टक्के पूर्ण	

निम्न तापी प्रकल्प पाडळसे ता. अमळनेर जि. जळगाव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये ४०७.६८ कोटी

मूळ प्र. मा. १९९५-९६ च्या दरसूचीनुसार होती. अद्यावत सु.प्र.मा. साठीचे अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये १७०.४० कोटी (मुळ तरतूद रु. ३०.२५ कोटी, सुधारीत रु. २००.६५ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रुपये १०३.५२ कोटी.

अ) प्रकल्पाचे मूळ लाभक्षेत्र ३१३०९ हेक्टर होते व तृतीय सुधारीत अहवालानूसार ४३६०० हेक्टर लाभक्षेत्र आहे. लाभक्षेत्रात १२२९१ हेक्टर वाढ झालेली आहे. तसेच प्रकल्पाच्या मूळ अहवालातील दगडी बांधकामा ऐवजी कोलगाऊट बांधकामाची तरतूद सुधारीत अहवालात करण्यात आली आहे. यामुळे रु.१०३.५२ कोटी वाढ झालेली आहे.

मुळ प्रकल्पीय सिंचन क्षमता ४०७०१ हे., सुधारीत ६३६५६ हे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये ११२.५६ कोटी

मूळ प्रकल्प अहवालात १५ १२ मी. आकाराचे ३८ दरवाजे होते. सुधारीत प्रकल्प अहवाला नुसार १८.३० १६.७६ मी. आकाराचे २३ दरवाजे तरतूद आहे.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रुपये १९०.९४ कोटी

धरणाचे दोन्ही किनाऱ्यांवर पोहोच रस्त्यांची तरतूद, बुडीत क्षेत्र सर्वेक्षणाची तरतूद, धरणाचे वरील बाजूस असलेलया बुडीत क्षेत्रामुळे बाधीत होणाऱ्या ५१ गावांचे पाणीपुरवठा पाईपलाईन स्थलांतरणाची तसेच संगणीकरणाची तरतूद सुधारीत अहवालात करण्यात आलेली आहे.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- निधीची कमी उपलब्धता.

३) प्रकल्पाची सद्यःस्थिती-

- सांडवा-३५ पूर्ण. ओगीचे काम प्रगतीपथावर.
- वक्राकार दरवाजे निर्मिती प्रगतीपथावर
- मातीधरणाचे जलरोधी खंदकाचे काम प्रगतीपथावर
- मातीधरण- ६० टक्के पूर्ण उजवी बाजूकडील सॅडल डॅम पूर्ण झालेले आहे. डाव्या तिरावरील काम प्रगतीत
- पुनर्वसन कामे पाडळसे या एक गावाचे पुनर्वसन कार्यवाही ९० टक्के पूर्ण, उर्वरीत कार्यवाही प्रगतीत, पाच गावठाणातील नागरी सुविधांची निविदा कार्यवाही प्रगतीत.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नांव- पुनंद मोठा प्रकल्प**	**तालुका – कळवण**		**जिल्हा – नाशिक**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	१२६६२		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर १००७५	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु. कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ (शासन स्तर)	२९/५/१९८१	१९७९-८०	९.१४	१०,८४६
	सुप्रमा- १ (महामंडळ स्तर)	६/१/१९९९	१९९५-९६	११५.६२	१२,६६२
	सुप्रमा- २ (शासन स्तर)	४/११/२००८	२००७-०८	४६२.१७	१२,६६२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग नवी दिल्ली यांचे पत्र जा.क्र- २(२२९)/२००३-डब्ल्यूआर, दि.२२/५/२००९ अन्वये मान्यता प्राप्त (रु.३४०.५६ कोटी)			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	२६०.८१	-
४.२	भूसंपादन,पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	२२.३३	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	२१६.४९	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	२१.९९	-
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	सन-१९८१	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष **(सन १९९३ ची अद्यावत किंमत रु.२८.६९ कोटी)**	सन-१९९३	-	-	-
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ		-	४५३.०२	-
	वाढीतील कारणे	**रक्कम(रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	२२९.७३		५०.७१	
७.२	भूसंपादन,पुनर्वसन/वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ (रु.२६.६९-०.२६उरु.२६.४३ कोटी)	१७.६३		३.८९	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	३४.६२		७.६४	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	-		-	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	१६७.४१		३६.९६	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती -**				
८.१	भूसंपादन,पुनर्वसन,वनजमिन संपादन	वनजमिन संपादन १०० टक्के पुर्ण, पुनर्वसन कामे ९९ टक्के पूर्ण, खाजगी जमिन संपादन ८० टक्के पूर्ण			
८.२	धरण	सुपळे धरण व सुळे उन्नैयी बंधारा पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	चणकापूर उजवा कालवा पुर्ण, सुळे उजवा व डावा तसेच सुपळे उजवा व डावा कालव्याचे ७० टक्के काम पुर्ण. वितरीकांचे ५० टक्के कामे पूर्ण (१६० किमी पैकी ९२ किमी पूर्ण) वितरिकांच्या एकूण १४१ किमी पैकी ७८ किमी पूर्ण			

पुनंद मोठा प्रकल्प, ता. कळवण, जि. नाशिक
प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

७.१ दरसुचीतील वाढ-

मूळ प्रकल्प अहवाल सन १९७९-८० दरसूचीनुसार होता. द्वितीय सुधारीत प्रकल्प अहवाल सन २००७-०८ दरसुचीनुसार तयार करण्यात आला. २८ वर्षाचे कालावधीत दरसुचीतील दरात वाढ झाल्याने रु. २२९.७३ कोटी (५०.७१ टक्के) वाढ झाली.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिन मुळ खर्चातील वाढ -

भूसंपादन - प्रकल्पासाठी १९७८.८९ हेक्टर जमिन लागते. त्यात ११०३.१९ हेक्टर खाजगी जमिन, ५९.७६ हेक्टर वनजमिन व १५.९४ हेक्टर सरकारी जमिन आहे. खाजगी जमिनीचे ८८८.३६ हेक्टर (८० टक्के)क्षेत्र खात्याचे ताब्यात आहे. वनजमिन व सरकारी जमिन १०० टक्के उपलब्ध आहे. जमिनीच्या किंमतीत वाढ झाल्याने पर्यायाने प्रकल्पाचे किंमतीत वाढ झाली.

पुनर्वसन – पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार अधिसुचना दिनांक २०/४/१९९९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाली. प्रकल्पाचे सुपळे धरणातील ३ गावे (४ पाडयाचे) २४५ कुटुंबे (११५७ व्यक्तिंचे) पुनर्वसन सन २०१० मध्ये पुनर्वसीत गावठाणात करण्यात आले.

वनजमिन - प्रकल्पास ५९.७६ हेक्टर वनजमिन लागते. प्रस्तावास तत्वतः मान्यता सन १९९३ मध्ये केन्द्र शासनाकडून प्राप्त झाल्याने सुपळे धरणाचे काम हाती घेण्यात आले. वनजमिन उपलब्ध होण्यास ८ वर्षे लागली. त्यामुळे रुपये १७.६३ कोटी (३.८९ टक्के) रकमेची वाढ अपेक्षीत आहे.

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदल-

१) मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालानंतर चणकापूर उजवा वाढीव कालवा व सुळे डावा वाढीव कालव्याचे कामे मा.श्री.ए.टी.पवार, तत्कालीन राज्यमंत्री, आदीवासी विकास व समाज कल्याण, मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक २८/९/१९८४ व मा.श्री.शरद पवार विधान भवन, मुंबई यांचे पत्र दिनांक १/११/१९८५ नुसार मागणीनुसार प्रस्ताव शासनास सादर करुन त्यास शासनाने शासन पत्र क्र.३९५, दिनांक १२/७/१९९५ व ७/२/१९९८ अन्वये मंजुरी दिली. मंजूर प्रस्तावानुसार वाढीव कालव्याची कामे प्रथम सुधारीत प्रकल्प अहवालात समाविष्ट करण्यात आली.

२) सिंचन तथा विद्युत विमोचकाची (ICPO) तरतूद-

मुळ प्रकल्प अहवालात विद्युत निर्मिती करणे प्रस्तावित नव्हते. प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाचे तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता देतांना TAC Note मध्ये प्रकल्पावर विजनिर्मीती करणे विषयी सुचित केले. त्यानुसार प्रकल्प अहवालाचे प्रथम सुधारीत प्रकल्प अहवाल सिंचन विमोचकांचे विद्युत

विमोचकात रुपांतर (ICPO) करुन तरतुद करण्यात आली. नवीन वाढीव कामामुळे रु.३४.६२ कोटी (७.६४ टक्के) वाढ होत आहे.

७.४ इतर कारणे -

१) जादा दराची निविदा स्विकृतीमुळे, २) गौण खनिजाच्या स्वामित्व शुल्काबाबत शासन निर्णय सन-२००३ मध्ये निर्गमीत झाला. त्यामुळे गौण खनिजाच्या स्वामीत्व शुल्काची तरतुद केल्याने किंमतीत वाढ, ३) प्रकल्पाचे कालव्यावरील बांधकाम संख्येत वाढ, ४) शेतचा-यांची कामाची तरतूद मुळ प्रकल्प अहवालात नसल्याने, ५) पर्यावरण शेरे पूर्तता (Catchment Area Treatment) तरतूद नसल्याने प्रकल्पाचे किंमतीत वाढ झाल्याने, ६) आस्थापना इ. अनुषंगिक खर्चात (ETP) वाढ झाली. वरील इतर कारणांमुळे रु. १६७.४१ (३६.९६ टक्के) रकमेची वाढ होत आहे.

७.५ प्रकल्प विलंबाची कारणे-

प्रकल्प पुर्ण होण्यास सुमारे २३ वर्षे विलंब होत आहे.

१) निधीची अनुउपलब्धता –

मंजूर प्रकल्प अहवालात नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक वर्षी नियोजनानुसार आवश्यक निधी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सुमारे १४ वर्षे (६०.६० टक्के) विलंब लागला.

२) भुसंपादन व पुनर्वसन-

प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात येणाऱ्या ३ गावांचे पुनर्वसन नागरी सुविधा देऊन पुनर्वसीत गावठाणात करण्यात आले. तसेच भूसंपादनाच्या प्रक्रियेत जमिन धारकांनी काही अंशी जमिनी देण्यास विरोध केल्याने त्यांची मने वळविण्यास सुमारे एक वर्ष (४.३२ टक्के) विलंब झाला.

३) वनजमिन मान्यता-

प्रकल्पास ५९.७६ हेक्टर वनजमिन लागते. वनजमिन प्रस्ताव मंजुरीसाठी सुमारे ८ वर्षे लागली. वनजमिन प्रस्ताव मंजूरी अभावी धरणाचे काम हाती घेता आले नाही.

७.६ प्रकल्पाची सद्यःस्थिती -

प्रकल्पातील सुपळे धरण व उन्नैयी बंधारा पूर्ण झाला आहे. प्रकल्पात संपूर्ण क्षमतेने (१.४० अघफू) पाणीसाठा निर्माण करण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत ५ कालवे आहेत. कालव्याची एकूण लांबी १६० कि.मी. असून ९२ किमी (५८ टक्के) लांबीच्या कालव्यांची कामे पूर्ण झाली आहेत. वितरण प्रणालीची एकूण लांबी १४१ किमी असून ७८ किमी. (५५ टक्के) लांबीतील कामे पूर्ण झाली आहेत. प्रकल्पावर १२६६२ हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट असून आतापर्यंत १०,०७५ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. प्रकल्प निधी उपलब्धतेनुसार सन-२०१३ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव- अंजनी मध्यम प्रकल्प**	**तालुका- एरंडोल**		**जिल्हा- जळगांव**	
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	७९०२		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून २०१२ -११२३	
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प.मा. (शासन स्तर)	३/५/१९७७	१९७५-७६	२.८५	३०००
	शासन स्तर - नव्याने सुप्रमा	१९/१०/९२	१९९९१-९२	१७.९५	३०००
	महामंडळ स्तर - सुप्रमा-१	६/४/१९९९	१९९७-९८	४८.९१	३०००
	महामंडळ स्तर - सुप्रमा-२	९/२०/२००५	२००२-०३	८५.२०	३०००
	महामंडळ स्तर - अंजनी उंचीवाढ	१४/१/१९९९	१९९७-९८	३१.०५	४९०२
	एकूण	मुळ द्वितीय सु.प्र.मा. व उंचीवाढीची प.मा.		११६.२५	७९०२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क. २०-(१४) ८१ आय ॲन्ड कॅड दिनांक २०.११.१९८१ मान्यता किंमत रुपये ४.९१ कोटी			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		९९.६२ आस्थापनेसह		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)		४४.२३		
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)		४२.२०		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		१३.१९		
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९९२		
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९९२ (अंदाजीत किंमत रुपये १७.९५ कोटी)		
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ		रुपये ११३.४० कोटी		
	मुळ किंमत रु. २.८५ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार - रू.११६.२५ कोटी				
			रक्कम (कोटी		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		३२.१३		२८.३३
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.६.६० कोटी, सुधारीत रु. ३०.३० कोटी		२३.७०		२०.९०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ) पाणीसाठा वाढ-१७.३८८ दलघमी, उंचीवाढ-१.८७ मी., भूसंपादन क्षेत्र वाढ ३४१ हे.		२५.३४		२२.३५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		१४.४३		१२.७२
७.५	इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)		१७.८		१५.७०
	एकूण वाढ		११३.४०		१००.००
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**		-		-
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन		अंशतः पूर्ण- ३ गावांचे पूर्नवसन बाकी, भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर		
८.२	धरण		पूर्ण, जून – २००८		
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		डावा व उजव्या कालव्याचे काम प्रगतीपथावर, २० टक्के काम पूर्ण. वितरण प्रणालीचे संरेखा मंजूर करुन अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर.		

अंजनी मध्यम प्रकल्प एरंडोल, ता. एरंडोल, जि. जळगाव
प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे व सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ-

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये ३२.१३ कोटी.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये २३.७० कोटी (मुळ तरतूद रु.६.६० कोटी, सुधारीत रु.३०.३० कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रुपये २५.३४ कोटी.

धरणाची उंची १.८३ मी. ने वाढ झाल्याने धरणाचा काटछेद सुधारीत करावा लागला. मुळ प्रकल्प अहवालानुसार सिंचन क्षमता ३००० हे. व पाणीसाठा १९.३९२ द.ल.घ.मी. होता. उंची वाढनुसार ७९०२ हेक्टर सिंचन क्षमता व पाणीसाठा ३६.७८ द.ल. घ.मी. निर्माण होईल. धरणाची उंची वाढविण्याची मागणी मा.आ.श्री.महेंद्रसिंग पाटील यांनी पाटबंधारे मंत्री यांचेकडे दिनांक ९/५/१९९८ च्या पत्राद्वारे केलेली होती. यापमाणे उंचीवाढीनुसार १७.३८८ दलघमी पाणीसाठा व ४९०२ हे.सिंचन क्षमतेत वाढ झालेली आहे. उंचीवाढीमुळे ३४१ हे. अतिरिक्त भूसंपादन करावे लागणार आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये १४.४३ कोटी

डाव्या कालव्याची ४.५ कि.मी. व उजव्या कालव्यावरील जोड कालवा २.५ कि.मी. ने वाढला तसेच धरणाच्या उंची वाढीमुळे धरणाच्या मातीकामाच्या उंचीत १.८३ मी. ने व दगडी धरणाच्या उंचीत १.९१ मी. ने वाढ झाली.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च) - रुपये १७.८० कोटी

फळझाडांच्या मुल्यांकनात वाढ, न्यायालयाच्या निर्णयानुसार कलम १८ व २८ (अ) नुसार वाढीव मोबदला द्यावा लागला. त्यामुळे भूसंपादनात झालेली वाढ, धरणाच्या खालील बाजूस कॉजवे व निरिक्षण पथ, सांडव्याच्या ठिकाणी अतिरिक्त विंधन छिंद्रे, धरणाच्या काटछेदात बदल, अंजनी प्रकल्पाला सु.प्र.मा. जरी सन १९७७ मध्ये मिळाली असली तरी प्रत्यक्ष कामास सुरुवात सन-१९९२ मध्ये झाली. व त्यावेळी प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.१७.९५ कोटी होती. प्रकल्पास शेतकऱ्यांच्या भूसंपादनास विरोधामुळे १९९३ पर्यन्त काम सुरु होऊ शकले नाही.

२) प्रकल्पास विंलब होण्याची कारणे-

- प्रकल्पास शेतकऱ्यांच्या विरोधामुळे १५ वर्ष उशिरा सुरुवात.
- फळझाडे व जमिनींच्या मुल्यांकनात न्यायालयीन निर्णयाने वाढ, तरतुद अपूर्ण पडली.
- अपुऱ्या निधीची दरवर्षी तरतुद.

- उंचीवाढीनुसार ३०२ हे. बुडीत क्षेत्राचे भूंसापदन करण्याचे प्रस्तावीत.
- उंचीवाढीच्या फळझाडांची किमंत जास्त येत असल्याने २००४ ते २००८ पर्यंत उंचीवाढीस स्थगिती.
- महामंडळाच्या २९ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत दिनांक ८/१०/२००८ रोजी उंचीवाढीच्या भूसंपादनाची स्थगिती उठविली.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-

- अंजनी धरणाचे वाढीव उंचीसह व दरवाजे सहित जून-२००८ मध्ये काम पूर्ण झाले. पाणी साठवण क्षमता ३६.७८ दलघमी निर्मिती झालेली आहे. जून-२०१२ अखेर सिंचन क्षमता ११२३ हेक्टर निर्मिती झालेली आहे.
- मुळ प्रकल्प अहवालानुसार भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.
- डावा कालवा एकूण १४ कि.मी. पैकी ३ कि.मी. सलग कालव्याचे काम पूर्ण झाले आहे.
- उजवा कालवा एकूण ९ कि.मी. पैकी १ ते ५ कि.मी. चे काम प्रगतीपथावर आहे.
- कि.मी. ६ ते ९ चे अंदाजपत्रक तांत्रिक मंजूरीसाठी महामंडळाकडे सादर केलेले असून शेरे पुर्तता सुरू आहे.उजव्या कालव्यावरील जोड कालवा २.५० कि.मी. चे काम प्रगतीपथावर आहे. डाव्या कालव्यावरील वितरिका क. १ ते ६ चे संरेखा प्रस्ताव मंजुर असून अंदाजपत्रके व भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव- बहुळा मध्यम प्रकल्प**	**तालुका- पाचोरा**	**जिल्हा : जळगांव**		
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	४६५४	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून २०१२ अखेर ४६५४		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प.मा. (शासन स्तर)	२५/१/१९७७	१९७५-७६	२.६६	४६५४
	शासन स्तर - सुप्रमा-१	२६/१२/१९८९	१९८७-८८	११.१५	४६५४
	महामंडळ स्तर - सुप्रमा-२	६/१/१९९९	१९९७-९८	४४.०३	४६५४
	महामंडळ स्तर - सुप्रमा-३	२०/९/२००५	२००२-०३	५४.९७	४६५४
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता(TAC/ Investment संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क. २०-(१४) ८१ आय ॲन्ड कॅड दिनांक २०.१०.१९८१ मान्यता किंमत रुपये ५.९१ कोटी			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		५७.९० आस्थापनेसह		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		१०.०२		
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)		३४.८२		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		१३.०६		
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९७८		
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९७८ (अंदाजीत किंमत रुपये ३.३७ कोटी)		
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ		रु.५२.३१ कोटी		
	मुळ किंमत रु. २.६६ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार -		रु.५४.९७ कोटी		
			रक्कम (कोटी)		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		२५.८७		४९.४६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.०.४३ कोटी, सुधारीत रु. ७.६८ कोटी		७.२५		१३.८६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ)		०		०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		७.२८		१३.९२
७.५	इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)		११.९१		२२.७७
	एकूण वाढ		५२.३१		१००.००
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**		-		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन		काम पूर्ण		
८.२	धरण		काम पूर्ण, सन-१९९९		
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		काम पूर्ण, जून-२०१२		

बहुळा मध्यम प्रकल्प खेडगांव, ता. पाचोरा, जि. जळगाव
प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे व सद्यःस्थिती

१) **प्रकल्प किंमतीतील वाढ-**

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.

७.१ दरसूचीतील वाढ- रु.२५.८७ कोटी

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रु.७.२५ कोटी
(मुळ तरतूद रु.०.४३ कोटी, सुधारीत रु.७.६८ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रु.७.२८ कोटी
सांडव्याच्या संकल्पनात बदल झाल्यामुळे लांबीत वाढ झाली. त्यामुळे सहा द्वारांऐवजी नऊ द्वारांची तरतूद करण्यात आली. अतिरिक्त शाखा कालव्याची तरतूद, शाखा कालव्यावरील रेल्वे कॉसिंगची तरतूद, बुडीत क्षेत्रात पाचोरा कडे जाणाऱ्या पुलाचे व रस्त्याचे काम

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रु.११.९१ कोटी

- धरणाच्या उजव्या तटावरील जलरोधक खंदकाच्या खोलीत वाढ झाल्यामुळे
- जळगाव पाचोरा रस्त्यावरील बहुळा नदीवरील पुलाची तरतुद
- बुडीत क्षेत्रातील विद्युत वाहिनी व टेलिफोन वाहीनी स्थलांतरीत करावी लागल्यामुळे व जास्त दराने निविदा स्विकारल्यामुळे
- अनुषंगिक आस्थापना खर्चात वाढ झाल्यामुळे

२) **प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-**

- प्रकल्पासाठी मुळ प्रशासकीय मान्यता अहवाल सन १९७६-७७ मध्ये मंजूर करण्यात आला. प्रकल्पाच्या पत्यक्ष कामास १९७८ मध्ये सुरुवात करण्यांत आली.
- निधी अभावी व भूसंपादनाच्या अडचणी
- प्रकल्पास गती सन १९९२-९३ ला मिळाली व १९९९ ला घळभरणी झाली.
- कालव्याच्या भूसंपादनाच्या कामास संथ गतीमुले सन २०१२ पर्यंत कालव्याची कामे पूर्ण करण्यास विलंब झाला.
- प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीधारकांचा प्रकल्पास तीव्र विरोध होता. या कारणाने सन १९७७ ते १९८१ व १९८५ ते १९८७ या कालावधीत काम करणेस अडथळे निर्माण झाले.
- प्रकल्पाच्या वितरण प्रणाली करीता आवश्यक जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव सन १९९९ मध्ये महसुल विभागास सादर करण्यात आले होते. परंतु सदर भूसंपादन प्रक्रियेसाठी आवश्यक कलम १३(१) ची अधिसुचना सन २००४-०५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली.

३) **प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-**

- **धरण-** मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून धरणात २०.०३२ द.ल.घ.मी. (१००) पाणीसाठा निर्माण होत आहे.
- **कालवा-** प्रकल्पास उजवा कालवा कि.मी. १ ते १४ व शाखा कालवा कि.मी. १ ते १० ची कामे पूर्ण झालेली आहे.
- **वितरिका-** मुख्य कालव्यावरील वितरिका क.१ ते ५ ची कामे पूर्ण झालेली आहे. शाखा कालव्यावरील मायनर क. १ व ५ वगळता इतर मायनर्सची कामे पूर्ण झालेली आहेत. मायनर-१ चे काम ९० पूर्ण झाले आहे. जून २०१२ अखेर ४६५४ हे. सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.
- बहुळा प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रुपये ५७.९० कोटी खर्च झालेला असून मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यता रुपये ५४.९७ कोटी आहे. बहुळा प्रकल्पाच्या उर्वरीत कामासाठी, देयके अंतिम करणे व भूसंपादनासाठी रुपये ३.०५ कोटी आवश्यक आहे. भाग-१ भूविकास कामासाठी रुपये १३.०० कोटी आवश्यक आहेत. सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल क्षेत्रिय स्तरावर अंतिम करणे सुरु आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव- गुळ मध्यम प्रकल्प**	तालुका-चोपडा	जिल्हा : जळगांव		
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	३०२५ हे.	निर्मित सिंचन क्षमता जून-२०१२ अखेर २६४१ हे.		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प.मा. (शासन स्तर)	१५/९/१९८३	१९८१-८२	५.९२	२६३७
	शासन स्तर - नव्याने सुप्रमा-१	११/३/१९९३	१९९१-९२	१७.७९	२६३७
	शासन स्तर - पथम सुप्रमा-२	१८/१०/१९९७	१९९५-९६	३४.६०	३०२५
	महामंडळ स्तर - द्वितीय सुप्रमा-३	६/४/१९९९	१९९८-९९	५५.९३	३०२५
	महामंडळ स्तर - तृतीय सुप्रमा-४	१२/३/२००२	२०००-०१	६५.७३	३०२५
	शासन स्तर -चतुर्थ सुप्रमा-५	१५/१२/२००८	२००७-०८	९६.६१	३०२५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क. २०-(१३/२००५) दिनांक २१.१०.२०१० मान्यता किंमत रुपये ९६.६२ कोटी			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		८१.१७ आस्थापनेसह		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)		७.३२		
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)		६७.२२		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		६.६३		
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९९४		
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९९४ (अंदाजीत किंमत रुपये १७.७९ कोटी)		
७	**मुळ पशा्सकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ		रु.९०.६९ कोटी		
	मुळ किंमत रु.५.९२ कोटी, मंजूर सुप्रमानुसार रु.९६.६१ कोटी		रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		१९.९२	२१.९६	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.०.१६ कोटी, सुधारीत रु. ९.९९ कोटी		९.२९	१०.२४	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ) वाढीव पाणीसाठा-३.५६ दलघमी, वाढीव सिंचन क्षेत्र-३८१ हेक्टर, वाढीव भूसंपादन क्षेत्र-५४ हेक्टर.		४.२७	४.७१	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		२६.९९	२९.७६	
७.५	इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)		३०.२२	३३.३२	
	एकूण वाढ		९०.६९	१००.००	
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**		-		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन		भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर.		
८.२	धरण		पूर्ण ९५ काम पूर्ण सन २००९		
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		उजवा कालवा १०० टक्के, डावा कालवा ९५ टक्के, वितरण व्यवस्थेचे ८० टक्के काम पूर्ण. २६४१ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण.		

गुळ मध्यम प्रकल्प, ता.चोपडा, जि.जळगांव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये १९.९२ कोटी

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये ९.२९ कोटी (मुळ तरतूद रु.०.१६ कोटी, सुधारीत रु. ९.४५ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रुपये ४.२७ कोटी

धरणाच्या गेटच्या आकारात बदल झाल्यामुळे पूर्ण संचय पातळीत २६७.१५ वरुन २६८.४५ ने वाढ करुन १९.६९ दलघमी. ऐवजी २३.२५ दलघमी पाणीसाठा निर्माण करण्यात आला. त्यामुळे २६३७ हे. सिंचन क्षमता वरुन ३०२५ हे. सिंचन क्षमता करण्यात आली आहे. यापमाणे ३.५६ दलघमी पाणीसाठ्यांत व ३८८हे. सिंचन क्षमतेत वाढ झालेली आहे. वाढीव भूसंपादन ५४ हेक्टर.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये २६.९९ कोटी

धरणाच्या काटछेदात बदल, उर्जा श्रयन प्रणाली (EDA) व टेल चॅनेलच्या संकल्पनात बदल त्यामुळे बांधकामाच्या परिमाणात वाढ झाल्याने किंमतीत वाढ झाली. सदर प्रकल्प सातपुड्याच्या पायथ्याशी असल्यामुळे व भूस्तरातील तांत्रिक अडचणीमुळे संकल्पनात मोठे बदल करावे लागले.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च) - रुपये ३०.२२ कोटी

प्रकल्पास सन-१९८३ मध्ये जरी प्रशासकीय मान्यता मिळाली असली तरी वन जमिनी सन १९९३ मध्ये उपलब्ध झाली व त्यानंतरच प्रकल्पाचे काम सुरु झाले. प्रकल्पाच्या बांधकामात बदल, दरसूचीतील वाढ, देखभाल किंमतीत वाढ, धरणाच्या खालच्या बाजूस जोड रस्त्याची तरतूद, मुख्य कालव्यावर सेवापथाची तरतूद तसेच धरणाचा माथा पातळीत वाढ, काटछेदामध्ये झालेल्या बदलामुळे परिमाणात झालेली वाढ, भूसंपादनाचा वाढीव खर्च, अनुषंगिक आस्थापना खर्चात वाढ इ. कारणामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झालेली आहे सन १९९२-९३ मध्ये प्रकल्पाची किंमत १७.७९ कोटी होती. अद्यावत सु.प्र.मा. ९६.६१ कोटी आहे. भूसंपादनातील अडचणीमुळे प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- गुळ मध्यम प्रकल्पास सन १९८३ मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली परंतू निधी उपलब्ध न झाल्यामुळे सन १९९२ मध्ये नव्याने प्रशासकीय मान्यता घेऊन, वन संवर्धन अधिनियम-१९८०

कायदा लागू झाल्यानंतर वनजमिनीस मान्यता पाप्त करण्याची कार्यवाही सुरु करण्यांत येवून २७२ हे. वन जमिनीस अंतिम मान्यता दिनांक ३१.१२.१९९३ रोजी प्राप्त झाली. वन जमिनीच्या मान्यतेनंतर कामास १९९४ मध्ये सुरुवात करण्यांत आली. वन जमिनी संपादनासाठी प्रकल्पास १० वर्ष विलंब झालेला आहे.

- वितरीकांसाठी लागणारी जमिन संपादनाची प्रक्रीया विविध टप्प्यात महसुल यंत्रणेकडून झालेला विलंब
- वितरीकांच्या भूसंपादनाच्या ८० टक्के आगाऊ मोबदला प्राप्त झाल्याशिवाय काम करू देण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-

- **धरण-** मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून धरणात २३.२५ द.ल.घ.मी. (१००) पाणीसाठी निर्माण होत आहे. (वर्ष २००९)
- **कालवा-** प्रकल्पास उजवा कालवा ४.६२ कि.मी. लांबी पैकी ४.३० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेला आहे. मातीकाम ९० पूर्ण झाले आहे. एकूण ३४ बांधकामा पैकी २९ बांधकामे पूर्ण झाली आहेत. डाव्या कालव्याची लांबी ३.६८ कि.मी. पैकी ३.४० कि.मी. पर्यन्तचे मातीकाम पूर्ण झालेले आहे. सा.क्र. ३४४५ मी. वरील जलसेतूचे काम अपूर्ण असल्याने उर्वरीत लाबीतील मातीकाम अपूर्ण आहे. एकूण १६ बांधकामा पैकी ११ बांधकामे पूर्ण झालेली आहेत.
- **वितरिका-** उजव्या कालव्यावरील वितरिकांची कामे प्रगतीपथावर आहेत. सर्व वितरिकांची एकूण लांबी ३४.८० कि.मी. इतकी असून २३ कि.मी. पर्यन्तचे मातीकाम पूर्ण झालेले आहे. ९ कि.मी. लांबीतील कामाची निविदा रद्द झाल्याने नव्याने अंदाजपत्रक करुन निविदा कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. त्यामधील मातीकाम प्रगतीपथावर आहे. एकूण २९० बांधकामां पैकी १६२ बांधकामे पूर्ण झालेली आहेत.
- डाव्या कालव्यावरील वितरिकेंची एकूण लांबी ११ कि.मी. असून ९ कि.मी. मधील लांबीतील मातीकाम पूर्ण झालेले आहे. एकूण १८० बांधकामापैकी १५० बांधकामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे. जून-२०१२ अखेर २६४१ हे. सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव- मंगरुळ मध्यम प्रकल्प**	**तालुका- रावेर**	**जिल्हा : जळगांव.**		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	१९३५ हे.	निर्मित सिंचन क्षमता जून-२०१२ अ१९३५ हे.		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्र.मा. (शासन स्तर)	२९/११/१९७७	१९७६-७७	१.०७	१५०४
	शासन स्तर - सुप्रमा-१	१८/१०/१९९५	१९९३-९४	१०.८२	१९३५
	महामंडळ स्तर - सुप्रमा-२	१६/४/१९९३	१९९७-९८	१५.८३	१९३५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	-	-	-	-
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		१७.३० आस्थापनेसह		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)		२.९७		
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)		११.७९		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		२.५४		
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९७८		
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९७८ (अंदाजीत किंमत रुपये १.६१ कोटी)		
७	मुळ पशा्सकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे				
	एकूण वाढ		रु.१४.७६ कोटी		
	मुळ किंमत रु. १.०७ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार		रु.१५.८३ कोटी		
			रक्कम (कोटी		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		७.३६		४९.८६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.०.०१ कोटी, सुधारीत रु. ०.८१ कोटी (वनक्षेत्र १४६.११ हेक्टर)		०.८०		५.४२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ)		०		०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		२.३२		१५.७२
७.५	इतर कारणे अनुषंगीक (खर्चासह आस्थापना खर्चात वाढ)		४.२८		२९.००
	एकूण वाढ		१४.७६		१००.००
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		-		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन		काम पूर्ण		
८.२	धरण		पूर्ण, जून १९९७		
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		पूर्ण		

मंगरुळ मध्यम प्रकल्प, ता. रावेर, जि. जळगांव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती.

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये ७.३६ कोटी.

१९७७ मध्ये मंजूरी पाप्त पत्यक्ष धरणाच्या १९९३ मध्ये सुरुवात म्हणून दरसूचीत वाढ

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये ०.८० कोटी

(मुळ तरतूद रु.०.०१ कोटी, सुधारीत रु. ०.८१ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये २.३२ कोटी

जलयेवा अभ्यासात बदल झाल्यामुळे व जलसेतूच्या बांधकामात बदल झाल्यामुळे खर्चात वाढ झाली. भविष्यातील तरतुदीचा विचार करुन धरणाची उंची १.८५ मी. ने वाढविल्यामुळे १.४८९ दलघमीने पाणी साठयात वाढ त्यामुळे धरणाच्या काटछेदात बदल.

मुळ सिंचन क्षेत्र १३०८ हे., व सुप्रमा अहवालातील सिंचन क्षेत्र १६८३ हे. याप्रमाणे सिंचन क्षेत्रात ३७५ हे. ने वाढ. सिंचन क्षमतेत ४३१ हे. ने वाढ.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च) - रुपये ४.२८ कोटी

जलसेवा अभ्यासात बदल झाल्यामुळे व जलसेतूच्या बांधकामात बदल झाल्यामुळे नव्याने तरतूद करावी लागल्यामुळे तसेच लाभक्षेत्र वाढल्याने झालेली वाढ. (पाण्याची उपलब्धता पाहता भविष्यांतील साठा वाढणेसाठी तरतूद.) अनुषंगिक आस्थापना खर्चात वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत वाढ.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- वन मान्यता १५ वर्षे उशिरा (१९७७ ते १९९३) मिळाली. (वनजमिन १४६.११ हेक्टर)
- अपुर्ण निधीची तरतुद (१९७७-१९९३)
- शेतकऱ्यांचा कालवा प्रणालीस विरोध (१९९९ ते २००९)

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-

- **धरण-** मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून धरणात ८.९८२ द.ल.घ.मी. (१००) पाणीसाठा निर्माण होत आहे.
- **कालवा-** प्रकल्पास उजवा कालवा कि.मी. १ ते ४.६२ सन १९९७ मध्ये पूर्ण झालेला आहे.
- **वितरिका-** वितरिकांची कामे सन २००७ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत.
- प्रकल्पाची पूर्ण सिंचन क्षमता निर्माण झाली असून धरणामुळे लाभक्षेत्रातील भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाल्यामुळे लाभक्षेत्रात मोठ्या पमाणत विहीरी (१२४२) झाल्या असून ठिबक सिंचनाद्वारे मोठ्या पमाणात बागायती शेती करण्यात येते. मंगरुळ प्रकल्पाच्या परिसरात १७८२ हेक्टर एवढी केळी होत असून १०२० हेक्टर बागायती कापूस होत आहे. एकूण प्रकल्पामुळे अपत्यक्ष फायदे खूप झालेले आहेत. प्रकल्पीय सिंचन क्षमता १९३५ हेक्टर निर्मिती झालेली आहे.
- लाभक्षेत्रात केळी प्रिकाच्या उत्पादनामुळे अदमासे रुपये ७७.०० कोटी व कापूस उत्पादनामुळे रु.१७.७० कोटी असा एकूण रु.९४.७० कोटीचा अपत्यक्ष फायदा झालेला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नांव- मोर मध्यम प्रकल्प**	तालुका : यावल	जिल्हा : जळगांव		
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	२१५६ हे.	निर्मित सिंचन क्षमता जून २०१२-१६०० हे.		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प.मा. (शासन स्तर)	२/३/१९७७	१९७६-७७	१.२३	२१५६
	शासन स्तर - सुप्रमा-१	४/१२/१९९३	१९९१-१९९२	२४.३३	२१५६
	शासन स्तर - सुप्रमा-२	२६/९/१९९७	१९९५-९६	३६.१८	२१५६
	महामंडळ स्तर - सुप्रमा-३	३/१२/२००२	१९९९-२०००	४८.९२	२१५६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग नवी दिल्ली यांचे पत्र क.एमजीपी/२२७६/३८८/७६-टी (२५) दिनांक २५.०३.१९७६ मान्यता किंमत रु.०.९१ कोटी			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		५३.६१ आस्थापनेसह		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु. कोटी)		१.२४		
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)		४१.४१		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		१०.९६		
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९७७		
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष		१९७७ (अंदाजीत किंमत रुपये १.२२ कोटी)		
७	**मुळ पशांसकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ		रु.४७.६९ कोटी		
	मुळ किंमत रु. १.२३ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार		रु.४८.९२ कोटी		
			रक्कम (कोटी		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		२०.१६		४२.२७
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ, मुळ तरतूद रु.०.०७ कोटी, सुधारीत रु.३.३३ कोटी		३.२६		६.८४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदीमुळे झालेली वाढ)		०		०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		१.९२		४.०३
७.५	इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)		२२.३५		४६.८७
	एकूण वाढ		४७.६९		१००.००
८	**प्रकल्पाची सद्यःस्थिती**		-		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन		भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर		
८.२	धरण		काम पूर्ण सन २००७		
८.३	कालवा व वितरण व्यवस्था		कालवा १०० टक्के पूर्ण, वितरण प्रणालीचे काम प्रगतीपथावर. ७० टक्के काम पूर्ण.		

मोर मध्यम प्रकल्प, ता.यावल, जि.जळगांव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये २०.१६ कोटी

प्रकल्पास वनजमिनीमुळे विंलबाने सुरुवात (१९७७ ते १९९३)

७.२. भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये ३.२६ कोटी

(मुळ तरतूद रु.०.०७ कोटी, सुधारीत रु. ३.३३ कोटी) (वनजमिन १३०.९० हेक्टर)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये १.९२ कोटी

मूळ प्रशासकीय मान्यतामध्ये नदी पात्रात मातीधरण प्रस्तावित होते. परंतू नदी पात्रात मातीधरणाच्या काटछेदाची उंची ४८.४ मी. असल्याने एका कामाच्या वार्षिक वर्षामध्ये काम करणे अवघड असल्याने अभ्यासाअंती दगडी धरण मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी आराखडयांत अंशतः बदल करुन नदीपात्रात मातीधरणा ऐवजी वकाकार दरवाज्यांसह दगडी धरणाचे काम प्रस्तावीत करण्यांत आले. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली. १९९१-९२ साली प्रकल्पाची किंमत २४.३३ कोटी होती. आजपावेतो प्रकल्पावर खर्च ५३.६१ कोटी झालेला आहे.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रुपये २२.३५ कोटी

सर्वेक्षणातील वाढ तसेच ओ-संकीर्णमुळे झालेली वाढ, देखभाल खर्च व हत्यारे व अवजारे खर्चात झालेली वाढ, अनुषंगिक आस्थापना खर्चात वाढ झाल्यामुळे. भूसंपादनातील अडचर्णीमुळे कालव्याच्या कामास विलंब

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- प्रकल्पासाठी मुळ प्रशासकीय मान्यता सन १९७७ मध्ये पाप्त. प्रकल्पाच्या पत्यक्ष कामास १९७७ मध्ये सुरुवात करण्यांत आली. सन १९७७-७८ ते १९९२-९३ पर्यंत प्रकल्पास अत्यल्प निधी प्राप्त झाला.
- प्रकल्पाच्या १३०.९० हेक्टर वनजमिनीस १०/१९९३ मध्ये अंतिम मान्यता प्राप्त. वन जमिनीस मान्यता मिळाल्यानंतरच धरणाचे काम सुरू होऊ शकले. वन जमिनीमुळे १६ वर्षे प्रकल्पास विलंब झालेला आहे.
- कालव्याच्या भूसंपादनास शेतकऱ्यांच्या विरोधामुळे कालव्याच्या कामास विलंब झालेला आहे. वितरीकांसाठी लागणारी जमिन संपादनाची प्रक्रिया विविध टप्प्यात कार्यवाहीत आहे. भूसंपादनाची अडचण व शेतकऱ्यांचा विरोध.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-

- **धरण-** मुख्य धरणाचे काम सन २००७ मध्ये पूर्ण झाले असून धरणात ९.५०५ द.ल.घ.मी. (१००) पाणीसाठा निर्माण होत आहे.
- **कालवा-** प्रकल्पास उजवा कालवा ७.३७ कि.मी. सन १९९७ मध्ये पूर्ण झालेला आहे.
- **वितरिका-** वितरिकांची कामे प्रगतीपथावर आहेत. जून-२०१२ अखेर १६०० हे. सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प**	**तालुका- जळगांव**	**जिल्हा- जळगांव**		
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	११३१८ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प.मा. (शासन स्तर)	०६.०४.१९९९	१९९७-१९९८	१९८.०५	८,८७२
	नव्याने सुधारीत मान्यतेसाठी प्रस्ताव दिनांक २०.१०.२०१० रोजी शासनास मंजूरीसाठी सादर केलेला आहे. (उपसा सिंचन योजनेसह)	२०.१०.२०१०	२००९-२०१०	१०६८.०७	११३१८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी) केंद्र शासन नियोजन आयोग इंग्रजी पत्र क्र- २०(१३)/२०१०/WR-Vol.४ दिनांक ०५.१२.२०१०	०५.१२.२०१०	-	४४६.४९	११,३१८
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	२१२.८७			
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	८.९४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१८२.४७			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	२१.४६			
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९९-२०००			
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	सन १९९९ (अंदाजीत किंमत रुपये १९८.०५ कोटी)			
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ	रु.८७०.०२ कोटी			
	मुळ किंमत रु.१९८.०५ कोटी, प्रस्तावीत सुप्रमानुसार	रु.१०६८.०७ कोटी			
		रक्कम (रु.कोटी)	**टक्केवारी**		
७.१	दरसुचीतील वाढ	१९९.९१	२२.९८		
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ मुळ तरतूद रु.४.२५ कोटी, सुधारीत रु.१४९.८१ कोटी	१४५.५६	१६.७३		
७.३	प्रकल्प व्यप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात उपसा सिंचन योजनेचा सामावेश नव्हता. केंद्रीय जल आयोग यांचे DIR (APP)/NAG/Shelgaon/२००२/४७७-४९ दि. २०.०७.२००५ रोजीच्या पत्रान्वये उपसा सिंचन योजनेचा सामावेश नव्याने केल्याने झालेली वाढ)	३२०.८३	३६.८८		
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	३०.१८	३.४७		
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	१७३.५४	१९.९५		
		८७०.०२	१००.००		
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	४७.४५ हेक्टर जमिन संपादीत, पुनर्वसन नाही, वनजमिन तत्वतः मान्यता पाप्त			
८.२	धरण	मुख्य धरणाचे बांधकाम ६२ टक्के पुर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	-			

शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प ता. जि. जळगांव
प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये १९९.९१ कोटी.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये १४५.५६ कोटी. (मुळ तरतूद रु.४.२५ कोटी, सुधारीत रु. १४९.८१ कोटी) (वनजमिन ३९.९८ हेक्टर)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रुपये ३२०.८३ कोटी.

७.४ उपसा सिंचन योजना खात्यामार्फत बांधणे नव्याने प्रस्तावित केल्याने केंद्रीय जल आयोग यांचे DIR(APP)/NAG/Shelgaon/२००२/४७७-४९ दिनांक २०/७/२००५ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार उपसा सिंचन योजना प्रस्तावित केली आहे.

७.५ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये ३०.१८ कोटी. संविस्तर संकल्पनामुळे संकल्पचित्रात व मुळ मंजूर प्रशासकीय मान्यता अहवालात खालीलप्रमाणे बदल झालेले आहेत.

अ. क.	बाब	मुळ मंजूर प्रकल्प अहवालापमाणे संकल्पन	क्षेत्रिय परिस्थितीनुसार संकल्पनात बदल
अ	सांडवा	व -१५ संधानक बांधणे (१३२.१७ सघमी)	प्रकारचा सांडवा कोलगाऊट व -२० संधानकाने बांधणे. (१४८.५२ स.घ.मी.)
ब	प्रस्तंभ	प्रस्तंभाचे बांधकाम	प्रस्तंभाचे बांधकाम
		-१५ सलोह संधानकामधे करणे (५५.०० स.घ.मी.)	२० सलोह संधानकामधे करणे (१०२.०० स.घ.मी)
क	डाव्या व उजव्या बाजूच्या दुभाजक व दर्शक भिंतींना कोलगाऊट सेप्ट्रम.	तरतुद नाही.	भिंतींना दगडी बांधकाम वे कोलगाऊट सेप्ट्रम (२६.५७ स.घ.मी.)
ड	जलक्षोभ - नाशक व्यवस्था	जलक्षोभनाशी कुंड (Steeling basin) -१५ संधानकात (११.५५ स.घ.मी.)	जलक्षोभनाशी कुंड (Stelling basin) -२० संधानकात (१८.०० स.घ.मी.)
ई	डाव्या बाजूचे माती धरण व उजव्या बाजूचे खिर्डीतील मातीधरण.	जलावरोधी खंदक (१८६.७७ स.घ.मी.)	जलरोधी खंदक (५७५.९५ स.घ.मी.)
फ	थोपव्दारे (Stoplog)	१ संच	२ संच

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च) - रुपये १७३.५४ कोटी

गौण खनिजाच्या स्वामित्व धनाच्या देय परताव्यासाठी तरतुद केल्यामुळे, प्रथम शिर्षकामातील मुख्य धरणाच्या खर्चात अपरिहार्य कारणामुळे झालेल्या वाढीची तुलना करता 'प' देखभाल या उपशिर्षाच्या अंदाजपत्रकात त्या अनुषंगाने वाढ झाली, प्रकल्पाचा लाभक्षेत्राच्या परिमाणात वाढ झाल्यामुळे लाभक्षेत्राचे सविस्तर सर्वेक्षण करण्याची तरतूद केल्यामुळे धरणाच्या दुभाजक भिंती व मार्गदर्शक भितींच्या लांबी वाढविण्याची तरतुद, धरणाच्या बुडीत व लाभ क्षेत्रातील पोचरस्त्यांना मुख्य रस्त्यापर्यंत जोडणेसाठीची तरतूद केल्यामुळे, केंद्रिय जलआयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार प्रकल्पास पर्यावरण तसेच पाणलोट क्षेत्र विकासाची तरतुद केल्यामुळे, आस्थापनामधील झालेली वाढ.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- अपुऱ्या निधीमुळे प्रकल्पाचे काम हळूवार सुरु आहे.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती-

- प्रकल्पाचे नदीपात्रात सांडवा माथा तलांक (Crest level) १६३.२४ मी पर्यंत काम पूर्ण झाले असून पस्तंभांचे काम प्रगतीपथावर आहे.
- वक्रकार दरवाज्यांचे व्दार निर्मितीचे व उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.
- डावा तीर माती धरण (लांबी ४९५ मी.) व उजवा तीर माती धरण (लांबी १२९ मी.) यांचे काम जवळपास ९० एवढे पूर्ण झालेले आहे.
- मुख्य धरणाचे एकूण बांधकाम ६२ एवढे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे.
- शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पास ३९.९८ हेक्टर वन जमीनीकरीता दिनांक २७.१०.२००९ रोजी तत्वतः मान्यता मिळाली.
- प्रकल्पाच्या वनजमीनीची (NPV) रक्कम रु.८.६८ कोटी भरणे बाकी आहे. प्रकल्पास पुरेसा आवश्यक निधी प्राप्त न झाल्याने प्रकल्पाचे काम अद्याप अपूर्ण आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- कमानीतांडा**	**तालुका- जामनेर**		**जिल्हा- जळगाव**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	६०३२ हे.	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ ६०३२ हेक्टर		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प.मा. (महामंडळ स्तर)	१०/३/१९९८	१९९७-९८	४२.२१	६०३२
	सुप्रमा.- १ (महामंडळ स्तर)	२०/९/२००५	२००२-२००३	७८.४९	६०३२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२३/१/२००९		७८.४९	६०३२
		No. 16/27/2008/-PA(N) 295-309 CWC Project of Apprisal Organization, New Delhi, dt.23/1/2009			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	६९.४३			
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	२७.४६			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	३१.३७			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१०.६०			
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९९-२०००			
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	सन १९९९ (अंदाजीत किंमत रु.४७.३९ कोटी)			
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ	रु.३६.२८ कोटी			
	मुळ किंमत रु. ४२.२१ कोटी, मंजूर सुप्रमा नुसार	रु.७८.४९ कोटी			
		रक्कम (रु.कोटी)		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	६.२४६		१७.२२	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ, मुळ तरतूद रु.६.३८ कोटी, सुधारीत रु.१९.३६ कोटी	१२.९८		३५.७८	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		०.००	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.४९४		१.३६	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (इटीपी, आस्थापनासह)	१६.५६		४५.६४	
	एकूण वाढ	३६.२८		१००.००	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भुसंपादन पकिया पूर्ण.			
८.२	धरण	धरण कामे पुर्ण जून २००८			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	भरण कालवा प्रगतीपथावर, ९५ टक्के पुर्ण			

कमानीतांडा योजना ता.जामनेर जि.जळगांव
प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये ६.२१ कोटी

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये १२.९८ कोटी (मुळ तरतूद रु. ६.३८ कोटी, सुधारीत रु. १९.३६ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- रुपये ०.४९४ कोटी.
उन्नेयी बंधाऱ्यातील संकल्पचित्र बदल झाल्यामुळे (EDA ची नव्याने तरतुद) वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रुपये १६.५६ कोटी
जलरोधक खंदकातील वाढीव काम व इत्यादी. सांडवा संलग्न बांधकाम व पायातील वाढीव काम. वळण बंधाऱ्यावरील मुख्य विमोचकामध्ये कालवा कॉस रेग्युलेटर बांधकाम तरतुदीमुळे झालेली वाढ. पुच्छ कालव्यामध्ये रस्ता क्रॉसिंग मुळे झालेली वाढ. अनुषंगिक खर्च.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- सदर प्रकल्पात सात साठवण तलाव, एक उन्नयी बंधारा व भरण कालवा समाविष्ट असून त्यासाठी आवश्यक महसूल जमिनीच्या भूसंपादनासाठी साधारणतः ६ ते ८ वर्षे विलंब झाला.
- अपुऱ्या निधीमुळे प्रकल्प पुर्ण करणे शक्य झाले नाही.

३) प्रकल्पाची सद्यःस्थिती-

- भरण कालवा व त्यावरील साठवण तलाव मोयगांव, सोनाळा, लोंढरी, हिजऱ्यानाला, पाळधी ही कामे पुर्ण.
- साठवण तलाव शेरीचे काम ९५ टक्के झालेले व साठवण तलाव पिंपळगांव (गो.) चे काम ८० टक्के पुर्ण.

४) प्रकल्पामुळे होणारे फायदे.

- प्रकल्पाच्या परिसरातील व खालील बाजूस असलेल्या विहीरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ.
- पर्यायाने आजुबाजुच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.
- प्रकल्पाच्या परिसरातील विविध गावांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागलेला आहे

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- अमरावती मध्यम प्रकल्प**	**तालुका- शिंदखेडा**		**जिल्हा- धुळे**	
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	३१२७	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर ३१२७		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ (शासन स्तर)	१२/७/१९७९	१९७७-७८	३.५८	३,१२७
	सुप्रमा-१ (महामंडळ स्तर)	११/१/१९९५	१९९४-९५	२८.७७	३,१२७
	सुप्रमा-२ (शासन स्तर)	२६/७/२००१	१९९९-००	४८.३३	३,१२७
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क- २०(०४/८१)/ केंद्र दिनांक २०/१०/१९८१ रु.४८.३३ कोटी			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	५२.६७	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	५.१२	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	४४.११	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	३.४४	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७९	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष **(सन १९८० ची अद्यावत किंमत रु.४.३३ कोटी)**	१९८०	-	-	-
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ**		**-**	**४४.७५**	**-**
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	१६.२०		३६.२०	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ **(रु.३.९२७-०.१६रु.३.७६ कोटी)**	३.७६		८.४०	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		०.००	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	५.७६		१२.८७	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	१९.०३		४२.५०	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती-**	प्रकल्पाची व कालव्याची कामे पूर्ण			
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भूसंपादन पूर्ण, पुनर्वसन व वनजमिन येत नाही			
८.२	धरण	१०० कामे पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	१०० कामे पूर्ण			

अमरावती मध्यम प्रकल्प, ता.शिंदखेडा, जि.धुळे
प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

७.१ दरसुचीतील वाढ-

मुळ प्रकल्प अहवाल सन १९७७-७८ च्या दरसुचीवर आधारीत होता. द्वितीय सुधारीत प्रकल्प अहवाल सन १९९९-०० च्या दरसुचीनूसार तयार करण्यात आला आहे. त्यामुळे रु.१६.२० कोटीची (२६.२० टक्के) वाढ झाली आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेल्या खर्चातील वाढ-

जमिनीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे रु.३.७६ कोटी (८.४० टक्के) वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-

सांडव्यावरील गॅलरी वगळून उर्वरीत दगडी बांधकाम कोलगाऊट मध्ये केल्यामुळे रु.५.७६ कोटी (१२.८७ टक्के) वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे-

गेट व वळण रस्त्यासाठी लागलेल्या प्रत्यक्ष खर्चात वाढ. तसेच दगडी बांधकामाऐवजी शासन परिपत्रकानुसार संधानकाचा वापर करावा लागल्याने व प्रकल्प खर्चात वाढ झाल्यामुळे आस्थापना व अनुषंगिक खर्चात वाढ झाली आहे. रु.१९.०३ कोटी (४२.५३ टक्के) वाढ झाली आहे.

८ प्रकल्पाची सद्यस्थिती-

- अमरावती प्रकल्पाचे काम सन २००६-२००७ मध्ये पूर्ण झाले आहे.
- मातीधरण काम, सांडवा इत्यादी १०० टक्के पूर्ण झाले आहे.
- डाव्या व उजव्या कालव्याचे काम अनुकमे ७.५ व १४.२० किमी लांबीचे काम (मेथी चारीचे अंशतः काम वगळता) पुर्ण झाले आहे.
- प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २७.७८ दलघमी असून सन २००६-०७ मध्ये पुर्ण पाणीसाठा निर्माण झाला आहे. तथापि सन-२००८ पासून पर्जन्यवृष्टी अत्यल्प झाल्यामुळे उपयुक्त पाणीसाठा निर्माण झालेला नाही.
- सन २००६-०७ मध्ये एकूण ३१२७ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
- सन २००७-०८ मध्ये एकूण ९११ हेक्टर क्षेत्र प्रत्यक्ष भिजविण्यात आले आहे.
- सदर प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी ०.४७ दलघमी पाणी रनाळे व ४ गावांसाठी आरक्षित आहे.
- सदर प्रकल्पाचा सन २००५-०६ मध्ये केंद्रीय जल आयोगाच्या केंद्रीय अर्थसहाय्यांतर्गत समोवश करण्यात आला. सदर प्रकल्पास सन २००५-०६ मध्ये रु.१.१८२ कोटी अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे.
- अमरावती प्रकल्पामुळे कोणतेही गावठाण बाधीत होत नसल्याने पुनर्वसनाची तरतूद मुळ प्रकल्प अहवालात नव्हती. तथापि २००६ मध्ये आलेल्या पुरानंतर मौजे वैंदाणे गावातील काही घरांची पडझड झाल्याने बाधीत घरांच्या निश्चितीकरिता महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांचेमार्फत पश्चजल अभ्यास अंतिम टप्प्यात आहे.
- पश्चजल अभ्यासानुसार मौजे वैंदाणे गावातील बाधीत घरांच्या संख्येनुसार तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालात दुरुस्ती करण्यात येईल.

विलंबाची कारणे-

- पुरेशा निधी अनुपलब्धतेमुळे प्रकल्प कालावधीत १९ वर्षाने वाढ झाली आहे.
- ठेकेदाराच्या कामाची प्रगती असमाधानाकारक असल्याने प्रकल्प पुर्णत्वास विलंब झाला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- निम्न पांझरा मध्यम प्रकल्प**	**तालुका- साकी**		**जिल्हा- धुळे**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	७५८५	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर २४४२		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल				
	मुळ प्रशासकीय मान्यता	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ (शासन स्तर)	३०/१/१९८४	१९८२-८३	२०.६७	६,१९१
	सुप्रमा.- १ (महामंडळ स्तर)	६/४/१९९९	१९९८-९९	१३१.४०	६,१९१
	सुप्रमा.- २ (शासन स्तर)	२६/३/२००८	२००५-०६	३४७.३१	७,५८५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क- २०/(१३)/२००८/ डब्ल्युआर, दिनांक १/४/२००९ रु.३४७.३२ कोटी			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	२६६.७१	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	७१.३२	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	१९३.८८	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	१.५१	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८७-८८	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष **(सन १९८६ ची अद्यावत किंमत रु.२७.५१ कोटी)**	१९८६	-	-	-
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ	रु.३२६.६४कोटी			
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	१३३.८२		४०.९७	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ (रु.६०.५०-१.९५रु.५८.५५ कोटी)	५८.५५		१७.९४	
७.३	प्रकल्प व्याप्तील बदलामुळे झालेली वाढ (मुळे प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		-	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	७८.५४		२४.०४	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	५५.६९		१७.०५	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भूसंपादन पूर्ण, पुनर्वसानाची कामे ८० कामे पूर्ण व वनजमिन मान्यता पाप्त			
८.२	धरण	मातीधरण ९६ टक्के पूर्ण, सांडव्याची कामे पूर्ण, द्वारनिर्मिती पूर्ण, द्वार उभारणी प्रगतीत आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	उजवा कालवा पूर्ण, डावा कालवा ५० टक्के पूर्ण			

निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प, ता.साकी, जि.धुळे

प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

७.१ दरसुचीतील वाढ-

मुळ प्रकल्प अहवाल सन १९८२-८३ च्या दरसूचीवर आधारीत होता. द्वितीय सुधारीत प्रकल्प अहवाल सन २००५-०६ दरसूचीनुसार तयार करण्यात आला आहे. त्यामुळे रु.१३३.८२ कोटी (४०.९७टक्के) वाढ झाली आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेल्या खर्चातील वाढ-

मुळ प्रकल्प अहवालात भूसंपादनाची किंमत रु.१.९४ कोटी एवढी आहे व सुधारित प्रकल्प अहवालात भूसंपादनाची तरतूद रु.६०.९४ कोटी आहे. बुडीतात येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गातील वळण रस्ता, तसेच घरांच्या संख्येत वाढ झाली आहे. स्थलांतरीत करावयाची विद्युत वाहीनी, निर्वणीकरणापोटी वनखात्यास अदा करावयाची रक्कम याशिवाय पुनर्वसन गावठाणात बुडीतात येणाऱ्या प्रकल्पगस्तांच्या संख्येतील वाढ झाली आहे त्यामुळे रु.५८.५५ कोटी (१७.९४टक्के) वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-

जलक्षोभक नाशक व्यवस्थेच्या लांबीत वाढ झाली आहे. तसेच उत्सारीत भागाचे दगडी बांधकामाऐवजी कोलगाऊट बांधकामामध्ये काम केल्यानमुळे किंमतीत वाढ झाली अहे व मातीधरणाच्या काटछेदात बदल झाल्यामुळे किंमतीत वाढ झाली आहे. अशी एकूण रु.७८.५४ कोटी (२४.०४टक्के) एवढी वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे-

गौण खनिजाच्या स्वामित्व शुल्काची तरतूदीमुळे वाढ झाली आहे. तसेच दगडी बांधकामाऐवजी शासन परिपत्रकानुसार संधानकाचा वापर केल्यामुळे रु.०.३८ कोटी किंमतीत वाढ झाली आहे. प्रकल्प खर्चात वाढ झाल्यामुळे आस्थापना व अनुषंगिक खर्चात रु.५५.३१ कोटी वाढ झाली आहे. अशी एकूण रु.५५.६९ कोटी (१७.०५टक्के) ने वाढ झालेली आहे.

८ प्रकल्पाची सद्यःस्थिती

- मातीधरण- ९८ पूर्ण, सांडवा ९८, पूर्ण, प्रस्तंभ ९५ पुर्ण, व्दार निर्मिती पूर्ण व उभारणी कामे प्रगतीत
- **उजवा कालवा-** किमी.१४.१५ पूर्ण, हरणमाळ तलाव पूर्ण, गोताणे बंधारा पूर्ण
- **डावा कालवा-** किमी ३२.०८५ पैकी ० ते १० मधील काम ९० पूर्ण, किमी ११ ते २० चे कार्यारंभ आदेश पारित करण्यात आले आहेत. किमी २१ ते ३२ मधील ६० कामे पूर्ण.
- **पुनर्वसन-** प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या गावठाणात पुरवावयाच्या नागरी सुविधांची कामे, सैय्यदनगर ७० पूर्ण, वसमार १०० पूर्ण, तामसवाडी ८० पूर्ण, मौजे वसमार गावाचे नविन गावठाणात १०० स्थलांतर झाले आहे.
- प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ७५८५ हेक्टर असून सन २००७-०८ पासून सिंचन क्षमता निर्मिती सुरु झाली आहे. जून-२०१२ अखेर एकूण २४४२ हेक्टर सिंचन निर्मिती झाली आहे.
- प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा १०९.३१४ असून जून-२०१२ अखेर धरण ३५.०७ दलघमी पाणीसाठा निर्मितीक्षम झाले आहे.
- प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा ८८.८२ दलघमी असून त्यापैकी पिण्यासाठी धुळे शहर, गामीण, ए.सी.पी.एम. कॉलेज व छत्रपती शिवाजी पब्लीक स्कुल यासाठी एकूण २५.३३ दलघमी व धुळे औद्योगिक वसाहतीसाठी ८.५० दलघमी पाणीसाठा आरक्षित करण्यात आला आहे. धुळे शहराची लोकसंख्या सन-२००१ साली ३,४१,००० होती. सद्यःस्थितीत लोकसंख्या ४.४६,००० इतकी आहे. निम्नपांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्पामुळे हरणमाळ तलाव भरण्याची व्यवस्था झाली असून त्यामधून धुळे शहराचा अंशतः पाणी प्रश्न सुटला आहे.

- केंद्रीय जल आयोगाची मान्यता दिनांक २०/१/२००९ रोजीच्या ९५व्या बैठकीत प्राप्त झाली. मार्च-२००९ मध्ये रु.१३२.४३ कोटी अर्थसहाय्य मंजूर झाले आहे.

एआयबीपी वर्षनिहाय निधी-

- सन २००९-१० रु.५३.०६ कोटी, सन २०१०-११ रु.३१.५० कोटी, सन २०११-१२ रु.४३.०८ कोटी
- वरील वर्षनिहाय निधी एआयबीपी अंतर्गत प्राप्त झाला असून रु.१२७.३३ कोटी एवढा निधी खर्च झाले आहे.
- सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करण्यता येत असून वर्ष २०११-१२ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची अद्यावत अंदाजित किंमत रु.५९९ कोटी एवढी आहे.

विलंबाची कारणे-

- पुरेशा निधीच्या अनुपलब्धतेमुळे कालावधी २ वर्षाने वाढला आहे.
- बुडीतात येणाऱ्या सय्यदनगर, तामसवाडी, वसमार येथील प्रकल्पगस्तांच्या तिव्र विरोधामुळे कालावधीत १५ वर्ष वाढ झाली आहे.
- प्रकल्पगस्तांच्या विरोधामुळे भूसंपादन व पुनर्वसन प्रकियेत विलंब झाल्यामुळे २ वर्षाने कालावधीत वाढ झाली आहे.
- राष्ट्रीय महामार्गाच्या वळण रस्त्यासाठी १७८.९० हेक्टर वनजमिन संपादनामुळे ३ वर्ष विलंब झाला आहे.
- संकल्पनाच्या बदलामुळे परिमाणात वाढ होऊन त्यानुषंगाने २ वर्ष ३ महिने कालावधीत वाढ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- वाडी शेवाडी मध्यम प्रकल्प**	**तालुका- शिंदखेडा**		**जिल्हा- धुळे**	
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	७१७६	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर ३१८०		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसूची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ (शासन स्तर)	१२/२१/१९९२	१९९१-९२	१९.२४	७,१७६
	सुप्रमा-१ (महामंडळ स्तर)	४/६/१९९९	१९९८-९९	९८.४३	७,१७६
	सुप्रमा-२ (शासन स्तर)	५/२६/२०११	२००८-०९	२५८.३३	७,१७६
	सुप्रमा-३	-	-	-	-
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	-	-	-	-
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	११६.४९	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	३०.६४	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	८१.२७	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	४.५८	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९२-९३	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	१९९३	-	-	-
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ**	**-**	**-**	**२३९.०९**	**-**
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	१२४.७६		५२.१८	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ **(रु.७७.३३-०.५०रु.७६.८३ कोटी)**	७६.८३		३२.१३	
७.३	प्रकल्प व्याप्तील बदलामुळे झालेली वाढ (मुळे प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		-	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	६.०५		२.५३	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	३१.४५		१३.१६	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भूसंपादन ७५, पूनर्वसन ५० टक्के पूर्ण			
८.२	धरण	१०० टक्के पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	डावा कालवा पूर्ण, उजवा कालवा ५० टक्के पूर्ण			

वाडी शेवाडी मध्यम प्रकल्प, ता.शिंदखेडा. जि.धुळे
प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

७.१ दरसुचीतील वाढ-

मुळ प्रकल्प अहवाल सन १९९१-९२ च्या दरसूचीवर आधारीत होता. द्वितीय सुधारीत प्रकल्प अहवाल सन २००८-०९ दरसूचीनुसार तयार करण्यात आला आहे. त्यामुळे रु.१२४.७६ कोटी (५२.१८टक्के) वाढ झाली आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेल्या खर्चातील वाढ-

जमिनीच्या किंमतीत वाढ तसेच प्रकल्पगस्तांच्या संख्येत वाढ झाल्याने पुनर्वसन खर्चात रु.७६.८३ कोटी (३२.१३टक्के) वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-

धरणाचा काटछेद व इतर संकल्पनातील बदलामुळे झालेली वाढ तसेच दगडी बांधकामाऐवजी शासन परिपत्रकानुसार संधानकाचा वापर केल्यामुळे रु.६.०५ कोटी (२.५३टक्के) वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे-

प्रकल्प खर्चात वाढ झाल्यामुळे आस्थापना व अनुषंगिक खर्चात रु.३१.४५ कोटी (१३.१६टक्के) वाढ झाली आहे.

८ प्रकल्पाची सद्यःस्थिती-

- मातीधरण १०० पूर्ण, सांडवा १०० पूर्ण, पस्तंभ १०० पूर्ण, व्दारनिर्मिती व उभारणी १०० पूर्ण

कालवा-

उजवा कालवा- २३.१६ पैकी ० ते १० किमी काम प्रगतीत असून एकूण उजव्या कालव्याचे ५० काम पूर्ण झाले आहे.

डावा कालवा- ८.२५ किमी चे मातीकाम व बांधकाम पूर्ण

- वाडी गावाचे पुनर्वसन १०० झाले असून गाव स्थलांतरीत झाले आहे. दिवी पुनर्वसन गावाचे ले-आऊट होऊन प्लॉटन वाटप प्रकिया पूर्ण झाली आहे. नागरी सुविधा कामाची निविदा प्रकिया सुरु आहे.
- प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ३६.९३ दलघमी असून दिवी गावाचे पुनर्वसनासाठी धरणाचा पाणीसाठा २७१.०० मी. तलांकापर्यंत १२.५३९ दलघमी एवढा मर्यादीत ठेवला आहे.
- प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ७१७६ हेक्टर असून सन २००७-०८ पासून सिंचन निर्मितीस सुरुवात झाली असून जून-२०१२ अखेर ३१८० हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे व सन २००९-१० मध्ये १०० हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.
- सदर प्रकल्पातून चिमठाणे, शिंदखेडा साठी ०.७१ दलघमी पाणी आरक्षीत आहे.

विलंबाची कारणे-

- पुरेशा निधीच्या अनुपलब्धतेमुळे (९ वर्ष ५ महिने) कालावधी वाढला आहे
- वाडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील वाडी व दिवी येथील प्रकल्पगस्तांच्या तिव्र विरोधामुळे (४ वर्ष) कालावधी वाढला आहे.
- प्रकल्पगस्तांच्या विरोधामुळे भूसंपादन प्रकियेत २ वर्षाचा विलंब झाला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- सुलवाडे बॅरेज मध्यम प्रकल्प**	**तालुका- शिंदखेडा**		**जिल्हा- धुळे**	
२	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**	८५८२	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर- ८५८२		
३	**प्रशासकीय मान्यतेचा तपशिल**				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसूची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ (शासन स्तर)	४/४/१९९४	१९९२-९३	४२.०२	८,५८२
	सुप्रमा.- १ (महामंडळ स्तर)	४/६/१९९९	१९९८.९९	१३१.४८	८,५८२
	सुप्रमा.- २ (शासन स्तर)	१२/२६/२००१	१९९९-००	१७१.८३	८,५८२
	सुप्रमा - ३ (महामंडळ स्तर)	११/२०/२००७	२००६-०७	२९०.८८	८,५८२
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/Investment)संदर्भ व किंमत (रु.कोटी)	योजना आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क.२० (१३)/२००७-डब्ल्यु आर दि.१०.१२.२००७ अन्वये मान्यता पाप्त (रु.२९०.८८ कोटी)			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	२१९.६९	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	१.४०	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	२१७.९८	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	०.३१	-
५	प्रकल्पस पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९४-९५	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष **(१९९९ ची अद्यावत किंमत रु.६७.६७ कोटी)**	१९९९	-	-	-
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ**	**-**	**-**	**२४८.८६**	**-**
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	१६६.५९		६६.९४	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ **(रु.२.५७-०.७८ रु.१.७९ कोटी)**	१.७९		०.७२	
७.३	प्रकल्प व्याप्तील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	०		०	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	२६.२२		१०.५४	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	५४.२५		२१.८०	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भूसंपादन पूर्ण			
८.२	धरण	१०० टक्के बॅरेज पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	लागू नाही			

सुलवाडे बॅरेज मध्यम प्रकल्प, ता.शिंदखेडा. जि.धुळे
प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

७.१ दरसुचीतील वाढ-

मुळे प्रकल्प अहवाल सन १९९२-९३ च्या दरसूचीवर आधारीत होता. तृतीय सुधारीत प्रकल्प अहवाल सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आला होता. त्यामुळे रु.१६६.५९ कोटी (६६.९४टक्के) एवढी वाढ झाली.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेल्या खर्चातील वाढ-

जमीनीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे रु.१.७९ कोटी (०.७२ टक्के) किंमतीत वाढ झाली आहे.

४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत	सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाने पत्र क्र- F.No.२/(४२६)/२०११/WR, दि ८/५/२०११ अन्वये रु.२१७८.६७ एवढया किमतीस मान्यता दिलेली आहे.			
४.१	दिनांक ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)	रू. १८.४२ कोटी			
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	रू. ५.३१ कोटी			
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)	रू. १३.११ कोटी			
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)	निरंक			
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	सन १९९९-२०००			
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष	निविदेअंतर्गत संकल्पन व लाभक्षेत्र सर्व्हेक्षणाच्या कामास मे-२००२ मध्ये सुरुवात. (अंदाजीत किंमत रुपये ९११.३४ कोटी) प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ ११ जून २०१० तथापि पत्यक्ष कामास अद्याप सुरूवात झालेली नाही.			
७	**मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ	रु.१४८९.५३ कोटी			
	मुळ प्रमा किंमत रु. ६८९.१४ कोटी, प्रस्तावित सुप्रमा किंमतीनुसार	रु.२१७८.५३ कोटी			
		रक्कम (रु. कोटी)		टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ	७९३.७५		५३.२९	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एनपीव्ही मुळे खर्चात वाढ, मुळ तरतूद रु.१२.७४ कोटी, सुधारीत रु.८३.१९ कोटी	७०.४५		४.७३	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)	२७६.४३		१८.५६	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००		०.००	
७.५	इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)	३४८.९०		२३.४२	
	एकूण वाढ	१४८९.५३		१००.००	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन	योजनेसाठी लागणाऱ्या ५०७.३१ हे वनजमीनीस केंद्र शासनाची अंतिम मान्यता मार्च २००२ मध्ये मिळालेली आहे. खाजगी जमिनीची भुसंपादन पकिया प्रगतीत आहे. खाजगी जमीन सरळ खरेदी करणे प्रस्तावित आहे. प्रकल्पांअतर्गत पुनर्वसनाची आवश्यकता नाही.			
८.२	धरण	योजनेअंतर्गत जुनोने धरण व उपसा प्रणाली टप्पा-१ तसेच जामठी धरण व उपसा प्रणाली टप्पा-२ अशा दोन निविदा निश्चित झालेल्या आहेत. निविदेअंतर्गत संकल्पन व लाभक्षेत्र सर्वेक्षणांचे काम प्रगतीत आहे. पत्यक्ष धरणाचे व उपसा प्रणालीच्या कामास अद्याप सुरूवात झालेली नाही.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	संपूर्ण वितरण प्रणाली बदीस्त पाईप लाईन स्वरुपाची प्रस्तावित आहे. संकल्पन प्रगतीत.			

बोदवड परिसर सिंचन योजना, ता.बोदवड, जि.जळगाव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे व सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रु.७९३.७५ कोटी

मुळ प्रशासकीय मान्यता सन १९९९-२००० च्या दरसूचीनुसार होती. सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रक सन २००९-१० च्या दरसुचीनूसार आहे.

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रु.७०.४५ कोटी

(मुळ तरतूद रु.१२.७४ कोटी, सुधारीत रु.८३.१९ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- रु.२७६.४३ कोटी.

मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनेंतर्गत असलेल्या साळशिंगी धरणासाठी लागणाऱ्या ५३५ हेक्टर वनजमीनीसाठी निव्वळ वर्तमान मूल्यापोटी (NPV) रु.४७.६१ कोटी एवढी रक्कम वनखात्यास वर्ग करावी लागणार होती. तसेच १,१७,००० झाडे तोडावी लागणार होती. तसेच रुईखेडा धरणासाठी देखील वनजमीनीची आवश्यकता होती. म्हणून योजनेबाबत पुर्नअभ्यास व नियोजन करण्यात आले.

यात-

अ) मुळ प्रस्तावात असलेल्या पाच धरणांपैकी जुनोने धरणात कोणताही बदल न करता उर्वरीत साळशिंगी, रुईखेडा व शेलवड ही धरणे रद्द करुन जामठी धरणाची पाणी साठवण क्षमता ७.६५ दलघमी वरुन ७२.६४ दलघमी एवढी वाढविण्यात आली.

ब) उपसा प्रणालीच्या टप्पा-२ च्या उदभवात बदल, पंपींग मशीनरी व उध्दरण नलिकेच्या विसर्गात व लांबीत वाढ झाली.

क) एकूण पाणी वापरात बदल न करता प्रचलीत प्रवाही सिंचनाऐवजी ज्या पिकांना ठिंबक सिंचनाद्वारे सिंचन करणे शक्य आहे अशा प्रिकांना ठिंबक सिंचन प्रस्तावित करण्यात आले. यामुळे सिंचन क्षेत्र २७,०२७ हेक्टर ऐवजी ४२,४२० हेक्टर एवढे झाले. यापमाणे १५,३९३ हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ झालेली आहे व २२,४७५ हेक्टरने सिंचन क्षमतेत वाढ झाली. सारांशाने व्याप्तीत मोठया प्रमाणात बदल असून या व्याप्तीतील बदलामुळे रु.१७५.६० कोटीची वाढ झाली आहे.

या व्यतिरिक्त पवन उर्जा निर्मितीसाठी पवन चक्क्यांसाठी रु.९५.५० कोटी नव्याने तरतूद करण्यात आली.

पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक अतिरिक्त तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रु.१.७८ कोटी वाढ होत आहे. रस्त्यांची तरतूद आवश्यकतेनुसार वाढविण्यात आली आहे. रु.३.५५ कोटी वाढ होत आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- निरंक

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च)- रु.३४८.९० कोटी

- ज्यादा किमतीच्या निविदेमुळे रु.१७.३९ कोटी वाढ होत आहे.
- प्रकल्पाची किंमत वाढल्याने इ.टी.पी मध्ये रु.९१.८२ कोटी वाढ होत आहे.
- प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात वितरीकांसाठी ढोबळ दराने किंमत गृहीत धरली होती. अद्यावत किंमत काढतांना सविस्तर अंदाजपत्रकानुसार किंमत काढण्यात आली. यामुळे दरसुचीतील वाढ वगळता रु.१९९.२६ कोटी वाढ झाली.
- इतर अनुषंगिक कारणांमुळे रु.४०.४३ कोटी वाढ होत आहे.

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- पुरेसा निधी उपलब्ध नसणे.
- वनजमीनीस मान्यता मिळण्यास विलंब
- प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल (लाभक्षेत्रात विदर्भाचे क्षेत्र समाविष्ट केले.)
- मा.मुख्य सचिव यांनी दिनांक १९ जुलै-२०११ रोजी घेतलेल्या बैठकीत निर्देश दिल्यानुसार योजनेचे काम सुरु करण्यापूर्वी मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मंत्रीमंडळाची मान्यता मिळणेचा प्रस्ताव महामंडळामार्फत दिनांक १२/१०/२०१२ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती- मार्च-२०१२ अखेर

- **उपसा सिंचन टप्पा-१ व साठवण तलाव जुनोने-** या निविदेस माहे १२/१९९९ मध्ये Letter of Intent देण्यात आले होते. निविदेंतर्गत वनजमीनीस मार्च-२००२ मध्ये मान्यता मिळविण्यात आल्यानंतर मे-२००२ मध्ये प्रत्यक्ष काम सुरु करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार निविदेंतर्गत लाभक्षेत्र सर्वेक्षणाचे काम अंतीम टप्प्यात आहे. निविदेंतर्गत संकल्पनाचे काम काही प्रमाणात करण्यात आले आहे. प्रत्यक्ष कामास अद्याप सुरुवात झालेली नाही.
- **उपसा सिंचन टप्पा-२ व साठवण तलाव जामठी-** निविदेंतर्गत संकल्पनाचे काम प्रगतीत आहे. प्रत्यक्ष कामास अद्याप सुरूवात झालेली नाही.
- **कालवा व वितरिका प्रणाली-** संपूर्ण कालवा व वितरिका प्रणाली बंदीस्त पाईपलाईनची प्रस्तावित. कालवा व वितरिका प्रणालीची संपूर्ण कामे बाकी.
- प्रकल्पास केंद्र शासनाकडून Special Plan Assistance अंतर्गत एकरकमी रु.५०० कोटी **अर्थसहाय्य देण्याचा निर्णय झाला असल्याचे** केंद्र शासनाच्या जलसंसाधन मंत्रालयाचे पत्र क-२७/२/२०१२-PR दिनांक २४/७/२०१२ अन्वये सुचीत करण्यांत आले असून यापत्रान्वये मागणीकृत माहिती केंद्र शासनास सादर करण्यांत आली आहे. व त्यावरील शेऱ्याची पुर्तता तापी पाटबंधारे विकास महामंडळा मार्फत दिनांक ११/१०/२०१२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनास करण्यात आली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- पदमालय-२ सिंचन योजना**	**तालुका- एरंडोल**		**जिल्हा- जळगांव**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	१३१४० हे.		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर)- जून-२०१२	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प.मा. (महामंडळ स्तर)	३/१/१९९९	१९९७-९८	९५.४४	१३१४०
	सुप्रमा.- १ (महामंडळ स्तर)	-	२०११-१२	१६६.८६	१३१४०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता TAC/Investment संदर्भ व किंमत (रु.कोटी)	सदर प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाने पत्र क्र- Maha/६३-२००३/ PAC/३६ दि १६/०३/२००५ अन्वये तत्वतः मान्यता दिलेली आहे.			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	७१.८४	-	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	१४.१५	-	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	५४.४९	-	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	३.२०	-	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	-	२००२-०३	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	-	१/२००३	-	-
७	**मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे**				
	एकूण वाढ	रु. ७१.४२ कोटी			
	मुळ किंमत रु.९५.४४ कोटी, प्रस्तावीत सुप्रमानुसार	रू.१६६.८६ कोटी			
		रक्कम (रु.कोटी)		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	१९.५६		२७.३९	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ, मुळ तरतूद रु. ४.९३ कोटी, सुधारीत रु. ४९.८७ कोटी (प्रस्तावीत)	४४.९४		६२.९२	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		०.००	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	-		०.००	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) (इटीपी आस्थापनासह)	६.९२		९.६९	
	एकूण वाढ	७१.४२		१००.००	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**				
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	भूसंपादन अंतिम निवाडा कार्यवाही सुरु			
८.२	धरण	धरण कामे ९१ टक्के पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कालवा व वितरण व्यवस्था बाकी.			

पद्मालय-२ उ.सिं.योजना, ता.एरंडोल जि.जळगाव

प्रकल्पाच्या किंमतीत वाढीची व पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे, सद्यःस्थिती

१) प्रकल्प किंमतीतील वाढ

७.० मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे

७.१ दरसूचीतील वाढ- रुपये १९.५६ कोटी

७.२ भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ- रुपये ४४.९४ कोटी (मुळ तरतूद रु. ४.९३ कोटी, सुधारीत रु. ४९.८७ कोटी)

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ- निरंक

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ- निरंक

७.५ इतर कारणे (अनुषंगीक खर्चासह आस्थापना खर्च) - रुपये ६.९२ कोटी

स्वामित्व धन दर इटीपी आस्थापना वाढ झाल्याने रुपये ३.२० कोटी

गाभा भरावाकरीता माती वाहतुक अंतर वाढ झाल्याने-रुपये ३.७२ कोटी

२) प्रकल्पास विलंब होण्याची कारणे-

- सदर प्रकल्पास ५८ हेक्टर वन जमिन संपादन करण्याकरीता सुमारे ३.५ वर्षे कालावधी.
- महसुल जमिन संपादनाकरीता ८ वर्षाचा कालावधी लागला.
- अपुऱ्या निधीमुळे प्रकल्पास विलंब.

३) प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती-

- पद्मालय उपसा सिंचन योजने अंतर्गत मुख्य धरण, उपसा प्रणाली, कालवा कामे समाविष्ट असून धरणाचे ९० मातीकाम पुर्ण झालेले आहे.
- निधी अभावी उपसा प्रणाली, कालवा कामे बाकी आहेत.
- प्रकल्पाची भूसंपादन कार्यवाही १५२ हे. पुर्ण झालेली असून उर्वरीत १५१ हे. अंतीम टप्प्यावर आहे.
- वनजमिन हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण झालेली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव-** सुलवाडे-जामफळ कनोली उसिंयो	**तालुका- शिंदखेडा**		**जिल्हा- धुळे**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	५२७२०		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर निरंक	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ (महामंडळर स्तर)	१/९/१९९९	१९९९-००	७८८.८९	५२,७२०
	सुप्रमा.- १	-	-	-	-
	सुप्रमा.- २	-	-	-	-
	सुप्रमा.- ३	-	-	-	-
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	७/११/२०१२	२०११-१२	२,२६१.२१	५२,७२०
		केद्रिय जल आयोगाचे दिनांक ११/७/२०१२ चे पत्रानुसार योजनेची अद्यावत किंमत रु.२२६१.२१ कोटी आहे. अद्याप केंद्रीय जल आयोगाची मान्यता बाकी आहे.			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	८.९२	-	८.९२	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	१.३५	-	१.३५	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	७.५७	-	७.५७	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	-	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९९-००	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	-	-	-	-
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ	-	-	१,४७२.३२	-
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	९६५.०७		६५.५५	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	४.२५		०.२९	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	-		-	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	-		-	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	५०३.००		३१.१६	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती-**	प्रकल्पाचे काम भौतिकदृष्ट्या सुरु झालेले नाही.			
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	२३७ हेक्टर वनजमिन प्रस्तावास दिनांक २३/७/२००२ रोजी अंतिम मान्यता मिळाली आहे. तसेच पर्यावरण प्रस्ताव दिनांक १६/८/२००२ अन्वये मान्यता पाप्त आहे. पुनर्वसनाची आवश्यकता नाही.			
८.२	धरण	कामास सुरुवात नाही.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कामास सुरुवात नाही.			

सुलवाडे जामफळ कनोली उ.सिं.योजना, ता.शिंदखेडा, जि.धुळे
प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

- तापी नदीतील पुराचे ९.२४ अघफू पाणी उपसा करुन अस्तित्वातील ९ तलाव व ४ नवीन साठवण तलावात साठवून धुळे व शिंदखेडा तालुक्यातील ९८ गावांचे एकूण ३३३६७ हेक्टर लाभक्षेत्र ओलीताखाली आणण्याचे प्रस्तावित आहे.
- जामफळ धरणाची सध्याची साठवण क्षमता २.३४ दलघमी एवढी असून उंची वाढवून सदर साठवण क्षमता १६१.९४ दलघमी होणार आहे.
- केंद्रीय जल आयोगास दिनांक २६/३/२०१२ रोजी सादर केलेल्या तापी खो-याच्या बृहत आराखडयात समावेश केल्याने सन २०११-१२ चे दरसुचीवर आधारित सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक ४/५/२०१२ रोजी केंद्रीय जल आयोगास सादर करण्यात आला.
- केंद्रीय जल आयोगाचे दिनांक ११/७/२०१२ चे पत्रानुसार योजनेची अद्यावत किंमत रु.२२६१.२१ कोटी अंतिम करण्यात आली.
- दिनांक २४/७/२०१२ च्या केंद्रीय जल आयोगाच्या बैठकीत सदर योजनेवर उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता प्रगतीपथावर आहे.
- योजनेच्या अद्ययावत किंमतीस राज्य शासनाच्या वित्त व नियोजन विभागाची मान्यता मिळण्याचा प्रस्ताव दिनांक १८/६/२०१२ रोजी शासनास सादर.
- अद्यावत किंमतीचे अंदाजपत्रक दिनांक ११/७/२०१२ रोजी महासंचालक, संकल्पन पशिक्षण जलविज्ञान संशोधन व सुरक्षा, नाशिक (अध्यक्ष, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती) यांना सादर.

७.५ इतर कारणे-

१) मुळ अंदाजपत्रकात आस्थापना खर्च मुख्य धरण व कालवे याचें किंमतीच्या १ गृहीत धरण्यात आला होता मात्र आता केंद्रीय जल आयोगाचे सुचनेनुसार अनुकमे ९ व ११ घेण्यात आल्याने रु.१७७.३२ कोटी वाढ होते.

२) मुळ अंदाजपत्रकाचे वेळी (सन १९९९) , विमा व स्वामित्व धनाची तरतूद करण्यात येत नव्हती. शासनाने नंतर केलेल्या सुधारित नियमानुसार सदर तरतूद केल्याने रु.३२५.६८ कोटी वाढ होते.

३) वरील १ व २ मुळे एकूण रु.५०३ कोटी वाढ होत आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशिल

१	**प्रकल्पाचे नाव- प्रकाशा बुराई उ.सिं.योजना**	**तालुका- नंदुरबार**		**जिल्हा- नंदुरबार**	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	७४३९		निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जून-२०१२ अखेर ०	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल				
	मुळ प्रशासकीय मान्यता	**दिनांक**	**दरसुची सन**	**किंमत (रु.कोटी)**	**प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)**
	मुळ प.मा. (महामंडळ स्तर)	२.२.१९९९	१९९७-९८	११०.१०	७,४३९
	सुप्रमा.- १	-	-	-	-
	सुप्रमा.- २	-	-	-	-
	सुप्रमा.- ३	-	-	-	-
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता संदर्भ व किंमत (रु.कोटी)	२६.०३.२०१२	२०११-१२	४३९.३१	७,४३९
		राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती नाशिक व केंद्रीय जल आयोग, नागपूर यांना रु.४३९.३१ कोटी किंमतीचा अद्ययावत प्रकल्प अहवाल दरसुची २०११-१२ नुसार तांत्रिक तपासणीसाठी सादर करण्यांत आला आहे.			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	-	-	१.५२	-
४.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	-	-	०.४५००	-
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	-	-	१.४८००	-
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	-	-	-	-
५	प्रकल्पास पथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	२०००-२००१	-	-	-
६	प्रकल्पाच्या धरणाचे पत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	२०१२	-	-	-
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्चातील वाढ	निरंक	-	३२९.२१	-
	वाढीतील कारणे	**रक्कम (रु.कोटी)**		**टक्केवारी**	
७.१	दरसुचीतील वाढ	२३१.१२०		७०.२०	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन / वनजमिन व एनपीव्ही मुळे खर्चातील वाढ	१.३१०		०.४०	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	निरंक		-	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	निरंक		-	
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	९६.७८०		२९.४०	
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती-**	प्रकल्पाचे उर्ध्वगामी नलिकेचे काम साक- ० ते ७००० मी. मध्ये २/२०१२ मध्ये सुरु करण्यात आले आहे.			
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन संपादन	४.३३ हे. वन जमिन प्रस्ताव अंतीम मान्यता पाप्त झाली आहे. खाजगी भूसंपादनाची पकिया प्रगतीत आहे. पुनर्वसनाची आवश्यकता नाही.			
८.२	धरण	लागू नाही.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	लागू नाही.			

प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजना ता.जि.नंदुरबार

प्रकल्पाच्या कामाबाबत झालेली विलंब व वाढीबाबत टिप्पणी

प्रकल्पाची सद्यःस्थिती-

- तापी नदीतील पुराचे १.४२ अघफू पाणी उपसा करुन अस्तित्वातील १ मध्यम, १ लघु तलाव व २ नवीन साठवण तलावात साठवून नंदुरबार व शिंदखेडा तालुक्यातील एकूण ७०८५ हेक्टर लाभक्षेत्र ओलीताखाली आणण्याचे प्रस्तावित आहे.

- केंद्रीय जल आयोगास दिनांक २६/३/२०१२ रोजी सादर केलेल्या तापी खोऱ्याच्या बृहत आराखडयात समावेश केल्याने सन २०११-१२ चे दरसुची वर आधारित सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक .११/७/२०१२ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती व केंद्रीय जल आयोग, नागपूर यांना रु.४३९.३१ कोटी किंमतीचा सादर करण्यांत आला आहे.

- एकुण रु.३२९.२१ कोटी इतकी वाढ होत आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत तपशील
प्रकल्पनिहाय (टिप्पणीसह)
अ नु क्र म णि का

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
अ)	**मोठे प्रकल्प**		
१	निम्न दुधना प्रकल्प जि. जालना	१	४
२	जायकवाडी प्रकल्प टप्पा-2	५	८
३	मांजरा प्रकल्प ता. केज जि. बीड	९	१२
४	निम्न तेरणा प्रकल्प (प्रवाही) ता. लोहारा जि. उस्मानाबाद	१३	१५
५	कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प ता.जि. उस्मानाबाद	१७	१९
६	शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प ता.जि. नांदेड	२१	२४
७	उर्ध्व पेनगंगा प्रकल्प	२५	२८
८	लेंडी प्रकल्प ता. मुखेड जि. नांदेड	२९	३१
९	उर्ध्व प्रवरा (निळवंडे) प्रकल्प ता.अकोले जि.अहमदनगर	३३	३५
१०	मुळा प्रकल्प ता. राहुरी जि. अहमदनगर	३७	३९
११	नांदूर मधमेश्वर प्रकल्प ता.जि. नाशिक	४१	४८
१२	कडवा मोठा प्रकल्प, ता.इगतपुरी जि. नाशिक	४९	५०
१३	उर्ध्व गोदावरी प्रकल्प ता.दिंडोरी जि. नाशिक	५१	५४
ब)	**मध्यम प्रकल्प**		
१	शिवना टाकळी मध्यम प्रकल्प ता.कन्नड जि. औरंगाबाद	५५	५७
२	वाकोद मध्यम प्रकल्प ता.फुलंब्री जि. औरंगाबाद	५९	६०
३	ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना ता.पैठण जि. औरंगाबाद	६१	६३
४	उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प ता. वडवणी जि. बीड	६५	६९
५	रेणापूर मध्यम प्रकल्प ता. रेणापूर जि. लातूर	७१	७३
६	संगमेश्वर मध्यम प्रकल्प ता. भूम जि. उस्मानाबाद	७५	७६
७	वाघोली मध्यम प्रकल्प ता.जि. उस्मानाबाद	७७	७८
८	बाभळी बंधारा ता. धर्माबाद जि. नांदेड	७९	८१
९	उर्ध्व मानार मध्यम प्रकल्प लिंबोटी ता. लोहा जि. नांदेड	८३	८५
१०	ताजनापूर उपसा सिंचन टप्पा-1 व 2 ता. शेवगाव जि. अहमदनगर	८७	८९
११	गौतमी गोदावरी मध्यम प्रकल्प ता.त्र्यंबकेश्वर जि. नाशिक	९१	९२
१२	काश्यपी मध्यम प्रकल्प ता.जि. नाशिक	९३	९४

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	निम्न दुधना प्रकल्प ता.सेलु , जि.परभणी.			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	५३३७९ हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	२२८२२ हेक्टर			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३०/०५/१९७९	१९७८-७९	२८.४१	४०९८३
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	०४/१०/१९९९	१९९५-९६	४७४.०६	५३३७९
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२१/०१/२००८	२००६-०७	१०२५.७८	५३३७९
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	कें. ज. आ. पत्र १०/३४/७०/सीए/(आय) २३४ दि.३०/१०/२००९ रु.१३४९.५० कोटी (सन २००८-०९)			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७८-७९ ते १९९४-९५ पर्यंत २) १९९५-९६ ते १९९९-२००० .. ३) २०००-२००१ ते २०११-१२ .. एकुण ..		रु. ५.६७ कोटी रु. ९१.१४ कोटी रु. ९३६.६४कोटी रु. १०३३.४५ कोटी	
४.२	भू-संपादन,पुनर्वसन,वनजमीन संपादन खर्च	रु. २३८.८० कोटी			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	७०७.२३			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	८७.४२			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१०३३.४५- सुधारीत तृतीय प्र.मा. साठी राज्य तांत्रीक सल्लागार समितीकडे सादर.			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७८-१९७९			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९९४-९५ (नोंव्हेबर-१९९४) (किंमत रु. १००.७९ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत	वाढीव रक्कम	टक्केवारी (वाढीव रकमेची)
		अ	**ब**	**क = (ब - अ)**	**ड**
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	२०.७६	५१७.६२	४९६.८६	४९.८२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	४.२६	१४९.१४	१४४.८८	१४.५३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	४६.००	४६.००	४.६१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२०९.२७	२०९.२७	२०.९८
७.५	इतर कारणे ETP संह	३.३९	१०३.७५	१००.३६	१०.०६
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	२८.४१	१०२५.७८	९९७.३७	१००.००.००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	९० % पूर्ण. वन जमिनीचे संपादन आवश्यक नाही.			
८.२	धरण	९९ % काम पूर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	१) निम्न दुधना डावा कालवा कि.मी.१ ते ६९ :- ९२ % पूर्ण. २) निम्न दुधना उजवा कालवा कि.मी.१ ते ४८ :- ४७ % पूर्ण. ३) नि.दु.डावा /उजवा कालव्यावरील वितरण व्यवस्था: :- २६ % पूर्ण.			

निम्न दुधना प्रकल्प ता.सेलु ,जिल्हा परभणी

संक्षिप्त टिप्पणी

१.० निम्न दुधना प्रकल्प परभणी जिल्हयातील सेलू तालुक्यात ब्रम्हवाकडी येथे दुधना नदीवर बांधण्यात येत आहे. या प्रकल्पास शासन निर्णय जीओस पत्र क्र. पिआरएम ६९७९/(१७३२) एम दिनांक ३०.५.१९७९ अन्वये दरसूची १९७८-७९ वर आधारित रु. २८.४१ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. केंद्रिय जल आयोगाने या प्रकल्पाच्या सुधारित प्राकलनास रु. ५३.२१ कोटी (दरसुची १९८२-८३) च्या किंमतीस पत्र क्र.२ (११२) ८२- आय ऍन्ड कॅड, भारत सरकार योजना आयोग दिल्ली दि.३१.३.१९८३ अन्वये मान्यता दिलेली आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार या प्रकल्पाचे धरण, डावा कालवा लांबी ६४ किमी व उजवा कालवा लांबी ४० किमी कामाचा समावेश असुन या व्दारे एकुण ४०९८३ हेक्टर पिकाखालील सिंचन क्षेत्र प्रस्तावित होते.

२.० निम्न दुधना या प्रकल्पाच्या १९७९ मध्ये प्रशासकीय मान्यतेनंतर यांत्रिकी संघटने मार्फत माती धरणाचे काम सन १९८३ मध्ये सुरु करण्यात आले. धरणाच्या बुडीत क्षेत्रातील शेतजमिनी सुपिक व बागायती असल्याने प्रकल्पग्रस्तांनी प्रचंड विरोध दर्शवून हे काम १९८३ मध्ये बंद पाडले. या विरोधामुळे धरणाचे काम १९८३ ते नोव्हेंबर १९९४ दरम्यान जवळपास अकरा वर्षे बंद होते. जानेवारी-१९९४ मध्ये यांत्रिकी संघटने मार्फत काम सुरु करण्यांत आले परंतू प्रकल्पग्रस्तांनी यांत्रिकी संघटनेच्या मशिनरीची मोठया प्रमाणात जाळपोळ करुन काम सुरु होवू दिले नाही. सन १९७९ ते १९९४ पर्यंत प्रकल्पाच्या कामास अत्यल्प निधीची तरतुद झालेली होती. (१९९४ पर्यंत रु. १.८३ कोटी खर्च)

३.० मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि.६.११.१९९४ रोजी प्रकल्पाच्या बांधकामाचा शुभारंभ झाला व त्या कार्यक्रमात जाहीर भाषणात मा.मुख्यमंत्र्यानी प्रकल्पग्रस्तांचा विरोध लक्षात घेवून ''विस्थापित लोकांच्या समस्यांचा सहानुभूती पूर्वक विचार करण्यात येईल. प्रकल्पबाधित लोकांच्या फायद्याच्या दृष्टीकोनातुन बाधित क्षेत्रातील गावाच्या उर्वरित जमिनी सिंचीत करण्यासाठी जलाशयातील २०% पाण्याचा साठा राखीव ठेवण्यात येईल व त्यासाठी शासकीय खर्चाने उपसा सिंचन योजना राबविण्यात येईल'' असे घोषीत केले. या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांचे घोषणेनुसार शासन पत्र क्र.गोपनिय/निदुप्र/१०९३/१७०२/(२०९/९३) मो.प्र(२) दि.१३.१.१९९५ अन्वये जलाशयातील २० टक्के पाणी राखीव ठेवण्याचे आदेश दिले तसेच या पाण्याव्दारे दुधना प्रकल्पाच्या जलाशयावर प्रकल्पाचा भाग म्हणून चार उपसा सिंचन योजनेच्या रु २६.७४ कोटीच्या प्रस्तावास शासन पत्र क्र./निदुप्र/७९५/१५९३/२९६/९५ मो.प्र. दि.२४.२.१९९७ अन्वये मान्यता दिली. या उपसा सिंचन योजनेव्दारे ८८९७ हेक्टर (पिकक्षेत्र) सिंचनक्षेत्र व मुळ पिकरचनेत बदल करुन कालव्याद्वारे ४४४८२ हे. पिकक्षेत्र अशी एकुण सिंचनक्षमता ५३३७९ हेक्टर (पिकक्षेत्र) निर्माण करण्याचे नियोजन आहे.

४.० सन १९९३ मध्ये आलेल्या भुकंपामुळे भुकंप झोनमध्ये बदल झाला त्यामुळे मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक यांनी धरणाचा काटछेद सुधारीत केला. उपरोक्त उपसासिंचन योजनांची कामे व दोन्ही कालव्यासाठी साधे विमोचक बांधण्याऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचके बांधण्याचे, कामाच्या खर्चाचा समावेश करुन प्रकल्पास प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता शासन पत्र क्र./निदुप्र/१०९३/ ८२७/१२४/९३/मो.प्र. (२) मुंबई दि.४.१०.१९९९ अन्वये रु. ४७४.०६ कोटी (दरसुची १९९५-९६) रक्कमेस मिळाली आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यतेनूसार एकुण रु. ४४५.६५ कोटी एवढी वाढ झाली आहे. प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत १२३९६ हेक्टर सिंचन क्षेत्राची वाढ झालेली आहे. किंमतीतील वाढीमध्ये दरसुचीतील वाढ रु. २५७.९५ कोटी (दरसुची १९७८-७९ ते १९९५-९६), भुसंपादन व पुनर्वसन रु. २४.७९ कोटी, संकल्पचित्रातील बदल रु. ४२.५८ कोटी (उपसा सिंचन योजनेचा समावेश व सुधारित सिंचन तथा विद्युत विमोचकाचे बांधकामे), नवीन तरतूद रु. ६३.३५ कोटी (केंद्रिय जल आयोगाच्या निर्देशानुसार पर्यावरण व पाणलोट विकास तरतूद, गतिशिल पाणी नियमन बाबतची तरतूद), इतर कारणे रु. ५६.८६ कोटी (प्रत्यक्ष सर्वेक्षणाअंती बुडीत जमिनीच्या क्षेत्रफळातील वाढ व पुनर्वसन बाधित घराची/ विहीरीची/ झाडांच्या संख्येतील वाढ) अशी एकूण प्रकल्पाची किंमत रु. ४४५.६५ कोटीने वाढ झालेली आहे.

५.० सन १९९४-९५ पासुन धरणाचे कांही काम कंत्राटदारामार्फत तसेच उर्वरित कामे यांत्रिकी संघटने मार्फत सुरु करण्यात आली. तसेच सन १९९६-९७ पासुन दोन्ही कालव्याचे संरेखा सर्वेक्षणाचे कामे सुरु करुन २००३-०४ मध्ये कंत्राटदारामार्फत मुख्य कालव्याची कामे सुरु करण्यात आली. पुनर्वसनाची कामे सन ९५-९६ पासुन सुरु करण्यात आली. नोव्हेंबर २००१ ते नोव्हेंबर-२००७ या काळात विविध कालावधीत ३८ वेळेस प्रकल्पग्रस्तांनी धरणाचे काम बंद पाडले. प्रकल्पग्रस्तानी जमिनीचा मोबदला वाढीव मिळावा व इतर कारणामुळे कामांत वेळोवेळी अडथळा निर्माण करुन कामे बंद पाडली. काम बंद असलेला एकुण कालावधी ८४६ दिवस (२ वर्ष ४ महिने) आहे. त्यामुळे प्रकल्पाची प्रगती मंद गतीने झाली.

६.० प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नसल्याने सदरील प्रकल्प केंद्र शासनाच्या ए.आय.बी.पी. अंतर्गत सन २००५-०६ मध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले. त्यानुसार ए.आय.बी .पी. अंतर्गत या प्रकल्पाचा समावेश करताना सन २०००-०१ च्या दरसूची नुसार प्रकल्पाची किंमत अद्यावत करण्यात आली. त्यामुळे निम्न दुधना धरण ,पुनर्वसन, डावा कालवा कि.मी. १ ते ५५ व निम्न दुधना उजवा कालवा कि.मी. १ ते ४५ व त्यावरील वितरण व्यवस्थेची एकूण किंमत रु. ३११.९७ कोटी एवढी अे.आय.बी.पी. अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली. सिंचन क्षमता २९१२३ हेक्टर प्रस्तावित करण्यात आलेली होती. त्यानुसार ही कामे २००९-१० अखेर पुर्ण करावयाची होती. निम्न दुधना उजवा कालवा कि.मी. ४६ ते ४८, निम्न दुधना डावा कालवा कि.मी. ५६ ते ६९, व त्यावरील वितरण व्यवस्थेची कामे व उपसा सिंचन योजनेच्या कामाचा समावेश अे.आय.बी.पी. अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेला नव्हता.

६.० चे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण झालेले नसल्याने नमुना अंदाजपत्रकाच्या आधारे व विसर्गाच्या आधारे कालव्यासाठी लागणारा खर्च परिगणित केलेला होता, तसेच वितरणप्रणाली साठी लाभक्षेत्राच्या प्रति हेक्टरी किंमत धरुन तरतूदी ठेवण्यात आलेल्या होत्या. तथापि उजवा कालवा २५ किमी. व डावा कालवा ३५ किमी. संरेखेचे सविस्तर सर्वेक्षण पूर्ण करुन व पेव्हर लायनिंगचा समावेश करुन कालव्याच्या कामासाठी मंजुर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार निविदा काढून कंत्राटदारामार्फत काम चालू करण्यात आले.कालवा वितरणप्रणालीसाठी १०० टक्के अस्तरीकरण प्रस्तावित असल्याने किंमतीत वाढ होणार असल्याचे निदर्शनास आले. उपसा सिंचन योजनेच्या सविस्तर सर्वेक्षणानुसार शिर्ष कामाच्या मंजुर तांत्रिक अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ व या योजनेची वितरण प्रणालीसाठी प्रकल्पातील बुडीत क्षेत्रा लगत उर्वरित जमिनी देण्यास प्रकल्पग्रस्तांचा विरोध लक्षात घेता पाईप व्दारे वितरण व्यवस्थेचे काम करणे आवश्यक होते. यामुळे वितरण व्यवस्थेच्या किंमतीत वाढ होणार असल्याचे निर्दशनास आले. मुख्य धरणाचे कामात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचे सविस्तर संकल्पनेनूसार व क्षेत्रीय परिस्थिती नुसार काही तांत्रिक बदल अपरिहार्य ठरले. त्यामुळे प्रकल्पाचे खर्चात होणारी वाढ लक्षात घेवून व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार केला. त्यास गो.म.पा.वि.महामंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्र.ताशा-१/निदुप्र/प्र.म/सुप्रमा/२/२००८, दि.२१.१.२००८ अन्वये रु. १०२५.७८ कोटी किंमतीस मान्यता मिळालेली आहे. व्दितीय सुधारित मान्यतेमध्ये प्रथम सुधारित मान्यतेच्या तुलनेत एकुण किंमतीत रु. ५५१.७२ कोटी एवढी वाढ झाली. यामध्ये दरसुचीतील वाढ रु.१८२.९८ कोटी (दरसुची १९९५-९६ ते २००६-०७), उच्च दराच्या निविदा रु.५५.८६ कोटी, भुसंपादनातील वाढ रु. १२०.०१ कोटी, संकल्पचित्र व अभियांत्रीकी बदल रु. १६७.७२ कोटी, कामाच्या व्याप्तीतील बदल रु.१४.९१ कोटी (बुडीत क्षेत्रातील राज्य महामार्गावरील दोन पुलांची उंची वाढविणे), नविन तरतूद व इतर कारणे रु. १०.२४ कोटी (वितरण व्यवस्थेचे १००% अस्तरीकरण), अशी एकुण ५५१.७२ कोटी एवढी वाढ झाली.

७.० केंद्रिय जल आयोग नवी दिल्ली यांनी ए.आय.बी.पी. अंतर्गत अर्थसहाय्य सलगतेने चालू राहण्यासाठी प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रकीय (दरसुची २००८-०९) किंमत रु. १३४९.५० कोटीस मान्यता त्यांचे पत्र क्र. १०/३४/७०/सीए(आय)/२३४, दि.३०.१०.२००९ अन्वये प्रदान केलेली आहे. सदरील प्रस्तावित डाव्या व उजव्या कालव्या वरील संपुर्ण लांबीतील कामे समाविष्ठ आहेत. अे.आय.बी.पी. प्रस्तावात उपसा सिंचन योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही.

८.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)

अ) पूनर्वसन :- **निम्न** दूधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात २२ गावे पूर्णत: बाधीत होतात.सदरील गावांचे नविन ठिकाणी पूनर्वसन करणे प्रकल्प अहवाला प्रमाणे प्रस्तावीत आहे. त्याचप्रमाणे ५ गावातील अंशत: जमिन बाधीत होते.एकूण २२ गावातील २१ गावे जालना जिल्ह्यातील व एक गाव परभणी जिल्ह्यातील आहे. २२ गावांचे पूनर्वसन २१ नविन गावठाणात करण्यात येत आहे. परभणी जिल्हा अंतर्गत ३ गावे पूनर्वसीत करण्यात येत असून जालना जिल्ह्यात १९ गावे १८ ठिकाणी पूनर्वसीत करण्यात येत आहेत. २२ गाव पैकी मौजे मापेगाव (बु.) व मौजे नानसी या गावामधील प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी पूनर्वसीत नविन गावठाणाच्या जागा बदलाची मागणी केली. मौजे मापेगांव (बु.) व मौजे नानसी गावातील प्रकल्पग्रस्तांकरिता निवडलेल्या नविन गावठाणाची जमिन संपादित करतांना जमिन धारकांनी विरोध दर्शविला व सन २००८ मध्ये मा.उच्च न्यायालयामध्ये याचीका दाखल केली. मा.उच्च न्यायालयात सदरील याचीका दि.३१/०३/२००९ मध्ये फेटाळण्यात आल्या, तरीही मौजे मापेगांव (बु.) व मौजे नानसी पुनर्वसन गावठाणातील जमीन मालकांनी आपला विरोध कायम ठेवला. भूधारकांच्या विरोधामुळे नविन गावठाणाच्या जमिनी ताब्यात घेण्यास विलंब झाला. मौजे मापेगाव येथील जमिन दि. ०६/०६/२००९ व मौजे नानसी येथील जमीनी दि.१८/०६/२०११ रोजी पोलीस बंदोबस्तात ताब्यात घेण्यात आल्या. या दोन्ही गावठाणातील कांही जमीन मालकांनी जिल्हा/उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत त्याचा निर्णय प्रलंबीत आहे. त्यास्तव मौजे मापेगांव (बु.)

व मौजे नानसी बाधीत गावे स्थलांतरीत करण्यात विलंब झाला. या पैकी मौजे नानसी या गावाचे स्थलांतरण प्रगतीपथावर असून, मौ मापेगांवचे स्थलांतर झाले आहे. सदरील स्थलांतरीत गावांसाठी १३ नागरी सुविधांची कामे जवळपास पूर्ण झाले असून उर्वरीत ५ नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

ब) धरण :- निम्न दूधना धरणाचे काम सन १९८३ मध्ये सुरु झाले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे धरणाचे काम सन १९९४ पर्यंत बंद राहीले. शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचा सहानूभूतीपूर्वक विचार करुन प्रकल्पग्रस्तांच्या उर्वरीत जमिनीसाठी शासन खर्चाने चार उपसा सिंचन योजना घेण्याचा निर्णय घेतला व धरणाचे काम सन १९९४ मध्ये पून्हा सुरु करण्यात आले. प्रकल्पाला सुरुवातीच्या काळामध्ये अपूरा निधी प्राप्त होत गेला. प्रकल्प त्वरेने पूर्ण करणेसाठी व प्रकल्पाचा फायदा मिळणेसाठी अेआयपीबी मध्ये समावेश करण्यात आला. प्रकल्पास वित्त विभाग पत्र क्रं एसएफ क्रं ४४(१) पीएफ-१/२००५-१६८ भारत सरकार एमएफ विभाग नवी दिल्ली दि.३१/०१/२००६ अन्वये एआयबीपी अंतर्गत अनूदान प्राप्त झाले. प्रकल्पांला एआयबीपी अंतर्गत निधी उपलब्ध झाल्यामुळे कामाची गती वाढली. मुख्य धरणाचे काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे. प्रकल्पामध्ये सन २००९-१० मध्ये जोतापातळी पर्यत ५६ दलघमी पाणी अडविण्यात आले, सन २०१०-११ मध्ये १३१ दलघमी पाणी अडविण्यात आले.

क) कालवे :- निम्न दूधना डावा कालवा व उजवा कालव्याची कामे सन २००३-०४ मध्ये सुरु करुन डावा कालव्यावरील किमी १ ते ६९ मधील कामे जवळपास पुर्ण झालेली आहेत. तसेच उजवा कालवा किमी. १ ते १५ मधील कामे, किमी. १ मधील किरकोळ कामे वगळता पुर्ण झालेली आहेत. कालव्याची इतर कामे प्रगतीत आहेत. वितरण व्यवस्थेची कामे २००९-१० मध्ये सुरु केले असून जून २०१२ अखेर २६ टक्के कामे पुर्ण करुन १८२७५ हेक्टर सिंचन निर्मीती झालेली आहे. तसेच सन २०११-१२ मध्ये उपलब्ध पाणी वापरुन कालव्यावर ६१५ हेक्टर क्षेत्रावर सिंचन करण्यात आलेले आहे. कालव्याची, पुनर्वसनाची उर्वरित कामे ए.आय.बी.पी अंतर्गत प्रगतीत असून ही कामे जून २०१५ पर्यंत पुर्ण करुन उर्वरित २६२०७ हेक्टर सिंचन निर्मीती करण्याचे नियोजन आहे.

ड) उपसा सिंचन योजना :- निम्न दुधना प्रकल्पावरील चार उपसा सिंचन योजनेची शिर्ष कामे पुर्ण झालेली असुन पाईप वितरण व्यवस्थेची कामे जवळपास ९० टक्के पुर्ण झालेली आहेत. जुन २०१२ अखेर ४५४७ हेक्टर सिंचन निर्मीती झालेली आहे. सन २०११-१२ मध्ये मौजे श्रीधर जवळा उपसा सिंचन योजनेची चाचणी यशस्वी रित्या घेण्यात आली आहे. आवश्यक निधी उपलब्ध झाल्यास या वर्षी योजनेची उर्वरीत कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे व त्यामुळे ४३५० हेक्टर सिंचन निर्मीती होईल.

प्रकल्पाच्या सर्व घटकावर मार्च २०१२ अखेर रु.१०३३.४५ कोटी एवढा खर्च झालेला आहे. प्रकल्पाची उर्वरित कामे सन २०१५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. एआयबीपी अंतर्गत प्रकल्पाचा सलगतेचा प्रस्ताव केंद्रीय जलआयोग कार्यालयास सादर झाला आहे.

८.० **विशेष लाभ** :- निम्न दुधना धरणाचे काम पुर्ण झाले असून पूर्ण जलसंचय पातळी पर्यंत (३४४.०० द.ल.घ.मी.) पाणी साठा निर्मित झाला आहे. सन २०११-१२ मध्ये कालव्याव्दारे ६१५.००हेक्टर क्षेत्रावर चाचणी सिंचन करण्यात आलेले आहे. निम्न दूधना प्रकल्पामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी ६.४४ दलघमी आरक्षीत करण्यात आले आहे. परतूर पुरक व १ गाव योजनेसाठी १.८० दलघमी आरक्षित आहे. सातोना पाणी पूरवठा योजना अंतर्गत एकूण ५ गावे या करीता ०.४८ दलघमी पाणी आरक्षित आहे. मंठा पाणी पुरवठा अंतर्गत १० गावे करिता ०.७६ दलघमी पाणी आरक्षीत आहे. डासाळा पाणी पूरवठा योजने अंतर्गत ९ गांवे करीता ०.५९ दलघमी पाणी आरक्षित आहे. सेलू पूरक पाणी पूरवठा अंतर्गत ४ गावे या करीता २.८१ दलघमी पाणी आरक्षीत आहे.

प्रकल्पाच्या बाजूच्या गावामध्ये उद्योगाला चालना मिळावी म्हणून १.६० दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. उजव्या विमोचकाद्वारे २५० किलो वॅट व डाव्या विमोचकाद्वारे ३५० किलोवॅट विद्युत निर्मीती प्रस्तावित आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव :	जायकवाडी प्रकल्प टप्पा २ (पैठण उजवा कालवा,माजलगांव धरण व माजलगांव उजवा कालवा) जि.बीड			
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीकक्षेत्र	१२९६९६ हे (चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यते प्रमाणे)			
	निर्मीत सिंचन क्षमता (हेक्टर) जुन २०१२ :	९८८१४ हे.			
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२१/०५/१९७४	१९७३-७४	७८.२५	१३५५६७
	सुप्रमा- १	११/०३/१९८५	१९८२-८३	२७२.५१	१३८९५६
	सुप्रमा- २	१५/०७/१९९९	१९९४-९५	५४२.९९	१३८९५६
	सुप्रमा- ३	२८/०६/२००१	१९९९-२०००	७९२.२०	१३८९५६
	सुप्रमा- ४	१६/०७/२००९	२००८-०९	२२१६.३५	१२९६९६
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रुपये कोटी)	भारत सरकार योजना आयोगाचे पत्र क्रं. II /१५(१)(१४)/७६ I & CAD Dt. २/६/१९७६ किंमत û.८८.९० कोटी			
४.१	दि. ३१/०३/२०१२ अखेर खर्च(रु.कोटी)	**१.१९७३-७४** ते १९९४-९५		३७२.०९	
		२.१९९५-९६ ते १९९९-२०००		११५.९५	
		३.२०००-०१ ते २०११-१२		४१७.२१	
		एकुण		**९०५.२५**	
४.२	भु-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३८.३४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	६६९.२८			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१९७.६३			
	एकुण अ.क्रं.४.२ ते ४.४ (रु.कोटी)	**९०५.२५**			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७४-७५			
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व किंमत	१९७५-७६ (रु ७८.२५ कोटी)			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		रू कोटी		
		मुळ प्रशासकीय मान्य किंमत	अद्ययावत सुप्रमा किंमत	वाढीव रक्कम	टक्केवारी (वाढीव रक्कमेशी)
		(अ)	(ब)	(क) = (ब-अ)	(ड)
७.१	दरसुचीतील वाढ (भाववाढ)	६६.९५	७३४.३९	६६७.४४	३१.२३
७.२	भुसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन पी.व्हीमुळे खर्चातील वाढ	७.९०	१००.३६	९२.४६	४.३२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	०.००	८२२.३९	८२२.३९	३८.४६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४४.९५	४४.९५	२.१०
७.५	इतर कारणे ETP सह	३.४०	५१४.२६	५१०.८६	२३.८९
	एकुण अ.क्रं.७.१ ते ७.५ (रु कोटी)	७८.२५	२२१६.३५	२१३८.१०	१००.००
८	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतीक)				
८.१	भु.संपादन, पुनर्वसन व वन जमीन संपादन	माजलगांव उजवा कालवा कि.मी. १०१ पर्यन्त व धरणासाठी भुसंपादन पूर्ण, कि.मी. १०२ ते १४८ चे भुसंपादन प्रगतीत , पूनर्वसन पुर्ण व वनजमीन आवश्यक नाही.			
८.२	धरण	माजलगांव धरणाचे काम पुर्ण झालेले आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	पैठण उजवा कालवा वितरण व्यवस्थेसह पुर्ण व माजलगांव उजवा कालवा किमी १ ते १०१ वितरण व्यवस्थेसह पुर्ण व कि.मी. १०२ ते १३४ मधील कामे प्रगतीत, कि.मी. १३५ ते १४८ सर्वेक्षण सुरु.			

जायकवाडी प्रकल्प टप्पा -२
(पैठण उजवा कालवा, माजलगांव धरण व माजलगांव उजवा कालवा)

संक्षिप्त टिप्पणी

१.० जायकवाडी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत १३२ किमी लांबीचा पैठण उजवा कालवा, माजलगांव धरण व १४८ किमी लांबीचा माजलगांव उजवा कालवा या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु. ७८.२५ कोटीस सन १९७४ साली प्राप्त झाली आहे.चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. २२१६.३५ कोटी अशी आहे. जायकवाडी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत असलेला १३२ किमी लांबीचा पैठण उजवा कालवा, माजलगांव धरण व माजलगांव उजवा कालवा किमी १ ते १०१ पर्यंतची कामे पुर्ण झाली आहेत. प्रकल्पाची सिंचन क्षमता १२९६९६ हेक्टर असुन ९८८१४ हेक्टर सिंचन क्षेत्राची निर्मिती झालेली आहे. पैठण उजव्या कालव्याचे सर्व सिंचन क्षेत्राची निर्मिती झाली असुन त्याचे सर्व क्षेत्र व माजलगांव उजवा कालव्याचे ५६०९० हेक्टर सिंचन क्षेत्राची निर्मिती झालेली आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ:

जायकवाडी प्रकल्प टप्पा २ प्रकल्पास शासन निर्णय क्रं पीआयएम-४९७२/४३०४३-आयपीआय दिनांक २१/०५/१९७४ अन्वये रु ७८.२५ कोटीस (दरसुची १९७३-७४) मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच या प्रकल्पास केंद्रिय जलआयोगाकडुन त्यांचे पत्र क्रं II-१५(१) (१४)/७६-I & CAD Dt. ०२/६/१९७६ अन्वये रु. ८८.९० कोटीस मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये दरसुची, भूसंपादन रक्कम, संकल्प चित्रामध्ये सीडीओ नाशिक यांनी सुचविलेल्या बदल ईत्यादी कारणांमुळे वाढ झाली . प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत किंमतीस शासन निर्णय क्रं जेएवाय/१०८३/६१०/(२३११) पाप्र-३ दिनांक ११/०३/१९८५ अन्वये रु २७२.५१ कोटीस (दरसुची १९८२-८३) मान्यता मिळाली आहे.

या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये दरसुची ,भूसंपादन रक्कम यांच्या वाढीमुळे ,गतीशिल पाणी नियमन पथदर्शी प्रकल्पाची कामे या प्रमुख कारणांमुळे वाढ झाली व प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत किंमतीस शासन निर्णय क्रं. जेएवाय/ १०९०/ ९१४/ (२७३/९०)/ मोप्र-२/ भाग १ दिनांक १५/०७/१९९९ अन्वये रु ५४२.९९ कोटीस (दरसुची १९९४-९५) मान्यता मिळाली आहे.

या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये दरसुची व भूसंपादन रक्कम यांच्या वाढीमुळे,संकल्प चित्रातील बदल या प्रमुख कारणांमुळे वाढ झाली व प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत किंमतीस शासन निर्णय क्रं जेएवाय२००१/२३२/(१३२/२००१) मोप्र-२ दिनांक २८/०६/ २००१ अन्वये रु ७९२.२० कोटीस (दरसुची १९९९-२०००) मान्यता मिळाली आहे.

प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावातील नियोजित पाणी येवा,पाणी वापर व मागील २० वर्षांचा प्रत्यक्ष पाणी येवा,पाणी वापर याच्या तौलनिक अभ्यासाअंती मंजुर पाणी वापर व अभ्यासाअंती धरणस्थळी उपलब्ध होणारा पाणी येवा, या मध्ये असलेली तुट भरुन काढण्यासाठी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात खालील घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

माजलगांव धरणाची उंची वाढविणे:

या प्रकल्पातील असलेली पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी व नांदेड शहरास पुराचा असणारा धोका कमी करण्यासाठी माजलगांव धरणाची उंची ०.५० मी ने वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले.या कामामुळे ३८ दलघमी अतिरीक्त पाणीसाठा निर्माण होणार असुन त्या साठी रु २६.०० कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे.

मार्गस्थ जलाशयाची कामे:

बिगर सिंचन पाणी वापरात झालेली लक्षणीय वाढ,माजलगांव धरणातील कमी होत असलेला येवा व इतर तत्सम कारणांमुळे माजलगांव प्रकल्पाचे पाणी वापराचे पुनर्विलोकन व पुनर्नियोजन संबंधीत पाणी वापरातील तुट भरुन काढण्यासाठी माजलगांव कालव्यावर जेथे मोठे नाले छेदतात तेथे मार्गस्थ जलाशयाची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.या कामास

महामंडळ कार्यालयाने चतुर्थ सुधारीत अंदाजपत्रकामध्ये मंजुरी दिली आहे. या कामामुळे ६९.८५ दलघमी अतिरीक्त पाणीसाठा निर्माण होणार असुन त्या साठी रु २०९.१२ कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे.

माजलगांव उपसा योजना:

पैठण धरणाखाली लोणी सावंगी बंधाऱ्यापर्यन्तच्या मुक्त पाणलोट क्षेत्रामध्ये ५० टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी १५० दलघमी पाणी उपसा करण्याचे प्रस्तावीत आहे. या उपसा योजनेमुळे माजलगांव धरणात तुटीच्या वर्षात १५० दलघमी पाणी उपलब्ध होणार आहे.यामुळे प्रकल्पाची विश्वासार्हता वाढणार आहे व परळी औष्णीक विद्युतकेंद्रास विज निर्मिती साठी शाश्वत पाणीपुरवठा होणार आहे. या साठी रु ३५०.०० कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे.

मासोळी धरणाची उंची वाढविणे:

माजलगांव प्रकल्पातील पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी मासोळी धरणाची उंची वाढविण्याने होणारा अतिरीक्त पाणीसाठा माजलगांव कालव्यासाठी वापरण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या कामामुळे १५ दलघमी अतिरीक्त पाणीसाठा निर्माण होणार असुन त्या साठी रु ८.०० कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे.

रोषणपुरी उच्च पातळी बंधारा :

सिंदफणा नदीवर रोषणपुरी उच्च पातळी बंधा-याचे काम प्रगतीत असुन या व्दारे ६ दलघमी पाणीसाठा व ११५४ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. या साठी रु ९४.०६ कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे. सदरील काम प्रगतीत असुन जुन २०१३ अखेर २.० दलघमी पाणीसाठा करण्याचे नियोजित आहे.

सिरसमार्ग निम्न पातळी बंधारा :

सिंदफणा नदीवर माजलगांव धरणाच्या वर हे काम असुन याव्दारे २.०३ दलघमी पाणीसाठा निर्माण होऊन २९५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. या साठी रु ७१.३३ कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे. सदरील काम प्रगतीपथावर आहे.

वर नमुद केलेल्या सर्व वाढीव कामांसह प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत किंमतीस महामंडळ कार्यालयाने त्यांचे पत्र क्रं. गोमपाविमं/तां-१/जाप्रटप्पा २/सुप्रमा/४/२००९ दिनांक १६/०७/२००९ अन्वये रु २२१६.३५ कोटीस (दरसुची २००८-०९) मान्यता दिली आहे.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ:

मुळ संकल्पनात बांधकामाच्या संख्येत (Structures) झालेल्या वाढीमुळे रु १३.१६ कोटी व बांधकामाच्या विर्निदिष्टात झालेल्या बदलामुळे रु ९.५५ कोटी वाढ झालेली आहे. तसेच अस्तरीकरणाच्या परिमाणातील बदलामुळे रू २२.२४ कोटी वाढ झाली आहे.अशी एकुण संकल्प चित्रामुळे झालेली वाढ रु ४४.९५ कोटी आहे.

४.० इतर कारणे:

व्यवस्थापन यंत्रणेस कालव्याची कामे हस्तांतरीत करण्यापुर्वीची पुर्नस्थापनेची कामे, लवाद निवाडा तरतुद, आस्थापना, संयंत्रे व हत्यारे यांच्या तरतुदीतील वाढ यांमुळे रु ५१०.८६ कोटीची वाढ झाली आहे.

अ.क्रं.	वाढीची कारणे	वाढीची रक्कम (रु. कोटी)
१	कालवा पुर्नस्थापनेची कामे	१५३.२९
२	लवाद निवाडा तरतुद	३२.४५
३	आस्थापना,संयंत्रे व हत्यारे यांच्या तरतुदीतील वाढ	३२५.१२
	एकुण:	**५१०.८६**

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक) :

जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ या कामास सन १९७४-७५ मध्ये सुरुवात झाली.जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत १३२ किमी लांबीचा पैठण उजवा कालवा,माजलगांव धरण व किमी १४८ किमी लांबीचा माजलगांव उजवा कालवा या कामाचा प्रामुख्याने समावेश आहे. पैठण उजवा कालव्याव्दारे ४२७२४ हेक्टर व माजलगांव उजवा कालव्याव्दारे ८६९७२ हेक्टर अशी एकुण १२९६९६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. पैठण उजवा कालवा किमी १ ते १३२, माजलगांव धरण व माजलगांव उजवा कालवा किमी १ ते १०१ ची कामे पुर्ण झाली असुन जुन २०१२ अखेर ९८८१४ हेक्टर ठ सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेप्रमाणे माजलगांव धरणाची उंची वाढविणे,माजलगांव उपसा योजना,मासोळी धरणाची उंची वाढविणे,मार्गस्थ जलाशयांची बांधकामे, रोषणपुरी उच्च पातळी बंधारा,सिरसमार्ग निम्न पातळी बंधारा या कामांचा समावेश करण्यात आला आहे.या घटकांच्या समावेशामुळे एकुण २८०.८८ दलघमी पाणीसाठा निर्माण होणार आहे.

माजलगांव उजवा कालवा किमी. १०२ ते १३४ मधील कामाच्या निविदा झाल्या असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच किमी १३५ ते १४८ चे सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे.किमी १०२ ते १४८ मध्ये वितरण व्यवस्थेव्दारे ३०८८२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

६.० विशेष लाभ :

परळी येथे महाजनको औष्णिक विद्युतकेंद्र आहे.या केंद्रासाठी माजलगांव धरणामध्ये ५६.२० दलघमी पाणी आरक्षित आहे. सदरील पाण्यापासुन परळी औष्णिक विद्युतकेंद्रातुन १०२५ मेगावॅट विजनिर्मिती होते. तसेच माजलगांव उजव्या कालव्याच्या विमोचकाव्दारे सोडण्यात येणा-या विसर्गातुन २.२५ मेगावॅट विज निर्माण होते. आतापर्यंत १७ लक्ष युनीट विज निर्मिती झाली आहे. माजलगांव धरणातुन पिण्याच्या पाण्यासाठी बीड व माजलगांव शहर तसेच लऊळ, सावरगांव, राजेगांव व धरणाच्या लगतची जवळपास १५ ते २० खेडी अशा ६ ते ७ लक्ष लोकसंख्येस पाणीपुरवठा केला जातो. या साठी १५.९३ दलघमी पाणी आरक्षित केलेले आहे. माजलगांव धरणाच्या विस्तिर्ण जलसाठ्यामुळे मत्सोद्योगात भरीव वाढ झाली आहे.

पैठण उजवा कालवा व माजलगांव उजवा कालव्यामुळे लाभक्षेत्रातील सहा साखर कारखान्याचे साखर उत्पादन प्रगतीत असुन लाभक्षेत्रातील सिंचनाच्या सोयीमुळे शेतक-यांची आर्थिक प्रगती होत आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	मांजरा प्रकल्प (प्रवाही) ता.केज जि.बीड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	२८५४१ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	२३६९० हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२०/०८/१९७५	१९७४-७५	१७.१४	२३६९०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	३०/०९/१९८३	१९८१-८२	३१.६०	२३६९०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २ (०.५० मी. उंची वाढविणे व कालवा अस्तरीकरणासह)	०१/०९/२००३	१९९९-००	१७६.०२	२३६९०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (७ बॅरेजसह)	०६/०४/२००५	२००३-०४	४८६.६१	२४५९६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ४ (९ बॅरेजेस व ४ को.प.बंधारे नुतनीकरणासह)	१७/१०/२००८	२००७-०८	१०८७.४७	२८५४१
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	इंग्रजी पत्र क्र.२-१५/१ (१४) दि.२/६/१९७६ -रु.२०.१९ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७५-७६ ते १९९४-९५ १) १९९५-९६ ते १९९९-२००० २) २०००-२००१ ते २०११-१२		६५.६९८ ०४.११० ६३०.०९०	
		एकुण		६९९.८९८	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३२.८१२			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	६२२.४५१			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	४४.६३५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	६९९.८९८			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	सन १९७५			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन १९७५ (किंमत रुपये १७.१४ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	६.९३	६१.०२	५४.०९	५.०५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	३.८७	३७.०५	३३.१८	३.१०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	४२३.९४	४२३.९४	३९.६१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	२३७.१५	२३७.१५	२२.१६
७.५	इतर कारणे	६.३४	३२८.३१	३२१.९७	३०.०८
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	१७.१४	१०८७.४७	१०७०.३३	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	मुख्य भूसंपादन पूर्ण, ०.५० मी.वाढीव उंचीसाठी व बॅरेजच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगत.			
८.२	धरण	सन १९८२ मध्ये पूर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	विना अस्तरीकरण काम पूर्ण, कालवा अस्तरीकरण प्रगत.			

मांजरा प्रकल्प,धनेगांव,ता.केज जिल्हा बीड
संक्षिप्त टिप्पणी

१.० मांजरा धरण बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात धनेगांव येथे मांजरा नदीवर बांधण्यात आले आहे. मांजरा धरणाचे कामास सन १९७५ साली सुरुवात होऊन धरणाचे बांधकाम सन १९८२ मध्ये पुर्ण झाले. त्यावरील दोन्ही कालव्याचे व वितरण व्यवस्थेची कामे सन १९८६ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहेत.मांजरा डाव्या कालव्याची लांबी ९० कि.मी.व उजव्या कालव्याची लांबी ७८ कि.मी.असून एकुण लाभक्षेत्र २३६९० हेक्टर आहे.मांजरा प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेसाठी जुलै १९८६ मध्ये लाभक्षेत्र विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत करण्यात आला.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

मांजरा प्रकल्पास शासन निर्णय क्र.पीआयएन३९९३५/२५ दिनांक २०.०८.१९७५ अन्वये रु.१७.१४ कोटीस मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली.तसेच मांजरा प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाकडून त्यांचे पत्र दिनांक ०२.०६.१९७६ अन्वये रु.२०.१९ कोटीस मान्यता दिली आहे.तदनंतर प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात वाढ झाल्याने व भाव वाढीमुळे प्रथम सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र.एम.एन.जे.१०८०/ १०८२९/(१६७६) मंत्रालय,मुंबई दिनांक ३०.०९.१९८३ अन्वये (दरसुची वर्ष १९८१-८२) रु.३१.६० कोटीस मान्यता मिळाली.

या प्रकल्पामध्ये शासन निर्णय क्र.सीडीए/१०००/(१८८/२०००)/लाक्षेवि कामे पाटबंधारे विभाग, मंत्रालय,मुंबई दिनांक ०२.०१.२००१ अन्वये मांजरा धरणाची उंची ०.५० मीटरने वाढविणे व लाभक्षेत्र विकासाची कामे व मांजरा नदीवरील धनेगांव पासून बिंदगीहाळ पर्यंत एकूण १४ को.प.बंधा-यांच्या नुतनीकरणाचा अंतर्भाव करण्यात आला.सदर प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दरसुची १९९९-२००० वर आधारीत शासन निर्णय क्र.मांजरा/२००१/४०१/(१६०/२००१) मो.प्र.-२ दिनांक ०९.०१.२००३ अन्वये रु.१७६.०२ कोटी किंमतीस मान्यता मिळाली. या धरणाची ०.५० मीटरने उंची वाढविल्यामुळे २३.६९ दलघमी पाणीसाठ्यामध्ये वाढ झाली. लातूर व अन्य नागरी वस्त्यांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी ही साठवण क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

लातूर शहर व परिसराची झपाट्याने होणारी वाढ, शहरात होणारी औद्योगीकरण,त्यामूळे वाढणारी लोकसंख्या यामूळे अस्तित्वातील पाणीपुरवठयाच्या योजना अपूऱ्या पडू लागल्यामूळे पाणी पुरवठयाचे अन्य शास्वत स्त्रोत निश्चित करणे किंवा सध्याच्या स्त्रोतात सुधारणा करणे आवश्यक ठरल्याने याबाबतचा अभ्यास करुन उपाययोजना करण्यासाठी शासनाने सचिव (लाक्षेवि) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रं.पा.पु.व ख.वि.क्रं.पापुयो ३१०४/प्र.क्रं.८३/पापु-१८ दिनांक ३/११/२००४ अन्वये उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर मांजरा उपखो-याचा सर्वंकश जल उपलब्धतेचा अभ्यास करून उच्चाधिकार समितीच्या शिफारशी शासनाने दिनांक २३/६/२००५ चे शासन निर्णयानुसार स्विकृत केलेल्या आहेत. या नुसार मांजरा नदीवरील मांजरा धरणाखालील भागात उपलब्ध करुन दिलेल्या पाण्यातून ७ बॅरेजेस बांधण्याचा समावेश तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आला.सदर प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळ निर्णय क्र.गोमपाविमं/तां-१/मांजरा/तृसुप्रमा (८१/९८-भाग-३) दिनांक ०६.०४.२००५ अन्वये (दरसुची २००३-०४) रु.४८६.६१ कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली.त्यामुळे पाणीसाठ्यामध्ये व सिंचन क्षेत्रामध्ये अनुक्रमे ७७.९३ दलघमी व ९०६ हेक्टर एवढी वाढ झाली आहे.

मांजरा नदीवरील धनेगांव व डोंगरगांव बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील शेतक~यांच्या सुपीक जमिनी संपादनास विरोध केल्यामूळे त्या बॅरेजची उंची कमी करण्यांत आली. त्यामूळे शिल्लक राहणा-या पाण्याचे फेरनियोजन करणे आवश्यक होते. त्यामूळे तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या दिनांक १२/२/२००८ रोजीच्या लातूर दौ-यात लातूर परिसरातील शेतक-यांच्या मागणीनुसार साई व शिवणी हे दोन बॅरेजेसचे सर्वेक्षण करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा मंत्री यांचे समवेत दिनाक २०/२/२००८ रोजी मराठवाडयातील सिंचन विषयक आढावा बैठक व सिंचन अनुशेष निर्मुलन उपाययोजना याबाबत झालेल्या बैठकीत मांजरा नदीवरील ४ को.प.बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या कामास मान्यता देण्यात आली. (संदर्भ :-शासन पत्र क्रं.बैठक-२००८/औधा-२७/(१३०/२००८)/जसंअ दि.४/४/२००८.) तदनंतर या प्रकल्पात मांजरा नदीवरील साई व शिवणी २ नविन बॅरेजेस व ४ को.प.बंधारेचे बॅरेजच्या धर्तीवर नुतनीकरण करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येऊन चतूर्थ सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळ निर्णय क्र.गोमपाविमं/तां-१/मांजरा/धरण/सुप्रमा/०८/२००८ दि.१७.१०.२००८ (दरसुची २००७-०८) अन्वये रु.१०८७.४७ कोटीस मान्यता मिळाली.त्यामुळे सिंचन क्षेत्रामध्ये ३९४५ हेक्टर एवढी वाढ झाली आहे.

अशा रितीने मांजरा प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे खालील प्रमाणे किंमतीत वाढ झाली आहे.

१)	०.५० मी.उंची वाढविणे व कालवा अस्तरीकरण करणे व जलसेतू ऐवजी लादीमोरी बांधकामात रुपांतरण	रु. ९४.३३ कोटी.
२)	७ नविन बॅरेजेसचा समावेश केल्याने	रु.२२८.१५ कोटी.
३)	२ नविन बॅरेजेस (साई व शिवणी) तसेच ४ को.प.बंधा-याचे बॅरेजच्या धर्तीवर नुतनीकरण व बंद पाणीपाळीमध्ये गतीने काम करण्यासाठी यांत्रिकी पध्दतीने संधानक अस्तरीकरण करणे.	रु.३३८.६१ कोटी.
	एकुण (१ ते ३)	रु.६६१.०९ कोटी.
४)	वजा तांत्रिक सुधारणा संकल्पनामुळे होणारी वाढ	(-) रु.२३७.१५ कोटी.
५)	निव्वळ व्याप्तीतील वाढ	रु.४२३.९४ कोटी.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

बंद पाणीपाळी मध्ये कामाची गती राखण्यासाठी यांत्रिकी पध्दतीने संधानक अस्तरीकरण करावे लागले. तसेच बॅरेजचे अंदाजपत्रक ढोबळ आराखड्यानुसार केले होते. सविस्तर संकल्पनामुळे या मध्ये वाढ झाली आहे.तांत्रिक सुधारणा संकल्पनामुळे होणारी वाढ ----- **रु.२३७.१५ कोटी.**

४.० इतर कारणे.

१. अपूरी तरतूद
२. भुविकास कामाची तरतूद.
३. मांजरा कालव्यावरील निवडक वितरीकांचे अस्तरीकरण.
४. उच्च दराच्या निविदा व बॅरेजेससाठी संरक्षक कामाची तरतूद.

एकुण होणारी वाढ -----रु.१६८.६१ कोटी.

ई.टी.पी.मुळे होणारी वाढ. ---------- रु.१५३.३६ कोटी.

एकुण ----------रु.३२१.९७ **कोटी.**

५.० प्रकल्पाची सध्यस्थिती (भौतिक).

मांजरा प्रकल्पाचे काम सन १९७५ साली सुरु केले.मुख्य धरणचे काम १९८२ मध्ये झाले असून प्रकल्पावरील दोन्ही कालवे व वितरीकाची कामे १९८६ मध्ये पुर्ण करण्यात आली आहेत.डाव्या कालव्याची लांबी ९० कि.मी.व उजव्या कालव्याची लांबी ७८ कि.मी. आहे. सन १९८६ मध्ये १८२२३ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे.मांजरा प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेसाठी जुलै १९८६ मध्ये लाभक्षेत्र विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर प्रकल्पाची मूळ कामे व सिंचन क्षमता निर्मिती पुर्वीच झाली असली तरी शासन आदेशान्वये मांजरा धरणाची उंची ०.५० मीटरने वाढविणे, कालवा अस्तरीकरण,मांजरा नदीवरील को.प.बंधारे नुतनीकरण व बॅरेजेसची कामे हाती घेण्यात आली आहेत.त्यापैकी मांजरा धरणाची ०.५० मीटरने उंची वाढविण्याचे काम पुर्ण झाले आहे.

मांजरा नदीवरील ३ (बिंदगीहाळ,नागझरी व वांगदरी) को.प.बंधा-याचे बॅरेजच्या धर्तीवर नुतनीकरण कामापैकी बिंदगीहाळ व नागझरी लातूर पध्दतीचे बॅरेजचे काम पुर्ण झाले असून बंधा-यात पाणीसाठा करण्यात आला आहे.वांगदरी बंधा-याचे काम प्रगतीपथावर असून निधी उपलब्ध झाल्यास जुन २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

मांजरा प्रकल्पावरील डावा व उजवा कालवा अनुक्रमे ० ते ८० कि.मी.व ० ते ६८ कि.मी.मधील आवश्यक मातीकाम जवळपास पुर्ण झाले आहे.मांजरा उजव्या व डाव्या कालव्यावरील अस्तरीकरणाची कामे सद्यस्थितीत प्रगतीपथावर असून तसेच मांजरा नदीवरील ९ बॅरेजेसपैकी ७ बॅरेजेसचे काम पुर्ण झाले असून साई बॅरेजचे काम पुर्णत्वास आहे व उर्वरीत १ बॅरेजचे काम प्रगतीपथावर आहे.पुर्ण झालेल्या ७ बॅरेजेस मध्ये पाणीसाठा करण्यात आला आहे.सिंचन व्यवस्थापनासाठी बॅरेजेसचे हस्तांतरण व्यवस्थापन विभागाकडे करण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.या ७ बॅरेजेसमूळे ५२.६७ द.ल.घ.मी.साठवण क्षमता व ९६७५ हे. सिंचनक्षेत्र निर्मिती झाली आहे.निविदे अंतर्गत चालू असलेल्या प्रस्तावित १६८ कि.मी.लांबीपैकी ०३/२०१२ पर्यंत १२.५० कि.मी. लांबीत अस्तरीकरणाचे काम पुर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

मांजरा प्रकल्पाच्या (प्रवाही), को.प.बंधारे नुतनीकरण व ३ को.प.बंधारेचे बॅरेजेसच्या धर्तीवर नुतनीकरण व बॅरेजेस घटकाची सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु.१०८७.४७ कोटी असून या प्रकल्पावर प्रवाही व बॅरेज घटक मिळून मार्च २०१२ अखेर रु.६९९.८९ कोटी खर्च झाला असून प्रकल्पावरील उर्वरीत कामे कालव्याचे अस्तरीकरण व मांजरा नदीवरील बॅरेजेसची कामे वर्ष २०१४ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

६.० विशेष लाभ :

६.१ या वर्षीच्या पावसाळ्यामध्ये मांजरा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस नसल्यामुळे मांजरा धरणात पुरेसा पाणी साठा झाला नाही, तथापी लातूर परिसरात चांगला पाऊस झाल्यामुळे बॅरेजेसमध्ये ३७.१२ दलघमी पाणीसाठा झाला.

६.२ मांजरा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात एकुण नऊ साखर कारखाने असुन त्यापैकी प्रमुख पाच साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०११-२०१२ मधील एकत्रीत गाळप २७ लक्ष मे. टन व साखर उत्पादन ३० लक्ष पोते आहे. मळीवर आधारीत आल्कोहल उत्पादन ३ कोटी लिटर असुन दोन कारखान्यामध्ये बगॅसवर आधारीत ३० मे. वॅट वीज उत्पादन ही सुरु आहे. या सर्व कारखान्यांची याच गळीत हंगामातील एकत्रित उलाढाल रु. १०५० कोटी इतकी असुन विविध कर माध्यमाव्दारे रु. ९० कोटी शासनास भरणा केले आहेत.

६.३ मांजरा प्रकल्प व बंधाऱ्यामुळे पाच शहरे व साधारण १२५ गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध झालेले आहे. मांजरा धरणाच्या खाली राज्य सिमेपर्यंत नदीची लांबी १३६ कि.मी. असून या लांबीमध्ये लाभ होत आहे. साधारण १५ लक्ष लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे. या प्रकल्पातुन बिगर सिंचन आरक्षण जवळपास ६० द.ल.घ.मी. एवढे आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	निम्न तेरणा प्रकल्प (प्रवाही) ता.लोहारा, जि.उस्मानाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	२३४७० हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	१८५०० हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०१/११/१९७७	१९७५-१९७६	२०.०३	१४५१३
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १ (उपसा सिंचन योजनेचा समावेश)	२५/०६/१९९३	१९९२-१९९३	१६५.२०	२३४७०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २ (उ.सिं.यो.व वडाळा ल.पा.योजनांचा समावेश)	११/१२/२०००	१९९६-१९९७	२८३.५५	२३४७०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (को.प.बं.नुतनीकरणासह)	१२/०९/२००८	२००७-२००८	५४२.०४	१३४७०
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	इंग्रजी पत्रा क्र.२/२२२७/८२ आय.अॅन्ड कॅड दि.२८/०२/१९८३, रु.३७.६५ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यन्त २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		८८.८६४ ३५.६५ १०७.५९	
		एकुण		२३२.१०४	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३०.०१७			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१४४.८५			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	५७.२३७			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	२३२.१०४			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	सन १९८१			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन १९८१ (किंमत रुपये ३४.१२५ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१२.१५	१५३.८१	१४१.६६	२७.१४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	३.५१	४०.७५	३७.२४	७.१३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	१२२.३८	१२२.३८	२३.४४
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३०.४५	३०.४५	५.८३
७.५	इतर कारणे	४.३७	१९४.६५	१९०.२८	३६.४५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	२०.०३	५४२.०४	५२२.०१	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	मुख्य भुसंपादन पुर्ण.			
८.२	धरण	सन १९८९ मध्ये पुर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	विना अस्तरीकरण काम पुर्ण, कालवा अस्तरीकरण प्रगत.			

निम्न तेरणा प्रकल्प ता.लोहारा जि.उस्मानाबाद
संक्षिप्त टिप्पणी

१.० निम्न तेरणा प्रकल्पाचे धरण हे तेरणा नदीवर माकणी, ता.लोहारा जि.उस्मानाबाद येथे बांधले आहे. या प्रकल्पात मातीधरण, दगडी धरण, दोन कालवे म्हणजे ८० कि.मी. लांबीचा डावा कालवा व ७४ कि.मी.लांबीचा उजवा कालवा आणि जलाशयातील आशीव उपसा सिंचन योजना या घटकाचा प्रामुख्याने समावेश आहे. या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र २३४७० हेक्टर (प्रवाही सिंचन क्षेत्र १४५१३ हे.व उपसा सिंचन योजनेचे सिंचन क्षेत्र ८९५७ हे.) आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

निम्न तेरणा प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्रं.पीआयएम/६१७७/१८२८ (१३२१) डब्ल्युआरआय दि.०१/११/१९७७ मध्ये रु.२०.०३ कोटी करिता मिळाली. त्यानंतर या प्रकल्पामध्ये आशिव उपसा सिंचन योजना, उस्मानाबाद या योजनेचा शासन निर्णय क्र.उसिंयो/१०९०/३५८८/(२१/९०) दि.२६/०२/१९९० अन्वये समावेश करण्यात आला. सदर प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दरसुची १९९२-९३ वर आधारीत शासन निर्णय क्रं.नितेप्र/१०८८/ ८/४/८८ मो.प्र.(२) दि.२५/०६/१९९३ अन्वये रु.१६५.२० कोटी करिता मिळाली.

त्यांनतर या प्रकल्पाच्या व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकास दरसुची वर्ष १९९६-९७ वर आधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्रं.नितेप्र/१०९८/२२२९/(३३६/९८) मो.प्र.(२) दि.११/१२/२००० अन्वये रु.२८३.५५ कोटी करिता मिळाली. यामध्ये प्रामुख्याने वडाळा ल.पा.योजनेचा समावेश आहे.

त्यानंतर तेरणा नदीवरील ९ को.प. बंधाऱ्याचे बॅरेजेसच्या धर्तीवर नुतनीकरण व किल्लारी (कवठा) बॅरेजचा समावेश करुन तृतीय सुधारीत अंदाजपत्रकास दरसुची वर्ष २००७-०८ वर आधारीत तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता महामंडळ निर्णय क्रं.गोमपाविमं/तांशा-१/निम्न तेरणा/सु.प्र.मा./०६/२००८ दि.१२/०९/२००८ अन्वये रु.५४२.०४ कोटी करिता मिळाली.

अशा रितीने मांजरा प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे खालील प्रमाणे किंमतीत वाढ झाली आहे.

१)	आशीव उपसा सिंचन योजना	.. रु.६४.२२ कोटी
२)	वडाळा ल.पा.योजना	.. रु.२३.४१ कोटी
३)	तेरणा नदीवरील ९ को.प.बंधाऱ्याचे बॅरेजच्या धर्तीवर नुतनीकरण व किल्लारी (कवठा) बंधाऱ्याच्या कामाचा समावेश	.. रु.६५.२० कोटी
	एकुण (१ ते ३)	.. रु.१५२.८३ कोटी
४)	तांत्रिक सुधारणा, संकल्पनामुळे होणारी घट	.. (-) रु.३०.४५ कोटी
	निव्वळ व्याप्तीतील वाढ	**.. रु.१२२.३८ कोटी**

३.० सवीस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

उपसा सिंचन योजनेचे अंदाजपत्रक ढोबळ आराखड्यानुसार करण्यात आले होते. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना मार्फत सविस्तर संकल्पनामुळे यामध्ये रु. ३०.४५ कोटी वाढ झाली आहे.

४.० इतर कारणे.

१. उपसा सिंचन योजनेच्या विद्युत पंपाचे देयक

२. इंटरनल लायनिंग ऑफ रायजींग मेन

३. संकीर्ण कामे

४. डब्ल्यु.एम.आर.चे समायोजन

५. गवती अस्तरीकरणा ऐवजी संधानक अस्तरीकरणा मध्ये रुपांतरण.

एकुण होणारी वाढ (१ ते ५) ..... **रु.९०.७३ कोटी.**

६. ई.टी.पी.मुळे होणारी वाढ ..... **रु.९९.५५ कोटी**

एकुण ... रु.१९०.२८ कोटी

५.० प्रकल्पाची सध्यस्थिती (भौतिक).

निम्न तेरणा प्रकल्पाचे काम सन १९८१ साली सुरु केले. मुख्य धरणाचे काम सन १९८९ साली पूर्ण झाले आहे. निम्न तेरणा डावा व उजवा या दोन्ही कालव्याची कामे पुर्ण झाली असून त्यावरील वितरण व्यवस्थेचे ९५ टक्के काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. सन २००६-०७ या वर्षात जुन २००७ अखेर एकुण १४५१३ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली व आशीव उपसा सिंचन योजने अंतर्गत जुन २००२ अखेर एकुण ८९५७ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली असुन निम्न तेरणा प्रकल्पाची (आशीव उपसा सिंचन योजनेसह) एकुण २३४७० हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सदर प्रकल्पाचे पुर्ण सिंचन क्षमता निर्मीती पुर्वीच झाली असली तरी कालव्याच्या अस्तरीकरणाचे कामे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण १०९२/(१००/९२)मो.प्र.(प्र.)दिनांक १७.३.१९९४ अन्वये निधी अभावी लांबणीवर टाकण्यात आले होते.

तेरणा नदीवरील मदनसुरी व किल्लारी क्र.२ या २ को.प.बंधा-याचे लातूर पध्दतीच्या बॅरेजमध्ये रुपांतरणाचे काम पुर्णत्वास असून याद्वारे ४८३ हेक्टर पुनर्स्थापीत होत आहे. तसेच आशीव उपसा सिंचन योजनेचे काम ०९/२००२ मध्ये पुर्ण झाले असुन सदर योजना मार्च २००४ मध्ये व्यवस्थापन विभागास हस्तांतरीत केलेली आहे.

निम्न तेरणा कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे सद्यस्थितीत प्रगतीपथावर असुन प्रस्तावित ११० कि.मी. लांबीपैकी ०३/२०१२ पर्यंत ५९ कि.मी.लांबीत अस्तरीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे.उर्वरीत अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. उजवा कालवा कि.मी. ७४ पर्यंत व डावा कालवा ८० कि.मी. पर्यंत व त्यावरील वितरीकासहीत सिंचन व्यवस्थापन विभागास सिंचन व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत केलेला आहे.

६.० विशेष लाभ :-

या वर्षीच्या पावसाळयामध्ये निम्न तेरणा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस नसल्यामुळे निम्न तेरणा धरणात पाणीसाठा झाला नाही. तथापि धरणाखालील काही भागात पाऊस झाल्यामुळे या वर्षी नुतनीकरणाचे काम पुर्ण झालेल्या दोन लातूर पध्दतीच्या बॅरेजसह ४ को.प.बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा करण्यात आला आहे.

निम्न तेरणा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात ५ साखर कारखाने असून त्यापैकी ४ कारखान्यांचा गळीत हंगाम सन २०११-१२ मधील एकत्रित गाळप १५ लक्ष मे.टन व साखर उत्पादन १६ लक्ष पोते आहे. या सर्व कारखान्यांची याच गळीत हंगामातील एकत्रित उलाढाल रु ५०० कोटी इतकी असून विविध कर माध्यमाद्वारे रु.४० कोटी शासनास भरणा केले आहेत.

सन १९९३ साली किल्लारी परिसरात मोठा भुकंप झाला व त्यामुळे अनेक गावे विस्थापित झाल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. २२ गावांना पाणी पुरवठयाची योजना निम्न तेरणा प्रकल्पाद्वारे करण्यात आली आहे. तसेच औसा, उमरगा, निलंगा, लोहारा या शहरांना व परिसरातील गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध झालेले आहे. साधारण ५ लक्ष लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे. या प्रकल्पातून बिगर सिंचन आरक्षण जवळपास १५.९१ द.ल.घ.मी. एवढे आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, जि.उस्मानाबाद व बीड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	११४७३१ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	निरंक			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता (कृ.म.उ.सिं.यो.क्र.१ व २ जि.उस्मानाबाद)	२३/०८/२००७	२००३-२००४	२३८२.५०	९२१४१
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १ (कृ.म.उ.सिं.यो.क्र.३ जि.बीड च्या समावेशासह)	२७/०८/२००९	२००८-२००९	४८४५.०५	११४७३१
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	आवश्यकता नाही.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यन्त २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		निरंक निरंक ४१७.६२	
		एकुण		४१७.६२	
४.२	भू-संपादन,पुनर्वसन,वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	२७.०३			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	३८३.५४			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	७.०५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	४१७.६२			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	२००८-२००९			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	२००८-२००९ (किंमत रु.४८४५.०५ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१४१९.७१	१५७०.८८	१५१.१७	६.१४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	६४.८६	१२१.७८	५६.९२	२.३१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	६१.६६	१७५६.०४	१६९४.३८	६८.८१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	१२३.९५	४२३.२४	२९९.२९	१२.१५
७.५	इतर कारणे	७१२.३२	९७३.११	२६०.७९	१०.५९
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	२३८२.५०	४८४५.०५	२४६२.५५	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	१) उ.सि.यो.क्र.१ अंतर्गत १ जोडकालवा व १ साठवण तलावाच्या भूसंपादनाचा अंतिम मावेजा वाटप झाला असून १ बोगदा व ३ कालव्यांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली . २) उ.सि.यो.क्र.२ अंतर्गत १ बॅरेज व २ कालव्यांची संयुक्त मोजणी पुर्ण झाली असुन २ साठवण तलावांची भूसंपादन प्रकरणे निवाडा स्तरावर आहेत. ३) उ.सि.यो.क्र.३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलाव ता.आष्टी योजनेसाठी एकूण १०६८ हे. आवश्यक संपादनापैकी १९०.०० हे. क्षेत्र सरळ खरेदी केले. पुनर्वसन प्रक्रिया प्रगतिपथावर असुन वन जमीन संपादन करावी लागत नाही.			
८.२	धरण	१) उ.सि.यो.क्र.१ व २ अंतर्गत घाटणे बॅरेजचे काम ८० टक्के, नळदूर्ग बॅरेज क्र.१ चे काम ४० टक्के, व साठवण तलावांची कामे डोंगरी सा.त. ३०टक्के , रामदरा ल. पा. ६० टक्के, पांगारधरवाडी तलाव ७० टक्के व सोनगिरी सा.त. ७० टक्के पूर्ण झाली आहेत. २) उ.सि.यो.क्र.३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलावाचे काम ३५% पूर्ण झाले आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	१) उ.सि.यो.क्र.१ व २ अंतर्गत सोनारी ते साकत,गणेगाव ते देवंग्रा , वालवड माथा ते जेजला-चिंचपूर, वालवड माथा ते हिवर्डा , भोयरा ते पडसाळी, दारफळ ते सावरगांव या कालव्यांची कामे प्रगतीपथावर असून ३० ते ५० टक्के कामे (मातीकाम व खोदकाम) पूर्ण झाली आहेत. २) उ.सि.यो .क्र.३ अंतर्गत कालव्याची कामे अद्याप हाती घेतली नाहीत			

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प जि.उस्मानाबाद व बीड
संक्षिप्त टिप्पणी

१.० दिनांक २२/२/२००५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार मराठवाडयाच्या कृष्णा खो-यातील भू-भागास कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनी जलाशयात येणाऱ्या ६६.२७ अ.घ.फु. पाण्यापैकी २१ अ.घ.फु. पैकी १९ अ.घ.फु. पाणी उस्मानाबाद जिल्हयास व २ अ.घ.फु. बीड जिल्हयास देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार मराठवाडयातील कृष्णा खो-यातील फक्त उस्मानाबाद जिल्हयातील क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-२००४/१४१३/(३८५/२००४) जसंनि दिनांक २३/८/२००७ अन्वये २३८२.५० कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार उस्मानाबाद जिल्हयास कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत २ स्वतंत्र उपसा सिंचन योजनाद्वारे १९ अ.घ.फु. पाणी देण्याचे नियोजन करणेत आले. उपसा सिंचन योजना क्र.१ मधील ११.०० अ.घ.फु. व उपसा सिंचन क्र.२ मधून ८.०० अ.घ.फु. पाणी उस्मानाबाद जिल्हयातील एकूण ९२,१४१ हेक्टर क्षेत्रास देण्याचे प्रस्तावित होते.बीड जिल्हयासाठी सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर वेगळी प्रशासकीय मान्यता देण्यात येईल असा निर्णय झाला.

शासन पत्र क्र.संकीर्ण-२००८/४१७/(११३/०८)जसंनि, मंत्रालय मुंबई, दिनांक ४/११/२००८ अन्वये बीड जिल्हयातील कृष्णा खोरे अंतर्गत भागासाठी उपसा योजनांचा अंतर्भाव करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करणेचे सूचना देण्यात आल्या. बीड जिल्हयातील कृष्णा खो-यातील क्षेत्रानुसार २ अ.घ.फु. ऐवजी ६ अ.घ.फु. पाणी देण्याचा निर्णय शासन पत्र क्र.गोमपावि/२००८ /२१२२/पत्र क्र.३४०/०८/जसंनि, दिनांक २०/१२/२००८ अन्वये झाला. उस्मानाबाद जिल्हयासाठी १९ अ.घ.फु. व बीड जिल्हयासाठी ६ अ.घ.फु. असे एकूण २५ अ.घ.फु. पाणी राज्याच्या सिमेपर्यंत उपलब्ध होत आहे. परंतु एवढया लांबीवरुन पाणी उचलने शक्य नसल्याने सोलापूर जिल्हयातील घाटणे बॅरेजपर्यंत उपलब्ध येव्याचा विचार करुन २३.६६ अ.घ.फु. पाण्यासाठी एकत्रित सुधारीत प्रशासकीय मान्यता करणेचा निर्णय होऊन शासन पत्र संकीर्ण-२००९/२७४/(५३/०९) जसंनि, दिनांक ७/७/२००९ अन्वये जल नियोजनास मंजूरी प्राप्त झाली व त्यानुसार शासनाने निर्णय क्रमांक कृष्णाम-०७०९/(४३७/२००९) मोप्र-१, दिनांक २७/८/२००९ अन्वये कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना (२३.६६ अ.घ.फु.) जि. उस्मानाबाद व जिल्हा बीड करिता रु. ४८४५.०५ कोटी रक्कमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने मा.राज्यपाल यांचे कार्यालयाने त्यांचे इंग्रजी पत्र Gò.No.GS/DB/IRG-DIR-५/२००९/६४ दिनांक २६ ऑक्टोबर - २००९ अन्वये या प्रकल्पाच्या घटकांचे काम करण्यास परवानगी दिलेली आहे.

२.० कृष्णा- भीमा स्थिरीकरण प्रकल्पांतर्गत उजनी जलाशयात येणा-या पाण्यापैकी २१.०० अ.घ.फु. व सीना कोळेगांव प्रकल्पाच्या खालील बाजूस मुक्त पाणलोट क्षेत्रात उपलब्ध असलेले २.६६ अ.घ.फु. असे एकूण २३.६६ अ.घ.फु. पाणी मराठवाडयातील कृष्णा खो-यातील भागाला देण्यासाठी कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत ३ स्वतंत्र उपसा सिंचन योजना द्वारे पाणी देण्याचे नियोजन आहे. उपसा सिंचन योजना क्र.१ मधून १०.४१ अ.घ.फु. व उपसा सिंचन क्र.२ मधुन ७.५७ अ.घ.फु. पाणी उस्मानाबाद जिल्हयातील एकूण ८७,१८८ हेक्टर क्षेत्रासाठी व आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ द्वारे ५.६८ अ.घ.फु. पाणी बीड जिल्हयासाठी २७,५४३ हेक्टर क्षेत्रास देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सदर प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे काम दोन टप्यात करावयाचे असून प्रथम टप्पा ७.०० अ.घ.फु. साठी व दुस-या टप्प्यात उर्वरीत १६.६६ अ.घ.फु. साठीची कामे हाती घ्यावयाची आहेत. त्यानुसार प्रथम टप्यातील ७.०० अ.घ.फु.ची कामे प्रगतीपथावर आहेत.

३.० उपसा सिंचन योजना क्र.१:- उपसा सिंचन योजना क्र.१ द्वारे उस्मानाबाद जिल्हयातील परांडा, भूम, कळंब, वाशी व उस्मानाबाद तालुक्यातील ५०,४८० हेक्टर सिंचनासाठी १०.४१ अ.घ.फु. पाणी वापर असुन उजनी धरणापासुन ५ टप्प्याद्वारे पाणी आणावयाचे प्रस्तावित आहे. सुधारीत प्र.मा.अहवालानुसार प्रथम टप्प्यातील उपलब्ध ३.०८ अ.घ.फु. पाणी वापरासाठी उपसा सिंचन योजना क्र.१ ची कामे प्रगतीपथावर आहेत. यापैकी टप्पा क्र.१ मधील उजनी धरण ते सीना- काळेगांव प्रकल्प जोड बोगद्याचे काम, पंपगृह क्र.१, टप्पा क्र.२ मधील साकत - सोनारी जोड कालवा, टप्पा क्र.३ (अ) मधील उध्दरण नलिकेचे काम गणेंगाव ते देंवंग्रा कालवा, टप्पा क्र.३ (ब) वालवड माथा ते जेजला- चिंचपूर कालवा तसेच वालवड ते हिवर्डा कालवा, टप्पा

क्र.४ मधील गोरमाळा ते सोनगिरी सा.त.कालवा व सोनगिरी सा.त. ही कामे प्रगतीपथावर आहेत. सोनारी साकत पूर्ण झाल्याने सीना कोळेगांव प्रकल्पातील वाहून जाणारे पाणी सीना कोळेगांव प्रकल्पाचे पंपगृह वापरुन साकत मध्यम प्रकल्पामध्ये भरणे शक्य होणार आहे. तसेच सोनगिरी प्रकल्पाचे काम पूर्ण होवुन अतिरिक्त ०.४५ अ.घ.फु. साठा निर्माण होवू शकेल.

४.० उपसा सिंचन योजना क्र.२ :- उपसा सिंचन योजना क्र.२ द्वारे उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर, लोहारा व उमरगा तालुक्यातील ३६,७०८ हेक्टर क्षेत्रास ७.५७ अ.घ.फु. पाण्याचा सिंचनासाठी वापर करण्याचे प्रस्तावित आहे. सुधारीत प्र.मा. अहवालानुसार प्रथम टप्प्यातील उपलब्ध २.२४ अ.घ.फु. पाणी वापरासाठी उपसा सिंचन योजना क्र.२ ची कामे प्रगतीपथावर आहेत. घाटणे बॅरेज, पांगरधरवाडी सा.त. रामदरा ल.पा.तलाव, डोंगरी सा.त., नळदूर्ग बॅरेज क्र.१ ही कामे तसेच टप्पा क्र.१ ते ५ मधील पंपगृह, उर्ध्वनलीका, कालवे ही कामे प्रगतीपथावर आहेत.

५.० उपसा सिंचन योजना क्र.३ :- उपसा सिंचन योजना क्र.३ द्वारे बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यातील २७,५४३ हेक्टर क्षेत्रास ५.६८ अ.घ.फु. पाण्याचा सिंचनासाठी वापर करण्याचे प्रस्तावित आहे. सुधारीत प्र.मा.अहवालानुसार प्रथम टप्प्यातील उपलब्ध १.६८ अ.घ.फु. पाणी वापरासाठी उपसा सिंचन योजना क्र.३ ची कामे ५ टप्प्यात प्रस्तावित आहेत. त्यापैकी टप्पा क्र.१ व २ अंतर्गत उजनी धरणातुन पेडगांव येथून पाणी उचलून खुंटेफळ साठवण तलाव ता. आष्टी या प्रकल्पात सोडण्याचे नियोजित आहे टप्पा क्र.३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलाव ता. आष्टी या प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर असुन भौतिकदृष्टया सुमारे ३५ % पूर्ण झाले आहे. पुढील ४ व ५ टप्प्यातील कामाचे सविस्तर सर्वेक्षण अद्याप हाती घेण्यात आलेले नाही.

६.० विशेष लाभ:- उस्मानाबाद व बीड जिल्हयातील अवर्षण प्रवण भागातील खालील दर्शविलेल्या क्षेत्रास पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी या योजनेचा लाभ होणार आहे.

तालुका निहाय सिंचन क्षेत्र (हेक्टर)		
अ.क्र.	उस्मानाबाद जिल्हा	सिंचन क्षेत्र (हेक्टर)
अ)	उपसा सिंचन योजना क्र.१ (१०.४१ अ.घ.फु.)	
	तालुका	
१.	परंडा	१८८९८
२.	भूम	२१२४०
३.	कळंब	१७४०
४.	वाशी	२०४६
५.	उस्मानाबाद	६५५६
	अ) एकूण	**५०४८०**
ब.	उपसा सिंचन योजना क्र.२ (७.५७ अ.घ.फु.)	
१.	तुळजापूर	२२५०३
२.	उमरगा	६९४९
३.	लोहारा	७२४६
	ब) एकूण	**३६७०८**
	बीड जिल्हा	
क.	उपसा सिंचन योजना क्र.३ (५.६८ अ.घ.फु.)	
१	आष्टी	२७५४३
	एकूण अ + ब + क =	**११४७३१**

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प ता.नांदेड जि. नांदेड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	६१६२५			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	४८५२०			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२५/०५/१९७९	१९७८-७९	३२.२४	३३७२५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १ (डेरला,किवळा व शिराढोण उपसा सिंचन योजनासह)	०७/०६/१९९४	१९९२-९३	१९६.६०	३३७२५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २ (गोदावरी नदीवरील १० बंधा-यांसह)	०३/०३/२००५	२००३-०४	६००.९४	५०८८६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (गोदावरी नदीवरील ११ बंधा-यांसह)	१५/११/२००५	२००३-०४	१०११.७८	५५८१०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ४ (गोदावरी नदीवरील १२ बंधारे व कोलंबी उपसा सिंचन योजनेसह)	२७/८/२००९	२००८-०९	२४५२.००	६१६२५
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	इंग्रजी पत्र क्र. २(२३६)/८३/आय ऍन्ड सीएडी दि. २९/०६/१९८३ रू.७८.९३ कोटी (दरसूची १९८१-८२)			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७६-७७ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२ एकुण	रु. ९७.३० कोटी रु. ३१.९० कोटी रु. १५७८.४२ कोटी रु. १७०७.६२ कोटी		
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	८.३८			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१५५१.७२			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१४७.५२			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१७०७.६२			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७९-८०			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९८२ (किंमत रुपये ७८.९३ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) =(ब - अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	२६.७२	३६९.९५	३४३.२३	१४.१८
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	२.०६	२०.२५	१८.१९	०.७५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	१०३१.५८	१०३१.५८	४२.६३
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३८८.११	३८८.११	१६.०४
७.५	इतर कारणे	३.४६	६४२.११	६३८.६५	२६.४०
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	३२.२४	२४५२	२४१९.७६	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	विष्णुपूरी बंधा-याचे भूसंपादन पूर्ण. भाग-२अंतर्गत बंधा-यासाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रगत.पुनर्वसन व वन जमीन संपादनाची आवश्यकता नाही.			
८.२	धरण	विष्णुपूरी बंधा-याचे काम १९८६ मध्ये पूर्ण.भाग-२ अंतर्गत तारुगव्हाण बंधारा वगळता अन्य बंधा-यांची कामे जवळपास पूर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	विष्णुपूरी प्रकल्पाच्या भाग-१ अंतर्गत मुख्य कालवा कि.मी. १ ते ४९, कि.मी. १ ते ३३ मधील वितरण व्यवस्थेसह पूर्ण.मुख्य कालवा कि.मी. ३४ ते ४९ मधील वितरण व्यवस्थेची उर्वरीत कामे व चार उपसा सिंचन योजनांची कामे प्रगत.			

शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्प.जि. नांदेड
संक्षिप्त टिप्पणी

१.० शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाचा बंधारा असरजन ता.जि. नांदेड येथे गोदावरी नदीवर बांधण्यात आला आहे. विष्णुपूरी बंधा-याचे काम सन १९८२ साली सुरुवात होऊन काम सन १९८६ मध्ये पूर्ण करण्यात आले. प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्याची एकूण लांबी ४९ कि.मी. असून एकूण लाभक्षेत्र २८३४० हेक्टर आहे. उजवा मुख्य कालवा कि.मी. १ ते ३३ पर्यंतचे काम वितरण व्यवस्थेसह १९९० साली पूर्ण करण्यात आले. विष्णुपूरी प्रकल्प टप्प्याटप्याने व्यवस्थापन विभागाकडे व्यवस्थापनेसाठी हस्तांतरीत करण्यात आला असून एकूण जून-२०१२ अखेर १४३९५ हेक्टर क्षेत्र हस्तांतरीत करण्यात आले आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

मुळ प्रकल्प अहवालात प्रकल्पाचे लाभक्षेत्र टोपोशिटच्या आधारे निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर एक मिटर अंतराने समतल रेषांचे नकाशे उपलब्ध झाल्याने लाभक्षेत्रामध्ये घट दिसून आली. शासन पत्र क्र. एलजीपी/१०८४/२२९२/३००२/मोप्र-२/दिनांक ४/२/१९८७ अन्वये बंधा-याच्या उर्ध्व बाजूस उजव्या तीरावर पांगरा शाखा कालवा काढण्यात आला. शासन पत्र क्र. एजलीपी/ १०८९/२०३१/(१०४२/८९)मोप्र-२/दिनांक १३/११/१९९१ अन्वये कालव्यावर डेरला, किवळा व गोळेगांव (शिराढोण) या तीन उपसा सिंचन योजनांचा समावेश करण्यात आला. तसेच प्रकल्पाच्या बांधकामाच्या खर्चात वाढ झाल्यामुळे प्रथम सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दिनांक ७.०६.१९९४ अन्वये रु. १९६.६० कोटीस मान्यता मिळाली.

शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पांतर्गत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील तरतुदीच्या अधिन राहून प्रकल्पांच्या कामांतर्गत टप्पा-१ ची कामे पूर्ण झाल्यांनतर टप्पा-२ अंतर्गतची कामे हाती घेण्याकरिता प्रकल्पाच्या पुनर्विलोकन अभ्यास करण्यात आला. प्रकल्पाच्या पुनर्विलोकन अहवालात मागील १५ वर्षाच्या विष्णुपूरी प्रकल्पाच्या स्थळी उपलब्ध होणा-या येव्याच्या अनुभवावरुन असे निदर्शनास आले की, सद्याच्या बंधा-याच्या साठवण क्षमतेच्या मर्यादेमुळे विष्णुपूरी प्रकल्पासाठी ४.१० अ.घ.फू.(११६.०० द.ल.घ.मी.) पेक्षा अधिक पाणी वापर होऊ शकत नाही. त्यामुळे ७.३० अ.घ.फू.(२०७ .०० द.ल.घ.मी.) एवढे पाणी वापराविना नदीतून महाराष्ट्राच्या सिमेखाली आंध्र प्रदेशात वाहून जाते. यासंबंधी दिनाक २५/८/२००४ रोजी प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाणी उपलब्धतेबाबत केलेला पुनर्विलोकन अभ्यास व गोदावरी नदीवर बंधा-यांची श्रृंखला निर्माण करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. शासन पत्र क्र. जलसंपदा विभाग विष्णुपूरी - २००४/२९५/(५९/४) मोप्र-२ दिनाक ५/१०/२००४ नुसार नियोजन आयोग व केंद्रीय जल आयोग यांनी विष्णुपूरी प्रकल्पास दिलेल्या मंजूर पाणी वाटपाच्या मर्यादेत विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारीत नियोजनाचा एकत्रित प्रस्ताव तयार करुन त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी असे निर्देश दिले. महाराष्ट्र शासनाच्या दिनाक २२/२/२००५ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत गोदावरी नदीवर पैठण धरणाच्या निम्न बाजूस महाराष्ट्र - आंध्र प्रदेश राज्याच्या सिमेपर्यंत १० बंधारे विष्णुपूरी प्रकल्पाचा भाग म्हणून बांधण्यास मंजूरी देण्यात आली. सखोल सर्वेक्षणानुसार बंधा-याची स्थळे निश्चित करण्यात आली व द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये १० बंधा-यांचा समावेश करण्यात आला. शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाचे द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळाने निर्णय क्र. गोमपाविमं/तां-३/ विप्र/सुप्रमा/१/दिनांक ३/३/२००५अन्वये रु. ६००.९४ कोटीस मान्यता दिली.

प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेनुसार विष्णुपूरी प्रकल्प भाग-२ अंतर्गत बंधा-यांची सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनाची कामे हाती घेण्यात आली. महासंचालक महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक, कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद, क्षेत्रिय अधिकारी व मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे अभियंता यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. उपरोक्त बैठकांमध्ये बंधा-यांची माथा पातळी, पांरपारिक पद्धतीच्या दरवाजा ऐवजी स्वयंचलित/अर्ध स्वयंचलित दरवाजे बसविणे, १:२५ चा पूर विसर्गानुसार वहनपथ निश्चिती, उर्जा व्यय संरचना करणे, कामास्तव वापरावयाच्या संधानकाची श्रेणी ठरविणे इत्यादि तांत्रिक बाबींचे निर्णय घेण्यात आले. सदर निर्णयांच्या कार्यान्वयामुळे या बंधा-यांच्या द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेच्या किंमतीमध्ये लक्षणीय वाढ निदर्शनास आली. त्याचप्रमाणे सध्या गोदावरी नदीवर प्रगत असलेल्या हिरडपुरी को.प. बंधा-याच्या व्याप्तीत बदल करुन निम्न पातळी बंधारा प्रस्तावित करण्यात आला. शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी

प्रकल्पाच्या एकूण रुपये १०११.७८ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या तृतिय सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळाने निर्णय क्र. गोमपाविम/ता-३/विष्णुपूरी प्रकल्प/सुप्रमा/२९, दिनांक १५/११/२००५ अन्वये मान्यता प्रदान केली.

विष्णुपूरी प्रकल्पाच्या मुळ नियोजनात अंतर्भूत असलेल्या कोलंबी उपसा सिंचन योजनेचा पुन:श्च अंतर्भाव करण्यात आला. तसेच गोदावरी नदीवरील बांधकामाधीन मुदगल व ढालेगाव बंधा-यांचे दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आग्रही मागणीनुसार तारुगव्हाण बंधा-याचा समावेश करण्यात आला व मूळ योजने नजीक नदीच्या घाटाचे बांधकाम व परिसर विकासाची कामे अंतर्भूत करण्यात आली. वरील कारणामुळे शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाच्या एकूण रुपये २४५२ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या चतुर्थ सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळाने निर्णय क्र. गोमपाविम/तांशा-३/शंचविप्र/ चसुप्रमा/ ११, दिनांक २७/८/२००९ अन्वये मान्यता प्रदान केली .

अशा रितीने विष्णुपूरी प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे खालीलप्रमाणे किमतीत वाढ झाली आहे.

१	भाग-१ अंतर्गत डेरला, किवळा, शिराढोण व कोलंबी उपसा सिंचन योजनांचा समावेश केल्याने	रु. १२५.१७ कोटी
२	भाग-२ अंतर्गत एकूण १२ बंधा-यांचा समावेश केल्याने	रु. १२९४.५२ कोटी
३	एकूण	रु. १४१९.६९ कोटी
४	तांत्रिक सुधारणा संकल्पनामुळे होणारी घट	(-) रु.३८८.११ कोटी
५	निव्वळ व्याप्तीतील वाढ	रु.१०३१.५८ कोटी

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

विष्णुपूरी बंधा-याच्या, पंपगृहाच्या व उध्दरण नलिकेच्या मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सुधारीत संकल्पनामुळे रु. १५१.४२ कोटी वाढ झाली. भाग-२ अंतर्गत बंधा-यांची अंदाजपत्रके ढोबळ आराखडयानुसार केलेली असल्यामुळे सविस्तर संकल्पनानुसार झालेली वाढ रु. २३६.६९ कोटी असून एकूण संकल्पचित्र बदलामुळे झालेली वाढ रु. ३८८.११ कोटी आहे.

४.० इतर कारणे

१) अपूरी तरतूद

२) भूविकास कामाची तरतूद

३) वाढीव किंमतीच्या निवीदा स्विकृती

एकूण होणारी वाढ (१ ते ३) रु. २६२.११ कोटी

४) ई.टी.पी. मुळे होणारी वाढ रु. ३७६.५४ कोटी

एकूण रु. ६३८.६५ कोटी

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक) :

विष्णुपूरी प्रकल्पाच्या मुख्य बंधा-याचे काम १९७८ मध्ये सुरु केले व १९८६ मध्ये पूर्ण करण्यात आले. उजवा मुख्य कालवा कि.मी. १ ते ३३ वितरण व्यवस्थेसह पूर्ण करण्यात येऊन टप्प्याटप्प्याने १७९५० हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झालेली असून १४३९५ हे. क्षेत्र व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. कालव्यावरील डेरला, किवळा, शिराढोण व कोलंबी उपसा सिंचन योजनांची कामे प्रगत आहेत.

भाग-२ अंतर्गत १२ बंधा-यांपैकी तारुगव्हाण बंधारा वगळता इतर सर्व बंधा-यांची स्थापत्य व यांत्रिकी कामे जवळपास पूर्ण झाली असून अनुषंगिक कामे जसे बुडीत क्षेत्रातील रस्ते, पुल व भुसंपादन प्रगत आहेत. पूर्ण झालेल्या बंधा-यांमध्ये २०८.८८५ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्मिती झाली असून २८३०१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

विष्णुपूरी प्रकल्प भाग-१ व भाग-२ (१२ बंधा-यांसह) सुधारीत प्रशासकीय मान्यता किमंत रु. २४५२ कोटी असून या प्रकल्पावर भाग-१ व भाग-२ मिळून मार्च-२०१२ अखेर रु. १७०७.६२ कोटी खर्च झाला आहे. निधी उपलब्ध झाल्यास भाग-१

ची कामे मुख्यत्वे ४ उपसा सिंचन योजना जून-२०१६ अखेर पूर्ण करावयाचे नियोजित आहे व तारुगव्हाण बंधा-याचे काम जून-२०१४ अखेर पूर्ण करावयाचे नियोजित आहे.

६.० विशेष लाभ

विष्णुपूरी प्रकल्प भाग-१ :-

१) विष्णुपूरी प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालवा व वितरण व्यवस्थेद्वारे सन १९८९-९० पासून सिंचनाच्या प्रत्यक्ष लाभास सुरुवात होऊन मागील ५ वर्षापासून सरासरी दरवर्षी १२००० ते १४००० हेक्टर सिंचन होत आहे.

२) नांदेड शहराच्या सुमारे ६ लक्ष लोकसंख्येच्या पाणी पुरवठयासाठी विष्णुपूरी प्रकल्पाशिवाय इतरत्र उद्भव शहरालगतच्या परिसरात उपलब्ध नाही. नांदेड शहरापासून केवळ ८ कि.मी. अंतरावर विष्णुपूरी प्रकल्पातून फक्त २५ मी. उंचीचा उपसा करुन नांदेड शहरासाठी दरवर्षी ३५ ते ४० द.ल.घ.मी. पाणी पूरविण्यात येते व त्यापोटी दरवर्षी शासनास अंदाजे रु. ६५.०० लक्ष महसुल प्राप्त होतो.

३) नांदेड जिल्हयातील गोदावरीच्या काठावरील ११ गावांना जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येतो.

४) नांदेड औद्योगिक वसाहतीतील ५०० उद्योगांना खात्रीलायक पाणी पुरवठयामुळे उद्योगधंद्याची भरभराट होऊन अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे. कृष्णूर येथील औद्योगिक वसाहतीतील प्रस्तावित १५०० उद्योगांना तसेच कृष्णूर येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी जलाशयातून पाणी पुरवठा करावयाचे नियोजित आहे.

५) विष्णुपूरी जलाशय नांदेड शहरा जवळ असल्याने अंतर्गत जलवाहतूक व बोटींग च्या माध्यमातून पर्यटनास चालना मिळाली आहे. त्यामुळे नांदेड शहराच्या आर्थिक विकासास मोठा हातभार लागला आहे.

६) प्रकल्पाच्या सिंचनामुळे कृषि आधारीत उद्योग धंद्यांना चालना मिळाली असून लाभक्षेत्रात अप्रत्यक्षपणे रोजगार निर्मीती होऊन परिसरातील नागरीकांचे सामाजिक व अर्थिक जीवनमान उंचावण्यामध्ये हातभार लागला आहे.

७) विष्णुपूरी बंधारा परीसरात काळेश्वर मंदीर हे पर्यटन स्थळ विकसित झाले आहे. केंद्र शासनामार्फत मेगा टुरिझम सर्किट अंतर्गत रु. ४७ कोटी निधीस मान्यता झाली असल्याने पर्यटनास चालना मिळणार आहे.

८) गुरु-ता-गद्दी या जागतिक घटनेचे नियोजन विष्णुपूरी जलाशयातील मुबलक पाणी उपलब्धतेमुळे शक्य झाले व नांदेड शहर जगाच्या नकाशावर आले.

विष्णुपूरी प्रकल्प भाग-२ :-

१ जायकवाडी प्रकल्पाखाली मुक्त पाणलोट क्षेत्रातून १२ बंधा-यांकरिता पाणी उपलब्ध होणार असल्याने महाराष्ट्र राज्याच्या हक्काचे ११.४० अ.घ.फू. पैकी विनावापर आंध्र प्रदेशात वाहून जाणारे ७.३० अ.घ.फू. पाणी अडविण्यात येणार आहे. तसेच गोदावरीचे पात्र पैठण धरण ते राज्यसिमेपर्यंत पूर्णत: भरुन राहणार असल्याने नदीकाठावरील गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

२ सन २०१२ मध्ये पावसाळयाच्या शेवटी जायकवाडी धरणामध्ये ३ टक्के जीवंत पाणीसाठा असतांनाही १२ बंधा-यांमध्ये मुक्त पाणलोट क्षेत्राद्वारे ८६.४६ द.ल.घ.मी. पाणीसाठा करण्यात आला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	उर्ध्व पैनगंगा प्रकल्प ता.पुसद जिल्हा यवतमाळ.			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१२४७७२			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	१००१५८			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिं.क्षे.(हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०८/११/१९६८	१९६०-६१	३५.०६	१११५११
	सुधारित प्रशासकीय मान्यता -१	३०/०३/१९७७	१९७५-७६	८४.४८	१११५११
	सुधारित प्रशासकीय मान्यता-२ (तीन मुख्य कालव्याचे अस्तरीकरण व १० शाखा कालव्याचे मातीकाम, बांधकामे व अस्तरीकरणासह नव्याने अंतर्भूत)	२०/०४/१९८७	१९८४-८५	३६८.१९	१३४२८२
	सुधारित प्रशासकीय मान्यता-३ (१ शाखा कालवा अस्तरीकरणासह नव्याने अंतर्भूत)	२५/०७/१९९९	१९९४-९५	८६७.४६	१३४२८२
	सुधारित प्रशासकीय मान्यता -४ (१ शाखा कालवा अस्तरीकरणासह नव्याने अंतर्भूत)	२९/१०/२००७	२००५-०६	१९७६.०९	११६७२८
	सुधारित प्रशासकीय मान्यता -५ (पैनगंगा नदीवरील ५ उच्च पातळी बंधारे नव्याने अंतर्भूत)	२७/०८/२००९	२००८-०९	३५५०.२८	१२४७७२
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	नियोजन आयोग, जलसंसाधन विभाग, योजना भवन नवी दिल्ली यांचे पत्र क्र.२ (१८०)/ २००७-डब्ल्युआर दि.१२.४.१० रु.३०३८.४२ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९६८-६९ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. ३२६.१० कोटी रु. १९८.७० कोटी रु. ९५६.५४ कोटी रु.१४८१.३४ कोटी	
४.२	भूसंपादन,पुनर्वसन,वनजमीन संपादनखर्च (रु.कोटी)	९८.९८			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१०४३.२३			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	३३९.१३			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१४८१.३४			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९६८-१९६९			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	इसापूर धरणाचे काम १९७६ साली सुरु झाले असून त्यावेळची प्रकल्पाची किंमत रु.८४.४८ कोटी होती. सापळी धरणाचे काम पर्यावरण मान्यते अभावी व प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सुरु झालेले नाही.			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत	वाढीव रक्कम	टक्केवारी (वाढीव रकमेची)
		अ	**ब**	**क = (ब-अ)**	**ड**
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	२९.६९	११४४.८६	१११५.१७	३१.७२
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ	५.०७	४०६.९६	४०१.८९	११.४३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे वाढ)	०.००	१२८३.२०	१२८३.२०	३६.५१
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	६१.७३	६१.७३	१.७६
७.५	इतर कारणे	०.३०	६५३.५३	६५३.२३	१८.५८
	एकुण अ.क्र. ७.१ ते ७.५ (रु.कोटी)	३५.०६	३५५०.२८	३५१५.२२	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	इसापूर धरणाचे भूसंपादन व पुनर्वसन पूर्ण, सापळी धरणाचे भुसंपादन प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामूळे प्रलंबीत, इसापूर डावा कालवा, कयाधु शाखा कालवा व इसापूर उजवा कालवा कि.मी. १२५ पर्यंत कालव्यासाठीचे भुसंपादन पूर्ण व कि.मी.१२६ ते १४० मध्ये प्रगतीपथावर. कालव्यासाठी लागणाऱ्या ५.८३ हे.वनजमीनी पैकी ५.२१ हे.साठी मान्यता मिळाली आहे.			
८.२	धरण	इसापूर धरणाचे मातीकाम १९८२ मध्ये पूर्ण, सांडवा व द्वार उभारणीचे काम १९९६ मध्ये पूर्ण, सापळी धरणाचे काम पर्यावरण मान्यतेअभावी व प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सुरु झालेले नाही.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	इसापूर डावा कालवा,कयाधू शाखा कालवा व इसापूर उजवा कालवा कि.मी.१ ते १२५ पर्यंत वितरण व्यवस्थेच्या कामासहीत पूर्ण. इसापूर उजवा कालवा कि.मी. १२६ ते१४० मधील कामे वितरण व्यवस्थेच्या कामासहित प्रगती पथावर आहेत.			

उर्ध्व पैनगंगा प्रकल्प
संक्षिप्त टिपणी

१.० प्रास्ताविक :-

उर्ध्व पैनगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र राज्यातील एक मोठा पाटबंधारे प्रकल्प असून मौजे ईसापूर ता.पुसद जि.यवतमाळ येथे पैनगंगा नदीवर इसापूर धरण, मौजे सापळी ता.कळमनूरी जि.हिंगोली येथे कयाधू नदीवर सापळी धरण, इसापूर धरणापासून निघणारा ८४ कि.मी. लांबीचा डावा कालवा, १४० कि.मी. लांबीचा इसापूर उजवा कालवा व सापळी धरणा पासून निघणारा ६ कि.मी. लांबीचा कयाधू पुरक कालवा याचा समावेश असून समरुपता अभ्यासानुसार ११६७२८ हे. सिंचन क्षमता आहे. या प्रकल्पामध्ये पैनगंगा नदीवरील पाच उच्च पातळी बंधाऱ्यांचा समावेश केला असून त्याद्वारे ४९.२० दलघमी पाणीसाठा व ८०४४ हे. सिंचन निर्मिती करण्यांत येणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची दोन्ही मिळून एकूण सिंचन क्षमता १२४७७२ हे. आहे. इसापूर धरण सन १९९६ मध्ये पूर्ण झाले असून व्यवस्थापन विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहे. प्रकल्पीय सिंचन क्षमतेपैकी १,००,१५८ हे. सिंचन निर्मिती जून २०१२ अखेर झाली असून त्यापैकी ८२,६९२ हे. क्षेत्र व्यवस्थापन विभागास सिंचनासाठी हस्तांतरीत करण्यात आले आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पास पाटबंधारे व विज विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.पीआयएम/४०६८/ १३९३३ आयपी-(२) दि. ८/११/१९६८ अन्वये (दरसुची वर्ष १९६०-६१) रु. ३५.०६ कोटीस मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात वाढ झाल्यामुळे प्रथम सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता शासन पाटबंधारे विभाग निर्णय क्र. उपैप्र-११७६/१०१९/५३३/एमएजे (१) दि. ३०/३/१९७७ अन्वये (दरसुची वर्ष १९७५-७६) रु.८४.४८ कोटीस मान्यता मिळाली आहे. उपरोक्त दोन्ही अंदाजपत्रकामध्ये प्रकल्पीय सिंचन क्षमता १,११,५११ हे. आहे. सदरील अंदाजपत्रकास केंद्रिय जलआयोग व नियोजन आयोग यांचे पत्र क्र.२ (१)(१४)/७६ आय अँन्ड सीएडी दि. २/६/१९७६ अन्वये केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित अंदाजपत्रकास शासन पाटबंधारे विभाग निर्यण क्र.उपैप्र-१०८६/ २३९३/३५३/८६/मोप्र (२) दि.२०/४/१९८७ अन्वये (दरसुची वर्ष १९८४-८५) अन्वये रु.३६८.१९ कोटीस मान्यता मिळाली आहे. मुळ अंदाजपत्रकात व प्रथम सुधारित अंदाजपत्रकामध्ये इसापूर उजवा कालव्यासच फक्त अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित होते. प्रकल्पास जागतीक बँकेकडून अर्थसहाय्य प्राप्त झाल्यामुळे प्रकल्पावरील मुख्य व शाखा कालवे आणि वितरण व्यवस्था अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित केल्यामुळे कालव्याचा वहन नाश कमी होवून लागवडी क्षेत्राच्या ७५ टक्के ऐवजी ९० टक्के सिंचनक्षेत्र झाल्यामुळे प्रकल्पाची सिंचन क्षमता १३४२८२ हे. इतकी झाली. प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित अंदाजपत्रकात तीन मुख्य कालव्याचे अस्तरीकरण व १० शाखा कालव्याचे मातीकाम, बांधकामे व अस्तरीकरणासह नव्याने अंर्तभुत केले. प्रकल्पाच्या तृतिय सुधारित अंदाजपत्रकास शासन पाटबंधारे विभाग निर्णय क्र.उपैप्र-१०९४/ ८८७/ (१५१/९४)मोप्र-२ दि. २५/७/१९९९ अन्वये (दरसुची वर्ष १९९४-९५) रु.८६७.४६ कोटीस मान्यता मिळाली आहे.या अंदाजपत्रकात प्रकल्पाची सिंचन क्षमता १३४२८२ हे. आहे.

प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित अंदाजपत्रकास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्र. गोमपाविम/तां-२/५/२००७-०८/उपेप्र/सुप्रमा/११६७ दि.२९/१०/२००७(दरसुची वर्ष २००५-०६) अन्वये रु.१९७६.०९ कोटीस मान्यता मिळाली आहे. इसापूर धरणस्थळी येणाऱ्या पाण्याच्या येवामधील तूट प्रकल्पाच्या समरुपता अभ्यासामध्ये दिसून आली. त्यानुसार महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-२००७/ (२५७/२००७)/जसंनि दि. १७/१/२००८ अन्वये या अंदाजपत्रकामध्ये प्रकल्पाची सिंचन क्षमता १३४२८२ हे. ऐवजी ११६७२८ हे. करण्यांत आली आहे. तसेच सापळी धरणाची साठवण क्षमता १२० दलघमी ऐवजी २४१ दलघमी पर्यंत वाढवण्यात आली. त्यानुसार परिमाणात झालेल्या वाढीचा अंतर्भाव सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आला.प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित अद्ययावत अंदाजपत्रकास केंद्रिय नियोजन आयोग व जलसंसाधन विभाग, योजना भवन, नवी दिल्ली यांनी पत्र क्र. २ (१८०)/२००७-डब्ल्युआर दि. १२/४/२०१० (दरसुची वर्ष २००८-०९) अन्वये रु.३०३८.४२ कोटीस मान्यता दिली आहे.

प्रकल्पाच्या पाचव्या सुधारित अंदाजपत्रकास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्र. गोमपाविम/तां-२/१८/२००९-१०/उपेप्र/सुप्रमा/१० दि. २७/८/२००९ (दरसुची वर्ष २००८-०९) रु.३५५०.२८ कोटीस मान्यता मिळाली आहे. महामंडळ कार्यालयाने पत्र क्र.गोमपाविम /तां-३/ नापामं/ससाप/५९०६ दि. २४/७/२००९ अन्वये पैनगंगा नदीवरील नांदेड जिल्ह्याच्या किनवट/माहूर तालुक्यातील लोकप्रतिनिधी मा.प्रदीप नाईक, आमदार किनवट यांचे मागणीनुसार मोहपूर, दिगडी, मारेगाव, भंडारवाडी व किनवट येथील बांधकामाधीन कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे नव्याने प्रस्तावित उच्च पातळी बंधाऱ्यामध्ये रुपांतरीत करुन त्यास उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचा एक भाग म्हणून प्रस्तावित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने पैनगंगा नदीवरील पाच उच्च पातळी बंधाऱ्यांच्या रु.३००.१३ कोटी किंमतीच्या कामाचा समावेश प्रकल्पाच्या पाचव्या सुधारित अंदाजपत्रकात केला आहे. या उच्च पातळी बंधाऱ्यामुळे ८०४४ हे. सिंचन निर्मिती करण्यांत येणार आहे त्यामुळे प्रकल्पाची सिंचन क्षमता ११६७२८ ऐवजी १२४७७२ हे. झाली आहे.

अशा रितीने प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे खालीलप्रमाणे किंमतीत वाढ झाली आहे. (रु.कोटी)

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

अ. क्रमांक	तपशिल	इसापूर धरण	सापळी धरण	एकूण
१	सांडव्याची भिंत दगडी बांधकामाऐवजी संधानकामध्ये बांधणे	४.७८		४.७८
२	सांडवा द्वाररहित ऐवजी लोह वक्रद्वार बसविणे, त्यावर पुल बांधणे इ.	८.१५		८.१५
३	सांडव्याची भिंत दगडी बांधकाम व संधानका ऐवजी पुर्णपणे संधानकात बांधणे.		४८.८०	४८.८०
	एकूण :-	**१२.९३**	**४८.८०**	**६१.७३**

४.० इतर कारणामुळे झालेली वाढ :-

अ. क्र.	तपशिल	इसापूर धरण	सापळी धरण	मुख्य/शाखा कालवे व वितरण व्यवस्था	पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधारे	एकूण
१.	सापळी धरणाची क्षमता १२० ऐवजी २४१ दलघमी करणे.		१०९.८०			१०९.८०
२.	पुनर्वसनासाठी नव्याने तरतूद करणे.	१६.५८	१५.५८			३२.१६
३.	पर्यावरणासाठी नव्याने तरतूद करणे.	७७.९४	१९.७८	१.१४		९८.८६
४.	भांडार साठयातील तुटीसाठी (वाय - शिर्षाखाली) नव्याने तरतूद करणे.	०.१७	०.४८	२.१०		२.७५
५.	बारा शाखा कालव्यांचे मातीकाम, भूसंपादन व त्यावरील बांधकामे यांची नव्याने तरतूद करणे.			२१४.५६		२१४.५६
६.	पंधरा शाखा कालव्यांचे अस्तरीकरणासाठी नव्याने तरतूद करणे.			१०२.२६		१०२.२६
७.	वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरणाची नव्याने तरतूद करणे.			३०१.८९		३०१.८९
८.	भुविकासासाठी नव्याने तरतूद करणे.			८१.५१		८१.५१
९.	विशेष दुरुस्तीसाठी नव्याने तरतुद करणे.			३९.२६		३९.२६
१०.	पैनगंगा नदीवरील पाच उच्च पातळी बंधाऱ्यांच्या कामाचा समावेश करणे.				३००.१३	३००.१३
	एकूण :-	**९४.६९**	**१४५.६४**	**७४२.७४**	**३००.१३**	**१२८३.२०**

अ.	ई.टी.पी. व इतर बांबीसाठी मुळ अंदाजपत्रकातील तरतुद	रु. ०.३० कोटी.
ब.	पाचव्या सुधारित अंदाजपत्रकातील ईटीपी व इतर बाबीसाठी तरतुद १. मार्च २००९ पर्यंत आस्थापनेवर झालेला खर्च रु. २८४.९१ कोटी २. भविष्यातील आस्थापनेसाठी १५ % तरतुद उर्वरित कामाच्या किंमतीवर (भुसंपादन किंमत वगळून) रु २५१.३८कोटी ३. तरतुद उर्वरित कामाच्याबाबीसाठी रु ११७.२४ कोटी एकूण रु ६५३.५३ कोटी	६५३.५३ कोटी
क	इटीपी वइतर बाबीमुळे होणारी वाढ	रु. ६५३.२३ कोटी

५.० प्रकल्पाची सध्यस्थिती:

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाअंतर्गत इसापूर मातीधरणाचे काम वर्ष १९७६ मध्ये अवजड यंत्र सामुग्रीने खात्यामार्फत हाती घेण्यात येवून मे-१९८२ मध्ये पुर्ण करण्यात आले. इसापूर धरणामुळे प्रकल्प बाधीत गावांचे पुनर्वसनाचे काम वर्ष १९७७-७८ मघ्ये हाती घेण्यांत येवून वर्ष १९८२ मध्ये पूर्ण करण्यांत आले. पुनर्वसित गावांमध्ये अतिरिक्त नागरी सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. इसापूर धरणाचे मातीकाम १९८२ मध्ये पूर्ण झाल्यामुळे धरणात अंशत: ३१५ दलघमी (३३ टक्के) उपयुक्त पाणीसाठा निर्माण करण्यात आला होता. इसापूर धरणाच्या सांडव्याचे काम वर्ष १९८७ मध्ये हाती घेवून द्वार उभारणीसह वर्ष १९९६ मध्ये पूर्ण झाल्यामुळे इसापूर धरणात ९६४ दलघमी (१०० टक्के) उपयुक्त पाणीसाठा पूर्ण क्षमतेने निर्माण करण्यात आला आहे. या प्रकलांतर्गत सापळी धरणाचे व कयाधु पुरक कालव्याचे काम पर्यावरण मान्यतेअभावी व प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे अद्याप सुरु झालेले नाही. इसापूर उजवा कालव्याचे काम वर्ष १९७६-७७ मध्ये व इसापूर डाव्या कालव्याचे काम वर्ष १९७७-७८ मध्ये हाती घेण्यात आले. प्रकल्पांतर्गत वितरण व्यवस्थेची कामे वर्ष १९८२-८३ मध्ये हाती घेण्यात आली.

सद्यस्थितीत इसापूर उजवा कालव्याच्या १४० कि.मी.लांबी पैकी १२५ कि.मी. पर्यंतचा कालवा अस्तरीकरणासह जवळपास पुर्ण करण्यांत आला असून कि.मी.१२६ ते १४० चे काम प्रगती पथावर आहे. तसेच इसापूर डावा कालव्याचे ८४ कि.मी. लांबीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. इसापूर उजव्या कालव्यावरील १२ पैकी १० शाखा कालव्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. करखेली व धर्माबाद शाखा कालव्याचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रकल्पाच्या कालवे व वितरण व्यवस्थेद्वारे निर्माण होणाऱ्या ११६७२८ हे. सिंचन क्षेत्रापैकी जून २०१२ अखेर १००१५८ हे. क्षेत्रावर सिंचन निर्मिती करण्यात आली आहे. प्रकल्पास सन २००४-०५ पासून वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमा अंतर्गत केंद्रिय अर्थसहाय्य प्राप्त होत आहे. या कार्यक्रमांतर्गत उर्वरित सिंचन क्षमता मार्च २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत भुविकासाची कामे ८३०७६ हे. क्षेत्रावर पूर्ण झाली असून उर्वरीत क्षेत्रावर कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच पैनगंगा नदीवरील पाच उच्च पातळी बंधाऱ्यापैकी मोहपूर, दिगडी व किनवट या बंधाऱ्यांची कामे प्रगती पथावर असून सन २०१४ पर्यंत निधी उपलब्ध झाल्यास पूर्ण करण्याचे नियोजन आहे. भंडारवाडी आणि मारेगांव उच्च पातळी बंधाऱ्याची कामे लवकरच हाती घेण्यात येणार आहेत.

६.० विशेष लाभ :-

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात एकूण ७ साखर कारखाने असून त्यापैकी प्रमुख ४ साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०११-१२ मधील एकत्रित गाळप १२ लक्ष मे.टन व साखर उत्पादन १३ लक्ष पोते आहे. व मळीवर आधारीत अल्कोहल उत्पादन ५८.१६ लक्ष लिटर आहे. या सर्व कारखान्यांची या गळीत हंगामातील एकत्रीत उलाढाल रु.३८०.० कोटी असून विविध करापोटी शासनास रु.३२.० कोटी भरणा केलेला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, मुदखेड, तसेच हिंगोली जिल्हयातील कळमनुरी व वसमत या तालुक्यातील लाभक्षेत्रामध्ये केळी या पिकाचे भरघोस उत्पादन होत आहे. इसापूर धरणामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील उमरखेड, हदगांव, हिमायतनगर व कळमनुरी या तालुका स्तरावरील शहरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली असून इसापूर धरणात १५.२३ दलघमी पिण्याचे पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. उर्ध्व पैनगंगा प्रकल्पामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले असून रोजगाराच्या भरीव संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	लेंडी आंतरराज्यीय प्रकल्प ता.मुखेड जि. नांदेड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१. महाराष्ट्र -१६९५० २. आंध्र प्रदेश - ११३३६ एकूण -२८२८६			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	निरंक			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२९-८-१९८६	१९८४-८५	४५.५१	२८२८६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२१-१२-२००१	१९९९-२०००	२२५.९९	२८२८६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२८-११-२००५	२००४-०५	३५७.८८	२८२८६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	२९-१२-२००७	२००६-७	४६४.३२	२८२८६
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	मान्यतेची कार्यवाही प्रगत आहे			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९८६-८७ ते १९९४-९५ .. १) १९९५-९६ ते १९९९-२००० .. २) २०००-२००१ ते २०११-१२ .. एकुण ..		रु. ९.८८ कोटी रु. १२.६४ कोटी रु.२७२.२० कोटी रु.२९४.७२ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	१०७.७४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१५९.४८			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	२७.५०			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	२९४.७२			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८६-८७			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन.१९८६-८७ (किंमत रु.४५.५१ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क)=(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	३३.४८	१९१.३७	१५७.८९	३७.७०
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	९.२९	१५२.३०	१४३.०१	३४.१५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	५८.८८	५८.८८	१४.०६
७.५	इतर कारणे (इ. टी.पी.)	२.७४	६१.७७	५९.०३	१४.०९
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	४५.५१	४६४.३२	४१८.८१	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	बुडीत क्षेत्रात १२ गावठाणे बाधीत, भूसंपादन व नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर, वनजमीन नाही.			
८.२	धरण	धरणाचे काम ७०% पूर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	मुख्य कालवा कि.मी.० ते १९ मधील कामे प्रगतअसून उर्वरित कामास लवकरच सुरूवात होत आहे.			

लेंडी आंतरराज्य प्रकल्प, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड
संक्षिप्त टिपण्णी

१.० लेंडी प्रकल्प हा आंतरराज्यीय प्रकल्प असून महाराष्ट् व आंध्रप्रदेश राज्याचा संयुक्त उपक्रम आहे. सदर प्रकल्प मौ.गोणेगांव ता.मुखेड जि.नांदेड येथे स्थित असून प्रकल्पाची साठवण क्षमता १४५.१५ द.ल.घ.मी.आहे. प्रकल्पाचे सिंचन योग्य पीक क्षेत्र महाराष्ट् व आंध्रप्रदेश राज्याचे अनुक्रमे १६९५० हे. व ११३३६ हे. असून एकत्रीत सिंचन योग्य पीक क्षेत्र २८२८६ हे. आहे. प्रकल्पाचा मुख्य कालवा ४५ कि.मी.लांबीचा असून त्या पैकी १९ कि.मी.लांबीचा कालवा संयुक्त कालवा आहे.प्रकल्पाच्या अंतरराज्यीय करार झालेला असून त्या प्रमाणे महाराष्ट्र व आंध्रप्रदेश राज्याचा वाटा अनुक्रमे ६२% व ३८% खर्च करणे बंधणकारक आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

लेंडी प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये यामुळे कोणतीही वाढ झालेली नाही.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

सन १९९३ मध्ये किल्लारी येथे भूकंप झाल्याने प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा पुनर्विलोकन करून सन फेब्रुवारी १९९५ मध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना यांनी तयार केलेल्या आराखडयात प्रकल्पाचे क्षेत्र भुकंप झोन क्र.३ मध्ये विचारात घेतल्याने संकल्प चित्रात व लेंडी प्रकल्पासाठी शासन पत्र क्र.लेंडी/१०९०/ ९३३६/ २५३/९०(मेजर-२) दि.१९/१२/९२नुसार नदी विमोचकाची तरतुद केल्याने रु.३९.८६ कोटीची वाढ झालेली आहे.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौ.मुक्रमाबाद व मै.इटग्याळ ही गावठाणे संपादीत करण्याच्या मार्गदर्शनास्तव महाराष्ट्र शासनाने पत्र क्र.दि.२५/८/२००४ नुसार गठीत केलेल्या समीतीने जुने गावठाण मुक्रमाबाद व गावठाण ईटग्याळ पूर्णत: संपादीत करण्याची शिफारस केल्याने रु.१०.३४ कोटीची वाढ झालेली आहे. बुडीत क्षेत्रातील पुलांचे संकल्पनात बदल झाल्यामुळे व पुनर्वसित गावठाणाचे पोच रस्त्याचे तरतूदीमुळे रु.८.६८ कोटी वाढ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली आहे. अशा रितीने लेंडी प्रकल्पाच्या सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे खालील प्रमाणे किंमतीत वाढ झालेली आहे.

१	प्रकल्पाचे क्षेत्र भुकंप झोन क्र.३ मध्ये विचारात घेतल्याने संकल्प चित्रात व लेंडी प्रकल्पासाठी नदी विमोचकाची तरतुद केल्याने झालेली वाढ.	रु.३९.८६ कोटी
२	प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौ.मुक्रमाबाद व मै.इटग्याळ ही गावठाणे पूर्णत: संपादीत करण्याची शिफारस केल्याने झालेली वाढ .	रु.१०.३४ कोटी
३	प्रल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पुलांचे संकल्पनात बदल झाल्यामुळे व पुनर्वसित गावठाणाचे पोच रस्त्याचे तरतूदीमुळे झालेली वाढ .	रु.८.६८ कोटी
४	एकूण वाढ	**रु.५८.८८ कोटी**

४.० इतर कारणे

इतर कारणामुळे व ई.टी.पी.मुळे होणारी वाढ रु.५९.०३ कोटी आहे.

५.० <u>प्रकल्पाची सद्य:स्थिती</u>

लेंडी प्रकल्पाचे काम सन.१९८६ साली सुरू झालेले आहे. मातीधरणाचे काम ७०% पुर्ण झालेले असून फक्त घळभरणीचे काम शिल्लक आहे.दगडी सांडव्याचे काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. साखळी क्र.३१५ मी. वरील सिंचनासह विद्युत विमोचकाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. लेंडी प्रकल्पाचा मुख्य कालवा ० ते ४५ पैकी मुख्य कालवा कि.मी.० ते १९ हा संयुक्त कालवा असून

त्याचे मातीकाम व त्या वरील बांधकामांची कामे प्रगतीपथावर आहेत.त्यापुढे महाराष्ट्र राज्य मुख्य कालवा कि.मी. २० ते ४५ असून त्या कामाची भूसंपादन प्रक्रीया प्रगत आहे.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात १२ गावठाणे बाधीत होतात. भुसंपादन व नागरी सूविधांची कामे प्रगत असून. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्ताचे पुर्नवसन अधिनियम १९९९ प्रमाणे पुर्नवसनाची विकास कामे प्रगतीपथावर आहेत. लेंडी प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या विविध मागण्या करिता दि. ६/४/२०११ पासून बंद केलेले आहे.प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१) प्रकल्पग्रस्तानी प्रकल्पाच्या कामाकरीता यापूर्वी संपादीत केलेल्या जमीनीची किंमत बाजार भावाच्या ५ ते ६ पटीने रुपये ५०.०० लक्ष प्रति हेक्टर प्रमाणे देण्याची मागणी केलेली आहे.
२) प्रकल्पग्रस्तानी दरमहा रुपये ३०००/-प्रमाणे २० वर्ष कालावधीकरीता उपजिवीका भत्त्याची मागणी केली आहे.
३) कुटूंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी देण्याची मागणी आहे.
४) प्रकल्पाच्या कामात विद्यार्थ्यांना सुशिक्षीत बेरोजगार म्हणून समाविष्ट करुन घ्यावे व त्यांना १० लाख रुपये देण्याची मागणी आहे.
५) पूनर्वसन करुन पूनर्वसीत ठिकाणी घरे बांधून देण्याची मागणी आहे.
६) खानापूर येथील सहकारी सुत गिरणी सुशिक्षीत बेरोजगारांना नौकरी देण्याची मागणी आहे.

बांधकाम कार्यक्रमानुसार प्रकल्पाचे काम जून २०१५ अखेर पूर्ण करावयाचे नियोजन आहे.

६.० विषेश लाभ :

लेंडी प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र आर्थीक दृष्टया कमकुवत असलेल्या ता.मुखेड व ता.देगलूर या भागातील आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र भागातील १६९५० हे.सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे) ता.अकोले, जि.अहमदनगर			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	६४२६० हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	०			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१४/७/१९७०	१९६८-६९	७.९३	१६८४८ (म्हाळादेवी प्रकल्प)
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२५/३/१९७७	१९७६-७७	१५.८७	१६८४८ (म्हाळादेवी प्रकल्प)
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२२/६/१९९३	१९९१-९२	२३४.४१	६४२६० (निळवंडे प्रकल्प)
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	११/११/२००३	१९९९-००	७६०.२१	६४२६० (निळवंडे प्रकल्प)
	सुधारित प्रशासकीय मान्यता – ४ (SLTAC ला सादर)	१०/०१/२०१२	२०१०-११	२१०७.१२	७०४०४ (निळवंडे प्रकल्प)
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	TAC मंजूरीची कार्यवाही प्रगतीपथावर			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७८-७९ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. ५.६८ कोटी रु. ७.२५ककोटी रु.५४५.४९ कोटी रु.५५८.४२ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	रु. ४६.२३ कोटी			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	रु.४५५.३३ कोटी			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	रु.५६.८६ कोटी			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	रु.५५८.४२ कोटी			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	सन १९७८			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन १९९३ (किंमत रु.२३४.४१ कोटी)			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत	वाढीव रक्कम	टक्केवारी (वाढीव रकमेची)
		अ	ब	क = (ब-अ)	ड
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	४.८८	१७८.८४	१७३.९६	२३.१२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	१.१२	२५.५५	२४.४३	३.२५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	४१५.५०	४१५.५०	५५.२३
७.४	**सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ**	०.००	२५.३३	२५.३३	३.३७
७.५	इतर कारणे	१.९३	११४.९९	११३.०६	१५.०३
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	७.९३	७६०.२१	७५२.२८	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	धरणाचे भूसंपादन पूर्ण, पुनर्वसन सुरु, कालव्यासाठी ६० टक्के भूसंपादन पूर्ण, उर्वरीत प्रगतीत आहे.			
८.२	धरण	धरणाचे ९० टक्के काम पूर्ण, उर्वरीत काम जून-२०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कालव्याची मातीकामे ३५ टक्के पूर्ण, उर्वरीत मातीकामे व बांधकामे प्रगतीत. वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षण सुरु आहे.			

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) ता.अकोले, जि.अहमदनगर

संक्षिप्त टिप्पणी

१.०० प्रस्तावना :

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (म्हाळादेवी) शासनाचे पत्र क्र.७४७०/१६११६/आयपी, मुंबई दि.१४/७/१९७० अन्वये रु. ७९३.३१ लक्ष रक्कमेस मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. मूळ प्रशासकीय मान्यता ही म्हाळादेवी प्रकल्पास होती. त्यात म्हाळादेवी, ता.अकोेले येथे प्रवरा नदीवर मातीचे धरण व डावा तट कालवा ७२.०० कि.मी. १६८४८ हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावित होते. सन १९७० पासून ते सन १९९२ पर्यंत प्रकल्पग्रस्तांनी तिव्र विरोध केल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या बागायती जमीनी वाचविण्याकरीता शासनाने पत्र क्र.३५५/१०९२/तां ५०४ / (१३५/९२) मोप्र-१,दि.२७/४/९२ अन्वये निळवंडे गावाच्या वरील बाजूस ६०० मी.वरील तिस-या संरेखा बदलास (धरणस्थळ बदलास) मान्यता दिली. या निळवंडे-२ प्रवरानदीवरील दगडी धरणाची लांबी ५३३ मी. असून यामध्ये ८.३२ दसलक्ष घन फूट जलसाठा निर्माण होणार आहे. या प्रकल्पात डावा कालवा ८५ कि.मी. व उजवा कालवा ९७ कि.मी.लांबीचा असून अहमदनगर व नाशिक जिल्हयातील १८२ गावातील ६४२६० हे.क्षेत्र आठमाही सिंचनाखाली प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत मुख्य धरणाचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. डाव्या कालव्यावरील बोगद्याचे काम पूर्ण झालेले असून उर्वरीत ठिकाणी मातीकामे व खोदकाम तसेच बांधकामे प्रगतीत आहेत. उजव्या कालव्यावरील वरील बोगद्याचे काम प्रगतीत असून मातीकामे, खोदकाम व बांधकामे प्रगतीत आहेत.

२.०० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

उर्ध्व प्रवरा प्रकल्पास (म्हाळादेवी, ता.अकोले) शासनाने सन १९७० मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता दिली. सन १९७० ते सन १९७७ पर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे धरणाचे काम सुरु होऊ शकले नाही. दरम्यान दरवाढीमुळे सन १९७७ मध्ये रु. १५.८७ कोटीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. म्हाळादेवी येथील प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे वरच्या बाजूला असलेल्या पर्यायी धरणस्थळांचा अभ्यास करण्याचे शासनाने आदेश दिले. त्याप्रमाणे बुडणारी गावे, लोकसंख्या, जमीनीचा प्रकार व पुनर्वसन यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर शासन निर्णय पीआयएस/७४७६/३८३/ (७६७) ए.एम.जे (१) दि.४/७/१९७७ अन्वये निळवंडे येथे धरण बांधण्याचा निर्णय घेतला याही याही धरणस्थळास प्रकल्पग्रस्तांनी तीव्र विरोध केला व आधी पुनर्वसन व नंतर धरण अशी मुख्य मागणी केली. **दि.१९/५/१९८६ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली निळवंडे प्रकल्पाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मंत्रालयाच्या समिती सभागृहात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत समिती नेमण्याचे ठरले व पुनर्वसनाबाबत चर्चा होऊन प्रकल्प सुरु करणेसाठी मार्ग काढण्यात आला.** त्यानंतर निळवंडे गावाच्या ६०० मी वरच्या बाजूस धरणस्थळाचे सर्वेक्षण व अभ्यास करुन सुधारीत अहवाल शासनास सादर करण्यात आला. निळवंडे-२ या धरणस्थळास शासनाचे पत्र क्र.३५५/१०९२/तां-५०४/ (१३५/९२) मोप्र-१ दि.२७/४/१९९२ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

निळवंडे-२ या नवीन धरणस्थळामुळे मूळ प्रकल्पाच्या व्याप्तीत मोठया प्रमाणात बदल झाला. या नवीन स्थळ निळवंडे-२ येथे मोठे दगडी धरण बांधणेचे प्रस्तावित करण्यात आले. तसेच डावा कालवा ८५ कि.मी. व उजवाकालवा ९७ कि.मी. प्रस्तावित करण्यात आले. त्यामुळे मूळ कालवा लांबीमध्ये १३.०० मी. लांबीची वाढ झाली. तसेच सिंचन क्षेत्रात ४७४२५ हे.ने. वाढ होऊन ते ६४२६० हे. इतके झाले. त्यामुळे वितरण व्यवस्थेच्या खर्चातही वाढ झालेली आहे.

सन १९९२-९३ च्या दरसूचीवर आधारीत नवीन अंदाजपत्रके तयार करण्यात आली त्याप्रमाणे शासन निर्णय ३५५/१०९२/ (६२३/९२) मोप्र-१ दिनांक २२/६/९३ अन्वये प्रकल्पाच्या रु. २३४.४१ कोटीच्या अंदाजपत्रकास द्वितीय सुधारीत मान्यता देण्यात आली. सन १९७० ते सन १९९२ या कालावधीत दरसूचीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली तसेच उर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये प्रचंड प्रमाणात बदल झाला त्यामुळे मूळ प्रशासकीय किंमतीपेक्षा २२६.४८ कोटी (२८५६ टक्के) इतकी प्रचंड वाढ झाली. तद्नंतर संकल्पचित्र संघटना यांचेकडून विस्तारीत दगडी धरणाचे संकल्पने व त्यासंबंधीचे रेखाचित्र तयार करण्यात आली. प्राप्त संकल्पनानुसार सन १९९५-९६ मध्ये धरणाचे मुख्य काम सुरु करण्यात आले.

धरणाचे काम चालु झालेनंतर सन २००२ मध्ये धरणाचे बांधकाम अनघड दगडी बांधकामाऐवजी कोलग्राऊट बांधकामात करणेचा निर्णय घेण्यात आला.

तसेच विमोचक २ वरुन ४ करण्यात आले. वरील सर्व बाबींमुळे मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये रु. ४१५.५० कोटी वाढ झालेली आहे.

३.०० भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन यांचेमुळे खर्चातील वाढ

मूळ अंदाजपत्रकात धरण व कालव्यासाठी १४०० हे. जमीन लागणार होती. धरण स्थळ बदलल्यामुळे व कालव्यांची लांबी वाढल्यामुळे धरण व कालव्यासाठी ३०२३ हे.क्षेत्र आवश्यक आहे.

मूळ अंदाजपत्रकात भूसंपादनाचा दर ७५०० प्रति हे. इतका होता. पुनर्वसनसाठी तृतीय सुप्रमा प्रस्तावात १०२५० प्रति युनिट या प्रमाणे तरतुद करावी लागली.

४.०० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

मूळ प्रस्तावानुसार मातीचे धरण प्रस्तावित होते. नवीन धरण दगडी बांधकामात प्रस्तावित केल्याने संकल्पनात बदल झाला. तसेच कालव्यांची वहन क्षमता डावा कालवा व उजवा कालवा अनुक्रमे २५.४९ व ११.८९ घनमी/से.वरुन २६.४०/१४.३८ घमी/से इतकी वाढ झाली त्यामुळे कालव्यांच्या संकल्पनात वाढ झाल्याने किंमतीत वाढ झाली.

५.०० इतर कारणे

अ) मूळ अंदाजपत्रकात समावेश नसलेने परंतु तृतीय सुप्रमामध्ये धरण्यात आलेले घटक.

ब) उच्च तलांक पूल- १५..०० कोटी

क) पाणी साठयावरील उपसा सिंचन योजना - ९..०० कोटी

ड) तसेच प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या जमीनीचे सपाटीकरणाचा खर्च, कार्यालये व वसाहती या इमारतींची वाढ

इ) तसेच 'O' Misc, P-Main't, Q-Special, T & P यामधील झालेली वाढ

फ) निधीची कमतरता

६.०० सद्य:स्थिती - धरण

धरणाची लांबी ५३३ मी. असून कमाल उंची ७४.५० मी आहे. या धरणामध्ये एकुण ८.३२ टी.एम.सी (२३६.०० द.ल.घ.मी) जलसाठा निर्माण होणार असून त्याव्दारे ६४२६० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मिती होणार आहे. तसेच ११ मे.वॅट वीजनिर्मिती होणार आहे. धरणाची (अद्ययावत) सुधारीत किंमत रु. ५२५.०० कोटी इतकी असून धरण कामावर एकुण ऑगस्ट- २०१२ अखेर रु. ४५१.८९ कोटी खर्च झालेला आहे.

मुख्य धरणाचे काम ९० टक्के पूर्ण झालेले असून ऑगस्ट २०११ अखेर ४.५०९ टी.एम.सी.(१२७.६८ द.ल.घ.मी.) इतका पाणीसाठी करण्यात आलेला होता. या धरणामध्ये जून २०१२ अखेर उत्सारी भागात ६३४.०० मी तलांकापर्यंत बांधकाम पूर्ण केलेले असून ४.७३१ टी.एम.सी. (१३३.९८ द.ल.घ.मी.) पाणीसाठा करण्याचे नियोजन आहे. धरणाचे उर्वरीत संपूर्ण काम जून-२०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे

दि.९/१/२००३ रोजी मा.विलासरावजी देशमुख , मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राजूर ते पिंपरकणे रस्त्यावरील उच्चतलांक पूल, निळवंडे धरणाच्या जलाशयावरील उपसा सिंचन योजना तसेच उच्चस्तरीय कालवे या कामांचा प्रकल्पात समावेश करणेबाबत निर्णय घेण्यात आला. या वाढीव कामांमुळे प्रकल्पाचे किंमतीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

- **कालवे :-**

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) या प्रकल्पातंर्गत अहमदनगर व नाशिक या जिल्हयातील एकूण १८२ गावांतील ६४२६० हेक्टर क्षेत्र आठमाही सिंचनाखालील प्रस्तावित आहे.

कालव्यांचे कामांची सद्य:स्थिती.

१.० उर्ध्व प्रवरा डावा कालवा :- अ) मुख्य कालवा :- उर्ध्व प्रवरा डावा कालव्याची प्रस्तावित लांबी ८५ कि.मी. असून सुरुवातीची वहन क्षमता ४१.०५ घ.मी/सें. (१४५० क्युसेक्स) इतकी आहे. उर्ध्व प्रवरा डावा कालव्याच्या सा.क्र. २७०६ मधून उर्ध्व प्रवरा उजवा कालवा निघतो. प्रवरा नदी ओलांडल्यानंतर त्यावर उजव्या तीरावरील लाभक्षेत्र सिंचनासाठी प्रस्तावित आहे.

- **डावा कालवा :-** एकूण लांबी कि.मी.० ते ८५ :-निविदा निश्चित.कि.मी. २० ते २७ मधील खोदकाम ५० टक्के पुर्णझालेले असून उर्वरित काम प्रगती पथावर आहे. कि.मी. २७ व २८ मधील बोगदयाचे खोदकाम पुर्ण झालेले आहे. कि.मी. ५९ ते ६३ मी मधील बोगदा खोदाई पूर्ण. उर्वरीत लांबीतील मातीकामे व बांधकामे प्रगतीत आहे.
- <u>उजवा कालवा :-</u>

१) सा.क्र. ६७५ मी. नदीवरील जलसेतूचे काम :-निविदा कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे. परंतु जलसेतूचे भुगत भागाचे संकल्पन अद्याप प्राप्त नसलेमुळे काम सुरु करण्यात आलेले नाही. संकल्पन प्राप्त होताच काम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे..

२) कि.मी.१ ते १८ मधील कि.मी १२ ते १५ मधील मातीकाम पुर्ण झाले असून एकुण ६ बांधकामे पुर्ण झालेले आहे. उर्वरीत मातीकामे व बांधकामे सुरु आहेत.

३) कि.मी. १९ ते ८४ :- कि.मी. २९ व कि.मी. ५९ मधील बोगद्याचे खोदकाम सुरु आहे.

४) कि.मी. ८५ ते ९७ :- सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे

७.०० विशेष लाभ

धरणामध्ये जून २००८ पासून अंशत: पाणीसाठा करण्यात येत आहे. या पाणीसाठयाचा वापर भंडारदरा धरणाच्या लाभक्षेत्रासाठी करण्यात येत आहे. त्यामुळे २००८ साली १५५८ हे, २००९ साली ६०१५ हे.२०१० साली ९०३३ हेक्टर व २०११ साली १०,००० हेक्टर सिंचन क्षेत्र वाढले. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली.

या वर्षी धरणामध्ये १३३.९८ द.ल.घ.मी.पाणीसाठा झालेला आहे. जायकवाडी धरणात पाण्याचा तुटवडा असल्यामूळे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशानुसार २.५० टी.एम.सी.पाणी दिनांक २१/१०/२०१२ पासून सोडण्यात आलेले आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाच्या पाणीसाठयावर अवलंबून असलेल्या औरंगाबाद, जालना, अंबड व इतर शहरांना पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

८.०० उर्ध्व प्रवरा प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमा राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर केलेला आहे. त्याची छाननी चालु आहे. तथापि तृतीय सुप्रमा किंमत ७६०.२१ कोटी एवढी आहे. प्रस्तावित चतुर्थ सुप्रमा किंमत २१०७.१२ कोटी आहे.

८.०० उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) प्रकल्पाचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रु.२१०७.१२ कोटी रक्कमेचा राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालास अद्याप सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली नाही. उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) प्रकल्पाचा मंजूर तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालाची किंमत ७६०.२१ कोटी इतकी असून तृतीय सुधारीत प्रकल्प अहवाला मध्ये रु. १३४७.४१ कोटी इतकी वाढ होणार असून सदर वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

प्रकल्पाच्या किंमतीत खालील बाबीमुळे वाढ झालेली आहे.

१. दरसूचीतील वाढ	रु. ८६७.९० कोटी
२. निविदा अधिक्य	रु. ४४.४८ कोटी
३. वहन अंतरातील वाढ	रु. ५.७३ कोटी
४. संकल्पचित्रामुळे बदल	रु. ६२.९० कोटी
५. नवीन तरतुद व इतर कारणे	रु. १७४.४९ कोटी
६. आस्थापना व अनुषंगिक वाढ	रु. १९१.४० कोटी
	एकूण रु. १३४६.९१ कोटी

सिंचन प्रकल्पां सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	मुळा प्रकल्प ता. राहूरी जि. अहमदनगर			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	८५८७७ हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	८४४२९ हेक्टर			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१/११/१९५०	१९५५-५६	९.३२	५३१३८
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१५/७/१९६६	१९५९-६०	१६.११	७८५००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१४/४/१९७१	प्रत्यक्ष खर्चानुसार	२१.६४	७८५००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	११/२/१९७४	१९८२-८३	३४.०३	७९६२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ४	११/४/१९९१	१९८८-८९	१२३.१८	१०१६७३
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ५	९/७/१९९९	१९९६-९७	१३६.०१	८२९२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ६	२२/११/२०११	२००९-१०	२६२.३२	८५८७७
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)	1. Planning Commission Letter No. 1 (3) (14)/56 Dated 10 August 1956 2. Planning Commission Letter No. 1 (3) (14)/56 Dated 28/29 January 1957			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९४-९५ पर्यत २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ **एकुण**		रु. ३०.८८ रु. निरंक रु. १५१.०५ **रु. १८१.९३**	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	४.३९			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१७७.११			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	०.४३			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१८१.९३			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९५९			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९५९ (किंमत रुपये ९.३२ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत अ	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत ब	वाढीव रक्कम क = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) ड
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	८.२८	२९.१६	२०.८८	८.२५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.२९	५.९२	५.६३	२.२२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	---	१५८.२१	१५८.२१	६२.५४
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.००	०.००
७.५	इतर कारणे	०.७५	६९.०३	६८.२८	२६.९९
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	९.३२	२६२.३२	२५३.००	१००.००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	वांबोरी पाईप चारी टप्पा-१ व टप्पा-२ चे भूसंपादन प्रगतीपथावर आहे.			
८.२	धरण	मुळा धरणाचे काम पूर्ण झाले आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	मुळा उजवा व डावा कालवा काम पूर्ण झाले आहे. वांबोरी पाईप चारी टप्पा-१ व भागडा पाईप चारी चे काम पूर्ण झाले आहे. तसेच वांबोरी पाईप चारी टप्पा-२ चे व ३ को.प. बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर आहे.			

मुळा प्रकल्प, ता. राहूरी, जि. अहमदनगर
संक्षिप्त टिप्पणी

१. प्रास्ताविक : अहमदनगर जिल्हयातील राहूरी तालुक्यातील मौजे बारागांव नांदूर येथे बांधण्यात आलेल्या मुळा प्रकल्पास शासन निर्णय क्र. एमआयपी/३३५७ / जे दि. १/११/१९५७ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली व या प्रकल्पाचे काम सन १९७२ मध्ये पूर्ण करण्यात आले. मुळा प्रकल्पात डावा व उजवा असे दोन कालवे असून त्यांचे पीक क्षेत्र ८५८७७ हेक्टर अहमदनगर जिल्हयातील राहूरी, नेवासा, शेवगाव व पाथर्डी या तालुक्यात आहे.

२. प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

मुळा प्रकल्पाचे पाणी ज्या भागाला मिळत नाही अशा राहूरी, नेवासा, नगर व पाथर्डी तालुक्यातील अवर्षण-प्रवण भागाच्या शेतीला व पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी मुळा उच्चस्तरीय उजवा पाईप कालवा व डावा पाईप कालवा (वांबोरी चारी व भागडा चारीची) यांची मागणी करण्यात आली. मुळा जलाशयातून वांबोरी चारीसाठी ६८० द.ल.घ.फु. आणि भागडा चारीसाठी ६०. द.ल.घ.फु. पाणीसाठा आरक्षित करण्यात आले आहे. हे काम मुळा प्रकल्पाचा एक भाग समजून मुळा प्रकल्पाच्या पाचव्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास शासनाने निर्णय क्र. /मुळा ९९७/६/२६४३/(५५०/९७) मोठे प्रकल्प -१ दि. ९/७/१९९९ अन्वये रु.१३६.०१ कोटीस मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार सन २००० पासून सदर योजनेचे कामे प्रगतीपथावर आहे. वांबोरी चारी योजनेचा लाभ ज्या तलावांना मिळत नाही असे योजनेपासून वंचित असलेल्या लाभधारकांनी उंचावरील तलाव योजनेत समाविष्ट करण्याची विनंती शासनाकडे केली. तसेच मुळा प्रकल्पाचा लाभ न मिळालेल्या गावातील शेतकऱ्यांनी को.प.बंधारे बांधण्याची मागणी केली. त्यानुसार वांबोरी चारी टप्पा २ व को.प. बंधारे आणि अनुषंगिक कामे याचा अंतर्भाव करुन मुळा प्रकल्पाचा ६ वा प्रशासकीय मान्यता अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्यानुसार शासन निर्णय क्र. /१११०/(६५१/१०) मोठे प्रकल्प -१ दि. २२/११/२०११ प्रमाणे रु. २६२.३२ कोटीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्यी व्याप्तीत खालीप्रमाणे बदल झालेला आहे.

अ.क्र.	वर्णन	किंमत (रु. कोटी)
१.	मुळा प्रकल्पासाठी	१.३२
२.	मुळा उच्चस्तरीय उजवा पाईप कालवा (वांबोरी), पाईप चारी टप्पा १ व २	१२३.९४
३.	मुळा उच्चस्तरीय डावा पाईप कालवा (भागडा), पाईप चारी	१९.४४
४.	को. प. बंधारे ढोरजळगाव, वाघोली, मळेगाव	१३.५१
	एकुण रु.	**१५८.२१**

वांबोरी पाईप चारी -मुळा धरणावर पंपगृह बांधून ११७० अश्वशक्तीच्या ३ पंपाव्दारे पाणी उचलून व वितरण टाकीतून हे पाणी ५९ कि.मी. लांबीच्या मुख्य गुरुत्व वाहीनी पाईप लाईन व्दारा अवर्षण-प्रवण भागातील सुमारे १०२ पाझर तलाव, कोल्हापूर पध्दतीचा बंधारा, गावतळी साठवण बंधारे, लघु पाटबंधारे तलाव इ. भरुन त्याव्दारे अंदाजे ३५६८ हे. क्षेत्राचे अप्रत्यक्ष सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे. मुळा प्रकल्पाच्या पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालातील एक भाग म्हणून हया उपसा सिंचन योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. या योजनेचे काम माहे फेब्रुवारी २००० मध्ये सुरु करुन सदर काम डिसेंबर- २०१२ पर्यंत पूर्ण करावयाचे नियोजन आहे.

भागडा चारी -मुळा उच्चस्तरीय डावा कालवा(भागडा पाईप चारी) चे काम सन २००३ मध्ये सुरु करण्यात येवून सन २०१० मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. या प्रकल्पांमध्ये राहुरी तालुक्यातील ९ गांवातील ५९ तळे भरुन त्यांच्यावर

२५० हेक्टर अप्रत्यक्ष सिंचन क्षमता निर्माण करण्यात आलेली आहे. यामध्ये मुळा प्रकल्पांच्या डाव्या कालव्यावरुन ४० दिवस पाणी २४ तास उपसा करुन ६० द.ल.घ.फू. पाणी उचलून सिंचन करणे अपेक्षित आहे. लाभधारकांच्या मागणी प्रमाणे पाणी सोडण्यात येते. योजनेची पाणी उचलण्याची सुरवात २००५ पासुन सुरु झालेली आहे. योजना सिंचन यंत्रणेकडे हस्तातरीत करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

को.प.बंधारे - शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांव को.प.बंधाऱ्याचे यांचे काम प्रगती पथावर असुन ४० टक्के काम पुर्ण करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे वाधोली को.प.बंधारा व मळेगांव को.प.बंधारा यांची कामे लवकरच करण्याचे नियोजन आहे.

३. सविस्तर घटक संकल्प चित्रामुळे झालेली वाढ :

प्रकल्पाच्या घटक संकल्पनामध्ये बदल नसल्याने संकल्पचित्रामुळे कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही.

४. इतर कारणे :

अ.क्र.	वर्णन	किंमत (रुपये कोटी)
१	मुळा प्रकल्पासाठी	२५.०९
२	मुळा उच्चस्तरीय उजवा पाईप कालवा (वांबोरी पाईप चारी टप्पा १ व २)	३४.९०
३	मुळा उच्चस्तरीय डावा पाईप कालवा (भागडा पाईप चारी)	८.२९
४	को.प.बंधारे ढोरजळगाव,वाघोली, मळेगाव	०.००
	एकूण रुपये	६८.२८

५. प्रकल्पाची सद्दस्थिती :

मुळा धरण व कालव्याची कामे १९७२ मध्ये पूर्ण झालेली आहेत. वांबोरी चारी टप्पा १ चे काम ९९ टक्के पूर्ण झालेले असून टप्पा २ चे संकल्पनाचे काम प्रगतीपथावर आहे. भागडा चारी योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. को. प. बंधारे, ढोरजळगाव यांचे काम ४० टक्के पूर्ण झाले असून को.प.ब.वाघोली व मळेगाव यांची कामे सुरु करावयाची आहेत.

६. विशेष लाभ :

मुळा उजवा व डावा कालवा, वांबोरी पाईपचारी व्दारे ८४४२९ हे. सिंचनक्षेत्र निर्मिती झाली असून वांबोरी पाईपचारी टप्पा-२ व को.प.बंधारेव्दारे १४४८ हे. पीक क्षेत्र निर्मितीची कामे प्रगतीपथावर आहेत.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	नांदूर मधमेश्वर प्रकल्प ता.नाशिक जि.नाशिक.			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	४५५७६			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	१७२७२			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१९/७/१९७९	१९७८-७९	४८.७०	४५५७६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	९/७/१९९९	१९९६-९७	५७८.३६	४५५७६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१६/११/२००५	२००२-०३	८६६.३०	४५५७६
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (शासनास सादर)	०१/१२/२०१०	२००९-१०	१५७२.२४	४५५७६
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र.एफ-२/(१९०)/२००७ डब्ल्यु.आर.दि.१७/४/२००९ रू.९४१.३३ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७९ ते १९९५-९६ पर्यंत २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. ३४.७१ कोटी रु. १७७.९० कोटी रु. ८७७.४४ कोटी रु. १०९०.०५ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	२१४.१८			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	७७९.३०			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	९६.५७			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१०९०.०५			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७९-८०			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९७९-८० (किंमत रुपये ४८.७० कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत अ	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत ब	वाढीव रक्कम क = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) ड
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	४५.४७	४८५.६४	४४०.१७	५३.८४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	२.०१	१२०.२५	११८.२४	१४.४६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	२२.५७	२२.५७	२.७६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१४७.४०	१४७.४०	१८.०३
७.५	इतर कारणे	१.२२	९०.४४	८९.२२	१०.९१
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	४८.७०	८६६.३०	८१७.६०	१००.००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	मुकणे धरण भूसंपादन पूर्ण, भावली धरणाचे वनजमिनीसह भूसंपादन, पुनर्वसन पूर्ण.वाकी धरणाची भूसंपादन प्रक्रीया ३१ हे. वगळता उर्वरीत भूसंपादन पूर्ण झाले असून ४ गावठाणाचे पुनर्वसन ९० टक्के पूर्ण झाले आहे. १ गावठाणाचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे. भाम धरणाचे वनजमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले असून धरणाच्या पायासाठी आवश्यक लागणारी खाजगी जमिन सरळ खरेदीव्दारे संपादीत करण्यांत आली आहे. उर्वरित धरणाच्या बुडीताखालील जमिनीची सरळ खरेदी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.			
८.२	धरण	मुकणे व भावली धरण पूर्ण आहेत. वाकी व भाम धरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यांचे काम प्रगतीपथावर आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	नांदूर मधमेश्वर मुख्य कालवा , शाखा कालवे व वितरण व्यवस्थेची कामे , किरकोळ कामे वगळता पुर्ण झालेली आहेत.			

नांदूर मधमेश्वर प्रकल्प जि.नाशिक
संक्षिप्त टिप्पणी.

१.० नांदूर मधमेश्वर हा एक संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पातर्गत नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यात मुकणे, भावली, वाकी व भाम या चार धरणांचा सामावेश आहे. तसेच निफाड तालुक्यातील नांदुर मधमेश्वर येथे अस्तित्वात असलेल्या बंधाऱ्याचे नुतनीकरण करुन तेथून १२८ कि.मी. लांबीचा जलद कालवा काढून औरंगाबाद व अहमदनगर जिल्हातील ४३८६० हेक्टर (पीक क्षेत्र) जमिन सिंचनासाठी येणार आहे. त्याचप्रमाणे मुकणे धरणाखाली नदीवर ६ बंधारे बांधून नाशिक जिल्हयातील ४५३ हे. व भावली धरणापासून निघणा-या कालव्याऐवजी ७ बंधारे बांधून १२६३ हे. क्षेत्रास सिंचन लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

२.० मुकणे धरण :-

मुकणे धरणाचे बांधकामास सन १९८७ साली सुरुवात होऊन धरणाचे मुळ उंचीतील बांधकाम सन १९९५ साली पुर्ण झाले असून पाणीसाठा होणेस सुरुवात झाली. मुकणे धरणाची जलनिष्पती ७५ टक्के विश्वासार्हते ऐवजी ५० टक्के विश्वासार्हतेनुसार निर्धारीत करून वाढीव उंचीचे काम सन २००६ साली पुर्ण होऊन व्यवस्थापनेकरिता नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले.

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

धरणाचे काम प्रगतीपथावर असतांना नाशिक परिसरातील होणारा औद्योगिक पाणीवापर, घरगुती पाणी वापर तसेच गोदावरी खोऱ्यातील सिंचनातील संभाव्य तूट भरुन काढण्यासाठी मुकणे धरण ५० टक्के विश्वासार्हतेनुसार बांधण्याचे ठरले. मा.ना. रामरावजी आदिक, मंत्री अर्थ व नियोजन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २.९.१९९२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीत धरणाची धारणाशक्ती मंजूर ७५ टक्के विश्वासार्हता ऐवजी ५० टक्के विश्वासार्हतेवर निर्धारीत करुन धरण साठवण क्षमता वाढविणेस व त्याअनुषंगाने कामे हाती घेणेस सूचित केले तसेच सदर साठवण क्षमता वाढविणेस महाराष्ट्र शासन पत्र दिनांक १६.१.१९९३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. यामुळे साठवण क्षमता ७४.४ द.ल.घ.मी. / २.६२८ अघफू. एवढा पाणीसाठा वाढला आहे. मुकणे धरण वाढीव उंचीत पाणीसाठा करणेस असलेली स्थगिती उठल्याने सन २०११-२०१२ पासून वाढीव उंचीत पाणीसाठा करणेस गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक २.९.२०११ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मुकणे डाव्या कालव्याचे सविस्तर सर्वेक्षणास शेतकऱ्यांनी कालवा संरेखेस विरोध दर्शविला व कालव्या ऐवजी औंधा नाल्यावर बंधारे बांधून देणेबाबत मागणी केली. त्याअनुषंगाने पाटबंधारे विभागाने पत्र क्र. नांदूर ०७/०३/(३६३/२००३) मोप्र-१ दिनांक १८.१.२००५ अन्वये औंधा नाल्यावर बंधारे बांधण्याच्या कामाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या सर्व बंधाऱ्याकरीता मुकणे धरणातून ७९ द.ल.घ.फू. पाणी वापर प्रस्तावित असून त्याद्वारे सर्व बंधाऱ्याखाली ४५३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

मुकणे धरणाच्या व्याप्तीत व दरसूचीत झालेल्या बदलामुळे खालीलप्रमाणे किंमतीत वाढ झाली आहे.

अ.क्र.	बाब	रुपये कोटी
१	वाढीव उंचीत झालेल्या भूसंपादनावरील अतिरिक्त खर्च	३७.६९
२	सी-वर्क्स	२५.०४
३	डी-विमोचक	६.८७
४	इतर	६.२६
	एकूण	**७५.८६**

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

मुकणे धरणाच्या वाढीव उंचीमुळे संकल्पनातील बदलामुळे होणारी वाढ रु. ३१.९२ कोटी इतकी आहे.

इतर कारणे

१. प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे मुकणे धरणाच्या वाढीव उंचीच्या बांधकामास स्थगितीमुळे विलंब झालेमुळे किंमतीत वाढ झाली आहे.
२. भूसपांदन प्रक्रिया व भूसंपादन निधी उपलब्धतातील अडचणी
३. दरसूचीतील वाढ.

प्रकल्पाची सद्य:स्थिती :

मुकणे धरणाचे काम वाढीव उंचीनुसार सन २००६ साली पूर्ण झाले असून औंधा नाल्यावरील बंधाऱ्याची कामे सन जून २०१२ साली पूर्ण झाली आहेत. सदर बंधाऱ्यामुळे ४५३ हे. एवढी सिंचन निर्मिती झाली आहे.

३.० भावली धरण :-

भावली धरण मौजे भावली (खु) ता.इगतपूरी जि. नाशिक येथे दारणा नदीवर बांधण्यात आले असून ७५ टक्के विश्वासार्हतेनुसार सदर धरणाचा एकूण४४.७५ द.ल.घ.मी (१.५८ अघफू) इतका जलसाठा आहे. धरणाचे काम २/१९९९ मध्ये सुरु होऊन ५/२००९ मध्ये पुर्ण झाले आहे. यामुळे औरंगाबाद व अहमदनगर जिल्हयातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील २९६० हेक्टर व नाशिक जिल्हयातील इगतपूरी तालुक्यातील आदिवासी भागातील १२६३ हे. सिंचनास लाभ होत आहे.

व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : या कारणास्तव वाढ निरंक आहे.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी भावली धरणाचा परिसर भूकंप प्रवण क्षेत्रात येत असल्याने माती धरणाच्या काटछेदात बदल केल्याने तसेच धरणाच्या उर्ध्व बाजूस सांडव्यात भराव एकमेकास छेदत असल्याने आधार भिंती प्रस्तावित केल्यामुळे संकल्पचित्रामध्ये सुचविलेल्या बदलामुळे रु. ६.६४ कोटीची वाढ झाली आहे.

इतर कारणांनी झालेली वाढ :

मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये भावली धरणासाठी रु. ०.१७ कोटी आस्थापनेसाठी तरतूद होती. सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये आस्थापनेसाठी रु. १०.०४ कोटीची तरतूद केली आहे. त्यामुळे आस्थापनेच्या तरतुदीमध्ये रु. ९.८७ कोटीची वाढ झाली आहे.

भावली धरणाच्या किमंतीत खालील प्रमाणे वाढ झाली आहे.

अ.क्र.	वाढीची कारणे	झालेली वाढ (रु. कोटी)
१	दरसुचीतील झालेली वाढ	५६.०९
२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेली वाढ	१६.७४
३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	रु. ०.००
४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	६.६४
५	इतर कारणांनी, इटीपी इत्यादीमुळे झालेली वाढ	९.८७
	एकूण झालेली वाढ	**८९.३४**

कालव्याऐवजी बंधाऱ्यांची कामे :

भावली प्रकल्पाच्या सुधारीत प्रकल्प अहवालानुसार थेट डावा तट कालवा (लांबी ८.९४ किमी) व उजवा तट कालवा (लांबी ३.१२ किमी) कालव्याद्वारे इगतपूरी तालुक्यातील १२६३ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित होते. तथापि कालव्यासाठी

लागणाऱ्या भूसंपादनास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध होता. त्यामुळे कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण पुर्ण करता आले नाही. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधी व भावली, मानवेढा बोर्ली येथील ग्रामपंचायत कार्यालयीन तसेच प्रकल्पग्रस्त यांनी कालव्याऐवजी साठवण बंधारे बांधून देण्याची मागणी केली त्यानुसार कालव्याऐवजी भावली धरणाखाली दारणा नदीपात्रात बंधारे बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या दिनांक ९.२.२०१० च्या ४१ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. सद्य:स्थितीत मौजे बोर्ली, मानवेढा, वाघ्याची वाडी, फांगुळगाव, नांदगाव सदो, पिंप्री सदो व तारांगणपाडा येथे सात बंधारे बांधून पुर्ण झाले असून त्याद्वारे इगतपूरी तालुक्यातील १२६३ हे क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

प्रकल्पाची सद्य:स्थिती :

भावली धरणामुळे मौजे भावली खु व मौजे मानवेढे ता. इगतपूरी ही दोन गावे बांधीत झाली असून बाधीतांचे पुनर्वसन महाराष्ट्र पुनर्वसन अधिनियम १९८६ अन्वये करण्यात आले आहेत. त्यानुसार नवीन गावठाणात १३ नागरी सुविधा सार्वजनिक शौचकुपाऐवजी वैयक्तिक शौचकुपाची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केल्याने ही सुविधा सोडून इतर नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. नवीन पुनर्वसित गावठाणात प्रकल्पग्रस्तांचे १०० टक्के स्थलांतर झाले आहेत. भावली धरणाचे काम ५/२००९ मध्ये पुर्ण झाले असून धरणात पुर्ण तलांकास पाणीसाठा झाला आहे. यामुळे सिंचनाचा लाभ होत आहे.

४.० वाकी धरण :-

नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत वाकी धरण नाशिक जिल्हयातील इगतपूरी तालुक्यात कुर्णोली शिवारात वाकी नदीवर बांधण्यात येत आहे.

प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

वाकी प्रकल्पाच्या व्याप्तीत कुठलाही बदल झालेला नाही.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ:

वाकी धरणाचा सर्वसाधारण आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी सन १९९४ मध्ये तयार केला असून त्याअन्वये द्वाररहीत सांडव्याऐवजी द्वारयुक्त सांडवा प्रस्तावित करुन धरणाच्या उंचीत कुठलीही वाढ न करता ७५ टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध होणाऱ्या ६१.५० दलघमी जलसाठयाऐवजी ५० टक्के विश्वासार्हतेने उपलब्ध होणाऱ्या ७०.५७ दलघमी पाणीसाठी करण्यात येणार आहे. यामुळे सांडव्याच्या कामात रु. ६.६६ कोटी वाढ झालेली आहे. धरणाचे सिंचन तथा विद्युत विमोचकांचे काम दगडी बांधकामात प्रस्तावित होते. तथापि मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी तयार केलेल्या आराखडयाप्रमाणे त्याचे काम सलोह संधानक व एम एस प्लेट युक्त असल्याने यात रु.५.१५ कोटी वाढ झालेली आहे. .

वाकी धरणाच्या किमंतीत खालील प्रमाणे वाढ झाली आहे.

१	दरसुचीतील झालेली वाढ	रु. १४.०७ कोटी
२	भूसंपादन व पुनर्वसन तरतुदीतील वाढ	रु. ३६.६६ कोटी
३	प्रकल्पाच्या व्याप्तितील बदल	निरंक
४	संकल्पचित्रातील बदलामुळे	रु. ११.८१ कोटी
५	इतर कारणे	रु. ७.५६ कोटी
	एकूण रु.	**७०.१० कोटी**

प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)

वाकी धरणाचे काम प्रगतीपथावर असून घळ भरणी व्यतिरिक्त ५० टक्के अश्मपटलाचे काम वगळता सर्व मातीकाम ९५ टक्के पुर्ण झालेले आहे. द्वारयुक्त सांडव्याचे काम ८० टक्के पुर्ण झालेले असून पुच्छ कालव्याचे काम पुर्ण झालेले आहे. सिंचन तथा

विद्युत विमोचक व ट्रॅश रॅकचे काम ८० टक्के पुर्ण झालेले आहे. सर्वसाधारणपणे धरणाचे स्थापत्य काम ८० टक्के व यांत्रिकी काम ४० टक्के पुर्ण झालेले असून सन २०१३-१४ या वर्षात म्हणजेच जून २०१४ पर्यंत घळभरणीसह काम पुर्ण काण्याचे नियोजन आहे.

धरणासाठी व बुडीत क्षेत्रासाठी एकूण १०२३ हेक्टर क्षेत्र संपादित करणे आवश्यक असून त्यातील ७० हेक्टर क्षेत्र सरकारी असल्याने उर्वरित ९५३ हे. खाजगी क्षेत्रापैकी ९१८ हे.क्षेत्राचे भूसंपादन झालेले असून उर्वरित ३५ हे. क्षेत्राचे भूसंपादन अंतिम टप्प्यात आहे. धरणामुळे ५ गावे बाधीत होत असून ४ गांवांची पुनर्वसन कामे ९० टक्के पुर्ण झालेली असून त्यापैकी २ गावांचे भूखंड वाटप प्रक्रीया पुर्ण झालेली आहे. उर्वरित भावली बु या गावाचे पुनर्वसन काम प्राथमिक टप्प्यात आहे. जून २०१४ पावेतो घळभरणी करुन मान्सून २०१४ मध्ये: पाणीसाठा करण्याचे नियोजन आहे.

५.० भाम धरण

भाम धरण नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यातील काळुस्ते येथे भाम नदीवर बांधण्यात येत आहे. भाम धरणाच्या कामास सन २००७ साली सुरुवात होऊन प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सलग कालावधीत काम सुरु ठेवता आले नाही. एप्रिल २०११ पासून धरणाच्या कामास सुरुवात केली आहे.

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ : या कारणास्तव वाढ निरंक आहे.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

भाम धरणाचा सर्वसाधारण आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी सन २००१ मध्ये तयार केला आहे. सविस्तर संकल्पनामुळे होणारी वाढ रुपये ३९.५१ कोटी आहे. किंमत वाढीची कारणे खालीलप्रमाणे आहे.

१) सांडवा दगडी बांधकामा ऐवजी कोलग्राऊटमध्ये प्रस्तावित केल्यामुळे.

२) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून अंतीम केलेल्या संकल्पनानुसार मातीधरणाच्या काटछेदात झालेल्या बदलामुळे.

इतर कारणांनी झालेली वाढ :

आस्थापनेच्या तरतुदीमध्ये रु. ११.०७ कोटीची वाढ झाली आहे.

वरील प्रमाणे भाम धरणाच्या किंमतीत झालेली वाढ पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वाढीची कारणे	झालेली वाढ (रु. कोटी)
१	दरसुचीतील झालेली वाढ	१२.४९
२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एनपीव्ही मुळे झालेली वाढ	१२.२६
३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ	०.००
४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	३९.५१
५	इतर कारणांनी, झालेली वाढ	११.०७
	एकूण झालेली वाढ	**७५.३३**

प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक) :

भाम धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांनी जमिनीचे दर अल्प असल्याचे कारणामुळे मोबदला न स्विकारता वेळोवेळी बंद पाडले व प्रचंड विरोध केला. नियामक मंडळाच्या ३८ व्या बैठकीमध्ये (दिनांक १४.७.२००९) दिलेल्या निर्देशाप्रमाणे तसेच शासन पत्र दिनांक ८.१०.२००९ व महसुल विभागाचे दिनांक १ फेब्रुवारी २०१० च्या पत्रान्वये धरणासाठी सरळ खरेदीने जमीन संपादन करण्यास निर्देश दिले आहेत. याप्रमाणे भूसंपादन कार्यवाहीनंतर प्रकल्पग्रस्तांचा विरोध कमी होऊन माहे ४/२०११ पासून धरणाचे कामास सुरुवात झाली.

नांदूर मधमेश्वर प्रकल्प अंतर्गत भाम धरणाचा समावेश केंद्र शासनाचे वेगवर्धित सिंचन कार्यक्रम टप्पा-२ मध्ये समावेश केला आहे. या कार्यक्रमानुसार सन २०१२-१३ पर्यन्त धरणाचे काम पूर्ण करावयाचे आहे.

६.० नांदूर मधमेश्वर बंधारा नूतनीकरण व मजबुतीकरणाचे काम

अस्तित्वातील नांदूर मधमेश्वर बंधारा सुमारे १०० वर्षापूर्वी बांधलेला आहे. बंधा-याची संकल्पित साठवण क्षमता १०५७ दलघफू असून गाळ साठल्यामुळे सद्यस्थितीत साठवण क्षमता २५७ दलघफू एवढी झालेली होती. तसेच बंधा-याच्या भिंतीतून मोठया प्रमाणात पाणी गळती होवुन पाण्याचा अपव्यय होत होता. सदर बंधा-यापासून सुरु होणा-या गोदावरी कालवे व नांदूर मधमेश्वर जलद कालवा या कालव्यांना संतुलित विसर्ग उपलब्ध होण्यासाठी व महत्तम पूर पातळी कमी होण्यासाठी तसेच बंधा-यातील गाळ वाहून जाऊन व भविष्यात गाळ साठण्याचे प्रमाण कमी होण्यासाठी उजव्या तीरावर ५ व डाव्या तीरावर ३ असे १२ मी.x ८ मी. आकाराचे ८ वक्राकार दरवाजे बसविण्याचा कामाचा नूतनीकरणाच्या कामात अंतर्भाव होता.

वाढींची सविस्तर कारणे

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :- या सदराखालील वाढ निरंक आहे.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

डी रेग्युलेटर :-

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडुन प्राप्त संकल्प चित्रानुसार पाईल फाउंडेशनच्या पाईल्स मधील लोखंड, स्टिलप्लेट लाईनर, एम एस पाईपसाठी इनकेसींग संधानक इ.च्या परिमाणात झालेली वाढ तसेच इपॉक्सी ग्राउटिंग,पेटिंग, गनायटींगइ सुचवलेली कामे करण्यात आल्यामुळे व कालवा मुखाशी एम एस पाईप करिता ट्रानझेशन वॉल व विंग वॉल यांचे बांधकाम परिमाणात वाढ झाल्याने रुपये १.२५ कोटी वाढ झालेली आहे.

सी वर्क्स :-

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेमार्फत सखोल अभ्यासाअंती सुधारीत आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार मुळ प्रकल्प अहवालात नव्याने काही बाबींचा अंतर्भाव करण्यात आला. त्यामध्ये कठीण स्तरातील सामान्य सुरुंग, नियंत्रीत सुरुंग, छिन्नीने खोदकाम, एम-२० संधानक, एक्सपांन्शन जॉईंट, पायाची सफाई, पॉईंटींग मोकळे करणे, मृदु खडकातील खोदकाम, अँकर बार, झाडे झुडपे काढणे इत्यादी बाबींच्या परिमाणात वाढ झाली. या अनुषंगाने रुपये १६.२० कोटी वाढ झाली आहे.

एम प्लांटेशन :- मुळ प्रकल्प अहवालानुसार नांदूरमधमेश्वर बंधारा नुतणीकरणाच्या तरतुदीत बंधारा स्थळी पक्षी अभयारण्य घोषित होणे व पर्यटन स्थळ म्हणुन विकसीत व्हावे या कारणांसाठी रुपये २.०३ कोटी वाढ करण्यात आली. मुळ प्रकल्प अहवालानुसार सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे रुपये १९.४८ कोटी वाढ झालेली आहे.

इतर कारणे :- मुळ प्रकल्प अहवालानुसार इतर कारणांमुळे रुपये १२.२७ कोटी वाढ झालेली आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती :-

सद्यस्थितीत बंधा-याच्या जुन्या दगडी बांधकामातील भिंतीस संधानकात मजबुतीकरणाचे काम, बंधाऱ्याच्या भिंतीलगतचा गाळ काढण्याचे काम, उजव्या तिराकडील ५ वक्राकार द्वारांचे उभारणीचे भागातील काम पुर्ण झाले आहे. यांत्रिकी विभागामार्फत अंतीम टप्प्यातील ई.ओ.टी. क्रेन व स्ट्रक्चर उभारणी कामे वाढीव गाळया व्यतीरिक्त पुर्ण झालेली आहे. तसेच स्थापत्य विभागामार्फतही उजव्या बाजुकडील पुर्वबलीत पुर्वरचीत पुलाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.व डाव्या बाजुकडील पुर्वबलीत पुर्वरचीत पुलाचे काम बाकी आहे.

तसेच डाव्या तिराकडील ३ वक्राकार द्वारांचे भागातील स्थापत्य कामे पूर्ण करण्यात आली आहे आणि सद्यस्थितीत यांत्रिकी विभागामार्फत वक्राकार द्वारांचे उच्चालक पुल, ईओटी क्रेन, सेवापथ इ. अंतीम टप्प्यातील उभारणीची कामे वाढीव गाळया व्यतीरिक्त पुर्ण झालेली आहे. सद्यस्थितीत आठही वक्राकार द्वारे पावसाळ्यातील परीचलनाच्या दृष्टीने परीपुर्ण आहेत.

७.० नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प

नांदूर मधमेश्वर हा मोठा प्रकल्प असून त्यास शासन निर्णय क्र. पीआयएम ६२७७/१२६६, दिनांक १९/७/७९ अन्वये रु.४८.७० कोटी रक्कमेसाठी प्रशासकिय मान्यता मिळाली आहे. यामध्ये कालवा भागाची किंमत रु.२२.०० कोटी होती. प्रकल्प अहवाला नुसार या प्रकल्पांतर्गत नांदूर मधमेश्वर बंधारा येथून एक कालवा काढून त्याव्दारे अहमदनगर जिल्हयाच्या कोपरगांव तालुक्यातील १५६२ हे आणि औरंगाबाद जिल्हयाच्या वैजापूर व गंगापूर या दुष्काळी तालुक्यातील अनुक्रमे २५८९४ हे व १६४०४ हे अशा एकुण ४३८६० हे क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देणे हा उद्देश आहे.

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

नांदुर मधमेश्वर कालवा प्रकल्पाच्या मुळ प्रकल्प अहवालातील तरतुदीपेक्षा नव्याने कोणत्याही तरतुदींचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे वाढ झालेली नाही.

सविस्तर घटक संकल्पचित्र बदलामुळे झालेली वाढ.

मुळ प्रशासकिय मान्यताप्राप्त प्रकल्पातील कालव्याचा रीचनिहाय काटछेद केंद्रीय जल आयोगाच्या मान्यतेच्या वेळी निश्चित झालेल्या जलनियोजनानुसार सुधारीत झाला, ज्यामध्ये कालव्याची तळाची रुंदी ५.५० मी. वरुन ६.२२ मी. अशी झाली. शासन पाटबंधारे विभाग परिपत्रक क्रं.एमआयएस-१०९४/(१५६/९४) एमपी (ए) दिनांक १८/२/१९९५ अन्वये प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सुचनानुसार कालवा काटछेदामध्ये बदल झाले.

यामुळे कालव्याची तळाची रुंदी व कालवा माथा तलांक ते कालवा तळ तलांक उंचीत वाढ झाल्याने बांधकामाच्या अंत्याधार स्तंभ व प्रस्तंभ उंची तसेच स्पॅनच्या अनुषंगाने लादीची संधानकजाडी व लोहकामात वाढ झाली.

मुळ प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकामध्ये बांधकामांसाठी नमुना अंदाजपत्रकाच्या आधारे तरतूदी करण्यात आल्या होत्या. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडुन प्राप्त झालेल्या जलसेतुंच्या सविस्तर संकल्पन व आराखडयानूसार तसेच, इतर बांधकामासाठी सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन बांधकामे करण्यात आली. या संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ होऊन प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. प्रसारी मृदा भूस्तरातील कालवा खोदकामात शासन पा.वि.परिपत्रक क्र.एमआयएस-१०९४/(१४३/९४) एमपी(ए) दि.१८/२/९५ अन्वये निर्देशित केलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने अस्तरीकरणाच्या खाली सी.एन.एस.चा थर देण्याची तरतुद करण्यात आली. त्यामुळे अस्तरीकरणाच्या कामात व पर्यायाने किंमतीत वाढ झाली आहे. एकत्रितपणे वरिल सविस्तर घटक संकल्पचित्र बदलामुळे एकूण रू.१००.८० कोटी रकमेची वाढ झाली आहे.

इतर कारणे :

नांदूर मधमेश्वर कालव्याची कामे प्रथमत: दुष्काळी कामांतर्गत सन १९७२-७३ मध्ये टंचाई निवारण कामे म्हणून सुरू करण्यात आली. त्यानंतर ही कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत १९७७-७८ पासून हाती घेतली गेली. सन १९७९-८० पासून सदर कामे नियमित निधीतून हाताळण्यात आले परंतू पर्याप्त निधी उपलब्ध न झाल्यामुळे कामे संथगतीने चालू होती. सन १९९५ पासून कालव्याच्या कामास पुरेसे अनुदान मिळण्यास सुरूवात झाली. त्यामुळे अपु-या निधीमुळे कालव्याची कामे रखडल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमधे मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. मुळ प्रशासकिय अहवालामध्ये (४८) रस्ता पूल व (१) रेल्वे क्रॉसिंग बांधकामाची तरतूद होती. सन १९७५ ते आतापर्यंतच्या कालावधीत सा.बां.खाते, जिल्हा परिषदांच्या रस्त्यांचे जाळे विस्तृत झाले आहे. तथा बहुतांशी रस्त्यांची दर्जोनती झाली. त्यामुळे रस्ता पुलांची संख्या (१४८) झाली तथा पूलांची कामे रस्त्याच्या त्या त्या दर्जानूसार करताना सा.बां.खात्याच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना नुसार संकल्पने व आराखडे तयार करतांना कामाच्या किंमतीत वाढ झाली आहे. मुळ प्रशासकिय मान्यता प्रस्तावात पदपूलासाठी (फूट ब्रीज) कोणतीही तरतूद नव्हती. तथापी दोन अस्तित्वातील रस्त्यांवरील पूलात जास्त अंतर असेल अशा ठिकाणी संबंधित जमीन मालक, वा परिसरातील भूमालक यांच्या निवेदनावरुन स्थानिक लोक प्रतिनिधी/ आमदार/ खासदार इत्यादी यांनी पदपूल/ बांधकामे देण्यास्तव लेखी मागण्या केल्या. प्राप्त मागणी व प्रकल्पस्थिती नुसार पदपुलांची कामे केल्याने प्रकल्प किंमतीत वाढ झाली आहे.

मुळ प्रशासकिय मान्यता अंदाजपत्रकामधे भू विकास भाग-१ च्या (कडा काम्पोनंट) कामासाठी तरतुद नव्हती. नांदुर मधमेश्वर कालवा लाभक्षेत्रातील भूविकास भाग-१ ची कामे करण्यासाठी कालवा प्रकल्पाचा केंद्र शासन सहाय्यीत लाभक्षेत्र विकास व जलव्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास महाराष्ट्र शासनामार्फत सादर करण्यात आला. त्यास केंद्र शासनाने पत्र क्रं.केंद्र शासन, जलसंपदा विभाग १३/३/२००८ (कॅड डब्ल्यु एम)/४०, दि.१८/२/२०१० अन्वये रु.१५३.३३ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय रकमेस मान्यता प्रदान केली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु.१५३.३३ कोटी रकमेची वाढ झाली आहे.

ई.टी.पी. खर्चातील वाढीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

वरील सर्व कारणांमुळे खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

१	निधीची अपुरी तरतूद व त्यामुळे दरसूचीतील वाढ	रू. ३३०.६६ कोटी
२	भू विकास भाग-१ कामे	रू. १५३.३३ कोटी
३	रस्तापुल व पदपुल	रू. ५.३९ कोटी
४	जमिनीच्या किंमतीतील वाढ	रू. ४.४६ कोटी
५	इतर कारणे	रू. ३९.६२ कोटी
६	ई.टी.पी. खर्चातील वाढ	रू. ७३.६८ कोटी
	एकूण	**रू.६०७.१४ कोटी**

प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक)

नांदुर मधमेश्वर मुख्य कालवा कि.मी. १ ते १२८ चे काम त्यावरील बांधकामे व अस्तरीकरणासह पूर्ण झाले असुन त्यावरील प्रत्येकी १६ कि.मी.लांबीचे दोन शाखा कालवे त्यावरील बांधकामासह पुर्ण झालेले आहेत. शाखा कालवा क्रं.१ चे अस्तरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असुन वितरण व्यवस्थेची किरकोळ कामे वगळता पुर्ण करण्यात आली आहेत. वर्ष २००३ मधे कालव्याव्दारे पाणी सोडुन प्रथम चाचणी घेण्यात आली व २००४ पासुन वर्षनिहाय उपलब्ध झालेल्या पाण्यामधुन लाभक्षेत्रात प्रत्यक्ष सिंचन सुरु आहे. प्रकल्पीय सिंचन क्षमता ४३८६० हे इतकी असुन जुन-२०१२ अखेर पुर्ण सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. तसेच कालव्याच्या लाभक्षेत्रात भूविकास भाग-१ ची कामे प्रगतीपथावर आहेत. कालव्याच्या एकूण ५२८६४ हे (सीसीए) क्षेत्रापैकी सप्टेंबर-२०१२ अखेर १२३३८ हे. क्षेत्रावरील भू विकास भाग-१ ची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत ४०५२६ हे क्षेत्रावरील कामे वर्ष २०१५-१६ पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

८.० विशेष लाभ :

नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत मुकणे, भावली, वाकी व भाम या धरणांतील पाण्याचा वापर अहमदनगर व औरंगाबाद जिल्हयातील अवर्षण प्रवण क्षेत्राचे ४३,८६० हेक्टर जमिनीस सिंचनाचा लाभ होणार आहे तसेच इगतपुरी तालुक्यातील १७१६ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार असून एकत्रित ४५,५७६ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे. मुकणे व भावली धरण पूर्ण झाल्याने १७,२७२ हेक्टर इतके सिंचन क्षेत्र निर्मिती झाली आहे. नांदूर प्रकल्पांतर्गत मुकणे, भावली, वाकी व भाम या धरणांच्या पायथ्याशी विद्युत गृह प्रस्तावित असून प्रकल्प निहाय क्षमता खालील प्रमाणे आहे.

१.० मुकणे धरण - १ x १४५० किलो वॅट
२.० भावली धरण - १ x ५०० किलो वॅट
३.० वाकी धरण - १ x ११५० किलो वॅट
४.० भाम धरण - १ x १४०० किलो वॅट

९. नांदूर मधमेश्वर प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रकल्प अहवाल रु.१५७२.२४ कोटी रक्कमेचा महामंडळाचे पत्र क्र.गोमपाविम/तां.५/नांमप्र/सुप्रमा/१०१९६ दिनांक १.१२.२०१० अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास अद्याप प्र.मान्यता प्राप्त झाली नाही. नांदूर मधमेश्वर प्रकल्पाचा मंजूर द्वितीय सुधारीत प्रकल्प अहवालाची किंमत ८६६.३० कोटी इतकी असून तृतीय सुधारीत प्रकल्प अहवाला मध्ये रु. ७०५.९४ कोटी इतकी वाढ होणार असून सदर वाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१	दर सुचीतील फरकामुळे	रु.११९.८४ कोटी
२	जास्त दराची निविदा स्विकारल्यामुळे	रु.२४.४९ कोटी
३	भूसंपादनाच्या किंमतीतील वाढीमुळे	रु.१८०.२५ कोटी
४	संकल्पचित्रातील बदलामुळे	रु.४९.९३ कोटी
५	जलद कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे यांत्रिकी पध्दतीने करणे प्रस्तावित असल्याने	रु.८९.६८ कोटी
६	आस्थापनेतील खर्चातील वाढीमुळे	रु.६७.३२ कोटी
७	वाकी धरणावरुन उपसा सिंचन योजनेच्या कामामुळे होणारी वाढ	रु.१४.४० कोटी
८	लाभक्षेत्रातील भाग-१ च्या कामासाठी रु. १११.१३ कोटी इतकी वाढ होणार असल्यामुळे	रु.१११.१३ कोटी
९	इतर कारणांनी झालेली वाढ	रु.४८.९० कोटी
	एकूण	रु.७०५.९४ कोटी

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	कडवा मोठा प्रकल्प (पिपळगाव डुकरा) ता. इगतपुरी जि.नाशिक			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१०३२० हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	९१५५ हेक्टर			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०९/०७/१९७९	१९७८-७९	८.१४	१०३२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२५/१/१९९४	१९९१-९२	४३.६०	१०३२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	९/७/१९९९	१९९५-९६	७६.०६	१०३२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	३१/०८/२००९	२००८-०९	१४२.२१	१०३२०
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	१) के.ज.आ. नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र.८/२३३/८५/ टिएसी/१९४ दि.६/२/१९८९ अन्वये (रुपये रु.२७.०० कोटी किंमतीस मान्यता प्राप्त आहे			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७९-८० ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ **एकुण**		रु. ३५.५९ कोटी रु. २३.६८ कोटी रु. २७.८७ कोटी **८७.१४ कोटी**	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	११.६४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	६३.१६			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१२.३४			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	**८७.१४**			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९७९-८०			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९८२ (किंमत रु. १०.८२८ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत अ	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत ब	वाढीव रक्कम क = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) ड
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	६.५९	७०.४७	६३.८७	४७.६४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.६७	९.९३	९.२६	६.९०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	---	२५.४७	२५.४७	१९.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	---	१०.००	१०.००	७.४६
७.५	इतर कारणे	०.८८	२६.३५	२५.४७	१९.००
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	८.१४	१४२.२१	१३४.०७	१०० %
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	पुनर्वसन वनजमिन संपादन काम पुर्ण आहे. भुसंपादन ९८ टक्के पुर्ण आहे. २ टक्के भुसंपादन चा-यांसाठी प्रगतीत आहे.			
८.२	धरण	सन १९९२ मध्ये धरणाचे काम पुर्ण होऊन १०० टक्के पाणीसाठा (५९.५९ दलघमी) निर्माण झालेला आहे. धरण व कालवे सन १९९९ पासुन सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत केलेले आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कालवा (० ते ८८ किमी) पुर्ण आहे. चा-या, उपचा-या वितरीका व भाग-१ ची ९० टक्के कामे पुर्ण आहेत. ११६५ हे सिंचन क्षमता निर्मिती भुसंपादनास शेतक-यांच्या अडथळयामुळे बाकी आहे.			

कडवा मोठा प्रकल्प (पिंपळगाव डुकरा), ता. इगतपुरी जिल्हा नाशिक
संक्षिप्त टिप्पणी

१.० **कडवा** मोठा प्रकल्प नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यात पिंपळगाव डुकरा गावाजवळ कडवा नदीवर बांधण्यात आलेला आहे. कडवा धरणाच्या कामास सन १९७९ साली सुरुवात होऊन धरणाचे बांधकाम सन १९९२ मध्ये पुर्ण झाले त्यावरील उजवा कालव्याचे व वितरण व्यवस्थेची कामे सन १९९९ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहे. कडवा उजवा कालव्याची लांबी ८८ कि.मी. असून एकूण सिंचन क्षेत्र १०३२० हे. एवढे आहे. कडवा प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेसाठी सन १९९९ मध्ये नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक कडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

मुळ प्रकल्प अहवालातील कालवा हा पुर्वीच्या एन (Nô) किंमत व वहनव्यय किंमती विचारात घेऊन संकल्पित करण्यात आलेला होता. परंतु शासन परिपत्रक दि.१८/२/१९९५ तसेच वहनव्यया बाबतचे सुधारीत मापदंड तां.परिपत्रक क्र.संकीर्ण १०९२/(५८/९२) मोप्र(प्र) मंत्रालय मुंबई दि.०८/०६/१९९२ अन्वये कालवा संकल्पन केल्याने कालव्याच्या वहन क्षमतेत २४५ क्युसेक्स ऐवजी ४०२ क्युसेक्स वहन क्षमता अशी वाढ झाल्याने कालवा काटछेदांत वाढ होवून व्याप्तीत मोठा बदल झालेला आहे. सुधारीत काटछेदाप्रमाणे कालवा आधुनिकिकरण करण्याचे तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालात प्रस्तावित केल्याने प्रकल्प किंमतीत वाढ झालेली आहे

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

मुळ प्रकल्प अहवालात द्वार विरहित सांडवा व साधे सिंचन विमोचक दगडी बांधकामात प्रस्तावित होते, परंतु सविस्तर संकल्पनानुसार द्वारयुक्त सांडवा व विद्युत सिंचन विमोचक संधानकात बांधण्यात आले आहे. त्यामुळे एकंदरीत नवीन संकल्पानुसार किंमतीत रु.१०.०० कोटी ने वाढ झालेली आहे.

४.० इतर कारणे

१) भुविकास कामाची तरतुद केल्याने
२) पर्यावरण विषयक तरतुद
३) कडवा कालव्यावरील निवडक लांबीत अस्तरीकरण तरतुद केल्याने
४) उच्च दराच्या निविदा स्विकारल्याने
५) इ.टी.पी.(आस्थापना व संयत्रे) खर्चात झालेली वाढ

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक) :-

कडवा प्रकल्पाचे काम सन १९७९ साली सुरु होवून मुख्य धरणाचे काम १९९२ मध्ये पूर्ण झाले असून प्रकल्पावरील उजवा कालवा व वितरीकांची कामे सन १९९९ मध्ये ९० टक्के पुर्ण करण्यात आली आहेत. मुख्य कालव्याची लांबी ८८ कि.मी. आहे. सन १९९९ मध्ये ९१५५ हे. सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. कडवा प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेसाठी सन १९९९ मध्ये नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिककडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. शासन मान्यतेनुसार कडवा कालव्याची आधुनिकीकरणाची कामे सन २००९ पासून हाती घेण्यात आलेली आहेत. त्यानुसार कि.मी. ० ते ५५ पर्यंतची कामे सद्य:स्थितीत प्रगतीत असून उर्वरीत कामे लवकरच सुरु करण्याचे नियोजन आहे. नियोजनानुसार निधी उपलब्ध झाल्यास २०१४ पर्यंत सर्व आधुनिकीकरणाची कामे पुर्ण करणे शक्य होईल.

६.० विशेष लाभ

कडवा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात एकूण दोन साखर कारखाने आहेत एकुण गाळप ७ लक्ष मे.टन व साखर उत्पादन १० लक्ष पोते आहे. मळीवर आधारीत अल्कोहोल निर्मिती होते. या सर्व कारखान्यांची याच गळीत हंगामातील एकत्रित उलाढाल रु.६० कोटी इतकी असून विविध कर माध्यमाद्वारे रु. १० कोटी शासनास भरणा केले आहेत. कडवा प्रकलपामुळे सुमारे तीस गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहेत. तसेच साधारणपणे १.५ लक्ष लोकसंख्येसाठी पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे. या प्रकल्पातुन बिगर सिंचन आरक्षण जवळपास ५ दलघमी एवढे आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव -	उर्ध्व गोदावरी प्रकल्प तालुका — दिंडोरी जिल्हा — नाशिक			
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)	७४२१०			
	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) जुन २०१२ -	६९६५३			
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१९.७.१९६६	१९६४-६५	१४.२९	४४२९१
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १ (तीसगांव व पुणेगांव (धरण व कालवे), दरसवाडी पोहोच कालवा, वाघाड व करंजवन धरणांच्या कालव्यांचा नव्याने समावेश)	१९.९.१९९९	१९९६-९७	१८९.९८	६९०१५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २ (मांजरपाडा व इतर १२ प्रवाही वळण योजनांचा नव्याने समावेश)	१४.७.२००८	२००५-०६	४३९.१२	७४२१०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (शासनास सादर)	१३.२.२०१२	२००९-१०	१४४०.२९	७४२१०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) (रु.कोटी)	केंद्रीय नियोजन आयोगाचे इंग्रजी पत्र क्र.नं.११-१० (१) (१४)/६७-१ आणि पी दि. १६/०६/१९६७ (रुपये १४.२० कोटी)			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१. १९६८-६९ ते १९९४-९५		रु. १०२.२७	
		२. १९९५-९६ ते १९९९-००		रु. २३.३७	
		३. २०००-०१ ते २०११-१२		रु. २७५.६८	
		एकूण		रु. ४०१.३२	
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	३४.४१			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	३२५.७७			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	४१.१४			
	(एकुण अ.क्र. ४.२ ते ४.४) (रु.कोटी)	४०१.३२			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९६८-६९			
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९६८ (किंमत रुपये १४.२९ कोटी)			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	(रु.कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र. मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम क = (ब - अ)	टक्केवारी (वाढीव रक्कमेची) (ड)
७.१	दरसुचीतील वाढ	६.३१	२६.८६	२०.५५	४.८४
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ	१.०३	६.३६	५.३३	१.२५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	०.००	३१४.५८	३१४.५८	७४.०५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१५.४१	१५.४१	३.६३
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	६.९५	७५.९१	६८.९६	१६.२३
	(एकुण अ.क्र. ७.१ ते ७.५) (रु.कोटी)	१४.२९	४३९.१२	४२४.८३	१००.००
८	प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन,पुनर्वसन,वन जमिन संपादन	सर्व पुनर्वसन, वन जमिनीसह भुसंपादन पूर्ण.वळण योजनांचे भुसंपादन प्रगतीत.			
८.२	धरण	सर्व धरणे पूर्ण, वळण योजनांचे कामे प्रगतीत.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	सर्व मुख्य कालवे पूर्ण, वितरिका व लघु वितरिकाची कामे प्रगतीत			

उर्ध्व गोदावरी प्रकल्प, ता.दिंडोरी, जि.नाशिक
संक्षिप्त टिप्पणी

१.० उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मुळ मंजूर अहवालात वाघाड, करंजवण, पालखेड व ओझरखेड या धरणांचा समावेश करुन एकत्रित उर्ध्व गोदावरी प्रकल्प म्हणून सन १९६६ मध्ये मान्यता प्राप्त झाली. असून या प्रकल्पांच्या कामांना सन १९६८ मध्ये सुरुवात करण्यांत आली होती. तद्नंतर सन १९९९ मध्ये उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रकल्प अहवालात तिसगांव धरण, पुणेगांव धरण व कालवे आणि दरसवाडी पोहच कालव्याचा समावेश करण्यांत आलेला आहे. तसेच मांजरपाडा वळण योजना व १२ प्रवाही वळण योजनांचा समावेश द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात सन २००८ मध्ये करण्यांत आलेला आहे. या प्रकल्पांतर्गत नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्यातील ७४,२१० हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे. या प्रकल्पांतर्गत सर्व मुख्य धरणांचे व कालव्यांचे कामे पूर्ण झाले असून वळण योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्ध्व गोदावरी प्रकल्पांतर्गत सर्व धरणे व कालवे सिंचन व्यवस्थापनेसाठी टप्प्याटप्प्याने लाभक्षेत्र विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत करण्यांत आलेली आहेत. आतापर्यंत प्रकल्पित सिंचन क्षेत्र ७४,२१० हेक्टरपैकी ६९,६५३ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मिती जुन-२०१२ अखेर झाली असून त्यापैकी ६४,६७० हेक्टर क्षेत्र लाभक्षेत्र विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत करण्यांत आले आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

३.०मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये वेळोवेळी खालीलप्रमाणे बदल झाले आहेत.

४.० दिंडोरी तालुक्यातील शेतक-यांच्या सततच्या मागणीमुळे शासनाने करंजवण धरणापासून १७ कि.मी. लांबीच्या डावा कालवा व ६.५० कि.मी. लांबीचा उच्चस्तरीय कालवा काढण्यास अनुक्रमे शासन पत्र क्र. दिनांक १६.०८.१९८२ व दिनांक १९.०५.१९८३, अन्वये मंजूरी दिली आहे. यामुळे दिंडोरी तालुक्यातील १३७४ हेक्टर क्षेत्र सिंचन वाढ झाली आहे.

५.० वाघाड धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतक-यांच्या आग्रहाच्या मागणीनुसार वाघाड डावा कालवा-१४ कि.मी. व उजवा कालवा ४५ कि.मी. काढण्यास शासन पत्र दिनांक १८.१०.१९७५ व दिनांक २३.०३.१९७७ आणि दिनांक ०६.०४.१९७९ अन्वये मंजूरी देण्यात आली

६.० मुळ प्रकल्प अहवालानुसार पालखेड डावा कालवा १००.८० कि.मी. पर्यंत बारमाही मंजूर होता. येवला तालुक्यातील दुष्काळी भागास सिंचनाचा लाभ मिळण्यासाठी सदरचा कालवा हा दुहंगामी करुन १२८.५० कि.मी. पर्यंत शासन पत्र दिनांक ०६.०४.१९७९ अन्वये मान्यता मिळाली आहे तसेच पालखेड कालव्याचे कि.मी. ० ते ६६ पर्यंत नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित केले आहे.

७.० ओझरखेड धरणाच्या मुळ प्रकल्प अहवालात १२.०० कि.मी. डावा कालवा प्रस्तावित होता. पंरतु लोकप्रतिनिधी व शेतक-यांच्या सततच्या मागणीमुळे सदर कालव्याची लांबी ४९.०० कि.मी. पर्यंत वाढविण्यास शासन पत्र दिनांक २९.०८.१९८३ अन्वये मान्यता देण्यात आली.

८.० उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मुळ मंजूर प्रकल्प अहवालात तिसगांव प्रकल्पाचा समावेश नव्हता. सन १९८३ मध्ये मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर शासन पत्र दिनांक १६.११.१९८९ अन्वये उर्ध्व गोदावरी प्रकल्पात समाविष्ट करण्यास मंजूरी प्राप्त झाली. याद्वारे ओझरखेड कालव्यावरील १७२७ हेक्टर क्षेत्र पूनर्स्थापित करण्यांत आले आहे.

९.० पुणेगांव धरण व कालवा :- शासन पत्र दिनांक २९.०३.१९८३ अन्वये पुणेगांव धरण व ७३ कि.मी. लांबीचा डावा कालव्याचा समावेश (दरसवाडी ल.पा.भरण्यासाठी) उर्ध्व गोदावरी प्रकल्पात करुन ५४३० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ (दिंडोरी, निफाड व चांदवड तालुका) मिळण्यासाठी अंतर्भूत करण्यात आला.

१०.० दरसवाडी पोहच कालवा :- चांदवड व येवला तालुक्यातील ४० पाझर तलाव व २ लघु प्रकल्प भरण्यासाठी ९० कि.मी. लांबीच्या कालव्यास शासन पत्र दिनांक १९.०८.१९८३ अन्वये मान्यता देण्यात आली.

११.०ओझरखेड डावा कालवा कि.मी. ४७ पासून ६५ कि.मी. पर्यंत वाढविण्याबाबत शासन पत्र दिनांक ०५.१२.१९९८ अन्वये मंजूरी प्राप्त झाली.

१२.० पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी मांजरपाडा वळण योजनेचा समावेश उर्ध्व गोदावरी प्रकल्पात करण्यासाठी शासन पत्र दिनांक २४.११.२००६ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच शासन पत्र दिनांक १३.०९.२००५ अन्वये १२ प्रवाही वळण योजनांचा समावेश उर्ध्व गोदावरी प्रकल्प अहवाल करण्यास मंजूरी प्राप्त आहे. वरील बदलामुळे मुळ ४४,२९१ हेक्टर सिंचन क्षमतेवरुन आता सिंचन क्षमता ७४,२१० हेक्टर एवढी झाली आहे. अशा रितीने उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे किंमतीत रु. ३१४.५८ कोटी वाढ झाली आहे.

१३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

अ) करंजवण धरणाचे साठवण क्षमतेत वाढ झाल्याने संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ

ब) पालखेड धरणाचे जलक्षोमनाशक (E.D.A.) च्या एन्डसिल व गाईडवॉलचे बळकटीकरणामुळे वाढ

क) पालखेड कालव्याचे कि.मी. १००.८० ते १२८.५० कि.मी. वाढ झाल्याने घटक संकल्पचित्रामध्ये वाढ तसेच कि.मी. ०.०० ते ६६ मधील नुतनीकरणामुळे बांधकामांचे मुळ संकल्पचित्रामध्ये बदल झाल्याने वाढ

ड) पालखेड धरणाचे मुख्य विमोचकाचे संकल्पचित्रामध्ये बदल झाल्याने वाढ

१४.० अशा प्रकारे सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे व तांत्रिक सुधारणा संकल्पनामुळे एकूण वाढ रुपये १५.४१ कोटी.

१५.० इतर कारणे.

अ) वळोवेळी कालव्यांच्या लांबीमध्ये झालेल्या वाढींमुळे सर्वेक्षणातील वाढ

ब) भूविकास कामाची तरतुद

क) सर्वेक्षणांती नवीन पुल / मो-या इ. बांधकामांमुळे झालेली वाढ एकूण वाढ रुपये ९.१६ कोटी

ड) ई.टी.पी.मुळे वाढ (अ + ब + क) रुपये ५९.८० कोटी

एकूण वाढ रुपये ६८.९६ कोटी

१६.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)

उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचे काम सन १९६८ मध्ये सुरु केले. मुळ प्रकल्पामध्ये समाविष्ट वाघाड, करंजवण, पालखेड व ओझरखेड या धरणांची कामे पूर्ण झालेली असून प्रकल्पात नव्याने समाविष्ट पुणेगांव, तिसगांव या प्रकल्पांची कामेही पूर्ण झाली आहेत. सदर पाणीसाठ्याचा वापर सिंचनासाठी व बिगर सिंचनासाठी करण्यांत येत आहे. सदरचे प्रकल्पावर सन २०११-१२ पर्यंत ६९६५३ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. सदरचे प्रकल्प सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पात नव्याने समाविष्ट पुणेगांव धरणाचे व कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. धरण व कालव्याचे कि.मी. क्र. २५ पर्यंतचे हस्तांतरण व्यवस्थापन विभागाकडे करण्यांत आले आहे. प्रकल्पाचे एकूण ६९८४ हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी ४१४२ हे. सिंचन क्षेत्राची निर्मिती जुन-२०१२ अखेर झाली असून उर्वरीत २८४२ हे. क्षेत्राची निर्मिती जुन-२०१४ अखेर करण्याचे नियोजन आहे. नव्याने समाविष्ट तिसगांव धरण व त्यावरील कालव्याचे कामे पूर्ण झाली आहेत. तिसगांव धरणातील पाणीसाठ्याचा ओझरखेड कालव्याद्वारे सिंचन करावयाचे आहे. ओझरखेड प्रकल्पाचे जुन-२०१२ अखेर १३,०१६ हे. सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. उर्वरीत सिंचन क्षमता १७१६ हे. जुन-२०१४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदरच्या प्रकल्पाचे हस्तांतरण व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आले आहे.

दरसवाडी पोहच कालव्याचे काम अंतिम टप्प्यात असून जून-२०१४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मांजरपाडा वळण योजनेचे कामास सन २००९ मध्ये सुरुवात करण्यांत आली असून सन २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत मांजरपाडा वळण योजनेचे ५५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. ११ प्रवाही वळण योजनांची (चिमणपाडा वगळून) कामे प्रगतीपथावर असून जून-२०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सर्व वळण योजनांचे मिळून ६० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

विशेष लाभ

उर्ध्व गोदावरी प्रकल्पातील पाणीसाठ्याचा वापर सिंचन व बिगर सिंचनासाठी करण्यांत येत आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुका, येवला नगरपालिका व येवला तालुक्यातील ३८ गांवे, मनमाड नगरपालिका व नांदगांव तालुका, निफाड, लासलगांव, विंचूर, पिंपळगांव, साकोरे व चांदवड तालुक्यातील गावांना जिल्हाधिकारी आरक्षण व शासन मंजुर पाणी पुरवठा योजना या दोघांचे मिळून वार्षिक सरासरी सुमारे २ अ.घ.फू. पाणी पिण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येते.उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा पाण्याचा वापर रानवड शुगर फॅक्टरी, के.डिस्टीलरी, अशोककुमार हॅचरीज, एव्हरेस्ट इंडस्ट्रिज, सिग्राम डिस्टीलरीज, शिवम केमीकल, कादवा साखर कारखाना, दिंडोरी लघु औद्योगिक वसाहत, एम.आय.डी.सी.तळेगांव तसेच मध्य रेल्वे मनमाड या ठिकाणच्या औद्योगिक कामासाठी व छोट्यामोठ्या कारखान्यांसाठी सुमारे १६३ दलघफू पाण्याचे वार्षिक आरक्षण करण्यांत आले आहे.

गोदावरी खो-यातील कमी पडणारे पाऊस वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे पाण्याची तूट सध्या जाणवू लागली आहे. त्यानुषंगाने पश्चिम वाहिनी पार नदीवरील मांजरपाडा वळण योजनेचे पाणी तुटीच्या पुणेगांव व ओझरखेड धरणामध्ये वळविण्यात येत आहे. सदर वळण योजनेंतर्गत ६०६ दलघफू इतके पाणी गोदावरी खो-यात वळविण्यांत येणार आहे. उर्ध्व गोदावरी प्रकल्पात समाविष्ट प्रवाही १२ वळण योजनांची कामे सन २०१० मध्ये सुरु करण्यात आली असून यापैकी ११ योजनांची कामे प्रगतीत असून ८ योजनेत पाणीसाठा अंशत: निर्माण झालेला आहे व अंशत: गोदावरी खो-यात पाणी वळविण्यात येत आहे. १३१ दलघफू पाणी गोदावरी खो-यात वळविण्यांत आलेले आहे.

सन १९९१ ते २००४ पर्यंत वाघाड प्रकल्पावर एकूण २४ पाणी वापर संस्था १०० टक्के सिंचन क्षेत्रावर स्थापन झालेले आहेत. वाघाड प्रकल्पावर सन २००३ मध्ये प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था स्थापन झालेली आहे. दिनांक २४.११.२००५ रोजी प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेस प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन हस्तांतर करण्यात आले आहे. प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेस सिंचन व्यवस्थापन हस्तांतर करण्यात आलेला हा राज्यातील तसेच देशातील पहिलाच प्रकल्प आहे. सदर प्रकल्पास International Commission on Irrigation & Drainage या आंतरराष्ट्रीय संस्थेचा सन २०१० मध्ये Participatory Irrigation Management साठी पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या रु.१४४०.२९ कोटी रकमेचा तृतिय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.रातांसस/उगोप्र/तृसुमा/७२ दि.२४/११/२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे. तदनंतर महामंडळाचे पत्र जा.क्र.गोमपाविम/तां-५/उगोप्र/तृसुमा/११५१४ दि.२८/११/११ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालास अद्याप सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त नाही. उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या मंजूर द्वितीय सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रु.४३९.१२ कोटी इतकी असून तृतिय सुधारित प्रकल्प अहवालामध्ये रु.१००१.१७ कोटी इतकी वाढ प्रस्तावित आहे.

प्रकल्पाच्या किंमतीत खालील बाबींमुळे वाढ झालेली आहे.

१.	दरसुचीतील वाढ	--	९२.८४ कोटी.
२.	निविदा आधिक्य	--	३५.२७ कोटी.
३.	भू संपादनातील किंमतीत वाढ.	--	४५.५२ कोटी.
४.	संकल्पचित्रातील बदल.	--	२९९.५१ कोटी.
५.	नवीन तरतूद व इतर कारणे.	--	३८६.०२ कोटी.
६.	अस्थापना व अनुषंगीक वाढ.	--	१४२.०१ कोटी.
		एकूण	१००१.१७ कोटी.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	शिवना टाकळी मध्यम प्रकल्प (प्रवाही) ता.कन्नड जि.औरंगाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	६३८९ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	४३०२ हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१८/१/१९८०	१९७८-७९	८.०३	७४८४
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१८/१०/१९९५	१९९३-९४	४२.७२	६६००
	सुधारित प्रशासकीय मान्यता -२	२९/१०/२००३	२०००-०१	१२३.१२	६३८९
	सुधारित प्रशासकीय मान्यता -३	१३/०३/२००९	२००७-०८	२२८.६३	६३८९
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	दि.४/७/१९९४ रोजी या प्रकल्पास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. रु. ३४.७६ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यत २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		६.९७ २९.७० १२८.४१	
		एकुण		१६५.०८	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३३.६४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	११०.७४			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	२०.७०			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१६५.०८			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८२-१९८३			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	मार्च १९८९ (किंमत रुपये १८.९१ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) =(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	५.८२	६७.१७	६१.३५	२७.८१
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.७३	३९.०६	३८.३३	१७.३७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०	३३.७९	३३.७९	१५.३२
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०	२८.३५	२८.३५	१२.८५
७.५	इतर कारणे	१.४८	६०.२६	५८.७८	२६.६५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	८.०३	२२८.६३	२२०.६०	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	धरणाचे आवश्यक क्षेत्र, कालवा वितरण प्रणाली ८० टक्के भुसंपादन पुर्ण, उर्वरीत क्षेत्राचा मावेजा देणे बाकी आहे			
८.२	धरण	पुर्ण आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	मातीकाम पुर्ण, अस्तरीकरण प्रगतीपथावर, वितरिकाचे काम प्रगतीपथावर, भुविकास भाग-१ ची कामे शिल्लक			

शिवना टाकळी मध्यम प्रकल्प, जि. औरंगाबाद

संक्षिप्त टिप्पणी

१.० शिवना टाकळी धरण औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात टाकळी येथे गोदावरीची उपनदी असलेल्या शिवना नदीवर बांधण्यात आले आहे. शिवना टाकळी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे कामास सन १९८९ साली सुरुवात होऊन धरणाचे बांधकाम सन २००६ मध्ये पुर्ण झाले. प्रकल्पास दोन मुख्य कालवे असुन उजव्या कालव्याची लांबी ५५.२० कि.मी. असुन डाव्या कालव्याची लांबी १०.५३ कि.मी. आहे. तसेच उजव्या कालव्यावर ११ मुख्य वितरीका असुन डाव्या कालव्यावर ५ मुख्य वितरीका आहेत. प्रकल्पाचे एकुण लाभक्षेत्र ६३८९ हेक्टर आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :-

मूळ मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये दोन्ही कालव्यावर ५ टक्के निवडक अस्तरीकरणाची तरतुद होती. तथापि उजव्या व डाव्या कालव्यास निवडक अस्तरीकरणाऐवजी संपुर्ण लांबीमध्ये संधानकामध्ये अस्तरीकरण करण्याच्या प्रस्तावास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाने दिनांक २४/०३/२००६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये एकुण ७४८४ हेक्टर सिंचनाचा लाभ प्रस्तावित होता. केंद्रीय जल आयोगाकडुन येव्यात बदल झाल्यामुळे प्रकल्पाचा जिवंत साठा ४०.७० दलघमी वरुन ३६.४५ दलघमी झाल्यामुळे सिंचन क्षेत्रात ७४८४ हेक्टर वरुन ६६०० म्हणजे ८८४ हेक्टर घट झाली. व्दितीय सुधारीत मान्यतेच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुन ८ पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यामुळे प्रकल्पाच्या उपलब्ध साठ्यामधुन ३.७९१ दलघमी पिण्यासाठी पाणी आरक्षीत केले त्यामुळे प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र २११ हेक्टरने कमी झाले आहे.

बोरदहेगांव मध्यम प्रकल्प ता. वैजापुर मध्ये शिवना टाकळी मध्यम प्रकल्पाचे पाणी सोडण्यासाठी मा. जीवनराव गोरे, तत्कालीन उपाध्यक्ष गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक २८/०४/२००७ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश तसेच श्री. शैलेश सुरासे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ०८/०५/२००७ च्या पत्रान्वये मा. जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांना विनंती केल्यावरुन व त्या पत्रावर शासनाचे पत्र दिनांक २४/०९/२००७ व शासन पत्र क्र. दिनांक १८/१०/२०१० मधील निर्देशान्वये ५.९५ दलघमी वळविण्यासाठी रु. ५.७१ कोटीच्या प्रस्तावास मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, औरंगाबाद कार्यालयाने मंजुरी दिलेली आहे.

मुळ प्रशासकीय मान्यते प्रमाणे सांडव्याची जागा (सेंट्रल ओगी टाईप) ३७९०.९० मीटर ते ३९६७.५० मीटर या भागात निश्चीत केलेली होती. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने हा सांडवा ३६८३ मीटर ते ३८५५ मीटर या भागात प्रस्तावित केल्यामुळे माती धरणाचे काटछेद व दगडी धरणाचे संकल्पचित्रामध्ये बदल झालेला आहे.

अशा रितीने प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाल्याने रु.३३.७९ कोटी वाढ झाली आहे.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने धरणाची संकल्पचित्रे संकल्पीत केलेल्या काटछेदाप्रमाणे तसेच डाव्या विमोचकाचे संकल्पन यामुळे एकूण रु.२८.३५ कोटीची वाढ झालेली आहे.

४.० इतर कारणे :-

१)	भुविकास कामाची तरतुद, स्वामित्व शुल्क दरातील वाढ यामुळे होणारी एकूण वाढ	.. रु २९.७५ कोटी
२)	ई.टी.पी. मुळे होणारी वाढ	.. रु २९.०३ कोटी
	एकूण	**.. रु.५८.७८ कोटी**

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक) :-

शिवना टाकळी प्रकल्पातील मुख्य धरणाचे काम १९८९ मध्ये सुरु झाले असुन २००६ मध्ये पुर्ण झाले आहे. प्रकल्पाचे डावा कालवा लांबी कि.मी. १०.५३ व उजवा कालवा लांबी कि.मी. ५५.२० अस्तरीकरण वगळता सन २००६ मध्ये पुर्ण झाले आहे. दोन्ही कालव्याचे अस्तरीकरण व वितरीकांची कामे प्रगती पथावर आहेत. जुन २०१२ पर्यंत ४३०२ हेक्टर सिंचन निर्मीती झाली आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रात ५ गांवे येत असुन त्यांचे पुनर्वसन नविन गांवठाणात करण्यात आलेले आहे. सदर गावात बाधीतांचे स्थलांतरण झालेले असुन नविन नियमानुसार द्यावयाच्या १८ नागरी सुविधापैकी १३ सुविधा पुर्ण असुन इतर सुविधांची कामे प्रगतीत आहेत. निधी उपलब्धते नुसार सन २०१४ पर्यंत प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

६.० विशेष लाभ :-

शिवना टाकळी धरणातुन बिगर सिंचन आरक्षण ८ गांवाची पाणी पुरवठा योजनेतुन ४० गांवाना पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे. सन २०११-१२ मध्ये रब्बी हंगामामध्ये धरण उपसा, उजव्या व डाव्या कालव्याव्दारे प्रवाही सिंचन केल्यामुळे तसेच लाभक्षेत्रातील विहीरीच्या पाणी पातळीमध्ये वाढ झालेली असुन पिक उत्पादनात वाढ झालेली आहे. तसेच शिवना टाकळी मध्यम प्रकल्प परीसरातील जवळपास २३ गांवाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागलेला आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	वाकोद मध्यम प्रकल्प (प्रवाही) ता.फुलंब्री जि. औरंगाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	२२१७ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	२२१७ हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१९/१०/१९९२	१९९१-१९९२	८.६९	२३३५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२२/१०/१९९९	१९९७-१९९८	२८.३२	२२१७
	सुधारित प्रशासकीय मान्यता -२	२७/५/२००५	२०००-२००१	३४.३६	२२१७
	सुधारित प्रशासकीय मान्यता -३	३१/७/२००९	२००५-२००६	५०.८३	२२१७
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	पत्र क्र.(DIR/(APP)NAG/Wakod/२०००/६०-६३ दि.३१/३/२००३ रोजी प्रकल्पास स्विकृती प्राप्त झाली आहे.रु.३४.३६ कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यंत २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		०.४६ १५.०९ ५४.१३	
		एकुण		६९.६८	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३३.३४			
४.३	बांधकामावरील खर्च (रुपये कोटी)	३०.८९			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	५.४५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	६९.६८ (अद्ययावत सु.प्र.मा.शासनास सादर)			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९२-१९९३			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	डिसेंबर १९९५ (किंमत रुपये ११.२२ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा.किंमत (ब)	वाढीव रक्कम (क)=(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	७.५१	२१.६०	१४.०९	३३.४४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	१.१८	१६.८७	१५.६९	३७.२३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	--	--	--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	--	२.६०	२.६०	६.१७
७.५	इतर कारणे	--	९.७६	९.७६	२३.१६
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	८.६९	५०.८३	४२.१४	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	मुख्य धरण, बुडीत क्षेत्र व कालव्याचे भुसंपादन पुर्ण. वितरिका भुसंपादन प्रगतीपथावर आहे.			
८.२	धरण	मुख्य धरणाचे काम जुन २००६ मध्ये पुर्ण			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	मुख्य डाव्या कालव्याचे काम ९५ टक्के पुर्ण			

वाकोद मध्यम प्रकल्प
ता. फुलंब्री जि. औरंगाबाद
संक्षिप्त टिप्पणी

१.० वाकोद मध्यम प्रकल्प हा औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यात वाकोद गावाच्या वरील बाजूस नागझरी व कांबळी या दोन नद्यांवर आहे. या दोन नद्या पूर्णा नदीच्या उपनद्या असून प्रकल्प गोदावरी खो-यात येतो. वाकोद मध्यम प्रकल्पाच्या धरणाच्या कामास सन १९९५ पासून सुरुवात होऊन धरणाचे बांधकाम सन २००६ मध्ये पूर्ण झाले. यामुळे प्रकल्पामध्ये १२.६५ दलघमी पाणीसाठा निर्मिती झाली आहे. प्रकल्पाच्या डाव्या तिरावरुन १२ कि.मी लांबीचा कालवा असून लाभक्षेत्र २२१७ हेक्टर आहे

सद्य:स्थितीत प्रकल्पाचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रु ८०.५६ कोटीमंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

या कारणामुळे झालेली वाढ निरंक आहे

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

या प्रकल्पाचे स्थळ हे भूकंप प्रभावीत क्षेत्रात येत असल्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी त्यांचे पत्र दिनांक २८-१०-१९९४ अन्वये प्रकल्पाचा काटछेद संकल्पीत करुन दिला. या काटछेदानुसार काम करण्यात आले असून संकल्पचित्रामुळे रु. २.६० कोटी वाढ झाली आहे.

४.० इतर कारणे

अपुरी वित्तीय तरतूद, स्वामीत्व शुल्क दरातील वाढ, भाग-१ कामासाठी तरतूद व ई.टी.पी. च्या तरतूदीतील वाढ यामुळे रु. ९.७६ कोटी वाढ झाली आहे.

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतीक)

मुख्य धरण : प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम सन १९९५ मध्ये सुरु करण्यात येऊन सन २००६ मध्ये कंदरभरणीसह पूर्ण करण्यात आले. यामुळे धरणात प्रकल्पीय पाणीसाठा १२.६५ दलघमी निर्मित करण्यात आला आहे.

पुनर्वसन : प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एक गाव पूर्णत: व दोन गावे अंशत: येत असल्यामुळे त्यांचे तीन ठिकाणी (विरमगांव, लेहावाडी व महाराणाप्रताप नगर) नवीन गावठाणात पुनर्वसन करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पबाधीत ग्रामस्थ नवीन गावठाणात स्थलांतरीत झालेले असून नवीन गावठाणातील नागरी सुविधांची कामे ९५टक्के पूर्ण करण्यात आलेली आहेत.

भूसंपादन : प्रकल्पाच्या धरण, बुडीत क्षेत्र व कालव्यासाठी संपादीत जमीनीचा मावेजा शेतक-यांना वाटप करण्यात आलेला आहे. वितरीकांसाठी संपादीत जमिनीची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

कालवा :- प्रकल्पाच्या डाव्या तिरावरुन १२ कि.मी लांबीचा कालवा असून सद्य:स्थितीत कालव्याचे खोदकाम व भरावकाम पूर्ण झालेले आहे. कालव्यावरील एक बांधकाम वगळता उर्वरित बांधकामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

वितरण प्रणाली : वितरण प्रणाली अंतर्गत एकंदरीत १४ वितरिका असून या वितरिकांची कामे जवळपास ८०टक्के पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. प्रकल्पाच्या भाग-१ च्या कामांची अंदाजपत्रके मंजूर असून कामे अद्याप सुरु व्हावयाची आहेत.

६.० विशेष लाभ :-

हा प्रकल्प झाल्यामुळे सात गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. प्रकल्पाच्या जलाशयामुळे, जवळपासच्या भूगर्भीय पाणीपातळीत वाढ झाल्याने विहीरीवरील सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना ता.पैठण जि. औरंगाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१८७९०			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	३२०५			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१९/०१/१९८०	१९७८-७९	१.२५	३२०५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१९/०१/१९९४	१९९०-९१	८.५५	३२०५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१४/१०/२००५	२००४-०५	१३.५६	३२०५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	१७/०७/२००९	२००८-०९	२२२.२४	,५५८५+३२०५ =१८७९०
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	-- निरंक --			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यन्त २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		१०.५५ ३.०१ ६१.७३	
		एकुण		७५.२९	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३.१०			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	६२.६८			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	९.५१			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	७५.२९			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८१-८२			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९८१-८२ (किंमत रुपये १.२५ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१.०५	२.२०	१.१५	०.५२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.२०	३.३०	३.१०	१.४०
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	१८१.८०	१८१.८०	८२.२७
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	५.५९	५.५९	२.५३
७.५	इतर कारणे	०.००	२९.३५	२९.३५	१३.२८
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	१.२५	२२२.२४	२२०.९९	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भूसंपादन सरळ खरेदीने प्रस्तावीत, संयुक्त मोजणी पूर्ण.			
८.२	धरण	३४ % कामे झाली आहेत.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कालवा क्र १ व २ मिळून ३६ कि.मी.कालवा खोदकाम पूर्ण व उर्वरित कामे प्रगत. वितरण प्रणालीची कामे सर्वेक्षण स्तरावर			

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना
ता. पैठण जि. औरंगाबाद

<u>संक्षिप्त टिप्पणी</u>

१.० ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन प्रकल्पास शासन निर्णय क्र.बीएचएम/१०९७/२०७८/१९५४/डब्ल्यू आरआय/ आय दिनांक १९-०१-१९८० अन्वये रु. १.२५ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली. या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ३२०५ हे. होते. लोकप्रतिनिधी व जनतेने तसेच जायकवाडी पाणी संघर्ष समिती, पैठण यांनी वेळोवेळी निवेदन देवून लाभक्षेत्रातील उर्वरीत भागास व लाभक्षेत्राच्या बाहेरील भागास उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी देवून सिंचन निर्मीती करण्याबाबत मागणी केलेली होती. त्यानुसार जायकवाडी जलाशयाच्या मंजूर असलेल्या परंतू कार्यान्वीत न झालेल्या (बंद पडलेल्या) उपसा सिंचन योजनांचे ८५ दलघमी पाणी या योजनेसाठी वापरण्याचे प्रस्तावीत केले. सदरील योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करुन त्यास महामंडळ कार्यालयाने निर्णय क्र. गोमपाविमं/तां.३/ औपामं/ब्र.उ.सिं.यो/ सुप्रमा/ (५/२००९) दि.१७.७.२००९ अन्वये रु.२२२.२४ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार सिंचन क्षेत्र १८७९० हे. प्रस्तावित आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

योजनेच्या मूळ प्रशासकीय अंदाजपत्रकामध्ये जायकवाडी जलाशयामधून पंपगृहाचे बांधकाम करुन उध्दरण नलिका व कालव्याद्वारे ३२०५ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीचे उद्दिष्ट होते. जायकवाडी जलाशयातून वैयक्तिक व एकत्रीत उपसा सिंचन योजनेसाठी पाण्याचे आरक्षण करण्यात आलेले आहे. सदर आरक्षणामधुन जलाशयावरुन उपसा सिंचन योजनांना पाणी वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतू या योजना कार्यान्वित न झाल्याने हा पाणी वापर होत नव्हता. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना सिंचनाचा फायदा मिळत नव्हता. या पार्श्वभुमीवर जिल्हयातील लोक प्रतिनिधी, पाणी संघर्ष समिती पैठण, शेतकरी संघटना पैठण इत्यादींनी या भागाला शासनाने उपसा सिंचन योजना बांधून सिंचनाचा लाभ मिळावा म्हणून तत्कालीन आमदार श्री. संदीपान भुमरे ता. पैठण व खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे, औरंगाबाद व इतर राजकीय पदाधिकारी यांनी दि. १६/७/२००९ रोजी दिलेले पत्र जायकवाडी पाणी संघर्ष समिती व इतर गावातील शेतकरी यांनी दि. ८/४/०९ रोजी सुमारे पाचशे शेतकऱ्यासह मोर्चाव्दारे जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना दिलेले निवेदन व दि. ७/७/०९ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांना दिलेले निवेदन तसेच शेतकरी संघटना पैठण यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दि.२९/७/२००९ रोजी दिलेले निवेदन व मागणीच्या अनुषंगाने त्यावर शासन पत्र पत्र. संकीर्ण २००९/४३/०९ सिंव्य (धो) दि. २५/८/२००९ व शासन पत्र क्र. संकीर्ण २००९/१२२९/(४०६/२००९) मोप्र.२ दि. २२/२/२०१० नुसार मागविलेल्या अहवाला अन्वये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी निर्णय क्र गोमपाविमं/तां-३/औपामं/ब्रउसिंयो/सुप्रमा/ (५/००९)/ वप्र दिनांक १७-७-२००९ अन्वये योजनेच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेमुळे मूळ योजनेची व्याप्ती खालीलप्रमाणे वाढविण्यात आली.

१) मूळ योजनेच्या वितरण कुंडाजवळ पंपगृह बांधून भाग-१ योजनेअंतर्गत टप्पा-२ मधील उध्दरण नलिका व कालव्याद्वारे अतिरीक्त १००० हेक्टर सिंचन निर्मिती प्रस्तावित आहे.

२) भाग-२ : टप्पा-१ व २ जायकवाडी जलाशयामध्ये नवीन पंपगृह बांधून वेगवेगळया उध्दरण नलिकेच्या कालवा क्र १ (३७.०० किमी) व कालवा क्र २ -(३१ किमी)लांबी द्वारे १४५८५ हेक्टर अतिरीक्त सिंचन क्षेत्र निर्मिती करणे प्रस्तावित आहे. यामुळे योजनेची मूळ निर्मित सिंचन क्षमता ३२०५ हेक्टर व नव्याने अतिरीक्त प्रस्तावित १५५८५ हे. सिंचन क्षमता असे एकूण १८७९० हे.निर्मिती करण्यात येणार आहे.

वरील कारणामुळे व व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ रु. १८१.८० कोटी इतकी आहे.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

मुळ उपसा सिंचन योजनामधील पंपगृह , उध्दरण नलीका यांचे संकल्पनातील बदलामुळे झालेली वाढ रु. ५.५९ कोटी एवढी आहे.

४.० इतर कारणे :

इ.टी. पी. खर्चात झालेली वाढ रु. **२९.३५** कोटी आहे.

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती :-

ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या भाग-१ टप्पा-१ ही योजना पुर्ण झाली असून ३२०५ हे. सिंचन निर्मिती झाली आहे तसेच टप्पा-२ मध्ये आता अस्तित्वात असलेल्या वितरण कुंडामधुन पंपाव्दारे पाणी उचलुन कालव्याव्दारे १००० हे क्षेत्र निर्मीतीचे उदिष्ट आहे. तसेच योजनेच्या भाग-२ टप्पा-२ अंतर्गत पंपगृहाची उभारणी करून १२०० मी.मी.व्यासाची ६.०० कि.मी. व १५०० मी.मी. ९.०० कि.मी. उध्दरण नलीकेद्वारे ३७.०० कि.मी.व ३१.०० कि.मी. लांबीच्या कालव्याद्वारे १४५८५ हे. सिंचन क्षेत्र निर्मीतीचे उद्दिष्ट आहे या योजनेच्या कामाची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

पंपगृहाचे स्थापत्य काम जवळपास पूर्ण झालेले असून विद्यूत व यांत्रिकी विभागाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच दोन्ही उध्दरण नलीकेचे काम जवळपास ६० टक्के काम पूर्ण झालेले आहे.तसेच दोन्ही कालव्याचे अंदाजे ३६.०० किमी.चे खोदकाम पूर्ण झालेले आहे.उर्वरीत ३२.०० कि.मी.चे काम प्रगतीपथावर आहे.

६.० विशेष लाभ :-

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना मुळे उपलब्ध होणा-या पाण्यामुळे येथील पारंपारीक पिकाचा प्रकार बदलून शेतकऱ्यांना नगदी पिके घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. पीक पध्दतीतील बदलामुळे एकंदरीत शेतक-यांच्या उत्पन्नात होणा-या वाढीमुळे शेतक-यांची आर्थिक परिस्थितीत सुधारणा होणार आहे . तसेच कालव्यामुळे परिसरातील भूजल पातळीमध्ये वाढ होऊन ६४ गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटण्यास मदत होणार आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प ता.वडवणी, जि.बीड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	२८००			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	१५०			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१५/१०/१९९८	१९९७-९८	२४.५१	३५००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१४/०९/२००८	२००५-०६	८०.१०	२८००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२१/०३/२०११	२००९-१०	१८७.०२	२८००
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	केंद्रीय जल आयोग TAC मान्यता दि.२३/०९/२०११, किंमत रु.१५४.९१ कोटी.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यंत .. १) १९९५-९६ ते १९९९-२००० .. २) २०००-२००१ ते २०११-१२ ..		निरंक ०.१३१ १२०.४५१	
		एकुण		१२०.५८२	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	६.८३५			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१०१.०४४			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१२.७०३			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१२०.५८२			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९९-२०००			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन २००६ (दिनांक २०/११/२००६) (किंमत रु.८०.१० कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) =(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१५.२३	४९.७१	३४.४८	२१.२२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	२.५४	२०.६७	१८.१३	११.१६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	६१.८७	६१.८७	३८.०७
७.५	इतर कारणे	६.७४	५४.७७	४८.०३	२९.५५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	२४.५१	१८७.०२	१६२.५१	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	सरळ खरेदीस मान्यता, पुनर्वसनाची जागा निश्चित व अंदाजपत्रके प्रगतीपथावर, वनजमीन नाही.			
८.२	धरण	९०% काम पूर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	५ कि.मी. चे ९०% काम पूर्ण, ५ ते १५ कि.मी. निविदा मंजूरी स्तरावर.			

उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प ता.वडवणी, जि.बीड
संक्षिप्त टिप्पणी

१.० उर्ध्व कुंडलीका मध्यम प्रकल्प ता.वडवणी जि.बीड या प्रकल्पास शासन निर्णय क्रं. लपात युकेडी/१०९८/११८६/(२५३/९८) जसंअ दिनांक १५/१०/१९९८ अन्वये दरसुची १९९७-९८ वर आधारीत रुपये २४.५०८ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. योजनेच्या कामास दिनांक २०/११/२००६ ला प्रत्यक्षात सुरुवात करण्यांत आली.

२.० प्रशासकीय मान्यता प्राप्त धरणस्थळा ऐवजी दामोदरवाडी येथे धरण व्हावे अशी मागणी श्री. बाळासाहेब आंधळे यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचीका क्रं. ४१३८/९८ अन्वये केली होती. या याचिकेच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे वाल्मी औरंगाबाद या संस्थेची समिती म्हणुन नेमण्रुक केली होती व वाल्मी औरंगाबाद या संस्थेने अधिक्षक अभियंता, पाटबंधारे अन्वेषण मंडळ, पुणे यांचे मार्फत प्रकल्पाचे पुर्नसर्वेक्षण व अन्वेषण करुन घेतले. त्यानुसार त्या समितीने दिलेल्या अहवालानुसार प्रकल्पस्थळ सोन्नाखोटा येथेच (प्र.मा.प्राप्त संरेखावरच) योग्य असल्याबाबत प्रतिपादन केले. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १६/१२/२००२ अन्वये उर्ध्व कुंडलीका प्रकल्प हा ३५०० हे. लाभक्षेत्रासाठी व २०.६६ दलघमी. पाणी साठया ऐवजी १८.७७ दलघमी पाणीसाठा करण्यास लाभदायी आहे असा पुर्नसर्वेक्षणा आधारे निर्णय दिला या आधारे येणाऱ्या लाभक्षेत्र व पाणी वापरावर प्रकल्पासाठी पुन:आखणी करण्यात यावी (redrafted) असे आदेश दिले. त्यानंतर या निर्णयानुसार प्रकल्पाचे संरेखा मंजुरीचा प्रस्ताव मध्यवर्ती संकल्पचित्रा संघटना, नाशिक यांना सादर केला. मध्यवर्ती संकल्पचित्रा संघटना, नाशिक यांनी शिफारस केल्यानुसार प्रकल्पाचे संरेखेस मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्रा दिनांक २१/०२/२००५ अन्वये प्रकल्पाच्या पाणी वापरातील बचत करुन लाभक्षेत्रातील बदलासह संरेखेस मंजूरी दिली.

नाशीक यांना सादर केला मध्यवती संकल्पचित्र संघटना नाशीक यांनी शिफारस केल्यानुसार प्रकल्पाचे संरेखेसमुख्य अभियंता (जसं)´जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्रदिनांक २१/२/२००५ अन्वये प्रकल्पाच्या पाणी वापरातील बचत करुन रु.३५.९९ रु कोटी बदलासह संरेखेस मंजुरी दिली.-२-३.०५ उर्ध्वाकुंडलीका प्रकल्पाची मुख्य धरणाची सन २००३-०४ च्या दरसुचीवर आधारीत रु.३५.९९ कोटी रुपयाची ब-१ निविदा मागविण्यात आसुधारीत धरणाची निविदा १६.८५ टक्के अधिक्यासह. रु.४२.०६१ कोटीला मंजूर आहे. या मंजूर निविदेवर आधारीत रु.८०.१०७ कोटीच्या प्रथम सुधारीत अंदाजपत्रकास महामंडळ निर्णय क्रमांक गोमपाविमं/तां-४/ उर्ध्व कुंडलीकाम.प्र./ सुप्रमा/ १दिनांक १४/९/२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. अंदाजपत्रकात चालू निविदा अंतर्गत कामासाठी/ निश्चित केलेल्या निवीदेतील दर वापरण्यात आलेले असून, उर्वरीत कामासाठी दरसुची सन प्रथम नुसार दर घेण्यात आले होते. प्रथम सु.प्र.मा. नुसार सिंचन क्षमता २८०० हे.असून एकूण साठवण क्षमता १८.७७ द.ल.घ.मी. आहे. प्रथम सु.प्र.मा. मध्ये मुळ प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत एकुण किंमतीत.रु. ५५.६० कोटीची वाढ झाली. यामध्ये दरसुचीतील वाढ रु.४.२६ कोटी (दरसुची ९७-९८ ते दरसुची५२००५-०६), उच्च दराच्या निविदामुळे रु.१.६४ कोटी, भुसंपादन व पुनर्वसन रु.५.०५ कोटी, संकल्पचित्रातील बदल रु.२५.९८ कोटी (मं.स.सं. नाशीक यांनी मध्यवर्ती सांडवा . द्वाररहित सांडव्या ऐवजी वक्राकार द्वारासह व दगडी बांधकामा ऐवजी संधानका मध्ये प्रस्तावित केल्यामुळे वाढ झाली), इतर कारणे रु.१८.६७ कोटी (धरणाच्या एकुण किंमतीत वाढ झाल्यामुळे त्या किंमतीवर आधारित इतर उपशिर्षाच्या किंमती टक्केजललीवर आधारित असल्यामुळे त्यांच्या किंमतीत वाढ झाली आहे.)

उर्ध्व कुंडलीका मध्यम प्रकल्प ता.वडवणी जि.बीड या योजनेस केंद्रीय जल आयोग नवी दिल्लीच्या ९४ व्या नवी–दिल्ली येथे दिनांक ९/७/२००८ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरी प्रदान करण्यांत आली. नियोजन आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक ९/९/२००८ च्या पत्रान्वये उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पाच्या कामासाठी वर्ष २००५-२००६ च्या दरसूचीवर आधारीत रु.७२.७० कोटी किंमतीच्या गुंतवणुकीसाठी मान्यता देण्यात आली. उर्ध्व कुंडलीका मध्यम. प्रकल्प ता.वडवणी जि.बीड या योजनेचा केंद्र शासनाच्या अे.आय.बी.पी. सन २००८-०९ मध्ये समावेश करण्ची. आलेला आहे. संनियंत्रण संकोटीलय, केंद्रिय जल आयोग,९ भारत सरकार, यांचे दिनांक २/२/२००८ च्या पत्राप्रमाणे दिनांक, १/४/२००८ ची उर्वरीत किंमत रहे.

सिंचननक्षमता।३/२०११ केंद्र शासनाने अे.आय.बी.पी. अंतर्गत मंजूरी प्रदान केलेली आहे. या मंजूरीप्रमाणे योजनेची संपूर्ण २८००. हे. सिंचन क्षमता ३/२०११ पर्यंत पूर्ण करावयाची होती.

४.० प्रकल्पाचे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण पूर्ण झालेले नसल्याने ढोबळ मानाने लाभक्षेत्राच्या प्रति हेक्टरी किंमत धरुन कालवा व वितरण प्रणाली यांच्यासाठी तरतूदी ठेवण्यांत आल्या होत्या. कालव्याचे व वितरण प्रणालीचे २८०० हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी सविस्तर सर्वेक्षण पूर्ण करुन कालवा व वितरण प्रणालीसाठी मंजुर तांत्रीक अंदाजपत्रकानुसार प्रकल्पाचे किंमतीत वाढ होणार असल्याचे निदर्शनास आले. तसेच क्षेत्रीय परिस्थितीनुसार मुख्य धरणाच्या कामात मध्यवती संकल्पचित्र संघटना नाशीक यांनी सविस्तर संकल्पनामध्ये सुचविल्याप्रमाणे नवीन बाबींचा अंतर्भाव करावा लागला. प्रकल्पाचे धरणपिठ व खदानीचे भूसंपादन प्रस्तावाचा रु. ३.१८ कोटी किंमतीचा निवाडा मंजूर होवून त्याप्रमाणे मावेजा वाटप करण्यांत आला त्यामुळे भूसंपादनाच्या किंमतीत वाढ झाली. उर्वरीत भूसंपादनासाठी या मंजूर निवाड्याप्रमाणे निश्चितपणे वाढ होणार होती. मूळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार भुसंपादनासाठी सरासरी प्रति हेक्टरी दर रु.१७५२५/- इतका गृहीत धरण्यात आला होता व आता सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये हा दर सरासरी प्रति हेक्टरी रु.२,३४,९७८/- इतका आहे. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील रुई (पिंपळा) गांवाचे. पुनर्वसन करावयाचे आहे. मुळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकाचे वेळी शासन निर्णयानुसार पुनर्वसीत गावठाणासाठी १३ नागरी सुविधा देय होत्या. त्यानुसार शाळा, चावडी, विहीर व अंतर्गत रस्ते ई. नागरी सुविधांसाठी ढोबळ मानाने रु ०.०३५ कोटी इतकी तरतुद ठेवण्यात आली होती. तथापि सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात शासनाच्या सुधारीत निर्णयानुसार १८ नागरी सुविधा देय असुन त्या अनुषंगाने रु.२.५० कोटी इतकी तरतुद ठेवण्यात आली आहे. या गावातील जून्या घरांचे मूल्यांकनाना मान्यता प्रदान करण्यांत आलेली असल्याने, त्याप्रमाणे निवाडा मंजूर करण्यांत आला. मंजूर निवाड्याची किंमत रु.३.२५ कोटी इतकी वाटप करण्यांत आलेली आहे. यामुळेही प्रकल्पाचे. खर्चात वाढ झाली आहे. मुख्य धरणाचे कामात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक, वरिष्ठ अधिकारी व क्षेत्रिय परिस्थितीनूसार कांही तांत्रिक बदल अपरिहार्य ठरले. Iत्यामूळे प्रकल्पाचे खर्चात वाढ झाली. प्रकल्पाचे खर्चात होणारी वाढ लक्षात घेवून व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्यांत आला. व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रं. सुधारित प्र.मा-२०१० /५१४/(१९२/१०)म.प्र. दिनांक २१/०३/२०११ अन्वये रु .१८७.०२ कोटीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

द्वितीय सुप्रमा मध्ये प्रथम सुप्रमाच्या तुलनेत एकुण किंमतीत रु. १०६.९१ कोटीची वाढ झाली. यामध्ये दरसुचीतील वाढ रु.३०.२२ कोटी (दरसुची २००४-०५ते दरसुची २००९-१०), उच्च दराच्या निविदामुळे रु.२.९३ कोटी, भुसंपादन व पुनर्वसन रु.कालवा कोटी, संकल्पचित्रातील बदल रु.३५.८९ कोटी अशी प्रमुख कारणे होती. तांत्रिक व संकल्पचित्रातील बदलामध्ये पहोती. कालवा वितरण प्रणालीसाठी प्रथम सु.प्र.मा. मध्ये ढोबळ मानाने लाभक्षेत्राच्या प्रति हेक्टर नूसार तरतूद ठेवली होती. व्दितीय सु.प्र.मा. मध्ये प्रणालीसाठी मंजुर तांत्रीक अंदाजपत्रकानुसार तरतूदी ठेवण्यांत आल्या या बाबीचा तसेच डाव्या कालव्यावरील बोगद्याचे सविस्तर संकल्पनामुळे झालेल्या वाढीचा समावेश होता. मुळ प्रशासकिय मान्यता प्रस्ताव व प्रथम सुधारीत प्रशासकियांमान्यता प्रस्तावात डाव्या कालव्यावरील बोगद्याचे कामासाठी सविस्तर सर्वेक्षण न करता ढोबळ मानाने तरतुदी ठेवण्यात आल्या होत्या. सन २००८ मध्ये बोगद्याचे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक करण्यात आले. या अंदाजपत्रकात लॉगिंगग. करमरकर, भुगर्भ तज्ञ यांनी दिनांक २०/१/२००८ व २१/१/२००८ रोजी संरेखेवर घेण्यांत आलेल्या विंधन छिद्रांचे जिऑलॉजीकल लॉगिंग केल्यानुसार व अहवालात नमूद केल्यानुसार बोगद्याचे पूर्ण खोदकामानंतर बोगद्यातील खडक पाहून कायम आधाराबाबत निर्णय घेणे अपेक्षित असल्याने बोगद्याचे लांबीचे अंदाजे १० टक्के लांबी करीता म्हणजेच १४० मी. लांबीत कायम आधारासह अस्तरीकरणाची तरतूद ठेवण्यांत आली होती. बोगद्याचे खोदकाम मार्च-२००९ मध्ये सुरु करण्यात आले. बोगद्यातील खडक हा आडव्या, उभ्या व तिरप्या जवळ भेगा असलेला तसेच, मांजरा स्वरुपाचा असल्याने सतत दगड कोसळण्याचे प्रकार निदर्शनास आले. जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त भुगर्भशास्त्रज्ञ डॉ. टी.बी. तांदळे यस्वरुपी.आधार/२००९ रोजी बोगद्यातील भुस्तराची पाहणी केली व भविष्यात बोगदा ढासळण्याची शक्यता लक्षात घेता पूर्ण लांबीत कायम स्वरुपी आधार आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी डॉ.बी.एम.करमरकर भुगर्भ शास्त्रज्ञ याचे समवेत दि.६/११/२००९

रोजी क्षेत्रिय पहाणी केली. संयुक्त पाहणी करताना त्यांनी त्यांचे अभ्यासानुसार अपघात टाळणे, बोगदा ढासळणे टाळण्यासाठी व भविष्यातील देखभाल व दुरुस्ती सुकर व्हावी या करीता बोगद्याचे पूर्ण लांबीत ०.६०मी. अंतरावर कायम स्वरुपी आधार लाईनिंगसहआवश्यक असल्याचे सूचीत करुन तशी निरिक्षण टिप्पणी निर्गमित केली. व्दितीय सु.प्र. मान्यतेचे अंदाजपत्रकात या बाबीसाठी तरतूद ठेवण्यात आल्याने बोगदा कामाच्या किंमतीत वाढ झालेली आहे. व्दितीय सु.प्र.मान्यतेचे अंदाजपत्रकात बोगद्याचे कामाकरीता रु.२६.१६ कोटी इतकी तरतूद ठेवण्यात आली आहे. प्रथम सु.प्र.मा. च्या तुलनेत या कामात झालेली वाढ रु २४.७९ कोटी इतकी झाली. संकल्पचित्रातील बदलात क्षेत्रीय परिस्थीतीनुसार मुख्य धरणाच्या कामात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी सविस्तर संकलनामध्ये सुचविल्याप्रमाणे नवीन बाबीचा अंतर्भाव करावा लागला या कारणांचाही समावेश आहे. इतर कारणे या सदराखाली रु.२४.७९ कोटी इतकी वाढ असून, यात धरणाच्या एकुण किंमतीत वाढ झाल्यामुळे त्यावर आधारित इतर उपशिर्षाच्या किंमती टक्केवारीवर आधारित असल्यामुळे त्याच्या किंमतीत वाढ झाली आहे या कारणाचा समावेश होतो.

वरील किंमतीवर आधारित केंद्रिय जल आयोगासाठी सुधारित टी.ए.सी. मान्यता रु. १५४.९१ कोटीचा आली आहे. ५.०.करण्यात आला व त्यास टी.ए.सी. च्या ११२ व्या बैठकीत पत्र दिनांक २३/९/२०११अन्वये मंजुरी प्रदान/करण्यांत आली आहे.

५.० दिनांक २८/०२/२०११ रोजी प्रकल्पग्रस्तांनी भुसंपादनाचा दर बाजार भावाप्रमाणे मिळावा व इतर विविध मागण्यासाठी प्रकल्पाचे काम बंद`पाडले होते. त्यांच्या मागण्या बाबत विविध स्तरावरविचार होउन समेट घडवुन आणला व प्रकल्पाचे काम दिनांक १८/११/२०११ पासुन (९ महिन्यानंतर) पुर्ववत सुरु करण्यात आले. प्रकल्पामुळे एकूण ३३४ हेक्टर क्षेत्र बाधित४ /बुडीत होते यापैकी धरणपिठ व खदाणीसाठी आवश्यक असलेल्या १६३.६३ हेक्टर जमिनीचा निवाडा फेब्रुवारी २००८ मध्ये घोषित करण्यात येवून मावेजा वाटप करण्यात आला आहे. उर्वरीत क्षेत्राचे भूसंपादनासाठी कलम ४ ची अधिसूचना दि.२६/११/२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. शेतकऱ्यांनी या उर्वरीत जमिनीचे भूसंपादनाचा मोबदला बाजारभावाने मिळण्यासाठी प्रकल्पाचे काम बंद पाडले होते. प्रकल्पाचे काम पूर्ववत सुरु करण्यासाठी अधीक्षक अभियंता,बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ यांनी दि.४/३/२०११ रोजी जिल्हाधिकारी,बीड व जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांचेशी चर्चा केली. मा.राज्यमंत्री, महसूल व पुनर्वसन यांनी दि.१८/४/२०११ व २/५/२०११ रोजी बैठका घेतल्या. दि.२/५/२०११ च्या बैठकीत जमिनीचा मावेजा एकरकमी खाजगी वाटाघाटीने देण्या करीता दर निश्चित करण्यासाठी शासकीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीत प्रकल्पग्रस्त गावांचे प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला होता. या समितीची दि.३/५/२०११, २१/५/२०११ व ३०/५/२०११ रोजी बैठकां संपन्न झाल्या. दि.३१/५/२०११ रोजी अंतिम बैठक झाली. या बैठकीत खाजगी वाटाघाटीने देता येणे शक्य असलेला रु.३.५५ लक्ष प्रति हेक्टर दर अधीक ३० % दिलासा व १२ % अतिरिक्त घटक म्हणून येणारा दर शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येईल असे ठरविण्यात आले. मा.गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि.१३/७/२०११ रोजी संबंधीत अधिकाऱ्यांची प्रकल्पाचे काम पूर्ववत सुरु करण्यासाठी बैठक घेतली होती. या बैठकीत विधानसभेचे चालू अधिवेशनानंतर पोलीस संरक्षणात काम सुरु करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. दि.१७/१०/२०११ रोजी मा.राज्यमंत्री, महसूल व पुनर्वसन यांनी प्रकल्पग्रस्त शेतकरी व अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत प्रकल्पासाठीचे उर्वरीत भूसंपादन खाजगी वाटाघाटीने करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. या बैठकीतील निर्णयानुसार खाजगी वाटाघाटीचे भूसंपादनाचे दर महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि.२३/२/२०१२ रोजीच्या अठ्ठेचाळीसाव्या बैठकीत मंजूर करण्यात आला. त्यानुसार हा दर जिरायत जमिनीसाठी रु.६.०१ लक्ष प्रतिहेक्टर इतका निश्चित करण्यात आलेला आहे. प्रकल्पाचे काम दि.१९/१०/२०११ पासून पूर्ववत सुरु झाले. खाजगी वाटाघाटीने भूसंपादन प्रस्तावित करण्यात आल्याने भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत बुडीत क्षेत्रासाठीचे भूसंपादनासाठी सुरु करण्यात आलेली भूसंपादन प्रक्रिया कलम ४८ अन्वये रद्द करण्या बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे.

६.० प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रामध्ये रुई (पिंपळा) हे गाव बुडीत होते. या गावाचे नवीन गावठाणात पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. या गावातील प्रकल्पग्रस्तांची संख्या १२०० असून त्यासाठी रु.२.५० कोटीची तरतूद व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकात ठेवण्यात आलेली आहे. नवीन पुनर्वसीत गावठाणासाठी जागा निश्चित करण्याकरीता ग्रामपंचायत रुई(पिंपळा) यांनी दि.२५/४/२००७ ला ठराव केला. ग्रामपंचायतीने त्यांचे दि.१८/८/२००७ चे ठरावान्वये पुनर्वसनासाठी रुई व सोन्नाखोटा येथील जागा प्रस्तावित केली. त्यावर तत्कालीन आमदार ॲड सौ.उषाताई दराडे यांनी दि.१४/१२/२००६ रोजी ग्रामपंचायत रुई (पिंपळा)

यांनी प्रस्तावित केलेल्या ठिकाणी पुनर्वसन करु नये अशी मागणी मा.मंत्री, जलसंपदा यांचेकडे केली. दि.१२/९/२००८ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली बैठक होऊन ग्रामपंचायत रुई (पिंपळा) यांनी प्रस्तावित केलेल्या ठिकाणी नवीन पुनर्वसनासाठीची जागा निश्चित केली. या जागेच्या (१८.२० हेक्टर) कलम ४ ची अधिसुचना दि.१३/११/२००८ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली. दि.३०/१२/२००८ रोजी शेतकऱ्यांनी संयुक्त मोजणीस विरोध केला. त्या गावठाणाच्या कलम ४ प्रसिध्द झालेल्या जागेच्या विरोधात संबंधीत शेतकऱ्यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे १७८६/२००९ व ५३०४/२०१० अन्वये याचिका दाखल केल्या. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे ही भूसंपादन प्रक्रिया व्यपगत झाली. पुनर्वसनासाठी एकूण ३ पर्याय तयार करण्यात आले होते. यापैकी उपरोक्त प्रमाणे रुई व सोन्नाखोटा शिवारातील जागेची भूसंपादन प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाने रद्द केली. यापैकी पर्याय क्र.३ प्रमाणे रुई (पिंपळा) गावाच्या पुनर्वसनासाठी सोन्नाखोटा शिवारातील गट क्र.१६१ मारुती मंदिर, सरकारी जमीन व १६२ खाजगी जमीन घेण्याची जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्रा क्र.२०११/पुनर्वसन/कावी, दि.२०/६/२०११ अन्वये आदेशित केले. या जमिनीत पुनर्वसन करण्याबाबत रुई(पिंपळा) गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला. आणि रुई (पिंपळा) गावाचे पुनर्वसन सोन्नाखोटा शिवारात न करता रुई(पिंपळा) शिवारातच करावे अशी मागणी केली. रुई(पिंपळा) गावाची लोकसंख्या १२०० असून, घरांची एकूण संख्या ३११ आहे. महामंडळाचे दि.२३/२/२०१२ रोजीचे नियामक मंडळाचे बैठकीत मान्य करण्यात आल्या प्रमाणे स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या कुटूंबांना रु.१ लक्ष प्रतिकुटूंब देण्याची योजना मंजूर करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत २४१ कुटूंबांपैकी आता पर्यंत १७५ कुटूंबांनी रु.१ लक्ष स्वेच्छा पुनर्वसन स्विकारलेले आहे. १६२ कुटूंबांनी स्थलांतर केल्याचे ग्रामपंचायत रुई(पिंपळा) यांनी कळविले आहे.

दि.२१/५/२०१२ रोजी प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसनाच्या मागण्याबाबत प्रकल्पाचे काम ५-६ दिवसाकरीता पुन्हा बंद पाडले होते. रुई (पिंपळा) गावातील ग्रामस्तांच्या मागणीनुसार रुई (पिंपळा) शिवारातील संमती प्राप्त खाजगी जमीन १.१५ हेक्टर व गायराण जमीन ५ हेक्टर अशी एकूण ६.१५ हेक्टर जमीन गावठाणासाठी जिल्हाधिकारी,बीड यांनी त्यांचे दि.२८/६/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निश्चित केली. या जागेवर पुनर्वसनासाठी आवश्यक आराखडा नगररचनाकार,बीड यांनी दि.२९/८/२०१२ चे पत्रान्वये सादर केला. त्यास जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.९/१०/२०१२ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. या पुनर्वसन आराखडयानुसार नागरी सुविधांचे अंदाजपत्रके तयार करुन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या वारंवार होणाऱ्या विरोधामूळे प्रकल्पाचे काम विहित वेळेत व अंदाजपत्रकीय किंमतीत होण्यात अडचणी येत आहेत.

७.० प्रकल्पाचे उर्वरीत कामासाठी भूसंपादन खाजगी वाटाघाटीने करण्याचे प्रस्तावित आहे. खाजगी वाटाघाटीचा दर रु.६.०१ लक्ष प्रति हेक्टर जिरायती जमिनी करीता निश्चित करण्यात आलेला आहे. हा दर हंगामी बागायती जमिनीसाठी दिड पट व बागायती जमिनीसाठी दुप्पट इतका मंजूर आहे. या दराने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण केल्यास प्रकल्पाचे भूसंपादन शिर्षांतर्गतचे तरतूदीत मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. स्वेच्छा पूनर्वसन योजने अंतर्गत करण्यात आलेले रु.१.७५ कोटीचे वाटप व नवीन पुनर्वसीत गावठाणातील नागरी सुविधा इ.मूळे प्रकल्पाचे किंमतीत वाढ होणार आहे. धरणाचे काम अंतर्गत डेक ब्रीज/पायलॉन चे कामामूळे, कालव्याचे बांधकामाचे संकल्पचित्रातील क्षेत्रिय परिस्थितीनुरुप होणाऱ्या बदलामूळे वाढ होणार आहे. बोगद्याचे खोदकामातील मऊ खडकामूळे झालेली जास्तीची खोदाई संधानकात भरणे तांत्रिक आवश्यकतेनुसार गरजेचे असल्याने तसेच बोगद्या जवळील अतिखोदाईचे संरक्षणार्थ प्रस्तावित संरक्षक काम इ.बोगद्याचे कामांना मंजूरी प्राप्त असल्याने प्रकल्पाचे एकूण किंमतीत वाढ होणार आहे.

८.० प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे मातीकाम जवळपास १०० %, संधानक काम ७५ % पूर्ण झाले असून कालव्याचे १ ते ५ कि.मी. मधील मातीकाम जवळपास पूर्ण झाले असून बांधकामे प्रगतीपथावर आहेत. प्रकल्पाची सर्व कामे जून २०१३ पर्यंत पूर्ण करुन २८०० हेक्टर सिंचन निर्मिती प्रस्तावित आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	रेणापुर मध्यम प्रकल्प ता.रेणापुर, जि.लातूर			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	२४४५ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	२४४५ हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६/१०/१९९२	१९९१-९२	१२.७०	४४००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२६/११/१९९९	१९९६-९७	४९.६२	४४००
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२७/०८/२००७	२००५-०६	७२.१९	२८०४
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	१५/१२/२००८	२००७-०८	८९.३५	२४४५
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	आवश्यकता नाही.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९७५-७६ ते १९९४-९५ १) १९९५-९६ ते १९९९-२००० २) २०००-२००१ ते २०११-१२		१.४६ ३७.२९ २९.०८	
		एकुण		६७.८३	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	२२.२५			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	४५.५८			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	०.००			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	६७.८३			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९२-९३			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन १९९२ (किंमत रुपये १२.७० कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	७.२५	२१.७१	१४.४६	१८.८७
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	२.९६	२७.३६	२४.४०	३१.८३
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	१३.७८	१३.७८	१७.९८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१८.६८	१८.६८	२४.३७
७.५	इतर कारणे	२.४९	७.८२	५.३३	६.९५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	१२.७०	८९.३५	७६.६५	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भुसंपादन १०० टक्के पुर्ण, कलम १८-२८ ची न्यायालयीन प्रकरणे प्रलंबितआहेत.			
८.२	धरण	घळभरणी २००० मध्ये पुर्ण, २१.६८ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मित, वक्रद्वार उभारणी पुर्ण, स्टॉप लॉग गेट बाकी.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	उजवा कालवा ९.२० कि.मी. पैकी कि.मी. ७.०० मधील २६० मी. लांबीचे काम बाकी आहे. सर्व विमोचके बाकी आहेत. डावा कालवा ११.१० कि.मी. पुर्ण.			

रेणापुर मध्यम प्रकल्प ता रेणापुर जि. लातूर
संक्षिप्त टिप्पणी

१.० रेणापुर मध्यम प्रकल्प लातुर जिल्ह्यातील रेणापुर तालुक्यात भंडारवाडी येथे रेणा नदीवर बांधण्यात आले आहे. रेणापुर धरणाचे कामास सन १९९२ साली सुरुवात होऊन धरणाची घळभरणी सन २००० मध्ये पुर्ण झाली आहे. रेणापुर डाव्या कालव्याची लांबी ११.१० कि.मी. व उजव्या कालव्याची लांबी ९.२० कि.मी.असून एकुण लाभक्षेत्र २४४५ हेक्टर आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

माती धरणाचा काटछेद व दगडी धरणाचा काटछेद भुकंप प्रवण क्षेत्र म्हणून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी संकल्पीत करुन दिले. तसेच पिकाच्या पाण्याची गरज सुधारीत पेनमन पध्दतीने घेवून सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावाप्रमाणे प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ४४०० हेक्टर होते तथापी सुप्रमा देतेवेळी खालील बाबीवर अभ्यास करुन सिंचन क्षेत्र निश्चीत करावे असे आदेशीत होते.

१) रेणापुर प्रकल्पाचा भाग सपाट असल्यामुळे प्रकल्पाखाली साखळी को.प.बंधारे बांधून सिंचन क्षेत्र निर्माण करावे.

२) प्रकल्पाच्या पिकाच्या पाण्याची गरज सुधारीत पेनमन पध्दतीने काढण्यात यावी

दरम्यान पिण्याच्या पाण्याचे आरक्षण विचारात घेवून डावा कालवा ११.३२ कि.मी. च्या पुढे कपात करणे प्रस्तावीत करण्यात आले त्यास व पिक रचना बदलास शासन पत्र दिनांक २७/०२/२००३ अन्वये मान्यता देण्यात आली त्यामध्ये सुधारीत २४४५ हे. सिंचन क्षेत्रास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामध्ये ९८२ हेक्टर प्रवाही व १४६३ हे. उपसा पध्दतीने मंजुरी आहे.

रेणापुर मध्यम प्रकल्पाच्या खालील बाजूस ३ को.प.बंधारे होते व त्या बंधा-यात १५ ऑक्टोंबर नंतर गेट टाकणे अपेक्षित होते. बहुतांश वेळा १५ ऑक्टोंबर नंतर धरण भरलेले नसल्यामुळे को.प.बंधा-याच्या ठिकाणी पाणी येत नव्हते. तसेच १५ ऑक्टोंबर पुर्वी धरणाच्या खालील मुक्त पाणलोटातून पाणी वाहुन जात होते. म्हणून मा.विलासरावजी देशमुख, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी रेणापुर मध्यम प्रकल्प पावसाळयात ब-याचवेळा भरत नसल्यामुळे व धरणाच्या खालील मुक्त पाणलोटातील पाणी वाहून जात असल्यामुळे पावसाळयात को. प. बंधा-यात पाणी अडविण्याचे दृष्टीने को.प.बंधा-यास यांत्रिकी उचल पध्दतीचे लोखंडी दरवाजे रेणापुर मध्यम प्रकल्पाचा भाग म्हणुन अंदाजपत्रकात घेण्याबाबत आग्रही होते व तसे मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांनी दिनांक २१/०८/२००८ रोजी पत्र दिले होते. त्याप्रमाणे शासनाने दिनांक ३०/०८/२००८ अन्वये कार्यवाही करणे बाबत कळविले होते. त्याप्रमाणे रेणापुर मध्यम प्रकल्पाच्या तृतीय सुधारित अंदाजपत्रकात तीन को.प.बंधा-याचे यांत्रिकी उचल पध्दतीने दरवाजे बसवून नुतनीकरण करण्याचा समावेश करुन अंदाजपत्रक शासनास सादर केले होते. त्यास शासनाने शासन निर्णय दिनांक १५/१२/२००८ अन्वये रु. ८९.३५ कोटी रक्कमेस मान्यता दिलेली आहे. यामध्ये तीन को.प.बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतर करणेसाठी रु. १३.७८ कोटी रक्कमेचा समावेश आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलामुळे रु.१३.७८ कोटीची वाढ झालेली आहे.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

१. मातीकामाचा काटछेद:

मुळ अंदाजपत्रकात सर्वसाधारण काटछेद प्रस्तावित होता परंतु मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून धरणाचा पाया खोल असल्यामुळे व भुकंपप्रवण क्षेत्राप्रमाणे संकल्पन केल्यामुळे मातीकाम व रोधीचराच्या काटछेदामध्ये मोठया प्रमाणात बदल झाल्यामुळे परिमाणात वाढ झाली.

२. दगडी धरण व वक्रव्दार दरवाजे तसेच विमोचक संकल्पन :

मुळ अंदाजपत्रकात दगडी धरण, व्दारे व विमोचकासाठी सर्वसाधारण तरतुद होती. परंतु सदरील धरणाचा पाया खोल असल्यामुळे व भुकंप प्रवण क्षेत्र गृहीत धरुन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी संकल्पन केल्यामुळे माती धरणाच्या, दगडी धरणाच्या व वक्रद्वाराच्या परिमाणात वाढ झाली आहे.

३. कालवा काटछेद :

कालवा काटछेद सुधारीत पेनमन पध्दतीच्या विसर्गाप्रमाणे व कालवा संरेखा काळया मातीतील असल्यामुळे मुरुम बॅकिंगसह (Murum Backing) अस्तरीकरण प्रस्तावित केल्यामुळे, कालवा कामाच्या परिमाणात व खर्चात मुळ अंदाजपत्रकापेक्षा वाढ झालेली आहे.

अशा प्रकारे मातीधरण, दगडीधरण व कालव्याच्या सविस्तर संकल्पनामुळे रु. १८.६८ कोटी वाढ झाली आहे

४.० इतर कारणे.

सुधारित अंदाजपत्रकात सुधारीत किंमतीप्रमाणे ई.टी.पी. चार्जेस गृहीत धरण्यात आल्यामुळे २.१८ कोटी वाढ झाली आहे. तसेच इतर उपशिर्षात केलेल्या सुधारीत तरतूदीप्रमाणे रु.०.४० कोटी वाढ झालेली आहे. शेतचारीसाठी सविस्तर तरतूद ठेवल्यामुळे रु.२.७५ कोटी वाढ झालेली आहे. अशा प्रकारे एकूण इतर कारणामुळे रु. ५.३३ कोटी वाढ झालेली आहे.

५.० प्रकल्पाची सध्यस्थिती (भौतिक).

रेणापुर मध्यम प्रकल्पाचे काम सन १९९२ साली सुरु झाले. मुख्य धरणाचे काम २००० मध्ये झाले असून प्रकल्पावरील दोन्ही कालवे व वितरीकाची काही किरकोळ कामे वगळता २००० मध्ये पुर्ण करण्यात आली आहेत. डाव्या कालव्याची लांबी ११.१० कि.मी.व उजव्या कालव्याची लांबी ९.२० कि.मी. आहे. डावा कालव्याचे काम पुर्ण असुन उजव्या कालव्यावरील कि.मी. ७ मधील २६० मी. लांबीचे मातीकाम तसेच विमोचकाचे सर्व बांधकामे व काही पुलाची बांधकामे अपुर्ण आहेत. सन २००१ मध्ये २४४५ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. रेणापुर प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेसाठी जुलै २००१ मध्ये डावा कालव्याचे सिचंन क्षेत्र व पाणी साठा लाभक्षेत्र विकास यंत्रणेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाची मूळ कामे व सिंचन क्षमता निर्मिती पुर्वीच झाली असली तरी मंजुर सुप्रमा प्रमाणे रेणा नदीवरील को.प.बंधारे नुतनीकरण व बॅरेजेसची कामे हाती घेण्यात आली आहेत.

रेणापुर प्रकल्पाच्या (प्रवाही), को.प.बंधारे नुतनीकरण व ३ को.प.बंधा-याचे बॅरेजेसच्या धर्तीवर नुतनीकरण सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु.८९.३५ कोटी असून या प्रकल्पावर प्रवाही व बॅरेज घटक मिळून मार्च २०१२ अखेर रु.६७.८३ कोटी खर्च झाला असून प्रकल्पावरील उर्वरीत कामे, कालव्याची कामे व रेणा नदीवरील बॅरेजेसची कामे वर्ष २०१४ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

६.० विशेष लाभ :

या प्रकल्पावर पानगांव ७ खेडी, बीटरगांव व ५ खेडी, पटीवडगांव व ७ खेडी प्रादेशीक पाणी पुरवठा योजना तसेच रेणापूर पाणी पुरवठा योजना व पन्नगेश्वर सहकारी साखर कारखाना पाणी पुरवठा योजना अशा एकूण ५ मोठया योजना आहेत. यासाठी ४.०० दलघमी पाणी आरक्षण प्रस्तावात ठेवण्यात आले आहे. या सर्व योजनांद्वारे ६०,००० लोकसंखेस पिण्याचे पाणी पुरवठा होतो. तसेच एक साखर कारखान्यास व लाभक्षेत्रातील ऊस बागायतदारांना लाभ होतो. कारखान्याची ऊभारणी सन २००२ मध्ये झालेली आहे. प्रति वर्षी २.०० लक्ष मे.टन गाळप होऊन २.०० लक्ष पोती साखर उत्पादीत होते. तसेच प्रकल्पाच्या बाजुच्या रेणा सहकारी साखर कारखाना व अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना यानाही लाभक्षेत्रातील ऊसाचा पुरवठा होतो. अशा प्रकारे या प्रकल्पामुळे कारखान्याची वार्षीक उलाढाल रु.७५.०० कोटी असून याद्वारे शासनास कर स्वरुपात महसुलही मिळतो.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	संगमेश्वर मध्यम प्रकल्प ता.भुम, जि.उस्मानाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	३३५० हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	२०७० हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०१/०३/१९८९	१९८६-८७	६.४५	३३५०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१८/०४/२०००	१९९४-९५	४४.०४	३३५०
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	आवश्यकता नाही.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यन्त २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		१९.७५ १५.१९ १९.५५	
		एकुण		५४.४९	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	१५.४४			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	३९.०५			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१०.४५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	६४.९४			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८९-१९९०			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	सन १९८९ (किंमत रुपये ७.६४९ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	४.३२	१८.०७	१३.७५	३६.५८
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	१.३९	७.२२	५.८३	१५.५१
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१२.६४	१२.६४	३३.६३
७.५	इतर कारणे	०.७४	६.११	५.३७	१४.२८
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	६.४५	४४.०४	३७.५९	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	मुख्य भुसंपादन पुर्ण.			
८.२	धरण	मुख्य धरण सन १९९५ मध्ये पुर्ण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	कालव्याचे ९४ टक्के काम पुर्ण असून वितरण व्यवस्थेचे सवीस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.			

संगमेश्वर मध्यम प्रकल्प ता.भूम जि उस्मानाबाद

संक्षिप्त टिप्पणी

१.० संगमेश्वर मध्यम प्रकल्प ता. भूम, जि.उस्मानाबाद हा ईट गावाजवळील मांजरा नदीवर बांधण्यात आला आहे या कामास सन १९८९ साली सुरुवात होऊन मुख्य धरणाचे बांधकाम सन १९९५ मध्ये पुर्ण झाले. एकुण लाभक्षेत्र ३३५० हेक्टर आहे. या प्रकल्पाच्या डावा कालव्याची २९.५० किंमी व उजवा कालव्याची लांबी ४०.५० किमी आहे. दोन्ही कालव्याचे मिळून एकंदर ९० टक्के काम पुर्ण झाले असून २०७० हेक्टर सिंचन क्षमता निर्मीती झाली आहे. या प्रकल्पाचे शिर्ष काम व्यवस्थापन विभागास हस्तांतरीत झालेले आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

या प्रकल्पामध्ये व्याप्तीतील बदल झाला नाही.

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

जातेगाव पुल व बोरखेड ते वाढवणा रस्ता या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन संकल्पीत करून घेण्यात आला. विमोचके दगडी बांधकामाऐवजी सलोह संधानक बांधकामे केल्यामुळे ,कालव्यावरील प्रस्तावीत करण्यात आलेले जलसेतू सुपर पॅसेज इत्यादी प्रकारच्या बांधकामामध्ये पायातील काळया मातीमुळे तांत्रिक बदल करण्यात आलेले आहेत. सदरील प्रकल्पाच्या कंदरभरणीनंतर धरणाच्या सुरक्षितता व देखभालीसाठी पुच्छ कालव्यातील पाणी सुलभरित्या वाहात जाणेसाठी करण्यात आलेले विभाजक बांध व पुच्छ कालव्याचे खोदकाम इ. बाबीमुळे झालेली अनिवार्य वाढ या सर्व सविस्तर संकल्पनामुळे वाढ झाली आहे. ही वाढ रु.१७.४८ कोटी आहे.

४.० इतर कारणे.

प्रकल्प वाढीतील किमंतीमध्ये झालेल्या वाढीमुळे आस्थापना ई.टी.पी. खर्चात रु.९.०४ कोटी वाढ झालेली आहे.

५.० प्रकल्पाची सध्यस्थिती (भौतिक).

मुख्य धरणाचे बांधकाम सन १९९५ मध्ये पुर्ण झाले आहे. या प्रकल्पाचा डावा कालवा व उजवा कालवा यांचे एकंदर ९० टक्के काम पुर्ण झाले असून २०७० हेक्टर सिंचन क्षमता निर्मीती झाली आहे. या प्रकल्पाचे शिर्ष काम व्यवस्थापन विभागास हस्तांतरीत झालेले आहे.

६.० विशेष लाभ :

या धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतक-यांना उपसा सिंचनाव्दारे व कालव्याव्दारे तसेच विहीरींची, बोअरवेलची पाणी पातळी वाढल्याने अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळत आहे. सदर प्रकल्पाची मुळ सिंचन क्षमता ३३५० हेक्टर होती. तथापी बिगर सिंचन आरक्षणामुळे सदरील सिंचन क्षमता २२४० हेक्टर झालेली आहे. पर्यायाने सभोवतालच्या गावाना पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	वाघोली मध्यम प्रकल्प ता.जि.उस्मानाबाद			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१११५ हे.			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	१११५ हे.			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	०९/०३/१९८४	१९८२-८३	१.७७	१११५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२४/०८/२०००	१९९७-९८	१४.८७	१११५
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	आवश्यकता नाही			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यन्त २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२		५.९४ ३.०५ ७.२३८१	
		एकुण		१६.२२८१	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३.८०४०			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	११.५५१५			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	०.८७२६			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	१६.२२८१			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८८-१९८९			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	दि.२५/०२/१९८९ - (किंमत रुपये २.४१८ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क) = (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१.०३	३.६९	२.६६	२०.३१
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.४५	३.८७	३.४२	२६.११
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	०.००	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	३.८६	३.८६	२९.४६
७.५	इतर कारणे	०.२९	३.४५	३.१६	२४.१२
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	१.७७	१४.८७	१३.१०	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)	--			
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भुसंपादनाची प्रक्रिया मावेजा वाटपासह पुर्ण.			
८.२	धरण	धरणाचे काम पुर्ण, दि.२६/११/९७ रोजी व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरण.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	डावा कालवा लांबी ८.४ कि.मी. पुर्ण, सिंचन विभागाकडे हस्तांतरीत. उजव्या कालल्या पैकी ० ते ५ कि.मी. सिंचन विभागाकडे हस्तांतरीत व उर्वरीत कालवा हस्तांतरण प्रक्रिया चालु आहे.			

वाघोली मध्यम प्रकल्प ता.जि. उस्मानाबाद -संक्षिप्त टिप्पणी

१.० वाघोली मध्यम प्रकल्प ता.जि. उस्मानाबाद या प्रकल्पास शासन निर्णय क्र. लपात/ केजेएल/ १०८३/३९४/ (८४/८३) एएसए/(१) दिनांक ०३/०९/१९८४ अन्वये दरसुची १९८२-८३ वर आधारीत रुपये १.७७ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. योजनेच्या कामास दिनांक २५/०२/१९८९ ला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली.

प्रशासकीय मान्यता प्राप्त धरणस्थळी काम सुरु करतेवेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रकल्पाचे काम २५/०२/१९८९ रोजी यांत्रिकी विभागाच्या जड मशिनरीद्वारे सुरु करण्यात आले व माहे जुलै-१९९२ अखेर कंदरभरणीसह पूर्ण करण्यात आले.

तदनंतर लागवडीलायक सिंचन क्षेत्र २००० हे. पेक्षा कमी असल्याचे पाहुन शासनाने शासन पत्र क्र. पीएलएन/१४९०(१४/९०) /एनव्हीएस दिनांक २२/१०/१९९० नुसार सदर प्रकल्प बृहत लघु प्रकल्प म्हणून गृहीत धरावा अशा सुचना दिल्या .

प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात उजव्या कालव्याची लांबी १६.५० कि.मी. प्रस्तावित होती. सविस्तर सर्वेक्षण पूर्ण झालेनंतर असे दिसुन आले की, उपरोक्त लांबी मध्ये पुर्ण लाभक्षेत्र उपलब्ध होत नाही करीता डाव्या तिरावर ४.५ कि.मी. लांबीचा नवीन कालवा काढणे व तेरणा उजव्या कालव्याच्या पुच्छ भागाकडून ४.५ कि.मी. लांबीच्या कालव्याचे नुतनीकरण करणे प्रस्तावित केले कारण तेरणा धरणाच्या जिवंत साठयात घट झाल्यामुळे बऱ्याच दिवसापासुन तेरणा उजव्या कालव्यावर पुच्छ भागामध्ये सिंचन झालेले नव्हते. सदर कालव्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला व त्यास शासनाकडून शासन पत्र क्र. केजेएल/१०९०/१८६(३५/९०) एमपी दिनांक १३/०१/१९९२ अन्वये मंजुरी देण्यात आली व त्यामुळे एकुण १११५ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

दरसुचीमधील वाढ, जमीनीच्या दरातील वाढ, बांधीव विहीरीच्या किंमती मधील वाढ, फळझाडांच्या किमंतीमधील वाढ, वरुडा गावचे अंशत: पुर्नवसन, धरणाचे मातीकाम यांत्रिकी विभागामार्फत जड मशिनरीद्वारे केल्यामुळे झालेली वाढ, बांधकाम साहित्याच्या वाढीव अंतरामुळे झालेली वाढ इ. कारणामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. व त्यामुळे दरसुची १९९७-९८ नुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सुधारीत अंदाजपत्रकाची किंमत रु. १४.८७१८ कोटी इतकी असुन त्यास शा.नि.क्र. लपात/ २१९३/२१ (१२९/९३) लपा-२ दिनांक २४/०८/२००० अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पावर अद्यावत झालेल्या खर्च हा मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा रु. १४.४५८१ कोटी अधिक आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु. १४.८७ कोटी इतकी असुन प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु. १६.२२८१ कोटी इतका खर्च झाला आहे. जो की, सु.प्र.मा. च्या किंमतीच्या ११० टक्के पेक्षा आत आहे.

या वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ निरंक आहे.

३.०. सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ -

धरणाचे काम करीत असताना झालेल्या भुस्तरातील बदलामुळे तसेच मार्गदर्शक भिंतीचा व कालव्यावरील बांधकामाचा पाया ०.६० मी. अपारगम्य कठीण खडकामध्ये घेतल्यामुळे, मार्गदर्शक भिंतीच्या लांबीमधील झालेली वाढ, नवीन ४.५० कि.मी. कालव्याचे काम व ४.५० कि.मी. तेरणा पुच्छ कालव्याचे नुतनीकरण करणे या कारणाने रु. ३.८६ कोटी वाढ झालेली आहे.

४.० इतर कारणे -

मुळ अंदाजपत्रकामध्ये अपूरी तरतुद असल्या कारणाने कालवा, लाभक्षेत्र यांचे सर्वेक्षण, संकीर्ण किंमतीत झालेली वाढ, ईमारतीवरील खर्चात झालेली वाढ व ईटीपी चार्जेस यामध्ये एकुण रु. ३.१६ कोटी वाढ झाली आहे.

५.० प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक)

धरणाचे व कालव्याचे काम पुर्ण झाले असुन धरण सिंचन विभागाकडे दिनांक १६/११/१९९७ रोजी हस्तांतरीत करण्यात आले आहे. तसेच डावा कालवा लांबी ८.४० कि.मी. व उजवा कालवा लांबी ५ कि.मी. सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. उर्वरीत कालव्याची चाचणी पाण्याअभावी होऊ शकली नाही. धरणात पाणी येताच उर्वरीत कालव्याच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

६.० विशेष लाभ -

प्रकल्पाचा एकुण पाणीसाठा ७.२४६ द.ल.घ.मी. असुन मृत पाणीसाठा १.०३९ द.ल.घ.मी. असुन उपयुक्त पाणीसाठा ६.२०७ द.ल.घ.मी. आहे. या प्रकल्पाद्वारे १११५ हे. क्षेत्र सिंचनाखाली येते. तसेच वाघोली व परीसरातील इतर २० गावास पाणीपुरवठयासाठी पाणी आरक्षीत केलेले आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	बाभळी उच्च पातळी बंधारा, ता. धर्माबाद जि. नांदेड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	७९९५			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	निरंक			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१३/०३/१९९५	१९९३-९४	३१.३७	७९९५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१४/०२/२००३	२०००-०१	९२.५९	७९९५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	२५/११/२००५	२००४-०५	१४९.९४	७९९५
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३ (बळेगांव उच्च पातळी बंधा-यासह)	२५/०८/२००९	२००८-०९	४७३.९३	७९९५
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	प्रकल्पाच्या मान्यतेचा प्रस्ताव त्रुटींच्या पूर्ततेसह केंद्रीय जल आयोगास दिनांक २२-३-२०१० रोजी सादर केला आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९५ पर्यंत २) १९९५-९६ ते १९९९-२००० ३) २०००-२००१ ते २०११-१२ एकुण		रु. ०.०० कोटी रु. ०.०४ कोटी रु. २६९.३६ कोटी रु. २६९.४० कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	१.२९			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	२६८.११			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	०.००			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	२६९.४०			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९९-२०००			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	२००५ (किंमत रुपये १४९.९४ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क)=(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	२६.८३	१०६.१७	७९.३४	१७.९३
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.०५	१८.१२	१८.०७	४.०८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	२२१.२५	२२१.२५	५०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	१००.०३	१००.०३	२२.६०
७.५	इतर कारणे	४.४९	२८.३६	२३.८७	५.३९
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	३१.३७	४७३.९३	४४२.५६	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भूसंपादन पूर्ण ,पुनर्वसन व वन जमीन संपादनाची आवश्यकता नाही.			
८.२	धरण	बाभळी बंधा-यांचे काम पूर्ण. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २६/४/२००७ च्या अंतरीम आदेशानूसार पाणीसाठा करण्यास मनाई.बळेगांव उच्च पातळी बंधा-याचे काम प्रगत.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	जलाशयातून खाजगी उपसाद्वारे सिंचन करावयाचे अपेक्षित असल्याने बंधा-यास कालवे व वितरण व्यवस्था नाही.			

बाभळी उच्च पातळी बंधारा ता. धर्माबाद जि. नांदेड
संक्षिप्त टिप्पणी

१.० बाभळी उच्च पातळी बंधारा नांदेड जिल्हयातील धर्माबाद तालुक्यात बाभळी येथे गोदावरी नदीवर बांधण्यात आला आहे. बाभळी बंधाऱ्याचे कामास सन २००५ साली सुरुवात होऊन बंधाऱ्यचे काम सन २०१० मध्ये पूर्ण झाले. बाभळी बंधाऱ्यावर एकूण लाभक्षेत्र ७९९५ हेक्टर आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :

बाभळी बंधा-याद्वारा आंध्र प्रदेशातील पोचमपाड धरणाचे अंदाजे १७.१२ द.ल.घ.मी. पाणी अधिक्रमीत होत असल्यामुळे अधिक्रमीत साठा गोदावरी नदीत सोडण्याचे तत्वत: मान्य करण्यात आले. प्रशासकिय मान्यतेनुसार बाभळी बंधारा हा सिंचनासाठी व गोदातीरी उजव्या व डाव्या बाजूस असलेल्या ५८ गावांना पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी आहे. १७.१२ द.ल.घ.मी. पाणी आंध्र प्रदेशास सोडल्याने बळेगाव ते आमदुरा पर्यंत पाणी उपलब्ध होवू शकणार नाही. त्या भागात पाणी पुरवठा करु न शकल्यामुळे पूर्ण सिंचनाचे उद्दिष्ट शक्य होणार नाही. त्याचबरोबर स्थानिक आमदार यांनी वरील गावांना पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी केली. बाभळी बंधा-याच्या ७७.७० द.ल.घ.मी. मंजूर पाणी वापरापैकी आंध्र प्रदेशासाठी सोडावयाच्या १७.१२ द.ल.घ.मी. पाणी साठयासाठी पर्यायी तरतूद म्हणून मौ. बळेगांव ता. उमरी जि. नांदेड येथे नविन बंधारा प्रस्तूत योजनेचाच एक भाग म्हणून प्रस्तावित करण्यात आला.

बाभळी बंधा-याचे बांधकामाचे दरम्यान मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे अधिकारी व भूगर्भ शास्त्रज्ञ यांनी दिनांक ३०-०५-२००७ रोजी केलेल्या पाहणी मध्ये बंधा-यासाठी अधिकाधीक वहनपथ उपलब्ध होणेसाठी व भरावकाम सुरक्षित करणे या दृष्टीने भूस्तर विचारात घेवून बंधा-यास एक गाळा वाढविण्याचा निर्णय झाला. त्यानुसार १५ x ११ मी. आकाराच्या १३ ऐवजी एकूण १४ गाळे प्रस्तावित करण्यात आले. त्यानुषंगाने बंधा-याच्या स्थापत्य व यांत्रिकी कामात वाढ झाली. त्यानुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे पत्र क्र.मसंस/माध/माध-२/२७६/९७०/२००७, दिनांक २२-०६-२००७ नुसार सुधारित आराखडा प्राप्त झाला. बाभळी उच्च पातळी बंधारा ता. धर्माबाद (बळेगाव उच्च पातळी बंधा-यासह) तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास महामंडळाने निर्णय क्र. गोमपाविम/ता-३/बाळभी तृसुप्रमा/८, दिनांक २५.०८.२००९ नुसार रु. ४७३.९३ कोटी (दरसूची २००८-०९) रक्कमेस मान्यता प्रदान केली.

अशा रितीने बाभळी प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल झाल्यामुळे रु.२२१.२५ कोटीने किंमतीत वाढ झाली आहे.

३.० **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :**

बाभळी बंधा-याच्या ढोबळ आराखडयानुसार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकामध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी वेळोवेळी सूचविलेल्या घटक भागाच्या सविस्तर संकल्पनामुळे बंधा-याच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. तांत्रिक बाबी व सुधारित संकल्पनामुळे होणारी वाढ रु. १००.०३ कोटी आहे.

४.० **ईतर कारणे :**

इ.टी.पी. मुळे होणारी वाढ रु. २३.८७ कोटी

५.० **प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक):**

बाभळी बंधा-याचे स्थळ हे आंध्र प्रदेशच्या पोचमपाड धरणाच्या पश्चजलात येत असल्याने आंध्र प्रदेश शासनाने बंधा-याचे कामाबाबत हरकत घेतली. तसेच आंध्रप्रदेश चे खासदार व लोकप्रतिनिधींनी मा. सर्वोच्च न्यायालयात तीन रिट याचिका दाखल केल्या. मा. सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम सुनावणीमध्ये मा. केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांनी दोन्ही राज्यांसमवेत बैठक घेवून तोडगा काढावा असे निर्देश दिले. त्यानुसार मा. केंद्रीय जलसंसाधन मंत्री व आंध्र प्रदेश व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे समवेत बैठक होऊन चेअरमन, केंद्रीय जल आयोग यांचे अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली. तथापि, तांत्रिक समितीमध्ये ठरविण्यात आलेला सर्वमान्य तोडगा, आंध्र प्रदेश शासनाने अमान्य करुन मा. सर्वोच्च न्यालयात दावा दाखल केला. या दाव्याची मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सुनावणी झालेली असून दिनांक २६-०४-२००७ च्या अंतरिम आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने बाभळी बंधा-याचे काम चालू ठेवण्यास परवानगी दिली. परंतू बंधा-याचे गेट टाकून पाणीसाठा करण्यास मनाई केलेली आहे. त्याअनुषंगाने बंधा-याची स्थापत्य व यांत्रिकी कामे सन २०१० मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. बंधा-याच्या उभ्या उचल द्वारास विद्युत जोडणी करावयाचे काम शिल्लक आहे.

बाभळी प्रकल्पाची बळेगांव बंधा-यासह सुधारित प्रशासकिय मान्यता किंमत रु ४७३.९३ कोटी असून मार्च-२०१२ अखेर प्रकल्पावर रु. २६९.४० कोटी खर्च झाला आहे. बाभळी बंधा-याचे काम पूर्ण झालेले आहे. बळेगाव बंधा-याचे काम नोव्हेंबर २०१० मध्ये सुरु करण्यात आले असून निधी उपलब्ध झाल्यास २०१३ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

६.० **विशेष लाभ :-**

बाभळी बंधा-यात पूर्ण पाणी साठा झाल्यानंतर ७९९५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. कृषी उत्पादन वाढीमुळे कृषी औद्योगिक विकासास चालना मिळेल व लोकांचे राहणीमान उंचावेल. बाभळी उच्च पातळी बंधा-याच्या जलसाठयामुळे जवळपासच्या पसिरातील विहीरीतील /भूस्तर पाण्याच्या पातळीत वाढ होईल.

बाभळी बंधारा परिक्षेत्रातील ब-याच गावात फ्लोराईडयुक्त पाणी असल्यामुळे पिण्याकरीता पाणी अयोग्य आहे असा अहवाल संबंधीत खात्यामार्फत प्राप्त झालेला आहे. या बंधा-यामुळे बाभळी परिसरातील गोदावरी नदीच्या उजव्या व डाव्या तिरावरील ५८ गावांचा व ३ शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	उर्ध्व मानार मध्यम प्रकल्प, ता.लोहा, जिल्हा नांदेड			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१२४२०			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	६४८४			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची वर्षे	किंमत रु.कोटी	सिंचनक्षेत्र (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१६-११-१९८३	१९८१-८२	२३.०६	९४७०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	२०-१२-१९९६	१९९४-९५	१०८.६५	१२४२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१७-११-२००५	२००३-०४	३३५.७८	१२४२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	२९-१२-२००७	२००६-०७	५०२.९८	१२४२०
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ४	२८-०८-२००९	२००८-०९	६३५.९५	१२४२०
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	पत्र क्र. १६/२७/२०१० पीए (एन)/ ९६०-९९३, दि. २१.५.२०१० रु. ४२४.५० कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१. १९९५ पर्यत ७.८८ २. १९९५-९६ ते १९९९-०० १३.८३ ३. २०००-०१ ते २०११-१२ ३३६.३३ एकुण ३५८.०४			
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	३७.३२			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	२७५.५६			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	४५.१६			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	३५८.०४			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८३-८४			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९८३-८४ (रु.२७.९०२६ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रु.कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम (क)=(ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१९.५३	३३७.५५	३१८.०२	५१.८९
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	१.०९	४०.०५	३८.९६	६.३६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)		३५.९२	३५.९२	५.८६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		९७.७	९७.७०	१५.९४
७.५	इतर कारणे	२.४४	१२४.७३	१२२.२९	१९.९५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	२३.०६	६३५.९५	६१२.८९	१००.००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भुसंपादनाची कामे पुर्ण व पुनर्वसनाची कामे ९० टक्के पुर्ण.			
८.२	धरण	धरणाची कामे पुर्ण व १०० टक्के पाणी साठा निर्मिती.अहमदपूर उसिंयो कार्यान्वित.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	मुख्य कालवा कामे ९५ टक्के पुर्ण, वितरण व्यवस्था ५० टक्के पुर्ण , अहमदपूर उपसा सिंचन योजनेच्या डाव्या कालव्याचा १६ कि.मी. पैकी १२ कि.मी.व उजवा कालव्याची ६ कि.मी.चे मातीकाम व बांधकामे पुर्ण झालेली आहे.			

उर्ध्व मानार प्रकल्प ता.लोहा जि. नांदेड
संक्षिप्त टिप्पणी

१.० उर्ध्व मानार प्रकल्प हा मानार नदीवर मौ. लिंबोटी ता. लोहा जि. नादेड येथे बांधण्यात आला असुन धरणाच्या कामाची सुरवात सन १९८४ साली झाली व धरणाचे काम सन २०१० साली पुर्ण होवून सिंचन व्यवस्थापनाकडे जलाशय हस्तांतरीत करण्यात आले आहे. मानार प्रकल्पाच्या मुख्य कालव्याची लांबी ५८ किमी असुन कालव्याची चाचणी घेण्यात आली आहे व त्याचे लाभक्षेत्र ८२८० हे. आहे. तसेच अहमदपुर उपसा सिंचन योजनेचे लाभक्षेत्र ४१४० हे. असुन योजना कार्यान्वित झाली आहे.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

उर्ध्व मानार प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात अहमदपूर तालुक्यातील शेतजमीनी येत असल्यामुळे तालुक्यातील पुनर्वसीत व इतर आरक्षीत वर्गातील लोकांना उर्ध्व मानार प्रकल्पाचा फायदा होणेबाबत मागणी होती. त्या अनुषंगाने मंत्रालयात मा.पाटबंधारे मंत्री यांचे समवेत मा. आमदार श्री. बाळासाहेब जाधव, मा. प्रधान सचिव (जसं.) व संबंधीत अधिकारी यांची दि.१६/०६/१९९३ रोजी बैठक झाली. त्या अनुषंगाने अहमदपूर तालुक्यासाठी उर्ध्व मानार प्रकल्पातून उपसा सिंचन योजना घेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. उर्ध्व मानार उपसा सिंचन योजना ही उर्ध्व मानार मध्यम प्रकल्पाचा भाग म्हणून सादर प्रस्तावास शासनाने पत्र क्र.१०९२/२७४/९२/मप्र, दि.१२/१०/१९९४ अन्वये तत्वत: मान्यता दिली.

तद्नंतर उर्ध्व मानार प्रकल्पाचा एक भाग म्हणून अवर्षण प्रवण क्षेत्र व सिंचनाचा अनूशेष असलेल्या ४१४० हेकटर क्षेत्रास सिंचन योजनेचा लाभ होण्यासाठी उर्ध्व मानार उपसा सिंचन योजनेचा प्रथम सुधारीत अंदाज पत्रकात समावेश करुन या योजनेचे सुधारीत अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रमांक उमाप्र/१०९४/२०१९/(४४९/९४)मो.प्र.दिनांक २०.११.९६ अन्वये रु. १०८.६५ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता प्रदान झाली.

दिनांक २१.८.२००८ रोजी माननीय सचिवासमवेत झालेल्या बैठकीनुसार कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या व स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक ४.११.२००८ नुसार मागणी केल्याप्रमाणे कोटेकल्लूर ता.देगलुर व टाकळी ता.नायगांव उच्च पातळी बंधाऱ्यांचा समावेश चतुर्थ सुधीरीत प्रशासकिय मान्यतेत करण्यात आला असुन त्यास महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र. गोमपविम/ता-३/उर्वमानार म.प्र/चसुप्रमा/१३ दिनांक २८.०८.२००९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. अशारितीने प्रकल्पाच्या व्याप्तित बदल झाल्यामुळे खालील प्रमाणे वाढ झाली आहे.

१) अहमदपुर उपसा सिंचन योजना समाविष्ठ केल्यामुळे	रु. १५.९२ कोटी
२) कोटेकल्लूर ता.देगलुर व टाकळी ता.नायगांव उच्च पातळी बंधाऱ्यांचा समावेश	रु. २०.०० कोटी
एकूण वाढ	रु. **३५.९२ कोटी**

३.० सविस्तर घटक संकल्प चित्रामुळे झालेली वाढ.

मुळ प्रकल्प अहवालात १२ मी x ५ मी. आकाराचे १७ गेट प्रस्तावित होते . तथापि मुख्य अभियंता पाटबंधारे यांचे पत्र क्र उर्ध्व मानार प्रकल्प लेआऊट/६७८/३७६६/ताशा-५/१२३०/१ दिनांक ७.२.१९८९ अन्वये १२ मी x ६.५ मी. आकाराचे १५ दरवाज्यास मान्यता प्रदान केली . माती धरणाचे संकल्पनास अधिक्षक अभियंता,/ माध/सिडीओ/४ यांचे पत्र क्र मसस/माध/उमाप्र/६२/१२९ सन १९९१ दिनांक २३.१.१९९१ नुसार अंतिम केले. त्यामुळे मातीधरणाचा काटछेद वाढल्यामुळे रु.८.२० कोटीची वाढ झाली आहे. तसेच मोनोलिथ कॉक्रीटमुळे रु.३.७४ कोटी वाढ झाली आहे. या दोन्ही बाबींचा द्वितीय व तृतीय सुधारीत प्रशासकीय अंदाजपत्रकात समावेश करुन त्यास शासनाची मान्यता घेतली आहे.

तसेच संरेखा ही डोंगराच्या पायथ्यापासुन जात असल्यामुळे डोंगराचा भाग वारंवार घसरुन कालव्याचे नुकसान होत होते. सदर बाब मुख्य अभियंता, यांनी दिनांक १३.१२.२०१० च्या निरिक्षण टिप्पणीत नमुद केली व त्यांचे पत्र क्र ताशा-५/धा-३/१७५ दि.५.१.२०११ मध्ये नमुद करुन आर्च लायनिंग व ट्रफ लायनिंग प्रस्तावित केली त्यामुळे रु.२.५ कोटीची वाढ झाली आहे .

तसेच पारंपारीक पध्दतीचे अस्तरीकरणाचा (म्यनुअल) समावेश मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये होता. तथापि सदर प्रकल्पाच्या वेगवर्धीत सिंचन कार्यक्रम या केंद्र शासनाचा योजनेत समावेश झाल्यामुळे काम त्वरित होणेकरिता यांत्रिकी पध्दतीचे

अस्तरीकरणाचा समावेश करण्यात आला व त्यास तृतीय सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता महामंडळाचे पत्र क्रं.गोमपाविम/ताशा-३ /उर्ध्व मानार मप्र/तसूप्रमा-९/ दिनांक २९-१२-२००७ अन्वये घेण्यात आली, त्यामुळे एकूण वाढ रु.३१.१४ कोटी झाली आहे.

तसेच लोहा व कंधार शाखा कालवा नंतर वितरीकामध्ये रुपांतरीत करण्यात आला व त्यांचे सविस्तर सर्वेक्षणानुसार येणारी संरेखा अतिरिक्त बांधकामे व बांधकामाच्या संकल्पनातील बदल या सर्व बाबीमुळे रु.३९.७० कोटी ईतकी वाढ झाली आहे. या बदलास चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता मध्ये समाविष्ठ करुन त्यास महामंडळाचे पत्र क्र. गोमपाविम सुप्रमा/ताशा-३/उमाप्र/मप्र/ चसुप्रमा/१३/ दिनांक २८.८.२००९ अन्वये मंजूरी घेतली आहे. तसेच अहमदपुर उपसा सिंचन योजनेच्या घटक संकल्पनातील बदलामुळे रु १२.४२ कोटी ईतकी वाढ झाली आहे.

अशा प्रकारे सविस्तर घटकांची संकल्प चित्रामुळे झालेली एकूण वाढ रु ९७.७० कोटी ईतकी आहे.

४.० इतर कारणे .

खालील कारणामुळे वाढ झाली आहे.

१)	स्टोन रिव्हेटमेंट , स्वामित्व शुल्क, सरफेस ड्रेन ईत्यादी	रु. १.६४ कोटी
२)	ई.टी.पी. चार्जेस	रु. १२०.६५ कोटी

एकूण रु. १२२.२९ कोटी

५.० प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक) :

उर्ध्व मानार प्रकल्पांतर्गत धरणाचे काम सन २०१० मध्ये पुर्ण झाले असुन तेंव्हा पासुन प्रत्येक वर्षी पाणीसाठा होत आहे.मुख्य कालव्याचे ९५ टक्के काम पुर्ण झाले असुन वितरण व्यवस्थेचे ५० टक्के काम पुर्ण झाले आहे.

अहमदपुर उपसा सिंचन योजनेअंतर्गत पंपहाऊसचे काम पुर्ण झाले आहे, डावा कालव्याच्या एकूण १६ किमी.लाबी पैकी १२ कि.मी. लांबीमध्ये मातीकाम वबांधकामे बहुतांशी पुर्ण झाली आहेत. उजव्या कालव्याच्या एकूण ६ कि मी लांबीतील मातीकाम व बांधकामे बहुतांशी पुर्ण झालेली आहेत या योजनेची पाणी चाचणी १९.११.२०११ रोजी घेण्यात आली आहे.

६.० विशेष लाभ :

उर्ध्व मानार प्रकल्प सन २०११-२०१२ साली पुर्ण क्षमतेने भरल्यामुळे कालवा प्रणालीचे चाचणी कि मी. ५८ पर्यत करण्यात आली आहे. तसेच पाणी टंचाईच्या काळात उर्ध्व मानार अहमदपुर उपसा सिचन योजना कार्यान्वित झाल्यामुळे अहमदपुर शहरास पाणी पुरवठा व सिंचनाचा फायदा झाला .तसेच या वर्षी सुनेगाव तलावात कालव्याद्वारे पाणी सोडल्यामुळे लोहा तालुका पाणी टंचाई मुक्त झाला असुन टॅकर द्वारे पाणी पुरवठा करण्याची गरज भासली नाही. तसेच धरणाचे पाणी निम्न मानार धरणात सोडल्यामुळे सिंचनाचा अतिरिक्त लाभ झाला. भुजल पातळी वाढल्यामुळे उन्हाळयात पाणी टंचाई ची तिव्रता कमी झाली. या वर्षी झालेल्या पाणी साठयामुळे १६ गावास पाणी टंचाई जाणवली नाही. सन २०१२ या वर्षाच्या पावसाळयात कमी पाऊस झाल्यामुळे लोहा शहरास तीव्र पाणी टंचाई भासत होती त्यामुळे सुनेगांव तलावात ऑक्टोबर-२०१२ मध्ये उर्ध्व मानार प्रकल्पातुन १ द.ल.घ.मी. पाणी सोडण्यात आले असुन लोहा शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे, व अहमदपूर तालुक्यातील बालाघाट सहकारी साखर कारखान्यास पण मागील हंगामात पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच खाजगी सैनिक भरती केंद्रास पण या प्रकल्पातुन पाणी पुरवठा होतो. तसेच सन २०११-१२ मधील रब्बी व उन्हाळी हंगामात उर्ध्व मानार प्रकल्पाचे प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सिंचन ७५० हे., निम्न मानार प्रकल्पात सोडलेल्या पाण्यामुळे १२०० हे. व अहमदपुर उपसा सिंचन योजनेमुळे ४९९ हे. असे एकूण २४४९ हे. सिंचन झाले असुन परिसरात पिण्याचे पाणी सुध्दा उपलब्ध झाले आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा १ व २ ता.शेवगांव जि-अहमदनगर			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	१६४९८			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	३६२२			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२२/०२/१९८०	१९७९-८०	१.७३	३६२२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१०/०५/१९८२	१९८१-८२	२.७३	३६२२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	०८/०४/१९९४	१९९३-९४	१४.१५	३६२२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	१८/०२/२०००	१९९९-००	२५.८६	३६२२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ४	०१/०७/२००९	२००८-०९	४३८.७०	१६४९८
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	केंद्रीय जलआयोग नागपूर यांचे पत्र क्र.DIE(APP)NAG/ TECH-१/2002-30 dated 18/6/2002 रु.23.46 कोटी			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९८०-८१ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. २.५६ कोटी रु. ४.७३ कोटी रु. २२.३६ कोटी रु. २९.६५ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	०.९५			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	२१.१५			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	७.५५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	२९.६५			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९८८			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९८८ (किंमत रुपये २.७३ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र.मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम क ú= (ब-अ)	टक्केवारी (वाढीव रकमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	१.४१	१०.८८	९.४७	२.१७
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.०५	१.२३	१.१८	०.२७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	३५४.१९	३५४.१९	८१.०६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	०.००	०.०००	०.००
७.५	इतर कारणे	०.२७	७२.४०	७२.१३	१६.५०
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	१.७३	४३८.७०	४३६.९७	१००.००.००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	टप्पा १ भुसंपादन पूर्ण, टप्पा २ भुसंपादन प्रगतीपथावर			
८.२	धरण	टप्पा १ चे पंपगृह, उर्ध्व नलिका कामे पूर्ण झालेली आहेत. टप्पा-२ चे पंपगृहाचे काम प्रगतीपथावर आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	टप्पा १ चे कालवे पूर्ण व वितरण व्यवस्थेच्या भाग १ ची कामे प्रगतीपथावर.			

ताजनापुर उपसा सिंचन यो जना टप्पा-१ व २ ता.शेवगांव जि-अहमदनगर
संक्षिप्त टिप्पणी

१.० - जायकवाडी प्रकल्पाच्या जलाशयामुळे शेवगांव तालुक्याचा बराचसा भाग बुडीत क्षेत्रात गेलेला आहे. या प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन जायकवाडी जलाशयाभोवती व शक्यतो पुर्वीच्या त्यांच्या जमिनीजवळ करुन त्यांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-१ व टप्पा-२ प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. या योजनेसाठी जायकवाडी जलाशयातील ३.८७ अ.घ.फु.पाणी आरक्षित आहे. ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-१ योजनेव्दारे ३६२२ (पीकक्षेत्र) हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. या योजनेचे काम पुर्ण झालेले आहे.

ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२ योजनेव्दारे जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने ठिंबक सिंचनाचा पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. या योजनेचा समावेश असलेल्या चतुर्थ सुधारीत प्रकल्प अहवालास दि.१/७/२००९ च्या शासन निर्णय व्दारे मान्यता मिळालेली असुन त्याची टप्पा-१ सह एकत्रित किंमत रु ४३८.७० कोटी आहे. या योजनेव्दारे सुक्ष्म सिंचन पध्दतीमुळे २.२७ अ.घ.फू.. पाण्यामध्ये २० गांवामधील ६९६० (१२८७६ पीक क्षेत्र) हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे प्रस्तावित आहे

.

२.० प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.

सदर प्रकल्पास दि.२२/२/१९८० रोजी शासन निर्णय पाटबंधारे विभाग अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मुळ अंदाजपत्रक करतेवेळेस टप्पा-१ साठी कालवा अस्तरीकरण व उर्ध्वगामी नलिकेच्या बाजुने पोहोच रस्ता यांची तरतुद नव्हती. तसेच मुख्य शिर्षकामांच्या संरेखा(ठिकाण) बदलामुळे व वितरण व्यवस्थेतील बदलामुळे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये नव्याने समावेश केल्यामुळे रु.२२.७८ कोटीची वाढ झालेली आहे

चतुर्थ सु.प्र.मा. मध्ये ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२ चा नव्याने समावेश करण्यात आला. पाटबंधारे विभाग ज्ञानपन क्रं.आय.अटी.एम. १५७४/४९/५२१ व्यवस्था -१ (१३७१) नुसार मु.अ.पत्रक (NO. LIS १९७७७/११६९७/M३) प्रमाणे ताजनापुर उपसा सिंचन योजनेस ३.८७ अ.घ.फू.पाणी जायकवाडी जलाशयातून आरक्षित आहे. त्यापैकी १.६१ अ.घ.फू. ताजनापुर टप्पा-१ साठी वापरावयाचे आहे.

लाभक्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांची मागणी व उर्वरित आरक्षित २.२७ अ.घ.फू. पाण्याचा उपयोग होण्यासाठी लोकप्रतिनिधीनी केलेल्या शिफारशीनुसार सदर पाण्यात ६९६० हेक्टर सिंचन निर्मिती करण्यासाठी ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

शेवगांव-नेवासा विधानसभा क्षेत्राचे तत्कालीन विधानसभा सदस्य यांचे विनंतीनुसार दिनांक .२२/११/२००६ रोजी तंत्कालीन जलसंपदा मंत्री मा.अजितदादा पवार यांचे समवेत घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार जायकवाडी जलाशयातील उर्वरित २.२७ अ.घ.फू आरक्षित पाण्याचा उपयोग घेवुन ताजनापुर सिंचन योजना टप्पा-२ ची निर्मिती करण्यासाठी सर्वेक्षण करणेत यावेत असे ठरले.

मा.नरेद्र घुलेपाटील तत्कालीन आमदार यांनी एल.ए.क्यू. नंबर ९७०१५ व्दारे विधान सभेत प्रश्न उपस्थित केला व त्याअन्वये ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२ ही योजना नव्याने प्रस्तावित होवून ताजनापुर उपसा सिंचन योजनेस शासन निर्णय क्रमांक शा.नि.क्र. सुप्रमा-२००९/२६/(१७/०९) म.प्र. मुंबई दिनांक ०१/०७/२००९ अन्वये रुपये ४३८.७० कोटी इतक्या रक्कमेस एकत्रित मान्यता प्राप्त आहे.

ताजनापुर उ.सिं.योजना टप्पा-१	**ताजनापुर उ.सिं.योजना टप्पा-२**	**एकुण टप्पा-१ व २**
एकुण किमंत रु.४३.२२ कोटी	एकुण रु. ३९५.४८ कोटी	एकुण रु. ४३८.७० कोटी
कामासाठी रु. ३४.८९ कोटी	कामासाठी रु.३३१.४१ कोटी	कामासाठी रु.३६६.३० कोटी
अनुषंगिक रु. ८.३३ कोटी	अनुषंगिक रु. ६४.०७ कोटी	अनुषंगिक रु. ७२.४० कोटी

व्याप्तीतील बदलामुळे खालील प्रमाणे वाढ झालेली आहे.

१.टप्पा-१ च्या कामासाठी	रु. २२.७८ कोटी
२. टप्पा-२ च्या कामासाठी	रु.३३१.४१ कोटी
एकुण	**रु.३५४.१९ कोटी.**

३.० सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

या कारणास्तव वाढ निरंक आहे

४.० इतर कारणे

या मध्ये चतुर्थ सु.प्र.मा. प्रमाणे टप्पा-१ साठीचा अनुषंगिक खर्च रु.८.०६ कोटी व टप्पा-२ साठीचा अनुषंगिक खर्च रु.६४.०७ कोटी असे एकत्रित मिळून रु.७२.१३ कोटी वाढ आहे.

५.० प्रकल्पांची सद्य:स्थिती (भौतिक)

ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-१ –

प्रकल्पाचे उपसा विहीर तथा पेपगृह ,उर्ध्वनलिका सामाईक कालव्यासह , डावा व उजवा कालव्याची कामे १०० टक्के पुर्ण झालेली आहेत. वितरण व्यवस्थेची उजव्या व डाव्या कालव्यावरील भाग-१ ची कामे वगळता सर्व कामे पूर्ण झालेली आहेत.त्यानुसार प्रकल्पीय सिंचन क्षमता ३६२२ हेक्टर जुन २०१० अखेर निर्मिती झालेली आहे

ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२

योजनेच्या पंपगृहाचे खोदकाम पूर्ण झालेले असून राफट फाऊडेशनचे काम पूर्ण झाले आहे. राफट बीमचे संधानकाचे तसेच फोरवेचे पी.सी.सी. संधानकाचे काम प्रगतीपथावर आहे. पंपगृहाचे ४६५.०० मी. तलांकापर्यत मंजूर संकल्पनानुसार १२०५ घ.मी. संधानकाचे कामापैकी ६१५ घ.मी. संधानकाचे काम पूर्ण झालेले आहे.

उर्ध्वगामी नलिका क्र. १,२ व ३ साठी आवश्यक पाईपचा पुरवठा झालेला असून सदर पाईपचे आतील बाजूस सॅण्ड ब्लास्टींग करुन पेंटींग करण्याचे व पाईपच्या बाहेरील बाजूस गनाईटींग करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. वितरण कुंडा पूढील वितरण व्यवस्थेचे ९ अंदाजपत्रके व ठिबक सिंचनाचे अंदाजपत्रकांस प्रदेश कार्यालयाची मंजूरी प्राप्त आहे.

६.० विशेष लाभ

ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-२ च्या संपूर्ण लाभक्षेत्रात पाईप वितरण व्यवस्था व सूक्ष्म सिंचन पध्दत प्रस्तावित असल्याने प्रकल्पांची सिंचन कार्यक्षमता ९० टक्के राहणार आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	गौतमी गोदावरी मध्यम प्रकल्प, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	६८५१ हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	६८५१ हेक्टर			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	३१/०१/१९८५	१९८२-८३	७.६३	५०३२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१६/१०/१९९२	१९९१-९२	१८.९४	५०३२
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१२/०७/१९९९	१९९८-९९	६४.९०	६९०८
	सुधारित प्रशासकीय मान्यता - ३	१५/०६/२००९	२००७-०८	८७.९८	६८५१
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	निरंक			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९९२-९३ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. १.१० कोटी रु. ११.९१ कोटी रु. ७४.०६ कोटी रु. ८७.०७ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	८.८७			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	६५.७६			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	१२.४४			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	८७.०७			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९२-९३			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९९२-९३ (किंमत रुपये १८.९४ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र. मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम क = (ब -अ)	टक्केवारी (वाढीव रक्कमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	६.४१	४७.८७	४१.४६	५१.६०
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.१८	६.०९	५.९१	७.३६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	१७.०३	१७.०३	२१.१९
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४.२४	४.२४	५.२८
७.५	इतर कारणे	१.०४	१२.७५	११.७१	१४.५७
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	७.६३	८७.९८	८०.३५	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भूसंपादन पूर्ण, प्रकल्पात पूर्नवसन व वन जमिन नाही.			
८.२	धरण	धरण पूर्ण, व सिंचन व्यवस्थापनेकडे वर्ग.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	धरणास कालवे नाहीत.			

गौतमी गोदावरी मध्यम प्रकल्प, ता.त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक.
संक्षिप्त टिप्पणी

१.० **गौतमी** गोदावरी धरण नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यात बेझे येथे गोदावरी नदीवर बांधण्यात आले आहे. गौतमी गोदावरी धरणाचे कामास सन १९९२ साली सुरुवात होऊन धरणाची घळभरणी सन२००५मध्ये झाली आहे. सांडवा दरवाजांचे कामे सन २०१० मध्ये पुर्ण झाले आहे. धरणांस कालवे नाहीत. गंगापूर धरणावरील सिंचन क्षेत्र पूर्नस्थापित करण्यासाठी गौतमी गोदावरी प्रकल्प बांधण्यांत आले आहे. एकुण अप्रत्यक्ष सिंचन क्षेत्र ६८५१ हेक्टर आहे. गौतमी गोदावरी प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेकडे नोव्हेबंर २०१० मध्ये हस्तांतरीत करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत १.२० मे.वॅ. क्षमतेचे जलविद्युत प्रकल्पाचे काम बी.ओ.टी. तत्वावर प्रगतीत आहे.

२.० **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.**

मुळ प्रकल्प अहवाल ७५ % विश्वासार्हतेवर आधारीत जलनिष्पत्ती विचारात घेऊन तयार केला होता. तथापी बांधकामाच्या वेळी ५० % विश्वासार्हता विचारात घेतल्यामुळे प्रकल्पाचा पाणीसाठा ३७.७३ दलघमी ऐवजी ५३.३३७ दलघमी इतका करण्यांत आला. त्यामुळे सिंचन क्षेत्र ५०३२ हेक्टर वरुन ६८५१ हेक्टर इतके निश्चित करण्यांत आले. खालील कारणांमुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली.

१) पाणीसाठ्यातील वाढीमुळे धरणाची उंची वाढल्याने

२) क्षेत्रीय परिस्थितीनुसार साठवण क्षमता निर्माण करण्यासाठी पायलट कटमुळे खोदाईच्या परिमाणात वाढ झाल्याने खर्चात वाढ

३) सांडव्याचे संकल्पन व पाया खोदाई इ. मध्ये बदल झालेमुळे खर्चात वाढ

४) प्रकल्पासाठी व प्रकल्पग्रस्थांसाठी रस्ते, पूल, इ. वाढीव बाबींचा अंतर्भाव केल्यामुळे वाढ

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. १७.०३ कोटी आहे.

३.० **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.**

१) सांडव्याचे काम दगडी बांधकामा ऐवजी संधानकात(फ्लॅय ऍशसह) केल्यामुळे खर्चात वाढ झाली.

२) पेनस्टॉक सभोवती सलोह संधानकाची अतिरिक्त बाबीमुळे खर्चात वाढ झाली आहे.

सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ रु. ४.२४ कोटी आहे.

४.० **इतर कारणे.**

प्रकल्पाचा कालावधी वाढल्याने आस्थापना खर्चात झालेली एकूण वाढ रु. ११.७१ कोटी आहे.

५.० **प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक).**

प्रकल्पाची घळभरणी सन२००५-२००६मध्ये झाली असून सन२००९-२०१०मध्ये वक्रद्वाराचे काम पूर्ण करण्यांत आले. सन २००५-२००६ पासून धरणात अशंत: पाणीसाठा होत असुन, सन २००९-२०१० पासून धरणात पूर्ण पाणीसाठा निर्मिती झाली आहे. सन २०१० मध्ये धरण सिंचन व्यवस्थापनाकडे वर्ग केले आहे.

६.० **विशेष लाभ :**

या धरणाची निर्मिती गंगापूर धरणाची बिगर सिंचन वापरामुळे झालेली सिंचन क्षेत्रातील तूट भरुन काढणेसाठी केलेली आहे. गंगापूर धरणाच्या पाण्याचा विनियोग मोठ्या प्रमाणात नाशिक महानगर पालिका, सातपूर व अंबड औद्योगीक वसाहत, नाशिक थर्मल पॉवर स्टेशन तसेच सिंचनासाठी करण्यांत येतो.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१.	प्रकल्पाचे नांव	काश्यपी मध्यम प्रकल्प, ता. व जि. नाशिक			
२.	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीक क्षेत्र	५८१७ हेक्टर			
	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२) : (हेक्टर)	५८१७ हेक्टर			
३.	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मुळ प्रशासकीय मान्यता	११/०१/१९८५	१९८५	५.५०	५८१७
	सुधारित प्रशासकीय मान्यता - १	१९/१२/१९९२	१९९२	२०.७२	५८१७
	सुधारित प्रशासकीय मान्यता - २	१३/०७/१९९९	१९९५-९६	४९.३३	५८१७
४.	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत रु.कोटी)	निरंक			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	१) १९८७-८८ ते १९९४-९५ २) १९९५-९६ ते १९९९-०० ३) २०००-०१ ते २०११-१२ एकुण		रु. ९.४८ कोटी रु. २६.७१ कोटी रु. १५.५४ कोटी रु. ५१.७३ कोटी	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	७.९१			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	३७.०७			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	६.७५			
	(एकुण अ.क्र.४.२ ते ४.४) (रु.कोटी)	५१.७३			
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	१९९२			
६.	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळेची किंमत	१९९२ (किंमत रुपये २०.७२ कोटी)			
७.	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च, वाढीची कारणे.	(रुपये कोटी)			
		मुळ प्र.मा. किंमत (अ)	अद्ययावत सु.प्र. मा. किंमत (ब)	वाढीव रक्कम क = (ब - अ)	टक्केवारी (वाढीव रक्कमेची) (ड)
७.१	दरसूचीतील वाढ (भाववाढ)	४.५७	२२.०५	१७.४८	३९.८८
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ	०.२२	८.३६	८.१४	१८.५७
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ.)	०.००	७.३१	७.३१	१६.६८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	०.००	४.९६	४.९६	११.३२
७.५	इतर कारणे	०.७१	६.६५	५.९४	१३.५५
	एकुण अ.क्र.७.१ ते ७.५ (रु.कोटी)	५.५०	४९.३३	४३.८३	१००
८.	प्रकल्पाची सद्य:स्थिती (भौतिक)				
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन.	भूसंपादन पूर्ण, पूर्नवसन कामे ७० % पूर्ण			
८.२	धरण	धरण पूर्ण व सिंचन व्यवस्थापनेकडे वर्ग, सिंचन व विद्युत विमोचकाचे काम ७५ % पूर्ण आहे.			
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	धरणास कालवे नाहीत.			

काश्यपी मध्यम प्रकल्प, ता. व जिल्हा नाशिक
संक्षिप्त टिप्पणी

१.० काश्यपी धरण नाशिक जिल्हा व तालुक्यातील मौजे खड्याचीवाडी येथे कश्यपी या गोदावरी नदीच्या उपनदीवर बांधण्यात आले आहे. काश्यपी धरणाचे कामास सन १९९२ साली सुरुवात होऊन धरणाची घळभरणी सन १९९८मध्ये व इतर कामे सन२००२ मध्ये पुर्ण झाले. धरणांस कालवे नाहीत. गंगापूर धरणावरील सिंचन क्षेत्र पूर्नस्थापित करण्यासाठी काश्यपी प्रकल्प बांधण्यांत आला आहे. प्रकल्पाचे एकुण अप्रत्यक्ष सिंचन क्षेत्र ५८१७ हेक्टर आहे. काश्यपी प्रकल्प सिंचन व्यवस्थापनेकडे नोव्हेबंर २०१० मध्ये हस्तांतरीत करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत ७५० कि.वॅ. क्षमतेचे जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे.

२.० **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ.**

मुळ प्रकल्प अहवाल ७५ % विश्वासार्हतेवर आधारीत जलनिष्पत्ती विचारात घेऊन तयार केला होता. तथापी बांधकामाच्या वेळी ५० % विश्वासार्हता विचारात घेतल्यामुळे प्रकल्पाचा पाणीसाठा ३२.७९ दलघमी ऐवजी ५२.७९ दलघमी इतका करण्यांत आला. पाणीसाठ्यातील वाढीमुळे तसेच खदान क्षेत्र भुसंपादनाच्या अडचणीमुळे उत्खनन क्षेत्रात बदल झाल्यामुळे वाहतूक खर्चात वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली.

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली एकूण वाढ रु. ७.३१ कोटी आहे.

३.० **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.**

धरण पायात फिशर्ड क्ले लागल्याने सुधारीत संकल्पनानुसार प्रकल्पाच्या काटछेदात बदल झालेमुळे खर्चात वाढ झाली. सविस्तर घटक संकल्पनामुळे झालेली वाढ रु. ४.९६ कोटी आहे.

४.० **इतर कारणे.**

प्रकल्पाचा कालावधी वाढल्याने आस्थापना खर्चात झालेली एकूण वाढ रु. ५.९४ कोटी आहे.

५.० **प्रकल्पाची सध्यस्थिती (भौतिक).**

प्रकल्पाची घळभरणी सन १९९८-१९९९ मध्ये झाली. सन २००२-२००३ मध्ये वक्रद्वाराचे काम पूर्ण करण्यांत आले. सन १९९८-१९९९ पासून धरणात अंशत: पाणीसाठा होत असुन, सन २००३ पासून धरणात पूर्ण पाणीसाठा निर्मिती झाली आहे. सन २०१० मध्ये धरण सिंचन व्यवस्थापनाकडे वर्ग केले आहे.

६.० विशेष लाभ :

या धरणाची निर्मिती गंगापूर धरणाची बिगर सिंचन वापरामुळे सिंचन क्षेत्रातील तूट भरुन काढणेसाठी केलेली आहे. गंगापूर धरणाच्या पाण्याचा विनियोग मोठ्या प्रमाणात नाशिक महानगर पालिका, सातपूर व अंबड औद्योगीक वसाहत, नाशिक थर्मल पॉवर स्टेशन तसेच सिंचनासाठी करण्यांत येतो.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत प्रकल्पनिहाय तपशील (टिप्पणीसह)

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व वाढती किंमत बाबत तपशील
प्रकल्पनिहाय (टिप्पणीसह)
अ नु क्र म णि का

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	पृष्ठ क्र.	
		पासून	पर्यंत
अ)	**मोठे प्रकल्प**		
१	सुर्या प्रकल्प, जि. ठाणे	१	६
२	भातसा प्रकल्प, जि. ठाणे	७	१५
३	तिलारी प्रकल्प, जि सिंधुदूर्ग	१७	२८
४	तळंबा प्रकल्प, जि. सिधुदूर्ग	२९	३६
ब)	**मध्यम प्रकल्प**		
१	देहरजी प्रकल्प, जि. ठाणे	३७	३९
२	हेटवणे प्रकल्प, जि. रायगड	४१	५०
३	सांबरकुंड प्रकल्प, जि. रायगड	५१	५६
४	गडनदी प्रकल्प, जि. रत्नागिरी	५७	६४
५	जामदा प्रकल्प, जि. रत्नागिरी	६५	७०
६	अर्जुना प्रकल्प, जि. रत्नागिरी	७१	७७
७	कोर्ले सातंडी प्रकल्प, जि. सिंधुदूर्ग	७९	८४
८	देवघर प्रकल्प, जि. सिंधुदूर्ग	५८	९१
९	अरुणा प्रकल्प, जि. सिंधुदूर्ग	९३	९९
१०	नरडवे प्रकल्प, जि. सिंधुदूर्ग	१०१	१०८
११	सरंबळा प्रकल्प, जि. सिंधुदूर्ग	१०९	११३
	ठेव तत्वावरील कामे		
१	काळू पाणीपुरवठा प्रकल्प, जि. ठाणे	११७	११८
२	शाई पाणीपुरवठा प्रकल्प, जि. ठाणे	११९	१२०
३	सुसरी पाणीपुरवठा प्रकल्प, जि. ठाणे	१२१	१२१
४	बाळगंगा पाणी पुरवठा प्रकल्प, जि. रायगड	१२३	१२६

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव - सूर्या मोठा प्रकल्प,		तालुका- विक्रमगड,		जिल्हा- ठाणे
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हे.)	२७१८८	निर्मित सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हे.) जुन २०१२		२३१०७
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची-सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	मूळ प्रशासकीय मान्यता	०१/०९/१९७४	१९७२-७३	१८.९१	२३४५१
	सुप्रमा-१	०६/०८/१९७७	१९७६-७७	२५.७४	२३४५१
	सुप्रमा-२	२९/४/१९८६	१९८४-८५	७७.०४	२७१८८
	सुप्रमा-३	२६/९/१९९४	१९९०-९१	१४५.९०	२७१८८
	सुप्रमा-४	२६/३/२००३	१९९५-९६	२२८.२२	२७१८८
	सुप्रमा-५	०१/०९/२००४	२००१-०२	३७९.२६	२७१८८
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (रु.कोटी)				
	अ) TAC clearance Ref.	केंद्रीय जल आयोगाचे इग्रजी पत्र क्र. १५ (१) (१४)/ ७५-१/, दि.२६/९/१९७५ अन्वये मान्यता मिळाली आहे. (रु.१९.३५ कोटी)			
	ब) Invesment clearance Ref.	--			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		रु.४३०.०१(रु.३३३.६९ +रु.९६.३३ NPV) (रू.९६.३३ कोटी MMRDA कडून प्राप्त)		
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)		११५.४४		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		२३१.४७		
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)		८३.१०		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९७३-७४		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष/ त्यावेळेची किंमत (रु.कोटी)		मे १९७५/२१.७०		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		रु. ३६०.३५ (३७९.२६ - १८.९१)		
			रक्कम (रु.कोटी)		टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ		१९७.४६		५४.८०

७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (३२.८९-१.००)	३१.८९	८.८५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	४६.६२	१२.९४
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	१३.४९	३.७४
७.५	इतर कारणे	७०.८९	१९.६७
८	प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक)		
८.१	भू-संपादन,पुनर्वसन, वन जमिन संपादन	धरणासाठी करावयाचे खाजगी भूसंपादन (१०७८.४१ हे.) व पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण. कालव्यासाठी करावयाचे खाजगी भूसंपादनाच्या एकूण ८५६.४९ हे. क्षेत्रापैकी ४९३.५९ हे. क्षेत्र संपादीत झाले असून ३६३.९० हे. क्षेत्राच्या भूसंपादनाची प्रक्रीया प्रगती पथावर असून भूसंपादनाचे ७५ प्रस्ताव विविध टप्प्यावर आहेत. धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या वनजमीनीपोटी (१०९५.४०९ हे.) भरावयाची NPV रक्कम रु.१०१.२३ कोटी पैकी रू.८५ कोटी वनविभागास अदा करण्यात आली असून रू.१६.२३ कोटी अदयाप अदा करावयाची आहे.तसेच कालव्यासाठी संपादित करावयाच्या वनजमीनीपोटी (१९५.२६५ हे.) भरावयाची रक्कम रु.१४.२५ कोटी पैकी रू.१२.९७ कोटी वनविभागास अदा करण्यात आली असून रू.१.२८ कोटी अदयाप अदा करावयाची आहे. वन जमीन प्रस्तावास अंतिम मान्यता मिळणेसाठी अद्यापही रु.१७.५१ कोटी इतकी एनपीव्ही रक्कम भरणे बाकी आहे.	
८.२	धरण	धरणाचे बांधकाम सन १९९० मध्ये पूर्ण बुडीत क्षेत्रातील वनजमीन हस्तांतरणास मान्यता न मिळाल्याने २८५.३१ दलघमी साठवण क्षमता निर्माण होऊन सुद्धा फक्त सांडवा माथा पातळी पर्यंत १७५.४८३ द.ल.घ.मी. पाणीसाठा करता आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त रु.९६.३३ कोटी रक्कम वनविभागास वनमत्तामुल्य (NPV) म्हणून अदा केल्यानंतर सन २००९ पासून पूर्ण संचय पातळी पर्यंत पाणीसाठा करण्यात येत आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवथा	उजवा तीर कालव्याची लांबी २८. ५१ कि.मी असूा सदर कालव्याचे वितरणप्रणालीसह १०० टक्के काम पूर्ण झाले असून १८२०० हेक्टर (पीकक्षेत्र) सिंचा क्षमता निर्माण झाली आहे. डावा तीर कालव्याची लांबी ४७ कि.मी .असून सदर कालव्याच्या ३३ कि.मी लांबीतील काम वितरणप्रणालीसह १०० टक्के पूर्ण झाले असून ४९०७ हेक्टर (पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उर्वरीत कि.मी. ३४ ते ४७ या १४ कि.मी . लांबीतील ४०८१ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती वाजमीन हस्तांतरण पूर्ण झाले नसल्याने होऊ शकले नाही.	

सूर्या मोठा पाटबंधारे प्रकल्प, ता. विक्रमगड, जि. ठाणे
७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशील

७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलांमुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)	मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात अस्तरीकरण विरहित कालवे प्रस्तावीत करुन २३४५१ हे.(पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सदर कालव्यासाठी मुखाशी सोडलेल्या विसर्गाच्या २५% वहनव्यय गृहीत धरण्यांत आला होता. तथापि द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करतांना डावा, उजवा तीर कालवा व त्यावरील शाखासह १२६.०३ कि.मी.लांबीस अस्तरीकरण प्रस्तावित करण्यांत आले. अस्तरीकरणामुळे कालव्यामधील वहनव्यय कमी झाल्याने ३७३७ हे. (पीकक्षेत्र) अतिरिक्त क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले.सदर उपलब्ध पाण्यातून ३७३७ हे.क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी डावा तीर कालव्याचे कि.मी.३४ ते ४७ असे १४ कि.मी.लांबी वाढविणे प्रस्तावित केले गेले.सदर वाढीव कालवा कामासाठी रु.४६.६२ कोटी रकमेची वाढ झाली आहे. सदरच्या कालवा लांबीतील वाढीमुळे प्रकल्पाची सिंचन क्षमता २३४५१ हेक्टर (पीकक्षेत्र) वरुन २७१८८ हेक्टर (पीकक्षेत्र) झाली.
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावात कालव्याच्या मुखाशी सोडलेल्या विसर्गाच्या २५% वहनव्यय गृहीत धरण्यांत आला होता. सदर वहनव्यय कमी करणेसाठी कालव्याचे अस्तरीकरण प्रस्तावित करुन अस्तरीकरणासहित कालवा संकल्पन करण्यात आले. सदर अस्तरीकरण कामासाठी रु. १३.४९ कोटी इतक्या रक्कमेची वाढ झाली आहे.
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावात ई.टी.पी. चार्जेस रु.१.५० कोटी इतकी घेण्यात आले आहेत. सूर्या प्रकल्पांतर्गत ३० वर्षामध्ये वसाहत, पाणीपुरवठा, वैद्यकीय सुविधा, दुरुस्ती, देखभाल व प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इत्यादीसाठी बाबीवर रु.६९.६२ कोटी या पैकी आस्थापना खर्चात रु.६५.२६ कोटी तर Ordinary T & P खर्चात रु.४.३६ कोटी तसेच स्पर्धात्मक बोलीने आलेल्या अधिकच्या दराने निविदा स्वीकृतीमुळे रु.१.२८ कोटी अशी एकूण रु.७०.८९ कोटी वाढ झाली आहे.

सूर्या मोठा प्रकल्प
टिप्पणी

- सन १९७२-७३ च्या दरसुचीनुसार रु.१८.९१ कोटी किंमतीचे अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र. पी.आय.एन.६७७३/२३९११-आय.पी.(आय) दि.९/१/१९७४ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली.
- यानंतर धरणाचे काम मे १९७५ व कालव्याची कामे मे १९७६ मध्ये सुरू करण्यांत आले.

अ.क्र.	तपशिल	आकडेवारी
१	सिंचन	२७१८८ हेक्टर (पीक क्षेत्र)
२	एकूण साठा (धामणी व कवडास)	२९९.०१ दलघमी / १०.५६ TMC
३	उपयुक्त साठा (धामणी व कवडास)	२८६.३१ दलघमी /१०.११ TMC

- सन २००१-०२ च्या दरसुचीनुसार रु.३७९.२६ कोटी किंमतीचे अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र. सूर्या/सूप्रमा/०९०२/(४६३/२००३)/मोप्र-१, दि.९.१.२००४ अन्वये पाचवी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

- **प्रकल्पाची सद्यःस्थिती :-**

१	सूर्या धरण	काम पुर्ण, पुर्ण संचय पातळीपर्यंत पाणीसाठा २९९.०१ दलघमी./१०.५६ TMC
२	विद्युतगृह	६ मे.वॅट क्षमतेचे विद्युतगृह १९९९ मध्ये पुर्ण २००२ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस हस्तांतर मार्च २०१२ पर्यत विजनिर्मिती १७४ दशलक्ष युनिटस्.
३	उजवा कलवा	२८.५१ कि.मी. काम पूर्ण. वितरण व्यवस्था पूर्ण सिंचन क्षेत्र निर्मिती १८२०० हे. (पीक क्षेत्र)
४	डावा कालवा	एकूण लांबी ४७ कि.मी. त्यापैकी ३३. कि.मी. काम पूर्ण एकूण निर्मित सिंचन क्षेत्र ४९०६ हे. (पीक क्षेत्र) उर्वरित १४ कि.मी. लांबीच्या कालव्याचे काम वनजमीन संपादन न झाल्यामुळे सुरु करण्यात आलेले नाही. त्यामुळे ४०८२ हे. (पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्माण झाली नाही.

- **पाणी मंजूरी व वापर :-**

पाणी वापर संस्था	**मंजूर पाणी साठा (द.ल.घ.मी./ TMC)**	**प्रत्यक्ष पाणी वापर (द.ल.घ.मी./ TMC)**
अ) औद्योगिक पाणी वापर		
१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर	१७.२६/ ०.६०८	१७.२६/ ०.६०८
२) मुंबई उपनगरीय विद्युत पुरवठा	२.०० /०.०७	२.०० /०.०७
३) तारापूर अतिरिक्त अणुभट्टया	४.४७/०.१५७	२.४५/०.०८६५
४) तारापूर अतिरिक्त अणुभट्टया	२.२३५/०.०८	२.२३५/०.०८
५) मे. युनिव्हर्सल कॅप्सूल	०.२२/०.००७	०.००/०.००
एकूण अ)	**२६.१८/०.९२४**	**२३.९४/०.८४५**
ब) घरगुती पाणी वापर		
१) डहाणू पाणी पुरवठा	३.३१ /०.११६	३.३१ /०.११६
२) वसई-विरार पाणी पुरवठा	३६.५/१.२८९	३६.५/१.२८९

३) पालघर पाणी पुरवठा	२.००/०.०७०	२.००/०.०७०
४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर	१०.१४/०.३५२	१०.१४/०.३५२
५) चहाडे व नगावे ता.पालघर	०.२४/०.००८	०.००/०.००
६) दाभोण पाणी पुरवठा ता.डहाणू	०.१३६/०.००४	०.००/०.००
७) वाढीव दांडी ग्रा.पा.पु.यो.	०.३८/०.०१३	०.००/०.००
८) वाडा-पोफरण ग्रा.पा.पु.यो	१.७०/०.०६	०.००/०.००
९) मुं.म.प्र.वि.प्राधिकरण	४२.६५/१.६५०६	०.००
१०) मिरा भाईंदर महापालिका	३६.५०/१.२८८	०.००
११) मुं.म.प्र.वि.प्राधिकरण	६७.१८/२.३७२	०.००
एकूण ब)	**२००.७९/७.०९**	**५१.९५/१.८३४**
एकूण (अ व ब)	**२२६.९७/८.०१४**	**७५.८९/२.६७९**

उपरोक्त औद्योगिक व घरगुती पाणी वापरामुळे शासनास सन १९८२ ते मार्च २०१२ पर्यंत बिगर सिंचनांतर्गत रु.१५८.१८ कोटी व सिंचनांतर्गत रु.०.८२ कोटी असा एकूण रु.१५९ कोटी महसूल प्राप्त झाला आहे.

- **लाभक्षेत्र :-** सूर्या प्रकल्पांतर्गत एकूण २७१८८ हे. (पीकक्षेत्र) क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यापैकी जुन-२०१२ पर्यंत. २३१०७ हे (पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. सन २००६-०७ या वर्षात जास्तीत जास्त ४३०० हे.सिंचन झाले आहे. सन २०११-१२ या वर्षात २३१७ हे. सिंचन झाले आहे.
- **मुळ मंजूरीच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे :-** रु.३६०.३५ कोटी (रु.३७९.२६ - रु.१८.९१) पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ३७९.२६ कोटी (दरसुची -२००१-०२)

अ.क्र.	वाढीची करणे	वाढ रक्कम (रु.कोटी)	टक्के
१	दरसुची बदल	१९७.४६	५४.८० %
२	भूसंपादन वाढ	३१.८९	८.८५ %
३	व्याप्तीतील बदल	४६.६२	१२.९४%
४	संकल्पचित्र बदल	१३.४९	३.७४ %
५	इतर कारणे	७०.८९	१९.६७ %
	एकूण	**३६०.३५**	१००%

१) दरसुचीतील वाढ :- मुळ अंदाजपत्रक सन-१९७२-७३ च्या दरसुचीवर आधारित आहे. पाचवे सुधारित प्र.मा. अंदाजपत्रक सन-२००३-०४ च्या दरसुचीवर आधारित आहे. या ३० वर्षातील दरसुचीतील वाढ रु.१९७.४६ कोटी आहे.

२) भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिनी संपादनामुळे वाढ :- मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात भूसंपादन / पुनर्वसन/ वनजमिन संपादनासाठी रु.१.०० कोटी इतक्या रक्कमेची तरतुद करण्यांत आली होती. सूर्या प्रकल्पाचे काम १९७५ मध्ये सुरु झाले सूर्या प्रकल्प अंतर्गत ११ गावांचे पुनर्वसन १९८५ साली पूर्ण झाले.तसेच खाजगी जमिन संपादनाच्या एकूण २६१ प्रस्तवापैकी १८६ प्रस्तावाचे अंतिम निवाडे झाले असून अद्यापही ७५ प्रस्ताव भूसंपादन प्रक्रियेच्या विविध टप्यांवर प्रगती पथावर आहे. यामुळे एकूण रु. ३१.८९ कोटी वाढ झाली आहे.

सन १९९० मध्ये धरणाचे काम पूर्ण झाले तथापी बुडीत क्षेत्रातील वनजमीन हस्तांतरणास मान्यता नसल्याने पूर्ण साठवण क्षमतेने (२८५.३५ दलघमी) एवढा पाणी साठा करता आला नाही.

सन २००९ मध्ये मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांनी पिण्याचे पाणी देण्याच्या अटीवर वनविभागास अदा करावयाचे वनमत्ता मुल्य (N.P.V.) रक्कम रु.९६.३३ कोटी शासनास दिले. सदर वनमत्ता मुल्य रक्कम वनविभागास सन २००९ मध्ये अदा केल्यानंतर सन २००९ पासून धरणात पूर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यात येत आहे. तथापी दरम्यानच्या काळात वनमत्ता मुल्य (N.P.V.) रक्कम सुधारीत दराने लागू केल्यामुळे (रु.२.९३ कोटी) तसेच पर्यायी वनीकरणाची उर्वरीत रक्कम (रु.२.६० कोटी) व दंडात्मक वनीकरणाची रक्कम (रु.१३.६२ कोटी) अशी एकूण रु.१९.१५ कोटी इतकी वाढीव रक्कम वनविभागास अदा करणे बंधनकारक झाले. त्यापैकी रु.१.६४ कोटी रक्कम वनविभागास अदा करण्यात आली असून रु.१७.५१ कोटी रक्कम वनविभागास अदा करणे बाकी आहे.

३) व्याप्तीतील बदल व त्याची सविस्तर कारणे :- मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात अस्तरीकरण विरहित कालवे प्रस्तावीत करुन २३४५१ हे.(पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सदर कालव्यासाठी मुखाशी सोडलेल्या विसर्गाच्या २५% वहनव्यय गृहीत धरण्यांत आला होता. तथापि द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करतांना डावा, उजवा तीर कालवा व त्यावरील शाखासह १२६.०३ कि.मी.लांबीस अस्तरीकरण प्रस्तावित करण्यांत आले. अस्तरीकरणामुळे कालव्यामधील वहनव्यय कमी झाल्याने ३७३७ हे.(पीकक्षेत्र) अतिरिक्त क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले.सदर उपलब्ध पाण्यातून ३७३७ हे.क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी डावा तीर कालव्याचे कि.मी.३४ ते ४७ असे १४ कि.मी.लांबी वाढविणे प्रस्तावित केले गेले.सदर वाढीव कालवा कामासाठी रु.४६.६२ कोटी इतक्या किमंतीची तरतूद करण्यात आली.सदरच्या कालवा लांबीतील वाढीमुळे प्रकल्पाची सिंचन क्षमता २३४५१ हे. (पीकक्षेत्र) वरुन २७१८८ हे. (पीकक्षेत्र) झाली.

४) संकल्पचित्र/तांत्रिक बदलाचा तपशिल :- मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावात कालव्याच्या मुखाशी सोडलेल्या विसर्गाच्या २५% वहनव्यय गृहीत धरण्यांत आला होता. सदर वहनव्यय कमी करणेसाठी कालव्याचे अस्तरीकरण प्रस्तावित करुन अस्तरीकरणासहित कालवा संकल्पन करण्यात आले. सदर अस्तरीकरण कामासाठी रु. १३.४९ कोटी इतक्या रक्कमेची वाढ झाली आहे.

५) इतर कारणे :- प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावात ई.टी.पी. चार्जेस रु.१.५० कोटी इतकी घेण्यात आले आहेत. सूर्या प्रकल्पांतर्गत ३० वर्षामध्ये वसाहत, पाणीपुरवठा, वैद्यकीय सुविधा, दुरुस्ती, देखभाल व प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इत्यादीसाठी बाबीवर रु.६९.६२ कोटी या पैकी आस्थापना खर्चात रु.६५.२६ कोटी तर Ordinary T & P खर्चात रु.४.३६ कोटीची तसेच जास्त दराने निविदा स्वीकृतीमुळे रु.१.२८ कोटी असा एकूण रु.७०.८९ कोटी इतकी वाढ़ झाली आहे.

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव :- भातसा मोठा प्रकल्प		ता. शहापूर		जि. ठाणे
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (पीक क्षेत्र हे.) : ४२५५०			निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ अखेर (पीक क्षेत्र हे.) : १३८१२	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (पीक क्षेत्र हे.)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२८.६.१९६७	१९६५-६६	१३.६८	---
	सुप्रमा-१	२२.३.१९७२	१९६९-७०	१६.३४	१०९१५ (टप्पा-१)
	सुप्रमा-२	६.६.१९८१	१९७७-७८	२८.६०	१०९१५
	सुप्रमा-३	१.१२.१९८३	१९७९-८०	७९.६६	४२५५० (टप्पा-२)
	सुप्रमा-४	२९.६.२००२	१९९४-९५	३५८.२५	४२५५०
	सुप्रमा-५	१२.१०.२००७	२००३-०४	७६८.१०	४२५५०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता				
	अ) TAC Clearance Ref.	सन १९७९-८० च्या दरसुचीवर आधारीत रू.७९.६६ कोटी रकमेस केंद्र शासनाचे पत्र दि.२८/११/१९८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली			
	ब) Investment Clearance Ref.	सन १९७९-८० च्या दरसुचीवर आधारीत रू.७९.६६ कोटी रकमेस केंद्र शासनाचे पत्र दि.२८/११/१९८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			४६३.१४	
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)			१६.१३	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			३७४.५३	
४.४	इ.टी.पी. खर्च (रु.कोटी)			७२.४८	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९६९	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळची किंमत			१९६९/रु.१६.३४ कोटी	
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे			रु.७५४.४२ कोटी (रु.७६८.१०कोटी - रु.१३.६८कोटी)	
				रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			३३८.२४	४४.८३
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (रु.१३३.६३ कोटी - रु.०.७१ कोटी)			१३२.९२	१७.६२
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			८१.१०	१०.७५
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			४९.४४	६.५५
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)			१५२.७२	२०.२५
८	प्रकल्पाची सद्यस्थिती (भौतिक)				

८.१	भू-संपादन,पुनर्वसन,वन जमिन संपादन	भातसा धरण खाजगी जमिन ४४६ हे, वनजमिन २६२५ हे, भातसा उजवा कालवा खाजगी जमिन २७५ हे, वनजमिन १०९ हे प्राप्त झाली आहे. उर्वरीत ६८१ हे वनजमिन प्रस्तावास तत्वतः मान्यता प्राप्त.
८.२	धरण	भातसा धरणाचे काम वक्राकार दरवाजे बसवुन सन २००५ मध्ये पुर्ण केले आहे. धरणात ९७६.१० द.ल.घ.मी. (३४.४७ TMC) पाणीसाठा आहे. भातसा प्रकल्पांतर्गत मुमरी धरणाचे काम वनजमिन प्राप्त नसल्याने चालु नाही.
८.३	कालवा व वितरण व्यवथा	**उजवा कालवा :-** एकूण ६७ कि.मी पैकी कि.मी.३३ पर्यन्त १०० टक्के पुर्ण, कि.मी ५४ पर्यन्त मुख्य कालवा पुर्ण (८०.६० टक्के पुर्ण) उर्वरीत कामे वनजमिन प्रस्तावास अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याने चालु नाहीत. **डावा कालवा :-**एकूण ५० कि.मी. पैकी कि.मी.२ पर्यन्त पुर्ण (४ टक्के), उर्वरीत कामे वनजमिन प्रस्तावास अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याने सुरू केलेली नाही.

भातसा पाटबंधारे प्रकल्प

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढः-

- भातसा प्रकल्पांअतंर्गत मुळ प्रशासकीय मान्य अंदाजपत्रकात मुंबई महानगरपालिकेस ४५५ दललि/दिन पाणी पुरवठा करण्यासाठी धरण बांधण्याबाबत प्रस्तावित होते.तदनंतर दुसऱ्या प्र.मा. अंदाजपत्रकात १०९१५ हे सिंचन क्षेत्रास पाणी देण्यासाठी तरतुद करण्यात आली.

- तिसरे सुधारीत प्र.मा. वेळी उपलब्ध पाण्याचा अभ्यास करून मुंबई मनपास १३६५ दललि/दिन पाणी व उजव्या व डाव्या कालव्याव्दारे ४२५५० हे क्षेत्राचे सिंचन करणे व मुंबई मनपास पाणी देताना १५ मे.वॅट विज निर्मिती प्रस्तावित करण्यांत आली.

- यामध्ये धरणाच्या पाणीसाठयात वाढीसाठी रु.३८.३४ कोटी, कालव्याच्या लांबीत झालेल्या वाढीसाठी रु.२५.१८ कोटी व मुमरी धरणासाठी रु. १७.५८ कोटी असून एकूण रु.८१.१० कोटी वाढ आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

- भातसा धरणाजवळ खर्डी येथे १९८३ मध्ये झालल्या भुंकंपामुळे मसंसं ने भातसा धरणाच्या संकल्पीत काटछेदात सुधारणा करून माथा रूंदी ७.३ मी ऐवेजी ५.५ मी करून धरणाच्या अधोबाजुस दगडी बांधकामात बटरेसेस चे बांधकाम करण्यांत आले. यासाठी रु. ११.३५ कोटी, कालव्याचे काटछेद बदलल्याने रु.१३.९२ कोटी, खळग्यातील धरणासाठी रु.१.३५ कोटी, वक्रकार द्वारे व सिंचन द्वारांसाठी रु.११.८२ कोटी, कालव्यामध्ये बोगदा व जलसेतु यासाठी रु. ११.०० कोटी या प्रमाणे एकूण रु.४९.४४ कोटी वाढ झालेली आहे.

७.५ इतर कारणे :-

- भातसा प्रकल्पांतर्गत ४० वर्षामध्ये वसाहत, पाणीपुरवठा, वैद्यकीय सुविधा, वाहनांची खरेदी, दुरुस्ती व देखभाल इत्यादीसाठी ‘O’Misc. या बाबीवर रु.२४.८१ कोटी वाढ झालेली आहे.

- विद्युत देयके (वसाहत व धरण), रस्ते, कार्यालयीन इमारती इत्यादी. देखभाल दुरुस्तीसाठी ‘P’ Maintenace या बाबीवर रु.३०.०४ कोटी वाढ झालेली आहे.

- प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन, इतर भत्ते यासाठी ETP अंतर्गत रु.९७.८७ कोटी खर्च झालेला आहे. या प्रमाणे एकूण खर्च रु.१५२.७२ कोटी वाढ झालेली आहे.

भातसा पाटबंधारे प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- मुंबई महानगर पालिकेस पाणी पुरवठा करण्यासाठी सन १९६१ मध्ये उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली. (High level committee) त्यानुसार महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. U.D.P.H. Deptt.Bombay], Letter No. CWS-1064.M Dt-17/4/1964 अन्वये 'भातसा नदी' हे स्त्रोत निश्चित केले.
- सन १९६५ च्या दरसुचीनुसार रु.१३.६८ कोटी किंमतीचे अंदाजपत्रकास पत्र क्र. U.D.P.H. Deptt. BWS-1067/W दि.२८/६/१९६७ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली.
- या मध्ये भातसा धरण एकूण पाणीसाठा ६३० दलघमी (२२.२४TMC), यापैकी ३५० दलघमी (१२.३५ TMC) ११३५ दललि/दिन या प्रमाणे मुंबई महानगर पालिकेस देण्याचे प्रस्तावित होते.
- यानंतर सदर काम दोन टप्प्यात प्रस्तावित झाले.

अ.क्र.	तपशिल	टप्पा-१	टप्पा-२
१	पाणीवापर पाणी पुरवठा	४५५ दललि/दिन (१४२.१२ द.ल.घ.मी)	१३६५ दललि/दिन (४२६.३६ द.ल.घ.मी)
२	सिंचन	१४०.४१ द.ल.घ.मी (१०९१५ हे.) पीक क्षेत्र	२८०.८२ द.ल.घ.मी (४२५५० हे.)पीक क्षेत्र
३.	एकूण साठा	२६३.९२ द.ल.घ.मी (९.१६४TMC)	९७६.१० द.ल.घ.मी (३४.४७ TMC)
४	उपयुक्त साठा	२३६.७८द.ल.घ.मी (८.३६४ TMC)	९४२.१० द.ल.घ.मी (३३.२८ TMC)
५	तलांक	१०७.०० मी.	१४२.०७ मी.

- टप्पा-१ नुसार प्रथम सुधारित अंदाजपत्रकास शासन पत्र क्र. U.D.P.H. Deptt PD/VST/6171-1084M दि.२२/३/१९७२ अन्वये रु.१६.३४ कोटी किंमतीस मंजूरी मिळाली.
- पाणीपुरवठा व पाटबंधारे विभागाने एकत्रित अभ्यास करुन खालील प्रमाणे प्रस्तावित केले.

१) मुंबई महानगर पालिकेस पाणीपुरवठा - ४५५ दललि/दिन २८५ दिवसासाठी.
२) उजवा कालवा सिंचन कि.मी.४७- १०९१५ हे. पीक क्षेत्र
३) धरणाची एकूण साठवण क्षमता- २६३.९२ दलघमी. (९.१३२ TMC)
४) या साठी खर्च रु. २१.६४ कोटी याची विभागणी

- पाणीपुरवठा - रु.१५.४८ कोटी (७१.५%)
- पाटबंधारे - रु.६.१६ कोटी (२८.५%)

यानुसार उजवा कालव्याची (४७ कि.मी. लांबी) कामे १९७४ पासून चालू झाली.

- भातसा धरणाचे काम मे. जॉली ब्रदर्स यांना मे-१९६९ मध्ये रु.४.८७ कोटी किंमतीचे देण्यात आले यामध्ये सन १९७१ मध्ये टप्पा -२ गृहित धरुन पायाचे काम करण्यात आले. यामुळे धरणाच्या कामाच्या व्याप्तीत बदल झाला. त्याचप्रमाणे १९७३ मध्ये पेट्रोलियम व कामगार यांच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याने ठेकेदारांना कराराप्रमाणे कामाची प्रगती ठेवणे शक्य झाले नाही. त्यामुळे फेब्रुवारी-१९७६ मध्ये निविदा शर्त क्र. ३ब/३क नुसार निविदा रद्द करण्यात आली. त्यानंतर खात्यामार्फत काम चालू करुन १९८० मध्ये पुर्ण करण्यात आले. (टप्पा-१) व मुंबई महानगर पालिकेस प्रथम पाणी पुरवठा चालू करण्यात आला.

- टप्पा-१ च्या शिर्षकामाचा खर्च व टप्पा-२ चा अंर्तभाव करुन सन-१९७७-७८ च्या दरसुची नुसार रु.२८.६० कोटी किंमतीच्या दुस-या सुधारित प्रशासकीय मान्य अंदाजपत्रकास पाटबंधारे विभागाचे पत्र क्र. BTC-1078/3546(3198)/MAJ-3 दि. ६/६/८१ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्यानंतर उपलब्ध पाण्याचा अभ्यास करता मुंबई म.नं. पालिकेस ४५५ दललि/दिन ऐवजी १३६५ दललि/दिन, पीक क्षेत्र १०९१५ हेक्टर ऐवजी ४२५५० हेक्टर करणे शक्य असलेबाबत निदर्शनास आले. यासाठी भातसा धरणापासून ६ कि.मी. अंतरावर मुमरी धरण प्रस्तावित करुन अतिरिक्त ६८.२० दलघमी (२.४१TMC) पाणीसाठा करणे शक्य असल्याचे दिसून आले. या सर्व बाबींचा अंर्तभाव करुन प्रकल्पाचे तिसरे सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकास सन-१९७९-८० च्या दरसुचीनुसार रु.७९.६६ कोटी किंमतीस पाटबंधारे विभागाचे पत्र क्र. BTS/1078/ 3056(1965)MAJ-3, दि.१/१२/१९८३ अन्वये मान्यता मिळाली. सदर बाब विधीमंडळाच्या निदर्शनांस आणण्यात येत आहे असे नमुद करण्यांत आलेले आहे.

- सन-१९८० मध्ये टप्पा-२ चे काम चालू करुन १९८५ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन होते. परंतु १९८३ मध्ये खर्डी येथे झालेल्या भूकंपामुळे धरणाच्या संकल्पनात सुधारणा करुन धरणाच्या अधोबाजूस बटरेसेसचे काम व त्यामुळे काटछेद बदलल्याने व वनजमिन प्राप्त होण्यास विलंब झाल्याने सदर टप्पा-२ चे काम मे-२००५ मध्ये पुर्ण करण्यात आले, यामुळे ९७६.१० दलघमी (३४.४७ TMC) पाणीसाठा करण्यात आला. यातून १३६५ दललि/दिन याप्रमाणे मुंबई महानगर पालिकेस पाणी पुरवठा चालू झाला. सिंचन क्षमता पुर्णपणे विकसित न झाल्याने सिंचनाचे शिल्लक पाणी मुंबई महानगर पालिकेस ७५५ दललि/दिन या प्रमाणे आतिरिक्त पाणी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

- तिसऱ्या प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार चतुर्थ व पंचम सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

  चतुर्थ :- शासन पत्र क्र. भातसा/१०९६/S-2033/(५८२/९६)मोप्र-१, दि.२९/६/२००२ अन्वये सन १९९४-९५ च्या दरसूचीनुसार रु.३५८.२५ कोटी

  पंचम :- शासन पत्र क्र. भातसा सुप्रमा/३०७/(१०७/२००७)मोप्र-१, दि.१२/१०/२००७ अन्वये सन २००३-०४ च्या दरसुचीनुसार रु. ७६८.१० कोटी.

  यामध्ये भातसा धरणाचा खर्च पाणीवापराच्या प्रमाणात ७७.१५ टक्के पाणीपुरवठा विभाग व २२.८५ टक्के जलसंपदा विभागाने करावयाचा आहे.त्यानुसार पाणी पुरवठा विभागाकडुन मार्च २०१२ अखेर रू.२४८.५८ कोटी इतकी रक्कम भाग भांडवली म्हणुन प्राप्त झालेली आहे.

- **भातसा धरणातील पाण्याचे नियोजनः**

एकूण पाणीसाठा –.	९७६.१० दलघमी. (३४.४७ TMC)
उपयुक्त पाणीसाठा-	९४२.१० दलघमी (३३.२८ TMC)
बाष्पीभवन-	२४.०० दलघमी. (०.८५ TMC)

भातसा धरणाचे टप्पा १ चे काम सन १९८० मध्ये पुर्ण झाल्यावर १९८० पासुन मुंबई महानगरपालिकेस ४५५ दललि/दिन याप्रमाणे पाणी देण्यास सुरवात करण्यांत आली त्यानंतर वेळोवेळी धरणात जादा पाणीसाठा निर्माण झाल्यावर खालील प्रमाणे पाणी देण्यांत आले.

अ.क्र.	कोणास दिले	परिमाण दललि/दिन	केव्हापासुन	संदर्भ	शेरा
१	मुंबई महानगरपालिका	४५५	१९८०	मुळ प्र.मा. अंदाजपत्रक	भागभांडवलाप्रमाणे
२	मुंबई महानगरपालिका	३५५	१९९५	शासन पत्र दि. ४.९.९५	अतिरिक्त
३	ठाणे महानगरपालिका	१००	२००१	शासन पत्र दि.१६.१.९८	अतिरिक्त
४	मुंबई महानगरपालिका	९१०	२००५	तृतीय सुधारीत प्र.मा.अंदाजपत्रक	भागभांडवलाप्रमाणे
५	ठाणे महानगरपालिका	१००	२००५	शासन पत्र डिसें.२००५	अतिरिक्त
६	मुंबई महानगरपालिका	३००	२००६	शासन पत्र दि.१६.५.२००६	अतिरिक्त
७	मुंबई महानगरपालिका	१००	२००९	शासन पत्र दि.६.१.२००९	अतिरिक्त

प्रत्यक्ष वापर :- सद्यस्थितीमध्ये भातसा प्रकल्पांतर्गत पुर्ण सिंचन क्षमता निर्माण न झाल्याने शिल्लक पाण्यातून ७५५ दललि/दिन पाणी मुंबई महानगर पालिकेस अतिरिक्त परंतु तात्पुरत्या स्वरुपात, ठाणे महानगर पालिकेस २०० दललि/दिन तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येते. याप्रमाणे

मुंबई म.न.पा.२१२० दललि/दिन x २८५ दिवस = ६६४.६२ दलघमी (२३.४८ TMC)

ठाणे म.न.पा. २०० दललि/दिन x २८५ दिवस = ६२.७० दलघमी (२.२१ TMC)

सिंचन = ६० दलघमी (२.१२ TMC)

एकूण = ७८७.३२ दलघमी (२७.८१ TMC) पाणीवापर

- **लाभक्षेत्र :-** भातसा प्रकल्पांतर्गत २३००० हेक्टर मुळ सिंचन क्षेत्र (पीकक्षेत्र ४२५५० हे.) आहे. जुन-२०१२ पर्यंत ७४६६ हे. (१३८१२ हे पीकक्षेत्र) सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. प्रत्यक्ष कमीत कमी सिंचन ६७९ हे. सन २००२-०३ या वर्षात व जास्तीत जास्त सिंचन २३४० हे. सन २००६-०७ या वर्षात झालेले आहे. सन २०११-१२ या वर्षात १३०५ हे. सिंचन झालेले आहे.
- **मुळ मंजूरीच्या तुलनेत किंमत वाढीची करणे :-**

मुळ किंमत रु. १३.६८ कोटी (दरसुची १९६५-६६)

पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ७६८.१० कोटी (दरसुची -२००३-०४)

अ.क्र.	वाढीची करणे	वाढ रक्कम (रु.कोटी)	टक्के
१	व्याप्तीतील बदल	८१.१०	१०.७५%
२	संकल्पचित्र बदल	४९.४४	६.५५%
३	ऱ्रसुची बदल	३३८.२४	४४.८३%
४	भूसंपादन वाढ	१३२.९२	१७.६२%
५	इतर कारणे	१५२.७२	२०.२५%
	एकूण	**७५४.४२**	

- **अ) व्याप्तीतील बदल व त्याची सविस्तर कारणे :-**

अ. क्र.	व्याप्तीतील बदलाचा तपशिल	मागणी कारणे	मंजूरीचा संदर्भ	मंजूरी किंमत (रु. कोटी)
१	धरणाच्या साठयात वाढ (२६३.९२ दलघमी ते ९७६.१०दलघमी)	मुंबई म.न.पा मागणी	शासन पत्र दि.१/१२/१९८३	३८.३४
२	सिंचन क्षमतेत वाढ (पीक क्षेत्र) (१०९१५ हे. ते ४२५५० हे.)	उपलब्ध पाणीवापर	शासन पत्र दि.१/१२/१९८३	
३	कालव्याच्या लांबीत वाढ (४७ कि.मी. ते ११७ कि.मी.)	उपलब्ध पाणीवापर	शासन पत्र दि.१/१२/१९८३	२५.१८
४	मुमरी धरण (नविन प्रस्तावित)	उपलब्ध पाणी	शासन पत्र दि.१/१२/१९८३	१७.५८
			एकूण	**८१.१०**

- **व्याप्तीतील बदलामुळे झालेले फायदे :-**
  १, धरणाचे पाणीसाठयात ७१२.१८ दलघमी वाढ होउन मुंबई महानगरपालिकेस ९१० दललि/दिन (२८५ दिवस) पाणी देणे शक्य झाले.
  २, वाढीव पाणीसाठयामुळे शहापूर, भिवंडी व कल्याण तालुक्यातील एकुण ३१,६३५ हे. (पीक क्षेत्र) इतक्या वाढीव क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देणे शक्य झाले.
  ३, वाढीव पाण्यमुळे १५ मेगावॅट विज क्षमते नुसार प्रती वर्ष ८५.५ दल युनिट वीज निर्मिती करणे शक्य झाले.

- **ब) संकल्पचित्र/तांत्रिक बदलाचा तपशिल :-**

अ.क्र.	तांत्रिक बदल	बदलाची कारणे	मंजूरी संदर्भ	रक्कम (रु.कोटी)
१	दगडी धरणास बटरेसेसचे काम करणे	भूकंप खर्डी	शासन पत्र २९/६/२००२	११.३६
२	कालव्यांचे काटछेद वाढ झाली	टप्पा-२ नुसार	शासन पत्र दि.१.१२.१९८३	१३.९२
३	खळग्यातील धरण (Saddle Dam)	टप्पा-२ नुसार	शासन पत्र दि.१.१२.१९८३	१.३४
४	वक्राकार द्वारे, सिंचन द्वारे	टप्पा-२ नुसार	शासन पत्र दि.१.१२.१९८३	११.८२
५	कालवे, बोगदा, जलसेतु	टप्पा-२ नुसार	शासन पत्र दि.१.१२.१९८३	११.००
			एकूण	**४९.४४**

- **क) दरसुची बदल :-** मुळ अंदाजपत्रक सन-१९६५-६६ च्या दरसुचीवर आधारित आहे. पाचवे सुधारित प्र.मा. अंदाजपत्रक सन-२००३-०४ च्या दरसुचीवर आधारित आहे. या ४० वर्षातील दरसुचीतील वाढ रु.३३८.२४ कोटी आहे.

- **ड) भूसंपादन व वनजमिनीमुळे वाढ :-**

भूसंपादन क्षेत्रातील वाढ	क्षेत्र (हे.)	प्रती हेक्टर किंमत	एकूण रक्कम
मुळ प्रशासकीय मान्यता नुसार	७१०	रु. १०,०००/-	रु. ०.७१ कोटी
अद्यावत सुधारित प्रशासकीय मान्यता नुसार (अतिरिक्त)	९०४ हे. खाजगी ३४१५ हे. वन	रु. १.० लक्ष वनखात्याच्या मागणी नुसार	रु.९.०४ कोटी रु.१२३.१७ कोटी

भातसा धरणाचे टप्पा १ चे काम सन १९६९ मध्ये चालु ठेवण्यात येउन सन १९८० मध्ये तलांक १०७ मी. पर्यत पुर्ण करण्यात आले. यावेळी वन कायदा १९८० अस्तित्वत नव्हता. टप्पा २ चे काम लगेच चालु करण्यात आले पण वन कायदा १९८० लागू झाल्यामुळे धरणाचे तलांक १४२.०७ मी. पर्यतचे काम पुर्ण करण्यास सन २००५ पर्यतचा कालावधी वन जमिन वेळेत ताब्यात न मिळाल्यामुळे लागला.

- **वनजमिनी संपादनामुळे वाढ :-** भातसा प्रकल्पांतर्गत मुमरी धरण, भातसा उजवा व डावा कालवा यासाठी ६८१ हे. वनजमीनीस केंद्र शासनाचे पत्र दिनांक. २/३/२००९ अन्वये मंजूरी प्राप्त होऊन रु.७६.०३ कोटी रक्कम वनमत्ता मुल्य (NPV) व इतर अनुषांगिक कामे (CAT Plan, निर्वनीकरण, सर्वेक्षण, कालव्या लगत झाडे लावणे इ. बाबी) यासाठी वनविभागाने जुलै-२००९ मध्ये मागणी केले होती. परंतु सदर निधी मार्च-२०१२ पर्यंत प्राप्त न झाल्याने त्या क्षेत्रासाठी वनविभागाने रु.११०.५६ कोटी रक्कम जमा करणेबाबत जुन-२०१२ मध्ये कळविले आहे. तीन वर्षातील वाढ रु ३४.५३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

इ) इतर कारणे :- भातसा प्रकल्पांतर्गत ४० वर्षामध्ये वसाहत देखभाल व दुरुस्ती, पाणीपुरवठा, वैद्यकीय सुविधा, वाहनांची खरेदी, दुरुस्ती व देखभाल इत्यादीसाठी 'O'Misc. या बाबीवर रु.२४.८० कोटी खर्च झालेला आहे. त्याचप्रमाणे विद्युत देयके (वसाहत व धरण), रस्ते, कार्यालयीन इमारती इत्यादी. देखभाल दुरुस्तीसाठी 'P' Maintenace या बाबीवर रु.३०.०४ कोटी वाढ झाली आहे.

प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन, इतर भत्ते यासाठी ETP अंतर्गत रु.९७.८७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**

१	भातसा धरण	काम पुर्ण, पुर्ण संचय पातळीपर्यंत पाणीसाठा ९७६.१० दलघमी (३४.४७ TMC)
२	विद्युतगृह	१५ मे.वॅट क्षमतेचे विद्युतगृह १९९१ मध्ये पुर्ण १९९७ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस हस्तांतर ३१.३.२०१२ अखेर १३५१.३१२ दलयुनिट वीज निर्मिती करण्यात आलेली आहे. भातसा नदीवर बी.ओ.टी तत्वावर मौजे सरळांबे येथे वज्रा टप्पा-१ हा ३ मे.वॅ. चा जलविद्युत प्रकल्प सन २००१ पासून कार्यान्वित असून दि.३१.३.२०१२ अखेर २०६.४ दलयुनिट वीज निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच मौजे खुटघर येथे वज्रा टप्पा-२ हा १ मे.वॅ. चा जलविद्युत प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून नोव्हेंबर-१२ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. मौजे कासगांव येथे वज्रा टप्पा-३ हा १ मे.वॅ. चा जलविद्युत प्रकल्पाचे काम ७० ट्क्के पूर्ण झाले आहे.

३	उजवा कलवा	६७ कि.मी. पैकी ५४ कि.मी. कामे पुर्ण, ३३ कि.मी. पर्यंतची वितरण व्यवस्था पुर्ण ७४६६ हे. सिंचन क्षेत्र निर्मिती
४	मुमरी धरण	वनजमिन हस्तांतरण न झाल्याने काम चालू नाही.
५	डावा कालवा	वनजमिन हस्तांतरण न झाल्याने काम चालू नाही.

सन १९८० पासून मुंबई महानगर पालिकेस ४५५ दललि/दिन पाणी पुरवठा चालू करण्यात आला. सन-२००६ पासून त्यात वाढ करुन १३६५ दललि/दिन, या व्यतिरिक्त ७५५ दललि/दिन अतिरिक्त व तात्पुरत्या स्वरुपात देण्यास सुरुवात झाली. यामुळे शासनास मार्च-२०१२ पर्यंत बिगर सिंचनांतर्गत रु. ५९८ कोटी व सिंचनांतर्गत रु.२ कोटी असा एकूण रु.६०० कोटी महसूल प्राप्त झाला आहे. मार्च-२०१२ पर्यंत प्रकल्पाचा खर्च रु.४६३.१४ कोटी आहे. म्हणजेच प्रकल्प पुर्ण होण्या आधीच प्रकल्पावरील खर्चापेक्षा जादा महसूल प्राप्त झालेला आहे.

	मुळ प्रशासकीय मान्यता नुसार	मंजूर प्रशासकीय मान्यता नुसार
एकूण किंमत	रु. १३.६८ कोटी	रु.७६८.१० कोटी
एकूण पीकक्षेत्र	काही नाही	४२५५० हेक्टर
प्रती हेक्टरी किंमत	काही नाही	रु.१.८० लक्ष/हेक्टर
लाभव्यय गुणोत्तर	---	१.९४

प्रकल्पाचे नावः- तिलारी आंतरराज्य मोठा पाटबंधारे प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१ प्रकल्पाचे नावः- तिलारी आंतरराज्य मोठा पाटबंधारे प्रकल्प			तालुका : दोडामार्ग		जिल्हा : सिंधुदुर्ग
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता पीक क्षेत्र : ९६८० हे. (महाराष्ट्र) निर्मित सिंचन क्षमता पीक क्षेत्र जून २०१२ : ७२९५ हे.				
३	प्रशासकी मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये) **महाराष्ट्र + गोवा = एकूण**
	मूळ प्रशासकीय मान्यता	१५/३/१९७९	१९७८-१९७९	४५.२०	९६८० +२४६१८ = ३४२९८
	सुप्रमा -१	१५/१/२००२	१९९३-१९९४	४८८.३३	९६८० +२४६१८ = ३४२९८
	सुप्रमा-२	१५/१/२००३	१९९९-२०००	९५२.५४	९६८० +२४६१८ = ३४२९८
	सुप्रमा-३	१९/६/२००८	२००५-२००६	१३९०.०४	९६८० +२४६१८ = ३४२९८
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता अ. TAC clearance reference	१. केंद्रीय जलआयोगाची मान्यता पत्र No.2/140/88-P.P.O.(C)346 dt. 27.3.1990 अन्वये रु. २१७.२२ कोटीस प्रदान केली आहे. २. केंद्रीय जलआयोगाची मान्यता पत्र No. 16/27/2009-PA(N)2423-2457 dt. 19.12.2009 अन्वये रु. १६१२.१५ कोटीस प्रदान केली आहे.			
	ब. Investment clearance reference	1. Planning Commission No. 2(107)97-I & CAD dt. 31.3.2000 2. Planning Commission F.No. 2(107)/2010-WR dt. 23.2.2010			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)			९३७.८५	
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/ वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)			८१.७८	
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)			७१०.५३	
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)			१४५.५४	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९७८-७९	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष /व त्यावेळची किंमत (रु.कोटी)			१९८६ / रु.२०२.०१ कोटीं	

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	**रु.१५६६.९५ कोटी (१६१२.१५ - ४५.२०)**	
		रक्कम (कोटी मध्ये)	**टक्केवारी**
७.१	दरसूचीतील वाढ	८२४.५६	५२.६२
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ (१३४.८० कोटी – ०.६७ कोटी)	१३४.१३	८.५६
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	--	--
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	३२२.९५	२०.६१
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	२८५.३१	१८.२१
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती (भौतिक)		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन	सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेली १८६.९७ हे. वनजमीन जलसंपदा विभागाच्या ताब्यात मिळाली आहे. शीर्षकामासाठी खाजगी जमीन एकूण १९३१.४९ हे. आवश्यक असून त्यापैकी १९११.२० हे. ताब्यात मिळाली आहे. कालव्यासाठी एकूण ६५५.६६ हे. जमीन आवश्यक असून ५५६.८१ हे. जमीन संपादीत करण्यात आली आहे. उर्वरित सुमारे १०० हे. आवश्यक असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पुनर्वसनासाठी १०९.७४ हे. क्षेत्र संपादीत झाले आहे. या प्रकल्पासाठी लागणारी ५९.९२ हे. शासकीय जमीन ताब्यात मिळाली आहे. बुडीत क्षेत्रात ७ गांवे पूर्णतः व २ वाड्या अंशतः बाधित होत असून त्यांच्या पुनर्वसनासाठी ८ ठिकाणी वसाहती निर्माण केलेल्या असून प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झाले आहेत. सर्व गावठाणे जिल्हा परिषदेकडे दि. २८.२.२०१२ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहेत.	
८.२	धरण	धरणाचे काम जून-२००९ मध्ये पूर्ण होऊन प्रकल्पीय पाणीसाठा ४६२.१७ द.ल.घ.मी. (१६.३२ टि.एम.सी.) १०० टक्के निर्माण झाला आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र हद्दीतील डावा कालवा १८.७९९ कि.मी. लांबीचा असून त्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. या कालव्यावर २७४२ हे. पीक क्षेत्र सिंचन निर्मिती झाली आहे. महाराष्ट्र हद्दीतील उजवा कालवा २४.६९२ कि.मी. लांबीचा असून त्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले	

		आहे. या कालव्यावर ११९९ हे. पीक क्षेत्र सिंचन निर्मिती झाली आहे. जोड कालवा ३.५३ कि.मी. १०० टक्के पूर्ण झाला आहे. बांदा शाखा कालवा ५७ कि.मी. लांबीचा असून कि.मी. १ ते २९ मधील कामे पूर्ण झाली आहेत. कि.मी. ३० ते ४० मधील कामे प्रगतीपथावर असून कि.मी. ४१ ते ४८ मधील कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तथापि भूसंपादना अभावी गेले दोन वर्षापासून काम चालू करता आलेले नाही. कि.मी. ४९ ते ५७ पर्यंतची अंदाजपत्रके करणेची कार्यवाही चालू आहे. बांदा शाखा कालव्यावर एकूण ३३५४ हे. पीक क्षेत्र सिंचन निर्मिती झाली आहे.

तिलारी आंतरराज्य मोठा पाटबंधारे प्रकल्प
अ.क्र. ७.४ ते ७.५ चा सविस्तर तपशील

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

❖ मुख्य माती धरण व सांडवा :

- मुख्य धरणाच्या मुळ प्रशासकीय मान्यता अहवालात मुख्य माती धरणात क्षितीज समांतर गाळकांची (Horizontal Sand mat & inclined sand filter) तरतूद नव्हती. धरणाचे माती गुणधर्माच्या आधारे धरण काटछेदात अधोबाजूकडील व उर्ध्व बाजूकडील भरावात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी क्षितीज समांतर गाळके प्रस्तावित केली आहेत. तसेच अश्मपटलाचे खाली वाळू व खडीचा थर सुधारीत संकल्पित करण्यात आले.

- मूळ प्रस्तावानुसार साध्या पध्दतीचा विमोचक होता. तथापि शासनाच्या धोरणानुसार विद्युत निर्मिती करणेसाठी सिंचन तथा विद्युत विमोचकाचे तरतूद करण्यात आली. त्यामुळे Trash rack arrangement सर्जवेल, बोगदा अस्तरीकरण इत्यादीबाबीमुळे खर्चात वाढ झाली.

- जलरोधक खंदकातील खोदाईच्या परिमाणात वाढ झाली आहे.

- खळग्यातील दगडी धरणाच्या अधोबाजूस बाजूस Stilling Basin ची तरतूद होती. त्या ऐवजी Flip bucket ची तरतूद केलेली आहे.

- मूळ प्रकल्प अहवालानुसार खळग्यातील दगडी धरणाचे बांधकाम U.C.R. Masonry मध्ये प्रस्तावित होते. त्या ऐवजी कोलग्राऊट बांधकाम करण्यात आले. तसेच उत्सारीत भागात उर्ध्वबाजूस कोलग्राऊट बांधकामाऐवजी ३.०० मी. रुंदीचे एम-२० संधानक करण्यात आले.

- उर्जा व्ययसाठी पुच्छ कालव्यावरील ५ प्रपाताची नविन तरतूद मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडील संकल्पनानुसार केली आहे. त्यामुळे खोदकामात वाढ झाली.

❖ कालवे :

- कालव्याच्या कामामध्ये मो-यांची बांधकामे करताना पायासाठी कठिणभूस्तर ब-याचशा ठिकाणी आढळून आला नाही.

- सलोह संधानकातील मंजूषापेटी (R.C.C. Box) जलसेतूच्या पायाकरीता कठिणस्तर न लागल्याने Pile foundation घ्यावे लागले, उजवा कालवा व बांदा शाखा कालवा येथे डोंगर ओलांडण्यासाठी बोगदे काढावे लागले.

- कालवा काही ठिकाणी २०-२५ मी. खोल खोदाईतून तसेच डोंगराच्या कडेने जात असल्याने खोदकामास उतारावर बर्म द्यावे लागले. त्यामुळे खोदकामाच्या परिमाणामध्ये वाढ झाली.

- मूळ प्रकल्प अहवालात अस्तरीकरणाची तरतूद नव्हती. आता सर्व कालवा, शाखा कालवा, वितरीकांना भौगोलिक परिस्थितीनुसार व पाझराचे प्रमाण पहाता अस्तरीकरण केले आहे.

- कालव्याच्या काही खोल खोदाईच्या भागातील बाजू ढासळत असल्याने त्याभागात पाईप लाईन, आर.सी.सी. बॉक्स व संरक्षक भिंत इत्यादी बांधकामे करण्यात आली.

- तिलारी प्रकलपाचा भाग अतिपर्जन्यवृष्टी मध्ये येतो. (सरासरी ४५०० मी.मी.) त्यामुळे डोंगरावरील पावसाचे पाणी कालव्यात वाहून येऊन कालव्याचे नुकसान होऊ नये म्हणून ठिक ठिकाणी

अतिवाहकाचे बांधकामे करुन त्या पाण्यास योग्य मार्ग तयार करुन सुस्थितीत नाल्यात सोडावे लागले. तसेच मो-यांची संख्या वाढवावी लागली आहे.

- कालवा खोदकाम केल्याने शेतक-यांच्या बरेच गांव रस्ते व पायवाटा बंद झाल्याने त्यांची आवश्यकता व मागणीनुसार गांवपूल, फूटब्रीज बांधावे लागले.

- मूळ अंदाजपत्रकात बांदा शाखा कालवा कि.मी. १ ते ४७ इतक्या लांबीचे कालवा प्रस्तावित होता. तथापि प्रत्यक्ष सर्वेक्षणानुसार त्याची लांबी ५७ कि.मी. करण्याचे प्रस्तावित केले. त्यामुळे कालव्याची लांबी १० कि.मी. वाढल्याने खर्चात वाढ झाली.

७.५ इतर कारणे :

- महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ अंतर्गत पर्यायी शेत जमीनी ऐवजी रु. १३.७५ कोटी रोख रकमेचे वाटप मंत्रीमंडळाच्या दि. २६.११.२००२ रोजीच्या बैठकीतील मान्यतेने केले.

- धरणाच्या घळभरणीवेळी कॉफर डॅम बांधण्यात आला. तसेच पाणी वळविणेसाठी सांडव्याच्या भागात Pilot cut काढावा लागल्याने जादा खर्च झाला.

- प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन हस्तांतरणाच्या विलंबामुळे प्रकल्पाच्या बांधकाम खर्चामध्ये वाढ झाली आहे.

- केंद्रे बुद्रुक व केंद्रे खुर्द ही दोन गांवे तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या मुख्य धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेर आहेत. त्यांना दळणवळणाची सोय रहात नसल्याने या दोन गावांचे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्यास शासनाने दि. २६.३.२००४ च्या पत्रान्वये मंजूरी दिली. त्यामुळे पुनर्वसन खर्चात वाढ झाली.

- घटक भागाच्या स्पर्धात्मक दरानुसार अधिक दराची निविदा स्विकारल्यामुळे व निविदा शर्तीनुसार देय भाववाढ, आस्थापना खर्च इत्यादी प्रमख बाबीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

तिलारी आंतरराज्य मोठा पाटबंधारे प्रकल्प
टिप्पणी

- **मूळ प्रशासकीय मान्यता :** सन १९७८-७९ च्या दरसूचीवर आधारीत रु. ४५.२० कोटी रक्कमेस महाराष्ट्र शासन पत्र क्र. पी.आय.एम./६६७९/(१७३६)/जसं-१, दि. १५.०३.१९७९ अन्वये मान्यता मिळाली.

- **केंद्रीय जल आयोगाची मान्यता :** सन १९८७-८८ च्या दरसूचीवर आधारीत रु. २१७.२२ कोटी रक्कमेस केंद्रीय जलआयोग नवी दिल्ली यांच्या तांत्रिक सल्लागार समितीने इंग्रजी पत्र क्र.२/ १४०/८८-पी.पी.ओ.(सी)/३४६, दिनांक २७.०३.१९९० नुसार मान्यता दिलेली आहे.

- **प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता :** सन १९९३-९४ च्या दरसूचीवर आधारीत रु. ४८८.३३ कोटी रक्कमेस शासन पत्र क्र. शा.नि.पा.वि.क्र.तिलारी-८९५/सा-२१६०/५३८/९५/भाग-२/ मोप्र-१/मंत्रालय, मुंबई दि. १५.०१.२००२ नुसार मान्यता दिलेली आहे.

- **व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता :** सन १९९९-२००० च्या दरसूचीवर आधारीत रु. ९५२.५४ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र. तिलारी-०३०२/१०३०/(१९२/२००२)मोप्र (१) पा.वि. दि. १५.१.२००३ अन्वये मान्यता मिळाली.

- **तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता :** सन २००५-०६ च्या दरसूचीवर आधारीत रु. १३९०.०४ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र. तिलारी-११०७/१२९७/(६१०/२००७)/मोप्र(१) दि. १९.६.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

- **राज्य वित्त आयोगाची मान्यता :** सदर प्रकल्पास सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत रु. १६१२.१५ कोटी रक्कमेस राज्य वित्त आयोगांने त्यांचे इंग्रजी पत्र क्र. तिलारी-१००९/ (५६५/२००९)मोप्र-१, जलसंपदा विभाग, मुंबई दि.११.११.२००९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

- **केंद्रीय जलआयोगाची मान्यता :** सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत रु. १६१२.१५ कोटी रक्कमेस तांत्रिक सल्लागार समिती यांचेकडून इंग्रजी पत्र क्र.१६/२७/२००९-पीअे(एन)/२४२३-२४५७, दि. १९.१२.२००९ अन्वये मान्यता दिली आहे.

- **केंद्र शासनाची गुतवणूकीस मान्यता :** केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाचे पत्र क्र. 2(107)97-I & CAD दि.३१.३.२००० व सुधारित मान्यता पत्र क्र. 2(107)/2010-WR दि.२३.२.२०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- **पर्यावरण मान्यता :** तिलारी पाटबंधारे प्रकल्पास पर्यावरण व वन मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. १२-१७/८१ आयए-आय दि. ३.०८.१९९९ अन्वये पर्यावरण विषयक मान्यता प्राप्त झाली आहे.

- तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प हा महाराष्ट्र व गोवा राज्यांचा संयुक्त प्रकल्प आहे.

- दोन्ही राज्यांमधील आंतरराज्य करार दि. ६.०४.१९९० रोजी झाला. त्यानुसार प्रकल्पाच्या सामाईक कामाच्या खर्चाचा हिस्सा अनुक्रमे गोवा व महाराष्ट्र राज्याने ७३.३% व २६.७% या प्रमाणात करावयाचा आहे. मार्च-२०१२ अखेर सामाईक कामाच्या खर्चाच्या प्रमाणात गोवा शासनाकडून हिश्याची रक्कम रु. ४९१.०४६ कोटी आहे.

- या प्रकल्पापासून एकूण ३४२९८ हेक्टर पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यापैकी गोवा राज्यातील २४६१८ हेक्टर पीकक्षेत्र असून महाराष्ट्र राज्यातील ९६८० हेक्टर पीक क्षेत्र आहे.

- या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील ३३ गावांना व गोवा राज्यातील पेडणे, बारदेश व डिचोली तालुक्यातील ७३ गावांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

- या प्रकल्पामुळे ४६२.१७ द.ल.घ.मी. (१६.३२ टि.एम.सी.) पाणी साठा निर्माण झाला आहे. त्यातील १११.४६५ द.ल.घ.मी. (३.९३ टि.एम.सी.) पाण्याची तरतूद गोवा राज्यातील पिण्याच्या पाण्यासाठी व उद्योगधंद्यासाठी केलेली आहे.

- या प्रकल्पामुळे दोडामार्ग तालुक्यातील २७१८ हेक्टर (३९४१ हे. पीक क्षेत्र) व सावंतवाडी तालुक्यातील ३९५८ हे. (५७३९ हे. पीक क्षेत्र) असे एकूण ६६७६ हे. (९६८० हे. पीकक्षेत्र) सिंचन निर्मिती होणार आहे. यामधील दोडामार्ग तालुक्यातील २७१८ हे. (३९४१ हे. पीक क्षेत्र) व सावंतवाडी तालुक्यातील २३१३ हे. (३३५४ हे. पीक क्षेत्र) असे एकूण ५०३१ हे. (७२९५ हे. पीक क्षेत्र) सिंचन निर्माण झाली आहे. उर्वरित सिंचन क्षेत्र १६९७८ हे. (२४६१८ हे. पीक क्षेत्र) गोवा शासनाकडील आहे.

- प्रकल्पाच्या कामाच्या संनियंत्रणासाठी दोन्ही राज्याचे मा. जलसंपदा मंत्री व सचिव समाविष्ठ असलेल्या आंतरराज्य नियंत्रण मंडळाची स्थापना दि. २०.०९.१९९० रोजी झाली.

  अ. नियंत्रण मंडळाच्या एकूण तीन बैठका झाल्या, (पहिली बैठक दि. ९.०५.१९९५, दुसरी बैठक २६.१२.२०००, तिसरी बैठक दि. २१.०७.२०११)

  ब. स्थायी समितीच्या एकूण बारा बैठका झाल्या. (शेवटची बैठक दि. २०.०७.२०११)

❖ **भूसंपादन प्रक्रीया विलंबामुळे खर्चात झालेली वाढ :**

- प्रकल्पाच्या प्रमुख घटकांसाठीचे (धरणबैठक, बुडीतक्षेत्र) भूसंपादन प्रस्ताव सन १९८० पासून महसूल विभागास सादर करण्यात आले व सन १९८१ मध्ये कलम-४ ची अधिसूचना होऊन त्यामधील काही प्रस्तावांचे निवाडे १९८६ मध्ये घोषित होऊन सन १९९८ पर्यंत टप्प्याटप्याने जमीन ताब्यात मिळाली. भूसंपादन अधिनियमातील तरतूदीनुसार कलम-४चे अधिसूचनेनंतर एक ते दिड वर्षात निवाडा घोषित होणे आवश्यक होते. परंतू महसूल विभागाकडून प्रक्रिया पूर्ण करुन जमीन ताब्यात ५ वर्षानंतर मिळण्यास सुरवात झाली. त्यामुळे पर्यायाने कालावधी व किंमतीत वाढ झाली आहे.

- भूसंपादनाच्या प्रक्रियेमध्ये निवाडा होण्यास विलंब झाल्याने जमीनीचा द्यावा लागणारा मोबदला, त्यावर असणारी स्थावर मालमत्ता, फळझाडे, वनझाडे, घरे, विहीरी इत्यादींच्या द्याव्या लागणा-या मोबदल्यामध्ये वाढ झाल्याने किंमतीत वाढ झाली आहे.

- बांदा शाखा कालवा कि.मी. ४१ ते ४८ मधील भूसंपादन प्रस्ताव २००८-०९ मध्ये महसूल विभागाकडे सादर केले आहेत, तथापि अद्यापही संपादन प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने सन २०११-१२ मध्ये कालव्याची कामे करणे शक्य झाले नाही. परिणामी सन २०११-१२ मधील सिंचन उद्दिष्ट १०० टक्के साध्य करता आले नाही.

- सद्यःस्थितीत ३८ प्रकरणे भूसंपादन कार्यवाहीखाली प्रलंबित आहेत. त्यापैकी कांही प्रकरणे २००५-०६ पासूनची आहेत.

❖ **वनजमीन संपादन कालावधीत वाढ :**

या प्रकल्पासाठी एकूण २०२.९२ हे. वनजमीन संपादनाचा प्रस्ताव १९८२ साली सादर करण्यात आला व त्यास १९८७ मध्ये केंद्र शासनाने मंजूरी दिली व त्यानंतर टप्प्याटप्याने १९९५ पर्यंत १८६.९७ हे. इतकी वनजमीन जलसंपदा विभागाच्या ताब्यात मिळाली आहे व प्रत्यक्ष पहाणीनुसार उर्वरीत १५.९५ हे.

वनजमीन बुडीत क्षेत्राबाहेरील असल्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक नाही. वनजमीन प्रस्ताव मंजूरीस व हस्तांतरणास ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधीचा विलंब झाल्यामुळे धरणाच्या कामास विलंब व खर्चातही वाढ झाली.

❖ **संकल्पचित्रातील बदलामुळे वाढ :**

अ. मातीधरण :

- मुख्य धरणाच्या मुळ प्रशासकीय मान्यता अहवालात मुख्य माती धरणात क्षितीज समांतर गाळकांची (Horizontal Sand mat & inclined sand filter) तरतूद नव्हती. धरणाचे माती गुणधर्माच्या आधारे धरण काटछेदात अधोबाजूकडील व उर्ध्व बाजूकडील भरावात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी क्षितीज समांतर गाळके प्रस्तावित केली आहेत. तसेच अश्मपटलाचे खाली वाळू व खडीचा थर सुधारीत संकल्पित करण्यात आले.
- मूळ प्रस्तावानुसार साध्या पध्दतीचा विमोचक होता. तथापि शासनाच्या धोरणानुसार विद्युत निर्मिती करणेसाठी सिंचन तथा विद्युत विमोचकाचे तरतूद करण्यात आली. त्यामुळे Trash rack arrangement सर्जवेल, बोगदा अस्तरीकरण इत्यादीबाबीमुळे खर्चात वाढ झाली.
- जलरोधक खंदकातील खोदाईच्या परिमाणात वाढ झाली आहे.

ब. सांडवा :

- खळग्यातील दगडी धरणाच्या अधोबाजूस Stilling Basin ची मूळ तरतूद होती. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडील प्राप्त सुधारीत काटछेदाप्रमाणे धरणाचे अधोबाजूस Stilling Basin ऐवजी Flip bucket ची तरतूद केलेली आहे.
- मूळ प्रकल्प अहवालानुसार खळग्यातील दगडी धरणाचे बांधकाम U.C.R. Masonry मध्ये प्रस्तावित होते. त्यामध्ये संकल्पचित्रात बदल केल्याने बांधकामाऐवजी कोलग्राऊट बांधकाम करण्यास प्रस्तावित केल्याप्रमाणे कोलग्राऊट बांधकाम करण्यात आले.
- उत्सारीत भागात उर्ध्वबाजूस ३.०० मी. रुंदीचे एम-२० संधानक करण्यात आले.
- पुच्छ कालव्याच्या मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडील प्राप्त काटछेदानुसार पुच्छ कालव्यावरील ५ प्रपाताची नविन तरतूद केली आहे. त्यामुळे खोदकामात वाढ झाली.

क. सिंचन तथा विद्युत विमोचक :

- मूळ प्रशासकीय मान्यतेमधील सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक केले.
- बोगद्याचे संपूर्ण अस्तरीकरण, सर्जवेल, इंटेकवेल, ट्रॅशरॅक इत्यादी बाबी कराव्या लागल्या.
- अधोबाजूस लोखंडी पाईप, वायपीस इत्यादीची तरतूद करावी लागल्याने खर्चात वाढ झाली.

ड. कालवा कामे संकल्पनातील बदल/वाढ :

- मूळ अंदाजपत्रकात बांदा शाखा कालवा कि.मी. १ ते ४७ इतक्या लांबीचे कालवा प्रस्तावित होता. तथापि प्रत्यक्ष सर्वेक्षणानुसार त्याची लांबी ५७ कि.मी. करण्याचे प्रस्तावित केले. कालव्याची लांबी १० कि.मी. वाढल्याने खर्चात वाढ झाली.
- कालवा खोदकाम केल्याने शेतक-यांच्या ब-याच गांव वाटा व पायवाटा बंद झाल्याने त्यांची आवश्यकता व मागणीनुसार पदपूल, गांवपूल बांधावे लागले.

- तिलारी कालव्याच्या भागात अतिपर्जन्यवृष्टी होत असल्यामुळे डोंगरावरील पावसाचे पाणी कालव्यात वाहून येऊन कालव्याचे नुकसान होऊ नये म्हणून ठिक ठिकाणी अतिवाहके, नलिका मो-यांची बांधकामे करुन पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य मार्ग तयार करण्यात आला.
- कालव्याच्या काही खोल खोदाईच्या भागातील बाजू ढासळत असल्याने खोदकामास उतारावर बर्म देणे तसेच कांही भागात कालवा बंद होऊ नये म्हणून त्याभागात पाईप लाईन, आर.सी.सी. बॉक्स व संरक्षक भिंत इत्यादी कांही भागात बांधकामे करण्यात आली.
- मूळ प्रकल्प अहवालात अस्तरीकरणाची तरतूद नव्हती. परंतू नंतरच्या प्रशासकीय मान्यतेनुसार सर्व कालवा, शाखा कालवा, वितरीकांना भौगोलिक परिस्थितीनुसार व पाझराचे प्रमाण पहाता अस्तरीकरण केले आहे.
- कालव्याच्या कामामध्ये मो-यांची बांधकामे करताना पायासाठी कठिणभूस्तर ब-याचशा ठिकाणी आढळून आला नाही. त्यामुळे बांधकामात वाढ झाली.
- कालव्यावरील बांधकामे करीत असताना पाया खोदाईमध्ये कठिणस्तर अपेक्षित खोलीवरती न मिळाल्याने भूतांत्रिक अन्वेषणानुसार उपाय योजना करण्यात आलेली आहे.

❖ **इतर कारणामुळे झालेली वाढ :**

- महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९८६ अंतर्गत पर्यायी शेत जमीनी ऐवजी रु. १३.७५ कोटी रोख रक्कमेचे वाटप मंत्रीमंडळाच्या दि. २६.११.२००२ रोजीच्या बैठकीतील मान्यतेने केले.
- धरणाच्या घळभरणीवेळी कॉफर डॅम बांधण्यात आला. तसेच पाणी वळविण्यासाठी सांडव्याच्या भागात Pilot cut काढवा लागल्याने जादा खर्च झाला.
- घटक भागाच्या स्पर्धात्मक दरानुसार अधिक दराची निविदा स्विकारल्यामुळे व निविदा शर्तीनुसार देय भाववाढ, आस्थापना खर्च इत्यादी प्रमुख बाबीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.
- केंद्रे बुद्रुक व केंद्रे खुर्द ही दोन गांवे तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या मुख्य धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेर आहेत. त्यांना दळणवळणाची सोय रहात नसल्याने या दोन गावांचे पुनर्वसन करण्याची मागणी करुन घळभरणीचे दुसऱ्या टप्प्यातील कामास विरोध केल्यामुळे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्यास शासनाने दि. २६.३.२००४ च्या पत्रान्वये मंजूरी दिली. त्यामुळे घळभरणी कालावधीत व पुनर्वसन खर्चात वाढ झाली.

❖ **प्रकल्पाची सद्यस्थिती :**

मुख्य माती धरण :

- तिलारी पाटबंधारे प्रकल्पाचे मुख्य मातीच्या धरणाचे काम एप्रिल-२००६ अखेर माथा पातळी (TBL) (११८.५५ मी.) पर्यंत १०० टक्के पूर्ण करण्यात आले.

सांडवा :

- खळग्यातील दगडी धरणाचे काम माथ्यावरील पूर्वबलित-पूर्वरचित पूलाची उभारणी व व्दार उभारणीसह मे-२००९ अखेर पूर्ण करण्यात आले आहे. सन २००९ च्या पावसाळ्यापासून धरणात पूर्ण क्षमतेने ४६२.१७ द.ल.घ.मी. (१६.३२ टि.एम.सी.) पाणी साठा करण्यात येत आहे.

विमोचक :

सिंचनासह विद्युत विमोचक बोगदा - अस्तरीकरणासह १०० टक्के काम पूर्ण. त्याच्या खालील बाजूस १० मे.वॅट क्षमतेचा कोनाळ जलविद्युत प्रकल्प बी.ओ.टी. अंतर्गत पूर्ण करुन एप्रिल-२०१० पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. या जलविद्युत प्रकल्पातून प्रवर्तकांकडून दिनांक ३१.३.२०१२

अखेरची ५८.०२ द.ल.युनिट वीजनिर्मिती झाली आहे. व शासनास स्वामित्व शुल्क रु. ५८.०२ लक्ष प्राप्त झाले आहेत.

तेरवणमेढे उन्नेयी बंधारा :

- तेरवणमेढे उन्नैयी बंधारा : सदर बंधा-याचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. व तेथील २०० कि.वॅट जलविद्युत केंद्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास दि. १५.०५.२००२ रोजी हस्तांतरीत केले आहे.

❖ **मुख्य कालवे / शाखा कालवे :**

उजवा कालवा :

- उजव्या कालव्याची लांबी २४.६९ कि.मी. असून मातीकाम व बांधकामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. सदर कालव्यातून दिनांक १९.११.२००१ पासून गोवा राज्यास पाणी सोडले आहे.

डावा कालवा :

- डावा कालव्याची लांबी १८.७९ कि.मी. असून मातीकाम व बांधकामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. सदर कालव्यातून दिनांक ६.११.२००३ रोजी गोवा राज्यास पाणी सोडले आहे.

जोड कालवा :

- जोड कालव्याची लांबी ३.५३ कि.मी. असून मातीकाम व बांधकामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत.

बांदा शाखा कालवा :

- बांदा शाखा कालवा कि.मी. १ ते ५७ पैकी कि.मी. १ ते २९ पर्यंतची कामे पूर्ण झालेली आहेत. कि.मी. ३० ते ४० पर्यंतची कामे प्रगतीपथावर आहेत. कि.मी. ४१ ते ४८ मधील कामांची निविदा निश्चित केली आहे. तथापि गेले दोन वर्षापासून जमीन भूसंपादनाच्या अभावी कामास सुरुवात करता आलेली नाही. कि.मी. ४९ ते ५७ मधील संरेखा मंजूर झालेली असून भूसंपादन प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर केलेले आहेत.

- बादा शाखा कालवा कि.मी.४९ ते ५७ मधील कामांची अंदाजपत्रके वरिष्ठ कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करणेची कार्यवाही चालू आहे. तसेच प्रकल्पाच्या इतर भागात्ील उर्वरित वितरीका व लघुवितरीकांची कामे प्रगतीपथावर आहेत.

- **सिंचनक्षमता :**

  तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पाची महाराष्ट्र राज्यातील प्रकल्पीय सिंचन क्षमता ९६८० हे. पीक क्षेत्र असून त्यापैकी जून-२०१२ अखेर ७२९५ हे. पीकक्षेत्र सिंचनक्षमता निर्मिती झाली आहे.

	कालव्याचे नांव	संकल्पित सिंचन पीक क्षेत्र (हे.मध्ये)	**६/२०१२** अखेर निर्माण झालेली सिंचन पीक क्षेत्र क्षमता (हे.मध्ये)
अ.	डावा कालवा	२७४२	२७४२
ब.	उजवा कालवा	१९९९	११९९
.	बांदा शाखा कालवा	५७३९	३३५४
	एकूण क्षेत्र ...	**९६८०**	**७२९५**

सद्यःस्थितीत तिलारी उजवा तीर कालवा, डावा तीर कालवा व तिलारी नदीतून उपसाव्दारे महाराष्ट्रातील प्रत्यक्षात एकूण १६२ हे. इतके पीकक्षेत्रावर शेतकरी सिंचनाचा लाभ घेत आहेत. सन २००५ पासून आतापर्यंत रु. १०.९५ लक्ष इतकी रक्कम पाणीपट्टी पोटी वसूली केली आहे.

- **भूसंपादन :**

अ. क्र	भूसंपादन प्रस्ताव	शिर्षकामें		कालवे	
		प्रकरणें	क्षेत्र हेक्टरमध्ये	प्रकरणें	क्षेत्र हेक्टरमध्ये
१	अवार्ड घोषित झालेले व रक्कम अदा झालेले भूसंपादन प्रस्ताव	५८	१९११.२०.५०	८५	५७२.३३.००
२	निवाडा घोषित होणेवर	१	११.४०.३०	--	--
३	कलम ६ ची अधिसूचना प्रसिध्द झालेली व कलम ९ (३) (४) चौकशी पूर्ण झालेली एकूण प्रकरणे	१	८.८९.००	१२	२२.०८.३०
४	कलम ४ ची अधिसूचना प्रसिध्द झालेली एकूण प्रकरणे	--	--	३	४.९२.९०
५	संयुक्त मोजणी पूर्ण	--	--	१०	३८.९१.६०
६	संयुक्त मोजणी अपूर्ण असलेली प्रकरणे (शेतक-यांच्या विरोधामुळे)	--	--	३	१६.४५.१६
७	प्राथमिक अवस्थेत असलेली	--	--	१०	३८.८९.९७
	एकूण.....	**६०**	**१९३१.४९.८०**	**१२३**	**६९३.६१.१३**

❖ **पुनर्वसनाची सद्यस्थिती :**

सदर प्रकल्पासाठी आयनोडे, सरगवे, पाल, पाटये, शिरंगे, केंद्रे बुद्रुक व केंद्रे खुर्द ही गांवे पूर्णतः बाधित तर कोनाळ (भरडोंगरवाडी) व तेरवणमेढे (हरिजनवाडी) ही गांवे अंशतः बाधित होत आहेत. त्यांचा तपशील खालील प्रमाणे असून सदरील पुनर्वसित गांवठाणे जिल्हापरिषद सिंधुदुर्ग (ग्रामपंचायत विभाग) यांच्याकडे दि. २८.२.२०१२ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

गावाचे नाव	**बाधीत घरे**	**कुटुंबे**	**लोकसंख्या**
१. आयनोडे	१००	१९३	१०३२
२. सरगवे	६१	१२८	५९३
३. पाल	१३४	१६१	६४९
४. पाटये	५१६	३३३	१३४३
५. शिरंग	२७५	३४८	१५०८
६. केंद्रे बुद्रुक	१२	२२	१०१
७. केंद्रे खुर्द	०७	०८	५५
८. कोनाळ (भरडोंगरवाडी)	१८	३०	१२२
९. तेरवणमेढे (हरिजनवाडी)	११	१३	७३
एकूण	**११३४**	**१२३६**	**५४७६**

❖ **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :**

सदर प्रकल्पावर मार्च-२०१२ अखेर एकूण रु. ९३७.८५ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)	इटीपी खर्च (रु.कोटी)	एकूण खर्च मार्च-२०१२ अखेर (रु.कोटी)
७१०.५३	८१.७८	१४५.५४	९३७.८५

प्रकल्पाचे नांवः-तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांवः-तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प		ता. कुडाळ	जि. सिंधुदूर्ग	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (पीक क्षेत्र हे.) : २८९००		निर्मित सिंचन क्षमता जून २०१२ अखेर (पीक क्षेत्र हे.):निरंक		
३	प्रशासकिय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची	किंमत (रु. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (पीक क्षेत्र हे.)
	मुळ प्रशासकिय मान्यता	०२/०२/१९८१	१९७९-१९८०	७२.३८	२८९००
	सुप्रमा-१	०१/०७/१९९९	१९९९-२०००	३८८.१९	२८९००
	सुप्रमा-२	११/११/२००८	२००५-२००६	८१६.६५	२८९००
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता				
४.१	अ)TAC Clearance Ref	केंद्रिय जलआयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीचे पत्र क्र.२/१२८/८८/ पीपीओ/५८९ दि.२१/०७/१९९८ अन्वये रु.२८९.०९ कोटी (दरसुची सन १९९४-९५) मान्यता प्राप्त.			
	ब)Investment Clearance Ref.	गुंतवणुक मान्यता अदयाप मिळालेली नाही.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु. कोटी)			१०७.६५	
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु. कोटी)			१३.९७	
४.३	बांधकामावरील खर्च (रु. कोटी)			६७.३९	
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)			२६.२९	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष			१९८१-१९८२	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत			२००१ / रु.४१५.३६ कोटी	

७	मुळ प्रशासकिय मान्यतेंच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	रु. ७४४.२७ कोटी (रु. ८१६.६५ - रु. ७२.३८)	
		रक्कम(कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	२५५.७६	३४.३६
७.२	भू-संपादन,पुनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ रु. (११९.७० - ३.३०) कोटी	११६.४०	१५.६४
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	०.००	०.००
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	१७१.१८	२३.००
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	२००.९३	२७.००
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती (भौतिक)		
८.१	भू-संपादन, पुनर्वसन व वनजमिन संपादन	**भूसंपादन**- प्रकल्पासाठी एकुण २६१८.८३ हे.क्षेत्र आवश्यक आहे. धरणाचे भूसंपादन प्रस्ताव १९८३ मध्ये महसुल खात्यास सादर केले. धरण बैठक व बुडीत क्षेत्राचे ७ गावापैकी ३ गावाचे निवाडे सन १९८८ पर्यंत जाहीर केले व सन १९८८ मध्ये जमिन ताब्यात मिळण्यास सुरुवात झाली. तथापि वनजमिन निर्वणीकरण प्रस्ताव अंतिम टप्प्यात येईपर्यंत प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेस जलसंपदा विभागाने पत्र दि.१३/१०/१९९२ अन्वये स्थगिती दिली. त्यामुळे ४ गावाचे प्रस्ताव व्यपगत झाले. शासनाने सन १९९२ मध्ये दिलेली स्थगिती दि.१६/११/२००० च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे. सन १९९७ मध्ये प्रकल्पाच्या काही खाजगी व सरकारी क्षेत्रावर वनसंज्ञा लागु करण्यात आली. खाजगी वनसंज्ञा लागू झाल्याने नव्याने भूसंपादन प्रस्ताव तयार करुन सन २००१ ला सादर केले. परंतू प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे सदर प्रस्ताव व्यपगत झाले. पुन्हा सन २००६ साली भूसंपादन प्रस्ताव नव्याने तयार करण्यात आले. एकुण २६१८.८३ हे. क्षेत्रापैकी १८९९.६९ हे. क्षेत्राचे ८६ प्रस्ताव तयार करण्यात आले. त्यापैकी १८ प्रस्तावांची कार्यवाही पुर्ण झाली असून ४०७.७४ हे. (१५.५७ टक्के) क्षेत्र ताब्यात आले आहे. उर्वरीत ६८ (१४९१.९५हे.) प्रस्तावांची कार्यवाही सुरु आहे. भूसंपादनास प्रकल्पग्रस्तांचा प्रखर विरोध आहे. सन २०११ व सन २०१२ मध्ये पोलिस संरक्षणात मोजणी करणेचा प्रयत्न करणेत आला. परंतु प्रकल्पग्रस्तांनी मोजणी करु दिली नाही.	
		पुनर्वसन- बुडीत क्षेत्रातील ७ बाधीत गावठाणासाठी पुनर्वसनांतर्गत ४ वसाहती निर्माण करणेचे नियोजन आहे. १ गावठाणातील नागरी सुविधा कामे ८० टक्के पुर्ण आहेत. २ गावठाणातील नागरी सुविधा कामे प्रगतीत आहेत. १ गावठाणासाठी प्रकल्पग्रस्तांचे एकमत नसल्याने जागा निश्चित नाही.	

		वनजमिन संपादन- सन २००१ साली २६५.७० हे. वनजमिनीच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळाली आहे.दरम्यान सन १९९७ साली महसुल विभागाने प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या खाजगी व सरकारी जमिनीवर वनसंज्ञा लागू केली. त्यामुळे वाढीव वनसंज्ञा क्षेत्र ३५७.६२ हे. चा प्रस्ताव सादर केला आहे.सदर प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपुर यांचे स्तरावर आहे. पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक ६२३.३२ हे. जमिन वनविभागास हस्तांतरण केलेली आहे. वनविभागाने एन.पी.व्ही. साठी रु. ५८.५३ कोटी ची मागणी सन २००५ मध्ये केली आहे.
८.२	धरण	मुख्य धरणाचे कामामध्ये मातीभराव व जलरोधीचर यांचे काम प्रगतीत आहे. उजव्या तिरावर मुख्य धरणाचे काम ३० टक्के झालेले आहे.सांडवा व सिंचन तथा विद्यूत विमोचकाचे ठिकाणी वनक्षेत्र असल्याने अद्याप काम हाती घेतलेले नाही
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	उजवा तीर कालवा एकूण लांबी ४४.८० कि.मी पैकी ० ते २० कि.मी व डावा तीर कालवा लांबी ४२.४० कि.मी. पैकी ० ते २० कि.मी. संरेखा सर्व्हेक्षण कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प
अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशील

७.३ व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ :- प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल नसल्याने वाढ काही नाही.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढः- संकल्पचित्रातील बदलामुळे व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकात झालेली वाढ रु. १७१.१८ कोटी (२३ टक्के) आहे त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

- **काटछेद बदलः-** मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये नमुना काटछेदावर (Type Design) आधारीत किंमत काढण्यात आली होती. तथापी सप्टेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेकडून माती खाणीतील माती नमुन्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास केला त्या निष्कर्षावरुन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (माती धरण) यांच्याकडून धरणाचा काटछेद नव्याने तयार केला. सदर काटछेदामध्ये माती भरावाचे उतार, स्कंधांची (Berm) संख्या यामध्ये बदल झाल्याने माती भरावाच्या परिमाणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच धरणाच्या अश्मपटल, वाळूची झारणी इत्यादी बाबींच्या परिमाणामध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे मातीधरणाच्या किंमतीमध्ये रु. १२७.०७ कोटी (१७.०७ टक्के) इतक्या रकमेची वाढ झाली आहे.
- **जलोत्सारणीः-** तसेच प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये जलोत्सारणी दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होती. तथापी व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये जलोत्सारणी शासन निर्णयानुसार दगडी बांधकामा ऐवजी कोलग्राऊट बांधकामामध्ये प्रस्तावित करण्यात आल्यामुळे जलोत्सारणीच्या किंमतीत ३७.१७ कोटी (४.९९ टक्के) इतक्या रकमेची वाढ झाली आहे.
- **सिंचन विमोचकः-** मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये दोन सिंचन विमोचक प्रस्तावित करण्यात आले होते. तथापी व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये एका सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे विमोचकाच्या किंमतीमध्ये रु. ६.९४ कोटी (०.९३ टक्के) इतकी वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणामुळे किंमतीमध्ये झालेली वाढः- या बाबीमुळे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये झालेली वाढ रु.२००.९३ कोटी (२७ टक्के) इतकी आहे.

- प्रकल्प पुर्ण करण्यासाठी विविध कारणामुळे सुमारे २७ वर्षांचा विलंब झाला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या बांधकाम खर्चामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून प्रकल्पाच्या आस्थापना व यंत्रसामुग्री (ETP) खर्चामध्ये रु. १३२.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे.
- स्पर्धात्मक दरानुसार अधिक दराची निविदा स्विकारल्यामुळे व निविदा शर्तीनुसार देय भाववाढ या प्रमुख बाबींमुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. ४६.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे.
- प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मंजूरी प्राप्त अंदाजपत्रकामध्ये काही अंदाजपत्रके नमुना अंदाजपत्रकावर (Block Estimate) आधारीत होती. सुधारीत अंदाजपत्रकामध्ये बाबनिहाय अंदाजपत्रके तयार केल्याने रु. २१.३८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प
संक्षिप्त टिप्पणी

- तळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्प हा कुडाळ तालुक्यातील तळंबा या गावाजवळ कर्ली नदीवर आहे.

- **मुळ प्रशासकीय मान्यता** :- सन १९७९-८० च्या दरसुचीवर आधारीत रु. ७२.३८ कोटी इतक्या रक्कमेस शा.नि.क्र.टिएलबी/१०८१/२९५/(२३१५)जसंअ(२)दि.०२/०२/१९८१ अन्वये मिळाली आहे.

- **प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता** :- सन १९९९-२००० च्या दरसुचीवर आधारीत रु. ३८८.१९ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्रमांक तळंबा/६९८/(२८७/९९) मोप्र-१, दिनांक १ जुलै १९९९ अन्वये मिळाली आहे.

- **व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता** :- सन २००५-२००६ च्या दरसुचीवर आधारीत रु. ८१६.६५ कोटी इतक्या रक्कमेस शा.नि.क्र.तळंबा/०१०८/५०/(२६/२००८)मोप्र-१, दि.११/११/२००८ अन्वये मिळाली आहे.

- **केंद्रिय जलआयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीने** (TAC) पत्र क्र. २/१२८/८८/PPO/५८९, दि. २१/७/१९९८ अन्वये चार अटींचे अधिन राहून प्रकल्प स्वीकृत केला आहे.

- प्रकल्पाच्या मुळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अहवालाच्या तरतुदीनुसार पाणीसाठा २९७.१५ द.ल.घ.मी. (१०.५० टी.एम.सी.) आहे. सदर प्रकल्पामूळे २८९०० हे. पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षीत असून त्याच बरोबर धरणाच्या डाव्या तिरावर प्रकल्पांतर्गत ४ मे.वॅट विजनिर्मीती होणार आहे.

- धरणाचे भूसंपादन प्रस्ताव १९८३ मध्ये महसुल खात्यास सादर केले. धरण बैठक व बुडीत क्षेत्राचे ७ गावापैकी ३ गावाचे निवाडे सन १९८८ पर्यंत जाहीर केले व सन १९८८ मध्ये जमिन ताब्यात मिळण्यास सुरुवात झाली. तथापि वनजमिन निर्वणीकरण प्रस्ताव अंतिम टप्प्यात येईपर्यंत प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेस जलसंपदा विभागाने दि. १३/१०/१९९२ ला स्थगिती दिल्याने भूसंपादन प्रक्रिया लांबली व ४ गावाचे प्रस्ताव व्यपगत झाले. सदरहू स्थगिती दि. १६/११/२००० ला उठविण्यात आली.

- प्रकल्पाच्या धरण बांधकामाची रु. १७५.४१ कोटीची निविदा बोलविण्यात आली होती. स्पर्धात्मक निविदानुसार आर.एन.शेट्टी, हुबळी यांची स्पर्धात्मक दरानुसार १४.९२ टक्के अधिक दराची निविदा (सन १९९९-२००० चे दरसूचीनुसार) सन १९९९ मध्ये स्विकृत करण्यात आली. मुख्य धरणाच्या कामास २१/११/२००१ पासून सुरुवात केली होती. तथापि प्रकल्पग्रस्तांनी भूसंपादन व पुनर्वसन विषयी विविध मागण्या पूर्ण झाल्याशिवाय धरणाच्या कामास सुरुवात करु नये. म्हणून मोर्चा आणून मारहाण करुन काम बंद पाडले त्यामुळे दिनांक ३१/०३/२००२ ते ०१/०४/२००७ पर्यंत काम बंद होते. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यां संदर्भात पुर्ततेच्या अनुषंगाने त्यांच्या सहमतीने दिनांक ०३/०४/२००७ पासून पुन्हा कामास सुरुवात करण्यात आली. सदरचे काम २५/०५/२००७ पर्यंत चालु होते.

सन २००८-०९ मध्ये २१/०२/२००८ पासून ते २५/०५/२००८ पर्यंत काम प्रगतीत होते. सन २००९-१० मध्ये पुर्णतः काम बंद होते. तदनंतरच्या कालावधीत प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे काम लांबले. सन २०११ मध्ये प्रकल्पग्रस्तानी मोर्चा आणुन धरणस्थळावरील काम बंद पाडले त्यानंतर पोलीस बंदोबस्तात काम चालु ठेवण्यात आले. सन २०११-१२ मध्ये पुर्ण हंगामामध्ये काम कोणत्याही बंदोबस्ताशिवाय चालु होते.

- मुळ नियोजनामध्ये दोन सिंचन विमोचक प्रस्तावित होते त्याऐवजी शासन धोरणानुसार सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक हा बदल केल्याने एकच सिंचन तथा विद्युत विमोचक करण्याचे प्रथम सुधारीत अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आले आहे.

- मुळ प्रशासकीय मंजूरी प्राप्त अंदाजपत्रकातील काट-छेद नमुना काटछेदावर (Type Design Section) आधारीत होते. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तथापी सप्टेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेकडून माती खाणीतील माती नमुन्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास केला त्या निष्कर्षावरुन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (माती धरण) यांच्याकडून धरणाचा काटछेद नव्याने तयार केला. सदर काटछेदामध्ये माती भरावाचे उतार, स्कंधांची (Berm) संख्या यामध्ये बदल झाल्याने माती भरावाच्या परिमाणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच धरणाच्या अश्मपटल, वाळूची झारणी इत्यादी बाबींच्या परिमाणामध्येही वाढ झाली आहे. तसेच मुळ अंदाजपत्रकात जलोत्सारणी दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होती. तथापी व्दितीय प्रशासकीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये जलोत्सारणी शासन धोरणानुसार दगडी बांधकामा ऐवजी कोलग्राऊट बांधकामामध्ये प्रस्तावित करणेत आली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली.

- बुडीत क्षेत्राच्या बाहेरील वस्तीकडे जाण्यासाठी रस्ता करणेची मागणी विचारात घेऊन बुडीत क्षेत्राच्या वरच्या भागातून पर्यायी रस्त्याची तरतुद करावी लागली. निविदा शर्तीनुसार देय भाववाढ विचारात घेतली आणि आस्थापना खर्चातील वाढ इत्यादी प्रमुख बाबीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

- **प्रकल्पाच्या किंमतीमधील वाढीची कारणेः-** प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु. ७४४.२७ कोटी इतकी वाढ झाली आहे. किंमतीमधील वाढीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

  १) मुळ अंदाजपत्रक हे सन १९७९-८० च्या दरसूचीनुसार मंजूर आहे तथापी व्दितीय सुधारीत अंदाजपत्रक सन २००५-०६ च्या दरसूचीनुसार मंजूर असल्याने दरसूचीमधील वाढ रु. २५५.७६ कोटी इतकी झाली आहे.

  २) भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढः- मुळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकामध्ये भूसंपादन, पुनर्वसन या बाबींसाठी रु. ३.३० कोटी इतकी तरतुद करणेत आली होती. व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये भूसंपादनासाठी रु. ५७.४१ कोटी , पुनर्वसनासाठी रु. ५.८६ कोटी, वनजमिन व एन.पी.व्ही यासाठी रु. ५६.४३ कोटी अशी एकूण रु. ११९.७० कोटी इतकी तरतुद आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत झालेली वाढ रु. ११६.४० कोटी इतकी आहे.

  ३) सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढः- संकल्पचित्रातील बदलामुळे व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकात झालेली वाढ काटछेद बदल, जलोत्सारणी व सिंचन विमोचक यातील बदलामुळे रु. १७१.१८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

  ४) इतर कारणामुळे झालेली वाढ यामध्ये इ.टी.पी., स्पर्धात्मक दर बाबवार सविस्तर अंदाजपत्रके

यांचा समावेश आहे. त्यामुळे रु. २००.९३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- **प्रकल्पाची सद्यःस्थिती :-**

माती धरण :- मुख्य धरणाचे काम उजव्या तीरावर शासनाच्या ताब्यातील जमिनीवर सुरु आहे. सदर काम उजव्या तीरावरील अधोबाजूस सा.क्र. ९०० ते १६०० मी. व उर्ध्व बाजूस सा.क्र. १२०० ते २५०० मी. मध्ये चालू आहे. आतापर्यंत मुख्य धरणाचे काम ३० % पूर्ण झाले आहे.

सांडवा :- वनसंज्ञा क्षेत्रामुळे अद्याप काम हाती घेण्यात आले नाही.

सिंचन तथा विद्युत विमोचक :- स्थान निश्चितीबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना पाठविण्यात आला आहे. क्ष्यानुसार स्थान निश्चितीनंतर काम हाती घेण्यात येणार आहे.

- **कालवे :-** धरणाचे काम प्राथमिक अवस्थेत असल्याने कालव्याचे काम अद्याप मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आले नाही. तथापी उजवा तीर कालवा एकूण लांबी ४४.८० कि.मी पैकी ० ते २० कि.मी व डावा तीर कालवा लांबी ४२.४० कि.मी. पैकी ० ते २० कि.मी. संरेखा सर्व्हेक्षण कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

- **भूसंपादन** :- प्रकल्पासाठी एकूण २६१८.८३ हे. क्षेत्रापैकी १५४०.५१ हे. जमिन बुडित क्षेत्र, धरण बैठकीसाठी व १०७८.३२ हे. जमिन कालवा, पुनर्वसन गावठाण, पर्यायी रस्ता व वसाहतीसाठी लागणार आहे.

  १५४०.५१ हे. पैकी २६७.४३ हे. ताब्यात आहे. १०७८.३२ हे. पैकी कालव्यासाठी आवश्यक क्षेत्र ८२५.१४ हे. क्षेत्र व पर्यायी रस्त्यासाठी आवश्यक ८१.६३ हे. क्षेत्रापैकी अद्याप काहीही क्षेत्र ताब्यात आले नाही. पुनर्वसन गावठाणासाठी आवश्यक १३३.९९ हे. क्षेत्रापैकी ११८.२२ हे. क्षेत्र ताब्यात आहे. शासकीय वसाहतीसाठी आवश्यक सर्व २१.९२ हे. क्षेत्र ताब्यात आहे. तसेच दगडीखाणीसाठी आवश्यक १५.२१ हे. जमिन अद्याप ताब्यात मिळालेली नाही. तसेच जलमग्न पुलासाठी आवश्यक ०.४४ हे. पैकी ०.१८ हे. जमिन ताब्यात मिळाली आहे. अशी एकूण १४०.३२ हे. जमिन ताब्यात आहे.

  अशा प्रकारे धरण बैठक, बुडीत क्षेत्र, वसाहत व पुनर्वसन गावठाण यामधील एकूण ४०७.७४ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. प्रकल्पग्रस्तांचा भूसंपादनास विरोध असल्यामुळे भूसंपादन प्रक्रिया लांबली आहे. सन २०११ व सन २०१२ मध्ये पोलिस संरक्षणात मोजणी करणेचा प्रयत्न करणेत आला. परंतु प्रकल्पग्रस्तांनी मोजणी करु दिली नाही.

- **पुनर्वसन** :- बुडीत क्षेत्रात नेरुर क. नारूर, पुळास, चाफेलि, साकिर्डे, उपवडे, वसोलि, अशी ६ गावठाणे पुर्णतः व अंजीवडे असे १ गावठाण अंशतः बाधीत होत असून त्याच्या पुनर्वसनांतर्गत पुळास, आंबेरी, निवजे, केरवडे अशा ४ ठिकाणी वसाहती निर्माण करणेचे नियोजन असून पुळास गावठाणातील नागरी सुविधा ८० टक्के पूर्ण झाली असून आंबेरी, निवजे गावठाणातील नागरी सुविधातील कामे प्रगतीत आहे. १ गावठाण प्रकल्पग्रस्तांचे एकमत नसल्याचे अद्याप निश्चित झाले नाही.

  प्रकल्पग्रस्ताना वाटप करण्यासाठी आवश्यक १८४ हे. पर्यायी शेतजमीन पुनर्वसन

विभागाकडे उपलब्ध आहे. बुडित क्षेत्रातील जमिनीचे भूसंपादन झाल्यानंतर त्या बदल्यात सदर जमिनीचे वाटप करण्यात येणार आहे. परंतु बुडीत क्षेत्रातील भूसंपादनास प्रकल्पग्रस्तांचा विरोध असल्याने पर्यायी जमिन उपलब्ध असूनही तीचे वाटप करता येत नाही.

- **वनजमिनः-** सदर प्रकल्पांतर्गत एकूण २९७.१७ हे. वनजमीन व ३२६.१५ हे. वनसंज्ञा असे एकूण ६२३.३२ हे. क्षेत्र लागणार असून २६५.७० हे. वनजमिनीच्या प्रस्तावास पर्यावरण व वन मंत्रालयाचे पत्र क्र.एफ नं.८/२९/९९एफसी-६६५ एसआय दि.०१/०३/२००१ अन्वये वन विषयक तत्वतः मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच पत्र क्र. जे-११०१६/६६/८२ आयएआय, दि.२०/०३/२००१ अन्वये पर्यावरण विषयक तत्वतः मान्यता मिळाली आहे. वनजमिन तत्वतः मान्यता अटींचे पुर्ततेसाठी रु. १७३.६६ लक्ष व पर्यावरण तत्वतः मान्यता अटींचे पुर्ततेसाठी रु. ४२९.११ लक्ष अशी एकूण रु. ६०२.७७ इतकी रक्कम वनखात्यास भरणा केलेली आहे. नांदेड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील ६२३.३२ हे. पर्यायी जमिन वन खात्याकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. वनप्रस्तावासाठी आवश्यक (एन.पी.व्ही) रू. ५८.५३ कोटी भरणा करावयाची आहे. ३५७.६२ हे. चा एकत्रीत वन प्रस्ताव मा.प्रधान सचिव मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडे दि.४/७/२०१२ ला सादर करण्यात आलेला आहे.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी** :- सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रु.१०७.६५ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

(रु. कोटी मध्ये)

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
६७.३९	१३.९७	२६.२९	१०७.६५

प्रकल्पाचे नांवः- देहरजी मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	**प्रकल्पाचे नाव - देहरजी मध्यम प्रकल्प तालुका – विक्रमगड जिल्हा – ठाणे**				
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.) (पीकक्षेत्र)	६९७९	निर्मित सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हे.) जुन २०१२ निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसुची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	४.५.१९७९	१९७६-७७	११.५९	६९७९
	मूळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्याने नव्याने प्रशासकिय मान्यता	२१.१०.२००५	२००३-०४	१५८.२५	६९७९
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/Invesment) (संदर्भ व किंमत रु.कोटी) अ) TAC - सदर प्रकल्प मध्यम प्रकल्प असल्याने व आंतरराज्य नसल्यामुळे आवश्यकता नाही. ब) Invesment clearance - गुंतवणूक मान्यता मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे.				
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)	३०.९०			
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)	१३.८२			
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)	१०.००			
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी)	७.०८			
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	२००५-०६			
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष	अद्याप सुरु नाही			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी		
७.१	दर सुचीतील वाढ़	खर्च अत्यल्प असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव केला नसल्याने माहीती निरंक आहे.			
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ				
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)				
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ				
७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत) आस्थापनावर झालेल्या खर्चामधील वाढ				

८	प्रकल्पाची सद्यस्थिती	
८.१	भू-संपादन,पुनर्वसन,वन जमिन संपादन	या प्रकल्पाकरिता धरण व बुडीत क्षेत्र मिळून २२०.४५७ हे. खाजगी जमीन संपादित करण्यांचे प्रस्तावित आहे. बुडीत क्षत्रातील खाजगी जमिनीची संयुक्त मोजणी ता. निरिक्षक भूमी अभिलेख विक्रमगड यांचे मार्फत करण्यांत आलेले आहे. सदरचे अहवाल या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेले नाहीत. कालव्याकरिता ५०.६५ हे. इतकी खाजगी जमीन एकूण ७ गावांतून संपादित करावी लागणार आहे. सदर जमीनीची संयुक्त मोजणी पुर्ण झाली असून मिळालेल्या इ-प्रतीनुसार सुधारित प्रस्ताव बनविण्यांचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाकरिता ५३१.१८६ हे. वनजमीन इतके क्षेत्र संपादित करावे लागणार आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात ३ गांवे अंशतः येतात.
८.२	धरण	सदर प्रकल्पास वन व पर्यावरण मंत्रालय नवी दिल्ली यांनी पत्र क्र. एफ नं.८-१०/२००९/एफसी दि.२६.०३.२०१० अन्वये तत्वतः मान्यता दिली आहे. त्यापोटी उपवनसंरक्षक जव्हार यांनी एकूण १२३.६० कोटी रकमेचा भरणा करणे विषयी मागणी केली आहे. सदर रकमेपैकी १३.७० कोटी इतक्या रकमेचा भरणा वनविभागास केला असून उर्वरित १०९.९० कोटी रकमेचा भरणा निधी प्राप्त न झाल्यामुळे केलेला नाही. त्यामुळे सदर प्रकल्पाचे काम अद्याप सुरु करता आलेले नाही.
८.३	कालवा व वितरण व्यवथा	सदर प्रकल्पाचा उजवा कालवा २९ कि .मी. व डावा कालवा ४.०० कि.मी. असून तथापि वनजमीन व खाजगी भूसंपादन न झाल्यामुळे अद्याप कामास सुरुवात नाही.

देहरजी मध्यम प्रकल्प

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ) :-** प्रकल्पाचे काम सुरु झालेले नसल्यामुळे सद्यःस्थितीत वाढ नाही.

७.४ **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-** प्रकल्पाचे काम सुरु झालेले नसल्यामुळे सद्यःस्थितीत वाढ नाही.

७.५ **इतर कारणे :-** प्रकल्पाचे काम सुरु झालेले नसल्यामुळे सद्यःस्थितीत वाढ नाही.

देहरजी मध्यम प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- या प्रकल्पास शासन निर्णय क्र. आरपे-१०७७/११७८/२३३८/(म.प्र)/(१) दि.४.५.१९७९ अन्वये रु. ११.५९ कोटी या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. सदर प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्याने या प्रकल्पास कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाने निर्णय क्र. कोपाविमं/२५९६ दि.२१.१०.२००५ अन्वये रु. १५८.२५ कोटी रूपयास नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.
- सदर प्रकल्पामुळे ६९७९ हे. पीकक्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल
- या धरणाच्या कामाचे आदेश ब-१ निविदे नुसार मे. पी.व्ही.आर प्रोजेक्ट्स प्राईव्हेट लि. पुणे यांना जावक क्र. रापावि-२/ले-२/ २२६५ दि.२७.०७.२००६ अन्वये देण्यांत आलेले आहे.
- या योजनेचे कंत्राटदारांना कार्यकारी संचालक कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ यांचे पत्र क्र. जा.क्र. कोपाविमं/ ले-२/ देहरजी अग्रीम/ १३६१ दि.३०.०३.२००७ नुसार रु.१०.०० कोटी सुसज्जता अग्रीमा पोटी देण्यांत आलेले आहे. प्रकल्पाचे काम सुरु न झाल्याने सदर रकमेची वसूली झालेली नाही.
- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**

➢ भूसंपादन :- या प्रकल्पाकरिता धरण व बुडीत क्षेत्र मिळून २२०.४५७ हे. खाजगी जमीन संपादित करण्यांचे प्रस्तावित आहे. बुडीत क्षत्रातील खाजगी जमिनीची संयुक्त मोजणी ता. निरिक्षक भूमी अभिलेख विक्रमगड यांचे मार्फत करण्यांत आलेले आहे. सदरचे अहवाल या कार्यालयास अद्याप प्राप्त झालेले नाहीत. कालव्याकरिता ५०.६५ हे. इतकी खाजगी जमीन एकूण ७ गावांतून संपादित करावी लागणार आहे. सदर जमीनीची संयुक्त मोजणी पुर्ण झाली असून मिळालेल्या इ-प्रतीनुसार सुधारित प्रस्ताव बनविण्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

➢ पुनर्वसन :- सदर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण ३ गांवे अंशतः बाधित होत आहे. त्यापैकी मौजे-साखरे गावांतील १०० घरे व १२१ कुटुंबे तसेच मौजे-खुडेद गावांतील ११० घरे व १५१ कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. सदर पुनर्वसनासाठी २४.२५ हे. जमीन लागणार आहे. सदरची जागा उपलब्ध करण्याचे प्रयत्न क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. सदर पुनर्वसन प्रस्ताव बनविण्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

➢ वनजमीन :- या प्रकल्पाकरिता ५३१.१८६ हे. वनजमीन इतके क्षेत्र संपादित करावे लागणार आहे. सदर प्रकल्पास वन व पर्यावरण मंत्रालय नवी दिल्ली यांचे कडून त्यांचे इंग्रजी प्रत्र क्र. एफ नं-८-१०/२००९/एफसी दि.२६.०३.२०१० नुसार तत्वतः मान्यता मिळाली आहे. त्यानुषंगाने वनखात्याने रु. १२३.६० कोटी इतके मालमत्ता मुल्य व वनविकास महामंडळ यांचे ताब्यातील क्षेत्राचे मुल्य भरणा करणे विषयी कळविले आहे. त्यापैकी रु. १३.७१ कोटी इतकी रक्कम धनादेश क्र. ८५५९७६ दि.२७.०५.२०११ नुसार अदा करण्यांत आलेली आहे. उर्वरित रु. १०९.८९ कोटी इतकी रक्कम अद्याप अदा करावयाची आहे. स्तंभ ६ मधील प्रकल्पाची एकूण रक्कम सन २०११-१२ नुसार रु.३९५.५० कोटी येत असून त्यामध्ये वन विभागाची एन.पी.व्ही. रक्कम रु.१२३.६० कोटी समाविष्ट आहे.

प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही.

प्रकल्पांचे नांव :- हेटवणे मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पांचे नांव :- हेटवणे मध्यम प्रकल्प		तालुका : पेण	जिल्हा :- रायगड.	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (पीकक्षेत्र)(हेक्टर) :		११०२१ हेक्टर	निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२ अखेर) :- २०४६ हे.	
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	मूळ प्रशासकीय मान्यता	८/१/१९८१	१९७९-८०	१५.३६	१२२९०
	सु.प्र.मा.-१	१/१/१९९६	१९९२-९३	१०५.५२	१२१३६
	सु.प्र.मा.-२	१६/३/२०००	१९९८-९९	२०८.५४	१२१३६
	सु.प्र.मा.-३	१७/६/२००८	२००५-०६	३२९.९०	११०२१
४	केंद्र शासनाची अद्यायावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ) TAC Clearance Ref.		शासन पा.वि. पत्र क्र.१०८१/२३४४/(१५१/८५) जसंअ,दि.१८/४/१९९०,रक्कम रु. ४५.८७ कोटी.		
	ब) Investment Clearance Ref.		सुधारित किंमतीस गुंतवणूकीस मान्यता मिळणेचा प्रस्ताव महामंडळास दिनांक २४/२/२०१० रोजी सादर केला होता. महामंडळाचे दि.२९/३/२०१० रोजीचे पत्रान्वयें प्रस्तावावर उपस्थित शेऱ्यांची पूर्तता करण्याचे काम चालू आहे.		
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		रु. २८३.७४ कोटी		
४.२	भूसंपादन, पूनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		रु. २५.७९ कोटी		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी).		रु. १८७.३६ कोटी.		
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी).		रु. ७०.५९ कोटी.		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		सन १९८२-८३		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळची किंमत		सन १९८५ / रु. २३.०५ कोटी		

७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे.	एकूण वाढ = ३२९.९० - रु १५.३६ = रु.३१४.५४ कोटी.	
		रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ	८५.०८	२७.०५
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ. (रु. २१.२१ कोटी – १.२३ कोटी)	१९.९८	६.३५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	३५.३१	११.२३
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.	८४.५२	२६.८७
७.५	इतर कारणे (ई.टी.पी.सहीत)	८९.६५	२८.५०
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		
८.१	भूसंपादन	धरण व बुडीत क्षेत्रासाठी ४७८.०९.६ हे. खाणक्षेत्र, पूनर्वसन व इतर प्रयोजनासाठी ६४.७८.१ हे. असे एकुण ५४२.८७.७ हे. खाजगी क्षेत्राची व ७७.७६.९ हे. सरकारी क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊन सदर क्षेत्र प्रकल्पाच्या कामासाठी ताब्यात मिळाले आहे. कालव्याच्या कामासाठी २४५.६२ हे. खाजगी जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. त्यापैकी १६८.९५ हे. क्षेत्र संपादित करण्यांत आले आहे. उर्वरित ७६.६७ हे. क्षेत्राच्या भूसंपादनास स्थानिक लोकांचा विरोध झाल्याने सादर झालेले प्रस्ताव व्यपगत झाले आहेत. नव्याने भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.	
	पूनर्वसन	प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रामध्ये बाधित होत असलेल्या ४३७ कुटुंबाचे पूनर्वसन मौजे कामार्ली, कुरमुर्ली, आंबेघर व तळवली येथे करण्यांत आले आहे. पुनर्वसित गांवठाणामध्ये नागरी सुविधांची कामे सन १९९१-९२ मध्ये पूर्ण करुन ती पुढील देखभालीसाठी रायगड जिल्हा परिषदेकडे सन १९९७ मध्ये हस्तांतरण केली आहेत.	
	वनजमीन	धरण व बुडीत क्षेत्रामध्ये २३८.९८ हे. क्षेत्र वनजमीन बाधित होत असून वनजमीन संपादनास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडील आदेश क्र.८/११३/९६/एफसी दि.१०/२/१९९८ अन्वयें अंतिम मान्यता मिळाली आहे. कालव्याच्या कामासाठी ३३.०५ हे. क्षेत्र वनजमीन बाधित होत असून वनजमीन प्रस्तावास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडील पत्र क्र.(ई) एफ नं.८/११०/९९/एफसी ७८५८/एफ, दि.२०/३/२००१ अन्वये तत्वतः मान्यता मिळाली आहे. अंतिम मान्यतेसाठी वननक्त मूल्य रु.३१.१० कोटी रकमेची मागणी वनविभागाकडून करण्यांत आली असून ती देणे प्रलंबित आहे.	

८.२	धरण	मुख्य धरणाचे मातीकाम ९७ टक्के पूर्ण झाले असून धरणामध्ये प्रकल्पीय १४७.४९ दलघमी (५.२१ टीएमसी) पूर्ण पाणीसाठा जून २००८ अखेर निर्माण झाला आहे. सांडवा संधानकाचे व त्यावरील ६ x ३ मी.आकाराचे ६ उभे दरवाजे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. सिंचनासह विद्युत विमोचक व सिडको, नवी मुंबईस पाणी पुरवठा करणेच्या विमोचकाचे काम पूर्ण झाले आहे.
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	प्रकल्पांतर्गत संयुक्त कालवा , डावा कालवा व उजवा कालवा इ. कालवे आहेत. **संयुक्त कालवा (लांबी १ ते १२ कि.मी.)**:-कालवा कामे पूर्ण झाली आहेत. **डावा कालवा (लांबी १३ ते ३० कि.मी)**:- कि.मी.१३ ते २३ मधील कामे पूर्ण असून कि.मी.२४ ते २७ मधील कामे अंशतः पूर्ण झाली आहेत. कि.मी.२८ ते ३० मधील कालवा संरेखा सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. **उजवा कालवा (लांबी ११ ते २५ कि.मी)**:- कि.मी.११ ते १७ मधील कामे पूर्ण असून कि.मी.१८ ते २० मधील कामे अंशतः पूर्ण झाली आहेत. कि.मी.२१ ते २५ मधील कालवा संरेखा सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तथापि भूसंपादनास विरोध झाल्याने कामे सुरु करता आली नाहीत. **वितरिका** :- डाव्या कालव्यावर कोप्रोली वितरिका कि.मी.१ ते ८, शिर्की वितरिका कि.मी. १ ते १० व वाशी वितरिका कि.मी.१ ते ५ कि.मी. असून सदर वितरिकांचे संरेखा सर्वेक्षण पूर्ण करण्यांत आले आहे. तथापि भूसंपादनास विरोध झाल्याने कामे सुरु करता आली नाहीत. कालव्याच्या पूर्ण झालेल्या कामामुळे जून-२०१२ अखेर २०४६ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

हेटवणे मध्यम प्रकल्प

अ.क्र.७.३ ते ७.५ चा तपशील.

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- मूळ प्रकल्प अहवालानुसार १२९.९१ दलघमी प्रकल्पिय पाणीसाठा करुन कालव्याद्वारे १२२९० हे. क्षेत्रास सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन होते.

- प्रकल्पांतर्गत माती धरणाचे कामास सन १९८५ मध्ये सुरुवात केल्यानंतर सन १९८९ मध्ये आलेल्या अनपेक्षित पूरामुळे धरणाचे खालील बाजूस ९ कि.मी. अंतरावर असलेल्या पेण शहराचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने द्वारविरहीत सांडव्याऐवजी द्वारसहित सांडवा उभारण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच धरणाची उंची ३.२० मी. ने वाढविण्याचे ठरले. या वाढीव उंचीमुळे होणारा अतिरिक्त १७.९८ द.ल.घ.मी. पाणीसाठा सिडको नवी मुंबईस देण्याचे ठरले.
- धरणाची उंची ३.२० मी.ने वाढविणेच्या संकल्पचित्र अहवालास शासन पा.वि.पत्र क्र.हेटवणे १०९५/६७६/ (१५८/९५) म.प्र. दि.१९ जुलै १९९५ व द्वार विरहीत सांडव्याऐवजी ६ x ३ मी.आकाराचे ६ उभे दरवाजे बसविण्यांचे प्रस्तावास शासन पा.वि.पत्र क्र.हेटवणे १०९२/११६६(२६१/९२) मप्र दि.२४/१/१९९४ अन्वये मान्यता मिळाली.
- प्रकल्पाचे व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्प खर्चात रु.३५.३१ कोटी इतकी असून या वाढीव खर्चाचा समावेश प्रकल्पाचे प्रथम व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यांत आला आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

- मूळ प्रकल्प अहवालानुसार सांडव्याचे काम दगडी बांधकामामध्ये करण्याचे प्रस्तावित होते.
- शासन पा.वि. परिपत्रक क्र.एमआयएस-१०९१/(३६५/९३)/मोप्र/(प्र) दि.४/१०/१९९३ मधील सूचनांच्या अनुषंगाने, सांडव्याचे काम दगडी बांधकामाऐवजी संधानकामध्ये करण्यांत आले.
- द्वारविरहीत सांडव्या ऐवजी द्वारसहीत सांडवा केल्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने संकल्पित केल्यानुसार प्रकल्प खर्चात वाढ झाली आहे.
- वितरिकेच्या कामासाठी उघडा कालव्याऐवजी बंदिस्त कालवा केल्यामुळे प्रकल्प खर्चात रु.४४.१४ कोटी इतकी वाढ झाली आहे.
- उपरोक्त बांबीमुळे एकूण रु.८४.५२ कोटी इतक्या रकमेची वाढ झाली असून वाढीव खर्चाचा समावेश प्रकल्पाचे प्रथम, द्वितीय व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

७.५ **इतर कारणे :-**

- अंदाजपत्रकातील खालील अपुऱ्या तरतूदीमुळे प्रकल्पखर्चात वाढ झाली आहे.
- मुख्य धरणासाठी आवश्यक असणाऱ्या खाणक्षेत्रातील साहित्याची चाचणी करणे
- किनारी रस्त्याच्या लांबीत वाढ झाल्याने करावा लागलेला खर्च.
- वसाहतीतील इमारतीसाठीच्या तरतूदी.

- मूळ अंदाजपत्रकात कालव्यासाठीची अंदाजपत्रके कि.मी.धर्तीवर आधारित होती. सविस्तर अंदाजपत्रके केल्याने झालेल्या खर्चातील वाढ
- सर्वेक्षण व धरणाच्या पायाच्या भूस्तर अन्वेषणासाठीचा वाढीव खर्च
- खाणक्षेत्रातील अतिरिक्त जमीन संपादन, कालव्यावरील बांधकामाच्या संख्येत झालेली वाढ तसेच पाणलोट क्षेत्र विकास कामांमुळे झालेला वाढीव खर्च.
- आस्थापना खर्चातील वाढ.

उपरोक्त बाबीमुळे प्रकल्प खर्चात रु. ८९.६५ कोटी इतकी प्रकल्प खर्चात इतकी वाढ झाली असून वाढीव खर्चाचा समावेश प्रथम, द्वितीय व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यांत आला आहे.

हेटवणे मध्यम प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- हेटवणे मध्यम प्रकल्प ता.पेण, जि.रायगड हा प्रकल्प भोगेश्वरी नदीवर स्थित आहे.
- मूळ प्रशासकीय मान्यता :- सन १९७९-८० चे दरसूचीवर आधारित प्रकल्पाचे रु.१५.३६ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासन पा. वि. निर्णय क्र. एचईटी १०८०/२८०५/(२५५१)-जसंअ, दि.८/१/१९८१ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.
- प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता :- सन १९९२-९३ चे दरसूचीवर आधारित प्रकल्पाचे रु.१०५.५२ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासन पा.वि. निर्णय क्रमांक एचईटी/१०९१/१९९५/(५/९५)-मप्र, दिनांक ०१/०१/१९९६ अन्वयें प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे..
- द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता :- सन १९९८-९९ चे दरसूचीवर आधारित प्रकल्पाचे रु.२०८.५४ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासन पा.वि. निर्णय क्रमांक एचईटी/१०.००/१६४/(३१५/२०००) - मप्र, दिनांक १६/०३/२००० अन्वयें द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे..
- तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता :- सन २००५-०६ चे दरसूचीवर आधारित प्रकल्पाचे रु.३२९.९० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासन ज.वि. निर्णय क्रमांक सुप्रमा ११०६/१५२९/(३९२/०६) - मप्र, दिनांक १७/०६/२००८ अन्वयें तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे..
- प्रकल्पांतर्गत धरणामध्ये १४७.४९ दलघमी पाणीसाठा होऊन ६०५६ हेक्टर क्षेत्रास (११०२१ हे.पीकक्षेत्र) सिंचनाचा लाभ होईल अशी प्रकल्पीय तरतूद असून प्रकल्पांतर्गत धरणाच्या पायथ्याशी १.५ मे.वॅ. क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे.
- प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर धरण व अनुषंगिक कामाची निविदा निश्चित करुन दि.२५/०४/१९८५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यांत आला.
- धरण व बुडीत क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या खाजगी जमीनीचे संपादन होऊन व बुडीत क्षेत्रात असलेल्या प्रकल्पबाधित लोकांचे पुनर्वसन पूर्ण करुन जमीनीचा ताबा प्रकल्पास प्राप्त झाला.
- धरणाचे काम सुरुवातीस युनायटेड स्टेटस् एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (४6$,') अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आला होता. त्यानुसार ४6$,' च्या प्रमाणकानुसार अंदाजपत्रकात काही आवश्यक बदल करुन व त्यातील दर अद्ययावत करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यांत आले होते. मात्र ४6$,' कार्यक्रमामधून सदर प्रकल्प वगळण्यांत आला व तो शासनाच्या निधीतून राबवावा लागला.
- प्रकल्पाचे कामास सुरुवात करण्यांत आल्यानंतर सन १९८९ मध्ये आलेल्या अनपेक्षित पूरामुळे धरणाच्या खालील बाजूस ९.०० कि.मी. अंतरावर असलेल्या पेण शहराचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने द्वारविरहीत सांडव्याऐवजी द्वारसहीत सांडवा उभारण्याचे निश्चित करण्यांत आले. तसेच धरणाची उंची ३.२० मी. ने वाढविण्याचे ठरले. या वाढीव उंचीमुळे होणारा अतिरिक्त १७.९८ द.ल.घ.मी. पाणीसाठा सिडको नवी मुंबईस देण्याचे ठरले. धरणाची उंची ३.२० मी. ने वाढविणेच्या संकल्पचित्र अहवालास शासन पा.वि.पत्र क्र.१०९५/६७६/(१५८/९५) म.प्र. दि.१९/७/१९९५ अन्वयें मान्यता मिळाली तसेच द्वारविरहीत सांडव्याऐवजी ६ x ३ मी.आकाराचे सहा उभे दरवाजे बसविणेच्या प्रस्तावास शासन पा.वि.पत्र क्र. हेटवणे १०९२/ ११६६/ (२६१/९२) म.प्र. दि.२४/१/१९९४ अन्वये मान्यता मिळाली. यामुळे धरण व इतर आनुषंगिक बाबीमध्ये झालेल्या वाढीव खर्चाची तरतूद प्रकल्पाचे प्रथम व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यांत आली आहे.
- वाढीव उंचीमुळे धरणाच्या काटछेदात बदल करावा लागला. मात्र धरणाचे सुधारित संकल्पन मिळेपर्यंत सन १९८९ ते १९९५ या कालावधीत काम मंद गतीने चालू ठेवावे लागले. पुढे धरणाच्या वाढीव उंचीमुळे

जादा संपादन कराव्या लागणा-या वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून त्यांचे पत्र क्र. बी-११३/९६ एफ़ सी दि. १०.०२.१९९८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर दि.२२.०५.१९९८ रोजी वनविभागाकडून काम सुरू करण्यास परवानगी देण्यात आली. वनविभागाकडून बुडित क्षेत्रातील झाडझाडोरा साफ केल्यानंतर दि.१६.०१.१९९९ मध्ये कामास पूर्ण स्वरूपात सुरुवात करण्यात आली व सन १९९९-२००० मध्ये घळभरणी पूर्ण करून धरणात अंशतः पाणीसाठा करण्यात आला.

- धरणाचे कामासाठी प्राप्त होणाऱ्या पुरेशा निधीचा विचार करता हा प्रकल्प सन २००३-०४ पासून वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आला. या कार्यक्रमातर्गत मार्च-२००९ अखेर रु.२६.०३ कोटी इतका निधी प्राप्त होऊन धरणामध्ये प्रकल्पीय पाणीसाठयाइतका म्हणजेच १४७.४९ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण होण्याची स्थिती निदर्शनास आल्यानंतर हा प्रकल्प ए.आय.बी.पी. कार्यक्रमातून वगळण्यात आला.
- शासन पा.वि.पत्र क्र.हेटवणे-१०९०/३०२/(१८८/९०) दि.२७/९/९० व हेटवणे/१९९१/२८८२/(४३/९१)मप्र दि.२०/११/१९९२ अन्वयें सिडको नवी मुंबईस व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला अनुक्रमे १०० दललि/दिन व ५० दललि/दिन तात्पुरत्या स्वरुपात सहा वर्षाकरिता पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यांत आली.
- दिनांक १८/०६/२००१ पासून धरणातून सिडको नवी मुंबईस पिण्यासाठी पाणी पुरवठा सुरु करण्यात आला.
- सांडव्याचे सुधारित संकल्पन व सांडवा द्वारांचे संकल्पन सन २००३ मध्ये प्राप्त झाल्यानंतर सांडवा व त्यावरील उभेद्वारांचे काम जून २००८ पर्यंत पूर्ण करुन धरणामध्ये १४७.४९ दलघमी इतका प्रकल्पीय पाणीसाठा निर्माण करण्यात आला. धरणाची उंची ३.२० मी.ने वाढविल्यामुळे धरणामध्ये अतिरिक्त होणारा १७.९८ द.ल.घ.मी.पाणीसाठा कायमस्वरुपी पिण्यासाठी सिडकोमार्फत नवी मुंबईस देण्याचे ठरले. दि.१८/२/२००७ रोजी उच्चाधिकार समितीचे १२ व्या बैठकीमध्ये सिडकोमार्फत नवी मुंबईस १०० दललि/दिन प्रमाणे पिण्यासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यांस मान्यता देण्यांत आली. या पाणी पुरवठयापोटी सिडकोकडून भांडवली खर्च रु.४७.०० कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे :

दरसूचीतील वाढ :-

- तृतीय सुधारित मान्यताप्राप्त अंदाजपत्रक सन २००५-०६ च्या दरसूचीनुसार मंजूर असल्याने प्रकल्पाचे खर्चात दरसूचीतील बदलामुळे रु. ८५.०८ कोटी इतक्या रकमेची वाढ झाली आहे.

भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनामध्ये झालेली वाढ :-

- मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकामध्ये भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिन संपादन यासाठी रु.१.२३ कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती.
- मूळ प्रकल्प अहवालाच्या तुलनेत जमिनींच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली.
- मूळ प्रकल्प अहवालाच्या तुलनेत प्रकल्पबाधित व्यक्तिंच्या संख्येत वाढ झाल्याने पुनर्वसनासाठी जादा खर्च आला.
- धरणाच्या बुडित क्षेत्राभोवती किनारी रस्त्यांसाठी जादा वनजमिनीचे संपादन करावे लागले.
- धरणाची उंची वाढविल्यामुळे वाढीव बुडित क्षेत्रासाठी जादा वनजमीनीचे संपादन करावे लागले. त्यासाठी वाढीव पर्यायी वनीकरणाचा खर्च वनखात्यास द्यावा लागला.
- मूळ अंदाजपत्रकामध्ये वनजमिन संपादनापोटी नक्त वर्तमान मूल्य (एन.पी.व्ही.) साठी तरतूद नव्हती. वनजमीन संपादनाचे वेळी रु.२.२३ कोटी इतके नक्त वर्तमान मूल्य वनखात्यास द्यावे लागले.

  तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकामध्ये भूसंपादन, पुनर्वसन व वनजमिन संपादन यांसाठी रु.२१.२१ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून, उपरोक्त बाबींमुळे प्रकल्प

खर्चात रु.१९.९८ कोटी इतकी वाढ झाली आहे. सदर वाढीव खर्चाचा समावेश सुधारित प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- मूळ प्रकल्प अहवालानुसार १२९.९१ दलघमी प्रकल्पीय पाणीसाठा करुन कालव्याद्वारे १२२९० हे. क्षेत्रास सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन होते.
- प्रकल्पांतर्गत माती धरणाचे कामास सन १९८५ मध्ये सुरुवात केल्यानंतर सन १९८९ मध्ये आलेल्या अनपेक्षित पुरामुळे धरणाचे खालील बाजूस ९ कि.मी. अंतरावर असलेल्या पेण शहराचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने द्वारविरहीत सांडव्याऐवजी द्वारसहित सांडवा उभारण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच धरणाची उंची ३.२० मी. ने वाढविण्याचे ठरले. या वाढीव उंचीमुळे होणारा अतिरिक्त १७.९८ द.ल.घ.मी. पाणीसाठा सिडकोमार्फत नवी मुंबईस देण्याचे ठरले.
- धरणाची उंची ३.२० मी.ने वाढविणेच्या संकल्पचित्र अहवालास शासन पा.वि.पत्र क्र.हेटवणे १०९५/६७६/(१५८/९५) म.प्र. दि.१९ जुलै १९९५ व द्वार विरहीत सांडव्याऐवजी ६ x ३ मी.आकाराचे ६ उभे दरवाजे बसविण्यांचे प्रस्तावास शासन पा.वि.पत्र क्र.हेटवणे १०९२/११६६(२६१/९२) मप्र दि.२४/१/१९९४ अन्वये मान्यता मिळाली.
- प्रकल्पाचे व्याप्तीतील बदलामुळे प्रकल्प खर्चात रु.३५.३१ कोटी इतकी असून या वाढीव खर्चाचा समावेश प्रकल्पाचे प्रथम व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यांत आला आहे.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ.

- मूळ प्रकल्प अहवालानुसार सांडव्याचे काम दगडी बांधकामामध्ये करण्याचे प्रस्तावित होते.
- शासन पा.वि. परिपत्रक क्र.एमआयएस-१०९१/(३६५/९३)/मोप्र/(प्र) दि.४/१०/१९९३ मधील सूचनांच्या अनुषंगाने, सांडव्याचे काम दगडी बांधकामाऐवजी संधानकामध्ये करण्यांत आले.
- द्वारविरहीत सांडव्याऐवजी द्वारसहीत सांडवा केल्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने संकल्पित केल्यानुसार प्रकल्प खर्चात वाढ झाली आहे.
- वितरिकेच्या कामासाठी उघडा कालव्याऐवजी बंदिस्त कालवा केल्यामुळे प्रकल्प खर्चात रु.४४.१४ कोटी इतकी वाढ झाली आहे.
- उपरोक्त घटकनिहाय बाबीमुळे एकूण रु.८४.५२ कोटी इतक्या रकमेची प्रकल्प खर्चात वाढ झाली असून या वाढीव खर्चाचा समावेश प्रकल्पाचे प्रथम, द्वितीय व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात अनुक्रमे रु.८.४४ कोटी, रु.२३.३२ कोटी व रु.५२.७६ कोटी अशी तरतूद करण्यांत आली आहे.

इतर कारणे :-

- अंदाजपत्रकातील खालील अपुऱ्या तरतूदीमुळे प्रकल्पखर्चात वाढ झाली आहे.
  १) मुख्य धरणासाठी आवश्यक असणाऱ्या खाणक्षेत्रातील साहित्याची चाचणी करणे
  २) किनारी रस्त्याच्या लांबीत वाढ झाल्याने करावा लागलेला खर्च.
  ३) वसाहतीतील इमारतीसाठीच्या तरतूदी.
  ४) मूळ अंदाजपत्रकात कालव्यासाठीची अंदाजपत्रके कि.मी. धर्तीवर आधारित होती. सविस्तर अंदाजपत्रके केल्याने झालेल्या खर्चातील वाढ.
  ५) सर्वेक्षण व धरणाच्या पायाच्या भूस्तर अन्वेषणासाठीचा वाढीव खर्च
- खाणक्षेत्रातील अतिरिक्त जमीन संपादन, कालव्यावरील बांधकामाच्या संख्येत झालेली वाढ तसेच पाणलोट क्षेत्र विकास कामांमुळे झालेला वाढीव खर्च.
- आस्थापना खर्चातील वाढ.

उपरोक्त बाबीमुळे प्रकल्प खर्चात रु. ८९.६५ कोटी इतकी प्रकल्प खर्चात इतकी वाढ झाली असून वाढीव खर्चाचा समावेश प्रथम, द्वितीय व तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यांत आला आहे.

प्रकल्पाच्या कामाच्या सद्यःस्थिती :-

- माती धरण :- माती धरणाचे काम ९७ टक्के काम पूर्ण झाले असून धरणामध्ये प्रकल्पीय १४७.४९ द.ल.घ.मी.(५.२१ टीएमसी) पूर्ण पाणीसाठा जून-२००८ अखेर निर्माण झाला आहे. धरणाचे खालील बाजूचे सुमारे २३००० घ.मी. अश्मपटलाचे काम, बर्म व धरणाचे उतारावरील सुमारे १७००० घ.मी. मातीकाम करणे शिल्लक आहे.
- सांडवा :-ओगी पध्दतीच्या सांडवा संधानकाचे काम पूर्ण होऊन सांडव्यावर उभे उच्चालक पध्दतीचे ६x३ मी. आकाराचे ६ दरवाजे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. सांडव्यातर्गत पॅरापेट वॉल, गाईड वॉल व फ्लॅप वॉलचे संधानकाचे ३०० घ.मी. काम करावयाचे शिल्लक आहे.
- सिंचनासह विद्युत विमोचक :- सिंचनासह विद्युत विमोचकाचे काम सन २००२ मध्ये पूर्ण झाले आहे.
- सिडको विमोचक :- सिडको विमोचकाचे काम सन २००१ मध्ये पूर्ण होऊन सिडको नवी मुंबईस १०० द.ल.लि. प्रतिदिन प्रमाणे पिण्यासाठी पाणी पुरवठा दि.१८/६/२००१ पासून सुरू करण्यांत आला.
- कालवा कामाची सद्यस्थिती :- कालवा कामाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.
- संयुक्त कालवा (लांबी १ ते १२ कि.मी.) :- कालवा कामे पूर्ण झाली असून ७५५ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.
- डावा कालवा (लांबी १३ ते ३० कि.मी) :- कि.मी.१३ ते २३ मधील कामे पूर्ण झाली असून त्यावर ७०५ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कि.मी.२४ ते २७ मधील कामे अंशतः पूर्ण. कि.मी. २८ ते ३० मधील कालवा संरेखा सर्वेक्षण पूर्ण.
- उजवा कालवा (लांबी ११ ते २५ कि.मी):- कि.मी. ११ ते १७ मधील कामे पूर्ण झाली असून त्यावर ५८६ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कि.मी. १८ ते २० मधील कामे अंशतः पूर्ण. कि.मी.२१ ते २५ मधील कालवा संरेखा सर्वेक्षण पूर्ण. तथापि भूसंपादनास विरोध झाल्याने कामे सुरू करता आली नाहीत.
- वितरिका :- डाव्या कालव्यावर कोप्रोली वितरिका कि.मी. १ ते ८, शिर्की वितरिका कि.मी. १ ते १० व वाशी वितरिका कि.मी. १ ते ५ कि.मी. असून सदर वितरिकांचे संरेखा सर्वेक्षण पूर्ण करण्यांत आले आहे. तथापि भूसंपादनास विरोध झाल्याने कामे सुरू करता आली नाहीत. प्रकल्पाचे लाभक्षेत्रात सन २००६ मध्ये महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प घोषित करण्यात आला. त्यामुळे शासन पा.वि.क्र.एसईझेड/२००६/(३४०/२००६) मप्र दि.२८/२/२००७ अन्वयें प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सेझ मधील वितरिकांची कामे थांबविण्याबाबत आदेश देण्यांत आले. त्यामुळे या भागातील कामे सुरु करता आलेली नाहीत.

भूसंपादन व पुनर्वसन :-

- मुख्य धरण :- धरण व बुडीत क्षेत्रासाठी ४७८.०९.६ हे. खाणक्षेत्र, पुनर्वसन व इतर प्रयोजनासाठी ६४.७८.१ हे. असे एकूण ५४२.८७.७ हे. खाजगी क्षेत्राची व ७७.७६.९ हे. सरकारी क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊन सदर क्षेत्र प्रकल्पाच्या कामासाठी ताब्यात घेतले आहे.
- कालवा :- कालव्याच्या कामासाठी २४५.६२ हे. खाजगी जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. त्यापैकी १६८.९५ हे. क्षेत्र संपादित करण्यांत आले आहे. ऊर्वरित ७६.६७ हे. क्षेत्राच्या भूसंपादनास स्थानिक लोकांचा विरोध झाल्याने सादर झालेले प्रस्ताव व्यपगत झाले आहेत. नव्याने भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

- पुनर्वसन :- प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रामध्ये बाधित होत असलेल्या ४३७ कुटुंबांचे पुनर्वसन मौजे कामार्ली, कुरमुर्ली, आंबेघर व तळवली येथे करण्यांत आले आहे. पुनर्वसित गांवठाणांमध्ये नागरी सुविधांची कामे सन १९९१-९२ मध्ये पूर्ण करुन ती पुढील देखभालीसाठी रायगड जिल्हा परिषदेकडे सन १९९७ मध्ये हस्तांतरित केली आहेत.

वनजमीन :-

- मुख्य धरण :- धरण व बुडीत क्षेत्रामध्ये २३८.९८ हे. क्षेत्र वनजमीन बाधित होत असून वनजमीन संपादनास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडील आदेश क्र.८/११३/९६/एफसी दि.१०/२/१९९८ अन्वयें अंतिम मान्यता मिळाली आहे.
- कालवा :- कालव्याच्या कामासाठी ३३.०५ हे. क्षेत्र वनजमीन बाधित होत असून वनजमीन प्रस्तावास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडील पत्र क्र.(ई) एफ नं.८/११०/९९/एफसी ७८५८/एफ, दि.२०/३/२००१ अन्वये तत्वतः मान्यता मिळाली आहे. अंतिम मान्यतेसाठी वननक्त मूल्य रु.३१.१० कोटी रकमेची मागणी वनविभागाकडून करण्यांत आली असून ती देणे प्रलंबित आहे.

पाणीसाठा व पाणीवापर नियोजन :- प्रकल्पांतर्गत धरणामध्ये पाणीसाठा व पाणीवापराचे नियोजनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१)	एकूण पाणीसाठा	१४७.४९ द.ल.घ.मी.
२)	अचल पाणीसाठा.	२.५१ द.ल.घ.मी.
३)	उपयुक्त पाणीसाठा	१४४.९८ द.ल.घ.मी.
४)	बाष्पीभवन व्यय	७.३५५ द.ल.घ.मी.
५)	पिण्यासाठी आरक्षित पाणीसाठा (कायमस्वरुपी)	
	१) सिडको नवी मुंबई (कायमस्वरुपी पिणेसाठी)	३६.५० द.ल.घ.मी.
	२) सिडको नवी मुंबई (पिण्यासाठी अतिरिक्त पाणी पुरवठा)	१८.२५ द.ल.घ.मी.
	३) पेण नगर परिषद	२.२३ द.ल.घ.मी.
	४) वाशी विभागातील वाडया / वस्त्यांना पिण्यासाठी पाणी पुरवठा	०.२७ द.ल.घ.मी.
	एकूण १ ते ४	५७.३५ द.ल.घ.मी.
६)	सिंचनासाठी उपलब्ध होणारा पाणीसाठा (३-४-५)	८०.२७५ द.ल.घ.मी.
७)	उपलब्ध पाण्यातून सिंचित होणारे क्षेत्र (पीकक्षेत्र)	९९३२ हेक्टर

निर्मित सिंचन क्षमता :-

प्रकल्पांतर्गत ११०२१ हे. पीकक्षेत्रापैकी जून-२०१२ अखेर २०४६ हेक्टर पीकक्षेत्र निर्माण झाले आहे.

सिंचन व बिगर सिंचन पाणी वापराद्वारे मिळालेला महसूल :-

हेटवणे धरणातून सिडको नवी मुंबईस पिण्यासाठी करण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठयाद्वारे व प्रकल्पांतर्गत सिंचित झालेल्या क्षेत्राद्वारे ऑगस्ट-२०१२ अखेर अनुक्रमे रु. ९.१८ कोटी व रु. ०.०३ कोटी असा एकूण रु.९.२१ कोटी इतका महसूल शासनास मिळाला आहे.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :-

सदर प्रकल्पावर मार्च-२०१२ अखेर रु.२८३.७४ कोटी इतका खर्च झाला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

बांधकामावरील खर्च.(रु.कोटी)	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादन खर्च. (रु.कोटी)	आस्थापनेवरील खर्च. (रु.कोटी)	एकूण खर्च (रु.कोटी)
१८७.३६	२५.७९	७०.५९	२८३.७४

प्रकल्पांचे नांव :- सांबरकुंड मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पांचे नांव :- सांबरकुंड मध्यम प्रकल्प		तालुका:- अलिबाग	जिल्हा :- रायगड	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर):- २९८३ हे.		निर्मित सिंचन क्षमता (जून २०१२ अखेर) :- निरंक		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता(व्यपगत)	२८/७/१९८२	१९८१-८२	११.७१	२९८३
	नव्याने प्र.मा. (व्यपगत)	१६/३/१९९५	१९९२-९३	२९.७१	२९८३
	दुसऱ्यांदा नव्याने प्र.मा.	६/१०/२००१	१९९९-२०००	५०.४०	२९८३
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ)TAC Clearance		अद्याप मिळालेली नाही.		
	ब) Investment Clearance		नाही.		
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		रु. ३.४२ कोटी.		
४.२	भूसंपादन, पूनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी).		रु. १.५० कोटी		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी).		रु. ०.३१ कोटी.		
४.४	इटीपी खर्च (रु.कोटी).		रु. १.६१ कोटी.		
५	प्रकल्पास प्रथमत: अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		सन २००४-०५		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष व त्यावेळची किंमत		कामास अद्याप सुरुवात झालेली नाही.		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		कामास अद्याप सुरुवात झालेली नाही.		
			रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		--	--	
७.२	भूसंपादन, पूनर्वसन, वनजमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ.		--	--	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		--	--	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		--	--	
७.५	इतर कारणे (ईटीपीसह)		--	--	

८	प्रकल्पाची सद्यःस्थिती	
८.१	**भूसंपादन**	• धरण व बुडीत क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या १२८.०० हे. क्षेत्रापैंकी १०३.८१ हे. क्षेत्र संपादित झाले आहे. उर्वरित २४.१९.० हे. क्षेत्रासाठीची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे. • कालव्याच्या कामासाठी १२४.४५.० हे. खाजगी क्षेत्राची आवश्यकता असून भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.
	पूनर्वसन	• प्रकल्पातर्गंत मौजे महानवाडी, सांबरकुंडवाडी व खैरवाडी या गावांचे १२९ कुंटुंबे व ७०० लोकसंख्या बाधीत होणार असून त्यांचे पुनर्वसन राजेवाडी (रामराज) येथे करण्याचे प्रस्तावित आहे. पुनर्वसनासाठी ११.६९ हे. क्षेत्राचे संपादनासाठी आवश्यक असणारा भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे. पूनर्वसनासाठी आवश्यक असलेली पूनर्वसन कलम ११(१) ची अधिसूचना जाहीर झाली असून कलम १३(१) ची अधिसूचना काढणेसाठी आवश्यक असणारा प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.
	वनजमीन	• प्रकल्पांतर्गत धरण व बुडीत क्षेत्रासाठी २२८.४० हे. वनजमीन संपादन करावी लागणार असून त्यासाठी आवश्यक असणारा प्रस्ताव वन खात्याकडे सादर करण्यांत आला असून त्यावर मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांनी त्यांचे दि.३१/५/२०१२ चे पत्रान्वये उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करण्याचे काम चालू आहे • कालव्यासाठी सुमारे ४६.६०.० हे. वनजमीन संपादित करावी लागणार असून त्यासाठी आवश्यक असलेला प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.
८.२	**धरण**	• मुख्य धरणाचे कामास वनजमीन व भूसंपादनाअभावी अद्याप सुरुवात करता आली नाही.
८.३	**कालवा व वितरण व्यवस्था**	• प्रकल्पांतर्गत ३४ कि.मी.लांबीच्या कालव्याची संरेखा व लाभक्षेत्र निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही प्रगतीत आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्प

अ.क्र.७.३. ते ७.५ ची माहिती.

७.३ **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमूळे झालेली वाढ)**

धरणाचे कामास अदयाप सुरुवात झालेली नसल्याने प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे सद्यस्थितीत प्रकल्प खर्चात झालेली वाढ " निरंक " आहे.

७.४ **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ**

धरणाचे कामास अद्याप सुरुवात झालेली नसल्याने सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे सद्यस्थितीत प्रकल्प खर्चात झालेली वाढ " निरंक" आहे.

७.५ **इतर कारणे.**

धरणाचे कामास अदयाप सुरुवात झालेली नसल्याने इतर कारणामुळे सद्यस्थितीत प्रकल्प खर्चात झालेली वाढ " निरंक" आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्प,

संक्षिप्त टिप्पणी

- सांबरकुंड मध्यम प्रकल्प ता. अलिबाग, जि. रायगड येथे हा प्रकल्प सांबरकुंड नदीवर स्थित आहे.

- **मूळ प्रशासकीय मान्यताः** प्रकल्पास सन १९८१-८२ च्या दरसूचीवर आधारीत रु. ११.७१ कोटी इतक्या रकमेस शासन पा.वि. निर्णय क्रमांक एस.एस.बी./१०८२/३५७/(९२/८५)/जसंअ-२ दिनांक २८/७/१९८२ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली. प्रकल्पास सलग पाच वर्षे निधी उपलब्ध न झाल्याने सदरची प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली.

- **नव्याने प्रशासकीय मान्यताः** प्रकल्पास सन १९९२-९३ च्या दरसूचीवर आधारीत रु. २९.७१ कोटी इतक्या रकमेस शासन पा.वि. निर्णय क्रमांक सांबरकुंड/१०९४/९०९/(२०२/९४)/जसंअ-२ दिनांक १६/३/१९९५ अन्वये नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली. यावेळीही निधी उपलब्ध न झाल्याने नव्याने दिलेली प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली.

- **दुस-यांदा नव्याने प्रशासकीय मान्यताः** प्रकल्पास सन १९९९-२००० च्या दरसूचीवर आधारीत रु. ५०.४० कोटी इतक्या रकमेस शासन पा.वि. निर्णय क्र. २००१/४९८/(८०/२०००)/जसंअ, दि.६/१०/२००१ अन्वये दुसऱ्यांदा नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली.

- प्रकल्पीय नियोजनानुसार धरणामध्ये ४९.८५ द.ल.घ.मी.(१.७६ टी.एम.सी.) पाणीसाठा होऊन १८०८ हेक्टर क्षेत्रास (२९८३ हे. पीकक्षेत्र) सिंचनाचा लाभ होईल अशी तरतूद आहे.

- **प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती :-**

- **धरण :-** धरणाचे कामास वनजमीन व भूसंपादनाअभावी अद्याप सुरुवात करण्यांत आलेली नाही.

- प्रकल्पाचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने त्यांचे पत्र क्र.कोपाविमं/ रेशा-२/२०३१ दि. १७/७/२००४ अन्वये प्रकल्पांतर्गत धरण व अनुषंगिक कामे करणेच्या रु.३१.१० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली. त्यास अनुसरुन धरण व अनुषंगिक कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन रु.२७.५१ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीवर १४.३५ टक्के अधिक्याने (रु. ३१.४६ कोटी) निविदा स्विकारुन दि.४/२/२००५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यांत आला.

- धरण व बुडीत क्षेत्रात बाधित होत असलेल्या २२८.४० हे. वनजमीन संपादनाच्या प्रस्तावास केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाची मान्यता न मिळाल्याने तसेच खाजगी जमिनीचे भूसंपादनही न झाल्याने धरणाचे कामास सुरुवात करता आली नाही. प्रकल्पाचे कामास वनजमीन व भूसंपादनाअभावी विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित अभिकरणाने दि.१/८/२०११ चे पत्रान्वयें निविदा शर्त १५ खाली हे काम काढून घेण्याची विनंती केली. त्यानुसार प्रदेश कार्यालयाने मान्यता दिल्यानुसार दि.२३/०८/२०११ रोजी निविदा शर्त १५ खाली हे काम काढून घेण्यात आले.

- वनजमीन प्रस्तावांतर्गत आवश्यक असणारे पर्यायी वनेतर क्षेत्र नांदेड वनविभागाकडून प्राप्त झाल्यामुळे वनजमीन संपादन प्रक्रिया त्वरेने पूर्ण होईल अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रथमतः वनेतर क्षेत्रात धरणाचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने धरण व अनुषंगिक कामाची नव्याने निविदा प्रक्रिया करण्याबाबतची आवश्यकता निर्माण झाली. वनेतर क्षेत्रात काम सुरू करता यावे यासाठी

धरण संरेखा धरणाचे आस्तित्वातील संरेखेच्या खालील बाजूस १८० मी. ने सरकविण्याचे प्रस्तावित करुन सदर प्रस्तावास प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र.७९१३, दि. १९/१०/२०११ अन्वयें मान्यता देण्यांत आली. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या धरण व अनुषंगिक कामे करण्याच्या रु.१८२.२८ कोटी खर्चाचे अंदाजपत्रकास प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र.८६०१, दि. २३/११/२०११ अन्वयें तांत्रिक मान्यता प्रदान केली.

- प्रकल्पांतर्गत माती धरणाचे बांधकाम व अनुषंगिक कामे करणेच्या कामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

- **प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रक** :- प्रकल्पाचे अंदाजपत्रक सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रदेश कार्यालयास दि. २४/५/२०१२ रोजी सादर केले असता त्यावर प्रदेश कार्यालयाने त्यांचे पत्र क्र.४१८७, दि.३०/६/२०१२ अन्वयें काही शेरे उपस्थित केले आहेत. त्यामध्ये शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र.सुप्रमा/ ०४११/(२६२/२०११) /मोप्र-१ दि. १०/८/२०१२ च्या अनुषंगाने प्रकल्प खर्चाची वाढ टाळण्यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून माती धरण, सांडवा इ.चे संकल्पन प्राप्त करून घेऊनच अंदाजपत्रक सादर करावे अशी सूचना देण्यात आली आहे, जेणेकरुन संकल्पचित्रातील बदलामुळे खर्चात नव्याने वाढ होणार नाही.

- **काटछेद संकल्पन** :-अंदाजपत्रकासाठी माती धरणाच्या काटछेदाचे संकल्पन अधीक्षक अभियंता (मा.ध.), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे पत्र क्र.मसंसं/माध/माध-४/सांबरकुंड/२२१/९७५, दि.७/९/२०१२ अन्वयें प्राप्त झाले आहे.

- मंजूर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पांतर्गत सांडव्याची लांबी ८४.५० मी. असून सांडव्यावर १२ मी. x ५ मी.आकाराचे सहा वक्राकार पध्दतीचे दरवाजे बसविण्याची तरतूद आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून सदर प्रकल्पाकरीता पूर अभ्यास करण्यांत आला असून त्याप्रमाणे सांडव्यावर १२ मी. x ५ मी.आकाराचे तीन वक्राकार पध्दतीचे दरवाजे बसविण्याचे निश्चित केले आहे.

- अंदाजपत्रकासाठी प्राप्त झालेला माती धरणाचा काटछेद संकल्पन व पूर अभ्यासानंतर सांडव्यावरील दरवाजांची कमी झालेली संख्या व कमी झालेल्या सांडवा लांबीचा विचार करुन प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

- **कालवा** :- प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा १५ कि.मी. आंदोशी शाखा ९ कि.मी. चौलशाखा ५ कि.मी. व डावा तीर कालवा ५ कि.मी. प्रस्तावित आहे. कालवा संरेखा व लाभक्षेत्र निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे.

प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे:

प्रकल्पाचे कामास अदयाप सुरुवात झालेली नसल्याने प्रकल्पाचे खर्चात वाढ झालेली नाही.

प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती

- **धरण:-** मुख्य धरणाचे कामास वनजमीन व भूसंपादनाअभावी अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही.

- **कालवा:**- प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा १५ कि.मी. आंदोशी शाखा ९ कि.मी. चौलशाखा ५ कि.मी. व डावा तीर कालवा ५ कि.मी. प्रस्तावित आहे. कालवा संरेखा व लाभक्षेत्र सर्वेक्षणाची कार्यवाही प्रगतीत आहे.

- **भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन सद्यस्थिती :-**

- **भूसंपादन :-**

- **मुख्य धरण :-** धरण व बुडीत क्षेत्रासाठी १२८.०० हे. खाजगी क्षेत्राचे संपादन करावे लागणार असून त्यापैकी १०३.८१ हे. भूसंपादन क्षेत्र संपादित झाले आहे. उर्वरित २४.१९ हे. क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे.

- **कालवा** :- कालव्याचे कामासाठी १२४.४५ हे. क्षेत्र संपादित करण्याची आवश्यकता असून भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

- **पुनर्वसन** :- प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रामध्ये मौजे महानवाडी, सांबरकुंडवाडी व खैरवाडी या गावातील १२९ कुंटुंबे व ७०० लोकसंख्या बाधित होणार असून त्यांचे पुनर्वसन राजेवाडी (रामराज) येथे करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी ११.६९ हे. क्षेत्राचे संपादनासाठी आवश्यक असणारा भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे. पुनर्वसनासाठी आवश्यक असलेली पुनर्वसन कायद्यांतर्गत कलम ११(१) ची अधिसूचना सप्टेंबर २०११ मध्ये जाहीर करण्यात आली असून कलम १३(१) ची अधिसूचना काढण्यासाठी आवश्यक असणारा प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.

- **वनजमीन** :- प्रकल्पांतर्गत धरण व बुडीत क्षेत्रासाठी २२८.४० हे. वनजमीन बाधित होत असून वनजमीन निर्वनीकरणाच्या प्रस्तावावर मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांनी त्यांचे दि.३१/५/२०१ रोजीचे पत्रान्वयें उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता करण्याचे काम चालू आहे. कालव्यासाठी सुमारे ४६.६० वनजमीन बाधित होत असून वनजमीन निर्वनीकरणासाठी आवश्यक असणारा प्रस्ताव तयार करण्याचे काम चालू आहे.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी**

सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रु. ३.४२ कोटी खर्च झाला असून झालेल्या खर्चाची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

बांधकामावरील खर्च (रु. कोटी)	भूसंपादन व पूनर्वसन यावरील खर्च (रु. कोटी)	आस्थापनेवरील खर्च (रु. कोटी)	एकुण खर्च (रु. कोटी)
०.३१	१.५०	१.६१	३.४२

प्रकल्पाचे नाव : गडनदी मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव : गडनदी मध्यम प्रकल्प	तालुका : संगमेश्वर		जिल्हा : रत्नागिरी	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : (पीकक्षेत्र)	४२९६	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर): जून २०१२		१३६६
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रू. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता	२०/०८/१९८३	१९८२-८३	१०.३७	३६०६
	सुप्रमा-१	२५/०२/२०००	१९९८-९९	११२.८०	३६०६
	सुप्रमा-२	०५/०९/२००९	२००७-०८	४१९.८२	४२९६
	सुप्रमा-३	२७/०९/२०११	२००९-१०	६५१.४२	४२९६
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/ Investment) संदर्भ व किंमत (रू. कोटी):				
	अ) TAC Clearance Reference	सदर प्रकल्प मध्यम प्रकल्प असुन आंतरराज्य नसल्याने केंद्र शासनाची मान्यता आवश्यक नाही.			
	ब) Investment Clearance Reference	राज्य शासनाने इंग्रजी पत्र.क्र. SFC-2011/ 1123/ (CR-490/11)/MP दि. १३-०८- २०१२ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या रू. ६५१.२४ कोटी रकमेस गुंतवणूक मान्यता दिली आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रू.कोटी) :		४५५.८५		
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) :		३१.११		
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी) :		४०९.९१		
४.४	इटीपी खर्च (रू.कोटी) :		१४.८३		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्षः		१९८७-८८		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष/त्यावेळीची किंमत (रू.कोटी) :		१२/१९९४		८६.०६
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे:		एकूण वाढ रू.६४१.०५ कोटी (६५१.४२-१०.३७)		
			रक्कम(कोटी)		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		२४६.४९		३८.४५
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (४३.७५-०.२३)		४३.५२		६.७९
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ) :		९२.९१		१४.५०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :		१८८.८१		२९.४५
७.५	इतर कारणे (ई.टी.पी. सहीत) :		६९.३२		१०.८१

८	प्रकल्पाची सद्यस्थिती:	
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन :	**भूसंपादन**:- धरण व बुडीत क्षेत्र यासाठी एकूण ३५४.११ हे. क्षेत्र आवश्यक आहे. त्यापैकी ३१७.८८ हे. क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण. उर्वरित ३६.२३ हे. बुडीत क्षेत्राची प्रक्रिया निवाडा स्तरावर आहे. **कालव्यासाठी** एकूण २८२ हे. क्षेत्र आवश्यक असुन त्यापैकी १२८.३२ हे. क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण आहे. उर्वरित कालवा क्षेत्राचे संपादन कालवा संरेखा मंजूरी प्रमाणे प्रगतीपथावर आहे. **पुनर्वसन** :- प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रामध्ये एकूण पाच गावातील ६२८ कुटुंबे बाधित असुन त्यांचे पुनर्वसन खेरशेत, नांदगांव, घाडगेवाडी, शिर्केवाडी व रातांबी- काळंबेवाडी या गावठाणात करण्यात आले आहे. खेरशेत व नांदगांव गावठाणातील सर्व नागरी सुविधा पूर्ण असुन घाडगेवाडी व शिर्केवाडी या गावठाणातील ९० टक्के नागरी सुविधांची कामे पूर्ण आहेत. बाधित कुटुंबे पुनर्वसन गावठाणांमध्ये स्थलांतरीत झाली आहेत. रातांबी काळंबेवाडी गावठाणातील नागरी सुविधा ५० टक्के पूर्ण आहेत. **वनजमीन** : सदर प्रकल्पात वनजमीन येत नाही.
८.२	धरण:	धरणाचे मातीकाम व मुख्य विमोचकाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. सांडव्याचे संधानकाचे काम ८० टक्के पूर्ण असुन व्दार उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. प्रवेश व पुच्छ कालवा खोदाई १०० टक्के पूर्ण असुन पुच्छ कालव्यमधील उर्जाव्यय रचनेचे काम प्रगतीपथावर आहे. धरणामध्ये एकूण प्रस्तावित ८३.२१२ दलघमी (२.९४ टीएमसी) पाणीसाठयापैकी ७५.६२ दलघमी (२.६७ टीएमसी) पाणीसाठा जून २०१२ अखेर निर्माण झाला आहे.
८.३	कालवा व वितरण व्यवस्था :	सदर प्रकल्पास उजवा व डावा असे दोन कालवे आहेत. उजवा कालवा ४७ किमी असुन त्यापैकी २० किमी मधील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. उजवा कालवा किमी २१ ते ३० मधील निविदा प्रक्रिया पूर्ण आहे. किमी ३१ ते ४० मधील कालवा संरेखा मंजूर असुन सविस्तर अंदाजपत्रके तयार करणेत येत आहेत. किमी. ४१ ते ४७ मधील सविस्तर संरेखा सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. डावा कालवा एकूण २७ किमी असुन त्यापैकी किमी १ ते ७ मधील बहुतांश कामे पूर्ण आहेत. किमी ८ ते २७ मधील सविस्तर संरेखा सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. एकूण प्रस्तावित लाभक्षेत्र ४२९६ हे असुन ६/२०१२ अखेर १३६६ हे. सिंचनक्षमता निर्मिती झाली आहे.

गडनदी मध्यम प्रकल्प
अ. क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल.

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ)

- प्रकल्पाचे घळभरणीचे काम चालू असताना घाडगेवाडी, शिर्केवाडी व रातांबी-काळंबेवाडी या गावठाणाचे पुनर्वसन तातडीने करणे आवश्यक होते. या प्रकल्पग्रस्तांनी जलाशयाच्या वरील बाजुस त्यांची उर्वरित जमीन असल्याने, जलाशया लगतच पूनर्वसन गावठाणांची मागणी केली. त्यामुळे त्यांना पर्यायी शेतीजमीनी ऐवजी त्यांच्या उर्वरित जमीनीचा उपयोग शेतीसाठी करता येणार होता. यासाठी प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी शेतजमीनींऐवजी बुडीत क्षेत्रालगतचे त्यांचे मालकीच्या क्षेत्रास उपसा सिंचनाने प्रकल्पातूनच पाणी दयावे अशी मागणी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांचेसमवेत दि. २९/११/२००५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत केली. त्यान्वये धरणामध्ये अतिरीक्त पाणीसाठा करणे आवश्यक होते. सदर अतिरीक्त पाणीसाठा निर्माण करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाचे दि. ३१/१०/२००६ च्या ३५ व्या बैठकीमध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याच्या अधीन राहून सर्वसाधारण मान्यता मिळाली. त्याप्रमाणे धरणाचे काम पूर्ण झाले आहे. सदर अतिरीक्त पाणीसाठा करण्याच्या कामाचा समावेश मंजूर व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात केला आहे. सदर व्याप्ती बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली.
- मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये जलाशयाच्या बाजूने पोचरस्ते (रिंग रोड) या बाबींसाठी तरतूद नव्हती. प्रकल्पांतर्गत जलाशयाच्या बाजुने पुनर्वसन गावठाणे असल्याने तसेच येडगेवाडी रातांबी ही गावे असल्याने त्यांचेसाठी पोचरस्ता देणे आवश्यक होते. याबाबतची मागणी प्रकल्पग्रस्तांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांचेसमवेत दि. २९/११/२००५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत केली होती. सदरची मागणी या बैठकीत मान्य करणेत आली. यास्तव प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

- धरणाचा सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण/१०१/२००१/(५७१/२००१)मोप्र-२ दि. ९/७/२००२ अन्वये धरणाचे कोणतेही बांधकाम दगडी बांधकामात करू नये अशा सूचना आहेत त्यास अनुसरून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून प्राप्त सांडवा संकल्पनानुसार सांडव्याचे बांधकाम संधानकामध्ये करण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.
- मूळ अंदाजपत्रकामध्ये सांडव्याच्या अप्रवाही भागाच्या बांधकामासाठी दगडी बांधकामातील मार्गदर्शक भिंतीची तरतूद होती. क्षेत्रिय परिस्थितीनुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त संकल्पनानुसार संधानकातील विभाजक भिंतीचे काम करण्यात आले. त्यामुळे संधानकाच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.
- माती धरणासाठी बुडीत क्षेत्राच्या खाणीमधील उपलब्ध साहित्याच्या गुणधर्माच्या आधारे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून माती धरण काटछेद प्राप्त करण्यात आला. त्यानुसार मातीकामाच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.
- मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये मुख्य विमोचकासाठी ढोबळ तरतूद करण्यात आली होती. क्षेत्रिय परिस्थितीनुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून बोगदयासह सिंचन

तथा विद्युत विमोचकाचे सविस्तर संकल्पन प्राप्त करून घेण्यात आले. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

- कालव्याचे बांधकाम खोल खुदाईमध्ये तसेच उंच भरावामध्ये असुन मुळ अंदाजपत्रकामध्ये कालव्याच्या किंमतीचा समावेश ढोबळ मानाने करण्यात आला होता. प्रत्यक्ष काम करताना बांधकामांची सविस्तर संकल्पने करून बांधकाम करणे आवश्यक होते. त्यामुळे सविस्तर संकल्पनांअंती कालव्याच्या किंमतीमध्येही वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे :

- प्रकल्पाच्या आस्थापना खर्चामध्ये होणा-या वाढीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- निविदा बाबींशिवाय इतर अतिरीक्त बाबी उद्‌भवल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली आहे.
- स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा स्विकारली.
- निविदा शर्तीनुसार भाववाढ विचारत घेतली आहे.

गडनदी मध्यम प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- गडनदी मध्यम पाटबंधारे प्रकल्प शास्त्री खो-यातील गडनदीवर आहे.
- मूळ प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन १९८२-८३ च्या दरसूचीवर आधारीत रू.१०.३७ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र.जीएडी/१०८१/२८३/(१५/८३)जसंअ-३ दि.२०/८/१९८३ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन १९९८-९९ च्या दरसूचीवर आधारीत रू.११२.८० कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. गडनदी/१०९६/२६३९/(६४३/९६) मप्र दि.२५/२/२००० अन्वये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन २००७-०८ च्या दरसूचीवर आधारीत रू. ४१९.८२ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. सुप्रमा/२०.०८/१०७४/(२६३/२००८) मप्र दि. ५/९/२००९ अन्वये व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन २००९-१० च्या दरसूचीवर आधारीत रू. ६५१.४२ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. सुप्रमा/२०१०/९२६/(३११/२०१०) मप्र दि. २७/९/२०११ अन्वये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- सदर प्रकल्पामुळे ४२९६ हे. पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित असुन त्याचबरोबर १.२५ मे. वॅट वीज निर्मिती होणार आहे.
- प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता माहे ८/१९८३ मिळाली. तथापि त्यानंतर प्रकल्पास सन १९८६-८७ पर्यंत निधी मिळाला नाही. तद्नंतर सन १९९४-९५ पर्यंत प्रकल्पास कामासाठी अत्यल्प तरतूद उपलब्ध झाली. दरम्यानच्या काळात प्रकल्पाची प्राथमिक सविस्तर सर्वेक्षण कामे, वसाहतीची कामे तसेच भूसंपादन प्रस्ताव तयार करणे तसेच कालवा सविस्तर सर्वेक्षण करणे इ. कामे प्रगतीपथावर होती.
- सन १९९४-९५ ते सन १९९९-२००० पर्यंत काही प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या कामांना तसेच पुनर्वसन कामाना सुरूवात करण्यात आली. माहे १२/१९९४ पासून प्रकल्पाच्या धरण कामास सुरूवात करण्यात आली. तथापि भूसंपादनाच्या प्रक्रियेस व पुनर्वसनाच्या प्रक्रियेत विलंब लागत असल्याने प्रकल्पाच्या कामास प्रकल्पग्रस्तांचा विरोध होत होता. त्यामुळे कामाना गती देता आली नाही.
- अशाप्रकारे अपूरा निधी व भुसंपादन, पुनर्वसन प्रक्रियेस विलंब यामध्ये १९८३ ते २००० असा प्रदिर्घ कालावधी लागल्याने प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झाली.
- मुख्य धरण कामाची निविदा सन २०००-२००१ मध्ये निश्चित करण्यात आली. मुख्य धरणाचे घळभरणी व्यतिरीक्तचे मातीकाम सन २०००-०१ ते सन २००२-०३ पर्यंत करण्यात आले. दरम्यान प्रकल्पग्रस्तांनी जलाशयाच्या लगतच पुनर्वसन गावठाणे देण्यात यावी, राजिवली गावाचे भुसंपादनाचे पैसे दयावेत, प्रकल्पाच्या जलाशयाच्या भोवती दोन्ही बाजूस रिंगरोड करण्यात यावा तसेच जलाशयालगतच्या उर्वरित शेतीस उपसा सिंचनाने पाणी दयावे या मागण्यासाठी प्रकल्पाच्या कामात अडथळे आणून प्रकल्पाचे काम बंद पाडले. त्यामुळे प्रकल्पाचे काम सन २००५-०६ पर्यंत बंद होते.

- त्यानंतर प्रकल्पग्रस्तांशी चर्चा करून प्रकल्पाच्या घळभरणीचे काम मे २००८ अखेर पूर्ण करण्यात आले. प्रकल्पाच्या कालव्याच्या कामांनाही भूसंपादनासाठी तीव्र विरोध होत आहे. भूसंपादनाअभावी उजवा कालवा किमी २१ ते ३० मधील निविदा सन २०१० मध्ये निश्चित होवूनही आजअखेर कामास सुरूवात झालेली नाही. उर्वरित कालवा सर्वेक्षण करण्यात आले आहे. तथापि खाजगी वाटाघाटीने भूसंपादनास लोक तयार नसल्याने भूसंपादन प्रक्रियेस होणा-या विलंबामुळे कामास अपेक्षित गती देता येत नाही.

प्रकल्पाच्या किंमतीतील वाढीची कारणे :

- तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन २००९-१० च्या दरसूचीनुसार मंजूर असल्याने प्रकल्पाच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे रू. २४६.४९ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात भूसंपादन व पुनर्वसनासाठी रू. ०.२३ कोटी तरतूद होती. भूसंपादनाचे दर वाढल्यामुळे तसेच पुनर्वसनाच्या नागरी सुविधा पुरविणेच्या खर्चामध्ये वाढ झाल्याने त्याची रू. ४३.७५ कोटी तरतूद मंजूर तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रू. ४३.५२ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार ६५.३३ दलघमी (२.३१ टीएमसी) पाणीसाठा व ३६०६ हे. पीकक्षेत्र प्रस्तावित होते.

- प्रकल्पाचे घळभरणीचे काम चालू असताना घाडगेवाडी, शिर्केवाडी व रातांबी-काळंबेवाडी या गावठाणाचे पुनर्वसन तातडीने करणे आवश्यक होते. या प्रकल्पग्रस्तांनी जलाशयाच्या वरील बाजुस त्यांची उर्वरित जमीन असल्याने, जलाशया लगतच पुनर्वसन गावठाणांची मागणी केली. त्यामुळे त्यांना पर्यायी शेतीजमिनी ऐवजी त्यांच्या उर्वरित जमीनीचा उपयोग शेतीसाठी करता येणार होता. यासाठी प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी शेतजमिनींऐवजी बुडीत क्षेत्रालगतचे त्यांचे मालकीच्या क्षेत्रास उपसा सिंचनाने प्रकल्पातूनच पाणी दयावे अशी मागणी जलसंपदा मंत्री यांचेसमवेत दि.२९/११/२००५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत केली. त्यान्वये धरणामध्ये अतिरिक्त पाणीसाठा करणे आवश्यक होते. सदर अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाचे दि.३१/१०/२००६ च्या ३५ व्या बैठकीमध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याच्या अधीन राहून सर्वसाधारण मान्यता मिळाली. त्याप्रमाणे धरणाचे काम पूर्ण झाले आहे. सदर अतिरिक्त पाणीसाठा करण्याच्या कामाचा समावेश मंजूर व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात आहे. सदर व्याप्ती बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली. यामुळे धरणामध्ये १७.८८ दलघमी (०.६३ टीएमसी) अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होऊन ६९० हे. अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

- मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकामध्ये जलाशयाच्या बाजूने पोचरस्ते (रिंग रोड) या बाबींसाठी तरतूद नव्हती. प्रकल्पांतर्गत जलाशयाच्या बाजुने पुनर्वसन गावठाणे असल्याने तसेच येडगेवाडी रातांबी ही गावे असल्याने त्यांचेसाठी पोचरस्ता देणे आवश्यक होते. याबाबतची मागणी प्रकल्पग्रस्तांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांचेसमवेत दि. २९/११/२००५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत केली होती. सदरची मागणी या बैठकीत मान्य करणेत आली. यास्तव प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

- धरणाचा सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण/१०१ /२००१/(५७१/२००१) मोप्र-२ दि. ९/७/२००२ अन्वये धरणाचे कोणतेही बांधकाम दगडी बांधकामात करू नये अशा सूचना आहेत त्यास अनुसरून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून प्राप्त सांडवा संकल्पनानुसार सांडव्याचे बांधकाम संधानकामध्ये करण्यात आले.

- मूळ अंदाजपत्रकामध्ये सांडव्याच्या अप्रवाही भागाच्या बांधकामासाठी दगडी बांधकामातील मार्गदर्शक भिंतीची तरतूद होती. क्षेत्रिय परिस्थितीनुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त संकल्पनानुसार संधानकातील विभाजक भिंतीचे काम करण्यात आले. त्यामुळे संधानकाच्या परिमाणात वाढ झाली आहे.

- माती धरणासाठी बुडीत क्षेत्राच्या खाणीमधील उपलब्ध साहित्याच्या गुणधर्माच्या आधारे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून प्राप्त माती धरण काटछेदानुसार मातीकामाच्या परिमाणात वाढ झाली आहे.

- मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये मुख्य विमोचकासाठी ढोबळ तरतूद करण्यात आली होती. क्षेत्रिय परिस्थितीनुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून बोगदयासह सिंचन तथा विद्युत विमोचकाचे सविस्तर संकल्पन प्राप्त करून घेण्यात आले.

- कालव्याचे बांधकाम खोल खुदाईमध्ये तसेच उंच भरावामध्ये असुन मुळ अंदाजपत्रकामध्ये कालव्याच्या किंमतीचा समावेश ढोबळ मानाने करण्यात आला होता. प्रत्यक्ष काम करताना बांधकामांची सविस्तर संकल्पने करून बांधकाम करणे आवश्यक होते. त्यामुळे सविस्तर संकल्पनांअंती कालव्याच्या किंमतीमध्येही वाढ झाली आहे.

- प्रकल्पाच्या आस्थापना खर्चामध्ये होणा-या वाढीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा स्विकारणे व निविदा शर्तीनुसार भाववाढ विचारात घेतली असल्याने प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. तसेच निविदा बाबींशिवाय इतर अतिरिक्त बाबी उदभवल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली आहे.

प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती :

- **धरण कामे :** धरणाचे मातीकाम व मुख्य विमोचकाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. सांडव्याचे संधानकाचे काम ८० टक्के पूर्ण असुन व्दार उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. प्रवेश व पुच्छ कालवा खोदाई १०० टक्के पूर्ण असुन पुच्छ कालव्यमधील उर्जाव्यय रचनेचे काम प्रगतीपथावर आहे. धरणामध्ये एकूण प्रस्तावित ८३.२१२ दलघमी (२.९३ टीएमसी) पाणीसाठयापैकी ७५.६२ दलघमी (२.६७ टीएमसी) पाणीसाठा निर्माण झाला आहे.

- **कालवे :** योजनेअंतर्गत उजवा कालवा ४७ किमी असुन त्यापैकी २० किमी मधील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. उजवा कालवा किमी २१ ते ३० मधील निविदा प्रक्रिया पूर्ण आहे. किमी ३१ ते ४० मधील कालवा संरेखा मंजूर असुन सविस्तर अंदाजपत्रके तयार करणेत येत आहेत. किमी. ४१ ते ४७ मधील सविस्तर संरेखा सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. डावा कालवा एकूण २७ किमी असुन त्यापैकी किमी १ ते ७ मधील बहुतांश कामे पूर्ण आहेत. किमी ८ ते २७ मधील सविस्तर संरेखा सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. एकूण प्रस्तावित लाभक्षेत्र ४२९६ हे असुन ६/२०१२ अखेर १३६६ हे. सिंचनक्षमता निर्मिती झाली आहे.

- **भूसंपादन :** धरण व बुडीत क्षेत्र यासाठी एकूण ३५४.११ हे क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३१७.८८ हे क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण. उर्वरित ३६.२३ हे बुडीत क्षेत्राची प्रक्रिया निवाडा स्तरावर आहे. कालव्यासाठी एकूण २८२ हे क्षेत्र आवश्यक असुन त्यापैकी १२८.३२ हे क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण आहे. उर्वरित कालवा क्षेत्राचे संपादन कालवा संरेखा मंजूरी प्रमाणे टप्प्याटप्प्याने प्रगतीपथावर आहे. पुनर्वसन गावठाणासाठी आवश्यक ६७.८८ हे क्षेत्र ताब्यात आहे.

- **पुनर्वसन :** प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रामध्ये एकूण पाच गावातील ६२८ कुटुंबे बाधित असून त्यांचे पुनर्वसन खेरशेत, नांदगांव, घाडगेवाडी, शिर्केवाडी व रातांबी-काळंबेवाडी या गावठाणात करण्यात आले

आहे. खेरशेत व नांदगांव गावठाणातील नागरी सुविधा पूर्ण असून सदर गावठाणे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे पत्र क्र. पुनर्वसन का-२/गडनदी/नासुहस्तां/२०११ दि.२/६/२०११ अन्वये जिल्हापरिषद, रत्नागिरी यांचेकडे हस्तांतरीत केली आहेत. घाडगेवाडी व शिर्केवाडी या गावठाणातील ९० टक्के नागरी सुविधांची कामे पूर्ण असून बाधित कुटुंबे पुनर्वसन गावठाणांमध्ये स्थलांतरीत झाली आहेत. रातांबी काळंबेवाडी गावठाणातील नागरी सुविधा ५० टक्के पूर्ण आहेत.

- **अे.आय.बी.पी. :** प्रकल्पाचा समावेश सन २००९-१० मध्ये केंद्र शासनाच्या अेआयबीपी अंतर्गत करणेत आला. प्रकल्पाचा सन २०११-१२ साठीचा रू. २८८.९७ कोटीचा सलगता प्रस्ताव दि.१९/३/२०१२ रोजी मंजूर असुन सन २०१२-१३ साठी सलगता प्रस्ताव शासनास सादर केला आहे. अेआयबीपी अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ मध्ये अनुक्रमे रू. १७.५५ कोटी, रू. ९.०० कोटी, व रू. ११.२५ कोटी निधी प्राप्त झाला आहे. सन २०१२-१३ साठी प्रकल्पाची अर्थसंकल्पीय तरतूद रू. ७०.०० कोटी इतकी आहे.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :** सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रू. ४५५.८५ कोटी खर्च झाला असुन त्याची विगतवारी खालील प्रमाणे आहे.

बांधकामावरील खर्च (रू. कोटी)	भूसंपादन व पुनर्वसन यावरील खर्च (रू. कोटी)	आस्थापनेवरील खर्च (रू. कोटी)	एकूण खर्च (रू. कोटी)
४०९.९१	३१.११	१४.८३	४५५.८५

प्रकल्पाचे नाव : जामदा मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव : जामदा मध्यम प्रकल्प	तालुका : राजापूर		जिल्हा : रत्नागिरी	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : (पिकक्षेत्र)	४९००	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर): जून २०१२		काही नाही
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रू. कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता (व्यपगत)	०४/१२/१९९५	१९९३-९४	४१.९५	४७५०
	पुनः प्रशासकीय मान्यता	०१/०७/२००४	२००३-०४	१६६.५९	४९००
	सुप्रमा-१	०७/०९/२००९	२००५-०६	३४०.८५	४९००
	सुप्रमा-२	१२/०१/२०११	२००९-१०	५१५.२९	४९००
४	केंद्र शासनाची अद्यावत मान्यता (TAC/Investment) संदर्भ व किंमत (रू.कोटी) :				
	अ)TAC Clearance Reference	सदर प्रकल्प मध्यम प्रकल्प असुन आंतरराज्य नसल्याने केंद्र शासनाची मान्यता आवश्यक नाही.			
	ब) Investment Clearance Reference	राज्य शासनाने इंग्रजी पत्र.क्र. SFC-2011/ 155/ (CR-66/ 11)/MP दि. २५-०८-२०१२ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या रू. ५१९.२९ कोटी रकमेस गुंतवणूक मान्यता दिली आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रू.कोटी) :			१८६.७८	
४.२	भूसंपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रू.कोटी) :			१.३९	
४.३	बांधकामावरील खर्च (रू.कोटी) :			१७८.५१	
४.४	इटीपी खर्च (रू.कोटी) :			६.८८	
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष :			२००४-०५	
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष/ त्यावेळीची किंमत (रू.कोटी) :			०४/२००६	३४०.८५
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे:			एकूण वाढ रू. ३४८.७० कोटी (५१५.२९-१६६.५९)	
				रक्कम(कोटी)	टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ			१३९.२८	३९.९४
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (१५.६०-२.४२)			१३.१८	३.७८
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ) :			निरंक	निरंक
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :			१२१.७६	३४.९२
७.५	इतर कारणे (ई.टी.पी.सहीत) :			७४.४८	२१.३६

८	प्रकल्पाची सद्यस्थितीः	
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन :	**भूसंपादन** :- योजनेच्या धरण बैठकीसाठी आवश्यक ४४.२२ क्षेत्राचे भूसंपादन दि. ३१/१०/२००९ रोजी पूर्ण झाले आहे. बुडीत क्षेत्रासाठी काजिर्डा व राणेवाडी मधील अनुक्रमे २१३.५२ हे. व ३७.७३ हे. असे एकूण २५१.२५ हे. क्षेत्र आवश्यक आहे. बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी ३/२००६ मध्ये हाती घेण्यात आली. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे चार वर्ष बुडीत क्षेत्राच्या संयुक्त मोजणीचे काम प्रलंबित होते. प्रकल्पग्रस्तांशी वाटाघाटीअंती बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी मार्च २०१० ते मे २०१० या कालावधीत पूर्ण करण्यात आली आहे. कलम-४ व ६ च्या अधीसूचनेची कार्यवाही करण्यात येत आहे. कालवा संरेखा मंजूरीनंतर टप्प्याटप्प्याने भूसंपादन कार्यवाही करण्यात येईल. **पुनर्वसन** :- प्रकल्पांतर्गत काजिर्डा व राणेवाडी येथील एकूण १९५ घरे व ७०४ कुटुंबे बाधीत होत आहेत. त्याचे पुनर्वसनासाठी कोळंब-खडक, मूर-सांडवा, काजिर्डा-फणशी आणि काजिर्डा-ब्राह्मणखोरे असे चार भूसंपादन प्रस्ताव कार्यवाहीत आहेत. त्यापैकी काजिर्डा-फणशी व मूर-सांडवा या गावठाणाची संयुक्त मोजणी मे २०१२ अखेर पूर्ण झाली असुन उर्वरित प्रस्तावांची संयुक्त मोजणी लवकरच करण्यात येत आहे. सर्व पुनर्वसन गावठाणासाठी १२२.५७ हे. क्षेत्र आवश्यक असुन कलम-४ ची कार्यवाही सुरू आहे. **वनजमीन** :- प्रकल्पासाठी वनजमीनीची आवश्यकता नाही.
८.२	धरणः	धरणाच्या डाव्या तीरावरील मातीकाम प्रगतीत असुन उजव्या तीरावरील मातीकाम अद्याप हाती घ्यावयाचे आहे. प्रवेश व पुच्छ कालव्याची खोदाई ८० टक्के पूर्ण आहे. सांडव्याचे व विभाजक भिंतीचे संधानकाचे काम प्रगतीपथावर आहे. मुख्य विमोचकाचे काम अद्याप हाती घ्यावयाचे आहे. प्रकल्पाचा प्रस्तावित पाणीसाठा ४८.२५९ दलघमी (१.७० टीएमसी) आहे. अद्याप पाणीसाठा निर्मिती झाली नाही.
८.३	कालवा व वितरण व्यवस्था :	प्रकल्पास उजवा कालवा ६५ किमी व डावा कालवा ४७ किमी प्रस्तावित आहे. दोन्ही कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प
अ. क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतूदीमुळे झालेली वाढ) :

व्याप्तीत बदल झालेला नाही.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :

- सांडव्याचे काम करताना सांडवा, प्रवेश व पुच्छ कालव्यामध्ये मोठया आकाराचे दगड गोटे व तडे गेलेला खडक लागला. यास्तव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचेकडून कार्यक्षेत्राची सविस्तर पहाणी करण्यात आली. त्यानंतर क्षेत्रिय माहितीच्या आधारे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून सांडव्याचे सविस्तर संकल्पन प्राप्त करून त्यास सक्षमस्तरावर मान्यता घेण्यात आली आहे. सविस्तर संकल्पनाअंती संधानकाच्या व खोदाईच्या परिणामामध्ये वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.
- प्रवेश कालव्यामध्ये क्षेत्रिय परिस्थितीनुसार संरक्षक भिंतीचे काम सविस्तर संकल्पनामध्ये नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामळे संधानकाच्या परिमाणात वाढ झाल्याने प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.
- मूळ अंदाजपत्रकात विभाजक भिंती ऐवजी मार्गदर्शक भिंती प्रस्तावित होत्या. क्षेत्रिय ठिकाणचा कठिणस्तर Fractured असल्याने व अशा थरामध्ये अनुत्सारीत भागाचे अबटींग करणे अयोग्य असल्याने सविस्तर संकल्पनामध्ये दोन्ही बाजूस विभाजक भिंतीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे संधानकाच्या व खोदाईच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

  अशा रीतीने सविस्तर घटक संकल्पचित्रातील बदलामुळे रू. १४८.०९ कोटी वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे :

- प्रकल्पाच्या आस्थापना खर्चात होणा-या वाढीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- सन २००७-०८ व सन २००८-०९ चे पावसाळयामध्ये प्रवेश व पुच्छ कालवा तसेच सांडव्याच्या डोंगर उताराकडील भाग ढासळून प्रवेश व पुच्छ कालवा तसेच सांडव्यामध्ये आल्याने सदरचा भूस्तर काढणे काम करावे लागले. त्यामुळे खर्चात वाढ झाली आहे.
- निविदा बाबींशिवाय इतर अतिरीक्त बाबी उद्‌भवल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली आहे.
- स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा स्विकारली.
- निविदा शर्तीनुसार भाववाढ विचारत घेण्यात आली आहे.

जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- जामदा मध्यम पाटबंधारे प्रकल्प वाघोटन खो-यातील जामदा नदीवर आहे.
- मूळ प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन १९९३-९४ च्या दरसूचीवर अधारीत रू. ४१.९५ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. जामदा १०८६/७७८ (२२४/८६) दि. ४/१२/१९९५ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रकल्पास सलग पाच वर्ष निधी न मिळाल्यामुळे सदरची मान्यता व्यपगत झाली.
- पुन:प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन २००३-०४ च्या दरसूचीवर अधारीत रू. १६६.५९ कोटी इतक्या रकमेस कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. कोपाविमं/तां-६/१८७९/दि. १/७/२००४ अन्वये मिळाली आहे.
- प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन २००५-०६ च्या दरसूचीवर अधारीत रू. ३४०.८५ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. सुप्रमा/जामदा/१०८०/१०९५(२६८/०८) मप्र दि. ७/९/२००९ अन्वये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता : प्रकल्पास सन २००९-१० च्या दरसूचीवर अधारीत रू. ५१५.२९ कोटी इतक्या रकमेस शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१०/९२७/(३१२/२०१०) मप्र दि. १२/१/२०११ अन्वये व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- सदर प्रकल्पामुळे ४९०० हे. पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित असुन त्याचबरोबर २.०० मे. वॅट वीज निर्मिती होणार आहे.
- प्रकल्पास पुन:प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर धरण व अनुषंगिक कामाची निविदा निश्चित करण्यात येवून दि. २९/१/२००५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.
- धरणासाठी लागणारी जमीन खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणे प्रस्तावित होते. दरम्यानच्या काळात भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले होते. तथापि प्रकल्पग्रस्तांनी खाजगी वाटाघाटीने जमीन देण्यास विरोध केला. त्याचप्रमाणे बुडीत क्षेत्राच्या भूसंपादन प्रक्रियेलाही तीव्र विरोध केला. त्यामुळे प्रकल्पाचे काम डिसेंबर २००७ पर्यंत बहुतांश कालावधीसाठी बंद होते.
- बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी ३/२००६ मध्ये हाती घेण्यात आली. तथापी प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे चार वर्ष बुडीत क्षेत्राच्या संयुक्त मोजणीचे काम प्रलंबित होते. प्रकल्पग्रस्तांशी वाटाघाटीअंती बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी मार्च २०१० ते मे २०१० या कालावधीत पूर्ण करण्यात आली आहे. अशा प्रकारे बुडीत क्षेत्राच्या भूसंपादन प्रक्रियेस विलंब झाला आहे.
- पुनर्वसन गावठाणासाठी मौजे मूर-वाघवस व कोळंब (पाटेकर पॉईंट) भूसंपादन प्रस्ताव दि. २३/१०/२००७ रोजी महसूल खात्याकडे सादर करण्यात आले. तथापि जमीन मालकांनी सदर भूसंपादनास हरकत घेवून संयुक्त मोजणीस तीव्र विरोध केला. त्यानंतर प्रकल्पग्रस्तांचे गावठाणाचे जागेबाबत एकमत होत नसल्याने गावठाणाच्या जागा संपादन करण्यास बराच विलंब झाला.
- प्रकल्पग्रस्तांचा प्रकल्पास तीव्र विरोध व त्यामुळे भूसंपादनास विलंब, पुनर्वसन गावठाणांसाठी संपादीत करावयाच्या जमिनीचे संपादनास भूधारकांचा तीव्र विरोध होणे, पुनर्वसन गावठाणाची ठिकाणे बदलणे, किंवा त्यासाठी प्रकल्पग्रस्तांचे ठाम मत नसणे, पुरेसे क्षेत्र एके ठिकाणी उपलब्ध न होणे इत्यादीमुळे

पुनर्वसन गावठाणाचे जमीन संपादनास सन २००७ मध्ये सुरूवात होवूनही अदयाप अंतिम कार्यवाही पूर्ण झाली नाही.

प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणे :

- द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन २००९-१० च्या दरसूचीनुसार मंजूर असल्याने प्रकल्पाच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे रू. १३९.२८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- पुनः प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात भूसंपादन व पुनर्वसनासाठी रू. २.४२ कोटी तरतूद होती. भूसंपादनाचे दर वाढल्यामुळे तसेच पुनर्वसनाच्या नागरी सुविधा पुरविणेच्या खर्चामध्ये वाढ झाल्याने त्याची रू. १५.६० कोटी तरतूद मंजूर द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात रू. १३.१८ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- सांडव्याचे काम करताना सांडवा, प्रवेश व पुच्छ कालव्यामध्ये मोठया आकाराचे दगड गोटे व तडे गेलेला खडक लागला. यास्तव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचेकडून कार्यक्षेत्राची सविस्तर पहाणी करण्यात आली. त्यानंतर क्षेत्रिय माहितीच्या आधारे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून सांडव्याचे सविस्तर संकल्पन प्राप्त करून त्यास सक्षमस्तरावर मान्यता घेण्यात आली आहे. सविस्तर संकल्पनाअंती संधानकाच्या व खोदाईच्या परिणामामध्ये वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- प्रवेश कालव्यामध्ये क्षेत्रिय परिस्थितीनुसार संरक्षक भिंतीचे काम सविस्तर संकल्पनामध्ये नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे संधानकाच्या परिमाणात वाढ झाल्याने प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- मूळ अंदाजपत्रकात विभाजक भिंती ऐवजी मार्गदर्शक भिंती प्रस्तावित होत्या. सविस्तर संकल्पनामध्ये दोन्ही बाजूस विभाजक भिंतीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे संधानकाच्या व खोदाईच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- मूळ अंदाजपत्रकात विभाजक भिंती ऐवजी मार्गदर्शक भिंती प्रस्तावित होत्या. क्षेत्रिय ठिकाणचा कठिणस्तर क्ष्द्धड्डड्ड्यद्बद्धड्डड्ड असल्याने व अशा थरामध्ये अनुत्सारीत भागाचे अबटींग करणे अयोग्य असल्याने सविस्तर संकल्पनामध्ये दोन्ही बाजूस विभाजक भिंतीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे संधानकाच्या व खोदाईच्या परिमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- प्रकल्पाच्या आस्थापना खर्चात होणा-या वाढीची तरतूद करण्यात आलेली आहे. स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा स्विकारली. निविदा शर्तीनुसार भाववाढ विचारत घेण्यात आली आहे.

- सन २००७-०८ व सन २००८-०९ चे पावसाळयामध्ये प्रवेश व पुच्छ कालवा तसेच सांडव्याच्या डोंगर उताराकडील भाग ढासळून प्रवेश व पुच्छ कालवा तसेच सांडव्यामध्ये आल्याने सदरचा भूस्तर काढणे काम करावे लागले. त्यामुळे खर्चात वाढ झाली आहे. तसेच निविदा बाबींशिवाय इतर अतिरिक्त बाबी उदभवल्यामुळे खर्चामध्ये वाढ झाली आहे.

प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती :

- **धरण :** धरणाच्या डाव्या तीरावरील मातीकाम प्रगतीत असुन उजव्या तीरावरील मातीकाम अद्याप हाती घ्यावयाचे आहे. प्रवेश व पुच्छ कालव्याची खोदाई ८० टक्के पूर्ण आहे. सांडव्याचे व विभाजक भिंतीचे संधानक प्रगतीपथावर आहे. मुख्य विमोचकाचे काम अद्याप हाती घ्यावयाचे आहे. प्रकल्पाचा प्रस्तावित पाणीसाठा ४८.२५९ दलघमी (१.७० टीएमसी) आहे. अद्याप पाणीसाठा निर्मिती झाली नाही.

- **कालवा :** प्रकल्पास उजवा कालवा ६५ किमी व डावा कालवा ४७ किमी प्रस्तावित आहे. दोन्ही कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण पूर्ण झाले असुन कालवा संरेखा मंजूरीसाठी पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

- **भूसंपादन :** योजनेच्या धरण बैठकीसाठी आवश्यक ४४.२२ हे क्षेत्राचे भूसंपादन दि ३१/१०/२००९ रोजी पूर्ण करण्यात आले. बुडीत क्षेत्रासाठी काजिर्डा व राणेवाडी मधील अनुक्रमे २१३.५२ हे. व ३७.७३ हे. असे एकूण २५१.२५ हे. क्षेत्र आवश्यक आहे. बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी ३/२००६ मध्ये हाती घेण्यात आली. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे चार वर्ष बुडीत क्षेत्राच्या संयुक्त मोजणीचे काम प्रलंबित होते. प्रकल्पग्रस्तांशी वाटाघाटीअंती बुडीत क्षेत्राची संयुक्त मोजणी मार्च २०१० ते मे २०१० या कालावधीत पूर्ण करण्यात आली आहे. कलम-४ व ६ च्या अधिसूचनेची कार्यवाही करण्यात येत आहे. कालवा संरेखा मंजूरीनंतर टप्प्याटप्प्याने भूसंपादन कार्यवाही करण्यात येईल.

- **पुनर्वसन :-** प्रकल्पांतर्गत काजिर्डा व राणेवाडी येथील एकूण १९५ घरे व ७०४ कुटुंबे बाधीत होत आहेत. त्याचे पुनर्वसनासाठी कोळंब-खडक, मूर-सांडवा, काजिर्डा-फणशी आणि काजिर्डा-ब्राह्मणखोरे असे चार भूसंपादन प्रस्ताव कार्यवाहीत आहेत. त्यापैकी काजिर्डा-फणशी व मूर-सांडवा या गावठाणाची संयुक्त मोजणी मे २०१२ पूर्ण झाली असुन उर्वरित प्रस्तावांची संयुक्त मोजणी लवकरच करण्यात येत आहे. सर्व पुनर्वसन गावठाणासाठी १२२.५७ हे. क्षेत्र आवश्यक असुन संयुक्त मोजणी व कलम-४ ची कार्यवाही करण्यात येत आहे.

- **वनजमीन :** सदर प्रकल्पांतर्गत वन जमीन येत नाही.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :**

  सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर रू. १८६.७८ कोटी खर्च झाला असुन त्याची विगतवारी खालील प्रमाणे आहे.

बांधकामावरील खर्च (रू. कोटी)	भूसंपादन व पुनर्वसन यावरील खर्च (रू. कोटी)	आस्थापनेवरील खर्च (रू. कोटी)	एकूण खर्च (रू. कोटी)
१७८.५१	१.३९	६.८८	१८६.७८

प्रकल्पाचे नांव : अर्जुना मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव : अर्जुना मध्यम प्रकल्प,	तालुका : राजापूर,		जिल्हा : रत्नागिरी	
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) पीकक्षेत्र ९४११	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) : ८६८			
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रू.कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता
	मूळ प्रशासकीय मान्यता	५.१२.१९९५	१९९३-९४	६१.८८	७१०८
	सु.प्र.मा-१	५.०५.२००१	१९९९-२०००	१४५.४६	७१०८
	सु.प्र.मा-२	३.११.२००४	२००३-०४	२६१.३६	९४११
	सु.प्र.मा-३	२६.०८.२००९	२००८-०९	४७६.४९	९४११
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता **(TAC/Investment)** संदर्भ व किंमत (रू. कोटी)				
	अ) TAC Clearance Reference	मध्यम प्रकल्प असून आंतरराज्य नसल्याने केंद्र शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.			
	ब)Investment Clearance Reference	राज्य शासनाने इंग्रजी पत्र क्र. **Arjuna-2009/(C.R.298 /09) /MP,** दि. २५.११.२००९ अन्वये रू. ४७६.४९ कोटी इतक्या सुधारीत किमतीस गुंतवणूक मान्यता प्रदान केली आहे.			
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)	३७६.९९			
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च रू. कोटी	६०.२८			
४.३	बांधकामावरील खर्च (रू. कोटी)	३०६.९७			
४.४	इटीपी खर्च (रू. कोटी)	९.७४			
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष	२०००-०१			
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष	२००३ / रू. २६१.३६ कोटी			
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे	एकूण वाढ रू. ४१४.६१ कोटी (रू. ४७६.४९-रू.६१.८८)			
		रक्कम (कोटी)		टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ	१२९.४७		३१.२३	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (रू. ५३.४७ कोटी - रू. १.७८७ कोटी)	५१.६८		१२.४६	

७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	६६.१७	१५.९६
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	७२.५६	१७.५०
७.५	इतर कारणे (ई.टी.पी सहीत)	९४.७३	२२.८५
८	प्रकल्पाची सद्यःस्थिती		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन	सदर प्रकल्पांतर्गत वन जमीन येत नाही. शिर्षकामासाठी ४२३.७५.५६ हे. जमीन आवश्यक असून त्यापैकी ४१२.१०.६ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरित क्षेत्रापैकी ७.९८.९ हे. क्षेत्राच्या प्रस्तावाचा अंतीम निवाडा जाहीर झालेला आहे. त्याकरिता रू. १.७८ कोटी रक्कम अद्याप अदा करता आली नाही. शासकीय जमीन ३.६५.७ हे.वर्ग करण्यासाठी प्रस्ताव दि. ३१.१२.२००७ रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला आहे. परंतु अद्याप वर्ग व्हावयाची आहे. कालवा कामांसाठी ३५०.५७ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ९२.९३.५ हे क्षेत्र संपादीत झालेले आहे. पुनर्वसनासाठी ५७.६८५ हे.क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ५२.१८५ हे. क्षेत्र संपादित झालेले आहे. बुडीत क्षेत्रात २ गावठाणे बांधित होत असून त्यांच्या पुनर्वसनांतर्गत ४ ठिकाणी वसाहती निर्माण केलेल्या असून प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले आहेत. नागरी सुविधांची आवश्यक ती सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. ती जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडून हस्तांतरणाचे आदेश काढण्याची कार्यवाही चालू आहे..	
८.२	धरण	धरणाचा प्रकल्पीय पाणीसाठा ७४.६७ दलघमी (२.६४ **TMC**) १०० टक्के निर्माण झाला आहे, सांडवाच्या पुच्छ कालव्याचे काही काम बाकी आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	या प्रकल्पांतर्गत डावा कालवा ३८ कि.मी. लांबीचा आहे. याच कालव्यास ताम्हाणे शाखा कालवे आहेत. त्यांच्यासह डाव्या कालव्याची एकूण लांबी ६०.९३ कि.मी आहे. उजवा कालवा ५७ किमी लांबीचा आहे. डावा कालवा किमी १ ते १६ मधील कामे बहुतांशी पूर्ण झालेली असून त्यामधून ८६८ हेक्टर सिंचन निर्मिती झाली आहे. उजव्या कालव्याच्या कि.मी. १ ते १७ ची निविदा प्रक्रिया चालू आहे.	

अर्जुना मध्यम प्रकल्प

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशील

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

(मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- प्रकल्पाच्या मुळ प्र.मा. तरतूदीनुसार पाणीसाठा ५३.८१ दलघमी करून ७१०८ हे. पीक क्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित होता. उपलब्ध जलसंपत्तीचा विचार करता जादा क्षेत्र सिंचनाखाली आणता येणे शक्य असल्याने पाणीसाठा २०.८६ दलघमीने वाढवून ७४.६७ दलघमी करणेत आला. या वाढीव पाणीसाठ्याकरीता धरणाची उंची ६.१० मी.ने वाढविण्यात आली. त्यातून २३०३ हे अतिरिक्त पीकक्षेत्र निर्माण होणार आहे. सिंचनाचे क्षेत्र वाढणार असल्याने डावा कालवा ४९ कि.मी. ऐवजी ताम्हाणे शाखा कालव्यासह ६०.९३ कि.मी करण्यात आला व उजवा कालवा ३८ कि.मी ऐवजी ५७ कि.मी लांबीचा प्रस्तावित करण्यात आला. त्यामुळे प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात वाढ झाली आहे. ही वाढ व्दितीय सुधारित अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

- मुळ धरणाच्या काटछेदात नसलेली परंतु माती गुणधर्माच्या आधारे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून प्राप्त झालेल्या धरण काटछेदानुसार अधोबाजूस आडव्या झरण्या प्रस्तावित करण्यात आल्या.
- मूळ सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता, त्याऐवजी तो संधानकामध्ये प्रस्तावित करण्यात आला.
- वाढीव सिंचन क्षेत्रासाठी करावयाच्या पाणीसाठ्यातील बदलामुळे धरणाच्या उंचीत वाढ झाली. द्वितीय सु.प्र.मा. वेळी द्वारयुक्त सांडवा प्रस्तावित होता. त्याऐवजी तृतीय सु.प्र.मा. चे वेळी द्वारविरहित सांडवा प्रस्तावित करण्यात आला.या कारणांमुळे धरणाचा काटछेद वाढला. या प्रमुख बाबीमुळे अंदाजपत्रकीय किमतीमध्ये वाढ झालेली आहे.
- मुळ नियोजनामध्ये दोन सिंचन विमोचक प्रस्तावित होते. त्याऐवजी एकच सिंचन तथा विद्यूत विमोचक समाविष्ठ करुन त्याव्दारे २ X ०.७५० मे.वॅट इतकी विज निर्मिती करण्याचे तृतीय सु.प्र.मा. मध्ये प्रस्तावित करण्यात आले. त्यामुळे ट्रॅश रॅक, वायपीस, बोगद्यास संपूर्ण सलोह संधानकातील अस्तरीकरण इ.तरतूदी कराव्या लागल्याने अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये वाढ झालेली आहे.

७.५ इतर कारणे

- बुडीत क्षेत्राच्या वरच्या भागातून, पर्यायी रस्त्याची तरतूद करावी लागली.
- स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्वीकारल्या.
- निविदा शर्तींनुसार देय भाववाढ विचारात घेतली आहे.
- आस्थापना खर्चातील वाढ

  इ. प्रमुख बाबींमुळे वाढ झालेली आहे.

अर्जुना मध्यम प्रकल्प

संक्षिप्त टिप्पणी

- अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्प कोदवली नदीची उपनदी असलेल्या अर्जुना नदीवर आहे.
- **मूळ प्रशासकीय मान्यता** :- सन ९३-९४ च्या दरसूचीवर आधारीत रू.६१.८८ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र.एआरजे/१०८७/१३१४(१९१/८७)जसंअ, दि.५/१२/९५ अन्वये मिळाली आहे.
- **प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता** :- सन १९९९-२००० च्या दरसूचीवर शासन निर्णय क्र.अर्जुना १०.०१/६७३/(१६५/२००१) म.प्र., दि.५/५/२००१ अन्वये रक्कम रू.१४५.४६ कोटीला मिळाली आहे.
- **द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता** :- सन २००३-०४ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र.अर्जुना १०.०१/८०९/(१५७/२००३) म.प्र., दि.३/११/२००४ अन्वये रक्कम रू.२६१.३६ कोटीला मिळाली आहे.
- **तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता :-** सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र. सुप्रमा २००९/६६१/(२१८/०९) म.प्र., दि.२६/०८/२००९ अन्वये रक्कम रू.४७६.४९ कोटीला मिळाली आहे.
- **चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता :-** अंदाजपत्रकाची छाननी विभागीय स्तरावर सुरू आहे.
- सदर प्रकल्पामुळे ९४११ हे. पीकक्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित असून त्याचबरोबर २ x ०.७५० मे.वॅट वीज निर्मिती होणार आहे.
- धरणाच्या कामास सुरूवात करण्यास दि.५/७/२००१ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले. तथापि प्रकल्पग्रस्थांनी प्रकल्पास विरोध केला. तसेच पुनर्वसनाच्या मुद्यावर धरणाचे काम बंद पाडले. प्रकल्पग्रस्तांशी वारंवार विविध स्तरावर व मंत्री महोदय स्तरावर सुध्दा चर्चा व बैठका करून खाजगी वाटाघाटी द्वारे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी परवानगी दिल्याने डिसेंबर २००३ मध्ये कामास सुरूवात झाली. प्रमुख बैठकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बैठकीचा दिनांक	बैठकीचा तपशील
१.	९-११-२००१	जिल्हाधिकारी यांनी मा. आमदार गणपतराव कदम, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व महसूल खात्याच्या सर्व अधिका-यांची बैठक घेतली.
२.	१८.०२.२००२	मुख्य अभियंता यांचे समवेत प्रकल्पग्रस्तांची मुंबई येथे बैठक
३.	१५.०३.२००३	मा. मंत्री, पुनर्वसन यांनी चिपळूण येथे प्रकल्पग्रस्तांसमवेत व अधिका-यांसमवेत बैठक घेतली.
४.	८.०७.२००३	मा. मंत्री, जलसंपदा यांनी मुंबई येथे प्रकल्पग्रस्त, महसूल व जलसंपदा अधिका-यांची बैठक घेतली.
५.	१४.०८.२००३	मा. पालकमंत्री यांनी रत्नागिरी येथे संबंधितांची बैठक घेतली.
६.	११.०१.२००५	मा. मंत्री, जलसंपदा यांनी मुंबई येथे सर्व संबंधितांची बैठक घेतली.

याच काळात प्रकल्पग्रस्तांनी खालीलप्रमाणे न्यायालयीन दावे दाखल केले.

- **दि. २९.१२.२००४ रोजी करक गावच्या प्रकल्पग्रस्तांनी मौल्यवान भातशेतीचे व बागायत मिळकतीचे संपादन करू नये व इतर मागण्यांसाठी रत्नागिरी न्यायालयात दावा दाखल केला. याबाबत न्यायालयाने दि. ३.०१.२००५ रोजी भूसंपादनाबाबत जैसे थे आदेश दिला. अंतीमतः सदरचा दावा दि. २६.०८.२००५ रोजी नाकारण्यात आला.**

- **दि. २७.०१.२००५ रोजी अर्जुना प्रकल्प विकास परिषद यांनी मुंबई उच्च न्यायालयात भूसंपादन व पुनर्वसन प्रक्रियेबाबत व तोपर्यंत धरणाचे काम रोखण्याबाबत याचिका दाखल केली. सदरची याचिका दि. १२.९.२००५ रोजी खारीज (Dismiss) करण्यात आली.**

- धरणाचे भूसंपादन प्रस्ताव सन २००१ मध्ये महसूल खात्यास सादर केले.

- धरणाचे भूसंपादनाचे निवाडे जाहीर होऊन सन २००५ मध्ये प्रथमतः जमीन ताब्यात मिळण्यास सुरूवात झाली.

- तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार मंजूर असल्याने प्रकल्पाच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे रू. १२९.४७ कोटी इतकी वाढ झाली आहे.

- मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात भूसंपादनाची तरतूद ही नजीकच्या बांधकामाधिन असलेल्या बारेवाडी लघु पाटबंधारे प्रकल्पासाठीच्या जाहीर केलेल्या निवाड्यांनुसार विचारात घेतलेली होती. त्यानुसार बुडीत क्षेत्रातील जमिनीचे दर जिरायत क्षेत्रासाठी रू २५०००/- व पोट खराबा क्षेत्रासाठी रू. २००००/- तसेच लाभक्षेत्रातील गावातील जिरायत क्षेत्रासाठी रू २५०००/- व पोट खराबा क्षेत्रासाठी रू. १२५००/-प्रति हेक्टर असे होते. त्यानुसार मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावात रू. १.७८७ कोटी तरतूद होती. मंजूर तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात शिर्षकामासाठी भूसंपादनाची तरतूद ही प्रामुख्याने प्रत्यक्षात महसूल विभागाने वेळोवेळी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या अंतिम निवाड्यानुसार रू. ५३.४७ कोटी तरतूद करणेत आली आहे. मूळ अंदाजपत्रकीय तरतुदीच्या तुलनेत सन २००९ पर्यंत वेळोवेळी जाहीर झालेल्या निवाड्यांनुसार विविध बांधकामांचे प्रत्यक्षात करण्यात आलेल्या मुल्यांकनांमुळे रू. २०.०५ कोटी, दिलासा रकमेपोटी रू. ७.९० कोटी, व्याजापोटी रू. ६.५८ कोटी, जमीन सपाटीकरण, पुनर्वसन अनुदान व नागरी सुविधांपोटी रू. १४.०० कोटी व तद्अनुषंगिक बाबींमुळे रू. ३.१५ कोटी अशी एकूण रू. ५१.६८ कोटी वाढ झाली आहे.

- प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अहवालाच्या तरतुदीनुसार पाणीसाठा ५३.८१ द.ल.घ.मी. (१.९० टी.एम.सी.) व लाभक्षेत्र ७१०८ हे. पीकक्षेत्र होते.

- धरणस्थळी जलसंपत्तीचा विचार करता जादा क्षेत्र सिंचनासाठी आणता येणे शक्य असल्याने पाणीसाठा २०.८६ द.ल.घ.मी. ने वाढवून ७४.६७ द.ल.घ.मी. (२.६४ टी.एम.सी.) करण्यात आला व त्यामुळे २३०३ हे. अतिरिक्त पीकक्षेत्र निर्माण होणार आहे. सिंचनाचे क्षेत्र वाढणार असल्याने डावा कालवा ४९ किमी ऐवजी ताम्हाणे शाखा कालव्यांसह ६०.९३ किमी करण्यात आला व उजवा कालवा ३८ किमी ऐवजी ५७ किमी लांबीचा प्रस्तावित करण्यात आला. वाढीव सिंचन क्षेत्रासाठी करावयाच्या पाणीसाठ्यातील बदलामुळे धरणाच्या उंचीत वाढ झाली. सदरची पाणी साठ्यातील वाढीमुळे धरणाच्या उंचीत झालेली वाढ व कालव्याच्या वाढलेल्या लांबीमुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झालेली असून द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकात सदरची वाढ मंजूर करण्यात आली आहे.

- मूळ नियोजनामध्ये दोन सिंचन विमोचक प्रस्तावित होते. त्याऐवजी शासन धोरणानुसार सिंचन विमोचकाचे ऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक हा बदल केला आणि त्याद्वारे २ x ०.७५० मे.वॅट

वीज निर्मीती करण्याचे तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आले. वीजनिर्मितीसाठी विमोचकाचा वापर होणार असल्याने पातेरी जाळीचे स्ट्रक्चर व बोगद्याचे सलोह संधानकातील अस्तरीकरण, त्याखालील वायपीस इ. मुळे खर्चात वाढ झाली.

- मूळ मंजूर प्रकल्प अहवालातील अंतर्भूत धरणाच्या काटछेदात नसलेली परंतु माती गुणधर्माच्या आधारे म.सं.सं कडून अधो बाजूस आडव्या झरण्या प्रस्तावित करण्यात आल्या. तसेच मूळ सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. त्याऐवजी तो संधानकामध्ये प्रस्तावित करण्यात आला. तसेच द्वितीय सुप्रमावेळी द्वारयुक्त सांडवा प्रस्तावित होता. त्याऐवजी तृतीय सुप्रमाचे वेळी द्वारविरहित सांडवा प्रस्तावित करण्यात आला. या बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

- प्रकल्पग्रस्तांची बुडीत क्षेत्राच्या बाहेरील शेतीकडे जाण्यासाठी रस्ता करण्याची मागणी विचारात घेऊन बुडीत क्षेत्राच्या वरच्या भागातून पर्यायी रस्त्याची तरतुद करावी लागली, स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्विकारल्या, निविदा शर्तीनुसार देय भाववाढ विचारात घेतली आणि आस्थापना खर्चातील वाढ इ. प्रमुख बाबींमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती :-

शीर्षकामे :

- माती धरण - मुख्य धरणाचे मातीकाम १०० % पूर्ण झालेले आहे.
- सांडवा - सांडव्याचे खोदकाम व बहुतांशी संधानक काम पूर्ण झालेले आहे. उर्वरीत संधानकाचे काम पावसाळ्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
- सिंचन तथा विद्युत विमोचक - बोगदा खोदकाम व अस्तरीकरण, शुष्क विहीर, पातेरा जाळी, अववाहक ही कामे पूर्ण करून अववाहकास बल्कहेड बसवणे ही कामे पूर्ण करून धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात आलेला आहे. आपत्कालीन दरवाजासाठी उच्चालक बसवणे व खालील उर्जा व्यय व्यवस्था एवढी कामे राहीलेली असून ती डिसेंबर १२ नंतर हाती घेण्यात येत आहेत.

कालवे :

- कालवे - मुख्य कालवा ०.२८ किमी, डावा कालवा किमी १ ते १६ मधील सर्व कामे प्रगती पथावर आहेत. ताम्हाणे उजवा शाखा कालवा सा.क्र. ० ते ९०१० मी. च्या संरेखेस मंडळ कार्यालयाने दि. ११.३.११ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली असून अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. उजव्या कालव्याच्या किमी १ ते १७ पर्यंतची संरेखा मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

भूसंपादन :

- शिर्षकामासाठी ४२३.७५.५६ हे. जमीन आवश्यक असून त्यापैकी ४१२.१०.६ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरित क्षेत्रापैकी ७.९८.९ हे. क्षेत्राच्या प्रस्तावाचा अंतीम निवाडा जाहीर झालेला आहे. त्याकरिता रू. १.७८ कोटी रक्कम अद्याप अदा करता आली नाही. शासकीय जमीन ३.६५.७ हे.वर्ग करण्यासाठी प्रस्ताव दि. ३१.१२.२००७ रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला आहे. परंतु अद्याप वर्ग व्हावयाची आहे. कालवा कामांसाठी ३५०.५७ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ९२.९३.५ हे क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरित क्षेत्रापैकी उजवा कालवा कि.मी. १ ते १७ पर्यंतच्या जमीन संपादनासाठी ६५.८०.१ हे. क्षेत्राचे प्रस्ताव महसूल खात्यास सादर केले असून ते कलम ६ च्या कार्यवाहीवर आहेत. ताम्हाणे डाव्या कालव्यासाठी एकूण १९.५८.४ हे. क्षेत्राचे तसेच ताम्हाणे उजव्या कालव्यासाठी ४९.१६.२ हे. क्षेत्राचे प्रस्ताव महसूल खात्यास सादर करण्यात आले असून ते कलम ४ च्या कार्यवाहीवर आहेत.

वनजमीन :

- सदर प्रकल्पांतर्गत वन जमीन येत नाही.

पुनर्वसन :

- बुडीत क्षेत्रात २ गावठाणे बांधित होत असून त्यांच्या पुनर्वसनांतर्गत ४ ठिकाणी वसाहती निर्माण केलेल्या असून प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले आहेत. नागरी सुविधांची आवश्यक ती सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. ती जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडून हस्तांतरणाचे आदेश काढण्याची कार्यवाही चालू आहे.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :

सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रू. ३७६.९९ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

सर्व आकडे कोटीत.

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
३०६.९७	६०.२८	९.७४	३७६.९९

प्रकल्पाचे नांव : कोर्ले सातंडी मध्यम प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव : कोर्ले सातंडी मध्यम प्रकल्प		तालुका : देवगड		जिल्हा : सिंधुदुर्ग
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता पीकक्षेत्र (हेक्टर) :	३६२५	निर्मित सिंचन क्षमता(हेक्टर) : जून १२ : कांही नाही		
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशील	दिनांक	दरसूची सन	किंमत (रू. कोटी)	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर)
	मूळ प्रशासकीय मान्यता	१४.१०.१९९८	१९९७-९८	५४.५९	३४१३
	सुप्रमा-१	२६.११.२००१	२०००-२००१	९४.४९	३४१३
	सुप्रमा-२	१५.१.२००५	२००३-०४	१२१.७६	४११०
	सुप्रमा-३	शासनास सादर	२००९-२०१०	२६३.६४	३६२५
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (रू. कोटी)				
	अ)TAC Clearance Ref.	मध्यम प्रकल्प असून आंतरराज्य नसल्याने केंद्र शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.			
	ब)Investment Clearance Ref.	राज्य शासनाने इंग्रजी पत्र क्र. Investment/169/(49/07) Medium Project, दि. २४.४.२००८ अन्वये रू. १२१.७६ कोटीं इतक्या सुधारित प्रशासकीय मान्यताप्राप्त किंमतीस गुंतवणूक मान्यता प्रदान केली आहे.			
४.१	दि. ३१.०३.२०१२ अखेर खर्च (रू.कोटी)		१०३.९६		
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च रू. कोटी		१५.४४		
४.३	बांधकामावरील खर्च (रू. कोटी)		७३.५८		
४.४	इटीपी खर्च (रू. कोटी)		१४.९४		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		२०००-०१		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरू झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत		२००४ रू. १२१.७६ कोटी		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		एकूण वाढ रु. २०९.०५ कोटी (२६३.६४-५४.५९)		
			रक्कम (कोटी)		टक्केवारी
७.१	दरसूचीतील वाढ		१२८.४८		६१.४६
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (रू.२३.६० कोटी - रू. १.९६ कोटी)		२१.६४		१०.३५
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		०.०		०.०
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		१४.९४		७.१५

७.५	इतर कारणे (स्पष्ट करावीत)	४३.९९	२१.०४
८	प्रकल्पाची सद्यस्थिती		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन	सदर प्रकल्पांतर्गत ४.३६ हे. वनसंज्ञेखालील जमीन येत असून ती सन २००८ मध्ये वनखात्याकडून वर्ग झालेली आहे. शिर्षकामासाठी एकूण ३२८.४२ हे. आवश्यक आहे. त्यापैकी ३१९.६४ हे. क्षेत्र संपादित झाले आहे. उर्वरित प्रकरणे कलम ६ वर आहेत. कालव्यासाठी सूमारे २४०.२२ हे. जमिन आवश्यक असून प्रस्ताव महसूल खात्याकडे सादर करण्याची कार्यवाही चालू आहे. प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनाचा पर्याय अंतीम केलेला असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान अदा करावयाचे असून त्याबाबत मागणी महसूल खात्याकडून प्राप्त व्हावयाची आहे.	
८.२	धरण	धरणाचे मातीकाम पूर्ण झालेले आहे. प्रकल्पामध्ये २६.१७१ दलघमी (१०० टक्के) पाणी साठवण क्षमता निर्मिती झाली आहे. डकबिल पद्धतीच्या सांडव्याच्या बारचे काम पूर्ण झाले असून त्याच्या दोन्ही बाजूकडील संरक्षक भिंतीचे काम करायचे बाकी आहे.तसेच सिंचन तथा विद्युत विमाचकाचे अस्तरीकरणासह काही काम करण्याचे बाकी आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	डावा तीर कालवा २५.०० किमी . उजवा तीर शेजवली शाखा कालवा ४.७४ किमी व उजवा तीर उपळे शाखा कालवा ३१.०० किमी अशी एकूण कालव्यांची लांबी ६०.७४ किमी एवढी आहे. त्यापैकी डावा कालवा किमी १ ते ३ मधील बोगद्याची कामे प्रगती पथावर आहेत.	

कोर्ले सातंडी मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

अ.क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशील

७.३ **प्रकल्प व्याप्तीतील झालेली वाढ :-** व्याप्तीत बदल नसल्याने वाढ नाही

७.४ **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-** मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून धरणाचे माती गुणधर्माच्या आधारे धरण काटछेदात अधोबाजूकडील भरावात वाळूच्या आडव्या झरण्या प्रस्तावित केल्या. तसेच उर्ध्व बाजूच्या अश्मपटलाखाली वाळूचा थर नव्याने संकल्प त करण्यात आला. मूळ प्रस्तावानूसार साध्या पद्धतीचा विमोचक होता. तथापि शासनाच्या धोरणानूसार १.६० मे.वॅट विद्युत निर्मिती करणेसाठी सिंचन तथा विद्युत विमोचकाची तरतूद करण्यात आली. सांडव्याची खोदाई सुमारे १५ ते २० मी खोलीची असल्याने दोन्ही बाजूस क्षेत्रीय परिस्थिती नुसार संरक्षक भिंती बांधणे अनिवार्य असल्याने त्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे.

७.५ **इतर कारणे :-** स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्विकारल्या. मुख्य रस्त्यापासून धरणाकडे व विद्युतगृहाकडे जाण्यासाठी करावा लागणारा रस्ता व या रस्त्यासाठी पुच्छ कालव्यावर बांधावयाच्या पुलाच्या तरतुदीमुळे अंदाजत्रकीय किंमतीमध्ये वाढ झाली आहे. घळभरणी एकाच हंगामात पूर्ण करण्याच्यादृष्टीने कॉफरडॅम बांधण्यात आला. तसेच खाणक्षेत्रात ०.१ घ.मी. पेक्षा जादा आकाराचे बोल्डर लागल्याने निविदा शर्तीनुसार खर्चाची तरतूद करण्यात आली. खर्चातील वाढीमुळे आस्थापना खर्चात देखील वाढ झाली. या प्रमुख बाबींमुळे वाढ झाली आहे.

कोर्ले सातंडी मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

संक्षिप्त टिप्पणी

- कोर्ले सातंडी मध्यम पाटबंधारे प्रकल्प वाघोटण खोऱ्यात सातंडी नाल्यावर आहे.
- **मूळ प्रशासकीय मान्यता** :- सन १९९७-९८ च्या दरसूचीवर आधारीत रू. ५४.५९ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र.कोर्ले सातंडी १०९६/५७४(१९१/९६)जसंअ, दि.१४/१०/९८ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- **प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता :-** सन २०००-०१ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र.कोर्ले सातंडी १०.०१/(४३३/२००१)म.प्र., दि.२६/११/२००१ अन्वये रक्कम रू.९४.४९ कोटीला मिळाली आहे.
- **द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता :-** सन २००३-०४ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र.कोर्ले सातंडी १०.०४/८२७/(१८१/२००४)म.प्र., दि.१५/०१/२००५ अन्वये रक्कम रू.१२१.७६ कोटीला मिळाली आहे.
- **तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता :-** सन २००९-१० च्या दरसूचीवर आधारीत रू.२६३.६४ कोटीचे अंदाजपत्रक राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मान्यतेने शासनास माहे मे २०१२ मध्ये सादर करण्यात आले आहे. शासनस्तरावर छाननी सुरु असून अद्याप मान्यता मिळालेली नाही.
- या प्रकल्पामुळे २६.१७१ द.ल.घ.मी. (०.९२४ टी.एम.सी.) पाणी साठा निर्माण होणार असून ३६२५ हे. (पीकक्षेत्रास) सिंचनाचा लाभ अपेक्षित आहे. त्याचबरोबर २ x ०.८०० मे.वॅट वीजनिर्मिती होणार आहे.
- सदर प्रकल्पांतर्गत ४.३६ हे. वनसंज्ञेखालील क्षेत्र बाधीत होत असून त्याच्या हस्तांतरणास केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या भोपाळ कार्यालयाने दि.८/०९/२००४ च्या पत्रान्वये काही बाबींची पूर्तता करण्याच्या अटीवर तत्वतः मान्यता दिली होती. सदर प्रकरणी रू.३०.२५ लक्ष एवढी नेट प्रेझेंट व्हॅल्यू भरली. तसेच इतर बाबींची पूर्तता केल्यानंतर केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या भोपाळ कार्यालयाने दि.११/०७/२००७ च्या पत्रान्वये काही बाबींची पूर्तता करण्याच्या अटीवर अंतीम मान्यता दिलेली असून सदर क्षेत्रात प्रकल्पाचे काम करण्यास उप वन संरक्षक, सावंतवाडी यांनी दि.१२/०२/२००८ च्या पत्रान्वये परवानगी दिली आहे.
- धरणाच्या कामास सुरूवात करण्यास दि.९/०१/२००२ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले. भूसंपादन व पुनर्वसनाच्या मुद्यावर प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पास विरोध केला. धरणाचे काम सुरू करू दिले नाही. यानंतर प्रकल्पग्रस्तांसमवेत वारंवार बैठका घेऊन त्यांच्याशी समन्वय साधून प्रकल्पग्रस्तांनी परवानगी दिल्याने जानेवारी २००४ मध्ये कामास सुरूवात झाली.
- मूळ नियोजनामध्ये एक सिंचन विमोचक प्रस्तावित होता. त्याऐवजी शासन धोरणानुसार फक्त सिंचन विमोचका ऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक असा बदल करून त्याद्वारे २ x ०.८०० मे.वॅट वीज निर्मीती करण्याचे द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकात मंजूर करण्यात आले.
- मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्प अहवालातील धरण काटछेदात आडव्या झरण्या (Horizontal Mats) प्रस्तावित नव्हत्या. परंतु मातीगुणधर्मामुळे म.सं.सं., नाशिक यांनी आडव्या झरण्या प्रस्तावित केल्या.
- मूळ द्वारयुक्त सांडवा कोलग्राऊट पद्धतीच्या दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. त्याऐवजी तो डकबील पद्धतीचा द्वारविरहीत सांडवा, संधानकामध्ये प्रस्तावित करण्यात आला असून तो तृतीय सुप्रमा मध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे.

- मूळ प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकात भूसंपादनाची तरतूद तहसिलदार, देवगड यांचें दि.७.१०.१९९६ चे पत्रानुसार हेक्टरी दरावर आधारीत आहे. तृतीय सुधारीत अंदाजपत्रकात प्रत्यक्षात महसूल विभागाने सन २००५ ते २०११ दरम्यान वेळोवेळी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या अंतिम निवाडयानुसार करणेत आली आहे. मूळ अंदाजपत्रकात बुडीत क्षेत्रात ७५ बांधकामाच्या संपादनाची तरतूद होती तथापि प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीनुसार सुमारे २७१ बांधकामे संपादीत करावी लागली. त्यामुळे भूसंपादनाचे खर्चामध्ये रू. २०.८४ कोटी वाढ झाली आहे. प्रकल्पग्रस्ताना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान देणे व बुडीत क्षेत्रात जाणारी विद्युत वाहिनी स्थलातंरीत करणे इत्यादीसाठी रू. ०.८० कोटी इतकी वाढ झाली आहे. त्यामूळे भूसंपादन व पुनर्वसनाच्या खर्चात एकूण रू. २१.६४ कोटी वाढ झाली आहे.
- स्पर्धात्मक दरानुसार अधिक दराची निविदा स्विकारल्यामुळे व निविदा शर्तीनुसार देय भाववाढ, आस्थापना खर्च इ. प्रमुख बाबींमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

- **सिंचन क्षेत्रातील बदलाबाबतचा तपशिल**

मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पामध्ये २५.३० दलघमी पाणीसाठा करून त्याव्दारे २१३३ हेक्टर सिंचनक्षेत्र (म्हणजेच १६० टक्के पिकरचनेनुसार ३४१३ हेक्टर पिकक्षेत्र) ओलीताखाली आणणेचे प्रस्तावित होते. प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यतेच्या अहवालाचे वेळी तांत्रिक बाबीमध्ये बदल झाला नसल्याने प्रकल्पीय पाणीसाठा व सिंचनक्षेत्रात बदल झालेला नाही.

प्रथम सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाच्या आधारे प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा अ.अ. म.सं.सं.(मा.ध.) नाशिक यांनी तयार करून पत्र क्र.मसंसं/माध/माध ४/कोर्ले सातंडी /३२७/ १४२८ दि. २१.१२.२००३ अन्वये मान्यतेसाठी प्रदेश कार्यालयास सादर केला होता. त्यास प्रदेश कार्यालयाने पत्र क्र. कोर्ले सातंडी/२१९३/(१-०२)/तां-६/३६४२ दि. १७.११.२००४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर सर्वसाधारण आराखडयानुसार प्रकल्पाच्या नियत्रंण पातळयामध्ये बदल झाला. जलसंचय पातळी ८९.०० मी. ऐवजी ९०.१० मी झाल्याने प्रकल्पाच्या पाणीसाठयात ३.२० दलघमी वाढ होऊन २८.५० दलघमी इतका झाला. पर्यायाने सिंचनक्षेत्रातही वाढ होऊन ते २५६९ हेक्टर इतके (म्हणजेच १६० टक्के पिकरचनेनुसार ४११० हेक्टर पिकक्षेत्र) झाले.

सर्वसाधारण आराखडयास मंजूरी दिल्यानंतंर अ.अ. (द.ध.) म.सं.सं. नाशिक यांचेमार्फत सांडव्या बाबत व्दारयुक्त सांडव्याऐवजी व्दारविरहीत सांडवा असा पर्यायी अभ्यास झाला. धरण बैठकीत वनसंज्ञेखालील क्षेत्र येत असल्याने काम करताना कार्यक्षेत्रावर येत असलेल्या अडचणीचा विचार करून व फणसगाव (नरसाळेवाडी) नाल्याचे पाणी धरणरेषेवरच येत असल्याने धरणाची संरेखा २०० मी वरच्या बाजूस घेणेचा निर्णय होऊन त्यास शासन निर्णय क्र.संरेखा/२००६/१२४१/(३२१/२००६) मप्र दि. १६.१०.२००६ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. वरील बदलामुळे बुडीत क्षेत्र कमी झाले. पूर्ण संचय पातळी वाढवून पाणीसाठा २८.५० दलघमी इतकाच ठेवला असता तर राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ चा काही भाग बाधीत झाला असता. त्यांमुळे पूर्ण संचय पातळी ९०.१० मी इतकीच ठेवण्याचा निर्णय झाला.पर्यायाने पाणीसाठा २८.५० दलघमी ऐवजी २६.१७१ दलघमी असा झाला. पाणीसाठा कमी झाल्याने सिंचनक्षेत्र२५६९ हेक्टर ऐवजी २५०० हेक्टर असे कमी झाले आहे. (म्हणजेच १४५ टक्के पिकरचनेनुसार ३६२५ हेक्टर पिकक्षेत्र असे झाले आहे)

- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**
  - **माती धरण :-** मुख्य धरणाचे मातीकाम १००% पूर्ण झालेले आहे.
  - **सांडवा:** - डकबील पद्धतीच्या द्वारविरहित सांडव्याचे काम पूर्ण झालेले आहे. बाजूच्या संरक्षक भिंती व पुच्छ कालव्याच्या भागातील काम अद्याप शिल्लक आहे.

- **सिंचन तथा विद्युत विमोचक:** - बोगदा खोदकाम, पातेरी जाळीचा भाग व आपत्कालीन द्वारासाठी संधानक, विहीर संधानक पूर्ण झालेले आहे. उर्वरीत कामे शिल्लक आहेत.

कालवे :- कालवे - डावा कालवा किमी १ ते २० मधील कांही कि.मी. वगळता उर्वरित कामांच्या निविदा निश्चित झालेल्या असून त्यापैकी सद्यस्थितीत कि.मी.१ ते ३ मधील बोगदा काम प्रगती पथावर आहे. शेजवली शाखा कालव्याच्या संरेखेस विभागीय स्तरावर मान्यता देण्यात आलेली असून उपळे शाखा कालव्याच्या कि.मी. १४ पर्यंतची संरेखा मंजूर आहे. शेजवली शाखा कालवा व उपळे शाखा कालव्याच्या कि.मी. ५ पर्यंतची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

- **भूसंपादन :-** शीर्षकामासाठी एकूण ३२८.४२ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३१९.६४ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरीत प्रकरणे कलम ६ वरती आहेत. भूसंपादनासाठी आतापर्यंत रू. १५.४४ कोटी महसूल खात्यास दिलेले आहेत. कालव्यासाठी सुमारे २४०.२२ हे. जमीन आवश्यक असून त्यापैकी डावा कालव्याचे २० कि.मी. लांबीच्या भागातील भूसंपादन प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.
- **वनजमीन :-** सदर प्रकल्पासाठी ४.३६ हे. वनसंज्ञेखालील क्षेत्र येत असून त्यामध्ये काम करण्यास वनखात्याकडून सन २००८ मध्ये परवानगी मिळालेली आहे.
- **पुनर्वसन :-** सदर प्रकल्पांतर्गत ४ गावे अंशतः बाधीत होत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

गावाचे नाव	बाधीत घरे	कुटुंबे	लोकसंख्या
१. फणसगाव	--	--	--
२. कुणकवण (कोंडवाडी)	४३	१३०	२९७
३. उंडील	२०	७६	९६
४. वारगाव	२१	५६	४९०
एकूण	८४	२६२	८८३

प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनाचा पर्याय स्विकारलेला असल्याने पुनर्वसन गावठाण व त्यामध्ये नागरी सुविधांची कामे हाती घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :- सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रू.१०३.९६ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
७३.५८	१५.४४	१४.९४	१०३.९६

प्रकल्पाचे नांव :- देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव :-देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्प		तालुका :- कणकवली		जिल्हा - सिंधुदुर्ग
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हेक्टर) : पीकक्षेत्र)	८१२२	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) : जून २०१२		३२३८
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मुळ प्रशासकीय मान्यता	२१/०३/१९७९	१९७६-७७	१५.४८	८१२२
	प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता	१८/०१/१९९४	१९९२-९३	७०.९८	८१२२
	द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	१५/०१/२००२	१९९९-२०००	१७४.९८	८१२२
	तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	०१/०८/२००७	२००३-०४	२४९.७८	८१२२
	सुधारीत किंमत	शासनास सादर	२००८-०९	३५३.५७	८१२२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investrnent) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ) TAC Clearance Ref.	मध्यम प्रकल्प असल्यामुळे आंतरराज्य बाब संबंधीत नसल्याने केंद्र शासनाची मान्यता आवश्यक नाही.			
	ब) Investment Clearance Ref.	प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		२३९.९५		
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		८.१२		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		२१६.९७		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		१४.८६		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९७९-८०		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत		१९८७ / रू. ३०.४५ कोटी		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेंत खर्च वाढीची कारणे		एकूण वाढ रू. ३३८.०९ कोटी (रू.३५३.५७ - रू.१५.४८)		
			रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		१६१.८५	४७.८७	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (१९.५० - ०.५४)		१८.९६	५.६१	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		०.००	०.००	

७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	१८.२०	५.३८
७.५	इतर कारणे (ई.टी.पी सहीत)	१३९.०८	४१.१७
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन	भूसंपादन -शिर्षकामासाठी बुडीत क्षेत्रासह ६०९.०२ हे. क्षेत्राची आवश्यकता असून संपूर्ण क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. वसाहती व पर्यायी रस्त्या करीता एकूण ६६.१७ हे. क्षेत्र आवश्यक असून संपूर्ण क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. कालव्यासाठी एकूण ११५.२३ हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. त्यापैकी ३१.५९ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरीत ८३.६४ हे. क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. पुनर्वसन - पुनर्वसनाकरीता लागणारी जमिन संपादीत करून पुनर्वसन गावठाणामध्ये नागरी सुविधांची कामे पूर्ण करून नविन गावठाणे जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत.	
८.२	धरण	मातीधरण - धरणाचा माथा तलांक १९०.१५ मी पर्यंत मातीकाम पूर्ण झालेले आहे. १०० टक्के काम पूर्ण असून १००.४२ दलघमी (३.५४ टीएमसी) पाणीसाठा निर्माण झाला आहे. सिंचन तथा विद्युत विमोचकाचे काम पूर्ण होऊन १.५० मे.वॅट विजनिर्मिती करण्यात येत आहे. ओगी प्रकारच्या संधानकातील व्दारसहीत सांडव्याचे काम पूर्ण झाले आहे. पुच्छ कालव्याचे ८० टक्के काम पूर्ण असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	१) डावा कालवा :-डावा कालव्याची एकूण लांबी ७.५२ कि.मी. आहे. त्यापैकी कि.मी. ३ पर्यंतचे मातीकाम व बांधकामे पुर्ण झालेली आहेत. उर्वरित ४.५२ किमी लांबीतील कालव्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून भूसंपादन, अंदाजपत्रके व निविदा प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. २) उजवा कालवा :-उजवा कालव्याची एकूण लांबी ४.६१ कि.मी. आहे. त्यापैकी २.८६ किमी पर्यंतचे मातीकाम व बांधकामे पुर्ण झालेले आहे. उर्वरित १.७५ किमी करीता निविदा प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. ३) वितरण व्यवस्था :- उजवा कालव्यावरील वितरीका क्र. २ चे मातीकाम व बांधकामे प्रगतीपथावर आहेत. उजवा कालवा वितरिका क्र. २ चे मातीकाम, बांधकाम प्रगतीपथावर आहे. उजव्या कालव्यावरील उर्वरित व डाव्या कालव्यावरील वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे.अंदाजपत्रके व निविदा प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.	

७.३ **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ**
(मूळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)
बदलामुळे झालेली वाढ

प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झालेला नाही.

७.४ **सविस्तर घट संकल्पचित्रामुळे झालेली वाढ-**

- मूळ धरणाच्या आराखडयास प्रदेश कार्यालयाने दि. १५/०१/१९८२ अन्वये मान्यता दिली आहे.
- सांडव्याच्या पायाकरिता लागणारा भूस्तर कठीण खडकातील एकजीव असणे आवश्यक होते. परंतु मूळ प्रस्तावित ठिकाणी (सा.क्र. ०/१४० मी.) आवश्यकतेनुसार भूस्तर प्राप्त न झाल्याने सांडव्याच्या स्थानामध्ये बदल करण्यात आला आहे. सांडव्याचे सुधारित संकल्पन मसंसं, नाशिक यांचेकडून प्राप्त करुन घेतला असून सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. १/२/१९९० चे पत्रान्वये मान्यता दिली आहे.
- मूळ प्रकल्प अहवालामध्ये सांडव्याचे बांधकाम दगडी बांधकामात होते. सुधारित संकल्पनात तो एम १५ संधानकामध्ये दिला आहे.
- अशा रितीने सविस्तर घटक संकल्पचित्र संकल्पचित्रामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. १८.२० कोटी वाढ झाली आहे.

७.५ **इतर कारणे**

- स्पर्धात्मक बोलीनुसार निविदा अधिक्य, निविदा शर्तीनुसार देय भाववाढ, इत्यादींमुळे रु. ८०.०२ कोटी वाढ झाली आहे.
- तसेच आस्थापना खर्चात रु. ५९.०६ कोटी वाढ झालेली आहे.

देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग
संक्षिप्त टिप्पणी

- देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्प गडखोरे मधील देवघर नदीला मिळणाऱ्या कुर्ली नाल्यावर आहे.
- या प्रकल्पासाठी सन १९८६-८७ च्या दरसूचीवर आधारीत रू. १५.४८ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र. डी.ई.ओ. १०७६/९०२/२१३१/ म.प्र.१, मंत्रालय,मुंबई दि. २१/०३/१९७९ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- धरण बैठकीकरिता लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन प्रक्रीया सन १९८३ मध्ये सुरु करुन आवश्यक क्षेत्र सन १९८७ मध्ये ताब्यात मिळाले आहे.
- प्रशासकीय मान्यतेच्या आधारे प्रकल्पाच्या जलरोधी खंदकाच्या ११ निविदा निश्चित करुन एप्रिल १९८८ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले.
- धरण बैठकीकरिता लागणाऱ्या क्षेत्रात एकूण ९ कुटुंबे बाधित होत होती. सदर कुटुंबांचे पुनर्वसन न झाल्यामुळे धरणाच्या जलरोधी खंदकाच्या कामास तीव्र विरोध झाला. यामुळे असलेल्या निविदा आहे त्या स्थितीत अंतिम कराव्या लागल्या.
- सन १९९३ मध्ये सा.क्र. २१ मी ते ९२.५० मी मधील सांडवा व सिंचन तथा विद्युत विमोचकाचे काम तसेच सा.क्र. ९२.५० मी ते ११७१ मी मधील उर्वरित मातीधरणाचे (तलांक १६९.०० मी पर्यंत) काम ब-२/३ सन १९९२-९३ निविदेन्वये मे. नोबल इंडिया कन्स्ट्रक्शन कंपनी, जयपूर यांना देण्यात आले. सदरच्या कामास एप्रिल १९९३ मध्ये प्रत्यक्षात सुरुवात झाली.
- मूळ आराखड्यामध्ये सिंचन विमोचक प्रस्तावित होता. तद्नंतर सिंचन विमोचकाऐवजी सिंचन तथा विद्युत विमोचक तसेच सांडवा स्थानामध्ये बदल करण्यात आले. सदरचा बदलाचा प्रकल्पाच्या प्रथम सुधारीत अंदाजपत्रकात समावेश करण्यात आल आहे.
- सन १९९२-९३ च्या दरसूचीनुसार ु.र.७०.९८ कोटीच्या प्रथम सुधारित अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र. डी.ई.ओ./१०९३/१६०८/(२७५/९३) म.प्र. दि.१८.१.१९९४ अन्वये मंजुरी मिळाली आहे.
- प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या जसे पुनर्वसन, प्रकल्पग्रस्त दाखले, शासन सेवेत समावून घेणे या मागण्यांसाठी प्रकल्पाच्या कामास वारंवार विरोधामुळे नियोजनानुसार कामाची प्रगती साधता आली नाही.
- सन १९९९-२००० च्या दरसूचीवर आधारित शासन निर्णय क्र. देवघर १०.०१/८११/(२०४/२००१) म.प्र., मंत्रालय, मुंबई दि.१५.१.२००२ अन्वये रक्कम रु.१७४.९८ कोटीला द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.
- प्रकल्पाची धरण माथा पातळी १९०.१५ मी आहे. तलांक १६९.०० मी ते १९०.१५ मी पर्यंतचे उर्वरित मातीकाम व अनुषंगिक कामे, कार्यरत असलेल्या निविदा क्र. ब-२/३ सन १९९२-९३ अंतर्गत करुन घेण्यास शासनाने दि.१२.०६.२००३ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.
- सन २००५मध्ये प्रथम टप्पा घळभरणीसह मातीधरणाचे काम तलांक १६१.०० मी पर्यंत पूर्ण करुन १०.०९२ दलघमी पाणीसाठा करण्यात आला आहे.
- तसेच सन २००७ मध्ये टप्पा क्र. २ च्या घळभरणीसह १६९.०० मी तलांकापर्यंत काम करुन २४.६२ दलघमी पाणीसाठा करण्यात आला.
- सन २००३-२००४ च्या दरसूचीवर आधारित शासन निर्ण क्र. देवघर २००५/५४५/(१७३/२००६) म.प्र., दि.८.१.२००७ अन्वये रक्कम रु.२४९.७८ कोटीला तृतीय प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

- प्रकल्पग्रस्तांच्या वेळोवेळी होणाऱ्या विरोधामुळे कामाची अपेक्षित प्रगती राखणे शक्य होत नसल्याने अभिकरणाने काम करण्यास असमर्थता दर्शविली. सन २००८ मध्ये मातीकाम पूर्ण करुन सदरची निविदा आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात आली.
- धरणाचे (सांडवा, पुच्छ कालवा व अनुषंगिक कामे) उर्वरित कामाकरिता निविदा क्र. ब-१/७ सन २००८-०९ अन्वये मे. पी. आर. नायक असोसिएटस, हुबळी यांचेशी निश्चित करण्यात आली आहे.
- सन २००८-२००९ च्या दरसूचीवर आधारित महामंडळ कार्यालयाचे दि.२७.१.२०१० चे पत्रान्वये रक्कम रु.३५३.५७ कोटीचे अंदाजपत्रक चतुर्थ प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आले आहे. शासनस्तरावर छाननी सुरु असून अद्याप मान्यता मिळालेली नाही.
- या प्रकल्पामुळे १००.४२८ द.ल.घ.मी. (३.५४ टी.एम.सी.) पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर १.५ मे. वॅट वीजनिर्मिती जुर्ल-२०१० पासून सुरु झालेली आहे.
- **मूळ मंजूरीच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे-**
  मूळ प्रशासकीय किंमत रु.१५.४८ कोटी (दरसूची १९७६-७७)
  सुधारीत किंमत रु.३५३.५७ कोटी (दरसूची २००८-०९)
  एकुण वाढ रु.३३८.०९ कोटी

अ.क्र.	वाढीचे कारणे	वाढीव रक्कम (कोटी)	वाढीची टक्केवारी
१	दरसूचीतील वाढ	१६१.८५	४७.८७
२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१८.९६	५.६१
३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतूदीमुळे झालेली वाढ)	०.००	०.००
४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	१८.२०	५.३८
५	इतर कारणे (ईटीपी सह)	१३९.०८	४१.१७
	एकूण	**३३८.०९**	**१००.००**

उपरोक्त वाढीची सविस्तर कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. दरसूचीतील वाढ –

मूळ अंदाजपत्रक हे सन १९७६-७७ ची दरसूची वापरुन केला असून चतुर्थ सुधारित अंदाजपत्रकाकरीता (शासन सादर) सन २००८-०९ ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर दरामध्ये इंधनवाढ, मजूरीमधील वाढ, बांधकाम साहित्याच्या दरामधील वाढीमुळे रु.१६१.८५ कोटी वाढ झाली आहे.

२. भूसंपादन :-

मुळ नियोजनानुसार भूसंपादनाकरिता रु.०.५४ कोटी तरतूद करण्यात आली होती. प्रकल्पाच्या धरण बैठक, बुडीत क्षेत्र, पुच्छ कालवा करीता क्षेत्राचा ताबा सन १९८७ मध्ये मिळा आहे. या कालावधीत जमीनीच्या दरामध्ये, फळझाडाची व बांधकामच्या किंमतींमध्ये मोठ्या प्रमाणत वाढ झाली. प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष दिलेल्या मोबदला, संयुक्त मोजणी फी इ. रु.१९.५० कोटीची तरतूद चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये करण्यात आली. एकूण वाढ रु.१८.९६ कोटी झाली.

३. प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

(मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने समाविष्ठ तरतूदीमुळे झालेली वाढ):-
प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झालेला नाही.

४. सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

क्षेत्रीय परिस्थितीनुसार जागा बदलल्याने व मूळ नियोजनानुसार सांडवा बांधकाम दगडी बांधकामात होते. मात्र सांडवा बांधकाम सुधारित संकल्पानुसार संधानकात करण्यात आले.
सुधारित संकल्पनानुसार पुच्छ कालव्यामध्ये पाण्याचा वेग कमी करण्यासाठी संधानकातील आडवी बांध बांधण्याचे प्रस्तावित केले आहे.
सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या बांधकामाच्या परिमाणामध्ये वाढ झाली आहे.
उपरोक्त बाबीच्या बदलामुळे एकूण रु. १८.२० कोटीची वाढ झाली.

५. इतर कारणामुळे :-

स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा, निविदा शर्तीनुसार देय भाववाढ तसेच इतर बाबींमुळे रु. ८०.०२ कोटी वाढ झाली आहे.
आस्थापना खर्चातील वाढीमुळे रु. ५९.०६ कोटी इतकी वाढ झाली आहे.
इतर कारणांमुळे एकूण वाढ रु. १३९.०८ कोटी झाली आहे.

➢ प्रकल्पाची सद्यःस्थिती :

- शीर्षकामे :-
  - मातीधरण – धरणाचा माथा तलांक १९०.१५ मी. पर्यंत मातीकाम पूर्ण झालेले आहे. १०० टक्के काम पूर्ण असून १००.४२/दलघमी (३.५४ टीएमसी) पाणीसाठा निर्माण झाला आहे.
  - सिंचन तथा विद्युत विमोचकाचे काम पूर्ण होऊन १.५० मे. वॅट विजनिर्मिती करण्यात येत आहे.
  - ओगी प्रकारच्या संधानकातील द्वारसहित सांडव्याचे काम पूर्ण झाले आहे. पुच्छ कालव्याचे ८० टक्के काम पूर्ण असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
- **कालवे** :-

१. डावा कालवा : डावा कालव्याची एकूण लांबी ७.५२ कि.मी. आहे. त्यापैकी कि.मी. ३ पर्यंतचे मातीकाम व बांधकामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ४.५२ कि.मी. लांबीतील कालव्याचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून भूसंपादन, अंदाजपत्रके व निविदा प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.

२. उजवा कालवा :- उजवा कालव्याची एकूण लांबी ४.६१ कि.मी. आहे. त्यापैकी २.८६ कि.मी. पर्यंतचे मातीकाम व बांधकामे पूर्ण झालेले आहे. उर्वरित १.७५ कि.मी. करिता उर्वरित निविदा प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.

३. वितरण व्यवस्था :- उजवा कालव्यावरील वितरिका क्र. २ चे मातीकाम व बांधकामे प्रगतीपथावर आहे. उजवा कालवा वितरिका क्र. २ चे मातीकाम, बांधकाम प्रगतीपथावर आहे. उजव्या कालव्यावरील उर्वरित व डाव्या कालव्यावरील वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. अंदाजपत्रके व निविदा प्रक्रीया क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.

- **भूसंपादन** :
- भूसंपादन - शीर्षकामासाठी बुडीत क्षेत्रासह ६०९.०२ हे. क्षेत्राची आवश्यकता असून संपूर्ण क्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे.

- वसाहती व पर्यायी रस्त्याकरीता एकूण ६६.१८ हे. क्षेत्र आवश्यक असून संपूर्ण क्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे.
- कालव्यासाठी एकूण ११५.२३ हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. त्यापैकी ३१.५९ हे. क्षेत्र संपादित झालेले आहे. उर्वरीत ८३.६४ हे. क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव तयार करण्यात काम क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
- **पुनर्वसन** :-
  पुनर्वसनाकरिता लागणारी जमीन संपादित करुन पुनर्वसन गावठाणामध्ये नागरी सुविधांची कामे पूर्ण करुन नवीन गावठाणे जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडे हस्तांतरित करण्यात आली आहेत.
- **वनजमीन** : सदर प्रकल्पामध्ये वनजमीन येत नाही.
- पुनर्वसन :
- सदर प्रकल्पांतर्गत २ गांवे अंशतः बाधीत होत असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

गावाचे नांव	बाधीत घरे	कुटुंबे	लोकसंख्या
१. घोणसरी	११२	१०५	८१४
२. कुर्ली	३४१	४७०	३३०१
एकूण	४५३	५७५	४११५

- वरील पैकी एकूण ११५ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनाचा पर्याय स्वीकारलेला आहे व उर्वरित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झालेले आहे.

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
२१६.९७	८.१२	१४.८६	२३९.९५

प्रकल्पाचे नांव :- अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव :- **अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प**		तालुका :- वैभववाडी		जिल्हा :- सिंधुदुर्ग
२	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हेक्टर) :(पीकक्षेत्र)	९०२७	निर्मित सिंचन क्षमता (हेक्टर) : जून २०१२		०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता (व्यपगत)	५/१२/१९९५	१९९३-९४	५३.९४	६३७५
	नव्याने प्रशासकीय मान्यता	०३/०६/२००४	२००३-०४	१७८.४१	६३७५
	प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता	२९/०४/२००९	२००५-०६	३०१.०४	९०२७
	द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	२५/०५/२०१२	२००९-१०	६६९.८०	९०२७
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investrnent) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ) TAC Clearance Ref.	मध्यम प्रकल्प असल्यामुळे आंतरराज्य बाब संबंधीत नसल्याने केंद्र शासनाची मान्यता आवश्यक नाही.			
	ब) Investment Clearance Ref.	१) शासनाचे इंग्रजी पत्र क्र. अरूणा २००९/११७३ (३७४ /०९)/दि. २९.०९.२००९ अन्वये रू. ३०१.०४ कोटी रकमेस गुंतवणूक मान्यता दिली आहे. २) द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार रू. ६६९.८० कोटी रकमेस गुंतवणूक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		१९०.९२		
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		१३.८७		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		१७४.१२		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		२.९३		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		२००४-०५		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत		मे- २००६ / रू. ३०१.०४ कोटी		
७	मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे		एकूण वाढ रू. ४९१.३९ कोटी (रू. ६६९.८० - रू. १७८.४१)		
			रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		५६.५१	११.५०	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही. मुळे खर्चातील वाढ (१२९.००-४.२१)		१२४.७९	२५.४०	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)		३.२६	०.६६	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ		२२२.०१	४५.१८	
७.५	इतर कारणे (ई.टी.पी सहीत)		८४.८२	१७.२६	

८	प्रकल्पाची सद्यस्थिती	
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन	• शिर्षकामासाठी बुडीत क्षेत्रासह ३९२.२२ हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. पैकी १२०.८५ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे. उर्वरीत २७१.३७ हे. क्षेत्रापैकी २५२.१५ हे. क्षेत्राचा अंतिम निवाडा प्रस्ताव मंजूरीकरीता आयुक्त, कोकण प्रदेश, नवी मुंबई यांचेमार्फत महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर झालेला आहे व १९.२२ हे. सरकारी क्षेत्र असून जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडून हस्तांतरण करण्याची कार्यवाही चालू आहे. • पुनर्वसनाकरीता १०३.६० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. पैकी ७५.६३ हे.क्षेत्र संपादीत झालेले असून उर्वरीत २७.९७ हे. क्षेत्राची कलम ९(११) ची चौकशी पूर्ण झाली आहे.भूसंपादनाची पुढील कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. • पर्यायी रस्त्या करीता १५.७५ हे. क्षेत्राची आवश्यकता असून सदरची जमीन खाजगी वाटाघाटीने घेण्याचे प्रस्तावित असून संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे. पुढील संपादनाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. • कालव्यासाठी सुमारे २०३.०० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. त्याची भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. त्यापैकी ९ भूसंपादन प्रस्ताव (११४.०९ हे.) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),सिंधुदूर्गनगरी ओरोस यांचे कार्यालयास सादर केलेले आहेत. भूसंपादना बाबतची पुढील कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. उर्वरित ८८.९१ हे. क्षेत्राचे भूसंपादन प्रक्रीया प्राथमिक स्तरावर आहे.
८.२	धरण	• मातीधरण: धरण माथा तलांक १६८ मी असून डाव्या तीराकडील सा.क्र. ६० ते ५४० मी. मध्ये १४७ तलांकापर्यंत काम पुर्ण झाले आहे. • उजव्या तीराकडील सा.क्र. ६८० ते १०२० मध्ये १४५ मी. तलांकापर्यंत काम पुर्ण झाले आहे. • सांडव्याचे खोदकाम पूर्ण झालेले असुन पूच्छ कालव्याचे खोदकाम प्रगतीपथावर आहे. • साधारणत: ७५ टक्के शिर्षकामे पूर्ण झालेली आहेत.
८.३	कालवा व वितरण व्यवस्था	• अरुणा डावा कालव्याची एकूण लांबी २३.१३ कि.मी. असून डावा कालवा सा.क्र. ०/००० ते १३/००० मी (१३ कि.मी. ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. • मांगवली शाखा कालवा एकूण लांबी १९.०१ किमी असून त्यापैकी सा.क्र. ०/००० ते १०/००० मी (१० कि.मी.) ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. • भूईबावडा शाखा कालवा एकूण लांबी २२.८९ किमी असून त्यापैकी सा.क्र. ०/००० ते ८/००० मी (८ कि.मी.) ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. • उजव्या कालव्याची एकूण लांबी २६.५० कि.मी. असून अंदाजपत्रके तयार करणे व निविदा कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर सुरु आहे.

अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग
अ. क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

(मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- मूळ नियोजनानुसार धरणाचा पाणीसाठा ६४.५५७ द.ल.घ.मी. व ६३७५ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन होते.
- प्रकल्पाच्या ठिकाणी उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर लाभ घेण्याच्या दृष्टीने अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या दि. २२.०८.२००६ च्या ३४ व्या बैठकीत ठराव क्र.३४/५ अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर अतिरिक्त पाणीसाठा करण्याच्या कामाचा समावेश मंजूर प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात आहे. यामुळे धरणामध्ये २८.८२ द.ल.घ.मी. (१.०१७ टी.एम.सी.) अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होऊन २६५२ हे. अतिरिक्त सिंचन निर्मिती होणार आहे. सदर व्याप्ती बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

- धरणाच्या पाणीसाठया मध्ये २८.८२ द.ल.घ.मी. वाढ झाल्याने धरणाच्या काटछेदामुळे परिमाणात वाढ झाल्याने प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सदर सुधारीत मातीधरण काटछेद म.स.स.नाशिक यांचेकडून दि. १३.०३.२००९ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. २९.१२.२००९ चे पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.
- मूळ प्रकल्प अहवालामध्ये सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. त्याऐवजी एम-१५ संधानकामध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे. सांडव्याचे संकल्पन म.सं.सं.नाशिक यांचेकडून दि.३०.०५.२०१२ चे पत्रान्वये प्राप्त झाले आहे. सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. ४.१०.२०१२ चे पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.
- अशारितीने सविस्तर घटक संकल्पचित्रातील बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रू. २२२.०१ कोटी वाढ झाली आहे.

७.५ इतर कारणे

- स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्वीकारल्यामुळे रु.४३.७६ कोटी इतकी वाढ झाली आहे.
- निविदा शर्तींनुसार देय भाववाढ रु.१८.६४ कोटी विचारात घेतली आहे.
- आस्थापना व इतर खर्चात रु.२२.४२ कोटी इतकी वाढ झाली आहे.

अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग
संक्षिप्त टिप्पणी

- अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प हा वाघोटण खोऱ्यात अरुणा नदीवर आहे.
- या प्रकल्पासाठी सन १९९३-९४ च्या दरसुचीनुसार रु. ५३.९४ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र. अरुणा १०८५/(२०९/८६)/जसंअ,मुंबई, दि. ०५/१२/१९९५ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तथापी सदर प्रकल्पाकरीता प्रशासकीय मान्यतेनंतर ५ वर्षापर्यंत आर्थिक तरतुद झाली नाही. त्यामूळे मुळ प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली.
- सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सिंचनाचा शिल्लक असलेला अनुशेष भरुन काढण्यासाठी, तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने नियामक मंडळाच्या दि.२५/०५/२००४ रोजीच्या २४ व्या बैठकीत ठराव क्रमांक २४/०५ संमत केला. त्या अनुषंगाने सन २००३-०४ च्या दरसूचीनुसार रु. १७८.४१ कोटी रक्कमेस को.पा.वि.म./तां-१/१६२१, दि.०३/०६/२००४ अन्वये व्यपगत झालेल्या प्रशासकीय मान्यतेस पुन:प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.
- या पुन:प्रशासकीय अंदाजपत्रकामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने उद्देश होता.

			सिंचनक्षेत्र
१	पाणीसाठा	६४.५५७ द.ल.घ.मी.	--
२	विद्युत विज निर्मिती	२.४० मे. वॅट	--
३	मुख्य कालवा	०.४२ कि.मी.	३८८१ हे.
४	उजवा कालवा	५०.०२ कि.मी.	
५	डावा कालवा	३२.०० कि.मी.	२४९४ हे.
		एकूण	६३७५ हे.

- पुन:प्रशासकीय मान्यतेच्या आधारे अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दि.११/०३/२००५ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. हे काम महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन लि. पुणे. यांना निविदा क्र. ब-१/१६ सन २००४-०५ अन्वये देण्यात आले.
- या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी त्यांच्या काही अटी लादून विरोध केल्याने (जसे बाजारभावा प्रमाणे मोबदला मिळावा व प्रकल्पग्रस्तांना शासन सेवेत नोकरी मिळावी इ.) या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात जवळपास एक वर्ष उशीराने म्हणजेच मे २००६ मध्ये चालू झाले.
- सदर प्रकल्प पुर्ण करणेकरीता ५ वर्षाचा कालावधी अपेक्षित होता (दि.१०/०३/२०१० पर्यंत)
- सदर प्रकल्पाचे काम प्राथमिक अवस्थेत असताना कोंकण प्रदेशातील उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपुर लाभ घेण्याचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या दि. २२/०८/२००६ च्या ३४ व्या बैठकीत ठेवण्यात आला. या बैठकीमधील ठराव क्रमांक ३४/०५ अन्वये या प्रस्तावास मान्यता मिळाली.
- त्यामूळे अरुणा मध्यम प्रकल्पाच्या बाबीमध्ये पुढील प्रमाणे बदल झाले.

अ.क्र	धरण/ कालवा	मुळ	सुधारीत	वाढ
१	पाणीसाठा	६४.५५७ द.ल.घ.मी.	९३.३७८ द.ल.घ.मी	२८.८२१ द.ल.घ.मी
२	विद्युत विज निर्मिती	२.४० मे. वॅट	३.२० मे. वॅट	०.८० मे. वॅट
३	उजवा कालवा	५०.०२ कि.मी.	५०.०२ कि.मी.	०
४	डावा कालवा	३२.०० कि.मी.	४७.०८ कि.मी.	१५.०८ कि.मी.
५	मुख्य कालवा	०.४२ कि.मी.	०.४२ कि.मी.	०
६	पीक क्षेत्र	६३७५ हे.	९०२७ हे.	२६५२ हे.

- **व्याप्तीतील बदलामूळे होणारा लाभ :-**
- धरणामध्ये २८.८२१ द.ल.घ.मी. (१.०१७ टी.एम.सी) अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होऊन २६५२ हे. अतिरिक्त सिंचननिर्मिती होणार आहे. तसेच २.४० मे. वॅट विज निर्मिती मध्ये ०.८० मे. वॅट विज निर्मितीत वाढ होऊन एकूण ३.२० मे. वॅट विज निर्मिती होणार आहे.
- सदर व्याप्तीतील बदलानंतर मध्यवर्तीत संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून मुख्य धरणाचा सुधारीत काटछेद दि. १३/०३/२००९ रोजी प्राप्त झाला. सदर काटछेदास मुख्य अभियंता, कोंकण प्रदेश, मुंबई यांनी दि. २९/१२/२००९ रोजी मान्यता दिली.
- व्याप्तीतील बदल झाल्याने (प्रकल्पसाठ्यात वाढ) धरणाचा काटछेद सुधारीत करावा लागला. सदर सुधारीत काटछेदाच्या संकल्पचित्रानुसार विविध बाबींचा समावेश नव्याने करावा लागला. सदर अतिरिक्त बाबींचा समावेश प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकामध्ये आला. त्या अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रमांक अरुणा/२०११/२१८/(८२/११) मप्र., दि.२५/०५/२०१२ अन्वये ६६९.८० कोटी किंमतीस मान्यता प्रदान करण्यात आली.
- सन २००६ ते मार्च २००९ पर्यंत या प्रकल्पासाठी अल्प निधी प्राप्त झाला (रु. ३७.६६ कोटी). त्यामूळे या प्रकल्पाची आवश्यक ती प्रगती साधता आली नाही.
- सन २००९-१० मध्ये या प्रकल्पास केंद्रशासनाचा निधी मिळणे करीता व वेळेत पुर्ण करणे करीता केंद्र शासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत (AIBP) समावेश करण्यात आला
- मार्च २००९ नंतर आज पर्यंत या प्रकल्पावर रु. १३५.४५ कोटी निधी उपलब्ध झाला. त्यामूळे धरणाच्या कामाची आवश्यक ती प्रगती साधता आली. मुख्य धरणाचे माती काम सुमारे ७५ टक्के पुर्ण झाले असून भूसंपादन व पुनर्वसनाची कामे वेगाने प्रगतीपथावर आहेत. पुढील वर्षी जून २०१३ अखेर कंदरभरणीचा पहिला टप्पा पुर्ण करुन ४८.०६ द.ल.घ.मी. इतका साठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.
- **मुळ मंजूरीच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे -**

  पुर्नप्रशासकीय किंमत रु.१७८.४१ कोटी (दरसूची २००३-०४)

  द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु.६६९.८० कोटी (दरसूची २००९-१०)

  एकुण वाढ रु.४९१.३९ कोटी

अ.क्र.	वाढीची कारणे	वाढीव रक्कम (कोटी)	वाढीची टक्केवारी
१	दरसूचीतील वाढ	५६.५१	११.५०
२	भूसंपादन,पुनर्वसन,वनजमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ	१२४.७९	२५.४०
३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने सामाविष्ठ तरतूदीमुळे झालेली वाढ)	३.२६	०.६६
४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	२२२.०१	४५.१८
५	इतर कारणे	८४.८२	१७.२६
	एकूण	**४९१.३९**	**१००.००**

उपरोक्त वाढीची सविस्तर कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. **दरसूचीतील वाढ :-**

मुळ अंदाजपत्रक हे सन २००३-०४ ची दरसूची वापरुन केला असून द्वितीय सुधारीत अंदाजपत्रकाकरीता सन २००९-१० ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर दरामध्ये इंधन वाढ, मजूरीमधील वाढ, बांधकाम साहित्याच्या तसेच गौणखनिजाच्या दरातील वाढीमूळे रु. ५६.५१ कोटी इतकी वाढ झाली आहे.

२. **भूसंपादन :-**

मुळ नियोजनुसार भूसंपादनाकरीता ४.२१ कोटी तरतूद करण्यात आली होती. प्रकल्पाच्या धरण बैठक, बुडीत क्षेत्र, पुच्छ कालवा करीता क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव (५५/०६ व ५६/०६) माहे ऑगस्ट २००६ मध्ये महसूल विभागास सादर करण्यात आला. सदर भूसंपादन प्रकरणाचे अंतिम निवाडे दि.१५/०४/२०१० व दि. २४/१२/२०१० मध्ये जाहीर झाले. या कालावधीत जमीनीच्या दरामध्ये, फळझाडाची व बांधकामाच्या किंमतींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. तसेच व्याप्तीतील बदलामूळे धरणबूडीत क्षेत्राकरीता लागणारी वाढीव जमीनीचा अंतिम निवाडा प्रस्ताव (०८/०६, ०९/०६ व ३४/०७) मंजूरी करीता शासनास सादर केलेला आहे. या वाढीव क्षेत्राकरीता येणारा खर्च, प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष दिलेल्या मोबदला, भूभाडे, संयुक्त मोजणीफी इ. रु.१२९.०० कोटीची तरतूद द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेमध्ये करण्यात आली.

३. **प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ**

(मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापी नव्याने सामाविष्ठ तरतूदीमुळे झालेली वाढ) :-

कालव्याची लांबी वाढल्यामूळे तसेच अश्मपटलांच्या जाडीत बदल झाल्यामूळे एकूण रु.३.२६ कोटी इतकी वाढ झाली आहे.

४. **सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-**

व्याप्तीच्या बदलामूळे नव्याने माती धरणाचा काटछेद संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून संकल्पन करुन घेतल्यामूळे खालील बाबीमध्ये वाढ झाली आहे.

आडवी झरणी (Horizontal Mat) अतिरिक्त तरतुद झाली , सांडव्याचे बांधकाम दगडी बांधकामाच्या ऐवजी संधानकामध्ये (M15) करण्यात आले , कालव्यावर अतिरिक्त काटनियामकाचे बांधकाम (Cross Regulator), काटछेदातील बदलामुळे मोठ्या प्रमाणात भरावाच्या परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. उपरोक्त बाबीच्या बदलामूळे एकूण रु.२२२.०१ कोटीची वाढ झाली

५. **इतर कारणामूळे :-**

स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराची निविदा, निविदा शर्तीनुसार देय भाववाढ व अस्थापना खर्चात झालेली वाढ या सर्व बाबींमूळे एकूण रु. ८४.८२ कोटी इतकी वाढ झाली.

➢ **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**

शीर्षकामे :

मातीधरणः- डाव्या तीराकडील सा.क्र. ६० ते ५४० मी. मध्ये १४७ तलांकापर्यंत काम पुर्ण. उजव्या तिराकडील सा.क्र. ६८० ते १०२० मध्ये १४५ मी. तलांकापर्यंत काम पुर्ण आहे. सांडव्याचे खोदकाम पूर्ण झालेले असुन पूच्छ कालव्याचे खोदकाम प्रगतीपथावर आहे. साधारणतः ७५ टक्के काम पूर्ण झालेले आहे.

कालवे :

- अरूणा मुख्य कालवा सा.क्र. ०/००० मी ते ०/४२० मी ची कालवा संरेखा मंजूर झाली आहे.
- अरुणा डावा कालव्याची एकूण लांबी २३.१३ कि.मी. असून डावा कालवा सा.क्र. ०/००० मी ते १३/००० मी (एकूण १३ किमी) ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

- मांगवली शाखा कालवा सा.क्र. ०/००० मी ते १०/००० मी (एकूण १० किमी) ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
- भुईबावडा शाखा कालवा सा.क्र. ०/००० मी ते ८/००० मी (एकूण ८ किमी) ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.
- उजव्या कालव्याची एकूण लांबी २६.५० कि.मी. असून अंदाजपत्रके तयार करणे व निविदा कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर सुरु आहे.

❖ **भूसंपादन :**

- शिर्षकामासाठी बुडीतक्षेत्रासह ३९२.२२ हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. पैकी १२०.८५ हे. क्षेत्र संपादीत झालेले आहे उर्वरीत २७१.३७ हे. क्षेत्रापैकी २५२.१५ हे. इतक्या क्षेत्राचा अंतिम निवाडा प्रस्ताव मंजूरीकरीता शासनास सादर झालेला आहे व १९.२१ हे. क्षेत्र सरकारी असून जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडून हस्तांतरण करण्याची कार्यवाही चालू आहे.
- पुनर्वसनाकरीता १०३.६० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. पैकी ७५.६३ हे.क्षेत्र संपादीत झालेले असून उर्वरीत २७.९७ हे. क्षेत्राची कलम ९(१) ची चौकशी पूर्ण झाली आहे.
- पर्यायी रस्त्या करीता १५.७५ हे. क्षेत्राची आवश्यकता असून सदरची जमीन खाजगी वाटाघाटीने घेण्याचे प्रस्तावित आहे.
- कालव्यांसाठी सुमारे २०३.०० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. त्यांची भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. त्यापैकी ९ भूसंपादन प्रस्ताव (११४.०९ हे.) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सिंधुदूर्गनगरी- ओरोस यांचे कार्यालयास सादर केलेले आहे.

- **वनजमीन :**
  सदर प्रकल्पामध्ये वनजमीन येत नाही.

- **पुनर्वसन :**
  सदर प्रकल्पांतर्गत ३ गावे पूर्णतः बाधीत होत असून १ गांव अंशतः बाधीत होत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

गावाचे नाव	बाधीत घरे	कुटुंबे	लोकसंख्या
१. नागपवाडी	१५३	३८०	१८४९
२. आखवणे	६२	२१९	११५५
३. भोम	१५३	४४०	१६०६
४. हेत (अंशतः)	९	७	१३०
एकूण	३७७	१०४६	४७४०

२६ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनाचा पर्याय स्विकारलेला असून उर्वरीत १०२० कुटुंबे पुनर्वसन गावठाण स्विकारणार आहेत. सदर पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधांची कामे ७० टक्के पूर्ण झालेली आहे. यावर्षी प्रकल्पग्रस्तांना नविन गावठाणामध्ये भुखंडाचे वाटपकरुन स्थलांतरीत करणेत येणार आहे.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :**
  सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रू. १९०.९२ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

सर्व आकडे कोटीत.

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
१७४.१२	१३.८७	२.९३	१९०.९२

प्रकल्पाचे नांव :- नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प
सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नांव :- नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प		तालुका :- कणकवली		जिल्हा :- सिंधुदुर्ग
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता (हे.) :- (पीकक्षेत्र)	१२५३०	निर्मित सिंचन क्षमता (हे.) : जून २०१२ -		११५३
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची सन	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.)
	मुळ प्रशासकीय मान्यता	१२/०७/१९८९	१९८६-८७	३२.४३	९४२४
	प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता	१७/११/१९९७	१९९३-९४	१०२.९८	९४२४
	द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	२२/०४/१९९९	१९९७-९८	१८९.९१	९४२४
	तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	१९/०७/२००७	२००५-०६	४४६.७१	१२५३०
	सुधारीत किंमत	शासनास सादर	२००९-१०	६४९.९५	१२५३०
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investrnent) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ) TAC Clearance Ref.	मध्यम प्रकल्प असून आंतरराज्य नसल्याने केंद्र शासनाची मान्यता आवश्यक नाही.			
	ब) Investment Clearance Ref.	शासनाने इंग्रजी पत्र क्र. नरडवे २००९/(११७४/२००९)/ जसंअ, मंत्रालय, मुंबई, दिनांक २९/०९/२००९ अन्वये तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या रू. ४४६.७१ कोटी रकमेस गुंतवणूक मान्यता दिली आहे.			
४.१	दिनांक ३१/०३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		३११.४८		
४.२	भू-संपादन, पुनर्वसन/वनजमीन संपादन खर्च (रु.कोटी)		५७.६२		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी)		२४६.५३		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		७.३३		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		१९९२-९३		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत		२००१ / रू. २३२.६५ कोटी		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेंत खर्च वाढीची कारणे		एकूण वाढ रू. ६१७.५२ कोटी (रू. ६४९.९५ - रू.३२.४३)		
			रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी	
७.१	दरसूचीतील वाढ		९२.११	१४.९२	
७.२	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ (९१.५२ - २.२९)		८९.२३	१४.४५	

७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)	११४.७३	१८.५८
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ	११८.४०	१९.१७
७.५	इतर कारणे (ई.टी.पी सहीत)	२०३.०५	३२.८८
८	**प्रकल्पाची सद्यस्थिती**		
८.१	भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन	भूसंपादन - प्रकल्पासाठी एकूण ६२५.७० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे.प्रकल्पाच्या शीर्षकामा करिता एकूण ५३४.३९ हे.खाजगी क्षेत्राची आवश्यकता असून ४३६.६५ हे. क्षेत्र खात्याच्या ताब्यात आले आहे. उर्वरित ९७.७४ हे. खाजगी क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यात आले आहेत. पुनर्वसन गावठाणाकरिता ८५.७१ हे. क्षेत्राची आवश्यकता असून हे संपूर्ण क्षेत्र ताब्यात आले आहे. को.प.बंधा-यांकरिता ५.६० हे. क्षेत्राची आवश्यकता असून भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. साधारणतः ८५ टक्के भूसंपादन पुर्ण झाले आहे.	
		पुनर्वसन - या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण ५ गावे बाधीत होत असून त्यापैकी १ पुर्णतः व ४ अंशतः गावे बाधीत होत आहेत. या बाधीत गावठाणाचे पुनर्वसन ३ ठिकाणी करण्यात येत आहे. पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर असुन ग्रामस्थांचे स्थलांतर नविन गावठाणात करण्याचे नियोजन आहे. पुनर्वसन अंतर्गत नागरी सुविधांची ७० टक्के कामे पूर्ण आहेत.	
		या प्रकल्पामध्ये ३४.१३.५ हे. क्षेत्र वनसंज्ञेखाली येत असून त्याच्या निर्वणीकरणाचा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे ऑगस्ट २०११ चे पत्रान्वये केंद्र शासनाच्या केंदीय पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली येथे तत्वतः मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.	
८.२	धरण (को.प.बंधारे सहित)	या प्रकल्पाची धर ा माथा पातळी १९३.६० मी. असून त्यापै ी बहुतांश भागामध्ये १७४.०० मी. पातळीपर्यन्त माती भराव काम करण्यात आले आहे. एकूण मातीकाम ६१ टक्के झाले असून सांडव्याचे काम ४० टक्के व सिंचन तथा विद्युत विमोचकाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे.	
८.३	कालवा व वितरण व्यवस्था (को.प. बंधारे)	या प्रकल्पांतर्गत धरणाच्या खालच्या बाजूस गडनदीमध्ये पाणी सोडून १४ को.प.बंधारे बांधण्याचे प्रस्तावित आहेत. या बंधा-यांमध्ये पाणी साठा निर्माण करुन १२५३० हे. सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. या एकूण १४ को.प.बंधा-यांपैकी १० बंधारे पूर्ण झाले असून जून २०१२ अखेर ११५३ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.	

नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग
अ. क्र. ७.३ ते ७.५ चा सविस्तर तपशिल

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ

(मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- मूळ नियोजनानुसार धरणाचा पाणीसाठा ९३.२० द.ल.घ.मी. व ९४२४ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन होते.
- प्रकल्पाच्या ठिकाणी उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर लाभ घेण्याच्या दृष्टीने अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या दि. २२.०८.२००६ च्या ३४ व्या बैठकीमध्ये मान्यता मिळाली आहे. सदर अतिरिक्त पाणीसाठा करण्याच्या कामाचा समावेश मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात आहे. यामुळे धरणामध्ये ३०.५४ द.ल.घ.मी. (१.०८ टी.एम.सी.) अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होऊन ३१०६ हे. अतिरिक्त सिंचन निर्मिती होणार आहे. सदर व्याप्ती बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.
- अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी नियोजित ९ को.प बंधा-या ऐवजी १४ को.प बंधारे प्रस्तावित केल्याने प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात वाढ झाली आहे.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

- धरणाच्या पाणीसाठया मध्ये ३०.५४ द.ल.घ.मी. वाढ झाल्याने धरणाच्या काटछेदामुळे परिमाणात वाढ झाल्याने प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सदर सुधारीत मातीधरण काटछेद म.स.स.नाशिक यांचेकडून दि. २६/१२/२००६ चे पत्रान्वये व्हेटींग केला आहे. सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. १४.१०.२०१० चे पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.
- मूळ प्रकल्प अहवालामध्ये व्दार विरहीत सांडवा दगडी बांधकामामध्ये प्रस्तावित होता. त्याऐवजी एम-१५ संधानकामध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच पुच्छ कालव्याच्या च्यूट पध्दतीच्या संकल्पनामध्ये बदल होऊन सलगतेने प्रपात घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. सांडवा व पुच्छ कालव्याचे सुधारित संकल्पन म.सं.सं.नाशिक यांनी दि.७/१०/२००९ चे पत्रान्वये व्हेटींग केला आहे. सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. १३.०५.२०१० चे पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.
- पाणीसाठयात वाढ झाल्याने सिंचन तथा विद्युत विमोचकाचे सुधारीत संकल्पन करावे लागले. सदर सुधारित संकल्पन म.सं.सं.नाशिक यांनी दि. २३.०२.२००७ चे पत्रान्वये व्हेटींग केला आहे. सदर संकल्पनास प्रदेश कार्यालयाने दि. २२.१०.२०१० चे पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.
- अशा रीतीने सविस्तर घटक संकल्पचित्रातील बदलामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रू. ११८.४० कोटी वाढ झाली आहे.

७.६ इतर कारणे

- स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्वीकारल्यामुळे वाढ झाली आहे.
- निविदा शर्तींनुसार देय भाववाढ विचारात घेतली आहे.
- कामाच्या आवश्यकते नुसार व क्षेत्रिय परिस्थिती नुसार तांत्रिकदृष्टया काम करणे आवश्यक असल्याने निविदा बाबी शिवाय इतर अतिरिक्त बाबींमुळे वाढ झालेली आहे.
- गौण खनिजांकरीता वाढ घेण्यात आली आहे.
- आस्थापना खर्चात वाढ झाली आहे.
- अशा रीतीने इतर कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीत रू. २०३.०५ कोटी वाढ झाली आहे.

• नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग
संक्षिप्त टिप्पणी

- नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प ता.कणकवली हा मौजे नरडवे ता.कणकवली येथील गडनदीवर प्रस्तावित आहे.
- या प्रकल्पासाठी सन १९८६-८७ च्या दरसूचीवर आधारीत रू. ३२.४३ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय क्र. नरडवे १०८५/(३९०/८५)मप्र,मंत्रालय,मुंबई दि.१२/०७/१९८९ अन्वये मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. परंतु निधीची तरतुद न झाल्याने या प्रकल्पाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया झाली नाही.
- नियोजीत प्रकल्पाच्या शेजारी प्राप्त परिस्थितीत प्रगतीत असलेल्या देवघर मध्यम प्रकल्पाच्या संकल्पचित्राचा व पीक पद्धतीचा सविस्तर अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना वरिष्ठ कार्यालयाकडुन प्राप्त झाल्या. प्राप्त परिस्थितीनुसार मुळ नियोजनामध्ये असलेल्या कालव्या ऐवजी गड नदीवर को.प.बंधारे बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले.
- सदर बाबीचा समावेश या प्रकल्पाच्या प्रथम सुधारित अंदाजपत्रकामध्ये करण्यात येऊन सन १९९३-९४ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र. नरडवे १०९६/(७०/९६) मप्र,मंत्रालय,मुंबई दि. १७/११/१९९७ अन्वये रक्कम रू.१०२.९८ कोटीला मान्यता घेण्यात आली.
- या प्रकल्पास सन १९९२-९३ मध्ये प्रथम अनुदान उपलब्ध झाले त्यानंतर सन १९९९-२००० पर्यंत प्रत्येक वर्षी अत्यल्प तरतुद करण्यात आली (एकुण रु. १.२० कोटी). दरम्यानच्या कालावधीत प्रकल्पाच्या उजव्या बाजुस असलेल्या सांडव्याचा पाया योग्य नसल्याचे आढळुन आले. त्यामध्ये Conglomerate प्रकारच्या खडकाचा प्रकार आढळुन आला. या बाबीचा अभ्यास करण्यासाठी भुवैज्ञानिक, नागपुर यांचे मागदर्शन घेण्यात आले. केलेल्या सुचनांनुसार सांडव्याची संकल्पित पाया पातळीत बदल करण्यात आले. त्यामुळे सांडव्याच्या खोदकाम व बांधकामाच्या परिमाणात वाढ झाली.
- मुळ नियोजनानुसार सिंचन विमोचक व विद्युत विमोचक वेगवेगळे प्रस्तावित होते. भुवैज्ञानिक नागपुर यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सिंचन विमोचक व विद्युत विमोचक एकत्रित करण्यात आले. या बदलाचे सविस्तर संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडुन करुन घेण्यात आले.
- उपरोक्त बदलांचा समावेश द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यात आला असुन सन १९९७-९८ च्या दरसूचीवर आधारीत शासन निर्णय क्र. नरडवे १०९९/(६७/१६/९९) मप्र,मंत्रालय,मुंबई दि. २२/०४/१९९९ अन्वये रक्कम रू.१८९.९१ कोटीला मिळाली आहे.
- या द्वितीय प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार प्राप्त किंमतीवर 'क' प्रकारची निविदा करण्यात आली. या प्रकल्पाचे काम मे.आर.एन.नायक ॲण्ड सन्स, हुबळी यांना देण्यात आले.
- या प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश दि.३/०५/१९९९ रोजी देण्यात आला. परंतु प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी त्यांच्या काही अटी लादून विरोध केल्याने, जसे जमिनीचा मोबदला तात्काळ मिळावा, मोबदला बाजारभावा प्रमाणे मिळावा व प्रकल्प ग्रस्तांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे इ. मागणी केल्याने या प्रकल्पाचे काम जवळपास दोन वर्ष विलंबाने म्हणजेच २४/०२/२००१ रोजी सुरु झाले.
- सदर प्रकल्पाचे काम प्राथमिक अवस्थेत असताना कोकण प्रदेशातील उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर लाभ घेण्याचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या दि. २२/०८/२००६ च्या ३४ व्या बैठकीत ठेवण्यात आला. या बैठकीमधील ठराव क्र. ३४/०४ अन्वये या प्रस्तावास मान्यता मिळाली.
- त्यामुळे नरडवे मध्यम प्रकल्पाच्या बाबीमध्ये पुढीलप्रमाणे बदल झाले.

अ.क्र.	धरण /को.प.बं.	मुळ	सुधारीत	वाढ
१	पाणीसाठा	९३.२० द.ल.घ.मी.	१२३.७४ द.ल.घ.मी.	३०.५४ द.ल.घ.मी.
२	वीज निर्मिती	२ मे.वॅट	३ मे.वॅट	१ मे.वॅट
३	को.प.बंधारे	९ नं.	१४ नं.	५ नं.
४	सिंचन क्षेत्र	९४२४ हे.	१२५३० हे.	३१०६ हे.

- **व्याप्तीतील बदलामुळे होणारा लाभ -**
  - धरणामध्ये ३०.५४ द.ल.घ.मी. (१.०८ टी.एम.सी.) अतिरीक्त पाणीसाठा निर्माण होऊन ३१०६ हे. अतिरीक्त सिंचन निर्मिती होणार आहे. तसेच १ मे.वॅट वीज निर्मिती मध्ये वाढ होणार आहे.
  - या प्रकल्पाचे लाभक्षेत्र १२५३० हे. असून कणकवली तालुक्यातील ३० गावे, मालवण तालुक्यातील १० गावे व कुडाळतालुक्यातील ८ गावे अशा एकूण ४८ गावांना लाभ होणार आहे.
- सदर व्याप्तीतील बदलानंतर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून मुख्य धरणाचा सुधारित काटछेद व्हेटींग करून दि.२६.१२.२००६ रोजी प्राप्त झाला. सुधारित काटछेदास मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दि. १४.१०.२०१० रोजी मान्यता दिली.
- व्याप्तीतील बदल झाल्याने (प्रकल्पाच्या पाणीसाठयात वाढ) धरणाचा काटछेद सुधारित करावा लागला. सदर सुधारित काटछेदाच्या संकल्पचित्रानुसार विविध बाबींचा समावेश नव्याने करावा लागला. सदर अतिरिक्त बाबींचा समावेश प्रकल्पाच्या तृतीय सुधारित अंदाजपत्रकामध्ये आला. या सन २००५-०६ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रमांक नरडवे २००७/१४०/(४७/२००७) मप्र, मंत्रालय, मुंबई दि.१९.०७.२००७ अन्वये रक्कम रू.४४६.७१ कोटीला मान्यता प्रदान करण्यात आली.
- सन २००९-१० मध्ये या प्रकल्पास केंद्रशासनाचा निधी मिळणे करिता व वेळेत पुर्ण करणे करिता केंद्र शासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत (AIBP) समावेश करण्यात आला.
- मार्च २००९ नंतर आज पर्यंत या प्रकल्पावर वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत (AIBP) रु. १२१.०५ कोटी निधी उपलब्ध झाला. त्यामुळे धरणाच्या कामाची आवश्यक ती प्रगती साधता आली. मुख्य धरणाचे मातीकाम सुमारे ६१.०० टक्के पूर्ण झाले असून भूसंपादन व पुनर्वसनाची कामे वेगाने प्रगतीपथावर आहेत. पुढील वर्षी जून २०१३-१४ मध्ये कंदरभरणीचा पहिला टप्पा पूर्ण करुन जून २०१४ अखेर ५७.८३ द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.
- भूसंपादन किंमतीत झालेली वाढ, पुच्छ कालव्याच्या सुधारीत संकल्पचित्रामध्ये च्यूट कालव्याऐवजी सलगतेने प्रपात बांधणे असा झालेला बदल, गौण खनिज बाबींच्या दरामध्ये झालेली वाढ, को.प.बंधारे परिमाणा मध्ये झालेली वाढ या कारणास्तव प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. याशिवाय आस्थापना खर्चातील वाढ इ. कारणामुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत वाढ झाल्याने प्रकल्पाच्या कामाचे चतुर्थ सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी एप्रिल २०१२ मध्ये शासनास सादर करण्यात आले आहे. शासनस्तरावर छाननी सुरु असून अद्याप मान्यता मिळालेली नाही.
- **मूळ मंजूरीच्या तुलनेत किंमत वाढीची कारणे.**

  मुळ किंमत रु. ३२.४३ कोटी (दरसूची १९८६-८७)

  शासनास सादर केलेल्या चतुर्थ सुधारीत प्रशासकिय अंदाजपत्रकानुसार किंमत रु.६४९.९५ कोटी (दरसूची २००९-१०)

अ.क्र.	वाढीची कारणे	वाढ रक्कम (रु.कोटीत)	टक्के
१	दरसूचीतील वाढ	९२.११	१४.९२
२	भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ	८९.२३	१४.४५
३	प्रङ्कल्प व्याप्तीतील बदल	११४.७३	१८.५८
४	संकल्पचित्र बदल	११८.४०	१९.१७
५	इतर कारणे	२०३.०५	३२.८८

अ) दरसूचीतील वाढ

नरडवे मध्यम प्रकल्पाचे मुळ प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन १९८६-८७ दरसुची वर आधारित आहे. चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सन २००५-०६ व सन २००९-१० च्या दरसुचीवर आधारित आहे. या चोवीस वर्षात दरसुचीतील वाढ रु.९२.११ कोटी आहे.

ब) भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन व एन.पी.व्ही मुळे खर्चातील वाढ

- मूळ नियोजनानुसार ४५० हेक्टर जमीन संपादीत करण्याचे प्रस्तावित होते व याकरीता रू. २.२९ कोटीची तरतूद होती. परंतु तृतीय मान्यता प्राप्त सु.प्र.मा. अंदाजपत्रकात पाणीसाठा, सिंचनक्षमता यामध्ये वाढ झाल्याने एकूण ६२५.७० हे. क्षेत्राची आवश्यकता भासल्यामुळे १७५.७० हेक्टर खाजगी व वन जमीन इतके अतिरिक्त क्षेत्र संपादित करावे लागले. भूसंपादनाकरीता प्रत्यक्ष मोबदला वाटपानुसार वाढ झाली आहे.
- प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रास डिसेंबर १९९७ रोजी वनसंज्ञा लागू झाल्यामुळे या प्रकल्पाच्या आवश्यक क्षेत्रातील ३४.१३५ हेक्टर क्षेत्र वनसंज्ञेमध्ये समाविष्ठ करण्यात आले.
- सदर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण ५ गावे बाधीत होतात. त्यापैकी १ गाव पूर्णतः व ४ गावे अंशतः बाधीत होत असून, या गावांचे पुनर्वसन मौजे दिगवळे, मोजे संभाजीनगर ता.कणकवली व मौजे जांभवडे ता.कुडाळ या ३ ठिकाणी करण्यात येत आहे. या पुनर्वसन गावठाणात करावयाच्या नागरी सुविधांच्या कामामुळे वाढ झाली आहे.
- सदर प्रकल्पात ४ गावे अंशतः बाधीत होत असल्याने उर्वरीत प्रकल्पग्रस्तांसाठी पर्यायी पोच रस्ता देणे आवश्यक असल्याने वाढ झाली आहे.
- अशा प्रकारे भूसंपादन, पुनर्वसन ,वनसंज्ञा इत्यादी कारणांमुळे एकूण रु. ८९.२३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

क) प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)

- प्रकल्पाच्या ठिकाणी उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपूर लाभ घेण्याच्या दृष्टीने अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या दि. २२.०८.२००६ च्या ३४ व्या बैठकीमध्ये मान्यता मिळाली आहे. सदर अतिरिक्त पाणीसाठा करण्याच्या कामाचा समावेश मंजूर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात आहे. यामुळे धरणामध्ये ३०.५४ द.ल.घ.मी. (१.०८ टी.एम.सी.) अतिरिक्त पाणीसाठा निर्माण होऊन ३१०६ हे. अतिरिक्त सिंचन निर्मिती होणार आहे. सदर व्याप्ती बदलामुळे धरणाच्या काटछेदात वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या परिमाणात व किंमतीत वाढ झाली आहे. या सुधारित काटछेदाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून पारित करुन घेण्यात आले असून यास मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

- अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्माण करण्यासाठी नियोजित ९ को.प बंधा-या ऐवजी १४ को.प बंधारे प्रस्तावित केल्याने प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात वाढ झाली आहे.
- या प्रकल्पासाठी मूळ प्रकल्प अहवालामध्ये २.०० मे.वॅट वीजनिर्मिती करण्याचे प्रस्तावित होते. आता त्यात वाढ होऊन ३.०० मे.वॅट विद्युत निर्मिती करण्याचे प्रस्तावित असून त्यास तृतीय सु.प्र.मा मध्ये मान्यता घेतली आहे.

ड) सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ

- धरणाच्या पाणीसाठया मध्ये वाढ झाल्याने धरणाच्या काटछेदा मध्ये बदल झाला . धरण्याच्या अधो बाजूस गाव असल्याने तसेच पुच्छ कालवा धरणास समांतर गेल्याने व त्या दोहो मधील अंतर कमी असल्याने धरणाचा काटछेद अधो बाजूस वाढविणे शक्य नव्हते तसेच त्याकरीता अतिरिक्त भूसंपादन करावे लागले असते. त्यामुळे सदर काटछेद उर्ध्व बाजूस वाढविण्यात आला. मूळ व्दार विरहीत सांडवा दगडी बांधकामात प्रस्तावित होता. परंतु आता व्दारासह सांडवा बांधकाम एम-१५ प्रतीच्या संधानकात प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच या प्रकल्पाच्या पुच्छ कालव्याचे च्यूट पध्दतीच्या संकल्पना मध्ये बदल होवून सलगतेने प्रपात घेण्याची तरतूद करण्यात आली. सदर संकल्पनास मसंसं, नाशिक यांनी व्हेटींग करून दिले असून त्यास प्रदेश कार्यालयाने मान्यता दिलेली आहे.
- उपरोक्त बाबीं मुळे रुपये ११८.४० कोटी इतकी वाढ झालेली आहे.

- **इतर कारणे**
  - प्रकल्पास विलंब झाल्यामुळे आस्थापना खर्चात वाढ झाली आहे.
  - स्पर्धात्मक बोलीनुसार अधिक दराच्या निविदा स्वीकारल्यामुळे वाढ झाली आहे.
  - निविदा शर्तींनुसार देय भाववाढ विचारात घेतली आहे.
  - कामाच्या आवश्यकते नुसार व क्षेत्रिय परिस्थिती नुसार तांत्रिकदृष्टया काम करणे आवश्यक असल्याने निविदा बाबी शिवाय इतर अतिरिक्त बाबींमुळे वाढ झालेली आहे.
  - गौण खनिजांकरीता वाढ घेण्यात आली आहे.
  - अशी एकूण रु २०३.०५ कोटी इतकी वाढ झालेली आहे.
- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**
- **शीर्षकामे :**
  - माती धरण माथा पातळी १९३.६० मी.आहे. धरणाच्या माती भरावाचे काम सा.क्र ६० मी ते १६५ मी मध्ये १५५ मी.तलांकापर्यंत, साखळी क्रमांक ३३०मी. ते ७०२ मी. मध्ये १७४ मी तलांका पर्यंत व साखळी क्रमांक ८८० मी. ते ११७० मी मध्ये १७५ मी तलांकापर्यंत करण्यात आले आहे. धरणाचे काम ६१.०० टक्के पूर्ण झालेले आहे.
  - सांडवा कामाअंतर्गत ओगी प्रकारच्या सांडव्याचे खोदकाम बहुतांशी पूर्ण झालेले असून सांडवा व प्रपात संधानकाचे काम प्रगती पथावर आहे. सांडव्याचे व पूच्छ कालव्याचे काम ४० टक्के पूर्ण झालेले आहे.
  - सिंचन तथा विद्युत विमोचक-संकल्पीत ३३५.९५ मी लांबीची पेनस्टॉक ऊभारणी व त्याचे सलोह संधानकाचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. अग्रहन विहिरीचे बांधकाम १५५ मी. तलांकापर्यंत (संकल्पीत तलांक १९३.६० मी) पूर्ण झाले आहे. उर्ध्व बाजू कडील ट्रॅश रॅकचे सलोह संधानकाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. सेवा व्दार निर्मितीचे व उभारणीचे काम पूर्ण झालेले आहे.अशा प्रकारे सिंचन तथा विद्युत विमोचकाचे एकूण ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

- **को.प.-बंधारे :**

नियोजीत १६ को.प.-बंधा-यां पैकी २ को.प.बंधारे स्थानिकस्थर व जिल्हापरिषदे मार्फत पूर्ण केले आहेत. उर्वरित १४ को.प. बंधा-यां पैकी १० को.प.-बंधारे पूर्ण केले आहेत.उर्वरित को.प.बंधा-यांची कामे हाती घेण्यात येत आहेत.

. **भूसंपादन :**

प्रकल्पाच्या शिर्षकामाकरीता एकूण ५३४.३९ हे. क्षेत्राची आवश्यकता असून त्यापैकी ४३६.६५ हे. क्षेत्र खात्याच्या ताब्यात आले आहे. उर्वरीत ९७.७४ हे. क्षेत्राचे संपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पुनर्वसन गावठाणाकरीता ८५.७१ हे. क्षेत्राची आवश्यकता असून हे संपूर्ण क्षेत्र ताब्यात आले आहे. को.प.बं. करीता ५.६० हे. क्षेत्राची आवश्यकता असून संपादन कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

- **पुनर्वसन :**

सदर प्रकल्पांतर्गत ४ गावे अंशतः बाधीत होत असून १ गाव पूर्णतः बाधित होत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

गावाचे नाव	बाधीत घरे	कुटुंबे	लोकसंख्या
१. नरडवे	२००	३२७	१२४०
२. भैरवगाव	१५	९९	४२६
३. यवतेश्वर	५७	५६	४०२
४. दुर्गानगर	९२	२३६	८८१
५.जांभळगांव (पूर्णतःबाधीत)	३९३	२४९	९००
एकूण	७५७	९६७	३८४९

बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मौजे दिगवळे, मौजे संभाजी नगर,ता.कणकवली व मौजे जांभवडे ता. कुडाळ या ठिकाणी करण्याचे नियोजन असून नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. मौजे दिगवळे, गावठाणातील कामे ८५ टक्के,मौजे संभाजी नगर येथील ८० टक्के व मौजे जांभवडे येथे नागरी सुविधांची ४० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. यावर्षी प्रकल्पग्रस्तांना नविन गावठाणामध्ये भुखंड वाटप करुन स्थलांतरीत करणेत येणार आहे.

- **वनजमीन :**

सिंधुदूर्ग जिल्हयातील काही क्षेत्रास डिसेंबर १९९७ मध्ये वनसंज्ञा लागु करण्यात आली सदर प्रकल्पांतर्गत ३४.१३५ हे. वनसंज्ञेखालील क्षेत्र बाधीत होत असून त्याच्या निर्वणीकरणाचा प्रस्ताव प्रथमतः सन २००१ मध्ये उपवन संरक्षक, सावंतवाडी यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यावरील विविध स्तरा वरील त्रृटींची पुर्तता करुन व नविन नियमांप्रमाणे सद्यस्थितीत सदर प्रस्ताव केंद शासनाच्या केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली,येथे माहे. ऑगस्ट २०११ रोजी तत्वतः मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे. प्रस्तावाची तपासणी केल्यानंतर त्याचे इंग्रजी पत्र क्रमांक ७-१/२०११/ ROHQ/ Dt.2/9/2001 व भोपाळ येथील इंग्रजी पत्र क्रमांक ६-MHCO/ 18/ 2011/ BHO/ 387 Dt.18/10/2011 अन्वये शेरे उपस्थित केले आहेत. सदर शे-यांची पूर्तता करण्याची कार्यवाही चालू आहे.

- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :**

सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रू. ३११.४८ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

सर्व आकडे कोटीत.

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
२४६.५३	५७.६२	७.३३	३११.४८

प्रकल्पाचे नाव :-सरंबळा मध्यम पाटबंधारे प्रकल्प

सिंचन प्रकल्पांचा वाढता कालावधी व किंमतीबाबत तपशील

१	प्रकल्पाचे नाव :-सरंबळा मध्यम पाटबंधारे प्रकल्प		तालुका:- सावतंवाडी		जिल्हा:- सिंधुदुर्ग
२	प्रकल्पीय सिंचन क्षमता(हेक्टर)(पीक क्षेत्र) :	१११४२	निर्मित सिंचन क्षमता(हे.) जून २०१२		०
३	प्रशासकीय मान्यतेचा तपशिल	दिनांक	दरसूची	किंमत (रु.कोटी)	प्रकल्पिय सिंचन क्षमता (हे.मध्ये)
	मूळ प्रशासकीय मान्यता (व्यपगत)	०५/१२/१९९५	१९९३-९४	५६.१६	१११४२
	नव्याने प्रशासकीय मान्यता	२३/६/२००४	२००३-०४	१८४.७३	१११४२
४	केंद्र शासनाची अद्ययावत मान्यता (TAC / Investment) संदर्भ व किंमत (रु.कोटी)				
	अ) TAC Clearance Ref.	आंतरराज्य बाब संबंधित असल्यामुळे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.			
	ब) Investment Clearance Ref.	प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.			
४.१	दिनांक ३१/३/२०१२ अखेर खर्च (रु.कोटी)		५४.६७		
४.२	भू-संपादन पुनर्वसन/वनजमिन संपादन खर्च (रु.कोटी)		२.२३		
४.३	बांधकामावरील खर्च (रु.कोटी) आस्थापना व्यतिरिक्त		४९.४७		
४.४	इटीपी खर्च (रु. कोटी)		२.९७		
५	प्रकल्पास प्रथमतः अनुदान उपलब्ध झालेले वर्ष		२००४-०५		
६	प्रकल्पाच्या धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचे वर्ष / त्यावेळची किंमत		२००६ / रू. २११.५० कोटी		
७	मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे (नव्याने मंजूर प्र.मा. किंमतीपेक्षा झालेला खर्च कमी असल्याने सु.प्र.मा. प्रस्ताव करण्यात आलेला नाही.)			एकूण वाढ - निरंक	
				रक्कम (रु.कोटी)	टक्केवारी
७.१	दरसुचीतील वाढ			अद्याप वाढ नाही	
७.२	भूसंपादन,पुनर्वसन,वन जमिन व एन.पी.व्ही.मुळे खर्चातील वाढ			अद्याप वाढ नाही	
७.३	प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढ (मुळ प्रकल्प अहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ट तरतुदीमुळे झालेली वाढ)			अद्याप वाढ नाही	
७.४	सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ			अद्याप वाढ नाही	
७.५	इतर कारणे (ई.टी.पी सहीत)			अद्याप वाढ नाही	

८	प्रकल्पाची सद्यस्थिती	
८.१	भू-संपादन, पुनर्वसन, वन जमिन संपादन	**भूसंपादन** -: • सरंबळा प्रकल्पासाठी एकूण ७५३.५५ हे क्षेत्राची आवश्यकता आहे. (खाजगी क्षेत्र ५६९.२७ हे. सरकारी क्षेत्र ३१.४९ हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र १५२.७९ हे.) • प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र २९५.६२ हे. (खाजगी क्षेत्र १६४.९६ हे. सरकारी क्षेत्र ५.०९ हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र १२५.५७ हे.) कालवा व इतर प्रयोजनासाठी ४५७.९३ हे. क्षेत्र (खाजगी क्षेत्र ४०४.३१ हे. सरकारी क्षेत्र २६.४० हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र २७.२२ हे.) आवश्यक आहे. • प्रकल्पासाठी आवश्यक बुडीत क्षेत्रासाठी संपादीत करावयाच्या १६४.९६ हे खाजगी जमीनींचे सहा भूसंपादन प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यांत आलेले आहेत.यापैकी मौजे कोनास गावातील प्रस्तावाचे २३.०० हे. क्षेत्र खात्याच्या ताब्यात आले आहे. • सरमळे (२ प्रस्ताव) व दाभिळ (१ प्रस्ताव) या तीन प्रस्तावांचे ४५.११ हे.क्षेत्र याबाबतचा प्रस्ताव निवाडा स्तरावर आहे. याशिवाय सरमळे गावचा एक प्रस्ताव (क्षेत्र ६१.०० हे.) कलम ६ स्तरावर असून दुसरा प्रस्ताव (क्षेत्र ३५.८५ हे.) तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे. • कालव्याकरीता भूसंपादनाची कार्यवाही अद्याप हाती घेण्यात आलेली नाही. **पुनर्वसन** -: प्र्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मौजे दाभिळ गाव पूर्णतः बाधित होत असून एकूण ३४ घरांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पग्रस्तांनी गावठाण निश्चितीस अद्याप पसंती दिलेली नसल्यामुळे गावठाण निश्चित झालेले नाही. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी शेतजमिन देण्यासाठी लाभक्षेत्रातील २२ गावांमधील ८ एकर वरील जमिन पहाणी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांचे मार्फत सुरु आहे. पुनर्वसन गावठाणासाठी १०.०० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे. **वन व वनसंज्ञा** -: प्रकल्पास एकूण १५२.७९ हे क्षेत्र वन व वनसंज्ञेचे आहे. पैकी ३५.०० हेक्टर वन व ११७.७९ हेक्टर वनसंज्ञा असे मिळुन १५२.७९ हेक्टर जमीनीचा निर्वनीकरणाच्या प्रस्तावास वन व पर्यावरण मंत्रालय, (केंद्र शासन) नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ नं. ८-४९ /२००७- एफ.सी., दि. ५.१.२००९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे.

८.२	धरण	या प्रकल्पाची संकल्पित धरण माथा पातळी ९८.०० मी असून सन २००६-०७ मध्ये सा. क्र.१५० मी. ते ४५० मी. तसेच सा.क्र.५१० मी. ते ६०० मी. मध्ये साधारणतः ५५.०० मी पातळीपर्यंत भरावाचे (साधारणतः ३५ टक्के) काम पूर्ण झाले आहे.
८.३	कालवा व वितरण व्यवथा	कालव्याच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नसुन कालव्याच्या सविस्तर सर्वेक्षणाचे काम तसेच लाभक्षेत्र सर्वेक्षणाचे काम करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

सरंबळा मध्यम पाटबंधारे प्रकल्प

अ.क्र.७.३ ते ७.५ चा तपशील.

७.३ प्रकल्प व्याप्तीतील बदलामुळे झालेली वाढः-

(मुळ प्रकल्पअहवालात नसलेल्या तथापि नव्याने समाविष्ठ तरतुदी मुळे झालेली वाढ)

प्रकल्पातील व्याप्तीतील बदलामुळे अद्याप वाढ झालेली नाही.

७.४ सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढ :-

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे अद्याप वाढ झालेली नाही.

७.५ इतर कारणे :-

इतर कारणामुळे अद्याप वाढ झालेली नाही.

सरंबळा मध्यम पाटबंधारे प्रकल्प संक्षिप्त टिप्पणी

- सरंबळा मध्यम पाटबंधारे प्रकल्प हा मौजे सरमळे (नांगरतासवाडी) ता.सावंतवाडी येथे तेरेखोल नदीच्या खो-यातील दाभिळ नाल्यावर प्रस्तावीत आहे.

- या प्रकल्पास शासन निर्णय क्र.एसआरबी. १०८६/७७८(२२३/८६) जसंअ दि ५/१२/१९९५ अन्वये रक्कम रु. ५६.१६ कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती . तथापी प्रकल्पास सलग पाच वर्ष आर्थिक तरतुद नसल्याने सदर प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली. यानंतर कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे यांचे पत्र क्र. कोपाविमं/तां-१ /१८०९/२००४ दिनांक २३.०६.२००४ अन्वये सन २००३-०४ च्या दरसुचीवर आधारित रक्कम रु. १८४.७३ कोटी इतक्या रकमेस नव्याने प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

- म.सं.सं.नाशिक यांनी दि.१५.०७.२००२ चे पत्रान्वये या प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा व माती धरणाचा सुधारीत काटछेद दिला. यामध्ये ७५० मी. लांबीचे धरण, धरणाच्या डाव्या तीरावर ओगी पध्दतीचा सांडवा, २.५० मे.वॅट वीज निर्मितीसाठी सिंचन तथा विद्युत विमोचक आणि ३७.४७ कि.मी. लांबीचा उजवा तीर कालवा इत्यादी प्रस्तावित केले आहे. या सर्व बाबींचा अंतर्भाव नव्याने प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकात करण्यात आला आहे.

- या प्रकल्पामुळे धरणामध्ये ९६.२५८ द.ल.घ.मी (३.४० टी.एम.सी.) पाणीसाठा उपलब्ध होणार आहे.उपलब्ध साठयानुसार सिंचनासाठी ७७.५५७ द.ल.घ.मी, पिण्यासाठी ८.७२ द.ल.घ.मी, औद्योगिक वापरासाठी ५.८२ द.ल.घ.मी. पाणी देण्याचे नियोजन आहे.

- प्रकल्पास उजवा तीर कालवा ३७.४७ कि.मी लांबीचा प्रस्तावीत असून त्याव्दारे सावंतवाडी तालुक्यातील १५ गावे व वेंगुर्ला तालुक्यातील ७ गावे अशा.२२ गावातील १११४२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

- नव्याने प्राप्त प्र.मा. अंदाजपत्रकानुसार या प्रकल्पाच्या धरण व अनुषंगिक कामाची निविदा निश्चित करून कंत्राटदारास दि. ३०.३.२००५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. परंतु प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी त्यांच्या मागण्यांसाठी जसे जमिनीचा मोबदला तात्काळ मिळावा, मोबदला बाजारभावा प्रमाणे मिळावा व प्रकल्प ग्रस्तांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे इ., प्रकल्पाच्या कामास विरोध केल्याने या प्रकल्पाचे काम जवळपास एक वर्ष विलंबाने म्हणजेच ३०.३.२००६ रोजी सुरु झाले.

- **मुळ प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत खर्च वाढीची कारणे :-**

  या प्रकल्पाचा अद्यावत खर्च रू. ५४.६७ कोटी आहे. प्रकल्पाच्या नव्याने प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा (रू. १८४.७३ कोटी) अद्यावत खर्च कमी असल्याने या प्रकल्पासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव करण्यात आलेला नाही. त्यामुळे मूळ (नव्याने) मंजूरीच्या तुलनेत किंमतीत वाढ झालेली नाही.

- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**

- **शीर्षकामे :**

  या प्रकल्पाची संकल्पित धरण माथा पातळी ९८.०० मी असून सन २००६-०७ मध्ये सा. क्र.१५० मी. ते ४५० मी. तसेच सा.क्र.५१० मी. ते ६०० मी. मध्ये साधारणतः ५५.०० मी पातळीपर्यंत भरावाचे काम (साधारणतः ३५ टक्के) पूर्ण झाले आहे. भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही पूर्ण न झाल्याने कामामध्ये प्रगती साधता आलेली नाही.

- **कालवा :** कालव्याच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात आलेली नसुन कालव्याच्या सविस्तर सर्वेक्षणाचे काम तसेच लाभक्षेत्र सर्वेक्षणाचे काम करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

- **भूसंपादन**
  - सरंबळा प्रकल्पासाठी एकूण ७५३.५५ हे क्षेत्राची आवश्यकता आहे. (खाजगी क्षेत्र ५६९.२७ हे. सरकारी क्षेत्र ३१.४९ हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र १५२.७९ हे.)
  - प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र २९५.६२ हे. (खाजगी क्षेत्र १६४.९६ हे. सरकारी क्षेत्र ५.०९ हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र १२५.५७ हे.) कालवा व इतर प्रयोजनासाठी ४५७.९३ हे. क्षेत्र (खाजगी क्षेत्र ४०४.३१ हे. सरकारी क्षेत्र २६.४० हे. वन व वनसंज्ञा क्षेत्र २७.२२ हे.) आवश्यक आहे.
  - प्रकल्पासाठी आवश्यक बुडीत क्षेत्रासाठी संपादीत करावयाच्या १६४.९६ हे खाजगी जमीनींचे सहा भूसंपादन प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यांत आलेले आहेत.यापैकी मौजे कोनास गावातील प्रस्तावाचे २३.०० हे. क्षेत्र खात्याच्या ताब्यात आले आहे.
  - सरमळे (२ प्रस्ताव) व दाभिळ (१ प्रस्ताव) या तीन प्रस्तावांचे ४५.११ हे.क्षेत्र याबाबतचा प्रस्ताव निवाडा स्तरावर आहे. याशिवाय सरमळे गावचा एक प्रस्ताव (क्षेत्र ६१.०० हे.) कलम ६ स्तरावर असून दुसरा प्रस्ताव (क्षेत्र ३५.८५ हे.) तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.
  - कालव्याकरीता भूसंपादनाची कार्यवाही अद्याप हाती घेण्यात आलेली नाही.
- **पुनर्वसन**

  प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मौजे दाभिळ गाव पूर्णतः बाधित होत असून एकूण ३४ घरांचे पुनर्वसन करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पग्रस्तांनी गावठाण निश्चितीस अद्याप पसंती दिलेली नसल्यामुळे गावठाण निश्चित झालेले नाही. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी शेतजमिन देण्यासाठी लाभक्षेत्रातील २२ गावांमधील ८ एकर वरील जमिन पहाणी उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांचे मार्फत सुरु आहे. पुनर्वसन गावठाणासाठी १०.०० हे. क्षेत्राची आवश्यकता आहे.
- **वन व वनसंज्ञा जमीन :**
  - प्रकल्पास एकूण १५२.७९ हे क्षेत्र वन व वनसंज्ञेचे आहे. पैकी ३५.०० हेक्टर वन व ११७.७९ हेक्टर वनसंज्ञा असे मिळुन १५२.७९ हेक्टर जमीनीचा निर्वनीकरणाच्या प्रस्तावास वन व पर्यावरण मंत्रालय, (केंद्र शासन) नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ नं. ८-४९ /२००७- एफ.सी., दि. ५.१.२००९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे.
  - वन विभागाच्या अंतिम मान्यतेकरीता रु. ३०.४३ कोटी इतकी एन.पी.व्ही. रक्कम भरावी लागणार आहे.
  - वन विभागास हस्तांतरण करावयाच्या एकूण १५२.७९ हे. क्षेत्रापैकी ११० हे. क्षेत्र हस्तांतरीत झाले आहे.उर्वरीत ४२.७९ हे.क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्हयातील कुसगांव, ता. कुडाळ येथे उपलब्ध आहे. सदर जमिनीचे हस्तांतरणाचे आदेश प्राप्त झाले असून, महसूल खात्याकडून सदर क्षेत्र हस्तांतरण कार्यवाही सुरु आहे.
- **प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी :**

  सदर प्रकल्पावर मार्च २०१२ अखेर एकूण रू. ५४.६७ कोटी एवढा खर्च झालेला असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

सर्व आकडे कोटीत.

बांधकामावरील खर्च	भूसंपादन, पुनर्वसन व वनजमीन संपादनावर झालेला खर्च	आस्थापनेवरील खर्च	एकूण खर्च
४९.४७	**२.३३**	**२.९७**	**५४.६७**

ठेव तत्वावरील कामे

काळू पाणीपुरवठा प्रकल्प ता. मुरबाड, जि. ठाणे

संक्षिप्त टिप्पणी

- काळू पाणी पुरवठा प्रकल्प, ता. मुरबाड, जि. ठाणे हा पाणी पुरवठा प्रकल्प असून जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. काळू २००९/८३९/ (२७६/०९) जसंअ (१)/ भाग-१ दि. ९/७/२००९ नुसार सदर प्रकल्प मुंबई महानगर क्षेत्राच्या पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वखर्चाने विकसित करण्यासाठी जलसंपदा विभागाने मान्यता दिली आहे.
- मा. मुख्यमंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३.८.२००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत सदर प्रकल्पास रु.६५७.५८ कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. ५/१०/२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे.
- काळू प्रकल्पाचे काम **ठेव तत्वावर** करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या मध्ये प्रकल्पाचे बांधकाम करण्याबाबत दि. १०.२.२०११ रोजी सामंजस्य करार (MoU) झालेला आहे.
- सदरचा प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प असल्याने पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नाही.
- **पाणीसाठा :-**

पाणीसाठा	दलघमी/(टी.एम.सी.)
एकूण साठा	४०७.९९/१४.४०८
उपयुक्त साठा	३९६.२६/१३.९९
निर्मित साठा	---

- **प्रकल्पाची सद्यःस्थिती :-**
  - **धरण :-** प्रकल्प ग्रस्तांची खाजगी वाटाघाटीने संमती पत्रे घेऊन दि.१६.३.२०११ रोजी काळू धरणाचे काम सुरु करण्यांत आलेले आहे. वनेत्तर क्षेत्रावर धरणाचे काम २०% झाले आहे. प्रकल्पाच्या वनजमीन प्रस्तावास केंद्रिय वनविभागाने अद्याप पर्यंत मंजूरी न दिल्याने मा. उच्च न्यायालयाने दि. १.३.२०१२ रोजी पुढील आदेशापर्यंत धरणाचे बांधकाम थांबविण्यांचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सद्यःस्थितीत काम बंद आहे. मार्च २०१२ अखेर रु.१०९.१९ कोटी एवढा खर्च झाला आहे. यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निधी उपलब्ध केला आहे.

- **भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिनी सद्यःस्थिती :-**

  - **भूसंपादन :-** सदर प्रकल्पास सुमारे १२५९.५४ हे. खाजगी जमीन संपादीत करावी लागणार आहे. कार्यकारी अभियंता यांनी पत्र रापावि-२/आ-६/काळू/१५७३/२०१० दि.२६.०५.२०१० अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. सर्व

प्रस्ताव संयुक्त मोजणी करिता तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, मुरबाड यांचे कार्यालयात पुढील कार्यवाही करिता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेले असून बुडीत क्षेत्रातील कुडशेत, फांगणे, झाडघर, उडाळडोह, दिवानपाडा, भोरांडे, मोरोशी, फांगुळ गव्हाण व न्याहाडी या गावांची संयुक्त मोजणी पुर्ण झाली असून कलम ४ ची अधिसूचना काढणेबाबत कार्यवाही सुरु आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण १७ गावे येत असून, त्यापैकी ५ गावे पूर्णतः व १२ गावे अंशतः बाधीत होत आहेत.

- **पुनर्वसन :-** बुडीत क्षेत्रात येणाऱ्या गावांपैकी ५ पुर्णतः व १२ अशंतः गावांतील वाडयांचे विस्थापन होणार असून त्याकरीता पुनर्वसन गावठाणासाठी जागा मिळविण्याची कार्यवाही प्राथमिक स्तरावर सुरु आहे. सदर गावांच्या विस्थापनासाठी ५ पुनर्वसन गावठाणांची आवश्यकता असून, याकरिता १०० हे. जमीनीची आवश्यकता आहे. या बाबत पुनर्वसन अधिनियम १९९९ चे शासन निणर्यानुसार रु. ६७.९२ कोटी रकमेचे पुनर्वसन पॅकेजला महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाने दि. ४ मे २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे.

- **वनजमीन :-** प्रकल्पासाठी १७ गांवातील एकुण ९९९.३२८ हे. जमिन संपादीत करावी लागणार आहे. वन जमीन संपादनाचा प्रस्ताव महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे इंग्रजी पत्र क्र. FLD/1211/CR 155/F-10 Dated 26/8/2011 अन्वये केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केला होता. सदर प्रस्ताव केंद्रिय, पर्यावरण व वनविभागाने त्यांचे पत्र क्र. ९-९२/२०११ एफसी दि.२७.०७.१२ अन्वये बंद केला आहे. सदर प्रस्तावाचा पुनर्विचार करुन मंजूर करण्यांबाबत महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांनी पत्र क्र. एफएलडी - २०११/सीआर-१५५/ एफ-१०, दि.१०.०९.२०१२ अन्वये केंद्रीय, पर्यावरण व वनविभाग भारत सरकार, नवी दिल्ली, यांना विनंती केली आहे.

शाई पाणीपुरवठा प्रकल्प ता.शहापूर, जि. ठाणे

संक्षिप्त टिप्पणी

- शाई पाणीपुरवठा प्रकल्प, ता शहापूर, जि. ठाणे हा पाणीपुरवठा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील भविष्यातील पिण्यांसाठी व औद्योगिक वापरासाठी लागणा-या पाणी वापराकरीता नियोजित आहे.
- शाई धरणाच्या अंदाजपत्रकास ठाणे महानगरपालिकेने त्यांचा ठराव क्रमांक ४११ दिनांक ५.३.२००८ अन्वये रु.४५२.७५ कोटी रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.
- ठाणे महानगरपालिकेने सदर प्रकल्प बांधणेस असमर्थता दर्शविली त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत विकसित करण्याबाबत महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्र.ग्रापापु-१२०९/प्र.क्र.९९/पापु-०६, दि.१५.६.२००९, अन्वये शाई प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांच्या निधीतून करावा असे आदेश निर्गमित केले आहेत.
- मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि. ३.८.२००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत रु.५७९.७२ कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. ५.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
- शाई प्रकल्पाचे काम **ठेव तत्वावर** करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या मध्ये दि.६.१.२०११ सामंजस्य करार (MoU) झालेला आहे.
- कंत्राटदारास कर्जरुपाने बांधकाम अग्रीम रु. १५ कोटी द.सा.द.शे. १२ टक्के व्याज दराच्या आकारणीसह मंजूर केले आहे व या रकमेची व्याजासहीत पूर्ण वसूली निविदेतील ७५% काम पूर्ण होई पर्यन्त करण्याची अट अंतर्भूत आहे.
- सदरचा प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प असल्याने पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नाही.
- **पाणीसाठा :-**

पाणीसाठा	दलघमी/(टी.एम.सी.)
एकूण साठा	३७२.१५६/१३.१४
उपयुक्त साठा	३५३.४१/१२.४८
निर्मित साठा	---

- **प्रकल्पाची सद्यःस्थिती :-**
  - **धरण :-** सदर प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे तसेच वनविभागास नक्त वर्तमान मूल्याची (एन.पी.व्ही) रक्कम रु. १२३.२५ कोटी अदा करणेसाठी उपलब्ध न झाल्याने प्रकल्पाचे काम अद्याप सुरु करता आले नाही.

- **भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिनी सद्यःस्थिती :-**

➢ **भूसंपादन :-**

या प्रकल्पासाठी बुडीत क्षेत्रातील १८ गावांमधील (मुरबाड तालुक्यातील आलवे, वेळुक, शाई, शेलगांव, मांदुसी, बुरसुंगे, खेड, तळेगांव, वानोटे, शिरोसी आणि शहापुर तालुक्यातील मांजरे, ढाढरे, कांबे, माळद, टेंभुर्ली, बेलवली, गुंडे, साकुर्ली) २३९७.३३ हे. इतकी खाजगी जमिन संपादनाचे गांववार भूसंपादन प्रस्ताव तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तालुका निरीक्षक, मुरबाड व शहापूर यांना पाठविण्यात आले आहेत. मौजे तळेगाव, ता. मुरबाड व मौजे साकुर्ली, कांबे ता. शहापूर या गावांची खाजगी जमीनीच्या मोजणीसाठी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, मुरबाड / शहापूर, या कार्यालयातील भूमापक दिनांक ३०/०४/२०१० रोजी गेले असता संबधीत शेतकऱ्यांनी मोजणी करु दिलेली नाही. संयुक्त मोजणी करिता लागणारे आवश्यक फी संबधित कार्यालयास अदा करण्यांत आलेले आहे.

➢ **पुनर्वसन :-**

सदर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात शहापूर व मुरबाड तालुक्यातील १८ गांवे (१३ गांवे पूर्णतः - मुरबाड तालुक्यातील मांदुशी, शाई, शेलगांव, शिरोंशी, बुरसुंगे, आळवे, वानोटे व वेळुक आणि शहापूर तालुक्यातील कांबे, माळद, टेंभुर्ली, बेलवली, ढाढरे व ५ गांवे अंशतः - मुरबाड तालुक्यातील खेड, तळेगांव आणि शहापूर तालुक्यातील साकुर्ली, गुंडे, मांजरे) समाविष्ट होत आहेत. संबधीत ग्रामपंचायतीकडुन प्रकल्पग्रस्त कुटुंबाची सन २००१ च्या जनगणनेनुसार प्राथमिक माहिती प्राप्त करुन घेऊन त्यात योग्य प्रमाणात वाढ धरली असता एकूण ३३३५ कुटुंबे बाधित होत आहेत. पुर्नवसनाकरीता शहापूर व मुरबाड तालुक्यातील एकूण १६१.६० हे. जमीन लागणार आहे. सदर पुर्नवसन दोन्ही तालुक्यात ७ ठिकाणी करण्याचे प्रस्तावित आहे. महाराष्ट्र पुर्नवसन अधिनियम-१९९९ अंतर्गत प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुर्नवसन करण्यांत येत असून या प्रकल्पाची कलम ११ (१) ची अधिसूचना शासन राजपत्रात भाग १-कोंकण विभागीय पुरवणी मार्च १८-२४/२०१० मध्ये प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. दि. ४.०५.२०११ रोजी मंत्रालयात मा. मंत्री, मदत व पुनर्वसन, यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाची १२ वी बैठक पार पडली त्यात शाई प्रकल्पाचा अनुक्रमे रु. १३१.२६ कोटीचा पुनर्वसन आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

➢ **वनजमीन :-** या प्रकल्पासाठी ४९४.१४.६ हे. वनजमीन आवश्यक आहे. केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय, नवी दिल्ली, यांचे पत्र क्र. एफ नं. ८.९०/२०१०-एफ सी, दि.९.०५.२०११, अन्वये प्रकल्पाच्या वनजमीन प्रस्तावास केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय, नवी दिल्ली, या विभागाची तत्वतः मान्यता प्राप्त झाली आहे. तथापि वनविभागास एन.पी.व्ही.रक्कम अदा न केल्यामुळे अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही.

सुसरी पाणीपुरवठा प्रकल्प ता. डहाणू, जि. ठाणे

संक्षिप्त टिप्पणी

- सुसरी पाणीपुरवठा प्रकल्प, ता डहाणू, जि. ठाणे हा पाणी पुरवठा प्रकल्प असून या प्रकल्पाद्वारे वसई- विरार उपप्रदेशासाठी १८० द.ल.लि./दिन पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.
- या प्रकल्पाच्या प्राथमिक प्रस्तावास वसई-विरार महानगरपालिकेने दि.८.१२.२०१० च्या पत्रान्वये रु. २०२.१८ कोटी किंमतीस प्रशासकीय मंजुरी दिली होती.
- तदनंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा कमांक ९ मधील ठराव कमांक ९ अन्वये दि.१९.१.२०११ रोजी रु.३८९.४९ कोटी किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे.
- सुसरी प्रकल्पाचे काम **ठेव तत्वावर** करण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व वसई-विरार महानगरपालिका यांच्यामध्ये दि.२२.१२.२०११ रोजी सांमजस्य करार (MoU) झाला आहे.
- कंत्राटदारास कर्ज रुपाने बांधकाम अग्रीम रु. १५ कोटी द.सा.द.शे. १२ टक्के व्याज दराच्या आकारणीसह मंजूर केले आहे. या रकमेची व्याजासहीत पूर्ण वसूली निविदेतील ७५% काम पूर्ण होई पर्यन्त करण्याची अट अंतर्भूत आहे.
- सदरचा प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प असल्याने त्यास पर्यावरण विषयक मान्यतेची आवश्यकता नाही.
- **पाणीसाठा :-**

पाणीसाठा	दलघमी/(टी.एम.सी.)
एकूण साठा	६८.४५८/२.४१
उपयुक्त साठा	६७.६२९/२.३९
निर्मित साठा	---

- **प्रकल्पाची सद्यस्थिती :-**
  - **धरण :-** धरणाचे काम अदयाप सुरु झालेले नाही.
- **भूसंपादन, पुनर्वसन, वनजमिनी सद्यःस्थिती :-**
  - **भूसंपादन :-** सदर प्रकल्पासाठी ५ गावांतील ३७५ हे. क्षेत्रासाठी भूसंपादन प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यांचे काम प्रगतीपथावर आहे.
  - **पुनर्वसन :-** बुडीत क्षेत्रात येणाऱ्या गावांपैकी ५ पुर्णतः व ३ अशंतः गावांचे विस्थापन होणार असून त्याकरीता पुर्नवसन गावठाणाची जागा मिळविण्याची कार्यवाही प्राथमिक स्तरावर सुरु आहे.
  - **वनजमीन :-** प्रकल्पासाठी एकुण ४७९.०० हे. वनजमीन आवश्यक असून सदर वनजमिनीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र.१६०२ दि.१.६.२०१२ अन्वये उपवनसंरक्षक, वनविभाग, डहाणू यांचेकडे पाठविला आहे.

बाळगंगा पाणी पुरवठा, प्रकल्प ता. पेण जि. रायगड

संक्षिप्त टिप्पणी

बाळगंगा पाणीपुरवठा प्रकल्प, ता. पेण जि. रायगड हा पकल्प पाणीपुरवठा पकल्प असून त्याचा लाभ मुंबई महानगर क्षेत्राच्या आठ उपप्रदेशापैकी उप-प्रदेश ४ (नवी मुंबई), उपप्रदेश ५ (नेरळ, कर्जत, खोपोली, खालापूर), उपपदेश ६ (पनवेल, उरण) यांना पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी होणार आहे.

मा. मंत्री, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. २८.०१.२००९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार (शासन पत्र क्र. बैठक-२००९/प्र.क्र.२०/पापु-०६, मंत्रालय, दि. ४.०२.२००९ अन्वये प्रसृत केलेल्या इतिवृत्तातील मुद्दा क्र. ५ नुसार) बाळगंगा धरणाचे काम सिडकोच्या वतीने ठेव तत्वावर जलसंपदा विभागाने कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत हाती घ्यावयाचे ठरले.

सदर प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालास सिडकोने ५०३ व्या संचालकांच्या बैठकीत ठराव क्र. १००७०, दि. २४.०२.२००९ अन्वये रू. ५१२.७५ कोटी खर्चास (अनुषंगिक खर्च धरून) प्रशासकीय मंजूरी प्रदान केली आहे.

सदर प्रकल्पाचे काम जलसंपदा विभागामार्फत कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत ठेव तत्वावर करणेसाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई व कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्यात सामंजस्य करार दि. २३.०९.२००९ रोजी झाला आहे.

प्रकल्पाचा संक्षिप्त तपशील

चितळे समितीच्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या दुस-या अहवालातील खंड-२ मधील पृष्ठ क्र. ५०७ वर तसेच मुंबई वगळून मुंबई महानगर क्षेत्रातील इतर भागांसाठी पाणीपुरवठ्याचे उद्‌भव निश्चित करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालातील पृष्ठ क्र. ४.१५ वर पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून उल्लेख आहे.

बाळगंगा प्रकल्पाच्या धरणाची लांबी १११५ मी. असून महत्तम उंची ४०.१५ मी. इतकी आहे. सांडवा लांबी ९१.२५ मी. असून १२ ~ ६.५० मी. आकाराचे ६ दरवाजे आहेत. सदर प्रकल्पाद्वारे एकूण १४३.७८२ द.ल.घ.मी (५.०७.टी.एम.सी) इतका पाणीसाठा केला जाणार आहे.

भूसंपादन

सदर प्रकल्पामध्ये १४९३.८० हे. जमीन बुडीताखाली येणार असून त्यामध्ये ३६१.७५६ हे. वनजमीनीचा समावेश आहे. धरण पाया व बुडीत क्षेत्राची कलम ४ अधिसुचना डिसेबर २०११ मध्ये प्रसिध्द

करण्यात आली आहे. धरण पाया व बुडीत क्षेत्राची कलम ६ अधिसुचना नोव्हेंबर-२०१२ मध्ये प्रसिध्द करण्याचे नियोजन आहे.

मूळ अंदाजपत्रकात भूसंपादनाची तरतूद रू.९४.२४ कोटी होती. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार व त्याअनुषंगाने मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्प परिसरातील बाजारभाव विचारात घेवून जिल्हाधिकारी रायगड यांनी परिगणित केलेला जमिनीचा दर विचारात घेता तसेच महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९९९, लाभक्षेत्र नसलेल्या पाटबंधारे प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दि. १७.०३.२००६ अन्वये दयावयाच्या अतिरिक्त सुविधा यांचा विचार करता प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसनाच्या किंमतीत रू. ३७९.४६ कोटी (२५.५९ टक्के) इतकी वाढ होत आहे.

अ. क्र	वाढीची स्पष्टीकरण	मूळ मंजूर अंदाजपत्रकीय तरतूद(रू. कोटी)	प्रस्तावित सुधारित अंदाजपत्रकीय तरतूद (रू. कोटी)	वाढ (रू. कोटी)
१	जमिनीची किमत	९.५०	२०९.४०	१९९.९०
२	वनजमिनीची किंमत	२१.६२	३०.६७	९.०५
३	घरांचे मुल्यांकन	३०	३०	०
४	पुनर्वसनाच्या अतिरिक्त सुविधा	३३.१२	२०३.६३	१७०.५१
	एकूण	**९४.२४**	**४७३.७०**	**३७९.४६**

पुनर्वसन

बाधित १३ गावातील ३४४३ कुटुंबांचे पुनर्वसन ७ नवीन गावठाणात करावयाचे नियोजन आहे. पुनर्वसन गावठाणाची कलम ६ ची अधिसुचना जुलै २०१२ मध्ये राजपत्रात प्रसिध्द झाली आहे.

वनजमिन

प्रकल्पासाठी एकूण ३६१.७५६ हे. वनजमीन आवश्यक असून वन प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे दि.३.०३.२०१२ रोजी सादर करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या भिरा प्रकल्प, ता. माणगाव, जि. रायगड अंतर्गत संपादित जमिनीतून शिल्लक जमिनीपैकी वनासाठी पर्यायी जमिन म्हणून देण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

प्रकल्पाची सद्यःस्थिती

धरणाचे मातीकाम एप्रिल- २०१० पासून सुरू करण्यात आलेले असून आजअखेर सरासरी ६५ टक्के काम घळभाग वगळता धरणाचे दोन्ही तीरा वरील माथापातळी पर्यंत पूर्ण झालेले आहे. तसेच सांडवा व अनुषंगीक घटकांचे काम प्रगतीपथावर आहे.

कंत्राटदारास कर्जरुपाने बांधकाम अग्रीम रु. २५ कोटी इतकी रक्कम द.सा.द.शे. १२ टक्के व्याजाच्या आकारणीसह अदा केले आहे. अग्रिम मंजूर करतेवेळी मूळ अग्रिमाची रक्कम तसेच व्याजाची रक्कम ही निविदा रकमेच्या ७५% अदायगी पूर्ण होईपर्यन्त वसूल करण्यात यावी, या अटीच्या अधीन राहून अदा केली आहे. आतापर्यंत मुद्दलापोटी एकूण रू. १७.२३ कोटी एवढ्या अग्रिमाची वसूली करण्यात आली आहे. त्यावरील व्याजापोटी रू. ३.०७ कोटीची वसुली केली आहे.

प्रकल्पाच्या बांधकामा दरम्यान दरसूची, भूसंपादन व पुनर्वसन, संकल्पचित्र, इतर कारणांमुळे तसेच कंत्राटदाराने वेळोवेळी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होत असून प्रस्तावित वाढीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सविस्तर घटक संकल्पचित्रामुळे झालेली वाढः

बाळगंगा प्रकल्पाचे अंदाजपत्रकात सांडव्यासाठी १७२१ घ.मी. प्रतिसेंकद विसर्ग विचारात घेऊन १२.० मी. x ६.५० मी. चे चार वक्रद्वारांची तरतूद करण्यात आली होती. परंतु धरणामध्ये येणारा महत्तम पूर **(PMF)** विचारात घेता ३४५३ घ.मी. प्रतिसेंकद विसर्ग वाहून जाण्यासाठी मध्यवती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे संकल्पनानुसार १२.० मी. x ६.५० मी. चे सहा वक्रद्वार आवश्यक असल्यामुळे दोन वक्रद्वारांची वाढ झाली. त्याअनुषंगाने सांडव्याच्या खोदकाम, संधानक पूर्वरचित पूर्वबलित पूल वक्रद्वारे इत्यादि बाबींमध्ये वाढ अपेक्षित आहे. (रू.१९९.६० कोटी)

बाळगंगा धरणाच्या मंजूर अंदाजपत्रकामध्ये एम-१५ व एम-२० संधानकाचे एकूण परिमाण सुमारे ३.५ लक्ष घ.मी आहे. मंजूर अंदाजपत्रकामध्ये संधानकाचे काम पारंपारिक मिक्सर वापरुन करणेबाबत तरतूद आहे. प्रादेशिक दरसूची सन २००९-१० नुसार प्रकल्पाच्या बांधकामामध्ये संधानकाचे एकूण परिमाण १०००० घ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास बॅचिंग प्लँटद्वारे संधानक करणेची तरतूद आहे. सद्यःस्थितीत संधानकाचे एकूण परिमाण व काम पूर्ण करण्यासाठी असलेला मर्यादित कालावधी तसेच प्रादेशिक दरसूचीतील तरतूद विचारात घेउन संधानकाचे काम बॅचिग प्लँट, ट्रांझीट मिक्सर व कॉक्रीट पंप वापरुन करणे आवश्यक आहे. विभाजक व मार्गदर्शक भिंतीची उंची ५ मी पेक्षा जादा (जास्तीत जास्त १९ मी) असल्याने या कामासाठी स्टेजिंगचा वापर करण्यात येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून दरपृथःकरण करणेत आलेले आहे. यामुळे रू. ३९७.९० कोटी इतकी वाढ होणे अपेक्षित आहे.

इतर कारणे:

- धरणाचे प्राथमिक सर्वेक्षण सन १९८३-८४ मध्ये पाटबंधारे प्रकल्प व अन्वेषण विभागा मार्फत झाले. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या प्रचंड विरोधामुळे सविस्तर सर्वेक्षण करणे शक्य झाले नाही. धरणाच्या पायातील झाडे, धरणाचे जलरोधक खंदक, सांडवा पोहोच व पुच्छ कालवा यामध्ये खोदाई करतांना अति कठिण विशीष्ट प्रकारचा खडक आढळला त्यामुळे झालेल्या भू-स्तरातील बदलामुळे कठीण स्तराच्या परिमाणात वाढ होणार आहे.

- धरणाच्या अनुषंगिक बाबींच्या परिमाणामध्येही (गाभा भराव, कवच भराव, वाळू गाळणी, दगडी अश्मपटल, रॉक टो इ.) वाढ संभवते.

- मातीभरावाचे काम करत असताना उद्ग्रहण क्षेत्रात खोदकाम करतांना सुमारे ३५ ते ४० टक्के प्रमाणात अतिकठिण बोल्डर्स आढळले. कवच भरावाच्या कामासाठी अपेक्षित प्रमाणात माती मुरुम उपलब्ध होत नाही. त्यामुळे कामाची निर्धारीत गती मिळत नाही. सद्यःस्थितीत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे फारच मर्यादीत खाणक्षेत्र उपलब्ध झाले आहे. त्यामुळे वहन अंतरात वाढ होणार आहे.

- खोदकामातील टोळ बाजूला काढण्यासाठी अतिरिक्त परिश्रम लागतात. मुरूम खाणीतील खोदाई करताना खाणीतील वरच्या स्तरातील दगड विरहीत मुरूम दगडात मिसळत असल्याने मुरूम व दगड प्रत्यक्ष वापरात येईपर्यंत वेगवेगळे हाताळावे लागतात. सदर अतिरिक्त श्रमापोटी खर्चात वाढ अपेक्षित आहे.

धरणाचे जलरोधक खंदक, सांडवा पोहोच व पुच्छ कालवा यामध्ये सुरुंग पध्दतीने खोदाई करतांना मोठया प्रमाणात अति कठिण विशिष्ट प्रकारचा खडक आढळला. सुरूंग खोदाईमुळे गावातील घरांचे नुकसान झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी सुरूंग पध्दतीने खोदाई करण्यास विरोध केला. त्या अनुषंगाने वरिष्ठ भूवैज्ञानिक, पूणे यांनी पाहणी व सुचविलेल्या उपाययोजना नुसार कठीण स्तरातील खोदकाम नियंत्रित सुरूंग पध्दतीने केल्यामुळे खर्चात वाढ संभवते.

वरील कारणांमुळे होणारी वाढ विचारात घेऊन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सिडकोकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.

प्रकल्पावर झालेल्या खर्चाची विगतवारी

बाळगंगा प्रकल्पास सिडकोकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रकल्पावर जून-२०१२ अखेर रू. ५२०.६४ कोटी खर्च झालेला आहे.